# श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर

यांचे

# चरित्र

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चारित्र
सं. क्र. २६३.

REFBK-0005585

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
विजया देशमुखची भेट
२४-१०-३०

चरित्र २६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

खालील लिहिलेल्या तारखेप

# श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर

यांचें

# चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५५८५
REFBK-0005585

—लेखक—
केशव रामचंद्र दिवेकर

: मुद्रक :
**बी. जी. गण्डभीर,**
पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस,
सूर्य महाल, ठाकुरद्वार नाका,
मुंबई नं. ४.

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क लेखकानें
आपले स्वाधीन ठेविले आहेत.

**किंमत ३॥ रुपये**

: प्रकाशक :
**केशव रामचंद्र दिवेकर**
बी. ए., एल् एल्. बी., सॉलिसिटर,
गजानन भिमराव यांची वाडी.
ठाकुरद्वार नाका, मुंबई नं. २

# अर्पणपत्रिका

ज्यांनीं, नात्यागोत्याचा कोणताहि संबंध नसतां, पंचवीस वर्षें अनिमित्त बंधुप्रीतीनें वागविलें व प्रपंच-परमार्थीं स्वकर्तव्याची वेळोवेळीं जागृति देऊन ध्येयप्राप्तीचें कार्य सुकर केलें, ज्यांनीं आपल्याजवळ कित्येक वर्षें अत्यंत काळजीपूर्वक जतन करून ठेविलेली सर्व सामुग्री आपलेपणानें व पूर्ण विश्वासानें लेखकाच्या स्वाधीन करून आपल्या परम प्रिय प्रेममूर्ति व बोधस्वरूप वडील बंधूचें चरित्र लिहिण्याच्या सुसंधीचा अलभ्य लाभ करवून दिला आणि प्रोत्साहन व शुभाशीर्वाद देऊन त्याच्याकडून श्रीपंतमहाराजांची ही अल्पशी सेवा करवून घेतली त्या श्रीपंतबंधूंच्या चरणीं हा ग्रंथ अत्यंत नम्रतापूर्वक व कृतज्ञता-बुद्धीनें अर्पण असो

—लेखक

# प्रस्तावना

सर्वसाधारणपणें समग्र ग्रंथ लिहून झाला म्हणजे मग लेखक प्रस्तावना लिहितो व या प्रस्तावनेच्या बाबतींतहि तसाच प्रकार झालेला आहे. प्रस्तुत लेखकानें हा चरित्र-ग्रंथ लिहिला खरा; पण ही प्रस्तावना लिहिणें त्याला कठीण झालें आहे. कारण ग्रंथ लिहिणारी लेखणी जरी त्याची तरी चरित्रलेखनाला जरूर असलेली माहिती त्याला दुसऱ्यांकडून मिळालेली. त्यामुळें ग्रंथलेखनाचे कामीं त्याचा संबंध कांहींसा तिऱ्हाइता-सारखा होता असें म्हटलें असतांहि चालेल. पण या प्रस्तावनेचा प्रकार निराळा आहे. कारण तिच्या द्वारें बत्तीस वर्षांपूर्वी समाधिस्थ झालेले बेळगाव येथील श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांचें चरित्र लिहिण्याचें काम मुंबईतील रहिवासी जो प्रस्तुत लेखक त्याचेकडे कसें आलें या गोष्टीचा खुलासा करणें ओघानेंच प्राप्त झालें आहे व त्यायोगें त्याचा श्रीपंतमहाराजांशीं संबंध कसा आला हें निवेदन करणेंहि भाग झालें आहे.

शके १८२७ आश्विन वद्य ३ ( १६–१०–१९०५ ) रोजीं श्रीपंतमहाराजांनीं देह ठेविला. त्यांचा शिष्यवर्ग बराच मोठा असून त्यांत सुशिक्षित मंडळीहि कांहीं थोडी थोडकी नव्हती आणि त्यांच्यापैकीं कित्येकांना श्रीपंतमहाराजांचा सहवासहि पुष्कळ झालेला होता. तेव्हां त्यांचेपैकीं कोणीं तरी श्रीपंतमहाराजांचें चरित्र लिहिण्याचें काम केलें असतें तर तें फार चांगलें झालें असतें. पण तसें झालें नाहीं व ज्याला श्रीपंत-महाराजांचा अत्यल्प सहवास घडला होता अशा प्रस्तुत लेखकाकडे तें काम आलें हा विलक्षण योगायोग म्हटला पाहिजे !

श्रीपंतमहाराजांच्या हयातींत त्यांची प्रसिद्धि फारशी झालेली नव्हती. ते गृहस्थी बाण्यानें राहात असत आणि अखेरपर्यंत इंग्रजी शाळेंत शिक्षकाचें काम करीत होते. तसेंच त्यांचें वाङ्मयहि मुळींच प्रसिद्ध झालेलें नव्हतें. त्यामुळें 'साधु' म्हणून ते कोणाला फारसे माहीत नव्हते. फक्त त्यांचेशीं कोणत्या तरी निमित्तानें ज्यांचा संबंध आला किंवा कर्णोपकर्णी त्यांची किर्ति ऐकून परमार्थ–प्राप्तीकरितां जे त्यांचेकडे गेले त्यांना त्यांच्या साधुत्वाचा व बोधवैभवाचा फायदा घेतां आला. अशा लोकांपैकी लेखकाचे ग्रामबंधु म्हणजे सं. भोर, ता. सुधागड, मु. पडघवली येथील रहिवासी रा. वामन गजानन जोशी हे एक होत. १९०३ च्या मे महिन्यांत लेखकाचे वडील कै. ती. वे. रामभटजी दिवेकर हे ठाणें येथें अकस्मात कालाधीन झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या चिंताजनक स्थितींत लेखक व त्याचे वडील बंधु ती. वे. माधवभटजी यांना रा. जोशी यांनीं म्हटलेलीं श्रीपंतमहाराजांचीं कांहीं पदें ऐकण्यास मिळालीं आणि तेव्हांपासून अशीं अनुभवपर व रसाळ पदें कोणीं केलीं हें जाणण्याचें कुतूहल उत्पन्न होऊन शक्य तर तीं

ज्यांनीं केलीं त्यांच्या दर्शनाला आपण जावें असें त्यांना वाटूं लागलें. पुढें रा. जोशी यांचेपाशीं चौकशी केली असतां " श्रीपंतमहाराज हे गृहस्थाश्रमी असून फार अधिकारी सत्पुरुष आहेत" असें त्यांनीं सांगितलें आणि श्रीपंतबंधु नरसिंह रामचंद्र बाळेकुंद्री, वकील, बेळगाव, यांचा पत्ता देऊन ठेविला. तेव्हां ती. वे. माधवभटजी व प्रस्तुत लेखक यांना त्या वेळीं परमार्थप्राप्तीबद्दल फार तळमळ लागलेली असल्यामुळें त्यांचें आपसांत असें ठरलें कीं वे. माधभटजी यांनीं शके १८२६ मार्गशीर्ष शु. १५ ( श्रीदत्तजयंती ) च्या सुमारास म्हणजे डिसेंबर १९०४ मध्यें बेळगावास जाऊन श्रीपंतमहाराजांचें दर्शन घेऊन यावें व श्रीपंतमहाराजांसंबंधीं त्यांचा अनुकूल अभिप्राय पडल्यास लगेच नाताळच्या सुटींत लेखकानेंहि बेळगावास त्यांचे दर्शनास जावें.

त्या वेळीं लेखक हा ठाणें येथें बी. जे. हायस्कूलांत इंग्रजी सहाव्या इयत्तेंत शिकत होता. ठरल्याप्रमाणें वे. माधवभटजी बेळगावास गेले व श्रीपंतमहाराजांचें दर्शन घेऊन आणि दत्तजयंतीचा उत्सव त्यांचे घरीं करून आपले गावीं म्हणजे मु. पडघवली येथें परत आले; तों नाताळच्या सुट्टीनिमित्त लेखकहि तेथें गेला होता. वे. माधवभटजींनीं श्रीपंतमहाराजांसंबंधीं आपला अनुकूल अभिप्राय व्यक्त करितांक्षणीं लेखकालाहि त्यांच्या दर्शनाला जाण्याची उत्कंठा लागली व जान्युआरी १९०५ च्या सुरवातीला पुनः शाळा सुरू व्हावयाची असल्यामुळें त्यानें ताबडतोब आपल्या प. पू. ती. गं. मातोश्रींच्या संमतीनें बेळगावास जाण्याचा बेत केला आणि रा. जोशी हे त्याच वेळीं बेळगावास श्रीपंतमहाराजांचे घरीं जावयाचे असल्यामुळें त्यांच्याबरोबरच लेखकाचें जाण्याचें ठरलें. ३१–१२–१९०४ रोजीं जोशी यांचेबरोबर निघून १–१–१९०५ रोजीं सकाळीं सुमारें दहा साडेदहा वाजतां लेखक बेळगाव येथें देशपांडे गल्लींतील श्रीपंतमहाराजांच्या राहात्या वाड्यांत गेला व श्रीपंतमहाराजांचें दर्शन घेऊन आणि तो दिवस तेथें राहून दुसरे दिवशीं (२-१-१९०५) रात्रीं नवाच्या गाडीनें परत फिरला. त्या वेळीं लेखकाचें बेळगाव येथें सुमारें दीड दिवस राहाणें झालें. त्या अवधींत त्याला श्रीपंतमहाराजांच्या प्रत्यक्ष सहवासाचा जो काय लाभ झाला असेल तेवढाच. त्यानंतर ते सुमारें साडेनऊ महिने विद्यमान होते; पण लेखकाला त्यांच्या पुनदर्शनाचा योग जमून आला नाहीं ! चरित्र-नायकांशीं लेखकाचा हा जो अल्प संबंध आला तेंच त्याचें चरित्रलेखनाचे कामीं उपयोगी पडलेलें प्रत्यक्ष माहितीचें भांडवल होय ! त्यांतल्या त्यांत लेखक हा अगदीं अनोळखी ठिकाणीं एका थोर विभूतीच्या दर्शनाला याचक वृत्तीनें गेलेला असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं भिडस्तपणा व संकोच स्वाभाविकच होते; अशा स्थितींत श्रीपंतमहाराजांसारख्या थोर आणि पोक्त सत्पुरुषाचे नेहमींचे इतर व्यवसाय चालू असतांना त्यांचेशीं लेखकाचा संबंध तो कितीसा येणार व त्याला कितीसा बोध श्रवण करण्यास सापडणार ? पण त्या अल्प सहवासांतच श्रीपंतमहाराजांनीं " परमार्थप्राप्तीबद्दल काळजी नको. एकेरी अभ्यास चालूं दे " असें त्याला सांगून चालत्या गाड्याला जोराची गति दिली; आणि विशेष नवलाची गोष्ट ही कीं, श्रीपंतमहाराजांच्या प्रथम भेटींतच त्यांच्या निरपेक्ष प्रेमाचा व

बोधाचा लेखकाच्या अंतःकरणावर जो परिणाम झाला तो कायमचाच ! याप्रमाणें जरी स्थूल दृष्टया लेखकाला श्रीपंतमहाराजांच्या जीवनक्रमाची आणि त्यांनीं केलेल्या कार्याची फारशी प्रत्यक्ष माहिती नसली तरी त्यांच्या गद्य व पद्य वाङ्मयांत प्रगट झालेलें त्यांचें प्रेमळ अंतः-करण व त्यांचा दिव्य आत्मबोध यांच्याशीं मात्र गेलीं एकतीस बत्तीस वर्षे लेखकाचा चांगला परिचय झाला. पण वाङ्मयांत प्रतीत होणाऱ्या संतरूपाचें दर्शन सुलभ नाहीं. संतवाङ्मयांत व्यक्त झालेले स्वानुभवसिद्धांत म्हणजे सोलीव बदामगोळेच ते ! एकदम जरी ते पुष्कळसे खातां आले, तरी ते पचनीं कसे पडावे व आंगीं ब्रह्मपुष्टि कशी यावी ? सद्गुरुकृपेशिवाय तें होणें नाहीं व लोखंडाचे चणे खाल्ल्याशिवाय त्या कृपेचा लाभ होत नाहीं !

१९०५ च्या आक्टोबर महिन्यांत श्रीपंतमहाराजांनीं देह ठेविल्याची बातमी ऐकून लेखकाच्या अंतःकरणाला एक प्रकारचा धक्का बसला आणि बोधरवि अस्तंगत होऊन प्रेमझरा अटला कीं काय असें वाटूं लागून तो हताश झाला. त्याचा अभ्यासक्रम चालू होता व त्यांत प्रगतिहि होत होती. पण ज्या प्रेममूर्तीनें त्याचें चित्त आपल्याकडे आकर्षून घेतलें होतें ती अदृश्य झाली; श्रीपंतमहाराजांच्या बंधूंशीं त्याचा फारसा परिचय झालेला नव्हता व योग्य असा दुसरा मार्गदर्शकहि कोणी नव्हता. त्यामुळें त्याला चुकल्याचुकल्यासारखें वाटून कित्येक वेळां त्याच्या चित्तवृत्ति भांबावून जाऊन अनंतावर थडका मारण्यास जात आणि सद्गुरूच्या अकलंक भक्तवत्सल ब्रीदावर प्रहार करीत. तसेंच बिकट परिस्थितीचे फटके व मनस्तापाचे चटके बसत असतांना आणि विचारांचें काहूर माजलें असतांना श्रद्धेच्या चिंधड्या उडून श्रीपंतमहाराजांच्या बोधाला व वचनांना कस लागण्याचे प्रसंग येऊं लागले आणि त्या बोधाची व वचनांची सत्यता जर पटली नाहीं तर आपण साफ फसलों अशी शंका डोकावूं लागण्यापर्यंतहि कधीं कधीं मजल जाई ! अशा निराशेच्या स्थितींत जरी एका लहानशा वहींत टिपून घेतलेल्या श्रीपंतमहाराजांच्या कांहीं पदांचा संजीवनीमात्रेप्रमाणें उपयोग होत असे व श्रीपंतमहाराजांच्या भक्तांच्या मधुन मधुन गाठी पडून चित्ताला समाधान वाटे, तरी सुमारें चार-पाच वर्षे अंतःकरणांतील तळमळ कायमच होती. पुढें १९१०–११ च्या सुमारास श्रीपंतबंधूंचा परिचय होऊन अनिमित्त बंधुप्रीतीचा अनुभव अधिकाधिक येऊं लागला. श्रीपंतबंधूंच्या प्रमुखत्वाखाली "श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री, बुद्रुख" या संस्थेची स्थापना होऊन तेथें प्रतिवर्षी श्रीपंतमहाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव थाटानें होऊं लागला आणि अशा कांहीं प्रसंगीं कित्येक श्रीपंतभक्तांच्या भेटी होऊन त्यांचेकडून श्रीपंतमहाराजांसंबंधीं बोधप्रद व गुरुप्रेमानें हृदय उचंबळण्यास लाविणाऱ्या गोष्टीहि ऐकण्यास मिळूं लागल्या.

वरील सर्व प्रकारांनीं श्रीपंतमहाराजांच्या वियोगानें लेखकाला वाटणारी हळहळ कांहींशी कमी झाली खरी; तरी पण आपणास त्या प्रेममूर्तीच्या सहवासाचा पुरेपूर लाभ झाला नाहीं व अमोघ बोधवृष्टीनें आपले कर्ण धाले नाहींत या गोष्टींची त्याला वाटणारी रुखरुख मात्र कायमच होती. अंतःकरणांत पडलेली ही घाड आतां भरून निघणें शक्य नाहीं असें

वाटून कधीं कधीं मन उदास होई व ज्या भाग्यवंतांना श्रीपंतमहाराजांच्या सान्निध्यांत प्रेम-सुख अनुभवण्यास अथवा त्यांचा दिव्य बोध श्रवण करण्यास सापडलें त्यांचा हेवाहि वाटे. नाहीं म्हणावयाला श्रीपंतमहाराजांच्या पश्चात् लौकरच " श्रीदत्तप्रेमलहरी " नावाचा त्यांच्या पदांचा संग्रह श्रीपंतबंधूंनीं छापून प्रसिद्ध केल्यामुळें चित्ताला शांति मिळण्याचें व श्रीपंतमहाराजांच्या अंतःकरणाची खरी ओळख पटण्याचें एक सर्वोत्कृष्ट साधन हातीं आलें आणि त्रिविध तापांनीं गांजल्या वेळीं तें एक विश्रांतिस्थानच लाभलें. त्याचप्रमाणें श्रीपंतमहाराजांचा " भक्तालाप " लेख लौकरच छापला गेल्यामुळें चित्ताला समाधान होण्याचे कामीं त्याचाहि फार उपयोग होऊं लागला. पण श्रीपंतमहाराजांचीं पदें व त्यांचे कांहीं लेख यांचेशीं जसजसा लेखकाचा अधिकाधिक परिचय होऊं लागला व त्यांत व्यक्त झालेल्या आध्यात्मिक अनुभवांचा उपनिषदें, श्रीमद्भगवद्गीता वगैरे संस्कृत ग्रंथ आणि मराठींतील संत-वाङ्मय यांच्यांत व्यक्त झालेल्या आध्यात्मिक अनुभवांशीं कसा मेळ बसतो हें निदर्शनास येऊं लागलें, तसतसें त्यांचें चारित्र्य, त्यांच्या आयुष्यांतील निरनिराळे प्रसंग, त्यांची बोधशैली वगैरे गोष्टी जाणण्यासंबंधीं त्याला अधिकाधिक कुतूहल वाटूं लागलें आणि त्यांच्या जुन्या जुन्या भक्तांनीं त्यांचेसंबंधीं केलेलीं रसभरित वर्णनें ऐकून तें अधिकच वाढलें.

अशा परिस्थितींत १९१२ सालीं श्रीपंतबंधु रा.ब. गोपाळरावजी मुंबईस आले असतां त्यांनीं सहज बोलतां बोलतां " पंतांचें चरित्र लिहिण्याचें काम तुला करावें लागेल " असें लेखकाला म्हटलें. तेव्हां " श्रीपंतमहाराजांचें चरित्र अनंत आहे; तें लिहिणें आपणाकडून होणार नाहीं " असें त्यानें उत्तर दिलें. पुढें १९१५ सालीं आक्टोबर-नोव्हेंबरच्या सुमारास श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथील श्रीपंतमहाराजांच्या पुण्यतिथीच्या उत्सवाच्या निमित्तानें आपल्या प. पू. मातोश्रींसह लेखक बेळगावाकडे गेला असतां त्याला सुमारें दीड दोन महिने धारवाड, हुबळी, कुरुंदवाड, कोल्हापूर वगैरे ठिकाणीं जाऊन श्रीपंतमहाराजांच्या कित्येक जुन्या आणि अनुभवी भक्तांच्या भेटी घेण्याची व त्यांचेकडून श्रीपंतमहाराजांसंबंधीं पुष्कळशी माहिती मिळविण्याची सुसंधि मिळाली. त्या वेळीं श्रीपंतमहाराजांचें चरित्र लिहिण्याची त्याला स्वतःला कल्पनाहि नव्हती. फक्त ज्यांना आपण अत्यंत पूज्य मानतों व जे आपणाला आपल्या प्रेमरूपाची आणि बोधरूपाची एकदांच चमक दाखवून व चटका लावून अदृश्य झाले त्यांच्या सत्य स्वरूपाची ओळख व्हावी म्हणून, केवळ कुतूहल-बुद्धीनें, ती माहिती मिळविण्याचा त्याचा हेतु होता. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं त्या वेळीं त्याला भेटलेले श्रीपंतमहाराजांचे कांहीं अनुभवी भक्त मात्र आपण दिलेली माहिती त्यानें टिपून ठेवावी या बुद्धीनें सांगत असत आणि त्या माहितीचा या चरित्रलेखनाचे कामीं पुष्कळ फायदाहि झालेला आहे.

१९२३ सालीं श्रीपंतबंधु रा. ब. गोपाळरावजी पुन्हां एकदां मुंबईस आले असतां " श्रीपंतांचें चरित्र तुलाच लिहावें लागेल " असें त्यांनीं पुनः म्हटलें. तेव्हांहि लेखकानें पूर्वींप्रमाणेंच जबाब दिला व त्या कामीं आपली अपात्रता दर्शविली. मात्र १९२३ सालीं

श्रीपंतबंधूंच्या आज्ञेवरून प्रस्तुत लेखक आणि त्याचे आप्त व सहकारी आणि श्रीपंतमहाराजांचे एक शिष्य कै. हरि पुरुषोत्तम ऊर्फ बाळ दिवेकर यांनीं "श्रीदत्तप्रेमलहरी" या पदसंग्रहाच्या तृतीयावृत्तीला उपोद्‌घात लिहिला व त्याकरितां श्रीपंतमहाराजांच्या पदांचें बारकाईनें निरीक्षण करावें लागलें आणि तेव्हांपासून बोधान्नाची भूक अधिकच वाढली व प्रेमतृष्णा वृद्धिंगत होत गेली. १९२६—२७ सालीं "श्रीदत्तप्रेमलहरी पुष्पमाला" या नावानें श्रीपंत-महाराजांचें गद्य वाङ्मय प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांच्या एका शिष्यानें त्यांच्या बोधाचीं केलेलीं टिपणें छापून प्रसिद्ध करण्याचें श्रीपंतबंधूंनीं ठरविलें व तीं तपासून जरूर तेथें दुरुस्त्या करण्यास लेखकाला सांगितलें. तेव्हां श्रीपंतमहाराजांच्या बोधसागरांत यथेच्छ डुंबण्याची ही सुसंधि अनायासें आलीसें वाटून त्यानें तें मोठ्या आनंदानें पतकरिलें व तें पुरें होण्यास सुमारें चार वर्षें लागलीं. श्रीपंतमहाराजांच्या बोधाचीं तीं टिपणें बालबोध लिपींत लिहिलेलीं होतीं. पण ज्या भक्तवरानें तीं लिहून ठेविलीं त्याची मातृभाषा कानडी असल्यामुळें तीं व्याकरणदृष्ट्या फारशीं शुद्ध नव्हतीं. त्यामुळें तीं तपासून छापण्यासारखीं करण्याकरितां लेखक व त्याचे सहकारी बाळ दिवेकर यांना त्यांचें फार बारकाईनें परिशीलन करावें लागलें आणि त्यायोगें श्रीपंतमहाराजांचा बोध श्रवण करण्यास न मिळाल्यानें वाटणारी उणीव बऱ्याच अंशानें भरून निघाली. १९३१-३२ सालीं "श्रीदत्तप्रेमलहरी पुष्पमालें"तील पुष्प ७ व ८ च्या रूपानें श्रीपंतमहाराजांचा हा बोध प्रसिद्ध झाला आहे.

१९३१ च्या सुमारास श्रीपंतबंधूंनीं 'श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री, बुद्रुख' या संस्थेचें विश्वस्तिपत्र करण्याचें ठरविल्यामुळें त्यांनीं प्रस्तुत लेखकाला आपल्या कायद्याच्या अभ्यासाचाहि श्रीपंतमहाराजांच्या कार्याकडे उपयोग करण्याची सुसंधि दिली व १९३३ सालीं तें कार्यहि पुरें झालें. त्यापूर्वींच श्रीपंतबंधूंपैकीं वामनरावजी व नरसिंहरावजी यांनीं इह-लोकची यात्रा संपविली होती व गोविंदरावजी आणि रा. ब. गोपाळरावजी यांनीं त्या वेळीं सत्तरीच्या घरांत पदनिक्षेप केल्यामुळें त्याना 'कृतांतकटकामलध्वज जरा दिसूं लागली' होती. अशा स्थितींत श्रीपंतचरित्र लिहिण्याचें कार्य शक्य तर आपल्या देखत करवून घ्यावें असें वाटून त्या वेळीं विद्यमान असलेल्या श्रीपंतबंधूंनीं प्रस्तुत लेखकावरील आपल्या अकृत्रिम प्रेमामुळें व पूर्ण विश्वासामुळें १९३२ च्या नाताळांत त्याला बेळगाव येथें बोलावून घेऊन आपला मनोदय कळविला आणि श्रीपंतमहाराजांचें चरित्र लिहिण्याची आज्ञा केली. तेव्हां स्वतःच्या शरीरदौर्बल्याची व जिकीरीच्या व्यवसायाची लेखकाला जाणीव असूनहि "आज्ञा म्हणजे शक्तिदान, आज्ञा करणाऱ्याच्या इच्छेचें प्रसरण; आज्ञा घेणारा नाममात्र, निमित्तमात्र" (पु. ८-२१०) या श्रीपंतमहाराजांच्या वचना-वर विश्वसून त्यानें मोठ्या उत्सुकतेनें व हौसेनें श्रीपंतबंधूंची ती कळकळीची, प्रेमाची आणि आपलेपणानें केलेली आज्ञा शिरसा मान्य केली. लगेच त्यांनीं आपल्याजवळ अत्यंत परिश्रम करून जमवून ठेविलेली श्रीपंतमहाराजांच्या चरित्रासंबंधाची सर्व सामुग्री १९३३ च्या जान्युआरीच्या सुरवातीला लेखकाचे स्वाधीन केली व श्रीपंतबंधु गोविंदरावदादांनीं

श्रीपंतचरित्र काय धोरणानें लिहावें यासंबंधीं पुढीलप्रमाणें कांहीं अत्यंत मार्मिक सूचनाहि केल्या. दादा म्हणाले "पंतांचें चरित्र लिहितांना त्यांचा जीवनक्रम शक्य तितका जशाचा तसाच वर्णन करा. अद्भुत चमत्कारांची रेळचेल करून, त्याला कृत्रिम स्वरूप देऊन तें भडक रंगांनीं रंगवूं नका. मात्र त्यांच्या वाङ्मयांत व्यक्त झालेलें त्यांचें प्रेमस्वरूप व बोधस्वरूप हीं वाचकांपुढें व्यक्त करून दाखवा." प्रेमळ दादांचे श्रीपंतचरित्रासंबंधाचे वरील प्रकारचे उद्गार ऐकून त्यांच्या शुद्ध व सरळ विचारसरणीबद्दल फार विस्मय वाटला. दादा फारसे शिकलेले नव्हते. पण त्यांचा स्वभाव फार प्रेमळ, साधा व निगर्वी असून त्यांनीं पंचवीस-तीस वर्षें श्रीपंतमहाराजांच्या सान्निध राहून त्यांची अत्यंत मनोभावानें सेवा केली होती. त्यामुळें श्रीपंतमहाराजांच्या सहज राहाटीचें, प्रेमळ स्वभावाचें व शुद्ध बोधाचें चित्र त्यांच्या सतत नजरेपुढें होतें. श्रीपंतमहाराजांच्या पश्चात् त्यांनीं तोच कित्ता गिरविला आणि म्हणून श्रीपंतमहाराजांच्या चरित्रांतहि त्यांची प्रपंचपरमार्थांतील सहज राहाटी, त्यांचें प्रेमळ व दयार्द्र अंतःकरण, त्यांचा शुद्ध अद्वैतबोध व अभेदभक्तिरहस्य हीं शक्य तितकीं उमटलीं जावीं असें दादांना मनापासून वाटत होतें व त्याप्रमाणें ते लेखकाशीं वेळोवेळीं बोलूनहि दाखवीत.

दादांच्या वरील सूचनेमुळें लेखकाला श्रीपंतमहाराजांचें चरित्र लिहिण्याचे कामीं फार हुरूप वाटूं लागली. कारण जरी मागें लिहिल्याप्रमाणें त्याचेजवळ श्रीपंतमहाराजांच्या प्रत्यक्ष सहवासांत मिळालेल्या चरित्रलेखनाला अवश्य अशा माहितीचें भांडवल फारच अल्प होतें तरी प्रेमळ दादांच्या मार्मिक सूचनेप्रमाणें उपलब्ध असलेल्या माहितीच्या साह्यानें श्रीपंतमहाराजांच्या वाङ्मयांत व्यक्त झालेल्या त्यांच्या प्रेमरूपाचें व बोधरूपाचें या चरित्राच्या द्वारें यथामति व यथाशक्ति वर्णन करावें असें त्यानें ठरविलें. श्रीपंतचरित्रलेखनाला लागणाऱ्या या सामुग्रीचें भांडवल मात्र श्रीपंतमहाराजांनीं विपुल साठवून ठेविलें आहे. त्यांचें वाङ्मय म्हणजे त्यांनीं अनुभवोदधीच्या केलेल्या मंथनांत निघालेलें नवनीतच असून त्यांत त्यांचे विविध भूमिकांवरील अनुभव व्यक्त झाले आहेत. त्यामुळें या चरित्रांत शक्य तोंवर त्यांच्या स्वतःच्या गद्य व पद्य वाङ्मयाचा उपयोग केला आहे व विशेषतः श्रीपंतमहाराजांचे गुरु श्रीबालमुकुंद ऊर्फ श्रीबालावधूत यांच्यासंबंधीं या ग्रंथांत दिलेली माहिती तर मुख्यत्वेंकरून श्रीपंतमहाराजांच्या वाङ्मयांतच उपलब्ध झालेली आहे. तेव्हां असें म्हणावयास हरकत नाहीं कीं या चरित्रलेखनाचे कामीं उपयोगी पडलेलें मुख्य साधन म्हणजे श्रीपंतमहाराजांचें वाङ्मय व त्यांनीं करून ठेविलेलीं टिपणें हेंच होय.

चरित्रलेखनाच्या कामीं उपयोगी पडलेलें दुसरें साधन म्हणजे श्रीपंतबंधु व श्रीपंतभक्त यांनीं श्रीपंतमहाराजांसंबंधीं लिहिलेली माहिती आणि श्रीपंतमहाराजांच्या संगतींत आलेल्या आपापल्या अनुभवांचीं केलेलीं टिपणें हें होय. असे लेख १६७ आहेत व ते लिहिणारांची यादी या चरित्राच्या अखेर परिशिष्ट "अ" मध्यें दिली आहे. या चरित्राच्या प्रकरण ४५, ५० व ५१ मध्यें या लेखांसंबंधीं खुलासेवार माहिती दिलेली

असल्यामुळें येथें त्यांसंबंधीं अधिक लिहीत नाहीं. मात्र, लेखकाला एवढें म्हटल्याशिवाय राहावत नाहीं कीं वरील लेखकांनीं लिहिलेल्या माहितीचा चरित्रलेखनाच्या कामीं चांगला उपयोग झाला हें तर खरेंच; पण त्याला स्वतःला या लेखांच्या वाचनानें अपरिमित फायदा झाला आहे. कारण त्यांच्यामध्यें श्रीपंतमहाराजांच्या बालपणापासूनचीं निरनिराळ्या वेळीं घेतलेलीं छायाचित्रें व कित्येक प्रेमळ भक्तांच्या भक्तियुक्त आणि प्रेमळ अंतःकरणांचीं सुंदर शब्दचित्रें पाहाण्यास सापडून भक्तिप्रेमाची लूट करण्यास मिळाली. त्यामुळें या सर्व लेखकांचा लेखक अत्यंत ऋणी आहे.

येथें हें नमूद करणें जरूर वाटतें कीं आपल्या पात्रापात्रतेचा व बलाबलाचा फारसा विचार न करितां, श्रीपंतमहाराजांचें चरित्र लिहिण्याचें महत्वाचें व जबाबदारीचें हें जें कार्य लेखकानें पतकरिलें तें पुष्कळसें स्वार्थी बुद्धीनें पतकरिलें. कारण ज्या श्रीपंतमहाराजांचा सहवास अगदीं थोडा झाल्याबद्दल त्याला खेद वाटत असे, पण ज्यांच्या एकदांच झालेल्या दर्शनानें त्याच्या जीवनक्रमांत व विचारांत अद्भुत क्रांति घडवून आणिली त्यांचें चरित्र लिहिण्याचें कामच हातीं घेतलें म्हणजे अथपासून इतिपर्यंत त्यांच्या जीवनक्रमाचें बारकाईनें निरीक्षण करण्यास सापडेल, सहज ओघानें त्यांच्या वाङ्मयोदधींत पोहण्यास मिळेल, त्यांच्या शिष्यांनीं व भक्तांनीं त्यांच्यासंबंधीं भक्तिप्रेमानें लिहिलेले सर्व लेख वाचण्यास सापडतील आणि त्यायोगें आपणा स्वतःला फार फायदा होईल असें त्याला वाटत होतें. श्रीपंतमहाराजांचें स्वदस्तुरचें सर्व वाङ्मय, त्यांनीं करून ठेविलेलीं टिपणें व संग्रहीं ठेविलेले महत्वाचे कागद आणि श्रीपंतभक्तांकडून लिहून आलेले अनुभवपर लेख म्हणजे चरित्रलेखनाला जरूर असलेली सर्व सामुग्री श्रीपंतबंधूंजवळ होती व श्रीपंतबंधु नरसिंहरावजी त्या सर्व कागदांना इतके जपत कीं ते सर्व एका अग्निप्रतिबंधक पेटींत ठेवून ती नेहमीं आपल्या निजण्याच्या पलंगडीखालीं ठेवीत व ते फारसे कोणाला दाखवीत नसत. त्यामुळें श्रीपंतबंधूंखेरीज वरील सर्व कागद कोणीं वाचले असल्याचें दिसत नाहीं. अशा स्थितींत आपल्याकडे अनायासें चालून आलेल्या या सर्व वाङ्मयभांडाराचा लेखकानें अत्यादरपूर्वक स्वीकार केला आणि त्याच्या अटकळीप्रमाणें चरित्रलेखनाचे कामीं त्याचा फार उपयोग तर झालाच; पण गेलीं पाच वर्षें त्याला नित्य नव्या उल्हासानें जणूं प्रेमसागरांत डुंबण्यास मिळालें. तें अनुपम सुख वर्णनातीत होय ! आवड गोड असल्यामुळें आवडीच्या कार्यांत मनुष्याला श्रमांची अगर त्रासाची किंमत वाटत नाहीं; उलट ते त्या गोडींत भरच घालितात ! श्रीपंतचरित्ररूपी ही कृति कशी काय वठली आहे हें सांगणें जरी लेखकाच्या अटकळीबाहेरचें असलें तरी चरित्रलेखनाचें कार्य हातीं घेण्यांतील त्याचा हेतु पूर्णपणें साधला असून त्याला तृप्तीचें आणि समाधानाचें पारितोषक मिळालें आहे ही गोष्ट येथें नमूद केल्याशिवाय त्याच्यानें राहवत नाहीं.

चरित्रलेखनाचे कामीं उपयोगी पडलेलें तिसरें साधन म्हणजे कांहीं महत्वाच्या ठिकाणीं जाऊन व कांहीं व्यक्तींना भेटून लेखकानें मिळविलेली माहिती हें होय. अशी

ठिकाणें म्हणजे ( १ ) बेळगाव, ( २ ) पार्शवाड, ता. खानापूर जि. बेळगाव, श्रीपंत-महाराजांचे गुरु श्रीबालमुकुंद यांचें मूळ गाव ( ३ ) देसनूर, ता. संपगाव, जि. बेळगाव. श्रीबालमुकुंदांनीं श्रीपंतमहाराजांकडून योगसाधन करविलें तें ठिकाण, ( ४ ) कडेगुद्दी, ता. शहापूर, जि. बेळगांव, श्रीबालमुकुंदांच्या सिद्धावस्थेंतील राहाण्याचें ठिकाण व ( ५ ) दड्डी, ता. हुक्केरी, जि. बेळगाव, श्रीपंतमहाराजांचें जन्मस्थान हीं होत. त्याचप्रमाणें कुरुंदवाड, कोल्हापूर, धारवाड, हुबळी, अकोळ, हुक्केरी, कोचरी, चिकाल्गुड वगैरे ज्या ज्या गावीं श्रीपंतमहाराज गेले होते, त्या त्या गावीं लेखकाला चरित्रलेखनाचे कामीं उपयुक्त अशी बरीच माहिती मिळाली. तसेंच ज्या सद्‌गृहस्थांनीं श्रीपंत-महाराजांसंबंधाची माहिती मोठ्या उत्सुकतेनें दिली ते पुढीलप्रमाणें होत. ( १ व २ ) श्रीपंतमहाराजांचे मेहुणे, दड्डी येथील श्रीयुत अंबाजी श्रीपाद ऊर्फ दादासाहेब कुळकर्णी व बेळगाव येथील श्रीयुत शेषो श्रीपाद ऊर्फ बाबासाहेब कुळ-कर्णी, बी. ए., एल् एल्. बी. वकील, ( ३ ) श्रीयुत बाळकृष्ण श्रीनिवास कुळकर्णी मु. पार्शवाड ( जनक घराण्यांतील ) श्रीबालमुकुंदांचे पुतणे ( ४ ) बेळगाव येथील सुप्रसिद्ध व वयोवृद्ध वकील श्रीयुत रावजी गंगाधर खोत, श्रीपंतमहाराजांचे शिक्षक, (५) कै. राम-चंद्रराव सुंठणकर, बेळगावमधील एक धनिक गृहस्थ, श्रीपंतमहाराजांचे बालमित्र व अखेरपर्यंतचे हितचिंतक, ( ६ ) श्रीयुत सदाशिव वासुदेव जोग, वकील, शहापूर, श्रीपंत महाराजांचे इंग्रजी शाळेंतील विद्यार्थी व कांहीं वर्षे समकालीन शिक्षक, ( ७ ) शहापूर येथील श्रीयुत विष्णु लक्ष्मण काळे, लंडन मिशनस्कूलमधील श्रीपंतमहाराजांचे समकालीन शिक्षक, ( ८ ) बेळगाव येथील श्रीयुत वामन शामराव करगुप्पीकर, रिटायर्ड ओव्हरसियर कै. अमृतराव देशपांडे ( श्रीपंतमहाराजांचे एक शिष्य ) यांचे मेहुणे वगैरे. वरील सद्-गृहस्थांनीं श्रीपंतमहाराजांसंबंधीं महत्वाची माहिती दिली याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे. तसेंच ज्या श्रीपंतभक्तांनीं श्रीपंतमहाराजांसंबंधीं लेखकाला तोंडी माहिती दिली व ज्यांची संख्या फार मोठी असल्यामुळें ज्यांचा व्यक्तिशः नामनिर्देश करणें शक्य नाहीं त्यांचाहि लेखक फार ऋणी आहे.

शुद्ध प्रेम व अद्वैत बोध हेंच ज्यांच्या जीवितांचें रहस्य त्या श्रीपंतमहाराजांच्या चरित्राचें यथार्थ कथन करणें हें लेखकाला कांहींसें आपल्या आवांक्याच्या बाहेरचें वाटत आहे. कारण आत्मानुभवाचा गाभा हा निःशब्द व शुद्ध अद्वैत बोध तर बोध्य, बोधक व बोध या सर्वांचाच फडशा उडविणारा. तेव्हां श्रीपंतमहाराजांसारख्या सिद्ध पुरुषाची अंत-रंगस्थिति अथवा अवधूतवृत्ति ही वर्णनातीतच असावयाची. तेथील निष्कंटक स्वानंद-साम्राज्याचे भोक्ते तेच. हें जरी खरें असलें तरी भाविक, आर्त, जिज्ञासु व मुमुक्षु यांचे-करितां तिळतिळ तुटणारें त्यांचें दयार्द्र अंतःकरण वैखरीवाटें अथवा लेखणीच्या द्वारें मधुन मधुन व्यक्त होत असतें आणि त्यावरून इतरांना त्यांच्या खऱ्या अधिकाराची कांहींशी कल्पना होते. त्याचप्रमाणें अशा सिद्ध पुरुषांची सिद्धावस्था ही कांहीं एकदम प्राप्त झालेली नसते. तर त्या अवस्थेंतील देवकळा अंगीं येण्यापूर्वीं त्यांनीं टाकीचे असंख्य

घाव सोसलेले असतात व लोखंडाचे चणे खाल्लेले असतात. प्रण बहुतेक सत्पुरुषांच्या साधक स्थितींतील अनुभवांसंबंधाची माहिती मात्र फारशी उपलब्ध होत नाहीं. पण या बाबतींत श्रीपंतमहाराजांचा प्रकार निराळा होता. कारण त्यांनीं स्वतःच आपल्या साधक दशेंतील अनुभव खुलेपणानें जागजागीं लिहून ठेविलेले असल्यामुळें आणि आपल्या आध्यात्मिक अनुभवांची परिणति ज्या टप्प्यांनीं झाली त्यांच्यासंबंधीं टाचणें करून ठेविलीं असल्यामुळें त्यांचा मागोवा घेतां येतो. हीं टाचणें म्हणजे सुप्रसिद्ध आंग्ल कवि लॉंगफेलोनें म्हटल्याप्रमाणें "Foot-prints on the sands of Time" ( अनंतकाळरूपी रेताड यशस्वी रीतीनें तुडवून गेलेल्या प्रवाश्याचीं त्यांत उमटलेलीं पदचिन्हेंच ) होत व तीं साधकांना आणि मुमुक्षूंना मार्गदर्शक होतील असा भरंवसा वाटतो. तसेंच या टाचणांवरून आपल्या ठिकाणीं आत्मानुभव स्थिरावून पूर्णावस्था बाणेपर्यंत विविध मार्गांनीं प्रयत्न करण्याची श्रीपंतमहाराजांनीं कशी परमावधि केली होती तेंहि दिसून येईल. अत्यंत गरिबीच्या स्थितींत विद्याभ्यास चालू असतांना आणि वाढता प्रपंच सांभाळून शिक्षकाचें काम करीत असतांना हे सर्व प्रयत्न त्यांनीं कसे केले व प्रपंच आणि परमार्थ यांची आपल्या आयुष्यक्रमांत कशी बेमालुम सांगड घालून दिली व दोन्हीहि कसे उत्तम रीतीनें साधले तें या चरित्रांत पाहावयास सापडेल. त्यामुळें तें जिज्ञासु व मुमुक्षु यांना बोधप्रद आणि मार्गदर्शक होईल असा भरंवसा वाटतो. सद्गुरूची पूर्ण कृपा, भावनाप्रधान अंतःकरण, कुशाग्र बुद्धि व दीर्घ पुरुषप्रयत्न यांचा त्यांच्या ठिकाणीं उत्तम मिलाफ झाला असल्यामुळें आणि उत्कट गुरुभक्ति, शुद्ध प्रेम व खडा तत्वबोध यांना त्यांच्या चरित्रांत अग्रस्थान मिळालें असल्यामुळें भाविकांना व अध्यात्म–विषयाची गोडी असलेल्या विचारवंतांनाहि तें उपयुक्त होईल अशी खात्री वाटते. त्यामुळें हा चरित्रग्रंथ लक्षपूर्वक वाचावा अशी लेखकाची वाचकांना कळकळीची विनंति आहे व तिला भाविक, सुज्ञ, रसिक व मार्मिक वाचक मान देतील अशी आशा आहे. या चरित्राच्या वाचकांत जे श्रीपंतमहाराजांचे अनुयायी अगर भक्त असतील ते हें समग्र चरित्र आवडीनें वाचतील अशी लेखकाला खात्री वाटते. कारण चरित्रनायकांवरील त्यांची निरतिशय भक्ति तें त्यांचेकडून करवील. पण जे वाचक या वर्गांतील नसतील त्यांना कदाचित् या चरित्रांतील बारीक सारीक गोष्टींचीं वर्णनें वाचण्यांत फारशी मौज वाटणार नाहीं. तेव्हां अशा वाचकांना लेखकाची अशी नम्र विनंति आहे कीं जर त्यांना हें सगळें चरित्र वाचावयाचें नसेल तर त्यांनीं निदान त्यांतील ४३–४९ हीं सात प्रकरणें तरी अवश्य वाचावीं. सदर प्रकरणांत अवधूत संप्रदाय (प्र. ४३), श्रीपंतमहाराजांची आध्यात्मिक भूमिका (प्र. ४४), त्यांचें अवतारकार्य अथवा शिष्यप्रबोधनकार्य ( प्र. ४५ ), काव्यस्फूर्ति व सिद्ध कवींची भूमिका ( प्र. ४६ ), बोधस्फूर्ति व त्यांचे बोल अथवा सहजोद्गार ( प्र. ४७ ), योगमार्गांतील प्रभुत्व चमत्कार ( प्र. ४८ ) आणि गृहस्थ व शिक्षक या त्यांच्या भूमिका ( प्र. ४९ ) वगैरे विषयांचें विस्तृत विवेचन केलें आहे. त्यामुळें हीं प्रकरणें वाचलीं असतां श्रीपंतमहाराजांच्या अधिकारासंबंधीं वाचकांना पुष्कळशी कल्पना येईल.

येथें आणखी एका गोष्टीचा खुलासा करावासा वाटतो ती ही कीं श्रीपंतमहाराजांच्या चरित्रांत आणीबाणीचे उठावदार प्रसंग अगर जगाला थक्क करून सोडणाऱ्या चमत्कृति-जनक गोष्टी यांपैकीं फारसें कांहीं आढळणार नाहीं. पण त्यांच्या चरित्राचें महत्व त्यांच्या आध्यात्मिक उन्नतींत व बोधवैभवांत आहे. त्यामुळें त्यांच्या वाङ्मयांतील उतारे लेखकानें जागजागीं उद्धृत केले आहेत. या उताऱ्यांचा विशेष प्रमाणांत उपयोग करण्याचें आणखी एक कारण असें कीं श्रीपंतमहाराजांचें चरित्र म्हणजे त्यांच्या अंतरंगस्थितीचेंच वर्णन होय. तेव्हां त्या अंतरंगस्थितींतून वेळोवेळीं निघालेले त्यांचे स्वतःचे उद्गार वाचकांना त्या स्थितीची ओळख जितकी बिनचूक पटवितील तितकी लेखकानें केलेलें वर्णन पटवूं शकणार नाहीं. तसेंच श्रीपंतमहाराजांच्या भाषेमधील प्रसाद, भारदस्तपणा व जोरकसपणा यांच्यामुळें त्यांच्या वाङ्मयांतील उतारे देण्याचा मोहहि लेखकाला मधुन मधुन अनावर झालेला आहे. त्यामुळें क्वचित् ठिकाणीं हे उतारे लांब वाटण्याचा संभव आहे. पण मागचा पुढचा संदर्भ लक्षांत घेतां त्यांच्या विस्तारांत छाटाछाट करण्याचें लेखकाला धैर्य झालें नाहीं. तेव्हां सदर उताऱ्यांचा या चरित्रग्रंथांत सढळ हातानें उपयोग केल्याबद्दल सुज्ञ, मार्मिक व अध्यात्मप्रेमी वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

चरित्रनायकांच्या हयातींत सर्व जण—मग ते त्यांचे भक्त असोत अगर इतर असोत—त्यांना "पंत" या नावानेंच संबोधीत असत. इतकेंच नव्हे तर आपल्याला कोणीं "महाराज" म्हटलेलें त्यांना आवडत नसे. त्यामुळें जरी या प्रस्तावनेंत "श्रीपंतमहाराज" या शब्दानें त्यांचा उल्लेख केला आहे तरी चरित्रग्रंथांत "पंत" अथवा "श्रीपंत" या सुटसुटीत शब्दांनींच तो केला आहे. तसेंच "श्रीदत्तप्रेमलहरी" नावाच्या श्रीपंतमहाराजांच्या पदसंग्रहाचा 'द. प्रे. ल.' व त्यांच्या 'श्रीदत्तप्रेमलहरी पुष्पमाले'तील इतर पुस्तकांचा 'पु.' असा उल्लेख करून पुढें क्रमांक दिला आहे.

श्रीपंतभक्तांपैकीं ज्यांनीं या चरित्राचा मसुदा वाचून योग्य अशा सूचना केल्या त्यांचा लेखक फार आभारी आहे. अशा मंडळींपैकीं लेखकाचे सहकारी व आप्त कै. बाळ दिवेकर, लेखकाचे वडील बंधु ती. रा. नारायण रामचंद्र दिवेकर व ती. वे. माधवभटजी दिवेकर, अकोळ येथील श्रीयुत गोविंद सदाशिव कुळकर्णी, श्रीपंतमहाराजांचे पुतणे श्रीयुत श्रीपाद गोपाळ पंतबाळेकुंद्री, बी. ए., एल्‌एल्. बी. वकील, बेळगाव; श्रीयुत दत्तात्रय कृष्ण गुमास्ते, बेळगाव; श्रीयुत चिंतामण काशिनाथ मोडक, बी. ए, एल् एल्. बी. वकील, कल्याण; चि. रा. वासुदेव रामचंद्र दिवेकर, सॉलिसिटर; हुक्केरी येथील कै. गोविंद बापूजी मुतालिक यांचा प्रामुख्यानें उल्लेख करणें अवश्य आहे. त्यांपैकीं कै. बाळ दिवेकर यांची या चरित्रलेखनाचे कामीं झाली यापेक्षां पुष्कळ अधिक मदत व्हावयाची व सहलेखक म्हणून त्यांचा नामनिर्देशहि व्हावयाचा; परंतु त्यांची प्रकृति नादुरुस्त झाल्यामुळें, त्यांची तशी उत्कट इच्छा असूनहि, तो योग जमून आला नाहीं. इतकेंच नव्हे तर १३–२–१९३७ रोजीं त्यांनीं इहलोकची यात्रा संपविली. त्यांची श्रीपंतमहाराजांवर अढळ निष्ठा होती व श्रीपंतमहाराजांच्या

वाङ्मयाशीं त्यांचा चांगला परिचयहि होता आणि चरित्रलेखनाचे कामीं आपल्याकडून शक्य ती मदत व्हावी अशी त्यांची फार इच्छा होती. पण ईशसंकल्प निराळाच असल्यामुळें ती सफल होण्याचा योग जमून आला नाहीं याबद्दल फार वाईट वाटतें.

घाटकोपर ( मुंबईनजीक ) येथील श्रीयुत रामचंद्र कृष्णाजी हर्षे यांनीं चरित्राच्या मसुद्याच्या नकला करणें वगैरे जिकिरीचें काम भक्तिभावानें व अत्यंत कळकळीनें केलें याबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे. तसेंच अकोळ येथील श्रीयुत श्रीपाद आत्माराम कुळकर्णी, लटकर, बी.ए., एलएल. बी. आणि मुंबई येथील श्रीयुत अम्बरनाथ आत्माराम करडे यांनीं ह्या चरित्र-ग्रंथ छापत असतांना प्रुफ तपासण्याचे कामीं फार मदत केली व कांहीं मार्मिक सूचना केल्या याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे. त्याचप्रमाणें येथील पॉप्युलर प्रिंटिंग प्रेसचे मालक, श्री. बी. जी. गण्डभीर व मॅनेजर, श्री. बी. एन्. आंवर्डेकर यांनीं प्रस्तुत ग्रंथाच्या छपाईचें काम सुबकपणें व वक्तशीरपणें करून दिल्याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे. तसेंच मुंबई येथील प्रसिद्ध फोटोग्राफर श्री. रघुनाथ परशराम करंदीकर यांनीं प्रस्तुत चरित्रांत दिलेल्या छायाचित्रांचें काम आस्थेनें व कळकळीनें करून दिल्याबद्दल लेखक त्यांचाहि फार आभारी आहे.

प्रस्तावना फार लांबली खरी; पण ती संपविण्यापूर्वी एका गोष्टीचा उल्लेख केल्याखेरीज लेखकाला राहावत नाहीं. ती अशी कीं जेव्हां १९३३ च्या सुरवातीला हें चरित्र लिहिण्याचें काम त्याचेकडे सोपविण्यांत आलें तेव्हां श्रीपंतबंधूंपैकीं गोविंदरावजी, रा. ब. गोपाळरावजी आणि शंकररावजी हे तिघे विद्यमान होते हें वर सांगितलेंच आहे. पण ज्येष्ठ वद्य १४ शके १८५५ ( २१-६-१९३३ ) रोजीं शंकररावजींनीं देह ठेविला. त्यामुळें त्यांच्या वडील बंधूंना फार दुःख झालें. सर्वांत वडील जे गोविंदरावदादा त्यांना त्या वेळीं अशक्तपणा वाटूं लागला होता आणि श्रीपंतचरित्र लिहून प्रसिद्ध झालेलें आपण पाहावें अशी त्यांची फार इच्छा होती. लेखकावर त्यांचें अकृत्रिम प्रेम होतें व त्याचेकडून हें चरित्रलेखनाचें कार्य यथाकाल पार पडेल असा त्यांना भरवसाहि वाटत होता. तसेंच त्यांचे देखत हें चरित्र प्रसिद्ध व्हावें असें लेखकालाहि मनापासून वाटत होतें आणि त्या दृष्टीनें त्यानें आपला व्यवसाय सांभाळून प्रयत्नहि सुरू केला होता. पण श्रावण शुद्ध ३ शके १८५७ (२-८-१९३५) रोजीं गोविंदरावदादांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली. त्यामुळें आपल्या परम प्रिय बंधूचें हें चरित्र प्रसिद्ध झालेलें पाहण्यास गोविंदरावजी व शंकररावजी आज हयात नाहींत म्हणून हळहळ वाटते. त्यांतल्या त्यांत समाधान मानण्यासारखी गोष्ट ही कीं प. पू. दादांनीं, देह ठेवण्यापूर्वी, या चरित्राच्या पहिल्या सुमारें बारा तेरा प्रकरणांचा मसुदा वाचवून घेतला होता व तो ऐकून त्यांनीं समाधान व्यक्त केलें होतें. ज्या प्रेमळ दादांनीं श्रीपंतचरित्रलेखनाचे बाबतींत महत्वाच्या सूचना केल्या होत्या त्या सूचनांप्रमाणें लेखकाची ही कृति कितपत वठली आहे हें त्यांनींच पाहावयास हवें होतें. पण श्रीपंतचरित्र प्रसिद्ध होण्यापूर्वी ते श्रीपंतस्वरूपीं समरस झाले याबद्दल पुनः पुनः वाईट वाटतें. आपण

ऐकिलेल्या प्रकरणांच्या पुढील प्रकरणांत वर्णन केलेलें श्रीपंतचरित्र आपल्या नजरेसमोरच झालेलें असल्यामुळें लेखकाकडून त्याचें होणारें वर्णन वाचण्याची आवश्यकताच, दादा, आपणांस भासली नसेल काय ? तें कांहींहि असो. पण लेखकाला चटका लावून आपण निजधामाला गेलांत ही गोष्ट खरी !

दादांच्या पश्चात रा. ब. गोपाळरावजी तरी श्रीपंतचरित्र प्रसिद्ध झालेलें पाहाण्यास असतील असें लेखकाला फार वाटत होतें. गेलीं सुमारें दोन तीन वर्षे त्यांची शरीरप्रकृति फारच खालावलेली होती. त्यांचें बोलणें जवळ जवळ बंद झाल्यासारखेंच झालें होतें, डोळ्यांनीं दिसत नव्हतें व हाताला फार कंप असल्यामुळें लिहिणेंहि अशक्यप्राय झालें होतें. तें इतकें कीं एकेक वाक्य पाटीवर रेघोट्या काढून लिहून दाखविण्यास त्यांना पंधरावीस मिनिटेंहि लागत. त्यांना ऐकूं मात्र चांगलें येत होतें व त्या आधारावर त्यांनीं प्रस्तावनेसह चरित्राचा सर्व मसुदा वाचवून घेऊन योग्य अशा सूचना केल्या आणि त्यांना अनुसरून त्या मसुद्यांत जरूर त्या दुरुस्त्या करण्यांत आल्या; पण चैत्र शु.२ शके १८५९ ( १३–४–३७ ) रोजीं त्यांनींहि इहलोकची यात्रा संपविली. अशा रीतीनें ज्यांनीं हें चरित्रलेखनाचें काम लेखकाकडे सोपविलें त्यांपैकीं कोणींहि हें चरित्र प्रसिद्ध झालेलें पाहाण्यास आज हयात नाहीं म्हणून मन थोडें उद्विग्न होतें.

शेवटीं ज्या श्रीपंतमहाराजांनीं बत्तीस वर्षांपूर्वी लेखकाकडून कशाचीहि अपेक्षा न करितां अल्प काळच्या प्रथम भेटींतच त्याला शुद्ध प्रेमानें आपलासा केलें व अभ्युदय आणि निःश्रेयस यांचा मार्ग एकदमच दाखवून दिला आणि वेळोवेळीं आपल्या वचनांची सत्यता पटवून त्याला प्रत्यक्ष पाहाण्यास न मिळालेलें आपलें समग्र चरित्र त्याच्या भावनेत्रांना दाखविण्याची अघटित घटना घडवून आणिली त्यांचे आभार मानावयाचे. पण आभार मानणें हा प्रकार कांहींसा औपचारिक आहे आणि सैंधवसिंधुवत ज्यांचेशीं संबंध त्यांचे आभार कसे व किती मानणार ? तेव्हां तसल्या भानगडींत न पडतां, थोरांचें अनुकरण करून, "पुनश्च भूयोपि नमो नमस्ते" या सर्वांना सुलभ अशा महामंत्रानेंच तें काम उरकणें बरें !

गजानन भिमराव यांची वाडी<br>
ठाकुरद्वार, मुंबई नं. २<br>
आश्विन शुद्ध १० शके १८५९<br>
(विजया दशमी) १४-१०-१९३७

**केशव रामचंद्र दिवेकर**

# अनुक्रमणिका

—————:०:—————

**प्रकरण १ लें ( पृ. १-८ )**—पूर्वज; जन्म व बालपण.
**प्रकरण २ रें ( पृ. ९-१२ )**—प्राथमिक शिक्षण; गृहशिक्षण; धार्मिक शिक्षण; इंग्रजी शिक्षणास सुरवात व सन्मित्रलाभ.
**प्रकरण ३ रें ( पृ. १३-१७ )**—श्रीबालमुकुंद ऊर्फ बालावधूत.
**प्रकरण ४ थें ( पृ. १८-२१ )**—श्रीबालमुकुंदांचा अधिकार; त्यांच्या बोधाचा फैलाव व दत्तूच्या मातृ-पितृ घराण्यांतून वाहात येणारे त्यांच्या कृपासरितेचे ओघ.
**प्रकरण ५ वें ( पृ. २२-२८ )**—दत्तूनें बाळप्पांची केलेली निंदा; शाप, उःशाप; सद्गुरूच्या प्रथम दर्शनाचा अपूर्व योग व अनुग्रह.
**प्रकरण ६ वें ( पृ. २९-३३ )**—पुढील कार्याची तयारी; योगाभ्यास; गुरुबंधु.
**प्रकरण ७ वें ( पृ. ३४-३७ )**—दक्षिणेंतील भयंकर दुष्काळ, दत्तूचे हाल; संसार सोडून जाण्याचा प्रयत्न, सद्गुरूचें आश्वासन; दत्तूची फजिती करण्याचा प्रयत्न व त्यांची निष्फलता.
**प्रकरण ८ वें ( पृ. ३८-४२ )**—पंथवृद्धिआज्ञा व पूर्ण कृपादेणगी.
**प्रकरण ९ वें ( पृ. ४३-४५ )**—पब्लिक सर्व्हिस पास, बालमुकुंदांचें निर्याण व वियोगदुःख.
**प्रकरण १० वें ( पृ. ४६-५२ )**—सद्गुरूच्या वियोगानंतरची पंतांची भूमिका.
**प्रकरण ११ वें ( पृ. ५३-५८ )**—पंथविस्तार; काका घाणेकर, गणू व गंगाराम वगैरेंवर अनुग्रह; रावजी दड्डीकर वगैरे भक्त.
**प्रकरण १२ वें ( पृ. ५९-६१ )**—मॅट्रिक पास; शिक्षकाची नोकरी; बंधु गोपाळाला शिक्षणाकरितां आणिलें.
**प्रकरण १३ वें ( पृ. ६२-६६ )**—पंतांचें लग्न व गृहस्थाश्रमाला सुरवात
**प्रकरण १४ वें ( पृ. ६७-७२ )**—विविध प्रकारचे आध्यात्मिक अनुभव, (सांख्य-शिरकाव; कल्पनाखंडण; अंहब्रह्मास्मिखंडण; तारकारूढ; भक्ति-अनुभव-प्रभाव )
**प्रकरण १५ वें ( पृ. ७३-८३ )**—श्रीकल्लेश्वरमहाराज ऊर्फ कल्लाप्पा; तारकविस्तार, उन्मनीलीला; तारकखंडण; कल्लप्पावियाग व तारकऱ्हास.
**प्रकरण १६ वें ( पृ. ८४-९० )**—आपसांत फाटाफूट; मनस्ताप; सत्संगतीचा लाभ.
**प्रकरण १७ वें ( पृ. ९१-९८ )**—भजनलालसा व काव्यस्फूर्ति.
**प्रकरण १८ वें ( पृ. ९९-१०४ )**—गद्य लेखनाची सुरवात; स्फुट लेख; "श्रीबाल-मुकुंदबोधानंदगुटिका" (कल्याणचरित्र) व "बालबोधामृतसार"; एकीं; प्रेमकल्लोळ.

२

**प्रकरण १९ वें ( पृ. १०५-१११ )**—स्फुट लेख; अवधूतदर्शन आणि "श्रीदत्तगत बालबोध अथवा प्रेमतरंग."

**प्रकरण २० वें ( पृ. ११२-११८ )**—उपदेशपर स्फुट लेख व "आत्मज्योति."

**प्रकरण २१ वें ( पृ. ११९-१२७ )**—प्रेमखेळ; श्रीसिद्धारूढ स्वामींची भेट; उपदेशपर स्फुट लेख व " परमानुभव प्रकाश. "

**प्रकरण २२ वें ( पृ. १२८-१३८ )**—आत्मानुभवाची परिपक्कता; सगुण भक्ति व पादुकास्थापना; घरीं उत्सव करण्यास सुरवात.

**प्रकरण २३ वें ( पृ. १३९-१५० )**—पूर्णावस्था; " अनुभववल्ली " भाग १ व २, "ब्रह्मोपदेश" व "भक्तालाप" अथवा ज्ञानी भक्ताचे प्रेमोद्गार.

**प्रकरण २४ वें ( पृ. १५१-१६२ )**—लेखनव्यवसायांत शिथिलता; पितृवियोग; प्रतिहनुमान पुटप्पा कणबर्गी; कणबर्गीच्या डोंगरावरील खेळ; रामाबुवा ऊर्फ रामानंद, बापूभट राजापूरकर व विनायकराव ताह्मनकर ऊर्फ साई यांना भगवें घालण्याची परवानगी.

**प्रकरण २५ वें ( पृ. १६३-१७१ )**—शिष्यांच्या संख्येंत वाढ; अण्णा अकोळकर; सम दृष्टि; घरांतील व्यवस्था व शिस्त; ' फ्री मेसन सोसायटी ' चे दोन सभासद; ' गुरुप्रेम म्हणजे काय ? ' हा त्यांचा प्रश्न व त्याचें उत्तर; मोठा दरबार; काशीकरबुवा.

**प्रकरण २६ वें ( पृ. १७२-१८० )**—बोधपर पत्रव्यवहार; दड्डीची खेप व दत्तवाडकर पाटील; अकोळची पहिली खेप, अण्णांच्या मुलीची भूतबाधा दूर केली; प्रापंचिक व पारमार्थिक दृष्ट्या होत चाललेली प्रगति; अमृतराव देशपांडे; देशपांडे गल्लींतील अमृतरावांच्या घरांत बिऱ्हाड नेलें; जागेची सोय; दत्तमंदीर.

**प्रकरण २७ वें ( पृ. १८१-१८७ )**—आजोळच्या घराण्यांतील भाऊबंदकीचा तंटा मिटविला; आजोबांना संन्यासदीक्षा दिली; पुण्याची खेप.

**प्रकरण २८ वें ( पृ. १८८-१९८ )**—पंतांना मारण्याचा कट; वामनरावांची बंधुप्रीति; कटाची निष्फलता; कटवाल्यांत फूट व पश्चात्ताप; कटांतील पुढाऱ्यांचे पंतांसंबंधीं आदरयुक्त उद्गार; कटाच्या कारणांची मीमांसा व शिष्यांना इषारे; निंदकांचा गौरव.

**प्रकरण २९ वें ( पृ. १९९-२०७ )**—पुत्रदर्शन; पुत्रवियोग; पादुकाविसर्जन; गीतासार; भगवद्गीतेबद्दल अत्यादर व प्रशंसोद्गार; अकोळची दुसरी खेप; विष्णु हरि कुळकर्णी यांच्या दत्तमंदिरांत पादुकास्थापना; अमृतरावांचे घरांत राहात असतां ऐहिक व पारमार्थिक दृष्ट्या झालेला उत्कर्ष; मारुती गल्लींत बिऱ्हाड नेलें.

**प्रकरण ३० वें ( पृ. २०८-२१४ )**—मारुती गल्लींतील बिऱ्हाड; गृहकानू; काशीकरबोवांचें निधन; परमहंस आजोबांची समाधि.

**प्रकरण ३१ वें ( पृ. २१५–२२४ )**—आत्मानुभवाची परिपक्वता; गुरुप्रेमच जीवन; श्रीज्ञानेश्वरांबद्दल अत्यादर; अधिकारी सत्पुरुषाची भेट; अमृतानुभवाशीं दाट परिचय व अवधूत गीतेवद्दल आदर.

**प्रकरण ३२ वें ( पृ. २२५–२३२ )**—काका घाणेकर; धारवाड–हुबळीकडील दुसरी खेप; श्रीसिद्धारूढ स्वामींची पुनः भेट; आपल्या घरीं गोकुळाष्टमीचा उत्सव सुरू केला; मौनी बंगाली संन्यासी; कुरुंदवाड–अकोळ–बेडकिहाळकडील खेप; प्रेमकल्लोळ.

**प्रकरण ३३ वें ( पृ. २३३–२४२ )**—बेळगावांत प्लेग; दड्डी व अकोळ येथील मुक्काम; अकोळ येथील खेळ व प्रेममौजा.

**प्रकरण ३४ वें ( पृ. २४३–२५६ )**—देशपांडे गल्लींतील सुंठणकरांचा वाडा; प्लेगचा कहर व त्याला पडलेले बळी (चुलते जिवाणकाका, मावस भाऊ गणू अण्णा मारीहाळकर वगैरे ); गुरुद्वादशीच्या उत्सवांत विघ्न; दुःखालाप.

**प्रकरण ३५ वें ( पृ. २५७–२६८ )**—गृह–कानूंचा कडक अंमल; दोघां आरोपीं- वरील खटले; घरांतील व्यायामशाळा; परीक्षांचे समाधानकारक निकाल, मामां- बद्दल कृतज्ञता व त्यांना पत्र; परिक्षांकरितां येणारे विद्यार्थी; बापू अभ्यंकर व त्याच्या विचारांत क्रांति.

**प्रकरण ३६ वें ( पृ. २६७–२७७ )**—ज्ञानदानाचें व्रत; काका घाणेकरांच्या पुत- ण्याला प्लेग; काकांचा वीर निश्चय; शिष्यांच्या संख्येंत वाढ; मोठा दरबार; बैंदुरक- रांच्या कुटुंबाला भूतबाधा; 'डेव्हिल–वर्शिपर' सत्पुरुष ठरला.

**प्रकरण ३७ वें ( पृ. २७८–२८९ )**—१८९८ व १९०० सालांतील स्फुट लेख; " माझें माहेर अथवा नऊ फेऱ्यांचा प्रेम–भोंवरा " ( राजयोगांतील दिव्य अनुभव; तत्वबोध आणि प्रेममिठीचा अपूर्व सोहळा ).

**प्रकरण ३८ वें ( पृ. २९०–२९८ )**—१९०१–१९०५ मधील स्फुट लेख व " भक्तोद्गार किंवा प्रेमभेट "

**प्रकरण ३९ वें ( पृ. २९९–३१० )**—कोल्हापूरच्या खेपा; पुटप्पांना प्लेग व पंतांनीं मांडिलेला निर्वाण; नगाला नग; दिवाणाचा मृत्यु; "सरलें संसाराचें काज"; मरिकट्टीची खेप; नोकरीचा राजीनामा.

**प्रकरण ४० वें ( पृ. ३११–३१८ )**—अंबाक्काचा जन्म; सौ. यमनाक्कांचें निधन; हुक्केरी, कोचरी व चिकालगुडची खेप; गोविंदरावजींचें तिसरें लग्न.

**प्रकरण ४१ वें ( पृ. ३१९–३२७ )**—बेडकिहाळकरांचा विरस; मरिकट्टीची दुसरी खेप; कोचरीची दुसरी खेप.

**प्रकरण ४२ वें ( पृ. ३२८–३३७ )**—पंतांच्या शरीरप्रकृतींत बिघाड; निर्याणाच्या सूचना; दर्शनोत्सुक भक्तांच्या झुंडी; प्रेमळांच्या भेटी; बाळेकुंद्रीमधील आंबराईंत कायमची विश्रांति !

**प्रकरण ४३ वें ( पृ. ३३८–३६१ )**—अवधूत–संप्रदाय.
**प्रकरण ४४ वें ( पृ. ३६२–३८३ )**—श्रीपंतांची आध्यात्मिक भूमिका; पूर्णाद्वैत बोध व अभेदभक्तिरहस्य.
**प्रकरण ४५ वें ( पृ. ३८४–४०३ )**—" प्रेमाचा अवतार । गुरूचा। प्रेमाचा अवतार ॥ "; शिष्यप्रबोधनकार्य.;
**प्रकरण ४६ वें ( पृ. ४०४–४२४ )**—भजनलालसा व काव्यस्फूर्ति; श्रीदत्तप्रेम-लहरी व सिद्ध कवींची भूमिका.
**प्रकरण ४७ वें ( पृ. ४२४–४३७ )**—श्रीपंतांचे बोल व त्यांची वक्तृत्वशैली.
**प्रकरण ४८ वें ( पृ. ४३८–४४८ )**—योग व चमत्कार; चमत्कार होत नसतात, तर ते दिसत अथवा भासत असतात.
**प्रकरण ४९ वें ( पृ. ४३९–४६३ )**—गृहस्थ व शिक्षक.
**प्रकरण ५० वें ( पृ. ४६४–४७० )**—बंधुप्रीतीचा अपूर्व अनुभव; स्मारकाची योजना
**प्रकरण ५१ वें ( पृ. ४७१–४८१ )**—स्मारकाच्या योजनेला मूर्त स्वरूप; वामनराव-जींचें निधन; श्रीपंतांचें ओवीबद्ध चरित्र; नरसिंहरावजींचें निधन; ग्रंथप्रकाशन व स्मारकाच्या एका अंगाची पूर्तता.
**प्रकरण ५२ वें ( पृ. ४८२–४८८ )**—श्रीदत्तसंस्थानाची वाढ; श्रीपंतांच्या मातो-श्रींचें निधन; आंबराईतील श्रीकट्ट्यावर पादुकास्थापना; श्रीदत्तसंस्थानाचीं विश्वस्तिपत्रें व स्मारकाच्या मुख्य अंगाची पूर्तता; शंकररावजींचें निधन गोविंद-रावजींचें निधन व गोपाळरावजींचें निधन; स्मारकाची पूर्तता.
**परिशिष्ट " अ " ( पृ. ४८९–४९४ )** ज्या श्रीपंतभक्तांनीं श्रीपंतांसंबंधीं हकीगती लिहून पाठविल्या त्यांची यादी.

# छाया चित्रांची अनुक्रमणिका

———:०:———


१ श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर ... ... दर्शनी
२ बाळेकुंद्री गावामधील श्रीपंतमहाराजांचें घर ... पृ. ४०
३ दड्डीजवळील घटप्रभा नदीकाठीं असलेलें 'पत्रीबन' नावाचें रम्य स्थान ... ... ... पृ. ४०
४ श्रीपंतमहाराजांचें जन्मस्थान ... ... पृ. ४१
५ श्रीपंतमहाराजांचे मातुल श्रीपादपंत दड्डीकर यांचें दड्डी येथील घर पृ. ४१
६ दड्डीजवळ नदीकाठीं असलेलें " अनुभव–मंडप " नावाचें श्रीपंतमहाराजांचें बसण्याचें ठिकाण • ... ... पृ. १२०
७ देसनूर येथील श्रीपंतमहाराजांचें बसण्याचें ठिकाण ... पृ. १२०
८ दड्डी येथें नदीकाठीं असलेलें श्रीरामलिंगाचें देवालय ... पृ. १२१
९ देसनूर येथील श्रीपंतमहाराजांचें योगसाधन करण्याचें स्थान पृ. १२१
१० श्रीपंतमातोश्री, प. पू. गं. भा. सीताबाई ... पृ. १६०
११ श्रीपंत आणि सौ. यमनाक्का ... ... पृ. १७६
१२ श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर ... ... पृ. २०८
१३ श्रीपंतमहाराज आणि त्यांचे बंधु ... ... पृ. २७३
१४ श्रीपंतमहाराजांचें मोडी हस्ताक्षर ... पृ. ३३६
१५ श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथील श्रींच्या पालखीचा देखावा ... पृ. ३३६
१६ बाळेकुंद्री गावांतील घरामागें असलेली श्रीपंतमहाराजांचे आजोबा परमहंस श्रीबाळकृष्ण महाराज यांची समाधि ... पृ. ३३७
१७ बाळेकुंद्री गावांतील घरामागें असलेली श्रीपंतमहाराजांची समाधि पृ. ३३७
१८ श्रीपंतमहाराज राहात असलेला देशपांडे गल्लींतील सुंठणकर यांचा वाडा ... पृ. ४६४
१९ श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री बुद्रुख येथील भजनमंडप ... पृ. ४६४
२० श्रीपंतमहाराजांच्या पादुका व एकतान्या ... ... पृ. ४६५
२१ श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथील श्रींचा औदुंबर कट्टा व आंबराई ... पृ. ४६५
२२ श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथील आंबराई व श्रींचा कट्टा ... पृ. ४८८

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ३१ | १५ | दत्तला | दत्तूला |
| ३६ | १२ | अनिमित्तबंधप्रीतीचे | अनिमित्त बंधुप्रीतीचे |
| ४० | २० | चरित्रनाकांनीं | चरित्रनायकांनीं |
| ४१ | १३ | पारपूर्ण | परिपूर्ण |
| ६१ | २१ | बाळण्यानें | बाळप्पानें |
| ९२ | २७ | चालून | चालूच |
| १०६ | ३३ | ध्यनि | ध्वनि |
| ११७ | १ | वराग्य | वैराग्य |
| १४६ | १२ | स्वरूमात्रें | स्वरूपमात्रें |
| १४७ | ८ | टाहा | टाहो |
| १५३ | ११ | गल्लांत | गल्लींत |
| १५८ | २ | असे | नसे |
| १५८ | ६ | लागूळ | लागून |
| १९४ | २५ | निर्भत्सना | निर्भर्त्सना |
| १९७ | ११ | वीर्यकटिकां | वीर्यकीटकां |
| १९७ | २१ | सुगम | सन |
| २०३ | २९ | अजुन | अर्जुन |
| २०९ | २५ | नियांप्रमाणें | नियमांप्रमाणें |
| २१७ | २२ | द्वेत— | द्वैत— |
| २१८ | ३१ | दत्तावधूतएकावर्णवीं | दत्तावधूतएकार्णवीं |
| २२२ | २८ | मानें— | मौन— |
| २४५ | १६ | मामील | मामील |
| २५२ | ९ | ‘ चंद्रमाचे ’ ऐवजीं | ‘पौर्णिमा’ असें वाचावें. |
| २५२ | २४ | मृतपाय | मृतप्राय |
| २५३ | २७ | गणतरावांखेरीज | गणपतरावांखेरिज |
| २६० | ११ | मिनमिळाऊ | मनमिळाऊ |
| २७५ | ५ | मवा | मेवा |
| २७९ | ११ | विदहस्थितींत | विदेहस्थितींत |
| २९२ | १० | बह्मगिरीवरील | ब्रह्मगिरीवरील. |
| २९३ | १० | कृतकत्यता | कृतकृत्यता |
| २९७ | ६ | कृतकत्य | कृतकृत्य |
| ३०० | २७ | सखराम | सखाराम |
| ३१३ | १ | १८८५ | १८०७ |
| ४०८ | १३ | तृत्य | नृत्य |
| ४२३ | १४ | पर्यावसान | पर्यवसान. |

# श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर

यांचें

# चरित्र

श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर



जन्म
श्रावण वद्य ८ शके १७७७
( ३–९–१८५५ )

समाधि
आश्विन वद्य ३ शके १८२७
( १६–१०–१९०५ )

श्री

प्रकरण १ लें

# पूर्वज

क्र. ५५८५

**कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनंदनः ।**
**द्वापारे रामकृष्णौच कलौ श्रीपादवल्लभः ॥**

पंधराव्या शतकांत श्रीपादश्रीवल्लभरूपानें श्रीदत्तात्रेयांचा अवतार झाला व त्यांच्या-नंतर थोड्याच वर्षांनीं श्रीनृसिंहसरस्वतींचा अवतार झाला. या दोघां अवतारी पुरुषांनीं शुद्ध ज्ञानमार्गाचा प्रसार करून आपल्या अद्भुत सामर्थ्यानें सर्व हिंदुस्थानभर लोकानु-ग्रहाचें व धर्मजागृतीचें महत्कार्य केलें. तरी पण त्यांचें व विशेषतः श्रीनृसिंहसरस्वतींचें अवतारकार्य मुख्यत्वेंकरून दक्षिणमहाराष्ट्रांत झाल्यामुळें त्यांच्या संबंधाची पूज्य भावना त्या भागांत विशेष प्रमाणांत आढळून येते व ज्या ज्या स्थानांच्या ठिकाणीं त्यांचें वास्तव्य झालें व त्यांनीं आपलें लोकानुग्रहाचें कार्य केलें त्या त्या स्थानांना पुण्यक्षेत्रांचें स्वरूप येऊन गेलीं चार पाचशें वर्षें हजारों, लक्षावधि भाविकांना तीं विश्रांतिस्थानें झालीं आहेत. त्यांपैकीं कृष्णानदीकाठीं औदुंबर अथवा भिल्लवडी, कृष्णा–पंचगंगासंगमावर नृसिंहवाडी अथवा नरसोबाचीवाडी व निजामाच्या राज्यांत भीमातटाकीं गाणगापूर हीं मुख्य होत. गेलीं सुमारें साडेचारशें वर्षे या पुण्यक्षेत्रांत लक्षावधि आर्तांचें आर्तिहरण झालें आहे, हजारों जिज्ञासूंना ज्ञानलाभ झालेला आहे व कित्येक ज्ञानी जीवन्मुक्तांना गुरुप्रेमसुख अनुभविण्यास व निजानंदीं सत्समागमांत कालक्रमणा करण्यास मिळून त्यांचेकडून अज्ञ-जनोद्धाराचें कार्य झालें आहे.

या क्षेत्रांचें माहात्म्य कायम ठेवण्याला व गुरुभक्तीची ज्योत महाराष्ट्रीय जनतेच्या अंतःकरणांत कायमची जागती ठेवण्याला जसा तेथें जाणाऱ्या भक्तांना दृष्टांतरूपानें अगर अन्य मार्गांनीं येणारा अनुभव कारणीभूत झाला, तसाच गुरुचरित्र ग्रंथहि बऱ्याच अंशानें कारणीभूत झालेला आहे. तो श्रीनृसिंहसरस्वतींच्या पट्ट शिष्यांपैकीं जे सायंदेव त्यांचे वंशज सरस्वती गंगाधर यांनीं लिहिलेला आहे. त्यामध्यें नृसिंहसरस्वतींचे दुसरे एक पट्ट शिष्य जे सिद्धमुनि त्यांनीं आपला शिष्य नामधारक याला जें गुरूंचें चरित्र सांगितलें तें कथन केलें आहे व त्यांत श्रीदत्तात्रेय, श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्या अवतारकार्यांतील कांहीं प्रसंगांचें व विशेषतः श्रीनृसिंहसरस्वतींच्या चरित्रांतील ठळक ठळक गोष्टींचें वर्णन केले आहे. या ग्रंथाचा विशेष हा आहे कीं तो निःसीम गुरुभक्तीनें व

अंतःकरणाच्या जिव्हाळ्यानें लिहिलेला आहे. त्यांतील कथानकांतील गुरुकृपेला पात्र झालेल्या व्यक्ति हिंदु समाजाच्या उच्च नीच वगैरे सर्व वर्गांतील स्त्रीपुरुषांमधील व परधर्मीयांतीलहि असल्यामुळें सामान्य स्थितींतील प्रापंचिक लोकांमध्यें त्याचा फार प्रसार झालेला आहे व दक्षिण महाराष्ट्रांत हजारों लोक मोठ्या भाविकपणानें त्याचे सप्ताह करीत असतात. अजूनहि जर अशी स्थिति पुष्कळ प्रमाणांत आढळते, तर ज्या वेळीं पाश्चात्य संस्कृतीचा महाराष्ट्रीय जनतेवर अंमल बसला नव्हता व धर्मश्रद्धा जागृत असून वेदविहित कर्माचरणाकडे जनतेची प्रवृत्ति होती त्या वेळीं म्हणजे सुमारें २०० वर्षांपूर्वीं श्रीनृसिंहसरस्वतींच्या अवतारकार्याची व गुरुचरित्र ग्रंथाची छाप महाराष्ट्रीय जतनेच्या मनावर फारच असली पाहिजे हें उघड दिसतें व विशेषतः दक्षिण महाराष्ट्रांत औदुंबर, नरसोबाचीवाडी व गाणगापूर या क्षेत्रांच्या आसमंतांतलि भागांत तर ती विशेष प्रमाणांत असली पाहिजे हें सांगणें नकोच.

## पितृघराणें

सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं श्रीक्षेत्र गाणगापूरनजीक निजामाच्या राज्यांत देऊळगांव नावाच्या गावीं गुराप्पा नावाचे एक सच्छील, ऋग्वेदी भारद्वाजगोत्री देशस्थ ब्राम्हण राहात असत. ते त्या गावाचे वतनदार देशपांडे असून त्यांना नरसिंह, मोरेश्वर व विरूपाक्ष असे तिघे मुलगे होते. गुराप्पांच्या घराण्याचें कुलदैवत अंबाबाई असून आराध्य दैवत श्रीदत्तात्रेय हें होतें. या घराण्यांतील सर्व मंडळींची श्रीनृसिंहसरस्वतींच्या ठिकाणीं दृढ भक्ति असून गुरुचरित्र ग्रंथाबद्दल त्यांना अत्यंत पूज्यभाव वाटत असे. या संबंधीं असें सांगतात कीं गुराप्पांचे ज्येष्ठ चिरंजीव नरसिंहपंत हे नेहमीं मोठ्या श्रद्धेनें गुरुचरित्राचे सप्ताह करीत व एकदां तर त्यांनीं एका पायावर उभें राहून सप्ताह केला. तेव्हां श्रीदत्तात्रेयांनीं प्रसन्न होऊन त्यांना स्वप्नांत असा दृष्टांत दिला कीं, ‘ तुझ्या सातव्या पिढींत मी अवतार घेईन.’ गुराप्पांच्या घराण्याकडे त्यावेळीं निजामसरकारच्या अमलाखालीं असलेल्या मुलखापैकीं बेळगावनजिकच्या सुमारें १७ गावांच्या कुळकर्णिकीचें काम आलें. त्यामुळें नरसिंहपंत व त्यांचे बंधु मोरोपंत व विरूपाक्षपंत हे त्या गावांपैकीं बाळेकुंद्री बुदरुख या गावीं येऊन राहिले व सदर १७ गावांचें कुळकर्णिकीचें काम पाहूं लागले.

बाळेकुंद्री बुदरुख हा गाव हल्लीं सांगली संस्थानाच्या हद्दींत असून तो बेळगाव—कलादगी रस्त्यावर बेळगावपासून सुमारें आठ मैलांवर सडकेच्या उत्तर दिशेला पाव मैलावर वसलेला आहे व तो मद्रास व सदर्न मराठा रेल्वेवरील सुळेभावी स्टेशन पासून सुमारें दोन मैल अंतरावर आहे. या गावाची वसाहत फार जुनी असून गेलीं सुमारें २५०—३०० वर्षें तो जाधव घराण्याकडे इनाम आहे. हल्लीं तेथील लोकवस्ती सुमारें ८५० असून त्यापैकीं सुमारें ३५० मुसलमान व बाकीचे हिंदु आहेत. तेथील लोकांचा मुख्य धंदा शेतीचा असून बरेच लोक रेशीम कातण्याचें कामहि करितात. या गावाचा विशेष हा आहे कीं तो सपाट जमीनीवर वसलेला असून त्याच्या आस-

पा च्या टापूंत साधारणपणें कोठेंहि खणल्यास सुमारें तीनचार हातांवर विपुल गोडें पाणी लागतें. त्यामुळें तेथें गुप्तगंगा वास करिते अशी पुष्कळ लोकांची भावना आहे. पूर्वी या गावाचे सभोवतां सात तलाव होते. पण त्यांपैकीं कांहीं आतां बुजत आलेले आहेत. एकंदरींत या गावीं पाणी विपुल आहे त्यामुळें आसपासची जमीन सुपीक असून उसाचें पीक चांगलें येतें; व येथील सृष्टिसौंदर्य प्रेक्षणीय असून हवा थंड आहे.

या गावाच्या मध्यमागीं श्रीरामेश्वराचें एक फार पुरातन देवालय असून तें दैवत फार कडकडीत आहे. तसेंच गावाच्या उत्तर दिशेला " बालादेवी " चें स्थान असल्यामुळे त्याला ' बाळेकुंद्री ' हें नाव पडलें असावें असा कांहीं लोकांचा तर्क आहे. पण या गावीं कर्दळीचीं अथवा केळीचीं झाडें फार असल्यामुळें व कानडी भाषेंत त्या झाडाला " बाळी " हें नाव असल्यामुळें त्याला ' बाळीकुंद्री ' हें नाव पडलेलें दिसतें. चरित्रनायकांच्या ग्रंथांत या गावाचा " कर्दळीग्राम " अगर " कर्दळीवन " असाहि उल्लेख केलेला आहे.

बाळेकुंद्रीस आल्यावर नरसिंहपंत व त्यांचे बंधु हे श्रीरामेश्वराच्या देवळाजवळच घर बांधून राहूं लागले व तेव्हांपासून त्यांचें तेथें कायमचें वास्तव्य झालें. पुढें या बंधूंचे वंश वृद्धिंगत होत जाऊन त्यांच्या पुष्कळ शाखा उपशाखा होत गेल्या. नरसिंहपंतांना लक्ष्मप्पा, मल्हारपंत व तिमप्पा असे तिघे मुलगे होते. त्यांपैकीं लक्ष्मप्पांना नरसाप्पा नावाचा एकच मुलगा होता. मल्हारपंतांना मुलगा नव्हता व तिमपांना पाच मुलगे होते.


लक्ष्मप्पांचा वंशवेल पुढील पानावर दिला आहे; त्यावरून हें दिसून येईल की लक्ष्मपांना नरसापा हा एकटाच मुलगा होता. नरसापांना अरळपा व गुरपा असे दोघे मुलगे होते व त्यांपैकीं अरळपांना रामपा हा एकच मुलगा होता. रामपा उर्फ रामाजीपंत हे फार शूर व कर्तबगार असून पेशवे सरकारच्या पदरीं लष्करांत मोठ्या हुद्याच्या जागेवर होते. ते अत्यंत कर्तव्यनिष्ठ असून त्यांनीं आपले प्राण खर्ची घालून सेनापतीचे प्राण वाचविले व आपण स्वामिकार्यीं देह ठेविला.

रामप्पांच्या निधनसमयीं त्यांचा एकुलता एक मुलगा बाळकृष्ण हा फक्त सहा महिन्यांचा होता. त्यांच्या अकल्पित निधनानें त्यांचें कुटुंब जानकीबाई यांच्यावर मोठाच दुर्धर प्रसंग आला. पण त्यांनीं मोठ्या धैर्यानें प्रपंच चालवून आपला मुलगा बाळकृष्ण याचें संगोपन केलें. बाळकृष्ण वयांत आल्यानंतर त्यानें प्रपंचाचा सर्वभार आपल्या शिरावर घेऊन तो मोठ्या दक्षतेनें व हुषारीनें चालविला. बाळकृष्णपंत हे फार कर्तृत्ववान असून त्यांची सांपत्तिक स्थितिहि चांगली होती. त्यांना रामप्पा, देवप्पा, जीवप्पा व चिंतप्पा असे चार मुलगे होते. त्यांपैकीं सर्वांत वडील रामप्पा हे कट्टे दत्तभक्त असून सात्विक वृत्तीचे होते. हेच चरित्रनायकांचे वडील होत.

## मातृघराणें

बेळगाव जिल्ह्यापैकीं हुक्केरी तालुक्यांत घटप्रभा नदीच्या उत्तर तीरावर दड्डी गाव वसलेला असून त्याच्या आसपासचें सृष्टिसौंदर्य फार प्रेक्षणीय आहे. सुमारें दीडशें वर्षां-

# श्रीपंतघराण्याची वंशावळ



पूर्वी तेथें अंबाजी रामचंद्र कुळकर्णी नावाचे एक ऋग्वेदी वासिष्ठ गोत्री देशस्थ ब्राह्मण राहात असत. त्यांचें कुलदैवत श्रीतुळजाभवानी असून ते दत्तउपासक व रामउपासकहि होते. ते दड्डी व लगतचे चार गाव मिळून पाच गावांचे वतनदार कुळकर्णी होते. ते अतिशय धार्मिक वृत्तीचे असून कट्टे गुरुभक्त होते; तसेच ते फार व्यवहारचतुरहि होते. त्यामुळें त्यांचा लौकिक मोठा असून सर्व लोक त्यांना फार मान देत असत. त्यांच्या घराण्यांत पिढ्यान्पिढ्या श्रीदत्तात्रेय, श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्या संबंधीं पूज्यभाव व श्रीगुरुचरित्र ग्रंथाबद्दल श्रद्धा हीं वसत होतीं. अंबाजीपंत कट्टे गुरुभक्त होते व ते एका पायावर उभे राहून गुरुचरित्राचा सप्ताह करीत. त्यांच्या घरांतील सर्व मंडळी ईश्वरनिष्ठ, सदाचारी व सद्वर्तनी होती. त्यांच्या उज्ज्वल चारित्र्याचा लोकांवर इतका परिणाम झाला होता कीं त्यांना पुष्कळ लोक ‘ राजर्षि ’ म्हणत.


अंबाजीपंतांना अनंत उर्फ अण्णा, नरसिंह व रामचंद्र असे तिघे मुलगे होते. त्यांची वंशावळ पुढील पानावर दिली आहे.

अंबाजीपंतांच्या मुलांपैकीं सर्वांत वडील जे अनंतराव उर्फ अण्णा त्यांना (१) लक्ष्मणराव ऊर्फ भाऊ (२) बाळकृष्ण व (३) गोपाळ असे तिघे मुलगे होते व त्यांपैकीं सर्वांत वडील जे लक्ष्मणराव ऊर्फ भाऊ त्यांना (१) व्यंकटराव ऊर्फ रावजी (२) हणमंत व (३) शामजी असे तिघे मुलगे होते. नरसिंहपंतांना सुंदराक्का, गोदाक्का व बहिणाक्का अशा तिघी मुली असून श्रीपाद नावाचा एक मुलगा होता. या सर्व मुलांत वडील ज्या सुंदराक्का त्यांना बागेवाडी येथें जोशी यांचे घरीं दिल्या होत्या. त्यांच्या लग्नानंतर लवकरच त्यांना वैधव्य आल्यामुळें त्या माहेरींच राहात असत. गोदाक्का यांस बाळेकुंद्री येथील मागें उल्लेख केलेल्या कुळकर्णी घराण्यापैकीं बाळकृष्णपंतांचे ज्येष्ठ चिरंजीव रामपा यांस दिल्या होत्या व त्यांचें सासरचें नाव सीताबाई असें होतें. याच चरित्रनायकांच्या मातोश्री होत. बहिणाक्कांना बाळेकुंद्रीनजीक मारीहाळ येथील कृष्णाजीपंत कुळकर्णी यांस दिल्या होत्या. नरसिंहपंतांच्या मुलांपैकीं श्रीपाद हा सर्वांत लहान असून त्याच्या जन्मानंतर थोड्याच महिन्यांनीं ते १८४४ च्या सुमारास परलोकवासी झाले. ते फार करारी व कर्तृत्ववान होते. त्यावेळीं ते व त्यांचे बंधु अनंतराव ऊर्फ अण्णा व रामचंद्रपंत हे एकत्र राहात असून त्यांच्या घराण्याची सांपत्तिक स्थितिहि चांगली व भरभराटीची होती.

## श्रीकृष्णजन्म


सन १८५५ सालीं नरसिंहपंतांची मुलगी सौ. गोदाक्का ऊर्फ सीताबाई म्हणजे बाळेकुंद्री येथील रामचंद्रपंत कुळकर्णी यांचें कुटुंब या गरोदर राहून दड्डी येथें आपल्या माहेरीं बाळंतपणाकरितां गेल्या होत्या. त्यावेळीं त्यांचा भाऊ श्रीपाद व चुलते लक्ष्मणराव ऊर्फ भाऊ व रामचंद्रपंत हे एकत्र राहात असल्यामुळें त्यांच्या घरांत सुमारें चाळीस पन्नास मनुष्यें नांदत होतीं व त्यांचें राहतें घरहि फार मोठें होतें आणि त्यांची सुस्थिति असून शेतीचें उत्पन्न चांगलें होतें व गुरेंढोरेंहि पुष्कळ होतीं.

# पंतांच्या मातृघराण्याची वंशावळ



शके १७७७ राक्षसनाम संवत्सर श्रावण वद्य ८ सोमवार ( ३–९–१८५५ ) या शुभ दिवशीं दुपारीं सुमारें तीन वाजतां रोहिणी नक्षत्र, धनुर्लग्न अशा शुभ वेळीं अंबाजी पंतांच्या घराच्या मध्यभागांत देवघराच्या समोर जेथें ते देवपूजेला बसत असत त्या पवित्र जागीं सौ. गोदाक्का ऊर्फ सीताबाई या प्रसूत होऊन पुत्ररत्न झालें व त्यांचा हा पहिलाच मुलगा असल्यामुळें सर्वांना फार आनंद झाला. त्याचा जन्म गोकुळाष्टमीच्या दिवशीं म्हणजे श्रीकृष्णाच्या जन्मदिवशीं झाल्यामुळें त्याचें नाव " श्रीकृष्ण " असें ठेविलें. नंतर कांहीं दिवसांनीं सौ. सीताबाई या श्रीकृष्णासह बाळेकुंद्री येथें आपल्या घरीं गेल्या. तेव्हां त्याला पाहून सर्वांना फार आनंद झाला व विशेषतः त्याची पणजी जानकीबाई यांना तर प्रपौत्र ( पणतु ) मुखदर्शन झाल्यामुळें अत्यानंद झाला ! प्रपौत्रमुखदर्शन झाल्यानें काशीयात्रा केल्याचें पुण्य लाभतें अशी भाविक लोकांची समजूत असल्यानें मांवदें घालून या सहजप्राप्त यात्रेची ते सांगता करीत असतात. त्याप्रमाणें बाळकृष्णपंतांनीं मोठ्या थाटानें प्रपौत्रमुखदर्शनविधि करून व मांवदें घालून आपल्या परमपूज्य मातोश्रींना कनकाभिषेक केला व सर्वत्र आनंदीआनंद झाला. मात्र श्रीकृष्णाची आजी म्हणजे बाळकृष्णपंतांचें कुटुंब सौ. रुक्मिणीबाई यांचे सांगण्यावरून व बाळकृष्णपंत, रामचंद्रपंत वगैरे घरांतील वडील मंडळी दत्तउपासक असल्यामुळें त्याचें " दत्तात्रय " नाव ठेविलें व तेंच पुढें रूढ झालें. हा दत्तात्रय म्हणजेच या चरित्राचे नायक दत्तोपंत उर्फ श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर होत.

## दत्तात्रयाची जन्मकुंडली




दत्तूचें जन्मलग्न धनुराशी असून लग्नाचे स्वामी पराक्रमांत शुक्राधिप; वृषभांत चंद्र उच्च असल्यामुळें परमहंसक योग झाला आहे असें ज्योतिषशास्त्रज्ञांचें मत आहे व लोकांचे मनांत विलक्षण धर्मबुद्धि उत्पन्न करून तीं परमार्थाकडे वळविणें हें त्याचें फळ आहे असें ते सांगतात. तसेंच बाळेकुंद्री येथें प्रथम येऊन राहिलेले दत्तूचे पूर्वज नरसिंहपंत यांना श्रीदत्तात्रेयांनीं दृष्टांत दिल्याप्रमाणें त्यांच्या सातव्या पिढींत या 'दत्तात्रया'च्या रूपानें श्रीदत्तात्रेयांनीं अवतार घेतला असें भाविक लोक मानितात. रामपा व सीताबाई यांना दत्तात्रयाच्या पाठीवर अक्कावा, गंगावा व यमनाक्का अशा तिघी मुली झाल्या व त्यांच्या पाठीवर गोविंद, गोपाळ, वामन, नरसिंह व शंकर हे पाच मुलगे व तंगेवा, अहिल्या व पुटाक्का या तिघी मुली हीं अपत्यें झालीं. त्यांपैकीं अहिल्या ही लहानपणींच वारली.

दत्तूच्या आयुष्याचीं पहिलीं सात आठ वर्षे बाळेकुंद्री येथें गेलीं. तो अगदीं लहान असतांना त्याच्या जिवावरचे दोन प्रसंग येऊन गेले. पण ईश्वरकृपेनें त्यांतून तो वाचला.

ते प्रसंग असे–एकदां त्याची आई त्याला घेऊन बाजल्यावर निजली असतां तिला झोप लागली. तितक्यांत बाजल्याखालीं ठेविलेल्या शेगडींतील विस्तव भडकून बाजल्यानें पेट घेतला, तेव्हां आगीच्या धगीनें जागी होऊन दत्तूच्या आईनें त्याला चटकन उचलून घेऊन बाजल्याखालीं उडी टाकली व तो अनर्थकारक प्रसंग टळला. तसेंच, एकदां दत्तूची आई बाजल्यावर बसली होती व तो खालीं एका अंथरुणावर निजलेला होता; इतक्यांत त्याच्या आईकडे एक बाई आल्या व तिच्याशीं बोलण्याच्या नादांत त्यांनीं स्वतःला बसण्याकरितां म्हणून ज्या अंथरुणावर दत्तू निजलेला होता तें त्याच्यासह लगबगीनें गुंडाळलें व आपण स्वतः त्यावर बसल्या ! प्रथम ही गोष्ट दत्तूच्या आईच्या लक्षांत आली नाहीं. पण झालेला प्रकार लौकरच तिच्या नजरेस येऊन तिनें तावडतोब त्या बाईंना उठवून अंथरूण उलगडलें, तों दत्तू अगदीं गुदमरून गेला होता. त्या बंदिवासांतून त्याची वेळींच सुटका झाली म्हणून निभावलें !

तो पाच सहा वर्षांचा असतांना एकदां श्रीरामेश्वराच्या देवळांत समाराधना असून ब्राह्मण मंडळी भोजनास बसली होती. तेथें दत्तूहि होता. तेव्हां कोणी एकानें त्याला श्लोक म्हणण्यास सांगतांच त्यानें "संत समागम कराचिना। चिन्मय राघव वराचिना ॥" हा श्लोक न भितां खड्या सुरांत म्हटला. तेव्हां तेथें जमलेल्या विद्वान ब्राह्मणांना फार कौतुक वाटून त्यांनीं त्याची फार वाखाणणी केली व "हा पुढें फार थोर पुरुष होईल" असे उद्गार काढले. हे त्यांचे सहज निघालेले उद्गार कालांतरानें खरे ठरले ! त्यावेळीं दत्तूच्या घराण्याची सांपत्तिक स्थिति बऱ्यापैकीं असून त्याचे आजोबा बाळकृष्णपंत यांचा नावलौकिक चांगला होता. वयाच्या आठव्या वर्षीं त्याचें उपनयन बाळेकुंद्री येथें झालें व तो समारंभ बाळकृष्णपंतांनीं आपल्या लौकिकाला साजेशा थाटानें व उत्साहानें केला. त्यावेळीं बाळेकुंद्री येथें शाळा नसल्यामुळें शिकण्याची सोय नव्हती. त्यामुळें बाळकृष्णपंतांनीं दत्तूला त्याच्या मामाकडे म्हणजे दड्डी येथील श्रीपादपंत कुळकर्णी यांचेकडे शिक्षणाकरितां ठेवण्याची व्यवस्था केली व १८६४ सालापासून तो तेथें राहूं लागला.

# प्रकरण २ रें

---

## प्राथमिक शिक्षण, गृहशिक्षण, धार्मिक शिक्षण, इंग्रजी शिक्षणास सुरवात व सन्मित्रलाभ.

दत्तू दड्डी येथें शिकण्यास गेला तेव्हां तेथें कानडी शाळा असल्यामुळें त्याचें प्राथमिक शिक्षण कानडींतूनच झालें. त्याचे मामा श्रीपादपंत हे जरी फारसे शिकलेले नव्हते, तरी ते सात्विक, धार्मिक प्रवृत्तीचे, दयाशील, परोपकारी, विद्याप्रेमी व कर्तृत्ववान होते. त्यांच्या बहिणी सुंदराक्का, गोदाक्का व बहिणाक्का या तिघींहि शांत, सात्विकवृत्तीच्या व प्रेमळ होत्या व त्यांचेवर श्रीपादपंतांचें फार प्रेम असे. त्यामुळें गोदाक्काचा पहिला मुलगा त्यांच्याकडे शिक्षणाकरितां आल्यामुळें आणि तोहि गुणी व त्यांच्याच वळणाचा असल्यामुळें ते त्याला प्रेमानें वागवून मोठ्या हौसेनें शिकवीत असत. जरी दड्डी येथील शाळेंत त्यावेळीं कानडींत शिक्षण दिलें जात होतें, तरी श्रीपादपंतांच्या घरीं प्रचारांतील भाषा मराठी असून देवघेवींच्या व इतर व्यवहारासंबंधींचे कागदपत्र मराठींत असत व बहुतेक सर्व व्यवहार मराठींतच चालत असे. त्यामुळें त्यांना मराठीचें महत्व विशेष वाटत असे. त्यांनीं दत्तूकडून मराठीचा अभ्यास घरींच करविला व त्याच्याकडून रामायण, महाभारत, हरिविजय, भक्तिविजय वगैरे पौराणिक ग्रंथ व इतर मराठी पुस्तकें वाचवून घेतलीं. तसेंच त्याचें बालबोध व मोडी अक्षर सुधारण्याकडेहि त्यांचें विशेष लक्ष असे व त्याकरितां ते त्याच्याकडून पुस्तकें लिहवून घेत असत. त्यामुळें दत्तूचें मराठीचें ज्ञान वाढलें, इतकेंच नव्हे तर त्याला लेखनाची व तदनुषंगानें टिपणें करून ठेवण्याची अत्यंत महत्वाची सवय लागली. ही सवय विद्यार्थी-दशेंत अंगीं जडणें अत्यंत जरूरीचें आहे. दत्तूला ती बालपणींच जडल्यामुळें तिचे सुपरिणाम त्याला स्वतःला आपल्या पुढील आयुष्यक्रमांत अनुभवण्यास मिळाले. दत्तूच्या इतिहास, भूगोल, गणित वगैरे विषयांच्या शिक्षणाकडेहि श्रीपादपंत लक्ष पुरवीत असत.

दत्तू मामांजवळ राहात असतां त्याला शाळेंतील शिक्षणाबरोबर नमुनेदार गृहशिक्षक व धार्मिक शिक्षणहि मिळालें. सदाचार, सद्वर्तन व व्यवहारचातुर्य या गुणांचे लहान मुलांना तोंडानें धडे देण्यापेक्षां वडील मनुष्यांनीं त्यांना ते आपल्या वर्तनानें घालून देणें अधिक श्रेयस्कर व परिणामकारक होतें. सदाचारसंपन्न, सच्छील व व्यवहारदक्ष मनुष्याच्या संगतींत त्याच्या अनुकरणानें ते मुलांच्या मनावर चांगले बिंबतात. श्रीपादपंत मामांच्या ठिकाणीं वरील गुण वसत असल्यामुळें त्यांच्या संगतींत दत्तूला त्यांचे धडे सहज मिळाले व त्यानें ते घेतले. तसेंच त्यांच्या टापटिपीचा व सचोटीच्या व दक्षतेच्या राहणीचाहि त्याचेवर चांगला परिणाम झाला. त्याचप्रमाणें तो मामांजवळ राहात असतां

त्याला मोठ्या कुटुंबांतील वडील व कर्त्या पुरुषाच्या ठिकाणीं जरूर असाव्या लागणाऱ्या कांहीं गुणांचा म्हणजे सहनशीलता, परोपकारबुद्धि, अतिथिअभ्यागतांचें आदरातिथ्य करणें, आपल्यावर अवलंबून असणारांचें हित साधण्याकरितां करावा लागणारा स्वार्थत्याग व विद्यार्जन करणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांबद्दल सहानुभूति वगैरे गुणांचा उत्कृष्ट नमुना पहावयास सांपडला. हें शिक्षण शाळेंत मिळणारें नसून तें घरींच मिळालें पाहिजे. या दृष्टीनेंहि दत्तूला मामांच्या संगतींत अपरिमित फायदा झाला.

दत्तू मामांच्या जवळ राहात असतां त्याला धार्मिक शिक्षणाचे बाबतींतहि फायदा झाला. मागें वर्णन केल्याप्रमाणें श्रीपादपंतांच्या घरांतील सर्व मंडळी भाविक असून त्यांची श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांचेवर फार श्रद्धा होती. त्यामुळें त्या गोष्टीचा दत्तूच्या मनावरहि परिणाम होऊन बाळपणींच त्याची श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्यावर भक्ति बसली. तसेंच तो मधुन मधुन बाळेकुंद्रीस गेला म्हणजे त्याचे आजोबा बाळकृष्णपंत व वडील रामचंद्रपंत हे त्याचेकडून गुरुचरित्र, दत्तमाहात्म्य वगैरे भक्तिपर ग्रंथ वाचून घेत व इतर रीतीनें दत्तभक्तीचें महत्व त्याला पटवून देत. त्यायोगें त्याची श्रीदत्तावर दृढ भक्ति बसली. अशा रीतीनें दत्तूच्या पितृघराण्यांतून व मातृघराण्यांतून उज्वल गुरुभक्तीचे जे प्रवाह पिढ्यान्‌पिढ्या वाहात येत होते, त्यांचा गोड संगम होऊन त्याच्या ठिकाणीं स्वाभाविक रीतीनें श्रीदत्तात्रेय, श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्यासंबंधीं फार पूज्यभाव उत्पन्न झाला व गुरुभक्तीचें त्याला जणूं बाळकडूच मिळालें.

दत्तू मामांकडे शिक्षणाकरितां गेला तेव्हां त्याच्या आजोळीं शिक्षण घेणारीं त्याच्याच वयाचीं अशीं १०-१५ मुलें होतीं व त्यांतच त्याची बहिण बहिणाक्का इचा मुलगा गणू हाहि होता. तसेंच त्यावेळीं दड्डी येथें "दड्डीकर" नावाचे एक लिंगायत सावकार होते. त्यांच्या घरींहि शाळेंत जाणारीं १०-१५ मुलें होतीं. त्यामुळें श्रीपादपंत व दड्डीकर सावकार यांच्या घरचीं मुलें शाळेंत गेलीं म्हणजे शाळा जवळ जवळ भरून जात असे. दत्तूच्या अंगच्या अनेक गुणांमुळें आणि त्याच्या गोड व मनमिळाऊ स्वभावामुळें त्याच्या बरोबरीच्या मुलांचें पुढारीपण त्याच्याकडेच होतें. लहानपणापासून त्याची प्रवृत्ति धार्मिक विषयांकडे असल्यामुळें त्याचे खेळहि त्या स्वरूपाचे असत. कोठें पुराण अगर भजन असल्यास तो आपल्या संवगड्यांसह तेथें जात असे व देवळांत देवाला पूजा बांधणें वगैरे प्रकारचें कांहीं काम असल्यास तें करण्यास मदत करी. शाळेंतून घरीं आल्यावर फुलें, तुळशी, बेल वगैरे पूजासाहित्य जमवून हीं मुलें देवपूजा करीत असत. दत्तूला लहानपणापासूनच नदीकाठीं, जंगलांत, डोंगरावर वगैरे ठिकाणीं हिंडण्याफिरण्याची फार हौस होती. दड्डीजवळच नदीकाठीं श्रीरामलिंगाचें देऊळ आहे व त्याचे शेजारीं पत्रीबन नावाचें बेलाच्या झाडांचें बन आहे; तेथें सुटीच्या दिवसांत तो आपल्या बालमित्रांसह जात असे व तेथें गेल्यावर त्यांना देवाची सेवा करणें, ध्यान करणें वगैरेबद्दल उपदेश करीत असे. त्याच्या संवगड्यांचें त्याच्यावर फार प्रेम असून ते त्याच्या आज्ञेन वागत असत व त्याला त्यांच्या-

बरोबर निरनिराळे खेळ खेळतांना पाहून हरिविजयांत वर्णिलेल्या श्रीकृष्णाच्या बाललीलांची वडील मंडळींना आठवण होत असे.

दत्तूचें दड्डी येथील प्राथमिक शिक्षण संपल्यावर त्याच्या मनांतून इंग्रजी शिकावयाचें होतें. त्या गोष्टीला त्याचे आजोबा बाळकृष्णपंत व मामा श्रीपादपंत यांची संमति मिळाली व सर्वानुमतें त्यानें इंग्रजी शिकण्याकरितां बेळगाव येथें रहावें असें ठरलें. त्याप्रमाणें तो १८७२ च्या सुमारास बेळगावास पुढील शिक्षणाकरितां गेला.

## इंग्रजी शिक्षण

दत्तू इंग्रजी शिकण्याकरितां बेळगावास आला तेव्हां त्याच्या वडिलांनीं एक लहानशी बिऱ्हाडाची जागा घेऊन तेथें त्याच्याबरोबर त्याचे चुलते जीवाप्पा व चिंताप्पा यांनाहि शिक्षणाकरितां ठेविलें आणि या मुलांना स्वयंपाक करून घालण्याकरितां दत्तूची आजी सौ. रुक्मिणीबाई याहि बेळगावांतील बिऱ्हाडांत येऊन राहिल्या. कांहीं दिवसांनीं दत्तूच्या उभय चुलत्यांचें लक्ष विद्येकडे जसें लागावें तसें लागत नाहींसें पाहून व त्याच्या वडिलांना शहरांत बिऱ्हाड ठेवून सर्वांचा खर्च चालू ठेवणें जड वाटूं लागून त्यांनीं बेळगाव येथील बिऱ्हाड मोडलें व दत्तू एकटाच राहूं लागला. प्रथम प्रथम त्याला घराकडून पैशाअडक्याची वगैरे मदत होत असे. पण पुढें घरच्या आर्थिक अडचणीमुळें तीहि होणेचें बंद झालें. तेव्हां त्याला शिकवण्या धरून अभ्यासक्रम चालवावा लागला. बेळगावांत आल्यावर त्यानें लंडन मिशन स्कूलमध्यें आपलें नाव घातलें व १८७२ अखेर त्याची इंग्रजी पहिली इयत्ता होऊन तो दुसरींत गेला. तो शाळेंत माफीचा विद्यार्थी होता. त्याच्या वर्गांत कृष्णा गुमास्ते व रामचंद्र सुंठणकर नावाचे दोघे विद्यार्थी होते व त्या उभयतांशीं त्याचा विशेष स्नेह जमला. कृष्णाच्या घरीं त्याचें वरचेवर जाणें येणें असे. रामचंद्र व दत्तू हे वर्गांत जवळ जवळ बसत व रामचंद्राला कांहीं अडल्यास तो दत्तूला विचारीत असे आणि दत्तूहि मनमोकळेपणानें व कळकळीनें तें त्याला सांगत असे.

दत्तू व रामचंद्र हे वर्गांत जरी जिवलग स्नेही होते तरी त्यांच्या घरच्या परिस्थितींत जमीन अस्मानाचें अंतर होतें. दत्तू दरमहा चार आणे भाड्याच्या खोलींत हातांनीं स्वयंपाक करून राहात असे व त्याला कधीं कधीं उपाशी पोटींहि शाळेंत जाण्याचा प्रसंग येई. तर रामचंद्र हा लक्षाधीशाचा एकुलता एक मुलगा असून आईबापांचा फार लाडका होता. दररोज शाळेंतून परत येतांना तो दत्तूच्या बरोबर त्याच्या बिऱ्हाडीं जात असे व तेथें तास अर्धा तास त्याच्या सहवासांत घालवीत असे. त्यामुळें त्याला दत्तूच्या घरांतलि परिस्थितीची बरोबर कल्पना येऊन त्याचा दत्तूवरील प्रेमा दुणावला; तो इतका कीं त्यानें दत्तू राहात असलेली खोली सोडण्यास त्याला सांगून आपण एक खोली भाड्यानें घेतली व तेथें त्याची राहण्याची सोय केली. त्या जागीं तालीम, कुस्ती, खेळ वगैरे प्रकार नेहमीं चालत असत. त्यामुळें त्या दोघांमधील संघटण अधिकच वाढलें. त्यांनी त्या जागेपुढें एक लहानसा बगीचाहि केला होता. त्यावेळीं दत्तूची शरीरप्रकृति चांगली असून त्याची ताकद

फार दांडगी होती. रामचंद्राचीहि शरीरप्रकृति चांगली असून त्याला कुस्ती शिकविण्याकरितां एक तालीममास्तर ठेविला होता.

१८७२ सालीं हल्लीं बेळगाव येथें फौजदारी काम चालविण्यांत सुप्रसिद्ध असलेले वकील श्रीयुत रावजी गंगाधर खोत हे मॅट्रीक्युलेशनची परीक्षा पास झाले व त्यावेळीं खडे बाजारांत असलेल्या लंडन मिशनस्कूलमध्यें इंग्रजी दुसऱ्या इयत्तेवर शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. १८७३ सालीं दत्तू त्यांच्या हाताखालीं दुसऱ्या इयत्तेंत विद्यार्थी होता. श्रीयुत रावजी खोत हे उत्तम तऱ्हेचे शिक्षक असल्यामुळें शाळेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्यांची १८७३ च्या अखेर एकदम चवथ्या इयत्तेवर नेमणूक केली. तेव्हां त्यांच्या शिफारशीनें इतर कांहीं विद्यार्थ्यांबरोबर दत्तूहि १८७४ सालीं चवथ्या इयत्तेंत त्यांच्या हाताखालीं गेला व पुढें १८७६ अखेरपर्यंत त्याला श्रीयुत खोत यांच्या हाताखालीं शिकण्याचा सुयोग जमून आला. १८७६ अखेर शाळेंतील नोकरीचा राजीनामा देऊन श्री. खोत हे पोलिस खात्यांत शिरले. नंतर त्यांनीं त्यावेळीं चालू असलेली डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा दिली व ते बेळगाव येथें वकिली करूं लागले. त्यांनीं आपल्या धंद्यांत चांगला नांवलौकिक संपादन केला आहे.

वर लिहिल्याप्रमाणें दत्तूचा शाळेंतील अभ्यासक्रम चालू असतां १८७५ सालीं त्याला मोठ्या चमत्कारानें **श्रीबालमुकुंद** ऊर्फ **बालावधूत** नावाच्या एका परमहंस पूर्णाद्वैती सिद्ध पुरुषाच्या कृपेचा अकस्मात लाभ झाला व तेव्हांपासून त्याच्या आध्यात्मिक उन्नतीला सुरवात होऊन जीवनक्रमाला नवीन वळण लागलें. तेव्हां ज्या सद्‌गुरूंच्या कृपेनें त्याच्या आयुष्यक्रमांत ही क्रांति होण्यास सुरवात झाली त्यांची वाचकांना प्रथम ओळख करून देऊन त्याला त्यांचें दर्शन होण्याचा योग कसा जमून आला व तेव्हांपासून त्यांचा वियोग होईपर्यंत त्याला आध्यात्मिक दृष्ट्या कोणते फायदे झाले तें सांगत आहोंत.

# प्रकरण ३ रें

———:०:———

## श्री वालमुकुंद ऊर्फ वालावधूत

बेळगाव जिल्ह्यापैकीं खानापूर तालुक्यांत मलप्रभा नदीच्या काठीं पार्शवाड नावाचा सुमारें दीड हजार लोकवस्तीचा गाव आहे. यालाच चरित्र नायकांनी परीक्षापूर् अथवा पारखपूर असेंहि म्हटलें आहे. तेथें सन १८५० च्या सुमारास बाळाजी अनंत कुळकर्णी ऊर्फ बाळप्पा नावाचे एक ऋग्वेदी देशस्थ ब्राम्हण राहात असत. त्यांचें गोत्र विश्वामित्र व प्रवर अघमर्षण, कौशिक, विश्वामित्र असें होतें. ते वतनी कुळकर्णीकीचें काम करीत असत व त्यांची सांपत्तिक स्थितिहि बऱ्यापैकीं होती. त्यांना गोपाळप्पा, रंगप्पा व तुंगवा अशीं तीन अपत्यें होतीं. त्यांपैकीं गोपाळप्पाचा जन्म १८४७ सालीं व रंगप्पाचा १८५० सालीं झाला. गोपाळप्पांना आणप्पा व अनंतराव असे दोघे मुलगे होते. त्यांपैकीं अनंतराव हे बी. ए., बी. टी. असून धारवाड जिल्ह्यांत शिक्षण खात्यांत नोकरीवर आहेत. बाळप्पांची मातृभाषा कानडी होती. त्यांचा मराठी भाषेशींहि साधारण परिचय होता.

बाळप्पांचे पूर्वज मूळचे वाईकडील राहणारे असून त्यांच्या घराण्याचें आडनाव जोशी होतें. ते स्मार्त होते, पण पार्शवाडकडे राहूं लागल्यानंतर त्यांनीं वैष्णव संप्रदायाची दीक्षा घेतली. बाळप्पा प्रथम कट्टे वीरवैष्णव होते. पुढें ते बावाबैराग्यांच्या संगतींत आपला काळ घालवूं लागले व त्यांचें प्रपंचाकडील लक्ष कमी कमी होत जाऊन घरांतील मंडळींशीं पटेनासें झालें. सद्गुरूची कृपा झाल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं अशी त्यांची दिवसें-दिवस खात्री होत गेली व त्यांच्या अंगीं वैराग्य बाणत चाललें. असें होतां होतां त्यांना प्रपंचाचा पूर्ण वीट येऊन त्यांनीं आपल्या वतनी कुळकर्णिकीचा राजीनामा दिला व प्रपं-चाचा त्याग करून तपाचरण सुरू केलें. प्रथम कांहीं दिवस त्यांनी मलप्रभा नदीचे कांठीं श्रीसूर्यनारायणाकडे डोळयांचें एकहि पातें न लवतां एकसारखें टक लावून पाहात बस-ण्याचें हटयोगांतील "त्राटक" नावाचें खडतर योगसाधन केलें. नंतर एका निर्जन अरण्यांत जाऊन घोर तपश्चर्या केल्यावर त्यांना श्रीरामचैतन्य नावाच्या एका अवधूताचें दर्शन झालें. श्रीरामचैतन्यांवर अथवा रामावधूतांवर श्रीदत्तात्रेयांचा अनुग्रह झालेला होता. त्यांनीं बाळप्पांवर अनुग्रह केला व त्यांना अवधूत संप्रदायाची दीक्षा दिली. चरित्रनायकांनीं बाळप्पांना "बालावधूत" अथवा "बालमुकुंद" असेंहि म्हटलें आहे. चरित्रनायकांच्या "श्रीदत्तप्रेमलहरी" नावाच्या पदसंग्रहामधील पद १८३ मध्यें त्यांनीं बालमुकुंदांचा पूर्ववृत्तांत दिला असून त्यांच्यावर श्रीरामचैतन्यांचा अनुग्रह कसा झाला याचें थोडक्यांत सुंदर वर्णन केलें आहे. तें असें:— "सुरम्य मलप्रभातिरीं । परिक्षापुरीं । वैष्णवोदरीं । आला शिवयोगी । आला शिवयोगी । बालावधूत सद्गुरु तारक जगीं ॥ धृ० ॥ स्थापन कराया धर्म । आचरी कर्म । दावुनी वर्म । जन तारिले । जन तारिले । निष्काम भक्तिनें

देवदेव पूजिले । संसार पाहुनि असार । निर्जन घोर । अरण्य सेविलें । अरण्य सेविलें । तप घोर आचरुनी त्रिभुवन तापविलें । श्रीराम । आनंदधाम । योगी विश्राम । दयाघन ओळे । दयाघन ओळे । देखुनी तयाचीं बाळ वंदी पाउलें ॥ चाल ॥ देउनी अभय अंकावरी घेतला । घेतला । अवधूत अनादि मूळपंथ बोधिला । बोधिला । चैतन्य स्वरूपें चराचरीं भरला । भरला ॥ चाल ॥ उन्मनी सेवुनी अनुदिनीं । मल्लिकार्जुनीं निजानंद भोगी । निजानंद भोगी । बालवधूत० ॥ १ ॥ " बाळप्पांची अंतःकरणभूमि अगोदरच वैराग्यवन्हीनें तप्त झालेली असल्यामुळें श्रीरामचैतन्यांसारख्या "आनंदधामं, योगिविश्राम व दयाघन " अशा पूर्णानुभवी अवधूतानें पूर्ण कृपेनें पेरलेलें बोधबीज फलद्रूप होऊन त्यांचे ठिकाणीं अल्पावधींतच अद्वैतानुभव बाणला.

श्रीराम चैतन्यांचा अनुग्रह झाल्यावर बाळप्पांचा व त्यांचा कांहीं सहवास झाला किंवा नाहीं व झाला असल्यास तो किती व कोठें झाला हें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु बाळप्पांवर अनुग्रह झाल्यावर त्यांनीं कांही काळ " कबरीवनांत " योगसाधनांत घालविला. कबरीवन म्हणजे बेळगाव तालुक्यापैकीं अंकलगी ( ज्यास " भडाळ अंकलगी " म्हणतात ) गावच्या जवळच्या कबरी गुड्डा नावाच्या डोंगरावरील वन होय. हें स्थान पार्शवाड अगर पारखपूरपासून जवळ आहे. तेथें बाळप्पांना मडवळप्पा, नागलिंगप्पा वगैरे कांहीं महान् महान् योग्यांच्या संगतीचा लाभ होऊन ते योगाच्या अत्युच्च स्थितीला जाऊन पोंचले.

ते तेथें असतांना त्यांच्या अद्भुत योगसामर्थ्यानें पुष्कळ लोकांना चमत्कार पाहण्यास सापडले व त्यांचे कांही शिष्यहि झाले. एके दिवशीं ते भजन करीत बसले असतां यमाजी नावाचा एक धनगर त्यांच्या जवळ येऊन पायां पडला व "आप्पा तुझ्याप्रमाणें मला बैरागी कर " अशी त्यानें विनंति केली. तेव्हां " तुझीं मुलें माणसें, तुझा मेंढरांचा व व बकऱ्यांचा कळप वगैरे सर्व सोडून माझ्या बरोबर येण्यास तयार असशील तर तुला बैरागी करितों " असें बाळप्पांनीं सांगितलें. ताबडतोब तो घरीं गेला व कांहीं वेळानें परत येऊन " आप्पा मी सर्व सोडून आलों आहें " असें त्यानें सांगितलें. तें ऐकून बाळप्पांनीं त्याला आपल्या जवळ ठेवून घेतलें व तो त्यांच्याजवळ राहून एकनिष्ठपणें त्यांची सेवा करूं लागला. यमाजीच्या दांडग्या गुरुभक्तीसंबंधीं असें सांगतात कीं एके दिवशीं बाळप्पा वसत असलेल्या गुहेंत एक वाघ जाऊन बसला. यमाजी नित्याप्रमाणें त्या गुहेंत जातो तों तेथे बसलेला वाघ त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां किंचित्‌हि न डगमगतां " ही माझ्या बापाची जागा आहे. त्याची येण्याची वेळ झाली आहे. तेव्हां तूं येथून निघून जा " असें तो वाघाला म्हणाला. पण वाघ बाहेर न जातां गुरगुरूं लागून आपलें शेपूट जमिनीवर आपटूं लागला. तें पाहून " मला भिववितोस होय ? पण मी भिणार नाहीं " असें म्हणून वाघाचे दोन्ही कान धरून तो त्याला ओढीत बाहेर आणूं लागला. तेव्हां वाघानेंहि आपल्या पंजांनीं त्याचे ओरबाडे काढले. पण त्यांना न जुमानतां यमाजीनें त्याला गुहेच्या बाहेर आणिलें. इतक्यांत बाळप्पा आले व लगेच वाघ निघून गेला. यमाजीनें जेव्हां घडलेला प्रकार त्यांचे कानावर

घातला तेव्हां त्याच्या एकनिष्ठेबद्दल व धाडसाबद्दल त्यांना फार कौतुक वाटलें व त्याच्या अंगावरून आपला वरदहस्त फिरवून ते म्हणाले " पहा वाघाचा धर्म त्यानें पाळला. तो आपल्या धर्मांत चुकला नाही; उलट तो मला असें म्हणतो कीं ' तूं आपल्या गावीं राहण्याचें सोडून या गुहेंत, मी राहाण्याचें ठिकाणीं कां आलास ? ' मी असण्याचे ठिकाणीं तो आला नाहीं, तर त्याच्या जागेंत मी आलों आहे. यांत त्याची चूक नाहीं." पुढें यमाजीवर बाळप्पांची पूर्ण कृपा होऊन त्यांनीं त्याला अनुग्रह दिला व कांहीं वर्षें त्यांच्या सेवेंत घालवून त्यानें देह ठेविला. या संबंधीं चरित्रनायकांनीं पद नं. १८३ मध्यें पुढीलप्रमाणें वर्णन केलेलें आहे. " प्रभु गेला कबरीवना । आनंद कानना । योग साधनावरी बहु प्रीति निजतेजें दिधली यमा किंकरा गति " या ठिकाणीं ' यमा किंकरा ' म्हणून ज्याचा उल्लेख केला आहे तोच वर वर्णन केलेला यमाजी धनगर होय.

अशा रीतीनें कांहीं वर्षें योगानंदांत गेल्यावर बाळप्पा पार्शवाड येथें आपल्या घरीं गेले. त्या वेळीं अवधूत गीतेंत ( अ. ७–१ ) " रथ्याकर्पटविरचितकंथः । पुण्यापुण्यविवर्जितपंथः । शून्यागारे तिष्ठति नग्नो । शुद्ध निरंजन समरसमग्नः " ( रस्त्यांतील चिंध्यांची गोधडी ज्यानें पांघरलेली आहे, ज्यानें पुण्य व पाप यांचा मार्ग सोडला आहे व जो शुद्ध निरंजन व समरस स्थितींत मग्न आहे असा सिद्ध पुरुष शून्य गृहांत नग्न स्थितींत राहतो ) असें जें अवधूताचें वर्णन केलें आहे त्याप्रमाणें त्यांची स्थिति होती. त्यांच्या जटा व दाढीमिशा वाढविलेल्या असून ते ब्राह्मणाप्रमाणें यज्ञोपवीत घालीत व लिंगायताप्रमाणें फडक्याच्या चिंधींत बांधलेलें लिंग गळयांत अडकवीत. तसेंच स्मार्तांप्रमाणें सर्वांगाला विभूति चर्चीत व वैष्णवांप्रमाणें गंध लावून तोंडावर, दंडावर, पोटावर वगैरे ठिकाणीं शंखचक्रांकित मुद्रा लावीत. अशा रीतीनें शैव व वैष्णव या दोन्ही संप्रदायांचीं विशिष्ट प्रकारचीं बाह्यचिन्हें धारण करून हे परस्परविरुद्ध भासणारे संप्रदाय तत्वतः एकच असून ते दोन्हीहि आपणांस मान्य असल्याचें ते सुचवीत असावे असें दिसतें.

बाळप्पांच्या विचित्र वेषामुळें व वागण्यामुळें लोकांकडून त्यांचा अनादर होऊं लागला. एके दिवशीं ते निजले असतांना कोणीं त्यांच्या दाढी मिशा कातरून टाकिल्या व " याला खूळ लागलें आहे " असें समजून सर्वजण त्यांना " हुच्च ( वेडा ) बाळप्पा " म्हणूं लागले. पुढें त्यांना घरीं राहाणें बरें न वाटून ते पार्शवाड गावांत असलेल्या मल्लिकार्जुनाचे देवालयांत जाऊन राहिले. तेथें असतांना ते एकतारीवर भजन करीत, गावीं परगावीं संचार करून भिक्षेवर निर्वाह करीत व भजनांत स्वतः रचलेलीं पदेंहि म्हणत. मल्लिकार्जुन हें त्यांचें आराध्यदैवत असल्यामुळें त्यांच्या पदांमध्यें त्याचा वारंवार उल्लेख झालेला आहे. मागें उल्लेख केलेल्या पद नं. १८३ मध्यें या वेळच्या त्यांच्या रूपाचें व स्थितीचें पुढीलप्रमाणें वर्णन केलेलें आहे. " सुकुमार गात्र मनोहर ॥ उटी सुंदर ॥ भस्माची वरुती । भस्माची वरुती । निजशांति झाली । मोहित पाहुनी मूर्ति । मस्तकीं जटांचा भार । भाळीं केशर मुद्रा सुंदर । अनुपम कांति । आरक्त नेत्र उन्मीलित कृपेची दीप्ति ॥चाल॥

कौपीन कांसे दडकमंडलू करीं। हो करीं। शिव धन्य शिवशिव गर्जतसे वैखरी। वैखरी। उन्मत्त वालपिशाच स्थिति स्वीकरी। स्वीकरी ॥ " वगैरे.

यावेळीं बाळप्पा बालोन्मत्त पिशाच स्थितींत असल्यामुळें त्यांना मानापमानाची बिलकुल पर्वा नव्हती. त्यांचा खरा अधिकार काय आहे हें न समजल्यामुळें लोक त्यांना मल्लिकार्जुनाच्या देवळांतहि त्रास देऊं लागले. तेव्हां पार्शवाड गाव सोडून ते बेळगावच्या पूर्व दिशेला, बेळगाव-कलादगी रस्त्यावर, सुमारें ११ मैलांवर असलेल्या कर्डेगुद्दीच्या डोंगरावर दाट झाडीचें एक ठिकाण पाहून तेथें राहूं लागले. तेथें गडदलक्ष्मचें एक लहानसें देऊळ आहे. त्याच्या जवळच त्यांचें बसण्याचें ठिकाण होतें व तेथें त्यांनीं एक झोपडीहि बांधली होती. त्या डोंगराला कर्डेगुद्दीचा डोंगर व त्याच्या दक्षिण दिशेला पायथ्याशीं असलेल्या गावाला कर्डेगुद्दी हीं नावें पडण्याचें कारण असें कीं पूर्वीं तेथें अस्वलें फार होतीं. कानडी भाषेंत अस्वलाला कर्डी म्हणतात व गुद्दी म्हणजे गुहा. तेंव्हां तेथें अस्वलें फार असल्यामुळें त्या स्थानाला कर्डेगुद्दी हें नाव पडलें. चरित्रनायकांनीं त्या गावाला जंबुनगर, जंबुद्वीप, जंबुकपाट अगर रीसपुरी म्हटलें आहे व त्या डोंगराला जंबुगिरि म्हटलें आहे. कर्डेगुद्दी गाव वाळेकुंद्रीच्या पूर्वेस सुमारें तीन मैलांवर असून तेथील लोकवस्ती सुमारें ११०० आहे त्यापैकीं सुमारें दोन तृतीयांश लिंगायत असून बाकीच्या एक तृतीयांशांत इतर जातींच्या लोकांचा समावेश होतो व त्यांत हणबर लोकांचा भरणा विशेष आहे. त्या गावच्या आजूबाजूला व त्याच्यापासून एक मैलावर असलेल्या मारीहाळ गावीं बेरड लोकांची बरीच वस्ती आहे. बाळप्पांच्या वेळीं म्हणजे सुमारें ६०–७० वर्षांपूर्वीं या गावाच्या आसपास दाट झाडी होती व वाटसरूंना तो भाग फारसा सुरक्षित नव्हता.

बाळप्पा कर्डेगुद्दीच्या डोंगरावर राहूं लागल्यावर कर्डेगुद्दी येथील रामप्पा गोपाळ कुळकर्णी व शंकरप्पा तळकलकर या दोघां इसमांनीं त्यांचेकडून अनुग्रह घेतला व ते त्यांना कर्डेगुद्दी गावांत घेऊन आले. तेव्हांपासून बाळप्पा मधुन मधुन गावांत जाऊं लागले व जसजसें त्यांचें गावांत जाणें येणें अधिक होऊं लागलें तसतशी त्यांचेवर तेथील लोकांची अधिकाधिक भक्ति बसून पुष्कळ लोकांनीं त्यांचेकडून अनुग्रह घेतला आणि दिवसेंदिवस त्यांच्या शिष्यांची संख्या वाढत चालली.

यासंबंधीं पद १८३ मध्यें पुढीलप्रमाणें वर्णन केलेलें आहे. ( बालावधूतांची मूर्ति ) " प्रगटली जंबुशिखरीं। रामशंकरीं। वंदीला योगी ॥२॥ निजगुह्य ज्ञान प्रगटिलें। तत्त्व बोधिलें। अज्ञ तारिले। सुलभ उपायें। स्त्री शूद्र मूढजन धांवुनि धरिती पाय। अद्वैत मार्ग अवधूत। बोधुनि त्वरित। चुकवी अपाय। चुकवी अपाय। आम्नाय तटस्थ महिमा वर्णूं मी काय। श्रीगुरु। ब्रह्म परात्परू। ज्ञानसागरू। भक्त जन माय। दे मुक्ति अर्पितां पायीं धन मन काय ॥ चाल ॥ वाङ्मनातीत गुरुप्रेमामृत सागर। सागर। निजज्ञानी मत्स्य खेळती निरंतर। निरंतर। धन्य त्रिभुवनीं गुरुचरण कमल भ्रमर ॥ चाल ॥ निज छंद भजनानंद वृत्ति ही धुंद दत्त निजरंगी ॥ ३ ॥ " येथें "राम शंकरीं" असा ज्यांचा उल्लेख केलेला आहे तेच बाळप्पांचा प्रथम अनुग्रह घेतलेले कर्डेगुद्दी येथील रामप्पा व

शंकराप्पा हे होत. तसेंच चरित्रनायकांनीं पद ४७ मध्यें बाळप्पांचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. " मलप्रभातिरीं परीक्षा नगरीं । दत्त हा अवतरी भक्तकार्या ॥ ध्रु० ॥ जबुद्वीपां प्रगट होऊनीयां खेळे । दासांचीया मेळे अहर्निशीं ॥१॥ स्त्री शूद्रादि लहान थोर उद्धरिले । जाणुनि मिरविलें पिसेपण ॥२॥ "; पद नं. ३३० मध्यें "पारखपुर क्षेत्रीं अवतरला गुरु माझा । साकार भक्तकाजा । जंबुकपाटीं दावितसे बहु मौजा । घेई सुरनरमुनि पूजा । भरुनी सर्वत्र अनंत उरला ॥२॥ " असें म्हटलें आहे आणि पद १००१ मध्यें कर्डेगुद्दी येथील बाळप्पांची राहाणी व कार्य यांसंबंधीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. " पारखपुरीं जन्मुनी प्रगट जंबुशिखरीं। जनीं वेड पांघरुनियां जडमूढ जनां उद्धरी। अलिप्त सदा असुनी अवधूत मार्ग पसरी. "

बाळप्पांची शरीरयष्टि उंच, सडपातळ व सुदृढ असून त्यांचा वर्ण निमगोरा होता. कर्डेगुद्दीस आल्यावर प्रथम त्यांचा पेहेराव मागें वर्णन केल्याप्रमाणें होता. पण पुढें त्यांनीं जटा व दाढी काढून टाकिल्या. तेव्हांपासून कर्डेगुद्दी गावांत असतांना ते कधीं लंगोटी घालीत तर कधीं धोतर नेसत व कोठें बाहेर गावीं जावयाचें असल्यास त्यांचा पोषाख पुढील प्रमाणें असे—म्हणजे अंगांत बंडी अगर कोट, पायांत तुमान अगर धोतर नेसलेलें व डोकीला रुमाल अगर फडकें गुंडाळलेलें असे. ते उजव्या हातांत एक सोटा घेत व त्यांच्या डाव्या खांद्यावर एकतारी असून तिला एक घंटा बांधलेली असे. त्यांच्या काखेंत एक बटवा असून त्यांत एक पातेलें, शिळी भाकर व मिरच्या इतके जिन्नस असत.

## प्रकरण ४ थें

———:०:———

### बाळप्पांचा अधिकार; त्यांच्या बोधाचा फैलाव व दत्तूच्या मातृ-पितृघराण्यांतून वाहत येणारे त्यांच्या कृपासरितेचे ओघ.

कर्डेगुद्दी येथें राहात असतां बाळप्पा आत्मानुभवाच्या पूर्णावस्थेला पोचले होते व "अक्षरत्वाद्वरेण्यत्वाद्धूतसंसारबंधनात्॥ तत्त्वमस्यादिलक्ष्यत्वादवधूत इतीर्यते ॥ १ ॥ यो विलङ्घ्याश्रमान्वर्णानात्मन्येवस्थितःसदा अतिवर्णाश्रमीयोगी अवधूतःस कथ्यते ॥२॥" या अवधूतोपनिषदाच्या पहिल्या दोन श्लोकांत वर्णन केलेलीं अवधूताचीं लक्षणें त्यांच्या ठिकाणीं वसत होतीं व चरित्रनायकांनीं त्यांच्या स्थितीसंबंधीं, अधिकारासंबंधीं व राहाणीसंबंधीं एके ठिकाणीं जें वर्णन केलें आहे त्यावरून वाचकांना या गोष्टींची सत्यता पटेल, तें असें "सहज स्थितींत जनोद्धार करीत अंतर्बाह्य बोधरूप होऊन बोलणें तो वेदान्त, चालणें ते सिद्धांत, ब्रम्हानंदाचा पुतळाच होऊन, कशाचेंहि चिंतन नसतां बालवत् परतंत्रानें देहादिकांचे व्यापार चालत असून भीति, शंका, लज्जा, आपपरभावरहित होऊन सदा आत्मा, ब्रम्ह, गुरु, एकरूप होऊन, दग्धपटवत् देह प्रारब्धचक्रानें फिरत असतांहि कुलालचक्रस्थित मक्षिकेप्रमाणें अंतरानुभव किंचित् भानावर न येतां सर्व जग आत्माच हा अनुभव, ज्यास त्याचे योग्यतेनुसार दिसून, ज्या भावानें जो भजेल त्यास त्याप्रमाणें फलदाता होत, ज्या रंगांत मिळवावें त्याप्रमाणें होत असूनहि, विविध विषयरंजनास अभिमानाचें तोंड न देतां दिसण्यास मूढ, असण्यास पूर्ण ज्ञाता, बोलण्यास वेडा, बोधास परमहंस, व्यवहारांत भोगी, अंतरंगीं राजयोगी, पहाण्यास देही अदृश्यास विदेही, कैवल्यसाम्राज्यपदीं स्थिरासन झालेला, चारी योगांचेवर ज्याचें शांतिस्थान, ज्याचें अंतर कळणेंच नाहीं, फक्त त्याचे अनन्य भक्त जाणून तद्रूप झाले, जो निराकार, निरंजन, निर्विकल्प, निरामय असा होऊन महीवर विचरतो, तो पंचाक्षरी नामधारक सद्गुरु बालमुकुंद होय." ( पु. २–१०७ )

बाळप्पा आपल्या शिष्यांशीं फार प्रेमळपणानें वागत. त्यांनां गुरुत्व कधींच मिरविलें नाहीं. ते शिष्यांकडून कधीं पायां पडून घेत नसत. कोणी शिष्य त्यांच्या पायां पडल्यास " माझ्याकडे आल्यावर मग रे काय ? तूं राहिलाच नाहींस. तूं मरून गेलास, आतां कोणाचे पाया पडतोस ? " असें ते म्हणत. त्यामुळें लहानापासून थोरापर्यंत कित्येक भाविक भक्तांना त्यांच्या कृपेचा लाभ होऊन ते कृतार्थ झाले. या संबंधानें चरित्रनायकांनीं म्हटलें आहे कीं बालावधूतानें " जंवद्वीपीं राहून शुद्ध अवधूत पंथ अगोचर मार्ग अवलंबून असंख्य जन तारिले. पाच वर्षांपासून तों अगदी जर्जर झालेल्यासहि एकाच सायुज्य सदनीं एकाच क्षणांत धाडिलें." ( पु. ५–२४९ ) व आणखी एकेठिकाणीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे; तें असें " बालावधूत सद्गुरु जनीं आगळा ॥ध्रु.॥

अद्वैत बोधामृत पाजुनी । चुकवितो भवघाला ॥ १ ॥ विक्षेपग भिरवीत आपण । खेळवी भक्त मेळा ॥ २ ॥ पूर्ण कृपें निज खूण दावुनी । प्रगटवी दत्तकळा ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ३१५ )

बाळप्पांना नुसत्या पुस्तकी ज्ञानाचा फार तिटकारा असे. त्यांचा सर्व भर अनुभवावर होता. या संबंधीं चरित्रनायक म्हणतात " माझ्या बाळप्पानें शास्त्र हातीं धरिलें नाहीं. तो नेहमीं असें म्हणे कीं ' तूं स्वतः असल्यानें तुझा अनुभव काय तो सांग कीं ! मेलेले असें म्हणतात, तसें म्हणतात, अशी मेलेल्यांची उसावर तुला कां ?' " ( पु. ७–२२९ ) ते जसे ज्ञाननिधि होते तशीच त्यांचे ठिकाणीं वैराग्याची सीमा झालेली होती. त्यांच्या ठिकाणचें वैराग्य इतकें तीव्र होतें कीं घरदार मुलेंबाळें वगैरेंनीं युक्त असा भरघोस असलेला संसार तुच्छ मानून त्यांनीं त्याचा जो एकदां त्याग केला त्यानंतर त्याच्याकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर ते कर्डेगुद्दी येथें येऊन राहिल्यानंतर पार्शवाड येथें गेलेहि नाहींत. तसेंच त्यांचें वैराग्य पिशाच्च वैराग्य नसून विवेकसंपन्न होतें. जरी त्यांनीं मोह-जालांत गुंतविणारे सर्व आशापाश तोडून टाकले होते, तरी दिवसेंदिवस त्यांच्या शिष्यांची संख्या वाढत जाऊन ते भाविक भक्तांच्या भक्तिप्रेमपाशांत जणूं बद्ध झाले व त्यांचा एक प्रकारचा " अवधूताचा संसार " थाटला.

बालमुकुंद हे शुद्ध प्रेमाची मूर्तिच होते. ते सदा आत्मरंगीं पूर्ण रंगलेले असून इतर गोष्टींत फारसे बोलत नसत. त्यांनीं जवळ जवळ एकतारी खालीं ठेविलीच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. त्यांचीं सुमारें ६० कानडी पदें उपलब्ध आहेत. त्यांपैकीं "मूकनाग बेकू । जनरोळ जाणा गिरबेकु ।" या कानडी पदावर चरित्रनायकांनीं "श्री बाळ बोधामृतसार" नावाचा एक विस्तृत निबंध लिहिलेला आहे; त्याचा योग्य स्थळीं उल्लेख येईलच. ते एकतारीवर भजन करूं लागले म्हणजे त्यांचेभोंवतीं लोकांची गर्दी जमत असे व ऐकणारे मोहित होत असत.

एकदां बाळप्पा धारवाडकडे गेले असतां ( Castle Rock ) कॅसल रॉक जवळ फिरत होते. तेव्हां जवळच निर्जन स्थळीं असलेल्या एका देवळांत एक इसम देवापुढें उभा राहून " जेवावें म्हणतों पण देवा जेवायला घालणारा कोणी नाहीं " असें म्हणून देवाची करुणा भाकीत होता. म्हणजे "आपणाला बोधाची फारच भूक लागली आहे; पण बोधान्न, सिद्धान्न घालणारा सद्गुरुच मिळत नाहीं; आतां मी कोठें जाऊं, काय करूं ?" असा त्याच्या म्हणण्याचा भावार्थ होता. त्याचे ते कळकळीचे आलाप जेव्हां बाळप्पांच्या कानावर आले तेव्हां त्यांनीं एकतारी घेऊन " येथें जेऊं घालूं म्हणतों पण जेवणारेच नाहींत " अशा अर्थाचें पद म्हणण्यास सुरवात केली. तशा भर जंगलांत तें पद अकस्मात् कानीं पडतांच त्या इसमाला फार आनंद झाला. ती अमृत वाणी कोणाची व कोठून आली हें पाहण्याकरितां त्यानें पुनः पूर्वीप्रमाणेंच देवापुढें गाऱ्हाणें केलें व बाळप्पांनीं तेंच पद पुन्हां म्हणून जबाब दिला. तेव्हां त्यानें त्यांच्याजवळ जाऊन त्यांचे पाय धरिले व त्यांनीं त्याला अनुग्रह देऊन कृतार्थ केलें.

तसेंच एकदां बाळप्पा भजन करीत बसले असतां जवळच गस्त घालीत असलेल्या एका शिपायाचे " हुषार " " हुषार " हे शब्द त्यांच्या कानावर आले. तेव्हां त्यांनीं आपल्या एका शिष्यास त्या शिपायाला बोलावण्यास पाठविलें. कांहीं वेळानें तो शिपाई त्यांच्याजवळ आल्यावर ते म्हणाले "बाबा 'हुषार', 'हुषार' म्हणून ओरडून तूं दुसऱ्यांना सावध करीत आहेस. पण तूं जो यमाच्या फासांत सापडला आहेस तो तूंच आधीं सावध हो आणि मग दुसऱ्यांना हुषार राहण्यास सांग." लगेच त्यानें त्यांच्या पायांवर मस्तक ठेविलें व त्यांनीं त्याचेवर अनुग्रह केला.

बाळप्पांचा बराच काळ कर्डेगुद्दीच्या डोंगरावर जात असल्यामुळें बेरड लोकांना त्यांच्या सहवासाचें सुख अनायासें मिळत असे व ते त्यांच्या सेवेंत फार तत्पर असत. त्यांच्यापैकीं कांहींजण चोऱ्या वगैरे करून उदरनिर्वाह करणारे होते. पण त्यांच्या अचल मूढभक्तीमुळें ते बाळपांच्या कृपेला पात्र झाले होते. अशा लोकांना त्यांच्या चौरकर्मादि व्यवसायापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करीत व "अप्पा, त्याशिवाय आमचें भागत नाहीं" असें क्वचित् कोणीं म्हटल्यास गरीब गुरीबांना त्रास न पोंचेल या हेतूनें ते त्यांना कांहीं नियम घालून देत व ते त्याप्रमाणें वागत.

बाळप्पा कर्डेगुद्दी गावांत जाऊं लागल्यापासून ते तेथें असलेल्या बसवण्णाच्या देवळांतील एका खोलींत राहात असत; मधुन मधुन गावाच्या पाठीमागें असलेल्या डोंगरावरील "कर्डीकोळ" नावाच्या दरींत जाऊन बसत व विशेष एकांत पाहिजे असल्यास त्या दरीच्या पश्चिम दिशेला असलेल्या " अयनफडी " नावाच्या गुहेंत बसत असत. त्यांच्या शिष्यमंडळींत सर्व ज्ञातींचे लोक होते. इनामदारांच्या घराण्याखेरीज कर्डेगुद्दी गावांतील बहुतेक ब्राम्हणमंडळींनीं त्यांचेपासून अनुग्रह घेतला होता.

ही सर्व मंडळी परस्परांची आप्तसंबंधी असल्यामुळें त्यांचें परस्परांकडे जाणें येणें फार असे व बाळप्पाहि त्या सर्वांशी अतिशय प्रेमानें व सलगीनें वागत. तें इतकें कीं, त्यांच्या घरांतील मुलांबाळांना ते आपल्याच घरांतील एक आहेत असें वाटून तीं त्यांच्या अंगाखांद्यावर खेळत व तेहि त्यांना न्हाऊं खाऊं घालीत व खेळवीत असत. "ज्याच्याशीं लहान लहान मुलें मनमोकळेपणानें वागून निःशंकपणें मोराप्रमाणें नाचूं उडूं लागतात तो साधुपुरुष आहे असें समजावें " असें ते म्हणत.

कर्डेगुद्दी येथील बाळप्पांचे एक शिष्य विरूपाक्ष गिरमाजी यांच्या मातोश्री अंबाबा व वहीण राधाबाई यांनाहि बाळाप्पांचा अनुग्रह झालेला होता. राधाबाई इजला देसनूर येथील कुलकर्णी रामपा यांस दिली होती. देसनूर गाव बेळगाव जिल्ह्यापैकीं बैलहोंगल तालुक्यांत असून बेळगावपासून सुमारें २० मैलांवर बेळगाव–कलादगी रस्त्याचे बाजूस आहे. रामपा मयत झाल्यामुळें राधाबाई याच देसनूर येथील आपल्या घरची व्यवस्था पाहूं लागल्या व तेव्हांपासून त्यांच्या माहेरची मंडळी देसनूर येथें त्यांच्या घरीं राहावयास गेली. त्यामुळें बाळप्पाहि तेथें वरचेवर जात व ते तेथें असले म्हणजे त्यांचे इतर शिष्यहि तेथें जात. राधाबाईंच्या घरांतील सर्वच मंडळी बाळप्पांची अनुग्रहीत असल्यामुळें

त्यांना ते वडील माणसाप्रमाणें वाटत. पुढें राधाबाईची मुलगी तंगेवा हिला तिच्या मामाला म्हणजे राधाबाईंचा भाऊ विरूपाक्ष यालाच दिल्यामुळें त्याचें तेथेंच कायमचें वास्तव्य झालें. नंतर देसनूर येथील राधाबाईंच्या घरासंबंधीं कोर्टदरबार होऊन अखेर तंगेवांनीं तें विकत घेतलें व अजून तें त्यांच्याच मालकीचें आहे. या घराण्यांतील माणसांखेरीज देसनूर गावांत बाळप्पांचे फारसे शिष्य नव्हते.

विरूपाक्ष गिरमाजी यांचा मावसभाऊ चिंतापा बाळेकुंद्रीकर ( दत्तूचा चुलता ) याचेवर आणि मारीहाळ येथील कृष्णाजीपंत कुळकर्णी यांचें कुटुंब बहिणाक्का ( दत्तूची मावशी ) व त्यांचा मुलगा गणपति ( दत्तूचा मावसभाऊ ) यांचेवरहि बाळप्पांचा अनुग्रह झाला. तसेंच दत्तूच्या आइच्या चुलत भावाचा मुलगा हणमू याचेवरहि बाळप्पांचा अनुग्रह झाला. अशा रीतीने सद्गुरु बालमुकुंदांच्या कृपासरितेचे ओघ दत्तूच्या पितृघराण्यांतून व मातृघराण्यांतून वाहात येत होते. तेव्हां त्याच्यासारखा सात्विक, सच्छील व भक्तिमान मुलगा त्या ओघांत सापडणें अपरिहार्यच होतें.

## प्रकरण ५ वें

---

### दत्तूनें बाळप्पांची केलेली निंदा, शाप, उःशाप, सद्गुरूच्या प्रथमदर्शनाचा अपूर्व योग व अनुग्रह.

दत्तू बाळेकुंद्रीकर, गणू मारीहाळकर व हणमू दड्डीकर हे दड्डी येथें असले म्हणजे त्यांचें बसणें, उठणें, खेळणें वगैरे एकाच घरांत होत असे. ते अतिशय सलगीनें वागत. पण गणू व हणमू यांच्या बाळप्पांसंबंधीं गोष्टी निघाल्या म्हणजे मात्र दत्तू त्यांच्यापासून फटकून असे. पण गणूला मनापासून असें वाटे कीं, जर दत्तूवर बाळप्पांची कृपा होईल तर फार बहार होईल. त्यामुळें दत्तूनें त्यांच्याकडून अनुग्रह घ्यावा निदान एकवार त्यांच्या दर्शनाला तरी जावें अशाबद्दल तो त्याचें मन वळविण्याचा वारंवार प्रयत्न करी. एकदां दड्डीस असतांना त्यानें दत्तूला बाळप्पांच्या अधिकारासंबंधीं पुष्कळ गोष्टी सांगितल्या. परंतु त्याच्या त्या सांगण्याचा दत्तूवर अनुकूल असा कांहींच परिणाम झाला नाहीं. त्यावेळीं बाळप्पांसंबंधीं त्याचें मन कलुषित झालेलें होतें व तसें होणेंहि अगदीं स्वाभाविक होतें. कारण ते शुद्ध अद्वैतमार्गी अवधूत असून बालोन्मत्त पिशाच स्थितींत लौकिकाची पर्वा न करितां राहात असत. त्यामुळें त्यांच्या खऱ्या अधिकाराची ज्यांना कल्पना नव्हती असे लोक त्यांना वेडा समजून त्यांची निंदा करीत. दत्तूच्या घरांतील मंडळीचेंहि त्यांच्यासंबंधीं चांगलें मत नव्हतें. एकदां कांहीं कामानिमित्त ते बाळेकुंद्रीस दत्तूच्या घरीं गेले असतां ओटीवर कोणी न दिसल्यामुळें मध्यघरांत गेले. इतक्यांत दत्तूचे आजोबा बाळकृष्णपंत हे मागील परसांतून तेथें आले तों त्यांना विचित्र पोषाख असलेले बाळप्पा दिसले. तेव्हां त्यांना फार राग आला व त्यांनीं बाळप्पांना वाक्ताडन करून तावडतोब तेथून निघून जाण्यास सांगितलें व ते कांहीं न बोलतां निघून गेले.

दत्तूच्या कानावर बाळप्पांसंबंधीं प्रतिकूल गोष्टी आल्यामुळें तो त्यांना "जोगडा, कर्मभ्रष्ट" वगैरे नावें ठेवून त्यांची निंदा करीत असे. त्यामुळें गणूनें त्यांचे कितीहि गोडवे गाइले तरी त्यांचा त्याच्या मनावर अनुकूल परिणाम होण्याऐवजीं तो उलट अधिकच प्रतिकूल होत गेला व गणूला चिडविण्याकरितां तो त्याच्याजवळ बाळप्पांची अधिकच निंदा करूं लागला. दत्तू बेळगाव येथें इंग्रजी शिकत असतां गणूहि तेथें कांहीं दिवस राहिला होता. एके दिवशीं ते दोघे बोलत बसले असतां बाळप्पांसंबंधीं गोष्टी निघाल्या. तेव्हां गणूनें त्यांच्या पदांची चोपडी दत्तूच्या पुढें केली व "या चोपडींतील पदें तरी वाच म्हणजे तुला बाळप्पांची खरी योग्यता समजून येईल." असें तो म्हणाला; पण तीं पदें वाचून पाहण्याऐवजीं दत्तूनें ती चोपडीच फाडून टाकिली व गणूची एकतारी फोडली, त्यामुळें गणूला फार वाईट वाटलें.

नंतर कांहीं दिवसांनीं गणू कर्डेगुद्दीस असतांना दत्तूनें त्याला एक पत्र लिहिलें व त्यांत " तूं बाळप्पांच्या नादीं लागला आहेस. पण हें बरें नव्हे. हे बोवालोक भोळ्याभाबड्या लोकांना नादीं लावून फसवतात " वगैरे प्रकारचा मजकूर होता. योगायोग असा जमून आला कीं ज्यावेळीं तें पत्र गणूच्या हातीं पडलें तेव्हां बाळप्पा तेथेंच होते. त्यांनीं तें कोणाचें म्हणून विचारलें. तेव्हां " तें माझ्या दादाचें " असें गणू म्हणाला. लगेच त्यांनीं त्याला तें वाचण्यास सांगितलें. तेव्हा त्याची फार चमत्कारिक स्थिति झाली. कारण जरी दत्तू बाळप्पांची निंदा करी व तेवढ्यापुरता त्याला त्याचा रागहि येई, तरी त्याचेवर गणूचें अकृत्रिम प्रेम होतें. तेव्हां दत्तूचें तें पत्र बाळप्पांना वाचून दाखविणें म्हणजे त्याला मोठें संकट वाटूं लागलें. पण त्यांनीं आपण होऊन तें वाचण्यास सांगितल्यामुळें त्याला टाळाटाळी करणेंहि शक्य नव्हतें. तेव्हां इकडे आड व तिकडे विहीर अशी त्याच्या मनाची केविलवाणी स्थिति झाली व त्यानें नाइलाजानें भीतभीत तें पत्र वाचलें. त्याबरोबर बाळप्पांना राग आला व " हें पत्र लिहिणाराला धक्का पोचून तो लवकरच मरतो बघ " असें ते म्हणाले. ते त्यांचे शब्द कानीं पडतांच गणू भयभीत झाला व आतां दत्तूची धडगत नाहीं असें त्याला वाटूं लागलें. कारण समर्थ सद्गुरु बाळप्पांचें वचन कधींहि खोटें होणार नाहीं हा त्याचा दृढ विश्वास होता. तेव्हां आतां या संकटांतून पार करणारा त्यांच्याशिवाय दुसरा कोणीहि नाहीं हें जाणून त्यानें त्यांचे चरण घट्ट धरिले व स्फुंदस्फुंदून रडत दत्तूला अभय देण्याबद्दल तो त्यांना विनवूं लागला. त्याची विनवणी ऐकून बाळप्पांनीं त्याला उचलून पोटाशीं धरिलें व ते त्याला म्हणाले " बाळा, भिऊं नको. तुझा दादा माझाच नव्हे काय ? अरे, माझ्या बोलण्याचें वर्म तुझ्या नीट लक्षांत आलें नाहीं; म्हणून तूं असा भेदरलास. अरे, दत्तू लवकरच मरतो म्हणजे माझ्याकडे येतो बघ. ताबडतोब त्याला इकडे येण्यास लिही. " बाळप्पांचे वरील शब्द कानीं पडतांच गणूला अत्यानंद झाला व दत्तूचें कांहीं बरें वाईट होतें कीं काय ही जी त्याला भीति वाटत होती ती तर दूर झालीच, पण त्याचेवर आतां बाळप्पांचा अनुग्रह होणार अशी खात्री वाटूं लागली व त्यानें ताबडतोब कर्डेगुद्दीस येण्याबद्दल दत्तूला पत्र लिहिलें.

त्याच सुमारास बेळगावांत दत्तूचें पोट अतिशय दुखूं लागून त्याला ताप आला व भयंकर मनस्ताप होऊं लागला. अशा स्थितींत गणूनें बाळप्पांच्या सांगण्यावरून लिहिलेलें पत्र त्याला मिळालें. तें वाचून त्याला मोठा विस्मय वाटला व त्यानें आपण आजारी असल्याचें कर्डेगुद्दीस गणूला कळविलें. गणूनें ताबडतोब ही गोष्ट बाळप्पांच्या कानावर घातली. तेव्हां त्यांनीं विभूति व प्रसाद देऊन व " ही विभूति त्याच्या सर्वांगाला लावून त्याला प्रसाद दे व सतत नामस्मरण व भजन करण्यास सांग" असें सांगून त्याला दत्तूकडे पाठविलें. त्याप्रमाणें गणूनें ताबडतोब बेळगावास जाऊन दत्तूची भेट घेतली व त्यानें लिहिलेल्या पत्रासंबंधीं घडलेली सर्व हकीगत त्याला सांगितली; आणि बाळप्पांनीं सांगितल्याप्रमाणें त्याच्या अंगाला विभूति लावून त्याला प्रसाद दिला व नाम-

स्मरण व भजन करण्यास व लवकरच कर्डेगुद्दीस बाळप्पांच्या दर्शनाला येण्यास सांगून तो कर्डेगुद्दीस परत गेला.

दत्तूच्या त्या वेळच्या स्थितींत बाळप्पांकडून विभूति, प्रसाद व अभयवचन घेऊन येणारा गणू म्हणजे प्रत्यक्ष देवदूतच आलासें वाटून त्यानें मोठ्या श्रद्धेनें बाळप्पांनीं दिलेली विभूति लावून व प्रसाद घेऊन त्यांनीं सांगितल्याप्रमाणें नामस्मरण व भजन करण्यास सुरवात केली व त्याला थोडथोडा आराम पडत गेला. तेव्हांपासून त्याच्या हृदयाकाशांतील बाळप्पांसंबंधाच्या प्रतिकूल ग्रहांचे ढग वितळूं लागून त्याची त्यांच्यावर श्रद्धा बसत चालली. त्याला जरा बरें वाटल्यावर तो त्यांच्या दर्शनास जाण्याकरितां निघाला व कर्डेगुद्दी येथें त्याचे आप्त विरूपाक्ष गिरमाजी यांचेकडे गेला.

यावेळीं दत्तूच्या मनाची स्थिति फार चमत्कारिक झाली होती. ज्या सत्पुरुषासंबंधी त्यानें आपला प्रतिकूल ग्रह करून घेतला व गणूच्या कळकळीच्या विनंतीला झिडकारून ज्याची त्यानें निंदा केली त्याच महात्म्यानें तें सर्व पोटांत घालून पूर्ण कृपेनें विभूति व प्रसाद पाठवून त्याला अभय देऊन धीर दिला! तेव्हां हा काय प्रकार आहे तें त्याला कांहींच समजेना. तोंपर्यंत त्याची सदसद्विवेकबुद्धि त्याला असें सांगत होती कीं बाळप्पांसारखे बावालोक ढोंगी, फसवे व लुच्चे असतात; म्हणून त्यांच्या नादीं लागणारांना उपदेश करून परावृत्त करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. परंतु त्याच्या या दुखण्यांत त्याला बाळप्पांसंबंधीं जो प्रत्यक्ष अनुभव आला त्याच्या योगानें त्याच्या सदसद्विवेकबुद्धीचे आधार ढिले पडले व त्याला भयंकर असमाधान वाटूं लागून तळमळ उत्पन्न झाली आणि त्याच्या अंतःकरणानें बाळप्पांकडे ओढ घेतली. त्याच आकर्षणानें त्याला बेळगावाहून कर्डेगुद्दीपर्यंत खेचून नेलें होतें. तरीपण तेथें गेल्यावर एकदम त्यांचेकडे जाऊन त्यांची क्षमा मागण्याचें त्याला धैर्य झालें नाहीं. अशा स्थितींत त्याचा चुलता चिंतापा व विरूपाक्ष गिरमाजी यांनीं "आम्ही तुला बाळप्पांकडे घेऊन जातों. तूं आमच्याबरोबर चल" असें त्याला सांगितलें. पण तें न पटून "जो गुरु रागावतो, त्याचेकडे मीं येणार नाहीं," असे त्यानें उत्तर दिलें. तेव्हां त्यांनीं ती गोष्ट बाळप्पांच्या कानावर घातली व लगेच ते दत्तूला भेटण्याकरितां विरूपाक्षपंतांच्या घरीं गेले.

बाळप्पा आल्याचें दत्तूला समजतांच तो घराच्या बाजूला गुरेंढोरें बांधण्याच्या जागीं ठेवलेल्या गवतांत लपून बसला. तेव्हां तो लपला होता तेथें ते गेले व "माझ्या मूळलेका (अनादिपुत्रा), आतां किती दिवस तूं लपून बसणार? मी तुझी कित्येक दिवस वाट पाहात आहें, ऊठ," असें म्हणून त्यांनीं त्याला उठविलें व मोठ्या प्रेमानें पोटाशीं धरून कुरवाळीत सद्गदित कंठानें ते म्हणाले "बाळ, तूं माझा अनादि पुत्र; माझा कुलोद्धारक आहेस. तेव्हां माझ्याकडे येण्याला संकोच कां? भीति कां?" हा सर्व प्रकार पाहून दत्तू अगदीं चेकित झाला व हें काय गारुड आहे याची त्याला कांहींच कल्पना होईना!

अशा अद्‌भुत रीतीनें बालावधूत व दत्तू या अद्वितीय सद्‌गुरुसच्छिष्यांच्या प्रथम भेटीचा योग जमून आला. जीवशिवांच्या भेटीचाच तो अद्‌भुतरम्य प्रसंग म्हटला

पाहिजे ! फार दिवस चुकलेलें आपलें लाडकें मूल अकस्मात भेटलें म्हणजे मातेची जशी स्थिति होते तशी स्थिति दत्तूला पाहिल्याबरोबर बालावधूतांची झाली व आपला अनादि पुत्र व अवधूतसंप्रदाय चालविणारा वारसदार भेटलासें वाटून त्यांना अत्यानंद झाला आणि वात्सल्यभरानें त्यांनीं त्याला पोटाशीं धरिलें. तर दत्तू त्यांच्या अनपेक्षित भेटीनें व अत्यंत प्रेमळ व सलगीच्या वागण्यानें दिङ्मूढ होऊन त्याच्या ठिकाणचे सर्व संशय, पूर्वग्रह व तर्ककुतर्क देशोधडीला गेले व तो अंतःकरणानें त्यांना शरण गेला. त्यांच्या कृपाकटाक्षानें त्याच्या ठिकाणच्या शंकाकुशंकांचें निरसन होऊन त्याची अंतःकरणभूमि शुद्ध, अद्वैत बोधबीज ग्रहण करण्यास तयार झाली. या प्रथम भेटींतच तो जो सद्‌गुरूच्या प्रेमाकर्षणांत सापडला तो कायमचाच !

शिष्याच्या जीवनक्रमांत सद्‌गुरूच्या प्रथम दर्शनाचें महत्व किती आहे याचें चरित्रनायकांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे—

"इतर पाहिजे ती वस्तु केव्हां ना केव्हां तरी हातीं लागेल; परंतु सद्‌गुरु मिळणें फार कठीण. अपार पूर्वसुकृत असल्याशिवाय गुरूची गाठ पडणें नाहीं. ब्रह्मांडांचीं ब्रह्मांडें तराजूच्या एका पारड्यांत घालून सद्‌गुरुदर्शनलाभाचें पुण्य दुसऱ्यांत घातलें असतां दर्शनलाभाचें पारडें अचलच राहील, व किंचित्हि जागा सोडणार नाहीं. सद्‌गुरुदर्शनमहिमा असा आहे. स गुरुदर्शनदिवस हा अनंत युगांतील, अनंत जन्मांतील एक सुदिन, पर्वकाळ व दिव्ययोगघटिका आहे. सद्‌गुरुदर्शनच बुद्धिसूर्याचें उत्तरायण, स्वर्गद्वाराचें–मुक्तिद्वाराचें उद्घाटन व भाग्योदय महायोग. सर्व तीर्थाटनें, सर्व व्रतें, सर्व साधनें, सर्व उपासना, सर्व जप, तप, अध्ययन, सर्व सत्कर्मे, सर्व परोपकार हीं एकाच काळीं, एकाच क्षणीं सद्‌गुरुदर्शनयोगरूपें फळतात. 'काशीक्षेत्रं तन्निवासं जान्हवी चरणोदकम्' या वचनाची सद्‌गुरुदर्शनानें सार्थ सिद्धि होते. याहून श्रेष्ठ लाभ होणें नाहीं." ( पु. ७–७८ )

बालमुकुंद व दत्तू यांची भेट झाल्यानंतर लौकरच त्यांनीं त्याचेवर विधियुक्त अनुग्रह केला. त्या प्रसंगाचें वर्णन करितांना चरित्रनायक म्हणतात "तो सद्‌गुरु व्याघ्राजिनावर पद्मासनस्थ झालेला पाहिला. ××× तो आनंदसागर परमपुरुष पाहतांच आश्चर्य आल्हादाचा पूर आला. तो ब्रह्मानंदाचा डोह मूर्तिमंत पाहतांच अंगीं सत्वाचें वारें भरलें. तेणेंकरून प्रेम सावरेनासें होऊन सुखातिशयानें व्याकुळता आली. ती धवधवीत दिगंबर मूर्ति पाहून मन मनपणास विसरूं लागलें; सुखाच्या महापुरांत देहादि संसार बुडूं लागला; चित्तांतील स्मरणशक्ति उडाली; जीव, शिव प्रणव एक झाले; बुद्धीचा निश्चय सत्वपुरांत बुचकळ्या खाऊं लागला; भक्तकामकल्पतरूचे दर्शनाबरोबर निजात्मज्योति लखलखीत प्रगट होऊन जीवदशा लाजून दडाली. देहावरील भान नाहींसें होऊन विषयांची वार्ता स्वप्नींहि ऐकिली नव्हती कीं काय असें झालें. त्या काळीं त्रिपुटी हरपली; अंतरींचे विकार मावळून गेले. जीवशिवांचा भेद उडाला. गुरुकृपा–अरुणोदय होतांच अज्ञान–अंधःकार निघून गेला. मग ज्ञानाच्या उजेडांत " मी ", " तूं " पणातीत दिव्य मूर्ति पाहतां पाहतां कंठ दाटून आला, आणि शब्दव्यवहार खुंटला. रोमांच उभे राहून सर्वांगांतून घामाचा

लोट चालला. देह वायुस्तब्धतेनें कापूं लागला. पोटांत आनंद मावेनासा होऊन डोळ्यां वाटे आनंदवाष्पाचा पूर वाहूं लागला, सुखभरांत स्फुंदत स्फुंदत आनंदमूर्च्छा येऊं लागली. इतक्यांत "नाभी नाभी ! धीर ! धीर !!" अशी गंभीर गिरा ऐकून ती सत्वावस्था सावरून घर्म पुसून पुढील कार्यस्मरण होतांच बालमुकुंदचरणांवर दंडवत प्रणाम केला. दिव्य-चरणकमलीं लोळण्याची ती आवडी अपुरी राहिल्यामुळें गडबडा लोटांगणें घालीत असतां, हा मूढ बाळभाव जाणून योगीराणा स्वानंदानें संतुष्ट झाला. मग बाहु पसरून, शिष्याला उठवून बसविलें, आणि कृपादृष्टीनें सावकाश त्याच्याकडे पाहून परिपक्क दशा अंगीं आल्याचा त्यांना संतोष झाला. शरणागताचें खरें मुमुक्षुत्व व दीन हीन गोस्थिति पाहून समर्थाचें दयार्द्र अंतःकरण उचंबळलें. त्यांनीं पायांवर लोळलोळून स्फुंदत असलेला, प्रेमाश्रूंनीं श्रीचरण न्हाणीत असलेला, केशांनीं चरणधूळ झाडीत असलेला, जिव्हेनें चरणरज चाखीत असलेला जो शिष्य त्यास उदार करानें उचलून दृढालिंगन दिलें, प्रेमानें त्याचें मुख कुरवाळिलें आणि त्याला सन्मुख बसता केला आणि जो निःशब्दाचा ठाव विश्वतोमुख, चारी वाचांचा प्रकाशक तो अवधूत, शब्दांचें जीवन, स्वतः हास्यवदन करून बोलूं लागला. तेव्हां चित्सागराची लहरी लोटली, कीं आनंदाचा झरा फुटला, कीं निजसुखाची खाणी उघडली किंवा परमानंदाची भरती आली अशी ती मेघसदृश गंभीरवाणी प्रकट केली." (पु. ३–१६६) त्यानंतर बालमुकुंदांनीं तत्वबोध करून अनादि अवधूत संप्रदायक्रमाप्रमाणें दत्तला अनुग्रह दिला. त्या प्रसंगाचें चरित्रनायकांनीं श्रीदत्तप्रेमलहरी पद २७२५ मध्यें फारच मार्मिक वर्णन केलें आहे तें असें:—

ब्रह्मानंद परमाद्वित शुद्ध बुद्ध सद्‌गुरु ॥ ज्ञेयाज्ञेयत्वादि शाश्वत विमुक्त चित्सागरु ॥ धृ. ॥ नित्यानंदाखंडरसैक दिव्य मूर्ति साजिरी ॥ सर्व निषेधावधीभूत अक्रिय अविकारी ॥ भादृशीमात्र प्रत्यग्रूप अनंत सचराचरीं ॥ प्रत्यस्तमिताशेषविशेष पूर्ण परावरी ॥ १ ॥ कौपिन कांसे भस्मोध्दूलित परमहंस धूर्जटी ॥ दंडकमंडलु सुरभी श्वान कल्पवृक्षनिकटीं ॥ निगमागमाऽगोचर तीं अनुग्रहहतवटी ॥ चरणरजीं लोळतां हृदयीं प्रेमपूर लोटी ॥ २ ॥ शके सत्राशे सत्याणव युवनाम वत्सरीं ॥ अश्विनमास असितपक्ष द्वादशी शुभवासरीं बालावधूत तरणी उदेला परमव्योमकुहरीं ॥ दर्शनमात्रें समूळ सरली अज्ञानशर्वरी॥३॥ ब्रह्मनिष्ठ श्रोत्रिय सद्‌गुरु योगीमुकुटमणी ॥ कृपाकटाक्षें ब्रह्मचि होय शिष्य समित्पाणी ॥ ज्ञाताज्ञानज्ञेयविहीन स्वानुभवधणी ॥ अखंड शांति सहज दाता अद्‌भुत तत्करणी ॥४॥ अनादि सिद्ध श्रुतिसंमत संप्रदाय भला ॥ बोधामृत पाजितां शिष्य शक्तिपात झाला ॥ सहज समाधि सहज लागतां अहंभाव निमला ॥ सत्यज्ञानानंत सद्‌गुरु दत्तहृदयीं भरला ॥ ५ ॥ "

या पदांतील तिसऱ्या चरणांत शके १७९७ युवनाम संवत्सरांत आश्विन वद्य द्वादशीच्या म्हणजे गुरुद्वादशीच्या शुभ दिवशीं बालावधूतांचा आपणावर अनुग्रह झाला व आपल्या हृदयांत बोधरवीचा उदय होऊन अज्ञानरूपी रात्र समूळ नाहींशी झाली असें म्हटलें आहे व शेवटल्या चरणांत सद्‌गुरूकडून अनादिसिद्ध श्रुतिसंमत अशा अवधूत-

संप्रदायाप्रमाणें आपणास बोधप्राप्ति होतांच सहजसमाधि लागून जो अद्‌भुत व दिव्य अनुभव आला त्याचें दिग्दर्शन केलें आहे. हा गूढ अनुभव शब्दापलीकडला असल्यामुळें त्याचें मर्म अनुभवीच जाणतील.

दत्तूसारख्या सच्छील व सदभिरुचीच्या मुलानें बाळप्पांची केलेली निंदा कानीं पडतांच रागावून त्यांनीं त्याला शाप देणें व नंतर उःशाप देऊन त्याचेवर अनुग्रह करणें या गोष्टी सकृद्दर्शनीं विपरीत दिसतात. कारण बाळप्पांच्या त्या वेळच्या राहणीमुळें त्यांची कोणी निंदा केली तर त्यांत विलक्षण असें कांहींच नव्हतें. स्वामी रामकृष्णांचा अधिकार काय आहे हें समजण्यापूर्वी त्यांच्या राहणीवरून ते भ्रमिष्ट व माथेफिरू आहेत असें नरेंद्रनाथाला वाटे व हा एक वेडापीर आहे असेंहि तो म्हणे. पण पुढें तो त्यांचाच पट्टशिष्य झाला ! तेव्हां आपली निंदा कानीं पडतांच बाळप्पांनीं दत्तूला जो शाप दिला तो गूढार्थपूर्णच असला पाहिजे असें म्हणावें लागतें. या दृष्टीनें विचार केला असतां असें दिसतें कीं, शिष्यानें समित्पाणि होऊन सद्‌गुरूला शरण जाणें म्हणजे तें एक प्रकारें त्याच्या जीवदशेचें मरणच होय. "मरूनियां गुरूसी शरण त्वां जावें। तरीच ही फावे जीवन्मुक्ति" (द. प्रे. ल. ७३६) "शिष्यजींव घेतल्याविना न दाविसी तुझिया खूणा" (द. प्रे. ल. ७६३) "समूळ मी मेलों। तैंचि दत्तासी भेटलों" ( द. प्रे. ल. २१४० ) असे चरित्रनायकांनीं वारंवार उद्गार काढले आहेत. त्यांवरून बाळप्पांनीं "तो मरतो म्हणजे माझ्याकडे येतो बघ" असें जें गणूला सांगितलें त्याचें रहस्य समजून येतें. तसेंच सद्‌गुरूला शरण जाणें म्हणजे काय हें श्री ज्ञानेश्वरमहाराजांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहेः—" तैसा मी एकवाचूनि कांहीं। मग भिन्नाभिन्न आन नाहीं। सोऽहंबोधें तयाच्या ठायीं। अनन्यु होय ॥ ज्ञा. १८–१३९७ पैं आपलेंनि भेदेंविण। माझें जाणिजे जें एकपण। तयाचि नांव शरण। मज येणें गा ॥ १३९८ ॥ जैसें घटाचेनि नाशें। गगनीं गगन प्रवेशे। मज शरण येणें तैसें। ऐक्य करीं ॥ १३९९ ॥ × × मजहीं शरण रिघिजे। आणि जीवितेंचि असिजे। धिग् बोली यिया न लजे। प्रज्ञा केवीं ॥ १४०२ ॥ " तेव्हां " दत्तू लवकरच मरतो बघ " हे बाळप्पांचे उद्गार सद्धेतुमूलक नव्हते असें कोण म्हणेल ? व पुढें त्यांनीं स्वतः आपल्या शाप उःशापाचें वर्म दत्तूला पुढीलप्रमाणें सांगितलें, तें असें–" हे पुत्रा, तुझ्या परम हिताकरितां तुला माझी निजस्थिति, निजरूप व निजानंद यांची खूण दाखवावी म्हणून तूं गजाननास ( गणूला ) लिहिलेलें पत्र पाहून शाप दिला व उःशापहि वदलों. त्यानंतर तूं आध्यात्मिक तापानें फार पीडलास. त्यावेळीं माझें वचन मम पुत्र गजाननमुखें श्रवण करून, भक्तिविश्वासपूर्वक विभूति धारण करून व नामस्मरण, भजन हीं चालवून फळ पावलास. तेणेंकरून मी संतोष पावलों, व प्रसन्न झालों. त्या शापउःशाप प्रसादाची अनुपम दीप्ति असून त्यांत अपार शक्तिदान आहे. " ( पु. ३–१७० )

या शापउःशापांच्या परिणामाकडे पाहिलें असतां असें दिसतें कीं दीर्घकाळ उपदेश करून अगर साधनें करण्यास लावून दत्तूच्या सर्व चित्तवृत्ति आपल्याकडे आकर्षून घेण्याचें जें महत्कार्य साधलें नसतें तें बाळप्पांनीं शापउःशापमिषानें सहज लीलेनें चुटकीसरसें

घडवून आणिलें. तेव्हां त्यांच्या अद्‌भुत सामर्थ्याचें व अतर्क्य लीलेचें कौतुक करावें तेवढें थोडेंच !

तें कांहींहि असो. पण दत्तूला पाहिल्याबरोबर बाळप्पांना त्याची खरी योग्यता कळून आली व त्याला अनुग्रह झाला त्याचवेळीं " हा फार अधिकारी आहे. हाच माझा मार्ग पुढें चालवील " अशा प्रकारचे प्रशंसोद्गार त्यांनीं आपल्या इतर शिष्यांसमक्ष काढिले.

---

# प्रकरण ६ वें

——:०:——

## पुढील कार्याची तयारी; योगाभ्यास; गुरुबंधु.

दत्तूवर बालमुकुंदांचा अनुग्रह झाला तेव्हां त्याचें वय सुमारें वीस वर्षांचें असून तो इंग्रजी पाचव्या इयत्तेंत शिकत होता. त्यामुळें त्यांना त्याच्याबद्दल फार कौतुक वाटत असे व आपला अभ्यास चालू ठेवण्याबद्दल त्यांचें त्याला आग्रहाचें सांगणें असे.

दत्तूच्या पूर्वी त्याचा वर्गबंधु कृष्णा याचेवर बालमुकुंदांचा अनुग्रह झालेला होता. त्याची गृहस्थिति बऱ्यापैकीं असून दत्तूचें त्याच्याकडे विशेष जाणें येणें असे. दत्तूलाहि बालमुकुंदांचा अनुग्रह झाल्यामुळें ते दोघे गुरुबंधु झाले. त्यामुळें दुधांत साखर पडल्याप्रमाणें होऊन त्यांच्यांतील अकृत्रिम प्रेम व संघटण अधिकाधिक वाढत गेलें. बालमुकुंद मधुन मधुन कृष्णाच्या घरीं जात. त्यामुळें तेथें दत्तूला त्यांच्या दर्शनाचा लाभ होत असे. पुढें दत्तूनें स्वतःची राहण्याची स्वतंत्र जागा घेतल्यावर ते वारंवार तेथें जाऊन त्याची विचारपूस करीत व कधीं तेथें भजन पूजनहि करीत. त्याची शुद्ध सात्विक व भावनाप्रधान वृत्ति, अध्यात्म विषयाची अतिशय आवड, ऐन तारुण्यांतील धडाडी, बिकट परिस्थितीमुळें व पारमार्थिक विचारांचे योगें उत्पन्न झालेली वैराग्यवृत्ति, व तो आपल्या बिऱ्हाडीं एकटाच राहात असल्यामुळें मिळणारी स्वतंत्रता वगैरे गोष्टींचा असा परिणाम झाला कीं त्याला गुरूचाच छंद लागून राहिला व गुरुवाक्यच वेदांत, त्याचा बोधच सिद्धांत, तोच देव, तोच गुरु, तोच माता, तोच पिता, तोच बंधु, तोच सखा, सर्व कांहीं तोच अशी त्याची भावना झाली. बाळप्पांची राहाणी तर "कोई दिन जोगी, कोई दिन भोगी" अशा प्रकारची ! तेव्हां अशा स्थितींत त्याचा अभ्यासक्रम पुरा होणें शक्य नव्हतें. परंतु अभ्यास न सोडण्याची त्यांनीं त्याला आज्ञा करून " तुला माझ्याकडे येण्याचें कारण नाहीं. तुला पाहिजे तेव्हां मीच तुझ्याकडे येत जाईन. तूं विद्याभ्यास पुरा करून प्रपंच केला पाहिजेस. मी तुझ्या योगक्षेमाचा सर्व भार घेतला आहे. काळजी नको." अशा प्रकारचें आश्वासन दिल्यामुळें तो चालू राहिला. या वेळच्या त्यांच्या व आपल्यामधील संबंधाचें चरित्रनायकांनीं एके ठिकाणीं फारच गोड वर्णन केलें आहे, तें असें:— I was with Him childlike, innocent of all knowledge or ignorance, fully confident in Him, the worthy and able Saviour and Supreme Guide and He led me to the self effulgence out of His simple and indefinable and single love of truest mother. ( योग्य व समर्थ असा जो माझा त्राता व सर्वांहून श्रेष्ठ मार्गदर्शक त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून कसल्याहि प्रकारचें ज्ञान अगर अज्ञान यांचा गंधहि नसलेल्या एखाद्या मुलाप्रमाणें मी त्याच्यावरोबर असें व त्यानें शुद्ध, अनिर्वचनीय,

फकिरी व अत्यंत निरपेक्ष अशा मातृप्रेमानें मला आपल्या स्वयंप्रकाश स्थितीप्रत नेलें. ) ( पु. ८–२९ )

जरी बालमुकुंद स्वतः फकिरी बाण्यानें राहात असत तरी विद्याभ्यास अगर उद्योग धंदा करीत असलेल्या शिष्यांनीं आपापले व्यवसाय बिनचूक चालवावे अशी त्यांची शिकवण असे व दत्तूची परिस्थिति व त्याच्या अडचणी लक्षांत घेऊन ते त्याच्याशीं वागत. पण त्याला भेटून कांहीं दिवस गेले म्हणजे त्यांना त्याच्या भेटीची उत्कंठा लागत असे व ते त्याचा शोध करीत तो असे त्या ठिकाणीं जात. एकदां आठवले वकिलांच्या घरीं त्यांच्या मुलाला दत्तू शिकवीत बसला होता. तें बाळप्पांना समजतांच ते तेथें गेले व तो माडीवर आहे असें समजल्यावर घराच्या मागील बाजूस असलेल्या तुलसीवृंदावनाच्या कट्टयावर त्याची वाट पाहात बसले. इतक्यांत गणपतराव कांहीं कामानिमित्त घराचे मागील बाजूस गेले, तों तुलसीकट्टयावर बसलेले बाळप्पा त्यांना दिसले व हा विक्षिप्त मनुष्य येथें कशाला आला असें वाटून त्यांनीं त्यांना घालवून दिलें.

मागें उल्लेख केल्याप्रमाणें बालमुकुंद हे महान् योगी असून ते मधुन मधुन सुटीच्या दिवसांत दत्तूला कडेगुद्दीस अगर देसनुरास बोलावीत व त्याचेकडून योगाभ्यास करवून घेत. त्याला अनुग्रह झाल्यावर सुमारें सहा महिन्यांनीं तो देसनूर येथें तीन महिने मुद्दाम जाऊन राहिला होता. तेव्हां त्यांनीं आपल्या इतर कांहीं शिष्यांबरोबर त्याच्याकडून फार उग्र स्वरूपाचें साधन करवून घेतलें. त्यांच्या साधनाला बसण्याच्या मुख्य जागा म्हणजे विरूपाक्षपंतांच्या घरांतील एक खोली व देसनूर गावाच्या उत्तर दिशेकडील मलसर्जीच्या डोंगरावर असलेलें करेवा देवीचें देवालय या होत. विरूपाक्षपंतांचें घर डोंगराच्या पायथ्याशीं असून उत्तराभिमुख आहे. त्याच्या वायव्येकडील कोपऱ्यांत एक लहानशी खोली (६'×७') असून तिला एक दार आहे व चोहोंबाजूंच्या भिंती फार जाडीच्या आहेत. घराची मांडण फार उंच नसल्यामुळें या खोलीचें दार बंद केलें म्हणजे तें एक अत्यंत निवाऱ्याचें स्थान आहे. या खोलींतील एका कोपऱ्यांत एका चौरंगावर मागें उल्लेख केलेले योगी मडवळप्पा यांच्या पादुका असून बाजूला बालमुकुंदांच्या हातांतील सुमारें ५॥ फूट लांबीची वेताची काठी, रुद्राक्षांची माळ, एकतारी या वस्तु ठेवलेल्या आहेत. एकतारीच्या भोपळयावर सरळ सोंडेचा गणपति, हातांत वीणा असलेली सरस्वती व पाच फणांचा नाग अशीं चित्रें काढलेलीं आहेत. एकतारीच्या दांडीच्या बाजूला भोपळयावर टेकलेली लाकडाची नक्षीदार प्रभावळ असून दांडीच्या टोकावर एक लाकडाची राघूची चोच बसविलेली आहे.

पुढें कांहीं दिवसांनीं बालमुकुंदांच्या आज्ञेवरून दत्तू पुनः तीन महिने देसनूर येथें योगाभ्यासाकरितां जाऊन राहिला होता. या खेपेला त्याचा अभ्यास पुरा झाला व त्यायोगें बालमुकुंदांना फार समाधान झालें. जरी अशा रीतीनें बालमुकुंदांनीं त्याचेकडून योगाभ्यास करविला तरी गुरुभक्तीपुढें योगाची मातब्बरी नाहीं असें त्यांचें त्याला सांगणें असे. एकदां त्यानें त्यांना असें विचारिलें कीं "अप्पा, 'मी चक्र पाहिलें, ज्योति पाहिली, नाद ऐकिले' असें पुष्कळ सांगतात. पण मला असलें कांहीं होत नाहीं. हें काय ?"

तेव्हां " केळीं खाणारांना दिलेलीं तीं केळीं रे! त्यांस दिलेलीं केळीं खाऊन सुख मानून घेणाऱ्यांस आईच्या स्तनाचें दुध नको असतें. तर मग तीं केळीं तुला पाहिजेत म्हणतोस काय ? " असें त्यांनीं विचारतांच " तीं मला नकोत " असें त्यानें सांगितलें.

दत्तू कर्डेगुद्दी येथें गेला म्हणजे बाळप्पा त्याला कधीं गावांतील बसवण्णाच्या देवळामधलि आपल्या बसण्याच्या खोलींत तर कधीं डोंगरावरील गुहेंत अगर दरींतील झाडींत अगर दुसऱ्या एखाद्या एकांतस्थळीं अद्‌भुत योगलीला दाखवून निरनिराळ्या प्रकारचे अनुभव देत. यासंबंधीं चरित्रनायकांनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, " मला निराकार सामरस्य दे " असा आपण हट्ट धरल्यावर सद्‌गुरूंनीं मांडीवर घेऊन उजव्या हातानें आपलें तोंड कुरवाळून "जय, जय, उदय, उदय, आनंदभेरी ठोका" असें म्हणून वरचेवर मुखचुंबन घेत निर्विकल्प समाधिशेजेवर आपणाला नेऊन प्रेमस्तन पाजून आनंद निद्रा दिली. तसेंच आणखी एके ठिकाणीं ते म्हणतात, " सद्‌गुरु बालमुकुंदाच्या चरणीं जंबुगिरीवरच्या पश्चिम दिशेच्या गुहेंत ते बसले असतांना पडलों व त्यावेळीं त्यांनीं पदतीर्थ देऊन अद्वैतबोधाचा उपदेश केला आणि ' सर्वत्र मला पहा ' असें सांगून सांख्य तारक व अमनस्क मार्गानें तें रूपहि तत्काळ अनुभवास आणून दिलें." (पु.६-२५६)

अशा रीतीनें दत्तला निरनिराळे आध्यात्मिक अनुभव घेण्यास मिळावे म्हणून बालमुकुंदांचे सारखे प्रयत्न सुरू होते. ते वरचेवर बेळगावास जात व तेथें शिष्यमंडळीसह त्यांचा भजनाचा कार्यक्रम होत असे. जसजसें त्यांचे बेळगावीं जाणें येणें अधिकाधिक होऊं लागलें तसतशी तेथें त्यांच्या शिष्यांची संख्याहि वाढत गेली. त्यांत गोपाळ श्रीपाद भागोजीकोप नावाचा दत्तूच्याच वयाचा एक मुलगा होता. तो बेळगाव जिल्ह्यापैकीं मुरगोड महालांतलि भागोजीकोप गावचा राहणारा असून तो अगदीं लहान असतांच त्याचे वडील वगैरे जवळची आप्त मंडळी कालवश झाली. नंतर १८७२ सालीं त्याची आई त्याला घेऊन त्याच्या विद्याभ्यासाकरितां बेळगावीं येऊन राहिली. घरची फार गरिबी असल्यामुळें कृष्णा गुमास्तेच्या घरांतील एक लहानशी खोली भाड्यानें घेऊन ती गोपाळासह राहूं लागली. शाळेचा खर्च झेपण्याइतकीहि त्यांची ऐपत नव्हती. पण गोपाळाचें हस्ताक्षर फार चांगलें असल्यामुळें दत्तूचा बाळमित्र रामचंद्र सुंठणकर याच्या खटपटीनें त्याला एका वाण्याच्या दुकानाचे हिशेब लिहिण्याचें काम मिळालें व त्या योगें त्याला विद्याभ्यासाचे कामीं मोठी मदत झाली. रामचंद्राचीहि त्याला अडचणींचे वेळीं मदत होत असे.

गोपाळाचें बिऱ्हाड कृष्णाच्या घरांतच असल्यामुळें व दत्तू तेथें वारंवार जात असल्यामुळें त्यांचा बराच परिचय झाला. कृष्णा, दत्तू व त्यांचे इतर गुरुबंधु यांचें परस्परांवरील अकृत्रिम प्रेम व बालमुकुंदांवरील त्यांची तीव्र भक्ति पाहून गोपाळाला त्यांच्याबद्दल फार आदर वाटे. पण हे आपले इतर बाबतींतील जिवलग स्नेही या बाबतींत मात्र आपणास परका समजून दूर ठेवितात याबद्दल त्याला फार वाईट वाटे. त्यामुळें आपल्याला बालमुकुंदांच्या पायीं घालण्याबद्दल त्यानें त्यांची मनधरणी चालविली.

एके दिवशीं बालमुकुंद कृष्णाचे घरीं गेले असतां 'आज मी तुझे घरीं जेवणास येतों' असें ते गोपाळाला म्हणाले. त्यावेळीं हेच कृष्णा व दत्तू यांचे गुरु हें त्याला माहित नव्हतें व त्यापूर्वी त्यांच्याशीं बोलण्याचाहि कधीं प्रसंग आलेला नव्हता. त्यामुळें त्याला जरा गोंधळल्यासारखें झालें. पण त्यांच्या तेजःपुंज चेहेऱ्यावरून व एकंदर राहणीवरून हा कोणी तरी थोर पुरुष असावा असें वाटून त्यानें त्यांना जेवणास बोलाविलें व ते त्याच्या बिऱ्हाडांत जाऊन पानावर बसले. लगेच त्यांनीं प्रथम आपल्या पानांतील एक घास त्याच्या तोंडांत घातला. तेव्हां तो चपापला. पण कांहीं एक न बोलतां त्यानें तो मुकाट्यानें खाऊन टाकिला. जेवण आटोपल्यावर बाळप्पांनीं त्याला मारुतिनामाचा मंत्र सांगून जप करण्यास सांगितलें. हा काय प्रकार आहे याची त्याला कांहींच अटकळ होईना. पण तो जात्याच भोळ्या स्वभावाचा असल्यामुळें त्यानें त्यांच्या सांगण्याप्रमाणें जप करण्याचा क्रम सुरू ठेविला. पुढें जेव्हां आपल्याकडे जेवणास आलेले व आपणास मंत्र देणारे हेच कृष्णा व दत्तू यांचे गुरु होत हें त्याला समजलें तेव्हां त्याला अत्यानंद झाला व त्यांचेकडून अनुग्रह घेण्याची त्याची उत्कंठा वाढत चालली.

यावेळीं दत्तू व्यंकटेशाच्या देवळाजवळील एका खोलींत राहात होता. एके दिवशी असा योग जमून आला कीं गोपाळा रात्रीच्या वेळीं अचानक त्याच्या बिऱ्हाडीं गेला; तों खोलीचा दरवाजा बंद होता. पण आंत दिवा लावलेला दिसत होता व भजन चाललेलें ऐकूं येत होतें, तेव्हां त्यानें हलके दार ठोठावलें, पण कोणी दाद घेईना. तेव्हां त्यानें एक धोंडा घेऊन दारावर तडाके देण्यास सुरवात केली. व " दार उघडा नाहीं तर तें फोडून आंत येतों " असें तो मोठ्यानें ओरडूं लागला. तेव्हां दत्तूनें बाळप्पांची परवानगी घेऊन दार उघडलें व तो आंत गेला. तों मध्यभागीं बाळप्पा पूजासाहित्यासह बसले असून भोंवतालीं कृष्णा, हणमू वगैरे शिष्य मंडळी बसली होती व दत्तू बाजूला उभा होता असा देखावा त्याच्या दृष्टीस पडला व तो जरासा भांबावला. पण ज्यांच्या कृपेची त्याला रात्रंदिवस तळमळ लागून राहिली होती व ज्यांची भेट करविण्याबद्दल त्यानें दत्तू व कृष्णा यांचा सारखा पिच्छा पुरविला होता त्या बालमुकुंदांचें अकस्मात दर्शन झाल्यामुळें त्याचा आनंद गगनांत मावेनासा होऊन त्याला :अष्टसात्विक भावांचें भरतें आलें व त्यानें एकदम बालमुकुंदचरणीं साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां त्यांनीं त्याला अनुग्रह देऊन कृतकृत्य केलें आणि असें सांगितले कीं " तूं माझा परमभक्त आहेस. यापुढें तूं पाहिजे तसा वाग, पण मला विसरूं नको, तूं मुक्त आहेस. जो जसा भेटेल त्याच्याशीं तसा वागून निःसंग राहात जा. तुमच्यामध्यें वडील दत्ताप्पा असून तो सांगेल त्याप्रमाणें वागत जा." तेव्हांपासून दत्तूचा व त्याचा स्नेहसंबंध अधिक दृढ व जिव्हाळ्याचा झाला व ते एकमेकांशीं जुळ्या भावांप्रमाणें वागूं लागले.

दत्तू आपला फुरसुदीचा वेळ कृष्णा, गोपाळ वगैरे आपल्या गुरुबंधूंसह गुरुभजनांत घालवीत असे. अशा वेळीं शाळेंतील त्याचे कांहीं सोबतीहि येत. त्यांच्यांत व्यंकटेश जुनेबेळगावकर व परशुराम धामणेकर नावाचे दोघे विद्यार्थी होते. ते सात्विक वृत्तीचे, सच्छील

व भक्तिमान् होते. दत्तू, कृष्णा व गोपाळ यांच्या तोंडून बालमुकुंदांच्या प्रेमासंबंधीं व अद्‌भुत लीलांसंबंधीं गोष्टी ऐकून त्यांना त्यांच्या दर्शनाबद्दल अतिशय तळमळ लागून राहिली व आपल्याला सद्‌गुरूची प्राप्ति कशी होईल, आपली दाद कशी लागेल, काय उपाय करावा हें न सुचून ते फार उद्विग्न झाले व बालमुकुंदांची भेट करविण्याबद्दल दत्तूच्या फार पाठीस लागले. तेव्हां त्यांची आतुरता पाहून त्यानें ती गोष्ट बालमुकुंदांच्या कानावर घातली व एकदां ते त्याच्या बिऱ्हाडीं आले असतां त्या उभयतांवर त्यांनीं अनुग्रह केला.

याप्रमाणें बेळगावांत दत्तूच्या सहाध्यायी मंडळीपैकीं बरेच जण त्याचे गुरुबंधु झाले व त्यांचा भजनाचा क्रम अधिकच नेटानें व उत्साहानें चालू झाला. हे गुरुबंधु समवयस्क उत्साही व भाविक असल्यामुळें एकमेकांशीं अत्यंत सलगीनें व प्रेमानें वागत. बाळप्पाहि वरचेवर बेळगावास जात व कधीं कृष्णाच्या घरीं, कधीं दत्तूच्या बिऱ्हाडीं, व कधीं परशरामच्या घरीं त्यांचें भजनपूजन होत असे. तेथें ते आपल्या शिष्य मंडळीला प्रेमरंगांत खेळवून सद्‌गुरुभक्ति व अनिमित्त बंधुप्रीति यांचे जणूं धडे देत असत. एकदां ते दत्तूच्या बिऱ्हाडीं गेले असतां तेथें बरीच भक्तमंडळी जमली होती. तेव्हां तेथें गुरुभक्तांचा जो प्रेमसोहळा झाला व बाळप्पांनीं आपल्या भक्तांना जो अमृतबोध केला त्याचें सुंदर वर्णन चरित्रनायकांचे मावसबंधु गणपतराव मारीहाळकर यांनीं एका कानडी पदात केलें आहे. त्या पदाचा मराठींत भावार्थ पुढीलप्रमाणें आहे:—

"एके दिवशीं भस्मभूषिततनु, कौपीनधारी, करुणेचा सागर, सकलगुणधाम असा श्रीबालमुकुंद वेणुग्रामीं पाहिला. तो आजानुबाहु, सुहास्यवदन, भक्तप्रिय श्रीरामावधूताचा दास प्रभुराज गुरुराजा आपला शिष्य जो दत्त त्याच्या घरीं आला. तेथें त्याचे शिष्य मोठ्या आनंदानें व प्रेमानें त्याचे पायां पडले व नवविध भक्तीच्या निरनिराळ्या प्रकारांनीं प्रेमभरानें नाचत उडत त्यांनीं सद्‌गुरूचे अगणित गुण गाण्यास सुरवात केली. तेव्हां बालमुकुंद प्रेमानंदानें आपल्या बाळ ( भक्त ) मेळीं खेळला व त्यानें आपल्या अमृततुल्य मृदु भाषणानें सर्वांच्या ठिकाणची द्वैतभावना पुसून टाकिली; ज्याच्या योगानें संसारसागर तरून जातां येईल असा त्यांना परमपावन बोध सांगितला; त्यांना समजेल अशा रीतीनें चारीहि देहांचें विवरण करून कालातीत शिवस्वरूपाचा अनुभव आणून दिला. त्यानें नाना प्रकारांनीं आपल्या बाळ ( भक्त ) समूहामध्यें स्वरूपबोध उघड करून दाखविला व तो त्यांच्या ठिकाणीं बिंबविला. तो बालमुकुंद त्यावेळीं भूतगणवेष्टित शशिधराप्रमाणें म्हणजे भूतनाथ भगवान् शंकराप्रमाणें शोभत होता. त्यानें त्यांना इंद्रियांना न सापडणारी व बुद्धीला अगम्य अशी जी नित्यवस्तु ती दाखविली, व "सर्व ठिकाणीं मला पहा" हें श्रुतिवचनांचें सार ध्यानीं धरण्यास सांगितलें."

दत्तूचे आपल्या गुरुबंधूशीं संबंध कशा प्रकारचे होते या संबंधीं ता. ६-५-१८७७ रोजीं त्यानें कडेगुद्दी येथील आपल्या एका गुरुबंधूला लिहिलेल्या पत्रावरून कल्पना होते. त्या पत्रांत तो लिहितो:—"जोडलेलें मित्रत्व मरेपर्यंत तोडणार नाहीं, हें पक्कें समजा. सुसरीचें धरणें व माझें मित्रत्व धरणें अखेरचें आहे. एकदां धरलें कीं सोडण्यास मला येतच नाहीं. या प्रकारें तुमचेंहि असावें."

---

# प्रकरण ७ वें

-———:०:———

## दक्षिणेंतील भयंकर दुष्काळ; दत्तूचे हाल; संसार सोडून जाण्याचा प्रयत्न; सद्गुरूचें आश्वासन; दत्तूची फजिती करण्याचा प्रयत्न व त्याची निष्फळता.

सन १८७६–७७ सालीं दक्षिणप्रांतांत फार भयंकर दुष्काळ पडला. त्यामुळें जिकडे तिकडे हाहाःकार उडून लाखों लोक मृत्युमुखीं पडले अशा दुर्धर प्रसंगीं गरीब लोकांचे अन्नावाचून किती हाल झाले असतील याची आतां कल्पनाहि होणार नाहीं. वास्तविक दत्तूच्या घराण्याची आर्थिक स्थिति साधारण बऱ्यापैकीं होती. परंतु दुष्काळामुळें घरांतील चीजवस्त मोडून कुटुंबाचा व कित्येक आपद्ग्रस्त शेतकऱ्यांचाहि निर्वाह करणें त्यांना भाग पडलें. त्यामुळें त्यांची फार निकृष्टावस्था झाली. अशा स्थितींत दत्तूला शिक्षणाचे कामीं घराकडून मदत होणें शक्य नव्हतें. दुष्काळामुळें सर्वत्र महागाईहि फार वाढली होती. त्यामुळें आपला अभ्यास सांभाळून चरितार्थ चालविणें त्याला फारच कठीण जाऊं लागलें. त्यावेळीं रामचंद्र सुंठणकर मधुन मधुन सकाळीं त्याचेकडे जात असे व जातांना घरांत तांदुळ, डाळ, भाजीपाला वगैरे जे जिन्नस हाताला येतील ते बरोबर घेऊन जाई व त्याच्या खोलींत नेऊन टाकी. तो राहात असे त्याठिकाणीं पाण्याची फार टंचाई असल्यामुळें त्याचें स्नान, कपडे धुणें वगैरे गोष्टी करण्याची रामचंद्रानें आपल्या घरच्या विहीरीवर सोय केली होती. कधीं त्याचे कपडे फाटलेले आढळल्यास रामचंद्र त्याला नवीन कपडे आणून देई व घरांतील वडील माणसांचा रोष न व्हावा म्हणून त्याला मदत करणें ती त्यांच्या नकळत करी. तसेंच रामचंद्रानें आपल्या वडिलांना सांगून घरांतील मुलांना इंग्रजी पहिली व दुसरी इयत्ता शिकविण्याकरितां दत्तूला दरमहा सहा रुपये पगाराची शिकवणी लावून दिली व ती सुमारें दोन वर्षें चालू होती. तसेंच आठवले वकील यांच्या मुलाची शिकवणी होतीच. आठवले यांच्या कुटुंबांतील मंडळींना दत्तूची सर्व हकीगत समजल्यापासून त्याच्याबद्दल फार सहानुभूति वाटूं लागली व अडीअडचणींच्या वेळीं त्याच्या जेवणाखाणाचीहि सोय त्यांचे घरीं होऊं लागली.

शिकवण्या वगैरे करून दत्तू आपला स्वतःचा खर्च कसा तरी भागवी. पण वाळेकुंद्री येथील त्याच्या घरांतील मंडळीचे दुष्काळामुळें फार हाल होत होते. एकदां तो व त्याचा गुरुबंधु हणमू हे वाळेकुंद्रीस गेले असतां त्याच्या असें नजरेस आलें कीं घरांत पुरेसे तांदूळ नसल्यामुळें फक्त त्याच्यापुरताच भात शिजवून बाकीच्या माणसांकरितां आंबील शिजविली होती. तो प्रकार पाहून त्याचें मन फार उद्विग्न झालें व आपण इतके मोठे झालों असूनहि आपल्याला या दैन्यावस्थेचें निवारण करतां येऊं नये याबद्दल त्याला अति-

शय दुःख होऊन तो इतका वैतागला कीं तो व हणमू यांनीं कोणालाहि न कळवितां कोठें तरी निघून जाण्याचा बेत करून सर्व तयारी केली व एके दिवशीं पहाटे उठून ते घरांतून बाहेर पडण्याच्या तयारींत होते. इतक्यांत बाळप्पा तेथें गेले व त्यांनीं त्यांची कानउघाडणी करून त्यांचा बेत फिसकटविला. या प्रसंगाचें चरित्रनायकांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलेलें आहे, त्यावरून त्यावेळच्या परिस्थितीसंबंधीं बरोबर कल्पना होतेः—तें असें "संसारांत पुष्कळ त्रास भोगलेला असा मी आहें. अन्नाशिवाय मी रात्रीच्या रात्री, दिवसच्या दिवस फार काय पण पंधरवडेच्या पंधरवडे घालविले आहेत. एकदां इतकें संकट आलें व मनास इतका त्रास झाला कीं या संसारांतील निरंतर होणारा त्रास टाळण्याकरितां कोणालाहि न कळवितां जंगलांत निघून जावें असें वाटलें. हें धारवाडांत माझ्या बापाला—बाळप्पांना कळलें. मी निघून बाहेर पडणार इतक्यांत धारवाडहून निघालेली स्वारी चार वाजतां घरीं हजर झाली आणि मला विचारलें "हें काय मांडलें आहेस? काय करतोस? पहा मी सुद्धां संसारांत आहें. माझ्याप्रमाणें तूं पण रहा. संसार सोडून कोठें जातोस? दृश्य संसार सर्व मीच आहेंना? सद्गुरुस्वरूपच आहेना? मग काय सोडून जातोस? संसारांत राहिलें तरच गुरुप्रेमाचा अनुभव घडी घडी मिळत असतो, गुरुभक्तीस संधि सापडते. व्यवहारांत अनुभवाचे प्रसंग पुष्कळ असतात. संसार सोडून गेला म्हणजे अनुभव मिळण्याचे प्रसंग नाहींसे होतात. संसार सोडून जाऊं नको. अनुभव घे" असें म्हणून मला संसारांत ठेविलें. संसार सोडून जाऊं दिलें नाहीं. किती दयाळू बाप तो!" (पु. ७–१९१)

दत्तूवर बालमुकुंदांचा अनुग्रह झाल्यापासून कर्डेगुद्दी येथील त्याचे कांहीं गुरुबंधु त्याचा द्वेष व मत्सर करीत. बाळप्पा तर त्याचे वारंवार गोडवे गात व बेळगावास त्याच्या बिऱ्हाडीं जाऊन तेथें भजनपूजन करीत. त्यामुळें त्यांचा द्वेषाग्नि दिवसेंदिवस अधिकाधिक भडकत गेला व दत्तूच्या कंगाल स्थितीचा फायदा घेऊन त्याची फजिती करण्याचा त्यांनी एकदां घाट घातला. बाळप्पा बेळगावास दत्तूकडे गेलेसें पाहून एके दिवशीं सकाळीं सुमारें २५-३० मंडळी कर्डेगुद्दीहून निघून सुमारें १२ वाजतां बेळगावास दत्तूच्या बिऱ्हाडीं गेली व "आम्ही फार दमून आलों आहोंत. सकाळपासून उपाशी आहोंत. त्यामुळें फार भूक लागली आहे. तर ताबडतोब जेवणाची व्यवस्था कर" असें त्यांनीं त्याला सांगितलें. तेव्हां घरांत दोन माणसांना पुरेल इतकीहि शिधासामुग्री नसल्यामुळें त्याला मोठी विवंचना येऊन पडली. कारण त्यावेळीं इतक्या माणसांना पुरेल इतकी शिधासामुग्री नव्हतीच, व जवळ पैसेहि नव्हते. पण त्याच्या चिंतेचें कारण बाळप्पांच्या लक्षांत येऊन ते म्हणाले कीं "अरे, तूं इतक्या काळजींत कां पडला आहेस? हे कांहीं तुझ्याकडे पाहुणे आलेले नाहींत. तर तुझे बंधु म्हणून आलेले आहेत. तेव्हां तुझ्याजवळ जें कांहीं असेल तेवढ्यांतच भागव व स्वयंपाक करून यांना वाढ म्हणजे झालें. जा तुझ्या पेटींत कांहीं पैसे असतील तर बघ व मी सांगतों ते जिन्नस घेऊन ये." अशा प्रकारचे त्यांचे प्रोत्साहनपर शब्द कानीं पडतांच त्याला धीर आला व पेटींत पैसे नाहींत अशी त्याची समजूत असूनहि त्यांच्या सांगण्या-

प्रमाणें पेटी उघडून तो आंत पाहूं लागला तों त्याला एक रुपया आढळला. तेव्हां मोठें आश्चर्य व समाधान वाटून त्यानें ती गोष्ट बाळप्पांना सांगितली व त्यांनीं सांगितल्याप्रमाणें तावडतोब बाजारांतून जिन्नस आणिले. हा सर्व प्रकार त्याचेकडे आलेली मंडळी पाहात होती. त्या भयंकर महागाईच्या दिवसांत एका रुपायांत २५–३० इसमांना पुरण्यासारखी जेवणाची तजवीज ती काय होणार ! तेव्हां आज दत्तूची नक्की फजिती होणार या समजुतीनें ते आपसांत त्याच्या कुचेष्टा करीत होते. ही गोष्ट बाळप्पांच्या नजरेस आली व हे कुत्सित बुद्धीनें दत्तूची टवाळकी करण्याकरितां आले आहेत हें त्यांनीं ताडलें. पण त्यावेळीं कांहींहि न बोलतां त्यांनीं स्वतःच स्वयंपाक केला व दत्तूला पानें वाढण्यास सांगून सर्वांना जेवायास बसण्यास सांगितलें. त्याप्रमाणें आलेली सर्व मंडळी जेवणास बसली व दत्तू त्यांना वाढूं लागला.

त्या मंडळीचें जेवण चालू असतां बाळप्पांनीं बोध सांगण्यास सुरवात केली व अनिमित्तबंधप्रीतीचें महत्व समजावून सांगितलें. ते म्हणाले " अनिमित्त बंधुप्रीति केल्याशिवाय खरें गुरुप्रेमसुख भोगण्यास मिळणार नाहीं. तसेंच अनिमित्त बंधुप्रीति म्हणजे आपले जे बंधु, सहोदर, अगर आप्त त्यांच्यावर निर्हेतुक प्रेम करणें इतकेंच नव्हे तर सर्वांवर, अखिल विश्वावर प्रेम करणें, अजातशत्रु होणें, निर्वैरभाव बाळगणें, जनीं जनार्दन पाहणें होय. " व " यल्ला ठाविनल्लि नन्नहिडि " ( सर्वत्र मला पहा ) हा अमृतबोध नेहमीं ध्यानांत ठेवण्यास त्यांनीं सर्वांना सांगितलें. याप्रमाणें आलेल्या मंडळींना पूर्ण तृप्ति होईपर्यंत बोधान्नाचें भोजन घालून ते म्हणाले " बाबांनो तुम्हां सर्वांवर माझी सारखीच प्रीति आहे. पण दत्ताप्पा हा जन्मतःच फार अधिकारी आहे. तुम्हांला त्याच्या ठिकाणचें गूढ दिव्यत्व दिसत नसलें तरी तें मला स्पष्ट दिसत आहे. तो स्वयंप्रकाश आहे. त्याच्या अंतःकरणावरील अनादिमायाभ्रमाची काजळी नाहींशी होण्याला मी कारणीभूत झालों इतकेंच. मी निमित्ताला मात्र त्याचा गुरु आहें. तुम्ही त्याचा हेवा करूं नका. तोच माझ्या संप्रदायवृक्षाचा नवीन अंकुर आहे. त्याला प्रेमानें वागवा व अनिमित्तबंधुभावानें अवधूतचरणसेवा करीत गुरुप्रेमसुख भोगा, म्हणजे मला आनंद होईल. "

अशा प्रकारें बाळप्पांच्या दिव्य वाणींतून बोधामृताचा वर्षाव चालू असतांना जेवणारी सर्व मंडळीं आपापल्या पानांवर चित्रासारखी स्तब्ध बसून तो ऐकत होती, कांहीं जणांच्या नेत्रावाटें प्रेमाश्रूंच्या धारा चालू होत्या, तर कांहींना एकसारखे प्रेमाचे हुंदके अनावर होऊन त्यांचा मधुन मधुन स्फोट होत होता. इकडे दत्तू एका बाजूला उभा राहून सर्वांगाचे कान करून तृषार्त चातकाप्रमाणें तो बोधवर्षाव वरच्यावर झेलीत होता. त्याचें चित्त स्वानंदाब्धींत बुड्या मारीत होतें व त्याला अनिर्वचनीय सुखाचा लाभ होत होता. याप्रमाणें सर्व मंडळी समरससुखांत डुलत असल्याचें पाहून बाळप्पांना फार संतोष झाला व त्यांनीं आपला बोधौघ आवरता घेतला आणि त्या दिवशींचा भोजनसमारंभ आटोपला. तेव्हां जेवणाऱ्या मंडळीची पूर्ण तृप्ति झाली इतकेंच नव्हे तर त्यांपैकीं कांहींनीं तेथील प्रसाद आपल्या बरोबर बांधून घेतला !

जेवण आटोपल्यानंतर दत्तूकडे आलेली मंडळी कर्डेगुद्दीस परत गेली व त्यांपैकीं बहुतेकांना त्याच्या अतुल गुरुभक्तीबद्दल व त्याच्यावरील गुरुकृपेबद्दल फार कौतुक वाटलें व ते त्याचे धन्यवाद गाऊं लागले. पण तशा स्थितींतहि एक दोन व्यक्तींना मात्र समाधान वाटण्याऐवजीं आज चारचौघांत आपला अपमान झालासें वाटून त्यांच्या ठिकाणचा दत्तूसंबंधींचा मत्सराग्नि अधिकच भडकला. " आम्ही इतकीं वर्षें बाळप्पांच्या सन्निध घालविलीं व त्यांची सेवा केली असें असून त्यांचें दत्तूवर, या कालच्या पोरावर, अधिकच प्रेम आहे व त्याला आपला मार्ग चालविण्याचा अधिकार देऊन आमच्या देखत ते त्याचे गोडवे गातात हा आमचा उपमर्दच होय " असें ते म्हणूं लागले. त्या दिवसापासून ते त्याचा अधिकच द्वेष करूं लागले व बाळप्पांना तो अधिकच प्रिय वाटूं लागला.

---

प्रमाणें पेटी उघडून तो आंत पाहूं लागला तों त्याला एक रुपया आढळला. तेव्हां मोठें आश्चर्य व समाधान वाटून त्यानें ती गोष्ट बाळप्पांना सांगितली व त्यांनीं सांगितल्याप्रमाणें तावडतोब बाजारांतून जिन्नस आणिले. हा सर्व प्रकार त्याचेकडे आलेली मंडळी पाहात होती. त्या भयंकर महागाईच्या दिवसांत एका रुपायांत २५–३० इसमांना पुरण्यासारखी जेवणाची तजवीज ती काय होणार ! तेव्हां आज दत्तूची नक्की फजिती होणार या समजुतीनें ते आपसांत त्याच्या कुचेष्टा करीत होते. ही गोष्ट बाळप्पांच्या नजरेस आली व हे कुत्सित बुद्धीनें दत्तूची टवाळकी करण्याकरितां आले आहेत हें त्यांनीं ताडलें. पण त्यावेळीं कांहींहि न बोलतां त्यांनीं स्वतःच स्वयंपाक केला व दत्तूला पानें वाढण्यास सांगून सर्वांना जेवा-वयास बसण्यास सांगितलें. त्याप्रमाणें आलेली सर्व मंडळी जेवणास बसली व दत्तू त्यांना वाढूं लागला.

त्या मंडळींचें जेवण चालू असतां बाळप्पांनीं बोध सांगण्यास सुरवात केली व अनि-मित्तबंधप्रीतीचें महत्व समजावून सांगितलें. ते म्हणाले “ अनिमित्त बंधुप्रीति केल्याशिवाय खरें गुरुप्रेमसुख भोगण्यास मिळणार नाहीं. तसेंच अनिमित्त बंधुप्रीति म्हणजे आपले जे बंधु, सहोदर, अगर आप्त त्यांच्यावर निर्हेतुक प्रेम करणें इतकेंच नव्हे तर सर्वांवर, अखिल विश्वावर प्रेम करणें, अजातशत्रु होणें, निर्वैरभाव बाळगणें, जनीं जनार्दन पाहणें होय. ” व “ यल्ला ठाविनल्लि नन्नहिडि ” ( सर्वत्र मला पहा ) हा अमृतबोध नेहमीं ध्यानांत ठेवण्यास त्यांनीं सर्वांना सांगितलें. याप्रमाणें आलेल्या मंडळींना पूर्ण तृप्ति होईपर्यंत बोधा-न्नाचें भोजन घालून ते म्हणाले “ बाबांनों तुम्हां सर्वांवर माझी सारखीच प्रीति आहे. पण दत्ताप्पा हा जन्मतःच फार अधिकारी आहे. तुम्हांला त्याच्या ठिकाणचें गूढ दिव्यत्व दिसत नसलें तरी तें मला स्पष्ट दिसत आहे. तो स्वयंप्रकाश आहे. त्याच्या अंतःकरणावरील अनादिमायाभ्रमाची काजळी नाहींशी होण्याला मी कारणीभूत झालों इतकेंच. मी निमित्ताला मात्र त्याचा गुरु आहें. तुम्ही त्याचा हेवा करूं नका. तोच माझ्या संप्रदायवृक्षाचा नवीन अंकुर आहे. त्याला प्रेमानें वागवा व अनिमित्तबंधुभावानें अवधूतचरणसेवा करीत गुरुप्रेम-सुख भोगा, म्हणजे मला आनंद होईल. ”

अशा प्रकारें बाळप्पांच्या दिव्य वाणींतून बोधामृताचा वर्षाव चालू असतांना जेव-णारी सर्व मंडळीं आपापल्या पानांवर चित्रासारखी स्तब्ध बसून तो ऐकत होती, कांहीं जणांच्या नेत्रावाटें प्रेमाश्रूंच्या धारा चालू होत्या, तर कांहींना एकसारखे प्रेमाचे हुंदके अनावर होऊन त्यांचा मधुन मधुन स्फोट होत होता. इकडे दत्तू एका बाजूला उभा राहून सर्वांगाचे कान करून तृषार्त चातकाप्रमाणें तो बोधवर्षाव वरच्यावर झेलीत होता. त्याचें चित्त स्वानंदाब्धींत बुड्या मारीत होतें व त्याला अनिर्वचनीय सुखाचा लाभ होत होता. या-प्रमाणें सर्व मंडळी समरससुखांत डुलत असल्याचें पाहून बाळप्पांना फार संतोष झाला व त्यांनीं आपला बोधौघ आवरता घेतला आणि त्या दिवशीचा भोजनसमारंभ आटोपला. तेव्हां जेवणाऱ्या मंडळीची पूर्ण तृप्ति झाली इतकेंच नव्हे तर त्यांपैकीं कांहींनीं तेथील प्रसाद आपल्या बरोबर बांधून घेतला !

जेवण आटोपल्यानंतर दत्तूकडे आलेली मंडळी कर्डेगुद्दीस परत गेली व त्यांपैकीं बहुतेकांना त्याच्या अतुल गुरुभक्तीबद्दल व त्याच्यावरील गुरुकृपेबद्दल फार कौतुक वाटलें व ते त्याचे धन्यवाद गाऊं लागले. पण तशा स्थितींतहि एक दोन व्यक्तींना मात्र समाधान वाटण्याऐवजीं आज चारचौघांत आपला अपमान झालासें वाटून त्यांच्या ठिकाणचा दत्तूसंबंधींचा मत्सराग्नि अधिकच भडकला. " आम्ही इतकीं वर्षे बाळप्पांच्या सन्निध घालविलीं व त्यांची सेवा केली असें असून त्यांचें दत्तूवर, या कालच्या पोरावर, अधिकच प्रेम आहे व त्याला आपला मार्ग चालविण्याचा अधिकार देऊन आमच्या देखत ते त्याचे गोडवे गातात हा आमचा उपमर्दच होय " असें ते म्हणूं लागले. त्या दिवसापासून ते त्याचा अधिकच द्वेष करूं लागले व बाळप्पांना तो अधिकच प्रिय वाटूं लागला.

# प्रकरण ८ वें

## पंथवृद्धिआज्ञा व पूर्णकृपादेणगी

दत्तूला पाहिल्यापासून अवधूत मार्ग पुढें चालविण्याला हाच अधिकारी आहे हें बाळप्पा जाणून होते व त्याप्रमाणें ते बोलूनहि दाखवीत. पण त्याला मात्र त्यांची खरी योग्यता, गुरुशिष्यांमधील भक्तिप्रेमरहस्य, अवधूत मार्ग पुढें चालविण्याची जबाबदारी वगैरे गोष्टींचें बरोबर आकलन झालेलें नव्हतें. ज्यांची आपण कांहीं दिवसांपूर्वी निंदा करीत होतों ते बाळप्पा साधु पुरुष असून त्यांनीं शापउःशापमिषानें आपणास जागृति देऊन आपल्यावर अनुग्रह केला व आपलें समाधान झालें; त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागणें एवढेंच आपलें काम अशा प्रकारची त्यावेळीं त्याची मनस्थिति होती. यासंबंधीं चरित्र-नायकांनीं पुढील उद्गार काढले आहेतः—"जंबुद्वीपीं चिंतामणि विरूपाक्ष यांचे प्रेरणेनें तुझे पायीं पडलों. तुझा बोध ग्रहण केला. तीर्थप्रसादहि घेतला. पण तेव्हां तरी तुझी ओळख लागली नाहीं. तूं वरचेवर सांगत असतांनाहि तुझा अधिकार, तुझी योग्यता, तुझें स्वरूप तुजशीं माझें कर्तव्य हीं न जाणतां सामान्य पुरुषाप्रमाणें तुजला वागविलें. कधीं सेवा केली नाहीं, प्रेमानें पदरजीं लोळलों नाहीं, ध्यान नाहीं, पूजन नाहीं. आज्ञा चालविली नाहीं. लक्षपूर्वक तुझा अमृतबोध ऐकिला नाहीं. तरी तूंच भक्तवत्सल ब्रीदास्तव मला आपला म्हणविलें. मी आधारांध काय जाणें ? इतका उघड रीतीनें ( तूं ) मजशीं खेळत असून अनेक खुणा दाखवीत असूनहि मी तारुण्यमदानें तुझी ओळख धरण्यास खटपट केली नाहीं." ( पु. २–१६३ ) दुसऱ्या एका ठिकाणीं ते म्हणतात "बालावधूता, जेव्हां तूं जंबु-शिखरीं वगैरे ठिकाणीं अवधूत खेळ खेळत होतास तेव्हां तरीं आम्ही केवळ मुलें; त्यांस खेळांतच गोंवून सेवा घेतली नाहींस." ( पु. २–२४० )

एखाद्या वयोवृद्ध धनाढ्य मनुष्याला अठरा वीस वर्षांचा तरणा बांड व होतकरू असा एकुलता एक मुलगा असला म्हणजे त्या वृद्ध मनुष्याला असें वाटत असतें कीं आतां आपण चार दिवसांचे सोबती, आपल्या पाठीमागें हाच आपल्या अपार संपत्तीचा व वैभवाचा वारस व पूर्णाधिकारी होणार. तेव्हां तो त्याला आपल्या सर्व व्यवहारांची व गुप्त गोष्टींची बारकाईची माहिती देत असतो. पण वडिलांच्या त्या कळकळीच्या उपदेशाचें वर्म त्या अल्लड व खेळाडू तरुणाच्या त्या वेळीं पूर्णपणें लक्षांत येत नाहीं व तो तिकडे दुर्लक्षहि करतो. अशाच प्रकारची कांहींशी स्थिति बाळप्पा व दत्तू यांची होती. आपल्या निर्याणाचा समय जवळ जवळ येत चालला याची बाळप्पांना जाणीव होती व ते त्याच्या ठिकाणीं पूर्णत्व आणण्याच्या तयारीला लागले होते. या संबंधीं चरित्रनायकांनीं असें म्हटलें आहे कीं " पित्यानें संपादिलेल्या द्रव्यास पुत्र अधिकारी होतो. याकरितां बालमुकुंदानें योग्य पात्र पाहून आपलें गुह्य ज्ञान देण्यास तयार झाला. बाळपित्याचें पुत्रवात्सल्य

अवर्णनीय! म्हणूनच शापानुग्रहमिषें पूर्वसूत्रधारी पुत्रास चरणकमलदर्शनास येईसें करून आपलें निजरूप दाखवून निर्विकल्प ज्ञान मोठ्या प्रीतीनें सांगूं लागला व आपला निजात्मबोध थोडक्यांतच दीन दत्ताला दिला." (पु. ३–१७८)

जरी बाळप्पांची अशी स्थिति होती तरी ते लवकरच जातील अगर कायमचे दृष्टि-आड होतील याची दत्तूला कल्पनाहि नव्हती. त्यामुळें त्यांच्या कळकळीच्या बोधाचें वर्म त्यावेळीं त्याच्या पूर्णपणें लक्षांत आलें नव्हते. म्हणून पुढें एके प्रसंगी मागील आठवण होऊन चरित्रनायकांनीं सद्‌गुरूला उद्देशून असें म्हटलें आहे कीं "वरचेवर माझे ठिकाणीं येऊन मी न विचारतां तत्वबोध केलास, विनंती न करतां सर्वकर्तृत्व, सर्वज्ञत्व सर्वदयाळुत्व इत्यादि शक्ति प्रगट केलांस. मी सेवा न करतां भक्ति शिकवून भजनास लाविलेंस. मी "आई" न म्हणतां मातृस्नेह प्रगट करून "गुरूमाय" म्हणवून घेतलेंस. माझ्या ठिकाणीं भक्ति बिंबण्यास मजसी सलगीनें जिवलग सखा होऊन मान सांडून खेळ खेळलास! माझ्या उद्धाराचा सर्व बोजा तूंच तुझे माथां घेतलास व पूर्ण दयेनें कर्मउपासनेचा संशय निरसन केलास." (पु. २–२५१).

एकदां बाळप्पांनीं दत्तूला आग्रहपूर्वक असें सांगितलें कीं "तुला अवधूत मार्ग पुढें चालविला पाहिजे." तोंपर्यंत ते मधुन मधुन तशा प्रकारचे उद्गार काढीत तरी त्यांसंबंधीं तो फारसा विचार करीत नसे. पण या प्रसंगीं मात्र जेव्हां त्यांनीं अवधूत मार्ग पुढें चालविण्याची त्याला स्पष्ट आज्ञाच केली तेव्हां आपलें हृद्गत व्यक्त करणें त्याला भाग झालें व "ही गोष्ट आपल्याच्यानें होणार नाहीं; ती मला नको" असें त्यानें सांगितलें. तें ऐकून "तुला पाहिजे तो वर माग मी तो देतों. पण तुला ही गोष्ट केलीच पाहिजे" असें बाळप्पांनीं त्याला पुन्हां आग्रहपूर्वक सांगितलें; तेव्हां त्यानें आपल्या शंका व अडचणी स्पष्टपणें त्यांच्या पुढें मांडल्या व त्या उभयतांमध्यें पुढीलप्रमाणें संवाद झाला. तो फार महत्वाचा असल्यामुळें तो चरित्रनायकांच्या शब्दांत देणें बरें. अवधूत-मार्ग पुढें चालविण्याच्या बाबतींत आपल्या अडचणी काय आहेत तें सांगतांना दत्तू म्हणाला "मी केवळ मतिमंद अज्ञान आहें. मला तुझें गुह्य ज्ञान सांग. तें गुह्यज्ञान कोणतें म्हणशील तर तुझें सूक्ष्म निर्गुण स्वरूप आणि हें प्रत्यक्ष दिसतें हें सावळें स्थूळरूप हीं अभेद आहेत असें जें ज्ञान तुझें पोटीं आहे तें मला सांग. × × तूंच 'पाहिजे तो वर माग' असें अभय वचन दिलेंस म्हणून या अज्ञ बाळकानें ही सलगी आरंभिली. × × × सर्व देवाधिदेवा, तुझें वचन तूं सिद्ध केलें पाहिजे. तूं म्हणशील कीं लोकानुग्रहाचें कार्य सांगितलें त्यास भिऊन मी तुला हें गुह्यज्ञान विचारतों आहें. पण मी कांहीं तुझी आज्ञा उल्लंघण्याची इच्छा धरिली नाहीं; ती अनलसपणें करितोंच. तरी निर्विघ्नपणें तुझ्या अकलंक मार्गास कलंक न लागेल अशा रीतीनें क्रम चालावा हाच हेतु आहे. तूं म्हणशील कीं गुह्यज्ञान म्हणजे निर्विकल्प समाधीचें मर्म, विदेह स्थितीची इच्छा कां करतोस? तर हे सद्‌गुरु, स्वरूपज्ञान पूर्ण पावून तुझा पंथक्रम चालवीन. जर सत्य ज्ञानोदय न होईल तर मानाभिमान मजला बाधतील. तूं जवळ असतां त्यांची बाधा होणार नाहीं हें खरें. पण तुझे पश्चात् अवधूत पंथ चाल-

वितांना तुझें विस्मरण पडेल आणि मी मानाभिमानाचे जाळ्यांत सांपडेन. विस्मरण कां होईल म्हणशील तर तुझी माया अतर्क्य आहे ! ती हरएक प्रसंगीं तुझी आठवण नुरवून देहाभिमान वाढवील. जशी दिव्याला काजळी तशी तुझी माया तुझ्या जवळ वास करिते. ती मजलाहि विषयासक्त करून देहाभिमानानें झाकून टाकील. × × × तर मायेचें निरसन होईल असा विचार मला सांग. अनुग्रहकार्य चालतां कर्माकर्मी तुझें स्मरण असावें; अभिमान किमपि बाधूं नये. इतका कां उतावीळ म्हणशील तर माझ्या शरीरीं अहंभाव असतांच माझा अंगीकार करून परमप्रीतीनें या स्थितीस आणिलेंस. अशावर स्वतंत्रपणें मार्ग चालवितांना " मी इतक्यांस अनुग्रहिलें, इतके अनुभवमार्गास तयार झाले, माझ्या प्रसादानें बहुतेक कृतकृत्य झाले " असा अभिमान अंगीं वाढेल. श्रेष्ठांपासून सन्मान तोच लहानांस हृदयाभिमानबीज आहे. म्हणून माझें हृदय भयानें कापतें. तर दयाळा, निरभिमानस्थिति येईल असें तुझें ज्ञान मला बोध. तुझी आज्ञा उल्लंघूं नये एतदर्थ मी संप्रदाय वाढवावा हें खरें. पण तुझीच सेवा असें मानीत असतांहि नित्य नित्य अभिमान उठेल. अभिमान उठण्याचें कारण, अनुग्रहार्थ, अधम, उत्तम, नीच, विषयी, क्रोधी, इत्यादि अनेक प्रकारचे लोक शरण येतील. त्या काळीं " तुझ्यासम मीहि ज्ञानदाता " असा अभिमान अवश्य येईल. उपदेशक्रम सुरू करणेंच अभिमानाचा जन्म असें मला वाटतें. तर तो अभिमान न येईल असें ज्ञान सांगून तुझें वचन सत्य कर." ( पु. ३–१७१ व १७३ ).

अशा तऱ्हेनें दत्तूनें आपलें हृद्गत बोलून दाखविल्यावर बालमुकुंदांना परमानंद झाला व त्यांनीं आपला गुह्याद्गुह्यतम असा हृदयांतील ठेवा त्याचे स्वाधीन केला. तो कशा रीतीनें व कोणत्या भूमिकेवरून केला हें चरित्रनायकांनीं एके ठिकाणीं सांगितलें आहे, तें असें— " पुत्रास पाहून बाळमातेस अतिशय प्रेमाचा उमाळा फुटला; आणि आपल्या करकमळीं उद्धवलेला अनादि सूत्रधारी पुत्र असें ओळखून निजज्ञान स्तनपान देण्यास ती कनवाळू माता तयार झाली. चुकलेलें पाडस भेटतां हरिणी जशी स्नेहानें त्या बाळकाकडे टक लावून पाहते तद्वत प्रीतिभरानें बाळाकडे ती बाळमाता पाहूं लागली. पहा चमत्कार कीं सद्गुरुच शिष्यास भुलला आणि अवधूत पंथाचीं मर्में सांगण्यास तयार झाला. तेणेंकरून शिष्याचा जीवभाव चमत्कारला आणि तो अंतःकरण देहावेगळें करून, श्रवणीं एकाग्रता स्थापून पुढील निरूपण ऐकण्यास तटस्थ बसला. ( पु. ३–१७५ ).


त्यानंतर बालमुकुंदांनीं ज्ञान म्हणजे काय, विज्ञान म्हणजे काय, खरी सद्गुरुभक्ति कोणती वगैरे समजावून सांगून दत्तूच्या मस्तकीं आपला दिव्य हस्त ठेविला. त्याबरोबर त्याला पूर्ण ब्रम्हबोधप्राप्ति झाली व अनिर्वचनीय सुखाचा अनुभव आला. तरी त्यांचें समाधान झालें नाहीं. तेव्हां पुढें जो प्रकार झाला तो चरित्रनायकांच्याच शब्दांत सांगत आहोंत. ते म्हणतात " अनादि स्वतःसिद्ध रूप आपलें आहेच अशी शिष्याची अनुभवशीर खात्री जाणून निजानंद क्षीरसागर उल्हासला. बाळकास अलंकार लेववून माता आनंद पावते तद्वत शिष्याचे ठायीं निजबोधाची स्थिरता पाहून सद्गुरूस अत्यानंद होतो व




बाळेकुंद्री गावामधील श्रीपंतमहाराजांचें घर
[ उजवीकडे असलेलें ] ( पृ. ७ )



दड्डीजवळील घटप्रभा नदीकाठीं असलेलें
'पत्रीवन' नावाचें रम्य स्थान ( पृ. १२१ )



दड्डी येथील श्रीपंतमहाराजांचें जन्मस्थान (पृ. ७)



श्रीपंतमहाराजांचे मातुल श्रीपादपंत दड्डीकर
यांचें दड्डी येथील घर (पृ. ९)

शिष्याची स्वानंदीं बुडी देखून सद्गुरूस अतिशय प्रेम उचंबळतें. अशा प्रेमभरात सद्गुरु बालावधूतानें दोन्ही हात पसरून परमानंद स्थितींत निजशिष्यास गाढालिंगन दिलें. आधींच पुत्रावर प्रीति. त्यांत तो ब्रह्माधिकारी झाला हें पाहून परमानंदानें श्रीसद्-गुरूंनीं शिष्यास हृदयावर आलिंगलें. खरोखर पोटीं जन्मला म्हणून त्याच्यावर अतिप्रीति ठेवून, थोड्याच शब्दांत, शास्त्रभार न वाढवितां सत्यखूण हातीं दिली. पुत्रस्नेहाची उपमा दिली. पण शिष्य ब्रम्हसंपन्न होतां सद्गुरुहि त्यास पूज्य मानितो. ब्रम्हसंपन्नतेपुढें पुत्र-सुख तें काय ! सद्गुरु कृपेनें जिकडे पाहील त्यास तात्काळ ब्रह्मसंपन्न करितो. जे शब्दांनीं देतां येत नाहीं, बुद्धीस अतर्क्य, वृत्तीच्या हातास दूर, असें पूर्णपण आलिंगनाचे निमि-त्तानें समर्थांनीं शिष्यास दिलें. हृदय हृदय एक झालें. सद्गुरूनें आपले हृदयींचें शिष्य-हृदयीं घातलें. याप्रमाणें शब्दबाजार नसतां, न बोलतां, कांहीं न करितां पूर्णत्व शिष्यास दिलें. ज्याप्रमाणें दोन दिवे एक होतां मोठा प्रकाश पडतो, त्याप्रमाणें बाळदत्तांची भेट होतां अनुभवशक्ति प्रबळपणें कोंदाटली. दत्ताचें दत्तपण हरपलें. बालावधूताचे ठायीं सद्गुरुपण लीन झालें. जिकडे तिकडे चैतन्यघन वस्तुच भरून दत्त परिपूर्ण ब्रम्ह होऊन राहिला.त्या काळीं बोध ना अबोध, स्वानंद ना निरानंद, गुरु शिष्य एक होऊन अखंड परिपूर्ण परमानंदच उरला. गुरुशिष्य अभिन्न झाले. बोल, चाल, मौन हीं खुटलीं. मी तूं पण निःशेष गेलें. अशी अद्वय स्थिति प्रगटली. स्वरूपाचे साक्षात्कारानें शिष्याअंगीं ब्रह्मस्फुरण मुरलें; विस्मरण निःशेष निमालें आणि अव्यंग ज्ञानोदय झाला. याप्रमाणें सद्गुरूनें आपलें पूर्णपण देऊन पुढें अवधूतपंथवृद्धि करण्यास्तव अकर्तृत्वबोध सांगण्यास तयार झाला. तेव्हां मुख्य बिंबाचे ठायीं भिन्न न होतां सूर्यापुढें प्रकाशमान किरण पसरतात, त्याप्रमाणें वेगळेंपण न दिसतां बाळदत्तांचें आलिंगन सुटलें. जलांत, जलावर तरंग राहतात. त्यांचे सबाह्य जल असतें. त्याचप्रमाणें आलिंगनापासून वेगळा शिष्य झाला. ज्याप्रमाणें दिव्यानें दिवा पेटविला असतां वडील धाकटा हा भेद नसतो, त्याप्रमाणें शिष्य सद्गुरुसम झाला. अनु-ग्रहमार्ग धरिला असतां अहंता येईल अशी शिष्याची जी भीति होती ती या प्रकारें काढिली. जो शिष्य " पंथक्रम चालवींत नाहीं " म्हणत होता तोच आपलें अकर्तृत्व जाणून अनुग्रह करण्याची योग्यता पावला. पूर्ण समाधान पावून सद्गुरुचे चरणीं शिष्यानें मिठी घालितांच पूर्ण बोधानें पूर्ण उत्साहभरित झाला. " (पु. ३–१९५)

सद्गुरूंनीं गाढ आलिंगनाचें निमित्त करून शिष्याला पूर्णत्व दिल्याचें वर जें वर्णन केलें आहे तें वाचून ज्ञानेश्वरींतील ज्ञानेश्वर महाराजांच्या पुढील ओव्यांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. त्या अशाः—

" मग सांवळा सकंकणु । बाहु पसरोनि दक्षिणु । आलिंगिला स्वशरणु । भक्त-राजु तो ॥ १८–१४१८ ॥ न पवतां जयातें । काखे सूनि बुद्धीतें । बोलणें मागौतें । वोसरलें ॥ १४१९ ॥ ऐसें जें कांहीं येक । बोला बुद्धीसिहि अटक । तें द्यावया मिख । खेवाचें केलें ॥ १४२० ॥ हृदया हृदय येक जालें । ये हृदयींचें ते हृदयीं घातलें । द्वैत न मोडितां केलें । आपणाऐसें अर्जुना ॥ १४२१ ॥ दीपें दीपु लाविला । तैसा परिष्वगु

तों जाला । द्वैत न मोडितां केला। आपणपें पार्थु ॥ १४२२ ॥तेव्हां सुखाचा मग तया। पूरु आला जो धनंजया । तेथ वाडुतऱ्ही बुडोनियां । ठेला देवो ॥ १४२३ ॥ ”

त्याचप्रमाणें भगवान श्रीकृष्णानें सद्भक्त उद्धवाला प्रेमालिंगनाच्या द्वारें आपलें सर्वस्व अर्पण केल्याचें श्रीएकनाथमहाराजांनीं एकनाथी भागवतांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. तें असें:—“म्यां सांगितलें जैशा रीतीं । तैशी सेवावी माझी निजभक्ती। ऐसें बोलत बोलतां श्रीपती । उद्धव प्रीतीं उचलिला ॥ १९–३०३ ॥ मागां टाकूनि पितांवरें। मांडोनियां शंखचक्रें। उद्धव उचलिला श्रीधरें। तरी प्रेम न सवरे देवाचें ॥ १९–३०४ ॥ हांव न बाणेचि दों करीं । मग चारी भुजा पसरी । उद्धवातें हृदयावरी । प्रीतीं थोरी आलिंगी ॥ ॥ १९–३०५ ॥ हृदया हृदय एक जाहलें । ये हृदयींचें ते हृदयीं घातिलें । कृष्णें सर्वस्व आपुलें । तें हृदयीं सूदलें उद्धवाचें ॥ १९–३०६ ॥ देव अवाप्तकामनिचाड । त्यासीही भक्ताची ऐसी चाड ।अतिशयें उद्धव लागला गोड। स्वानंदें कोड पुरवी त्याचें ॥१९-३०७॥”

श्रीज्ञानेश्वर व श्रीएकनाथ यांची गुरुभक्ति अत्युत्कट होती व त्यांनीं सद्गुरूची पूर्णकृपा संपादन केली होती हें सर्वश्रुतच आहे. तेव्हां त्या उभयतांनींहि भगवान श्रीकृष्णानें आपल्या परम भक्ताला आपलेपण, स्वरूपज्ञान अथवा पूर्णत्व देण्याकरितां व वाङ्मनातीत समरससुखाचा अनुभव देण्याकरितां प्रेमालिंगन दिल्याचें जें रसभरित वर्णन केलें आहे त्यायोगें त्यांनीं आपण अनुभविलेल्या समरसप्रेमाचेंच वर्णन केलें आहे हें उघड दिसतें. जें शब्दाला गवसत नाहीं, बुद्धीला ज्याचा पत्ता लागत नाहीं, मनाला ज्याचें आकलन होत नाहीं तें गुह्याद्गुह्यतम ब्रम्हात्म्यैक्यज्ञान, अभेदभक्तिरहस्य अथवा भक्तिप्रेमसार देण्याला व घेण्याला शब्द, मन, बुद्धि व इंद्रियें हीं अपुरीं आहेत.

सद्गुरुनें पूर्ण कृपेनें शिष्याला आपल्या शुद्ध प्रेमस्वरूपांत प्रेमालिंगनाच्या मिषानें अथवा अन्य युक्ति योजून समरस करावें तेव्हांच तें रहस्य शिष्याचे हातीं यावयाचें. तें साध्य होण्याला अन्य उपायच नाहीं. या अभेदभक्तिरहस्याचा अथवा भक्तिप्रेमसाराचा लाभ होणें यालाच श्रीएकनाथांनीं “ पाचवा पुरुषार्थ ” म्हटलें आहे.

पंतांना बालमुकुंदांचा अनुग्रह कर्डेगुद्दी येथें झाला असला तरी सद्गुरूंनीं आपणांस पूर्णत्व व अवधूतपंथवृद्धि आज्ञा हीं वेणुपुरीं म्हणजे बेळगावी दिलीं असें त्यांनीं जागजागीं म्हटलें आहे. पद नं. ४७ मध्यें “ वेणुनगरीं ब्रह्मज्ञानाचें कोठार। उघडुनी थोर ख्याति केली ॥ ” असे उद्गार त्यांनीं काढले आहेत.

# प्रकरण ९ वें

———:०:———

## पब्लिक सर्व्हिस पास; बालमुकुंदांचें निर्याण व वियोगदुःख

जरी दत्तूला अनुग्रह झाल्यापासून त्याचा बराचसा काळ भजनपूजनांत योगसाध-नांत व बाळप्पांच्या सहवासांत जात असे आणि त्यामुळें त्याच्या अभ्यासांत व शाळेंतील हजेरींत थोडथोडी हयगयहि होई तरी स्वकर्तव्याची जाणीव व अभ्यासक्रम न सोडण्याची बाळप्पांची आज्ञा यांच्यामुळें त्याचा शिक्षणक्रम चालू राहून तो १८७७ सालीं ( त्यावेळीं चालू असलेल्या ) पब्लिक सर्व्हिसच्या परिक्षेला बसला व उत्तीर्ण झाला. त्यामुळें बाळ-प्पांना फार आनंद झाला व प्रापंचिक दृष्टीनेंहि त्याचें पाऊल पुढें पडल्याबद्दल त्यांना समा-धान वाटलें.

१८७७ च्या अखेर बाळप्पांचा श्रीशैल्ययात्रेला जाण्याचा बेत नक्की झाला. निघण्या-पूर्वी बेळगावांत असतांना एके दिवशीं ते दत्ताप्पाला म्हणाले, “ माझ्या पोरांपासून मी कांहींच लपवून न ठेवितां माझें आतडें त्यांच्यापुढें उघडें करून ठेविलें आहे. ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें जो तो आपला फायदा करून घेईल. आतां मी म्हातारा झालों आहें. तशांत दिवसेंदिवस माझी वृत्ति शांत होत चालली आहे. या उपर माझ्याकडून कोणतीहि दगदग होणार नाहीं. या पूर्वींच मी तुला पूर्ण अधिकार देऊन ठेविला आहे. कोठें जाऊं नको. तूं बसल्या ठिकाणींच सत्पुरुषाची भेट होऊन खूण मिळत जाईल. तूं कसलीहि चिंता करूं नको. मी केव्हांहि तुझ्या पाठीवर आहें, ” याप्रमाणें आश्वासन देऊन त्यांनीं त्याला आपल्या सन्मुख बसण्यास सांगितलें व त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून ते म्हणाले, “ हे अनादि पुत्रा, मी कालत्रयीं जशाचा तसाच राहून उत्पत्तिस्थितिलयानें विकार न पावतां ब्रह्मस्वरूपच खेळतों; तोच पराक्रम तुला मिळो ! मी सगुण दिसून नित्य निर्गुण आहें, रूपाकारानें विकार पावत नाहीं; ही स्वरूपाची थोरी पुत्रा, तुला प्राप्त होवो ! रूपी असून अरूपता, गुणीं व्यवहारत असतां निर्गुणता ही जी माझी पूर्णावस्था ती तुला माझ्या कृपेनें मिळो ! ज्याप्रमाणें आकाश जळीं असून ओलें होत नाहीं, त्याप्रमाणें परमा-त्मानुभवपूर्णतेच्या योगें सर्व कर्माचरणीं अकर्तृत्व, संप्रदायक्रम वाढवितांना, तुला प्राप्त होवो ! ” याप्रमाणें हस्तमस्तकसंयोगपूर्वक दत्ताप्पाला आशिर्वाद दिल्यावर बाळप्पांनीं त्याला प्रेमालिंगन दिलें व त्या प्रेमाकुल स्थितींत त्याचा निरोप घेतला. नंतर बेळगावमधील आपल्या इतर मंडळींचा निरोप घेऊन ते कडेगुद्दीस जाण्यास निघाले व वाटेंत सांबरें गावीं ( बेळगावपासून सुमारें ६ मैलांवर ) त्यांनीं मुक्काम केला. तेथें ते व त्यांचा शिष्य चन-बसप्पा ऊर्फ शिवायनमः हे दोघेच बोलत बसले असतांना शिवायनमःनें त्यांना विचारलें कीं, “ अप्पा, तुम्हीं कोणाला काय देणगी दिली आहे ? ” तेव्हां ते म्हणाले, “ माझी कृपादेणगी सर्वांना सारखीच दिलेली आहे व मी सर्वांना सारख्याच प्रेमानें वागविलें आहे.

पण त्याचा योग्य उपयोग करून घेणें हें ज्याच्या त्याच्या हातीं आहे. ज्यांच्या ठिकाणीं नश्वर वस्तूंचा मोह व अनश्वर वस्तूबद्दल अनास्था आहे अशांना माझ्या देणगीची व बोधाची किंमत कशी समजावी ? जे शुद्ध भावानें माझ्या बोधाचें मनन करून व माझ्या आज्ञेप्रमाणें वागून अखंड माझ्या स्मरणांत राहातील त्यांना कसलीहि कमतरता पडणार नाहीं. दत्ताप्पाला माझा अवधूत मार्ग चालविण्याचा अधिकार दिलेला आहे. तुं त्याला धरून राहा व प्रत्येक गोष्टीचें हंसाप्रमाणें सार ग्रहण करीत जा. "

शके १७९९ च्या कार्तिकाच्या सुमारास एके दिवशीं "मी श्रीशैल्ययात्रेला जातों, फाल्गुन शुद्ध १५ पर्यंत परत येईन. तेव्हां कोणीहि माझ्याबरोबर येऊं नका, आनंदानें राहा, " असे सांगून, विशेष गाजावाजा न करितां, बाळाप्पा कडेगुद्दीहून निघून गेले. ते कायमचे गेले असें त्यावेळेस कोणासहि वाटलें नाहीं. पण फाल्गुन शुद्ध १५ ची त्यांची परत येण्याची मुदत टळून गेल्यावर मात्र त्यांच्या शिष्यांना काळजी वाटूं लागली. त्यांनीं त्यांचा तपास करण्यास सुरवात केली व श्रीशैल्य, म्हैसूर, वऱ्हाड वगैरे ठिकाणी चवकशी केली. पण कांहीं पत्ता लागला नाहीं. एकदां ते दक्षिण हैद्राबादेकडे असल्याचें वर्तमान समजल्यावरून त्यांच्या शिष्यमंडळींनी तिकडे मुद्दाम मनुष्य पाठवून चवकशी केली. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां मात्र त्यांच्या शिष्यांची निराशा होऊन त्यांना फार दुःख झालें. त्यांतल्यात्यांत ज्यांनीं त्यांच्या सन्निध राहून त्यांची एकनिष्ठपणें सेवा केली होती त्यांना परमावधीचें दुःख झालें. तेव्हां दत्तूनें कडेगुद्दीस जाऊन मोठ्या प्रेमानें व कळवळ्यानें त्यांना बोधाच्या चार गोष्टी सांगून व धीर देऊन त्यांचें सांत्वन केलें. त्या प्रसंगाचें सुंदर शब्दचित्र गणपतराव मारीहाळकर यांनीं एका कानडी पदांत रेखाटलें आहे. त्याचा मराठींत भावार्थ पुढीलप्रमाणें आहेः—

" हे बाळांनो, लक्ष देऊन ऐकारे. भक्त दत्ताला मी आपलें ( अधिकार ) वस्त्र देऊन तुमचा पुढारी केले आहे. जसे तुम्ही बाळाला भजत होतां तसे त्याला भजत रहा, " असें सांगून महायोगी बाळप्पा निघून गेला. तेव्हां भक्तजन दीन होऊन त्याच्या लीला आठवीत विरहदुःखानें ( विव्हल होऊन ) जमिनीवर अंग टाकून व देहभान विसरून निचेष्टित पडले. इतक्यांत भक्त दत्त तेथें आला व त्यानें लगबगीनें आपल्या गुरुबंधूंना मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें; आपल्या हातानें त्यांच्या डोळ्यांतील अश्रु पुशीत त्यांची समजूत पटेल अशा युक्तीनें बाळप्पाच्या बोधाची व वैराग्याची त्यांना आठवण करून दिली; अधिकारयुक्त वाणीनें त्यांना अभय वचन दिलें आणि तात्काळ त्यांचें विरहदुःख नाहींसें करून व त्यांना ज्ञानदान देऊन त्यांच्या ठिकाणच्या मोहभ्रमाचा निरास केला व मोठ्या प्रेमभरानें त्यांना शांतिरूपी मेवा खाऊं घातला. त्यासरसा बाळप्पाच्या सर्व भक्तांना धीर येऊन उमेद वाटूं लागली व त्यांनीं दत्ताचे चरण घट्ट धरिले आणि मोठ्या प्रेमानें सद्‌गुरूचें भजन करूं लागून ते सहज ब्रह्मानंद भोगूं लागले. "

याप्रमाणे जरी दत्तूनें आपल्या कांहीं गुरुबंधुभगिनींचें सांतवन करण्याचा प्रयत्न केला, तरी ज्यांच्या भावना अत्युत्कट होत्या अशा बालमुकुंदांच्या कांहीं शिष्यांना त्यांच्या

वियोगाचें दुःख असह्य झालें. ज्याचा मागें उल्लेख केला आहे तो कर्डेगुद्दी येथील बाळप्पांचा पहिला शिष्य रामपा गोपाळ कुळकर्णी हा कुळकर्णीकीचें काम पाहात असे. त्याचें लग्न झालेलें होतें व त्याच्या घरांत त्याचें कुटुंब, वडील, धाकटा भाऊ वगैरे माणसें होतीं. बाळप्पा आतां परत येत नाहींत अशी जेव्हां त्याची खात्री झाली तेव्हां त्याचें मन फार उद्विग्न होऊन त्यानें आपल्या कुळकर्णीकीच्या कामाचा राजिनामा दिला व ते गेल्यानंतर सुमारें सहा महिन्यांनी त्यांचा तपास करण्याकरितां म्हणून तो जो घरांतून निघून गेला तो परत आला नाहीं. त्यानंतर त्याच्या घरांतील मंडळींनीं त्याचा पुष्कळ तपास केला पण कांहीं पत्ता लागला नाहीं.

चनबसप्पा ऊर्फ शिवायनमः हा लिंगायत जातीचा असून बालमुकुंद कर्डेगुद्दीस आल्यापासून तों ते श्रीशैल्ययात्रेला जाईपर्यंत नेहमीं त्यांच्या संगतीत असे. तो फार भाविक असून अतिशय प्रेमळ होता. तो नेहमीं तोंडानें "शिवायनमः", "शिवायनमः" असें म्हणत असे. त्यामुळें सर्व जण त्याला "शिवायनमः" म्हणूं लागले व पुढें तेंच त्याचें नाव रूढ झालें. त्याच्यासारख्या एकधोरणी व भाविक भक्तांना बाळप्पांचा वियोग फारच असह्य झाला. पण त्यांनीं पूर्वींच सांगून ठेविल्याप्रमाणें, "दत्त हाच आपला वाटाड्या असून तोच आतां आपल्याला बाळप्पाच्या ठिकाणीं आहे," अशी त्याची दृढ भावना असल्यामुळें तो दत्तूजवळच राहूं लागला व त्याला सोडून कोठें गेला नाहीं.

बालमुकुंदांच्या निर्याणासंबंधीं चरित्रनायकांनी असें म्हटलें आहे कीं, "जवळून दूर न जातां आमच्या आसपास सन्मुखच हिंडत असतां (आम्ही) त्याच्याबरोबर स्वानंद खेळ खेळत असतांच, पहातां, पहातां त्याची निजरूपताच श्रीशैल्ययात्रेच्या मिषानें अदृश्य झाली. जी घृताची पुतळी थिजून पुरुषाकृति भासली होती ती विरघळून घृतरूपानें राहावी, त्याप्रमाणें स्वलीलावलंबनेंकरून भक्तांकरितां परोक्षाक्षेत्रीं अवतरून, जंबुनगरीं अनुग्रह देऊन, वेणुनगरीं आपलें गुह्यज्ञान, संप्रदायक्रमवृद्धिआज्ञा हा भक्तास देऊन 'बालावधूत' अदृश्य झाला. निराकाररूपानें दत्तास अंतर्बाह्य व्यापून, एकरूपता देऊन, केव्हांहि विभक्तपणा नसतां अखंड भेटी असूनहि अदृश्य राहिला. आकार दृष्टीपुढून नाहींसा झाला तरी निर्गुणत्वें सहज उरला. जेव्हां श्रीदत्तात्रय बालमुकुंदनामें अवतार धारण करून भेटला, तेव्हां तें सगुणरूप इंद्रियांस गोचर झालें होतें. तेंच रूप इंद्रियांस अकळ असें अनुभवास आलें." (पु. ३–१९८)

तसेंच एका पदांत बालमुकुंदांचें सबंध चरित्र थोडक्यांत देऊन त्याच्या शेवटीं ते म्हणतात "वेणुनगरीं ब्रह्मज्ञानाचें कोठार। उघडुनीयां थोर ख्याति केली ॥ ३ ॥ श्रीशैल्ययात्रेचें करूनीयां मीस। दत्तहृदयींवास गुप्त केला ॥ ४ ॥ (द. प्रे. ल. ४७).

———

# प्रकरण १० वें

———×———

## सद्गुरूच्या वियोगानंतरची पंतांची भूमिका

बाळप्पा श्रीशैलयात्रेहून परत येण्याची मुदत टळून गेल्यावर जसजसा अधिकाधिक काळ लोटत चालला, तसतशी त्यांच्या शिष्यांची निराशा बळावत चालली. बेळगावमधील पंतांचे तरुण गुरुबंधु म्हणजे गोपाळ भागोजी कोंप, कृष्णा, परशराम, व्यंकटेश जुनेबेळगावकर वगैरे स्नेही मंडळी, तसेंच गणपतराव, चिंतोपंत, हणमंतराव वगैरे आप्त मंडळी व चनबसप्पा ऊर्फ शिवायनमः सारखी भाविक मंडळी पंतांना आपला पुढारी समजून त्यांच्या नेतृत्वाखालीं सद्गुरूचें भजनपूजन करूं लागली. बाळप्पा गेल्यापासून या गुरुबंधूंना परस्परांबद्दल विशेष ओढा वाटूं लागून अनिमित्त बंधुप्रीतीचा अपूर्व अनुभव येऊं लागला आणि त्यांचीं अंतःकरणें एका गुरुप्रेमरज्जूनें निगडित झालीं.

पंत व त्यांचे गुरुबंधु या सर्वांचीच वरीलप्रमाणें स्थिति झाली खरी. पण पंतांना सद्गुरूच्या आज्ञेप्रमाणें विद्याभ्यास पुरा करून प्रपंचांत राहूनच अवधूतमार्ग पुढें चालविण्याचें म्हणजे अज्ञजनबोधाचें कार्य करावयाचें असल्यामुळें त्यांना सद्गुरूच्या वियोगानें होणारें दुःख आवरून पुढला विचार करणें भाग झालें. तसेंच त्यावेळीं त्यांच्या ठिकाणीं पुढील गुण उत्कटतेनें वसत होते व त्यांनीं त्या वियोगदुःखाला बराच आळा घातला होता. ते असेः— अत्युत्कट गुरुभक्ति, तीव्र ज्ञानलालसा, वीर विरति, विवेकजागृति, गुरुनामाचा छंद व गुरुभजनीं अवीट गोडी, गुरुवचनीं अढळ विश्वास, उज्वल कर्तव्यनिष्ठा, अध्ययन व अध्यापनं यांची हौस व उद्योगप्रियता. या गुणांचाच पंतांच्या पुढील आयुष्यक्रमांत विकास होत गेल्यामुळें येथें म्हणजे या चरित्ररूपी मंदिरांत प्रवेश करतांना उंबरठ्याशींच वाचकांना त्यांची थोडीशी ओळख करून दिल्यास बरें होईल असें वाटल्यावरून पंतांच्याच वचनांच्या आधारें त्यांचें थोडक्यांत दिग्दर्शन करीत आहोंत.

### सद्गुरुभक्ति

बालमुकुंद व दत्तू यांची प्रथम भेट कशा रीतीनें झाली व तेव्हांपासून ते श्रीशैल्ययात्रेला जाईपर्यंत त्यांचा संबंध कसकसा आला व काय काय प्रकार झाले या संबंधाची सविस्तर हकीगत यापूर्वी आलेलीच आहे. बालमुकुंद हे ब्रह्मनिष्ठ, श्रोत्रिय व शिष्यप्रबोधनीं समर्थ असे सद्गुरु आहेत व आपण प्रणिपात, प्रश्न अगर सेवा यांपैकीं कोणत्या तरी मार्गानें अगर अन्य रीतीनें त्यांची कृपा संपादून त्यांचेकडून अनुग्रह घ्यावा ही गोष्ट दत्तूच्या ध्यानींमनीं अगर स्वप्नींहि नव्हती; तर त्यानें गणूला लिहिलेल्या पत्रांतील मजकूर कानीं पडतांच त्यांनीं त्याला शाप देऊन उःशाप दिला व आपल्या ठिकाणचें पूर्णत्व देऊन अवधूतमार्ग पुढें चालविण्याची आज्ञा केली. त्यामुळें बालमुकुंदांकडे जातांना दत्तूच्या

अंतःकरणाची जी स्थिति होती तिला काय नाव द्यावें अगर नवविधाभक्तींच्या कोणत्या चौकटींत बसवावें हें कांहींच समजत नाहीं व आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी हे जे भगवद्भक्तांचे चार वर्ग श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितले आहेत त्यांपैकीं कोणत्या वर्गापैकीं त्यावेळीं तो होता हें सांगतां येत नाहीं. फार तर त्याच्या ठिकाणच्या भक्तीला आत्मनिवेदन भक्ति म्हणतां येईल. पण त्याचें आत्मनिवेदन अथवा आत्मार्पण हें त्यानें आपण होऊन केलेलें नव्हतें तर तें सद्गुरूनें करवुन घेतलें होतें व तें पुढें स्वानुभवानें स्थिर व्हावयाचें होतें. तसेंच सद्गुरुकृपेनें त्याला अद्वैतबोधाचा अनुभव आल्यामुळें त्याला ज्ञानी-भक्त म्हणण्यास हरकत नाहीं. पण त्याच्या ठिकाणचें अद्वैतज्ञान पक्वदशेला यावयाचें होतें आणि त्याचें ज्ञान व भक्ति हीं दोन्हींहि एका सद्गुरुकृपेचींच लेंकरें होतीं म्हणजे तीं सद्गुरुचीच देणगी होती.

"या भक्तिः सा परानुरक्तिरीश्वरे" अशी जी नारदभक्तिसूत्रांत भक्तीची व्याख्या केली आहे त्या व्याख्येप्रमाणें भक्ति म्हणजे ईश्वरावर निरतिशय प्रीति होय अगर सोप्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे भक्ति म्हणजे भगवंतासंबंधीं आवड अगर चित्ताचा त्याचेकडे ओढा असें म्हणतां येईल. कोणत्या कां निमित्तानें होईना, मनुष्याच्या अंतःकरणाची भगवंताकडे ओढ लागणें ह्याला आपण सामान्यतः भक्ति म्हणतो. आतां दत्तूच्या संबंधीं विचार करूं लागतां असें दिसतें कीं जरी बालमुकुंदांचें दर्शन होण्यापूर्वी त्याच्या ठिकाणीं सद्धर्म व सच्छास्त्र यांसंबंधीं पूज्यभाव होता व त्याची श्रीदत्तावर दृढ भक्ति होती, तरी बालमुकुंदांकडे त्याच्या चित्ताची ओढ मुळींच नव्हती. तर उलट त्यांच्यासंबंधीं त्याला तिटकाराच वाटत होता व त्याच्या या अशा मनःस्थितींत त्यांनीं आपण होऊन आपल्या अजब युक्तीनें त्याला आपल्याकडे ओढून घेतलें आणि प्रथम भेटींतच त्याच्यावर कृपा केली. या संबंधीं एके ठिकाणीं आपले मागील अनुभव सांगतांना पंत म्हणतात, "आम्हीं कांहीं साधन न करतां, शास्त्रें न पाहतां, कर्मे न आचरतां, आम्हांला ज्ञानशक्ति नसतां, मूढ, भ्रष्ट अशा आम्हांवर आपलेपणाचा प्रेमपदर पसरून सर्वावस्थांत सदा "तूं माझाच" अशी खूण अंतःकरणास देऊन त्यानें आम्हांस अबाधित, त्रिगुणातीत शांतिसागरांतील प्रेममत्स्य करून खेळावयास लाविलें. अशा सद्गुरूच्या निरपेक्ष व समप्रेमास उपमा कोणती? याबद्दल उत्तराई कसें व्हावें? ज्या प्रेमांत गुरुशिष्यभाव बुडाला अशा प्रेमापुढें निरभिमानता कोणती? वैराग्य कोणतें? जप, तप, होम, नेम, पूजा, सेवा वगैरे कांहींच न पाहतां त्यानें आम्हांस "आपले" या निर्मल प्रेमदृष्टीच्या मुशींत ओतून आमचें अहंममतादारिद्र्यदुःख नाहींसें केलें व आम्हांस मरणातीत करून आपल्या अविनाश सुखांकावर निजविलें." (पु. ८–२३५).

याप्रमाणें दत्तूला अगदीं अनपेक्षित रीतीनें सद्गुरुकृपेचा व ज्यांत गुरुशिष्यभावहि नाहींसा होतो अशा निरपेक्ष व समप्रेमाचा लाभ झाला व सद्गुरूच्या या अपार प्रेमदेणगीनें त्याच्या ठिकाणीं सद्गुरूसंबंधीं जी आवड उत्पन्न झाली व त्याच्या चित्ताची प्रचंड ओढ सद्गुरूकडे लागून त्याला सद्गुरूचें जें वेड लागलें अगर त्याचा जो छंद लागला त्याला

भक्ति असें म्हणतां येईल. दत्तूला लागलेलें हें वेड; हा छंद अगर ही भक्ति अत्यंत निर्हेतुक अगर निष्काम होती. ही भक्तिच ज्ञानविज्ञानाची माउली होय.

## भक्ति व ज्ञान

आपणांस सद्‌गुरूपासून जो ज्ञानलाभ झाला त्यासंबंधीं पंतांनीं असें म्हटलें आहे कीं, "मला वेदशास्त्रांत गति नाहीं, तरी पूर्ण भाग्योदयानें ज्ञानपरीस मला मिळाला. परीस सर्व ठिकाणीं मिळत नाहीं. जरी असला तरी तो या लोकीं गुप्त असेल. तो चिद्रत्नाचा परीस बालमुकुंद मला सापडला. माझ्या अंगीं मूर्खपण असल्यामुळें परिसाचें लक्षण मी जाणत नाहीं. तरी श्रीसद्‌गुरुबालमुकुंदाचे चरणरजानें मला परिपूर्ण ज्ञान प्राप्त झालें. परीस लोहाचें सुवर्ण करितो, पण लोहाचा परीस होत नाहीं. तरी श्रीसद्‌गुरु बालमुकुंदाचे चरणरजानें लोहाचा परीस होतो. अशा ह्या महानिधि श्रीसद्‌गुरुबालमुकुंदानें मी दीन हीन असें जाणून मला गुप्तज्ञान दिलें. सप्तकोटी महामंत्र आहेत. त्यांत एकाक्षर, द्व्यक्षर, चतुरक्षर असे अनेक भेद आहेत. माझा मंत्र पंचाक्षरी, केवळ ज्ञानाब्धीचा पूर्ण चंद्र, असा आहे. या मंत्राचें एकेक अक्षर क्षरातीत पर असें आहे; तो "बालमुकुंद" हा होय. अशा सद्‌गुरु समर्थानें हें वरील ज्ञान मला दिलें. मला ज्ञान दिलें म्हणण्यांत भेदभाव आणूं नका. तोच ज्ञान, तोच ज्ञानदाता, तोच ज्ञाता." ( पु. ३–१९७ )

## भक्ति ज्ञान आणि वैराग्य

त्याचप्रमाणें आणखी एके ठिकाणीं पंत म्हणतात "शुद्ध वैराग्याविना भक्ति खरी अनन्य घडणें नाहीं म्हणून सद्‌गुरुबोधासरशीं शिष्यांत ज्ञान, वैराग्य व अनन्यभक्ति हीं एकदमच भरतात. सत्, चित् व आनंद हीं जशीं आत्म्याचीं लक्षणें तशीं ज्ञान, वैराग्य व भक्ति हीं निजबोधाचीं लक्षणें होत." ( पु. ८–१४० )

पंतांनीं या अवतरणांत म्हटल्याप्रमाणें सद्‌गुरूचा वियोग झाला तेव्हां त्यांच्या ठिकाणीं त्याच्या कृपाप्रसादानें सद्‌गुरुभक्ति, ज्ञान व वैराग्य ही निजबोधाचीं लक्षणें वसत होतीं. तरी पण त्यावेळीं त्यांच्या अंतःकरणांत सद्‌गुरुभक्तीचेंच विशेष प्राबल्य होतें. १८७५ सालीं त्यांना बालमुकुंदांचें प्रथम दर्शन झालें. तेव्हांच त्यांच्या हृदयांत वर वर्णन केलेल्या भक्तीचें बीज रुजलें गेलें. तेव्हांपासून १८८५ पर्यंतच्या दहा वर्षांतील आपल्या आध्यात्मिक जीवनक्रमांत आपणांस कसकसे अनुभव येत गेले याचें त्यांनीं सनावळीवजा एक टाचण करून ठेविलें आहे. त्याचा विशेष हा आहे कीं त्यांत प्रापंचिक गोष्ट एकहि नाहीं. त्या टाचणांत १८७५–७६ सालांत "गुरुशंका", "सद्‌गुरुप्राप्ति" व "भक्तिप्रभाव"; १८७६–७७ सालांत "भक्तिदृढता" व "कृपा-देणगी" व १८७७–७८ सालांत "अधिकारारूढ" व "वियोग" या गोष्टी नमूद केलेल्या आहेत. त्यांवरून हें उघड दिसतें कीं १८७५ सालीं आश्विन वद्य १२ श. १७९७ रोजीं "उपायवनवसंतु" अशा सद्‌गुरूच्या प्रसादानें त्यांच्या अंतःकरणांत अनन्यभक्तीचें बीज रुजून त्याच्या

अंकुराला अद्वय बोधाचें व शुद्ध व निरपेक्ष गुरुप्रेमाचें खतपाणी मिळत गेलें व तो दिवसें-दिवस फोफावत जाऊन सद्गुरूंच्या अल्पकाळच्या सहवासांतच भक्तिप्रेमरसाची मधुर फळें त्यांना चाखण्यास मिळालीं आणि सद्गुरूंची दिव्य व अद्भुत लीला पाहण्यास सापडली. त्यायोगें बालमुकुंदांचा वियोग होईपर्यंत त्यांचें अंतःकरण सद्गुरुमय अथवा बालमय झालेलें होतें आणि म्हणून बाळप्पांचें दर्शन झाल्यापासून तीन वर्षांच्या कालावधीला त्यांनीं एके ठिकाणीं "बाळयुग" म्हणजे "बाळप्पांचें युग" असें म्हटलें आहे व आणखी एके ठिकाणीं त्याच कालावधीला "भक्तियुग" म्हणजे भक्तिप्रधानयुग असेंहि म्हटलें आहे. तेव्हां असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं जरी बालमुकुंदांच्या कृपेनें पंतांच्या ठिकाणीं भक्ति, ज्ञान व वैराग्य हीं तीन्हीहि वसत होतीं, इतकेंच नव्हे तर सद्गुरूनें त्यांना परचित्त-प्रबोधक शक्तिहि दिली होती तरी ते श्रीशैल्ययात्रेला जाण्यापूर्वीं व तें गेल्यानंतरहि कांहीं दिवस त्यांची भूमिका मुख्यत्वेंकरून भक्ताची अगर गुरुपुत्राची होती व त्यांना सद्गुरूंच्या वियोगाचें दुःख फार जाणवत होतें.

सच्छिष्याला सद्गुरूच्या वियोगाचें दुःख होणें जरी स्वाभाविक असलें तरी त्याची भक्ति अगर सद्गुरूकडील त्याच्या चित्ताची ओढ कमी होण्याऐवजीं ती अधिकाधिक वाढूं लागते व त्याच्या भावनेत्रांना सद्गुरुचरणाच्या ध्यानाचा व वाणीला गुरुनामाचा छंद लागून तो भजनानंदांत रममाण होतो. या पलीकडे त्याला अन्य कशांतच खरी गोडी वाटत नाहींशी होते व वृत्तीचा बाहेरचा प्रवाह हलके हलके बंद पडत जाऊन ती हृदयस्थ सद्गुरूच्या चरणीं खिळून राहते. त्यामुळें त्याच्या हृदयांत गुरुभक्तांचा सोहळा अखंड चालू राहून त्याला अनुपम गुरुप्रेमसुखाचा अनुभव येतो. अनन्यभक्तहृदयीं हा गुरुभक्तांचा सोहळा कसा चालू असतो याचा एक उत्कृष्ट मासला सुप्रसिद्ध संत शिवदिनकेसरी यांच्या "माझी देवपूजा, देवपूजा। पाय तुझे गुरुराजा ॥" या सर्वतोमुखीं असलेल्या पदांत पाहावयास सापडतो. अशा अनन्य भक्ताच्या स्थूल दृष्टीला दिसेनासा झालेला सद्गुरु त्याच्याच हृदयीं शुद्धप्रेमरूपानें वास करितो. या भक्तहृदयवासी शुद्धप्रेमस्वरूप सद्गुरूची मूर्ति कशी घडली जाते यासंबंधीं पंतांनीं निरनिराळ्या प्रसंगीं फार बहारीचीं वर्णनें केलीं आहेत, तीं अशीः—'सद्गुरुमूर्ति प्रेमें ओतियली ॥ ध्रु. ॥ द्वैताद्वैत नाहीं करूनी। भक्तिमूस भरली ॥१॥ सत्यज्ञानानंत लक्षणें। परिपूर्ण झालीं ॥ २ ॥ दत्तावधूत बालमुकुंद। प्रेमानंद पुतळी ॥ ३ ॥ (द. प्रे. ल. १७०८)"; "निर्मळभक्तिमुशीमाजीं प्रेमरस भरला। ऐसा सद्गुरु देखियला ॥ ध्रु. ॥ निजज्ञानाग्नीनें मूसरस। एकरूप जाहला। शुद्ध अवधूत बनला ॥१॥" (द. प्रे. ल. १७८४); "अनन्यभक्तिमुशीमाजीं प्रेमरस भरला। तोची अवधूत पुतळा ॥ ध्रु. ॥ × × × बालावधूत दिव्यबोध। दत्तहृदयीं भरला। ब्रम्हानंद उचंबळला ॥३॥" (द. प्रे. ल. १९४७) म्हणजे देहधारी सद्गुरु दृष्टिआड झाल्यावर देहांच्या पृथकत्वामुळें येणारें अंतरहि नाहीसें होऊन आपल्या हृदयांत तो शुद्ध-प्रेमरूपानें प्रगट झाला असा पंतांनीं आपला अनुभव व्यक्त केला आहे. हृदयस्थ प्रेमस्वरूप सद्गुरूची जी अनन्यभक्ति तीच पराभक्ति अथवा प्रेमलक्षणा भक्ति होय.

बाळप्पा दृष्टिआड झाल्यावर आपला गुरु शुद्ध प्रेमस्वरूप व बोधस्वरूप असून तो अविनाशी आहे. तो सर्वत्र भरलेला आहे, आपल्या आदिमध्यावसानीं तोच आहे, आपणास अंतर्बाह्य त्यानेंच व्यापिलें आहे म्हणजे "गुरुरेव परब्रह्म" हा अनुभव पंतांच्या ठिकाणीं अधिकाधिक दृढावत चालला व सद्गुरूच्या बोधाचें मनन व निदिध्यास हीं सुरू झालीं. बाळप्पा पुढें दिसत असेपर्यंत मनन व निदिध्यास यांना पंतांच्या अंतःकरणांत फारसा अवसरच नव्हता असें म्हटलें असतांहि चालेल. कारण त्यांनीं आपल्या अद्भुत सामर्थ्यानें पंतांना जणूं भारून टाकून पूर्णपणें आपलेसे केलें व अल्पावधीतच त्यांना राजयोगांतर्गत सांख्य, तारक व अमनस्क योग व शिवयोग यांची खूण पटवून व आपल्या दिव्य अवधूत खेळांत खेळवून निरनिराळ्या प्रकारचे गूढ अनुभवहि आणून दिले आणि आपण दीर्घ प्रयत्नानें मिळविलेल्या आत्मानुभवाचा गाभाच त्यांचे स्वाधीन केला. त्यामुळें त्या दोन-तीन वर्षाच्या अवधींत पंतांना एखाद्या चलच्चित्रपटांतील देखाव्यांप्रमाणें निरनिराळे अनुभव एकामागून एक येत गेले. त्यामुळें त्यावेळीं मनन व निदिध्यास करण्याला त्यांना सवडच नव्हती: ती त्यांना मागाहून करावीं लागलीं; किंवा असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं कीं सद्गुरूंनीं पंतांना आपल्या कृपेच्या विमानांत बसवून विहंगम मार्गानें आत्मानुभवाच्या निःशब्द शिखरावर नेऊन तेथील अद्भुत लीला दाखविल्या. पण त्या स्वानुभवशिखरावर जाण्याचे सामान्य जनांना सुलभ वाटतील असे धोपट मार्ग पंतांना मागाहून शोधून काढावे लागले.

तसेंच बाळप्पांचा बोधहि शेलका व सोलीव असे म्हणजे ते मोजक्या शब्दांत अखेरचे सिद्धांत सांगून आपल्या अद्भुत सामर्थ्यानें व प्रेमाकर्षणानें तो शिष्यांना पटवून देत असत. त्यामुळें शास्त्राधार देऊन तपशिलांत शिरण्याचें त्यांना प्रयोजनहि पडत नसे; म्हणजे त्यांनीं या विश्वरूपी गूढ गणिताचें ब्रह्मात्मैक्य—बोधरूपी उत्तर पंतांना सांगून आपल्या अजब युक्तीनें तें त्यांना पटवून दिलें. पण तें काढण्याची वेदशास्त्रांना संमत असलेली सुलभ व सरळ रीति बसविण्याचें काम पंतांनाच मागाहून करावें लागलें किंवा असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं कीं बालावधूतांनीं "आधीं कळस मग पायारे" या संतांच्या घरच्या न्यायानें ब्रह्मात्मैक्यबोधाचा पंतांना अनुभव आणून देऊन व "सर्वत्र मला पहा" हा आपला निर्वाणींचा बोध अखंड ध्यानीं धरण्यास सांगून कळस उभारून ठेविला होता व स्वानुभवाच्या भक्कम पायावर त्या कळसाला साजेशी भव्य व सुंदर इमारत उभारण्याचें काम पंतांनाच करावयास लाविलें. सद्गुरूच्या कळसवचनरूपी अद्वैतबोधाला स्वानुभवाचा पाया रचून गुरुप्रतीतीशीं आत्मप्रतीतीचा मेळ बसविण्याचें पंतांचें कार्य सद्गुरूच्या वियोग झाल्यावरच सुरू झालें. तसेंच सद्गुरूचा बोध व स्वानुभव यांची महावाक्यादि श्रुतिवचनें व आत्मानुभवी संतांचीं वचनें यांच्याशीं एकवाक्यता होणें अवश्य असल्यामुळें गुरुप्रतीति, आत्मप्रतीति व शास्त्रप्रतीति यांचा मेळ बसविण्यास बाळप्पांच्या वियोगानंतर पंतांनीं सुरवात केली. या संबंधीं त्यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, "शास्त्रापेक्षां आपला अनुभव श्रेष्ठ: व अनुभवापेक्षां सद्गुरुवचनीं भक्ति अगर निश्चयाचा विश्वास श्रेष्ठ व तारक. सद्गुरुवाक्यच सर्व श्रेष्ठ. शास्त्रवचन, सद्गुरुवाक्य व आपला अनुभव

कार्ति ... क्र. ५५८५



यांच्यांत किती मेळ बसतो ते पहावें. जर आपला अनुभव कमी असेल तर तो कामास येत नाहीं. सद्गुरूचा अनुभव खरा व श्रेष्ठ. त्याचे ठायीं विश्वास धरून तो अनुभव आपलासा करून घ्यावा. " ( पु. ८-१०४ )

तसेंच पंतांना सद्गुरूचा वियोग झाल्यानंतर शाळेंतील अभ्यासाबरोबरच संस्कृत भाषेंतील अध्यात्म विषयावरील उपनिषदादि ग्रंथ, व मराठी व कानडी भाषेंतील संतांचें वाङ्मय यांचें आस्थापूर्वक वाचन अगर अध्ययन करावें लागलें आणि मनन व निदिध्यास हीं सुरुं झालीं आणि सद्गुरूनें स्वानुभवयुक्त दिव्यदृष्टि दिलेली असल्यामुळें त्यांना तें अत्यंत सुलभ गेलें; कारण पंतांनीं म्हटलें आहे कीं, " सद्गुरूस शरण गेल्यानंतर ग्रंथ पहावेत तों त्यांत आपलाच अनुभव भरलेला दिसतो. गुरुपुत्ररूपी पुरुषव्याघ्रास पाहतांच, ब्रह्मबोधानें पूर्ण गर्भवती असलेली ( वेदोपनिषद् ) श्रुतिनामक धेनु एकदम घाबरून बोधरूप गर्भ गलित होऊन अर्थरूप गर्भ बाहेर टाकिते. वेदादि ग्रंथांचा अर्थ गुरुपुत्राला जसा सुगम होतो तसा तो दुसऱ्याला होत नाहीं. कारण गुरुपुत्राचा स्वतःसिद्ध अनुभव वेदांचा गूढ अर्थ असतो. गुरुपुत्रास गुरुकृपें बोध सहज असतो. त्याला खटपटी अगर यत्न नकोत. त्याचें अस्तित्व व राहाटी बोधरूप व स्वानुभवरूप असतात." ( पु. ७-२२० ) पंतांनीं जरी अध्यात्मविषयावरील ग्रंथ बारकाईनें वाचण्यास सुरवात केली तरी त्यांचा विशेष भर स्वानुभवावर होता.

श्रीशैल्ययात्रेच्या मिषानें बाळप्पा दृष्टिआड झाल्यापासून सद्गुरुआज्ञापालन म्हणजे गुरुसेवा हाच पंतांचा स्वधर्म होऊन बसला व त्यांच्या जीवनक्रमाची नौका सद्गुरूनें आपल्या आज्ञेनें आखून दिलेल्या मार्गानें त्याच्या बोधवचनरूपी दीपस्तंभांच्या अनुरोधानें चालूं लागली. यासंबंधीं पंतांनीं सद्गुरूला उद्देशून असे उद्गार काढले आहेत कीं, " गुरुसेवाच स्वधर्म हा सिद्धांत तूं श्रीशैल्ययात्रेस जाईपर्यंत अंतःकरणीं प्रेरिलाच नाहींस. तूं निघून गेल्यावर मग परमार्थाची किल्ली दाखविली म्हणजे स्फुरणमार्ग सुचविली. " (पु.२-२४०) तसेंच खरी "गुरुसेवा" म्हणजे काय यासंबंधीं ते म्हणतात, "पूर्व सुकृतानें सद्गुरुसेवनीं चूर झालें कीं त्याचें (गुरुपुत्राचें) वैभव अवर्णनीय होतें; कारण ऋद्धि-सिद्धि या त्याचे घरीं न बोलावितां पाणी वाहून सेवा करूं लागतात. वेदशास्त्रांचे संमतीनें खचित सांगतों कीं परमार्थसाधनास गुरुसेवेखेरीज अन्य उपाय मुळींच नाहीं. ती गुरुसेवेची विलक्षण खूण ही कीं जीमध्यें सेव्यसेवकभाव नसून, मीतूंपणाचा भाव नसून गुरुशिष्य एकपणें नांदतात. हें वर्म जोंपर्यंत हातीं आलें नाहीं तोंपर्यंत " गुरुपुत्र " या नावास जागाच नाहीं. तर ज्यास एकात्मतेचा अनुभव पूर्ण बाणला त्यासच गुरुसेवेची गोडी समजून येईल. ही गोष्ट कांहीं मोठी दुर्घट नाहीं. कारण गुरुशिष्य हे एकात्म, स्वतःसिद्ध आहेत."(पु. २-३२)

सद्गुरुवियोगानंतरचें पंतांचें कर्तव्य सद्गुरूच्या आज्ञेनेंच निश्चित झालें होतें, म्हणजे प्रापंचिक दृष्ट्या आपला अभ्यासक्रम पुरा करून व धाकट्या भावांना सुशिक्षित करून प्रपंचाची त्यावेळची हीन स्थिति त्यांना यथाशक्ति सुधारावयाची होती; व परमार्थदृष्ट्या

आपल्या गुरुबंधूंना बोधजागृति देऊन भजनानंदांत गुरुप्रेमाचा उपभोग घेत भाविक जिज्ञासु व मुमुक्षु यांना अद्वैतबोधामृत पाजून त्यांचें समाधान करावयाचें होतें. या उभयविध कर्तव्याची पंतांच्या ठिकाणीं पूर्ण जागृति असल्यामुळें बाळप्पांच्या वियोगानें किंकर्तव्यमूढ होऊन न जातां त्यांनीं आपला अभ्यासक्रम चालू ठेविला व १८७८ सालीं ते मॅट्रिकच्या परीक्षेला बसलेहि पण त्यांना यश आलें नाहीं. तरी त्यांनीं अभ्यास चालू ठेविला. तसेंच बाळप्पा गेल्यापासून पंतांना आपल्या गुरुबंधूंबद्दल विशेष प्रेम वाटूं लागलें व त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीबद्दल कळकळ वाळगून ते त्यांना भजनानंदांत खेळवून बोधजागृति देऊं लागले आणि सद्गुरुआज्ञेप्रमाणें भाविक जिज्ञासु व मुमुक्षु यांना बोधामृत पाजून त्यांचें समाधान करण्याचें आपलें कर्तव्य करण्यास त्यांनीं लवकरच सुरवात केली.

पंतांच्या ठिकाणीं अल्प वयांतच सद्गुरुकृपेनें परचित्तप्रबोधक शक्ति प्रगट झाली हें त्यांच्या चरित्राचें रहस्य होय. कारण स्वात्मानंदीं मग्न असून बालोन्मत्त पिशाच्च स्थितींत आत्मरत, आत्मक्रीड असलेले सत्पुरुष बरेच असतात. परंतु त्यांच्यापासून इतरांना फारसा फायदा होत नाहीं. पण ही अद्भुत शक्ति ज्याचे ठिकाणीं प्रगट आहे त्याच्या कृपादेणगीनें असंख्य लोक कृतार्थ होतात व म्हणून श्रीएकनाथांनीं अशा पुरुषाला परमेश्वराचा अवतार म्हटलें आहे. नाथ म्हणतात, "जो शिष्यासि दे ब्रह्मज्ञान। मी परमात्मा त्या अधीन। ब्रह्मदात्याच्या बोलें जाण। स्त्रियादि शूद्रजन मी उद्धरीं ॥४४२॥ × × × जो ब्रह्मज्ञान दे मद्भक्तां। तयाहूनि आणीक परता। मज आन नाहीं गा पढियंता। जाण तत्वतां उद्धवा ॥ ४४४ ॥ तो आत्मा मी शरीर जाण। त्याचा देह मी होय आपण। त्याचें जें जें कर्माचरण। तें संपूर्ण मीचि होय ॥ ४४५ ॥ जैसा मीं अवतारधारी। तैसाचि तोहि अवतारी। त्या आणि मज माझारीं। नाहीं तिळभरी अंतर ॥४४६॥ जो या ब्रह्मज्ञानाचें करी दान। त्यासि या परी मी आपण। करीं निजात्म अर्पण। तरी उत्तीर्ण नव्हेंची ॥ ४४७ ॥ ॥ × × × ॥ त्याचें जें जें जडभारी। तेंहि मी वाहें आपुले शिरीं। माझी चैतन्यश्री। नांदे त्याचे घरीं सर्वदा ॥ ४४९ ॥ (ए.भा.अ.२९). सद्गुरुकृपेनें पंतांच्या ठिकाणी परचित्त-प्रबोधक शक्ति जरी निर्माण झाली होती तरी ते पूर्ण निरहंकृति होते व त्यांनीं एके ठिकाणीं पुढील उद्गार काढले आहेत, "गुरूचें बळच आपलें बळ. तें असें कीं आपण फक्त the transmitter, channel or instrument of His will, power or force (त्याच्या इच्छेचे, शक्तीचे अगर सामर्थ्याचे वाहक, बाहेर पडण्याचें द्वार अगर साधन) आहोंत. आपल्यांत काडीएवढेंहि त्राण नाहीं. आपला गुरूवर अढळ विश्वास हेंच आपलें बळ, अन्य थाराच नाहीं." (पु. ८-१०६).

अशा प्रकारच्या आत्मानुभवाच्या उच्च भूमिकेवरून पंतांनीं सद्गुरूच्या आज्ञेप्रमाणें शिष्य प्रबोधनकार्याला लौकरच सुरवात केली व तें चालू असतां अध्ययन-अध्यापनाचें व आपल्या अनुभवाला दृढता आणण्याचें त्यांचें कार्यहि चाललें होतें. त्यामुळें कांहीं वर्षे त्यांची भूमिका सिद्ध व साधक अशी उभयविध होती.

# प्रकरण ११ वें

——:०:——

## पंथविस्तार

सद्गुरुच्या आज्ञेप्रमाणे योग्य अधिकारी पाहून त्याला अवधूतसंप्रदायानुसार उपदेश देण्याचें पंतांचें कार्य १८७९ पासून सुरू झालें व १८७५ पासून १८८५ पर्यंतच्या ज्या सनावळीचा मागें उल्लेख केला आहे तिच्यांत १८७८–७९ सालांत प्रथमच " पंथ-विस्तार " असें त्यांनीं नमूद करून ठेविलें आहे.

## काका घाणेकर, गणू व गंगाराम

१८७८ अखेर पंतांची मॅट्रिकची परीक्षा नापास झाली तेव्हां ते खडेबाजारांत विठोबाच्या देवळाजवळ एक लहानशी जागा भाड्यानें घेऊन एकटेच राहात असत व घरींच अभ्यास करीत. त्यांनीं मराठी मिशनस्कूलमध्यें दरमहा रु. ६ पगारावर शिक्षकाची नोकरी धरली व शिकवण्या पतकरून ते आपला चरितार्थ चालवीत. तसेंच अडीअडचणीला त्यांचे परमस्नेही रामराव सुंठणकर व मावसभाऊ गणपतराव यांचीहि त्यांना मदत होत असे.

माग उल्लेख केल्याप्रमाणें रोज सायंकाळीं पंत आठवले यांचे घरीं त्यांच्या मुलाला ( बाळाला ) शिकविण्याकरितां जात असत. ता. १३–१–१८७९ रोजीं संध्याकाळी ते आठवले यांचे घरीं शिकवीत बसले असतां जवळच निजलेला पंधरासोळा वर्षांचा एक तरुण मुलगा त्यांच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्यांनीं " हा मुलगा कोण " म्हणून बाळाला विचारलें व " हा माझा काका " असें त्यानें उत्तर दिलें. तें ऐकून " काक्या ऊठ " असें पंत त्या मुलाला म्हणाले. त्याबरोबर तो चटकन उठला व मोठ्या सलगीनें त्यांच्या अगदीं शेजारी जाऊन बसला. तेव्हांपासून पंत त्याला " काक्या " या नावानें हाक मारूं लागले व पुढें सर्वजण त्याला " काका " म्हणूं लागले. पंतांचें शिकविण्याचें काम संपल्यावर परत जातांना त्यांनीं काकाला आपल्या बिऱ्हाडीं येण्यास सांगितलें आणि त्यांची व त्याची पूर्वीची मुळींच ओळख नसतांहि तो मुकाट्यानें त्यांच्याबरोबर गेला व त्या रात्रीं त्यांच्याच बिऱ्हाडीं राहिला. त्यानें त्यांना आपली इत्थंभूत हकीगत सांगितली व बेळगावांत इंग्रजी शिकण्याकरितां आपले आतेभाऊ गणपतराव आठवले यांचेकडे, आपल्या घरांतील माणसांची परवानगी न घेतां, आपण आलों असल्याचें सांगितलें. त्याला पाहिल्याबरोबर पंतांना त्याच्या उमद्या व निष्कपट स्वभावाची साक्ष पटून त्यांचा त्याच्यासंबंधीं अनुकूल ग्रह झाला होता. पुढें त्यानें मोकळ्या मनानें जी आपली हृदयस्पर्शी हकीगत सांगितली ती ऐकून तर त्यांना त्याच्या इंग्रजी शिकण्याच्या इच्छेबद्दल व निश्चयाबद्दल फार कौतुक वाटून त्याच्याबद्दल अधिकच सहानुभूति वाटूं लागली व त्यांनीं त्याला " तुझ्या योगक्षेमाची काळजी मी घेतों; तूं कांहीं चिंता करूं नकोस " अशा तऱ्हेचें आश्वासन दिलें.

त्या रात्रीं पंतांच्या बिऱ्हाडीं काका झोपीं गेला व दुसऱ्या दिवशीं पहाटेस उठून आठवले यांच्या घरीं परत गेला. तेव्हां त्याच्या आतेनें, "काल रात्रीं कोठें गेला होतास?," म्हणून त्याला विचारलें व त्यानें तिला खरी हकीगत सांगितली. आठवले यांचे घरांतील माणसांचा पंतांसंबंधीं चांगला ग्रह असल्यामुळें त्याला कोणी रागें भरलें नाहीं.

पंत व काका यांची प्रथम गाठ पडली त्यावेळीं पंतांचें वय सुमारें २४ वर्षांचें असून ते मॅट्रिकचा अभ्यास करीत होते व काकाचें वय १५।१६ वर्षांचें असून तो इंग्रजी शिकण्याकरितां बेळगावांत आलेला होता. बाळा आठवले याला शिकविण्याकरितां रोज ते त्यांच्या घरीं जात असल्यामुळें काकाला त्यांच्या संगतीचा व शिक्षक या नात्याचा अनायासें फायदा झाला. आपल्या बिऱ्हाडांत ते एकटेच राहात असल्यामुळें त्याचा बराचसा वेळ त्यांच्या बिऱ्हाडीं जाऊं लागला व ते एकटेच स्वयंपाक करून जेवण करीत असल्यामुळें त्याचें जेवणखाणहि मधुन मधुन त्यांच्याकडेच होऊं लागलें. तसेंच तो नेहमीं पंतांच्या बरोबर असल्यामुळें त्यांचे गुरुबंधु कृष्णा, गोपाळ वगैरे मंडळींशीं आणि कृष्णाचा भाऊ गणपति व त्याचा स्नेही गंगाराम यांच्याशींहि त्याचा परिचय झाला व कधीं कधीं तो पंतांच्या बरोबर भजनपूजनालाहि जात असे. कृष्णाचे घरीं बाळप्पा मधुन मधुन जात असल्यामुळें व तेथेंच वारंवार भजनपूजन होत असल्यामुळें गणूलाहि आपण अनुग्रह घ्यावा असें वाटूं लागलें व त्याच्या सहवासानें त्याचा स्नेही गंगाराम यालाहि अनुग्रह घेण्याची इच्छा उत्पन्न झाली. पुढें त्यांचा स्नेही काका घाणेकर यालाहि आपल्याला अनुग्रह झाल्यास बरें होईल असें वाटूं लागलें व त्या तिघांनीं पंतांचे गुरुबंधु कृष्णा व गोपाळ यांचेमार्फत ती गोष्ट पंतांचे कानावर घातली. नंतर त्यांना अनुग्रह घेण्याची उत्कंठा लागली असल्याची जेव्हां पंतांची खात्री झाली तेव्हां त्यांनीं त्या तिघांवर अवधूत संप्रदायाप्रमाणें अनुग्रह केला आणि तेव्हांपासून पंतांचें व त्यांचें गुरुशिष्यांचें नातें सुरु झालें.

अशा रीतीनें १८७९ सालीं पंतांनीं सद्‌गुरु बालमुकुंदांच्या आज्ञेप्रमाणें अवधूत संप्रदाय पुढें चालविण्यास सुरवात केली व काका, गणपति व गंगाराम हे त्यांचे पहिले शिष्य होत.

## रावजी दड्डीकर

पंतांच्या आईच्या चुलतभावाचा मुलगा व्यंकटेश ऊर्फ रावजी दड्डीकर हा वयानें त्यांच्यापेक्षां थोडा मोठा होता. जेव्हां ते दड्डी येथें प्राथमिक शिक्षणाकरितां आपल्या मामाकडे राहात होते तेव्हां तोहि त्याच घरांत राहात असल्यामुळें तो त्यांच्याबरोबर खेळांत व इतर बाबतींत भाग घेत असे. त्यामुळें त्या दोघांची विशेष सलगी असून त्यांचें एकमेकांवर फार प्रेम होतें. दोघांचीहि देवावर भक्ति असून सद्धर्मावर श्रद्धा होती. दोघेहि इंग्रजी शिकण्याकरितां एकाच वेळीं बेळगावीं आले आणि रावजीनें नोकरी धरली व पंतांनीं आपला अभ्यासक्रम चालू ठेविला, तरी त्या दोघांमधील प्रेम कायमच होतें व ते एकमेकांच्या सल्ल्यानें वागत असत. परंतु रावजीला जरी परमार्थप्राप्तीची तळमळ लागून राहिली

होती तरी त्यानें पंत व त्याचा धाकटा भाऊ हणमू यांचे गुरु जे बालमुकुंद त्यांचेकडून अनुग्रह घेतला नाहीं. मात्र कोणातरी सत्पुरुषाची कृपा झाल्याखेरीज आपलें समाधान होणार नाहीं अशी त्याची खात्री झाली होती.

## बाबा कुडची ऊर्फ कुडची वीर

त्यावेळीं बेळगाव येथें विरूपाक्ष बाळाजी कुलकर्णी नावाचे एक सत्पुरुष राहात असत. ते बेळगाव जिल्ह्यांतील बेळगाव तालुक्यापैकीं कुडची गावचे राहणारे असून बेळगावचें कुळकर्णिकीचें काम करीत असत. ते फार सत्वशील व शांत असून त्यांचा स्नानसंध्यादि नित्यनैमित्तिक कर्माचरणाकडे विशेष ओढा होता. त्यांना भजनाचा फार नाद असे व ते आपल्या शिष्यमंडळीसह टिपऱ्याहि खेळत असत. सुप्रसिद्ध सत्पुरुष श्रीराघवचैतन्यांपासून आपला संप्रदाय चालत आलेला आहे असें ते म्हणत.

त्या संप्रदायांत कट्यारीची पूजा करितात व भजन करतांना अगर टिपरी खेळतांना सोगा सोडून डोक्यास पटका बांधितात. बाबा कुडचींचे गुरु गोविंदराव इंदापूरकर हे होते. ते बेळगाव येथें ठगी डिपार्टमेंटचें ऑफिस असतांना त्याच्या मुख्य अधिकाऱ्याचे शिरस्तेदार होते. ते बेळगाव येथील लहान मारुतीच्या व रामाच्या देवळांत भजन करीत असत. गोविंदराव व बाबा हे एकाच घरांत राहात असल्यामुळें त्यांचा परिचय झाला व बाबांनीं गोविंदरावांकडून अनुग्रह घेतला. गोविंदराव व बाबा कुडची यांनीं कांहीं कानडी व मराठी पदेंहि केलीं होतीं. बाबांचा कृष्णभक्तीवर विशेष भर होता. ते दररोज व विशेषतः उत्सवप्रसंगीं आपल्या शिष्यमंडळीसह टिपरी खेळून भजन करीत असत. त्यांची शिष्यमंडळी पुष्कळ होती व त्यांत स्त्रियाहि बऱ्याच होत्या.

बाबा कुडचींकडून अनुग्रह घेण्याचा आपला बेत रावजींनीं पंतांचे कानावर घातला व तो त्यांना पसंत पडून बाबांनीं रावजींना अनुग्रह दिला. त्यावेळीं पंत तेथे हजर होते. पंत बाबांना फार मानीत असत व कधीं कधीं त्यांच्या भजनास व टिपरी पाहण्यासहि जात. बाबांच्या वीर निश्चयाच्या भक्तीमुळें असो अगर त्यांच्या संप्रदायाची निशाणी जी कट्यार तिच्यावरून असो, पंत त्यांना " कुडची वीर " म्हणत व त्यांच्या अढळ शांतीची फार वाखाणणी करीत. बाबांच्या अधिकारासंबंधीं पंतांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत:—

" रावजींचा बाबा, माझा बाळप्पा असे गुरुच आतां दृष्टीला पडत नाहींत. बाबानें कर्ममार्ग धरून जनांस अवधूत मार्गास लाविलें. बाळप्पानें कर्ममार्ग खंडून भक्तांस अवधूतमार्गात खेळविलें. ते दोघेहि भिन्न नव्हेत. योग व सांख्य भिन्न नव्हेत. दोहोंचे परिणाम अगर फल एकच. बाबाचें तें पोट, त्याचें तें भजनीं नाचणें, भजन म्हणतांना फुगलेल्या त्याच्या गळ्याच्या शिरा हें सारें आतां आठवतें. ' बाबा, ते बघ दिवसा जप करितात, आसन घालून बसतात, पूजा करितात; मी फिरतीवर जाणारा; तें मला कसें घडावें ?' असें कोणी म्हणतांच ' तुला तें करण्यास सवड नाहीं तर करूं नकोस, कांहीं करूं नकोस. झालें तर कर, नाहीं तर सोड. केलें न केलें तुला सारखेंच. ' असें बाबा सांगत असे. "

( पु. ८–१७६ )

पंत जरी बाबांपेक्षां वयानें फार लहान होते, तरी बाबांना त्यांच्या अधिकारा-संबंधीं यथार्थ कल्पना असल्यामुळें ते पंतांना थोर समजत.

रावजींवर अनुग्रह झाल्यावर कांहीं दिवसांनीं म्हणजे माघ शुद्ध १५ शके १८०१ ( २५-२-१८८० ) रोजीं बाबा समाधिस्थ झाले. त्यापूर्वी पंतांकडून पुढील मार्ग पुरा करून घेण्याबद्दल त्यांनीं रावजींना सांगून ठेविलें होतें. त्यामुळें बाबा समाधिस्थ झाल्यापासून रावजी हे पंतांच्या भजनपूजनादि कार्यक्रमांत मोठ्या आस्थेनें भाग घेऊं लागले, व त्यांचे गुरुबंधु व शिष्य या मंडळींत विशेष सलगीनें व आपलेपणानें मिसळूं लागले. त्यांचा पंतांशीं प्रपंच व परमार्थ या दोहोंतहि अति निकट संबंध येऊं लागला व ते पंतांना बाबांच्या ठिकाणीं म्हणजे गुरुस्थानीं मानूं लागले. पण पंत मात्र त्यांना साधारणपणें बरोबरीच्या नात्यानेंच वागवीत व त्या उभयतांमधील ही सलगी अखेरपर्यंत टिकली. पंतांनीं एका पदांत ( द. प्रे. ल.–आवृत्ति १ ली–१३७७) रावजींचें केलेलें वर्णन पुढीलप्रमाणें आहे:— " व्यंकटेश वीराचा । तोचि प्रिय अवधूताचा ॥ धृ. ॥ वीर दत्त तव हृदयीं नांदे । भिन्न भाव केंचा ॥ १ ॥ संप्रदाय चैतन्य एकची । प्रेमसागर साचा ॥ २ ॥ " या पदांत पंतांनीं असें म्हटलें आहे कीं " वीराचा " म्हणजे कुडची वीराचा अथवा बाबा कुडचींचा (शिष्य) जो व्यंकटेश म्हणजे रावजी तोच अवधूताचा प्रिय झाला व रावजींला उद्देशून असें म्हटलें आहे कीं, " तुझ्या हृदयांत कुडचीं वीर व दत्त ( मी स्वतः ) अभिन्नपणें नांदत आहोंत; म्हणजे तूं आम्हां उभयतांना एकरूप समजत आहेस." तसेंच पंत आणखी असेंहि सांगतात कीं, अवधूत संप्रदाय म्हणजेच चैतन्य व तोच प्रेमसागर होय.

## दड्डी येथील शिष्य

बेळगावास शिकत असतांना बहुतकरून सुटींच्या दिवसांत पंत दड्डीस आपल्या आजोळीं जात असत. बालमुकुंदांचा त्यांच्यावर अनुग्रह झाल्यापासून पंत, हणमू व गणू हे तिघे गुरुबंधु दड्डी येथें एकत्र जमले म्हणजे त्यांच्या नेहमीं बालमुकुंदांसंबंधीं गोष्टी चालत व गावाबाहेर नदी–कांठीं, अगर जंगलांत जाऊन भजन करण्यांत अगर खेळ खेळण्यांत त्यांचा बराच काळ जात असे. लहानपणापासूनच पंत हे दड्डी येथील आपल्या बरोबरीच्या मंडळींचे पुढारी असल्यामुळे त्या मंडळींपैकीं बहुतेक जण पंत व त्यांचे गुरुबंधु यांचे-बरोबर भजन, खेळ वगैरे क्रीडा करण्यांत मिसळत व पंत त्यांना बोध करून गुरुमार्गाचें महत्व समजावून सांगत. त्यामुळें पंतांच्या बरोबरीच्या बऱ्याच मंडळींना परमार्थासंबंधी गोडी वाटूं लागून त्यांनीं पंतांकडून अनुग्रह घेतला. त्यांपैकीं सरजेराव हेळे-वाडीकर, विठू सोनार, गुंडू सोनार, चनवीरय्या स्वामी, रामचंद्र भट वगैरे मंडळी प्रमुख होती. पंतांचा स्वभाव प्रेमळ व मनमिळाऊ असल्यामुळें आणि त्यांची बोधशैली चित्ताकर्षक व परिणामकारक असल्यामुळें दड्डी येथील इतर बऱ्याच मंडळींची त्यांच्यावर भक्ति बसली. पंतांनीं आपल्या बालवयांत बाळगोपाळ मंडळीसह दड्डी येथें पुष्कळ ' बाललीला ' केली होतीच. पुढें सद्गुरु बालावधूतांची त्यांच्यावर कृपा झाल्यापासून

त्यांच्या ठिकाणच्या लोकप्रियतेत भक्तिप्रेमरसाची भर पडली आणि तेव्हांपासून त्यांच्या खेळांना व ललिंना दिव्यत्व प्राप्त होऊन त्यांच्या बरोबरच्या मंडळींना करमणुकीबरोबर बोधहि मिळूं लागला. दड्डीच्या आजूबाजूला निसर्गाची शोभा फारच रमणीय असल्या-मुळे व तेथील भक्त मंडळी एकनिष्ठ, धाडशी व खेळाडू वृत्तीची असल्यामुळें भजन-पूजन, टिपरी वगैरे पंतांच्या लीलांचें ते मुख्य ठिकाण झालें.

## बेळगाव येथील आणखी शिष्य

बालमुकुंदांचा वियोग झाल्यापासून पंतांच्या ठिकाणीं तीव्र भजनलालसा उत्पन्न झाली, त्यांना अहर्निश गुरुनामाचा छंद लागला व तेच आपलें जीवन असें वाटूं लागलें. बेळगाव येथें असतांना सवड मिळाली म्हणजे ते भक्तमंडळीसह भजन करीत व भजनांत बालमुकुंदांची कानडी पदें व भजनसंग्रह वगैरे पुस्तकांतील पदें म्हणत. पंतांच्या व त्यांच्या गुरुबंधूंच्या सहवासानें त्यांच्या बऱ्याच तरुण व होतकरू मित्रांना म्हणजे राघवेंद्र शेषो हुबळीकर ऊर्फ राघू अवधूत, व्यंकोबा गोंवी, भाऊ जुनेबेळगावकर वगैरे मंडळींना भज-नाची गोडी उत्पन्न झाली व गुरुभक्तीचे महत्त्व पटून त्यांनीं पंतांकडून अनुग्रह घेतला. अशा रीतीनें पंतांच्या शिष्यांची व भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली व त्यांचा भक्तिपंथ अथवा भजनक्रम जोरावत चालला. त्याबरोबरच त्यांच्या ठिकाणची प्रबोधनशक्ति अधिकाधिक जोरावत जाऊन त्यांचा बोध संभाषण, पत्रव्यवहार, लेखन, भजनस्फूर्ति वगैरे मार्गांनीं अधिकाधिक व्यक्त होऊं लागला व सच्छिष्याचें रूपांतर सद्गुरूंत होऊं लागलें म्हणजे दत्ताचा बालमुकुंदच बनत चालला.

जसजसा पंतांचा शिष्यवर्ग वाढत चालला तसतशी "यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवे-तरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते" (भ. गी. ३–२१) या श्रीमद्भगव-द्गीतेंतील सिद्धांताप्रमाणें आपल्या अनुयायांना प्रपंच–परमार्थीं योग्य वळण लावण्याची जबाबदारी त्यांचेवर येऊन पडली, व त्यांनीं ज्ञानमूलक, भक्तिप्रधान, निष्काम कर्मयो-गाच्या आचरणानें वेदविहित सनातन धर्म पाळून त्यांना कित्ता घालून देण्यास सुरवात केली. यासंबंधीं पंत म्हणतात, "आपण स्वतः निष्काम असतांहि साधकहितार्थ यम, नियम, स्वधर्मकर्म, भजनपूजन, श्रवण इत्यादि आचरण करून (बालमुकुंदांचा शिष्य म्हणजे पंत) कित्ता घालूं लागला. श्रेष्ठांनीं जो आचार ठेवावा त्याचाच कित्ता लोक उचलतात; म्हणून दीन शिष्य, अनहंकृतीनें, फलाशा न धरितां, साधकजनांसमोर वेदोक्त विधीनें कर्में आचरूं लागला. कुंभाराचें काम संपल्यावर पूर्वभ्रमानें चक्र फिरत असतें त्याप्रमाणें जीव-न्मुक्ताचे देहधर्म परमस्वभावानें चालत असतात." (पु. ३–१९३)

या उद्गारांवरून कोणत्या भूमिकेवरून पंतांनीं शिष्यांना अनुग्रह देऊन अवधूतमार्ग पुढे चालविण्यास सुरवात केली, या संबंधाची यथार्थ कल्पना होते. तसेंच आपले गुरुबंधु व शिष्य यांचा वर्तनक्रम सुधारण्याकडे पंतांचें यावेळीं किती लक्ष असे हें त्यांनीं आपला गुरुबंधु हणमू दड्डीकर याला ता. १०-५-१८८९ रोजीं लिहिलेल्या पत्रांतील मजकुरावरून

स्पष्ट दिसतें. त्या पत्रांत पंत लिहितात, " श्री सहजानंदी सद्गुरूच्या सेवेंत व भजनानंदांत अहोरात्र काल कंठीत आहें. श्री समर्थांच्या आज्ञेंत फरक घडला कीं विलक्षण प्रकार घडेल. गुरुसत्ता अधिक आहे. " न गुरोरधिकम् " असें श्रुति सांगते. " नुडी यंते नडी आदरे, इदे जन्म जन्मकडी " ( बोलेल तैसा चालेल त्याचा हाच जन्म शेवटचा ) अशी साधूक्ति आहे. परंपरागत चालत आलेले नियम बिनचूक चालवावेत, कल्याण आहे. श्री गुरुकृपेचें व भक्तिचें बळ हृदयांत अमूप असल्यावर सर्व सुगम आहे. सर्वत्र गुरुरूपच आहे. जेथून फिरणेंच नाहीं अशा श्रीबाळचरणीं अखंडित तनु मन धन अर्पण करून सुखी असावें. " ( पु. ४–१६४ )

जरी वर लिहिल्याप्रमाणे पंतांच्या शिष्यांची संख्या वाढत चालली तरी त्यांच्यापासून कोणताहि स्वार्थ पंतांना साधावयाचा नव्हता. ही बहुतेक शिष्यमंडळी तरुण, होतकरू व गरीब स्थितींतील असून त्यांचेकडून पंतांना आर्थिक फायदा होण्याऐवजीं उलट तेच त्यांच्याकरितां झीज सोशीत असत.

---

# प्रकरण १२ वें

—————:०:—————

## सर्वारम्भास्तंडुलप्रस्थमूलाः ।

### मॅट्रिक पास; शिक्षकाची नोकरी; बंधु गोपाळाला शिक्षणाकरितां आणिलें.

जरी १८७९ सालीं पंतांचें शिष्यप्रबोधनकार्य सुरू झालें तरी सद्गुरूच्या सांगीप्रमाणें विद्याभ्यास पुरा करून प्रचंच करण्याचें ध्येय यत्किंचित्हि दृष्टिआड न होऊं देतां त्यांनीं मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याचा निश्चय करून अभ्यास सुरू केला. पण त्यावेळीं त्यांच्या भोंवतालची परिस्थिति विद्याभ्यास पुढें चालू ठेवण्याला फार प्रतिकूल होती. १८७८ व १८७९ सालांतहि पिकें चांगलीं न आल्यामुळें १८७६ च्या दुष्काळाचे दुष्परिणाम तीव्रतेनें जाणवत असून महागाई फार वाढली होती व हजारों लोक मृत्युमुखीं पडत होते. त्यामुळें वाळेकुंद्री येथें पंतांच्या घरच्या मंडळींचे फार हाल होत होते. त्यांतच ता. २-४-१८८० रोजीं पंतांचे चुलते चिंतोपंत झाडावरून पडून अकस्मात मरण पावले. पंतांच्या घराण्यांत बालमुकुंदांचा अनुग्रह घेतलेले त्यांच्याखेरीज चिंतोपंत हे एकटेच होते. त्यांच्या अकल्पित निधनानें पंतांना फार दुःख झालें.

बिकट परिस्थिति व अभ्यासाची दगदग यांच्यामुळें त्यावेळीं पंतांची शरीर प्रकृतिहि फार खालावली होती. ता. ९-९-१८८० रोजीं त्यांनीं हणमू व सर्जेराव दड्डीकर यांना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत त्यांच्या त्या वेळच्या मानसिक व शारीरिक स्थितीचें प्रतिबिंब पडलेलें असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग येथें देत आहोंत. तो असा:—

" इकडील हकीगत आनंद, वैराग्य, पश्चात्ताप, दुःख आणि आश्चर्य उत्पन्न करणारी आहे. ती वाचून समजून घ्यावी. ××× इकडील सुखरूपता म्हणाल तर अभ्यासाच्या पिच्छेस लागून रात्रंदिवस झटत असल्यामुळें शरीररक्षणाची किंवा जीवाची आशा एकीकडे राहिली. यामुळें अतिशय श्रम सोसावे लागतात. म्हणून तुरळक ज्वर (जरी उघड नव्हे) नित्यशः येत असतो. त्यामुळें प्रकृति क्षणोक्षणीं अशक्त होत चालली आहे, निस्तेजता प्राप्त झाली आहे. परिणाम समजून येईलच. मला तरी दिसेंबरअखेर शिवाय येणें होत नाहीं. तुम्ही आल्यास भेट होईल. ××× काम सुरक्षितपणें चाललें आहे. दीर्घ खटपटीच्या प्रवाहांत उडी घातली आहे. मोतीं मिळेल तेव्हां खरें. " अशा स्थितींतहि नेटानें अभ्यास चालू ठेवून १८८० च्या नोव्हेंबर महिन्यांत पंत पुन्हां मॅट्रिकच्या परीक्षेला बसले व पास झाले. याप्रमाणें १८७२ सालीं बेळगावास येऊन इंग्रजी शिकण्याला प्रारंभ केल्यापासून निरनिराळ्या आपत्तींना तोंड देत त्यांनीं बेळगावमधील शिक्षणक्रमाची अखेर गाठली, आणि पब्लिक सर्विस व मॅट्रिक या दोन परीक्षा त्यांच्या पदरांत पडल्या. त्यावेळीं शिक्षणाचा प्रसार फारच थोडा झालेला असल्यामुळें त्यांनी हा मोठाच पल्ला गाठला असें म्हणावयास हरकत नाहीं.

इंग्रजी शिकण्याची कोठें सोय नसल्यामुळे पंतांचा भाऊ गोविंद हा बाळेकुंद्रीस होता. गोपाळ हुषार असून त्याचें दड्डी येथें मराठी ४ थ्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण पुरें झालें होतें. पण इंग्रजी शिक्षणाकरितां कोठें जाण्याची सोय नसल्यामुळे त्यानें दड्डीच्या शाळेंत दरमहा रु. ४ पगारावर शिक्षकाचें काम पतकरिलें होतें. वामन व नरसू हे दड्डी येथें मराठी शिकत होते. दोघेंहि हुषार असून त्यांचें अभ्यासाकडे फार लक्ष असे शंकरच्या शिक्षणालाहि सुरवात झाली होती. अशा परिस्थितींत पंतांनीं तावडतोब नोकरी धरण्याचें ठरविलें व ज्या शाळेंतून ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले त्या शाळेंत शिक्षकाची जागा मिळावी म्हणून त्यांनीं अर्ज केला, पण तो नाकारण्यांत आला; त्यामुळे त्यांना फार वाईट वाटलें. पण पैसा मिळविण्याची फारच निकड असल्यामुळें त्यांनीं तावडतोब मराठी मिशन स्कूलमध्यें दरमहा रु. १२ पगाराची शिक्षकाची नोकरी धरिली.

१८८१ च्या जानेवारी महिन्यांत पंतांनीं आपला सख्खा भाऊ गोपाळ व मास-भाऊ नाना यांना इंग्रजी शिकण्याकरितां बेळगावास आपल्या बिऱ्हाडीं आणिलें व त्यांना घरींच इंग्रजी शिकविण्यास सुरवात केली. मराठी मिशन स्कूलमध्यें पंतांनीं कांहीं दिवस नोकरी केल्यावर लंडन मिशन स्कूलचे त्यावेळचे मुख्य चालक रे. स्मिथसाहेब यांना आपल्या शाळेचा मॅट्रिक पास झालेला विद्यार्थी मराठी शाळेंत दरमहा रु. १२ पगारावर नोकरी करीत राहणें बरें न वाटून त्यांनीं लंडन मिशनस्कूलमध्यें दरमहा रु. २० पगारावर पंतांची शिक्षक म्हणून नेमणूक केली व आपण स्वतः त्यांच्याकडे जाऊन त्यांची समजूत घातली. पंतांनीं ती नोकरी पतकरिली व तेव्हांपासून ते त्या शाळेंत शिक्षकाचें काम करूं लागले. उदरनिर्वाहाचें साधन म्हणून त्यांनीं हें काम पतकरिलें ही गोष्ट खरी असली तरी त्यांना शिक्षकाचें काम करण्याची जात्याच फार आवड होती. त्यांना लहान मुलांबद्दल फार प्रेम वाटत असे व मुलांच्या भावनाप्रधान व कोंवळ्या मनाला योग्य वळण लावून त्यांचें शील सुधारण्याकडे त्यांचें फार लक्ष असे. त्यामुळें शिक्षकाचें काम त्यांच्या स्वभावाला व मनोरचनेला अनुकूल असेंच होतें.

त्यावेळीं पंतांच्या बिऱ्हाडाच्या खोलींत कंबरेइतक्या उंचीची मातीची भिंत घालून दोन भाग केले होते. मागील भागांत स्वयंपाक व पुढील भागांत निजणें बसणें वगैरे होत असे. गोपाळ व नाना आल्यापासून पंत व ते दोघे मिळून हातांनीं स्वयंपाक करून जेवीत असत. त्यावेळीं पंतांच्या बिऱ्हाडांत भांडींकुंडीं वगैरे सामान अगदींच बेताचें व जेमतेम एकदोन माणसांना पुरेल इतकेंच होतें. तांदूळ, डाळ वगैरे ठेवण्याकरितां एक सागवानी पेटी असून तिच्यांत दोन कप्पे होते. त्या पेटीचा उपयोग डाळ तांदूळ वगैरे ठेवण्याकरितांच होता. सुरक्षितपणाच्या दृष्टीनें ती निरुपयोगीच होती. कारण ती मागच्या बाजूनें मोडलेली असून मागूनहि तिचें झाकण उघडतां येत असे; तेव्हां पेटीला कुलूप नव्हतें हें सांगणें नकोच. ज्या दिवशीं गोपाळ व नाना बेळगावास आले त्याच दिवशीं प्रपंचाच्या बाबतींत आपली थोडीशी सुटवणूक झालीसें वाटून पंत गोपाळाला हांसत हांसत म्हणाले "गोपाळ, हा तुझा प्रपंच तुझेकडे घे." तेव्हां तो पेटीजवळ गेला व ती मागच्या बाजूनें मोडली

असल्याचें पाहून म्हणाला " दत्तु या पेटीला कुलूप नाहीं का रे ? " तें ऐकून " अरे, माझ्या संसाराला व परमार्थाला कुलूपच नाहीं !" असें पंत विनोदानें म्हणाले. या वेळेपासूनच जणूं पंतांनीं प्रपंचाचा प्रत्यक्ष कारभार आपल्या बंधूकडे सोपविण्यास सुरवात केली व आपण अलिप्त राहूं लागले.

गोपाळानें पेटी उघडून पाहिली तों एका डालनांत शेर दोन शेर तांदूळ व थोडीशी डाळ असून त्यांतच एक दोन कांदे व पांच सहा पैसे असल्याचें त्याला आढळून आलें. गोपाळ व नाना हे पंतांजवळ राहूं लागल्यापासून खर्चांत वाढ झाली, व जोंपर्यंत त्यांना दरमहा रु. १२ पगार मिळत होता तोंपर्यंत खर्च भागविण्याची फारच मुष्कील पडत असे, म्हणून शाळेंतील काम सांभाळून ते शिकवण्याहि करीत. त्यांतच पंतांकडे त्यांचे गुरुबंधु व शिष्य यांपैकीं कोणी ना कोणी तरी मधुन मधुन येतच असत. त्यामुळे त्यांना खर्चाची अतिशय टंचाई भासे.

एके दिवशीं सकाळची शाळा असल्यामुळे पंत सकाळीं उठून शाळेंत गेले व स्वयंपाक करण्याचें काम गोपाळ व नाना यांचेकडे आलें. पंत शाळेंत गेल्यावर ते पेटी उघडून पाहतात तों डाळ, तांदूळ वगैरे सामान संपलें असल्याचें त्यांच्या नजरेस आलें व बाजारांतून सामान आणण्यास घरांत पैसेहि नव्हते. तेव्हां त्यांना मोठी फिकीर येऊन पडली. ते धांवत मराठी मिशनस्कूलमध्यें गेले व त्यांनीं पंतांना सर्व हकीगत सांगितली. तेव्हां " जरा बसारे, माझा बाळप्पा कांहीं तरी सोय करील " असें म्हणून पंत त्यांना धीर देऊं लागले. तों शाळा सुटण्याची वेळ होऊन घंटा वाजली व मुलेंहि जाऊं लागली. त्यामुळे गोपाळा व नाना यांची पूर्ण निराशा झाली. इतक्यांत एक मुलगा पंतांजवळ येऊन " मास्तर, माझें नांव घाला " असें म्हणाला व त्यानें पुढें चार आणे ठेविले. तेव्हां पंतांनीं त्या मुलाचें नांव रीतीप्रमाणें दाखल केलें व " हे घ्यारे, माझ्या बाळप्पानें दिले बघा " असें सद्गदित अंतःकरणानें म्हणून त्यांनीं ते चार आणे गोपाळाजवळ दिले व पुढील व्यवस्था करण्यास सांगितलें. नंतर तांदूळ लाकडें वगैरे जरूर ते जिन्नस आणून त्यांनीं तो दिवस पार पाडला. अशा परिस्थितींत पंतांनीं मोठ्या धैर्यानें दिवस काढले. इतकेंच नव्हे तर त्यांचेकडे कोणी अनाथ आल्यास तो विन्मुख जात नसे. १८८१ सालांत गोपाळ व नाना यांचा इंग्रजी तीन इयत्तांचा अभ्यास घरांच पुरा करून घेऊन १८८२ सालीं पंतांनीं त्यांना लंडन मिशन स्कूलमध्यें चौथे इयत्तेंत घातलें. त्यावेळीं पंत त्याच शाळेंत तिसऱ्या इयत्तेवर शिक्षक होते. गोपाळ व नाना या दोघांचाहि अभ्यास चांगला असून गोपाळाला दरवर्षी स्कॉलरशिप मिळूं लागली.

१८८१-८२ मध्यें खडेबाजारांतील जागा सोडून शहापूरच्या रस्त्यावरील कृष्णप्पा गोकाककर यांच्या घरांत पंतांनीं बिऱ्हाड केलें. या बिऱ्हाडांत मागच्या बिऱ्हाडापेक्षां जागा जरा अधिक होती. तेथें गेल्यावर त्यांनीं नरसूला इंग्रजी शिक्षणाकरितां आणिलें व त्याच्यानंतर कांहीं दिवसांनीं रामनाहि आला. ते दोघे घरांच इंग्रजी शिकूं लागले व शंकरहि मराठी शिकूं लागला. या बिऱ्हाडाची जागा मोठी असल्यामुळे पंतांनीं तेथें एक दत्ताचा फोटो पूजेला ठेविला. त्याच्यापुढें रोज संध्याकाळीं आरती होत असे व कधीं पंत आपल्या मंडळीसह भजनहि करीत.

# प्रकरण १३ वें

## पंतांचें लग्न व गृहस्थाश्रमाला सुरवात

सन १८८० अखेर पंतांची मॅट्रिकची परीक्षा पास होऊन त्यांनीं नोकरी धरिली, तेव्हां त्यांचें वय सुमारें २५–२६ वर्षांचें होतें; पण त्यांचें लग्न झालें नव्हतें. याचें मुख्य कारण म्हणजे त्यांच्या घरची गरिबी होय. १८७६–७७ च्या भयंकर दुष्काळानें व त्यानंतरच्या दोन तीन वर्षांच्या नापिकानें त्यांच्या घराण्याला फारच निकृष्टावस्था आली होती व त्यांच्या गरिबीमुळें त्यांना मुलीहि फारशा सांगून येत नव्हत्या. स्वतः पंतांसंबंधीं असें दिसतें कीं आपलें ज्ञानार्जन पुरें होऊन कांहीं तरी उद्योगधंदा करून द्रव्यार्जन करूं लागेपर्यंत लग्न करावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चय केलेला होता. निदान या बाबतींत १८८१ अखेरपर्यंत ते उदासीन होते.

पंतांच्या घरची मंडळी व ते स्वतः यांची जरी त्यांच्या लग्नाच्या बाबतींत वर लिहिल्याप्रमाणे उदासीन वृत्ति होती, तरी त्यांचे मामा श्रीपादपंत यांचे दत्तूवर निरतिशय प्रेम असून तो आतां मोठा झाला आहे, इंग्रजी शिकत आहे तेव्हां आतां त्याचें लग्न करून टाकावें असें त्यांच्या मनांत पुष्कळदां येई व १८७७–७८ च्या सुमारास ते आपली वडील मुलगी चंद्राक्का इजला दत्तूला देण्याच्या विचारांत होते. पण कांहीं आकस्मिक कारणामुळें तिला राजगोळीं येथील इनामदारांचे घरीं दिली व त्यांचा तो हेतु तडीस गेला नाहीं. श्रीपादपंतांना चंद्राक्काच्या पाठीवर नरसिंह ऊर्फ नाना नावाचा मुलगा होता व तो १८८१ सालीं इंग्रजी शिकण्याकरितां बेळगावास पंतांजवळ येऊन राहिल्याची हकीगत मागें आलीच आहे. नानाच्या पाठीवर त्यांना यमनाक्का नावाची मुलगी होती. तिचा जन्म मिति आषाढ शुद्ध १२ शके १७९२ (१०–७–१८७०) रोजी झाला होता व तिचें वय त्या वेळीं लहान म्हणजे ८ वर्षांचेच होतें. त्यामुळें तिचें दत्तूशीं लग्न लावणें त्यावेळीं त्यांना बरें दिसलें नाहीं व तो प्रश्न तसाच राहिला. पुढें दत्तूची मॅट्रिकची परीक्षा पास होऊन त्यानें नोकरी धरली व गोपाळ व नाना यांना इंग्रजी शिकण्याकरितां बेळगावास आपल्या जवळ आणिलें. व ते तिघे हातांनीं स्वयंपाक करून राहूं लागले. यमनाक्काहि तोंपर्यंत ११–१२ वर्षांची झाली होती, तेव्हां तिचें दत्तूशीं लग्न करून टाकावें असें श्रीपादपंतांनीं ठरविलें. या गोष्टीची वाटाघाट घरांत चालत असल्यामुळें व दत्तूहि मामांच्याच घरांत वाढलेला असल्यामुळें दत्तूशींच लग्न करावें असें यमनाक्कालाहि वाटूं लागलें व त्याप्रमाणें तिनें सुंदराक्का मावशीशीं बोलूनहि दाखविलें. परंतु बाळेकुंद्रीकरांची स्थिति या सुमारास फार खालावलेली असल्यामुळें यमनाक्काला दत्तूला देण्याचा विचार श्रीपादपंतांच्या स्नेही मंडळीस पसंत पडला नाहीं. कारण श्रीपादपंतांची सुस्थिति असून त्यांचा नावलौकिकहि चांगला होता. तेव्हां "दत्तूसारख्या दरिद्री मुलाला आपली मुलगी देण्यापेक्षां श्रीपादपंतांनीं तिला विहीरींत लोटून

दिलेली बरी ", असें म्हणण्यापर्यंतहि कांहीं उथळ मनोवृत्तीच्या माणसांची मजल गेली ! पण श्रीपादपंत फार शांत, दूरदर्शी व खंबीर वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांचें दत्तूवर पुत्रवत् प्रेम असून त्याच्या अंगच्या विविध गुणांची त्यांना पूर्ण जाणीव होती व त्याला आपल्या देखरेखीखालीं शिक्षण देऊन व योग्य वळण लावून त्याच्या भावी उन्नतीचा पाया त्यांनींच घालून दिला होता. तेव्हां वरवर पाहणाऱ्या अविचारी माणसांच्या असल्या प्रलापांना भीक घालणारे ते नव्हते. कांहीं आक्षेपकांना तर "तितकीच वेळ आली तर माझ्या भाकरीं-तील अर्धी भाकर मी तिला देईन पण दत्तूशींच तिचें लग्न लावीन ", असेंहि त्यांनीं निक्षून सांगितलें व यमनाक्काला दत्तूला देण्याचें ठरविलें. या त्यांच्या बेताला त्यांची वडील बहीण सुंदराक्का व त्यांच्या मातोश्री यांचा मात्र पूर्ण पाठिंबा होता. त्यामुळें इतर कोणाच्या म्हणण्याला भीक न घालतां त्यांनीं तो बेत निश्चित केला.

याप्रमाणें दत्तूचें लग्न करण्याचें मामांनीं ठरविलें खरें. पण दत्तूच्या बाजूनें मुख्य अडचण म्हणजे लग्नाच्या खर्चाची व मुलीच्या अंगावर रीतीप्रमाणें कांहीं तरी दागदागिने घालण्याची ! तेव्हां ही अडचण दूर करण्याकरितां मामांनीं दोन्ही बाजूंकडील खर्च आप-णच करून साळंकृत कन्यादान करण्याचें ठरविलें. या वेळीं मामांचा मोठा मुलगा नरसिंह ऊर्फ नाना यालाहि पुष्कळ मुली सांगून येत होत्या. तेव्हां त्याचेंहि लग्न उरकून त्याच्या व यमनाक्काच्या अशा दोन्हीहि लग्नांचे समारंभ एकाच वेळीं उरकून घेतल्यास खर्चाचीहि बरीच बचत होईल या विचारानें मामांनीं दोघांचीहि लग्नें एकाच वेळीं करण्याचा बेत नक्की केला व हुक्केरी येथील सद्‌गृहस्थ कल्लोपंत गोविंद मुत्तालिक यांची कन्या निश्चित करून नानाचें व यमनाक्काचें अशीं दोन्ही लग्नें एकाच वेळीं रायबाग मुक्कामीं कर-ण्याचें ठरविलें.

इकडे दत्तूच्या घरच्या मंडळींना श्रीपादपंत आपली मुलगी दत्तूला देत आहेत हें पाहून आनंद झाला: पण मामांनीं दोन्ही बाजूंचा खर्च करून साळंकृत कन्यादान करून त्याचें लग्न व्हावें या गोष्टीचा त्यांना फार विषाद वाटला. त्यांतल्या त्यांत पंतांचे आजोबा बाळ-कृष्णपंत ( ज्यांना " अप्पा " म्हणत असत ) यांच्या मानी स्वभावामुळें त्यांना तर ती गोष्ट मुळींच पसंत पडली नाहीं. ते फार कर्तबगार असून दुष्काळापूर्वी त्यांची स्थिति भरभराटीची होती व त्यांचा नावलौकिकहि फार मोठा होता. तेव्हां ज्या दत्तूच्या जन्माच्या वेळेस त्यांनीं आपल्या मातोश्री जानकीबाई यांना प्रपौत्रदर्शन झाल्यामुळें कनकाभिषेक केला होता त्याच दत्तूच लग्न दुसऱ्यानें खर्च करून साळंकृत कन्यादान व्हावे ही गोष्ट त्यांच्या मनाला फार लागून राहिली. तसेंच त्यांच्याजवळ लग्नाच्या खर्चाला लागणारे पैसेहि नव्हते, इतकेंच नव्हे तर त्यांना चार पांच वर्षांत स्वतःचें व जामिनकीचें बरेंच कर्जहि झालें होतें. तेव्हां नाइलाजानें त्यांनीं श्रीपादपंतांचे म्हणणें कबूल केलें व रायबाग मुक्कामीं शके १८०४ वैशाख शु० १ रोजीं पंतांचें यमनाक्काशीं लग्न होण्याचें निश्चित झालें. पण पंतांच्या घराण्यांतील मंडळींना ही गोष्ट मनापासून आवडली नसल्यामुळें कोणालाहि या लग्नाच्या बाबतींत उमेद वाटत नव्हती.

याच सुमारास पंतांचे एक भाऊबंद गुरुनाथ गुरपा यांना पंतांचा भाऊ गोविंद याला दत्तक देण्याचें ठरलें. गुरुनाथपंत हे पंतांच्याच घराण्यापैकीं असून कुळकर्णी वतनांत एक हिस्सेदार होते. ते निपुत्रिक असल्यामुळें आपल्या घराण्यांतील एखादा मुलगा दत्तक घेण्याचा त्यांचा मानस होता व त्याप्रमाणें त्यांचें बाळकृष्णपंतांशीं बोलणें होऊन बाळकृष्णपंतांचा सर्वांत धाकटा मुलगा चिनापा याला गुरुनाथपंतांच्या मांडीवर देण्याचा बेतहि नक्की झाला होता. पण चिंनापा हा १८८० सालीं वारल्यामुळें तो बेत फसला. तेव्हां असें ठरलें कीं बाळकृष्णपंतांचा नातू गोविंद याला गुरुनाथपंतांच्या मांडीवर द्यावा. त्याप्रमाणें गुरुनाथपंत हे गोविंदाला मुलाप्रमाणें वागवूं लागले व त्यांनीं एक मुलगी पसंत करुन आपल्या खर्चानें गोविंदाचें तिच्याशीं लग्नहि करुन टाकिलें. नंतर लगेच त्यांनीं गोविंदाला विधियुक्त दत्तक घेतलें व त्याचें नाव बसवंत असें ठेविलें.

गोविंदाचें लग्न व दत्तविधान होण्यापूर्वीच पंतांच्या मातोश्री बाकीच्या मुलांना घेऊन दड्डीस माहेरीं पंतांच्या लग्नाकरितां म्हणून गेल्या होत्या. पंतांचे चुलते देवपा हे मरीकट्टी येथें राहत असत. तेव्हां पंतांच्या लग्नाच्या सुमारास बाळेकुंद्री येथें घराण्यांतील मंडळी-पैकीं बाळकृष्णपंत, त्यांचें कुटुंब सौ. रखमाबाई व त्यांचे दोघे मुलगे रामप्पा व जीवप्पा व गोविंदा इतकीं माणसें होतीं. त्यांपैकीं फक्त पंतांचे वडील रामपा हे तेवढे त्यांच्या लग्नाकरितां रायबागला गेले; बाकी कोणीहि गेलें नाहीं. तेव्हां त्यांच्या आप्तइष्टांपैकीं कोणीहि गेलें नाहीं हें सांगणें नकोच.

याच संधीस आणखी एक भानगड उपस्थित झाली. ती अशी कीं बाळेकुंद्रीच्या त्यावेळच्या इनामदारांवर एका सावकारानें हुकुमनामा मिळवून त्यांचा वाडा जप्त केला होता. त्या जप्तीच्या बजावणीच्या कामीं इनामदारांनीं कांहीं गुन्हा केला असें त्या सावकाराला वाटल्यावरुन त्यानें त्यांच्यावर शहापूर कचेरींत फौजदारी केली, व त्या प्रकरणांत बाळ-कृष्णपंतांनी व बाळेकुंद्री येथील इतर कांहीं इसमांनीं आपल्यातर्फे साक्ष द्यावी असें त्या सावकाराचें त्यांना म्हणणें होतें. त्या गोष्टीला बाळकृष्णपंत कबूल नव्हते; आणि त्यांनीं साक्ष दिली तरच बाळेकुंद्री येथील इतर साक्षीदार साक्ष देण्यास कबूल होते. त्यामुळें बाळकृष्ण पंतांनीं आपल्यातर्फे साक्ष द्यावी अशाबद्दल त्या सावकाराचा फार आग्रह होता. त्यापूर्वी त्याच सावकारानें बाळेकुंद्री येथें राहणाऱ्या दुसऱ्या एका इसमावर ऋणको म्हणून व बाळकृष्ण-पंतांवर जामीन म्हणून रु. २०० चा हुकुमनामा मिळविला होता. हुकुमनामा होतांच तो ऋणको नापत्ता झाला. तरी बाळकृष्णपंतांपासून दाव्याची रक्कम वसूल करण्याचा सावका-राला हक्क होता. तेव्हां त्यानें बाळकृष्णपंतांना असें सांगितलें कीं, " तुम्हीं इनामदारां-विरुद्ध साक्ष दिल्यास तुमचेवर झालेला दोनशें रुपयांचा हुकुमनामा मी तुमचेवर बजाव-णार नाहीं. पण तुम्हीं तसें न केल्यास तुम्हांला फार जड जाईल. " तेव्हां बाळकृष्णपंतांना मोठा पेच येऊन पडला.

यावेळीं पंत लंडन मिशनस्कूलांत शिक्षकाचें काम करीत होते. त्यांचे कानावर बाळकृष्णपंतांनीं वरील हकीगत घातली. तेव्हां त्या सावकाराला भेटून तडजोड करण्याचा

पंतांनीं पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यांत यश आलें नाहीं. तेव्हां पंतांनी बाळकृष्णपंतांना असें स्पष्ट सांगितलें कीं. " परिणाम कांहींहि झाला तरी हरकत नाहीं; पण साक्ष द्यावयाची तर खरें असेल तेंच सांगावयाचें. " त्याप्रमाणे बाळकृष्णपंतांनीं ठरविलें व सावकाराला कळविलें. पण तेवढ्यानें त्याचें समाधान झाल्यासारखें नव्हते. त्यामुळें त्यानें तो नाद सोडून दिला. बाळकृष्णपंतांनीं सावकाराच्या वतीनें साक्ष न दिल्यामुळें बाळेकुंद्रीतील इतर कोणींहि साक्ष देण्यास तयार झाला नाही. त्यामुळे चिडून जाऊन त्यानें बाळकृष्णपंतांची मानखंडणा करण्याकरितां त्यांच्या घरांतील मंडळी पंतांच्या लग्नाकरितां रायबागला गेल्याची संधि पाहून त्यांच्यावर मिळविलेल्या हुकुमनाम्याच्या बजावणीच्या कामीं शहापूर कचेरींतून तुरुंग-वारंट मिळवून तें बाळकृष्णपंतांवर बाळेकुंद्री येथें बजावण्याची व्यवस्था केली व त्यांना पकडून शहापुरास नेण्यांत आलें. त्यावेळीं त्यांच्या घरांत त्यांचा मुलगा जिवपा हा एकटाच होता. पण कोर्ट दरबारची त्याला कांहींच माहिती नसल्यामुळें त्यांची तावडतोब सुटका करण्याचा कांही इलाज करितां आला नाहीं व त्यांना अशा प्रकारें झालेली मानखंडणा निमूटपणें सोसणें भाग पडलें. पण सुदैवानें त्यांचे एक स्नेही रावजी सदरे नावाचे शिंपी जातीचे गृहस्थ शहापूर येथें वकिली करीत होते. त्यांना ही गोष्ट समजतांच आपण स्वतःच जामीन राहून त्यांनीं बाळकृष्णपंतांची सुटका करून घेतली.

अशा रीतीनें पंतांच्या लग्नाचे वेळीं वधूपक्षाकडील बऱ्याच मंडळींची नाराजी होती; त्याचप्रमाणें पंतांच्या घराण्यापैकीं त्यांच्या मातोश्री व पंत यांचीच काय ती या लग्नाला मनापासून संमति होती. बाकी सर्व मंडळी नाराज असल्यामुळें या लग्नाच्या बाबतीत त्यांना कोणालाहि उत्साह वाटत नव्हता. वास्तविक बाळकृष्णपंतांच्या पहिल्याच नातवाचे लग्न म्हणजे कित्येक दिवस लग्नाची तयारी चालून तें मोठ्या थाटानें व्हावयाचें व लग्नसमारंभाला बाळेकुंद्रीतील व इतर आप्तइष्ट व स्नेहीसोबती मंडळींपैकी पुष्कळ मंडळी हजर राहावयाची; पण या लग्नाचा थाट अगदींच निराळा म्हणजे पंतांच्या त्या वेळच्या अवधूत वृत्तीला अनुरूप असाच होता असें म्हणावें लागतें. स्वतः त्यांच्याविषयीं म्हणावयाचें तर ते स्थितप्रज्ञाच्या भूमिकेवर असून त्यांचा सद्गुरुवचनावर दृढ विश्वास असल्यामुळें व कर्तव्यनिष्ठेमुळें त्यांना लग्न करून घेणें म्हणजे तें एक ओघप्राप्त कर्तव्यच होतें व त्यांनीं पुढें एके ठिकाणीं " गमतीखातर वरिली नवरी । ऊर्ध्वरेता ब्रह्मचारी " ( द. प्रे. ल. ७९३ ) असे उद्गार काढले आहेत.

ठरल्याप्रमाणें रायबाग मुक्कामीं शके १८०४ वैशाख शु० १ ( १८-४-१८८२ ) रोजीं पंतांचें यमनाक्काशीं लग्न झाले व त्याच दिवशीं श्रीपादपंत मामांचा मुलगा नाना याचे लग्न हुक्केरी येथील कल्लोपंत मुतालिक यांच्या मुलीशीं झालें. हे समारंभ रीतीप्रमाणें पार पडले व श्रीपादपंत मामांनीं आपली मुलगी यमनाक्का दत्तूला देण्याचा आपला हेतु तडीस नेला.

पंतांची सहधर्मचारिणी म्हणून यमनाक्कांचा बाळेकुंद्रीकरांच्या घरांत प्रवेश झाल्यापासून त्या घराण्याच्या उत्कर्षाला सुरवात झाली व तेथें सुख, शांति समाधान व एकोपा

यांचें वास्तव्य सुरू झालें. यमनाक्कांच्या रूपानें अन्नपूर्णा गृहलक्ष्मीचाच त्यांच्या घरांत प्रवेश झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं !

लग्नसमारंभ उरकून पंत व इतर मंडळी बेळगावास परत येतात तों बाळकृष्णपंतांना सावकाराच्या अर्जावरून तुरुंग वारंट काढून बाळेकुंद्रीहून शहापुरास पकडून नेल्याचें व त्यांचे स्नेही सदरे वकिल यांनीं जामीन राहून त्यांची सुटका करविल्याचें वर्तमान समजलें व त्यायोगें त्यांना फार वाईट वाटलें. परंतु त्यांना आपल्या घराण्याचा झालेला हा अपमान निमूटपणें सहन करून स्वस्थ बसणें भाग पडलें. पुढें पंतांनीं त्या सावकाराच्या सर्व रकमेची फेडहि केली. तरीपण पंत व त्याचे बंधु यांच्या मनाला ती गोष्ट फार लागून राहिली.

पंतांच्या लग्नाची हकीगत वर दिलीच आहे. पण त्यांनीं पुढें एके प्रसंगीं स्वतःच्या-लग्नाचें व लग्नसोहाळ्याचें तात्विक दृष्ट्या जें सुंदर वर्णन केलें आहे तें येथें दिलें असतां अस्थानीं होणार नाहीं असें वाटल्यामुळें तें त्यांच्याच शब्दांत येथें देत आहोंत: तें असें:—

“ लागलें लग्न मजसीं मजला । न देखतां हा सोहाळा ॥ धृ. ॥ नवरा मींचि नवरी मींचि । लग्नमुहूर्त सदा भला ॥ १ ॥ अंतरपाट बोधें उडतां । जयजयकारघोष जाहला ॥ २ ॥ मंगलाष्टक वेदचि बोले । आनंद जगीं भरला ॥ ३ ॥ स्वानंदामृत भोजन विश्वा । अभिमान समूळ मावळला ॥ ४ ॥ सहज समाधि आवड भोगित । दत्त ठायीं आला ॥ ५ ॥ ” ( द. प्रे. ल. १३६७ ).

## प्रकरण १४ वें

———:०:———

### विविध प्रकारचे आध्यात्मिक अनुभव

१८७८-८० या सुमारें दोन वर्षांच्या अवधीत आपणाला आध्यात्मिक दृष्टया काय काय अनुभव आले यासंबंधी पंतांनी आपल्या सनावळींत पुढील गोष्टी नमूद करून ठेविल्या आहेत. त्या अशा— ( १ ) पंथ-विस्तार, ( २ ) सांख्यशिरकाव, ( ३ ) कल्पना-खंडण, ( ४ ) अहंब्रम्हास्मिखंडण, ( ५ ) तारकारूढ ( ६ ) भक्ति अनुभव-प्रभाव. त्यांपैकी "पंथविस्तार" म्हणजे अवधूतपंथाचा प्रसार होण्यास कशी सुरवात झाली या संबंधाची हकीगत प्रकरण ११ मध्यें आलेलीच आहे. वर नमूद केलेले बाकीचे अनुभव म्हणजे पंतांनी त्या दोन वर्षांत आक्रमिलेल्या आत्मानुभवाच्या मार्गांतील मुख्य मुख्य टप्पेच होत. जगांत प्रसिद्धीस आलेले बहुतेक सत्पुरुष हे अगदी पूर्णावस्थेला पोचल्यावरच जगाच्या निदर्शनास येतात. त्यामुळें स्वानुभवाच्या शिखरावर आरूढ होण्यापूर्वी तें अत्युच्च स्थान गाठीपर्यंत त्यांना ज्या खाचखळग्यांतून अगर दऱ्याखोऱ्यांतून मार्ग काढावा लागलेला असतो त्याची इतरांना फारशी माहिती नसते व त्या स्थितींतील आपले अनुभव फारसे कोणी टिपूनहि ठेवीत नाहीं. या दृष्टीनें पाहतां पंतांनी १८७५ पासून १८८५ पर्यंतच्या दहा वर्षांतील आपल्या आध्यात्मिक अनुभवांचें जें सनवार टिपण करून ठेविलें आहे तें साधकांच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें वाटतें. अशा प्रकारचे जे अनुभव पंतांनीं अगदी संक्षिप्त रीतीनें टिपून ठेविले आहेत त्यांपैकी कांहींचें त्यांच्याच ग्रंथांत व्यक्त झालेल्या स्वानुभवोद्गारांच्या अनुरोधानें येथें स्पष्टीकरण केल्यास, कांहीं वाचकांना तरी, फायदा झाल्याशिवाय राहणार नाहीं असें वाटल्यावरून, पुढील विवेचन करीत आहोंत. तसेंच येथें हेंहि लक्षांत ठेवणें जरूर आहे की प्रकरण १० मध्यें सांगितल्याप्रमाणें अनुभवाचे वर लिहिलेले टप्पे ओलांडून जात असतां पंतांची भूमिका उभयविध म्हणजे सिद्धाची व साधकाची अशी होती.

### सांख्यशिरकाव

पंतांच्या बिकट परिस्थितीमुळें भक्तिप्रेमभरानें केवळ भजनानंदांत दंग होऊन राहिल्यानें जीवनकलहांत त्यांचा निभाव लागणें शक्य नव्हतें. तर, त्यांच्या ठिकाणच्या अत्युत्कट गुरुभक्तीला विचाराच्या डोळसपणाची अगर विवेकनेत्राची फार आवश्यकता होती. ज्ञान्याला व विशेषत: प्रपंचांत राहून पारमार्थिक वैभवाचा उपभोग घेऊं इच्छिणाऱ्या व दुसऱ्यांना परमार्थाचा लाभ करून देणाऱ्या ज्ञान्याला तारतम्यबुद्धि, विवेक व युक्ति यांची किती आवश्यकता आहे यासंबंधीं पंतांनी पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—"प्रसंग येईल तसें वागणें म्हणजे बहुरूपी होणें अगर सोंग करणें नव्हे; तर तारतम्यबुद्धीने,

विवेकानें, युक्तीनें, यथाप्रसंग, यथोचित वागणें हेंच खरें शहाणपण. प्रसंग आले तर पार पडून, सुधारून, कमलदलवत् अलिप्त राहावें हें शहाणपण. खरें शहाणपण ज्ञान्यालाच असणार. ज्ञानी म्हणजे मूर्खपणा, सगळा गोंधळ, उलटसुलट करणारा नव्हे. ज्ञानी म्हणजे शहाण्याहून शहाणा. परमार्थी जें ज्ञान ते व्यवहारी शहाणपण. एक निवृत्तिपर; दुसरें प्रवृत्तिपर. पण दोन्हींतहि बुद्धि, विवेक, विचार, युक्ति यांची योजना करावी लागते: म्हणून ज्ञानी हा शहाणाहि असला पाहिजे." (पृ. ८–१०)

१८७७–७८ सालीं अगदीं अनपेक्षित रीतीनें पंतांना सद्गुरूंचा वियोग झाल्यामुळे त्यांच्या भावनेत व विचारांत विलक्षण क्रांति होण्यास सुरवात होऊन भक्तिज्ञानयुक्त विचार-प्रधान जीवनाला सुरवात झाली. त्यांच्या आयुष्यांतील हा अत्यंत महत्त्वाचा दुसरा क्रांति-कारक प्रसंग होय. कारण तेव्हांपासून त्यांच्या आध्यात्मिक जीवनाला नवीन वळण लागलें. तें असें कीं, प्रपंच परमार्थातील त्यांचा सल्लागार व मार्गदर्शक जे बाळप्पा त्यांचा वियोग झाल्यामुळे पंतांच्या विचारशक्तीला मोठीच चालना मिळून त्यांना सारासारविचार करून धिमेपणानें आपल्या विकट परिस्थितीतून स्वतःच मार्ग काढावा लागला तसेंच त्यांची विचार-शक्ति जागृत झाल्याबरोबर आपण कोण ? देव कोण ? जग म्हणजे काय ? हें कोणीं व कशी निर्माण केलें ? जगांत विषमता कां ? एक सुखी तर दुसरा दुःखी असें कां ? पिंडब्रह्मांडांचा संबंध काय ? सांख्यांची प्रकृति व पुरुष यांचा संबंध काय ? मन म्हणजे काय व त्याचा व आपला संबंध काय ? इंद्रियें स्वतंत्र कीं परतंत्र ? आपण स्वतंत्र कीं परतंत्र ? बंध मोक्ष म्हणजे काय ? शांति कशी प्राप्त व्हावी ? वगैरे प्रत्येक विचारी मनुष्यापुढें येणाऱ्या प्रश्नांचा स्वतंत्र रीतीनें विचार करून सांख्यशास्त्र वेदांतशास्त्र वगैरे शास्त्रांतील प्रमाणभूत ग्रंथांच्या आधारें तर्कशुद्ध पद्धतीनें अशा प्रश्नांचा समाधानकारक निकाल लावून घेणें त्यांना भाग झाले. त्यामुळेंच त्यांनीं आपल्या मनावळींत १८७८–७९ सालीं " सांख्यशिरकाव " झाल्याचे नमूद करून ठेविलें आहे व त्यांनीं एके ठिकाणीं प्रत्येक मुमुक्षूला व जिज्ञासूला जो पुढील इषारा दिला आहे त्यावरूनहि त्यांनीं या गूढ प्रश्नांचा विवेकाच्या व शास्त्राच्या साह्यानें निकाल लावून घेतला होता हें उघड दिसतें. पंत म्हणतात, "आपण कोण, कोठून आलों, कोठें जाणार हा सर्वांत अति महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण आपल्याशीं त्याचा अतिनिकट संबंध आहे. हा प्रश्न एकदां ना एकदां आपल्यापुढें येणारच. तेव्हां विचार-शक्ति कमी झाले वेळीं, म्हातारपणीं समोर येण्यापेक्षां, बुद्धि तरतरीत आहे, शक्ति कायम आहे, व बाहेरील केरकचऱ्यानें आपलें मन घाणेरडें झालें नाहीं, तोंपर्यंतच हा प्रश्न मना-पुढें उभा करून त्याचा उलगडा करून तत्त्व समजून टिकीट घेऊन राहावें हें बरें."(पृ. ७-८)

विशेषतः शिष्यप्रबोधनाचें महत्कार्य सद्गुरूनें पंतांकडे सोपविल्यामुळें त्यांना 'शाब्दे परेच निष्णात' होऊन जिज्ञासु व मुमुक्षु यांच्या शंकाकुशंकांचें निरसन करून त्यांचें समाधान करण्याची पात्रता आपल्या अंगीं आणणें व त्याकरितां ग्रंथवाचन व वेदांतचर्चा यांच्या साह्यानें शास्त्रज्ञानाचें शस्त्र परजून तयार ठेवणें भाग होतें. १८८० सालीं दड्डी येथील एक सद्गृहस्थ रघपा अण्णा रघशेट्टी यांना लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात, "येथें कांहीं

मुमुक्षुजन आहेत. त्यांचें शांतवन करणें अवश्य आहे. तर अगत्य कोणी येणाराबरोबर: आपले जवळचा "निरालंब उपनिषद्" नावाचा ग्रंथ पाठविणें. आठवड्यांत परत करितों." (पु. ५-१०९)

या उपनिषदाचा विशेष हा आहे कीं त्यामध्यें अज्ञ जीवांच्या सर्व दुःखांचा परिहार होण्याकरितां ज्या ज्या गोष्टीचें ज्ञान होणें अवश्य आहे त्यांच्या संबंधीं "किं ब्रह्म", "क ईश्वरः", "को जीवः", "का प्रकृतिः", "कःपरमात्मा" अशा प्रकारच्या अध्यात्मशास्त्रात जिज्ञासूपुढें येणाऱ्या मुख्य मुख्य प्रश्नांचीं समर्पक उत्तरें दिलेलीं आहेत.

आत्मानात्मविचार अगर नित्यानित्यवस्तुविवेक हा ज्याचा त्यानेच केला पाहिजे. व "उद्धरेदात्मनात्मानम्" या श्रीमद्भगवद्गीतेतील सिद्धांताप्रमाणे दीर्घ प्रयत्न करून वैराग्ययुक्त अभ्यासानें व विवेकाच्या साह्यानें ज्याने त्याने आपली प्रज्ञा प्रबुद्ध केली पाहिजे. विवेकजन्य स्वप्रतिभोत्थ ज्ञान म्हणजे आपल्याच ठिकाणीं प्रगट होणारें ज्ञान हेंच खरें तारक ज्ञान होय. यासंबंधीं पंतांनीं असें म्हटलें आहे कीं, "जोंपर्यंत तत्व अंगभूत झाले नाहीं तोंपर्यंत अनुभव किंवा खरें ज्ञान नव्हे: शब्दज्ञान मात्र झालें. समजून घ्यावयाचें थोडेंच. पण आपल्या शंका काय आहेत, कोठें अडचण येते, काय अडते तें पाहून घ्यावयाचें आपलेंच काम. अंतःकरण ज्याचें त्यालाच ठाऊक. बाहेरील सोंग मात्र दुसऱ्याला, पाहणाऱ्याला दिसतें. आपलें अंतःकरण अनुभवीं करून घेणें हें ज्याचे त्याचेच काम आहे. अनुभव एकदां मिळाल्यावर 'करावें', 'धरावें', 'सोडावें' हीं आपोआपच निघून जातात. इच्छा, वासना यांचा लय होऊन जातो. त्याशिवाय आत्मा भेटणें नाहीं: आत्मा ओळखणें अगर समरस होणें नाहीं. देहवासना, शास्त्रवासना व लोकवासना या सर्व मावळून जाव्यात, आत्मानुभूति वाढत जावी. ही गोष्ट आत्मानात्मविचारानें व अभ्यासानें साधावी. (पु. ८-४१)

## कल्पनाखंडण

आत्मनात्मविचाराने व आध्यात्मिक ग्रंथांच्या परिशीलनानें सृष्टि म्हणजे जीवाची मिथ्या कल्पनाच होय म्हणजे हा सर्व दृश्यविस्तार कल्पित अतएव मिथ्या होय अशी पंतांची पूर्ण खात्री झाली व "असे सृष्टि सारी। मिथ्या कल्पना जीवाची" (द. प्रे. ल. ६७०) व "कल्पित कैवल्य कल्पित शांति। दृश्य हें कल्पिताचें" (द. प्रे. ल. १००५) हा सिद्धांत स्वानुभवानें खरा ठरला. हाच अनुभव त्यांनीं आपल्या सनावळींत "कल्पनाखंडण" या शब्दानें दिग्दर्शित केला आहे.

## अहंब्रह्मास्मिखंडण

सृष्टि ही जीवाची मिथ्या कल्पना आहे अथवा दृश्य हें कल्पित आहे अशी साधकाची खात्री झाली तरी सृष्टीची कल्पना करणारा जीव अथवा दृश्यरूपी कल्पिताचें मूळ जो द्रष्टा म्हणजे "अहं" तो कायम असेपर्यंत त्रिपुटीरहित शुद्ध ज्ञान झालें असें म्हणतां

येत नाहीं. सद्‌गुरूनें ब्रह्मात्मैक्यबोध केला तरी कल्पितांचें मूळ जो शिष्याच्या ठिकाणचा जीवभाव अगर अहंभाव तो एकदम नाहींसा होत नाहीं. तर " जीवोऽहं " ही जी त्याची प्रथम भावना असते ती जाऊन तिच्या जागीं " शिवोऽहं ", " सोऽहं " अगर " अहं ब्रह्मास्मि " अशी भावना उत्पन्न होते. म्हणजे या स्थितींतसुद्धां " अहम् " कायमच असतो. तो समूळ मरावयाला फार चिवट आहे. तो पुरा मरण्यापूर्वी म्हणजे स्वरूपीं पूर्णपणें लीन होण्यापूर्वी " आपण आतां कृतकृत्य झालों, धन्य झालों, मुक्त झालों " या अभिमानाला अंतःकरणांत थारा मिळाल्यास तो केव्हां दगा देईल याचा नियम नाहीं. अज्ञानजन्य अभिमान एक वेळ पुरवेल पण ज्ञानाभिमान अत्यंत घातुक आहे. त्यामध्यें आपल्याखेरीज इतरांना तुच्छ लेखण्याची प्रवृत्ति असल्यामुळें तो दुसऱ्यांनाहि जाचक होतो. पंत म्हणतात, " अहं ब्रह्मास्मि "वरून " सर्वं खल्विदं ब्रह्म " या स्थितीस पोचणें फार कठिण आहे. तसें होण्यास फार वेळ लागतो. अहंवृत्तीस ओळखून घेणेंच फार कठीण. अहंवृत्ति ही अट्टल चोर आहे. ती " अहं ब्रह्मास्मि " या रूपानें ( साधकाला ) साधु झालासें दाखवून निजधन चोरून नेते, निजधनाची भुली पाडते. " ( पु. ७–७१ )

आणखी एके ठिकाणीं " शिष्याच्या ठिकाणीं " अहं ब्रह्मास्मि " भावना आहे तोंपर्यंत त्यानें सद्‌गुरूचें बोधऋण फेडिलें नाहीं," असें सांगून ते म्हणतात कीं, " जेव्हां शिष्याने " अहं ब्रह्मास्मि " हा भावदेखील टाकून पडावें, जेव्हां त्याचा मीपणा अगदीं समूळ नाहींसा व्हावा व " सर्वं खल्विदंब्रह्म " हा अनुभव ठसावा, तेव्हां गुरुहि नाहीं व शिष्यहि नाहीं असें होऊन त्यानें गुरूचें ऋण फेडिलें व " अहं ब्रह्मास्मि " भावाची गुरुदक्षिणा दिली व ती गुरूला पोचली; शिष्योद्धारार्थ असलेला गुरूचा अवतार संपला ; व दोघे एक झाले असें समजावें. " ( पु. ७–१९८ ).

## तारकारूढ

सद्‌गुरूंचा वियोग झाल्यानंतर लौकरच पंतांच्या ठिकाणीं तत्त्वविचार सुरू होऊन त्यांनीं " कल्पनाखंडण " व " अहंब्रह्मास्मिखंडण " हे दोन टप्पे ओलांडून " सर्वं खल्विदं ब्रह्म" या श्रुतिवचनाचा सांख्ययोगानें अनुभव घेऊन पडताळा पाहिला व त्यानंतर त्यांनीं राजयोगांतर्गत दुसरा जो तारकयोग त्याचा अभ्यास सुरू करून श्रुतींनी वर्णिलेल्या व संतांनीं चोखाळलेल्या देवयान पंथानें आत्मदर्शन करून घेतलें, असें त्यांनीं आपल्या सनावळींत १८७९–८० सालीं "तारकारूढ" या शब्दानें दर्शविलें आहे. नादबिंदुकलात्मक तारक योगानें होणारा ब्रह्मसाक्षात्कार सद्‌गुरूंच्या सान्निध्यांतच पंतांना झालेला होता या गोष्टीचा प्रकरण ६ मध्यें उल्लेख केलाच आहे. त्यामुळें त्यांना आणखी योगसाधनाची आवश्यकता होतीच असें नाहीं व बाळप्पांच्या वियोगानंतर प्राणनिरोधन करून ध्यान लावून बसलेले त्यांना कोणीं फारसें पाहिलेंहि नव्हतें. पण सद्‌गुरूंचा वियोग झाल्यावर जेव्हां ते आत्मानुभवाला दृढता आणण्याचे निरनिराळ्या मार्गांनीं प्रयत्न करूं

लागले तेव्हां त्यांनीं तारक योगाचाहि अधिक अभ्यास केला व आत्मसाक्षात्कार करून घेतला. या योगांतील दिव्य अनुभव त्यांनी आपल्या वाङ्मयांत जागजागीं व्यक्त केले आहेत.

राजयोगांतर्गत सांख्ययोगापेक्षां तारकयोगाचा विशेष हा आहे की जरी या दोन्ही योगांचें साध्य म्हणजे परमात्मस्वरूपाचा लाभ हेंच आहे, तरी सांख्ययोगांत तत्वविचार करून जें तत्वांतीत शेष उरतें तें ब्रम्ह असें अनुमानज्ञान होतें व त्यांत परमात्मानुसंधानाला कांहीं साधन नसतें. पण तारक योगांत नादबिंदुकलात्मक परमात्मानुसंधानपूर्वक तत्वें सांडून उरलेलें जें आत्मस्वरूप त्याचें प्रत्यक्ष दर्शन होतें म्हणजे त्याचा साक्षात्कार होतो. तसेंच सांख्ययोगांत साधकाला ध्यानास कांहीं आलंब नसतो. पण तारकयोगांत ध्यानास निरनिराळ्या लक्ष्यांचा आलंब व नादानुसंधान असून प्रकाशमय आत्म्याचें प्रत्यक्ष दर्शन होतें. नुसत्या सांख्यमार्गानें अथवा तत्वविचारानें मनाला मोक्षमार्गी लावणें महा-कठीण आहे. म्हणून एके ठिकाणीं पंत सांगतात, " सद्‌गुरूकडून तारक उपदेश घेऊन चंद्र सूर्य अग्नींत, इडापिंगळा सुषुम्णेंत, मन उन्मनींत स्थिर करावें. दृष्टि स्थिर झाली कीं वायु स्थिर होतो. मग मन आपोआप पंखरहित पक्ष्याप्रमाणें जिकडे फेकावें तिकडे जाऊन पडतें. एकदां दृष्टि स्थिर झाली कीं बाह्य पदार्थ देहादि दिसेनासे होऊन चोहों-कडे विजा चमकूं लागतात; नक्षत्रें झळकूं लागतात, रत्नजडित पुरें, गोपुरें उभारूं लागतात, द्विभुज, चतुर्भुज, षड्भुज, अष्टभुज, षोडशभुज, किरीटकुंडलधारी देवता प्रकाशूं लागतात, अगणित चंद्र-सूर्यांचा अप्रतिम प्रकाश, सर्व अंबरीं भरूं लागतो, अष्टादशनाद अशा पोक-ळींत आपोआप दुमदुमूं लागतो. अशा वैभवांत मन मनपणास विसरून त्यांतच लीन होऊं पाहतें. आणि एकदां दृष्टिस्थिरत्व साधलें कीं बसतां, उठतां, चालतां, काम करितां, लिहितां, वाचतां सहजीसहज बिंदू प्रकाशून मूर्ति दिसूं लागतात. भस्मभूषित जटाधारी दिगंबर सद्‌गुरूची मूर्ति क्षणोक्षणीं दृष्टीपुढें उभी राहते, अनेक प्रकारचे बोध आपोआप होऊन शंका खंडून जातात. मुक्तीची खात्री होते. मग मनासहि गोडी लागून जगदाकार, त्यांतील विषय, पदार्थ, स्थूल देह यांचा वीट मानून सदा ऊर्ध्वगामी होऊं पाहतें. " ( पु. २–१४७ )

हा जो योगाचा प्रकार सांगितला त्याचा आश्रय करणारास तो गर्भ-जन्म-जरा-मरणरूप संसारांतून अचूक पार करितो म्हणून त्याला " तारक " योग म्हणतात असें पंतांनीं सांगितलें आहे. तसेंच त्यांनीं एके ठिकाणी असें म्हटलें आहे कीं " हें तारकच ॐ कार म्हणवितें. तो ॐ कारच ब्रम्ह; ॐ कारच सर्व व्यापक; ॐ असें एकदां उच्चारलें कीं परमात्मज्योति अभिमुख होते. असें " ॐ इति ब्रम्ह " इत्यादि श्रुति-प्रमाणांनीं त्रिगुणात्मक, त्र्याक्षरसमन्वित ॐ कार लक्ष्यत्रयांनीं तारकयोगाचा अभ्यास करावा. " ( पु. २–५९ )

## भक्ति–अनुभव–प्रभाव

येथें हें लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं सांख्ययोग व तारकयोग यांचा पंतांनीं जो

अभ्यास केला तो त्यांचा परीक्षेचा अभ्यास व तो पास झाल्यावर नोकरी व इतर व्यवसाय तसेच त्यांचा भजनक्रम व गुरुबंधु व शिष्य यांना बोधामृत पाजण्याचें कार्य हीं सर्व चालू असतांनाच केला. त्याच वेळीं त्यांच्या ठिकाणचे भजनप्रेमवृद्धिंगत होत होतें व त्यांचें शिष्यप्रबोधनाचें कार्यहि चालूच होते. त्यांच्या ठिकाणच्या अत्युत्कट गुरुभक्तीच्या बळावर बिकट परिस्थितीत या सर्व गोष्टी चालल्या होत्या. त्यामुळें या सुमारास त्यांना सद्गुरूच्या भक्तवात्सल्याचे पदोपदी अनुभव येत होते.

# प्रकरण १५ वें

## श्रीकल्लेश्वर महाराज ऊर्फ कल्लप्पा; तारकविस्तार; ऊन्मनीलीला; तारकखंडण; कल्लप्पावियोग व तारकऱ्हास

पंतांच्या आध्यात्मिक अनुभवांच्या ज्या सनावळीचा मागें उल्लेख केला आहे तिच्यांत त्यांनीं सन १८८०–८२ या सुमारें दोन वर्षांच्या अवधींत पुढील गोष्टी घडल्याचें नमूद करून ठेविलें आहे. त्या येणेंप्रमाणें –(१) कल्लप्पादर्शन, (२) तारकविस्तार, (३) उन्मनी-लीला, (४) तारकखंडण, (५) कल्लप्पावियोग व (६) तारकऱ्हास. त्यांचेसंबंधीं येथें त्यांच्याच वचनांच्या आधारें थोडें स्पष्टीकरण करीत आहोंत.

### कल्लप्पादर्शन

कोणत्याहि विद्येचें पद्धतशीर अध्ययन करून ती पूर्णपणें आपलीशी करून घेणें झाल्यास ती शिकणाऱ्या विद्यार्थ्याला अगर अभ्यासकाला त्या विद्येंत पारंगत असलेल्या निष्णात गुरूच्या अगर मार्गदर्शकाच्या सान्निध्याची फार आवश्यकता असते व तसा गुरु अगर मार्गदर्शक नसेल तर निदान तीच विद्या शिकणाऱ्या आपल्या बरोबरीच्या अगर आपल्या पुढें गेलेल्या दुसऱ्या एखाद्या कळकळीच्या विद्यार्थ्याची फार जरूर असते. सर्व विद्यांमध्यें श्रेष्ठ जी अध्यात्मविद्या तिचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला तर ही जरूर विशेषच भासते. कारण अध्यात्मशास्त्र हें अनुभवाचें शास्त्र असल्या-मुळें त्या शास्त्रांतील सिद्धांत नुसते बुद्धीला पटून भागत नाहीं तर ते अनुभवाच्या कसो-टीला उतरावे लागतात, व त्यांचा स्वानुभवाशीं मेळ बसून ते आत्मसात होण्याला अनुभवी मनुष्याबरोबर चर्चा, विचारविनिमय, वादविवाद ( शुष्क नव्हे ) यांची फार जरूर असते. याच हेतूनें परमार्थसाधनांत सत्संगतीला अत्यंत महत्व दिलें आहे.

सद्गुरु बालमुकुंदांनीं पूर्ण कृपेनें पंतांना आत्मबोध केला, पुढील कार्याची दिशा दाखवून दिली व अभय दिलें. पण विषम प्रपंचांत असंख्य द्वंद्वांशीं झगडत असतांच त्या बोधाचें मनन व निदिध्यास करून तो आत्मसात करणें व त्याच्याशीं तन्मय होऊन आपलें जीवन बोधमय करणें हें दुर्घट कार्य पंतांना स्वतःच करावें लागलें. त्यामुळें आत्मानुभवाच्या क्षेत्रांत त्यांना कोणातरी पूर्ण अनुभवी मनुष्याच्या संगतीची फार आवश्य-कता होती. वास्तविक बालमुकुंदांनीं दिलेल्या देणगीपलीकडे त्यांना कांहीं प्राप्तव्य नव्हतें. पण आत्मप्रतीति, गुरुप्रतीति व शास्त्रप्रतीति या तिहींचा मेळ बसविण्याचें जें बिकट कार्य त्यांना बालमुकुंदांचा वियोग झाल्यानंतर करावें लागलें त्या कार्यांत त्यांना एखाद्या अनुभवी, शास्त्रज्ञ व विवेकसंपन्न अशा सत्पुरुषाच्या संगतीचें फार महत्व होतें आणि त्यांच्या सन्निध तशा प्रकारचा कोणी नसल्यामुळें त्यांना ही जाणीव विशेषच भासत होती. पण " वरचे-

वर तूं बसल्या ठिकाणींच सत्पुरुषाची भेट होऊन खूण मिळते पहा, ” असें जें सद्गुरु बालमुकुंदांनीं त्यांना आश्वासन दिलें होतें त्याप्रमाणें त्यांना एका अधिकारी महात्म्याच्या सुसंगतीचा अगदीं योग्य वेळीं लाभ होण्याचा सुयोग जमून आला.

## कल्लप्पांची भेट

सन १८८० सालीं एकदां पंत दड्डीस गेले असतां तेथें मागें उल्लेख केलेल्या रघप्पा आण्णा रघशेट्टी नावाच्या भक्तिमान व वेदान्ताची आवड असणाऱ्या एका लिंगायत गृहस्थाशीं त्यांचें वेदान्तविषयासंबंधीं संभाषण चाललें असतां रघप्पांना त्यांना असें सांगितलें कीं, “ बेळगाव येथें ‘ कल्लपा ’ नावाचे एक लिंगायत गृहस्थ जंगल खात्यांत नोकर आहेत. ते मोठे सिद्धांती असून योगी आहेत; तेव्हां त्यांची तुम्ही अवश्य भेट घ्यावी. त्यायोगें तुम्हांस फायदा होईल. त्यानंतर बेळगावास परत आल्यावर पंतांनीं कल्लप्पांची भेट घेतली. त्यावेळीं कल्लप्पा हे समादेवी गल्लींत हल्लीं बाळेकुंद्रीकरांच्या वाड्यासमोर जें घर आहे, त्या घरांत राहात असत; त्या स्थानाला “ बनबोवाचा मठ ” म्हणतात. त्या ठिकाणीं घराच्या मध्यभागीं असलेल्या भुयारांत एका सत्पुरुषाची समाधि आहे. त्यामुळें त्या स्थानाला “बनबोवाचा मठ” हें नाव पडलें असावें. कल्लप्पांचें दर्शन होऊन कांहीं दिवस त्यांच्या सहवासाचा लाभ घेतल्यानंतर पंतांना त्यांच्यासंबंधीं जो अनुभव आला त्यासंबंधीं आक्टोबर १८८० च्या सुमारास पंतांनीं दड्डी येथील रघप्पा आण्णा रघशेट्टी यांना प्रकरण १४ मध्यें उल्लेख केल्याप्रमाणें जें पत्र लिहिलें त्यांत पुढील मजकूर आहे:—“ आपण सांगितल्याप्रमाणें श्रीकल्लप्पांचें दर्शन घेतलें. सद्गुरूची पूर्ण कृपा संपादिली आहे. वृत्ति फारच सफाई आहे. ‘ जीवन्मुक्त ’ ही संज्ञाहि सांडून अंतर मौन ब्रह्मीं स्थिरावलें. दिवसांतून एक दोनदां दर्शनास जात असतों. ” वरील मजकुरावरून व त्यांत कल्लप्पांसंबंधीं केलेल्या गौरवपर उल्लेखावरून अल्पावधींतच पंतांचें कल्लप्पांसंबंधीं काय मत झालें व पंत त्यांना किती पूज्य मानीत याची साक्ष पटते.

कल्लप्पा हे धारवाडकडील राहणारे असून बेळगाव येथें जंगलखात्यांत ड्राफ्ट्स्मनचें काम करीत असत. ते एक सिद्ध पुरुष असून फार शांत होते. ते प्रपंच करीत असूनहि पूर्ण आत्मानुभवी होते. त्यांचें अध्यात्मविषयासंबंधींचें वाचन फार दांडगें असून त्यांची उपदेशशैलीहि चांगली होती. त्यामुळें त्यांच्याकडे पुष्कळ जिज्ञासु व मुमुक्षु बोधश्रवणास येत असत. त्यांनीं पूर्ण विचार करून शास्त्राधारें व तर्कशुद्ध पद्धतीनें कांहीं सिद्धांत कायम करून ठेविले होते. ते त्यांचे सिद्धांत मणसणीत असत. त्यामुळें त्यांचा बोध निःसंदिग्ध व परिणामकारक असे. कल्लपांचे हे सिद्धांत कानडी भाषेंत लिहिलेले होते. त्यांचें मराठी भाषांतर करून पंतांनीं त्या भाषांतराची एक प्रत आपल्याजवळ ठेविली होती; ती अजून त्यांच्या दप्तरांत उपलब्ध आहे. ते सिद्धांत वाचले असतां कल्लप्पांच्या अध्यात्मविद्येच्या

दीर्घ व्यासंगांची, आत्मानुभवाची व कुशाग्र बुद्धीची साक्ष पटते. प्रत्येक सिद्धांत म्हणजे एकएक लहानसा निबंधच आहे.

कल्लप्पांची राहाणी अत्यंत साधी असून तिच्यावरून ते फार अधिकारी आत्मानुभवी पुरुष असतील असें कोणालाहि वाटत नसे. त्यांच्या राहणीसंबंधीं पंतांनीं असें म्हटलें आहे कीं, "कल्लप्पा तसाच ( बाळप्पासारखाच ). पाहिला असतां बिलकुल दुसऱ्यांहून निराळा दिसत नव्हता; दुसऱ्यांसारखाच. पण अंतरशुद्ध अखंड आत्मनिष्ठ होतें. म्हणून त्याचे सिद्धांत सणसणीत असत." (पु. ८–४०) एकदां कल्लप्पांकडे एक श्रीमंत गृहस्थ गेला होता. त्यानें आठ प्रश्न टिपून ठेवलेले होते व कोणी वेदांती भेटला म्हणजे तो ते प्रश्न त्याच्यापुढें ठेवी व त्यांचीं उत्तरें देण्यास सांगे. कल्लप्पांकडे गेल्यावर त्यानें ते प्रश्न त्यांचे पुढें टाकिले व त्यांचीं उत्तरें देण्यास सांगितलें. तेव्हां कल्लप्पांनीं त्याचा तो सिद्धांतांचा कागद उचलून फेंकून दिला. तेव्हां "असें कां ?" म्हणून त्यानें विचारतां, "तूं अगोदर कीं प्रश्न अगोदर ?", असें कल्लप्पांनीं त्यास विचारलें. तेव्हां "मी अगोदर" असें त्यानें उत्तर दिलें. तें ऐकून कल्लप्पा म्हणाले, "तसें असेल तर प्रश्न कां ? उगीच बैस कीं ?", अशा प्रकारें कांहीं वेळ भाषण झाल्यावर त्या गृहस्थाचें समाधान होऊन त्यानें कल्लप्पांचे पाय धरिले.

अशा थोर महात्म्याच्या सुसंगतीचा अगदीं योग्य वेळीं लाभ झाल्यामुळें पंतांना आपल्या आत्मानुभवाला बळकटी आणण्याच्या कामीं फार फायदा झाला व कल्लप्पांच्या-रूपानें सद्‌गुरु बालावधूतच आपल्याला मार्ग दाखविण्याकरितां व आपल्या अनुभवाला बळकटी आणण्याकरितां आले आहेत अशी त्यांची भावना झाली. यासंबंधीं त्यांनी सद्‌गुरूला उद्देशून असें म्हटलें आहे कीं, "श्रीशैल्ययात्रेचें मिष करून तूं दृष्टिआड झाल्यावर कामहत होऊन विषयी जनांचे संगतीस लागून पशुभोगांत रमूं लागलों, अनेक त्रास भोगिले. तेव्हां प्रभु, तुझी आठवण कोठली ? हा माझा अपराध काय ? माझें पूर्ण पारतंत्र्य ! याप्रमाणें तुझी आज्ञा उल्लंघून तुझ्या बोधाचें विस्मरण पडून त्रिवासनेच्या जाळ्यांत तडफडत असतांना तूंच कल्लेश्वर–रूपानें भेटून शब्द–खंडण, मीपण–त्याग हा तारकसाक्षात्कार-सिद्धांतबोध करून, कांहींसें स्मरण देऊन तुझे योगानंदांत सुखाविलेंस." (पु. २–१६४)

आणखी एका ठिकाणीं पंतांनीं सद्‌गुरूला उद्देशून पुढील उद्गार काढले आहेत, "तुझ्या अभयवचनांसंबंधीं कोणत्याहि रीतीनें आमच्या ठायीं शंका उद्भवूं नये, तुझे वचनांचा अनुभव अंतरीं दृढ बाणावा, म्हणून श्रीकल्लेश्वरप्रेरणा करून वरील गोष्टींचें ( मागें उल्लेख केलेले सत्यसिद्धांत व अभय वचनें यांचें) मंडन केलें." (पु. २-२५३)

कल्लप्पा हे जसे सिद्धांती होते तसेच महान् योगीहि होते. त्यामुळें योगाभ्यास करण्याकरितां त्यांच्याकडे बरीच मंडळी जात असत. पंतहि बहुतेक रोज त्यांच्याकडे जात. तेथें त्या उभयतांची वेदान्तविषयावर व योगासंबंधीं चर्चा चालत असे व अध्यात्म-ग्रंथांचें वाचन, भजन वगैरे प्रकार चालत. उज्वल गुरुभक्ति, तीव्र ज्ञानलालसा, कुशाग्र-

बुद्धि, योगमार्गांतील अनुभव व अध्यात्मविषयाची निरतिशय गोडी वगैरे पंतांच्या ठिकाण-च्या गुणांमुळें कल्लप्पांना फार समाधान वाटून ते मोठ्या उल्हासानें व प्रेमानें पंतांशीं विचारविनिमय करीत; अथवा थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे " बोधयन्तः परस्परं । तुष्यन्तिच रमन्तिच " (भ. गी.अ. १०–९.) या गीतावचनांत वर्णिल्याप्रमाणें कल्लप्पा व पंत हे दोघे थोर पुरुष एकमेकांना एकमेकांच्या संगतींत बोध देत भक्तिप्रेमरंगांत व योगा-नंदांत फुरसुतीचा काळ घालवीत. त्या दोघांमध्यें कल्लप्पा पंतांपेक्षां वयानें वडील असून पूर्ण अनुभवी असल्यामुळें पंत त्यांना आपल्या वडील भावाप्रमाणें मानीत व पंत त्यांच्या-पेक्षां वयानें लहान असूनहि त्यांचा अधिकार पाहून कल्लप्पांना फार कौतुक वाटत असे.

## तारकविस्तार

पंत कल्लप्पांकडे गेले म्हणजे काका त्यांचेबरोबर असे. कधीं कधीं गणू गुमास्ते, गंगाराम, राघू अवधूत वगैरे इतर कांहीं शिष्यहि त्यांच्यावरोबर असत. निदान रोज संध्याकाळीं शाळेचें काम संपल्यावर तरी पंत आपल्या शिष्यमंडळीसह कल्लप्पांच्या मठांत जात. तेथें कल्लप्पा " कैवल्य–पद्धति " व " कैवल्य–कल्प–वल्लरी " नावाच्या निजगुणा-राध्य यांच्या पद्यमय कानडी ग्रंथांतील व इतर पदें म्हणून भजन करीत; तर कधीं पंतांची व त्यांची वेदान्तविषयासंबंधीं चर्चा चालत असे. पंतांच्या बरोबरची ही तरुण मंडळी कधीं मुद्रा लावून बसत, कधीं भजन करीत तर कधीं पंत व कल्लप्पा यांचें संभाषण ऐकत बसत. बनबोवाच्या मठांत पुढल्या सोप्यांत जी गुहा आहे ती गोमुखीच्या आकृतीची व सुमारें एक पुरुष खोलीची असून आंत जाण्याकरितां पायऱ्या आहेत. पायऱ्या संपतांच डाव्या हाताला ढोलीसारखी सुमारें तीन फूट लांबीची जागा आहे व त्या जागेसमोर एक कोनाडा असून त्यांत एका सत्पुरुषाच्या पादुका स्थापन केल्या आहेत. त्या पादुकांपुढें सुमारें तीन मनुष्यें एका वेळीं रांगेनें बसतील इतकी जागा आहे. त्या एकांत स्थळीं पंतांच्या बरोबरचे मुलगे ध्यान लावून बसत व त्यांपैकीं कांहींचा बराच वेळ समाधि लागत असे. मागें लिहिल्याप्रमाणें सद्गुरु बालमुकुंदांनीं पंतांकडून खडतर योगसाधन करवून घेतलें होतें व त्यांना सांख्य, तारक व अमनस्क मार्गांनीं निरनिराळ्या तऱ्हेचे अनुभवहि आणून दिले होते; त्याचप्रमाणें बालमुकुंदांचा वियोग झाल्यानंतर तारकयोगाचा अधिक अभ्यास करून पंत ' तारकारूढ ' स्थितीला पोंचले होते. त्यांतच कल्लप्पांसारख्या योगधुरंधर महापुरुषाची त्यांना संगति लाभल्यामुळें सहज ओघानेंच त्यांचें योगशास्त्राकडे अधिक लक्ष वेधलें. त्या वेळच्या आपल्या बहुतेक शिष्यांना ते योगसाधन करण्यास सांगूं लागले व आपल्या देखरेखीखालीं त्यांच्याकडून तें करवून घेऊं लागले. त्यामुळें खेचरीमुद्रा लावणें, तारकयोगांतील नादबिंदुकलात्मक अनुभव घेणें वगैरे प्रकार त्यांच्या शिष्यांत सुरू झाले. त्याच सुमारास म्हणजे सन १८८१-८२ सालीं पंतांच्या अनुयायांत आणखी कांहीं मंडळींची भर पडली. बाबा कुडची ऊर्फ कुडचीवीर सन १८८० सालीं समाधिस्थ झाल्यापासून त्यांच्या शिष्यमंडळींना योग्य व अधिकारी असा मार्ग-

दर्शक कोणी नसल्यामुळें त्यांना उदास वाटूं लागून त्यांची जरा चमत्कारिक स्थिति झाली होती. इतक्यांत बाबा कुडचींच्या शिष्यांपैकीं कोन्हेरेराव ऊर्फ दादा सावनूर यांना सुप्रसिद्ध वेदान्ती व " ब्रह्मसिद्धांतमाला " वगैरे ग्रंथांचे कर्ते कै. बाबा गर्दे यांचेमार्फत कोल्हापूर येथें रामभाऊ तिकोटेकर नावाच्या एका योग्याचें दर्शन होऊन त्यांनीं रामभाऊंकडून योगमार्गाची दीक्षा घेतली व त्यांच्यामुळें बाबा कुडचींच्या बऱ्याच शिष्य मंडळींनीं रामभाऊंकडून उपदेश घेतला आणि तेव्हांपासून ही मंडळी रोज एकनाथी भागवत वाचीत व प्राणायाम करीत असत. त्यांच्यांत स्त्रियाहि बऱ्याच होत्या. या मंडळींना बाबांच्या तोडीचा कोणी मार्गदर्शक नसल्यामुळें समाधान वाटत नव्हतें. पुढें कांहीं दिवसांनीं बाबांचे एक शिष्य रावजी दड्डीकर यांचा पंतांशीं अति निकट संबंध असून ते मागें वर्णन केल्याप्रमाणें पंतांना गुरुस्थानीं मानूं लागल्यामुळें बाबांची बहुतेक शिष्यमंडळी पंतांकडे येऊं लागली व त्यांना बाबांच्या ठिकाणीं मानून त्यांच्या मंडळींत पूर्णपणें मिसळली. पंतहि त्यांना मोठ्या प्रेमानें वागवून बोध करीत असत. बाबांच्या या शिष्यमंडळींची रामभाऊ तिकोटेकरांच्या शिकवणीमुळें योगमार्गांत कांहीं प्रगति झालेली होती. त्यांतच ते पंतांकडे येऊं लागल्यापासून पंतांच्या शिष्यमंडळी-बरोबर तेहि मुद्रा लावणें, ध्यान धरून बसणें वगैरे प्रकार अधिक आस्थेनें करूं लागले. अशा रीतीनें तारकयोगाचा अभ्यास करणाऱ्या पंतांच्या अनुयायांची संख्या बरीच वाढली व या गोष्टीचा उल्लेख " तारकविस्तार " या शब्दानें त्यांनीं आपल्या सनावळींत केलेला आहे.

## उन्मनीलीला

पंतांनीं तारकसिद्ध उन्मनचिें एके ठिकाणीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—"गुरूनें उपदेशिलेल्या तारकाभ्यासानें मस्तकाच्या पोकळींत भ्रूमध्यस्थानीं बिंदु, प्रगटून त्यांत प्राणापानांचें स्थिरत्व करून, दृष्टि मन हीं अग्नींत आणि त्रिकुटीं स्थापून अनेक प्रकारचे नाद बिंदु कळा हीं पाहून बिंदूंतील साक्षित्वभाव आपण ॐ कार अशा भावनें, प्रणवध्वनींत पाहिल्या ऐकिल्याचा अभिमान सांडून, ब्रह्मरंध्रीं सद्‌गुरूच्या दिव्य मूर्तीचें दर्शन घेऊन, प्रकाशभरांत नादमय अंबरीं मन लीन करावें. प्रत्येक चक्रीं देवता, पुजारी, जप हीं जाणून, मनाची कल्पना खंडीत, त्रिकूटादि सहा घाट चढून सहस्रदळीं सत्रावीचें पान करून आरोहण करावें आणि पश्चिम चक्रीं कांहीं नाहीं असें होऊन शांतातीतोत्तर कलेसहित उन्मनीसमाधींत चारीदेहभाव विसरून असणें ही उन्मनी होय; " ( पु. २–१३४ ) व पुढें असेंहि सांगितलें आहे कीं, " हा उन्मनीजनित ब्रह्मानंद मनाच्या कल्पनेस दूर विचारास अतीत, वायूस मिरलेला, दृष्टीस अगम्य, वाचेस अगोचर, सद्‌गुरुकृपाबळान अनुभवानें सिद्ध होणारा आहे. " ( पु. २–१३५ ) अशा तऱ्हेच्या उन्मनीजनित ब्रम्हानंदाच्या स्थितींत पंत व कल्लप्पा या दोन योगशास्त्र-विशारद महापुरुषांनीं काय काय " उन्मनी-लीला " अनुभविली असेल यासंबंधीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं.

तरीपण या सुमारास पंतांच्या ठिकाणचें योगसामर्थ्य इतकें विलक्षण होतें की ते आपल्या शिष्यमंडळींपैकीं कांहींचा अगदीं अल्प अवधींत, अल्प प्रयत्नानें म्हणजे नुसत्या दृष्टिक्षेपानेंहि, चार चार पाच पाच तास समाधि लावूं शकत. अशा प्रकारच्या अनुभवांच्या कांहीं अद्‌भुत प्रकारांसंबंधीं जी कांहीं विश्वसनीय माहिती उपलब्ध आहे ती पुढें देत आहोंत.

पंतांच्या शिष्यमंडळींपैकीं योगसाधनांत बरीच प्रगति झालेली मंडळी म्हणजे काका, गणू गुमास्ते, गंगाराम व अवधूत राघू हे होत; व विशेषतः पंतांना कल्लप्पांची भेट झाल्यापासून या मंडळींच्या योगाभ्यासाला अधिक चालना मिळाली. पंतांच्या अनुयायांत काका हा अत्यंत एकधोरणी, अतिशय निष्ठावान्, प्रेमळ व दृढनिश्चयी असल्यामुळें त्याला समाधि फार लौकर लागत असे. एकदां असे झालें कीं काका हा एकटाच एकांत स्थळीं बसून मुद्रा लावून समाधि लावण्याचा प्रयत्न करूं लागला; पण तें त्याला लौकर साधेना. तेव्हां तो इतका वैतागला कीं तो आपलें डोकें भिंतीवर आपटूं लागला. तें पंतांना समजतांच त्यांनीं ताबडतोब त्याच्याजवळ जाऊन त्याला धीर देऊन आपल्या देखत पुन्हां प्रयत्न करण्यास सांगितलें व त्यानीं सांगितल्याप्रमाणें प्रयत्न करितांच त्याचा समाधि लागला.

पंतांच्या बरोबरच्या मुलांची योगसाधन करण्याची उत्सुकता व त्यांपैकीं कांहीं जणांची तयारी पाहून कल्लप्पांना फार कौतुक वाटे, व ते त्यांना चुरमुरे अगर दुसरा कांहीं तरी खाऊ देत. कल्लप्पा जरी अनुभवी व सिद्धांती होते तरी त्यांचें योगसाधनावर फार प्रेम असे. तें इतकें कीं योगाभ्यास केल्याशिवाय मुक्ति मिळणें नाहीं असें ते म्हणत तर उलट पंत असें म्हणत कीं भक्तीशिवाय मुक्ति नाहीं. योगसाधन हें गौण आहे. भक्तीमध्ये सर्व साधनें येतात. " भक्ति ज्ञानाची माउली। भक्तीपासुनी मुक्ति झाली " असा त्यांचा सिद्धांत होता व भक्ति म्हणजे अविभक्त स्थिति म्हणजे देवभक्तांमधील ऐक्यभाव असें ते म्हणत.

एकदां रविवारची सुट्टी असल्यामुळें दुपारी सुमारें एक वाजतां पंत कल्लप्पांच्या मठांत गेले. बरोबर काका, गणू व गंगाराम हे तिघे होते. तेथें गेल्यावर पंत व कल्लप्पा एक पुस्तक वाचीत व चर्चा करीत बसले व काका, गणू व गंगाराम हे जवळच चुरमुरे खात बसले होते. ते आपल्याच नादांत असल्यामुळें पंत व कल्लप्पा यांच्यामधील चर्चेकडे त्यांचें लक्ष नव्हतें व त्यांत त्यांना कांहीं गम्यहि नव्हतें. पंत व कल्लप्पा या दोघांचें संभाषण चाललें असतां पंतांनी एकदम काका, गणू व गंगाराम या तिघांचीं नावें घेऊन मोठ्यानें हाक मारली. त्याबरोबर त्या तिघांची नजर पंतांच्या दृष्टीकडे वेधली व लगेच त्या तिघांचेंहि देहभान उडालें. या वेळीं सुमारें तीन वाजले होते. तेव्हांपासून त्या तिघांना जागच्या जागीं डोळे उघडे असून झोप लागल्याप्रमाणें होऊन त्यांचा समाधि लागला. कल्लप्पांनीं त्यांच्याजवळ जाऊन त्यांची नाडी वगैरे तपासून पाहिली व श्वासोच्छ्वास चालला आहे कीं काय तेहि पाहिलें. तेव्हां त्यांना खरोखरच समाधि लागला असल्याची

त्यांची खात्री झाली. तशा स्थितींत ते चार पाच तास होते. नंतर पंतांनीं प्रत्येकाच्या मस्तकावर हात ठेवितांच त्याचा समाधि उतरून झोपेंतून जागा झाल्याप्रमाणें त्याला वाटूं लागलें; तों रात्रींचे सुमारें आठ वाजले होते.

वरील प्रकार झाल्यापासून कल्प्पांना पंतांच्या ठिकाणच्या योगमार्गांतील नैपुण्या-बद्दल फार कौतुक वाटूं लागून ते पंतांवर फार प्रेम करूं लागले. त्यांनी वरील हकीगत मागें उल्लेख केलेले कै. बाबा गर्दे यांचे कानावर घातली. बाबा गर्दे यांना योगसाधनाचा फार नाद असून कोल्हापूरकडील प्रसिद्ध योगी रामभाऊ तिकोटेकर यांचे ते शिष्य होते याचा मागें उल्लेख केलाच आहे. बाबांना योगसाधनाबद्दल फार प्रेम वाटत असल्यामुळें त्यांचा कल्प्पांशीं चांगला परिचय होता. तेव्हां आपल्यादेखत पंतांना मागीलप्रमाणें आपल्या शिष्यांचा समाधि लावण्यास सांगावें अशी त्यांनी कल्प्पांना विनंति केली व कल्पांच्या सांगण्यावरून पंतांनीं बाबा हजर असतांना काका, गणू व गंगाराम यांचा मागीलप्रमाणें पुनः समाधि लाविला. यावेळींहि ते तिघे चार पाच तास समाधीच्या स्थितींत होते. रात्रीं सुमारें नऊ वाजण्याच्या सुमारास पंतांनीं मागीलप्रमाणेंच त्यांच्या मस्तकावर हात ठेवितांच त्यांचा समाधि उतरला व त्यांना झोपेंतून जागें झाल्याप्रमाणें वाटूं लागलें. वरील प्रकार पाहून बाबांना फार आनंद झाला. पंतांनीं शिष्यांचा चार पाच तास समाधि लाविल्याचे वर जे दोन प्रसंग दिले आहेत, त्यांखेरीज अशा प्रकारचे प्रयोग ते फारसे करीत नसत. उलट अशा प्रकारच्या समाधीला "ताटस्थ्य समाधि, मूर्च्छाविकार" (द. प्रे. ल. १९१) असेंच त्यांनीं म्हटलें आहे. तरीपण कल्प्पांचा सहवास झाल्यापासून योगसाधनाकडे, नादबिंदुकलात्मक तारकसाक्षात्कारांचा अनुभव घेण्याकडे व आपल्या कांहीं शिष्यांना तशा प्रकारचे अनुभव आणून देण्याकडे पंतांचें विशेष लक्ष वेधलें होतें व ते आपल्या शिष्यांना ध्यानधारणादि प्रकार करण्यास सांगत. निदान कल्प्पांचा सहवास असेपर्यंत तरी त्यांचा बराच काळ योगशास्त्राची बारकाईची व सविस्तर माहिती करून घेण्यांत जात असे.

याच सुमारास आपणास आलेला आणखी एक विलक्षण अनुभव काका घाणेकर यांनीं लिहून ठेविला आहे. तो असा कीं—एकदां पंत व काका असे दोघेच बसले असतां पंतांनीं त्याला आपल्या समोर बसण्यास सांगितलें व आपल्या हातांत एक खडू घेऊन ते म्हणाले कीं, "मी आतां जमिनीवर रेघ काढतों, तिकडे तूं दृष्टि लाव". त्यानें त्या-प्रमाणें करतांच, "मी आतां तुझे पाय तोडतों," असें म्हणून पंतांनीं खडूनें जमिनीवर एक रेघ काढली व तो त्या रेघेकडे पाहूं लागतांच त्याला आपल्या पायांतील शक्ति नाहींशी होऊन दोन्ही पाय तुटल्याप्रमाणें वाटूं लागलें. नंतर पंतांनीं दुसरी रेघ काढली व "तुझी आतां कंबर तोडतों," म्हणाले. लगेच त्याला आपल्या कंबरेखालच्या भागांतील शक्ति नाहींशी होऊन तो भाग तुटल्यासारखें वाटूं लागलें. पुढें पंतांनीं तिसरी रेघ काढली व "तुझी छाती तोडतों" म्हणाले; तों काकाला छातीखालचा भाग निर्जीव होऊन तो तुटल्याप्रमाणें वाटूं लागलें. नंतर पंतांनीं आणखी एक रेघ काढली व "आतां तुझा गळा

कापतों " असें ते म्हणाले. त्यासरसें त्याचें भान नाहींसें होऊन झोंप लागल्याप्रमाणें त्याची निर्भान स्थिति झाली. सुमारें एक तासानें पंतांनीं त्याच्या मस्तकावर हात ठेविल्यावर तो सावध झाला. अशा प्रकारचे अद्‌भुत योगसामर्थ्याचे प्रयोग पंत क्वचितच करीत असत !

## तारकखंडण

तारकयोगाचा विशेष म्हणजे षट्‌चक्रभेद करून प्रकाशरूप आत्म्याचें दर्शन घेणें अगर ब्रह्मसाक्षात्कार होणें हा होय. पण यासंबंधीं पंत म्हणतात, " मी आहें म्हणून तत्वविचार ( सांख्य ) व तारकसाक्षात्कार यांची भ्रांति आहे. निराकार सर्वत्र भरलेला; परतत्वीं दुसऱ्याचा अभाव; तेथें मिथ्या मीपणा शुक्तिरजतन्यायें मुळींच नाहीं. चारी देहांचें साक्षित्व, बिंदु, प्रणव, अनुभवस्थिति धारण करणाऱ्या मिथ्या ज्ञानापलीकडे परमात्म्याचें रूप आपोआप सिद्ध आहे. ज्याप्रमाणें काविळीनें पिवळा रंग नसून दिसतो, किंवा भ्रमग्रस्त अंतःकरणास दोरीवर सर्पाचा भास होतो, किंवा दूरत्वामुळें रत्नावर दीपाची भ्रांति उत्पन्न होते, किंवा अंधारामुळें स्थाणूवर चोराची शंका उत्पन्न होते, तद्वत ज्ञानानें साक्षित्व धरल्यामुळें बंध मोक्ष, जीव शिव, जड अजड, जग ब्रह्म इत्यादि अगणित द्वंद्वें कल्पून, त्या त्या द्वंद्वांचा अभिमान धरून, मी जीव, मी बद्ध, मी मुक्त, मी ज्ञानी, मी अज्ञानी असें स्वप्नांच्या भीतीनें ( जो ) बरळतो, त्यानें हा अभिमान टाकून मागें पाहिलें कीं आपणच नाहींसा होतो. मग गारुडीच नाहींसा झाल्यावर इंद्रजाल कोठें राहील ? मध्यान्ह काळच निघून गेल्यावर मृगजळाभास कोठून राहील ? म्हणून या सर्व भ्रांतीस मिरलेलें, ज्ञानास भिरलेलें, उन्मनीजन्य महासुख प्राप्त होतें. तेंहि सुख वृत्तिजन्य आहे. त्या वृत्तीचा व ज्ञानाचा तादात्म्याभिमान सोडून वृत्तिरहित होऊन उरतां आपोआप सहजीं सहज अनंत निराकार आहे तो आहेच. होणें जाणें नाहीं. हा अनुभव तत्वविचारानें ( सांख्ययोगानें ) तारकाभ्यासानें ( तारकयोगानें ) कळणार नाहीं. यास सद्‌गुरूच्या ऐक्यभक्तिबळानें, त्यांचे प्रेमानंदानें एकपणाहि न स्मरतां, आपल्या पोटांत तो, त्याचे पोटांत आपण, जगांत आत्मा, आत्म्यांत जग या खुणेनेंच जाणण्यास सुसाध्य आहे. वस्तूस जगाची ओळखच नाहीं. आपणच तो आत्मा आहे. मग जगाची भ्रांति कोठून राहणार ? आणि भेदाभेदरहित अभेद्य वस्तुच आपण झाल्यावर ज्यांत अणुरेणूचाहि अभाव त्यांत इह पर, स्वर्ग नरक, बंध मोक्ष, भक्ति उपासना, ज्ञान, गुरु शिष्य, देव भक्त हीं कोठून असणार ? सगळा स्वप्नांचा बाजार आहे ! " ( पु. २—१३५ )

वर जे पंतांचे उद्गार दिले आहेत त्यांवरून हें स्पष्ट दिसून येईल कीं सांख्य व तारक या दोन्हीहि योगांत येणारे अनुभव हे एकदेशीपणाचे असतात; म्हणजे त्यांचे ठिकाणी ' मी अनुभव घेणारा, ' ' मला आत्मदर्शन झालें अगर ब्रम्हसाक्षात्कार झाला ' अशा प्रकारचा एकदेशीपणा कायम असतो. पण ब्रम्हात्मैक्यबोध ठसला म्हणजे एकदेशीपणा नाहींसा होऊन सर्वात्मभाव बाणला कीं, ' मला ब्रम्हसाक्षात्कार झाला, मी मुक्त

झालों' ही भावनाहि नष्ट होऊन जाते. यालाच पंतांनीं अमनस्कयोग अगर ज्ञानयोग म्हटलें आहे. वर जे पंतांचे उद्गार दिले आहेत, ते त्यांनीं आपला अत्यंत प्रिय गुरुबंधु जो कल्याण त्याला सद्गुरु बालमुकुंदांच्या बोधाचें मर्म समजावून सांगतांना काढले आहेत व त्यांत सांख्य व तारक या योगांचें खंडण करून म्हणजे त्यांचा एकदेशीपणा दाखवून अमनस्क योगाचें अगर ज्ञानयोगाचें महत्व वर्णन केलें आहे. यासंबंधीं आणखी एके ठिकाणीं ते म्हणतात, "मी देह ही भ्रांति ज्याची गेली नाहीं, ज्याची देहासंबंधीं आप्त, इष्ट, मित्र, मानापमान, सुख दुःख यांची काळजी तुटली नाहीं, त्यास दुसऱ्या स्वप्नांतील म्हणजे तुर्यदेहांतील अनुभव समजल्यासारखें, त्याचे भ्रांतिभ्रष्टज्ञानास वाटेल. पण त्यांचें सौख्य किमपिहि होणार नाहीं. मग शुद्ध जागृति सहजस्थितीची खूण त्यापासून फारच दूर आणि तुर्यस्थास सहजाची खूण समजल्यासारखी वाटेल, कांहींसा आनंद झाल्याचा भास होऊन तेवढ्यांतच तो कृतकृत्यता मानील. पण सहजस्थितींत आल्याविना वरील खुणेची महती कळणार नाहीं, कीं त्याची सुटका होणार नाहीं. याकरितां युक्तीनें सद्गुरुमुखें सांख्ययोगांत वीर वैराग्य, दृढभक्ति येणें करून तत्वविचार करून मी देह, मी कर्ता, मी भोक्ता, मी सुखी, मी दुःखी, मी पापी, मी पुण्यशलि, या स्वप्नांतून जागे व्हा. मग गुरुमुखें तारकसाधन जाणून उन्मनीदृष्टीनें मी ब्रम्ह, मी मुक्त, मी ज्ञानी, इत्यादि साक्षात्कारसहित दुसऱ्या स्वप्नांतून प्रणवध्वनीसरशीं जागे व्हा; आणि सद्गुरुबालमुकुंदाचे पायीं सर्वाभिमान, सर्वांशीं त्यजून त्याची निजखूण त्याचे युक्तीनें जाणून स्वस्थ राहा. वाचून, पढून, विचार चालवून फक्त भ्रांतींत पडून पुनः देहाभिमानाचें दीर्घ स्वप्न पडेल; मग तुम्हाला जागे करणारा कोणी भेटणार नाहीं! पुन्हां झोंप न यावीशीं औषधें सांगितलीं, सांगतों, सांगेन. तीं सांगितल्या अनुपानानें पथ्य न सोडतां घेत चला. भवरोग पुन्हां जडणार नाहीं हें सत्य, सत्य!!!" (पु. २–१५३)

वर जे पंतांच्या लेखांतील जरा विस्तृत उतारे दिले आहेत त्यांवरून राजयोगांतर्गत सांख्य, तारक व अमनस्क अगर ज्ञानयोग यांच्यासंबंधीं वाचकांना यथार्थ कल्पना येईल असा भरवंसा आहे. पंतांनीं "तारकखंडण" हा जो खुणेचा शब्द आपल्या सनावळींत नमूद करून ठेविला आहे, त्यावरून कल्लेश्वर महाराजांच्या संगतींत तारकयोगाच्या एकदेशीपणाची खात्री होऊन आपण अमनस्क अगर ज्ञानयोगाचा अनुभव घेतल्याचें त्यांनीं दर्शविलें आहे. तसेंच येथें हेंहि लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं जरी पंतांनीं सांख्ययोग व तारकयोग यांचें खंडण झाल्याचें नमूद करून टेविलें आहे, तरी त्यावरून ते योग त्याज्य अगर उपेक्षणीय आहेत अथवा त्यांना ते तसे वाटत होते असा त्याचा अर्थ समजूं नये. तर त्यापासून इतकेंच समजावयाचें कीं हे दोन्ही प्रकारचे योग साधणें हें अंतिम साध्य नव्हे. तर त्यांचा साधन म्हणून सर्वात्मभाव बाणण्याकरितां उपयोग केला पाहिजे.

## कल्लप्पावियोग

१८८२ मध्यें कारवार जिल्ह्यांत कल्लप्पांची बदली झाल्यामुळें ते तिकडे गेले. त्या-

नंतरहि त्यांचा पंतांशीं अध्यात्मविषयासंबंधीं व योगमार्गासंबंधीं पत्रव्यवहार होत असे व ते एकदां बेळगावास येऊनहि गेले. पण पुढें लवकरच त्यांचें देहावसान झालें. पंतांना त्यांच्या संगतींत फार फायदा झाला. बाळप्पांचा वियोग झाल्यापासून पंतांना बिकट परिस्थितींत मार्ग दाखविणारा व धीर देणारा असा कोणी नसल्यामुळें त्यांना चुकल्या-चुकल्यासारखें वाटत होतें. पण कल्लप्पा भेटल्यापासून त्यांच्या विचारांना अधिक चालना मिळून कल्लप्पांच्या रोखठोक व सणसणीत सिद्धांतांच्या योगानें त्यांच्या स्वतःच्या अनुभवाला पक्केपणा येण्यास मदत झाली व त्यांच्या योगशास्त्रांतील ज्ञानाचा व अनुभवाचा पंतांना अपरिमित फायदा झाला. आपण लिहिलेले योगासंबंधींचे व अध्यात्मविषयावरील निबंध पंत कल्लप्पांना वाचून दाखवीत असत. अशा प्रकारचे कांहीं निबंध त्यांनीं कल्लप्पां-जवळ दिले असतां त्यांचेपासून ते एका इसमानें वाचण्याकरितां नेले; पण त्यानें ते पुनः परत आणून दिले नाहींत.

कल्लप्पांच्या संगतीचा पंतांना जो अपूर्व लाभ झाला त्यावरून कल्लप्पांच्या रूपानें प्रत्यक्ष बालावधूतच आपणास भेटले अशी पंतांची भावना झाली व ते कल्लप्पांना फार पूज्य मानून त्यांच्यासंबंधीं वारंवार धन्यत्वाचे उद्गार काढीत. कल्लेश्वररूपानें भेट-लेल्या बालावधूतांना त्यांनीं जी वाक्सुमनांजुलि प्रेमभरानें अर्पण केली तिच्यांतील अव-शेष राहिलेलीं कांहीं वाक्सुमनें त्यांच्या वाङ्मयोद्यानांत इतस्ततः विखुरलेलीं असून वाच-कांना त्यांचा आमोद सेवन करण्यास मिळतो. कल्लप्पांचा वियोग झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं लिहिलेल्या आपल्या "बोधानंदगुटिका" नावाच्या निबंधांत पंतांनीं "कल्लेश्वर महाराज दया कर । बालमुकुंद महाराज प्रभो" असें म्हणून कल्लेश्वरांना सद्गुरु बाल-मुकुंदांच्या शेजारचें पूज्य स्थान दिलें आहे. तसेंच त्या निबंधांत प्रथम राजयोगांतील अष्टांगांचा निर्देश करून व नंतर सांख्य, तारक व अमनस्क ( तत्वविचार, साक्षात्कार व ऐक्यपद ) या योगांसंबंधीं विवेचन करून अखेर पंतांनीं असें सांगितलें आहे कीं, "वर लिहिलेली बोधानंदगुटिका अनेक शास्त्रें, पुराणें, श्रुति, वेदवेदांगांचे आधारानें केलेली असून याप्रमाणें साधून प्राप्तपुरुष झालेल्या महापुरुषाची साक्ष घेतली आहे. सर्वांस हात धरून पुढें नेणारा, महाज्ञानखड्गानें साधकसंशयवनाचा एके क्षणांत विध्वंस करणारा, हातोहातीं उन्मनी करून देणारा, पूर्ण अद्वैत आरूढपदास पोंचलेला, आपल्या दर्शन, स्पर्शन, संभाषण, सान्निध्यानें अज्ञजनांस भवसागरांतून अचूक पार कर-णारा, श्रीगुरु अविरल परंज्योति सच्चिदानंद नित्य परिपूर्ण समर्थ कल्लेश्वर महाराज यांच्या स्वानुभवसिद्धांतांचें सार लिहिलें आहे." ( पु. २-८१ ).

पंतांनीं वरील प्रकारच्या शेलक्या विशेषणांनीं ज्या कल्लेश्वर महाराजांचा गौरव करून उपकारस्मरण केलें त्यांचा अधिकार किती मोठा असेल याची वाचकांना सहज कल्पना होईल. अशा प्रकारचे कल्लप्पांसंबंधींचे गौरवपर उद्गार ते वारंवार काढीत असत.

कल्लप्पांचा वियोग झाल्यानें पंतांना फार दुःख झालें व आपला एक जिवलग सखा व कळकळीचा वाटाड्या नाहींसा झाल्याप्रमाणें वाटून कांहीं दिवस चुकल्याचुकल्यासारखें

झालें. त्या वेळेच्या आपल्या स्थितीचे निदर्शक असे त्यांनीं सद्गुरूला उद्देशून पुढील उद्गार काढले आहेत, " तूंच कल्लेश्वररूपानें भेटून योगानंदांत सुखविलेंस. पण तूं पुनः पश्चिम सागरास (कारवारकडे) गमन केलेंस तेव्हां पूर्ववत मजला मस्ती चढून व्यसनाच्या तडाख्यांत सापडून तळमळूं लागलों." ( पु. २–१६४ ).

कल्लप्पांचें दर्शन झाल्यापासून त्यांचा वियोग होईपर्यंतच्या कालावधीला (१८८०-८२). पंतांनीं एके ठिकाणीं " कल्लेश्वरयुग " असें म्हटलें आहे व त्या युगांतील विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे " तारकसाक्षात्कार " असें नमूद करून ठेविलें आहे. या एकाच गोष्टीवरून पंतांच्या आध्यात्मिक जीवनांत त्यांना कल्लप्पांच्या सुमारें दोन वर्षांच्या सहवासांत किती अपरिमित फायदा झाला असेल यासंबंधीं यथार्थ कल्पना होते.

## तारक-ऱ्हास

कल्लप्पा बेळगावाहून कारवारला गेल्यापासून पंतांचें योगमार्गाकडील लक्ष कमी कमी होत गेलें व नादबिंदुकलात्मक तारकसाक्षात्काराकडे दुर्लक्ष होऊं लागलें. उलट त्यांच्या-ठिकाणची बोधस्फूर्ति अधिकाधिक प्रभावशाली होत जाऊन भजनलालसा वृद्धिंगत होत चालली. तसेंच त्यांचे गुरुबंधु व शिष्य यांच्यापैकीं ज्यांनीं योगसाधनाचा अभ्यास करून तारकयोगांतील नादबिंदुकलात्मक कांहीं अनुभव घेतले होते त्यांपैकीं कांहींजण स्वतंत्रपणें योगाभ्यास करूं लागून अभिमानाला बळी पडले व मोहवश झाले; आणि तेव्हां-पासून त्यांची पंतांवरची निष्ठा कमी कमी होत गेली व त्यांच्या ठिकाणीं पंतांविषयीं मत्सर व द्वेष या दोन विषवृक्षांचें बीजारोपण होऊन त्यांचे अंकुर अधिकाधिक जोरावत चालले. कल्लप्पांचा वियोग झाल्यावर तारक-ऱ्हास होऊन काय प्रकार झाला यासंबंधीं एके ठिकाणीं सद्गुरूला उद्देशून पंत म्हणतात " मग त्याचे ( कल्लेश्वराचे ) संगतीनें कांहीं दिवस खेळ-वून, तारकमद मस्तकास चढतांच पुत्रबंधूंचें स्फुटीकरण होऊन पुनः तुझे अगम्य माया-विलासांत अडकवून लोकापवाद, मनउदासीनता, इत्यादिकांनीं तळमळावयास लावून सगळी मस्ती मोडून टाकिली आणि अशा द्वैतवनांत संचार करितांना वाचामृतखड्ग हातीं धरण्यास धाऊन येऊन उपदेश केलास." ( पु. २–२५३ ).

येथपर्यंत तारकयोगांतील पंतांच्या अनुभवांसंबंधीं त्यांच्याच वचनांच्या आधारानें जें विवेचन केलें आहे त्यावरून वाचकांच्या हें लक्षांत आलें असेल कीं हें योगसाधन अनुभवी गुरूच्या सान्निध्यांत अगर त्यानें सांगितल्याप्रमाणें केल्यासच उन्मनीआनंद प्रणवैक्यस्थिति वगैरे प्रकारचे अनुभव घेतां येतात. तसें न केल्यास त्यापासून अनिष्ट परि-णाम होण्याचा फार संभव असतो. याकरितां तारकयोगांतील अनुभव घेऊं इच्छिणाऱ्या साधकांना पंतांनीं पुढील इषारा दिला आहे, तो असा–" हा अनुभव जीवभाव धरून, साधनाभिमान धरून, वाचून, पुस्तक साहाय्यानें अगर अननुभवी गुरूचे सांगण्यानें साधूं म्हटल्यास घात होईल; प्रत्यय कधींहि येणार नाहीं; एकादें भयंकर कांहीं दृष्टीस पडेल; ऊर फुटून दुखणें लागेल; किंवा वायु भलत्या नाडींत शिरून फजिती होइल. याची किल्ली जाणत्याकडून जाणून, त्यासच अनुभव सांगून त्याचे नजीकच साधावा. गुरूचे ठायीं पूर्ण अंतःकरण ठेवावें. स्मरणासरशीं हजर होणाऱ्या सद्गुरूचीं पाउलें हृदयीं स्थापावीं." ( पु. २–१४८ )

# प्रकरण १६ वें

———×———

## आपसांत फाटाफूट; मनस्ताप; सत्संगतीचा लाभ

पंतांना सद्‌गुरूंचा वियोग झाल्यापासून त्यांचें लग्न होईपर्यंत त्यांचीं सुमारें चार पाच वर्षें प्रपंचदृष्ट्या व परमार्थदृष्ट्या स्थिरस्थावर करण्यांत गेलीं. लग्न झाल्यानंतर लौकरच त्यांनीं आपल्या मातोश्री व कुटुंब यांना बेळगावास आणल्यामुळें त्यांच्या पाठी-मागचा स्वयंपाक करण्याचा त्रास कमी झाला व त्यांचे बंधु घरांतील बाजारहाट वगैरे कामें पाहूं लागल्यामुळें त्या बाबतींतहि त्यांची पुष्कळशी सुटवणूक झाली. तसेंच कृष्टप्पा गोकाककरांच्या घरांतलि त्यांच्या बिऱ्हाडाची जागा जरा मोठी असल्यामुळें एका खोलींत दत्ताचा फोटो मांडून तेथें रोज संध्याकाळीं भजन व आरती करण्यास सुरवात झाली व त्यांच्या शिष्यांची व भक्तांची संख्याहि वाढत चालली. तसेंच मागील एका प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें बाबा कुडची ऊर्फ कुडचीवीर यांच्या शिष्यमंडळींपैकीं दादा सावनूर, कृष्टप्पा पाच्छापूरकर, निळकंठराव नाडगौडा, रावजी कुळकर्णी वगैरे मंडळींची पंतांवर भक्ति बसली व ते पंतांना बाबांच्या ठिकाणीं मानून त्यांच्या मंडळींत भजनपूजनादि कार्यक्रमांत मिसळूं लागले. अशा रीतीनें पंतांचा भजनक्रम अधिक जोरानें चालू झाला व भजनाच्या वेळीं टिपरी खेळण्यास सुरवात झाली. अशा परिस्थितींत पंतांना आपल्या आवडीच्या विषयांत रमण्यास पूर्वीपेक्षां अधिक अवसर मिळूं लागून त्यांचा उत्साह दुणावला. त्यांच्या अत्यंत आवडीचा व जिव्हाळ्याचा विषय म्हणजे सद्‌गुरुसेवा हा होता आणि तेव्हांपासून शाळेंतील नोकरी व व्यवहारांतील ओघप्राप्त कर्तव्य हीं सांभाळून त्यांनीं आपणास सद्‌गुरुसेवेला पूर्णपणें वाहून घेतलें. अशा रीतीनें त्यांची गृहस्थिति त्यांच्या अंगीकृत कार्याला अनुकूल होत चालली खरी; पण १८८२ अखेर त्यांची बाह्य परिस्थिति चिंताजनक व त्रासदायक बनत चालली. दिवसेंदिवस त्यांच्या शिष्यांची व भक्तांची संख्या वाढत चालली व जसे बेळगावांत तसे दड्डीलाहि त्यांचे बरेच शिष्य झाले व त्यांच्या अनुयायांत भिन्न भिन्न वृत्तींच्या व भिन्न भिन्न व्यवसायांतील लोकांचा समावेश होऊं लागला. त्याचप्रमाणें त्यांनीं कांहीं मंडळींना ध्यानधारणादि योगसाधनाचा अभ्यास करण्यास सांगितल्यामुळें अशा मंडळींचा एक निराळाच वर्ग झाला; निदान त्यांपैकीं कांही जणांना तरी तसें वाटूं लागून ' ग ' ची बाधा झाली. अशा प्रकारें १८८२ मध्यें पंतांच्या अनुयायांत त्यांचे गुरुबंधु, त्यांचे शिष्य व त्यांना पूज्य अगर गुरूंच्या ठिकाणीं मानणारी भक्तमंडळी यांचा समावेश झालेला होता. त्यांपैकीं प्रत्येक वर्गांतलि व्यक्तींचें पंतांजवळचें नातें निरनिराळें होतें व प्रत्येक वर्गांत भिन्न स्वभावांच्या, भिन्न रुचींच्या व भिन्न विचारांच्या व्यक्ति होत्याच. तेव्हां आपला शिरकाव करण्यास असली अनुकूल भूमि मिळाल्यावर कलिराज स्वस्थ बसणें शक्य नव्हतें!

व त्यांचा प्रवेश होण्याला प्रयासहि नको होते; कारण मागें उल्लेख केल्याप्रमाणें बालमुकुंद कर्डेगुद्दीस असतांनाहि त्यांचे कांहीं शिष्य पंतांचा द्वेष व मत्सर करीत होते. तेव्हां बालमुकुंद दृष्टिआड झाल्यावर व पंतांचें पंथविस्ताराचें कार्य सुरू झाल्यावर त्यांच्या संबंधीं कांहीं मंडळींना द्वेष व मत्सर वाटणें जवळ जवळ अपरिहार्यच होतें. त्याप्रमाणें १८८२ अखेर त्यांच्या मंडळींत मतभेद होण्यास सुरवात होऊन, प्रकरण १५ मध्यें सांगितल्याप्रमाणें, मत्सर व द्वेष या विषवृक्षांचें बीजारोपण झालें व त्यांच्यांत फाटाफूट होण्यास सुरवात झाली. प्रथम ही सुरवात कृष्णराव व त्यांचा भाऊ गणू यांच्यापासून झाली.

कृष्णराव हे बोलून चालून पंतांचें गुरुबंधु व त्यांच्यावर पंतांच्या आधीं बालमुकुंदांचा अनुग्रह झालेला. तेव्हां स्वाभाविकपणें त्यांच्या ठिकाणीं स्वतंत्रपणें वागण्याची प्रवृत्ति होती. ज्याप्रमाणें गोपाळ भागोजीकोप, वेंकोबा व परशराम हे गुरुबंधु पंतांनाच आपला पुढारी अथवा वडील भाऊ समजून त्यांच्याशीं त्या नात्यानें वागत असत, तसा प्रकार कृष्णरावांचा नव्हता. तसेंच त्यांचा भाऊ गणू याला जरी पंतांकडून अनुग्रह झालेला होता तरी त्याच्या ठिकाणींहि त्यांच्याबद्दल 'गुरु' म्हणून जितकी पूज्यबुद्धि असावयास पाहिजे होती तितकी नव्हती. कृष्णराव आणि गणू हे बंधु व त्यांच्या कलानें वागणारी गंगाराम वगैरे कांहीं मंडळी हे पंतांची उघडउघड निंदा करूं लागले व त्यामुळें त्यांचा पंतांजवळचा संबंधहि कमी कमी होत चालला. अशा रीतीनें ज्या ठिकाणीं बालमुकुंदांच्या बोधाप्रमाणें आत्मशांति, सद्‌गुरुभक्ति व बंधुप्रीति यांचें साम्राज्य असावयाचें त्या ठिकाणी अशांति, गुरुविन्मुखता व असूया या कैदासणींचा शिरकाव झाला व त्यांनीं पंतांची शांति व त्यांच्या ठिकाणचा बोध यांना कसाला लावण्यास सुरवात केली. त्यायोगें आत्मानुभवाचें दृढीकरण करण्याचें पंतांचें कार्य अधिक नेटानें सुरू झालें व सद्‌गुरुमायेनें दिलेलें बोधखड्ग वापरण्यास त्यांना अधिकाधिक अवसर मिळत गेला.

पंतांना आपल्या गुरुबंधूंबद्दल व शिष्यांबद्दल किती प्रेम वाटत असे व त्यांच्या उन्नतीबद्दल त्यांना किती कळकळ वाटे, या संबंधीं श्रीदत्तप्रेमलहरीपुष्पमालेंतील पुष्प ४ मध्यें त्यांनीं आपला गुरुबंधु हणमू दड्डीकर याला लिहिलेलीं जीं पहिलीं तीन पत्रें छापलीं आहेत त्यांवरून थोडीशी कल्पना होईल. तेव्हां त्यांचे गुरुबंधु कृष्णराव व शिष्य गणू यांच्यासंबंधीं त्यांना अतिशय प्रेम वाटत होतें हे सांगणें नकोच. त्यांतल्या त्यांत कृष्णराव हे त्यांचे वर्गबंधु, गुरुबंधु व आप्तसंबंधी असल्यामुळें ते व त्यांचा भाऊ गणू यांच्याबद्दल पंतांना विशेष प्रेम व आपलेपणा वाटे. ते पंतांपासून फटकून वागूं लागल्यापासून त्यांना कांहीं दुर्वर्तनी माणसांची संगति लागून सन्मार्ग सुटत चालला व या गोष्टीबद्दल पंतांना अतिशय दुःख झालें. त्यांनीं ता. १०-९-१८८२ रोजी गणूला लिहिलेल्या पत्रावरून त्याच्या त्यावेळच्या स्थितीची व त्याच्या कल्याणाकरितां तिळतिळ तुटणाऱ्या पंतांच्या अंतःकरणाची कांहींशी कल्पना करितां येते. त्या पत्रांत पंत म्हणतात "अरे काय चमत्कार ! आरंभापासून तुझा माझा प्रेमोल्हास किती ! तूं आपली माता, बंधु इत्यादि मला मानून तृप्त होतास. तुजला चांगल्या मार्गास लावावें, इहपरलोकीं तूं धन्य व्हावेंस

म्हाच मुख्य हेतु ध्यानीं धरून केव्हां केव्हां तुला मायलेकरांच्या नात्यानें कडक हुषारीहि देत होतों. तें तूं निमूटपणें ऐकून किंचितहि विषाद मनीं आणिला नाहींस. असा प्रकार असतांना आतां दुर्जनांची संगत धरून, दुष्ट वाक्यें ऐकून, दुष्ट मार्गांचें अवलंबन करून सज्जनांची संगत, सच्छास्त्रश्रवण, सन्मार्ग यांचा वीट मानूं लागलास. धन्य आहे तुझी !" अशा प्रकारें सुरवात करून त्याचा अधःपात कसा होत होता तें अगदीं स्पष्ट, कडक व जिव्हाळयाच्या भाषेंत दाखवून देऊन अखेर ते म्हणतात, "हें काय मांडलेंस ! सद्गुरु बालमुकुंदांचीं सिंहासारखीं वाक्यें कोल्ह्यांनीं गिळल्यासारखीं केलींस ! (कल्लप्पाचें) अति तीक्ष्ण प्रज्वलित ज्ञानखड्ग दुर्जनाच्या बोथलोण्यानें मोडून पडलें काय ? हुषारहो; माघारा परत, आणि पूर्ववत् श्रीसमर्थावर पूर्ण हवाला ठेवून त्याचा बोध ध्यानीं धरून वाग; कल्याण होईल. तुझा अखंड कल्याण चिंतणारा दत्त." ( पु. ४–६५ )

कृष्णराव व गणू हे बंधु बेळगाव येथील मंडळींत प्रमुख होते व इतर बरीच मंडळी त्यांच्या तंत्रानें चालणारी होती. त्यामुळें ते पंतांपासून फटकून वागूं लागल्याबरोबर त्यांच्या छापेंतील मंडळींनीहि तेंच धोरण स्वीकारलें व त्यांनीं पंतांजवळचा संबंध जवळ जवळ सोडल्यासारखाच केला. अशा रीतीनें बाळप्पांच्या वियोगानंतर पंतांनीं ज्यांच्यावर जिवापलीकडे प्रेम करून व ज्यांना वेळोवेळीं बोध करून सांख्य, तारक व अमनस्क योगांतील अनुभव घेण्यास शिकविलें त्यांच्या ठिकाणीं दुजाभाव उत्पन्न होऊन त्यांनीं आपली निंदा करण्यास व नावें ठेवण्यास सुरवात केल्याचें पाहून पंतांना अतिशय वाईट वाटून भयंकर मनस्ताप झाला व या परिस्थितीचा उल्लेख त्यांनीं आपल्या सनावळींत " बालसमूह अभिमानारूढ ", " गुरुविन्मुखता, " " बालवियोग", "पुत्रबंधूंचें स्फुटीकरण, "शांतिखंडण " व " आपसांत मारामारी " या शब्दांनीं केला आहे.

याप्रमाणें कांहीं मंडळींनीं जरी पंतांची संगत सोडली तरी गोपाळ भागोजीकोप व वेंकटेश ऊर्फ कल्याण या दोघां गुरुबंधूंचें त्यांच्यावरील प्रेम व निष्ठा हीं कायम होतीं व परशरामहि त्यांना धरून होता. वेंकटेश ऊर्फ कल्याण हा पोस्टखात्यांत नोकर असून या सुमारास त्याची बदली विजापुरास झाली होती. त्यामुळें त्याच्याशीं पंतांचा पत्रव्यवहार चालू असे. जून १८८३ मध्यें विजापुरास गेल्यावर आपणास चैन पडत नाहीं व उद्विग्नता वाटत आहे अशा मजकुराचें " कल्याण " चें पत्र आल्यावर पंतांनीं त्याला ता. १७–६ १८८३ रोजीं जो जबाब पाठविला त्यांत ते लिहितात, " हल्लींची ( तुझी ) उद्विग्नता समजून फार वाईट वाटतें, उपाय नाहीं. लढाईंत गेल्यापासूनच शूरपणाची खात्री होणार आहे. कसाहि प्रसंग पडो, कशाहि अडचणी येवोत, कितीहि दुःसंग प्राप्त होऊं देत. अनेक प्रकारें प्रतिकूलता येऊन वेढिली तरी " येल्ला ठाविनल्लि नन्न हिंडी " ( सर्वत्र मला पहा ) हें अमृतवाक्य ध्यानीं दृढ राखून, आपला जो क्रम तो सतत चालवावा. वरील वाक्य लक्षांत टेविलेंस कीं सर्वच अनुकूल आहे. सर्वत्र त्याचीच संगत आहे. स्थलांतर झालें तरी माझें अंतरंग पूर्णपणें तुमचेकडे जडलें आहे. धन्य तुमची मैत्री कीं तुमच्याशिवाय माझें मन कोणींच घेतलें नाहीं ! तुमच्याकडे मनाची ओढ फार आहे. असें पूर्ण प्रेम मिळवि-

ण्याची भक्तिकिल्ली ती तुम्हींच साधिली. इतरांस असाध्य आहे. अंतरीच्या खुणा जाणणारे तुम्ही आणि गोपाळाविना अन्य नाहीं." आणखी त्या पत्रांत पंत पुढें लिहितात, "दर-रोज गोपाळाच्या माडीवर गोपाळ आणि मी देघेच समर्थविचार करीत असतों. तुम्हांस सांगितल्याप्रमाणेंच सर्वसंगविदुर झालों आहोंत. आतां कोणीच ढुंकून पाहात नाहीं. सर्व जिकडे तिकडे गुंतून गेले. निराळा झालों. सदा शांतिमद्य पिऊन, गुरुस्मरणभांग ओढून शिवयोगखोलींत स्वस्थ असावें. कोणत्याहि रीतीनें कर्तृत्वास बळी पडूं नये. वाचामृत केव्हांहि नजरेपुढें राहूं दे." त्या पत्रांत पंतांनीं आणखी असें लिहिलें आहे कीं, "आतां नित्य शाळा सुटल्यापासून रात्रीं ८ वाजेपावेतों अष्टेकर यांच्या माडीवर मॅथेमॅटिक्सचा ( गणित विषय शिकविण्याचा ) क्लास काढला आहे. आठवले, दड्डी, केळकर हे येतात, त्यामुळें संग-संयोग आपोआप तुटून अलग राहिलों." ( पु. ४–७४ )

अशा रीतीनें सन १८८३ सालीं पंतांच्या गुरुबंधु व शिष्य मंडळींपैकीं बेळगाव येथील बऱ्याच मंडळींनीं त्यांची संगत सोडली व ते आणि गोपाळ हे अलग राहून एकांत-वासांत सद्गुरुचिंतनांत काळ घालवूं लागले आणि पंतांनीं या संधीचा फायदा घेऊन द्रव्यार्जनाचें साधन म्हणून गणितविषय शिकविण्याचा खाजगी वर्गाहि सुरू केला.

अशा परिस्थितींत पंतांनीं आपल्या विरुद्ध असलेल्या कांहीं मंडळींची समजूत घालून समेट घडवून आणण्याचा बराच प्रयत्न केला. ता. २७ जून १८८३ रोजीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात, "तुम्ही गेल्यानंतर रात्री बापूच्या घरीं एकदां, गोंबीच्या ( वेंकोबा ) घरीं चार वेळां मंडळी मिळविली होती. तींत तिघांना मुळींच बोलाविलें नाहीं. अशा प्रकारें तिघांची संगत, विशेष दर्शन, जाणेंयेणें, भाषण हीं फारच थोडीं चालतात. उभयतांच्या मतें ठरल्याप्रमाणें बहुतेक प्रकार घडून आला आहे. नित्य गोपाळाच्या माडीवर जात असतों. तेथें दुसरें कोणीच येत नाहीं." येथें उल्लेख केलेले बापू व वेंकोबा गोंबी हे पंतांचे शिष्य होते. त्यांच्या घरीं मंडळी जमवून समेट घडवून आणण्याचा त्यांनीं प्रयत्न केला, पण त्यांत यश आलें नाहीं. ज्या तिघांना या वाटाघाटीच्या वेळीं बोलाविलें नव्हतें ते म्हणजे कृष्णराव, गणू व गंगाराम हे असावेत. या मंडळीं-संबंधीं त्याच पत्रांत पंत म्हणतात "प्रत्येक आपापल्या समजुतीप्रमाणें स्वतंत्र आणि आनंद समजून देहाचे पाठीं लागून, जग सत्य मानीत, महा अंधःकूपाचा रस्ता धरून चालत आहे. दुष्कृतापुढें उपाय नाहीं. पश्चात्तापाचा मोडदेखील नाहीं. सर्वांशीं त्यांच्या प्रमाणेंच वर्तन ठेविलें आहे. कोणाशीं वक्रता अगर कठोरता नाहीं. निंदा करणारे आणि स्तुति करणारे एका पंक्तींतच जेवतात. कारण "येल्ला ठाविनल्लिनन्नहिडी" ( सर्वत्र मला पहा ) असें समर्थवाक्य आहे. त्यास अनुसरून श्रेष्ठ–किंचित्भाव सांडून नित्या-नंदीं अनेक साधनांपेक्षां समर्थचिंतन अनन्यभक्ति श्रेष्ठ आहे. ती जर पूर्ण साधली तर इतर क्षुद्र साधनांची गरज नाहीं, हें लक्षांत असावें." याप्रकारें वर्णन करून त्याच पत्रांत पंत म्हणतात, "येथील उलट प्रकार भक्तिन्यूनता पाहून तसींच कापट्य–मैत्री पाहून वरचेवर उभयतां १५ दिवस फिरतीवर गेलों होतों. तो काळ आठवतो."

तसेंच ता. ८-८-१८८३ रोजीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात, " येथील साधक मनानंदांत मस्त आहेत. सुस्तपणा जात नाहीं. " याप्रमाणें त्या सुमारास पंतांच्या भोंवतालीं द्वेषाग्नि व मत्सराग्नि पेट घेत होते व त्यांना त्यांच्या ज्वाळांचा दाह सोसावा लागत होता. तरीपण त्यांची शांति ढळली नाहीं.

१८८२ सालीं पंतांचे सर्व भाऊ शिक्षणाकरितां बेळगावास त्यांचे जवळ आले. गोपाळ व नाना यांची इंग्रजी ४ थी इयत्ता पास होऊन ते पाचवींत गेले व गोपाळाचा पहिला नंबर येऊन त्याला शाळेंत स्कॉलरशिप मिळूं लागली. गोविंदाच्या इंग्रजी पहिल्या तीन इयत्तांचा अभ्यास पंत, गोपाळ व नाना यांनीं घरींच पुरा करून घेतला व १८८३ सालीं त्याचें नाव लंडन मिशन स्कूलमध्ये ४ थ्या इयत्तेंत घातलें. पण त्याचें अभ्यासाकडे फारसें लक्ष नसे. त्यासालीं ४ थ्या इयत्तेंत तो नापास झाला. पण पंतांनीं त्याच्या वर्गाच्या शिक्षकाची समजूत घातली व आपण त्याचे कच्चे असलेले विषय घरीं शिकविण्याची हमी घेऊन १८८४ च्या सुरवातीस त्याचें नाव ५ व्या इयत्तेंत घातलें. त्यासालीं वामन व नरसू हे दोघे इंग्रजी पहिल्या तीन इयत्तांचा अभ्यास घरीं करीत होते व शंकर घरींच मराठी शिकत होता.

१८८४ सालीं पंतांनीं शहापूरच्या रस्त्यावरील गोकाककर यांच्या घरांतील बिऱ्हाड सोडून देशपांडे गल्लींत भास्करराव कोट याचे घरांत बिऱ्हाड केलें व सर्व मंडळींसह ते तेथें राहूं लागले. या सालीं गोपाळ, नाना व काका घाणेकर हे इंग्रजी सहाव्या इयत्तेंत होते. गोपाळ व नाना या दोघांचाहि अभ्यास चांगला होता. पण गोविंदाचा अभ्यास चांगला नसल्यामुळें त्याच्या वर्गाचे शिक्षक पंतांकडे नेहमीं तक्रार करीत. तेव्हां पंतांनीं त्याला घरीं इंग्रजी शिकविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला व ते कधीं कधीं मारहि देत. पण त्याचा फारसा परिणाम होत नाहींसें पाहून एके दिवशीं त्यांनीं त्याला विचारलें कीं, " गोविंदा, तुझ्याकडून अभ्यास होईल कीं नाहीं तें स्पष्ट सांग. होत नसल्यास विनाकारण तुला व इतरांना त्रास कां ? " तेव्हां त्यानें धीर करून " इंग्रजी माझ्या तोंडाला लागत नाहीं " असें सांगितलें. तेव्हां पंत म्हणाले, " इंग्रजी जर तुझ्या तोंडाला लागत नाहीं तर तूंहि त्याच्या तोंडाला न लागतां श्रीदत्ताचे भजन करीत जा. " तेव्हांपासून गोविंदा शाळेंत जाण्याचा बंद झाला व घरांतील व्यवस्था पाहूं लागला. त्यानें सकाळ संध्याकाळ श्रीदत्ताच्या फोटोपुढें भजन करण्याचा क्रम सुरू ठेविला व त्याचा स्वभाव गरीब व प्रेमळ असल्यामुळें व कंठ मधुर असल्यामुळें भजन हाच त्याच्या आवडीचा विषय होऊन बसला. त्याचें भजन पंतांना फार आवडत असे. गोपाळ व नाना हे दोघेहि हुषार असल्यामुळे त्यांच्या अभ्यासाकडे पंतांचें विशेष लक्ष असे व ते त्यांना निबंध लिहिण्यास सांगून ते तपाशीत असत. काकाचें अभ्यासाकडे फारसें लक्ष नसे व तो शाळेंतहि नित्य नियमानें जात नसे. मात्र एखादे वेळीं पंत रागावल्यास गुरुचरित्राच्या सप्ताहाप्रमाणें कच्चा असलेल्या विषयाचा तो सप्ताह करीत असे. अशा रीतीनें तो कसा तरी एकेक इयत्ता वर चढत गेला.

सन १८८४ सालीं बेळगावमधील सुप्रसिद्ध श्रीमारुतीचे देवळाच्या माडीवर धार्मिक विषयांची चर्चा करण्याकरितां सभा होत असत व निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें होत. तेव्हां एके दिवशीं आपणहि त्या सभेंत भाषण करावें असें नानाच्या मनांत येऊन त्यानें ती गोष्ट पंतांना सांगितली. तेव्हां पंतांनीं त्याला प्रोत्साहन दिलें. त्याप्रमाणें नानानें शनिवार ता. २८ जून १८८४ रोजीं मारुतीच्या देवळांतील सभेंत भाषण केलें. तें चांगलें वठलें व त्याची वाहवा झाली. त्यामुळें पंतांना तसेंच त्यावेळीं बेळगावास असलेले नानाचे वडील श्रीपादपंत यांना व इतर मंडळीला फार आनंद झाला. दुसऱ्या दिवशीं म्हणजे रविवारीं श्रीपादपंत दड्डीस गेले. तेव्हां त्यांना पोचविण्याकरितां नाना कंग्राळी नदीपर्यंत गेला होता. तिकडून परत आल्यानंतर त्याला ताप आला व तो विषम ज्वर होता. पुष्कळ उपचार केले तरी कांहीं गुण आला नाहीं व बुधवार ता. २ जुलै १८८४ रोजीं नानाचा अंत झाला. रविवारीं मामांची पाठ फिरल्यानंतर तिसऱ्याच दिवशीं हा काळाचा घाला पडल्यामुळें पंतांना परमावधीचें दुःख झालें. ज्या मामांनीं पंतांचें व त्यांच्या बंधूंचें पुत्रवत पालन करून आपल्या देखरेखीखालीं त्यांचें प्राथमिक शिक्षण पुरें केलें, त्या मामांचा लग्न झालेला वडील मुलगा आपल्याजवळ इंग्रजी शिकण्याकरितां राहिलेला असतां इतक्या तडकाफडकीं कालाधीन झाला या गोष्टीनें पंतांना वाईट वाटून ते इतके उद्विग्न झाले कीं त्यांना ती दुःखकारक बातमी दड्डीस मामांना कळविण्याचेंहि प्रथम धैर्य झालें नाहीं. पण अखेर अपरिहार्य म्हणून त्यांना तसें करणें भाग झालें. देशपांडे गल्लींतील कोट यांचे घरांत राहावयास आल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं नाना वारल्यामुळें पंतांनीं तें बिऱ्हाड सोडून महादेव गल्लींत त्यावेळचे सरकारी वकील महेश्वरपंत गाडगीळ यांच्या घराशेजारीं येरुळकर यांचें घर भाड्यानें घेतलें व तेथें सर्व मंडळीसह ते राहूं लागले.

पंतांना कल्लप्पांचा वियोग झाल्यापासून कांहीं मंडळी त्यांचा द्वेष व निंदा करूं लागल्यामुळे त्यांना फार मानसिक त्रास सोसावा लागत होता. त्यांतच नाना अकस्मात वारल्यामुळें त्यांना फार दुःख झालें. पण तशा स्थितींत "तूं असल्या ठिकाणींच सत्पुरुषाची भेट होऊन खूण मिळते बघ", या सद्गुरु बालमुकुंदांच्या वचनाप्रमाणें त्यांना एका अधिकारी संन्याश्याच्या सत्संगतीचा लाभ झाला. यासंबंधीं पंत म्हणतात, "माझा बाळप्पाहि गेला, कल्लप्पाहि दुसरीकडे गेला. तेव्हां मला सत्संगति नसल्यानें मी रोज भजनाचे वेळीं दत्ताजवळ प्रार्थना करीत असें कीं मला सत्संगति मिळावी. तेव्हां एके दिवशीं रात्रीं मला एका संन्याश्याचें दर्शन झालें व आपण बाळप्पाचे गुरुबंधु असल्याचें त्यानें सांगितले, तेव्हां मी त्याचे पाय घट्ट धरिले व तो कल्लप्पांना कानडींत म्हणाला कीं, "कोणी कांहीं करो, बाळप्पाचा सोटा व षण्मुखी यांशिवाय हें काम व्हावयाचेंच नाहीं." हें ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें व आनंद झाला आणि "हा कोण माझ्या बाळप्पाला जाणणारा !", असें म्हणून मी त्याचे पाय घट्ट धरिले. त्या स्वप्नांत जसा मी त्या संन्याश्याला पाहिला होता तसाच एक संन्यासी मला प्रत्यक्ष दिसला. त्याचे डोळे तेजस्वी, शरीर सडपातळ व बांधेसूद,

दाढी वाढलेली व डोक्यावर जटा बांधलेली होती. त्याला पाहतांच मला प्रेमाचें भरतें आलें व त्यानेंहि तें ओळखिलें व " आपण माझ्या घरीं येऊन राहा ", असें म्हणतांच तो कबूल झाला व वर्ष दीड वर्ष माझे घरीं राहिला. नित्य शाळा सुटून घरीं आल्याबरोबर मी त्याचेपाशीं जाऊन बसत असें व रात्रीं त्याच्या खोलींत भजन करीत असें. तेव्हां त्याला आनंद होत असे. तो सर्व हिंदुस्थानभर फिरलेला, व्यवहारांत व सर्व तऱ्हेच्या विद्यांत हुषार, चतुर, औषधींचें ज्ञान असलेला, सर्व तऱ्हेच्या बावांशीं मिसळलेला, सर्व योग साधलेला, व्यापार व नोकरी केलेला असून त्यानें आपली सर्व संपत्ति वाटून टाकून संन्यास घेतला होता. " नंतर त्याचा वर्तनक्रम व त्याचे गुणवर्णन करून पंत म्हणतात कीं " एके दिवशीं ' मी गावास जातों. दत्ताप्पास बोलवा ' असें म्हणून तो जो समाधिस्थ बसला तो तसाच त्यानें देह ठेविला. " ( पु. ८–१५ ) त्याचें उत्तरकार्य पंतांनींच केलें.

१८८२ अखेर पंतांच्या पुत्रबंधूंचें स्फुटीकरण होऊन जी असमाधानकारक परिस्थिति निर्माण झाली तिचा परिणाम असा झाला कीं, त्यांना वारंवार सद्गुरूच्या आठवणा येऊन त्याच्या भजनाची लालसा अधिक वाढली व दृष्टि अंतर्मुख होऊन स्वानुभवाचें निरीक्षण सुरू झालें. तसेंच त्यांचा जो फुरसुदीचा वेळ गुरुबंधु व शिष्य यांच्या संगतींत जात असे तो मोकळा मिळूं लागल्यामुळें वामनपंडितांची यथार्थदीपिका, ज्ञानेश्वरांची भावार्थदीपिका व अमृतानुभव वगैरे ग्रंथ मननपूर्वक व चर्चा करून वाचण्यासहि अवसर मिळाला व लेखनाकडे दृष्टि वळली. एकीकडे योग्य अधिकारी अशा मुमुक्षूंना अनुग्रह देण्याचें त्यांचें कार्यहि चालूच होतें. पंतांच्या आयुष्यांतील हा भाग अत्यंत महत्वाचा समजला पाहिजे. कारण त्यांच्या ठिकाणची काव्यस्फूर्ति याच संधीस निर्माण झाली व आपल्या ठिकाणचे आध्यात्मिक अनुभव व स्वानुभवानें पक्के झालेले सिद्धांत व विचार लिहून ठेवण्यास याचवेळीं सुरवात झाली.

# प्रकरण १७ वें

—————— :०: ——————

## भजनलालसा व काव्यस्फूर्ति

मागील प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें 'पुत्रबंधूंचें स्फुटीकरण' होऊन जेव्हां पंतांना भयंकर मनस्ताप होऊं लागला तेव्हां चित्ताला शांति मिळण्याचें भजन हेंच मुख्य साधन होऊन बसलें. ते भजनांत बालमुकुंदांची व इतर साधुसंतांचीं पदें म्हणत; पण हीं पदें म्हणून त्यांचें समाधान होण्यासारखें नव्हते. कारण त्यांच्या अन्तःकरणांतील गुरुभक्तीच्या भावना अत्युत्कट व अत्यंत तीव्र होत्या. त्यामुळें ते भजनाला बसले म्हणजे त्यांत ते पूर्णपणें तन्मय होऊन जात. भजन कसें असावें यासंबंधीं ते म्हणतात, "जें भजन ऐकतांच ऐकणाऱ्यांस आनंद वाटून त्यांचें मन एकाग्र व उन्मन होऊन ते तन्मय होतात तेंच भजन खरें. ज्या भजनानें ऐकणाऱ्यांचें अन्तःकरण, तें कितीहि कठीण अगर पाखंडी असलें तरी, द्रवून विरघळून, प्रेमरसानें भरतें तें भजन खरें. तें देवास प्रिय झालें असें समजावें. हीच खऱ्या भक्तीची ( खूण ) परीक्षा. आपण व पुढें सद्गुरु मात्र अशा भावनेनें भजन सुरू करावें. दुसरें कांहीं नजरेपुढें येऊं नये. कोरडें भजन ऐकणाऱ्यांच्या हृदयांत तरी प्रेमानंद कसा उपजावा? पण भजनांत आपलीं स्वतःचीं, भजन करणाऱ्याचीं आतडीं पिळून, बाहेर काढून तीं सद्गुरुप्रेमानें भरलीं असतां 'मी सद्गुरु-भजनास अगदीं असमर्थ, नेणता, दीन आहें;' हें समजून सद्गुरूचें स्मरण करून, त्याच्या पायीं आपण संपूर्ण नाहीं झालों असतां, म्हणजे मन एकाग्र करून त्या शुद्ध मनांतून आपलें शहाणपण, बुद्धिचातुर्य, भजनकौशल्य सर्व गाळून शुद्ध सद्गुरुप्रेमानेंच तें भरून भजन केलें असतां कां दुसऱ्याच्या मनास आनंद होणार नाहीं? कां ऐकणाऱ्याचें अन्तःकरण भजनगोडी चाखून तन्मय होणार नाहीं? कां दगड द्रवणार नाहींत? कां तसबिरीवर तेज चमकणार नाहीं? कां ऐकणाऱ्यांस प्रसन्नता वाटणार नाहीं? कां मूर्ति बोलणार नाहीं?" ( पु. ८–६ ) या ठिकाणीं पंतांनीं आपला अनुभवच बोलून दाखविला आहे, हें सांगणें नकोच. तसेंच "उभ्यानें नाचून भजन करण्याची गोडी बसून भजन करण्यांत येत नाहीं. बसून भजन करणें तें दळतांना गाणें म्हणण्यासारखें होतें," असेंहि त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. ( पु. ८–२३८ ).

अशा प्रकारच्या तन्मय स्थितींत दुसऱ्या कोणीं केलेलीं पदें म्हणून भजन करणाराचें खरें समाधान होत नाहीं. कारण भजन म्हणजे सहज स्फुरण अथवा ईश्वर-विषयक अगर गुरुविषयक भावनेशीं तादात्म्य पावून भक्ताच्या अंतःकरणांत जी सहज वाणी उमटते ती होय; आणि पद म्हणजे भक्ताचें अंतःकरण भक्तिप्रेमरसानें उचंबळून येऊन, सहज स्फूर्तीनें शब्दांच्या द्वारें व्यक्त होणारा त्याच्या उत्कट भावनांचा स्फोट होय; कारण त्याचें अंतःकरण वर्ण्य विषयाशीं तादात्म्य पावलें असतां त्या एकतानतेच्या

स्थितींत उत्पन्न होणारा निजरंग, नादानुसंधानानें गुणगुणण्याच्या अगर गानाच्या रूपानें व्यक्त होतो व त्याची संस्कृति व विद्वत्ता वगैरे ज्याप्रमाणें असतील त्याप्रमाणें त्याच्या गानाला काव्याचें स्वरूप येतें. निरनिराळ्या भक्तांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या भक्ति-प्रेमाच्या उत्कट भावना एकाच जातीच्या असल्या तरी प्रत्येकाच्या ठिकाणीं प्रेम, प्रसाद व प्रतिभा हीं ज्या मानानें असतील त्या मानानें त्यांना काव्याच्या द्वारें व्यक्त स्वरूप येतें. त्यामुळें एका भक्ताच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या स्फूर्तीचा ओघ ज्या वळणांनीं म्हणजे भावनांनीं व ज्या शब्दांच्या रूपानें वाहेर पडला त्या वळणांनीं व त्याच शब्दांच्या द्वारें दुसऱ्या भक्ताच्या स्फूर्तीचा ओघ जाईलच असें नाहीं. इतकेंच नव्हे तर तो त्याच वळ-णांनीं व शब्दांनीं जाणें शक्य नाहीं. कारण ज्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीचें अंतःकरण निर-निराळें, त्याचप्रमाणें त्या अंतःकरणाची भाषाहि निरनिराळीच असणार. एकाच्या अंतः-करणांतील अत्युत्कट भावनांना दुसऱ्याच्या शब्दांच्या द्वारें व्यक्त होण्यास लावणें म्हणजे ती एक प्रकारें सक्तिच होय. तसें करूं गेल्यास त्या म्हणण्यांत कृत्रिमपणा येईल. प्रत्येक ठिकाणीं मंत्रपुष्प झाला म्हणजे, " घालीन लोटांगण । वंदीन चरण । डोळ्यांनी पाहीन । रूप तुझें ॥ प्रेमें आलिंगिन । आनंदें पूजीन । भावें ओवाळीन । म्हणे नामा ॥ " हें भक्तशिरोमणि नामदेवांचें पद म्हणत असतात; ही गोष्ट फार चांगली आहे. पण खरा प्रकार असा होतो कीं, त्या भक्तराजानें प्रेमातिशयानें आपल्या आराध्य दैवताशीं ज्या प्रेमाच्या गोष्टी केल्या त्या आपण त्याच्याच शब्दांत देवाला अर्पण करितों व " नामदेव तुला असें म्हणाले, " असें त्याला बजावतों ! कदाचित् त्या पदांत व्यक्त होणाऱ्या भाव-नेचा म्हणणाराच्या अन्तःकरणांत मागमूसहि नसेल. दुसरें असें कीं, म्हणणाराच्या अंतः-करणांत सगुण प्रेमाच्या उत्कट भावना उठल्या तरी नामदेवरायांचे वरील बोल उच्चारूनहि त्याचें समाधान होईलच असें नाहीं; तर त्याच्या त्या वेळच्या स्थितींत त्याच्या अंतः-करणांतील स्फूर्ति ज्या मार्गानें व्यक्त होईल, मग तें गद्य असो अथवा पद्य असो, अथवा त्यांचें मिश्रण असो, तेंच त्याचें खरें भजन होय.

पंतांनीं वर्णन केल्याप्रमाणें आपण स्वतः व देव अगर सद्गुरु यांखेरीज अन्य भावना नष्ट झाल्या म्हणजे आपलें अंतःकरण देवाशीं अगर सद्गुरूशीं जी भाषा बोलतें अथवा जें गुणवर्णन करितें तें खरें भजन होय व प्रत्येक खऱ्या भक्ताचें हें भजन, जाणून न जाणून, चालून असतें. तें तसें चालल्याशिवाय तो भक्तच होणार नाहीं. नामदेव, तुकाराम वगैरे भगवद्भक्तांच्या भाषेंतच देवाशीं भक्तिप्रेमाचा व्यवहार करणें झाल्यास तो कृत्रिम होईल. त्या संतशिरोमणींच्या बोलांचा अगर पदांचा आपण उपयोग करावयाचा नाहीं असा याचा अर्थ नव्हे. तर त्यांच्या दिव्य व प्रासादिक वचनांचा पूर्ण फायदा घेऊन भक्ताचें अंतःकरण कळवळून स्वतंत्रपणें देवाशीं जी भाषा बोलेल ती खरी. तीच देवाला पोंचणारी व पटणारी ! त्याला प्रत्येक भक्ताच्या अंतःकरणाच्या भाषेची अपेक्षा असते. आतां हेंहि खरें कीं भक्ताच्या स्वतःच्या ठिकाणीं भक्तिप्रेमाच्या भावना उत्कट नसल्यास अगर त्या व्यक्त करण्याची त्याच्या ठिकाणीं प्रतिभा नसल्यास तो संतकवींच्या काव्याचा

उपयोग करीत असतो व तें योग्यच आहे. पण ज्याच्या अंतःकरणांत भक्तिप्रेमाचा जिव्हाळा असून भावना उत्कट आहेत त्या भक्ताला आपल्या स्वतःच्या शब्दांनीं आपल्या अंतःकरणांतील भावना व्यक्त केल्याशिवाय समाधान होत नाहीं. श्रीज्ञानेश्वरांपासून तों आधुनिक काळापर्यंतच्या सुप्रसिद्ध साधुसंतांच्या काव्याचा प्रसिद्ध झालेला संग्रह प्रचंड आहे; पण उच्च कोटींतील भक्तांचें अप्रसिद्ध असें भक्तिप्रधान काव्यहि पुष्कळच असलें पाहिजे. कारण भजन हेंच भक्ताचें जीवन होय व साधारणपणें उच्च कोटींतील प्रत्येक भक्ताचें स्वतंत्र असें कांहीं तरी काव्य असतें म्हणजे त्याच्या ठिकाणचा भक्तिप्रेमरंग स्वतंत्र भाषेंत व्यक्त होत असतो. तसें झाल्याशिवाय त्याला समाधान वाटत नाहीं. बालमुकुंद, गोविंदराव इंदापूरकर व बाबा कुडची यांच्या ज्या कवितेचा मागें उल्लेख केला आहे, ती कविता अशाच प्रकारची आहे. त्याचप्रमाणें सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. विनायकराव भावे यांनीं " महाराष्ट्रकवी "च्या द्वारें जो काव्यसंग्रह प्रसिद्ध केला आहे त्यांतील कित्येक कविता त्या त्या भक्तांच्या उत्कट भावनांच्या निदर्शक अशाच आहेत.

पंतांसारख्या प्रतिभासंपन्न, भावनाप्रधान, व्युत्पन्न व सद्गुरूच्या पूर्ण कृपेंतील भक्ताच्या अंतःकरणांतील अत्युत्कट भावना ठराविक पदांच्या रूपानें पूर्णपणें व्यक्त होण्यासारख्या नव्हत्या व तसें करून त्यांचें समाधान होण्यासारखें नव्हतें. कारण मागील प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें पुत्रबंधूंचें स्फुटीकरण झाल्यापासून जसजसा त्यांना मत्सर, निंदा व छळ यांचा अधिकाधिक त्रास होऊं लागला तसतशी त्यांची वृत्ति स्वाभाविकपणें सद्गुरु बालमुकुंदांकडे वळून ते अधिकाधिक आतुरतेनें व कळवळ्यानें त्यांचा धावा करूं लागले व त्यांची दृष्टि अंतर्मुख होऊन आध्यात्मिक अनुभवांचें निरीक्षण करूं लागली. त्या सुमारास त्यांच्या अंतःकरणांत भक्ति, प्रेम, वियोगदुःख, करुणा, प्रपंचाच्या ठिकाणीं अप्रीति, सद्गुरूदर्शनलालसा, वगैरे भावना प्रबळ होऊन त्यांनीं मोठी खळबळ उडवून दिली होती. अशा स्थितींत ते प्रेमभरानें भजन करूं लागले म्हणजे नवीन नवीन पदांच्या रूपानें ती खळबळ बाहेर पडूं लागली व तीं पदें अगोदर मुद्दाम रचलेलीं नसून भजनरंगांत सहज झालेलीं असत. प्रथम ही गोष्ट फारशी कोणाच्या लक्षांत आली नव्हती. त्यामुळें कांहीं पदें टिपून ठेविलीं गेलीं नाहींत. कारण नवीन ऐकिलेलें पद जरी अपरिचित असें वाटलें तरी तें आपण न ऐकिलेलें असें दुसऱ्या कोणाचें तरी असेल असें भोंवतालच्या मंडळींना वाटे; पण पंत भजन करूं लागले म्हणजे नवीन नवीन पदें जसजशीं भोंवतालच्या मंडळींना ऐकूं येऊं लागलीं, तसतसें त्यांचें लक्ष तिकडे अधिकाधिक वेधूं लागलें. स्वतः पंतांच्या मुखांतून जरी भजनरंगांत नवीन पद येई तरी त्यांना भजन संपल्यावर तें जसेंच्यातसें म्हणतां येत नसे. पण पंत म्हणत असलेलीं पदें दुसऱ्या कोणीं केलेलीं नसून तीं नवीन आहेत म्हणजे भजनरंगांत निघालेले ते त्यांचे सहजोद्गार आहेत ही गोष्ट जेव्हां भोंवतालच्या मंडळीच्या लक्षांत आली तेव्हांपासून त्यांच्यापैकीं कोणीतरी तीं टिपून ठेवूं लागला. प्रथम प्रथम हें काम विशेषेंकरून पंतांचा गुरुबंधु गोपाळ श्रीपाद भागोजीकोप अगर जवळ असलेला इतर कोणी गुरुबंधु अगर शिष्य करीत असे. अशा

तऱ्हेनें केलेलें नवीन पदांचें टाचण पंत मागाहून तपाशीत व तें टिपून घेतांना व्याकरण-दृष्ट्या किंवा इतर कांहीं दोष राहिले असल्यास ते सुधारीत. नवीन पद म्हणतांना पंत तें सावकाश म्हणत व एकएक चरण दोन तीन वेळां म्हणत. त्यामुळें तें लिहून घेणाराला फारशी पंचाईत पडत नसे.

पंतांच्या सुरवातीच्या पदांमध्यें सद्‌गुरूची स्तुति, भजनस्फूर्ति देण्याची प्रार्थना, करुणा भाकणें वगैरे विषय प्रामुख्यानें दृष्टीस पडतात. सन १८८३ सालीं झालेल्या श्रीदत्तप्रेमलहरी पुष्प १ मधील पद १५ मध्यें, "धन्य रे सदगुरु राया । धन्य केलें भक्तांसी । अन्यभाव हरियेला । नेले मुक्तिपदासी" अशी सद्‌गुरूची स्तुति करून व आपलें अनन्यगतिकत्व व्यक्त करून, "गाईन क्षणभरीं । जरी मतीत शिरसी । वेदही शिणले वा मज कैसें आतुडसी, " अशा प्रकारें गुणगान करण्याची आपली इच्छा त्यांनीं दर्शविली आणि "त्या कामीं वेदांनी हात टेकले. तूं माझ्या मतीत शिरशील तरच तें होईल, " असें सद्‌गुरूला सांगितलें. पद २० मध्यें "दया करीं श्रीगुरू दत्ता । मला तुजविणें नसे दुजा त्राता ॥ धृ० ॥ मम दुर्गुण काढूं मी न शके । क्षमा करीं अनंता । ध्यान योग मी कांहींच नेणें । भक्ति देऊनी तारीं आतां ॥ १ ॥ मीन जळाविण तैसा तुजविण । आधार नाहीं पाहतां । भक्तवत्सलब्रीद राखीं दयाळा । तूंचि माय बंधु पिता ॥ २ ॥ भजनापरतें साधन दुजें । काय करूं ही चिंता । दत्त तव चरणीं अखंड लोळे । धांवे बालावधूता ॥ ३ ॥" अशा रीतीनें भजन हेंच आतां आपल्याला साधन उरलें आहे हें स्पष्ट केलें व पद ४१ मध्यें तर, "बाळा सद्‌गुरू समर्था । तव चरणीं ठेवितों माथा । स्फुरवुनी भजनपंथा । बोलवीं गुण यथार्था ॥ धृ० ॥, " अशा प्रकारें भजनपंथ स्फुरवून आपले यथार्थ गुण बोलवून घे अशी चरणीं मस्तक ठेवून त्यांनीं सद्‌गुरु समर्थाची प्रार्थना केली. त्याच पदांत पंत पुढें म्हणतात, "आम्हीं अज्ञ दीन बाळ । नेणों गीत नृत्य ताळ । परि पोटीं भजनआळ । त्वरित पुरवी स्नेहाळ ॥ १ ॥ प्रेम द्यावें भजन गाया । भावें नमितों तव पाया । करीं लौकरी कृपेची छाया । भेटी देईं बा गुरूराया ॥ २ ॥ तुजविणें भजन व्यर्थ । अंतरींचा हा मनोरथ । गुरुसूत्रें नाचवीं देहरथ । प्रेमरंगीं रंगवीं यथार्थ ॥ ३ ॥ धांव धांव सद्‌गुरुमाय । अझुनी अंत पहासी काय । बालचरणीं अर्पुनी काय । दत्त आनंदें गुरुगुण गाय ॥ ४ ॥," अशा प्रकारें पंतांनीं सद्‌गुरूकडे भजनपंथ स्फुरवून गुण-गान करवून घेण्याची जी याचना केली ती सद्‌गुरुकृपेनें दिवसेंदिवस अधिकाधिक सफल होत गेली. १८८२ पासून १८८५ पर्यंत पंतांचीं सुमारें ६५ पदें झालेलीं होतीं व तीं बहुतेक "श्रीदत्तप्रेमलहरी" या पदसंग्रहांतील पहिल्या सुमारें ११ ते ९० पर्यंतच्या पदांत आलेलीं आहेत व ज्या क्रमानें तीं झालीं त्या क्रमानें तीं छापली आहेत असें साधा-रणपणें समजण्यास हरकत नाहीं. त्या पदांत १८८५ पर्यंत पंतांची जी मनःस्थिति होती तिचें शब्दचित्र कसें उमटलें आहे तें या प्रकरणांत दाखवीत आहोंत.

१८८३ च्या सुमारास जेव्हां पंतांना सद्‌गुरु बालमुकुंदांच्या वरचेवर आठवणी येऊन त्यांच्या वियोगाचें दुःख अत्यंत तीव्रतेनें जाणवूं लागलें तेव्हां तशा विरहाकुल

स्थितींत ते भजन करूं लागले म्हणजे त्यांचे दुःखालापच पद्यरूपानें बाहेर पडत. बालमुकुंद श्रीशैल्ययात्रेच्या निमित्तानें गेल्यापासून पुष्कळ तपास करूनहि त्यांचा कांहींच पत्ता लागला नव्हता व त्यांनीं देह ठेविला असेंहि पंतांना म्हणवेना. ते कदाचित् आपल्याला पुनः भेटतील ही अंधुक आशा पंतांच्या हृदयांत मधुन मधुन डोकावत होती. त्यामुळें त्यांच्या अंतःकरणाला सद्गुरूंच्या दर्शनाची फार तळमळ लागून राहिली होती. त्या सुमारास त्यांनी अगदीं मुक्त कंठानें सद्गुरूंचा धावा केला व कांहीं प्रसंगी विरहदुःखानें अत्यंत व्याकुळ होऊन पाषाणालाहि पाझर फोडणाऱ्या करूणालापांनीं " कां रुसवा मजवरी ॥ दत्ता ॥ दे दर्शन झडकरी ॥ धृ० ॥ तान्हें बाळ टाकुनी माता । जाय देशांतरी । तेवीं पर्वतयात्रामिसें । गेलासी नरहरी ॥ १ ॥ पक्षहीन मी पक्षीच केवळ । वाचूं कैशापरी । रक्षिरक्षि हा व्यर्थचि मरतो । सर्वसाक्षी श्रीहरी ॥ २ ॥ काळ घडोघडी गिळूं पहातो । छळूं नको आतां तरी । भाललोचना खेळ पुरे करी । बाळा घे पदरीं ॥ ३ ॥ " (द. प्रे. ल. ५०) अशा प्रकारचा टाहो फोडून आपलें अनन्यगतिकत्व त्याचे पुढें मांडलें; तसेंच कांहीं वेळां सद्गुरूंचा धावा करूनहि तो न आल्यानें धीर सुटून, " दर्शनासी कां गा लाविला उशीर । धरवेना धीर आतां कांहीं ॥ धृ० ॥ पतित म्हणोनी न येसी दयाळा । नाम कां कृपाळा पतितोद्धार ॥१॥ माता कोपे तरी पित्याकडे जावें । बाळा नसे ठावें अन्य कोणी ॥२॥ तूंचि माझी माता तूंचि माझा पिता । तूंचि निवारितां जाऊं कोठें ॥ ३ ॥ नको अंत पाहूं बाळा अतुर्बळी । दत्तचरण कमलीं रतलासे ॥४॥ " (द. प्रे. ल. ४८) अशा शेलक्या शब्दांनी त्याच्या पतितपावन–ब्रीदावरहि प्रहार केले. तसेंच क्वचित्प्रसंगीं पंतांनीं अट्टाहास करून निर्वाण मांडल्यावर त्यांना सद्गुरूंचें दर्शनहि होत असे.

१८८४ सालीं एके दिवशीं सद्गुरूंच्या दर्शनाची तीव्र उत्कंठा लागून पंतांनीं, " देई दर्शन धावुनि दत्ता । धीर धरवेना मजला आतां " ( द. प्रे. ल. २१ ) याप्रमाणें पद म्हणण्यास सुरवात केली व प्रथम सद्गुरूनें अत्रितनय दत्तरूपानें, श्रीपादश्रीवल्लभरूपानें व श्रीनरसिंहसरस्वतीरूपानें अवतार घेऊन जनोद्धाराचें जें अद्भुत कार्य केलें त्याबद्दल स्तुति करून वेदविहित मार्ग सोडून लोक विषयलंपट झाले व स्वेच्छाचारी बनले आणि अशा प्रकारें धर्मग्लानि झालेली पाहून तूं परम कारुण्यानें अवतार घेतलास असें सांगून सद्गुरु बालावधूतांची चरण ८–२१ मध्यें अत्यंत काकुळतीनें करुणा भाकिली आहे–" पारखपुरीं अवतरलासी । जंबुगिरीं प्रगटलासी । वेणूनगरीं खेळलासी । गमन केलें श्रीशैल्यासी ॥ ८ ॥ सगुण मूर्ति दिव्य तूझी । पाहतां वृत्ति वेधली माझी । कांरे सांड केली माझी । कैसा निष्ठुर झालासी आजी ॥ ९ ॥ लक्ष चौऱ्याशीं फेरे फिरूनि । घोर पातकें आचरूनी । नाना दुःखद भोग भोगुनी । अधम झालों तुला विसरूनी । तव कृपें मानव झालों । तव दर्शनें धन्य झालों । परी तुझ्या संगा मुकलों । नेणों कैसा हतभागी झालों ॥ ११ ॥ सप्त वर्षें झालीं तत्वतां । केवीं वियोग साहूं आतां । बाळा टाकुनी जाय माता । तेवीं तुवां केलें ताता ॥ १२ ॥ नाहीं कांहीं सेवा घडली । तवसवें सलगी केली । म्हणुनी अवकृपा झाली । तरी दयाळु गुरु माउली ॥ १३ ॥ उबग आला जरी

माझा । तरी वाचूं काय काजा । भक्तवत्सल ब्रीद तुझा । प्राण द्याया देई रजा ॥ १४ ॥ व्यर्थ झालें माझें जिणें । गुरुवाचुनी काय जगणें । नको नको जगीं राहणें । हीत वाटे तत्काळ मरणें ॥ १५ ॥ काम क्रोध मद अहंकार । जाच करिती मज फार । कंटकवन झाला संसार । चिंतेखालीं झालों चूर ॥ १६ ॥ त्रिविध तापें बहु पोळलों । गोड मानुनी विषयीं खेळलों । धन कामिनी पाहुनी भुललों । भ्रष्ट नष्ट कुकर्मी बनलों ॥ १७ ॥ काळ जातो क्षणक्षणा । आतां येऊं दे माझी करुणा । दयाळुवो गुरुराणा । दावि दावि दिव्य चरणा ॥ १८ ॥ मजऐसा पापी दुर्धर । नाहीं देखिला निर्धार । ऐशा पाप्याचा उद्धार । करिसी तरी कीर्ति थोर ॥ १९ ॥ करुणा भाकोनी कंठ शोषला । प्राण कासावीस झाला । कां रे निर्वाण मांडिला । प्राण देतों निर्धार झाला ॥ २० ॥ दीपाविणें जैसें सदन । निर्नासिक न शोभे वदन । दत्तावीणें शुन्य भुवन । होईल बाळा सत्य जाण ॥ २१ ॥," इतकें म्हणून झाल्यावर पंतांना विरहदुःख इतकें अनावर झालें कीं ते निर्भान होऊन जमीनीवर पडले व तशा स्थितींत बालमुकुंदांनीं धावत येऊन त्यांना दर्शन दिलें ! त्यायोगें त्यांना ज्या अनुपम सुखाचा अनुभव आला त्याचें वर्णन त्यांनीं अखेरच्या चरणांत पुढीलप्रमाणें केलें आहे. "सुकल्या अंकुरा पाऊस आला । तप्त मीन जळीं लोटला । तैसा दत्त शांत झाला । धांवत धांवत बाळ आला ॥ २२ ॥" हा चरण म्हणून झाल्यावर लगेच पुढच्याच पदांत फार दिवसांनीं झालेल्या या सद्‌गुरूच्या अपूर्व भेटींत जो प्रेमसोहळा आपण अनुभविला त्याचें त्यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें. "माझा सद्‌गुरु ब्रह्मानंद । पहा आला रे बालमुकुंद ॥ धृ. ॥ बाळ कासावीस झाला । पाहुनी अंतरीं कळवळला । कंठ सद्गदित झाला । प्रेमाश्रूंचा पूर लोटला ॥ १ ॥ कनवाळू ती बाळ आई । उचलुनि दासा कडिये घेई । प्रेमें हुंगुनी भक्त डोई । वरचेवर चुंबन घेई ॥ २ ॥ बहुतां दिवसां झाली भेटी । नोहे पुनरपि कदा तुटी । दत्तबाळा पडली मिठी । त्या सुखासी काय गोष्टी ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. २२ )

वर उल्लेख केलेलें पद २१ जेव्हां झालें त्या प्रसंगाचें पंतांनीं एके ठिकाणीं पुढीलप्रमाणे वर्णन केलें आहे. " देई दर्शन धांवुनी दत्ता । धीर धरवेना मजला आतां ॥ " ( द. प्रे. ल. २१ ) हें पद म्हणतांना आतांसुद्धां हृदय विरघळतें. हें पद झाल्यादिवशीं सर्व मंडळी एक तासपर्यंत सारखी लोळत होती. सात वर्षे गुरूची भेट नव्हती. काय करूं काय नको हें न उमगून अत्यंत उदास झालों व निर्वाण मांडला. उभ्यानें भजन होत असतां " प्राण देतों निर्धार झाला ", "प्राण द्याया देई रजा" वगैरे चरण म्हणतेवेळीं इतका आवेग आला कीं निर्भान होऊन धाडदिशीं जमिनीवर पडलों. १८७७ पासून सद्‌गुरूची भेट नव्हती. १८८४ सालीं हें पद झालें. त्या दिवशीं दर्शन झालें." पद २१ च्या बाराव्या चरणांत " सप्त वर्षे झालीं तत्वतां । केवीं वियोग साहूं आतां," असा मूळ पाठ होता व तें पद झालें त्या वेळीं तो सार्थहि होता. कारण बालमुकुंदांचा पंतांना वियोग झाल्यानंतर सात वर्षांनीं तें पद झालें. पण पुढें अधिक काळ लोटल्यामुळें " सप्त " च्या ठिकाणीं " बहुत " शब्द घातलेला आहे.

या पदांत करुणरसाची परमावधि झाली आहे व पद २२ मध्यें वात्सल्यरसाला पूर आलेला आहे. या दोन रसांचा या दोन पदांत जो हृदयंगम संगम झाला आहे तो प्रत्येक भक्ताचें व सहृदय वाचकाचें अंतःकरण हलविल्याशिवाय खचित राहणार नाहीं ! या दोन पदांत व्यक्त झालेला पंतांचा अनुभव अपूर्व खराच. पण त्यांच्यांत दिसून येणारीं वृत्तीचीं रूपांतरें व अंतःकरणांतील तुफानाचें झालेलें गोड पर्यवसान यांचीं त्यांच्या ठिकाणच्या कवित्वस्फूर्तीनें यथार्थ शब्दचित्रें रेखून ठेविलीं अथवा त्यांचे फोटो घेऊन ठेविले हें विशेष होय !

सद्‌गुरूच्या दर्शनाची उत्कंठा लागून पंतांचे पद २१ व २२ मध्यें जसें आलाप निघाले आहेत तशाच प्रकारचे दुःखालाप १८८५ पर्यंत झालेल्या त्यांच्या पदांत वारंवार आढळतात. त्याचप्रमाणें त्या पदांत, " धांव धांव धांव दत्ता धांव लौकरी । पाव दासा दिनानाथा वेगीं नरहरी " (द. प्रे. ल. २४); " तुजविण मजला कोण तारी आतां । धांव बालावधूतारे " (द. प्रे. ल. २९); " पावे गुरुराया । शरण तुझ्या पाया ॥ धृ. ॥ तान्हें बाळ करि तळमळ धांवे प्रेमळ आई । भक्ति शिकवुनी मुक्त करुनि ठेवी दत्ता पायीं ॥ ३ ॥ " (द. प्रे. ल. ६२); " उठी उठी बा धांव नरहरी । उडी घालीं बुडालों भवसागरीं । " (द. प्रे. ल. ६६); " आतां तरी येऊं दे करुणा । वेगीं हरी जन्म मरणा । धांवुनी येई योगीरमणा । दत्ता चरणीं देई थार " (द. प्रे. ल. ७४). अशा प्रकारच्या दीन स्वरानें सद्‌गुरूचा धांवा केला आहे. तसेंच कांहीं प्रसंगीं सद्‌गुरूच्या भेटीच्या बाबतींत अत्यंत निराश होऊन त्यांनीं मोठ्या काकुळतीनें सद्‌गुरूचें दर्शन करविण्याबद्दल भोंवतालच्या मंडळींची विनवणी केली आहे. उदाहरणार्थ पद ४९ मध्यें बालावधूतांच्या सगुण मूर्तीचें वर्णन करून अखेरच्या चरणांत, " बालावधूतासी दावा मज कोणी । दत्त समचरणीं ठेवी माथा, " अशी त्यांनीं प्रार्थना केली आहे. पद ५६ मध्यें " नरसिंहसरस्वती दावा कोणी मजला " अशी श्रोत्यांना विनंति केली आहे व पद ६३ मध्यें तर गुरूविण फार व्याकुळ झालों; संसाररूपी वनांत विरागरूपी प्रचंड वैश्वानर पेटत आहे, उन्मनीचें मंदिर घोर स्मशानाप्रमाणें ओसाड दिसत आहे; समाधीच्या शेजेवर कांटे रुतत असल्यामुळें सुखाला थारा नाहीं; मुक्तिरूपी स्त्री विवशी झाली; अंतरींचा धीर सुटलेला आहे" असें सांगून "कोणी तरी दत्त मातेसी दावा । होतील बहु उपकार " अशी केविलवाण्या स्वरानें श्रोत्यांची प्रार्थना केली आहे.

१८८५ पर्यंतच्या पदांत मधुन मधुन " मीतूंपणाचा झाडा करितां । उकलिला तत्वांचा घोटाळा ॥ ॥१॥ प्रणवीं वृत्ति लीन होतां । प्रगटली दिव्य आत्मकळा ॥२॥ सहज स्थितीची खूण बाणतां । भक्त जिताचीरे मेला ॥३॥ " (द. प्रे. ल. १३) अशा प्रकारचे स्वानुभवसिद्धांत, राजयोगांतील अनुभव वगैरेंचाहि अंतर्भाव झाला आहे. पद ३३ मध्यें " भलारे गारुडी दत्तावधूत " असें सांगून व त्याच्या गारुडाचें "अनंत प्रकाशाचा बंबाळा । असंख्य सौदामिनींचा मेळा । कोटी सूर्यकांति झळाळा । भूल पडली तेजें डोळा । मौज भानरहित ॥१॥ " अशा स्वरूपाचें वर्णन करून अखेर " इंद्रजाल जनदृष्टिबंध ।

गारुडी ओळखा बालमुकुंद । प्रेक्षकां पुरवी ब्रह्मानंद । धन्य हंडीबाग स्वच्छंद । नाचे खेळे. दत्त ॥७॥ ” अशा रीतीनें पंतांनी आपणाला सद्गुरु गारुड्याचा हंडीबाग म्हटलें आहे. तसेंच मधुन मधुन शिष्यांना बोधहि केला आहे. ता. २८–११–१८८३ रोजी पंतांनीं आपला गुरुबंधु कल्याण याला लिहिलेल्या पत्रांत, “ नश्वरीं मोह हा त्वरित कापा । भजा मापा । अनश्वरीं चित्त योजी बापा । चुकवी खेपा ”, हें उपदेशपर पद ( द. प्रे ल. ९० ). जसेच्या तसें देऊन त्यांतील कठिण शब्दांची सुलभ अर्थ देऊन फोड केली आहे. तरीपण १८८५ पर्यंतच्या पदांत सद्गुरुस्तुति, दर्शनलालसा, सद्गुरूचा धांवा यांच्यावरच विशेष भर होता. त्यामुळें तीं पदें फार प्रेमळ व रसाळ आहेत व त्यायोगें पंतांच्या भक्तमंडळीच्या नित्यपाठांत त्यांचाच विशेष भरणा असल्याचें आढळतें.

पंतांच्या कवित्वस्फूर्तीचा उगम त्यांच्या अंतःकरणांतील तीव्र भजनलालसेंत व गुरूप्रेमाच्या जिव्हाळ्यांत झाला व सद्गुरूच्या वियोगानें त्यांच्या अंतःकरणांत विरहदुःखानें करुणरसाच्या ज्या प्रचंड लाटा उसळल्या त्यांच्या योगानें त्या कवित्वस्फूर्तीला बेफामपणें स्वैर विहार करण्यास मिळाला; पुढें जरी त्यांच्या ठिकाणचें विरहदुःख कमी कमी होत गेलें, तरी कवित्वस्फूर्ति अधिकाधिक जोरावत जाऊन अंतःकरणांतील हर्षशोकादिक उत्कट भावना पद्यरूपानें व्यक्त होऊं लागल्या व त्यांचें अंतःकरण गुरुमय अगर प्रेममय बनून गेल्यामुळें पद्यरूपानें व्यक्त होणारे सर्व मनोविकारहि गुरुप्रेममुशींतूनच जणूं बाहेर पडूं लागले. दिवसेंदिवस त्यांची काव्यस्फूर्ति अधिकाधिक जोरावत जाऊन तिनें त्यांच्या हयातीच्या अखेरपर्यंत फार मनोहर वाग्विलास केला व त्यांच्या पदांचा संग्रह “ श्रीदत्तप्रेम लहरी ” या नावानें प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील पदांसंबंधीं विस्तृत विवेचन प्रकरण ४६ मध्ये केलें आहे. पंतांचीं पदें म्हणजे त्यांच्या अंतःकरणाचे निरनिराळ्या वेळीं घेतलेले फोटो अगर छायाचित्रेंच होत. या दृष्टीनें त्यांच्या चरित्राशीं निकट परिचय होण्याला या फोटोंचा अगर छायाचित्रांचा फार उपयोग आहे. त्यामुळे त्यांपैकीं कांहींचा योग्य स्थळीं उपयोग करण्याचें योजिलें आहे. आतां पंतांच्या भजनस्फूर्तीचे जुळें भावंड जी लेखनस्फूर्ति तिकडे वळूं.

# प्रकरण १८ वें

——————:०:——————

## गद्य लेखनाची सुरवात; स्फुट लेख; श्रीबालमुकुंदबोधानंदगुटिका ( कल्याणचरित्र ) व बाळबोधामृतसार; एकी; प्रेमकल्लोळ.

१८८३ च्या सुरवातीपासून सद्गुरूची स्तुति, वियोगदुःख, त्याच्या दर्शनाची लालसा, त्याचा धावा, उत्कट गुरुप्रेम, प्रपंचीं विराग वगैरे प्रकारच्या पंतांच्या भावना कमी अधिक प्रमाणांत गद्यरूपानेंहि प्रगट होण्यास सुरवात झाली. ५–१–१८८३ रोजीं त्यांनीं " श्रीसद्गुरुस्तोत्र, गद्यात्मक " हा लेख लिहिला. ( पु. ५–१६९ ) तो गद्यात्मक कां होईना, पण " स्तोत्र " असल्यामुळें त्यामध्यें स्वाभाविकपणें सद्गुरूची स्तुति केलेली आहे. तसेंच पतांनीं आपलें अनन्यगतिकत्व व्यक्त करून व सद्गुरूचे अनंत उपकार आठवून, " इतकी कनवाळु, कृपाळु माय मला पुनः मिळेल काय ? ", अशा प्रकारें सद्गुरूच्या दर्शनाबद्दल निराशेचे उद्गार काढले आहेत व " दत्ता, तुझी लीला, तुझे खेळ, तुझा अमृततुल्य बोध, तुझें दिव्य दर्शन, तुझी भक्तिप्रियता, दीनवत्सलता हीं करतलामलकाप्रमाणें उघड अनुभवास आणून दिलींस आणि मम हृदयांत तुझें भक्तिबीज पेरिलेंस, " असें सद्गुरूला म्हटलें आहे व आपल्या ठिकाणची भजनाची पराकाष्ठेची आवड व्यक्त करून आपली स्तुति करवून हरएक रीतीनें सेवा घेण्याबद्दल विनंति केली आहे. पंतांनीं ता. ७ रोजीं " सद्गुरुस्तुति, " ता. ८ रोजीं " सद्गुरुप्रशंसा " व " गुरुस्तुति, नाममाहात्म्य " व ता. ९ रोजीं " श्रीसद्गुरूचें स्तवन " हे लेख लिहिले. ( पु. ५–१७७ ते १८५ ) त्यांच्यांतहि श्रीबालमुकुंदांचें गुणवर्णन करून आर्तस्वरानें त्यांची करुणा भाकली आहे; आणि " पुत्र बंधूंचें स्फुटीकरण " झाल्यानें झालेला मनस्ताप पुढीलप्रमाणें व्यक्त केला आहे. " अवधूतावस्थेची, अभिमानाची, जाणिवेची खोडकी जिरवून, दीन हीन पायांतील धूळ चाखून तुझे पायांतील पादुका होऊन राहण्यास तूंच सामर्थ्य दे. उशीर करूं नको. माझा घात करण्यास अनेक वैरी सभोंवार उभे आहेत; गळा कापतील व तूंच निपुत्रिक होशील. तुझेंच घर बाळाविरहित शून्य होईल. मग पुढें तुलाच गमणार नाहीं. आई भूक लागली प्राण कासावीस होतो; प्रेमस्तन पाज." या लेखांत सद्गुरूशीं पराकाष्ठेची सलगी व अत्यंत लडिवाळपणाचा मातृ–बालक-संबंध हीं व्यक्त झालीं आहेत.

ता. १२–१–१८८३ रोजीं पंतांनीं " दीन दासाचा अर्ज " हा लेख लिहिला, ( पु. ५–१८६ ते १९४ ): तो सहज स्फूर्तीनें लिहिलेला आहे. कारण त्यामध्यें विवक्षित विषयाची पद्धतशीर मांडणी केलेली नसून पंतांच्या गुरुप्रेमस्फूर्तीनें निरनिराळीं वळणें घेऊन जो वाग्विलास केला तो व्यक्त झाला आहे. पंतांनीं या लेखांत प्रथम सद्गुरूकडे गाऱ्हाणें करण्यास सुरवात केली खरी; पण जसजसे ते आपल्या गतकालांतील अनुभवांचें सिंहाव-

लोकन करून टांचण करूं लागले तसतशा त्यांच्या अंतःकरणांत भक्तिप्रेमाच्या उत्कट भावना उचंबळूं लागल्या-व-त्या लेखांचें ' अर्ज ' हें स्वरूप जाऊन त्याला निःशब्द प्रेमोद्गारांचें स्वरूप आलें. पंतांच्या भावनाप्रधान अशा पुष्कळ लेखांत व पदांत असाच प्रकार झालेला आढळतो.

याप्रमाणें अंतःकरणांतील भक्तिप्रेमाच्या उत्कट भावना व्यक्त करण्याकरितां पंतांच्या लेखनाला सुरवात झाली खरी. पण प्रकरण १६ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें पुत्रबंधूंचें स्फुटीकरण होऊन त्यांच्या भोंवतालची परिस्थिति बिघडली असल्यामुळें त्यांच्या लेखनाचा ओघ आपल्या गुरुबंधूंना व शिष्यांना उपदेश, सिद्धांतप्रतिपादन, तत्वविवेचन व स्वानुभववर्णन वगैरे करण्याकडे वळला व या कामीं पद्यापेक्षां गद्य अधिक सोईचें असल्यामुळें १८८३–८५ च्या सुमारास त्यांचा गद्यलेखनावर विशेष भर होता. पत्रांच्या द्वारें आपल्या गुरुबंधूंना व शिष्यांना उपदेश करण्याचें त्यांचें कार्य १८८० पूर्वीपासूनच सुरू झालेलें होतें व अशा उपदेशपर कांहीं पत्रांचा मागें उल्लेख झालेला आहे.

ता. १२-१-१८८३ रोजीं पंतांनीं आपले गुरुबंधु, शिष्य व भक्त आणि इतर तरुण व होतकरू मंडळी यांना वर्तनाचे नियम घालून दिले ( पु. ५-१८५ ) व तेव्हांपासूनच आपल्या अनुयायांचें वर्तन न्याय, नीति व धर्म यांच्याविरुद्ध न होतां त्यांचें शील चांगलें राहून व भक्तीची वाढ होत जाऊन स्वानुभवाचें भरपूर माप त्यांच्या पदरीं पडेल अशाबद्दल ते फार काळजी घेऊं लागले. त्यांनीं फेब्रुवारीं १८८३ मध्यें "अज्ञान आणि जन्ममरण" व "माझ्या स्वप्नांतील जिऊताईची हकीगत" अथवा "साक्षात्कार" हे लेख लिहिले. ( पु. ५-१९४ ते २०४ ) ते दोन्हींहि तर्कप्रधान व विचारप्रवर्तक असून पहिल्या लेखांत " सद्‌गुरुपायीं लीन व्हा; त्याचेंच ध्यान करा म्हणजेच तद्रूप व्हाल. तें रूप वाङ्मनास अगोचर सर्वत्र कोंदलेलें हें माहीतच आहे " असा इषारा दिला आहे. "माझ्या स्वप्नांतील जिऊताईची हकीगत" या लेखांतील प्रतिपाद्य विषयाची त्याच्या नावावरून थोडीशी कल्पना होते. ती अशी की जिऊताइचें अस्तित्त्वच स्वप्नांत असल्यामुळें तिची हकीगत म्हणजे स्वप्नांतील प्रतिस्वप्नच असणार. तसेंच या लेखांत पंतांनीं अनंत कोटी सूर्यांना आपल्या तेजानें लाजविणाऱ्या प्रकाशरूप सद्‌गुरूचें आपल्याला दर्शन होऊन तारकसाक्षात्कार झाल्याचें वर्णन केलें आहे. हा लेख म्हणजे एक भलें मोठें रूपक असून त्याच्या द्वारां पंतांनीं आपला गूढ आत्मानुभव व्यक्त केला आहे.

वरील लेख लिहिल्यानंतर सुमारें आठ महिने पंतांचें लेखन बंद होतें. त्या अवधींत मागें उल्लेख केल्याप्रमाणें त्यांनीं गणित विषय शिकविण्याचा वर्ग काढला होता. तसेंच ता. २८–११–१८८३ रोजीं त्यांनीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत, "आतां नियमानें रात्रीं भगवद्गीतेवर वामनपंडिताची टीका, यथार्थदीपिका, या ( ग्रंथा ) चें श्रवण, मनन मग सद्‌गुरुभजन हीं चालतात ", असा उल्लेख केला आहे. त्यामुळें त्या सुमारास त्यांना लेखनाला फारशी फुरसदच नव्हती.

५५८५
दा. क्र.



पंतांनीं १८८३ च्या आक्टोबर ते डिसेंबर यां तीन महिन्यांत “ निःसंशय हो, निरंजन मिळेल ”, “ विजयादशमी ”, “ आत्मबोधास—योग्य कोण व अयोग्य कोण ” व “ चमत्कार ” हे चार लेख लिहिले. ( पु. ५–२०५ ते २२६ ) त्यांपैकीं “ निःसंशय हो, निरंजन मिळेल ” या लेखाच्या शेवटीं सद्‌गुरुकृपेच्या थोरवीचें वर्णन करून अखेर, “ तुझ्या कृपेनें माते ! जसा मी सुखरूप होऊन तुझ्या प्रेमामृतानें पुष्ट होऊन अजिंक्य वीर सजलों, तसेंच या तुझ्या इतर पुत्रांनाहि जन्ममरणविदूर कर ” अशी विनवणी केली आहे. “ आत्मबोधास योग्य कोण व अयोग्य कोण ” या लेखाच्या शेवटीं आपल्या गुरुबंधूंपैकी ज्यांनीं गुरु बनून शिष्य करण्यास सुरवात केली होती त्यांना पुढील इषारा दिला आहे. “ आत्मशोधनीं जागृत राहून सतत ज्ञानाचा पिच्छा पुरविणाऱ्यांना सोडून अज्ञानमलयुक्त जीवांना आत्मबोध सांगितला म्हणून सद्‌गुरुपदाधिकारी होतील काय ? कदापि होणार नाहीत ! यासाठीं पात्रापात्रविचार कर नाहीतर स्वस्थ रहा. ” “ चमत्कार ” हा लेख त्यांनीं आपल्या कांहीं गुरुबंधूंना व शिष्यांना उद्देशून लिहिला असून त्यांत गुरुमार्गाकडे दुर्लक्ष करून दुर्जनांची संगति धरणाऱ्या त्यांच्या गुरुबंधूंबद्दल त्यांचें तिळतिळ तुटणारें अंतःकरण पूर्णपणे व्यक्त झालें आहे व त्याच्या शेवटीं पंतांनीं त्यांना मोठ्या कळकळीनें पुढील उपदेश केला आहे. “ मान, ढोंग, क्रोध, काम इत्यादि तोंडपुजे लोकांस थारा देऊं नका; बाहेरच्या डौलास भुलूं नका. घडी जात आहे. घडीनें घडी साधा. अखंड साधन करा. नामापरतें साधन नाहीं. आंत शिरून पहा. बाहेर जाऊं नका. समर्थचिंतन करा, समर्थभजन करा, समर्थमार्गीं चाला, समर्थचरणीं शांत राहा. ”

१८८४ च्या जानेवारी महिन्यांत पंतांनीं “ साधकाचे कर्तव्यकर्म ”, “ उपयुक्त बोध ”, “ मोहत्यागाचा उपाय ”, “ स्वभाव व सवय ”, “ आश्चर्य ! ”, “ अज्ञजन उद्धाराचे पाच मार्ग ”, “ सबुरी थोर कामाची वस्तु आहे ”, “ आत्मा तु सततं प्राप्तोऽप्यप्राप्तवदविद्यया । तन्नाशे प्राप्तवद्भाति स्वकंठाभरणं यथा ॥ ” व “ सावध हो ” हे आठ लेख लिहिले. ( पु. ५–२२६ ते २४४ ) ते सर्व उपदेशपर आहेत. फेब्रुवारी महिन्यांत त्यांनीं “कर्मणो गहना गतिः” , “ सद्‌गुरुस्तव ”, “ शिवरात्रीचा उपवास ” व “ न कल्पितां पडलेलें निरंजन स्वप्न ” हे चार लेख लिहिले. ( पु. ५–२४४ ते २५६ व पु. ६—१ ते ३ ) व तेहि उपदेशपर आहेत.

मार्च १८८४ मध्यें पंतांनीं “ गुरुचरणप्रतापें पुण्यपापें जळालीं, ” “ श्री सद्‌गुरु—उपदेश भिन्न फलदायी कां ? ”,“ चांगलें भाषण ”,“क्षमा”,“समर्थ सद्‌गुरूस भजा”, “ त्रिपुटीज्ञानलक्षण ” व “ शिमगा किंवा अपूर्व रथ ” हे सात लेख लिहिले. ( पु. ६—४ ते २२ ) तेहि उपदेशपर आहेत. त्यांपैकीं “ समर्थ सद्‌गुरूस भजा ” या लेखांत “ सद्‌गुरूपेक्षां ब्रह्म श्रेष्ठ म्हणून त्यांत निर्विकल्पता साधणारा आणि अंकुशविरहित मत्तहत्तीप्रमाणें मन मानेल तशी वहिवाट करणारा महानरकाचा अधिकारी होतो हे निःसंशय आहे ” असा पंतांनीं इषारा दिला आहे. ‘ शिमगा किंवा अपूर्व रथ ’ हा लेख रूपकात्मक

असून त्यांत त्यांनीं राजयोगांतर्गत सांख्य, तारक व अमनस्क योगांतील अनुभव सुंदर रीतीनें वर्णिले आहेत व आपल्या स्वतःस " दत्तरथ " कल्पून त्या रथावर म्हणजे आपल्या हृत्सिंहासनावर सद्गुरु बालमुकुंदांची स्वारी विराजमान झाली असून त्या रथाच्या घडघडाटानें, वाद्यांच्या कडकडाटानें व प्रकाशाच्या झगझगाटानें द्वैतवादशहादि वैरी नाहीं-तसे झाले असें वर्णन केलें आहे व त्यायोगें आपण केवळ निमित्तमात्र असून आपल्या-द्वारें सद्गुरु बालमुकुंदच शिष्यप्रबोधनकार्य करीत आहे असें सुचविलें आहे.

वरील स्फूट लेखांखेरीज मार्च १८८४ मध्यें पंतांनीं " श्रीबालमुकुंदबोधानंद-गुटिका " ( कल्याणचरित्र ) हा जरा मोठा लेख लिहिला. ( पु. २-३१ ते ८२ ) त्याच्या सुरवातीला बालमुकुंदांना मंगलमूर्ति गणपति कल्पून विघ्नदूरीकरणार्थ गणपतिरूप सद्गुरूचें स्तवन केलें आहे. अशा प्रकारची प्रस्तावना करून कल्याण म्हणजे आपला गुरुबंधु, व्यंकटेश जुनेबेळगावकर, याला सद्गुरुप्राप्ति कशी झाली व सद्गुरूनें त्याला कशा प्रकारचा बोध केला याचें पंतांनीं वर्णन केलें आहे.

या लेखाच्या द्वारें पंतांनीं मुख्यत्वेंकरून अष्टांगयोग व राजयोगांतर्गत सांख्य, तारक व अमनस्क म्हणजे तत्त्वविचार, साक्षात्कार व ऐक्यपद यांचें क्रमशः विवरण केलें आहे. राजयोगांतर्गत हे तीन पोटभेद व त्यांचे परस्परांशीं संबंध याविषयीं प्रकरण १४ मध्यें वर्णन केलेलें असल्यामुळें तें येथें देत नाहीं. या लेखाच्या शेवटीं योग्य शब्दांनीं कल्पांचा गौरव करून, ज्याची हा योगमार्ग उपदेशणाऱ्या गुरूचे ठायीं म्हणजे पर-शिवाचे ठायीं अनन्य भक्ति असेल, ज्याची योगाभ्यासाचे ठायीं निश्चल हांव असेल, जो जितेंद्रिय वीर शैव भक्त विरक्त असेल, अशा शिष्यासच त्याचा उपदेश करावा असा पंतांनीं इषारा दिला आहे.

" श्रीबालमुकुंदबोधानंदगुटिका " हा लेख लिहून झाल्यानंतर लौकरच पंतांनीं " श्रीबाळबोधामृतसार " हा लेख लिहिला. ( पु. २-८३ ते १५८ ) त्याचे सुरवातीस " मूकनागवेकु। जनरोळु जाणा गिरबेकु ॥ ध्रु. ॥ " हें श्रीबालमुकुंदांचें कानडी पद व त्याचें मराठी पद्यरूपांत भाषांतर हीं देऊन टीकेच्या सुरवातीला पंत म्हणतात, " या संसाररूपी दीर्घ स्वप्नांतून अचूक पार पडावें म्हणून समर्थांनीं कर्मी, उपासक, मुमुक्षु, भक्त, ज्ञानी यांस एके काळींच बोध व्हावा या कोमल अंतर्गत सहज हेतूनें हें वरील वचन गुह्यतमबोधप्रपूरित, अर्थ अनंत पण शब्द थोडे, अधिकारानुरूप त्यांतील सार जाणावें म्हणून जगापुढें मांडिलें आहे. याचा भाव संक्षिप्तरीतीनें या पाद्या-मध्यें बालावधूतानें फुंकलेल्या शब्दानें अनंतरूपी अनंतलीलाधारी सद्गुरूपुढें निवेदन, आत्मपणाचा अभिमान सद्गुरुचरणीं टाकून, करण्यास आरंभिलें आहे." नंतर पंतांनीं त्या पदाच्या ध्रुपदावर व प्रत्येक चरणावर टीका करतांना त्यांतील शब्दांचा अर्थ कर्ममार्गी, उपासक, मुमुक्षु ( सांख्य, तारक व अमनस्क या प्रत्येक योगाचे अभ्यासक ) भक्त व ज्ञानी यांनीं कसकसा घ्यावा यासंबंधीं विवेचन केलें आहे. तें अत्यंत बोधप्रचुर असून साधकांना फारच उपयोगी पडणारें आहे.

शेवटीं ज्या संत श्रोत्यांनीं म्हणजे आपले गुरुबंधु व शिष्य यांनी हा लेख लिहि-ण्याची आपणास विनंति केली त्यांचा योग्य शब्दांत गौरव करून पंत म्हणतात, " यांत बालमुकुंदाचें हृद्गत, बालमुकुंदानें लिहविलें आहे; आणि तुम्हीहि बालमुकुंदरूपच होऊन पिता आपण शिकविलेले खेळ मुलांकरवीं आपल्यापुढें खेळवून आनंद पावतो, त्याप्रमाणें या पामराकरवीं खेळवून आनंद पावतां. यांत प्रार्थना तरी काय करावयाची? तुमची ओळख तुम्हींच देऊन कृतकृत्य केलें. तुमचे पायीं अनन्य होऊन, तुमची अशीच प्रसन्न मर्जी बाळावर असण्याविषयीं मागणी करून माझ्या निरंजन स्थळींच्या आईकडे ज्ञान अनुभव मार्गें टाकून तिचे प्रेमस्तन पिऊन तिचे पदराखालीं सुखनिद्रा घेण्यास जातों! लोभ असावा! जय सद्गुरु बालमुकुंद महाराज की जय!"

पंतांचे जे गुरुबंधु व शिष्य त्यांच्यापासून फटकून राहिले होते ते १८८३ अखेर-पर्यंत दूरच होते. ता. २८-११-८३ रोजीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात, " तुझे मित्र सुटलेले ते तसेच आहेत. गरज सोडिली. थेट वैरागी बनलों." त्याच पत्रांत स्वतःच्या अनुभवस्थितीसंबंधीं पंत म्हणतात, " आसनीं, भोजनीं, शयनीं, वनीं, जनीं, सर्वकाळ अबाधित्व, अनंत अखंड घनदाट बाळस्वरूप प्रगट झालें आहे. तुम्हीं होतां तेव्हांपेक्षां हल्लीं सुवर्णास अधिकच तेज चढलें आहे."

पंतांना आपल्या गुरुबंधूंबद्दल व शिष्यांबद्दल जें अनिमित्त प्रेम वाटत होतें व त्यांच्या उन्नतीबद्दल जी कळकळ वाटत होती तीं त्यांना स्वस्थ बसूं देईनात. त्यामुळें त्यांची समजूत घालून त्यांना सन्मार्गाला लावण्याचे त्यांचे प्रयत्नहि चालू होते. त्यावेळची त्यांची मनःस्थिति त्यांच्या पुढील उद्गारांवरून स्पष्टपणें दिसून येते. ते असेः—" हे दयाळु बापा, काळाच्याहि काळा, तुझी दयार्द्र बुद्धि, तुझें पुत्रवात्सल्य, अनाक्रोश क्षमा हीं जाणून अनुभवूनहि पुत्रबांधवांसी कठोरपणें वागलों; त्यांचीं मनें दुखविलीं, त्यांचेकडे दुर्लक्ष केलें. काय मी अधम. तान्ह्या बाळाचे अगणित अपराध असतांहि ( अनंत माझे अपराध कोटी। नाणी मनीं घालुनी सर्व पोटीं ) या नारायणाचे वचनाप्रमाणें गुरुमाता पोटीं घालून बाळ पुढें आलें कीं तिचा कंठ दाटून मोठा आनंद उद्भवून प्रेमभरानें निजां-कावर घेऊन प्रीतीचें चुंबन देऊन स्तनपान करविते. असें असतां, बापा दयाळा, ( असें म्हणण्यासहि जीभ उचलत नाहीं ) माझीं अज्ञ बालकें, माझे अजाणते गुरुबंधु, गुरुतत्व जाणण्यास अशक्य असल्यामुळें, विषयांचे ठायीं दोषदृष्टि पूर्ण न साधल्यामुळें महायो-ग्यासहि करण्यास कठीण अशा आज्ञा, मुद्दाम नव्हे, पण मायेच्या झपाट्यांत सांपडून, खेळाच्या नादांत गुंतून, फसवणुकीनें न कळत, मोडल्या हें माहीत असतांहि तीं मुलें जवळ येत असतां, ' समोर येऊं नका ', असलीं निष्ठुर भाषणें बोललों. अहारे अधम चांडाळा, निर्लज्जा, दयाळु बापाचे नावास बट्टा लाविलास किरे, कोडग्या, या गुरुमूर्तीपुढें नाम घेऊन बोलतो आहेस काय म्हणून? वनांत जा. एकलकोंड्या, कावळ्या तुला कशाला गुरुमार्ग पाहिजे? द्वैतांत मर जा. काळे तोंड जगांत मिरवूं नको. अशा माझ्या नीच कर-णीनें तुझे पुत्र, नातु यांच्या व्यवस्थापकाच्या नावें तर्पण सोडून अशा मध्य प्रवाहांत हात

सोडणाऱ्याचे पदरीं पडल्याचा पश्चात्ताप करून आपआपलीं सुखें मिळतील तेथें शोधूं लागलीं. काय करतील बापडीं ! निराधार; इकडे बाप भीक मागूं देईना, आई जेवूं घालीना अशी अवस्था झाली. मग काय ? बाळ नसलेलें घर शून्यच कीं नव्हे ? माझा आनंद गेला, शांतिसती सोडून गेली, माझें तोंड मार्जारमुखाप्रमाणें अपशकूनदायक दिसूं लागलें. कोणी ढुंकूनहि पाहीना. क्षणोक्षणीं माझी मस्ती झडत जाऊन रात्रंदिवस त्रासाग्नींत पोळ-पोळून तुझी करुणा अनन्यभावें भाकितां धावून आलास. " हा जो पंतांच्या एका अप्रसिद्ध लेखांतील उतारा दिला आहे त्यावरून स्वतः पड घेऊन व आपल्या गुरुबंधूंचे व शिष्यांचे अपराध पोटांत घालून त्यांना जवळ करण्याची पंतांना किती तळमळ लागली होती तें स्पष्ट होतें.

१८८४ च्या सुरवातीला कांहीं मंडळींच्या मध्यस्थीनें पंत, कृष्णराव, गणपतराव, वगैरे मंडळींच्या सभा होऊन वाटाघाट सुरू झाली आणि उभय पक्षांमध्यें समेट झाला. या गोष्टीचा पंतांनीं आपल्या सनावळींत " पुनरपि मिलाफ, " "प्रेमकल्लोळ" व "एकी" या शब्दांनीं केला आहे. त्या प्रसंगाचें आपल्या एका अप्रसिद्ध लेखांत पंतांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. " पाहतां पाहतां पुत्रबांधवांच्या मिठ्या पडल्या. प्रेमाचा पूर लोटला, अंतःकरणें स्वच्छ झालीं, भक्तिसूर्य प्रकाशूं लागला, तुझ्या (सद्गुरूच्या) भजनांत अपूर्व रंग उद्भवला, ग्रहणाची काळोखी उडाली. तुझ्या प्रेमसूत्रानें तूं घालून दिलेल्या मंडलांत अनिवार प्रेमानंदानें नाचूं लागलों. तेव्हांपासून तुझी बालमंडळी हा वेळपर्यंत मोठ्या धैर्यानें तुझी कृपा भाकीत; तुझें नाम गात, तुझ्या भजनीं नाचत, आनंदाचा पूर लोटीत चालली व पुढेंहि चालतील हें पक्कें सांगतो, " अशा रीतीनें परस्परांसंबंधीं दिलसफाई होऊन पंत व त्यांचेपासून दूर झालेले गुरुबंधु व शिष्यमंडळी यांच्यामध्यें एकी झाल्यामुळें सद्गुरूची भजनसेवा करण्याला पंतांना अधिक उमेद आली, व त्यांच्या ठिकाणची बोधस्फूर्ति जोरावली. असें झालें तरी पंतांसंबंधीं कांहीं मंडळींच्या मनांत उत्पन्न झालेली अढी कायमच होती व त्यांच्या ठिकाणचा द्वेषाग्नि धुमसतच होता.

# प्रकरण १९ वें

## स्फुटलेख; अवधूतदर्शन आणि श्रीदत्तगत बालबोध अथवा प्रेमतरंग.

सन १८८४ च्या सुरवातीला पंत व त्यांचे विरुद्ध असलेली मंडळी यांच्यामध्यें समेट झाल्यामुळें सद्‌गुरूंची भजनसेवा, खेळ व बोध यांना मोठीच चालना मिळाली व पंतांच्या शिष्यांची संख्याहि वाढत चालली. साधारणपणें एप्रिल १८८४ पासून आपल्या गुरुबंधूंना व शिष्यांना उपदेशपर असे लेख लिहिण्याची पंतांची प्रवृत्ति विशेष प्रमाणांत दिसून येते. पंतांनीं एप्रिल १८८४ मध्यें " सत्य, सत्य, सत्य " व " विचार करा ", हे दोन लहान लहान लेख लिहिले. ( पु. ६–२२ ते २४ ) त्यानंतर जुलै १८८४ मध्यें " साधकांस विघ्नें ", " मानवास्थिति ", " कोल्ह्याचे शिकारीस वाघाची तयारी ", " हुषार, हुषार, हुषार " व " परमार्थ सुलभ नव्हे " हे पाच लेख लिहिले. ( पु. ६–२५ ते ३२ ) ते सर्व उपदेशपर आहेत. ऑगस्ट १८८४ मध्ये त्यांनीं " श्रीदत्तबोध; श्रीसद्‌गुरुज्ञानशक्तीनें सांगितलेलें वचन ", " सावध, सावध, सावध ", " सुप्तानंद" व " शिष्यप्राप्ति–आत्मविचार " हे चार लेख लिहिले, ( पु. ६–३२ ते ४२ ) व तेहि उपदेशपर असून त्यांच्यांत त्यांनीं " आर्तता नाहीं त्यास उपदेश करणें प्रेतास उपभोग दिल्याप्रमाणें होय ", " बुद्धीचे ठिकाणीं अद्वैत बोध स्थिरावून त्याप्रमाणें वृत्ति होईतोंपर्यंत अभ्यास सोडूं नये ", वगैरेंसारखे स्वानुभव–सिद्धांत सांगितले आहेत व आत्मप्राप्तीचा मार्ग सुलभ होण्याकरितां श्रीबालमुकुंदमथित सद्वर्तनाचे कांहीं नियमहि घालून दिले आहेत. सप्टेंबर १८८४ मध्यें " गायत्री " या लहानशा लेखांत त्यांनीं तात्विकदृष्ट्या गायत्री मंत्राचा अर्थ सांगितला आहे. ( पु. ६–४२ ते ४३ )

या सुमारास पंतांचा मेहुणा नाना हा अकस्मात वारल्यामुळें व भोंवतालच्या परिस्थितीमुळें त्यांना भयंकर मनस्ताप होऊन सद्‌गुरूचा वियोग फार तीव्रपणानें जाणवत होता व सद्‌गुरुदर्शनाची अत्यंत तीव्र उत्कंठा लागली होती. अशा परिस्थितींत एकदां ते, रावजी वगैरे मंडळी दड्डीस गेली होती व तेथें त्यांचें भजन पूजन, जंगलांतील खेळ वगैरे प्रकार चालू होते. एके दिवशीं पंतांना स्वप्नांत श्रीदत्तात्रेयांनीं संन्यासीरूपानें दर्शन दिलें. त्या स्वामींचा एक पाय लंगडा होता व " या माझ्या लंगड्या पायाला कांहीं तरी आधार दे, " असें ते पंतांना म्हणाले. तेव्हां पंतांनीं आपले सर्व कपडे गोळा करून ते स्वामींच्या त्या पायाखालीं ठेविले; पण त्यांचा त्याला नीट आधार मिळेना. तेव्हां पंतांनीं आपलें मस्तक त्यांच्या पायाखालीं ठेवून त्याला आधार दिला. त्यामुळें त्यांना फार आनंद होऊन त्यांनीं पंतांना प्रेमालिंगन दिलें व " मी तुला माझ्या चरणीं ठेविलें आहे " असें आश्वासन दिलें. तसेंच " तूं मला विसरणार नाहींस अशाबद्दल वचन दे ", असें ते पंतांना म्हणाले व पंतांनीं तें दिलें, नंतर स्वामींनीं एकतारीवर भजन करण्यास सुरवात

केली; इतक्यांत पंत जागे झाले! लगेच त्यांनीं ती हकीगत रावजीला सांगितली व आपल्याला नुक्ताच आलेला अनुभव पुढील पदाच्या रूपानें व्यक्त केला. " दत्तवचनसुधापानें अंतर निवालें। दत्तभजनीं नित्य नवें प्रेम उद्भवलें ॥ धृ. ॥ दत्तचरणछत्र मम शोभतें शिरीं। दत्तभक्तिवज्रकवच ल्यालों शरीरीं। दत्तनामखड्ग अति तीक्ष्ण करीं। दत्तकृपें मायाजाळ सहज तोडिलें ॥ १ ॥ दत्तनामामृतपानें झालों अमर। दत्तस्मरणें स्थिरावली शांति सुचीर। दत्तरूपमय झालें अनंत चराचर। दत्तसायुज्यपदीं चित्त पूर्ण रंगलें ॥ २ ॥ दत्तपंथ राजमार्ग धरुनी चाललों। दत्तनिरंजनगृहीं सहज पावलों। दत्तघनानंदरूपीं द्वैत हरपलें ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. १५७ ) या प्रसंगाला उद्देशून रावजी लिहितात, " त्या दिवशीं दत्तप्रभूची लीला वर्णन करीत असतां आनंदानें रात्र गेली. धन्य तो प्रेमाचा व दत्तकृपेचा दिवस !' तसेंच पंतांनीं आपल्या सनावळींत १८८४ सालांत " अवधूतदर्शन " हा खुणेचा शब्द लिहून ठेविला आहे.

याच सुमारास पंतांना आणखी एकदां सद्गुरूनें अवधूतरूपानें दर्शन दिलें. त्या प्रसंगाचें रावजींनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. " एकदां श्रीअक्कलकोटच्या स्वामीमहाराजांचे एक शिष्य वेणुग्रामीं आले होते. तेव्हां त्यांच्या भेटीला पंत गेले असतां ते पंतांकडे तोंड फिरवून बसले. तो प्रकार पाहून पंतांना वाईट वाटलें. नंतर लौकरच सद्गुरु बालमुकुंदांनीं पंतांना स्वप्नांत अवधूतवेषांत दर्शन दिलें व " तूं कोणालाहि भेटण्यास जाऊं नकोस. तूं बसल्या ठिकाणींच सत्पुरुषांची भेट होऊन खूण मिळते बघ असें तुला सांगितलें असतां तूं तिकडे कां गेलास ? इतःपर तसें करूं नकोस " असें सांगून पंतांचें सांत्वन केलें व ती अवधूतमूर्ति अदृश्य झाली." अशा तऱ्हेनें पंतांना या सुमारास आणखी एकदां अवधूताचें दर्शन झालें, त्या प्रसंगाचें व त्यावेळीं अनुभविलेल्या प्रेमानंदाचें त्यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:— "अवधूत देखियला। प्रेमाचा अमल भला चढला ॥ धृ. ॥ ब्रह्मगिरी चढत। निरंजनीं पहुडत। स्वानंदें क्रीडत। उडत नाचत आला ॥ १ ॥ आपआपीं हांसत। आपआपीं डुलत। आपणा विसरत। आपणा गिळुनी ठेला ॥ २ ॥ आकार निराकार। झाला चराचर। लोक लोकांतर। सर्व भरुनी उरला ॥ ३ ॥ आनंदें ओसंडत। प्रेमानंदीं बुडत। प्रेमभरें धुंडत। भक्तगृहीं आला ॥ ४ ॥ निःश्चळीं चालत। निःशब्दीं बोलत। सहज खेळत। दत्तहृदयीं भरला ॥ ५ ॥" ( द. प्रे. ल. १५३ )

वर जे पंतांना झालेल्या अवधूतदर्शनाचे दोन प्रसंग दिले आहेत, ते स्वप्नांतील होते. पण या सुमारास एके दिवशीं दुपारच्या वेळीं जागेपणीं आपणांस श्रीदत्तात्रेयांचें दर्शन होऊन आज्ञा मिळाल्याचें पंतांनीं स्वतःच एके ठिकाणीं सांगितलें आहे व त्या वेळीं आपणापुढें प्रत्यक्ष दिसत असलेल्या मूर्तीचें त्याच वेळीं झालेल्या पदांत फार सुंदर वर्णन केलें आहे. तो प्रकार असा—पंत म्हणतात, "बाळेकुंद्री येथें रामेश्वराचें जागृत स्थान आहे. तेथें ॐकार ध्वनि रात्रीं स्पष्ट ऐकूं येत असे. एकदां मला तेथें पूजा करावीशी वाटली आणि होतों तसाच फुलें घेऊन आंत जाऊन पूजा केली. त्याच रात्रीं दृष्टांत झाला.

रामेश्वर मला म्हणाला, “ मी कोण ओळखतोस काय ? ” तेव्हां मी म्हटलें, “ मला सद्‌गुरूविना अन्य कोण दिसणार ? ” तेव्हां तो म्हणाला, “ हें सामान्य स्वरूपाचें उत्तर नको. विशिष्ट असा मी कोण हें ओळखलेंस काय ? तर ऐक. “ आज तूं ज्याची पूजा केलीस तो मी रामेश्वर. “ ॐ श्री दत्त ” यावर विवरण करून पद कर म्हणून तुला जी आज्ञा झाली आहे व जें तुला कळेनासें दिसतें त्याचा अर्थ असा आहे. ‘ॐ श्री दत्त’ हीं तीन्हींहि एकच, भिन्न नव्हेत. पाहा. हें टिपून ठेव. ऊठ जागा हो, ” असें सांगून माझें अंग थोपटून त्यानें मला जागें केलें व मी तें लिहून ठेविलें. त्याच दिवशीं दुपारीं असाच ध्यानस्थ होतों; तेव्हां जाग्रदवस्थेंतच श्रीदत्त अवधूतरूप प्रत्यक्ष दिसून “ॐ-श्री दत्त याचा अर्थ कर ” अशी आज्ञा झाली व तेव्हांच, तें रूप पाहात असतांना त्याचें हुबेहुब वर्णन असलेलें “ राजयोगी धुरंधर बालदिगंबर ! दर्शनें धन्य मी झालों ” ( द. प्रे. ल. ३० ) हें पद म्हटलें.” ( पु. ८–१२७ ).

या पदांत आपल्याला दर्शन देणाऱ्या अवधूतमूर्तीचें पंतांनीं फार बहारीचें वर्णन केलें आहे. ते म्हणतात “ मूर्ति सांवळी सुंदर सुकुमार मस्तकीं मंदिल तुरा । रत्नजडित सिंहासनीं शोभे दिव्य अमोलिक हिरा ॥ १ ॥ योगी भोगी यति फकीर नग्न ब्रह्मचारी । अनंत रूपें दासां भेटे प्रेमें श्रीनरहरी ॥ २ ॥ अरुणप्रभेसम पायीं शोभती कांचनमय पादुका । मंदहास्य प्रभु आनंदसिंधु सुलभ भोळ्या भाविकां ॥ ३ ॥ कामधेनु विद्या माता भक्तवेष्टित दत्त । सस्मित वदनें कृपाकटाक्षें भक्ताकडे पाहात ॥ ४ ॥ करुणास्वरें बाहतां निशिदिनीं दत्त धांवत आला । दर्शनमात्रें मन हरपुनी दत्त स्वानंदें धाला ॥५॥ ” तसेंच श्री रामेश्वरांनीं ‘ ॐ ’, ‘ श्री ’, ‘ दत्त ’ हीं तिन्हींहि एकच असा जो खुलासा केला त्याप्रमाणें पंतांनीं “ सद्‌गुरु माते धांवगे । मज भेट देईगे ॥ ध्रु. ॥ श्रीरूपें अनंत ब्रह्मांडें व्यापुनी । शेष तूंची ॐ कारगे ॥ १ ॥ तत्त्वमसि महावाक्यें पाहातां । विश्व ब्रह्म तूंची एकगे ॥ २ ॥ माझें मीपण गुरुरूपें हरतां । दत्तची बालमुकुंदगे ॥ ३ ॥ ” ( द. प्रे. ल. २६ ) हें ब्रह्मात्मैक्यबोधपर पद केलें. पंतांना सद्‌गुरूनें यतिरूपानें व अवधूतरूपानें वेळोवेळीं दर्शन देऊन बोध केल्याचा जो येथें उल्लेख केला आहे त्यासंबंधीं एके ठिकाणीं सद्‌गुरूला उद्देशून ते म्हणतात, “ दयासागरा, मी प्रांजळपणें तुझे पायापाशीं कबूल करितों कीं तूंच बालावधूत माझा त्राता, माझा शास्ता, माझा पाठीराखा, भजनप्रिय, नरसिंहसरस्वती अशी माझी खात्री बहुत वेळां यतिरूपानें, अवधूतरूपानें, अवस्थांतरीं केलीस. अभयवचनहि अनेक वेळां दिलेंस, वर्तणुकीचे नियमहि कळविलेस; क्षणोक्षणीं हुषारीहि दिलीस. ” ( पु. २–१६५ )

१८८४–८५ च्या सुमारास आणखी एका विलक्षण मार्गानें पंतांना सद्‌गुरूची आज्ञा, संदेश अगर बोध मिळत असे; तो प्रकार असा—त्यांचा गुरुबंधु गोपाळ श्रीपाद भागोजीकोप हा स्वभावानें भोळा व एकधोरणी होता. तो पंत सांगतील त्याप्रमाणें, फारसा तर्क न लढवितां वागत असे व पंतहि त्याला बरोबरीच्या नात्यानें प्रेमानें वागवीत. पंतांना एखादी शंका उत्पन्न झाल्यास गोपाळाला स्वप्नांत श्रीदत्तात्रेयांचें दर्शन होऊन

त्या शंकेचा खुलासा होत असे व याच मार्गानें त्यांना मधुन मधुन आज्ञा व संदेशहि मिळत. यासंबंधीं गोपाळ श्रीपाद भागोजीकोप लिहितात, " कल्लप्पा एकदां ( कारवाराहून बेळगांवास ) येऊन गेल्यावर पंतांना विचाराचा जोर वाढत जाऊन शंकानिवारण करण्यास कोणी समर्थ नाहीं असें वाटून गुरूच्या स्मरणांत तळमळ पंतांना वाटूं लागली. एके दिवशीं मी दररोजच्या प्रमाणें साधनास बसलों असतां ब्राह्मणरूपानें एकटा माझ्या पुढें येऊन " तुझा गुरुबंधु दत्तोपंत बाळेकुंद्री हा माझा निःसीम भक्त असून त्याचा कुलस्वामी मी आहें. त्याचेच ठिकाणीं माझा अंश आहे. म्हणून त्याला निराळें दर्शन देतां येत नाहीं. आतां येथून दत्तोपंतांना ज्या शंका येत जातील त्या आपोआप नाहींशा होतील. आतां ( त्यांना ) "ॐ श्री"चा अर्थ करण्यास सांग ", असें म्हणून ते गुप्त झाले. मग हा प्रकार दत्तोपंतांना कळविला व या बोलण्यावर त्यांची भक्ति बसली. मग पंतांनीं त्रैमूर्तीचा फोटो ठेवून भजन करण्यास सुरू केलें व ॐ श्रीचा अर्थ निबंधरूपानें लिहिला व पुढें त्यावर त्यांनीं पदेंहि केलीं आहेत. पुढें पंतांस ज्या शंका येत त्या ते मला कळवीत. मग मला दर्शन होऊन प्रत्यक्ष सर्व खुलासा होत जाई. × × × पुढें ' गोपाळास भेट देतोस आणि मला कां भेटत नाहींस. ' म्हणून पंत फारच अट्टहास करून घेत असत. तेव्हां श्रीदत्तात्रेयांनीं मला दर्शन देऊन सांगितलें कीं, " मी मूर्तिमंत त्यांना दर्शन देत नाहीं. मी ( त्यांना ) स्फूर्तिरूपानें अगर श्रुतीनें भेट देत जाईन. " हें मी पंतांना कळविलें. त्यावेळीं माझें नाव " गोपाळ " असें असून मला " वेदपाळ " असें पंत म्हणत व मी फार सभ्य असून तर्क वगैरे कांहीं नसल्यामुळें मला " शंकर " असें नाव ठेवून त्याप्रमाणें ते पदांमध्यें व लेखांमध्यें उल्लेख करीत." गोपाळ भागोजीकोपमार्फत आपणाला सद्गुरूची आज्ञा व संदेश वेळोवेळीं मिळत असत व मधुन मधुन जागृतिहि मिळत असे या गोष्टीचा पंतांनींहि वारंवार उल्लेख केलेला आहे. एके ठिकाणीं सद्गुरूला उद्देशून ते म्हणतात, " अजापुरीं ( दड्डी येथें ) माझें मस्तक तुझे चरणतळीं ठेवून " तुला मी सोडीत नाहीं. माझें स्मरण तूं सोडूं नकोस, " असें, दयाळा, अभयवचन देऊन नाचायास लाविलेंस; आणि वेदपाळद्वारें निजबोधाची नित्य वृष्टि आणि प्रेमसागराच्या अनंत लहरी मजकरितां उठविल्यास. त्याचें वर्णन या सर्व क्रियेस सदासाक्षी जी श्रीशारदाज्ञानशक्ति इनेंच करावें. " ( पु. २–२५४ )

यावेळीं पंत व गोपाळ म्हणजे शंकर यांचे परस्परांशीं संबंध कसे होते यासंबंधीं ता. ६–९–१८८४ रोजीं आपला अत्यंत प्रीतींतील गुरुबंधु जो कल्याण त्याला लिहिलेल्या पत्रांत ( पु. ४ पा. ४३ ) पंत लिहितात, " स्फूर्तीसरशीं अग्नींतहि उडी घालणाऱ्या, प्रिय पुत्रबांधवांची आठवण सतत होऊन एकदम प्रेम, आणि वृत्तीवर असल्यानें वियोग यांच्या योगानें डोळे आसवांनीं भरून येतात; आणि रोजीना आतडें तिकडे धांवतें; स्थूल दृष्टीला जड देह टाकून गेलांत, पण प्रेमाचा गड्डाच उपटून त्याचें एकछत्रत्व कल्याण व शंकर यांनीं आपल्या हातीं घेऊन सूर्यचंद्राप्रमाणें त्रिजगांत, मला अभिमान बाळगिण्याजोग्या शूरत्वानें तळपताहेत. धन्य माझी ! केव्हांहि माझी पाठ थोपटणारे बंधु आणि

पोटास कवटाळून घेणारे पुत्र चारी देहांत प्रत्यक्ष असावे हेंच जीवन्मुक्तीचें अनेक जन्मांतरींच्या सुकृताचें सौख्य होय. " या उताऱ्यावरून कल्याण म्हणजे वेंकोबा जुनेबेळगावकर व शंकर म्हणजे गोपाळ भागोजीकोप या उभयतां गुरुबंधूंशीं पंतांचे संबंध किती जिव्हाळ्याचे व प्रेमाचे होते हें दिसून येईल. याच पत्रांत पंत पुढें लिहितात, " शनिवारीं सर्वत्र मंडळी गंगारामाचे घरीं गणपतीपुढें भजनसमरस करून मोठ्या आनंदांत बहुतेक रात्र घालविली. असाच प्रकार आहे. " ( न छापलेला मजकूर ) तसेंच त्या पत्रांत पंतांनीं उपदेशपर १५ गोष्टींचें विवेचन करून शेवटीं " येणेंप्रमाणें १५ गोष्टींचें विवेचन सद्गुरुकृपाबलानें, भक्तीची लेखणी करून, प्रेमाचे शाईनें शुद्धसत्वयुक्त ज्ञानपटावर ठळक अक्षरांनीं ( कोरून ) ठेवावें " असें म्हटलें आहे.

पंत व त्यांचे विरुद्ध असलेले गुरुबंधु व शिष्य यांची एकी झाल्यामुळें आणि सद्गुरूनें यति–अवधूत–रूपांनीं व गोपाळामार्फत बोधवृष्टि करून व अभय व आश्वासन देऊन प्रेरणा केल्यामुळें त्यांच्या ठिकाणच्या भक्तिप्रेमाच्या भावना व बोधस्फूर्ति यांना प्रचंड चालना मिळाली व त्या भावना व बोध हीं लेखनद्वारें प्रगट होऊं लागलीं. १८८४ च्या आक्टोबरच्या सुरवातीपासून पंतांचें जें लेखन झालें त्यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. त्या महिन्यांत त्यांनीं " प्रश्नोत्तरें ", " आत्मविचार जनाकरितां नव्हे " व " पश्य सर्वत्र मामेकम् " हे तीन उपदेशपर स्फुट लेख लिहिले ( पु. ६–४३ ते ५२ ) व " श्रीदत्तगत बोलबोध अथवा प्रेमतरंग " हा जरा विस्तृत असा सुंदर लेख लिहिला; ( पु. २–१ ते ३० ) तो त्याच्या नावांत दर्शित केल्याप्रमाणें पंतांना मिळालेल्या सद्गुरु बालमुकुंदांच्या बोधाचें सार अथवा त्यांच्या अंतःकरणांतील प्रेमसागरावरील तरंगच होय. कारण त्यांत सद्गुरूचें बोधस्वरूप व प्रेमस्वरूप हीं ठळकपणानें व्यक्त झालीं आहेत.

" प्रेमतरंग " लेख लिहिण्यास कारण असें झालें कीं पंतांचा गुरुबंधु परशराम व शिष्य गंगाराम हे आक्टोबर १८८४ च्या सुमारास हॉस्पिटल असिस्टंटच्या वर्गांत जाण्याकरितां पुण्यास जाण्याचें ठरलें. ते–विद्यार्जनाकरितां कां होईना–आपणाला सोडून जाणार ही कल्पनाहि पंतांना असह्य झाली. परंतु ही गोष्ट ओघप्राप्त व अपरिहार्य असल्यामुळें ती बदलणें शक्य नव्हतें. तेव्हां आपल्यापासून ते दोघे दूर गेल्यावर त्यांना वारंवार बोधजागृति व्हावी व गुरुप्रेम अनुभविण्यास मिळावें म्हणून पंतांनीं आपल्या अनुभवोदधीचें मंथन करून हें " प्रेमतरंग " रूपी नवनीत काढिलें. हा लेख म्हणजे गुरुप्रेमसुख अनुभवलेल्या व विद्यार्जनाकरितां परगावीं जाणाऱ्या तरुण व होतकरू शिष्याला सद्गुरूनें अत्यंत कळकळीनें केलेला बोध असून त्याला सुरवातहि वात्सल्यभरानें त्या शिष्याला ' पुत्रा ' असें संबोधून केलेली आहे व " मुख्यत्वेंकरून या जन्मांत आपण कोण, देव कोण याचा विचार करून मुक्त व्हावें एवढाच ईशसंकल्प आहे", असा इषारा दिला आहे. नंतर सद्गुरूचीं मुख्य मुख्य लक्षणें सांगून त्याला तनुमनधन कशीं अर्पण करावीं तें थोडक्यांत सांगितलें आहे व "ॐ नमः शिवाय" हा तारक मंत्र व "बालमुकुंद" हें सद्गुरुनाम यांच्यामध्यें गूढ असलेला स्वरूपबोध विशद करून त्या मंत्राचा अगर नामाचा सार्थ जप केल्यानें मंत्र-

योग, लययोग, हठयोग व राजयोग व अनन्य भक्ति हीं सहज साध्य होतील असें सांगितलें आहे. नंतर "तूं स्थिर, शांत, निराकार असा परमात्मा जिकडे तिकडे पसरलेला स्वयंप्रकाश आहेस असें सांगून "अहो, आत्माप्राप्तीस्तव कांहीं देशोदेशीं व वनोवनीं फिरण्याची जरूरी नाहीं. बसल्या ठिकाणींच आपआपणास पहा म्हणजे कार्य झालें," हा स्वानुभवसिद्धांत सांगितला आहे. त्यानंर अत्यंत प्रीतीनें " अनिमित्त बांधवा, " " जिवलग पुत्रा, " अशा जिव्हाळ्याच्या शब्दांनीं त्याला संबोधून आत्मैक्यभक्ति, आत्मनिवेदन भक्ति अथवा पराभक्ति म्हणजे काय तें सांगितलें आहे व " भक्ति म्हणजे कांहीं पदार्थ नाहीं. स्वरूपाची आवड तीच खरी भक्ति होय, " असें सांगून गुरुकृपा कशी प्राप्त होते तें सांगितलें आहे. नंतर पंतांनीं शिष्याला सद्गुरूच्या आज्ञेप्रमाणें " ॐ श्री " चा अर्थ विशद करून सांगितला असून त्या दोन अक्षरांचें महत्व वर्णन करून ते म्हणतात, "या दोन अक्षरांचा भेद कळण्याची योग्यता यावी म्हणूनच ही चोपडी भरली. हा माझा अनुभव आहे. " नंतर आपल्या बोधमय जीवनक्रमाचें रहस्य त्यांनी पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे. " बालमुकुंदाच्या बोधबळावर नाचत नाचत दोन दिसतात, पण एकच आहे असें कळण्यास्तव, गुरु–शिष्य–टिपऱ्या वाजवून ॐकारनाद उद्भवीत चारी देहांचें साक्षित्व असेपर्यंत एवढी पदवी ज्यानें हातोहातीं दिली त्याचें विस्मरण होऊन कृतघ्नपणा येईल तो न यावा म्हणून भजन, स्मरण, ध्यान करून, प्रेमरसाचा प्याला आकंठ पिऊन त्या गुंगींत मन मानेल तसें तुमच्यापुढें वेड्या वाकड्या उड्या मारीत फिरतों. क्षणांत योगी, क्षणांत भोगी, क्षणांत संभावित, क्षणांत लुच्चा, क्षणांत मनुष्य, क्षणांत पिशाच, क्षणांत पोक्त, क्षणांत पोरकट, अशा चंचलपणानें वागतों, व्यवहार करितों, मनास येईल तेव्हां बोध करितों, नाहीं तेव्हां रिकाम्या गप्पांत रमतों, योगी होऊन एकादे वेळीं साधनाच्या खटपटींत सहजीं पडतों, भोगी होऊन शुद्ध संसारी होतों. परंतु सद्गुरु बालमुकुंदानें पूर्ण कृपेनें " ॐ श्री " चा बोध सांगून साक्षीच्या तोंडासमोर झळकत ठेविल्यामुळें कशाचीच पर्वा नाहीं. ही स्वानुभवसिद्ध गोष्ट आहे. तीच तुम्हांला पुत्रवात्सल्यानें, बंधुप्रेमानें उघड करून दिली आहे. ती जीवीं दृढ धरा, म्हणजे शांति प्राप्त होऊन इहलोकीं देहसमाप्तीपर्यंत आनंदांत राहून अंतीं बालमुकुंदपदीं ऐक्य आहांच, पण घटाकाश महदाकाश न्यायें मिळून जाल. हें सत्य.. ही माझी दीनाची देणगी आहे. स्वीकारून बालमुकुंदाच्या नावानें गजर करा. "

पंतांचा हा " प्रेमतरंग" लेख म्हणजे त्यांच्या अनुभवाचा गाभाच आहे. त्यांतील रहस्य समजण्याला त्यांनीं परशराम व गंगाराम यांना ता. १५–११–१८८४ रोजीं जें पत्र लिहिले ( पु. ४–८८ ) तें वाचल्यानें फार मदत होईल असें वाटल्यावरून त्यांतील कांहीं उतारे येथें देत आहोंत. त्या पत्राच्या सुरवातीला, "बाळांनों × × × तुम्हीं देशांतरास निघालां पुन्हां भेट होईल याचा निश्चय नाहीं. बोध तरी वरचेवर होत असावा, सत्संग असावा. कारण संसारसागर फार घोर आहे. यांत कामक्रोधादि मोठाले नक्र आहेत. स्त्रिया सुसरी, एकदां मिठी घातली की घात करणाऱ्या टपून बसल्या आहेत.

मोहाचे अनिवार्य भोंवरे आहेत. कोणत्या वेळीं घोंटाळयांत पाडतील याचा नेम नाहीं. प्रारब्धक्षयापर्यंत देहाचें साक्षित्व बाळगून व्यवहार केलाच पाहिजे. त्या अर्थी या भवसमुद्रांतच शूरपणानें, मोठ्या हुषारीनें पार पडून गेलें पाहिजे. म्हणून गुरुकृपेची नाव घेऊन ती चालविणारा खुद्दच नावाडी बनून तुमचे हातांत हें "प्रेमतरंग किंवा दत्तगत बालबोध" नामक तीक्ष्ण शस्त्र देतों. याचें फार काळजी घेऊन संरक्षण करा. पुन्हां मिळणें कठीण," असा इषारा देऊन पंतांनीं प्रेमतरंग लेखाचें वर्णन पुढील शब्दांत केलें आहे. तें असें "हा प्रेमाचा गड्डा, अनुभवाचा पुंज, ज्ञानाचा दिवा, आत्मज्ञानाची किल्ली, बालमुकुंदाचा फोटो, आतड्यांत घुसलेला, आतडें तुटण्याची काळजी न बाळगितां तुमचे हातीं देतों. फार काळजी घेऊन जतन करा. फक्त सन्निध बाळगल्यास अनेक फळें प्राप्त होतील. केव्हां केव्हां आठवण केल्यानें बुद्धीची मांद्यता जाऊन कामकाजांत हुषारी येऊन अभ्यासांत उत्तेजन मिळून, आत्मविचाराची पाहाट फुटून दिवसोंदिवस ज्ञान-सूर्य अधिकाधिक उज्वलितपणें प्रकाशूं लागेल व अज्ञान-तिमिराचा नाश होऊन, जन्म-मरणाचे फेरे चुकून, अखंड शांतीच्या साम्राज्य-सिंहासनावर अखंड स्थापित व्हाल. कोठेंहि गेलां तरी ही चीज विसरूं नका. काळजासहित प्राण जाण्याचा जरी प्रसंग आला, तरी हें बुक हातचें सोडूं नका. यांतील बोधखड्ग तुम्हांला अनेक संकटांतून पार करील. त्यापासून उत्पन्न होणाऱ्या प्रेमरसानें भवरोगपीडा निवारील. नित्य कर्मांपैकीं याचें पठण हें एक कर्म आहे असें समजून फुरसुतीनुसार पाहात चला. हें तुमचें कर्तव्य आहे. ही माझी गरीब आईची तुम्हां परदेशी मुलांना दूर प्रवासास जातांना वाटेंत, म्हणजे आयुष्यक्रमांत, भूक लागल्यावेळीं खाऊन थंड व्हावें म्हणून दहीभाताची बुत्ती कालवून दिली आहे. भुकेची पीडा होऊं लागली, रस्ता चालवेनासा झाला म्हणजे अंतःकरणाचे छायेखालीं बसून, गुरुस्मरणाचे पाण्यानें तोंड धुवून, बाळांनों, तुम्हांला लागेल तें खा आणि वर प्रेमाचें पाणी प्या. जतनेनें चांगलें बांधून घ्या; कोणी तरी चोर भेंद काढून घेतील! तापत्रय, त्रास, चिंता या कुत्र्यांना मारण्याची ही काठी आहे."

पंतांचा "प्रेमतरंग" लेख व ता. १५-११-१८८४ चें पत्र या दोहोंमध्यें त्यांच्या अत्यंत प्रेमळ, कोमल व दयार्द्र अंतःकरणाचें व त्यांच्या ठिकाणच्या अभेद भक्तीचें व अद्वय बोधाचें प्रतिबिंब अगदीं स्पष्टपणें उमटलेलें आहे. त्यामुळें तीं मुळांतूनच वाचावीं अशी वाचकांना विनंती आहे.

# प्रकरण २० वें

## उपदेशपर स्फुटलेख व आत्मज्योति.

आक्टोबर १८८४ मध्यें " प्रेमतरंग " लेख लिहून झाल्यापासून पाच साडेपाच महिन्यांत पंतांनीं सुमारें पन्नास स्फुट लेख लिहिले. त्यांपैकीं बहुतेक लेखांचा विशेष हा आहे कीं त्यांनीं ते आपल्या गुरुबंधूंना व शिष्यांना उपदेश करण्याच्या हेतूनें लिहिले. त्यांपैकीं कांहीं लेखांत तर अस्ताव्यस्त वागणाऱ्या मंडळीवर फार कडक भाषेत ताशेरे उडविले आहेत. ता. २३-१०-१८८४ रोजीं पंतांनीं " डांगोरा " हा लेख लिहिला (पु. ६-५२ ते ५६) व ता. २४-१०-१८८४ रोजीं " निरंजनरूप जाणून निःसंग राहा " हा लेख लिहिला. (पु. ६-५७ ते ५८) या दोन्हीहि लेखांत त्यांनीं अत्यंत कळकळीचा व सडेतोड उपदेश केला आहे. " डांगोरा " या लेखाला सुरवातच "हुषार, हुषार, हुषार. जागे रहा निजूं नका" या शब्दांनीं केली आहे व पुढें स्त्रीलंपट व तनुमनधनाशा उराशीं बाळगून पारमार्थिक म्हणविणाऱ्यांवर सणसणीत कोरडे ओढलेले असून पुढील कळकळीचे व आतड्याला पीळ पडून निघालेले उद्गार आहेतः—"वेड्या पीरांनों, आतां तरी कान झाडा, डोळे मिटूं नका. माझें वेडें वि ुप रूप, घोगरा गळा, तुटक तुटक बडबडणें पाहून हसाल तर हसा. थट्टा करणार तर खुशाल चालूं द्या. मी कांहीं तुमच्याकडून मानमरातब मिळविण्यास ओरडत नाहीं. मी महाराज राजश्री बाळाजी अनंत मोकाशी यांच्या घरचें मीठ खाऊन वाढलेला, त्यांचें ब्रीद राखून त्यांची चाकरी वजावीत आहें. पाहा तो कसा दहाव्या मजल्यावर कौपीन कसून भस्म धारण करून टिळा, मुद्रा ठोकून, हातांत सोटा घेऊन, " मला विसरूं नका" अशी गर्जना करीत उभा आहे. अहो, दिवाभीत घुबडांनों, त्याची प्रभा सर्वत्र फाकली आहे. अझुनी तुमच्या पुढें मूर्तिमंत उभा आहे तोंपर्यंत सावध व्हा. शरण जा, नाकधुऱ्या काढा, धूळ चावा, थोबाडींत मारून घ्या, " चुकलों " म्हणून सांगा. तुम्हांला धैर्य नसेल तर मी पाहिजे तर मध्यस्थी करितों. त्याचे आज्ञेवरून मी इतक्या कठोर शब्दांनीं तुम्हांशीं बोलत आहे. माझा उपाय नाहीं. लाजूं नका; डोळे मिटूं नका; चंचल होऊं नका; कपाळास आठ्या घालूं नका; आंतल्या आंत चुरमुरे खाऊं नका; कुकल्पना वाढवूं नका; मजवर रागावूं नका; माझें किंचित्‌हि अहित करणें तुमचे हातीं नाहीं. तुमची भेकरासारखी स्थिति पाहून मी आपला कुळे बडवीत हासत हासत महाराजापाशीं कागाळी सांगेन. मला तरी वाटतें कीं तुमची मस्ती मोडून, आशा खंडून, द्वैतभावना सांडून, कापट्यकवच काढून, दीन हीन नम्र होऊन माझे बरोबर चला. तुम्हांस आश्वासन देववितों, केल्या अपराधांची क्षमा करवितों; या उपर तुमचा प्रपितामह आला तरी तुम्हांस कठोर पण सलोख्याच्या शब्दांनीं सांगण्यास येणार नाहीं. घडी जात आहे; साधून घ्या. मुक्तिमंदिरीं चला. शमदमादि सामुग्री सर्व घ्या.

गुरुभक्तींचें निशाण चढवा. प्रेम-गोधडी पांघरा. वैराग्य-विभूति चर्चा. ज्ञान-काठी घ्या. अपुनरावृत्तिमार्गानें मी जातों, तसे पावलें टाकीत चला या उपर तुमची मर्जी. माझें काम तुम्हाला कळवावयाचे, कळविलें. याला हृदयस्थ आत्माराम साक्षी आहे. पंच तत्वें, चंद्र सूर्य, तुमचीं अंतःकरणें पुराव्यास हजर आहेत. चव्हाट्यावर ओरडून सांगितलें आहे." याप्रमाणें डांगोरा पिटून अखेर पंतांनीं पुढील शब्दांत सद्‌गुरूची अत्यंत काकुळतीनें प्रार्थना केली आहे. ती अशीः–" सद्‌गुरुनाथा, यांचीं मनें निवळ. यांच्या डोळयांत अंजन घाल. यांच्यांतील दुर्गुणांचा झाडा कर. तुझ्या मंदिरीं येण्यास सिद्ध झालेले असून उपाधीनें गटारांत लोळत आहेत. कृपा कर. मलाहि कळकळ वाटली, म्हणून तुझा विनवणी करितों. मला मात्र पुन्हां हें काम सांगूं नको. मी द्वारींचा कुत्रा." या लेखाच्या शेवटीं "तळवार" अशी सही आहे. "निरंजनरूप जाणून निःसंग राहा" या लेखांत गुरुमार्गांत येऊन लोकवासनेला बळी पडून आपला जो वाटाड्या अगर मार्गदर्शक त्याच्या सांगण्या-प्रमाणें न वागणाऱ्या मंडळींना सावध राहण्याचा पंतांनीं कळकळीनें उपदेश केला आहे. आक्टोबर १८८४ मध्यें पंतांनीं "निजबोध", "दहा धडे" व "एकादशी" हे आणखी लेख लिहिले. ते उपदेशपर आहेत.

नोव्हेंबर १८८४ मध्यें पंतांनीं "कठीण शब्दांचा अर्थ", "तरुणांस बोध," "सद्‌गुरूचें उपकार–स्मरण", "योग्य संतोष मनीं धर", "स्फुट विचार", "गुरु-खुणेचा विचार," व "शिष्य–अधिकारलक्षण" हे प्रकाशित झालेले सात लेख लिहिले. (पु. ६-६७ ते ८३) त्यांपैकीं "सद्‌गुरूचें उपकारस्मरण" या लेखाखेरिज बाकीचे सहा उपदेशपर आहेत. या लेखांखेरीज प्रसिद्ध न झालेले असे तीन लेख या महिन्यांत त्यांनीं लिहिले. त्यांपैकीं "मोहरमांतील वाघ" हा लेख ता. १-११-१८८४ रोजीं लिहिला व त्यांत स्वतःला गुरुमार्गी म्हणवून अंतरंगीं विषयेच्छा बाळगणाऱ्या दुष्ट, दुर्जनांची संगत धरून, मित्रनिंदा, गुरुनिंदा व संतनिंदा करणाऱ्या मंडळीला मोहरमांतील नकली वाघांची उपमा देऊन त्यांच्यावर सणसणीत ताशेरे झाडले आहेत व त्यांना सुधारण्याचा उपदेश केला आहे. ता. १५-११-१८८४ रोजीं पंतांनीं "मागील विसरा, मागील आठवा" व "बुनादीचें उगवणें झालें" हे दोन लेख लिहून त्यांमध्यें सद्‌गुरूची स्तुति व उपकार–स्मरण केलें असून आपल्या कांहीं गुरुबंधूंची व आपली एकी झाल्यासंबंधाची हकी-गत दिली आहे.

डिसेंबर १८८४ मध्यें पंतांनीं १५ स्फुट लेख लिहिले (पु. ६–८४ ते १३३) व ते बोधपर आहेत. त्यांपैकीं पहिला लेख "नाम्या म्हणे नाम गाईन निर्विकल्प। येसी आपोआप गिवसीत" या शीर्षकाखालीं लिहिला असून त्यांत निर्विकल्प नामाचा महिमा वर्णन केला आहे. नंतर त्यांनीं "जागे राहा", "आम्हीं कोण? डोळे असून आंधळे", "गति", "ध्यानांत धर" व "भवनदी व ती तरून जाण्यास उपाय" हे पाच लेख लिहिले. त्यांपैकीं "भवनदी व ती तरून जाण्याचा उपाय" हा लेख फार मह-त्वाचा आहे. कारण त्यावरून सद्गुरु बालमुकुंदांनीं केलेली पंथविस्तार करण्याची आज्ञा

पाळण्यासंबंधाची पंतांची आस्था व गुरुबंधु व शिष्य यांच्या संबंधीं तिळतिळ तुटणाऱ्या त्यांच्या अंतःकरणाचा जिव्हाळा हीं व्यक्त होत आहेत; तसेंच सद्गुरूनें त्यांच्याकडे सोपविलेलें महत्कार्य करण्यास त्यांनीं सुरवात केली तेव्हां ते कोणत्या भूमिकेवर आरूढ होते व त्यांच्या ठिकाणीं शिष्यप्रबोधनकार्याला अवश्य लागणारी काय तयारी होती या संबंधींहि थोडीशी कल्पना होते. या लेखांत प्रथम महावेगवान भवनदीचें अत्यंत भेसूर व यथार्थ चित्र रेखाटून पुढें पंत म्हणतात, "अशा भवनदींत जर अचुक पार पडण्याचा निश्चय झाला तर निढोंगी, निःसंग, निर्लेप, निस्पृह, दृढविरक्त, अति धैर्यशाली, दूरदृष्टि, वीरशैव, अभिमानरहित, ज्ञानयुत, अनुभवपुंज अशा कर्णधाराचे चरण धरून त्यानें सांगितलेली गोष्ट प्रत्येक हृदयपटावर लिहून ठेवून, त्यास किंचित्‌हि आड न येतां, तारूं हाकारावें. कर्णधारानें उचित उपाय सांगून एखाद्यास वाटाड्या करून त्यास माहितीची पूर्ण सामुग्री देऊन, आपण सर्वांपुढें मुक्कामास पैलतीरास निघून गेला तर त्यानें घालून दिलेला कित्ता, त्यानें दाखविलेली खूण, त्यानें दिलेला गडी पुढें करून, आपला तर्क न लढवितां, तीरस्थ, नीरस्थ यांचे मोहांत न पडतां "आपणांस पूर्ण माहिती मिळाली. आतां कंपासाची काय गरज ? वाटाड्याची काय गरज ? गड्याचें काय काम आहे ?", अशा अभिमानास बळी पडून व्यर्थ नानाप्रकारच्या धोक्यांत सापडून उभयभ्रष्ट न होतां त्याच्या आज्ञा शिरसामान्य करून चालावें. त्यांतच आत्महित होऊन पैलतीरास सहजीं सहज जाऊन थडकाल. माझ्या परममित्रानों ! हें ऐकून "तर मग अशा घोटाळ्यांत खऱ्या कर्णधाराची ओळख लागावी कशी ? त्याचे तारवाची खूण काय ? असा एखादा धीट पुरुष दाखवाल काय ? कीं जेणेंकरून आम्ही पिच्छा धरून भवनदी निर्धास्त पार तरूं ?", असें मला विचाराल तर मी आनंदानें त्याचा "होय, माझा सद्गुरु बालमुकुंद यानें लोटलेलें तारूं अच्छेद्य, अदाह्य असें आहे. त्याचें नाम ऐकतांच तीरस्थ-नीरस्थांची "दे माय धरणी ठाय" अशी अवस्था होते. त्यास शरण जा.", असें हात उभारून त्रिभुवनांतील लोकांच्या कानठाळया बसण्याजोग्या उच्च स्वरानें, अनुभवाच्या शिखरावर उभा राहून गर्जून सांगतों. तर बाबांनों ! त्याची खूण पहा. लक्षांत धरा. मीहि त्यानें नेमलेला एक नावाडी, या भवनदींत भैदांचे तडाक्यांत सापडून हायहाय करीत उतरतात आणि जे मजकडे येतात त्यांस त्याचे ठायीं नेण्यास तयार होऊन त्यानें दिलेली होडी घातली आहे; या हवें तर." (पु. ६-९७ ते ९९) त्यानंतर पंतांनीं आपणांस सद्गुरूनें दिलेल्या चिमुकल्या होडीचें, तारवाचें अगर शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेल्या लढाऊ जहाजाचें पुर्दालप्रमाणें वर्णन केलें आहे. "तें तारूं सांख्य, तारक, अनमस्क अशा त्रिधारेचें आहे. बोधाचें शीड उभारलें आहे. त्यास अष्टांगयोगाचे दोरखंड आहेत. सप्त भूमिकांचे मजले केलेले आहेत. वैराग्य, भक्ति, ज्ञान, उन्मनी, सविकल्प समाधि, निर्विकल्प समाधि इत्यादि खोल्या आहेत. अद्वैत सिद्धांताची तोफ बार भरून वर चढविली आहे व वीरशैवभक्तीचा शूल आसमंतात् भागीं रोवून ठेविला आहे. निरनिराळया मजल्यांवर उतारू वीरशैव मंडळी प्रेमकवचें लेवून

उन्मनीमध्ये प्राशून, भक्तिढाल घेऊन, ज्ञानतरवार घेऊन, सज्ज होऊन बसली आहे. वरच्या तुर्यातीत मजल्यावर अति उन्नत एक सिद्धासन घातलें आहे. प्रत्येक मजल्यावर उतारूंचे सोयीकरितां बोधाच्या कोठड्या भरून जागजागीं कशाचीहि उणीव पडूं नये, त्रास होऊं नये, म्हणून व्यवस्था करून ठेविली आहे. वर जें उच्च आसन सांगितलें त्यावर भव्य आजानुबाहु, सुप्रसन्नवदन, जटामुगुटधारी, अर्धोन्मीलितदृष्टि, हातीं सर्वांस दिसण्यासारखा अभंग सोटा धरून " शिव जंगम, शिव जंगम, शिवधन्य, शिवधन्य" अशी गंभीर वाणी गर्जत बालमुकुंद कर्णधार आसनस्थ होऊन बसला आहे. त्या मजल्यावर ब्रह्मानंदाच्या कोठड्या, प्रेमाचे हौद, सहज स्थितीचे प्रासाद, यांची समृद्धि आहे. त्या मजल्यावर जाऊन त्याजकडे पाहतां पाहतां आपणांसह आपल्या ज्ञान-अनुभवासहित आपण नाहींसा होऊन जिकडे तिकडे अनंत निराकार रूपांत ॐकार घुमूं लागून, ती मूर्ति व्यापक होऊन, तो ध्वनिहि आटून कांहीं नाहीं अशी अवाङ्मनगोचर " नेति नेति " स्थिति उरते न उरते याचा अनुभव आहे; घ्या, चला. धन्य झालों. धन्य व्हा, संग तोडा, अभयवचन मिळेल. " ( पु. ६–९९ ते १०० ) वरील उताऱ्यावरून १८८४ अखेर पंतांच्या ठिकाणीं आत्मविश्वास किती दांडगा होता याची साक्ष पटते.

त्यानंतर डिसेंबर १८८४ मध्यें पंतांनीं " पंच आज्ञा, " "मन सज्जन कीं दुर्जन" " विदेह–कैवल्य ", " कर्तव्य ", " मागें मुरडून पाहा ", " आत्मविचारास होणारीं विघ्नें ", " अलिप्तपणा, अकर्तृत्व, अहिंसा, भक्ति ", " जीवन्मुक्तांचें वैभव भोगायाचें असेल तर काय केलें पाहिजे ? " व " परमार्थ " हे लेख लिहिले. ( पु.६–१०० ते १३३ ) ते सर्वच बोधपर आहेत.

जानेवारी १८८५ मध्यें पंतांनी " न्याय ", " होय कीं नाहीं ? मनास बोध ", " संक्रांत ", " व्यायाम " व " तर्कांत गर्क होऊन नर्कमार्ग धरूं नका; सरकून पार पडा " हे पाच लेख लिहिले. ( पु. ६–१३३ ते १५३ ) त्यांपैकीं " संक्रांत " हा लेख ता. १२–१–१८८५ ( पौष व. १२ श. १८०६ ) रोजीं संक्रांतीच्या दिवशीं लिहिला. त्यांत " संक्रांत " या विषयाचें अध्यात्मपर विवेचन केलें आहे. " व्यायाम " या लेखांत शारीरिक व्यायामाप्रमाणें आत्मिक बल वाढविण्याकरितां मानसिक व्यायामाची अत्यंत अवश्यकता असल्याचें सांगितलें आहे. वरील लेखांपैकीं शेवटला सद्गुरूला उद्देशून लिहिलेला असून त्यांत गुरुद्रोह करणाऱ्या व ढोंग माजविणाऱ्या कांहीं मंडळींच्या वर्तनानें अंतःकरणाला पीळ पडून पंतांनीं सद्गुरूची करुणा भाकली आहे.

फेब्रुवारी १८८५ मध्यें पंतांनीं " कारणकार्यविचार " हा एकच लहानसा लेख लिहिला ( पु. ६–१५३ ते १५४ ) व मार्च १८८५ मध्यें " डोळे असून ठेचकूं नका, " " बाहेर पडून रडूं नका ", "डोळे असून अंध होऊं नका", " सच्छिष्याचीं लक्षणें " व " सच्छिष्यानें सद्गुरूची उपासना करण्याचीं लक्षणें " हे पाच लेख लिहिले ( पु. ६–१५४ ते १७२ ) व ते सर्व बोधपर व उपदेशपर आहेत. या लेखांखेरीज मार्च १८८५ मध्यें पंतांनीं " आत्मज्योति " नावाचा एक विस्तृत लेख लिहिला. ( पु. ३-

१५९ ते २२७ ). या लेखांत त्यांनी आपल्याला सद्गुरु बालमुकुंदांचें दर्शन झाल्यापासून सुरुवात करून १८८५ पर्यंतच्या आपल्या आध्यात्मिक जीवनक्रमाचा थोडक्यांत इतिहासच दिला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या लेखांत वर्णन केलेल्या गोष्टींचा व प्रसंगांचा उल्लेख पंत व सद्गुरु बालमुकुंद यांच्यामधील संबंधाचें वर्णन करितांना या ग्रंथाच्या प्रकरण ३ ते ९ मध्यें कांहींशा विस्तारानें केला असल्यामुळें त्यांची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. येथें फक्त या लेखांतील मुख्य प्रतिपाद्य विषय कोणता, तो लिहिण्याला कारण काय झालें व तो लिहिण्यांतील हेतु काय यासंबंधीं थोडी माहिती देत आहोंत.

ज्या स्थळीं म्हणजे कर्डेगुद्दी गावीं पंतांना सद्गुरूचें प्रथम दर्शन झालें तें स्थळ, मागे उल्लेख केलेले प्रसंग व त्या त्या प्रसंगीं आपणास आलेले अनुभव यांचें वर्णन करून व श्रीदत्तात्रेयांपासून चालत आलेली आपली गुरुपरंपरा देऊन पंत म्हणतात, "एवंपरंपरेनें जी उपदेशस्थिति गुप्तरूपें चालत आली तीच " आत्मज्योति " ग्रंथ–रूपानें बंधु–पुत्र यांस नजर करण्याच्या हेतूनें परमार्थ उघडलेला आहे. मरणान्यास अमृतपान, किंवा दुष्काळ-पीडितास मिष्टान्न किंवा महाआवर्षणीं पाऊस प्राप्त व्हावा, त्याप्रमाणें वेणूपुरस्थ बालजनांप्रत हा बोध मिळाला. धन्य त्या बालावधूताची कृपा ! " तसेंच सद्गुरूनें आपणास कृपापूर्वक जें निजात्मसुख दिलें त्याची गोडी या लेखाच्या द्वारें आपल्या गुरुबंधु व शिष्य मंडळीला सादर केली आहे व ज्याप्रमाणें कणकेचे लहान लहान गव्हले एकत्र करून त्या गव्हल्यांची क्षीर करितात त्याप्रमाणें सद्गुरु बालमुकुंदाच्या उपदेशापैकीं कणकण जरूवून हा ग्रंथ केला आहे असें पंतांनीं म्हटलें आहे. आणखी ते म्हणतात, " गद्यरूपानें प्रगट झालेली " आत्मज्योति " धिःकारूं नका. ही आत्मज्ञान-कर्दळी–फळें सोलून मुमुक्षुपुत्र–बंधूंकरितां भक्ति--ताटांत वाढून पुढें आणिलीं आहेत. तर मोक्षेच्छा--भुकेनें, वैराग्यस्नात होऊन, निर्मल शुचिर्भूतपणें, सद्गुरुभक्तिमुखें सेवन करा, आणि अजरामर व्हा. जरी शब्दलालित्याचा अभाव, विचित्र वाक्यरचना, तुटक संबंध, अनियमित विषयप्रतिपादन, यांहीं युक्त अशा भाषणांनीं स्वानुभव वर्णिला आहे, तरी ( जसा ) वाकडा ऊस रसानें कडू असत नाहीं, तसें याचे पठणानें अल्पश्रमानें निजपरमार्थप्राप्ति होऊन संसाराची समूळ आटणी होईल, विषयवासना देशोधडीस जाईल, अहंकाराची गाठ तुटेल, जीवन्मुक्ति घरीं चालून येईल, अखंड शांतीचा झरा अव्याहत वाहूं लागेल. ही खात्री सांगतों. यास क्षुल्लक मानूं नका. " .

तसेंच या लेखांत व्यक्त झालेल्या आत्मानुभवाला गुरुप्रतीति व शास्त्रप्रतीति यांचा पूर्ण पाठिंबा कसा आहे तें त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे; तें असें-"श्रीबालमुकुंदाचा सर्वमान्य, अनेक श्रुति, स्मृति, पुराणें, आगम, मतें मंथून काढलेला निजबोध या आत्मज्योतिरूपानें पुढें आणिला आहे. " त्याचप्रमाणें सद्गुरूनें १८७५ सालीं आपल्या अंतःकरणांत अनादि अद्वैत सिद्धांताचें जें बोधबीज पेरिलें त्याचा सुंदर पुष्पांनीं व मधुर फलांनीं युक्त असा प्रचंड वृक्ष कसा बनला यासंबंधीं पंतांनीं या लेखांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे; तें असें:–' श्रीबालमुकुंद सद्गुरूनें वेणु नगरीं, स्वपंथवृध्यर्थ आज्ञा व अधिकार दत्तास

दिल्यावर त्याचा पंथ सुरळित चालला. तो असा. दत्त हाच कोणी माळी. त्यानें वैराग्य-नांगरानें भूमि शुद्ध करून, गुरुकृपेचें जीवन घालून, विवेकाच्या आळयांत बालबोध-वृक्ष वाढविता झाला. तो विस्तार ठायींठायीं अति मधुर; त्याला मोक्षाचे घड लागले; त्यांनीं मुळापासून अग्रापर्यंत वृक्षास व्यापिलें. त्याचीं फळें कितीहि वेळां कितीहि खालीं तरीं गोडी नवी ती नवीच; त्यांचें माधुर्य नित्य नवेंच; कोणत्याहि काळीं त्यांचा वीट न येण्याजोगीं. जे महापुरुष आवडीनें हीं फळें सेवन करितात त्यांस स्वप्नींहि अमृताची इच्छा उत्पन्न होत नाहीं. हें फळ मोठेंच विलक्षण. त्यास वर त्वचा नाहीं. आंत बीज नाहीं. त्याचें सेवन जीवाचा हात न लागतां, दातांचा स्पर्श न होतां, घडतें; जिव्हेवीण याची रुचि कळते, सेवन करितां तोंड उष्टें होत नाहीं, परमानंदाची तृप्ति पूर्ण होते. हें सुख सुज्ञानी सद्गुरुभक्तच भोगितात. " पंतांनीं या लेखांत आपणास सद्गुरुकृपेनें अद्भुत विश्वरूपदर्शन झाल्याचें सांगितलें असून तो गूढ अनुभव पुढीलप्रमाणें व्यक्त केला आहे. ते म्हणतातः—

"एके काळीं श्रीबालावधूतअवतारी दत्तात्रयस्वामींनीं अद्भुत विश्वरूपदर्शन दिलें. त्यांत आकार निराकार, गुरुशिष्य, जग जन ब्रह्म, यांचा भेदभाव काढून टाकून त्याचें वर्णन करण्यास आज्ञा दिली. त्या आज्ञेचें सामर्थ्य मोठें आश्चर्यकारक. कारण कीं जेव्हां मी तें गुह्यज्ञान या ( आत्मज्योति ) ग्रंथांत प्रकट करण्यास सुरू केलें तेव्हां सहजासहज ज्ञानार्थ प्रकाशूं लागला. श्रीबालमुकुंद अवतारी दत्त आज्ञाबळानें ग्रंथार्थ माझे दृष्टीपुढें खेळतो आहे. तो इतका कीं फोलकट विषयांचे गोष्टींतहि तें गुह्यज्ञान उघड दिसूं लागलें आहे. त्याचप्रमाणें श्रीदत्तमहाराज, दिव्यसप्तखणी रथ, त्रैमूर्तिरूप गारुड्याचा खेळ, सुकुमार राजयोगीरूप संन्यासी, बाळ, फकीर, शेषशायी, अमृतपान इत्यादि रूपांनीं दर्शन देऊन अनेक बोध सांगून, शेषाधिष्ठान, शेषप्रकाशक बालमुकुंदरूपानें भेटून पाठ थोपटून शारदाप्रियाकरवीं निजगुह्यज्ञान कळविलें. तेव्हांपासून नित्य, उदर पोषणधंदा करितांना हरएक व्यवहार करीत असतांनाहि तें गुह्यज्ञान समोर झळकत असतें. तें सर्व व्यवहारा-संबंधीं मानापमान, सुख-दुःख इत्यादि भावना मागें घालून आपणच पुढें प्रेमरस ओतीत उभें राहतें. जागृतींत श्रीदत्तमहाराजांनीं ओपिलेलें दिव्य ज्ञानच सर्वकाळ मागें पुढें, वर खालीं पसरलेलें दिसतें. श्रीनृसिंहसरस्वतीस्वामींचें निजगुह्य ज्ञानमयच माझें स्वप्न झालें आहे. सुषुप्तींतदेखील हा गुह्यज्ञानानंदच भरून राहतो. सहजीं बोलतांना शब्दा-पुढें हें ज्ञान धांवतें, लिहितांना अक्षराआधीं अर्थ पुढें येतो. जें जें माझें ठायीं कल्पितो व लिहितों तें तें गुह्यज्ञानच होतें. सद्गुरु बालमुकुंदाची आज्ञा अति प्रबळ; ती मजला क्षणभर सोडून राहात नाहीं. म्हणून त्याची निजशक्तिच या प्रकारें खेळत आहे. या-प्रमाणें श्रीदत्तमहाराजाचे आज्ञेनें, श्रीबालमुकुंद प्रसादबळानें, श्रीकलेश्वर-सिद्धांत-ज्ञान-वीर तारकाभ्यासानें, श्रीगोपाळ अत्रिवंशजाच्या सख्य भक्तीनें, श्रीबालपुत्रपौत्रांचे उत्कंठित प्रेमानें हा ग्रंथ रचिला आहे. दीन दत्त अनन्यभावें सद्गुरु बालमुकुंदचरणीं शरण जातां स्वप्नींहि जन्ममरणाची वार्ता कानीं पडेनाशी झाली. स्वतः परिपूर्ण ब्रह्मच त्याचे सहज कृपेनें झालों. याप्रमाणें श्रीदत्तात्रेय स्वामींचें निजगुह्यज्ञान मी दत्तानें कांहीं प्रगट

केलें नाहीं. तर यांतील अर्थ, लिहिता, लेखनरूपानें तो दत्तात्रेयच मजपुढें उभा राहिला. दीन दत्त, बालमुकुंद, श्री दत्तात्रेय, श्री गोपाळ हीं नावें मात्र भिन्न; पण स्वरूपें अभिन्न आहेत. म्हणून हा ग्रंथ पूर्ण बोधानें संपूर्ण केला. "

या लेखाच्या शेवटीं असलेल्या " श्रीदत्तमहिमा, विश्वरूपदर्शन " या प्रकरणांत " तें तुझें अनंत अफाट सर्वव्यापक विश्वरूप आपणास नको. तर मला तुझें दिव्य सगुण रूप लवकर दाखीव. धीर धरवत नाहीं " अशी प्रार्थना करितांच सद्गुरूनें त्रिमूर्तिरूप धारण केलें व आपणास अनन्यभक्तिरहस्य समजावून सांगून पुढीलप्रमाणें आश्वासन दिलें असें पंतांनां सांगितलें आहे. तें आश्वासन असें:—" ॐ श्री " दुर्बिणींतून सतत विश्वरूप न्याहाळीत, अद्वैतपणा सहजीं स्थिरावून, स्थूल सूक्ष्मीं मद्भावना दृढ राखून देह असे तोंपावेतों निरंकुश वृत्तीनें भजनीं नाचत रहा; आणि प्रारब्धसमाप्तीस ऐक्य असलेलाच घटाकाश महदाकाश न्यायानें मीळ. मी या रूपानें तुझे मनोरथ पूर्ण करीत, पाठीं पोटीं, वर खालीं, सर्वत्र सर्वावस्थांत तुला सोडून राहात नाहीं. सत्य, सत्य, सत्य ! "

वरीलप्रमाणें अभयवरदवाणी वदून सद्गुरूनें आपल्या उदरीं भक्तजनसमूह दाखवून ती अभयवाणी अनुभवास आणून दिली असें सांगून पंत म्हणतात, " आतां तुला कसा विसरूं दत्ता ! समर्था एवढेंच करणें विहित दिसतें कीं बालमुकुंदा, माझ्या हृदयाचा चौरंग करून त्यावर तुझीं चरणकमलें स्थापन करितों; ऐक्यभावाचे उदकाची ओंजळ भरून सर्वेंद्रियांच्या कळ्यांनीं भरून अर्घ्य देतों. अनन्योदकानें धुऊन, अभेदभक्तीचें गंध लेपन करून, शुद्ध प्रेम–सुवर्णाचे अलंकार लेववून, अतिघन आवडीच्या जोड्या घालितों. आनंदवासयुक्त सात्विकाची कळी उमललेलें अष्टदळ कमळ वर वाहतों. अहंधूप जाळून, नाहंतेजें ओवाळून, सामरस्याची मिठी मारितों. अनुभवज्ञानाच्या पादुका लेववून भोगमोक्षादि भावना ओवाळून टाकितों; आणि कांहीं न होऊन बुद्बुदवत विश्वसागरीं ' आहे नाहीं ' या विरहित खेळतों. या उपर मौनाविना अन्य मार्ग नाहीं. "

# प्रकरण २१ वें

———×———

## प्रेमखेळ; श्रीसिद्धारूढ स्वामींची भेट; उपदेशपर स्फुट लेख व "परमानुभव प्रकाश".

ज्याप्रमाणें १८८४–८५ सालांत पंतांच्या बोधपर लेखनाला ऊत आलेला होता त्याचप्रमाणें भजन, टिपरी खेळणें, आपल्या मंडळीबरोबर स्वच्छंदें क्रीडा करणें, त्यांना बोध सांगणें वगैरे गोष्टींनाहि ऊत आलेला होता. त्यांतल्या त्यांत पंत व त्यांचे विरुद्ध असलेले गुरुबंधु व शिष्य यांच्यामध्यें सन १८८४ च्या सुरवातीस "पुनरपि मिलाफ" होऊन विसकटलेली घडी पुनः बसल्यापासून या गोष्टींना विशेषच जोर आला व पंतांचा फुरसुतीचा वेळ व विशेषतः सुटीचे दिवस त्यांच्या मंडळींत भक्तिप्रेमरंगांत जाऊं लागले; किंबहुना त्यांच्या आयुष्यांतील १८८४ व १८८५ हीं दोन वर्षें म्हणजे वसंतसमयच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्याप्रमाणें वसंतऋतूचें आगमन होतांच वृक्षलतांना नवजीवनाचा पुरवठा होऊन पल्लवपुष्पफलांच्या रूपानें त्यांच्यावर नवचैतन्यश्री प्रगट झालेली दिसूं लागते, त्याचप्रमाणें सद्‌गुरूनें पंत-अंतःकरणीं पेरलेल्या अद्वैतबोधबीजाच्या वृक्षाला १८८३ अखेर, सद्‌गुरुकृपाप्रसादरूपी वसंताचें आगमन होतांच, तजेला येऊन स्फूर्तिद्वारां शब्दकुसुमांचा वर्षाव होऊं लागला व भक्तमंडळीला बोधाचीं मधुर फळें सेवन करण्यास मिळूं लागलीं. या सुमारास पंतांचा सर्व जीवनक्रमच सद्‌गुरुमय झाला होता. त्यांच्या मंडळीचे मुख्य व्यवसाय म्हणजे भजन, टिपरी, गावाबाहेर फिरावयास जाऊन मोकळ्या हवेंत निरनिराळे खेळ खेळणें, तालीम करणें वगैरे होते. सुटीच्या दिवशीं बहुतकरून पंत आपल्या मंडळीसह गावाबाहेर फिरावयास जात. अशा वेळीं ते पुढें व बाकीची मंडळी त्यांच्या मागें रांगेनें लष्करी पद्धतीनें चालत व कधीं तोंडानें "आघाडी चले दत्त राजा। पिछाडी संतनकी फौजा" हें किंवा अशाच तऱ्हेचें एखादें पद म्हणत. तेथें गेल्यावर पंत आपण लिहून आणलेले उपदेशपर निबंध वाचीत व त्यांची फोड करून सांगत. कधीं कधीं ही मंडळी आंब्याच्या झाडांच्या डाहाळ्या काढून त्यांच्या टिपऱ्या करून खेळत व एकीकडे भजन अगर पंतांचा बोध चालू असे. अशा तऱ्हेनें पंत आपल्या मंडळीला हासत खेळत बोध करीत व एक प्रकारें त्यांना किंडरगार्टनच्या पद्धतीनें अध्यात्मविषयाचे धडे देत असत.

पंतांची स्वतःची शरीरसंपत्ति फार चांगली असे. त्यांना तालिमीचाहि नाद होता. त्यांच्या बरोबरीची बहुतेक मंडळी तरुण व उत्साही असल्यामुळें ते सर्व एके ठिकाणीं जमून नियमानें जोर, बैठका, मलखांब वगैरे प्रकारची तालीम करीत व पहाटेस फिरावयास जात. त्या वेळीं पंतांचा शिष्य गंगाराम हा बेळगावांत काकतीवेशींत चांभारांच्या घरांच्या अलीकडील एका घरांत राहात असे. पंत, त्यांचे गुरुबंधु व शिष्य हे त्या घरीं

रोज पहाटे तीन चार वाजण्याच्या सुमारास जमत व तेथून निघून काकतीवेशीनें धावत जाऊन रेसकोर्सची फेरी करून ( म्हणजे सुमारें चार मैल फिरून ) परत येत व नंतर तापवून ठेविलेलें दुध पिऊन तालीम करीत. यासंबंधीं पंतांचे एक शिष्य कै. राघवेंद्र शेषो हुबळीकर ऊर्फ राघू अवधूत यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. " पळत जातांना आम्ही सर्व मनांतल्या मनांत मंत्रपठण करीत पाऊल टाकावें अशी पंतांची आज्ञा होती. त्याप्रमाणें आम्ही सर्व करीत होतों त्या वेळची सर्व मंडळी तरुण म्हणजे सुमारें २०-२२ वर्षांची होती. या सर्व मंडळीस पंत केवळ स्नेहभावानें खेळवीत होते. थट्टामस्करी करणें उड्या मारणें, हासणें, खेळणें वगैरे या सर्व मंडळीबरोबर पंतहि करीत असत; व त्यामध्यें नाना प्रकारें बोध देत असत. कधीं कधीं श्वासोच्छ्वासाबरोबर मंत्रपठण करण्यास व मंत्राची जपसंख्या किती झाली याची नोंद करण्यासहि पंत सांगत असत. " ज्याप्रमाणें शारीरिक बल वाढविण्याकरितां ही मंडळी शारीरिक व्यायाम करीत त्याचप्रमाणें आत्मिक बलवृद्धि करण्याकरितां मानसिक व्यायाम करण्यास पंत त्यांना सांगत. ता. १२-१-१८८५ रोजीं लिहिलेल्या "व्यायाम" या लेखांत पंत म्हणतात, "शरीररक्षणार्थ खटपट करणें गुरुमार्गास विरुद्ध आहे असें माझें मत नाहीं. कारण तें ( शरीर ) निरोगी असलें तरच मन शांत असतें. आणि मन शांत असलें तरच परमार्थ-साधन होतां लागतें. परंतु परमार्थसाधनापेक्षां देहसाधन श्रेष्ठ मानूं नये. आतां जेवढी तुमची देहावर प्रीति आहे, जेवढें लक्ष त्याच्या रक्षणाकडे जितक्या लौकर धावतें तेवढें किंवहुना त्याचें अर्ध, चतुर्थांश तरी आत्मसिध्यर्थ साधनाकडे वेधावें. आतां तुम्ही देहपुष्ट्यर्थ लोड फिरवितां, दंड काढितां, बसक्या घालतां, अरुणोदयास उठून ग्रामाबाहेर फिरावयास, पळावयास जातां आणि दुध पितां त्याचप्रमाणें आत्मपुष्ट्यर्थ वरील कामें कशीं व केव्हां करावीं तें सांगतों. त्याप्रमाणें इह-बंधन न ठेवितां पर साधा. मग ज्याप्रमाणें या क्षुद्र व्यायामानें अंगीं उत्साह, धैर्य, चापल्य व शूरत्व येतें, एक तऱ्हेचा मद चढतो व कोणाचीहि पर्वा न धरितां छाती वर करून डुलत चालतां, त्याचप्रमाणें पुढें सांगितल्या प्रकारच्या साधनानें आत्मत्वीं आल्हाद वीरशैवभक्ति, निर्मल ज्ञानप्रकाश, निःशंक वृत्ति बुद्धांत शिरते. निर्विकल्प समाधीची मस्ती चढते. चारी देहांची जगब्रह्माची देवदेवतांची ज्ञान—अनुभवाची पर्वा न राहतां सहज समाधीची छाती वर करून सहजानंदांत डुलत चालण्याची स्थिति आपोआप अंगीं बाणते. तीच लौकर साधण्यास लागा. " (पु. ६-१४७ ) या उताऱ्यावरून व्यायामासारखा नित्य परिचयाचा विषय घेऊन आपल्या मंडळीला आत्मबोध करण्याची पंतांची शैली चांगलीच निदर्शनास येते.


दिवाळी, नाताळ वगैरे सुटीच्या दिवसांत व विशेषतः उन्हाळ्याच्या सुटींत पंत आपल्या कांहीं मंडळींना घेऊन बाहेर गांवा जात असत व तेथें नदीकाठीं, जंगलांत अगर डोंगरावर स्वच्छंदपणें सद्गुरूच्या भजनपूजनांत काळ घालवीत. अशा प्रकारें सुटीच्या दिवसांत जाण्याचीं त्यांचीं मुख्य ठिकाणें म्हणजे अलतगें, कडेंगुद्दी, देसनूर, दड्डी वगैरे. अलतगे येथें त्यांचे मावस भाऊ गणपतराव मारीहाळकर हे कुळकर्णिकीचें काम करीत



दड्डीजवळ नदीकाठीं असलेलें "अनुभव-मंडप" नावाचें
श्रीपंतमहाराजांचें वसण्याचें ठिकाण (पृ. १२१)



देसनूर येथील श्रीपंतमहाराजांचें वसण्याचें ठिकाण (पृ. ३०)



दड्डी येथें नदीकाठीं असलेलें
श्रीरामलिंगाचें देवालय
( पृ. १२१ )



देसनूर येथील श्रीपंतमहाराजांचें योगसाधन
करण्याचें स्थान ( पृ. ३० )
( या छायाचित्रांत डावीकडे असलेला सोटा व उजवीकडे असलेली
एकतारी हीं श्रीबालमुकुंदांचीं आहेत )

होते व तेथें ते एकटेच राहात असत. अलतगें गाव बेळगावपासून जवळच म्हणजे सुमारें तीन मैल असल्यामुळें मधुन मधुन पंत शनिवारीं दुपारीं तेथें जात व रविवारीं सायंकाळीं अगर सोमवारीं सकाळीं बेळगावास परत येत. तेथें गेल्यावर तळ्याजवळील श्रीरामलिंगाचे देवालयांत त्यांचें भजन पूजन वगैरे चाले. अशा वेळीं त्यांच्याबरोबर काका घाणेकर, गणू गुमास्ते, परशराम, गंगाराम वगैरे मंडळींपैकीं कोणीतरी असत. कर्डेगुद्दी व देसनूर हे गाव तर बालमुकुंदांच्या वास्तव्यानें पंतांना अत्यंत प्रिय झालेले; तेव्हां त्या ठिकाणीं गेल्यावर त्यांना बालमुकुंदांच्या प्रेम--लिलांचें स्मरण होऊन त्यांची वृत्ति तल्लीन होऊन जात असे. कर्डेगुद्दीचा डोंगर व त्यावरील बाळप्पांच्या वसण्याच्या व योगसाधनाच्या जागा हीं स्थानें तर त्यांना अत्यंत प्रिय वाटत व आपल्या मंडळीसह ते तेथें गेले म्हणजे त्या डोंगरावरील जंगलांत अवधूत खेळ खेळत असत; कधीं कधीं मयूरपिच्छें बांधून, कधीं वल्कलें व निरनिराळीं वन्य पुष्पें धारण करून, “ झुलता है यतिराज । आत्म ख्यालमों, ख्यालमों ॥ ”, अशा थाटांत क्रीडा करीत, कधीं टिपरी खेळून भजन करीत, तर कधीं आपल्या मंडळीला मुद्रा लावण्यास सांगून योगानंदांत सुखवीत असत. हे सर्व प्रकार चालू असतांना पंतांचा बोध चालूच असे.

दड्डी गाव तर पंतांचें क्रीडांगणच होतें. तेथें त्यांचें बालपण गेलें होतें व तेथील त्यांची शिष्य व भक्त मंडळी एकनिष्ठ, धाडशी व खेळाडू वृत्तीची असल्यामुळें व त्यांचा गुरुबंधु हणमू दड्डीकर तेथेंच राहात असल्यामुळें ते बहुतकरून सुटीच्या दिवसांत दड्डी येथें जात व तेथें कांहीं दिवस राहात. त्यांच्याबरोबर बेळगावमधील कांहीं मंडळींहि असत व त्यांचे सुटीचे दिवस नदीकाठीं पत्रीबन, श्रीरामलिंगाचें देवालय, अनुभवमंडप वगैरे रम्य स्थळीं अगर डोंगरावर खेळ खेळण्यांत व भजनानंदांत जात असत. एकदां पंत दड्डीस गेले असतां तेथील कांहीं तरुण मंडळींनीं एक नाटक करण्याचें ठरविलें होतें. त्यांमध्यें पंतांचे शिष्य विठू, गुंडू सोनार व सर्जेराव वगैरे मंडळी होती. ही मंडळी नाटकाची रंगीत तालीम करीत असतांना पंत अकस्मात तेथें गेले; त्याबरोबर त्यांनीं नाटकाच्या सामानाची लपवालपवी सुरू केली. तेव्हां पंत म्हणाले, “ अरे लपवालपवी कां करितां ? पहा आम्ही जो प्रपंच करितों तें एक नाटकच आहे; मग हें वेगळें नाटक तुम्हीं कसलें करितां ? तुमचें नाटकाचें सामान काय काय आहे तें काढा पाहूं ! ” लगेच मंडळींनीं किरीट, कुंडलें वगैरे सामान त्यांचे पुढें ठेविलें. तेव्हां तें आपल्या अंगावर घालून घेऊन थोडा वेळ मौज करून पंत भजनाला गेले !

१८८५ सालीं पंतांचा गुरुबंधु परशराम हा हुबळी येथें सरकारी दवाखान्यांत कंपाउंडर होता. तसेंच त्यांचा शिष्य राघू अवधूत हा बेळगाव-धारवाड रस्त्यावरील मुगुट-खानहुबळी येथें शाळा-मास्तरचें काम करीत असे व काका घाणेकर धारवाड जिल्ह्यांतील कलघटगे तालुक्यापैकीं मिश्रीकोट येथील राहणारा होता. हुबळी येथें श्रीसिद्धारूढ स्वामींचा मठ असून त्यांचें तेथें वास्तव्य होतें व त्यांच्या संगतींत कांहीं काळ घालवावा असें पंतांना फार वाटत होतें. त्यामुळें १८८५ च्या उन्हाळ्याच्या सुटींत त्यांनीं धारवाड-हुबळीकडे

जाण्याचा बेत ठरविला व सुटी सुरू होतांच ते तिकडे गेले; बरोबर काका घाणेकर, रावजी दड्डीकर, भाऊ जुनेबेळगावकर, वेंकोबा गोंबी, अमृतराव कुळकर्णी, दादा सावनूर वगैरे १०–१२ मंडळी होती. त्यावेळीं आगगाडी चालू नसल्यामुळें ते पायरस्त्यानें निघाले व मुगुटखानहुबळी येथें राघू अवधूत याचे बिऱ्हाडीं एक दिवस मुक्काम करून पुढें गेले. हुबळी येथें गेल्यावर ते प्रथम परशरामच्या बिऱ्हाडीं उतरले. नंतर आरूढ स्वामींच्या दर्शनास जाऊन त्यांनीं मोठ्या आदरानें स्वामीची अर्घ्य--पाद्य--पूजा केली. स्वामींनींहि पंतांचा अधिकार व त्यांची योग्यता ओळखून त्यांचा फार गौरव केला व त्यांना मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें. पण तेवढ्यानें त्यांचें समाधान न होऊन 'त्यांनीं पंतांना उचलून आपल्या खांद्यावर घेतलें व प्रेमातिशयानें ते नाचूं लागले!', असें काका घाणेकर यांनीं लिहून ठेविलें आहे. पंतांना लहान वयांत उच्चकोटींतील आध्यात्मिक अनुभव बाणल्याबद्दल स्वामींना फार कौतुक वाटलें. नंतर स्वामींच्या आग्रहावरून पंत त्यांच्या मठांतच राहूं लागले. या खेपेस हुबळी येथें त्यांचा मुक्काम सुमारें १५–२० दिवस होता. त्या दरम्यान ते व आरूढ-स्वामी यांच्या वारंवार भेटी होत असत व भजन पूजन व आध्यात्मिक विषयावर चर्चा वगैरे प्रकार चालत. अशा रीतीनें या दोन अधिकारी पुरुषांचे ते दिवस परस्परांच्या गोड सहवासांत मोठ्या प्रेमानंदांत गेले. आरूढस्वामी हे पंतांपेक्षां वयानें वडील असून शांत व अनुभवी असल्यामुळें पंतांना त्यांच्या संगतींत फार फायदा झाला हें ता. २२-६-१८८५ रोजीं पंतांनीं कल्याणला लिहिलेल्या पत्रावरून दिसून येतें. त्या पत्रांत ते म्हणतात, "यंदाच्या मे महिन्याच्या सुटींत हुबळीस श्रीआरूढांकडे जाऊन १५–२० दिवस होतों. येथें श्रीबालमुकुंदाची अखंड निर्विकल्प वृत्ति आणि कल्पांचें खंडित वाच्य हीं समान दृष्टीस पडलीं. पूर्ण समरसभाव झाला. तेथें गेल्यानें कृतकृत्यता बाणली, वृत्ति पालटली, संशय गेला, मोह दुरावला, निःसंगत्व बाणलें, समाधि स्थिरावली, विदेह कैवल्याच्या साम्राज्यपटावर अखंड पट्टाभिषेक झाला." (पु. ४--९६) श्रीसिद्धारूढस्वामीं-संबंधीं अशाच प्रकारचे प्रशंसोद्गार पंत वारंवार काढीत असत.

वर लिहिल्याप्रमाणें जरी सुटीच्या दिवसांत पंत बाहेरगावीं जात, तरी जरा फुर-सुद मिळाली कीं त्यांचें लेखनाचें कार्य चालूच असे. बेळगावहून हुबळीस जाण्याकरितां निघण्याच्या आदल्या दिवशीं त्यांनीं "ढोंग" हा लेख लिहिला (पु. ६-१७२) आणि त्यांत किंचित्‌हि ढोंग न करितां अनुभव बाणण्याकडे सतत लक्ष देण्याचा उपदेश केला आहे व "परतत्व झाल्याखेरीज निजतत्व उमगणार नाहीं; त्याची, सद्‌गुरूची कृपा भाका. शब्दपांडित्य, जाणिवेचा अभिमान टाकून अनुभव दृष्टीनें पाहा," असा इषारा दिला आहे. हुबळीहून बेळगावीं परत आल्यावर त्यांनीं एका आठवड्यांत "भजा"; "साधन-चतुष्टय"; "समजून उमजून खुळा"; "आत्मज्ञान करून घेण्याच्या युक्त्या"; व "शिवशक्ति" हे पाच लेख लिहिले (पु. ६-१७५ ते १८८) व ते सर्व लेख उपदेश-पर आहेत; त्यांमध्यें सद्‌गुरूचें श्रेष्ठत्व वर्णन करून साधनसंपन्न होण्याचा व सद्‌गुरूलाच भजण्याचा उपदेश केला आहे व "सा काष्ठा सा परा गतिः" हेंच सद्‌गुरूचें रूप, हेंच

शिष्याचें रूप, हेंच निजबोधाचें रूप, हीच समाधि, हीच जीवनन्मुक्ति, हीच कैवल्यमुक्ति, हाच ब्रह्मानंद, हेंच परमपद. ' यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम '. ( भ. गी. १५-६ ) याच ठिकाणीं सर्व विश्व आनंद भोगीत आहे," असें सांगितलें आहे.

त्यानंतर पंत आपल्या कांहीं मंडळीसह दड्डीस गेले. त्याच सुमारास त्यांच्या अनुयायांपैकीं एकाचें तेथें लग्न व्हावयाचें असल्यामुळें बेळगावमधील त्यांच्या मंडळींपैकीं बरेच जण दड्डी येथें गेले होते. त्यामुळें तेथें भक्तमंडळीचा मोठाच जमाव झालेला होता. त्यांच्यासमवेत पंतांनीं सुमारें वीस दिवस सद्‌गुरूच्या भजनपूजनांत व नदीकाठीं, जंगलांत अगर डोंगरावर अवधूतलीला करण्यांत घालविले. दड्डीहून बेळगावास परत आल्यावर ता. २२-६-१८८५ रोजीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात, " तेथून ( हुबळीहून ) परत आल्यावर दड्डीस गेलों. वीस दिवस राहाणें झालें. तेथील हणमू, सरज्या, चनवीरया वगैरे दहावारा मंडळींना डोंगरांत रोज नेऊन आपल्यासारखी पूर्ण स्थिति दिली, पूर्ण शांत झाले. तेथील प्रकार, तेथील निर्विकल्प क्रीडा, अनुभवसुगी, भजनसमारंभ, प्रेमपूर, अद्वितीय सख्यभक्ति, परमार्थीं खरी आवड, विषयांचे ठायीं खरें वैराग्य, बालमुकुंदचरणीं अखंड प्रीति हीं पाहून जो कांहीं प्रेमा तिकडे बसला, तो शब्दानें वर्णितां येत नाहीं. तशा लीलेच्या अनुभवाचा खरा भोक्ता तूंच एक आहेस. तुझी त्यांत गणना करण्यास कांहीं शंका येत नाहीं × × × दड्डीकडील सर्वत्र मंडळी पूर्ण विश्वास, खरी भक्ति, पारमार्थिक आस्था बाळगून श्रवण-मनन-भजन करीत असते. हेच सुकृती होत." ( पु. ४-९६ )

या सुमारास पंतांच्या ठिकाणच्या बोधसागराला भरतें येऊन त्यांचें लेखन झपाट्यानें सुरू होतें व हे बहुतेक लेख उपदेशपर असत. जुलै १८८५ मध्यें त्यांनीं "स्वकल्पित सुखदुःख" व "सेवा" हे दोन स्फुट लेख लिहिले व ते बोधपर आहेत. (पु. ६-१८९ ते १९५ ) त्यांपैकीं पहिल्या लेखांत सर्व जग, सर्व साधनें, सांख्य, तारक, अमनस्क योग, आपला अनुभव, स्वतः आपण सर्वच कल्पित असें सांगून अखेर पंत म्हणतात, " मला तरी कांहीं कळेना, थेट खुळा बनलों आणि मन मानेल तसें त्या स्थितींत बडबडलों; खूळ कल्पित; लिहिणें कल्पित; तर सद्‌गुरु बालमुकुंद निर्विकल्प आहे; त्यास भजा." ' सेवा " हा लेख म्हणजे मागच्याच लेखाचा विस्तार होय असें म्हणण्यास हरकत नाहीं व त्याला पंतांनीं सुरवातच पुढीलप्रमाणें केली आहे. " हे निर्विकल्प समाधीच्या माहेरा ! तुझे अनंत उपकार आठवून तुझी कांहीं तरी सेवा करावी म्हणून पाहूं गेलों तों मोठाच चमत्कार घडला. तो हा कीं माझें मीपण धरणाऱ्या ज्ञानापूर्वीं तुझा तूंच वास करीत असल्यानें मीपणाचे अस्तित्वाची कल्पना तुझ्याच आधारानें उठली. मग सेवा कोणीं करावी ? ", अशा तऱ्हेनें प्रस्तावना करून व कोणत्याहि प्रकारची सेवा करण्याची इच्छा म्हणजे सद्‌गुरूच्या निस्तरंग, अनंत, अफाट स्वरूपमहासागरांतील तरंगच होय व तो तरंगहि मिथ्या अगर कल्पित होय असें सांगून पंत म्हणतात, "मूळ कल्पिताचा वंध्यासुतवत अत्यंत अभाव आहे. मग त्याची कल्पना तरी सत्यत्व कशी धरूं शकेल ? किंवा

त्याच्याहि पुढचे शाब्दिक व्यवहाराची वाट काय ? ही सत्य परमार्थाची खूण, निजानुसंधान श्रीबाळमुकुंदानें म्हणजे अजन्मा पुरुषानें आपला शिष्य जो दत्त म्हणजे जन्मवांझ पुत्र यास अत्यंत निर्विकल्प प्रेमानें बाणवून दिली आणि शेवटीं आपण, आपला पुत्र, आपण बाणवून दिलेली खूण, स्थिति हीं मुळींच नाहींत, आलीं नाहींत, गेलीं नाहींत, कांहींच भास ना कल्पना. जग जन कांहींच नसतां, कांहीं एक न होऊन असणारें कांहीं उरलें कीं नाहीं याचा विचार, विचारकर्ता, विचारणीय वस्तु, यांची कल्पना, शब्द, कल्पित हीं मावळलीं. पुढची स्थिति ओळखणारे असाल तर ओळखा. ”

ऑगस्ट १८८५ मध्यें त्यांनीं “ स्वातंत्र्य ”, “ आत्मतत्व जाणणें सत्पुरुषांच्या सहवाशिवाय होणें नाहीं” व “श्रावणी” हे तीन लेख लिहिले. (पु. ६—१९५-ते-२०७) त्यांपैकीं “ स्वातंत्र्य ” या लेखांत खरें स्वातंत्र्य म्हणजे काय ? व तें कसें प्राप्त होतें हें अध्यात्मदृष्ट्या श्रुति, युक्ति, अनुभव व पूर्वीं होऊन गेलेल्या सत्पुरुषांचे पुरावे यांच्या अनुरोधानें त्यांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे. “ आत्मतत्व जाणणें सत्पुरुषांच्या सहवासाशिवाय होणें नाहीं ”, या लेखांत पंतांनीं, “ कितीहि शहाणा झाला तरी, आत्मतत्व जाणणें सत्पुरुषांचे सहवासावाचून कदापि होणार नाहीं. जाणिवेचा अभिमान बिलकुल चालवयाचा नाहीं ”, हा स्वानुभव–सिद्धांत नमूद केला आहे. तिसरा लेख “ श्रावणी ” हा श्रावण शुद्ध १५ शके १८०७ रोजीं म्हणजे श्रावणीच्या दिवशीं लिहिला. त्याचे सुरवातीस “ आम्हीं आज श्रावणी केली ती साद्यंत तुम्हांपुढें सांगतों. मानल्यास स्वीकारा, नाहीं तर आमच्याच मनास बोध झाला. बंधुप्रेमानें, अंतरींच्या कळकळीनें सांगतों ऐका ”, असें सांगून सद्‌गुरु बालमुकुंद अग्निहोत्री महर्षींच्या घरीं आपण श्रावणीस गेलों असतां कशा प्रकारें श्रावणीचा विधि केला म्हणजे ब्रह्मात्मैक्यसुख अनुभविलें या संबंधीं रूपकाच्याद्वारें पंतांनीं वर्णन केलें आहे व त्यायोगें आपला अद्वैतानुभव व्यक्त केला आहे आणि अखेर, “ ज्ञानाज्ञान, पापपुण्य, जन्ममरण, गुरुशिष्य, बद्धमुक्तता, इत्यादि सर्व भाव ओसरून जाऊन सर्व चराचर, अनुभव, अनुभविता यांसहित बालमुकुंदमय होऊन उरलें. यास्तव तुमच्या पायांतील धूळ चाखीत तुमच्या चरणांपाशीं पदर पसरून दीन वाणीनें एवढी भीक मागतों, या भिकाऱ्यास द्या. ती ही कीं सर्वदा सद्‌गुरूच्या घरीं श्रावणी चालली आहे. लौकर चला. वाट पाहात बसणार नाहींत. तिकडेच आंघोळ वगैरे आटपून घ्या; चला. मागें पुढें पाहूं नका. वेळ स्वाधीन नाहीं. हे तात, हे माये, हे बांधवांनों, हे मित्रांनों, हे उदार दात्यानों, या बाळावर कृपा करून ही लडिवाळ विनंति मान्य करा, हित आहे, ” (पु. ६—२०७) अशी आपल्या गुरुबंधूंना व शिष्यांना अत्यंत कळकळीनें विनंति करून त्यांच्यापैकीं कांहीं जणांना कदाचित् हा बोध रुचणार नाहीं अशी शंका येऊन कीं काय “ हा बोध माझ्या चंचल मनास केला आहे; लोभ असूं द्या, ” असें लेखाच्या शेवटीं म्हटलें आहे. आत्मानुभवाच्या शिखरावर आरूढ झालेला अनुभवी महात्मा नेहमीं घडणाऱ्या गोष्टींकडे कोणत्या दृष्टीनें पाहातो हें पंतांनीं केलेल्या “ श्रावणी ” या लेखांतील रूपकात्मक वर्णनावरून

दिसून येतें. सप्टेंबर १८८५ मध्यें पंतांनी " ध्यानांत ठेवण्याजोगे नियम " या शीर्षकाखालीं भक्तमंडळाला सद्वर्तनाचे नियम घालून दिले व अखेर " सर्वस्थीं मला पहा, माझी आठवण नेहमीं राख, सर्वस्थीं मीच ", हें सद्गुरुवाक्य दिलें आहे. याच महिन्यांत त्यांनीं " भावच कारण, इष्टलिंग, प्राणलिंग, भावलिंग ", " तुका म्हणे बुनादीचें झालें साचें उगवणें " व " दत्त दिगंबर अवधूता। बालमुकुंदा मम ताता " हे आणखी तीन लेख लिहिले व ते स्तुतिपर व अनुभवपर आहेत. ( पु. ६-२०७ ते २१७ )

या सुमारास पंतांचे गुरुबंधु व शिष्य यांपैकीं कांहींजण कनक-कामिनींच्या पाठीस लागून व त्रिवासनांच्या जाळयांत सापडून व्यसनाधीन झाले होते. त्यामुळें पंतांना फार त्रास होत असे व त्यांचें वर्तन सुधारण्याचे पंतांचे आटोकाट प्रयत्नहि चालू होते. ता. २२-६-१८८५ रोजीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात, " इकडील कांहीं लोकांची स्थिति बिघडली आहे. × × × गुरुबंधु, पुत्र मंडळीहि कनक-कांता-मेदिनी-देहवासना, लोकवासना, मानापमान, गुरुपुत्रनिंदा, शब्द-ब्रम्ह-अभिमान, समर्थांची योग्यता, त्यास योग्य ( असणारी ) पूजा, सर्वश्रेष्ठपणा हीं आपणास यावीं म्हणून मिथ्या ढोंग इत्यादि अधोमार्ग धरून भ्रष्ट झाले आहेत. कितीहि त्यांच्या कानांशीं प्रत्यक्ष बोधानें, लेखनद्वारें, बोंब मारिली तरी निंदा करीतच, थेट उलटभाव धरून, नाहीं तें कुभांड रचीत, स्त्रियांचे नादीं लागून, द्रव्य मिळवावें, " साधु " म्हणवून घ्यावें, दागदागिने करावे, देहशोभारक्षण, इत्यादि मायाजाळयांतच सौख्य मानून गुरुमार्ग, साधन, श्रवण हीं टाकिल्यामुळें ( मला ) विशेष फायदा झाला. त्यांची संगत, दर्शन, भाषण हीं वर्ज करून स्वस्थ घरीं आत्मसाधनांत असून कोणी येणारास त्याच्या योग्यतेनुसार बोध करून निर्लिप्त आहें. " ( पु. ४-९५ ) त्याचप्रमाणें १२-१०-१८८५ रोजीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं लिहिलें आहे कीं आपण व कांहीं बालपुत्र " बालदत्त सहज समाधींत, निरंकुश वृत्तीनें कोणाचीच परवा न बाळगितां डुलत असतांना, लौकिकांत उघड गुप्त रूपें आंतून बाहेरून गुरुपुत्र, नरपुत्र यांनीं प्रचंड निंदा, बोभाट, उसावर, कुतर्क इत्यादि छळरूपी अग्नि पेटविला आहे. " ( पु. ४-१०४ )

जरी १८८२ च्या अखेरपासून पंतांचे गुरुबंधु व शिष्य यांच्यापैकीं कांहीं जण त्यांचा द्वेष, मत्सर, निंदा, उपहास व छळ करूं लागले होते व त्यायोगें त्यांना भयंकर मनस्ताप होत होता, तरी गणू मारीहाळकर, गोपाळ भागोजीकोप, कल्याण उर्फ वेंकोबा जुनेबेळगावकर वगैरे त्यांचे गुरुबंधु व कांही शिष्य मंडळी पूर्ण एकनिष्ठ व सच्छील असून त्यांच्या सहवासांत पंतांना गुरुप्रेम व अनिमित्त बंधुप्रीति यांचा वारंवार अनुभव घेण्यास मिळत होता व त्यांच्या ठिकाणीं आत्मशांति, बंधुप्रीति व सद्गुरुभक्ति यांचा विकास होऊन स्वानुभवाला पक्केपणा येत होता. तसेंच आपले विरुद्ध असलेले गुरुबंधु व शिष्य यांचे सर्व अपराध पोटांत घालून त्यांना अनिमित्त बंधुभावानें व शुद्ध प्रेमानें उपदेश करून सन्मार्गाला लावण्याचा पंतांचा सारखा प्रयत्न चालूच होता. त्यामुळें ते पुष्कळ वेळां पडतें घेऊनहि त्यांचें समाधान राखण्याचा प्रयत्न करीत. अशाच तऱ्हेचा एक प्रयत्न केल्याचा

त्यांनीं ता. २१--९--१८८५ रोजीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत उल्लेख केला आहे. आपल्या गुरुबंधूंनीं व शिष्यांनीं सन्मार्गाला लागून त्यांना प्रपंच--परमार्थी सुख मिळावें म्हणून पंतांचे जे प्रयत्न चालू होते त्यांपैकीं लेखनाच्या द्वारें उपदेश करणें, आज्ञा करणें, वर्तनाचे नियम घालून देणें हा एक प्रकार होता हें येथपर्यंत दाखविलेंच आहे. आक्टोबर १८८५ मधील लेख तर याच हेतूनें लिहिले गेले हें त्यांच्या नावांवरूनहि दिसून येतें. या महिन्यांत त्यांनीं आठ स्फुट लेख लिहिले. ( पु. ६-२१७ ते २३६ ) त्यांपैकीं "आज्ञा", "बीजाचा वृक्ष होऊन फळें येणार, पेरणारा भोक्ता, सांगणारा साक्षी, हुषार ", " अनायासें प्राप्त झाल्यास चांगल्या वस्तूचेंहि महत्व वाटत नाहीं ", " चणे खावे लोखंडाचे। मग तो ब्रम्हपदीं नाचे ", " वर्तनाचे नियम " या पाच लेखांत सद्वर्तन, सनातन धर्माचें आचरण, नीतिमर्यादा वगैरे न सोडण्याचा उपदेश केला आहे व प्रपंच उत्तम रीतीनें साधून परमार्थलाभ कसा करावा तें सांगितलें आहे. बाकीचे तीन लेख म्हणजे " जीव आणि शिव ", " सहजावस्था " व " अजब तमाशा " हे होत. या लेखांत स्वानुभव व बोध व्यक्त झाले आहेत.

वर ज्या स्फुट लेखांचा उल्लेख केला आहे त्यांखेरीज पंतांनीं १८८५ सालीं "परमानुभव प्रकाश " नावाचा एक विस्तृत निबंध लिहिला. ( पु. ३--१ ते १४६ ) तो त्यांनीं आपला परमप्रिय गुरुबंधु गोपाळ भागोजकिोप याला परतत्वबोध करण्याचें निमित्त करून आपले गुरुबंधु व शिष्य व इतर मुमुक्षुजन यांच्या हितार्थ लिहिला. त्याचीं सहा प्रकरणें असून प्रत्येक प्रकरणांत गोपाळाच्या एकेका प्रश्नाला उत्तर देण्याचें निमित्त करून पंतांनीं एकेका मुद्याचें विवरण केलें आहे. प्रथम प्रकरण " तत्वबोध " हें असून त्यांत " परिपूर्ण सुखरूपानें सदाकाळ असण्यास उपाय कोणता ?", या प्रश्नास उत्तर देण्याच्या निमित्तानें पंतांनीं आत्म्याचें असंगत्व स्थापित केलें आहे. दुसऱ्या प्रकरणांत, " तनुधर्मविरहित आत्मा कसा तें मला स्पष्ट समजण्याजोगें सांग", या गोपाळाच्या प्रश्नाला उत्तर देण्याच्या निमित्तानें त्यांनीं आत्म्याचें अद्वैतस्वरूप वर्णिलें आहे. तिसऱ्या प्रकरणांत, " परमात्म्याचे ठायीं भ्रांति कशी उद्भवली व सुखदुःखें, बंधमोक्ष वगैरे द्वंद्वें कशीं भासलीं ? ", या गोपाळाच्या प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, " भ्रांति शब्द मात्र; ती कालत्रयींहि विद्यमान नाहीं. आत्मत्वीं जगत् व जीव यांचा अभाव आहे, व " तत्त्वमसि " या अद्वैत श्रुतिबोधाप्रमाणें ' तूंच उपाधिरहित कर्मरहित, निरुपम, अज्ञानविधुर, सर्वपरिपूर्ण, अद्वय, निश्चलात्मा, सुखसमुद्र असा परमात्मा ' आहेस." नंतर निर्गुणयोगाची पद्धति सविस्तर सांगण्याची गोपाळानें प्रार्थना केल्यामुळें त्यांनीं चवथ्या प्रकरणांत निर्गुण योगाभ्यासाची राहाणी सविस्तर उघड करून दाखविली आहे व " सद्गुरुश्रेष्ठांनीं निर्गुण अभ्यास न जाणणारास सगुणयोग संतोषानें बोधून नंतर सगुणयोग समजावून द्यावा ", असें त्यांनीं सांगतांच, " अज्ञ जीव उद्धारार्थ सगुणयोगाचें वर्णन सांग ", अशी गोपाळानें विनंति केल्यावरून पंतांनीं पाचव्या प्रकरणांत योगशास्त्रांत सांगितलेल्या यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व

समाधि या अष्टांगांचें त्यांच्या पोटभेदांसह सविस्तर वर्णन केलें आहे. नंतर योगीश्वराच्या स्थितीचें व मंत्रयोग, लययोग, हठयोग व राजयोग यांचें थोडक्यांत वर्णन करून "सद्गुरु मूर्तीची पूजा, ब्रह्मानुसंधान, उत्तम शैवविद्या अथवा ब्रह्मविद्या, सद्भक्ति, सुव्रत हीं पाच किंचित्‌हि न्यूनत्व नसतां एकच आचरणेंच शिवयोग", असें सांगितलें आहे. नंतर योगसाधनास अधिकारभेदानें लागणाऱ्या कालावधीसंबंधीं माहिती देऊन योगसाधनांत येणारीं विघ्नें व त्यांचा परिहार करण्याचे मार्ग हीं सांगितलीं आहेत. त्यानंतर " निर्गुणांग-योगमार्गाचें हें रहस्य समजावून देणाऱ्या सद्गुरूचीं लक्षणें मला संतोषपूर्वक सांग ", अशी गोपाळानें विनंति केल्यामुळें पंतांनीं सहाव्या प्रकरणांत सद्गुरु व सच्छिष्य यांचीं लक्षणें सांगून शेवटीं " तत्त्वमसि " महावाक्याच्या अर्थाचें विवरण केलें आहे.

पंतांनीं या लेखांत योगशास्त्रांतील प्रमाणभूत ग्रंथ व आपला अनुभव यांचें मंथन करून निघालेलें सार मुमुक्षु व अभ्यासी यांना मार्गदर्शक होईल अशा रीतीनें थोडक्यांत दिलें आहे. त्यामुळें त्यांतील विषय व्यापक व गहन आहे. त्याचें बरोबर रीतीनें आकलन होण्याकरितां तो लक्षपूर्वक व पुनः पुनः वाचणें अवश्य आहे.

१८८३-८५ सालांत पंतांनीं केलेल्या सद्गुरूच्या वाङ्मयसेवेसंबंधीं येथपर्यंत थोडक्यांत जी माहिती दिली आहे, तिच्यावरून वाचकांच्या हें लक्षांत आलें असेल कीं, या वाङ्मयांत त्यांच्या अंतःस्थितीचें व बाह्य परिस्थितीचें चित्र उमटलें आहे. त्यामुळें हें वाङ्मय त्यांच्या चरित्रगंगेच्या ओघापासून अलग ठेवून ग्रंथाच्या अखेर त्याचा परामर्ष न घेतां येथेंच त्याचें दिग्दर्शन केलें आहे. त्यावरून १८८५ अखेरपर्यंत त्यांचें आत्मनिरीक्षण व तत्वशोधन किती बारकाईनें व झपाट्यानें चाललें होतें व आपल्या अनुयायांची प्रापंचिक व पारमार्थिक दृष्ट्या उन्नति व्हावी म्हणून ते किती कळकळीनें झटत होते तें उघड होतें. पण १८८५ अखेर त्यांच्या आत्मानुभवाला पक्केपणा येऊन भजनस्फूर्ति व बोधस्फूर्ति या अधिक जोरावल्या व मूर्तस्वरूपांत सामुदायिक रीतीनें सद्गुरूची भजनपूजनादि सेवा करावी असें त्यांना वाटूं लागलें.

# प्रकरण २२ वें

———:०:———

## आत्मानुभवाची परिपक्वता; सगुण भक्ति व पादुकास्थापना; घरीं उत्सव करण्यास सुरवात.

मागें उल्लेख केल्याप्रमाणें १८८५ सालीं पंत महादेव गल्लींत येळ्ळूरकरांच्या घरांत राहात असत. त्या घराला माडी असून तळमजल्यावरहि बरींच वठाणें होतीं. त्यामुळें पुष्कळ माणसांचा समावेश होण्यासारखी ती जागा होती. पंतांचे सर्व बंधु त्यांच्या जवळच राहात होते, व काका घाणेकर बहुतेक त्यांच्याच घरीं असे. त्या सालीं गोपाळ व काका हे दोघेहि मॅट्रिकच्या परिक्षेला बसावयाचे होते. वामन व नरसू हे इंग्रजी चौथ्या इयत्तेंत होते व शंकर मराठी शिकत होता. गोविंदाला इंग्रजी अभ्यास झेपेनासा झाल्यामुळें त्यानें यापूर्वींच शाळा सोडिली होती व पंतांनीं सांगितल्याप्रमाणें तो आस्थेनें श्रीदत्ताचें भजनपूजन करी व घरांतील बाजारहाट वगैरे पाहात असे.

१८८५ अखेरपर्यंत पंतांच्या घरीं नित्य नियमानें भजन होत नसे व त्यांच्या बंधूंपैकीं कोणावरहि त्यांचा अनुग्रह झालेला नव्हता. गोविंदाला श्रीबालमुकुंदांचें दर्शन झालें होतें. त्यामुळें त्याला त्यांच्यासंबंधीं व गुरुमार्गासंबंधीं फार पूज्यभाव वाटत असे. पण आपल्यावर अनुग्रह करण्याची गोष्ट पंतांजवळ काढण्याचा त्याला धीर होत नसे. येळ्ळूरकरांच्या घरांत पंत राहूं लागल्यापासून त्यांचे गुरुबंधु व शिष्य मधुन मधुन त्यांच्या घरीं येऊन तेथें भजनपूजन होऊं लागल्यामुळें व काका घाणेकराकडून पंतबंधु गोविंद व गोपाळ यांना गुरुमार्गासंबंधीं व पंतांचें भजनपूजन, खेळ, बोध वगैरेसंबंधीं माहिती मिळूं लागल्यामुळें आपण पंतांकडून अनुग्रह घ्यावा असें त्यांना वाटूं लागलें. त्यांतल्यात्यांत गोविंदाला तर फारच तळमळ लागून राहिली होती व स्वतः पंतांशीं ही गोष्ट काढण्याचें त्याला धैर्य होत नसल्यामुळें त्यानें आपला मावसभाऊ गणू मारीहाळकर, गोपाळ भागोजीकोप, कृष्णराव गुमास्ते वगैरे मंडळीकडे या संबंधीं बोलणें काढलें होतें. पण कोठेंहि दाद लागेना. तेव्हां गोविंद व गोपाळ या उभयतांनीं काकाला गळ घातली व त्यानें त्या उभयतांना अनुग्रह घेण्याची इच्छा असल्याचें पंतांच्या कानावर घातलें व त्यांना ती गोष्ट पटून शके १८०७ श्रावण वद्य ५ ( ३०–८–१८८५ ) रोजीं त्यांनीं गोविंद व गोपाळ यांचेवर अनुग्रह केला. पंतांचे बंधुच त्यांचे शिष्य झाल्यामुळें तेव्हांपासून त्यांच्या अवधूतमार्ग चालविण्याच्या कार्याला विशेष जोर आला. हा वेळपर्यंत त्यांचें भजनपूजन बहुतेक दुसऱ्या कोणाच्या तरी घरीं होत असे. पण घरामध्येंच त्यांचे शिष्य होऊं लागल्यापासून सद्गुरुसेवेचें आपलें व्रत आपल्या घरींच चालवावें व त्याकरितां आपल्या घरांतच श्रीदत्तात्रेयाचा फोटो अगर दुसरें कांहीं तरी प्रतीक ठेवावें असें त्यांना वाटूं लागलें. येळ्ळूरकरांच्या घरांत राहावयास आल्यावर त्यांनीं एक दत्ताचा फोटो ठेवून त्याचे पुढें रोज भजन कर-

व्यास गोविंदाला पूर्वींच सांगितलें होतें व त्याप्रमाणें तो करीतहि असे; पण तेवढ्यानें त्यांचें समाधान झालें नव्हतें; कारण आपल्या घरांतील विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच सद्‌गुरुभजनाची गोडी लागावी व सवय व्हावी असें त्यांना वाटत होतें व हा हेतु साधण्या-करितां रोजच्या कार्यक्रमांतच सकाळ–संध्याकाळ भजनाचा अंतर्भाव व्हावा असें त्यांनीं ठरविलें.

## अनुभवयुगाला अथवा अवधूतयुगाला सुरवात

१८८५ च्या अखेर पंतांच्या आध्यात्मिक अनुभवांना पक्केपणा येऊन अवधूत-स्थिति स्थिरावत चालली होती. ता. १०–९–१८८५ रोजीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत ( न छापलेल्या ) ते लिहितात, "तूं गेल्यापासून अनुभवस्थिति, आनंद-साक्षात्कार दिवसेंदिवस, क्षणोक्षणीं उत्कृष्ट होत चालला आहे. ××× १५।२० दिवस झाले. " अनुभवयुग " सुरू झालें. यासच " अवधूतयुग " म्हणतात. उपदेश घेतल्यानंतर भक्तियुग, विचारयुग अशीं दोन तरी झालीं. या युगांत अवधूतस्थिति स्थिरावून चवथ्या निर्गुणयुगांत मंडळी निःसंग होऊन निरंजनपदीं अखंड वस्तीस जाणार आहे; मुदत समजली नाहीं. आपण गेल्यानंतर शनिवारींच या तिसऱ्या युगास आरंभ झाला. अनुभव असेलच! कल्याणा, तुझा–माझा वियोग कालत्रयीं होणार नाहीं हें पक्कें जाण. पंच-भूतें आकारास असतांनाहि एक रूपानें राहून अंतीं सायुज्यपदीं ज्योतींत ज्योत मिळाले-प्रमाणें आहेच, मिळून जाऊं. निश्चित राहा. तुला मी विसरत नाहीं. मला तूं विसरूं नको. दोघेहि मिळून श्रीबालावधूताचे चरण अखंड स्मरणांत धरूं. म्हण तर पाहूं, ' जय बालमुकुंद महाराज ' दत्त–कल्याण या दोन पादुका पायीं घालून नाचणारा बुद्धा बाळ अखंड हृदयीं आहे पाहा."

१८७५ सालीं सद्‌गुरु बालमुकुंदांचा पंतांवर अनुग्रह झाल्यानंतर जीं भक्तियुग व विचारयुग संपल्याचा या पत्रांत उल्लेख केला आहे त्यांच्यासंबंधीं व त्या कालावधींतील पंतांच्या अनुभवांसंबंधीं येथपर्यंत वर्णन केलेंच आहे. पण १८८५ च्या सप्टेंबरच्या सुमारास अनुभवयुग अथवा अवधूतयुग सुरू झाल्याचा पंतांनीं जो उल्लेख केला आहे त्यावरून हें उघड होतें कीं सद्‌गुरूचा वियोग झाल्यापासून त्यांच्या ठिकाणीं विवेकजागृति होऊन आत्मप्रतीति, गुरुप्रतीति व शास्त्रप्रतीति यांचा मेळ बसविण्याचें जें कार्य सुरू झालें होतें तें सद्‌गुरु–भजन, ग्रंथवाचन, मनन, निदिध्यास, बिकट प्रसंग, वैराग्य, दृढ अभ्यास व सत्संग त्यांच्या योगानें १८८५ अखेरपर्यंत पुरें होऊन सद्‌गुरूच्या आज्ञे-प्रमाणें अवधूतपंथाची वृद्धि करण्याच्या कार्याला खरी चालना मिळाली आणि त्यांच्या जीवनक्रमाला एक प्रकारचें स्थैर्य प्राप्त झालें. ज्याप्रमाणें एखादा कर्तबगार मनुष्य स्व-कष्टानें विद्यार्जन करून, उद्योगधंदा सुरु करून, द्रव्यार्जन करूं लागल्यावर मागील देणें वगैरे कांहीं असल्यास तें वारून स्थिरस्थावर करितो, आपल्या आवडीप्रमाणें व उद्दिष्ट कार्याला अनुरूप असें घरदार व इतर सोई करून घेतो व त्याला स्थाईकपणा प्राप्त होतो,

त्याप्रमाणें १८८५ अखेर पंतांची स्थिति झाली. प्रापंचिक दृष्ट्या त्यांच्या परिवाराला पुरेल अशी राहण्याची जागा मिळाली, धाकटे भाऊ विद्यार्जन करूं लागले व गोपाळ तर त्या सालीं मॅट्रिकला बसावयाचा होता. तसेंच त्यांना नोकरी लागून पाच वर्षें झालीं होतीं व लग्न होऊनहि तीन साडेतीन वर्षें झालीं होतीं; म्हणजे त्यांच्या गृहस्थाश्रमाच्या राहणीला स्थिरत्व आलें होतें. त्याचप्रमाणें आध्यात्मिक दृष्ट्या त्यांच्या आत्मानुभवाला स्थिरता येऊन सद्‌गुरुसेवा अधिक नेटानें व उत्साहानें करण्यास अनुकूल अशी परिस्थिति निर्माण झाली. त्यामुळें प्रापंचिक व पारमार्थिक दोन्हीहि दृष्टींनी १८८५ साल हें पंतांच्या आयुष्यक्रमांत अत्यंत महत्वाचें होय.

## " आज बाळप्पांनीं देह ठेविला ! "

याच सुमारास एक महत्वाची गोष्ट घडून आली. १८७७ अखेर, " श्रीशैल्य-यात्रेला जातों ", असें सांगून श्रीबालमुकुंद जे गेले ते पुन्हां परत आले नव्हते व पुष्कळ तपास करूनहि त्यांचा कांहीं पत्ता लागला नव्हता. पण त्याबरोबर हेंहि खरें कीं, बाळप्पांनीं अमुक स्थळीं, अमुक वेळीं देह ठेविला या संबंधींहि त्यांच्या शिष्यांना कांहीं खबर मिळाली नव्हती. त्यामुळें ते परत येण्याचे बाबतींत जरी पंत व त्यांचे गुरुबंधु यांची बहुतेक निराशा झाली होती, तरी आशा ही फार चिवट असल्यामुळें, पंतांच्या अंतःकरणांत मधुन मधुन आशेचे किरण उद्भवत व कदाचित् आपला बाळप्पा आपल्यास अकस्मात् येऊन भेटेलहि असें त्यांना वाटे. " तत्त्वमसि " बोध कांहींहि सांगत असला तरी सगुण प्रेम हें खुळें आहे व अंतःकरणांत त्याचें उधान सुरू झालें म्हणजे बुद्धीवर विस्मृतिपटल येऊन कांहीं काळ प्रेमाचा निष्कंटक अंमल सुरू होतो व अष्ट सात्विक भावांना भरतें येऊन बेफामपणें प्रेमोद्गार बाहेर पडतात. मधुन मधुन अशा प्रकारची पंतांची स्थिति होत असे व तशा स्थितींत दर्शनभुकेनें अत्यंत व्याकुळ होऊन त्यांनीं सद्‌गुरूचा धावा केला, सगुणरूपानें दर्शन देण्याची काकुळतीनें याचना केली व कधीं कधीं तर ताबडतोब दर्शन न झाल्यामुळें हताश होऊन प्राण देण्यापर्यंत मजलहि नेली आणि क्वचित् प्रसंगीं त्या त्या वेळेपुरतें त्यांना दर्शनहि झालें; या गोष्टींचा १७ व्या प्रकरणांत उल्लेख केलाच आहे. एकीकडे पंतांच्या ठिकाणीं अद्वयबोध जागृत होता व शिष्यप्रबोधनकार्यहि चालू होतें. तरी पण बाळप्पांच्या वियोगदुःखाचें शल्य त्यांच्या अंतःकरणांत मधुन मधुन बोंचतच असे व " कोठें वससी शोधूं तुला । अंतरीं कीं बाहेरीं । " ( द. प्रे. ल. २९० ) या पदांत दर्शविल्याप्रमाणें त्यांची भांबावल्यासारखी स्थिति होई. असा प्रकार साधारणपणें १८८५ च्या अखेरपर्यंत विशेष प्रमाणांत होत असे. पण त्या सुमारास एके दिवशीं ते भजनाला बसले असतांना "आज बाळप्पांनीं देह ठेविला !" असे त्यांनीं उद्गार काढले व नंतर स्नान वगैरे केलें. वर उल्लेख केलेली महत्वाची गोष्ट ती हीच होय. या गोष्टीचा परिणाम असा झाला कीं, लगेच पंतांनीं गोपाळ भागोजीकोपच्या घरीं श्रीदत्ताच्या पादुका स्थापन केल्या व आपल्या स्वतःच्या घरीं सद्‌गुरूचें कांहीं तरी प्रतीक ठेवण्याचा निश्चय केला.

## पादुकास्थापना व उत्सवास सुरवात

श्रीबालमुकुंदांचा फोटो काढलेला नसल्यामुळें व त्यांच्या पायांतील पादुका पंतांजवळ नसल्यामुळें नवीन पादुका तयार करवून त्या आपल्या राहत्या घरांत स्थापन कराव्या असें त्यांना वाटूं लागलें. या वेळीं त्यांच्या शिष्यांची संख्याहि बरीच वाढली होती व त्यांची पंतांविषयींची भावना "गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु र्गुरुर्देवो महेश्वरः। गुरुःसाक्षात्परब्रह्म" या प्रकारची होती; म्हणजे पंतच गुरु, तोच देव, तोच सर्व कांहीं असें त्यांना वाटे. त्यांची ही भावना शास्त्राला धरूनच होती, तरी पण पंतांना असें वाटूं लागलें कीं तत्वतः जरी आपल्या शिष्यांची आपल्या संबंधींची भावना बरोबर असली तरी आपल्यास तो मान नको. याकरितां त्यांना त्रैमूर्ति दत्तात्रेयाच्या भक्तीला लाविलें असतां त्यांना सगुण भक्तीची गोडी लागेल व श्रीदत्तमहाराज पूज्यतेला धनी होतील; तसेंच श्रीदत्तात्रेयांचें एखादें पूज्यस्थान निर्माण झाल्यास त्या ठिकाणीं सर्व भक्तमंडळीला एकत्र जमून उत्सव वगैरे करण्यास बरें पडेल. तेव्हां आपला हेतु साधण्याकरितां काय करावें या संबंधीं पंतांनीं आपल्या प्रीतींतील व विश्वासांतील गणपतराव मारीहाळकर, गोपाळ भागोजीकोप, रावजी दड्डीकर वगैरे मंडळींशीं वाटाघाट करून असें ठरविलें कीं, महादेव गल्लींतील आपल्या राहात्या घरांतच श्रीदत्ताच्या पादुका यथाविधि स्थापन कराव्या व तेथें दररोज सकाळ-संध्याकाळ भजन, आरती वगैरे करावें व तेथेंच दरवर्षी गुरुद्वादशी ( अश्विन व. १२ ), दत्तजयन्ती ( मार्गशीर्ष शु. १५ ) व गुरुप्रतिपदा (माघ व. १) या तिथींना उत्सव करावे; म्हणजे घरांतील मंडळी व विशेषतः तरुण मंडळी भक्तिमार्गाला लागतील व उत्सवप्रसंगीं सर्व भक्तमंडळींना एकत्र जमून सामुदायिक रीतीनें सद्गुरूचें भजन-पूजन वगैरे कार्यक्रम मोठ्या प्रमाणांत करतां येतील. त्याप्रमाणें शके १८०७ अश्विन वद्य १२ म्हणजे गुरुद्वादशीच्या दिवशीं ( ३–११--८५ ) पंतांच्या राहात्या घरांत श्रीदत्ताच्या पादुका स्थापन करण्याचें व सात दिवस उत्सव करण्याचें ठरलें. गुरुद्वादशीच्या दिवशीं श्रीपादश्रीवल्लभांनीं निजानंदीं गमन केलें व शके १७९७ सालीं गुरुद्वादशीच्या दिवशींच पंतांवर श्रीबालावधूतांचा अनुग्रह झाला; त्यामुळें त्या दिवसाचें त्यांना विशेष महत्व वाटत असे.

पंतांच्या घरांत उत्सव करण्याचें ठरलें खरें परंतु भक्तमंडळींची संख्या व त्यांचा प्रचंड उत्साह ही लक्षांत घेतां, उत्सवाला खर्च बराच येईल असें वाटल्यावरून भक्तमंडळींनीं वर्गणी करून कांहीं रक्कम जमविली व शके १८०७ अश्विन व. ६ रोजीं उत्सवाच्या कार्यक्रमाला सुरवात झाली. सद्गुरूचा मोठ्या प्रमाणावर केलेला असा हा पहिलाच उत्सव असल्यामुळें भक्तमंडळींना अपूर्व उत्साह वाटत होता. अश्विन व. ५ पासूनच परगावची मंडळी येण्यास सुरवात झाली. उत्सवांतील रोजचा कार्यक्रम म्हणजे सकाळीं देवास अभिषेक, गुरुचरित्राचें पारायण व आरती; दुपारीं आरती व नैवेद्य व रात्रीं पुनः भजन व आरती असा होता. त्याखेरीज मधुन मधुन टिपरी खेळणें, पंतांचें बोध सांगणें

वगैरे प्रकारहि चालत. उत्सव सुरू झाल्यापासून सर्व भक्तमंडळी प्रेमानंदांत अगदीं दंग झाली होती. उत्सवाकरितां जमलेल्या बेळगावमधील व दड्डी वगैरे बाहेरगावांहून आलेल्या भक्तमंडळींची संख्या कल्पनेबाहेर वाढली व रोजचा जेवणाखाणाचा वगैरे खर्च अंदाजाबाहेर जाऊन तिसऱ्या-चवथ्या दिवशींच उत्सवाकरितां जमलेली रक्कम संपत आली. पादुका स्थापन करण्याच्या जागीं मखर तयार करणें व उत्सवाकरितां लागणाऱ्या सामानाची जमवाजमव करणें वगैरे कामें पंतबंधु गोविंदराव यांचेकडे होतीं व हिशेब ठेवण्याचें काम पंतबंधु गोपाळाकडे होतें. पैशाचा तुटवडा पडल्याचें त्यांच्या नजरेस येतांच गाजावाजा न करितां गोपाळानें ती गोष्ट हलकेच पंतांच्या कानावर घातली. तेव्हां पंतांनीं असें सांगितलें कीं, “ आजपासून उत्सवाच्या खर्चाचा हिशेबच ठेवूं नका व कांहीं काळजी करूं नका. ज्याचा उत्सव चाललेला आहे तो सर्व तजवीज करील. ही गोष्ट कोणाशींच बोलूं नका व कोणाजवळ पैशाची मागणी करूं नका. ” रावजी दड्डीकर हे पंतांच्या अत्यंत प्रीतींतले असून ते उत्सवाला सुरवातीपासून हजर असावयाचेच. पण पंतांच्या आज्ञेवरून सुमारें एक वर्षापूर्वी त्यांनीं बेळगाव जिल्ह्यापैकीं चंदगड ( महाल ) येथें मुखत्यार वकील म्हणून काम सुरू केलें होतें व तेथें त्यांचा नुकताच जम बसत चालला होता. कांहीं महत्वाचें काम निघाल्यामुळें त्यांना अश्विन वद्य नवमीपर्यंत चंदगडहून निघतां आलें नाहीं; पण त्या सुमारास त्यांना त्यांच्या धंद्यांत बराच पैसा मिळाला. अखेर अश्विन व. १० रोजीं ते बेळगावास येऊन दाखल झाले, व तेथील अपूर्व प्रेमसोहळ्यांत दंग झाले. उत्सवाच्या खर्चाची अडचण पडल्याचें रावजींना समजतांच त्यांनी आपल्या धंद्यांत नुकतीच मिळालेली रक्कम पंतांच्या स्वाधीन केली व खर्चाची अडचण दूर झाली.

## “ गोविंदा, तो दत्तच रे ! ”

अश्विन व० १२ रोजीं पहाटे तीन वाजल्यापासून भक्तमंडळी जमूं लागली व सकाळीं ६ वाजण्याच्या सुमारास पंतांनीं भजनगजरांत यथाविधि नियोजित स्थळीं श्रीदत्ताच्या पादुकांची स्थापना केली व नंतर मंत्राभिषेक, पूजा, आरती वगैरे होऊन सकाळच्या कार्यक्रम संपला; त्या दिवशीं दुपारीं ब्राह्मणभोजनाचा व महाप्रसादाचा बेत होता. जेवणाची तयारी होतांच पानें मांडलीं व पानांवर पदार्थ वाढण्यास सुरवात झाली. तूप वाढण्याचें काम काका घाणेकराकडे होतें. त्यावेळच्या गडबडींत त्याच्या नजरचुकीनें तूप आणि खोबरेल तेल हीं एका भांड्यांत मिसळून गेलीं व पंक्तींत वाढण्याकरितां तुपाची पंचाईत पडली. इकडे पानें वाढून मंडळी तर जेवणाकरितां आपापल्या पानांवर बसली. तेव्हां ताबडतोब तूप आणण्याकरितां चोहोंकडे माणसें पाठविलीं. पण वेळेवर तूप कोठेंहि मिळेना व सर्व मंडळी पानांवर तिष्ठत बसली. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, एक अनोळखी खेडवळ मनुष्य डोक्यावर तुपाची घागर घेऊन पंतांच्या घराचा तपास करीत आला व ती घागर देऊन गेला. त्यामुळें अगदीं अनपेक्षित रतीनें आयत्या वेळीं तुपाची सोय

होऊन मोठीच अडचण दूर झाली. त्या खेडवळ मनुष्यानें आणिलेली तुपाची घागर पंत-बंधु गोविंदरावांनीं घेतली. तेव्हां त्या प्रसंगाचें वर्णन त्यांच्याच शब्दांत देणें बरें. गोविंद-रावजी म्हणतात, "सर्व मंडळी पानांवर तुपाकरितां तिष्ठत बसली. इतक्यांत असा चम-त्कार झाला कीं, कोणी एक खेड्याचा इसम डोक्यावर तुपाची घागर घेऊन, "दत्तोपंत बाळेकुंद्रीकरांचें घर हेंच काय ?" असें विचारीत आमच्या घरीं आला. मी तूप आण-ण्यास गेलेल्या मंडळीची वाट पाहात समोरच उभा होतों. इतक्यांत हा गडी आलेला पाहून, "हेंच बाळेकुंद्रीकरांचे घर. तुला काय पाहिजे ?", म्हणून विचारतां "तूप घ्या" असें तो म्हणाला. लगेच मी अति आनंदानें ती घागर आंत नेऊन दिली आणि तूप कोणीं पाठविलें वगैरे तपास करण्याकरितां बाहेर येऊन पाहतों तों त्या मनुष्याचा पत्ताच लागेना ! चहूंकडे तपास केला, पण व्यर्थ ! ! तो कोठें गेला कांहींच समजलें नाहीं ! ! ! नंतर मी ही हकीगत माडीवर दत्तू (पंत) बसला होता त्याला जाऊन सांगतांच त्याच्या डोळ्यांत एकदम अश्रु आले आणि तो गहिंवरून म्हणाला, "गोविंदा, तो दत्तच रे." दत्तूनें असें म्हणतांच माझीहि स्थिति विचित्र झाली; मागाहून ही गोष्ट सर्वांना कळतांच त्यांच्या उत्साहांत भरच पडली." काका घाणेकर व रावजी दड्डीकर यांनींहि या तुपाच्या चमत्काराचा उल्लेख केला आहे. अशा रीतीनें सर्व उत्सव यथासांग पार पडला.

या उत्सवाच्या निमित्तानें पंतांच्या घरीं आलेली भक्तमंडळी कांहीं दिवस तेथेंच राहिली होती व दररोज भजन--पूजनादि कार्यक्रम होत असत. गोविंदरावजी म्हणतात, "उत्सव संपल्यानंतरहि आठ दिवस घरीं सारखी मंडळीची दाटी होती. पण कोणत्याहि गोष्टीची कमतरता म्हणून मुळींच भासली नाहीं. पादुका स्थापन झाल्यापासून रोज सकाळ-संध्याकाळ नेमानें माझें भजन चालत असे. सोमवार, गुरुवार, शनिवार या तीन दिवशीं गावांतील सर्व भक्तमंडळी भजनास येत असत. दर शनिवारीं मात्र घरीं रात्रींचें भजन व आरती झाल्यानंतर मारुती गल्लींतील रावजी कुळकर्णी ( बाबा कुडचींचे शिष्य ) यांच्या घरीं टिपरी होत असे."

अशा रीतीनें, बाळप्पांनीं देह ठेविल्याचें पंतांना समजल्यानंतर लौकरच त्यांनीं आपल्या घरांत श्रीदत्ताच्या पादुका स्थापन करून घरांतील मंडळींना भक्तिमार्गाला लाव-ण्याची घरींच योजना केली व त्यायोगें इतर भक्तमंडळीलाहि मधुन मधुन एकत्र जमून भजन-पूजन करण्याची व उत्सव करण्याची सोय झाली. पतांच्या हृत्सिंहासनावर सद्गुरु बाल-मुकुंदांच्या पादुका कायमच्याच स्थापन झालेल्या होत्या व वर वर्णन केलेला पादुकास्थापन-समारंभ होण्यापूर्वीच, "दत्ताचे पायीं आम्हीं । वस्ती केली अखंड । धरियेली गोडी नामीं शांति सेवूं उदंड ॥ ध्रु० ॥ ××× दत्त माझा राजयोग । दत्त विदेहमुक्ति । दत्त माझा सर्व भोग । दत्त अद्वैत भक्ति । दत्तात्म ब्रह्म जग । दत्ता बाळपायीं शांति ॥३॥" (द. प्रे. ल. ३९ ) व "दत्तगुरुभजनीं मन पूर्ण रंगलें ॥ ध्रु० ॥ ××× दत्त योग ज्ञान दत्त ध्यान मौन । सर्व दत्तचरणमय स्वयंसिद्ध ठेलें ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. ८२ ) अशाप्रकारचे अनुभवाचे उद्गार त्यांनीं काढले होते. पण भक्तांना श्रीदत्ताच्या सगुण

भक्तीची गोडी लागावी या हेतूनें त्यांनीं पादुका स्थापन केल्या व अवधूत संप्रदाय पुढें चालविण्याच्या त्यांच्या कार्याच्या दृष्टीनें ही अत्यंत महत्वाची गोष्ट घडली. पंतांच्याच घरांत पादुका स्थापन झाल्यामुळें तेव्हांपासून त्यांचें घर हें भक्तिप्रेमाचें व त्यांच्या शिष्यप्रबोधनकार्याचें केंद्र झालें.

## उत्सव म्हणजेच भक्तिप्रेमकल्लोळ

उत्सव म्हणजे असंख्य भक्तांचा प्रेमकल्लोळच होय. त्यामुळें उत्सवाच्या वेळीं सर्व वातावरणच भक्तिप्रेमाच्या भावनांनीं भरून गेलेलें असतें; तें इतकें कीं, त्यावेळीं त्या वातावरणांत सहृदय असा एखादा नास्तिक जरी गेला तरी कांहीं काळ तरी तेथें भरून राहिलेली भक्तिप्रेमाची, उल्हासाची वीज त्याच्या अंतःकरणाला धक्का देऊन हलविल्याशिवाय राहात नाहीं; किंबहुना महापुरांत जसे ओढे, नाले वगैरे अनेक लहान लहान पाण्याचे ओघ एकत्र होऊन त्यांचा एक प्रचंड व वेगवान प्रवाह बनतो, त्याप्रमाणें उत्सवप्रसंगीं भक्तिप्रेमानें एकाच वेळीं उल्हसित झालेलीं असंख्य अंतःकरणें एकत्र होत असल्यामुळें भक्तिप्रेमरसाला महापूर येत असतो, आणि त्या ठिकाणीं एखाद्या सामान्य मनुष्याचें अन्तःकरणहि प्रेमानें उचंबळून येतें. तेव्हां पादुकास्थापनेच्या उत्सवाचे उत्पादक जे पंत त्यांच्या स्वतःच्या अन्तःकरणाला या सद्गुरूच्या पहिल्याच उत्सवाचे वेळीं किती वेळां भरतें आलें असेल याची कल्पनाच होणें नाहीं. सद्गुरूचा वियोग झाल्यापासून सुमारें आठ वर्षें ज्या भक्तिप्रेमाच्या भावना, मधुन मधुन, पंतांच्या अंतःकरणांत उसळत होत्या, त्यांना या उत्सवप्रसंगीं मोठीच चालना मिळून बाहेर पडण्यास उत्तम संधि मिळाली व उत्सव सुरू झाल्यापासून दीड दोन महिन्यांत श्रीदत्तप्रेमलहरींतील सुमारें १५ पदें ( ९१ ते १०५ ) त्यांच्या भजनरंगांत झालीं. त्यांच्यांत त्यांनीं सद्गुरु बालमुकुंदांना भजण्याचा भक्तमंडळीला वारंवार उपदेश केला आहे. भजनानंदांत तल्लीन होऊन पद ९६ मध्यें " प्रेमानंदीं दत्त नाचतो । कर जोडुनि तुम्हां विनवितो । जो सद्गुरुभजनीं रमतो । तो जितांचि मुक्त होतो रे ॥ बापांनो बालमुकुंद नित्य भजा ", अशी त्यांनीं कळकळीनें विनंति केली आहे. तसेंच पद ९३ व ९९ मध्यें शुकसनकादिक जीवन्मुक्तांचा दाखला देऊन सद्गुरुस्मरणाचा व दत्तनामाचा महिमा गाईला आहे व, " अनन्य भावें भजतां पाय । करी दयानिधि कृपा । भक्तिरहस्य प्रगट दाउनी । हरी पुण्य पापा ॥ १ ॥ नित्य नैमित्य कर्मे करूनी । नका भरूं मापा । उपासनेचें मर्म जाणुनि । चुकवा जन्म खेपा ॥२॥", ( द. प्रे. ल. ९९ ) अशा प्रकारें अनन्य भावानें भजन केलें असतां दयानिधि कृपा करितो व भक्तिरहस्य उघड दाखवून पुण्यपापांचें हरण करितो असा उपदेश करून आंधळेपणानें नित्य नैमित्तिक कर्मे करीत न बसतां उपासनेचें मर्म जाणून जन्ममरणविधुर होण्याची विनंति केली आहे. गुरुद्वादशीच्या दिवशीं श्रीदत्ताच्या पादुका स्थापन करून भक्तांना स्थूलदृष्टया पूजेचें एक स्थान पंतांनीं निर्माण केलें. हें जरी खरें तरी श्रीदत्ताच्या खऱ्या पादुका कोणत्या व त्यांची पूजी कशी करावयाची तें त्यांनीं पद १०० मध्यें

स्वानुभवाला धरून सांगितलें आहे. त्या पदांत ते म्हणतात, "नित्य निरंजन दत्तपादुका भक्तीनें पूजा । हृत्पद्मावरी मुक्तिसिंहासनीं ध्यावा गुरुराजा ॥ धृ० ॥ सद्गुरुचरण सुचित्तहस्तीं युक्तीनें धरा । सद्भावकरें चित्कळागंध लेपन करा ॥ १ ॥ सुमनपुष्प अर्पुनी जाळा स्वानुभवधूपा । तनुभान टाकुनी ओवाळा सम्यग्ज्ञानदीपा ॥ २ ॥ निशून्य पात्रीं निर्मायोदकें श्रीपाद न्हाणा । निराळ मुखें तीर्थ पिऊनी धन्य दत्तराणा ॥ ३ ॥ ", याप्रमाणें पादुका-पूजेचें रहस्य सांगून पद १०१ मध्यें नित्य स्मरणपूर्वक प्रेमभरानें गुरुनामडंका वाजला असतां दत्तभक्तांना भय अगर शंका हीं नाहींत असें सांगून आत्मा गुरु ब्रम्ह यांच्या ऐक्याचा बोध केला आहे व अनंत शशिसूर्यांना प्रकाश देणारा स्वयंज्योति सगुणब्रम्ह सद्गुरु दयाळु असून रावरंकांना समदृष्टीनें पाहणारा आहे असें सांगून ज्ञानध्यानातीत, तर्काला अनाकळ अशा बाळ ( सद्गुरु ) रूपीं दत्त (आपण) हारपला असा अद्वैतानुभव व्यक्त केला आहे. पद १०२ मध्यें अवधूत मार्ग सुलभ नाहीं असें सांगून भक्तिरूपी हातांत ज्ञानखड्ग घेण्याचा उपदेश केला आहे व आत्मप्राप्तीचें मर्म न जाणतां केलेलीं साधनें व्यर्थ होत असें सांगून नित्य सद्गुरुभजन केल्यानें वृत्ति स्वरूपीं लीन होऊन आपण अलक्ष्य दुर्ग ( किल्ला ) सर केला असें सांगितलें आहे. पद १०३ मध्यें दत्त भक्तांचा कैवारी आहे, अनंत जनांचा उद्धार करणें हाच त्याच्या अवताराचा हेतु आहे व असा दयाळु सद्गुरु स्वतः हजर राहून दासाला त्वरित पावतो म्हणजे तो स्मर्तृगामी आहे असें सांगून श्रीदत्तात्रेयांच्या सगुणमूर्तीचें वर्णन केलें आहे व सद्गुरु बालमुकुंद अनन्य भावाचा भुकेला असून आपण प्रेमभरें नृत्य करीत भजनीं रमलों आहोंत असें म्हटलें आहे.

## काकांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा !

३--११--१८८५ रोजीं पादुका स्थापन झाल्या व त्यानंतर सात आठ दिवस पंतांच्या घरीं उत्सवाकरितां बाहेर गावांहून आलेली बरीच भक्तमंडळी राहिली होती व भजन, टिपरी, बोध सांगणें वगैरे प्रकार चालूच होते. त्यामुळें काका घाणेकर वगैरे विद्यार्थीहि त्या नादांतच होते. नंतर लौकरच मॅट्रिक्युलेशनची परीक्षा व्हावयाची होती व पंतबंधु गोपाळ व काका घाणेकर हे दोघेहि त्या परीक्षेला बसावयाचे होते. त्या दोघांपैकीं गोपाळ फार अभ्यासी होता व शाळेंतहि चांगल्या विद्यार्थ्यांत त्याची गणना होत असे. काकाला मात्र अभ्यासाचा कंटाळा असून तो पंतांबरोबर त्यांच्या गुरुबंधूंकडे व शिष्यांकडे जात असे व भजन-पूजनादि कार्यक्रमांत भाग घेत असे. त्यामुळें त्याचा अभ्यास बेताबाताचाच होता व त्याचे इंग्रजी व गणित हे विषय तर अगदींच कच्चे होते; ते इतके कीं, परीक्षे-करितां नेमलेल्या भूमितीच्या ( युक्लिडच्या ) चार पुस्तकांपैकीं त्यानें फक्त पहिलें पुस्तक साधारण वाचलें होतें. अशा स्थितींत गोपाळ व काका हे दोघे परीक्षेला बसले व गोपाळ नापास झाला व काका पास झाला ! हा निकाल सर्वांच्या अपेक्षेच्या अगदीं उलट झाला. वास्तविक काकाच्या तयारीवरून तो पास होण्यासारखा नव्हता; पण तो मोठ्या चमत्का-रानें पास झाला ! तें कसें तें काकांच्याच शब्दांत सांगणें बरें. काका म्हणतात, " मला

श्रीपंतांचा सहवास सन १८८५ पर्यंत सतत एकसारखा होता. तेवढ्या अवधींत त्यांच्या देखरेखीखालीं व त्यांच्या शिक्षणानें माझा इंग्रजी अभ्यास मॅट्रिकपर्यंत झाला. मॅट्रिकच्या विषयांमध्यें इंग्रजी व गणित हे दोन विषय माझे अगदींच कच्चे होते. गणित व इंग्रजी यांपैकीं प्रत्येक विषयाची परीक्षा ज्या दिवशीं व्हावयाची त्याच्या आदल्या दिवशीं मी अगदींच चिंताक्रांत होऊन निजत असें. पण पहाटे चार पाचाच्या सुमारास त्या दिवशीं परीक्षेंत जे प्रश्न पडणेचे तेच प्रश्न व तेवढे ( गुण ) मार्क असलेला प्रश्नांचा कागद माझ्या स्वप्नांत येत होता. श्रीपंत माझ्याजवळच निजत असत. मी जागा होतांच श्रीपंतांना उठवीत असें आणि त्यांना ही हकीगत सांगत असें. ते मला त्या प्रश्नांचीं उत्तरें सांगत व तीं मी पाठ करीत असें व परीक्षेच्या वेळेस तेच प्रश्न व तेवढेच मार्क असलेले कागद परीक्षेमध्यें येत होते ! त्यावेळीं मॅट्रिकला युक्लिडचीं चार पुस्तकें होतीं. मी युक्लिडच्या पहिल्या पुस्तकाखेरीज दुसऱ्या कोणत्याहि पुस्तकांतील कोणत्याहि सिद्धांताकडे ढुंकूनहि पाहिलें नव्हतें. त्या वर्षींच्या परीक्षेंत बहुतेक प्रश्न युक्लिडच्या दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या पुस्तकांतील होते. याप्रमाणें श्रीपंतांनीं माझी मॅट्रिक पास केली ! ”

१३-१-१८७९ रोजीं गणपतराव आठवले वकील यांच्या मुलाला शिकविण्याकरितां त्यांच्या घरी पंत गेले असतां तेथें प्रथम काकाची व त्यांची गाठ पडली व त्याच दिवशीं त्यांनीं त्याला आपल्या बरोबर नेलें. तेव्हांपासूनच तो त्यांच्या कृपेला पात्र झाला व त्यांच्या देखरेखीखालीं योगसाधनांत त्याची पुष्कळ प्रगति होऊन कांहीं अद्‌भुत अनुभवहि त्याला घेण्यास मिळाले. पारमार्थिक दृष्ट्या त्याला पंतांच्या सत्संगतीचा लाभ सहा वर्षें झाला व त्या दरम्यान त्यांच्या देखरेखीखालीं त्याची मॅट्रिकची परीक्षा पास होऊन व्यावहारिक दृष्ट्याहि तो मार्गाला लागून त्याचें कल्याण झालें व जो ‘ काक्या ’ आईबापांचीहि परवानगी न घेतां स्वयंस्फूर्तीनें इंग्रजी शिकण्याकरितां घरांतून पळून आला होता तोच सहा वर्षांनीं मॅट्रिकच्या परीक्षेंत यशस्वी होऊन १८८५ अखेर मिश्रीकोट येथें स्वगृहीं परत गेला. हा विलक्षण योगायोगच म्हटला पाहिजे. प्रपंचपरमार्थांत योग्य मार्ग दाखविणाऱ्या पंतांसारख्या सत्पुरुषाची अल्प वयांत सहजीं सहज गाठ पडणें ही गोष्ट अत्यंत दुर्लभ व महद्भाग्याची होय ! काकाचा पुढें योग्य स्थळीं आणखी उल्लेख येईलच.

पंतांनीं १८७९ मध्यें उपदेश देण्याचा क्रम सुरू केल्यापासून १८८५ च्या अखेरपर्यंत काका त्यांच्या जवळ घरांतील एखाद्या माणसाप्रमाणें अथवा धाकट्या भावाप्रमाणें होता व तो त्यांच्या भजनपूजनादि कार्यक्रमांतहि बहुतेक त्यांच्याबरोबरच असे. तो परम नैष्ठिक असून अत्यंत एकधोरणी होता, त्यामुळें पंतांचें त्याच्यावर फार प्रेम असे. तें इतकें कीं १८८३ मध्यें जी कांहीं मंडळी त्यांचा मत्सर व द्वेष करीत होती त्यांच्या संगतीचा काकाच्या मनावरहि थोडासा परिणाम झाल्याशिवाय राहिला नव्हता. तरी पंतांनीं तिकडे दुर्लक्ष करून त्याला आपल्यापासून दूर न करितां मोठ्या प्रेमानें वागविलें व काकाच्या ठिकाणीं या उपकाराची स्मृति कायम राहिली. त्याची बुद्धि फारशी तीव्र नव्हती. त्यामुळें त्याला तत्वविचार व वेदांतचर्चा यांचा कंटाळा असे. पंतांचा बोधवर्षाव तर सतत

चालू असे व गणू गुमास्ते वगैरे कांहीं शिष्यमंडळींना ते एखाद्या आध्यात्मिक विषयावर निबंध लिहिण्यास सांगून त्याची चर्चाहि चालत असे. तेव्हां असलें आपल्याला कांहीं साधत नाहीं याबद्दल थोडा विषाद वाटून त्यानें एके दिवशीं पंतांना विचारलें कीं, "मी वेदान्ताबाबत कांहीं वाचूं का?", तेव्हां "तूं कांहींहि वाचूं नकोस", असें पंतांनीं त्याला सांगितलें. पण पंत त्याला अनन्यभक्तीचे, वीरवैराग्याचे व धाडशी वृत्तीचे धडे आपल्या सहवासांत प्रत्यक्ष कृतीनें देत. अशा एका प्रसंगाचें काकानें असें वर्णन केलें आहे कीं, "श्रीपंतांना रात्रौ जंगलांत अगर स्मशानांत फिरणेची आवड असे. ती. कै. गणपतराव भारीहाळकर हे श्रीपंतांचे मावसभाऊ असून ते अलतग्यास राहात होते. १८८१ च्या सुमारास एके दिवशीं मी पंतांच्या घरी निजलेला असतांना पंतांनीं हळूच माझ्या कुशींत गुदगुल्या करून मला उठविलें. आम्ही दोघेजण अलतग्याजवळ कंग्राळी नदीकाठीं गेलों. तेथें एक मोठा वृक्ष आहे. त्या वृक्षावर आम्ही चढलों व एका खांदीवर पंत व एका खांदीवर मी असे बसलों. त्या वेळीं सुमारें आठ तास रात्र झाली होती. अर्धा तासपर्यंत आम्हीं "बालमुकुंद", "बालमुकुंद" असें ओरडलों व नंतर पंतांनीं सांगितल्यावरून तेथूनच मी गणपतरावांना हाका मारल्या. त्यावेळीं ते नदीकाठच्या श्रीरामलिंगाच्या देवालयांत राहात असत. माझी हाक ऐकून त्यांनीं 'ओ' दिली. नंतर आम्ही दोघे देवळांत गेलों व तिघांनीं ती रात्र गुरूच्या भजनपूजनांत घालविली."

अशा प्रकारें "विहारशय्यासनभोजनेषु" ज्या 'काक्या'ला पंतांनीं सहा वर्षे मोठ्या प्रीतीनें वागविला तो त्यांच्यापासून दूर जातांना त्यांना वियोगदुःख फार जाणवलें, कारण आपल्या जवळ असलेला अगर आपल्याकडे आलेला गुरुमार्गांतील कोणीहि मनुष्य दूर जाण्याची परवानगी मागण्यास आला असतां ती देण्याचें पंतांना मोठें संकट वाटत असे; परशराम व गंगाराम हे शिक्षणाकरितां पुण्यास जाण्याकरितां निघाले त्या वेळीं पंतांची मनःस्थिति कशा प्रकारची झाली होती या संबंधाचें वर्णन प्रकरण १९ मध्यें केलेंच आहे. तरी पण त्यांचा पहिलाच शिष्य व विद्यार्थी मॅट्रिकमध्यें यशस्वी होऊन आपल्या आईबापांकडे परत गेल्यामुळें पंतांना फार समाधानहि वाटलें. आणखी असें झालें कीं, काका बेळगावाहून जाण्यापूर्वी दोन तीन महिने पंतबंधु गोविंद व गोपाळ यांच्यावर पंतांचा अनुग्रह झाल्यामुळें, "आसनीं शयनीं भोजनीं गमनीं", सन्निध असणारा कट्टा गुरुभक्त काका त्यांचेपासून दूर झाला तरी त्याची जागा बऱ्याच अंशांनें गोविंद व गोपाळ या बंधुद्वयानें भरून काढली. त्यांतल्या त्यांत गोविंदाच्या मागें अभ्यासाचा लकडा नसल्यामुळें तो आपल्या 'दत्तू'ची (पंतांची) एकनिष्ठपणें सेवा करूं लागला व सद्गुरूची भजनपूजनादि नित्य नैमित्तिक सेवा अत्यंत कळकळीनें व मनोभावानें करूं लागला. गोपाळ आपला अभ्यास सांभाळून प्रापंचिक गोष्टींकडे लक्ष पुरवून 'दत्तूला' त्या बाबतींत त्रास न होईल याबद्दल दक्षता बाळगीत असे. त्यायोगें पंतांच्या प्रपंचाची व परमार्थाची घडी दिवसेंदिवस नीट बसत चालली.

शके १८०७ अश्विन व. १२ चा (गुरुद्वादशीचा) उत्सव झाल्यानंतर मार्गशीर्ष

शु. १५ चा (श्रीदत्तजयंतीचा) उत्सव पंतांच्या घरीं झाला व त्यानंतर माघ वद्य १ चा (गुरुप्रतिपदेचा) उत्सवहि झाला. पुढें हे तीन उत्सव दरवर्षी ते आपल्या घरीं करूं लागले.

अशा रीतीनें १८८५ अखेर पंतांच्या आत्मानुभवाला पक्केपणा येऊन आध्यात्मिक जीवनाला स्थैर्य आलें व या स्थितीचा उल्लेख त्यांनीं आपल्या सनावळीच्या शेवटीं "दत्तस्थापना," "फकीरीभवन," "अंतरीं स्वतंत्रता", "निजखूणदर्शन" व "निजानंदस्थितीप्रत गमन" या खुणेच्या शब्दांनी केला आहे; यांपैकी "दत्तस्थापना" या शब्दानें श्रीदत्ताच्या पादुका स्थापन केल्याचा उल्लेख केला आहे व पुढील चारी शब्द हें पंतांच्या त्यावेळच्या निःसंग स्थितीचे व पूर्णत्वाचे द्योतक आहेत. सद्‌गुरु बाळमुकुंदांचा वियोग झाल्यापासून पंतांची सिद्ध व साधक अशी जी उभयविध भूमिका होती तिचें पर्यवसान १८८५ अखेर पूर्णत्व बाणण्यांत होऊन तेव्हांपासून त्यांच्या परचित्तप्रबोधनकार्याला अथवा अवतारकार्याला खरी सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# प्रकरण २३ वें

---:०:---

## पूर्णावस्था; अनुभववल्ली भाग १ व २; ब्रह्मोपदेश व भक्तालाप अथवा ज्ञानीभक्ताचे प्रेमोद्गार

सन १८८५ अखेर पंतांच्या ठिकाणीं अद्वैत स्थितीचा अनुभव स्थिरावून त्यांनीं श्रीदत्ताच्या पादुका स्थापन केल्या व मोठ्या प्रमाणावर गुरुद्वादशीचा उत्सव केला. एकीकडे त्यांचा लेखनव्यवसाय चालूच होता व ज्याप्रमाणें मागील प्रकरणांत दर्शविल्याप्रमाणें उत्सवसमाप्तीनंतर कांहीं पदांच्यारूपानें स्वानंदामृतच बाहेर पडलें, त्याचप्रमाणें उत्सवानंतरच्या लेखांतहि पूर्ण तृप्तीचे धन्योद्गार व्यक्त झाले आहेत, आणि त्यांच्या ठिकाणीं बाणत चाललेला पूर्णाद्वैतबोध व "जगच्चिद्विलास" हा सिद्धांत निश्चित स्वरूपांत प्रगट झाला आहे. ता. ३०–११–८५ रोजीं त्यांनीं " निजानंद " हा लेख लिहिला. ( पु. ६–२३६ ते २३९ ) त्यांत " चराचर सर्व विश्व म्हणजे त्रैमूर्ति दत्तात्रेयाचाच खेळ आहे "; " त्रैमूर्तिच आप आपण कांहीं एक न होऊन निरनिराळया प्रकारांनीं सहज समाधींत डुलत आहे ", अशा प्रकारें सगुण–निर्गुण–ऐक्यरूपानें त्रिमूर्तीचें वर्णन करून अखेर पंत म्हणतात " ही गंमत दत्त–दृष्टीनें होऊन, दत्त–मनानें ध्याऊन, दत्त–प्रेमानें भिजून, दत्तभजनीं नाचत नाचत पूर्णदत्तपदीं अंशधारी दत्त मूळचाच असून, सांगण्यास मात्र उरून, तिकडेच बुडाला. पाहतों तों स्वप्नच. राम सद्गुरु समर्थ." ता. २–१२–१८८५ रोजीं त्यांनीं " सद्‌गुरुस्तुति " हा लेख लिहिला ( पु. ६–२३९ ते २४२ ) व त्यांत सद्‌गुरूची स्तुति करून, " ज्वालादेवतेस दीपानें आरती करण्याप्रमाणें, गुळराशीस गुळाचा नैवेद्य दाखविल्याप्रमाणें तुझे भक्तांनीं तुझी सेवा करावी, तूं कृपा करावीस, तुझे पुढें नाचावें, तुझे रूपीं ऐक्य व्हावें ", असें म्हटलें आहे.

१८८५ च्या नाताळांत पंत अलतगे येथें त्यांचे गुरुबंधु गणपतराव मारीहाळकर यांचेकडे गेले असतां, तेथें त्यांनीं ता. २८–१२–१८८५ रोजीं " अनुभववल्ली भाग १" हा लेख लिहिला ( पु. ३–२२९ ते २४२ ) व बेळगावीं परत आल्यानंतर ता. ५-१-१८८६ रोजीं " अनुभववल्ली भाग २ " हा लेख लिहिला. (पु. ३-२४२ ते २५७) या दोन्ही लेखांचा विशेष हा आहे कीं त्यांच्यांत अध्यात्मविषयाचें प्रश्नोत्तररूपानें प्रतिपादन केलें आहे. "अनुभववल्ली भाग १" मध्यें, शिष्यानें सद्‌गुरूंस "उपशांत पुरुषास मोक्ष कशानें प्राप्त होतो ?" हा प्रश्न विचारून सुरवात केली आहे व त्याच्या प्रश्नांना उत्तरें देऊन सद्‌गुरूंनीं त्याला अध्यात्मविषय सुलभ रीतीनें समजावून सांगून अखेर, "तूंच परब्रह्म असून तुझ्या सहज सुज्ञानाला प्रतिबंधक जें अज्ञान त्याची निवृत्ति परम दयाळु श्रीदत्तमहाराजाचे प्रसादानें झाली; म्हणून त्याचेंच अद्वय भजन–सेवन, आमरण करून सुखी हो", असा

उपदेश केला आहे. "अनुभववल्ली भाग २" मध्येंहि प्रश्नोत्तररूपानेंच पंतांनीं विषयप्रतिपादन केले आहे. पण त्याचा आणखी एक विशेष हा आहे कीं त्यांत जिज्ञासु शिष्यानें ज्ञानलालसेनें प्रश्न केलेले नसून, त्यानें सद्गुरूंना अशी विनंती केली आहे कीं, "हे शांतिशीतांशुशेखरा, आपल्या दिव्य चरणारविंदसान्निध्येंकरून मला प्राप्त झालेला परमार्थ समर्थांपुढें निवेदन करावा कीं न करावा ?", ही विनंती ऐकून सद्गुरु संतुष्ट होऊन म्हणाले, "बापा पुत्रा, निर्भयपणें बोल: त्वद्वाक्यनाडीपरिज्ञानानें अंतराळिक ज्वरास अस्तित्व नास्तित्व जाणून अंतर्गत ताप असल्यास ज्ञानामृतरसाचा प्रयोग करूं. नसल्यास तूंच ज्ञानामृतस्वरूपी झालास, म्हणून संतुष्ट होतों", अशा प्रकारें सद्गुरूंची आज्ञा मिळतांच समर्थांचे मुखें वेदान्तशास्त्ररहस्य कळल्यानें आपल्या ठिकाणीं जो आत्मानुभव स्थिरावला तो सद्गुरूंपुढें निवेदन करण्यास शिष्यानें सुरवात केली व मधुन मधुन आपणच प्रश्न उपस्थित करून त्यांचीं व सद्गुरूंनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन प्रेमरसभरित स्वानुभव ( म्हणजेच सकलोपनिषत्तात्पर्य व सकल पुरातन जनानुभव ) सद्गुरूंपुढें निवेदन केला. तेव्हां शिष्याचीं तीं वाक्यामृतफळें सेवन केल्यानें तो ज्ञानामृतस्वरूपी झाल्याची सद्गुरूंची खात्री होऊन त्यांना फार संतोष झाला व प्रेमभरानें त्यांनी त्यास आशिर्वाद दिला आणि आपण निजानंदस्थितींत असते झाले असें पंतांनीं वर्णन केलें आहे.

सर्वसाधारणपणें शिष्यानें प्रश्न करून व सद्गुरूंनीं त्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन अध्यात्मज्ञानाचा उपदेश केल्याचें उपनिषदादि ग्रंथांत आढळून येतें; पण सद्गुरूंनीं प्रश्न करून शिष्याच्या ब्रह्मविद्येंतील पूर्णत्वाची परीक्षा केल्याचीं वर्णनें क्वचितच आढळतात ! अशा प्रकारचें उत्कृष्ट उदाहरण श्रीमद्योगवासिष्ठांत पहावयास सापडतें. सद्गुरु वासिष्ठ महामुनींनीं आपला शिष्योत्तम जो प्रभु रामचंद्र त्याला अध्यात्मविषय सांगोपांग समजावून दिल्यानंतर त्याची परीक्षा पाहण्याच्या निमित्तानें आपल्या स्वतःकडे शिष्यत्व घेऊन व त्याला गुरुत्व देऊन प्रश्न विचारले व त्याच्याकडून समर्पक व निश्चयात्मक उत्तरें मिळाल्याचें पाहून त्यांना फार समाधान झालें. याच मार्गाचें अवलंबन करून पंतांनीं "अनुभववल्ली भाग २" मध्यें शिष्याच्या ठिकाणीं सद्गुरूंच्या पूर्ण कृपेनें व अद्वैत बोधानें जी ज्ञानामृतस्वरूप–स्थिति बाणली होती ती त्यानें वेदांतशास्त्रपद्धतीनें सद्गुरूंपुढें मांडली किंवा त्यांच्यापुढें ब्रह्मविद्येची परीक्षा दिली व त्यायोगें त्याच्या ठिकाणीं पूर्णत्व बाणल्याची व आपण लाविलेला बोधवृक्ष पूर्णपणें सफल झाल्याची सद्गुरूंची खात्री पटून त्यांना परमानंद झाला, असें वर्णन केलें आहे. या लेखाच्या द्वारें पंतांनीं आपल्या स्वतःच्या ठिकाणीं जी ज्ञानामृतस्वरूपस्थिति, त्यावेळीं, बाणली होती तिचें सद्गुरु बालावधूतांपुढें निवेदन केलें, हें उघड दिसतें.

१५–१–१८८६ रोजीं पंतांनीं "ब्रह्मोपदेश" नावाचा एक लहानसा लेख लिहिला. ( पु. ३–१४७ ते १५८ ) या लेखांतहि त्यांनी प्रश्नोत्तररूपानें ब्रह्मोपदेश केला आहे, अथवा अध्यात्मविषयाचें श्रुतिशास्त्रांना धरून शास्त्रीय पद्धतीनें प्रतिपादन केलें आहे. त्याच्या शेवटीं, " आपलें विस्मरणच मोठा घात आणि आत्मलाभच

मोठा लाभ असें जाणावें ", असें सांगितलें आहे व " महापुरुष म्हणजेच शिव असें जाणून त्याची प्रार्थना करून कृतार्थ व्हावें; अन्य मार्गानें कृतकृत्यता मिळणें नाहीं, " असा सद्गुरूंनीं सच्छिष्यास इषारा दिला आहे. १९-१-१८८६ रोजीं त्यांनीं " खऱ्या साधूचीं लक्षणें " हा स्फुट लेख लिहिला ( पु. ६-२४२ ते २४४ ) व ४-३-१८८६ रोजीं म्हणजे शिवरात्रीच्या दिवशीं " शिवरात्र " हा लेख लिहिला. ( पु. ६-२४५ ते २६० ) २५-२-१८८४ रोजीं त्यांनीं, " शिवरात्रीचा उपवास " हा लेख लिहिल्याचा मागें उल्लेख केलाच आहे. पण " शिवरात्र " या लेखांत त्यांनीं अध्यात्मशास्त्र व आपला आत्मानुभव यांना धरून निरनिराळ्या प्रकारांनीं म्हणजे सांख्य, तारक व अमनस्क योगांच्या दृष्टीनीं शिवरात्र म्हणजे काय तें सांगितलें आहे. पण शिवरात्रव्रत करण्याचे वरील योगमार्गांचे प्रकार हे आपले गुरुबंधु व शिष्य यांना कदाचित् अवघड वाटतील असें वाटून त्यांनीं सर्वांना आचरण्यास सुलभ असा अनन्य भक्तीचा प्रकार वर्णिला आहे. नंतर त्यांनीं " स्वतःची शिवरात्र " जंबुगिरीवरच्या पश्चिम दिशेच्या गुहेंत आपण श्रीसद्गुरु बालमुकुंदचरणीं पडल्या वेळीं जेव्हां गुरुशिष्यऐक्यतेचा अनुभव आला तेव्हां घडली ", असें सांगून निरभिमानता हेंच उपोषण, नित्य प्रेमामृत भोजनाच्या तृप्तीचें पारणें, अद्वय-भजन-सेवेचें ललित हीं अखंड चाललीं आहेत असें म्हटलें आहे. तसेंच ज्यामध्यें सद्गुरूच्या सहज प्रेमानें व पूर्ण कृपेनें आपणास अखंड निजानंदाची स्थिति बाणून नित्यानंदनामक महाशिवरात्रीचें व्रत आपोआप घडत आहे, असा स्वतःच्या शिवरात्रीचा आणखी एक प्रकार वर्णिला आहे व लेखाच्या शेवटीं सद्गुरूस अनन्यभावें शरण जाऊन त्याचें भजन व स्मरण करण्याचा उपदेश करून अविरळ परंज्योति सत्यज्ञानानंत बालावधूत-अवतारी दत्तप्रभूची करुणा भाकली आहे.

सन १८८३ च्या सुरवातीला पंतांच्या लेखनव्यवसायाला सुरवात झाल्यापासून मार्च १८८६ पर्यंत त्यांनीं सुमारें ११५ स्फुट लेख, व " श्रीबालमुकुंदबोधानंदगुटिका अथवा कल्याणचारित्र "; " बाळबोधामृतसार " म्हणजे श्रीबालमुकुंदांच्या " मूक नाग बेकु" या पदावरील टीका; " दत्तगत बालबोध अथवा प्रेमतरंग "; "आत्मज्योति" व ' परमानुभव प्रकाश" हे निबंध आणि "अनुवभवल्ली भाग १ व २" व "ब्रह्मोपदेश" हे लेख लिहिले. ते मुख्यत्वेंकरून सद्गुरूची स्तुति करणें, आपल्या आध्यात्मिक जीवनक्रमांत येणाऱ्या अडचणी व होणारे त्रिविधताप यांचें सद्गुरूला निवेदन करून त्याची करुणा भाकणें, आपल्या निरनिराळ्या प्रकारच्या अनुभवांचीं टाचणें करणें व आपले गुरुबंधु व शिष्य यांना सन्मार्गाला लावून तत्वबोध करणें या हेतूंनीं लिहिले. ही तीन वर्षें पंतांना प्रापंचिक दृष्ट्या व पारमार्थिक दृष्ट्या फार अस्वस्थतेचीं गेलीं व तशा स्थितींत आपले इतर व्यवसाय सांभाळून त्यांनीं आपल्या अनुभवोदधीचें जें मंथन केलें त्यायोगें हें वाङ्मयरूपी नवनीत निर्माण झालें. तेव्हां या कालावधीला त्यांनीं " विचारयुग " म्हणजे " ज्ञानयुग " असें जें म्हटलें आहे तें किती सार्थ होतें हें उघड होत आहे.

## भक्तालाप म्हणजेच ज्ञानी भक्ताचे प्रेमोद्गार

१८८५ अखेर प्रापंचिक व पारमार्थिक दृष्ट्या स्थैर्य प्राप्त झाल्यामुळें भजन–पूजनादि सद्‌गुरूच्या सेवेकडे व सद्‌गुरूनें सोपविलेल्या कार्याकडे पंतांचें लक्ष अधिकाधिक वेधूं लागलें. तें कार्य म्हणजे भाविक, जिज्ञासु व मुमुक्षु जे येतील त्यांना अद्वैत-ज्ञानाचा बोध करून व शुद्ध गुरुप्रेमाची देणगी देऊन कृतार्थ करणें व अशा तऱ्हेनें अनादि अवधूतमार्ग पुढें चालविणें हें होतें. प्रपंचांत राहून व प्रपंचांतील आपल्यावरील सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या योग्य रीतीनें सांभाळून हें कार्य यशस्वीपणें पार पाडणें फारच कठीण होतें; पण सद्‌गुरुआज्ञापालन हींच सद्‌गुरूची सेवा व सद्‌गुरुसेवाच स्वधर्म अशी पंतांची दृढ भावना असल्यामुळें व हा स्वधर्म प्राणापलीकडे पाळण्याचा त्यांचा पूर्ण निर्धार असल्यामुळें त्यांना तें अशक्यप्राय होतें असेंहि नाहीं. तरीपण सद्‌-गुरूच्या वियोगाचें दुःख त्यांना मधुन मधुन अत्यंत तीव्रतेनें जाणवत असल्यामुळें व आपल्या पुढील कार्य व तें करीत असतां आपल्यावर येणारी जबाबदारी यांची त्यांच्या-ठिकाणीं पूर्ण जाणीव असल्यामुळें त्यांनीं या सुमारास आपला वाटाड्या, पाता, त्राता, आई, बाप, बंधु, सखा, सोयरा, देव, सद्‌गुरु असे जे बालमुकुंद यांचेपुढें अत्यंत भक्ति-भरानें, काकुळतीनें, सलगीनें व ऐक्यभावानें आपल्या अनन्यगतिकत्वासंबंधीं व शिष्य-प्रबोधनकार्य कसें पार पडेल यासंबंधीं स्वैरवणानें ज्यांत आलाप काढले आहेत असा "भक्तालाप" नावाचा एक विस्तृत लेख लिहिला. (पु. २-१५९ ते २५८) त्याच्या नावावरून हें उघड दिसतें कीं, पंतांनीं आपल्या भक्तभूमिकेवरून सद्‌गुरूला उद्देशून काढलेल्या आलापांचा तो संग्रह आहे. पण विचारयुग अथवा ज्ञानयुग संपून "अनुभव-युग" अथवा "अवधूतयुग" सुरू होण्याच्या संधिकालीं निघालेले ज्ञानी भक्ताचे ते आलाप आहेत. त्यामुळें ते कर्णकर्कश नसून कर्णमधुर व प्रेमरसावगुंठित आहेत हें सांगणें नकोच.

"आलाप" या शब्दावरून प्रथम असें वाटण्याचा संभव आहे कीं पंतांनीं या लेखांत अत्यंत दीन हीन लाचार होऊन सद्‌गुरूपुढें आपलीं गाऱ्हाणीं, आपल्या तक्रारी, आपल्या अडचणी मांडून त्यांचें निरसन अगर निवारण करण्याची प्रार्थना केली असेल व करुणा भाकली असेल; व तें बऱ्याच अंशीं खरेंहि आहे. कारण स्वतः त्यांनींच या लेखाला "अर्ज" अगर "डांगोरा" म्हटलें आहे व त्याच्यांत पुढील उद्गार काढले आहेत, तें असे, "हे पतितपावना, मी जरी पापी आहें तरी तुझे दयेस पात्र आहें. 'अपिचेत्सुदुराचारो' हें प्रमाण आहे. तूं न्यायी प्रभु आहेस; अन्यायाची मागणी मी करीत नाहीं. इतकीच पदर पसरून विनंति करितों कीं, माझा अर्ज लक्षपूर्वक ऐकून घे. यांतलि आधार पाहा. माझ्या अपराधांची पूर्ण चौकशी कर. या दीनाची दाद घे. तुझ्या घुंदीदरबारांत माझी उपेक्षा करूं नकोस. मी पाजी आहें हें तूं जाणतोस. या भक्तालाप--डांगोऱ्यानें माझी अनास्था जाहीर करतों. तुझ्या दीनानाथ–निशाणीस कलंक लागेल. मला

तरी कीर्ति नाहीं, अपकीर्ति नाहीं, तुझे दारींचा कुत्रा आहें. हा उपाशी मरूं लागला आणि गल्लोगल्लीं फिरूं लागला तर त्रिलोकींचे रहिवाशी तुला नावें ठेवतील. " ( पु. २–१९५ ) तसेंच आपण आपल्या हकीगतीचा अर्ज जसा करावा तसा केला नसेल अशी शंका उद्भवून तिचें निरसन पंतांनीं पुढील शब्दांनीं केलें आहेः—" तूं त्रिकालज्ञ, सर्वज्ञ आहेस; तूं सर्व जाणत आहेस; तुझे द्वारीं नाम पुकारीत राहिलों कीं दाद घेशील आणि शांतविशील म्हणून उगी राहिलों. आतां तरी हा भक्तालाप–अर्ज स्वतः पहा. फार वेळ तिष्ठत उभा आहें. माझे मागून आलेल्यांस (उ. गोपाळ भागोजीकोप) दाद मिळाली. कृतकृत्य होऊन गेले." (पु. २-१९६) तेव्हां भक्तालापाच्या रूपानें पंतांनीं सद्गुरूकडे तक्रारअर्ज केला हें उघड होतें. पण ८–१–१८८३ रोजीं त्यांनीं " दीनदासाचा अर्ज " नावाचा जो एक लहानसा लेख लिहिला व ज्याचा उल्लेख १८ व्या प्रकरणांत झाला आहे, त्या अर्जाप्रमाणेंच या भक्ता-लाप-अर्जाची स्थिति झाली. " दीनदासाचा अर्ज " या अर्जांत पंतांनीं आपलीं गाऱ्हाणीं सद्गुरूपुढें मांडण्यास सुरवात केली. पण जसजसे ते लिहीत गेले तसतशा त्यांच्या अंतः–करणांत भक्तिप्रेमाच्या लाटा उसळूं लागून, त्या अर्जाची चौकशी करून जो निकाल सद्-गुरूनें द्यावयाचा तोच निकाल म्हणजे गुरुप्रेमसुखाचा अनुभव त्यांच्या लेखणीच्या द्वारें त्या लेखांतच व्यक्त झाला. तसाच कांहींसा प्रकार " भक्तालाप " अर्जाचा झालेला आहे. कारण जरी पंतांनीं या अर्जांत, " मी अपराधी आहें, दीन आहें, पापी आहें, माझी दाद घे. ", अशा प्रकारचे आलाप मधुन मधुन काढले आहेत, तरी या अर्जांतलि त्यांचे आलाप म्हणजे ऐक्यभावाच्या भक्तीनें सद्गुरुमातेपुढें अत्यंत लडिवाळपणानें व सलगीनें काढ-लेले प्रेमपुष्ट ज्ञानी बाळाचे प्रमोद्गार आहेत !

या अर्जाच्या सुरवातीलाच पंतांनीं सद्गुरु अवधूताला निवडक वाक्सुमनांची अंजुली वाहून व नमस्कार करून, " सद्गुरु समर्था × × ' एकाकी न रमते ' या श्रुतीस अनुसरून वक्ता, वदविता, श्रोता, भक्त, देव, भजन तूंच होऊन तुझी ओवाळणी करून, घे. ही कामना पुरविणार भक्तवत्सल समर्थ आहेस ", अशी प्रार्थना केली आहे व श्रुतींत वर्णिल्याप्रमाणें एकमेवाद्वितीय अशा सद्वस्तूच्या ठिकाणीं प्रेमभोगार्थ एकाचें अनेक व्हावें हें जें स्फुरण उठलें त्याला अनुसरून देव, भक्त व भजन तूंच असून तुझें भजन अगर तुझी स्तुति करणारा मी केवळ नामधारी आहें असें दर्शविलें आहे; आणि त्यायोगें त्रिपुटी-रूपानें सद्गुरुच नटला असून आपल्यासहित सर्व विश्व हा त्याचा चिद्विलास अथवा खेळ आहे हा स्वानुभवसिद्धांत सूचित केला आहे.

याप्रमाणें प्रार्थना केल्यावर पंतांनीं सद्गुरूला " हे भक्तजननी " असें संबोधून " मी तुझा अनाथ बाळ आहें ! × × × या बाळास या रडक्या पोरास रडवूं नको ! पुरे पुरे तुझा खेळ, पण माझा छळ !", असें लडिवाळपणानें विनविलें आहे व "विश्वनाटका" असें संबोधून व सद्गुरु विश्वनाटकसूत्रधार कसा आहे तें दाखवून " माझें स्वातंत्र्य तिळमात्र नाहीं. माझी ओळख मला नाहीं. मग तुझी ओळख कोठून असणार ! तूंच तुझे कृपेनें जें जें करविशील तें तें चाललें आहे समर्था ! ", अशा रीतीनें आपलें अनन्य-

गतिकत्व व्यक्त केलें आहे आणि आपलें पारतंत्र्य कसें आहे तें दाखविण्याकरितां आपल्या अटकळीबाहेरच्या व ज्यांच्यांत आपलें कर्तृत्व कांहींच दिसत नाहीं अशा आपल्या चरित्रांतलि सद्गुरूची निंदा, त्याच्या कृपेचा लाभ, त्यांचें श्रीशैल्ययात्रेला गमन, कल्पांचा सहवास व त्यांचा वियोग, नंतरची बिकट परिस्थिति व तिच्यांतून पार पडून भजनपंथाची झालेली वाढ वगैरे ठळक ठळक गोष्टींचा उल्लेख करून " माझें पारतंत्र्य पाहूनहि 'तूंच कर, तूंच कर' असा हवाला मजवर घालून टुमणें मारीत बसतोस. थोरास नाव कोणी ठेवावें ? खडकावर (बीज) पेरल्याप्रमाणें शंकर (गोपाळ) द्वारें वरचेवर बोधप्रेरणा करतोस मात्र. एवढ्यानें तुझें काम झालें असें नाहीं. दयाळा, शेवटास नेणेंहि तुजकडेसच आहे ", असें सद्गुरूला सांगितलें आहे. नंतर सद्गुरूनें यतिरूपानें व अवधूत-रूपानें अवस्थांतरीं दर्शन देऊन आपल्याला अभयवचन दिल्याचा व आज्ञा केल्याचा उल्लेख करून त्याप्रमाणे वागण्याचा निश्चय असतांहि दुर्लंघ्य मायाओघापुढें आपला टिकाव लागणें शक्य नाहीं असें सांगून " आतां पदर पसरून विनंति करितों कीं समर्था ! भवफेरा चुकविण्याचा हवाला मजवर घालूं नको; अभयकरानें तूंच मुक्त कर ", याप्रमाणें अत्यंत कळकळीनें अवधूतमार्ग पुढे चालविण्याचें कार्य आपणाकडून करवून घेण्याबद्दल सद्गुरूची प्रार्थना केली आहे.

याप्रमाणें आपल्या आर्जाची सुनावणी करून सद्गुरूनें आपल्याकडे सोपविलेलें परचित्तप्रबोधनकार्य पार पाडण्याला व गोपाळ भागोजीकोपमार्फत वेळोवेळां मिळा-लेल्या बोध-प्रेरणा, आज्ञा अगर सूचनांप्रमाणें वागण्याला व सद्गुरूचें यथार्थ गुणवर्णन वगैरे करण्याला आपण पात्र आहोंत काय ? तें आपणांस शक्य आहे काय ? वगैरे शंका आपणच घेऊन पंतांनीं या लेखाच्या द्वारें सद्गुरूपुढें आपल्या पात्रापात्रतेची छाननी कर-ण्यास सुरवात केली व तसें करीत असतां आपण कोण ? सद्गुरु कोण ? तो सगुण कीं निर्गुण ? त्याचा व आपला संबंध काय ? आपण स्वतंत्र कीं परतंत्र ? मन म्हणजे काय अहंपण म्हणजे काय ? मायेचें स्वरूप काय ? जग म्हणजे काय ? जगाचा व आपला संबंध काय ? वगैरे प्रश्नांचें तात्विक दृष्ट्या, श्रुति, युक्ति व अनुभव यांच्या अनुरोधानें, विवेचन केलें आहे आणि " भक्ति म्हणजे अविभक्त स्थिति, असा अभिन्न संबंध-तुझे माझेमध्यें अबाधित आहे", हें अभेदभक्तीचें वर्म सद्गुरूपुढें निरनिराळ्या प्रकारांनीं उघड करून दाखविलें आहे व " माया म्हणजे 'जी कांहीं नाहीं' म्हणजे अत्यंत अभावरूप. माया म्हणजे मीपणा, कल्पना, स्फुरण हीं जीं स्वरूपाला विसरून उठतात तीं होत "; " जल फेन, सागर तरंग, दुध साय, सुवर्ण अलंकार, मृत्तिका घट, पाणी गार, अग्नि ज्वाला, पुरुष छाया, स्थिर वायु चंचल वारा, गगन नीलिमा, अशी तुझी माया म्हणजे तुझी प्रभा होय. सूर्य प्रभा, चंद्र चांदणें, रत्न कीळ, दीप प्रकाश, यांत भिन्न नामें दिसलीं म्हणून पदार्थभिन्नत्व नाहीं. माया निवारणें म्हणजे प्रभा सोडून दीपास पाहण्याची खटपट करणें. "; " तुझीं सच्चिदानंद लक्षणेंच माया. तुझे व्यक्ताव्यक्तरूपच मायाविलास. तूंच जेव्हां व्हावें तेव्हां माया नाहीं. ";

"तुंच विश्वरूपानें विलसतो आहेस "; "ज्ञान, योग, समाधि, आचार, क्रिया, तुझें दर्शन, तुझा बोध, तुझे व्यक्ताव्यक्त अवतार, हा सर्व चिद्विलासच;" "त्रिगुणात्मक तूंच दत्तात्रेय सगुग रूपानें खेळत असलेला दिसतोस "; " सगुण निर्गुण परब्रम्ह तूंच पूज्य; आणि तुझें प्रतिबिंब, तुझे अंशाच तुझे चिद्विलासमात्रें भजक साहजिकच झाले आहेत"; " मी हें स्फुरणदेखील तुझेंच सगुणरूपें अवतरणें आहे "; " मी तूं हीं तुझींच रूपें होत; मी मी म्हणणारास गुळास गोडीप्रमाणें तूं व्यापून आहेस "; " मी म्हणण्यास तूंच कारण "; " तुझा चिद्विलास मीपण "; " अहंकार ( म्हणजे ) उत्तम पुरुषाचे अचिंत्य शक्तिविलासांतील अद्वितीय प्रेमोद्गार आहे "; " हा सगळा मनाचा विस्तार; तें मन तुझे आनंदसागररूपाचें चंचलावतरण होय "; " समुद्राविना लहरींची उत्पत्ति कोठून ? सूर्याचें जीवन जसा प्रकाश, तसा तूंच चराचरात्मक विश्वाचा जीवन आहेस "; वगैरे प्रकारच्या वचनांनीं माया म्हणजे काय तें सांगून अन्वय-बोधाचें रहस्य अथवा आत्मानुभवाचें पूर्णत्व व्यक्त केलें आहे. त्यायोगें न्यायी प्रभूनें आपल्या अर्जाचा जो निकाल द्यावयाचा तो साधक बाधक प्रमाणें दाखवून पंतांनीं आपणच देऊन टाकिला आहे; किंबहुना या भक्तालाप अर्जांत ' मी हीन, दीन, पापी, अपराधी आहें ', असें प्रथम सद्गुरूला सांगून नंतर श्रुतिवचनें, गीतावचनें व तर्कशुद्ध, बिनतोड विचारसरणी यांच्या आधारावर सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सर्वचालक भक्तवत्सल सद्गुरूला त्याच्या स्वरूपाची, सामर्थ्याची, लीलाप्रियतेची व वात्सल्याची आठवण करून देऊन आपल्यावरील हे आरोप कसे निरर्थक आहेत हें जणूं वकिली डावपेचांनीं सिद्ध करून एक प्रकारें पंत सद्गुरूच्या गळीं पडले आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे " भक्तालाप " हा भक्ताचा अर्ज खरा; पण तो ज्ञानी भक्ताचा अर्ज असल्यामुळें त्याच्यांत पंतांच्या अंतःकरणांतील भक्तिप्रेमाचा जिव्हाळा उत्कटतेनें व्यक्त झाला असून, निर्गुण, निराकार परब्रह्म व सगुण, साकार सद्गुरु यांच्यांत भेद नाहीं; सद्गुरु म्हणजे परब्रह्माचें मूर्त स्वरूप; त्यानेंच आपणांस अंतर्बाह्य व्यापिलें आहे, आपल्या आंतर व बाह्य सर्व चेष्टा त्याच्याच चिच्छक्तीनें चालल्या आहेत; किंबहुना आपलें शरीर अथवा सर्व विश्व हेंच शिवस्वरूप सद्गुरूचें देवालय असून त्यांत शिवपूजा अखंड चालली आहे वगैरे प्रकारचा अद्वैत स्थितीचा अनुभव जागजागीं व्यक्त झाला आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं आपल्या अंतःकरणांत उठणाऱ्या भिन्न भिन्न वृत्तींच्या अनुरोधानें कारुण्यमूर्ति सद्गुरूची दीन स्वरानें करुणा भाकिली आहे, महाराजाधिराज सद्गुरूनें आपणाकडून सर्व प्रकारची सेवा करवून घेण्याबद्दल त्याच्याशीं याचना केली आहे, व ' मीच तूं, तूंच मी ' अथवा ' सर्वच मी ' अशा प्रकारचे ऐक्यानुभवाचे धन्योद्गारहि काढले आहेत. तरी पण कैवल्यसुखापेक्षां अनन्य होऊन ' तुझा मी ' असें सद्गुरूला म्हणण्यांत व त्याच्या भजनरंगांत रंगून जाण्यांत अथवा त्याची सेवा करण्यांत आपणाला अधिक प्रेम वाटतें असें त्यांनीं म्हटलें आहे.

पंतांच्या भक्तियुक्त अन्तःकरणांतील भिन्न भिन्न वृत्तींच्या रूपानें बाहेर पडणारा

भक्तिप्रेमझऱ्याचा प्रवाह म्हणजेच भक्तालाप अर्ज होय. या अर्जाच्या द्वारें त्यांनीं जणूं आपलें अंतःकरणच सद्‌गुरूपुढें ओतलें आहे. त्यांनीं स्वतःच या लेखांत "भक्तालाप" म्हणजे सद्‌गुरुकामधेनूच्या चार वाचारूपी चार स्तनांतून वाहणाऱ्या अद्वैत प्रबोध-रूपी अत्युत्तम दुग्धाचें, तिच्याच कृपेनें, आपण आकंठ प्राशन केल्यानें, पूर्ण तृप्ति होऊन वेदपाळद्वारें दर्शविलेल्या वचनासरशा निजामृताचे जे तरंग आपल्या मुखावाटें बाहेर पडले व सर्वांगांतून जे प्रेमाचे ओघ चालले ते एकत्र जमून झालेलें "विज्ञानसरोवरच" होय, असें सांगितलें आहे व आपण सद्‌गुरूच्या हातांतील पावा असून तोच प्रेमसुखार्थ त्या पाव्यांतून भक्तालापरूपी गाणें गात आहे असेंहि म्हटलें आहे. तसेंच "भक्तालाप" कसा निर्माण झाला व त्याचें खरें स्वरूप काय यासंबंधीं पंत म्हणतात; "चंद्रप्रकाशानें चंद्रकांतमणि जसा स्रवूं लागतो, सूर्यप्रकाशानें सूर्यकांतमणि जसा प्रकाश वमूं लागतो किंवा लोहचुंबकसान्निध्यानें आयुगोल जसा चलन पावतो त्याप्रमाणें तुझे सर्वव्यापक चैतन्य-स्वरूमात्रे दत्तांतःकरण चलन पावून भक्तालापरूपें शब्दसमूहांत आलें. यांत तूं अक्रिय, मी तरी जड, परतंत्र. अशांत तुझे अगाध लीलेनें तुझी चिच्छक्ति शारदा इनें भक्तालाप-नामें अवतार घेतला आहे. पहा चमत्कार! अक्षर तरी जड. त्यांतील गुळास गोडीप्रमाणें व्यापक अर्थ तरी निराकार निःशब्द. त्यांचे योगानें भक्तहृदय प्रेमानें चलन पावून भजनाच्या लहरी उठतात. यास काय उपमा द्यावी? तूं निरंजन प्रणव ॐकार. तुझी श्रीच हा भक्तालाप. यांत लिहिता, वाचता, आनंद पावता तुझा तूंच समर्था! जय बालावधूत; जय नरसिंहस्वामी यतिराज!"

याप्रमाणें "प्रत्यक्ष शारदेनेंच भक्तालापरूपानें अवतार घेतला" व "निरंजन प्रणव ॐकाररूप सद्‌गुरूची श्रीच भक्तालाप" असें जरी पंतांनीं म्हटलें आहे, व त्यांतील आलापांच्या द्वारें अभेदबोधाचा डंका वाजविला आहे, तरी पण आपण अज्ञ बालक असून सद्‌गुरुमातेपुढें गाऱ्हाणें करीत आहोंत अशा भावनेनें त्यांनीं हा लेख लिहिला असल्या-मुळें त्याच्या सुरवातीपासून अखेरपर्यंत वात्सल्यरस ओतप्रोत भरलेला आहे व त्याच्यां-तील विषय जरी कित्येक ठिकाणीं गहन व गंभीर स्वरूपाचा आहे, तरी तो वाचीत असतां एखादें लाडकें मूल आपल्या आईच्या मांडीवर निजून तिचें स्तन चोखीत असतांना मधुन मधुन तिच्या मुखाकडे अवलोकन करून हासत असतें तर मधुन मधुन आपल्या हातां-पायांनीं तिला ढोशीत असतें व मधुन मधुन लडिवाळपणानें तिच्याशीं कुरकुर करीत "मला हें आणशीलना? तें देशील ना", म्हणून आपल्या बोबड्या शब्दांनीं तिला आज्ञावजा विनंति करीत असतें व ती माता प्रेमपान्हा अनावर होऊन आपल्या जीवींच्या जीवनाकडे प्रेमभरानें पहात व त्याला कुरवाळीत असते व आपलें सर्वस्व अर्पण करूनहि आपल्या जिवलगाचें ढोसणें, रागावणें, रुसणें वगैरे चाळे मोठ्या प्रीतीनें व कौतुकानें साहून त्याचे सर्व प्रकारचे कोड पुरविण्यास तत्पर असते अशा प्रकारचा गोड देखावा नजरेस पडतो. फरक इतकाच कीं या लेखांत पंतांची स्वतःची भूमिका बालकाची आहे व सद्‌गुरुमाता अदृश्य आहे. पण तिचें वात्सल्य मात्र स्फूर्तिरूपानें पंतांच्या लेखणीच्या द्वारें प्रगट झालें

आहे; म्हणजे विश्वव्यापक सद्गुरुजननीच्या विश्वअंकावर प्रेमदुग्धपान करीत असलेलें आपण बालक असून आपणास पडतांना सांवरणाऱ्या व आपले कोड पुरवून प्रेम-पान करविणाऱ्या समर्थ जगज्जननीपुढें आपलें गाऱ्हाणें आपण सांगत आहोंत अशा भावनेनें पंतांनीं हा लेख लिहिला आहे व सद्गुरु व आपण यांचेमधील हा मातृ-बालक-संबंध कायम ठेवूनच त्यांनीं या लेखांत अभेद-भक्तिरहस्य प्रगट केलें आहे. त्यामुळें त्याच्यांत वात्सल्य व शांत या रसांचा गोड मिलाफ झालेला आढळतो.

पंतांनीं सद्गुरूंकडे हा जो अत्यंत कळकळीचा अर्ज केला, मुक्तकंठानें डांगोरा पिटला अथवा टाहो फोडला तो मंजूर होऊन सद्गुरुकृपेनें आपल्या ठिकाणीं जी अद्वैत स्थिति, अभेद भक्ति अथवा सहज स्थिति बाणली तिचें त्यांनीं सद्गुरूला पुढीलप्रमाणें निवेदन केलें आहे, "सद्गुरु बालमुकुंद, बालावधूत, श्रीगुरुदेवदत्त अशी गर्जना करितांना संसाराचें दहन होऊन निःशंक, निर्भीत, निर्बाध झालों. तुझे चरणकृपें भवफेरा चुकला, आतां कांहीं होणें जाणें उरलें नाहीं. सद्गुरुनाथकी जय! तुझे चरण मजला सांपडतांच द्वैतभीति, कालशंका, पुनर्भवाची चिंता या देशोधडीस गेल्या; तुझे पायीं पूर्ण विश्वास बसला. तुझा अभिन्न दास होऊन उरलों. सर्व कांहीं इच्छा पूर्ण झाली. 'चरणरजोहं' हा सिद्धांत अचल झाला. तुझे भजनीं अनुपम गोडी लागली. सर्वांगांतून प्रेमाचा पूर आपोआप लोटूं लागला. अगदीं पिसेपणा आंगींचे आंगीं झगटून "अवधूत, अवधूत, अवधूत" असें अखंड बडबडणें चाललें. सर्व कांहीं कुंठित होतें. पुढें काय सांगूं दत्ता! सर्व शक्तिधरा, तूं अपार बळिवंत माझा पाठीराखा असल्यामुळें हा विषम संसार भोगतांना कोणत्याच प्रकारची चिंता, भीति किंवा शंका मनीं येत नाहीं. तुझें कृपाकवच माझे आंगीं अभंग असल्यानें पाप पुण्य, बंध मोक्ष, विधि निषेध, इत्यादि द्वंद्वें मला कोणत्याहि काळीं बाधूं शकत नाहींत. ××× दत्ता, दत्ता, दत्ता, प्रेमळा, दयाळा, आतां काय बोलून दाखवूं? कोणाला हाका मारूं? स्फूर्ति उठण्याबरोबर त्यांत तूंच उभा आहेस! शब्द उत्पन्न होण्यापूर्वीं तूंच अर्थ होऊन विराजतोस; निःशब्दाचा गाभा, निर्विकल्प समाधि, साखरेची गोडी, ब्रह्मानंदाचा आनंद असा तूं प्रभु मला गिळून माझे मीपणास चरणरजीं नाहींसें करून देवभक्त आंगें स्फुरवून आतां, बालावधूता, नाचतो आहेस. सर्व कांहीं जाणतोस. हल्लींची स्थिति तुजपुढें व्यक्त आहे. पाहिजे तसें यास ठेव, पाहिजे तें करीव. मन पांगळें झालें, बुद्धि खुंटली, विचार दमला, इंद्रियें प्रेमकल्लोळीं बुचकळ्या खाऊं लागलीं. कांहीं उपाय सुचेना. सर्वांगास प्रेम-भरें कंप सुटला. आतां काय धरूं? काय म्हणूं? काय टाकूं? आरंभिलें काय? करितों काय? झालें काय? कशानें झालें? कांहींच उमगेना! दत्त प्रभो कायरे हें गारूड! कायरे तुझें प्रेमळ अंतःकरण! माते, पुरे हा आलाप. घे पदरीं. मस्तक तुझे चरणतळीं ठेव. तुझ्या इच्छेस वाटेल तें कर. सर्वस्वाची शपथ वाहून प्रतिज्ञा करतों कीं तुझे चरणीं पडलों तेव्हांच मीपणा, माझेपणा तुझा झाला. अनाथ बाळ तुजपुढें पोट वर करून प्रेमभुकेनें तळमळत पडलों आहें. कितीहि प्रेमस्तन पाजिलेस तरी पुरें होईना! कृपाळु जननी

या बाळास प्रेमावीण अन्य कांहीं नको. आई, आई, आई, पडलों तुझे पायीं ! गुरुराज अवधूत ! ” वरील उताऱ्यांत पतांच्या त्या वेळच्या म्हणजे सन १८८५ अखेरच्या अनुभव–स्थितीचें अथवा भूमिकेचें उत्कृष्ट शब्दचित्र पाहण्यास मिळतें.

वास्तविक मागें लिहिल्याप्रमाणें पंतांनीं या लेखांतच आपल्या मागील चरित्राचें सिंहावलोकन करून त्याच्यांतील आपल्या आध्यात्मिक अनुभवांच्या क्षेत्रापैकीं ठळक ठळक गोष्टींचा उल्लेख केला आहे. तरी पण भक्तवत्सल सद्‌गुरु समर्थांच्या कृपाकटाक्षानें व अद्‌भुत समर्थ्यानें आपणांस दिव्य दृष्टि, आत्मतुष्टि व प्रेमपुष्टि यांचा जो अत्यंत दुर्लभ असा लाभ झाला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां त्यांनीं या लेखाच्या शेवटी “ उपसंहार ” अथवा “ उपकारस्मृति ” नावाचें प्रकरण जोडलें आहे व त्यांत आपल्या मागील अनुभवांचा पुनः उल्लेख करून सद्‌गुरूच्या अनंत उपकारांचें स्मरण केलें आहे. त्यांतल्यात्यांत आपण सद्‌गुरूकडे कृपेची याचना करण्याकरितां गेलेले नसतांना त्यानें आपण होऊन शापउःशापमिषानें आपणास आपल्याकडे ओढून घेऊन, अहर्निश झटून आपलें गुह्याद्‌गुह्यतम रहस्य, आपलें सर्वस्व, आपल्या ठिकाणची परचित्तप्रबोधनशक्ति किंवहुना आपलें पूर्णत्व आपणास दिलें व आपणास स्वानंदसाम्राज्याधिपति केलें या त्याच्या निर्हेतुक प्रेमाच्या दिव्य देणगीबद्दल पंतांना विशेषच कृतज्ञता वाटे; ती व्यक्त करितांना, “ मी ‘ आई ’ न म्हणतां मातृस्नेह प्रगट करून ‘ गुरुमाय ’ म्हणवून घेतलेंस. माझ्या ठिकाणीं भक्ति बिंबण्यास मजशीं सलगीनें जिवलग सखा होऊन मान सांडून खेळलास, ” असे त्यांनीं प्रेमाचे उद्‌गार काढले आहेत.

भक्तालापांत व पंतांच्या इतर लेखांत व्यक्त होणारी त्यांची सद्‌गुरुभक्ति व सलगीचा प्रेमा हीं खरोखर अपूर्व होत ! तसेंच त्यांनीं बालमुकुंदांच्या दयाळुत्वाचें, शुद्ध व निरपेक्ष प्रेमाचें व सलगीचें जागजागीं जें वर्णन केलें आहे त्यावरून बालमुकुंदांचें आपल्या शिष्यांशीं वर्तन कशा प्रकारचें होतें याची थोडीशी अटकळ होते. पण आपल्या एका शिष्यावरील अनुपम व निरतिशय प्रेमामुळें त्यांनीं किती हालअपेष्टा सोसल्या यासंबंधीं पंतांनीं एका प्रसिद्ध न झालेल्या आपल्या लेखांत जें वर्णन केलें आहे त्यावरून त्यांच्या निर्हेतुक प्रेमाची व पुत्रवात्सल्याची साक्ष पटून पंतांनीं या लेखांत त्यांना जीं विशेषणें लाविलीं आहेत व त्यांच्या शिष्यप्रेमाचें जें शब्दचित्र काढलें आहे त्याला पुष्टि येत असल्यामुळें तें येथें देत आहोंत. हा लेख १५–११–१८८४ रोजीं लिहिलेला असून त्यांत प्रथम सद्‌गुरूला निवडक शब्दकुसुमांची अंजुली अर्पण करून पंत म्हणतात, “ हीं विशषणें माझ्या अनुभवावरून उच्चारिलेलीं आहेत. इत्याद्यनेक विशेषणांनीं युक्त, सर्वांत श्रेष्ठ, सर्वपूज्य, सर्वांस मान्य असतांहि मागें तूं सर्व पुत्रांना सांडून त्यांजकडे दुर्लक्ष करून, म्लेंच्छदेशीं एका भक्ताबरोबर जाऊन, त्याचा अभिमान धरून, त्याची सेवा केलीस, त्याचे मनोदयानुरूप वागलास, त्याजकडून शिव्या घेतल्यास, तुडवून घेतलेंस, मारहि खाल्लास, त्याचे घरीं दासाचा दास झालास, कोरडे तुकडे खाऊन त्याच्या हितार्थ झटलास, त्यानें तुझी निर्भर्त्सना केली, तुझा वीट मानिला, तुझी निंदा केली, तुझा छळ केला, तुझा मानभंग

केला, तो तुझ्या आज्ञेविरुद्ध वागला; तरी हे क्षमासागरा, त्यास परमुक्तिसदनास पाठविण्यास कायावाचामनेंकरून झटलास हें कसें विसरूं ? " या उताऱ्यावरून कारुण्यमूर्ति सद्गुरु वालावधूतांच्या 'उपकारांची स्मृति' म्हणून पंतांनीं जें उपसंहारात्मक प्रकरण भक्तालाप लेखाच्या शेवटीं जोडलें आहे त्याचें रहस्य वाचकांना समजून येईल.

येथपर्यंत 'श्रीदत्तप्रेमलहरी पुष्पमाले'च्या पुष्प दोनमध्यें प्रसिद्ध झालेल्या 'भक्तालाप' लेखासंबंधीं विवेचन केलें आहे. पण या लेखाच्या एका हस्तलिखित प्रतीचा जो भाग पंतांच्या दप्तरांत सापडला आहे तो प्रसिद्ध झालेल्या भक्तालापाच्या कोणत्याहि आवृत्तींत छापलेला नाहीं. त्या भागांत या लेखाची योग्यता, तो कोणत्या भूमिकेवरून वाचावा व त्याच्या वाचनाची फलश्रुति काय या संबंधीं वर्णन केलेलें असून तो समाप्त झाल्याची तारीखहि दिली आहे. तो मजकूर असा, " महाराजा, हें स्तोत्र नव्हे. तर भक्तालाप—सुवर्णवाटींत प्रेमरस भरला आहे. त्याचे सेवनेंकरून सुख आणि अनुभव यांचे ऐक्यतेची पुष्टि चढेल यांत शंका नको. कारण ही त्याचीच ( सद्गुरूचीच ) वरदवाणी आहे. हे विश्वरूप-अवयव सज्जन हो, ही भक्तालापमात्रा अव्यभिचारिणी भक्तिमुखानें घेऊन श्रीबालमुकुंदाचें अद्वैत भजन नामक पथ्य करा. म्हणजे तुमचा जन्म-मरणरूपी भ्रांतिसंनिपात जाऊन अखंड शांतीचें आरोग्य प्राप्त होऊन जीवन्मुक्ति विदेहकैवल्यभोगांत अद्वैतानंदाची तृप्ति सहज चालून येईल. ही मात्रा घेण्याचें अनुपान समर्थाचे अंकित होऊन जाणा. स्वानुभवसिद्ध अमृतगुटिका आहे. श्रीगुरुदेव दत्त. ता. १३ मार्च १८८६ इ. समाप्त. "

वरील उताऱ्यांत पंतांनीं इषारा दिल्याप्रमाणें अव्यभिचारिणी भक्तीच्या अथवा अनन्य भक्तीच्या भूमिकेवरून हा लेख वाचल्याशिवाय त्यांतलि रहस्य बरोबर रीतीनें समजणार नाहीं हें सांगणें नकोच. भक्ताच्या आलापांचें मर्म समजण्याला स्वतः भक्तच बनावयास नको काय ? भक्ताचे आलाप म्हणजे त्याच्या उत्कट भावनांचा सहज स्फोटच होय. अशा अलापांचा संग्रह जो "भक्तालाप" तो कोणत्याहि पायरीवरील अगर भूमिकेवरील भक्ताला प्रिय होणारा असून तो वाचींत असतांना त्यामध्यें आपल्याच अंतःकरणांतील भक्तिभावनांचें शब्दचित्र पंतांनीं रेखिलें आहे असा त्याला अनुभव येईल अशी खात्री वाटते.

या लेखांतील मजकुरावरून असें दिसतें कीं तो एकाच वेळीं लिहिलेला नसून त्याच्यांतील निरनिराळे भाग निरनिराळ्या वेळीं लिहिलेले असावेत. त्यामुळें एकाच स्वरूपाचे आलाप व त्याच त्याच भावना हीं या लेखांत निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या शब्दांत व्यक्त झालीं आहेत. पण या लेखाच्या एका हस्तलिखित प्रतीच्या शेवटीं ता. १३ मार्च सन १८८६ रोजीं तो समाप्त झाल्याचा जो उल्लेख आहे त्यावरून तो १८८६ च्या मार्च महिन्यांत पुरा झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१८७७ अखेर श्रीबालमुकुंदांचा वियोग झाल्यापासून आपल्या आत्मानुभवाचें दृढीकरण करण्याचें पंतांचें जें कार्य सुरू झालें होतें तें १८८५ अखेर पुरें झालें व त्यांच्या आत्मानुभवाला स्थैर्य येऊन "अनुभवयुग" सुरू झाल्याचा त्यांनीं एका पत्रांत जो उल्लेख

कला आहे त्याची सत्यता भक्तालापाच्या वाचनानें पटते. वास्तविक १८८२ अखेरपासून १८८५ अखेरपर्यंत भजनरंगांत सहजस्फूर्तीनें पतांचीं जीं पदें झालीं व सन १८८३ च्या सुरवातीपासून त्यांनीं जे लेख व निबंध लिहिले त्यांच्यांत व्यक्त झालेला सिद्धांतबोधच भक्तालापांत व्यक्त झाला आहे. पण जसजसा त्यांच्या अपरोक्षानुभूतीचा परिपाक होत गेला तसतसा जगाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलत गेलेला दिसतो; म्हणजे जग हें मिथ्या आहे, तें मायाकार्य आहे व त्याच्याहून निराळें नित्य, शुद्ध, बुद्ध व मुक्त असें ब्रह्म मात्र सत्य आहे ही जी प्रथमावस्थेंतील व्यतिरेक-ज्ञानाची दृष्टि ती अन्वयबोधाच्या व स्वरूपानुभवाच्या दृढीकरणानें बदलत जाऊन जग म्हणजे सत्स्फूर्तिविलास असून पर-ब्रह्म वस्तुच एकत्वाला बाध न येतां जगरूपानें नटली आहे; द्वैत कधीं उद्भवलेंच नाहीं, त्याचा अत्यंताभाव असून द्वैताभास म्हणजेच चिद्विलास होय, ही पूर्णानुभवाची दृष्टि त्यांच्या ठिकाणीं स्थिरावत जाऊन तो अनुभव भक्तालापाच्या रूपानें व्यक्त झाला. तसेंच ज्या सफाईनें व लीलेनें त्यांनीं स्वानुभवसिद्धांत भक्तालापांत ग्रथित केले आहेत त्यावरून हा लेख लिहिला तेव्हां ते सिद्धांत पूर्णपणें त्यांच्या अंगभूत होऊन त्यांच्या ठिकाणीं अव-धूतस्थिति अथवा सिद्धावस्था बाणल्याचें स्पष्ट दिसतें व त्या भूमिकेच्या अढळपदावर आरूढ होऊन त्यांनीं पुढील कार्याला सुरवात केली.

पंतांच्या ज्या सनावळीचा मागें वारंवार उल्लेख केला आहे ती १८८५ अखेर संपली व त्यापुढें सनावळी लिहिण्याचें व बुद्धिपुरःसर अनुभवांचें टिपण करण्याचें बंद झालें. त्यावरून असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं पंतांच्या अंतःकरणांतील भक्तिगंगा सद्गुरुप्रेमसागराशीं समरस होईपर्यंत तिला जो मार्ग आक्रमण करावा लागला त्यावरील टप्प्यांची त्यांनीं नोंद करून ठेविली. पण गंगासागर-संगम झाल्यावर वृत्ति ध्येयाकार होऊन ध्येयांत व आपल्यांत अंतरच नसल्याची त्यांना साक्ष पटल्यापासून " मार्ग " खुंटला व अनुभवाच्या टप्प्यांची नोंद करणें, वगैरेंची आवश्यकता वाटेनाशी झाली आणि या गोष्टीची सत्यता भक्तालापाच्या वाचनानें सहज पटते.

## प्रकरण २४ वें

———:०:———

### लेखनव्यवसायांत शिथिलता; पितृवियोग; प्रतिहनुमान पुटप्पा कणबर्गी; कणबर्गीच्या डोंगरावरील खेळ; रामाबुवा ऊर्फ रामानंद, बापूभट राजापूरकर व विनायकराव ताम्हनकर ऊर्फ साई यांना भगवें घालण्याची परवानगी.

१८८६ च्या मार्च महिन्यांत पंतांचा "भक्तालाप" लेख लिहून झाल्यानंतर त्यांचा लेखनव्यवसाय जवळ जवळ बंदच पडला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं १८८७ सालीं "व्यवहारदक्षता", "जुने डोळे नवीन चमत्कार"; "अव्यभिचारिणी भक्तीनें सद्‌गुरूची करुणा भाकणें हेंच कर्तव्य" व "करणी" अगर "बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें" हे चार लहान लहान लेख लिहिले. ( पु. ६–२६० ते २६७ ) व ते सर्व उपदेशपर आहेत. १८८८ सालीं त्यांनीं "दत्त जाणून दत्त स्मरा" व "यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसासह" हे दोन लेख लिहिले ( पु. ६–२६७ ते २७९ ) व ते उपदेशपर व अनुभवपर आहेत. म्हणजे मार्च १८८६ नंतर सुमारें अडीच वर्षांत पंतांनीं फक्त सहा लहान लहान लेख लिहिले. त्यानंतरच्या १० वर्षांत म्हणजे सन १८९८ पर्यंत त्यांनीं एकहि स्फूट लेख लिहिला नाहीं. जानेवारी १८८३ पासून मार्च १८८६ पर्यंतच्या सुमारें सव्वातीन वर्षांत पंतांनीं आठ मोठाले निबंध अथवा लेख व सुमारें ११५ स्फुट लेख लिहिले ही गोष्ट लक्षांत घेतां त्या कालावधींत त्यांचें अध्यात्मविषयावरील लेखन किती झपाट्यानें चाललें होतें याची सहज कल्पना होते व त्यांचा लेखनव्यवसाय जर तसाच पुढें चालू राहता तर त्यांचेकडून फार प्रचंड वाङ्मय निर्माण झालें असतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण तसा योगायोग नसल्यामुळें मार्च १८८६ नंतर त्यांच्या लेखणींतून फारच थोडें वाङ्मय निर्माण झालें. याचें मुख्य कारण असें दिसतें कीं मार्च १८८६ पर्यंतचें त्यांचें बहुतेक वाङ्मय त्यांचे गुरुबंधु व शिष्य यांना उपदेश करण्याच्या हेतूनें अगर फुरसुदीच्या वेळीं स्वतःच्या आध्यात्मिक अनुभवांचीं टाचणें करण्याच्या निमित्तानें निर्माण झालें. पण त्यानंतर त्यांच्या भक्तांची व शिष्यांची संख्या वाढत गेली व त्यांना बोध करण्यांत व त्यांचेसह भजन, टिपरी खेळणें, जंगलांत अगर डोंगरावर जाणें वगैरे गोष्टी करण्यांत त्यांचा फुरसुदीचा वेळ अधिकाधिक जाऊं लागला. तसेंच अध्यात्मविषयासंबंधीं चर्चा करण्यास व शंका विचारण्यास कांहीं मंडळी त्यांचेकडे येऊं लागली व त्यांचेशीं चर्चा करण्यांत अगर त्यांच्या शंकांचें निरसन करून त्यांचें समाधान करण्यांतहि पंतांचा कांहीं वेळ जाऊं लागला. अशा लोकांत पंतांचे शिष्य नसलेलेहि पुष्कळ लोक येत व त्यांत शास्त्री व इंग्रजी शिक्षण घेतलेलेहि असत. दिवसेंदिवस अशा लोकांचीहि संख्या वाढत चालली. त्याचप्रमाणें पंतांकडे शिक्षणाकरितां येऊन राहिलेल्या मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली व त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यांतहि

पंतांचा कांहीं वेळ जाऊं लागला. अशा परिस्थितींत लेखनाला जरूर असणारी फुरसूद व मोकळेपणा हीं त्यांना मिळेनाशीं झालीं. त्यामुळें त्यांचें लेखनाकडे दुर्लक्ष होऊं लागलें व भक्तांना उपदेश करणें तो सहज बोलण्याच्या रूपानें होऊं लागला. तसेंच स्वानुभवाचीं टाचणें करण्याचें पंतांचें जें कार्य त्यांच्या आध्यात्मिक अनुभवांना पक्केपणा येईपर्यंत चाललें होतें तें त्यांच्या ठिकाणचा अद्वैतानुभव स्थिरावून त्यांनीं भक्तालाप लेख लिहिल्यानंतर बंद पडलें हें मागें सांगितलेंच आहे. त्यानंतरहि त्यांच्या अंतःकरणांत उठणाऱ्या प्रेमलहरी व बोधलहरी पूर्वीप्रमाणेंच भजनाच्या वेळीं होणाऱ्या पदांच्या रूपानें व भक्तांना लिहिलेल्या पत्रांच्या द्वारें व्यक्त होत होत्या. पण इतर वेळीं त्यांच्या ठिकाणचा बोध सहज बोलण्यांत व्यक्त होऊं लागला व तो कागदावर टिपला जाण्याऐवजीं ऐकणाऱ्यांच्या हृत्पटलावर कोरला जाऊं लागला. अशा तऱ्हेनें व्यक्त झालेला बोध आज उपलब्ध नाहीं हें खरें. पण १८९९ ते १९०१ या तीन सालांत संभाषणप्रसंगीं पंतांच्या वाणींतून जो बोधवर्षाव झाला त्यापैकीं बराच भाग त्यांच्या एका प्रिय शिष्यानें टिपून ठेविल्यामुळें तो आज उपलब्ध असून तो श्रीदत्तप्रेमलहरी पु. ७ व ८ यांच्या रूपानें प्रसिद्ध झाला आहे व त्याच्यासंबंधीं पुढें प्रकरण ४७ मध्यें विस्तृत विवेचन केलें आहे. येथें सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं जरी १८८६ च्या मार्चपासून पंतांचें लेखन जवळ जवळ बंदच पडलें, तरी त्यांच्या ठिकाणची बोधस्फूर्ति अधिकाधिक जोरावत गेली व सहजोद्गारांच्या द्वारें बोध व्यक्त होऊं लागला.

## पितृवियोग

मार्च १८८६ पासून पंतांच्या लेखनव्यवसायांत शिथिलता येण्याचें आणखी एक कारण असें झालें कीं १८८६ च्या मे महिन्याच्या सुटींत ते दड्डीस गेले असतां ता. २२-५-१८८६ रोजीं त्यांचे वडील रामचंद्रपंत ऊर्फ आण्णया हे बेळगाव येथें महादेव गल्लींतील त्यांच्या बिऱ्हाडीं अकस्मात कालाधीन झाले. ही दुःखदायक वार्ता पंतांना दड्डीस समजल्याबरोबर ते बेळगावास आले. ते सुटीनिमित्त दड्डीस गेले असतां वडिलांचें अकल्पित निधन झाल्यामुळें त्यांना अतिशय दुःख झालें. त्या वेळीं पंतांचे आजे बाळकृष्णपंत यांचा वृद्धापकाळ झाला होता व बाळेकुंद्री येथील घरचा सर्व कारभार आण्णया पहात असत. त्यामुळें ते हयात असेपर्यंत पंतांना बाळेकुंद्रीकडील प्रापंचिक गोष्टींकडे फारसें पाहावें लागत नसे. पण त्यांच्या पश्चात तो सर्व बोजा पंतांवर पडला. वडिलांच्या निधनानें पंतांना जनराहाटीप्रमाणें अपरिमित दुःख झालें खरें; पण आपलीं सुखदुःखें निवेदन करण्याचें त्यांचें विश्रांतिस्थान म्हणजे सद्गुरु बालमुकुंदांखेरीज अन्य कोण असणार? त्यामुळें दड्डीहून परत आल्यावर वडिलांच्या निधनानें झालेल्या दुःखावेगांत ता. २९-५-८६ रोजीं ते भजनाला बसले असतां, " दत्ता न्याय हा । तुझा न्याय हा ॥ धृ० ॥ पतितपावनब्रीद त्रिभुवनीं गाजे । पडत्या नुठविसी । न्याय हा ॥ १ ॥ त्रिविध तापें बहु । तापलों मी देवा । संकटीं न पावसी । न्याय हा ॥ २ ॥ भक्ताभिमानी भक्तवत्सल यती । दत्ता न रक्षिसी । न्याय हा ॥ ३ ॥ " (द. प्र. ल. ४९) हें पद म्हणून त्यांनीं सलगीच्या

निष्ठुरतेनें सद्गुरूच्या पतितपावनब्रीदावर प्रहार करून संकटसमयीं आपल्याकडे दुर्लक्ष केल्याचाहि आरोप केला. अशा रीतीनें पंतांना पितृवियोगानें झालेल्या दुःखाचें पर्यवसान भक्तिप्रेमांत होऊन द. प्रे. ल. पद ४९ निर्माण झालें व दिवसेंदिवस त्यांना होणाऱ्या सुखदुःखांची बोळवण भगवद्भजनांत होऊन नवीन नवीन पदें होऊं लागलीं.

पादुका स्थापन करून उत्सव सुरू केल्यापासून भजन, खेळ, जंगलांत जाणें वगैरे गोष्टींकडे पंतांचें विशेष लक्ष वेधलें. जरी त्यांच्या घरांत रोज सकाळ संध्याकाळ भजन होत असे व आठवड्यांतून तीन दिवस गावांतील भक्तमंडळीहि भजनाला तेथें येत, तरी पंत व त्यांचे गुरुबंधु व शिष्य यांचें टिपरी वगैरे खेळ खेळण्याचें मुख्य ठिकाण मारुती गल्लींतील रावजी विठ्ठल कुळकर्णी यांचे घरीं होतें. रावजी कुळकर्णी हे बाबा कुडचींचे शिष्य असून रावजी दड्डीकर, दादा सावनूर वगैरे आपल्या गुरुबंधूंप्रमाणें तेहि पंतांना गुरुस्थानीं मानून त्यांच्या शिष्यमंडळींपैकींच आपणा स्वतःस मानीत असत. मारुती गल्लात त्यांचें स्वतःचें घर असून ते व त्यांचें कुटुंब यांच्याखेरीज घरांत फारशीं माणसेंहि नव्हतीं. त्यामुळें त्यांच्या घरीं टिपरी वगैरे खेळ खेळण्याकरितां बरीच भक्तमंडळी जमत असे. तसेंच मारुती गल्लींत रावजी कुळकर्णी यांच्या घराशेजारीं पंतांचे एक शिष्य कै. मंगेशराव गुंजीकर यांचें घर होतें व तेथें या मंडळीचें कधीं कधीं भजन होत असे. रावजी कुळकर्णी यांच्या घरीं भजनपूजनाला व टिपरी वगैरे खेळ खेळण्याला जागा विपुल असल्यामुळें पंत, त्यांचे गुरुबंधु व शिष्य यांनीं घराच्या मध्यभागीं असलेल्या वठाणांत एक लहानसें मखर करून व त्यामध्यें श्रीदत्तात्रेयाची एक तसबीर ठेवून पूजेकरितां श्रीदत्ताची एक मूर्ति ठेविली होती. त्या मूर्तीपुढें भजन-पूजन, टिपरी खेळणें वगैरे कार्यक्रम होत असत व दर शनिवारीं रात्रीं सर्व मंडळी तेथें नियमानें जमत असत. १८८५ अखेर पादुकास्थापना झाल्यापासून या गुरुभक्तमंडळीमध्यें सगुण भक्तीला विशेष जोर आला व भजन-पूजन-टिपरी वगैरे कार्यक्रम विशेष जोमानें व उत्साहानें होऊं लागले. त्यांपैकीं टिपरीचा कार्यक्रम विशेष महत्वाचा होता. पंत स्वतः त्यांत प्रामुख्यानें भाग घेत असत. टिपरी खेळतांना पंत व इतर खेळणारी मंडळी अंगांत कफनी घालून व कधीं कधीं पायांत घुंगुर बांधून खेळत असत. टिपरी खेळतांना पंत पदाचा एकेक चरण सावकाश म्हणत व मागून तोच इतर मंडळी म्हणत. अशा प्रसंगीं भजनरंगांत पंत नवीन नवीन पदेंहि म्हणत व कोणीतरी तीं टिपून ठेवीत असे.

## पुटप्पा कणबर्गी

रावजी कुळकर्णी यांच्या घरीं त्यांचे कांहीं आप्तहि भजनाला येत. त्यांच्यापैकीं रावजींच्या कुटुंबाचा चुलतभाऊ कणबर्गी येथील बसवंत बाळकृष्ण ऊर्फ पुटप्पा कुलकर्णी हा भजन ऐकण्याकरितां कणबर्गीहून बेळगावास येत असे. तेथें त्याला भजनाची गोडी लागून त्याची पंतांवर श्रद्धा बसली व पंतांनीं त्याला दर गुरुवारीं व शनिवारीं भजनास येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो येऊं लागला व त्याचेबरोबर त्याचा स्नेही कपिलेश्वर

मास्तर व भाऊ निंगप्पा हेहि बेळगावास भजनाला येऊं लागले; नंतर त्या तिघांना पंतां-कडून अनुग्रह झाला व तेव्हांपासून ते भजनाला येतांना भजन करणाऱ्या मंडळींना पिण्याकरितां दुध घेऊन येऊं लागले. पुढें पुटप्पाचा पंतांशीं अधिक परिचय होऊन त्याच्या आग्रहामुळें मधुन मधुन ते आपल्या मंडळीसह कणबर्गीस जाऊं लागले.

कणबर्गी गाव बेळगावपासून सुमारें चार मैलांवर बेळगावच्या उत्तर दिशेला आहे. तेथें पुटप्पाचे वडील बाळाजी नारायण कुलकर्णी ऊर्फ बाळण्णा हे राहात असत. त्यांची सांपत्तिक स्थिति फार चांगली असून त्यांचा स्वभावहि थोर व दिलदार होता. त्यांना सिदप्पा, बसवंतराव ऊर्फ पुटप्पा व निंगप्पा असे तिघे मुलगे असून भागिरथीबाई नावाची एक मुलगी होती. सिदप्पांचें लग्न होऊन लगेच ते वारले. पुटप्पा व निंगप्पा हे साधारण जाणते झाल्यावर त्यांचेवर घरचा कारभार सोपवून बाळण्णा आपला काळ स्नानसंध्या कर-ण्यांत व ईशचिंतनांत घालवूं लागले. त्यांचा मुख्य धंदा शेतीचा असून देवघेवीचा व्यव-हारहि बराच होता. पुटप्पा साधा भोळा असून त्याला व्यवहारांतील डावपेच फारसे माहीत नसल्यामुळें तो शेतचिं काम पाहात असे व निंगप्पा इतर व्यवहार करीत असे. पुटप्पा व निंगप्पा या दोघांवर पंतांचा अनुग्रह झाल्यापासून त्यांचेकडून त्यांचे वडील बाळाजीपंत ऊर्फ बाळण्णा यांना पंतांसंबंधींची माहिती मिळून त्यांना पंतांबद्दल पूज्यभाव वाटूं लागला. पंत मधुन मधुन कणबर्गीस जात असल्यामुळें त्यांचा व बाळण्णांचा फार परिचय होऊन बाळण्णांनीं त्यांचेकडून अनुग्रह घेतला. त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांच्या घरांतील सर्व मंडळी पंतांची अनुग्रहीत झाली.

एकदां पुटप्पानें कांहीं अपराध केल्याची कागाळी पंतांकडे आली तेव्हां त्यांनीं चौकशी करून त्यानें तो अपराध केला असल्याची आपली खात्री करून घेतली व त्या अपराधाबद्दल शिक्षा म्हणून त्याला भजनाला येण्याची बंदी केली. त्या दिवशीं रावजी कुळकर्णी यांच्या घराशेजारीं असलेल्या गुंजीकर यांच्या घरीं भजन व्हावयाचें होतें. पुटप्पाला पंतांनीं भजनाला येण्याची बंदी केल्यामुळें त्याला गुंजीकर यांचे घरीं जातां येईना. त्यामुळें अतिशय वाईट वाटून त्यानें रावजी कुळकर्णी यांचे घरीं बसून एकतारी घेऊन " दत्तगुरु ", " दत्तगुरु " असें मोठमोठ्यानें ओरडण्यास सुरवात केली व कांहीं केल्या तो थांबेना. तेव्हां त्याची दांडगी निष्ठा पाहून पंतांनीं त्याला बोलावून घेतलें व चार उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. पुटप्पाच्या निष्कपट व प्रेमळ स्वभावाची पंतांना ओळख पटल्यापासून त्यांना त्याच्यासंबंधीं अधिकच प्रेम वाटूं लागलें. तेव्हांपासून ते वारंवार कणबर्गीस जात व पुटप्पाला बेळगावास बोलावीत असत.

पुटप्पाचे वडील बाळाजीपंत यांनीं पंतांकडून अनुग्रह घेतल्यापासून त्याला पंतांकडे येण्यास अधिकच सवड मिळूं लागली. त्याला दोन मुली झाल्यानंतर त्याचें कुटुंब वारलें. त्यावेळीं त्याचें वय सुमारें २५।२६ वर्षांचें होतें. त्याची घरची सुस्थिति असून, शरीरप्रकृति उत्तम होती व मुलीहि पुष्कळ सांगून येत होत्या आणि घरच्या मंडळींचा लग्न करून घेण्याबद्दल त्याला फार आग्रह चालला होता. परंतु आतां पुनः

लग्नाच्या फंदांत पडावयाचें नाहीं असा त्यानें निश्चय केला. पुढें घरच्या मंडळींकडून पुटप्पाच्या लग्नाचा प्रश्न पंतांपुढें आला. तेव्हां पंतांनीं त्याला त्यासंबंधीं निक्षून विचारलें व " आतां आपणास लग्न करावयाचें नाहीं, " असें त्यानें स्पष्ट सांगितलें. त्याचें हें सांगणें वरवरचें नसून खरें, मनापासूनचें आहे अशी पंतांची खात्री झाल्यामुळें त्यांनीं त्याला लग्नाचा आग्रह केला नाहीं व त्यानेंहि लग्न न करण्याचा आपला निश्चय अखेरपर्यंत कायम ठेविला; इतकेंच नव्हें तर आपलें वर्तन अतिशय शुद्ध ठेवून आपणास जणूं सद्‌गुरुसेवेला वाहून घेतलें. आपला गुरु, आपला देव, आपलें सर्वस्व म्हणजे पंतच होत अशी त्याची ठाम भावना झाली व त्या भावनेनें तो अत्यंत एकनिष्ठेनें त्यांची सेवा करूं लागला. त्याची शरीरयष्टि अतिशय मजबूत असून ताकद फार दांडगी होती व शारीरिक कष्ट सोसण्याची त्याला बिलकुल पर्वा वाटत नसे. त्यामुळें पंत कोठेंहि बाहेरगावीं जावयाचे म्हणजे तो त्यांच्याबरोबर असावयाचाच. एखादा ओढा लागल्यास व पंतांनीं पाटलोण घातलेली असल्यास " पुट्या, आतां पाटलोण काढण्याचा कंटाळा आला आहे, " असे ते म्हणत व लगेच तो त्यांना खांद्यावर घेऊन ओढ्याच्या पलीकडे नेऊन ठेवीत असे ! एकदां पंत अकोळास जात असतां एका गाडीवानाची गाडी एका खळग्यांत पडली व कांहीं केल्या ती त्या गाडीवानाला वर काढतां येईना. तेव्हां पंतांनीं त्याला मदत करण्यास पुटप्पाला सांगितलें. लगेच पुटप्पानें एकट्यानें ती गाडी रस्त्यावर आणून ठेविली ! रात्रीं अपरात्रीं पंत डोंगरावर अगर जंगलांत गेले म्हणजे तो बरोबर असे. कणबर्गी गाव डोंगराच्या पायथ्याशीं असल्यामुळें गावाच्या आजूबाजूला जंगल पुष्कळ आहे. त्यामुळें पंत मधुन मधुन शनिवार-रविवारीं कांही भक्तमंडळीसह कणबर्गीस जात असत. तेथें गेल्यावर ते बरोबरच्या मंडळींसह बहुतेक काळ कणबर्गीच्या डोंगरावरील जंगलांत घालवीत व तेथें भजन, टिपरी खेळणें वगैरे प्रकार स्वच्छंदानें चालत असत. अशा वेळीं पंतांचें बोध सांगणें सारखें चालू असें व कांहीं नवीन नवीन पदेंहि होत. या मंडळीची खाण्यापिण्याची वगैरे तरतूद करण्याचें काम पुटप्पाकडे असे व तो तें मनोभावानें करी. त्याच्या घरची सुस्थिति असल्यामुळें व घरांतलि सर्वच मंडळींची पंतांवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळें हें कार्य विशेष आस्थेनें केलें जाई.

पंत कणबर्गीस जात ते बहुतकरून शनिवारीं सकाळीं शाळा असल्यामुळें त्या दिवशीं दुपारीं जात व रविवारीं सायंकाळीं अगर सोमवारीं सकाळीं बेळगावास परत येत. एकदां शनिवारीं सायंकाळीं सुमारें वीस पंचवीस मंडळीसह पंत कणबर्गीस गेले व परभारें जंगलांत जाऊन त्यांनी पुटप्पाला फराळाची तयारी घेऊन येण्यास निरोप पाठविला. त्याप्रमाणें तो दशम्या, भाजी वगैरे तयारीनिशीं पंत होते त्या ठिकाणीं गेला. ते कार्तिक-मार्गशीर्षाचे दिवस होते. त्यामुळें थंडी फार कडाक्याची पडली होती. मध्यरात्रीच्या सुमारास पंतांनीं जवळच असलेल्या 'रामतीर्थ' नावाच्या कुंडांतून पाणी आणण्यास पुटप्पास सांगितले, तेव्हां तो त्या कुंडाशीं गेला व पाण्यांत हात घालतो तों तें फार गार लागलें. तेव्हां तो म्हणाला "पंत, पाणी फार गार आहे, " तें ऐकतांच पंतांनीं सर्व मंडळीला आज्ञा केली कीं सर्वांनीं कपडे

काढून या कुंडांत स्नान करावयाचें व कोणींहि विस्तवाशीं बसावयाचें नाहीं व तंबाखूहि ओढावयाची नाहीं. लगेच पंतांसुद्धां सर्वांनीं त्या कुंडांत उड्या टाकल्या व सर्वजण पाण्यांतच दोनतीन तास निरनिराळे खेळ खेळत होते व एकीकडे भजन व पंतांचें बोध सांगणें वगैरे चालूच होतें. अशा वेळीं कोणींहि थंडी लागल्याबद्दल कुरकुर करण्याची बिलकुल सोय नसे. कारण तसें कोणीं केल्यास त्याच्या डोक्यावर थंड पाण्याच्या घागरी ओतण्यास सांगून पंत त्याच्या तक्रारीचें निरसन करीत व अशा रीतीनें सोशिकपणा व धाडस हे गुण भक्तमंडळींच्या अंगीं आणण्याचे ते जणूं धडे देत.

एकदां पंत मंडळीसह कणबर्गीस गेले असतां त्यांनीं तेथील डोंगराच्या माथ्यावरील दाट झाडीच्या ठिकाणीं तीन दिवस वस्ती केली होती. ते तीन दिवस त्यांनीं "झुलता है यतिराज आत्मख्यालमों, ख्यालमों" या थाटांत घालविले. तेथें असतांना कधीं मोराचीं पिसें बांधून, तर कधीं वल्कलें धारण करून गुरुनामाचा डंका पिटीत त्यांची क्रीडा चालत असे. एके दिवशीं रात्रीं "चला, आपण आतां कुस्ती खेळूं या", असें पंत पुटप्पाला म्हणाले. लगेच त्यांची कुस्ती सुरू झाली व ती सुमारें दोन तास चालली होती; एकीकडे "गुरुसवें धरिली आजी कुस्तीरे । प्रेमाची चढली मज मस्तीरे ॥ धृ. ॥ काळासी पदीं तुडविलें । संसारा सहजी बुडविलें । गुरुपायीं केली वस्तीरे ॥ १ ॥ अभिमान टाकुनी पहातां । सर्वत्र दिसे गुरु त्राता । व्यापुनी असे आदि अंतीरे ॥ २ ॥ अवधूत गुरु शोभतो । प्रेमामाजीं नित्य खेळतो । दत्तपदीं सहज निश्चितीरे ॥ ३ ॥" (द.प्रे.ल.४०८) हें पद पंत तोंडानें म्हणत होते व त्यांच्या नेत्रांतून सारख्या प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या होत्या. "त्या नेत्रोदकानें पंतांनीं आपलें व माझें अंग भिजवून टाकिलें", असें पुटप्पा सांगतात. एकदां पंतांनीं पुटप्पाला मोठ्यानें "अलख" पुकारण्यास सांगितलें; त्याप्रमाणें त्यानें केलें. लगेच त्यांनीं त्याला "मी" "मी", असें तितकेंच मोठ्यानें ओरडण्यास सांगितलें. त्याबरोबर त्यानें तसें केलें व त्याला भीति वाटूं लागली. तेव्हां त्यांनीं त्याला "तूं" "तूं", म्हणून पुकारण्यास सांगितलें व त्याप्रमाणें त्यानें करितांच त्याची भीति नाहींशी झाली. अशा रीतीनें "सद्‌गुरु मी नाहीं, तूंच सर्वत्र आहेस" हा अनन्य भक्ताचा महामंत्र त्यांनीं त्याला अनुभवानें पटवून दिला. याप्रमाणें पंत आपल्या शिष्यांना हासत खेळत बोध देत असत व अनुभवाचा कस लागून तो त्यांचे मनावर ठसत असे.

एकदां काळोखांत पंत व त्यांच्या बरोबरची मंडळी जंगलांतून कणबर्गीकडे येत असतां, त्या बाजूकडील माहितगार म्हणून, पुटप्पा सर्वांच्या पुढें चालत होता. चालतां चालतां तो जरा एका बाजूला वळला, तेव्हां "पुट्या, कोणीकडे चाललास ?" असें पंतांनीं विचारलें. तेव्हां पुटप्पा म्हणाला, "पंत, पुढें मोठा खळगा आहे. म्हणून मी जरा बाजूला वळलों." तें ऐकून पंत पुट्यासह त्या खळग्याजवळ गेले व म्हणाले कीं, "आपण येथून उड्या मारल्या तर काय होईल ?" तेव्हां पुटप्पा म्हणाला, "महाराज हात पाय मोडतील." लगेच "तर मार उडी" असें पंत पुटप्पाला म्हणाले; त्याबरोबर त्यानें

त्या खळग्यांत उडी टाकली व लगेच " पुट्या मी आलों पहा " असे म्हणून पंतांनीहि उडी टाकिली आणि तें पाहून त्यांच्या बरोबरच्या सर्व मंडळींनीं भराभर त्या खड्यांत उड्या टाकल्या. त्यांच्यांत कांहीं म्हातारे व कांहीं अशक्त होते. पण कोणालहि इजा न होतां सर्व जण सुखरूपपणें पुटप्पाच्या घरीं जाऊन पोंचले व दुसरे दिवशीं पंत मंडळीसह बेळगावास परत गेले.

येथें पंतांच्या जंगलांतील खेळांसंबंधीं थोडेंसें दिग्दर्शन केलें आहे इतकेंच. या खेळांसंबंधीं एके ठिकाणीं ते म्हणतात, "जंगलांतील पंतांचे खेळ पाहशील तर उड्या मारूं लागशील; नाचूं लागशील; वाघाला कुत्रा करशील; सगळें विश्व तूं होशील. विश्व तुझें म्हणजे गुरुपुत्राचें नव्हे, तर अन्य कोणाचें ? दुसरा कोण याचा मालक ? पण एवढें उदारपणाचें दान घेण्यास पात्रहि उदार म्हणजे सर्वांवरच उदास, समूळ निस्पृह असावें. एरव्हीं सगळ्या समुद्राचें पाणी तांब्यांत भरून आणणार म्हणून तें आणण्यास जाणाराच्या गर्ताप्रमाणें गति होईल. समुद्र तांब्यांत कसा मावणार ! समुद्रास गिळण्यास समुद्राहून मोठें, विशाल असें पात्र पाहिजे. सर्व पोटीं सामावणारें, क्षमाशील, शांतिमय, प्रेमळ, अखंड प्रीतीचें अंतःकरण असावें." (पु. ८–११४) या उताऱ्यांत पंतांनीं अद्भुत खेळ कोणत्या स्थितींत होतात अगर दिसतात याचेंहि स्पष्टीकरण केलें आहे. त्यावरून जंगलासारख्या विजनस्थळीं योगारूढ स्थितींत ते असतांना भोंवतालच्या दृढनिश्चयी व एकनिष्ठ भक्तमंडळीसह त्यांनीं केलेल्या अद्भुत खेळांची थोडीशी कल्पना होते.

पुटप्पाचे वडील बाळाजीपंत ऊर्फ बाळण्णा यांचेवर पंतांचा अनुग्रह झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं ते फार आजारी पडले. तेव्हां त्यांना भेटण्याकरितां पंत कणबर्गीस गेले. पंतांना पाहतांच त्यांना परमानंद होऊन त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले. तेव्हां पंतांनीं त्यांना " आतां काय इच्छा आहे ? " म्हणून विचारतांच " माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्याच आहेत, अखेरची आपल्या दर्शनाची इच्छा होती. तीहि आपण पूर्ण केली आहे. माझ्या घरच्या सर्व मंडळींवर आपली पूर्ण कृपा आहेच. ती तशीच चालू ठेवा, " असें म्हणून त्यांनीं तशा स्थितींतच पंतांच्या पायांवर मस्तक ठेविलें. तेव्हां पंतांचाहि कंठ भरून येऊन त्यांनीं बाळण्णांना हलकेच उठवून पोटाशीं धरिलें व " बाळण्णा, दत्ताचें स्मरण ठेव " असें सांगितलें. लगेच " पंत, तुम्हांला मी कधींच विसरणार नाहीं. कारण तुम्ही माझा आत्माच होऊन राहिलांत " असें बाळण्णा म्हणाले व " केव्हांहि पंताला सोडूं नका; तोच तुमचा खरा कल्याणकर्ता आहे " असें त्यांनीं घरांतील मंडळींना सांगितलें. नंतर थोड्या वेळानें पंत बेळगावीं परत गेले व त्याच दिवशीं बाळण्णांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली. तेव्हांपासून पुटप्पाची पंतांवरील निष्ठा अधिकच बळावली. त्याचा भाऊ निंगप्पा हा घरचा कारभार पाहात असल्यामुळें तो बहुतेक बेळगावास पंतांजवळच राहूं लागला व मधुन मधुन कणबर्गीस जाऊन येत असे. निदान शनिवारीं तरी तो बेळगावास गेल्याशिवाय राहात नसे.

याप्रमाणें रावजी कुलकर्णी यांचे घरीं पंतांची व पुटप्पाची भेट होऊन त्याची

त्यांच्यावर इतकी निष्ठा बसली व त्यांचें त्याच्यावर इतकें प्रेम जडलें कीं त्यांना परस्परांशिवाय चैन पडत असे व त्या उभयतांमधील सलगीमुळें "पंतांचा पुट्या व पुट्याचे पंत" असें सर्व मंडळी म्हणूं लागली. पुढें पुढें तर पुटप्पा नेहमीं पंतांजवळ बॉडीगार्ड (शरीर–रक्षक) प्रमाणें राहूं लागला. एकदां तो पंतांना न विचारतां आपल्या गावीं गेला व दुसऱ्या दिवशीं परत आला. तेव्हां पंत म्हणाले "पुट्या, तूं काल माझ्याजवळ नव्हतास. त्यामुळें मी रात्रीं उठून बाहेर जातांना भिंतीला डोकें लागून टेंगूळ आलें. पहा, तूं मला सोडून गेलास म्हणजे माझे फार हाल होतात." लगेच, "तुमचे हाल होतात तर माझें तरी गावीं काय अडलें आहे? मी तुमच्याजवळच राहीन" असें त्यानें उत्तर दिलें व तेव्हांपासून तो त्यांना विचारल्याशिवाय कोठेंहि जात नसे. एकदां पंत शाळेंतून परत येतांना रस्त्यानें चाललेल्या म्हशी त्यांचे अंगावर आल्या. तेव्हांपासून ते शाळेंत जातांना व शाळेंतून परत येतांना पुटप्पा त्यांच्याबरोबर असे. एके दिवशीं रात्रीं पंतांना बाहेर जावयाचें होतें व त्यांनीं दिवा लावण्याकरितां पुटप्पाला हाका मारल्या पण तो जागा न झाल्यामुळें ते तसेच जाऊं लागले; तों कपाळाला पलंगाची दांडी लागून टेंगूळ आलें. दुसरे दिवशीं पंतांनीं ती हकीगत पुटप्पाला सांगितली व त्या दिवसापासून तो त्यांच्या पलंगाखालीं निजूं लागला आणि त्यांनीं हाक मारतांच काडी ओढून दिवा लावून देऊं लागला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पंतांना तो वज्रदेही व स्वामिसेवारत असा प्रतिहनुमानच भेटला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## शिष्यांच्या संख्येंत वाढ

पंतांच्या घरीं, रावजी कुळकर्णींच्या घरीं अगर अन्य ठिकाणीं पंतांच्या भजनाला त्यांचे शिष्य नसलेलेहि कांहीं लोक येत व त्यांची पंतांवर श्रद्धा बसून ते त्यांचे शिष्य होत. १८८६–८७ च्या सुमारास पंतांचा भाऊ गोपाळ याचेबरोबर दड्डी येथें शिकत असलेला रामभाऊ कामतनूर नावाचा एक मुलगा पंतांचा शिष्य झाला व कृष्णराव गुमास्ते यांचे बंधु बंडु आणि कल्लाप्पा यांनींहि पंतांकडून अनुग्रह घेतला. तसेंच श्रीपादपंत कुळकर्णी यांच्या आप्तेष्टांचीं जीं मुलें दड्डी येथील शिक्षण पुरें करून बेळगावास पंतांकडे पुढील शिक्षणाकरितां येऊन राहात त्यांचेपैकीं बहुतेकांवर पंतांचा अनुग्रह होत असे. अशा रीतीनें पंतांच्या शिष्यांची संख्या बरीच वाढत चालली.

## रामा शिपायाचा 'रामानंद' झाला

याच सुमारास रामा नावाचा मराठा जातीचा एक इसम बेळगावांत पोलिस खात्यांत शिपायाचें काम करीत असे. त्याला दारूचें व्यसन होतें व नाच तमाशाचा फार शोक असून गाण्याबजावण्याचाहि नाद होता. त्याचा आवाज गोड असून तो लावण्या फार चांगल्या म्हणत असे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तो एक रंगेल गडी असून त्याला परमार्थाचा गंधहि नव्हता. त्या वेळीं बेळगावांत बुरुडगल्लींत एक दारूचें दुकान होतें व तेथें तो नित्य नियमानें दररोज संध्याकाळीं जात असे. त्याचा त्या दुकानावर जाण्याचा

मार्ग बापटगल्लींतून असल्यामुळें पंतांचा गुरुबंधु परशराम याच्या त्या गल्लींत असलेल्या घरावरून तो नेहमीं जात असे. त्यावेळीं परशरामाच्या घरीं रोज संध्याकाळीं भजन होत असल्यामुळें एकदां कोणाच्या तरी ओळखीनें रामा शिपाई तेथें भजनाला गेला. नंतर त्याला भजनाची गोडी लागून तो मधुन मधुन तेथें जाऊं लागला व तेथें गेल्यावर कांहीं पदेंहि म्हणत असे. एकदां पंत परशरामाच्या घरीं भजनाला गेले असतां तेथें रामाहि आला होता व त्यानें आपल्या मधुर आवाजानें कांहीं पदें म्हटलीं; तीं ऐकून पंतांना फार आनंद होऊन ते म्हणाले, "रामा, तुझ्या या ईश्वरदत्त मधुर वाणीचा उपयोग तमाशांतील लावण्या म्हणण्याकडे करण्यापेक्षां देवाच्या भजनांत करशील तर तुझ्या जन्माचें सार्थक तरी होईल." तें ऐकून रामा म्हणाला कीं, "मी जर देव कधीं पाहिलाच नाहीं, तर त्याचें भजन माझ्याकडून कसें व्हावें? आपण जर तो मला दाखवीत असाल तर मात्र त्याचें भजन मी नेहमीं करीत जाईन." तें ऐकून पंतांना फार आनंद झाला व ते रामाला म्हणाले, "ठीक आहे; जेव्हां जेव्हां तुला सवड होत जाईल तेव्हां तेव्हां तूं येथें अगर माझ्या घरीं भजनाला येत जा म्हणजे सर्व कांहीं तुझ्या इच्छेप्रमाणें होईल." पंतांचे ते निश्चयात्मक शब्द ऐकून रामाला थोडा अचंबा वाटला व आनंद झाला. तेव्हांपासून तो मधुन मधुन परशरामाच्या घरीं, पंतांच्या घरीं अगर इतर ठिकाणीं पंतांचें भजन व्हावयाचें असेल तेथें जाऊं लागला. असें होतां होतां त्याला भजनाची फार गोडी लागली व पंतांवर त्याची पूर्ण श्रद्धा बसून त्यानें त्यांचेकडून अनुग्रह घेतला.

रामा स्वभावानें फार करारी व बाणेदार होता. पंतांकडून अनुग्रह घेतल्यापासून त्याच्या ठिकाणची भजनगोडी अधिकाधिक वाढत चालली व त्याचें प्रपंचाकडील व नोकरीकडील लक्ष कमी कमी होऊं लागलें; असें होतां होतां एके दिवशीं कांहीं कारणामुळें त्याचा त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशीं खटका उडून त्यानें आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. नंतर पंतांकडे आल्यावर तो पंतांना मोठ्या कळकळीनें म्हणाला, "पंत, आपल्या कृपेनें माझी नोकरी सुटली आहे. आतां यापुढें आपल्याखेरीज दुसऱ्या कोणाचीहि नोकरी करण्याची माझी इच्छा नाहीं. भगवी घालून राहिलेलें आयुष्य भजनानंदांत घालवून समर्थाचें नाव गाजवावें एवढीच इच्छा आहे. माझ्या प्रपंचांत माझ्या बायकोखेरीज कोणीहि नाहीं व मी राहीन त्या स्थितींत राहण्याची तिचीहि तयारी आहे. तेव्हां आपण मला कफनी द्यावी अशी प्रार्थना आहे." रामाचे हे कळकळीचे व निश्चयाचे उद्गार ऐकून पंतांना फार कौतुक वाटलें व समाधान झालें. त्याची निःसंग वृत्ति व बाणेदार स्वभाव हीं लक्षांत घेतां आतां याच्याकडून नोकरी वगैरे उद्योग होणार नाहीं असें जाणून ते म्हणाले कीं, "तुला कफनी देण्यास माझी हरकत नाहीं. पण या कामीं तुझ्या बायकोची संमति असेल तरच ती मी देईन; नाहीं तर देणार नाहीं." तें ऐकून रामाला फार आनंद झाला व तो आपल्या घरीं गेला.

दुसऱ्या दिवशीं रामा आपल्या बायकोला घेऊन पंतांकडे गेला व आपल्यास भगवें


घालण्यास तिची संमति असल्याचें त्यानें सांगितलें. तेव्हां पंतांनीं रामा आपणापाशा कफनी घालण्याची परवानगी मागत असल्याचें तिला सांगितलें व "तुझी या गोष्टीला संमति असेल तरच ती मी त्याला देईन", असें ते म्हणाले; तेव्हां "त्यांच्या इच्छेच्या आड मी येणार नाहीं. ते ज्या स्थितींत राहतील त्या स्थितींत मीहि राहीन. आपण त्यांना कफनी घालण्यास खुशाल परवानगी द्यावी व माझ्यावरहि कृपा करावी," असें तिनें सांगितलें. ते तिचे खऱ्या अंतःकरणापासून निघालेले शब्द ऐकून पंतांना फार कौतुक वाटलें व त्यांनीं तिला अनुग्रह दिला. नंतर पुष्कळ भक्तमंडळी बसली असतां पंतांनीं मोठ्या समारंभानें विधिपूर्वक रामाला कफनी दिली व त्याला मोठ्या प्रेमानें आलिंगन देऊन, "तूं समर्थघरचा पोळ आहेस; समर्थांचें नाव घेत आनंदानें राहा व माझा हा अवधूत मार्ग चालव. तुला कांहीं कमी पडणार नाहीं," असें सांगितलें.

याप्रमाणें पंतांनीं रामाला कफनी दिल्यापासून तो भजनानंदांत कालक्रमणा करूं लागला. उदरनिर्वाहाकरितां मधुन मधुन तो एकतारीवर पंतांचीं पदें म्हणत फेरी करीत असे व त्याची बायकोहि त्याच्याबरोबर असे. रामाची निःसंग वृत्ति, करारी बाणा, व सद्‌गुरूवरील अचल निष्ठा या गुणांमुळें लोक त्याला "रामाबुवा" अथवा "रामानंद" म्हणूं लागले. त्याचा कंठ फार मधुर असून त्याची म्हणण्याची शैली चित्ताकर्षक असल्यामुळें त्याचें भजन ऐकण्यास पुष्कळ लोक जमत व कित्येकांनीं त्याचेकडून अनुग्रह घेतला. पंतांकडून अनुग्रह घेतल्यानंतर कांहीं दिवसांनीं "रामबुवा" अथवा "रामानंद" हे कोल्हापुरास राहूं लागले व दिवसेंदिवस तेथें त्यांचे पुष्कळ शिष्य झाले.

## बापूभट राजापूरकर व विनायकराव ताम्हनकर ऊर्फ साई

या सुमारास पंतांनीं आपल्या आणखी दोन शिष्यांना कफन्या दिल्या. ते म्हणजे ज्यांचा मागें उल्लेख झाला आहे ते बापूभट राजापुरकर व विनायकराव ताम्हनकर हे होत. बापूभट हे राजापुराकडील राहाणारे कोंकणस्थ ब्राम्हण असून कृष्णराव गुमास्ते यांच्या घराजवळच त्यांचें फराळाचें दुकान होतें. त्या दुकानांत रोज संध्याकाळीं पंत व कांहीं भक्त जमून वेदान्तचर्चा, मुद्रा लावणें वगैरे प्रकार चालत. पुढें जेव्हां म्हातारपणामुळें बापूभटजींना दुकान चालविण्याची दगदग होईनाशी झाली तेव्हां त्यांनीं निटुरास (बेळगावपासून सुमारें १०।१२ मैल असलेल्या गावीं) जाऊन राहाण्याचें ठरवून पंतांना अशी विनंति केली कीं, "मला वृद्धापकाळामुळें वरचेवर बेळगावास येतां येणार नाहीं. तेव्हां निरंतर समर्थांचें स्मरण राहावें म्हणून कफनी घालून आठवड्यांतून तीन वार फेरी करण्याची परवानगी मिळावी." तेव्हां पंतांनीं त्यांच्या परिस्थितीचा विचार करून त्यांना त्याप्रमाणें परवानगी दिली. तेव्हांपासून ते कफनी घालूं लागले व निटुरास कांहीं दिवस निःसंग वृत्तीनें आपल्या भगव्याला शोभेल असा वर्तनक्रम ठेवून तेथेंच त्यांनीं समाधि घेतली. बापूभट स्वभावानें फार प्रेमळ असून शांत वृत्तीचे होते व निटूरकडील पुष्कळ लोकांना त्यांच्याबद्दल पूज्यभाव वाटत असे.

श्रीपंतमातोश्री



प. पू. गं. भा. सीताबाई

विनायकराव ताम्हनकर हे बेळगावांत राहणारे कोकणस्थ ब्राह्मण असून त्यांचेवर कांहीं कारणामुळें सामाजिक बहिष्कार घालण्यांत आला होता. पुढें त्यांच्यावर पंतांनी अनुग्रह केला आणि तेव्हांपासून पंत व त्यांचे शिष्य यांचा त्यांना आधार मिळाला. प्रथम त्यांना एका छापखान्यांत नोकरी होती; त्यामुळें ते आपलें कुटुंब व मुलगी यांच्यासह कसेबसे दिवस काढीत असत. पुढें त्यांचें कुटुंब वारलें व नंतर तो छापखानाहि बंद झाला. तेव्हां त्यांनीं रेल्वेखात्यांत नोकरी धरिली; पण कांहीं दिवसांनीं तीहि सुटली व त्यांचे फार हाल होऊं लागले. तेव्हां जगाला अगदीं कंटाळून, त्यांनीं एके दिवशीं पंतांकडे अशी मागणी केली कीं, " मला जगानें सोडलेलेंच आहे. तेव्हां माझी आतां अशी इच्छा आहे कीं, भगवें धारण करून राहिलेलें आयुष्य सद्‌गुरुभजनांत घालवावें. मला दुसऱ्या कशाचीहि इच्छा नाहीं. तेव्हां मला आपण भगवें घालण्याची परवानगी द्यावी." त्यांची सर्व परिस्थिति तसेंच त्यांचा प्रेमळ व निश्चयी स्वभाव यांची पंतांना चांगली माहिती असल्यामुळें त्यांनीं ताबडतोब त्या गोष्टीला संमति दिली व एके दिवशीं पुष्कळ भक्त जमले असतां मोठ्या समारंभानें यथाविधि त्यांना भगवी कफनी दिली व अशी आज्ञा केली कीं, " कफनी घालून घरोघर भिक्षा न मागतां, सिध्या रस्त्यानें एकतारीवर भजन करीत जात जा व असें जातां जातां जें कोणी कांहीं देईल तेवढ्यावर संतुष्ट राहात जा." याप्रमाणें पंतांची आज्ञा शिरसामान्य करून विनायकरावांनीं कफनी घालून बेळगावांतच एकतारी घेऊन फेरी करण्यास सुरवात केली. तेव्हांपासून लोक त्यांना ' साई ' म्हणूं लागले व पुढें त्यांचें तेंच नाव रूढ झालें. कोणी त्यांना नावें ठेवूं लागले, तर कोणी त्यांच्या वैराग्यवृत्तीची तारीफ करूं लागले. साईंचा आवाज गोड व म्हणणी सुरेल असून पंतांनीं केलेलीं पदें ते सहृदय अन्तःकरणानें म्हणत. त्यामुळें ऐकणारांवर त्यांच्या भजनाची छाप तेव्हांच बसत असे. सामाजिक बहिष्कारापासून साईंना फार त्रास सोसावा लागल्यामुळें पंतांनीं ढोंगी ब्राह्मणांसंबंधीं, " ब्रह्मात्मैक्य मर्म नेणतां ब्राह्मण म्हणविती । गहन श्रुतीचा भाव न पहातां वेदबाह्य होती ॥ ध्रु. ॥ ", ( द. प्रे. ल. १९२ ) हें पद केलें व त्याच्या अखेर " त्वंपद तत्पद लक्ष्य सविता श्रेष्ठ म्हणे श्रुति । सर्वव्यापक सर्वाधार देव स्वयंज्योति । सद्गुरुकृपें ब्राह्मण होतां गायत्री जाणती । जीवन्मुक्ति सहज वरूनी दत्तभजनीं रमती ॥ ५ ॥ " असें म्हटलें आहे. तसेंच पंतांनीं साईंना अनुग्रह देऊन कफनी घालण्यास सांगितलें व ते पंतांचीं पदें म्हणत रस्त्यांनीं फेरी करूं लागले ही गोष्ट न खपून, " तुम्ही ब्राह्मण असून संध्या वगैरे कां करित नाहीं ? ", असें कोणीं एकानें कुचेष्टेनें पंतांना विचारलें. तेव्हां त्यांनीं " सद्‌गुरुकृपें ब्राह्मण होतां संध्या केली ऐका । मनाचा लय करुनी स्वयं ब्रह्म झालों निका ॥ ध्रु. ॥ प्रकृति रात्र पुरुष दिवस खूण मनीं आणा । उभय संधि साधुनी प्रातःसंध्या केली जाणा । ज्ञानसूर्या अर्घ्य दिधलीं स्मरुनि गुरुचरणा । त्रिविध ताप उल्लंघुनी झालों विदुर जन्ममरणा ॥ १ ॥ अहं जिवात्मा सोऽहं परमात्मा पहा मायाखेळ । अहं सोऽहं अस्मि संधि माधान्हकाळ । आत्मभ्रांति छाया जातां ब्रह्मचि केवळ । जिवशिव-

मायाअर्घ्यें अटला त्रिपुटीगोंधळ ॥ २ ॥ सायंसंध्या समाधिस्थिति कशी वर्णूं आतां । संदेहची गेला कैंची संध्येची वार्ता । सच्चिदानंद अर्घ्यदानें ध्येय ना ध्याता । आपआपणातें विसरणें हेंची ध्यान प्रिय दत्ता ॥ ३ ॥ ", ( द. प्रे. ल. १५६ ) हें पद म्हटलें व आपली त्रिकाळ संध्या कशी अखंड चालली आहे ते सांगितलें. तसेंच, या सुमारास, " तुम्ही गृहस्थ असून स्वतःला ' अवधूत ' म्हणतां हें कसें ? ", असा एका इसमानें पंतांना प्रश्न केला. तेव्हां आपण 'अवधूत' कसे आहोंत हें त्यांनीं पुढील पद म्हणून सांगितलें तें असें " आम्ही जोगी निरंजनींचे 'दत्त' नामधारी । सहज खेळत गगनमंडळीं आलों संतद्वारीं ॥ध्रु०॥ आदि अंत ना मध्य आम्हां स्वयंभु अविनाशी । अधिष्ठानींचे मिरासदार वस्ती चिदाकाशीं । अखंड वैभव चिन्मय कांचन नामरत्नराशी । अनंत विश्वा पोसुनी आम्ही सदैव उपवासी । माय बापहो प्रेमभिक्षा यावी झडकरी ॥ १ ॥ अंतररंग भगवी कफनी आत्मबोधदंड । विदेह भस्म ज्ञानवल्लीचा कैफ अखंड । अद्वयअमलीं धुंदवृत्ति नाहीं दुजी चाड । भक्तिझोळीमाजी प्रेम तुकडे उदंड । ब्रह्मानंदें रमत रमत झाली येथें फेरी ॥ २ ॥ चिच्छक्तिसंप्रदाय आमुचा पंथ अवधूत । अलक्ष्य मुद्रा मार्ग अगोचर राहाटी अनंत । उपास्य नरसिंहमुनी सद्गुरु बालावधूत । सहजस्थितीनें चिद्विलासीं भजन नित्य होत । शंकर मस्तकीं वंदुनी दाऊं दत्तप्रेमलहरी ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १५१. ).

वर लिहिल्याप्रमाणें साई कांहीं दिवस बेळगावांत फेरी करून उदरनिर्वाह करीत असत. पण पुढें लौकरच त्यांची मुलगीहि वारली व ते एकटेच राहिले तेव्हां पंतांनीं त्यांना फेरी करणें बंद करण्यास सांगून आपल्या घरीं ठेवून घेतलें व तेथें ते शांतपणानें सद्गुरुभजनांत काळ घालवूं लागले. त्यांचें हस्ताक्षर फार चांगलें असल्यामुळें ते पंतांचीं पदें, निबंध वगैरे लिहिण्याचें कामहि करीत असत. पुढें परगावीं असलेल्या पंतांच्या कांहीं शिष्यांकडे ते मधुन मधुन जाऊन राहात असत.

अशा रीतीनें पंतांनीं रामा शिपाई ऊर्फ रामानंद, बापूभट राजापुरकर व विनायकराव ताम्हनकर ऊर्फ साई या तिघांना भगवें घालण्याची परवानगी दिली व त्या तिघांनींहि त्या भगव्याला साजेसें वर्तन ठेवून सद्गुरुभजनांत कालक्रमणा केली. या तीन शिष्यांखेरीज पंतांनीं कायमची कफनी घालण्यास कोणासहि परवानगी दिली नाहीं. उलट प्रत्येकानें प्रपंचांत राहूनच परमार्थ साधला पाहिजे व उद्योग करून उदरनिर्वाह केला पाहिजे असा त्यांचा फार कटाक्ष असे. यासंबंधीं पुढें योग्य स्थळीं अधिक खुलासा होईलच.

या तीन शिष्यांना पंतांनीं कफनी घालण्याची परवानगी दिल्यापासून भजन हाच त्यांचा मुख्य व्यवसाय झाला. रामाबुवा व साई हे भजनाचे खरे शोकीन असून त्यांची म्हणणीहि चांगली असल्यामुळें व मुख्यत्वेंकरून ते भजनांत पंतांचीं पदें म्हणत असल्यामुळें त्या पदांचा प्रसार होण्याचें व बेळगावाबाहेर पंतांची माहिती होण्याचें तें एक साधन झालें. रामाबुवा व साई यांनीं स्वतः केलेलीं पदेंहि बरींच असून त्यांच्यांत आत्मानुभव, गुरुभक्ति व प्रेमळपणा हे गुण व्यक्त झाले आहेत.

---

# प्रकरण २५ वें

शिष्यांच्या संख्येंत वाढ; अण्णा अकोळकर; समदृष्टि; घरांतील व्यवस्था व शिस्त; 'फ्री मेसन सोसायटी 'चे दोन सभासद; 'गुरुप्रेम म्हणजे काय ?' हा त्यांचा पंतांना प्रश्न व त्याचें उत्तर; मोठा दरबार; काशीकरबुवा.

## शिष्यांच्या संख्येंत वाढ

सन १८८६ अखेर पंतांचे बंधु गोपाळराव हे पुनः मॅट्रिकच्या परिक्षेला बसले व उत्तीर्ण झाले. शिक्षणक्रम पुढें चालू ठेवण्यास घरची आर्थिक परिस्थिति अनुकूल नसल्यामुळें ते बेळगावास मुलकी खात्यांत उमेदवारी करूं लागले. त्यांना मधुन मधुन बदली मिळून थोडथोडे पैसेहि मिळूं लागले व प्रपंचाचा खर्च भागविण्याचे कामीं त्यांची पंतांना थोडथोडी मदत होऊं लागली. त्यांचे स्नेही व पंतांचे एक शिष्य रामभाऊ कमतनूर हे १८८७ च्या सुमारास बेळगाव जिल्ह्यांतील चिकोडी तालुक्यापैकीं अकोळ येथें खाजगी शिक्षकाचें काम करीत असून तेथील सावकार विष्णु हरि कुलकर्णी, विष्णु अनंत कुलकर्णी वगैरे कांहीं मंडळींच्या घरांतील मुलांना शिकवण्याकरितां त्यांचे घरीं जात असत. एके दिवशीं गोपाळराव हे रामभाऊंना भेटण्याकरितां अकोळ येथें विष्णु हरि कुलकर्णी यांच्या घरीं गेले. तेव्हां रामभाऊंनीं विष्णुपंतांशीं त्यांची ओळख करून दिली व "यांचे बंधु दत्तोपंत म्हणून आहेत व ते सत्पुरुष आहेत" असेंहि सांगितलें. तेव्हां विष्णुपंतांनीं गोपाळरावांकडून पंतांसंबंधीं बरीच माहिती मिळविली व सवडीप्रमाणें एकदां पंतांच्या दर्शनाला जावें असें त्यांना वाटूं लागलें. त्यांची लहानपणापासून दत्तावर भक्ति होती व दर पौर्णिमेला ते नरसोबाच्या वाडीची वारी करीत असत. ते मधुन मधुन गुरुचरित्राचे सप्ताह करीत व एकनाथी भागवत, दासबोध वगैरे ग्रंथहि वाचीत असत.

वर उल्लेख केलेले विष्णु अनंत कुळकर्णी हे वतनदार कुळकर्णी घराण्यापैकीं असून वैद्यकीचा धंदा करीत असत. ते फार चतुर असून व्यवहारदक्ष होते व त्यांना कोर्टदरबाराच्या कामाचीहि चांगली माहिती होती. त्यामुळें पुष्कळ लोक त्यांची सल्ला विचारण्याकरितां येत असत. त्यांना लोक 'अण्णा' म्हणत. अण्णांना अध्यात्मविषयाची फार आवड होती. परमार्थप्राप्तीकरितां त्यांचे सतत प्रयत्न चालू होते व कोणातरी चांगल्या अधिकारी सत्पुरुषाची कृपा झाल्याशिवाय आपलें समाधान होणार नाहीं ही त्यांची बालंबाल खात्री झाली होती. त्यामुळें ते नेहमीं सत्पुरुषांच्या शोधांत असत. एखाद्या सत्पुरुषासंबंधीं माहिती मिळाल्यास ते ती टिपून ठेवीत व सवडीप्रमाणें त्याच्या दर्शनाला जात. अशा रीतीनें त्यांनीं सुमारें चाळीस पन्नास सत्पुरुषांची एक यादी केली

गेल्यावर त्यांनीं आपल्या घरीं ती दत्ताची तसबीर मांडून दररोज पंतांचीं पदें म्हणून भजन करण्याचा व टिपरी खेळण्याचा क्रम सुरू केला. त्यामुळें त्यांचे येथें भजनाला बरीच मंडळी जमूं लागली. पुढें लौकरच त्यांचे धाकटे बंधु हरिपंत व विष्णु हरि कुळकर्णी यांचा भाऊ यशवंत यांनींहि बेळगावीं जाऊन पंतांकडून अनुग्रह घेतला. त्यानंतर अण्णांचा पुतण्या गोविंद कृष्ण व विष्णुपंतांचे आणखी दोघे बंधु श्रीपाद व व्यंकटेश, तसेंच विष्णु श्रीपाद दिवाण, नारायण दत्तात्रय कुळकर्णी, गोविंद सदाशिव कुळकर्णी, भिमाजी सदाशिव कुळकर्णी, गोविंद विठ्ठलभट जोशी, सिताराम भिमराव देसाई, अधिकारी, शिवरामभट शेवडे, अप्पा नरसगौडा पाटील, विठू गोंधळी, सिताराम काशीराम शिंपी, परशराम नरहर कुळकर्णी वगैरे अकोळची बरीच मंडळी व त्या बहुतेकांच्या घरांतलि मंडळी यांचेवर पंतांचा अनुग्रह झाला व अकोळ हें भक्तमंडळीचें केंद्र बनलें. तेथील भक्तमंडळी एकनिष्ठ व दृढनिश्चयी असल्यामुळें पंतांचें तें एक आवडीचें ठिकाण झालें.

याच सुमारास कोल्हापूर येथलि वैश्य जातीचे एक गृहस्थ बळवंतराव ऊर्फ कृष्टप्पा राचप्पा नाईक मंडवळे यांनीं पंतांकडून अनुग्रह घेतला. ते फार श्रीमंत असून कर्तबगार व विनोदी होते. त्यांचे नंतर हरिभाऊ गोसावी, बळवंतराव दंडवते, रामभाऊ ठाकूर, रामभाऊ कुबेर वगैरे कोल्हापूरमधील वऱ्याच गृहस्थांनीं पंतांकडून अनुग्रह घेतला व अकोळप्रमाणें कोल्हापूर येथेंहि पंतांचे बरेच शिष्य झाले. १८८६ पर्यंत रावजी दड्डीकर हे बेळगाव जिल्ह्यापैकीं चंदगड येथें मुखत्यार वकील म्हणून काम करीत असत. पण त्या सालीं पंतांची संमति घेऊन ते कुरुंदवाड येथें वकिली करूं लागले व त्यानंतर कुरुंदवाड येथेंहि पंतांचे बरेच शिष्य झाले. तसेंच बेळगाव जिल्ह्यापैकीं चिकालगुड येथील केशवराव बळवंत पाटील, त्यावेळीं पाच्छापूर येथें राहात असलेले कृष्णाजी शेषो हुबळीकर व बेडकीहाळ येथील रामभाऊ कुळकर्णी वगैरे मंडळींनींहि पंतांचें शिष्यत्व पत्करिलें. याच सुमारास बेळगाव येथील पाटील घराण्यापैकीं भीमराव व्यंकटराव पाटील यांच्या घरीं सावंतवाडी येथलि सेनापति घराण्यांतील कानोजीराव नावाचा एक मुलगा राहात असे; त्याच्या घरची स्थिति खालावलेली असल्यामुळें त्याचा विद्याभ्यासहि म्हणण्यासारखा झालेला नव्हता. तो स्वभावानें उमदा असून शरीरप्रकृतीनें सुदृढ होता. त्यावेळीं त्याला नोकरी वगैरे नसल्यामुळें तो फार दिलगीर असे. पंतबंधु वामनची व त्याची मैत्री असल्यामुळें तो पंतांकडे जात असे. पुढें पंतांची त्याच्यावर मर्जी बसली व त्यांनीं त्याचेवर अनुग्रह केला. त्याला " बाबासाहेब सेनापति " असेंहि म्हणत. पुढें कांहीं दिवसांनीं बाबासाहेबांच्यामुळें भिमराव पाटील पंतांकडे येऊं लागले व त्यांचेवरहि पंतांचा अनुग्रह झाला आणि दिवसेदिवस मराठे लोकांत पंतांचे पुष्कळ शिष्य होऊं लागले.

## घरांतील व्यवस्था व शिस्त

या व मागील प्रकरणांत १८८६–८९ च्या सुमारास पंतांचे शिष्य असलेल्या कांहीं जणांचीं नावें दिलीं आहेत. पण तीं फक्त ठळक ठळक अशा पांढरपेशा मंडळींचीं

आहेत. परंतु ज्यांचा येथें नामनिर्देश करितां आला नाहीं अशा किल्येक इसमांना १८८६ ते १८८९ या चार वर्षांत पंतांचा अनुग्रह झाला. पंत आपल्या शिष्यप्रबोधनकार्यांत शिष्यांची जात, गोत, वर्ण, आश्रम, धर्म वगैरे गोष्टींकडे पाहून भेदाभेद करीत नसत. जो लीन भावानें शरण येई त्याला ते बोध करीत व ज्या प्रेमानें व अभेद बुद्धीनें ते विद्वान ब्राम्हणाला बोध करीत, त्याच प्रेमानें आणि बुद्धीनें एखाद्या हीन समजल्या जाणाऱ्या मनुष्याला व परधार्मीयालाहि बोध करीत. अकोळ येथील श्रीमंत सावकार विष्णु हरि कुळकर्णी यांचेवर जसा पंतांकडून अनुग्रह झाला तसाच त्यांच्या घरीं पाणी भरणाऱ्या सिताराम नावाच्या पाणक्यावरहि झाला. त्या उभयतांनाहि त्यांनीं एकाच शुद्ध प्रेमाची देणगी दिली व तीच अंत्यजांना व परधर्मीयांनाहि दिली. एक युरोपियन सोल्जर पंतांचा शिष्य होता. तो मधुन मधुन त्यांच्याकडे येत असे व बूट काढून त्यांच्या पायांवर डोकें ठेवून जात असे ! येथें सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, जशी ब्राम्हण मंडळांत पंतांच्या शिष्यांची संख्या वाढत चालली तशी ती ब्राम्हणेतर मंडळींतहि वाढत चालली.

याचा परिणाम असा झाला कीं, पंतांच्या घरीं भक्तमंडळींची येजा फार सुरू झाली. परगांवाहून येणारा प्रत्येक भक्त त्यांच्याकडेच उतरत असे व त्याचें जेवणखाणहि बहुतेक तेथेंच होत असे. त्यामुळें पंतांच्या घरांतील कामकाजाचा व्याप वाढत चालला. त्यावेळीं त्यांची स्थिति गरिबीचीच असल्यामुळें घरांत नोकर चाकर नव्हतेच. पंत, गोपाळराव व विद्यार्थी यांचा बहुतेक वेळ त्यांच्या त्यांच्या व्यवसायांत जात असे. त्यामुळें बाजारहाट, पाहुण्यांचें आदरातिथ्य, औषधपाणी वगैरे घरची व्यवस्था पंतबंधु गोविंदराव पाहात असत. ते हीं कामें मोठ्या तत्परतेनें, उत्साहानें व शांतपणानें करीत व घरांतील मंडळीं-मध्यें मतभेद, रुसवा फुगवा, किरकोळ भांडणतंटे वगैरे कांहीं दिसून आल्यास ते पंतांपर्यंत न जातील अशा रीतीनें त्यांचा निकाल लावून सर्व कारभार सुरळीतपणें चालेल अशाबद्दल ते फार दक्ष असत.

परगावची मंडळी पंतांच्या दर्शनाला आली म्हणजे घरांतील मंडळींच्या व पाहु-ण्यांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था ठेवणें भाग पडत असे. १८८९ पर्यंत पंतांचें कुटुंब सौ. यमनाक्का यांचेखेरीज स्वयंपाक व घरांतील इतर कामकाज करण्यास कोणी नव्हतें व नोकरचाकरहि नव्हते. परंतु त्या तें सर्व मोठ्या हौसेनें व दक्षतेनें करीत व सुगृहिणी-पदाला शोभेल अशा रीतीनें सर्वांचा परामर्ष घेत असत. त्यांतल्या त्यांत पंतांचा अधि-कार काय आहे व त्यांचेकडे येणारी मंडळी कोणत्या भावनेनें येतात याची सौ. यमनाक्कांना पूर्ण जाणीव असल्यामुळें, पंतांकडे येणाऱ्या भक्तमंडळींची त्या, आपल्या मुलांप्रमाणेंच, खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवीत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पंतांच्या भोवतालची सर्व मंडळी विचारी, सुस्वभावी, आज्ञाधारक व त्यांच्या कार्याला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रीतीनें हातभार लावणारी होती. त्यामुळें त्यांचे प्रपंच व परमार्थ दोन्हीं सुरळीतपणें चालून दोहोंचीहि उत्तरोत्तर वाढ होत गेली.

पंतांच्या घरीं भक्तमंडळीची येजा जरी नेहमीच चालत असे तरी उत्सवप्रसंगीं

येणाऱ्या मंडळीचा भरणा दिवसेदिवस अधिकाधिक होऊं लागला. त्यामुळें उत्सवाच्या दिवसांत, कांहीं दिवस आधीं व कांहीं दिवस नंतर घरांतील व्यवस्था ठेवण्याचें काम फारच बिकट होत चाललें. पण गोविंदरावजी तें फार कळकळीनें व उत्साहानें करीत आणि घरांतील सर्व कारभार व उत्सवांतील कार्यक्रम सुरळितपणें पार पडत. याचें मुख्य कारण असें होतें कीं, पंतांच्या घरांतील सर्व मंडळींची त्यांच्यावर पूर्ण निष्ठा असून त्यांचा शब्द सर्वांना वेदतुल्य वाटे. त्यामुळें सर्व कारभार एकसूत्रीपणानें चाले व प्रत्येक गोष्टींत जूट व शिस्त आढळून येत असे. तरीपण पंतांकडे येणाऱ्या मंडळींची संख्या बरीच असली म्हणजे घरांतील व्यवस्था ठेवण्याची मोठी पंचाईत पडे. साधारणपणें पंतांकडे येणारा प्रत्येक शिष्य अगर भक्त लीनपणानेंच येत असे व आपापली शक्य ती सोय करून घेई आणि घरांतील मंडळींना विनाकारण त्रास न होईल याबद्दल काळजी बाळगीत असे. पण अशी कांहीं मंडळी असत कीं स्नान केलें कीं धोतर न धुतां तसेंच ठेवून द्यावयाचें. अशीं कांहीं धोतरें राहिलीं म्हणजे, मिळाल्यास घरांतील मुलांचें साह्य घेऊन, गोविंदरावजींना तीं धुवावीं लागत. एकदां असें झालें कीं पंतांची बरीच शिष्य-मंडळी बाहेरगावांहून आलेली होती. त्यांपैकीं कांहींजण स्नान करून आपलीं धोतरें तशींच टाकून पंत असतील तेथें वेदान्तचर्चा अगर गप्पागोष्टी ऐकत बसत. त्यामुळें त्यांचीं धोतरें गोविंदरावजी व पंतांचा मावसभाऊ आण्णापा मारीहाळकर ( गणपतरावांचा धाकटा भाऊ ) यांना तीं धुऊन वाळत घालावीं लागत. असे दोन तीन दिवस गेले. त्यानंतर एके दिवशीं आण्णापा अशक्त असल्यामुळें धोतरें धुतांना तो इतका वैतागला कीं तो, होता तसाच ओलेता, पंत बसले होते तेथें गेला व त्यांच्यापुढें साष्टांग नमस्कार घालून रोज घडत असलेला प्रकार त्यानें निवेदन केला. तेव्हां ज्यांनीं आपलीं धोतरें धुतलीं नव्हतीं ते खजिल झाले व पंतांनीं त्याची समजूत घालून प्रत्येकानें स्नान केल्याबरोबर आपलें धोतर धुऊन वाळत घातलें पाहिजे अशीं सर्वांना ताकीद दिली. तेव्हांपासून तो नियम अमलांत येऊं लागला व अशाच प्रकारचे आणखी कांहीं नियम होऊन घरांतील कारभार सुरळितपणें चालूं लागला.

## उत्सवमूर्तीची योजना कशी झाली ?

पंतांच्या घरीं गुरुद्वादशी, दत्तजंयती वगैरे उत्सव भक्तिभरानें व थाटानें होऊं लागल्यापासून उत्सवाचे वेळीं उत्सवमूर्ति म्हणून ठेवण्याकरितां श्रीदत्ताचा एखादा मुखवटा असला तर बरा असें पंतांना वाटत होतें. त्याच सुमारास रावजी दड्डीकर कुरुंदवाडास असतांना त्यांना असा दृष्टांत झाला कीं, तूं श्रीदत्ताचा एक मुखवटा तयार करवून तो बेळगावास पंतांकडे पाठव. लगेच रावजींनीं ही हकीगत पंतांना कळविली व पंतांनीं मुखवटा तावडतोब तयार करवून घेऊन तो बेळगावास पाठविण्याबद्दल लिहिलें. त्याप्रमाणें रावजींनीं नरसिंहवाडीस मुखवटा तयार करवून घेतला व त्यावेळीं आगगाडीची सोय नसल्यामुळें व खर्चाची अडचण असल्यामुळें तो आणण्याकरितां पंतांचे दोन शिष्य, राघू अवधूत व बंड्ड गुमास्ते हे पंतांच्या सांगण्यावरून बेळगावाहून कुरुंदवाडास चालत गेले व मुखवटा

बेळगावास घेऊन आले. तेव्हांपासून दर उत्सवाचे वेळीं तो मुखवटा उत्सवमूर्ति म्हणून ठेवण्यांत येऊं लागला.

## " गुरुप्रेम म्हणजे काय ? "

पंतांकडे येणाऱ्या मंडळींत आधुनिक पद्धतीनें शिकलेले कांहीं लोकहि चर्चा करण्यास येत असत. बेळगाव जिल्ह्यापैकीं अष्टे गावचे इनामदार बाळासाहेब हे सुशिक्षित असून पंतांचे शिष्य होते व ते बेळगाव येथें लष्करांत असलेल्या "फ्री मेसन सोसायटी" या संस्थेचे सभासद होते. त्याच संस्थेचे सभासद असलेल्या पद्मनाभराव व गणपतअय्या नावाच्या दोन सद्गृहस्थांना बाळासाहेबांकडून पंतांसंबंधीं माहिती मिळाली व त्यांना वेदांत विषयाची आवड असल्यामुळें ते बाळासाहेबांबरोबर मधुन मधुन पंतांकडे येऊं लागले. तेथें त्यांची पंतांबरोबर निरनिराळ्या विषयांसंबंधीं चर्चा चालत असे. एके दिवशीं ते पंतांना म्हणाले कीं, " जोंपर्यंत वेदान्त विषयावरील ग्रंथ फक्त संस्कृत भाषेंत होते तोंपर्यंत गुरूची जरूरी भासत असेल. पण आतां ते ग्रंथ प्राकृत भाषेंत झाल्यामुळें गुरूची जरूरी काय राहिली ? भाषाज्ञान झालें कीं पुरे. " तेव्हां पंत म्हणाले, "ग्रंथांवरून फक्त " अहंब्रह्मास्मि " हें शब्दज्ञान होईल. पण तें ज्ञान स्वानुभवसिद्ध होऊन सहज स्थितींत येण्यास सद्गुरुशिवाय गति नाहीं; कारण जाणिवेचा अभिमान लीन होण्यास त्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. म्हणूनच पूर्वीचे महान महान ऋषि व साधुसंत यांनीं सद्गुरूचें महत्व गाइलें आहे व ते पूर्ण ज्ञानी असूनहि देहपातापर्यंत सद्गुरूच्या भजनपूजनांत काळ घालवीत असत. " पुढें कांहीं दिवसांनीं गुरुद्वादशीचा उत्सव आला. त्याकरितां पंतांकडे निरनिराळ्या ठिकाणची भक्तमंडळी जमूं लागली व त्या सर्वांचा उत्साह, पंतांवरील त्यांची अचल निष्ठा व पंतांचें त्यांचेशीं अत्यंत प्रेमळपणाचें व सलगीचें वागणें वगैरे गोष्टी पाहून त्यांना फार कौतुक वाटलें आणि गुरुशिष्यांमध्यें जें नातें व जो संबंध सर्व साधारणपणें आपण पाहतों त्यापेक्षां या गुरुशिष्यांमधील निरक्षेप प्रेम व सलगी हीं कांहीं निराळींच आहेत असें त्यांना वाटूं लागले. त्यामुळें त्यांची पंतांवर श्रद्धा बसून ते पंतांना म्हणाले कीं, " पंत, तुम्हींच आमचे गुरु होऊन " गुरुप्रेम " म्हणजे काय तें आम्हांला दाखवा. " तेव्हां पंतांनीं उत्सव संपल्यावर बाहेरगावची आलेली गुरुभक्त मंडळी परत जाण्याचे पूर्वीं एक मोठा " दरबार " भरविण्याचें ठरवून त्या वेळीं बाळासाहेब अष्टेकर व त्यांचे स्नेही पद्मनाभराव व गणपतअय्या यांना बोलाविलें.

हा दरबार म्हणजे मोठ्या प्रमाणावर भजनाचा व व्याख्यानाचा समारंभच होता असें म्हटलें असतां चालेल. पंतांचें राहातें घर लहान असून मंडळी फार असल्यामुळें व कोनवाळगल्लींत राहात असलेले पंतांचे शिष्य शामराव जिनराळकर यांचें घर मोठें असल्यामुळें जिनराळकरांच्या घराच्या मधल्या वठणांत हा दरबार भरविण्याचें पंतांनीं ठरविलें. त्या वठणाच्या मध्यभागीं एक मोटें मेज ( टेबल ) ठेवून व त्याचेवर पांढरी शुभ्र चादर घालून शामदानें ठेविलेलीं होतीं. त्या टेबलाच्या एका बाजूस उत्तम तऱ्हेनें शृंगार-

लेल्या खुर्चीवर पंत बसले होते. त्यांचे पाठीमागें त्यांचे गुरुबंधु व मावसबंधु गणपतराव मार्ाहाळकर बसले असून पंतांच्या एके बाजूस पुटप्पा कणबर्गी व दुसरे बाजूस सर्जेराव हेळेवार्डीकर हे ( बॉडीगार्ड ) उभे होते. पंतांच्या उजव्या हाताला तीन खुर्च्या असून त्यांवर त्यांचे गुरुबंधु गोपाळ भागोजीकोप, रावजी दड्डीकर व अण्णा अकोळकर हे बसले होते व पंतांच्या डाव्या हाताकडे तीन खुर्च्यांवर पद्मनाभराव, गणपतअय्या व अमृतराव देशपांडे हे बसले होते. परशरामपंत, बळवंतराव मंडवळे कोल्हापूरकर, विष्णु हरि कुळकर्णी अकोळकर व विठू सोनार दड्डीकर हे चौघे चार बाजूंना हातांत लांब सोटे घेऊन उभे होते व इतर सुमारें शें सव्वाशें गुरुभक्तमंडळी वीरासनें घालून जमीनीवर बसली होती. प्रथम थोडें भजन झाल्यावर रात्रीं सुमारें ११ वाजण्याचे सुमारास पंतांनीं बोध सांगण्यास सुरवात केली व त्यांचा बोधवर्षाव सारखा अविरतपणें सुरू होता. सर्व मंडळी पूर्ण एकाग्रतेनें तो ऐकत होती व सर्वांच्या चित्तवृत्ति अगदीं तल्लीन होऊन गेल्या होत्या. तशा स्थितींत जेव्हां " तुझिये चरणरजीं मी लोळें ॥ धृ. ॥ प्रत्यगात्मा देहीं तूंची । मन-वाणीसी न कळे ॥ १ ॥ तव स्वरूपसिंधूमाजीं । विश्वतरंग खेळे ॥ २ ॥ सगुण निर्गुण अभेद खूण । दत्तस्वरूपीं मिळे ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २८८ ) हें पद म्हणण्यास पंतांनीं सुरवात करून त्यांतील सगुण प्रेमाचें व अभेद भक्तीचें रहस्य ते समजावून सांगूं लागले तेव्हां सर्व मंडळींच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा चालू असून आपण प्रेमसागरांत पोहत आहोंत असें प्रत्येकाला वाटत होतें. अशा रीतीनें दुसऱ्या दिवशीं सकाळीं सात वाजेपर्यंत दरबारचा कार्यक्रम चालला होता ! या दरबारच्या प्रसंगीं पद्मनाभराव व गणपतअय्या यांना गुरुप्रेम म्हणजे काय याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यास मिळाला व वाचामनातीत ज्याचा अनुभव तें गुरुप्रेम ग्रंथांमध्यें मिळणारें नसून सद्‌गुरूच्या कृपेवाचून त्याचा अनुभव मिळणें नाहीं अशी त्यांची खात्री झाली आणि तेव्हांपासून ते पंतांना गुरु मानूं लागले.

## काशीकरबूवा

या सुमारास काशीनाथ पंतलू ऊर्फ काशीकरबूवा नावाचे एक सत्पुरुष पंतांच्या भेटीला आले व त्यांना पंतांसंबंधीं इतका आदर व पूज्यभाव वाटूं लागला कीं ते पुढें पंतांच्या जवळ त्यांच्या घरांतील एखाद्या माणसाप्रमाणें राहूं लागले. ते मूळचे मद्रासकडील राहणारे. त्यांनीं हैद्राबाद संस्थानांत मामलतदाराच्या हुद्यावरहि काम केलें होतें व पैसाहि बराच मिळविला होता. त्यांना वैदिकी, वैद्यकी व कायदा वगैरे विषयांचें चांगलें ज्ञान असून वेदान्तविषयाची फार आवड होती. त्यांना कानडी, तेलगू, इंग्रजी वगैरे दोन चार भाषा येत होत्या. आपली हैद्राबाद संस्थानांतील नोकरी सोडून आपलें कुटुंब व मातोश्री यांच्यासह ते काशीस जाऊन राहिले. तेथें गेल्यावर त्यांचें कुटुंब व मातोश्री या दोघीहि वारल्या. नंतर त्यांनीं चातुर्थाश्रम स्वीकारला व ते निरनिराळ्या ठिकाणच्या यात्रा करून अखेर दड्डीपासून तीन चार मैल दूर असलेल्या शहापूर तालुक्यापैकीं पर-शानहट्टी गावच्या डोंगरावरील एका गुहेंत राहूं लागले. पुढें आसपासच्या गावांत त्यांचे कांहीं शिष्यहि झाले.

एकदां पंतांचे बंधु गोविंदरावजी हे दड्डीस आजोळीं गेले असतां ते व दड्डी येथील पंतांचे शिष्य विठू व गुंडु सोनार हे काशीकरबुवांची कीर्ति ऐकून त्यांच्या दर्शनाला गेले व तेथें त्यांनीं पंतांच्या पदांपैकीं कांहीं पदें म्हटलीं. तीं ऐकून बूवांना फार आनंद झाला व तीं कोणीं केलीं यासंबंधीं त्यांनीं चौकशी केली आणि तीं पंतांनीं केल्याचें समजतांच " सवडीप्रमाणें मी पंतांना भेटेन " असें ते म्हणाले. पुढें कांहीं दिवसांनी बूवांचे एक शिष्य नागनूर गावचे निंगपा देसाई हे बेळगावास आले असतां बूवाहि त्यांचेबरोबर बेळगावास आले व खडेबाजारांतील एका घरांत उतरले. त्यावेळीं पंतांची शाळा जवळच असल्यामुळें बूवांनीं पंतांना बोलावणें पाठविलें. तेव्हां पंत आपले शिष्य अमृतराव देशपांडे यांच्यासह त्यांच्या भेटीला गेले. तेथें त्या उभयतांचें बराच वेळ संभाषण झालें व त्यांना परस्परांसंबंधीं फार आदर वाटूं लागला; तो इतका कीं नंतर कांहीं दिवसांनीं बुवा पंतांच्या भेटीला बेळगावास आले असतां पंतांनीं त्यांना आपल्याच घरीं राहण्यास सांगितलें व ते पंतांच्याच घरीं राहूं लागले. तेथें पंतांच्या व त्यांच्या अध्यात्मविषयासंबंधीं नेहमीं गोष्टी चालत असत. बुवांचा स्वभाव फार शांत, निराग्रही व प्रेमळ होता. ते पंतांना फार पूज्य मानीत व त्यांना " पंतलू " म्हणत व पंतहि त्यांना वडिलांप्रमाणें मान देत. बुवा पंतांच्या घरीं राहात असतां त्यांचे कांहीं शिष्यहि तेथें येत व ते पंतांना फार पूज्य मानीत.

एकदां असें झालें कीं पंतबंधु गोविंदराव व विठू व गुंडु सोनार, सर्जेराव हेळेवाडीकर, चनवीरय्यास्वामी वगैरे दड्डींतलि कांहीं भक्त गोकुळाष्टमीच्या उत्सवासाठीं बेळगावास येण्याकरितां दड्डीहून निघाले. त्यांचेबरोबर दोन तीन स्त्रियाहि होत्या. ते पावसाचे दिवस असल्यामुळें ही सर्व मंडळी पायवाटेनें निघाली. परशानहट्टीच्या डोंगरांतून ते जात असतां त्यांना चोरांनीं अडविलें व त्या सर्वांचे कपडे व इतर जिन्नस काढून घेतले. त्या चोरांत "येल्या" नावाचा एक बेरड असून तो काशीकरबुवांचा शिष्य होता. त्याला काय वाटलें असेल तें असो, त्यानें पुढें येऊन या मंडळीपाशीं " तुम्ही कोण, कोठील ? " वगैरे चवकशी केली. तेव्हां गोविंदरावजींनीं त्याला सर्व हकीगत सांगितली. काशीकरबुवांकडून त्याला पंतांसंबंधीं माहिती मिळालेली असावी; कारण आपण गोकुळाष्टमीच्या उत्सवाकरितां बेळगावास पंतांच्या घरीं जात असल्याचें गोविंदरावजींनीं सांगतांच त्याला फार पश्चात्ताप झाला आणि त्यानें सर्वांचे कपडे व इतर जिन्नस परत दिले. इतकेंच नव्हे तर त्यानें आपल्या साथीदारांपैकीं कांहीं लोक या मंडळींच्या बरोबर दिले व त्यांच्यापैकीं एकेकानें या मंडळींपैकीं एकेकाला अडचणीच्या जागीं खांद्यावर घेऊन त्यांना बेळगावपर्यंत पोचविलें. नंतर जेव्हां ही हकीगत काशीकरबुवांच्या कानावर गेली, तेव्हां त्यांना फार आनंद झाला.

# प्रकरण २६ वें

---:o:---

**बोधपर पत्रव्यहार; दङ्डींची खेप व दत्तवाडकर पाटील; अकोळची पहिली खेप; अण्णांच्या मुलीची भूतबाधा दूर केली; प्रापंचिक व पारमार्थिक दृष्ट्या होत चाललेली प्रगति; अमृतराव देशपांडे; देशपांडे गल्लींतील अमृतरावांच्या घरांत बिऱ्हाड नेलें; जागेची सोय; दत्तमंदीर.**

---:o:---

## बोधपर पत्रव्यवहार

परगावीं राहाणाऱ्या पंतांच्या शिष्यांची व भक्तांची संख्या जसजशी वाढत चालली तसतसा त्यांच्या बोधाचा ओघ तिकडे वळून पत्रांच्या रूपानें तो व्यक्त होऊं लागला. पंतांनीं आपल्या गुरुबंधूंना व शिष्यांना लिहिलेल्या कांहीं बोधपर पत्रांचा मागें उल्लेख केलाच आहे. पण १८८७–८८ च्या सुमारास अकोळ, कुरुंदवाड, कोल्हापूर, बेडकीहळ, चिकालगुड वगैरेकडील कांहीं मंडळींनीं पंतांकडून अनुग्रह घेतल्यापासून त्यांच्या बोधसरितेचे ओघ निरनिराळ्या दिशांनीं वाहूं लागले. शिष्यांची आध्यात्मिक उन्नति कशी होईल याबद्दल पंत फार काळजी बाळगीत असत व पत्रांच्या रूपानें त्यांचा बोधवर्षाव सतत चालू असे. अशा शिष्यांना लिहिलेल्या त्यांच्या पत्रांत, अनिमित्त गुरुप्रेम, शुद्ध अद्वैतबोध व विषम प्रपंच करीत असतां येणाऱ्या प्रसंगांतून धैर्यानें सुरक्षितपणें कसें पार पडावें यासंबंधीं दिलेल्या सूचना वगैरे गोष्टीच प्रामुख्यानें येत असत. त्यांतल्या त्यांत ज्याप्रमाणें पंतांनीं कल्याण व गोपाळ भागोजीकोप या गुरुबंधूंना लिहिलेल्या पत्रांत परमावधीची अनिमित्त बंधुप्रीति व्यक्त होत असे त्याप्रमाणें अण्णा अकोळकरांना लिहिलेल्या पत्रांत बोधाबरोबर पंतांच्या व त्यांच्यामधील सलगी व्यक्त होऊं लागली. पंतांनीं अण्णांना बोधपर असें पहिलें पत्र ५–६–८८ रोजीं लिहिलें त्या पत्राच्या अखेर पंत लिहितात, “ निराश होऊन आपला आनंद भोगीत क्षुद्र विषयांचें स्मरण दडून, वृत्तीची स्थिरता महाराजाचे चरणीं झाली कीं, सगुणनिर्गुणीं अद्वितीय प्रेम आपोआप व्यापूं लागतें. जसजसा आत्मानुभव वळावत जाईल, वृत्ति ब्रह्मीं तत्पर होत जाईल आणि निर्विषय सुखाकडे धाऊं लागेल, तसतसें गुरुप्रेम वाढत जाईल. वृत्ति वैराग्यानें तापवून विषयेच्छा न करितां, एकाग्रपणें ध्यानस्थ झालें कीं, सगुणदर्शन, निर्गुणसाक्षात्कार साहजीकच होतील. मिथ्याचें मिथ्यदृष्टीनें मिथ्यत्व सिद्ध करून, सत्याचें सत्यदृष्टीनें सत्यत्व साधिलें कीं, कार्य जाहलें. ज्याचा त्यानें विचार केला पाहिजे. सद्गुरूची मूर्ति कांहीं दूर नाहीं. आपली

प्रसन्नता तीच त्याची कृपा: आपली विषयसन्मुखता तीच त्याची अवकृपा " (पु.४–१४४); याच पत्राच्या शेवटीं ' श्रीदत्तप्रेमलहरी ' या पद संग्रहांतलि तीन पदें दिलीं आहेत. वरील पत्र लिहिल्यानंतर त्या उभयतांमध्यें अत्यंत बोधप्रद व सलगीचा पत्रव्यवहार सुरू झाला व अशीं तसि पत्रें ' श्रीदत्तप्रेमलहरी ' पुष्पमालेंतलि पुष्प ४ व ५ मध्यें प्रसिद्ध झालीं आहेत. तसेंच, रावजी कुरुंदवाड येथें राहूं लागल्यापासून त्यांचाहि पंतांशीं पत्रव्यवहार सुरू झाला. ते आपल्या शंकाकुशंका निर्भीडपणें पंतांपुढें पत्रद्वारें मांडूं लागले. व पंतहि सलगीच्या भाषेंत सडेतोडपणानें त्या शंकाकुशंकांचें निरसन करूं लागले. त्यामुळें पंतांचा रावजींशीं नेहमीं पत्रव्यवहार चालू झाला व पंतांनीं लिहिलेल्या पत्रांत सिद्धांतप्रतिपादन, तत्वविवेचन, शंकानिरसन, सलगी वगैरे गोष्टींवर विशेष भर असे. त्यांनीं रावजींना लिहिलेलीं ६३ पत्रें पुष्प ४ व ५ मध्यें प्रसिद्ध झालीं आहेत. त्याचप्रमाणें विष्णु हरि, यशवंत हरि वगैरे अकोळमधील इतर शिष्यमंडळी व कोल्हापूर, बेडकीहाळ वगैरेकडील शिष्यमंडळी यांचेशींहि पंतांचा पत्रव्यवहार सुरू झाला. परगावांहून येणाऱ्या शिष्यांच्या व भक्तांच्या पत्रांना उत्तरें देऊन त्यांच्या शंकांचें निरसन करणें व आत्मानुभवाच्या मार्गांत त्यांचें पाऊल पुढें पडावें म्हणून त्यांना यथायोग्य बोध करणें हें फुरसुदीच्या वेळीं करण्याचें पंतांना एक कामच झालें व स्फुट लेख लिहिण्याचें कार्य बऱ्याच अंशानें पत्रद्वारें होऊं लागलें. तसेंच बेळगावच्या बाहेर असलेल्या शिष्यांच्या आग्रहावरून पंतांना मधुन मधुन सुटीच्या दिवसांत त्यांचे गावीं जावें लागे.

## " मला ' दत्त ' म्हणा ! "

वर लिहिल्याप्रमाणें सुटीच्या दिवसांत पंत मंडळीसह बहुतेक दड्डीस जात. त्याप्रमाणें १८८८ च्या नाताळांत ते मंडळीसह दड्डीस गेले होते व अण्णा वगैरे अकोळची मंडळीहि तेथें गेली होती. दड्डी येथें पंतांचे एक शिष्य रामचंद्रभट यांनीं एक दत्तमंदिर बांधिलें होतें व पंत दड्डीस गेले म्हणजे त्यांचें भजनपूजन त्या मंदिरांत होते असे. १८८८ च्या नाताळांत पंत दड्डीस गेले असतां एके दिवशीं त्या मंदिरांत बरीच भक्तमंडळी जमली होती. त्यांच्यांत एक वृद्ध गृहस्थ होते. त्यांना " दत्तवाडकर पाटील " म्हणत. ते अवधूतसंप्रदायी असून " आपणाला पंतांच्या अगोदर बालमुकुंदांकडून अनुग्रह झालेला आहे त्यामुळें आपण पंतांचे वडील गुरुबंधु आहोंत, " असें सांगत. पंतांचे शिष्य जो मान त्यांना देतात तोच त्यांनीं आपणास द्यावा व जशी ते मनोभावानें पंतांची सेवा करितात तशीच त्यांनीं आपलीहि सेवा करावी असें त्यांना वाटे व पंतांच्या शिष्यांनीं तसें न केल्यास त्यांना फार राग येई ! पंतांच्या ही गोष्ट लक्षांत होती. पण निष्कारण कोणाचेंहि मन दुखविणें त्यांना बरें वाटत नसल्यामुळें ते दत्तवाडकर पाटलांशीं वादविवाद न करितां त्यांच्या वयाकडे पाहून त्यांना मोठेपणा देत असत. परंतु पंतांच्या शिष्यमंडळींना पाटलांचें चढेलपणाचें व आढ्यतेचें वर्तन आवडत नसे. पंत आपल्याला मान देतात या गोष्टीनें फुगून जाऊन, ते दड्डीहून परत गेल्यावर, दत्तवाडकर पाटलांनीं त्यांच्या

कांहीं शिष्यांवर अधिकार गाजविण्यास सुरवात केली व " मीच दत्त आहें, माझी आज्ञा तुम्ही पाळली पाहिजे " असें सांगून ते त्यांना कांहीं आज्ञा करूं लागले. पेव्हां पंतांचे शिष्य यशवंत हरि कुळकर्णी यांनीं ती गोष्ट पत्रद्वारें पंतांना कळविली. त्या पत्राला १२-१-१८८९ रोजीं पंतांनीं जो जबाब लिहिला त्यांत ते लिहितात, " अहंकाराची बेडी घातलेल्यास विशेष मान देतां कामा नये. फक्त ज्यास त्याचेप्रमाणें (आपलें राखून) ठेवावें. " अन्यथा शरणं नास्ति. " समर्थाखेरीज अन्य कोणाचीहि आज्ञा ऐकावयाची नाहीं. निरहंकारपणें समर्थचरणीं निश्चिंत राहावें. आपलें कर्तव्य दुसरें कांहीं नाहीं. " ( पु. ४-१७४ ) तसेंच, १३-१-१८८९ रोजीं रावजींना लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात "मीच दत्त" म्हणून आज्ञा करण्याचें वेड समजून आलें. दड्डी मुक्कामीं 'कटवू' उभा करून वर्चस्व दिलें होतें. तेवढ्यावरच फुगून भलत्यावर अंमल चालवूं पाहाणाऱ्यास काय म्हणाल ? अभिमान दवडल्याचें चिन्ह काय हें ? असो. त्याशीं आपलें कर्तव्य नाहीं. आल्यास गोड बोलून पाठविणें. खेळ कोणताहि त्याशीं खेळूं नये. बोध सांगितल्यास ऐकावा. विनाकारण आज्ञा बिलकुल ऐकूं नयेत. सिंहाचे बच्चे कोल्ह्याचे गारुडास भुलत नसतात. जाणून हुषार. अशीं उदाहरणें पाहून मनुष्यास ज्ञानकाळींहि माया कशी आवरण घालिते, कसा अभिमान हळुच तावा चालवितो व गुरुत्व घेण्यास लावून प्रेमाचें मातेरें करितो, हें पाहून अभिमानास दूर राखावें. समर्थांच्या द्वारांचे श्वान होण्यांत जें सुख आहे तें ज्ञानाभिमानांत नाहीं. केव्हांहि नीचत्व घेऊन त्याच्या भजनांत रमत असावें यांत हित आहे. उगीच शब्दजाल वाढवून शुष्क वादांत काळ घालविणाऱ्याची संगत दूर राखवेल तेवढी बरी. " ( पु. ४-१७५ ) तसेंच १४-१-१८८९ रोजीं अमृतराव देशपांडे यांना लिहिलेल्या पत्रांत पंतांनीं वरील गोष्टीचा उल्लेख करून असें म्हटलें आहे कीं, " पहा केवढा चमत्कार ! आधीं परमार्थाकडे लक्ष लागणें कठीण; त्यांत मार्ग सापडून त्याच्या सिद्धयर्थ सुसंगत मिळणें फारच मुष्किल; शिवाय आपली वृत्ति उर्ध्वगामी होऊन सुधरत जाणें सुकृताशिवाय होणें नाहीं. अशांत शुष्क ज्ञानाभिमानकोंडें अकस्मात न कळतच मायादेवी आणून घालिते; व तेणेंकरून प्रेमाचे अंकुर आपोआप सुकून जातात. अशांचा वाराहि प्रेमधुंदांस उपयोगी नाहीं. अशांस पुन्हां सुधारण्यास सद्‌गुरूसहि कठीण पडतें. " ( पु. ४-१७७ )

## " अण्णा तुझ्या घरीं पिशाच्च आहे ! "

रावजी दड्डीकर कुरुंदवाड येथें वकिली करीत असल्यामुळें व अकोळास व इतर गावीं पंतांचे बरेच शिष्य असल्यामुळें त्यांच्या आग्रहावरून १८८९ च्या डिसेंबर महिन्यांत नाताळचे सुटींत पंतांनीं मंडळीसह कुरुंदवाडास जाण्याचें ठरविलें. प्रथम ते पाच्छापुरास त्यांचा गुरुबंधु परशराम धामणेकर हा रेल्वेकडे नोकर असल्यामुळें तेथें गेले, तेथून शेडबाळ मुक्कामीं त्यांचा एक शिष्य होता त्याचेकडे गेले व तेथून वाडीस गेले आणि श्रीनृहासिंहसरस्वतींच्या पादुकांचें दर्शन घेऊन कुरुंदवाडास रावजीकडे गेले. तेथें त्यांचा सुमारें सहा दिवस मुक्काम होता. पंतांचा मुक्काम म्हटला म्हणजे

भजनपूजन, टिपरी, खेळ, बोध सांगणें वगैरेपैकीं कांहीं तरी सतत चालूच असे. त्याच प्रमाणें हास्यविनोदाचीहि कमतरता नसे. कुरुंदवाडहून पंत मंडळीसह अकोळास गेले व तेथें त्यांचा मुक्काम अण्णांचे घरीं होता. पंत ज्या दिवशीं अकोळास गेले त्या दिवशीं ते पूजेला बसले असतां अण्णांना म्हणाले, " अण्णा, तुझ्या घरीं एक पिशाच्च आहे ! " तें ऐकून अण्णा चकित झाले व म्हणाले " पंत तुम्ही घरीं आलां असतां पिशाच्च राहील कसें ? " त्यावेळीं ती गोष्ट तेवढ्यावरच गेली. पण दुसरे दिवशीं घरांतलि मंडळींच्या असें लक्षांत आलें कीं अण्णांची थोरली मुलगी मथुराक्का ( ही बालविधवा होती ) ही नेहमीं दार बंद करून खोलीच्या आंत बसत असे व पंत घरांतून कोठें बाहेर गेले म्हणजे ते येण्यापूर्वी जेवण वगैरे करून पुनः खोलींत जाऊन बसे आणि "तूं असें कां करतेस? " म्हणून विचारलें असतां, " मला पंतांचें भय वाटतें " असें ती सांगे. तिसऱ्या दिवशीं पंत पूजेला बसले असतां अण्णांनीं ही हकीगत त्यांना सांगितली. तेव्हां पंतांनीं तिला घेऊन येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें अण्णांनीं खोलींत जाऊन तिला बाहेर येऊन पंतांच्या पाया पडण्यास सांगितलें. त्याबरोबर ती मोठ्यानें रडूं लागली व जाग्यावरून हालेना व अण्णा जसे अधिक आग्रह करूं लागले त्यासरशीं मोठ्यानें किंकाळी फोडून ती निचेष्टित पडली. त्याप्रमाणें अण्णांनीं पंतांना सांगितलें व पंतांनीं तिला उचलून आणण्यास सांगतांच तिला उचलून त्यांचेपुढें आणिलें. त्यानंतर पंतांनीं तिला अंगारा वगैरे लावून शुद्धीवर आणिली व थोड्या वेळानें तिच्या अंगांतील पिशाच्च नाहींसें होऊन ती मोकळी झाली.

## " जो आंत आहे तोच बाहेर आहे ! "

या खेपेस अकोळ येथें पंतांचा मुक्काम तीन दिवस होता. एके दिवशीं ते कांहीं मंडळीसह अकोळजवळ असलेल्या आडी गावीं एका स्वामींना भेटण्याकरितां गेले होते. स्वामींची बसण्याची जागा गुहेसारखी असून बाहेर एक द्वारपाल असे. त्यामुळें परक्या मनुष्याला एकदम स्वामींकडे जातां येत नसे. पंत तेथें गेल्यावर द्वारपालानें आंत जाऊन स्वामींना वर्दी दिली. तेव्हां त्यांनीं कोण आले आहेत तें विचारून येण्यास त्याला सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें बाहेर येऊन आपण कोण म्हणून स्वामी विचारीत असल्याचें पंतांना सांगितलें. तेव्हां, " जो आंत आहे तोच बाहेर आहे असें स्वामींना सांग " असें पंतांनीं उत्तर दिलें. लगेच आंत जाऊन पंतांनीं दिलेलें उत्तर त्यानें स्वामींना सांगितलें. त्याबरोबर स्वामी चपापले व आपण स्वतः बाहेर येऊन पंतांना मंडळीसह आंत घेऊन गेले आणि त्यांनीं प्रेमानें पंतांचें स्वागत केलें. नंतर पंतांचें व त्याचें कांहीं वेळ अध्यात्मविषयासंबंधीं संभाषण झाल्यावर पंत मंडळीसह अकोळास गेले.

## अकोळच्या भक्तमंडळीबद्दल प्रशंसोद्गार

अण्णाप्रभृति अकोळची भक्तमंडळी अगोदरच उत्साही, त्यांतून ही पंतांची अकोळला पहिलीच भेट. त्यामुळें तेथील मंडळींनीं मोठ्या प्रेमानें त्यांचें स्वागत केलें व तीन दिवस तेथें गुरुभक्तांचा अपूर्व प्रेमसोहळा झाला. तेथील भक्तमंडळीची निष्ठा व

जूट पाहून पंतांना फार समाधान झालें. या गोष्टीचा उल्लेख त्यांनीं बेळगावास गेल्यावर ११–१–१८९० रोजीं रावजींना लिहिलेल्या (न छापलेल्या) पत्रांत पुढीलप्रमाणें केला आहे " सायंकाळीं अकोळास पोचलों. तेथें तीन दिवस मंडळींमध्यें फारच आनंदांत काळ गेला. तेथील मंडळी वाखाणण्याजोगी आहे. " तसेंच १२–१–१८९० रोजीं अण्णांना लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात, " तुमच्या सुकृतयोगेंकरून तुम्हांस मंडळी मिळालेली फार उत्तम आहेत. असे निष्कपटी, भक्तिभरांत नाचणारे, प्रेमानें भिजलेले, पूर्व सुकृत धरून आलेले गण असल्यास काळ आनंदांत कां जाणार नाहीं ? अकोळास माझी वृत्ति समाधान पावली. सवड असल्यास आणखी कांहीं दिवस तेथें राहण्याचें होतें. असो ! भक्तिप्रेमवृद्ध्यर्थ अल्प सहवासानंतर वियोग हितावह होय. कारण वियोगांतच अंतरंग–प्रेम–साठा किती आहे हें अनुभवास येतें." (पु. ४–२०१)

## पंतांची प्रापंचिक व परमार्थिक दृष्ट्या प्रगति

प्रापंचिक व पारमार्थिक दृष्ट्या सन १८८६–८९ या चार वर्षांचा काल म्हणजे पंतांच्या पुढील आयुष्यांतील भरभराटीच्या तयारीचाच काल होय असें म्हटलें असतां चालेल. १८८८ अखेर त्यांचे बंधु वामन व नरसू हे मॅट्रिकच्या परिक्षेंत उत्तीर्ण झाले. ते दोघेहि हुषार असून त्यांची पुढें शिकण्याची उमेद होती. पण त्यांचा दोघांचा कॉलेजचा खर्च झेपण्यासारखी पंताची परिस्थिति नव्हती. तेव्हां पंतांपुढें मोठा प्रश्न येऊन पडला. शेवटीं त्यांनीं आपले मामा श्रीपादपंत, गणपतराव मार्हाळकर, रावजी दड्डीकर, अमृतराव देशपांडे वगैरे हितचिंतकांची सल्ला घेऊन व त्यांनीं यथाशक्ति आर्थिक मदत करण्याचें आश्वासन दिल्यावरून एकट्या वामनला कोल्हापूर येथें राजाराम कॉलेजांत पुढील शिक्षणाकरितां ठेविलें. त्याला पैसे पाठविण्याचे कामीं पंतांना फार अडचण भासत असे. पण त्यांनीं आपलेवरील ही जबाबदारी पार पाडली व या कामीं त्यांना रावजी दड्डीकर व अमृतराव देशपांडे यांचें पुष्कळ साह्य झालें. आर्थिक अडचणीमुळें व नरसूची शरीरप्रकृती अशक्त असल्यामुळें पंतांनीं त्याच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न लांबणीवर टाकला. वामन व नरसू यांचा बेळगाव येथील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर आषाढ शु. ११ शके १८११ (८–७–१८८९) रोजीं नरसू व शंकर यांना व अश्विन व. १२ शके १८११ (२१–१०–८९) रोजीं वामनला पंतांनीं अनुग्रह दिला व त्यांचे सर्व बंधु त्यांचे अनुग्रहित झाले. ते सर्व भक्तिमान, एकनिष्ठ व आज्ञाधारक असल्यामुळें पंतांच्या सद्‌गुरुसेवेच्या कार्यांत त्यांचें फार साह्य होऊं लागलें व जसा पंतांच्या बोधाचा प्रसार बाहेर गावीं होऊं लागला तसा तो बेळगावांत व त्यांच्या घरांतहि होऊं लागला. या कालावधींत पंतबंधु गोपाळरावांचें लग्न झालें. पैशाचा पुरवठा अगदींच बेताचा होता. त्यामुळें पंतांना नोकरी संभाळून शिकवण्याहि कराव्या लागत. १८८९ सालीं वामनला कॉलेजमध्यें घातल्यापासून तर त्यांना पैशाची फारच अडचण भासूं लागली. पण त्यांनीं मोठ्या धैर्यानें त्या अडचणींशीं तोंड देऊन वामनला कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. १७–१–१८९० रोजी मामांना लिहिलेल्या (न छापलेल्या) पत्रांत पंत लिहितात,



श्रीपंतमहाराज

सौ. यमनाक्का

"वामन व नरसू यांस कोल्हापुरास पाठवून दिलें. जातेवेळीं ३० रुपयांची भरती कसेंहि करून केली. आतां फेब्रुवारी महिन्यांत ४० रुपये पाठवावे लागतील. ईश्वरकृपेनें त्यांचीहि तजवीज करितां येईल. सर्व भार ईश्वरावर घालून घोडें पुढें ढकलिलें आहे. योगक्षेमाची काळजी त्यानें वाहावी. या खेपेस वामनास स्कॉलरशिप मिळाली नाहीं. माफी मात्र होईल. स्कॉलरशिप मिळाली असती तर खर्चाचा इतका बोजा पडला नसता. असो. टक्केटोणपे खाल्ल्याशिवाय देवपणा येणार नाहीं. आपल्या काळजीनें काय होईल ? समर्थ प्रभूवर हवाला ठेवून यत्न करावा. वडिलांचे कृपेनें आज या स्थितीस पोंचलों आहोंत व पुढेंहि आपल्याच आशिर्वादेंकरून सर्व कांहीं अनुकूल होईल. × × × × गोपाळा अथणी तालुक्यास फिरतीवर आहे. बदली २० रुपयांची आहे. अझुनी कायमबद्दल कांहीं नाहीं. त्याजला कायम नोकरी झाली कीं मग कॉलेजासंबंधीं काळजी दूर होणार आहे. ईश्वर काय करतो पहावें. मागचे संधीस हातीं आलेला ग्रास गेला हें आपणास माहीत आहेच. असो; आज ना उद्यां सुदिन येईलच. चि. शंकरास शाळेंत इंग्रजी ४ थी यत्ता शिकण्यास घातलें आहे. आणप्पा ( मावस भाऊ ) फायनलचा अभ्यास करीत असतो. × × × वरचेवर पत्र पाठवून बालकाचा समाचार घेत असावें. विशेष लिहिणेस बाळक शक्त नव्हे." वरील उताऱ्यावरून १८९० च्या सुरवातीला पंतांची आर्थिक परिस्थिति कशी होती, त्यांच्यावर किती माणसें अवलंबून होतीं, तसेंच त्यांची मामांच्याबद्दल कृतज्ञताबुद्धि किती होती हें स्पष्ट दिसून येतें.

१८८५ अखेर अवधूतयुगाला अथवा अनुभवयुगाला सुरवात झाल्यापासून पंतांच्या स्वानुभवस्थितीची परिपक्वता कसकशी होत गेली व बोधवृक्ष दिवसेंदिवस अधिकाधिक फोफावत जाऊन कसा पुष्पफलयुक्त होत गेला याची त्यांनीं मधुन मधुन सहज ओघानें टिपणें केलेलीं आहेत. त्यांवरून १८८६ ते १८८९ या चार वर्षांत त्यांच्या आत्मानुभवाची दृढता कसकशी होत गेली याचा सुगावा लागतो. १५–१२–१८८६ रोजीं रावजींना लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात, "इतके दिवस श्रीदत्ताची भक्ति केल्याचा जो वृक्ष वाढत आला होता, तो आतां फलद्रूप होण्याचीं चिन्हें पुष्पफलांनीं सुचवूं लागलीं आहेत. म्हणजे याहीपेक्षां अधिकाधिक कृपामृत पिण्यास मिळत जाईल." ( पु. ४–१२४ ) २२–१–१८८८ रोजीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत, "स्थिति पूर्वघराकडे चालली आहे" ( पु. ४–१३७ ) असें त्यांनीं नमूद करून ठेविलें आहे. १९–११–८८ रोजीं विष्णु हरि कुळकर्णी यांना लिहिलेल्या पत्रांत "बोधबीजास अंकुर फुटून निवृत्तिवृक्ष रूपास येऊं लागला" असें पंतांनीं म्हटलें आहे. अशा रीतीनें सद्गुरूच्या अद्वैतबोधाचा फैलाव अधिकाधिक होऊं लागल्याचें पंतांनीं सूचित केलें आहे व २७–१२–१८८९ रोजीं त्यांचा गुरुबंधु गोपाळ श्रीपाद भागोजीकोप याला कुरुंदवाडाहून लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात, "गुरुद्वादशीच्या उत्सवापासून वृत्ति अति आनंदांत आहे. उत्सव म्हणजे सगुण ब्रह्म सद्गुरु बालमुकुंद याचा प्रेमोल्हास होय. उत्सवांतलि प्रेम, तो आनंद, तशी लीन स्थिति, तशी निश्चिंति, योगानें, ज्ञानानें, अनेक खटपटीनें

मिळावयाची नाहीं. बालावधूतास शरण गेल्यापासून अनेक कष्ट सोशिले, भजनीं नाचलों, प्रेमाकरितां, दर्शनाकरितां हवें हवें तें केलें होतें. या उत्सवांत बाळमातेचा प्रेमपान्हा, त्याचें दयाळुत्व बाहेर पडून आकंठ पिऊन धन्य झालों. "सर्वत्र मला पहा" हें ध्यानांत धरून सुखी हो." (पु. ४--१९७)

## अमृतरावांच्या घरांत बिऱ्हाड

१८९० पर्यंत पंतांच्या प्रपंचाचा व्याप बराच वाढला व शिष्यांच्या संख्येंतहि बरीच वाढ झाली. त्यामुळें महादेव गल्लींतील येळुरकरांचें घर त्यांना पुरेनासें झालें व विशेषतः उत्सवाचे वेळीं मंडळी फार जमूं लागल्यामुळें जागेची फारच अडचण भासूं लागली. त्या सुमारास त्यांचे शिष्य अमृतराव देशपांडे हे बेळगाव जिल्ह्यांत चिकोडी येथें दिवाणी कोर्टांत कारकून होते. त्यामुळें ते चिकोडीस राहात असत. बेळगाव येथें देशपांडे गल्लींत त्यांचें घर होतें. त्यांत त्यांचे एक नातेवाईक राहात असत. अमृतरावांची पंतांवर फार निष्ठा असून ते मधुन मधुन बेळगांवास पंतांच्या दर्शनाला येत असत. पंतांशीं त्यांचा पत्रव्यवहारहि चालू असे व त्यांना लिहिलेल्या पत्रांत पंत मधुन मधुन बोधजागृति देत असत. अशा पंतांनीं लिहिलेल्या पत्रांपैकीं १-११-१८८८, २२-११-८८ व १४-१-८९ या तारखांचीं पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत. (पु. ४-१६४, १७० व १७७) सदर पत्रांत, "कामांत जागृति ठेवून नामस्मरणीं शांति धर. सांगितल्या गोष्टी आठवीत जा. वियोगापासून स्वतःची सुधारणा, खरें धैर्य यांची दृढता कशी होते पहा. रणांत गेल्याखेरीज शूरत्व कळत नाहीं. × × × खरें जाणून खरें हो. खोटें जाणून अभिमान टाक. टाकणें, धरणें, होणें, जाणें या गोष्टी विचारें जाण. आहेस तसा रहा; श्रीदत्तभजनांत सदा खेळत जा. प्रेमसागरांतील मत्स्य हो. (प्रपंच) चिखलांत अडकूं नको. सद्गुरु समर्थ आहे. नामाचा डंका वाजीव. स्मरण—खड्ग बळकट धर. भक्तिकवच घट्ट अडकीव. चरणधुळी सर्वांगास फांस. वैराग्याची कास बळकट मार. प्रेमामृतानें तनु-मननेत्र धुंद कर. अहंकारास ज्ञानाभिमान—डोंगरावर चढूं न देतां त्याची मान मुरगळून त्याच्या मुळाशीं जो प्रेमाचा कूप आहेत त्यांत बुडवावें; म्हणजे त्यास सद्गुरूच्या निर्गुण—सगुण स्वरूपीं रमण्यास लावून त्याच्या चरणीं अगदीं नीच वृत्तीनें लोळण्यास लावावें. अन्य उपाय नाहीं."

१८८९ अखेर अमृतरावांची बदली बेळगावास व्हावयाची होती. त्यामुळें बेळगावास आल्यावर देशपांडे गल्लींतील आपल्या स्वतःच्याच घरांत राहण्याचा त्यांचा बेत होता. त्यांचें घर मोठें असून मागें पुढें मोकळी जागाहि पुष्कळ होती. तेव्हां त्यांनीं पंतांना असें सुचविलें कीं, " आपण माझे घरीं राहाण्यास चला. तें घर मोठें असून तेथें आपणां उभयतांच्या बिऱ्हाडांचा चांगल्या तऱ्हेनें समावेश होईल." मागील प्रकरणांत लिहिल्या-प्रमाणें महादेव गल्लींतील पंतांच्या बिऱ्हाडाची जागा त्यांना दिवसेंदिवस अपुरी वाटूं लागली होती व विशेषतः उत्सवप्रसंगीं भक्तमंडळीचा समुदाय बराच जमूं लागल्यामुळें

तर जागेची फारच अडचण भासूं लागली होती. त्यामुळें अमृतरावांची सूचना विचारार्ह आहे असें पंतांना वाटलें व त्यासंबंधीं वाटाघाट सुरू झाली. पंतांच्या व अमृतरावांच्या घरांतील मंडळींचा घरोबा असल्यामुळें एका घरांत दोन्ही बिऱ्हाडें नांदण्यास हरकत पडणार नाहीं असें पंतांना वाटूं लागलें. स्वतः अमृतराव तर पंतांना अत्यंत पूज्य किंबहुना प्रत्यक्ष देव असें मानीत असत व पंतहि त्यांना "अंब्या" या सलगीच्या नावानें हाक मारीत. तसेंच अमृतरावाच्या घरांत जागा पुष्कळ असून त्या घराच्या मागल्या व पुढल्या बाजूस खुली जागाहि बरीच असल्यामुळें तेथें रहावयास गेल्यानें उत्सवप्रसंगीं भासणारी जागेची अडचणहि दूर होण्यासारखी होती. तेव्हां सर्व गोष्टींचा विचार करून अमृतरावांच्या घरांत बिऱ्हाड नेण्याचें पंतांनीं ठरविलें व १८९० च्या सुरवातीला ते तेथें राहावयास गेले.

हें स्थलांतर झाल्यापासून पंतांच्या प्रपंचाची व परमार्थाची विशेष भरभराट होऊं लागली. अमृतरावांच्या घरांत पंतांना मुख्य फायदा जागेचा झाला. तें घर उत्तराभिमुख असून सडकेवरील दरवाजांतून आंत गेल्यावर मोकळें अंगण लागत असे. नंतर घराची ओटी असून त्या ओटीच्या पूर्वेकडील भागांत एक खोली होती. त्या खोलींत पंत बसत असत. ओटीच्या आंत माजघर असून त्याच्या दोन बाजूंस दोन खोल्या होत्या. त्यांपैकीं एक अमृतराव वापरीत व दुसरी विद्यार्थी मंडळीकडे असे. माजघराच्या पलीकडील सोप्यांत एका बाजूला अमृतरावांचें स्वयंपाकघर होतें व मागील परसांतील पडवींत दोघांचीं न्हाणीघरें होतीं. आल्यागेल्याचा समावेश पंतांच्या खोलीसमोरील ओटीच्या मोकळ्या भागांत होत असे. त्यामुळें दोन्ही बिऱ्हाडांचा त्या घरांत चांगल्या रीतीनें समावेश झाला. अशा रीतीनें जागेची सोय झाल्यामुळें भजनपूजन, टिपरी खेळणें, पंतांचें बोध सांगणें वगैरे गोष्टींना अधिक चालना मिळाली व विशेषतः उत्सवांना अधिक भक्तमंडळी जमूं लागली आणि पंतांच्या शिष्यांची संख्याहि झपाट्यानें वाढत चालली.

## श्रीदत्त मंदिराची स्थापना

अमृतरावांच्या घराच्या पाठीमागील परसूं फार मोठें असल्यामुळें तेथें जर एखादें मंदिर बांधलें तर भजनाची वगैरे चांगली सोय होईल असें पंतांच्या कांहीं भक्तांना वाटूं लागलें. अमृतराव स्वतः निःसीम भक्त असल्यामुळें त्यांना ही कल्पना पसंत पडली व पंतांचीहि संमति मिळाली. लगेच अण्णा अकोळकर वगैरे कांहीं उत्साही मंडळींनीं पुढाकार घेऊन वर्गणी जमविली. कांहीं रक्कम अमृतरावांनीं दिली व कांहीं पंतांनीं दिली. मिळून एकंदर सुमारें रु. २००० ( दोन हजार ) खर्च करून अमृतरावांच्या परसांत दक्षिणोत्तर लांबी सुमारें २५–३० हात व पूर्वपश्चिम रुंदी सुमारें १०–१२ हात असें एक सुंदर मंदिर बांधून त्याला " दत्तमंदिर " हें नाव देण्यांत आलें. दत्तमंदिराच्या दक्षिण टोकाला निवांतपणें बसण्याकरितां एक खोली काढली होती व मंदिराच्या पूर्वाभिमुख भिंतीच्या मध्यभागीं एक सुंदरसें मखर करून त्याच्यांत दत्ताचा एक रंगीत फोटो ठेविला

होता. त्या भिंतीच्या बाहेरच्या बाजूला एक औदुंबर वृक्ष लाविला होता व त्याचे आजूबाजूला सुवासिक फुलांचीं झाडें लावून एक टुमदार बगीचाहि केला होता. हें दत्तमंदिर तयार झाल्यापासून गुरुद्वादशी, दत्तजयंती व गुरुप्रतिपदा हे उत्सव याच मंदिरांत मोठ्या थाटानें होऊं लागले. १-११-१८९० रोजीं रावजींना लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात " उत्सवास ( गुरुद्वादशी ) मंडळी येऊं लागली आहेत. समारंभाची तयारी झपाट्यानें चालली आहे. उत्सव शुक्रवारीं म्हणजे दशमीस सुरू करणेचा संकेत आहे. या मंदिरांत हा उत्सव प्रथमच म्हणावयाचा. सुरू करून प्रेमांत खेळविणें महाराजाचे चरणकृपेनें व्हावें. कर्तृत्व नको. दृढ भावना असावी, स्मरण चालावें, भजन चालावें, सर्व कांहीं त्याचें कर्तृत्व आहे अशा निश्चयानें निश्चितपणें त्याच्या चरणरजीं लोळत असावें, हेंच आपलें कर्तव्य. याच रीतीनें प्रारब्ध सारावें दुसरें कांहीं नाहीं. " ( पु. ४-२१९ )

# प्रकरण २७ वें

—:०:—

## आजोळच्या घराण्यांतील भाऊबंदकीचा तंटा मिटविला; आजोबांना संन्यासदीक्षा दिली; पुण्याची खेप.

—:०:—

### आजोळच्या घराण्यांतील भाऊबंदकी

मागील प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें जरी प्रपंच-परमार्थदृष्ट्या पंतांच्या घराण्याची दिवसेदिवस भरभराट होत होती तरी त्यांचे मामा श्रीपादपंत कुळकर्णी दड्डीकर यांची परिस्थिति कित्येक वर्षें फार असमाधानकारक होती. सन १८६४ सालीं पंत दड्डीस मामांकडे प्राथमिक शिक्षणाकरितां गेले त्या सुमारास श्रीपादपंत व त्यांचे चुलते अण्णाजी व रामचंद्रपंत हे विभक्त झाले व त्यांचें जेवणखाण, पैशाअडक्याचा व्यवहार वगैरे अलग अलग होऊं लागलें. तरी पण त्यांच्या घराण्याकडे असलेल्या पाच वतनी गावांच्या वहिवाटीसंबंधीं मतभेद होऊन तें प्रकरण बरेंच विकोपास गेलें होतें. परंतु पंत दड्डी येथें मामांजवळ राहात असतांनाच १८६७ सालीं त्या तिघांनीं आपसांत तडजोड करून वाटणीपत्र केलें व त्याप्रमाणें वहिवाटहि सुरू झाली आणि १८७२ च्या सुमारास पंत इंग्रजी शिकण्याकरितां बेळगावास जाईपर्यंत ही स्थिति कायम होती. पण १८७४ सालीं वतनांचा कायदा अमलांत आल्यावर चवकशी होऊन या घराण्याकडे असलेल्या पाच वतनी गावांपैकीं तीन गावांचे वतनदार म्हणून अण्णाजींचें एकट्यांचेंच नाव सरकारदप्तरीं दाखल करण्यांत आलें व श्रीपादपंत आणि रामचंद्रपंत या प्रत्येकाकडे एकेकच गाव राहिला. या निकालानें नाराज होऊन श्रीपादपंतांनीं अपील करून दाद मागितली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांतच १८७५ सालीं दुष्टाव्यानें कोणीं त्यांचें नाक कापलें. त्यामुळें कित्येक वर्षें त्यांना फार कष्टांत काढावीं लागलीं. १८८४ सालीं अण्णाजी परलोकवासी झाले व त्यांचे चिरंजीव लक्ष्मणराव ऊर्फ भाऊ ( रावजींचे वडील ) यांचें नाव तीन गावांचे वतनदार कुळकर्णी म्हणून दाखल झालें. १८८५ च्या सुमारास कांहीं उपद्व्यापी मंडळींच्या प्रयत्नानें श्रीपादपंतांवर फॉरेस्ट ॲक्टाअन्वयें एक फौजदारी खटला करण्यांत आला; पण त्यांत ते निर्दोषी ठरून सुटले. तरी आपल्या कामांत हलगर्जीपणा केल्याचा त्यांचेवर आरोप करण्यांत येऊन त्यांचेकडे असलेल्या एका ( मोदगें ) गावाचें कुळकर्णीपणाचें कामहि काढून घेण्यांत आलें. त्यामुळें त्यांच्याकडे एकहि वतनी गाव राहिला नाहीं. अशा रीतीनें श्रीपादपंतांना कांहीं वर्षें अत्यंत हाल सोसून विवंचनेंत काढावीं लागलीं. तरी पण सरकारदरबारीं अर्ज करून त्यांच्याकडे पूर्वी असलेल्या मोदगें गावाची कुळकर्णिकी परत मिळविण्याचे त्यांचे प्रयत्न चालूच होते.

श्रीपादपंतांकडे एकहि गाव न राहिल्यामुळें त्यांची खरी फसवणूक झाली होती. पंत मधुन मधुन सुटीच्या दिवसांत दड्डीस जात असत व मामांची अशी चिंताजनक स्थिति

पाहून त्यांना फार वाईट वाटत असे. पण आजोळच्या घराण्यांतील वडील माणसांमधील हा तंटा मिटविणें झाल्यास कोणाचें तरी मन दुखविल्याशिवाय तें होणार नाहीं असें त्यांना वाटत होतें. मामांबद्दल जसा त्यांना आदर व पूज्यभाव वाटत होता, तसाच भाऊंबद्दलहि वाटत होता. त्यांतून भाऊंचा वडील मुलगा रावजी हा त्यांच्या अति प्रीतींतला असून त्याचा धाकटा भाऊ हणमू हा तर त्यांचा गुरुबंधु होता; त्यामुळें त्यांच्याकडे पंतांचा स्वाभाविक ओढा होता आणि म्हणून पंतांची स्थिति फार नाजुक झाली होती. तरी पण शक्य तर या तंट्याचा निकाल आपसांत लावावा असें पंत व रावजी या उभयतांसहि मनापासून वाटत होतें व त्या दिशेनें त्यांचे प्रयत्नहि चालले होते. मागील प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें १८८८ च्या नाताळांत मंडळीसह दड्डी येथें जाण्याचें निश्चित झाल्यावर पंतांनीं रावजींना २०–१२–१८८८ रोजीं जें पत्र लिहिलें ( न छापलेलें ) त्यांत ते लिहितात, " आम्हां उभयतांचे मताप्रमाणें वागण्यास उभतांसहि भाग पाडलें पाहिजे. यांत मला किंवा तुला पक्षपाताचा दोष काडीमात्र लागतां कामा नये. आम्हांला उभैताहि सारखेच. उभैतांचे नफ्यातोट्याचाहि आम्हांला संबंध नाहीं. केवळ परक्याप्रमाणें आम्ही तंट्याचा निकाल करण्याचा घाट घालूं. उभैतांचे मनस्तापजनित तक्रारी ऐकत बसूं नये. त्यांचा अंत लागायाचा नाहीं. उभैतांचीं मनें दूषित झालीं आहेत. दोन्ही हातांनीं टाळी वाजत आली आहे.: याकरिता मागलि राड मनांत आणून समाधानीभंग न करून घेतां, कोणतेहि प्रकारचा दोष आमचेवर न येतां निकाल झाल्यास हात घालावा. नाहीं तर ' चल जाऊं निरंजन वना ' असें म्हणत हासत सद्गुरुभजनीं सर्वाभिमानरहित सर्वसंगदूर, कल्पनातीत होऊन नाचत बसूं." या उताऱ्यावरून हा तंटा मिटविण्याचे कामीं पंतांची भूमिका कोणती होती तें दिसून येतें. पुढें नाताळांत पंत दड्डीस गेले व अण्णा अकोळकर वगैरे परगावची बरीच भक्तमंडळीहि तेथें जमली होती. तेव्हां स्वाभाविक रीतीनें पंतांच्या आजोळच्या घराण्यांतील तंटा मिटविण्यासंबंधीं वाटाघाटी चालत असत. त्यामुळें अण्णांना तेथील परिस्थितीची बरोबर कल्पना आली व श्रीपादपंतांशीं त्यांचा बराच परिचय झाला. रावजी व हणमू या बंधूंशींहि त्यांचा दिवसेदिवस जिव्हाळ्याचा संबंध येत गेला आणि शक्य ते उपाय करून हा तंटा मिटविलाच पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें. उभय पक्षांमध्यें तंटा मिटविण्यासंबंधीं वाटाघाटी चालूच होत्या व प्रत्येक बाजूची मंडळी आपापली बाजू पंतांपुढें मांडून त्यांचें मन आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करीत होती. २५–५–१८८९ रोजीं रावजींना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंत लिहितात, " विनाकारण दुसऱ्याचा बोजा कोणीं घ्यावा ? ज्याबद्दल आपण दुसऱ्यास दोष देतों त्या गोष्टी करण्यास मजला विचारणें साहसाचें काम आहे. भक्ति राखून निराशेनें काय करणेचें तें करावें. शिवाय व्यवहारांत मी केवळ मूढ आहें. त्यासंबंधीं माझी मसलत कोणीं घेऊं नये. सर्वांनीं झटून कार्य सिद्धीस नेणें आहे. सांगून घेऊन खटपट करण्याचा प्रकार मुळींच नाहीं."

## तंटा मिटविला

त्यानंतर कांहीं दिवसांनीं भाऊ, श्रीपादपंत व रामचंद्रपंतांचे चिरंजीव खंडोपंत हे तिघे कांहीं कामानिमित्त अकोळास गेले असतां त्यांनीं अण्णांची गाठ घेऊन आपसांतील तंट्याचा निकाल तडजोडीनें लावण्याची आपली इच्छा दर्शविली व तेव्हांपासून अण्णांनीं हा तंटा मिटविण्याची जारीनें खटपट चालविली. नंतर त्यांनीं पंत व रावजी यांचेशीं व उभयपक्षांतील मंडळींशीं वाटाघाट केली आणि सरतेशेवटीं पंत जो निकाल करतील तो उभय पक्षांनीं बिनतक्रार मान्य करावा असें सर्वानुमतें ठरलें. पुढें १८९० सालीं उन्हाळ्याचे सुटींत पंत दड्डीस गेल्यावेळीं त्यांनीं या तंट्याचा अखेरचा निकाल लाविला. या निकालानें पाच वतनी गावांपैकीं मोदगें गाव श्रीपादपंतांकडे पूर्ववत वंशपरंपरा हक्कानें राहावा असें ठरलें व त्याप्रमाणें सरकार—कागदीं नोंद करण्यांत आली. त्यानंतर असें ठरलें कीं, श्रीपादपंतांचें वय झाल्यामुळें त्यांचा वडील मुलगा अंबाजी ऊर्फ दादा याचें नावें तो गाव करावा व त्याप्रमाणें तो केला गेला. १०–८–१८९० रोजीं रावजींना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंत लिहितात "काल मुद्दाम ती. रा. श्रीपादपंतमामांकडून निरोप आला. त्यांत मोदगें गावचा राजीनामा पाठवून दादाच्या नावें नेमणूक होण्याबद्दल लिहून गेल्याचें होतें. सुवार्ता ! ××× यश घेणारा निराळाच आहे. ××× श्रीदत्त अभिमानी आहे हें लक्षांत ठेवावें."

ज्या दड्डिकरांच्या घरांत पंतांनीं आपलें बालपण काढलें व ज्यांच्या सुसंगतींत त्यांच्या भावी उन्नतीचा पाया रचला गेला त्यांचा कित्येक वर्षें धुमसत असलेला आपसांतील तंटा पंतांनीं मिटविल्यामुळें त्या घराण्यांतील सर्व मंडळींना त्यांच्यासंबंधीं विशेष आदर, कृतज्ञता व प्रेम हीं वाटूं लागलीं.

## आजोबांना संन्यासदीक्षा

अमृतराव देशपांडे यांच्या घरांत पंत राहवयास गेले तेव्हां त्यांचे आजोबा बाळकृष्णपंत ( अप्पा ) त्यांच्याजवळच राहात असत. त्यावेळीं त्यांचें वय सुमारें ८२–८३ वर्षांचे असून त्यांची प्रकृतिहिं बरीच अशक्त झाली होती. १८९० च्या नोव्हेंबर महिन्यांत त्यांची प्रकृति एकदम बिघडली व या दुखण्यांतून आपण वाचत नाहीं असें त्यांना वाटूं लागलें. तेव्हां त्यांनीं पंतांचे एक शिष्य राघवेंद्र शेषो हुबळीकर ऊर्फ राघू अवधूत यांना बोलावून त्यांचेकडून २०–११–१८९० रोजीं मृत्युपत्रवजा एक लेख लिहून घेऊन त्यावर सही केली. अप्पांनीं हा लेख आपल्या मिळकतीची विल्हेवाट अगर व्यवस्था करण्याच्या हेतूनें केला नसून त्याच्या द्वारें त्यांनीं आपले आप्त व ऋणानुबंधी लक्ष्मणराव ऊर्फ भाऊ व श्रीपादपंत कुळकर्णी दड्डीकर, आपले नातू पंत व त्यांचे बंधु व आपले मुलगे, देवप्पा व जिवप्पा, यांना त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें अतिशय कळकळीनें जिव्हाळ्याच्या सूचना अगर आज्ञा केल्या आहेत. तो लेख पुढीलप्रमाणें आहे.

श्री

याादी चिरंजीव भाऊ व श्रीपाद कुळकर्णी दड्डी ता. चिकोडी यांसी

१ तुमचा फार दिवसांचा ऋणानुबंध असल्यानें आजपावेतों आपण आमच्या घरा-

ण्यावर दक्षता ठेवून काळजीपूर्वक आमच्यापासून आमच्या मुलांबाळांपर्यंत फार अंतःकरणानें वागल्यामुळें आमच्या मुलांबाळांच्या कल्याणदायक गोष्टया घडून आल्या. त्यामुळें तुमचीहि कीर्ति जाहली. तर आतां मी असें लिहून ठेवितों कीं उभयतांनीं व उभयतांच्या वंशजांनीं पूर्ववतप्रमाणें ठेवण्याबद्दल दक्षता असावी कीं साधारण प्रकारचा ऋणानुबंध नसल्यानें व आजकालाला वरील गोष्टया मनांत आणिल्यामुळें लिहून ठेवणेंचे योग्य वाटलें. याजकरितां ही सूचना लिहून ठेविली आहे.

२ चिरंजीव राजेश्री दत्तूस आशीरवाद. घरच्या मुलाबाळांचा व इतर गोष्टींबद्दल आजपावेतों चांगल्या रीतीनें वर्तन ठेवीत आला. तर पुढेंहि त्याप्रमाणेंच करणें.

३ चिरंजीव गोविंद व गोपाळ व वामन, नरसू, शंकर यांस कळावें कीं तुम्ही पांच असामी चिरंजीव राजेश्री दत्तू याच्या निरोपांत वागून एकमेकांच्यांत अंतरता येतां नये कीं तुम्ही पांच असामी लहान असल्यामुळें दत्तू यानें तुमच्या कल्याणार्थ फार खटपट व काळजी बाळगून फारच संरक्षण केलें म्हणून ही सूचना लिहून ठेविली आहे. वरील गोष्टी वर्तन करण्याबद्दल अंतःकरणपूर्वक ही आज्ञा दिली आहे कीं दत्तोपंत हा फार स्वभावानें भोळा असून प्रामाणिकही आहे. म्हणोन त्याच्याव्यतिरिक्त कोणी राहूं नये.

४ चि. रा. देवपा व जिवपा तुम्ही उभयतांनी चांगल्या रीतीनें वर्तात असावें व मुलेंबाळें यांच्यावर पुर्ववतप्रमाणें अंतःकरण असावें. एकमेकांच्या दरम्यान कोणत्याहि गोष्टींबद्दल अंतरपणा आणूं नये.

५. चि. सौ. गंगाबाई इची प्रपंचासंबंधानें तूर्त नड असल्यामुळें ती येथें राहिजेपर्यंत दत्तू गोपाळ वगैरे व देवपा, जिवपा वगैरे यांनीं तिचें संरक्षण समान काळजीनें केली पाहिजे.

म्हणोन लिहून ठेविली लेख सही तारीख २० माहे नवंबर सन १८९० इ. दस्तुर राघवेंद्र शेषो हुबळीकर मु. बेळगांव.

( सही ) बाळकृष्ण रामाजी द. खुद.

वरील लेखावरून लक्ष्मणराव ऊर्फ भाऊ व श्रीपादपंत दड्डीकर यांचेशीं बाळकृष्णपंताचा संबंध किती जिव्हाळ्याचा होता व त्यांना श्रीपादपंतांबद्दल व त्यांच्या घराण्याबद्दल किती कृतज्ञता वाटत होती हें स्पष्ट दिसून येतें. तसेंच त्यांनीं पंतांच्या गुणांबद्दल केलेला गौरवपर उल्लेख व पंतांच्या आज्ञेंत राहण्याबद्दल त्यांच्या धाकट्या भावांना केलेल्या सूचना अगर आज्ञा यांच्यावरून आजोबांचें पंतांसंबंधीं काय मत होतें व त्यांचा पंतांवर किती विश्वास होता यासंबंधीं यथार्थ कल्पना होते. देवपा व जिवपा हे त्यांचे मुलगे होते व पांचव्या कलमांत ज्या गंगाबाईंचा उल्लेख केला आहे त्या म्हणजे मरिकट्टी येथील बंडो सांभाजी कुळकर्णी यांना दिलेल्या पंतांच्या भगिनी होत. त्यांची घरची स्थिति समाधानकारक नसल्यामुळें त्या कांहीं वर्षें माहेरींच राहात असत. त्यामुळें बाळकृष्णपंतांनीं त्यांच्यासंबंधीं कळकळीनें उल्लेख केला आहे.

या लेखावरून हें स्पष्ट दिसतें की आपण आतां फार दिवस जगत नाहीं असें बाळकृष्णपंतांना २०–११–१८९० रोजीं वाटूं लागलें व अखेरचा संदेश देण्या-करितां त्यांनीं तो लेख लिहवून घेऊन त्यावर सही केली आणि हा मृत्युलोक सोडण्यास ते तयार झाले. त्यांच्या तशा स्थितींत एकदां पंत, अण्णा अकोळकर, अमृतराव देश-पांडे, रावजी दड्डीकर, काशीकरबुवा वगैरे मंडळी बोलत बसली असतां अप्पांसंबंधीं गोष्टी निघाल्या. तेव्हां काशीकरबुवा पंतांना म्हणाले "दत्तापा, तुझ्या भाग्यवान आजो-बाचें निरंतर नाव राहण्याजोगें कांहीं तरी स्मारक कर." ही सूचना पंतांना पसंत पडली व कोणत्या रीतीनें हें स्मारक करावें यासंबंधीं बरीच वाटाघाट होऊन अप्पांना संन्यास द्यावा असें सर्वानुमतें ठरलें व त्याप्रमाणें अप्पांशीं व त्यांचें कुटुंब सौ. रुक्मिणीबाई यांच्याशीं बोलणें होऊन त्यांचीहि संमति मिळाली. दिवसेंदिवस त्यांची तबेत अधिका-धिक बिघडत चालली व २७–११–१८९० (कार्तिक व. १ श. १८१२) रोजीं तर ते अत्यवस्थ झाले. तेव्हां त्यावेळीं बेळगावांत धर्मशास्त्रांत निष्णात म्हणून प्रसिद्ध असलेले वे. नरसिंहभट ग्रामोपाध्याय यांना पंतांनीं बोलावून, "अप्पांना संन्यासदीक्षा द्यावयाची आहे व त्यांची तब्बेत फार बिघडल्यामुळें हें कार्य तावडतोब होणें जरूर आहे," असें सांगितलें. तेव्हां नरसिंहभटजींनीं शास्त्राधार पाहून व अप्पांचें प्रकृतिमान लक्षांत घेऊन त्यांना आतुर संन्यास द्यावा व परमहंसदीक्षा द्यावी असा अभिप्राय दिला व तो सर्वांना पसंत पडून दुसरे दिवशीं म्हणजे २८–११–१८९० रोजीं अप्पांना विधिपूर्वक संन्यास देण्याचें ठरलें. पण तो कोणीं द्यावयाचा यासंबंधीं अडचण येऊन पडली. कारण संन्यासदीक्षा देणारा संन्यासीच असावा लागतो. पण तेथें कोणीहि संन्यासी नव्हता. तेव्हां नरसिंहभटजींनीं शास्त्राधार काढून असें सांगितलें कीं अशा आणीबाणीच्या वेळीं दीक्षा देण्याला कोणी संन्यासी नच मिळाल्यास योग्य अशा वैदिकांनाहि ती देतां येते. तेव्हां वैदिकांकडून अप्पांना संन्यास देण्याचें निश्चित झालें.

कार्तिक व. २ श. १८१२ (२८–११–१८९०) रोजीं ठरल्याप्रमाणें वे. नरसिंह-भट ग्रामोपाध्याय, वे. रामभट हेगणे, वे. नागेशभट ग्रामोपाध्याय, बाळकृष्णपंतांचे कुल-पुरोहित व आणखी कांहीं विद्वान ब्राम्हण पंतांच्या बिऱ्हाडीं आले आणि यथाविधि होम-हवन होऊन अप्पांना सक्षौर प्रायश्चित्तहि देण्यांत आलें. पण जेव्हां त्यांना अनुग्रह देण्याची वेळ आली तेव्हां मोठी अडचण येऊन पडली. कारण अडचणीच्या वेळीं प्रणवाव्यतिरिक्त मंत्र देण्यास वैदिकांना अधिकार असल्याबद्दल शास्त्राधार असूनहि तसें करण्यास कोणी धजेना. तेव्हां वाटाघाट होऊन असें ठरलें कीं कोणींहि एकानें सर्व मंत्र न देतां त्याचे आठ भाग करावे व एकेका ब्राह्मणानें त्यांपैकीं एकेक भाग अप्पांना सांगावा आणि त्यांनीं तो म्हणावा. पण प्रथम सुरवात करण्यास कोणीहि तयार होईना. तेव्हां पुन्हां वाटा-घाट होऊन असें ठरलें कीं तो मंत्र एका कागदावर लिहून तो अप्पांनीं वाचावा. त्या-प्रमाणें तो कागदावर लिहून अप्पांना वाचण्यास दिला पण त्यांना तो नीट वाचतां येईना. तेव्हां पुनः अडचण आली. हा सर्व प्रकार पाहून काशीकरबुवा पंतांना म्हणाले "दत्तापा,

विनाकारण इतकी वाटाघाट कशाला ? तूंच तुझ्या आजोबांना कां अनुग्रह देत नाहींस ? ” तें ऐकून “ ब्रम्हवृंदांची त्याप्रमाणें आज्ञा झाल्यास माझी हरकत नाहीं ” असें पंत म्हणाले. तेव्हां तेथें असलेल्या सर्व ब्राम्हणांना मोठें कौतुक वाटून नरसिंहभटजी पंतांना म्हणाले कीं “दत्तू , तूं जरी आमच्यापेक्षां वयानें लहान आहेस तरी तुझी योग्यत मोठी आहे. तुझ्या हातून तुझ्या आजोबाचा उद्धार व्हावा असा ईश्वरी नेमानेमच दिसतो. तर तूंच त्यांना अनुग्रह दे. या कामीं आम्हां सर्वांचा तुला पूर्ण आशिर्वाद आहे.” याप्रमाणें ब्रम्हवृंदाची परवानगी मिळतांच पंतांनीं सर्वांना नमस्कार केला व ते अप्पांजवळ गेले. नंतर नरसिंहभटजींनीं अप्पांकडून “ न मे किंचित्, नाहं कस्यचित् ” ( माझें कांहीं नाहीं, मी कोणाचा नव्हे ) व एकनाथी भागवतांतील “ स्त्री पुत्र स्वजन धन ॥ यांच्या लोभाचें मुख्य कारण ॥ माझा मज देहाभिमान ॥ त्यासि माझें नमन साष्टांग ॥ अ. २३-४८१ ॥ नमन स्त्रीपुत्रादिकांसी ॥ नमन स्वयाति स्वजनांसी ॥ नमन देहाभिमानासी ॥ संबंध तुम्हां आम्हांसी असेना ॥ ४८२ ॥ जेवीं कां जळा आणि चंद्रबिंबासी ॥ एकत्र वास दिसे दोहींसी ॥ परी चंद्र अलिप्त जळेंसी ॥ तेवीं संबंध आम्हांसी तुम्हां असेना ॥ ४८३ ॥ जेवीं कां अखंड अहर्निशीं ॥ छाया जडलीसे रूपासी ॥ तें रूप न बैसे छायेसी ॥ तेवीं संबंधु तुम्हांसी मज नाहीं ॥ ४८४ ॥ जेवीं तारुण्य ये देहापाशीं ॥ तेणें तारुण्यें देहो मुसमुशी ॥ शेखीं तारुण्य सांडी देहासी ॥ तेवीं म्यां तम्हांसी सांडिलें ॥ ४८५ ॥ वनीं वसंताचें रिगवणें ॥ वनश्री शोभा मिरवी नेणें ॥ तो वसंत जेवीं सांडी वनें ॥ तेवीं म्यां सांडणें अहंममता ॥ ४८६ ॥ बाप सवैराग्य विवेक ॥ त्याग करविला अलौलिक ॥ देहाभिमाना तिलोदक ॥ दीधलें देख ममतेसीं” ॥४८७॥ या ओव्या म्हणवून घेऊन त्यांच्याकडून पुढीलप्रमाणें प्रार्थना करविली. ती अशी, “ हे इंद्रिय अधिष्ठात्री देवता । मज साह्य हो तूं समस्ता । सिद्धि पावावया परमार्था । इंद्रिय-जयता मज द्यावी ॥ ए. भा. २३-४६६ ॥ जो त्रिभुवनेश्वर विख्यात । तो साह्य झालिया भगवंत । देवता साह्य होती समस्त । त्या अंतर्भूत हरिरूपीं. ॥ ४६७ ॥” त्यानंतर त्यांनीं अप्पांकडून क्षौर करितांना राखून ठेविलेले सहा केस व यज्ञोपवीत यांचा त्याग करवून त्यांचे अंगावर भगवीं वस्त्रें घातलीं व कागदावर लिहिलेल्या मंत्राप्रमाणें त्यांना अनुग्रह देण्यास पंतांना सांगितलें. तेव्हां पंतांनीं अप्पांना सप्रणव मंत्रोपदेश दिला. हा सर्व प्रकार इतका हृदयद्रावक झाला कीं, तो चालू असतांना अप्पांच्या डोळ्यांतून सारख्या प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या होत्या व पंतांचे डोळेहि अश्रूंनीं भरून आले होते. नातवानें विद्वान ब्राह्मणांच्या आज्ञेप्रमाणें आजोबांना उपदेश दिल्याचा तो देखावा पाहून तेथें असलेल्या सर्व मंडळींचीं अंतःकरणें प्रेमानें भरून आलीं होतीं. तशा स्थितींत नरसिंहभटजी गहिंवरून पंतांना म्हणाले कीं, “ दत्तू, ज्याप्रमाणें तूं आज कृष्टाणांचा ( बाळकृष्णपंतांचा ) उद्धार केलास त्याप्रमाणें माझाहि एकदां कर म्हणजे झालें.” याप्रमाणें नरसिंहभटजी पंतांना जें बोलले तें कदाचित् विनोदानें अगर गौरवपरहि असेल. पण पुढें त्यांनीं खरोखरच सर्व-संगपरित्याग करून नरसिंहवाडीस जाऊन तेथें विधियुक्त संन्यास घेतला असें सांगतात.

नातवानें आजोबांना संन्यास देण्याचा प्रसंग अद्भुत खराच! पण ज्या बाळप्पांना, ५ व्या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें, बाळकृष्णपंतांनीं आपल्या घरांतून घालवून दिलें होतें त्याच बाळप्पांच्या शिष्यानें त्यांना संन्यासदीक्षा दिली हा योगायोग खरोखर अपूर्व होय ! !

वर लिहिल्याप्रमाणें पंतांनीं अप्पांना संन्यास दिला ही गोष्ट त्यांनी त्याच दिवशीं रावजींना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पुढीलप्रमाणें नमूद केली आहे, " काल रोजीं आजोबाची प्रकृत विशेष बिघडल्यासारखी वाटल्यावरून सर्वानुमतें आज त्यासी आतुरसंन्यास विधिपूर्वक दिला. प्रकृत साधारण बरी आहे. "तसेंच त्याच दिवशीं श्रीपाद-मामांना लिहिलेल्या पत्रांतहि तसाच मजकूर आहे.

बाळकृष्णपंतांची प्रकृति फार बिघडल्यामुळें त्यांनीं वर लिहिल्याप्रमाणें आतुर-संन्यास घेऊन चतुर्थाश्रम स्वीकारला खरा, पण पुढें त्यांना थोडथोडा कल पडत जाऊन त्यांची तबेत सुधारली व ते चांगले हिंडूं फिरूं लागले आणि आपल्या आश्रमाला योग्य असा त्यांनीं आपला वर्तनक्रम ठेविला. अप्पांची प्रकृति सुधारल्यापासून साधारणपणें त्यांची बैठक अमृतरावांच्या घराच्या मागील परसांतील दत्तमंदिरांत असे व तेथें ते भजन-पूजनांत आपला काळ घालवूं लागले.

## पुण्याची स्वारी

नोवेंबर १८९० अखेर पंतांचा भाऊ वामन याची फर्स्ट बी. ए. ची परीक्षा पास झाली. नंतर तो पुण्यास जावयाचा होता. तेव्हां पंतांनींहि त्याच्याबरोबर पुण्यास जाण्याचें ठरविलें व गणपतराव मारीहाळकर, अमृतराव, राघू अवधूत व अण्णा अकोळ-कर यांचेसह ते ६-१२-१८९० रोजीं पुण्यास जाण्यास निघाले. त्यावेळीं बाळ-सुंदर नावाचे पंतांचे एक गुरुबंधु पुणें येथें रेल्वे डी. टी. एस. ऑफिसमध्यें हेडक्लार्क होते. त्यामुळें त्या गुरुबंधूंना परस्परांच्या संगतींत कांहीं दिवस काढण्यास सापडलें. यावेळीं पुण्यास पंतांचा मुक्काम सुमारें एक आठवडा होता. आगगाडींतील प्रवासांत व पुण्यास असतांना भजन व पंतांचा बोध-वर्षाव हीं चालूच असत. त्यामुळें पंतांचा दौरा म्हणजे त्यांच्याबरोबरच्या मंडळींना एक पर्वणीयोगच वाटे.

पंतांची ही पुण्याची खेप झाल्यानंतर ते मिरज-कोल्हापूरच्या पुढें कोठेंहि गेले नाहींत.

# प्रकरण २८ वें

——:०:——

## पंतांना मारण्याचा कट; वामनरावांची बंधुप्रीति; कटाची निष्फलता; कटवाल्यांत फूट व पश्चाताप; पुढाऱ्यांचे पंतांसंबंधींचे आदरयुक्त उद्गार; कटाच्या कारणांची मीमांसा व शिष्यांना इषारे; निंदकांचा गौरव.

——:०:——

### पंतांना मारण्याचा कट

१८८२ अखेर पंतांचे कांहीं गुरुबंधु व शिष्य त्यांचे विरुद्ध जाऊन "पुत्रबंधूंचें स्फुटीकरण" झालें व १८८४ च्या सुरवातीस "पुनरपि मिलाफ" झाला; तरी पण एक दोन व्यक्तींच्या मनांतील पंतांविषयींचा द्वेष व मत्सर कायमच होते हें प्रकरण १६ व १८ मध्यें सांगितलेंच आहे. तसेंच १८८५ सालीं कल्याणला लिहिलेल्या पत्रांत कांहीं मंडळी अस्ताव्यस्तपणें वागत असून त्यांची स्थिति बिघडली आहे, आपण त्यांची संगत, दर्शन, भाषण हीं वर्ज्य केलीं आहेत व त्यांनीं लौकिकांत उघड, गुप्त रूपें, आंतून, बाहेरून प्रचंड निंदा, बोभाट, उसाबर, कुतर्क इत्यादि छळरूपी अग्नि पेटविला आहे, ही हकीगत देऊन त्या वेळच्या परिस्थितीचें पंतांनीं यथार्थ वर्णन केल्याचाहि प्रकरण २१ मध्यें उल्लेख केला आहे. याप्रमाणें जरी कांहीं व्यक्तींच्या अंतःकरणांत आपल्यासंबंधीं द्वेष व मत्सर वसत असल्याची पंतांना जाणिव होती तरी तिकडे दुर्लक्ष करून त्यांनीं सद्गुरुभजनसेवेचें व शिष्यप्रबोधनाचें कार्य उत्साहानें चालविलें होतें. १८८५ अखेर त्यांनीं आपल्या घरीं श्रीदत्ताच्या पादुका स्थापन करून उत्सव केल्यापासून त्यांचा भजनक्रम जोरावत चालला व शिष्यसंख्याहि वाढत चालली. पुढें १८९० च्या सुरवातीला ते अमृतरावांच्या घरांत राहावयास गेल्यावर त्या घराच्या मागील परसांत दत्तमंदीर बांधण्यांत येऊन तेथें श्रीचे उत्सव मोठ्या थाटानें होऊं लागले. प्रापंचिक दृष्ट्याहि त्यांची भरभराट होत होती. अशा रीतीनें जसजशी दिवसेंदिवस पंतांची प्रगति होत होती तसतसे त्यांच्या विरुद्ध असलेल्या मंडळींच्या मनांतील द्वेषाग्नि व मत्सराग्नि अधिकाधिक पेट घेत होते आणि १८९१ अखेर ते इतके भडकले कीं ते त्यांच्या अंतःकरणांत मावेनासे होऊन त्यांच्या भयंकर ज्वाला बाहेर पडूं लागल्या व त्यांच्यांत पंतांची आहुति पडते कीं काय अशी भीति वाटण्यापर्यंत मजल गेली !

पंतांचे गुरुबंधु कृष्णराव यांचें १८८५ पासूनच पंतांकडे जाणेंयेणें कमीकमी होत गेलें व पंतांसंबंधींचा त्यांच्या ठिकाणचा द्वेष व मत्सर वाढतच होते. कृष्णारावांचे बंधु गणपतराव हे पंतांचे शिष्य खरे, पण आपल्या बंधूचा कैवार घेऊन तेहि पंतांचा द्वेष करीत

हें मागें सांगितलेंच आहे. प्रपंचपरमार्थदृष्ट्या दिवसेदिवस होत चाललेला पंतांचा उत्कर्ष सहन न होऊन या उभयतां बंधूंनीं, पंतांवर भलभलते आरोप करून त्यांची निंदा करण्यास आणि भोळ्याभाबड्या व एकधोरणी अशा भक्तमंडळींचीं मनें त्यांच्यासंबंधीं कलुषित करण्यास सुरवात केली. गणपतराव हे जात्या बुद्धिमान व कारस्थानी असल्यामुळे बेळगावमधील वरीच भक्तमंडळी त्यांच्या कारस्थानाच्या जाळ्यांत सापडली व पंतांचा गुरुबंधु परशरामहि या कारस्थानांत सामील झाला! वास्तविक परशराम हा पंतांचा अत्यंत प्रीतींतील गुरुबंधु होता. त्याला बालमुकुंदांचा अनुग्रहहि पंतांच्यामुळें व त्यांच्याच बिन्हाडीं झाला होता. त्या उभयतांमधील संबंध किती जिव्हाळयाचे होते, या संबंधीं पंतांनी एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, " मी व परशराम लहानपणापासून एकीनें होतों. एका घोंगडींत दोघे निजत असों. दोघेहि बाळप्पाच्या खेळांत खेळलेले. परशरामच्या घरीं तट्ट्याच्या बाजूला आम्ही प्रीतीनें निजावें. बाळप्पीहि तेथें येत असे. आमची एकी पाहून आम्हा दोघांमध्यें बिघाड पाडावा, आम्हास एके ठिकाणीं राहण्यास मिळूं नये म्हणून पुष्कळ प्रयत्न केले. तरी या खटपटी बाहेरच्या. त्याच्या आमच्या अंतःकरणाच्या एकीनें आम्ही दोघे लोकांस न कळतच एकमेकांस भेटत होतों. माझ्या अन्तःकरणांचे विचार त्याला कळत. व त्याचे मला कळत. आम्ही दूर असूनहि एकमेकांशीं जवळ असल्याप्रमाणें बोलत होतों. हें प्रेममय अन्तःकरणाचें लक्षण होय. " ( पु. ८–७९ ते ८० )

वरील उताऱ्यावरून पंत व परशराम यांचेमधील सलगी कशा प्रकारची होती याची थोडीशी कल्पना येते; तसेंच हेंहि दिसून येतें कीं, त्या उभयतांमधील ही सलगी सहन न होऊन कांहीं उपद्व्यापी मंडळींचे त्यांच्यामध्यें वितुष्ट पाडण्याचे प्रथमपासूनच प्रयत्न चालू होते. परशराम जरी फार प्रेमळ होता तरी तो स्वभावानें भोळा होता. १८८४ नंतर नोकरीनिमित्तानें तो हुबळी, पाच्छापूर वगैरे ठिकाणीं राहात असे. त्यामुळें त्याच्या भोळेपणाचा फायदा घेऊन वरील कारस्थानी मंडळींना पंतांविषयीं त्याचें मन कलुषित करण्यास चांगली संधि मिळाली व सद्‌गुरु बालमुकुंदांच्या मार्गाविरुद्ध पंत वागत आहेत आणि त्या मार्गाला मोठा धोका प्राप्त झाला आहे असें त्यांनीं त्याच्या मनांत भरवून दिलें. तो भोळा व एकधोरणी असल्यामुळें पंतांच्या विरुद्ध रचलेल्या कटांत सामील होऊन पंतांचें पारिपत्य करण्याचा त्यानें चंग बांधला आणि तो व गणपतराव या उभयतांचे त्या दिशेनें प्रयत्न सुरू झाले. सुबराव, भाऊ, राघू अवधूत व त्याचा भाऊ कृष्णा, कृष्णाजी मल्हारी घोरपडे वगैरे पंतांच्या बऱ्याच शिष्यमंडळींना त्यांनीं आपल्या कटांत सामील करून घेतलें. ही मंडळी पंतांची उघड उघड निंदा करूं लागली व धमकीची भाषाहि बोलूं लागली. आक्टोबर १८९१ मध्यें परशरामनें पंतांना एक पत्र लिहिलें. त्यांत तो म्हणतो, " Sorry to see the present change. With regard to the present movements and the lately passed ones, former links are no more. Your mind has been spoiled as well as mine too. No use of the company as the minds are prejudiced.

"Cannot explain any more. Last compliments to self and the blessed company." [ हल्लीं झालेला फरक पाहून फार वाईट वाटतें. हल्लींच्या व नुकत्याच होऊन गेलेल्या गोष्टींवरून ( असें म्हणावेसें वाटतें कीं ) पूर्वींचे संबंध आतां राहिलेले नाहींत. तुझें तसेंच माझेंहि मन बिघडलें आहे. ज्या अर्थीं मनें कलुषित झालीं आहेत त्या अर्थीं एकमेकांचा सहवास नसलेला बरा. ( मी ) अधिक खुलासा करूं शकत नाहीं. तुला आणि तुझ्या पुढ्यांतील मंडळींना शेवटला रामराम. ] हें पत्र मिळतांच अमृतराव देशपांडे वगैरे कांहीं भक्तमंडळीसह पंत परशरामाच्या घरीं गेले व त्याच्या वृत्तींत असा फरक होण्याचें कारण काय असें त्यांनीं त्याला विचारलें. पण त्यानें सरळ जबाब न देतां उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं व दुसरे दिवशीं पंतांना पत्र लिहून असें कळविलें कीं, " काल माझ्या घरीं आला होतास. पण तुला अन्नूनें पाठविलें. या उप्पर येशील तर परिणाम वाईट होईल. " याच संधीस सुबराव नावाच्या पंतांच्या एका शिष्यानें त्यांना पत्र लिहून तो आपला शेवटला रामराम असल्याचें कळविलें व " तूं माझा गुरु नव्हेस व मी तुझा शिष्य नव्हे. ××× आमच्या कंपनीची आम्हाला ऑर्डर झाली आहे कीं, तुझ्याशीं बोलूं नये व तुझें तोंड पाहूं नये, " असें स्पष्ट लिहिलें. तसेंच परगावच्या कांहीं मंडळींनाहि ज्यांच्यांत पंतांची निंदा केली होती अशीं पत्रें गेलीं. कृष्णराव व गणपतराव हे उभयता बंधु व त्यांच्या छापेखालील मंडळी यांच्या अंतःकरणस्थितीची पंतांना खरी जाणीव झाल्यापासून त्यांच्याशीं ते फारसा संबंध ठेवीत नसत. २५-११-१८९१ रोजीं रावजींना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत ते लिहितात " इकडील मजकूर, परशराम, गणू, भाऊ, ठेंगणा कृष्णा, धाकटा कृष्णा, बंडु आणि इतर कांहीं मंडळी विरुद्ध होऊन सर्व संबंध तोडून टाकिला. औषध नसतां खरूज गेली. अवधूतलीला अगाध आहे ! "

३-१२-१८९१ या तारखेचें पंतांना एक पत्र आलें. त्याच्या सुरवातीला, "आबाचा भोपळा फुटला!" हें वाक्य ठळक अक्षरांनीं लिहिलेलें असून शेवटी "आपला हितचिंतक; नसल्यास सत्यमार्गाभिमानी " अशी सही आहे. हें पत्र फार भयंकर स्वरूपाचें असून त्यांत पंतांवर अत्यंत निंद्य व घाणेरडे आरोप केलेले होते व " शिमगा जवळ आला; होळी जाळणार; बॉंब तरी सुरवात झाली. पौर्णिमेस होळी तोडणार म्हणजे अवतारसमाप्ति," असेंहि म्हटलें होतें. तसेंच पंतांना उद्देशून देवीच्या रेड्याचा बळी देण्याचीहि धमकी दिली होती ! !

कृष्णराव, गणपतराव, परशराम व त्यांचे सुमारें पंधरा वीस हस्तक यांनीं असें ठरविलें होतें कीं दत्तजयंतीच्या दिवशीं ( १५-१२-९१ ) उत्सव चालू असतांना भजनाचा बेरंग करावयाचा व होळीपौर्णिमेपर्यंत पंतांचा खून पाडावयाचा आणि गोपाळ श्रीपाद भागोजीकोप वगैरे पंतांच्या बाजूच्या कांहीं मंडळींनाहि मारावयाचें, पण या कटांतील पुढाऱ्यांना, आपण स्वतः नामानिराळे राहून, हें काम करावयाचें असल्यामुळें त्याकरितां कांहीं मारेकरी तयार करण्याचें त्यांनीं ठरविलें व कांहीं अशिक्षित व धाडशी लोकांकडून शपथा

घेवविण्याचें काम सुरू झालें; कांहीं जणांनीं त्याप्रमाणें शपथा घेतल्याहि ! परशरामकडे येणाऱ्या मंडळींत कृष्णा मल्हारी घोरपडे नावाचा एक मराठा इसम होता. त्याला पोलीस-खात्यांत नोकरी होती. त्याचें परशरामकडे जाणें येणें फार असे व परशरामाच्यामुळें त्याला पंतांची माहिती होऊन त्याचेवर पंतांचा अनुग्रह झाला होता. प्रथम तो या मंडळीच्या मसलतींत सामील होता. पण जेव्हां त्याच्यावर पंतांना मारण्याच्या बाबतींत शपथ घेण्याची पाळी आली, "तेव्हां माझ्या गुरूला मारण्याच्या कटांत मी सामील होणार नाहीं व शपथ घेणार नाहीं," असें त्यानें स्पष्ट सांगितलें. त्यामुळें परशराम फार रागावला व त्यानें कृष्णाला घालवून दिलें. पुढें ही बातमी कृष्णानें पंतबंधु गोविंद-रावजींच्या कानावर घातली व दत्तजयंतीच्या दिवशीं कांहीं तरी धामधूम करून उत्सवांत व्यत्यय आणण्याचा कांहीं मंडळींनीं घाट घातला असल्याचेंहि सांगितलें. दत्तजयंतीचा उत्सव जवळच (१५-१२-९१ रोजीं) आला होता. तेव्हां तो सुरळीतपणें कसा पार पडतो याबद्दल गोविंदरावजींना मोठी काळजी येऊन पडली. त्यावेळीं पंत दड्डीस गेले होते. ते परत आल्यावर गोविंदरावजींनीं सर्व हकीगत त्यांचे कानावर घातली; तेव्हां पंतांनीं सर्वांना धीर देऊन व सद्गुरूच्या भक्तवत्सल ब्रीदावर दृढ विश्वास ठेवून नेहमींप्रमाणें उत्सवाची तयारी करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सर्व तयारी झाली व दत्तजयंतीच्या दिवशीं ठरल्याप्रमाणें उत्सव चालू झाला. पण नेहमीं-प्रमाणें मंडळी मात्र जमली नव्हती. फक्त पंतांचे पाच बंधु, चुलते जिवाणकाका, मावस-भाऊ गणु अण्णा व अण्णाप्पा मारीहाळकर, पुटप्पा कणबर्गी, विठू व गुंडू सोनार दड्डीकर, अमृतराव देशपांडे, बाबासाहेब सेनापति, मंगेशराव गुंजीकर, रामभट माहीनकट्टी व पंतांच्या विरुद्ध असलेल्या मंडळीच्या जाळ्यांत न सापडलेले कांही इसम इतकी मंडळी हजर होती. संध्याकाळची वेळ झाली तेव्हां पंतांनीं गोविंदरावजींना असें सांगितलें कीं, "विरुद्ध असलेल्या मंडळींचा सर्व राग माझ्या एकट्यावरच आहे. माझ्या बाळप्पाच्या उत्स-वांत मी गुरुभजन करीत बसलों असतांना माझ्या गुरुबंधूंकडून माझा बळी पडला तर मी स्वतःला धन्यच समजेन; पण माझ्याबरोबर इतरांना त्रास होणें बरें नव्हे. तेव्हां इतर सर्व मंडळींना घरीं जाण्यास सांग." तें ऐकून गोविंदरावजींचा कंठ भरून आला व त्यांनीं पंताना असें सांगितलें कीं, "आज येथें जी मंडळी आहेत त्यांपैकीं कोणीहि कसलाहि प्रसंग आला तरी तुला सोडून जाणार नाहीं. काय परिणाम व्हावयाचा असेल तो सर्वांचाच एकदम होईल." तेव्हां पंतांनाहि गहिंवर येऊन त्यांनीं गोविंदरावजींच्या हातांत गुलाल दिला व "सर्वांच्या डोक्यावर भंडारा घाल" म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं केलें व भजनाला सुरवात झाली.

त्यावेळीं दत्तमंदिरांत असलेली सर्व मंडळी पूर्ण भक्तिमान व एकदिलाची असून कसलाहि प्रसंग आला तरी त्याला तयार होती. पंतांचे मावसभाऊ गणु अण्णा व चुलते जिवाणकाका हे विरुद्ध पक्षाशीं दोन हात करण्यास तयार होऊन बसले होते. पंत-बंधु वामनराव व बाबासाहेब सेनापति हे दोघे हातांत मोठाले सोटे घेऊन अमृतराव

देशपांड्यांच्या घराच्या मागील बाजूस उभे राहिले होते व कृष्णा मल्हारी घोरपडे हा तर जिवावर उदार होऊन घराच्या बाहेर सशस्त्र उभा होता; पण या मंडळीच्या या तयारीसंबंधीं पंतांना प्रथम कांहींच कल्पना नव्हती व त्यांचा उत्सवाचा कार्यक्रम शांतपणें चालला होता. त्या दिवशीं रात्रीं दहा वाजण्याच्या सुमारास परशराम व विरुद्ध पक्षांतील इतर कांहीं मंडळी अमृतरावांच्या घराच्या दारापर्यंत आली, तों त्यांना तेथें सशस्त्र उभा असलेला कृष्णा मल्हारी घोरपडे दिसला व आंत पंतांजवळहि मंडळींचा भरणा बराच असल्याचें त्यांच्या नजरेस आलें. तेव्हां आपला कट फुटला असून ही मंडळी तयारींत आहेत, आतां येथें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं असें वाटून ते सर्व तसेच परत गेले व उत्सवाचा कार्यक्रम बिनबोभाट यथासांग पार पडला. भजन वगैरे आटोपल्यावर पंतांनीं सर्वांना जवळ बोलावून सद्‌गुरूच्या कृपेनें उत्सव निर्विघ्नपणें पार पडल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नंतर जेव्हां घडलेल्या प्रकारासंबंधींची हकीगत पंतांना समजली व आपला भाऊ वामन व बाबासाहेब सेनापति हे लांग कसून व हातांत सोडगे घेऊन घराच्या पिछाडीला रक्षकाचें काम करीत होते ही गोष्ट त्यांच्या कानावर आली तेव्हां त्यांचा कंठ भरून येऊन व त्यांनीं वामनला जवळ घेऊन मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें. त्याच वर्षी वामनराव बी. ए. ची परीक्षा पास झाले होते. स्वभावानें ते फार शांत व थिम्मे होते. तेव्हां आपला वामन आपल्या जिवाला धोका येण्याचा संभव आहे असें जाणून कोणाला न कळवितां स्वतःचा जीव धोक्यांत घालण्यास तयार झाला होता हें ऐकून पंतांना फारच कौतुक वाटलें व त्याच्या अतुल बंधुप्रीतीबद्दल धन्यता वाटली. अशा रीतीनें कृष्णराव, गणपतराव व परशराम यांचा दत्तजयंतीच्या उत्सवांत बखेडा करण्याचा डाव फसला व तेव्हांपासून त्यांच्या नादीं लागलेल्या मंडळींत फाटाफूट होण्यास सुरवात झाली.

१८९१ अखेर पंतांचे बंधु गोपाळराव हे मुलकी खात्यांत नोकरीवर असून फिरतीवर होते. बेळगावमधील पंताचा विरोध करणाऱ्या मंडळींच्या हालचालींची बातमी जेव्हां त्यांच्या कानावर गेली तेव्हां त्यांनीं परशरामला पत्र लिहून खरा प्रकार काय आहे यासंबंधीं चवकशी केली व १३-१-१८९१ (पौष शु. १४ श. १८१३) रोजीं परशरामनें त्यांना इंग्रजींत पत्र लिहून जबाब पाठविला. त्यांत पुढील मजकूर होता. "It is the bounden duty of every man who is concerned to the religion to see the welfare of the Samarth's Panth, to the sacrifice of his own life. ××× It is quite true that the brother-hood remains among true brothers, but not among crafty ones." (ज्याला धर्माची चाड आहे त्यानें आपले प्राण खर्ची घालूनहि समर्थाच्या पंथाचें रक्षण करणें हें त्याचें, वाटेल तें करून करण्याचें, कर्तव्य आहे. ××× हीं गोष्ट अगदीं सत्य आहे कीं जे खरे बंधु आहेत त्यांच्यामध्येंच बंधुप्रीति असूं शकते. पण जे कावेबाज आहेत त्यांच्यामध्यें ती असणें शक्य नाहीं.) वरील पत्रांतील मजकुरावरून

ही गोष्ट स्पष्ट दिसते कीं पंत हे गुरुमार्गाविरुद्ध वागत असून सद्धर्मावर मोठेंच संकट ओढवलें आहे, त्यामुळें त्यांना शासन करून त्या सद्धर्माचें संरक्षण करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे अशी परशरामाची प्रामाणिक समजूत झाली होती व तो जात्या भोळा व एकधोरणी असल्यामुळें तें ' कर्तव्य ' करण्याचे त्यानें जारीनें प्रयत्न सुरू केले होते.

मागें उल्लेख केलेल्या निनावी पत्रांत लिहिल्याप्रमाणें फाल्गुन शु. १५ शके १८१३ ( १३-३-१८९२ ) रोजीं अगर तत्पूर्वी पंतांना मारण्याचा या कटवाल्या मंडळींचा संकल्प होता हें उघड दिसतें. परंतु दत्तजयंतीच्या दिवशीं भजनांत व्यत्यय आणून उत्सवाचा वेरंग करण्याचा त्यांचा बेत फसल्यापासून त्यांच्यापैकीं कांहीं जणांना खरा प्रकार समजून येऊन विनाकारण गुरुद्रोह केल्याबद्दल पश्चात्ताप झाला व त्यांनीं पंतांकडे येऊन त्यांची क्षमा मागितली आणि घडलेली सर्व हकीगत त्यांना सांगितली. तसेंच कांहीं काळ लोटल्यावर परशरामालाहि झाल्या गोष्टीबद्दल पश्चात्ताप होऊन तो पुनः पंतांशीं सलगीनें वागूं लागला. मात्र, कृष्णरावांचें पूर्वीचेंच धोरण कायम होतें. पंतांशीं असलेला त्यांचा संबंध तुटल्यासारखाच झाला; दिवसेंदिवस त्यांची आर्थिक स्थिति खालावत गेली व १८९७ पर्यंत म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत तीच स्थिति कायम होती. गणपतराव व त्यांचे कांहीं हस्तक यांच्या मनांतील पंतांविषयींची आढी कांहीं वर्षे कायमच होती. पण १८९७ सालीं कृष्णराव वारल्यानंतर त्यांनाहि पश्चाताप होऊन त्यांनीं पंतांकडे जाणें येणें सुरू केलें. स्वतःचा गैरसमज झाल्यामुळें जे सदर कटांत सामील झाले होते असे बहुतेक इसम पुढें पंतांचे निःसीम भक्त बनले.

वरील सर्व प्रकार झाले तरी पंतांची शांति अढळ होती व त्यांनीं आपल्या जिवावर उठलेल्यांनाहि पश्चात्ताप झालासें पाहून प्रेमानें जवळ केलें. पंतांना मारण्याचा कट फाल्गुन शु. १५ ( १३-३-१८९२ ) पूर्वीच उघडकीस आला होता. त्यानंतर आपल्यास नुकत्याच आलेल्या अनुभवावरून २१-३-१८९२ रोजीं त्यांनीं एक टाचण केलें व त्यांत आपल्या शिष्यांना पुढील इषारे दिले आहेत— ( १ ) स्थूलाभिमानी यांची संगत धरूं नको; ( २ ) मत्सरी स्वभावाचा भरंवसा धरूं नको; ( ३ ) वैराग्याविण वेदान्तमार्ग धरलेल्याचा सहवास भयंकर आहे; ( ४ ) द्रव्य, स्त्री, मान इत्यादिकांचे अभिलाषी यांची शांति ढोंगाची आहे; ( ५ ) नास्तिक, अभक्त, स्वैरच्छाचारी यांचा वारा नको; (६) वेद, शास्त्र, गुरु, देव यांस न मानणारा घातक शत्रु समज; ( ७ ) भक्ति, वैराग्य, सूक्ष्म विचार, खरें मुमुक्षुत्व इत्यादि ग्राह्य गुणांच्या अभावीं अद्वैत सिद्धांत ज्यांनीं वाचिले, ऐकिले असतील ते गोमुखी व्याघ्र जाण." पंतांनीं हे जे इषारे दिले आहेत त्यांवरून नुकताच जो अनर्थ टळला त्याला कारणीभूत कोणकोणते दुर्गुण झाले होते याची सहज कल्पना येते.

तसेंच आपल्याला आलेल्या महत्वाच्या अनुभवांची छाननी करून त्यांचीं टाचणें करण्याचा पंतांचा पूर्वी जो क्रम चालू असे त्याला अनुसरून वरील कारस्थानासंबंधीं त्यांनीं स्वतः कांहीं टाचणें करून ठेविलीं आहेत. त्यांमध्यें कटांत सामील असलेल्या

अठरा इसमांची यादी देऊन त्यांपैकीं पुढारी कोण होते, तसेंच या कारस्थानांत कोणीं कोणीं कोणकोणता भाग घेतला होता यासंबंधीं स्पष्टीकरण केलेलें आहे.

सदर टाचणांत कृष्णराव व गणपतराव यांचेसंबंधीं सविस्तर वर्णन करून परशरामासंबंधीं पंत लिहितात, " प. १६ वर्षे संगतींत राहिलेला. चार अक्षरें शिकलेला. संगतीनें दुर्दशा सोडून संसारांत चांगल्या स्थितीस पोहोंचलेला, गोधडींत खेळलेला, बंधूपेक्षांहि मानिलेला, कधींहि अप्रीतीस पात्र न झालेला, नं. २ चे अंतर हेतु न जाणतां जिव्हाचापल्यास सत्य मानून संसारस्थितिमदानें मागील सर्व विसरून खरे हितचिंतकाची निर्भर्त्सना करून, आपस्वार्थाच सत्य हितकर्ता मानून, ज्याचे प्रसादानें आज चांगल्या स्थितींत आहे त्यास विसरला, मार्गाची निंदा केली. ग.स साह्य होऊन खून, मारामारी अर्थ–मानहानी इत्यादि भयंकर गोष्टी करण्याला प्रवृत्त झाला. ग.नें असंभाव्य गोष्ट त्यास सांगून त्याचाच दुर्लौकिक केला तरी तो हिताचा जाणून तामसांध होऊन त्याचाच पिच्छा धरिला." तसेंच अवधूत राघूसंबंधीं पंतांनीं असें म्हटलें आहे कीं त्यानें "आपला अवधूतपणा त्याचे ( परशरामचे ) पायीं अर्पण केला" व सदर अठरा इसमांपैकीं नं. १२ ते १८ या सात इसमांसंबंधीं असें म्हटलें आहे कीं, "त्यांना पुढाऱ्यांनीं भुलथापा देऊन त्यांचेकडून मारेकऱ्यांचें काम करविण्याचा घाट घालून आपण वेगळेंच राहावें अशी मसलत केली. हे लोक पहिल्यानें त्यांच्या शब्दास भुलून चेतले पण पुढें शुद्धीवर येऊन त्यांनीं आपला मार्ग सुधारला." या संकटांतून कोण कोण बचावले यासंबंधीं पंतांनीं पुढीलप्रमाणें खुलासा केला आहे. " या मत्सराग्नींत बेळगावांतील बहुतेक सापडून होरपळले. फक्त कृ. देसाई, कोपकर, वगैरे मंडळी व दड्डी, अक्कोळकडील मंडळी समर्थकृपेनें चांगलीच बचावली. सद्गुरु त्यांसी पूर्ण शांति देवो. गणु, परशराम, सोनार यांचे लेख हजर आहेत. शिवाय १२ ते १७ नंबरांनीं एकंदर कच्ची हकीगत कळविली."

इतका अनर्थ होण्याला कोणते दुर्गुण कारणीभूत झाले यासंबंधीं पंतांनीं पुढीलप्रमाणें टाचण करून ठेविलें आहे:—" ( १ ) गुरुमंत्रपठण सोडलें; ( २ ). भजनाचा कंटाळा; ( ३ ) गुरुभजनाची लाज वाटूं लागली; ( ४ ) गुरुमहापंथाच्या समारंभाची निर्भर्त्सना; ( ५ ) गुरुउत्सवाची अनास्था; ( ६ ) भिन्न संप्रदायक्रम; ( ७ ) गुरूच्या आज्ञेविरुद्ध स्वच्छंद राहाणें; ( ८ ) अधिकाराची विस्मृति; ( ९ ) गुरुवचनाची विस्मृति; ( १० ) द्रव्य, तारुण्य, अधिकारमद; ( ११ ) स्वेच्छाचाराची अनिवार इच्छा; ( १२ ) पूर्व स्थितीचें विस्मरण." हें कारस्थान कोणत्या प्रकारांनीं व्यक्त झालें तें त्यांनीं पुढीलप्रमाणें नमूद करून ठेविलें आहे. " गुरुनिंदा, गुरुहत्येची खटपट, गुरुभजनउत्सवभंग करण्याचा यत्न, गुरुगौप्यप्रगटीकरण, विश्वासघात, गुरुआज्ञेविरुद्ध वर्तन, अवधूत मार्गावर टीका इत्यादि, इत्यादि " व या अनिष्ट प्रकारापासून सिद्ध झालेल्या गोष्टी पुढीलप्रमाणें वर्णिल्या आहेत. " गुरुभक्ति सुटल्यापासून राजस तामस गुणांचा उत्कर्ष होऊन जन मांग बनतात आणि तामसांतच राहून तामसांतच मरण पावून तामस योनींत जन्मतात. गुरुविण सात्विक स्थितीस मार्ग नाहीं. आतां पुष्कळ

दिवस गुरूचे सहवासांत राहून अनेक बोध ऐकून स्वतंत्र रीतीनें पार पडूं असा अभिमान धरणारा, भोपळ्याचे साह्यानें कैक दिवस निर्विघ्नपणें ( जो ) डबक्यांत पोहला आणि भोपळा टाकून आतां महासागरांत पोहण्यास गेला त्याचे गतीस पोहोचले. बुडखा तोडून शाखेचीं फळें अनंत काळ भोगणारे हेच पुरुष होत ! " तसेंच पंत पुढें म्हणतात, " स्थूलाभिमान दृढ, विषयाशा पूर्ण, वैराग्याचा अभाव, द्रव्य-स्त्री-पुत्र-लौकिक इत्यादि जगरीतीचा ध्यास, चिरंजीवपणाची भ्रांति, दृश्यच सत्य ही मति आणि गुरु, शास्त्र, इत्यादि परमार्थ खोटे असें मानून श्रवण, मनन, निदिध्यासन, भजन, मंत्र इत्यादिकांचा त्याग, अशांची गति अवधूत जाणे ! "

वर या कटासंबंधीं जी माहिती दिली आहे ती मुख्यत्वेंकरून पंतांचीं स्वतःचीं टाचणें, पंतबंधु गोविंदरावजींनीं लिहिलेली हकीगत व कृष्णा मल्हारी घोरपडे ऊर्फ कृष्णा अवधूत यांनीं लिहिलेली हकीगत यांच्या आधारें दिलेली आहे. परशराम, सुबराव वगैरेंच्या हातचीं जीं पत्रें पंतांच्या दप्तरांत उपलब्ध आहेत व ज्यांचा उल्लेख पंतांच्या टाचणांत केलेला आहे त्यांच्यावरून व पुढें या कटाचें जें पर्यवसान झालें त्यावरून सदर हकी-गतीच्या सत्यतेबद्दल शंका रहात नाहीं. तसेंच गणपतराव व राघू अवधूत यांनीं पंतांच्या पश्चात जे आपले आध्यात्मिक अनुभव लिहून ठेविले आहेत त्यांमध्ये पंतांशीं कांहीं मंडळींचा विरोध असल्याचे स्पष्ट उल्लेख आहेत.

पंतांच्या विरुद्ध असलेल्या मंडळींत गणपतराव हे प्रमुख होते या गोष्टीचा मागें उल्लेख केलाच आहे. पंतांना मारण्याचा कट फिसकटल्यापासून त्यांचा पंतांसंबंधींचा ग्रह बदलत चालला व कांहीं काळ लोटल्यावर ते पंतांना फार पूज्य मानूं लागले. पंतांच्या पश्चात केलेल्या आपल्या आध्यात्मिक अनुभवांच्या टाचणांत त्यांनीं पंतांबद्दल फार आदर व पूज्यभाव व्यक्त करून कृतज्ञताबुद्धीनें त्यांच्या उपकारांचें स्मरण केलें आहे. गणपतराव व त्यांचे साथीदार यांनीं पंतांशीं जो कित्येक वर्षें विरोध केला त्यासंबंधीं त्यांच्या टाचणांत पुढील मजकूर आहे, "दत्तोपंताच्या भाकित वाक्याप्रमाणें बाह्यांतरीं म्हणजे अंतःकरणास कांहीं धक्का न लागतां त्याच्या कांहीं बाह्य वर्तनाच्या निमित्तानें थोडी मंडळी त्याच्या विरुद्ध वागूं लागली. उलट वागणें म्हणजे मूळ हेतु त्यांना व्यवहारदृष्ट्या कांहीं त्रास होऊं नये असा होता " व पुढें गणपतरावांनीं असें म्हटलें आहे कीं जेव्हां दत्तोपंतांशीं कांहीं मंडळींचा विरोध आल्याचा फायदा घेऊन (मागें उल्लेख केलेले) दत्तवाडकर पाटील हे त्यांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करूं लागले, तेव्हां सदर मंडळींनीं दत्तवाड-करांना पुढीलप्रमाणें जबाब दिला, " आम्ही दत्तोपंताबरोबर विरोधभक्तीनें पाहिजे तसे वागूं; तुम्हांला त्यासंबंधीं विचार करणेचें कांहीं कारण नाहीं" आणि त्यायोगें बाह्यतः जरी पंतांशीं आपला विरोध होता तरी अंतरंगीं पंतांबद्दलचा आपला आदर कायमच होता असें त्यांनीं दत्तवाडकरांच्या निदर्शनास आणिलें. तसेंच गणपतरावांच्या लेखावरून असें दिसतें कीं ते व त्यांचे साथीदार यांचा विशेष रोष पंतांवर नसून त्यांच्या सन्निध असणाऱ्या गोपाळ श्रीपाद भागोजीकोप, कोन्हेरराव ऊर्फ दादा सावनूर वगैरे कांहीं मंडळीवर होता

व त्यांच्या नादीं लागून त्यांना फाजील महत्व दिल्यामुळें विरुद्ध असलेल्या मंडळींच्या रोषास पंत पात्र झाले होते. पंतांच्या टाचणांवरून असेंहि दिसतें कीं त्यांच्यावरोबर गोपाळ भागोजीकोप यांनाहि मारण्याचा सदर कटवाल्यांचा वेत असून त्यांनीं भागोजीकोप यांच्या घरीं जाऊन दंगामस्ती केली होती. यासंबंधीं "उभयत्रिध मायेनीं गो. चे घरापर्यंत मजल पोचविली" असें पंतांनीं लिहिलें आहे.

वरील कटांत सामील असलेल्या मंडळींपैकीं राघू अवधूत हे एक होते हें वर लिहिलेंच आहे व तो कट मोडल्यावर जी कांहीं मंडळी पूर्ववत पंतांकडे येऊं लागून त्यांची निःसीम भक्ति करूं लागली त्यांपैकीं ते एक होते. त्यांनीं पंतांच्या पश्चात आपल्या अनुभवांचें जें टाचण करून ठेविलें आहे त्यांत या कटाचा पुढीलप्रमाणें ओझरता उल्लेख केला आहे; "कांहीं मंडळी व परशराम आणि पंत यांचा वेबनाव झाला होता. मींहि त्या मंडळींचे संगतीनें कांहीं दिवस पंतांकडे जात नव्हतों; परंतु माझी पंतांवरची भक्ति ढळली नव्हती" व पुढें पंतांचें गुणवर्णन करितांना ते म्हणतात, "पंतांचा बोध ठोक्याचा असे. त्यांत ते कोणतीच कसर ठेवीत नसत. त्यांच्या पायावर जो पडला त्यास आपला म्हणून तात्काळ मुक्त करून निर्भय, निश्चिंत करून सोडीत असत. त्यांच्याकडे मुक्ति उधार नसे. ते सर्वदा हांसत खेळत व खेळामध्येंच बोध देत असत. त्यांनीं कधीं सेवा घेतली नाहीं, नमस्कार व मोठेपणा घेतला नाहीं. कितीहि दुष्ट, चांडाळ, अपराधी असला व तो शरण आला तर त्यास आपला म्हणवून सर्व अपराध क्षमा करून कांहीं मनांत न आणितां अभय देत असत. त्यांची बोधशक्ति फार मोठी असे. पुत्रांविषयीं फार प्रेम असे. × × × ज्यांनीं आम्हांस खरा मार्ग दाखवून दिला, अज्ञानभ्रांति हरून अखंडानंदस्वरूपांत रमविलें व अखंड निश्चिंति दिली, त्यांच्या उपकाराचे कसें उतराई व्हावें ? आमचे देहाचे जोडे करून ( त्यांच्या पायांत ) घातले तरी तें कमीच आहे." गैरसमजुतीनें कां होईना, पण कांहीं काळ तरी सदर कटांत सामील असलेल्या राघू अवधूतांचे वरील उद्गार वाचले म्हणजे सद्गुरूच्या अतर्क्य लीलेचें कौतुक वाटतें !

तसेंच, वरील कटांतील एक पुढारी परशराम यांनीं पंतांच्या पश्चात् पंतबंधु गोपाळराव यांना लिहिलेल्या एका पत्रांतील पुढील मजकूर वरील कटाच्या दृष्टीनें महत्वाचा वाटल्यावरून तो येथें देत आहोंत. "रा. अवधूत राघू व गणू गुमास्ते यांजकडून काल रोजीं पत्रें आलीं. त्यांत आमचे परम पूज्य बंधु रा. रा. दत्तोपंत यांनी गेल्या सोमवारीं देह सोडिला व शेवटीं आम्हांला सोडून गेले हें ऐकून अत्यंत दुःख झालें. उपाय नाही. अवधूत बाळापा गेले त्यावेळीं देखील असें दुःख झालें नाहीं. कारण पंतांचे गुण व सुस्वभाव पाहून त्यांची आपल्या जागीं नेमणूक करून नंतर निघून गेले व आम्ही एकंदर बाळापाचे जागीं पंत आहेत असें मानून मनाचें शांतवन केलें होतें. असो. समर्थाची इच्छा."

अशा प्रकारें १८८२ पासून पंतांचे कांहीं गुरुबंधु व शिष्य यांनीं त्यांच्याशीं जो विरोध करण्यास सुरवात केली होती त्याचें पर्यवसान या कटांत होऊन तो फसला आणि

विरोधी मंडळींचे अंतस्थ हेतु निष्फळ झाले. तरी पण कांहीं मंडळींच्या मनांतील द्वेषाग्नि १८९५–९६ पर्यंत धुमसत होता व त्यापासून पंतांना मधुन मधुन तापहि होत असे. पण या विरोधाच्या योगानें पंतांची गुरुभक्ति व अद्वैतबोध हीं पूर्णपणे कसाला लागून तीं अधिक उज्वल झालीं आणि गुरुबंधु व शिष्य यांचेकडून होणारी निंदा व छळ यांच्यामुळें त्यांचें सद्‌गुरुभजनसेवेचें अंगीकृत कार्य अधिक नेटानें चालू झालें. सदर मंडळींपैकीं कांहीं जणांना उद्देशून पंतांनीं १८९५ सालीं पुढील पदें म्हटलीं. " नेणत आम्हीं खेळ खेळलों। तुम्हा सांगाती। आमुची गुरुपायीं प्रीति ॥धृ.॥ झाला खेळ दृष्टि न पडे। आमुची ही गति। भोगूं गुरुपायीं शांति ॥१॥ मुळींच संग नाहीं तुमचा। ढोंगाची ही प्रीति। आमुची आम्हां अकळ स्थिति ॥२॥ तुमचे ठायीं तुम्हीं रहा। आम्ही भोगूं शांति। दत्तपदीं आम्हां रति ॥३॥ " ( द. प्रे. ल. ९०६ ) व " येऊं नका तुम्ही मजसवें आतां। वर्यिकटिकां व्यर्थची भीतां ॥ धृ. ॥ जनसंगति जनप्रीति। सदा करा तुम्हीं विषयाचिंता ॥१॥ देहातीत मी, देहाधीन तुम्हीं। कैसी संगत जुळेल आतां ॥२॥ दत्तपदीं आम्हीं अनन्य झालों। नाहीं तुमची स्वप्नींहि वार्ता ॥३॥" ( द. प्रे. ल. ९०७ )

स्वेच्छेनें केलेले दीर्घ प्रयत्न हे जसे सत्पुरुषांच्या आत्मोन्नतीच्या मार्गातील मुख्य साधन होत, त्याचप्रमाणें छळ, निंदा, अपमान वगैरे प्रकारच्या परेच्छाप्रारब्धामुळें घडणाऱ्या गोष्टींचाहि ते आपली आध्यात्मिक उन्नति करून घेण्याकडे फायदा करून घेत असतात; किंबहुना वरील प्रकार उपस्थित करून सद्‌गुरुच आपली आत्मशांति, सद्‌गुरुभक्ति व बंधुप्रीति यांची परीक्षा पाहात असतो व हा सर्व त्याचाच खेळ आहे अशी त्यांची भावना असते आणि म्हणून "भक्तहितार्थ निंदकाची झाली उत्पत्ति। बोधमार्ग हा सुगम करूनी देती निजमुक्ति ॥ १ ॥" (द.प्रे.ल.२५८) असें त्यांनीं म्हटलें आहे. तसेंच सुगम १८९४–९५ च्या सुमारास झालेलीं पंतांचीं पुढील पदें या गोष्टींची साक्ष पटवितात. " छळतां छळतां जग हें भागलें। । म्हणुनी गुरुपदीं राहीं मी उगलें ॥ धृ० ॥ निंदारूपें स्तविती मजला ॥ हेंचि सदा मी भोगीं सोहाळे ॥ १ ॥ वैरी न कोणी जगीं दिसती। आप्त इष्ट विश्व सगळें ॥ २ ॥ दत्तपदीं अखंड रमलों। निजप्रेमाब्धि सहज उसळे ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. ८२५ ) व " छळ करितां जन येई उत्तेजन। गुरूचें भजन कराया ॥ धृ० ॥ छळ न करिती परिक्षा घेती। निजशांति द्याया ॥ १ ॥ स्वार्थ सांडुनी परार्थ झटती। बोध दृढ कराया ॥ २ ॥ निंदोत जन आनंद मजला। भजतों दत्तराया ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. ८७२) पुढील पदांत याच्याहि पुढें जाऊन पंतांनीं निंदकांना गुरुरूप मानून पुढीलप्रमाणें नमन केलें आहे. " नमन करणें निंदकासी। शांतिसाधन साधकासी ॥ धृं० ॥ मलापहारी निंदकसरिता। चित्तशुद्धि दे त्वरिता ॥ १ ॥ मोल न घेतां शुद्ध करिती। आपण जाती अधोगती ॥ २ ॥ निंदक जन हे गुरु मानुनी। दत्त नमन त्यां करी दुरूनी ॥ ३ ॥". (द.प्रे.ल. ७९०) वरील पदांवरून पतांनीं आपल्याला होत असलेल्या विरोधाचा आणि आपल्या निंदेचा व छळाचा कसा फायदा करून घेतला हें उघड दिसत आहे. त्याबद्दल उपकारस्मरण म्हणून त्यांनीं अशा निंदकांना त्वरित चित्तशुद्धि करवि-

णाऱ्या सर्वपावन गंगेची उपमा देऊन मोल न घेतां चित्तशुद्धि करविणारे परोपकारी महात्मे म्हटलें आहे. तसेंच आणखी एके ठिकाणीं पंतांनीं " जग माझा छळ करीत नाहीं, तर माझी प्रेमपरीक्षा, शांतिपरीक्षा घेतें. जग निष्ठुर नव्हे, दुष्ट नव्हे. सद्‌गुरुच जग असतां त्यांत निष्ठुरपणा येईल कोठून ? जे स्तुति करणारे त्यांच्या स्तुतींत कांहीं अर्थ नाहीं निंदकाकडून अंतःकरणप्रेमा घ्यावा. आलसर जागीं न शोधतांहि पाणी सांपेडल. दगडांत पाणी मिळविणाराच खरा शोधक. त्याचीच तृष्णा कोणत्याहि खडकावर अगर रखरखीत प्रदेशीं शांत होईल. त्यालाच नित्य प्रेमतृप्ति सर्वत्र मिळेल ! " ( पु. ८–२३१ ) असे उद्गार काढले आहेत.

---

# प्रकरण २९ वें

पुत्रदर्शन; पुत्रवियोग; पादुकाविसर्जन; गीतासार; भगवद्गीतेबद्दल अत्यादर व प्रशंसोद्गार; अकोळची दुसरी खेप; विष्णु हरि कुळकर्णी यांच्या दत्तमंदिरांत पादुकास्थापना; अमृतरावांचे घरांत राहात असतां ऐहिक व पारमार्थिक दृष्ट्या झालेला उत्कर्ष; मारुती गल्लींत बिऱ्हाड नेलें.

## पुत्रदर्शन

पौष शु. १४ शके १८१२ (२१-१--१८९१) रोजीं पंतांना मुलगा झाला व त्याचें नाव "बाळाराम" असें ठेविलें. पंतांना मुलगा झाल्यामुळें सर्वांना आनंद झाला खरा; पण कांहीं दिवसांनीं त्याची तब्येत बरीच बिघडल्यामुळें पंतांनीं त्याला हवा पालटण्याकरितां कुरुंदवाड येथें रावजी दड्डीकर यांचेकडे पाठविलें व त्याचेबरोबर त्याची आई सौ. यमनाक्का व आपले बंधु गोविंदरावजी यांना पाठविलें. २६-११-१८९१ रोजीं रावजींना लिहिलेल्या (न छापलेल्या) पत्रांत पंत लिहितात " बाळारामाची प्रकृति आठवड्यांतून एकदां तरी कळविलीच पाहिजे. त्याच्यावर माझें पुढील कर्तव्य सर्वस्वीं अवलंबून आहे, हें श्रीप्रेमळ माय दत्त जाणीतच आहे. व्यक्त करून दाखवीत नाहीं. त्याला दत्ताचा खुळा केला आहे. तो माझा नव्हे, दत्ताचा आहे. तुम्ही मात्र सांगितल्याप्रमाणें क्रम चालवून अंगारा, तीर्थ चालू ठेवावें. गोविंदाला उतावीळ होऊं देऊं नको. भजनाचें काम साईच्या कपाळीं लागलेंच आहे. तो तरी मुद्रांकित दत्ताचा खुळा आहे. सौभाग्यवतीलाहि दत्तस्मरणांत हुषार राहणेस आज्ञा कळविणें. सर्वांच्या प्रकृतीस जपून असावें. रक्षणकर्ता माय समर्थ आहे. सप्ताह, कवचपठण, भजन हीं अखंड चालावींत. दत्तचरणीं पूर्ण विश्वास ठेवून त्याच्यावर सर्व हवाला घालून त्याचे भजनीं निश्चिंत राहावें. अन्य चिंतन नको. तोच समर्थ आमच्या योगक्षेमाची चिंता वाहतो. त्याचे दारींचें कुत्रें होऊन त्याचें नामस्मरण भुंकत त्यानें कृपेनें टाकलेले तुकडे खात त्याचे चरणधुळींत राहावें हेंच कर्तव्य. रावजी, काळजी नको. काळजी करणारा तूं नाहींसच. समर्थ आहे." तसेंच त्यांनीं ३-७--१८९२ रोजीं लिहिलेल्या (न छापलेल्या) पत्रांत पुढील मजकूर आहे. "सौभाग्यवतीस दत्ताचें स्मरण भक्तिपूर्वक करीत धैर्यानें कांहीं दिवस तेथेंच राहण्यास कळविणें. इकडील हवा थोडीशी सुधारली म्हणजे इकडे आणितां येईल. विनाकारण चिंता करीत न बसण्यास सांगावें."

## पुत्रवियोग

बरेच दिवस हवापालट करूनहि बाळारामाच्या प्रकृतीला आराम पडत नाहींसें पाहून पंतांनीं त्याला बेळगावास आणिलें व तेथें तारीख ९-९-१८९२ रोजीं त्याचा अंत झाला. दुसरे दिवशीं रावजींना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत " बाळाराम काल परंधामास गेला. त्याचेबरोबर पूर्व संकेताप्रमाणें एकतारी, स्थापित पादुका आणि सोटा हीं पाठविलीं " असें पंतांनीं लिहिलें आहे. तसेंच १९-९-१८९२ रोजीं अण्णा अकोळकरांना लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे. " शेवटीं स्वतः कुरुंदवाडाहून आलेलें भगवें अंगावर घेऊन, जातां जातां स्थापन केलेल्या पादुका हातीं घेऊन तेथें जाणें झालें आणि ऊद घातला, एकतारी घुमूं लागली, दत्तनामगर्जना, अवधूतगजर हीं सुरू झालीं. अशा वेळीं पादुका त्याच्या छातीवर ठेविल्या, कपाळावर संप्रदायपूर्वक प्रणव कोरिला, तीर्थप्रसाद घातला आणि म्हटलें, " बाळारामा, आतां शांत झालास ना ? इच्छा पूर्ण झाली ना ? माझ्या पोटीं जन्म घेतल्याचें सार्थक झालें ना ? आतां गुरुप्रेमानंदानें जाशील ना ? " असे प्रश्न विचारतांच एकदम तशा मूर्च्छित स्थितींत प्रेमाचा हुंदका काढून प्रेमाश्रु वाहूं लागले. हें पाहून बाबा, प्रेम गिळून राम म्हण. उपदेशाचा परिणाम झाला हें समजलें. " जय अवधूत " असें म्हणून चोहोंकडे अवधूतगजरमय स्थितींत अंगावरील छाटी काढून त्याच्यावर घालतांच शांत झाला. " ( पु. ४-२४४ ) व त्याच दिवशीं रावजींना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंतांनीं बाळारामाच्या अखेरच्या वेळची सविस्तर हकीगत देऊन पुढें असें लिहिलें आहे कीं, "ममतेनें जरी मनास हुरहुर वाटली तरी प्राणी शुद्ध संस्कारानें गेला याचा प्रत्येक गुरुपुत्रानें आनंद मानला पाहिजे. × × × कालपर्यंत घरींच गीतासार लिहीत बसलों होतों. आज शाळेस गेलों. पादुका त्याचेबरोबर गेल्या व एकतारीहि फुटली, भगवेंहि गेलें."

पंतांच्या या पत्रांत पादुका, एकतारी व भगवें हीं बाळारामाबरोबर अग्निसात केल्याचा जो उल्लेख केला आहे, त्यासंबंधाची हकीगत पुढीलप्रमाणें आहे. भक्तमंडळीला सगुण भक्तीला लावावें या हेतूनें अश्विन वद्य १२ शके १८०७ ( ३-११-१८८५ ) रोजीं पंतांनीं महादेव गल्लींतील आपल्या बिऱ्हाडांत श्रीदत्ताच्या पादुका स्थापन करून गुरुद्वादशी, दत्तजयंती व गुरुप्रतिपदा हे उत्सव आपल्या घरीं करण्यास सुरवात केली या गोष्टीचा प्रकरण २२ मध्यें उल्लेख झालाच आहे. तेव्हांपासून त्यांच्याकडे येणाऱ्या शिष्यांची व भक्तांची संख्या सारखी वाढत होती. त्याबरोबरच सकाम भक्ति वाढत जाऊन कांहीं तरी हेतु धरून गुरुचरित्राचे सप्ताह करणें, श्रीदत्तापाशीं नाना तऱ्हेच्या मागण्या मागणें वगैरे प्रकार सुरू झाले व एखाद्याची मागणी सफल न झाल्यास साहजिकपणें त्याची अभक्ति होऊं लागली. हा प्रकार पाहून सद्गुरूचा अन्वयबोध उज्वल राखून " भक्तियोगस्य मद्गतिः " हें भक्तीचें मर्म भक्तमंडळीला समजावें म्हणून आपण जी पादुकास्थापना केली तिचें असें पर्यवसान झालेलें पाहून या सकाम भक्तीला कांहीं तरी युक्ति करून आळा घातलाच पाहिजे असें पंतांना वाटूं लागलें. जेव्हां महादेव गल्लींतील

बिऱ्हाड सोडून ते अमृतराव देशपांडे यांच्या घरांत राहावयास गेले तेव्हां पूर्वी स्थापन केलेल्या पादुका उचलून आपल्याबरोबर नेणें त्यांना भाग पडलें. पण त्यांनीं त्या अमृतरावांचे घरांतील बिऱ्हाडांत अगर त्या घराच्या मागील परसांतील मंदिरांत पुन्हां स्थापन केल्या नाहींत. त्या पादुकांची कांहीं तरी व्यवस्था लावून टाकण्याचें त्यांच्या मनांत बरेच दिवस घोळत होतें व त्यांचा मुलगा बाळाराम वारल्याची संधि साधून त्यांनीं त्या त्याच्या देहाबरोबर अग्निनारायणाला अर्पण केल्या. बाळारामाच्या निधनानंतर सुमारें तीन दिवस पंत खोली सोडून विशेष बाहेर गेले नव्हते. नंतर त्यांचे मावसभाऊ गणूअण्णा मारीहाळकर हे बेळगावास आल्यावर त्यांनीं पंतांना तसें करण्याचें कारण विचारिलें असतां, पंत म्हणाले " आजपासून माझी उपासना संपली. बालावधूताचें नेहमीं पाजळलेलें बोधखड्ग माझ्या हातीं असतां मला असले मायिक व्यवहार नकोत. आज मी मोकळा झालों. "

अशा रीतीनें पंतांचा एकुलता एक मुलगा बाळाराम यानें इहलोकची यात्रा संपविली. त्यानंतर त्यांना दुसरा मुलगा झाला नाहीं. बाळारामाच्या दुखण्यांत पंतांनीं त्याला बरा करण्यासंबंधीं पुष्कळ उपचार केले व त्याच्या निधनानें त्यांना फार दुःखहि झालें. पण पुढें एके प्रसंगीं सहज बोलण्याच्या ओघांत त्यांनीं पुढील उद्गार काढले आहेत. " मला एक मुलगा झाला होता; तो वारला; तेव्हां म्हणालों, " पोरें न झालेलीं बरीं, उगाच मोहास कारण होतें. " ( पु. ७–१२४ )

## ' गीतासार ' व भगवद्गीतेबद्दल अत्यादर

वर लिहिल्याप्रमाणें १९–९–१८९२ रोजीं रावजींना लिहिलेल्या पत्रांत " कालपर्यंत घरींच गीतासार लिहीत बसलों होतों" असा पंतांनीं जो उल्लेख केला आहे त्यावरून व त्यांच्या गीतासार या लेखावर ज्या तारखा दिल्या आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, तो लिहिण्यास सुरवात २४-२-१८९२ रोजीं झाली होती; पण तो अपुरा राहिल्यामुळें बाळारामाच्या निधनानें मिळालेल्या फुरसुदीचा फायदा घेऊन त्यांनीं तो पुरा केला. या लेखांत ( पु. ५-११५ ते १६८ ) मूळार्थ कायम ठेवून व अनुरूप असे दृष्टांत देऊन गीतेच्या प्रत्येक अध्यायाचें सार थोडक्यांत दिलें आहे. गीतासाराच्या सुरवातीला पंतांनीं सद्गुरूशीं आपलें अभेदत्व व्यक्त करून " तुझा चिद्विलास जो मीपणा त्याग तुझ्या सहज लीलामात्रें खेळविण्यास तूंच समर्थ आहेस " असें बालावधूतांना म्हटले आहे व त्याच्या अखेर "गीतेंतील मूळार्थ कायम ठेवून संक्षेपांत त्याचें सार लिहिलें आहे. या गीताशास्त्रावर मागेंहि पुष्कळ टीका लहान मोठ्या झाल्या आहेत, पुढेंहि होतील. तरी अल्पमतीनें ही सेवा केली. एका दिव्याचे अनेक दीप झाले तरी प्रकाशामध्यें उणेपणा होत नाहीं. तसा गीतेमध्यें अगाध अर्थ भरला आहे; कितीहि वर्णन केला तरी त्याची गोडी कमी व्हावयाची नाहीं. समुद्राचें पाणी घेऊन समुद्रास अर्पण केल्याप्रमाणें बालावधूत–बोधप्रकाश दिव्याची ओवाळणी बालावधूतचरणीं केली. यांत दत्तपणा निराळा उरला नाहीं. तरंगानें सागरास नमस्कार करावा, गोडीनें साखरेस नमन करावें, घटाकाश मठाकाशांनीं महदाकाशास

शरण जावें; किरणांनीं सूर्यास वंदन करावें, तसा दत्तानें बालमुकुंदास नमस्कार करून द्वैतध्वंसक अद्वैतबोधऋण फेडिलें " असें म्हटलें आहे.

पंतांनीं आपले लेख छापून प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें लिहिले नव्हते या गोष्टीचा मागें उल्लेख केलाच आहे. तेव्हां त्यांनीं हें अगदीं थोडक्यांत गीतासार जें काढिलें तें आपल्या शिष्यमंडळींना या अद्वितीय ग्रंथाचें सार व महत्त्व थोडक्यांत समजावें म्हणून काढिलें होतें हें उघड दिसतें. त्यामुळें एखादी गोष्ट सांगावी त्याप्रमाणें त्यांनीं गद्यरूपानें थोडक्यांत गीतेचा भावार्थ सांगितला व तो सांगतांना त्याच्या द्वारें आपल्या आवडीचा अद्वैतबोध व अभेद भक्ति हीं व्यक्त केलीं. बाळारामाच्या निधनानंतर दहा दिवस शाळेंतील आपल्या कामावर न जातां पंत घरींच राहिले होते व ते अशौचाचे दिवस असल्यामुळें इतर व्यवसायींहि बंदच होते. पुत्रवियोगानें आलेल्या औदासिन्याच्या स्थितींत श्रीमद्भगवद्गीतेचें मनन करण्यास ही जी फुरसूद मिळाली तिचा फायदा घेऊन पंतांनीं " गीतासार " लेख पुरा केला.

श्रीमद्भगवद्गीता या ग्रंथाबद्दल पंतांना अत्यंत आदर व पूज्यभाव वाटत असे. १८८५ अखेर 'भक्तालाप' नावाचा त्यांनीं जो एक विस्तृत लेख लिहिला व ज्याचा मागें उल्लेख झाला आहे त्यांत त्यांनीं बरींच गीतावचनें उध्दृत केलेलीं असून सद्‌गुरु बालावधूत म्हणजेच भगवद्गीता सांगणारे भगवान् श्रीकृष्ण अशा अर्थाचेहि वारंवार उल्लेख केले आहेत. श्रीमद्भगवद्गीता हा पंतांच्या अतिशय आवडीचा ग्रंथ होता. त्यासंबंधीं व त्याच्यांतील दिव्य बोधासंबंधीं ते नेहमीं धन्योद्गार काढीत असत. एके ठिकाणीं ते म्हणतात, " शिवगीता, रामगीता वगैरे निवृत्तिपर गीता पुष्कळ आहेत. त्या निवृत्त मनुष्यांनाच उपयोगी; बोवा–बैराग्यांची राहाटी पत्करून राहिलेल्यांस उपयोगी. परंतु असे लोक थोडे. बहुजनसमाजाला म्हणजे व्यवहारांत, लौकिक प्रवृत्तींत गुंतलेल्या असंख्य लोकांना प्रापंचिक प्रवृत्तींत देखील सद्‌गुरुकृपेनें खरी भक्ति, सायुज्यमुक्तीवरील भक्ति कशी प्राप्त होऊं शकते याचें विवरण त्यांच्या उद्धारार्थ धर्मयुद्ध प्रसंगानें श्रीकृष्णगीतेंत ( श्रीमद्भगवद्गीतेंत ) संपूर्ण झाल्यानें जनाला हीच गीता आवडती होऊन प्रस्थानत्रयींपैकीं ती एक गणली जाते. श्रीकृष्णगीतेंत अवधूत–राजयोग व निवृत्ति व प्रवृत्ति दोन्ही प्रमाणांस अगर शाखांस धरून व या दोन्हींच्या पलीकडील बोध दिला आहे. " ( पु. ८–२५१ ) तसेंच आणखी एके ठिकाणीं गीतेसंबंधीं त्यांनीं पुढील उद्गार काढले आहेत. " भगवद्गीतेंत कर्म उपासना व ज्ञान बोधून अखेरीस 'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ' ( अ. १८–६६ ) हा अवधूत-बोध दिला आहे. ' सर्व टाक. मला एकालाच शरण ये; एक सद्‌गुरूसच शरण जावें ' हाच याचा भाव. ' कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन " ( अ. २–४७ ) म्हणून निष्काम कर्म करण्याचा उपदेश केला. त्यायोगें शांति झाली नाहीं तर ' मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ' (अ. १८–६५).

म्हणून उपासनामार्ग सांगितला. त्यांत शांति मिळत नसल्यास 'सर्वस्यचाहं हृदि संनिविष्टो मत्तःस्मृतिर्ज्ञानमपोहनंच' (अ. १५-१५) असें सांगून सर्व ज्ञान-रूप, मंगलरूप, कल्याणरूप आहे असें ज्ञान बोधिलें आणि शेवटीं 'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत। तत्प्रसादात्परां शांति स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्' (अ. १८-६२) आणि 'सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच.' (अ. १८-६६) म्हणून अभय देऊन शांति दिली. जेव्हां शिष्य सर्व टाकून व कर्म, उपासना व ज्ञान यांचा अभिमान टाकून सद्‌गुरूस एकभावें शरवत्, सरळ मनानें शरण गेला, तेव्हांच तो सद्‌गुरुप्रेमपात्र झाला व शांत झाला." (पु. ७-१८५) दुसऱ्या एके ठिकाणीं पंत म्हणतात "कर्ता मुळींच नाहीं, सहज चिद्विलास आहे. कोण-तेंहि मत पाहिलें तरी या सिद्धांतालाच येऊन तात्पर्य ठेपतें. × × × भगवद्गीतेंतील बोध-सारहि हेंच आहे. कर्म उपासना व ज्ञान या तीन्ही कांडांचें तात्पर्य हेंच. कर्मच खरें असा विश्वास धरून राहिलेल्यास 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' असें सांगि-तलें. * * उपासनामार्गी लोकांस बोध कोणता हें पाहतां 'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज' असा सांगितला आहे. + + आतां ज्ञानमार्गी लोकांस उपदेश तो असा- 'गुणा गुणेषु वर्तंत इति धारयन् इति मत्वा नानुषज्जते' गुणांची गुणांकडे ओढ किंवा गुणांचा गुणांशीं खेळ चालला आहे. त्यांत तूं शिरलाच नाहींस. तूं निराळा अलिप्त आहेस, नित्य मुक्त आहेस. कर्ता भोक्ता तूं झालाच नाहींस व होणारहि नाहींस." (पु. ७-१३२)

वर लिहिल्याप्रमाणें पंतांनीं भगवद्गीतेचें सार जसें जागजागीं सांगितलें आहे, तसेंच युद्धाची तयारी होऊन सैन्यासमोर सैन्य उभें राहून लढाई आतां सुरू होणार अशा ऐन वेळींच श्रीकृष्णांनीं अर्जुनाला कां बोध केला? त्याकरितां दुसरी फुरसु-तींची वेळ सापडली नसती काय? या प्रश्नाला त्यांनीं असें उत्तर दिलें आहे कीं "अशी संधि मागें आली नव्हती व पुढेंहि येण्याजोगी नव्हती. सहजासहजीं युद्धाचा प्रसंग आलेला. तेव्हां अशा वेळीं अर्जुनाची भिडस्त मोहाची वृत्ति उपयोगी नव्हती. 'काय करूं कसें करूं? आपल्या आप्तांना मारून राज्य घेऊन जगून तरी काय करावयाचें?' अशा विचारांनीं त्याच्या हातांतील शस्त्र गळून पडूं लागलें व हातपाय गळूं लागले. अर्जुनाची अशी विव्हल झालेली स्थिति पाहून त्याच्याकडून युद्धाचें काम व्हावें तसें होणार नाहीं असें श्रीकृष्णास वाटलें व 'मला कांहीं सुचत नाहीं; तूंच योग्य वाटेल तें सांग. 'शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नं' असें अर्जुनानें म्हटलें. याप्रमाणें अर्जुन अनन्यगतिक झाला तेव्हां त्याचे अंगीं शूरत्व व पुरुषत्व भरून त्याला युद्धाला तयार करणें कृष्णाला जरूर वाटलें. म्हणून त्यानें त्याला सांख्यविचार सांगितला; तरी अर्जुन ताळ्या-वर येईना. ज्ञानमार्ग सांगितला तरी त्याचे तोंडावर प्रसन्न मुद्रा दिसेना. मग सरतेशेवटीं 'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज' असें सांगून आपल्या पायीं त्यास पाडून घेऊन जेव्हां त्याला आपलें रहस्य उघडें करून दाखविलें, तेव्हां त्या कृष्णानें काय जादू

केली ती गीतेमध्यें दिसत नाहीं. या अंकावर तेथेंच पडदा पाडून पुढील भाग म्हणजे कृष्णाच्या अनुग्रहाचा अर्जुनावर तात्काळ झालेला परिणाम ( सद्गुरु-उपदेशफल ) तेवढा मात्र सांगितला आहे. तो कोणता तर ' नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा ' ( मोह नाहींसा झाला व कर्तव्यस्मृति जागृत झाली ) आतां तूं सांगशील तें करण्यास हा तुझा दास तयार आहे. ' असें म्हणून शङ्ख मारून तो वीर युद्धास तयार झाला व कृष्णाचें कार्य झालें. ” ( पु. ८--१७७ )

## अकोळची दुसरी खेप

बाळारामाच्या निधनानंतर कांहीं दिवसांनी दिवाळीच्या सुटींत गणूअण्णा मारीहाळकर, अमृतराव देशपांडे, साई, रामाबुवा ऊर्फ रामानंद, कुन्दुरकरस्वामी वगैरे ३०–४० मंडळीसह पंत अकोळास गेले. अण्णाप्रभृति तेथील शिष्यमंडळींवर त्यांचें फार प्रेम होतें. त्या सुमारास विष्णु हरि कुळकर्णी यांनीं आपल्या घराच्या मागील बाजूस एक मंदीर बांधिलें होतें व त्यामध्यें पंतांच्या हस्तें श्रीदत्ताच्या पादुका स्थापन करण्याचा त्यांचा हेतु होता. त्याप्रमाणें त्यांनीं पंतांना लिहिलें होतें व पंतांनींहि अकोळास येण्याचें कबूल केलें होते. दिपावळीच्या अगोदर पंत अकोळास गेले व जातांना त्यांनीं आपल्या बरोबर त्रैमूर्ति दत्ताची पितळेची मूर्ति नेली होती. या वेळीं तीन चार दिवस पंतांचा मंडळीसह मुक्काम विष्णु हरि यांच्याच घरीं होता. कार्तिक शु. १ शके १८१४ रोजीं सदर मंदिरांत श्रीदत्ताच्या पादुका स्थापन करण्याचा समारंभ मोठ्या उत्साहानें पार पडला. त्यावेळीं आपल्याबरोबर नेलेली श्रीदत्ताची मूर्ति व श्रीदत्ताचा एक मोठा फोटो हीं पंतांनीं त्या मंदिरांत स्थापन केलीं. या खेपेला पंतांच्या बरोबर बरीच मंडळी असल्यामुळें त्यांची दिवाळीची सुटी अकोळ येथें भजनानंदांत गेली.

पुत्रवियोगानें पंतांना दुःख झालें खरें, पण त्याचे पर्यवसान श्रीमद्भगवद्गीतेचें मनन करण्यांत व सार काढण्यांत झालें आणि नंतर थोड्याच दिवसांनीं अकोळ येथें दत्तमंदिरांत पादुका स्थापन करण्याच्या निमित्तानें त्यांनीं दिवाळची सुटी भक्तमंडळीसह भक्तिप्रेमरंगांत घालविली. पंतांची स्वतःची स्थिति जरी अशा प्रकारची होती तरी त्यांचें कुटुंब सौ. यमनाक्का यांना मात्र पुत्रवियोगाचें दुःख फार जाणवत होतें व त्याचा त्यांच्या शरीरप्रकृतीवरहि फार अनिष्ट परिणाम झाला होता. मातृहृदयच तें ! तेव्हां आपल्याला एखादा मुलगा असावा, निदान एखादा मुलगा दत्तक तरी घ्यावा, असें त्यांना फार वाटत होतें व त्याप्रमाणें त्या बोलूनहि दाखवीत. एके दिवशीं पंत व सौ. यमनाक्का हीं बोलत बसलीं असतां त्यांना बाळारामाची आठवण होऊन त्या शोक करूं लागल्या. पुट्टाप्पा जवळच होता. तेव्हां पंत थट्टेनें म्हणाले, “ आतां आम्हांला मूल नको. पुट्या एक मुलगा आहे तेवढा पुरे आहे. पुट्यासारखा मुलगा असतांना आणखी मुलगा काय करावयाचा ? ” अशा रीतीनें जरी पंत त्यांना समाधानाच्या गोष्टी सांगत तरी पुत्रवियोगानें सौ. यमनाक्कांना झालेलें दुःख कमी न होतां त्यांची प्रकृति अधिकाधिक

विघडत चालली. तेव्हां स्थलांतर केल्याशिवाय त्यांना या दुःखाचा विसर पडणार नाहीं असें वाटून पंतांनीं १८९३ च्या जूनपासून मारुती गल्लींतील नाटेकर यांचें घर भाड्यानें घेतलें व ते मंडळीसह तेथें राहावयास गेले.

१८९० च्या सुरवातीस अमृतरावांच्या घरीं राहावयास गेल्यापासून तें सोडींपर्यंत प्रपंच व परमार्थदृष्ट्या पंतांच्या घराण्याची भरभराट होत होती. गोपाळरावांना मुलकी खात्यांत कायमची नोकरी लागली. वामनरावांचें लग्न झालें व १८९१सालीं त्यांची बी.ए.ची व १८९२ सालीं पहिल्या एल एल. बी.ची परीक्षा पास झाली आणि नरसिंहराव कॉलेजमध्यें जाऊं लागले. पंतांचा मेहुणा शेषो श्रीपाद कुळकर्णी, साईचा पुतण्या पांडुरंग वासुदेव ताम्रनकर वगैरे विद्यार्थी त्यांचेकडे शिक्षणाकरितां येऊन राहिले व घरांतलि विद्यार्थ्यांची संख्या बरीच वाढली. त्या अवधींत परमार्थदृष्ट्या पंतांच्या शिष्यप्रबोधनकार्यालाहि जोराची चालना मिळाली. अमृतरावांच्या घरांत भजनपूजनाला जागा विपुल असल्यामुळें भक्तमंडळी अधिकाधिक जमूं लागली. त्या घराच्या मागील परसांत बांधलेल्या दत्तमंदिरांत गुरु-द्वादशी, दत्तजयंती व गुरुप्रतिपदा या तिथींना होणारे उत्सव मोठ्या थाटानें होऊं लागले व पंतांच्या शिष्यांची संख्या पुष्कळ वाढली. भक्तमंडळींना बोध करण्याचें व फुरसुदीच्या वेळीं कोणी शास्त्री, पंडित वगैरे आल्यास त्यांचेशीं अध्यात्मविषयासंबंधीं चर्चा करण्याचें त्यांचें कार्यहि चालू असे; म्हणजे असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं १८९०-९३ या सुमारें तीन वर्षांत पंतांना बरेंचसें स्वास्थ्य लाभलें व सद्गुरूच्या भजनसेवेला अधिक अवसर मिळाला. या तीन साडेतीन वर्षांच्या अवधींत त्यांच्या भजनरंगांत सुमारें २०० नवीन पदें झालीं व तीं 'दत्तप्रेमलहरी' या पदसंग्रहांत साधारणपणें पद २०० पासून ४०० पर्यंत छापलीं आहेत. सदर पदांवरून त्यांच्या ठिकाणची बोधस्फूर्ति दिवसेंदिवस कशी जोरावत होती व त्यांच्या अंतःकरणांत गुरुप्रेमलहरी कशा वारंवार उठत होत्या यासंबंधींची साक्ष पटते. १८९२ सालीं झालेल्या एका पदांत पंत म्हणतात "गुरु-शिष्यांची गाठी पडली । शांतीनें निजशांति भोगिली ॥ ध्रु० ॥ बोधपुरुषा बोध ठसला । प्रेमासी बहु गहिंवर आला ॥ १ ॥ समाधीसी झोंप लागली । मौनाची मौनता हरली ॥ २ ॥ दत्तपदीं 'दत्त' निमाला । आनंदें स्वानंद धाला ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. ३७६) व त्याच सालीं एके दिवशीं दत्तमंदिरांत पुष्कळ भक्तमंडळी जमून भजनसमारंभ चालू असतां त्यांनीं कृतज्ञताबुद्धीनें पुढील उद्गार काढिले. "पाहियले हे दिवस सद्गुरु । होती तुझी कृपा ॥ ध्रु० ॥ × × आनंदसागरीं खेळूं लागलों । धन्य मायबापा ॥ २ ॥" (द. प्रे. ल. ३४७) वैखरीवाटें व पत्रद्वारें शिष्यांना बोध करण्याचें त्यांचें कार्यहि अव्याहत सुरूच होतें. १८९० च्या सुरवातीपासून १८९३ च्या अखेरपर्यंत त्यांनीं आपल्या शिष्यांना लिहिलेलीं ४७ पत्रें पुष्प ४ व ५ मध्यें ( पत्र ७० ते ११६ ) छापलीं आहेत. त्यांवरून प्रपंच–परमार्थांत शिष्यांना सडेतोड उपदेश करून योग्य मार्ग दाखविण्याचा त्यांचा उपक्रम कसा चालू होता हें दिसून येतें.

१८९० सालीं पंतबंधु वामन व नरसू कोल्हापूर येथें कॉलेजमध्यें शिकत होते व तेथें पंतांची बरीच शिष्यमंडळीहि होती आणि उपदेशपर पत्र पाठविण्याबद्दल त्यांनीं पंतांना लिहिलें होतें. त्या पत्राला १४ जुलै १८९० रोजीं लिहिलेल्या उत्तरांत पंत लिहितात " Dear Brothers and Sons, Waman, Narso at Kolhapur, ××× तेथील मंडळी उपदेशपर पत्र मागतात. पत्र कशास ! उपदेश आहे कीं. दृश्य म्हणजे कल्पित सर्व कांहीं गोष्टी सद्गुरूस शरण जातांना (तनु मन धन अर्पण करितांना) त्यास दिल्या आहेत. त्यांची आस कोणत्याहि रीतीनें धरतां कामा नये. " उद्यां " हा शब्द गुरूचे घरीं मुळींच नाहीं. केव्हांहि हुषार राहावें. समर्थचरणीं अहंपणा अर्पून स्वस्थ राहावें. विशेष काय लिहिणें ? काल्पनिक सर्व कांहीं खोटें आहे. निर्विकल्प म्हणजे ज्याची ओळख कल्पनेनें लागत नाहीं, तर्कानें ज्याची स्थिति कळत नाही, शब्दानें वर्णन करितां येत नाहीं असा एक अवधूत खरा आहे. त्याविणें अन्य कांहीं नाहीं या निश्चयानें निश्चित असावें. आपणाला विसरून सद्गुरूचें नामस्मरण करीत स्वस्थ असावें. शरीर राखून अभ्यास करावा. थंडीचे दिवस आहेत; हयगय करूं नये. केव्हांहि शांतींत राहावें हीच समर्थसेवा आहे. शांति बिघडूं नये. दत्तमातेचे पायीं अनन्य झाल्यावर पोरांना काळजी नको, उपदेश नको, साधन ( करावेसें ) वाटल्यास भजनीं नाचावें. ज्यानें हातीं धरलें त्यानें सर्व क्षेमाचा बोजा घेतला, अभयवचन दिलें, त्यासच त्या वचनाचा अभिमान. गुरुपायीं रमत आहां. मग कां चिंता ? सर्वांना हा सिद्धांत कळवावा. ××× अवधूत-दरबारीं भक्तांना काळजी नको. अभक्तांची, प्रापंचिकांची, अभिमानधारी यांची दाद मात्र नाहीं. आशिर्वाद. तुमचा, दत्त. " ( पु. ४–२०६ ते २०८ )

तसेंच या कालावधीमधील कांहीं पत्रांत पंतांच्या स्वानुभवस्थितीचा निदर्शक असा मजकूर आलेला आहे. त्यावरून त्यांच्या ठिकाणीं आत्मानुभवाची परिपक्वता कसकशी होत गेली याचाहि सुगावा लागतो. त्यांतल्यात्यांत अण्णा व रावजी यांना लिहिलेल्या पत्रांत अत्यंत सलगीचा बोध व स्वानुभवस्थिति हीं ठळकपणें व्यक्त झालीं आहेत. १५–५–१८९२ रोजीं अण्णांना लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात, " फार दिवस झाले, भेट नाहीं. सुटी जाहली, क्षणोक्षणीं गरज पडते. मुक्तीच्या भोगांत हजेरी पाहिजेच. ××× पंत म्हणजे मानवी विकारी प्राणि, अशा समजुतींत, काल्पनिक द्वैतांत, लौकिक समारंभांत गुरुपुत्र होऊनहि विदेहाच्या परिवारांत, अंतरज्ञान बाणूनहि बाहेर त्रिपुटींत, शब्दांतच ब्रह्म खेळविणारा गुरु आपला आहे अशा समजुतींत +++ आपल्या गळ्यांत कर्तृत्व-अभिमान-शिळा बांधून दुःखसागर तरण्यांत, डोळे झाकून सोमलांतील किड्याप्रमाणें आनंद मानीत असल्यानंतर, साडेसात खुळ्या, पंताची आठवण कशानें होणार ? जागृति, स्वप्न, सुषुप्ति यांचें भान उडालें. लवकरच यावें. तुजखेरीज रजा सुखाची होत नाहीं. हजार सुखें (दुःखेंच तीं) घरीं ठेवून निघून ये. तूं दीर्घ शहाणा आहेस. कांहीं तरी उत्तर पाठविण्याचें असल्यास, नको. पाहिजे तर ज्ञानअनुभव घेत तेथेंच बैस; नाहीं तर आलेंच पाहिजे. विशेष लिहिणें नलगे. शिवाय बाळबालक विशेष लिहिण्यास

शक्त नाहीं. सद्‌गुरुस्वरूपीं 'मी', 'तूं' शब्द नाहीं. तुझ्या दारीं पंत आहेच." (पु. ४–२४१) व २१–१–१८९३ रोजीं रावजीला लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात "पाण्याची लहरी, सुवर्णाचे अलंकार, तसे मौनाचे शब्द, यांत काय बिघडलें? अमावास्या-पौर्णिमेस उठणाऱ्या, चित्त व्यग्र करणाऱ्या, बिनअर्थाच्या, किंचितहि बाधक न होणाऱ्या तुझ्या बाललहरी उठतात. वाहवारे वेड्या, धन्य! फार दिवस निजप्रेम भोगून त्याची गोडी अनावर झाली आहे. इकडील स्थिति मौनमंदिरांत जाईल. मग जीभ आवरून उगीच बसावें लागणार! म्हणून तूं आणि अकोळ अण्णा, यांची ही वेड्याचें पांघरूण घेऊन सिद्धांत बाहेर काढण्याची युक्ति आहे. असो बापुडी! अलीकडील सिद्धांत समक्षच ऐकावेत. केव्हांहि जसा आहेस तसा आहेसच, राहातोसच, राहा अशी आज्ञा तरी गंमतच. उठल्या लहरी गिळूं नको; इकडे फेंकण्यास तुला पूर्ण मोकळीक आहे." (पु. ४- २५१) तसेंच ९–४–९३ रोजीं अण्णांना लिहिलेल्या (न छापलेल्या) पत्रांत "रजा घेऊन मंडळीसह दड्डीस गेलों. रावजीचे घरीं पाणी वाहिलें, वाढलें, इतकेंच नव्हे, तर मास्तरचे घरीं पाणकेपणा करणें, वाढणें इत्यादि सर्व (करून) गुलाम बनलों. भक्तीचा भुकेला समर्थ आहे!" असें पंतांनीं लिहिलें आहे.

# प्रकरण ३० वें

---:o:---

## मारुती गल्लींतील बिऱ्हाड; गृहकानू; काशीकरबोवांचें निधन; परमहंस आजोबांची समाधि.

---:o:---

### मारुती गल्लींतील बिऱ्हाड

१८९३ च्या जून महिन्यांत मारुती गल्लींत नाटेकर यांचे घरांत पंत राहावयास गेले या गोष्टीचा मागील प्रकरणांत उल्लेख झालाच आहे. तें सबंद घर त्यांच्याकडे असल्यामुळें त्यांना तेथें स्वतंत्रता अधिक मिळूं लागली. दिवसेंदिवस त्यांच्या शिष्यांची व भक्तांची संख्या वाढतच होती. त्यामुळें त्यांचे घरांत येणाऱ्या जाणाऱ्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवणें फार कठीण जाई व विशेषतः उत्सवप्रसंगीं तर तें फारच कठीण पडे. त्यावेळच्या पंतांच्या आर्थिक स्थितीमुळें स्वयंपाकी ठेवलेला नव्हता. त्यामुळें स्वयंपाक करणें व घरांतील इतर व्यवस्था पाहणें हें मुख्यत्वेंकरून पंतांचें कुटुंब सौ. यमनाक्का यांनाच करावें लागे व त्या तें हौसेनें करीतहि. परंतु नुकताच त्यांचा एकुलता एक मुलगा बाळाराम हा निवर्तल्यामुळें त्यांच्या शरीरप्रकृतीवर फार परिणाम झाला होता. दिवसेंदिवस त्यांची प्रकृति अधिकाधिक खालावत चालली होती; पण त्यांच्याखेरीज स्वयंपाक वगैरे घरांतलि कामकाज करण्यास कोणीहि नसल्यामुळें त्यांना तें कसेंबसें करावें लागे. घरीं मंडळींची येजा एकसारखी चालू असल्यामुळें चुलीला जवळ जवळ खंडच नव्हता असें म्हटलें असतांहि चालेल. तेव्हां अशा स्थितींत कांहीं तरी युक्ति करून सौ. यमनाक्कांच्या मागचा हा त्रास चुकविलाच पाहिजे, निदान तो कमी तरी केला पाहिजे, असें घरांतील मंडळींना वाटूं लागलें.

याच सुमारास हुक्केरी येथील एक तरुण गृहस्थ गोविंद बापूजी मुतालिक हे मुलकी खात्यांत नोकर असून त्यांची चिकोडीहून बेळगावास बदली झाली व त्यांनीं जून १८९३ मध्यें मारुती गल्लींत ज्या घरांत पंत राहात होते त्याच्या समोरच्या घरांत बिऱ्हाड केलें. पंतबंधु वामनराव व मुतालिक हे सहाध्यायी असल्यामुळें १८८५ पासून मुतालिकांचें पंतांच्या घरीं जाणेंयेणें असे व पंतबंधु गोपाळरावजी हेहि मुलकी खात्यांत असल्यामुळें त्यांचेशींहि त्यांचा दाट परिचय झाला होता. १८९२ सालीं मुतालिकांवर पंतांचा अनुग्रह झाला व तेव्हांपासून तर त्यांची पंतांच्या घरांतील मंडळींशीं विशेष सलगी झाली. ते मारुती गल्लींत राहूं लागल्यापासून त्यांचा बहुतेक वेळ पंतांच्या घरीं जाऊं लागला व पंतांच्या घरांतील सर्व मंडळी त्यांना आपल्यापैकींच समजूं लागली.

### गृहकानू

सौ. यमनाक्कांची तब्येत जेव्हां फार बिघडली तेव्हां त्यांना तपासण्याकरितां जे डॉक्टर आणिले होते त्यांनीं असें सांगितलें कीं, "यांना विश्रांति मिळून वेळींच जपलें नाहीं



श्रीपंतमहाराज

तर रोग दुःसाध्य होईल व परिणाम भयंकर होईल. " तेव्हां पंतांचे मावसबंधु गणपतराव मारीहाळकर आणि पंतांचे बंधु गोविंदराव, गोपाळराव, वामनराव, वगैरे मंडळींनी आपसांत वाटाघाट करून असें ठरविलें कीं घरांतील कामाला सुटसुटीतपणा यावा आणि सौ. यमनाक्कांना फारसा त्रास होऊं नये म्हणून कांहीं गृहकानू करावे व त्यांची कडक रीतीनें अंमलबजावणी करावी व त्याप्रमाणें त्यांनीं गृहकानूंचा एक मसुदाहि तयार केला. पण त्याला पंतांची मंजुरी मिळाल्याशिवाय त्याची अंमलबजावणी होणें शक्य नव्हतें. तेव्हां ती कोणीं व केव्हां मिळवावी हा मोठा प्रश्न येऊन पडला. कारण घरांतलि सर्व मंडळी पंतांशीं फार अदबीनें वागत व घरांत गैरसोय होते म्हणून नियम करून आपल्याकडे भाविकपणानें येणाऱ्या मंडळींना त्या नियमांप्रमाणें वागण्यास भाग पाडणें कदाचित् पंतांना आवडणार नाहीं अशीहि त्यांना भीति वाटत होती. नंतर त्यासंबंधीं बरीच वाटाघाट होऊन मुतालिक यांनीं सदर नियमांना पंतांची मंजुरी घ्यावी असें ठरलें.

एके दिवशीं पंत एक पुस्तक वाचीत बसले होते. कोणतेंहि पुस्तक वाचीत असतांना त्यांचेजवळ नेहमीं एखादी पेन्सिल असे व त्या पेन्सिलीनें ते त्या पुस्तकांतील महत्वाच्या भागांवर खुणा करीत असत. त्या दिवशीं वाचीत असतां पंतांना बहिर्दिशेला जावयाचें असल्यामुळें खुणेदाखल हातांतील पुस्तकांत पेन्सिल घालून व पुस्तक बाजूला ठेवून ते उठून गेले. ही गोष्ट मुतालिक आडून पहात होते. पंत उठून गेल्याची संधि साधून ते चटकन पंतांच्या बसण्याच्या जागीं गेले व त्या पुस्तकांत जेथें पेन्सिल ठेविलेली होती तेथें नियमांचा कागद ठेवून आपण निघून गेले आणि पंत आल्यावर काय करितात तें आडून पहात उभे राहिले. पंत परत आल्यावर त्यांनीं पुस्तक उघडतांच नियमांचा कागद त्यांच्या नजरेस पडला. तेव्हां ते सर्व नियम वाचून पाहून त्यांनीं त्यांच्याखालीं ' दत्त ' अशी सही केली; इतक्यांत मुतालिक पुढें झाले व पंतांनीं त्यांचेजवळ तो कागद दिला. आपली योजना यशस्वी झालेली पाहून घरांतील व्यवस्थापक मंडळींना अत्यानंद झाला व तेव्हांपासून त्या नियमांचा अंमल होऊं लागला. त्यामुळें सर्व दिवसाचा घरांतील कार्यक्रम शिस्तीनें व नियमित वेळीं होऊं लागला व बायकामंडळींच्या मागचा त्रास बराच कमी झाला. सदर नियांप्रमाणें दररोज पहाटे पाच वाजल्यापासून ठराविक वेळीं घंटा वाजविण्यांत येत असे व त्या त्या वेळीं ठराविक कार्यक्रम करण्यांत येत असत. या नियमांची अंमलबजावणी करण्याकरितां घरांतील मंडळींपैकीं कांहीं जणांना अधिकारी नेमिलें होतें व सदर नियमांचा भंग करणारांना शिक्षाहि देण्यांत येत असे. अशा रीतीनें मारुती गल्लींतील नाटेकर यांचे घरीं राहावयास आल्यापासून पंतांच्या घरांतील कारभार व्यवस्थितपणें चालूं लागला.

१८९३ अखेर पंतबंधु वामनरावांची दुसरी एल्‌एल्. बी. पास होऊन ते बेळगावास वकिली करूं लागले व प्रपंचाचा खर्च चालविण्याचे कामीं त्यांची थोडी थोडी मदत होऊं लागली. त्याच वेळीं पंतबंधु शंकरराव यांची मॅट्रिकची परीक्षा पास झाली व

पंतांनीं त्यांना पुढील शिक्षणाकरितां कोल्हापुरास ठेविलें. अशा रीतीनें प्रापंचिक व लौकिक दृष्ट्या पंतांच्या घराण्याचें एक पाऊल पुढें पडलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१८९४ सालीं पंत मारुती गल्लींत राहात असतां पंतबंधु नरसिंह यांचे अण्णा अकोळकर यांची पुतणी ( त्यांचे बंधु हरिभाऊ यांची मुलगी ) गंगूबाई इच्याशीं लग्न झालें. लग्नसमारंभ बेळगाव येथेंच झाला. वधूपक्षाकडील मंडळीचा मुक्काम अमृतराव देशपांडे यांच्या दत्तमंदिरांत होता. अगोदरच अण्णांवर पंतांचें विशेष प्रेम होतें. त्यांतच त्यांच्याशीं हा सोयरिकीचा संबंध जुळल्यामुळें दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें व त्या उभयतांमधील सलगी अधिकच वाढली. या लग्नाच्या निमित्तानें पंतांकडे व अण्णांकडे पुष्कळ भक्तमंडळी जमली होती व भजन, पंतांचा बोधवर्षाव वगैरे प्रकार चालू होते. त्यामुळें हा लग्नसमारंभ म्हणजे एक प्रकारें उत्सवसमारंभच झाला.

## काशीकरबुवांचा वियोग

पंत मारुती गल्लींत राहूं लागल्यानंतर लौकरच काशीकरबुवांनीं देह ठेविला. प्रकरण २५ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें बुवा कधीं बेळगावांत पंतांजवळ, कधीं कुरुंदवाडास रावजींकडे, तर कधीं अकोळ येथें अण्णांच्या घरीं राहात असत. पंत त्यांना फार मानीत व त्यांच्यासंबंधीं वारंवार प्रशंसोद्गार काढीत असत. १८९१ च्या सुरवातीला काशीकरबुवा कुरुंदवाड येथें रावजींकडे राहात असत. त्या वेळीं त्यांची प्रकृति बरीच बिघडल्याचें समजल्यावरून २४–१–१८९१ रोजीं पंतांनीं रावजींना लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे. "श्रीगुरुसच्चिदानंदबोवांची प्रकृति बिघडल्याचें ऐकून असमाधानी वाटली. प्रारब्धापुढें उपाय नाहीं. आमच्या विश्रांतीची जागा ती. त्यांच्या संगतीचें सुख खऱ्या गुरुपुत्रांनींच ओळखावें. पूर्व सुकृतगाठीनें, अनादि ऋणानुबंधानें, सत्पुरुषाची गाठ पडली आहे. बहु शोधाअंतीं अशी पूर्ण वस्तु दुर्मिळ होय अशी खात्री झाली. श्रींच्या दर्शनानें समर्थवियोगकल्पना नाहींशी होते. त्याचे ते सरळ सिद्धांत, त्याची ती शांत गंभीर वृत्ति, महत्वाच्या नावानें तिलांजुली दिलेलें त्याचें नेहमींचें वर्तन, निस्पृह, निःसंग स्थिति हीं पाहतांच साहजिकच, सहज रीतीनें वेदान्त म्हणजे काय, त्याचा परिणाम काय हीं लक्षांत येतात. काळजी घेतोसच; तुला सांगावें असें नाहीं. ज्याची तो काळजी घेणारा व आम्हां श्वानांचीहि चिंता वाळगणारा असतांना हेंहि बोलणें वाचारंभण होय. माघउत्सवास येतांना बरोबर आणावें. अनादि काळाचा श्रींचा आपला सहवास असल्यामुळें आपोआप निर्निमित्त प्रेमाचे उद्गार उठतात. श्रींच्या चरणीं माझा शिरसाष्टांग नमस्कार शब्दानें प्रविष्ट करावा. कारण शब्दांचें सुतक त्यांनीं सोडिलें आहे व नम्यनमकभाव त्यांच्याच बोधमात्रें गेला आहे. घट-उद्गार प्रारब्धास्तव उठतात. उठोत बापुडे. पूर्णपणें महत्व टाकणेंच गुरुपायीं नमस्कार करणें होय. गुरूनें मीपणाच नाहींसा केला. आतां कांहीं उरलें नाहीं व असें म्हणण्यास शब्दहि लाजतो !" ( पु. ४–२२० )

पंतांना काशीकरबुवांच्या प्रकृतीसंबंधीं विशेष काळजी वाटण्याला एक कारण असें

झालेलें होतें कीं बुवा बेळगावांत पंतांजवळ राहात असतांना एके दिवशीं ते व पंत प्रेमानें बोलत बसले होते. तेव्हां बोलण्याच्या ओघांत ते सद्गदित कंठानें पंतांना म्हणाले "पंतलू, मी काशीपासून रामेश्वरापर्यंत हिंडलों व पुष्कळ सत्पुरुषांच्या भेटी घेतल्या. पण अजून माझी पूर्ण समाधानी झाली नव्हती. पण तुझ्या संगतींत माझें पूर्ण समाधान झालें आहे. आतां मला कशाचीच इच्छा राहिली नाहीं. फक्त एवढीच इच्छा आहे कीं हा माझा देह तुझ्या देखत पडावा." तें ऐकून पंतांना गहिंवर आला व प्रेमाच्या चार गोष्टी सांगून त्यांनीं बुवांचें सांत्वन केलें. पण हे त्यांचे निर्वाणींचे उद्गार ऐकल्यापासून पंतांना त्यांच्या प्रकृतीसंबंधीं विशेष काळजी वाटूं लागली. कुरुंदवाड येथें बुवांची प्रकृति पुनः नादुरुस्त झाल्याचें समजल्यावरून ३१–१२–१८९२ रोजीं रावजींना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंत लिहितात, " श्रीगुरुबावांची प्रकृति कशी आहे ? श्रीस बेळगावास असल्यापेक्षां जास्त सोय ठेवावी. अशी सोय करणें कर्तव्य आहे. फार भिडस्त आहेत. समर्थकृपेने गाठी पडल्या आहेत. निस्पृह, निर्विकार, शांत स्थिति इतर मिळण्याजोगी नाहीं. कित्ता घेण्याजोगी स्थिति आहे. माझा साष्टांग नमस्कार सांगावा." त्यानंतर बुवांची प्रकृति थोडी सुधारली व ते अकोळ येथें अण्णांजवळ राहूं लागले. तेथें असतांना अकोळजवळ असलेल्या ममदापूर येथील श्रीअंबाबाईचें देवालय दुरुस्त करण्याचें काम त्यांनीं हातीं घेतलें होतें व त्या कामीं पंतांच्या सांगण्यावरून अण्णांनींहि पुष्कळ साह्य केलें.

१८९३ सालीं काशीकरबुवांची प्रकृति बरीच बिघडली; त्यामुळें त्यांनीं बरींच स्थलांतरें केलीं तरी आराम वाटेना. तेव्हां एकदां पंतांना भेटून जावें म्हणून ते गोकाकहून बेळगावास गेले व देशपांडे गल्लींत अमृतरावांच्या घरांत पंत असतील अशा समजुतीनें ते तेथें गेले आणि तेथें पंत राहात नसल्याचें समजल्यावर व पंतांचें नवीन बिऱ्हाड माहीत नसल्यामुळें, ते कोनवाळ गल्लींत राहात असलेल्या आपल्या ओळखीच्या एका गृहस्थाकडे जाऊन राहिले. जेव्हां ही बातमी पंतांना समजली तेव्हां अण्णा, रावजी, गोविंदरावजी वगैरे मंडळीसह ते, काशीकरबुवांना आपल्या घरीं घेऊन येण्याकरितां, ते उतरले होते तेथें गेले व त्याप्रमाणें त्यांनीं बुवांना सांगितलें; पण बुवा म्हणाले, " मी येथें राहाण्याकरितां आलों नसून इकडील हवा मला मानवत नसल्यामुळें सोमवारीं माझ्या मुलुखाला जाण्याचा माझा विचार आहे. त्यापूर्वीं तुम्हां सर्वांचा निरोप घ्यावा म्हणून मी येथें आलों आहे. येथें जागा चांगली आहे. तेव्हां मी आतां हलवाहलव करण्याच्या भानगडींत पडत नाहीं. उद्यां रविवार आहे. तेव्हां तुम्हींच उद्यां दुपारीं येथें या, म्हणजे चार घटका भजनानंदांत काळ घालविण्यास सापडेल." तें ऐकून पंतांनी त्यांना आपल्याबरोबर येण्याचा आग्रह केला नाहीं.

दुसरे दिवशीं दुपारीं कांहीं मंडळीसह पंत पुनः बुवांकडे गेले व सर्वांनीं त्यांच्या संगतींत रात्रीं दहा वाजेपर्यंतचा काळ मोठ्या प्रेमानंदांत घालविला. त्याच रात्रीं रावजी कुरुंदवाडास व अण्णा अकोळास जावयाचे असल्यामुळें, " रावजी व अण्णा यांची

स्टेशनवर रवानगी करून पहाटेस तुम्ही निघण्यापूर्वी आम्ही येथें येतों, ” असें पंतांनीं बुवांना सांगितलें, तेव्हां बुवांचा कंठ दाटून येऊन त्यांनीं पंतांना प्रेमालिंगन दिलें आणि ते पंतांना व त्यांच्याबरोबरच्या मंडळीला सद्गदित कंठानें म्हणाले, “मी पहाटेस जाणार आहे. तेव्हां सर्वांनीं मला प्रेमानें निरोप द्यावा.” हे त्यांचे शब्द कानीं पडतांच सर्वांच्या नेत्रांत प्रेमाश्रु उभे राहिले व तशा स्थितींत “आम्ही लौकरच परत येतों” असें सांगून पंत आपल्या मंडळीसह तेथून निघाले. घरीं गेल्यावर पुटप्पाला बरोबर देऊन त्यांनीं रावजी व अण्णा यांची स्टेशनवर रवानगी केली व थोड्या वेळानें बुवांकडे जाण्याचा त्यांचा विचार होता. इतक्यांत बुवांना अस्वस्थता वाटूं लागल्यामुळें त्यांचेकडून पंतांना बोलावणें आलें व लगेच ते तातडीनें मंडळीसह बुवांकडे गेले. पंत तेथें जाऊन पाहतात तों बुवांचा अंतसमय जवळ आला असल्याचें त्यांना आढळून आलें. तशा स्थितींत पंतांना आलेले पाहून बुवांना फार आनंद झाला. त्यांनीं रावजी व अण्णा यांची चवकशी केली व प्रेमानें सर्वांचा निरोप घेतला आणि शांतपणें इहलोकची यात्रा संपविली. तेव्हां पंतांना व इतर मंडळीला फार दुःख झालें. नंतर लगेच पंतांनीं बुवांच्या योग्यतेला साजेशा रीतीनें त्यांचें और्ध्वदेहिक यथासांग केलें. सद्गुरु बालमुकुंदांनीं आश्वासन दिल्याप्रमाणें पंतांना काशीकरबुवांच्या सत्संगतीचा लाभ झाला. त्यांच्यासंबंधीं पंतांनीं जे वारंवार उद्गार काढले आहेत त्यांवरून ते फार अधिकारी असले पाहिजेत हें उघड दिसतें. त्यांच्या निधनानंतर २९-१-१८९४ रोजीं पंतांनीं अण्णांना लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे. “ श्रीकाशीकरबुवांनीं तुम्ही गेल्यानंतर दोन तासांनीं मला बोलावून देह ठेविला. आठवण काढली. यथाविधि संस्कार जाहला. कृत्यावर साधूची परीक्षा नाहीं. अंतरस्थिति अंतर्ज्ञानीच जाणतो.” ( पु. ५-१४ )

## परमहंस आजोबांची समाधि

काशीकरबुवांच्या निधनानंतर कांहीं दिवसांनीं पंतांचे परमहंस आजोबा श्रीबाळकृष्णमहाराज ऊर्फ अप्पा यांची प्रकृति बिघडली. पंत मारुती गल्लींत नाटेकर यांचे घरांत राहूं लागल्यापासून त्या घराच्या माजघरांत अप्पांकरितां एक माची तयार केली होती. साधारणपणें त्या माचीवर बसून ईशचिंतनांत ते आपला काळ घालवीत असत व पंतांचें भजन मोठ्या आवडीनें ऐकत बसत. एके दिवशीं ते पंतांना म्हणाले, “ दत्तू, तूं नेहमीं दत्ताचीं पदें म्हणतोस पण आपलें कुलदैवत जी अंबाबाई तिचीं पदें कां म्हणत नाहींस ?” तेव्हां पंतांनीं त्या दिवशीं भजनांत खालील पाच पदें म्हटलीं—“ जगदंबे मी बाळ तुझा गे कृपा करी माते। दीनदयाळे कृपाकटाक्षें पाही अंबे माते ॥ धृ० ॥ ” ( द. प्रे. ल. ६ ), “ जगदंब भवानी नमितों सरस्वती ॥ धृ० ॥ ” ( द. प्रे. ल. ७ ), “ आदिकुमारी आनंदलहरी वागीश्वरी कल्पलते । भवजनतारी भुवनेश्वरी पार उतारी जय माते ॥ धृ० ॥” ( द. प्रे. ल. ८ ) “ शारदे हरिहरब्रम्हवंद्ये । करुणा करी शंकरी भवतारिणी दुःखहारिणी । तारि माते कमलवनचारिणी जगधारिणी ॥ धृ० ॥ ” ( द. प्रे. ल. ९ ) व “ भक्तकामकल्पलते । आदि शक्ति सरस्वती पावे माते ॥ धृ० ॥ ” ( द. प्रे. ल. १० ). वागीश्वरी,

भवानी जगदंबा, शारदा, सरस्वती अगर आदिशक्ति यांच्या स्तुतीपर पंतांनीं म्हटलेलीं हीं एवढींच पदें होत व तीं होण्याचा योग आजोबांच्यामुळें आला. पंतांच्या संनिध अप्पांचे अखेरचे दिवस फार आनंदांत गेले. त्यांनीं आषाढ वद्य ३ शके १८१६ (३०-७-१८९४) रोजीं बेळगाव येथें मारुती गल्लींतील आपल्या राहात्या घरीं देह ठेविला. त्यावेळीं त्यांचें वय सुमारें ८७-८८ वर्षांचें होतें. लगेच आपल्या परमहंस आजोबांची समाधि बाळेकुंद्री येथील आपल्या घराच्या मागील परसांत बांधावी असें पंतांनीं ठरविलें व त्याप्रमाणें बेळगाव येथील व सांगली संस्थानांतील सरकारी अधिकाऱ्यांची परवानगी मिळवून ज्या दिवशीं अप्पांचें देहावसान झालें त्या दिवशीं रात्रीं सुमारें आठ वाजतां त्यांचा देह धमणींत घालून मोठ्या समारंभानें बाळेकुंद्रीस नेण्यांत आला. पंतांच्या घरांतील बायकांमुलांसुद्धां सर्व मंडळी बरोबरच होती. त्यामुळें अप्पांच्या धमणीबरोबर सुमारें १२-१३ धमण्या होत्या. रात्रीं सुमारें १० वाजतां ही सर्व मंडळी बाळेकुंद्रीस पोचली. तेथें गेल्यावर अप्पांचा देह त्यांच्या घरांत ठेवण्यांत आला आणि तेथें रात्रभर भजन चाललें होतें. दुसरे दिवशीं सकाळीं घराच्या मागील परसांत एक जागा शुद्ध करून तेथें खाडा खणण्यांत आला; तसेंच सकाळीं अप्पांचा देह श्रीरामेश्वराच्या पालखींत घालून गावभर मिरवणूक काढण्यांत आली. यावेळीं पंत स्वतः एकतारी घेऊन पालखीपुढें पदें म्हणत चालले होते. मिरवणूक संपल्यावर १२-१२॥ वाजतां घराच्या मागील परसांत तयार केलेल्या जागीं विधिपूर्वक अप्पांना समाधि देण्यांत आली. या-संबंधीं ४--८--१८९४ रोजीं अण्णांना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंतांनीं पुढील-प्रमाणें उल्लेख केला आहे, " सोमवारीं दोन प्रहरीं श्रीपरमहंस आजोबा समाधिस्थ झाले. पूर्व संकेतानुसार बाळेकुंद्रीस पूर्ण समारंभानें विधि उरकण्यांत आला. " तेरा दिवस झाल्या-नंतर समाधीच्या जागीं एक दगडी चवथरा बांधून त्यावर पादुका स्थापन केल्या व त्यांच्यावर दगडी काम करून आच्छादन केलें आहे. त्या पादुकांची अजूनहि रोज पूजा-अर्चा होत असते.

पंतांनीं आपल्या परमपूज्य वयोवृद्ध आजोबांचा अंतसमय जवळ आलासें वाटून त्यांना कार्तिक व. २ शके १८१२ रोजीं आतुरसंन्यास देऊन परमहंसदीक्षा दिली व पुढें त्यांची प्रकृति सुधारून ते सुमारें चार वर्षे आपल्या आश्रमधर्माप्रमाणें पंतांच्या जवळच राहात होते. त्यामुळें त्यांच्या रूपानें परमहंस सद्‌गुरु बालमुकुंदच आपल्या जवळ राहिला आहे अशी पंताची भावना झाली होती व त्यांच्या निधनानें पंतांना फार दुःख झालें. तशा मनस्थितींत आषाढ वद्य ४ शके १८९४ रोजीं बाळेकुंद्री येथें आजोबांना समाधि दिली त्या दिवशीं, जेव्हां पंत भजन करूं लागले तेव्हां त्यांनीं खालीं लिहिलेलीं तीन पदें म्हटलीं-" परमहंस गुरु बाळकृष्ण हा॥ प्रेमाचा उदधि ॥ ध्रु० ॥ आशिर्वचनें धन्य केलें मज । बुडविलें ब्रह्मानंदीं ॥ ॥१॥ असुनी नाहीं संसृतीं वृत्ति । दुःख कदा न बाधी ॥२॥ बोधामृतें तृप्तचि केलें । भोगी दत्त नित्य समाधि ॥३॥" (द.प्रे.ल.७०६) या पदांत पंतांनीं आजोबांना " परमहंस गुरु ", " प्रेमाचा उदधि " वगैरे वाक्सुमनांनीं गौरविलें खरें,

परंतु लगेच आपल्यावरचें छत्र नाहींसें झालेसें वाटून त्यांनीं सद्गुरूची पुढीलप्रमाणें करुणा भाकून धावा केला. " श्रीगुरुराया निष्ठुर कां झालासी ।.तुजविणें जगीं मी परदेशी ॥ धृ० ॥ माता पिता तूं इष्ट भ्राता तूं । तूंचि प्रेमराशी ॥ १ ॥ शिणलों भागलों न पुसे कोणी । झालें मी उदासी ॥ २ ॥ धावुनि दर्शन देई झडकरी । धीर न दत्तासी ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. ७०७ ) वरीलप्रमाणें धावा केल्यावर पंतांना जो अनुभव आला तो पुढील पदाच्या रूपानें व्यक्त झाला आहे. " बालावधूत आजि प्रगटला । सर्व संशय आजि निरसला ॥ धु० ॥ मिथ्या मतें सर्व खंडुनी । बौधाद्वैत आजि उदेला ॥ १ ॥ द्वैताद्वैत नाहीं स्वरूपीं । 'नेति नेति' वेद वदला ॥ २ ॥ सहज स्थितिं जग हें विलसे । पाहुनी दत्त गुरुपदीं रमला ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ७०८ )

ज्याप्रमाणें पंतांनीं बाळेकुंद्री येथें आपल्या घराच्या परसांत समाधि बांधून आपल्या परमहंस आजोबांचे स्मारक करून ठेविलें त्याचप्रमाणें त्यांनीं " परमहंस गुरु बाळकृष्ण हा प्रेमाचा उदधि " या पदानें त्यांचें कायमचें स्मारक करून ठेविलें आहे. या पदांतील "बाळकृष्ण" या शब्दाचें औचित्य लक्षांत न आल्यानें 'श्रीदत्तप्रेमलहरी' या पदसंग्रहाच्या पहिल्या आवृत्तींतील या पदांत " बाळकृष्ण " या शब्दाऐवजी "बाल-मुकुंद " असें छापलें आहे; पण तें बरोबर नाहीं.

मारुती गल्लींत राहावयास आल्यानंतर थोड्याच दिवसांत पंतांना अत्यंत पूज्य अशा दोन थोर विभूतींचा वियोग झाला; तरी त्यांचें सद्गुरुभजनसेवेचें व्रत, शिष्य-प्रबोधनकार्य व अध्ययन–अध्यापन हीं अधिकाधिक उत्साहानें चाललीं होतीं.

# प्रकरण ३१ वें

———:०:———

## आत्मानुभवाची परिपक्वता; गुरुप्रेमच जीवन; ज्ञानेश्वरांबद्दल अत्यादर; अधिकारी सत्पुरुषांची भेट; अमृतानुभवाशीं दाट परिचय; अवधूतगतिबद्दल आदर.

———:०:———

१८८५ अखेर " अनुभवयुगाला " अथवा " अवधूतयुगाला " सुरवात झाल्यापासून पंतांच्या सिद्धावस्थेला सुरवात झाली व ज्याला त्यांनीं " विज्ञानसरोवर " व " प्रेमरसपूरित सुवर्णवाटी " म्हटलें आहे तो १८८६ च्या सुरवातीला लिहिलेला " भक्तालाप " लेख व १८८६–८७ सालीं झालेलीं पदें ( द. प्रे. ल. १०० ते १५० ) या गोष्टींची स्पष्ट साक्ष देतात. भक्तालापासंबंधीं विस्तृत विवेचन प्रकरण २३ मध्यें केलेंच आहे. तेव्हां त्यांत व्यक्त झालेल्या पंतांच्या उज्वल आत्मानुभवासंबंधीं येथें पुनरुक्ति करीत नाहीं. पद १४२ मध्यें पंत म्हणतात, " दत्तपायीं मम वासना निमाली। शांति स्थिरावली अंतरंगा ॥ ध्रु. ॥ भवपाश सहज बोधें हरियेला। सामरस्यलीला उघड केली ॥ १ ॥ भूतदेह तत्वबोधें नासूनियां। केली मंत्रकाया कृपाबळें ॥ २ ॥ वायुप्राण तोची गुरुप्राण झाला। जीवभाव गेला शिवतत्वीं ॥ ३ ॥ काल कल्पिताचा करूनियां अंत। मूलमंत्रतत्व बोधियेलें ॥ ४ ॥ तनुत्रयगत मलत्रय गेलें। लिंगत्रय झालें स्वतःसिद्ध ॥ ५ ॥ भवीं जन्म माझा करूनियां नष्ट। मुक्तिपद श्रेष्ठ हातीं दिलें ॥ ६ ॥ अनंत विस्तारीं ब्रम्ह दाखविलें। मज सामाविलें परब्रम्हीं ॥ ७ ॥ दत्ताठायीं पूर्ण बाळरूप दिसे। अखंड हें पिसें झगटलें ॥ ८ ॥ " या पदांत वर्णिलेल्या गुरुशिष्यांमधील ऐक्यभावाचें अथवा अद्वयभक्तीचें रहस्य त्यांनीं पद १४४ मध्यें तर पुढील शब्दांनीं व्यक्त केलें आहे. " कोणीं कोणासी सांगावें। दिसतें गुरुरूप आघवें ॥ ध्रु. ॥ कैंचा शिष्य कैंचा गुरु। कैंचा नेम सदाचारु ॥ १ ॥ कैंचा भक्त कैंचा देव। नाहीं मीतूंपणा ठाव ॥ २ ॥ कैंचें ध्यान कैंचें ज्ञान। नाहीं साक्षीचेंहि भान ॥ ३ ॥ कोण श्रोता कोण वक्ता। ॐकाराचा ठाव पुसतां ॥ ४ ॥ कैंचि भुक्ति कैंची मुक्ति। विषय नाहीं कैंची विरति ॥ ५ ॥ कैंचें जनन कैंचें मरण। हृदयीं स्मरतां श्रीपतिचरण ॥ ६ ॥ कैंचें बाह्य कैंचें आंतर। भरलें रूपीं चराचर ॥ ७ ॥ कैंचा दत्त कैंचा गोप। विश्वीं पहातां बाळरूप ॥ ८ ॥ अद्वयसेवा भजनाची। भक्तांसवें दत्त नाची ॥ ९ ॥ " या ऐक्यस्थितीचा व सर्वात्मभाव बाणल्याचा अनुभव त्यांनीं पद १५० मध्यें पुढीलप्रमाणें अधिक स्पष्टपणें सांगितला आहे. " भेदभाव गेला दत्त बालमुकुंद झाला। पाहतां पाहतां अवघा ब्रह्मानंद भरला ॥ ध्रु. ॥ निजरूपदर्शनें मना लागलें पिसें। चराचरीं परब्रह्म आपेंची प्रकाशे। सबाह्य अभ्यंतरीं आत्मतत्वची भासे ॥ १ ॥ बोध विरति उपरमाची जाहली सीमा। कल्पिताचा अंत झाला

रजा दिली कामा । ठाव कैंचा साक्षी निमतां मग रूपनामा ॥ २ ॥ दत्तचि निमाला तेथें बालमुकुंद उरला । त्रिपुटी हरपतां सगळा एकाकार झाला ॥ ३ ॥ ". पद १५१ मध्यें आपल्या ठिकाणीं बाणलेल्या सहजस्थितीचें रहस्य त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. " सकळ व्यवहार आनंदसागर । षोडशोपचार पूजा हेची ॥ ३ ॥ सेवा सर्वकाळ सहजानंद खेळ । पाहुनियां बाळ दत्त मौनी ॥ ४ ॥ " व पद १५२ मध्यें " दत्तकृपें स्वरूप उदेलें । आत्मभजन सहज चाललें ॥ " असें म्हटलें आहे. वरील उद्गारांवरून १८८६-८७ च्या सुमारास पंतांची आध्यात्मिक भूमिका किती उज्वल होती याची कल्पना होते व तेव्हांपासून दिवसेंदिवस त्यांचा स्वरूपानुभव कसकसा पक्क दशेला येत गेला तें यापूर्वी प्रकरण २६ व २९ मध्यें दाखविलेंच आहे.

## गुरुप्रेमच जीवन

१८९३ च्या जून महिन्यांत पंत मारुती गल्लींतील नाटेकर यांचे घरीं राहाण्यास गेले तेव्हां ते आत्मानुभाच्या पूर्णत्वाला पोचले होते. तेव्हांपासून भक्तमंडळीसह जंगलांत अगर डोंगरावर जाऊन स्वच्छंदपणें भजनानंदांत खेळ खेळणें वगैरे प्रकार कमी कमी होत जाऊन भजन करणें, बोध सांगणें, वेदान्तचर्चा करणें वगैरे कार्यक्रम आपल्या घरीं करण्यांतच त्यांचा अधिकाधिक वेळ जाऊं लागला, त्यांची वृत्ति गुरुप्रेमसुखांत अधिकाधिक रममाण होऊं लागली व काव्यस्फूर्ति जोरावत जाऊन स्वानुभव, गुरुप्रेम व बोध हीं पदांच्या रूपानें अधिकाधिक व्यक्त होऊं लागलीं आणि आतां फक्त प्रेमभोगार्थ आपणाला जगीं राहाणें आहे अशी त्यांची ठाम भावना होत चालली. श्रावण वद्य ८ शके १८१५ ( २७-८-१८९३ ) रोजीं अण्णांना लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात "खालील वचनें जन्मदिवसाचीं आहेत. × × × अण्णा, प्रेमामृताकरितां राहाणें आहे. त्याचीहि तृप्ति झाली. " ( पु. ५-१० ) त्या पत्राचे शेवटीं पाच पदें दिलीं असून एक आरती दिली आहे. त्यांपैकीं पहिलें पद " गुरुसवें धरिली आजी कुस्तीरे । प्रेमाची चढली मज मस्ती ॥ धृ० ॥ " ( द. प्रे. ल. ४०८ ) हें त्यांच्या ठिकाणच्या सलगीच्या गुरुप्रेमाची साक्ष देत आहे. " हरिहरब्रम्हां पूज्य जाहलों । गुरुपदीं रमलों । आजी ॥ धृ० ॥ ज्ञानाज्ञान बंध मुक्ति । सहजची लंघलों । आजी ॥ १ ॥ गुरुशिष्यांची मिठी पडली । बोधहि विसरलों । आजी ॥ २ ॥ बालमुकुंदपदीं दत्त निमला । प्रेमास्तव उरलों ॥ आजी ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. ४१० ) हें पद त्यांच्या ठिकाणचा उज्वल आत्मप्रत्यय व अभेदबोध यांचें निदर्शक आहे. " दत्त हा जन्मा आला । जयजयकार जाहला ॥ धृ० ॥ गोकुळाष्टमी शुभ दिन पाहुनी । भूवरी अवतरला ॥ १ ॥ सन्मार्गाची खूण दावुनी । प्रगटली बाळलीला ॥ २ ॥ सहजस्थितीनें सत्यत्व आणिलें । जक्षन् क्रीडन् श्रुतिबोला ॥ ३ ॥ बालमुकुंदपदीं दत्त निमाला । प्रेमाकारणीं उरला ॥ ४ ॥ " ( द. प्रे. ल. ४११ ) या पदांत वर्णन केल्याप्रमाणें गोकुळाष्टमीचा शुभ दिन पाहून भूमीवर अवतरणारा, सन्मार्गाची खूण दाखवून " बाळलीला " म्हणजे सदगुरु बालमुकुंदांची अद्भुत लीला प्रगट करणारा व सहज

स्थितीच्या राहाणीचें " जक्षन् क्रीडन्, " हें आत्मक्रीड पुरुषाच्या राहणीचें श्रुतीमधील वर्णन सत्य असल्याची साक्ष पटविणारा जो " दत्त " जन्माला आला तो आणि बालमुकुंद-पदीं निमून जाऊन प्रेमाकरितांच उरणारा " दत्त " हे एकच होत, म्हणजे स्वतःला उद्देशून निघालेले हे पंतांचे उद्गार आहेत हें सांगणें नकोच; अथवा बालमुकुंदांचा जन्महि गोकुळाष्टमीच्या दिवशीं झालेला असल्यामुळें त्या दिवशीं श्रीदत्तात्रेयांनीं त्यांच्या रूपानें अवतार घेतला व त्या दत्तावतारी श्रीबालमुकुंदपदीं " दत्त " ( पंत ) नाहींसा होऊन केवळ प्रेमभोगाकरितां उरला आहे, असा या पदाचा अर्थ घेतला तरीहि चालेल. तसेंच वरील पत्रांत दिलेल्या, " आरती अवधूता । जय जय आरती अवधूता ॥ धृ. ॥ " ( द. प्रे. ल. २६४२ ) या आरतीच्या शेवटीं, " प्रेमास्तव हा जन्म घेतला । बाणली खुण दत्ता ॥ ३ ॥, " असें म्हटलें आहे. पंतांनीं हे जे स्वानुभवाचे उद्गार काढले आहेत ते त्यांच्या त्या वेळच्या स्थितीचे निदर्शक आहेत. गोकुळाष्टमीनंतर थोड्याच दिवसांनीं झालेल्या, " गुरुप्रेमास्तव राहूं आतां । ध्यानीं धरूं गुरु बालावधूता ॥ धृ. ॥ नरजन्माचें काज सरलें । प्रेमास्तव शरीर उरलें । जाईल उद्यां कीं हो आतां ॥ १ ॥ खेळ खेळुनी बहुत भागलों । सर्वी असुनी सर्वां मुकलों । लागली मूळ घरची चिंता ॥ २ ॥ सत्यज्ञानानंदसागरीं । सहज खेळे प्रेमलहरी । विसरूं नको या दास दत्ता ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ४१९ ) या पदांत तर " आतां गुरुप्रेमास्तव राहूं व सद्गुरु बालावधूताला ध्यानीं धरूं. नरजन्माचें कार्य संपलें असून हें शरीर गुरुप्रेमाकरितां उरलें आहे; तें केव्हां जाईल याचा नियम नाहीं; आजपर्यंत खेळ खेळून फार शिणलों, सर्वांत असून अलिप्त राहिलों, आतां मूळ घरची चिंता लागली म्हणजे वृत्ति अंतर्मुख होऊन आपण आत्मरत, आत्म-क्रीड बनलों," असें पंतांनीं स्पष्टच म्हटलें आहे व त्या पदाच्या पूर्वीच्या पदांत हाच अनुभव अधिक स्पष्टपणें व्यक्त झाला आहे. " पुरे पुरे खेळ हा गुरूचा । गुरुपदीं शांत मी साचा ॥ धृ० ॥ नको मज संसृतिखटपट । परमार्थी वाद घटपट । द्वैत-भाव उरी आतां कैंचा ॥ १ ॥ द्वैत नाहीं आदि अंतीं जगासी सहज ही मुक्ति । चालला खेळ प्रेमाचा ॥ २ ॥ शिष्यासी गुरूनें गिळिलें । मीपण नाहीं उरलें । दत्ताचा ब्रीद हा साचा ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ४१८ ) तसेंच २६-११-१८९३ रोजीं रावजींना लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात, " गेल्या उत्सवापर्यंत घटाचें जें प्रारब्ध होतें तें निराळें, त्याच्या क्रिया निराळ्या, हेतु निराळे, हेतु साधण्याचे मार्ग निराळे. तो भाग संपला म्हणजे तो घट मावळला. आतांचा घट निराळ्या तऱ्हेवर जाणार, वृत्ति बोधसमूहाची संग्रहिणी होणार, म्हणजे बाह्यात्कारीं बोधाचे उद्गार क्वचितच येतील. सर्व कांहीं कूर्मवत गिळून नामरूपास न येतां स्वस्थपणें काळ घालविणें आहे. " ( पु. ५-१२ )

याप्रमाणें १८९३ अखेर आपलें नरजन्माचें कार्य संपलें, खेळ खेळून आपण फार भागलों, गुरूचा खेळ आतां पुरे झाला वगैरे प्रकारचे उद्गार जरी पंतांनीं काढले तरी ते त्यांच्या स्वतःपुरतेच होते हें उघड आहे. कारण आत्मप्राप्ति करून आत्मानंदांत पडून

राहाणें एवढेंच त्यांच्या आयुष्यांतील कार्य नसून असंख्य मुमुक्षूंना व भाविकांना आत्मबोध करून कृतार्थ करणें हें त्यांचें मुख्य कार्य होतें व तें विशेषेंकरून त्यानंतरच व्हावयाचें होतें. तसेंच जरी या सुमारास पंतांचे वरील प्रकारचे उद्गार वारंवार निघत तरी अध्यात्मविषया-संबंधींचें त्यांचें वाचन व मनन हीं चालूच होतीं.

## सिद्धानुवाद

१८७७ अखेर सद्गुरु बालमुकुंद श्रीशैल्ययात्रेला गेल्यापासूनच पंतांचें उपनिष-दादि ग्रंथांचें वाचन व मनन सुरू झालें होतें व त्यांनीं ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुका-राम, रामदास वगैरे संतांचें वाङ्मय व वामनपंडितांची 'यथार्थदीपिका' वगैरे ग्रंथ आस्था-पूर्वक वाचल्याचा मागें उल्लेख केलाच आहे. त्या वेळीं पंतांनीं ज्ञानेश्वरांचा 'अमृतानुभव'हि वाचला असेल व त्यांच्या ज्या स्वानुभवसिद्धांतांचें वर दिग्दर्शन केलें आहे ते अमृतानुभवांत व्यक्त झालेल्या स्वानुभवसिद्धांतांशीं फार जुळते आहेत. किंबहुना एकच 'अनुभवामृत' अथवा 'सकलोपनिषत्सार' पंतांच्या पदांत व ज्ञानेश्वरमहाराजांच्या अमृतानुभवांत व्यक्त झालें आहे. कारण दोहोंतहि सिद्धानुवाद केलेला आहे म्हणजे जें स्वयंसिद्ध आहे त्याचाच अनुवाद म्हणजे त्रिकालाबाधित परिपूर्ण वस्तूचें शक्यतोंपावेतों शब्दाच्या साह्यानें यथार्थ स्वरूपदर्शन केलें आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं अमृतानुभवाच्या दहाव्या अध्यायांत " तऱ्ही ग्रंथप्रस्तावो । न घडे म्हणे पावो । परी सिद्धानुवाद लाहो । आवडी करूं" ॥ १०–१२ ॥ ( अशा प्रकारें जगताच्या ठिकाणीं एकच स्वतःसिद्ध द्रष्टारूप वस्तु आहे तर हा ग्रंथाचा प्रसंग आणण्याचें कारणच उरत नाहीं असें जर कोणीं म्हणेल तर जें स्वतःसिद्ध आहे त्याचाच हा अनुवाद आम्हीं आवडीनें केला आहे. यांत आम्हीं अधिक कांहींच केलें नाहीं ) असें म्हटलें आहे. पंतांनीहि " सिद्धानुवाद सहज करूं आतां ॥ ध्रु. ॥ जगद्रूपें वस्तु विलसे । नाहीं मायिक वार्ता ॥ १ ॥ स्वानंदीं गुरुशिष्य-भाव । सहज तत्त्वतां ॥ २ ॥ ब्रह्मानंदीं नाचतां निशिदिनीं । भजन प्रिय दत्ता ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ७४२ ) असें म्हटलें आहे. तसेंच २४–६–१८९४ रोजीं अण्णांना लिहिलेल्या पत्रांत (पु. ५–१७ व १८) "आहे–नाहीं–विरहित सद्गुरुस्थिति ॥ ध्रु. ॥ " ( द. प्रे. ल. ६४० ); " सर्व शब्दांचा घोटाळा । टाकुनी होईरे मोकळा ॥ ध्रु. ॥ " ( द. प्रे. ल. ६४१ ), " स्वसंवेद्य सद्गुरूसी आरती केली । ज्ञानाज्ञानभ्रांति टाकितां निजशांति मिळली ॥ ध्रु. ॥ " ( द. प्रे. ल. २६४८ ) व " कैव-ल्यासी मारुनी लाथ वरिली गुरुभक्ति । सद्गुरुबोधें समूळ गेली जन्ममरणभीति ॥ध्रु.॥ धर्माधर्म पापपुण्या नाहीं गणती । येणें नाहीं जाणें नाहीं सहज ही स्थिति ॥ १ ॥ संस्तृति ही नियमित नाहीं म्हणुनी निजशांति । निवृत्तीसी नाहीं ठाव आत्मप्रतीति ॥ २ ॥ स्वेच्छाचार स्वैरसमाधि गुरुपायीं प्रीति । दत्तावधूतएकार्णवीं निरंकुश वृत्ति ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ६४३ ) हीं पदें देऊन " नित्य प्राप्तपदाचा अनुवाद पदांनीं केला. कारण पत्र–विस्तारास मजकूरच नाहीं. " असें तीं देण्याचें कारण त्यांनीं सांगितलें आहे.

## अधिकारी सत्पुरुषाचा सहवास व अमृतानुभवाशीं दाट परिचय

१८९४ पासून पंतांचा अमृतानुभवाशीं विशेष परिचय होत गेला. याला एक कारण असें झालें कीं त्या सालीं बेळगाव येथें एक सत्पुरुष आले होते. ते फार अधिकारी असून अद्वैतानुभवी होते. अमृतानुभवाचें त्यांचें अध्ययन फार चांगलें होतें व सुमारे तीन महिने त्यांचीं त्या ग्रंथावर बेळगावांत प्रवचनें चाललीं होतीं. जेव्हां पंतांची व त्यांची गाठ पडली तेव्हां परस्परांना परस्परांची ओळख पटून त्यांचा फार परिचय झाला व पंतांच्या आग्रहावरून ते पंतांच्याच घरीं राहूं लागले आणि त्या उभयतांमध्यें अमृतानुभवासंबंधीं नेहमीं चर्चा चालत असे. तो ग्रंथ दोघांच्याहि अत्यंत आवडीचा होता व त्यांतील विषयाशीं दोघांचें जणूं तादात्म्यच झालें होतें. तेव्हां त्यांच्या दरम्यान असें ठरलें की शुद्ध व सोप्या मराठींत अमृतानुभवाचें रूपांतर करून तें छापून प्रसिद्ध करावें म्हणजे सामान्य वाचकांना भाषेच्या दुर्बोधत्वामुळें त्या ग्रंथांतील विषय समजण्याला एक जी अडचण भासते ती बऱ्याच अंशानें दूर होईल. त्याप्रमाणें त्या ग्रंथासंबंधीं पंतांच्या घरीं चर्चा सुरू होऊन त्याचें शुद्ध व सोप्या मराठींत भाषांतर करण्यासहि सुरवात झाली. २४ मे १८९४ रोजीं अण्णांना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंत लिहितात, " हल्लीं येथें एक सत्पुरुष आले आहेत. ते अद्वैत–अनुभवांत प्रवीण आहेत. शिवाय विषय समजावून देण्याची त्यांची हातवटी फारच उत्तम आहे. हा काळपावेतों असा अनुभवी, धीर, निरंकुश वृत्तीचा, बाणेदार सत्पुरुष माझ्या पाहण्यांत आला नव्हता. सध्यां ते येथेंच आहेत. आणखी सुमारें निदान महिना तरी राहाण्याविषयीं विनंती केली आहे. सध्यां अमृतानुभवाचें मराठींत सुलभ भाषांतर चाललें आहे. सहा प्रकरणें झालीं आहेत. सातव्यास आरंभ केला आहे. संपण्यास निदान १५–२० दिवस लागतील. मग उभतांच्या संमतीनें पुनः एकवार शुद्धि करून मग छापण्यास देण्याचें ठरलें आहे. यांच्या संगतीपासून परमार्थमार्गांत मला तरी बराच फायदा झाला व पुढेंहि होईल. अशा संधीस तुम्ही असतां तर मजा झाली असती .'

या पत्रांतील मजकुरावरून हें स्पष्ट दिसतें कीं पंत व ते सत्पुरुष या उभयतांनी अमृतानुभवाच्या सहा सात प्रकरणांचें सुलभ मराठींत भाषांतरहि केलें होतें. पण कांहीं कारणामुळें सर्व ग्रंथाचें भाषांतर झालेलें दिसत नाहीं. कारण तें झालें असतें तर पंतांच्या सदर पत्रांत नमूद केलेल्या संकल्पाप्रमाणें तें ताबडतोब प्रसिद्धहि झालें असतें. तरी पण अमृतानुभवाच्या उपलब्ध होण्यासारख्या प्रति जमविण्याचें व त्या ग्रंथाचें बारकाईनें परिशीलन करण्याचें पंतांचें कार्य मात्र चालूच होतें. १०–४–१८९५ रोजीं अण्णांना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंत लिहितात " येथें मुद्दाम सांगितल्याप्रमाणें अगत्य येणें. निपाणीहून 'अमृतानुभव' मूळ वगैरे आणून इकडे आणावें. त्याजकरितां जाणेचा त्रास झाला तरी हरकत नाहीं. येतांना आणलेच पाहिजे. " यावरून असें दिसतें कीं निपाणी येथें कोणाकडे तरी अमृतानुभवाची एखादी जुनी प्रत असल्याचें

पंतांच्या कानावर असल्यामुळें मिळाल्यास ती प्रत अगर तिची नक्कल करून आणण्यास त्यांनीं अण्णांना आग्रहपूर्वक लिहिलें होतें. पण ती मूळ प्रत लौकर मिळाली नसावी असें दिसतें. कारण १२–९–१८९५ रोजीं अण्णांना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंतांनी पुनः लिहिलें कीं, " अमृतानुभवाची तयार केलेली नवीन कापी व त्यासंबंधीं कांहीं साधनें मिळालीं असल्यास ( आणि मिळण्याजोगीं असल्यास खटपट करून मिळवून ) येतांना तीं आणण्याचें करावें. " या पत्रावरून असें दिसतें कीं, अमृतानुभवाच्या उपलब्ध होणाऱ्या प्रतींसंबंधीं माहिती मिळविण्याचे व त्या ग्रंथाचें सुलभ भाषेंत रूपांतर करण्याचे पंतांचे प्रयत्न सुरूच होते.

२४–५–१८९४ रोजीं अण्णांना लिहिलेल्या पत्रांत अमृतानुभवाच्या पहिल्या सहा प्रकरणांचें सुलभ मराठींत भाषांतर पुरें झालें असून सातव्या प्रकरणाचें भाषांतर चालू आहे असें जें पंतांनीं लिहिलें होतें त्यावरून पाहतां निदान पहिल्या सहा सात प्रकरणांचें भाषांतर पंतांच्या कागदपत्रांत असावयास पाहिजे होतें, पण तें आज उपलब्ध नाहीं. मात्र, पंतांच्या दप्तरांत एक लहान वही असून तिच्यांत अमृतानुभवाच्या प्रत्येक प्रकरणामधील कठीण शब्दांचे सोप्या मराठींत पर्यायवाचक शब्द दिले आहेत व त्या वहीला " अमृतानुभवांतील कठीण शब्दांचा कोश " म्हटलें आहे. त्या वहीवरून सदर भाषांतर करण्याचे कामीं पंतांनीं पुष्कळच प्रयत्न केला होता हें स्पष्ट दिसतें.

अमृतानुभवाच्या जुन्या प्रति शक्य तर मिळविण्याचा पंतांचा हा प्रयत्न पुष्कळ दिवस चालू होता. १८९६ च्या सुमारास शिवराम गोविंद सहस्रबुद्धे नावाचे एक गृहस्थ बेळगाव जिल्ह्यापैकीं तोरगल संस्थानचे कारभारी होते. त्यांना वेदान्तविषयाचा बराच नाद असल्यामुळें ते बेळगावास गेले म्हणजे पंतांच्या भेटीला जात व पंतांशीं त्यांचें वेदान्तविषयासंबंधीं संभाषण होत असे. एकदां बोलण्याच्या ओघांत अमृतानुभवासंबंधीं शिवरामपंतांनीं पंतांना असें सांगितलें कीं कोल्हापूर येथें भय्याकाका नावाचे एक सत्पुरुष असून त्यांचें ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांचें अध्ययन फार चांगलें आहे व त्यांनीं अमृतानुभवावर टीकाहि केली आहे. तेव्हां जमल्यास भय्याकाकांच्या अमृतानुभवावरील टीकेची नक्कल करून पाठवून देण्याबद्दल पंतांनीं त्यांना सांगितलें व तें त्यांनीं कबूल केलें. त्याप्रमाणें शिवरामपंतांनीं प्रयत्न सुरू केला व भय्याकाकांचा एक शिष्य व त्यांचेजवळ लेखकाचे काम करणारा रघुनाथ शिंपी ऊर्फ नामदेव याचेकडून भय्याकाकांनीं केलेल्या टीकेसहित अमृतानुभवाची एक हस्तलिखित प्रत मिळवून तिच्यावरून १ ते ६, ८ व १० या प्रकरणांची स्वतः नक्कल केली आणि सातव्या प्रकरणाची नक्कल रघुनाथ शिंपी ऊर्फ नामदेव यांचेकडून करवून घेतली. हें जेव्हां पंतांना समजलें तेव्हां त्यांनीं २७–११–१८९७ रोजीं शिवरामपंतांना लिहिलेल्या पत्रांत, " अमृतानुभव सार्थ लिहून काढलेला पाठविणें होईलच" असें लिहिलें आहे. ( पु. ५–३५ ) त्यानंतर शिवरामपंतांनीं स्वतः केलेली भय्याकाकांच्या टीकेसहित अमृतानुभवाचीं प्रकरणें १–६, ८ व १० यांची नक्कल व ७ व्या प्रकरणाची रघुनाथ शिंपी यांचेकडून करवून घेतलेली नक्कल अशा दोन्ही नकला

पंतांकडे पाठवून दिल्या व त्या पंतांच्या दप्तरांत आहेत. अशा रीतीनें अमृतानुभवाचें फार बारकाईनें पंतांचें वाचन १८९७ अखेरपर्यंत चालू होतें हें स्पष्ट दिसतें.

## अमृतानुभवाची थोरवी व श्रीज्ञानेशांचा अधिकार

अमृतानुभव ग्रंथ पंतांच्या अत्यंत आवडीचा होता व त्यासंबंधीं त्यांना फार पूज्यभाव वाटत असे. त्यांत व्यक्त झालेल्या अनुभवापलीकडे आत्मानुभवाचें पाऊल पडणें शक्य नाहीं असें ते म्हणत. या ग्रंथासंबंधीं त्यांनीं एके ठिकाणीं असे उद्गार काढले आहेत कीं, "अमृतानुभव हा ग्रंथ म्हणजे अवधूतगीतेवरील टीका आहे. यासारखा ग्रंथच नाहीं. हा एक चांगला आपलासा केला तर पुरे. × × × या अमृतानुभवाचे पलीकडे अनुभवाचें पाऊलदेखील टाकणें शक्य नाहीं. उपनिषदें तर मागेंच राहिलीं. असा तो सरळ अमृत-अनुभवच आहे. ज्ञानेश्वर कसे होते हें जर आतां कोणास पाहणें असेल तर त्यानें हा ग्रंथ मनन करून वाचावा म्हणजे समजेल. निर्विकल्पीं जो स्थिर झाला त्याची वाचा निर्विकल्प स्फूर्तिरूपच असून बाहेर उच्चारास येते. म्हणून त्यानें बोललेलेंच खरें होतें." (पु. ८–५६ व ५८).

पंतांचा आत्मानुभव किती उच्च कोटींतील होता याची वाचकांना येथपर्यंत साक्ष पटलीच असेल. तशा स्थितींत जेव्हां ते अमृतानुभवाचें मननपूर्वक वाचन करूं लागले अथवा अनुभवामृताचें त्यांनीं मंथन सुरू केलें तेव्हां दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें. त्यांनीं 'अमृतानुभव' इतका आत्मसात केला होता कीं त्याच्यांत व्यक्त झालेले गूढ सिद्धांत आणि ते व्यक्त करितांना दिलेले समर्पक दृष्टांत व मार्मिक शब्दयोजना हीं जशींच्या तशींच अगर थोड्या फार फरकानें त्यांच्या सहजोद्गाररूपी पदांत ठिकठिकाणीं व्यक्त झालेलीं आढळतात व १८९४ सालीं त्यांचें अमृतानुभवाचें आस्थापूर्वक वाचन व त्यासंबंधीं मनन व चर्चा सुरू झाल्यापासून १८९७ च्या अखेरपर्यंत तर हा प्रकार विशेष प्रमाणांत आढळून येतो. या सुमारें चार वर्षांच्या अवधींत पंतांचीं अदमासें एक हजार नवीन पदें झालीं व तीं साधारणपणें 'श्रीदत्तप्रेमलहरी' मध्यें पद ४०० पासून पद १४२६ पर्यंत छापलीं आहेत. सदर पदांतलि कांहीं वचनें व अमृतानुभवांतील तत्सदृश वचनें हीं येथें दिलीं असतां पंतांचें अमृतानुभवाशीं व तत्प्रतिपाद्य विषयाशीं किती तादात्म्य झालें होतें यासंबंधीं वाचकांना यथार्थ कल्पना येईल. तीं वचनें पुढील-प्रमाणें आहेत.

| श्रीदत्तप्रेमलहरींतील पदें | अमृतानुभवांतील वचनें |
| --- | --- |
| ४९७–रंभागर्भ गगनीं निमलें ।<br>तेवीं सद्गुरुनमन घडलें ।। ध्रु० ।। | शिवशक्तिसमावेशें । नमन केलें म्यां ऐसें । रंभागर्भ आकाशें । रिगाला जैसा ।। १–६४ ।। |
| लवणमत्स्य जळीं विरला ।<br>तैसा जीव स्वरूपीं मिळला ।। १ ।। | लवणाची मासोळी । जरी जाली जिवाळीं । तरी जळीं ना जळावेगळी । न जिये जेवीं ।। ७–३६ ।। |

| | |
|---|---|
| ६६०–प्रळय शब्दाचा जाहला । आजी दुर्दिन संपला ॥ ध्रु० ॥ | या शब्दाचा निमाला । महाप्रळयो होसरला । अभ्रासवें गेला । दुर्दिनु जैसा ॥ ६–१०३ ॥ |
| ७८२–सिद्धानुवाद सहज करूं आतां ॥ ध्रु० ॥ | तरी सिद्धानुवाद लाहो ॥ आवडी करूं ॥ १०-१२ ॥ |
| ७५२–आपणचि बुझे आपण बुझावे । आपल्या ठायीं आपण तृप्त ॥ १ ॥ | जे तोचि चेता तोचि चेववीं । तेवीं हाचि बुझे हाचि बुझावी । |
| आपणचि सद्‌गुरु शिष्य होऊनी । आपुला अनुभव आपण पहात ॥२॥ | गुरुशिष्यत्वं नांदवी । ऐसेन हा ॥ २-६७ ॥ |
| ७५८–नाहीं अविद्येसी जाती । वायां जना पडली भ्रांति ॥ ध्रु० ॥ | अविद्येची ना जाती । तेथें नाहीं म्हणतया युक्ति ॥ ६-५७ ॥ |
| ७६३–शिष्यजीव घेतल्याविणा । न दाविसी तुझिया खूणा ॥ १ ॥ | जिवू घेतलिया उणें । चालों नेदिसी साजणें । मृत्यु उरे स्वामीपणें । तेंहि नव्हे ॥ २--३९ ॥ |
| सर्व भावें आम्ही तुझे । वरी प्रेमें म्हणसी माझे ॥ ५ ॥ | आम्ही निखळ मा तुझे । वरी लोभें म्हणसी माझें । हें पुनरुक्त साजे । तूंचि म्हणूनी ॥ ९–६७ ॥ |
| ८५१--झाला स्वेच्छाचि विधि । स्वैर झाली समाधि ॥ ध्रु० ॥ | जाला स्वेच्छाचि विधि । स्वैर झाला समाधि । दशे ये मोक्षऋद्धि । बैसों घापे ॥ ९--३४ ॥ |
| ९५८–मौन पिउनी बोलतों । अक्रिय सदा क्रिया करितों ॥ ध्रु० ॥ | आतां यावरी जें बोलणें । तें येणेंचि बोलणें शहाणें । जें मौनाचेंही निपटणें । पिऊनि गेले ॥ ५–५३ ॥ |
| ९९२–सिद्धांत हे निदसुऱ्याचे ब्रह्मविदा केवीं रुचे ॥ ध्रु० ॥ | सर्व सिद्धांताचिया उजरिया । सांडोनिया निदसुरिया । आपुलिया हातां चोरिया । आपणचि जो ॥५-३९॥ |
| १०४७–वाचामनातीत अनुभव माझा केविं बोलुनी दावूं । मौन-मुद्रा धारण करुनी सद्‌गुरु-गुण गावूं ॥ ध्रु० ॥ | म्हणोनि तोंडा आड पडे । तेंहि वाचा वावडे । परी समाधी न मोडे । मौनमुद्रेची ॥ ९–२० ॥ |
| १२६९–शिवशिवा सद्‌गुरु स्वामी । तुझिया बोधें नुरलें तूं मी ॥ध्रु.॥ | शिवशिवा समर्था स्वामी । येवढीये आनंदभूमि । घेपें दीजे एकें आम्हीं । ऐसें केलें ॥ ९–६५ ॥ |

| | |
|---|---|
| कोणाचें तूं कांहीं न घेसी । आपुलेंहि दुसऱ्या न देसी । सदा वस्ती आनंदधामीं ॥ १ ॥ | कोणाचें कांहीं न घेसी । आपुलेंही तैसेंचि न देसी । कोण जाणे भोगिसी । गौरव कैसें ॥ ९–६८ ॥ |
| नाहीं त्या जळीं शिष्य वुडतां घनवट तूंचि तारिता । तरला न दिसे रूपनामीं ॥ २ ॥ | नाहीं ते जळीं बुडिजे । तैं घनवटें जेणें तारिजे । जेणें तरलियाहि तुरिजे । कवणिये ठायीं ॥ २–२१ ॥ |
| १३१२–आम्ही प्रगट ना लोपलों । सर्वा ठायीं आम्हीं भरलों ॥ ध्रु. ॥ | आणि पूर्ण अहंता वेठलों । सैंघ आम्हांच दाटलों । मा लोपलों ना प्रगटलों । कोणा होउनी ॥ १०–१५ ॥ |

१८९४ सालीं करमरकर आडनावाचे एक गृहस्थ बेळगाव येथें आले होते. ते पूर्वी शिक्षणखात्यांत शिक्षकाचें काम करीत असत व सेवानिवृत्त झाल्यावर अध्यात्मविषयांत आपला काळ घालवीत. त्यांचा पंतांशीं परिचय झाला व तेव्हांपासून पंतांचें व त्यांचें अमृतानुभवासंबंधीं नेहमीं संभाषण होत असे. तसेंच १८९४–९५ सालीं माहुलीकर आडनावाचे एक फार विद्वान शास्त्री पंतांकडे येत असत. ते पुराण फार चांगलें सांगत. पंतांची आणि त्यांची वेदांतविषयासंबंधीं नेहमीं चर्चा चालत असे व पंतांशीं त्यांचा विशेष परिचय झाल्यापासून ते पंतांच्या मंडळीबरोबर भजनपूजनांतहि भाग घेत असत. याच सुमारास दुसरे एक विद्वान शास्त्री पंतांकडे येत असत. त्यांना नागेशशास्त्री म्हणत. ते नैय्यायिक होते. माहुलीकरशास्त्री व नागेशशास्त्री या विद्वान शास्त्रीद्वयाबरोबर पंत आचार्यांचा ‘ उपदेशसहस्री ’ हा संस्कृत ग्रंथ वाचीत असत आणि त्यावर त्यांची नेहमीं चर्चा चालत असे. अशा रीतीनें पंतांचें संस्कृत व प्राकृत अध्यात्मग्रंथांचें वाचन व मनन हीं, ते मारुती गल्लींतील घरांत राहात असेपर्यंत, विशेष प्रमाणांत चालू होतीं.

## ‘अवधूतगीते’बद्दल आदर

ज्याप्रमाणें श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या अमृतानुभवानें पंतांना मोहून टाकिलें होतें त्याचप्रमाणें अवधूतगीतेंतील अजातवादानेंहि त्यांना मोहित केलें होतें; त्यामुळें तो ग्रंथहि त्यांच्या फार आवडीचा होता. मागें जो पंतांच्या बोलांतील एक उतारा दिला आहे त्यांत त्यांनीं अमृतानुभव म्हणजे ( जणूं ) अवधूतगीतेवरील टीकाच आहे असें जें म्हटलें आहे तें त्यांच्यांतील अद्वैतसिद्धांतांमधील साम्यावरूनच होय. अमृतानुभवाप्रमाणेंच अवधूतगीतेमधील सिद्धांत व वचनें पंतांना आत्मसात झालीं होतीं व त्यांतील कांहीं वचनें तर जशींच्या तशींच त्यांच्या पदांत उतरलीं आहेत. उदाहरणार्थ, “समरस-

मग्नो भावितपूतः प्रलपति तत्वं परमवधूतः" (अ. गी.५-३२) या अवधूतगीतेंतील वचनानें "समरसमग्न भावितपूत । प्रलपितो तत्व परमावधूत ॥ धृ ॥" (द. प्रे. ल.१२६०) या पदाला सुरवात करून अवधूताच्या स्थितीचें पंतांनीं वर्णन केलें आहे. तसेंच अवधूतगीतेंतील तिसऱ्या अध्यायाच्या श्लोक ३ ते ४२ पैकीं प्रत्येक श्लोकाच्या शेवटीं "ज्ञानामृतं समरसं गगनोपमोऽहम्" हें जे वचन आहे तें घेऊन "ज्ञानामृत-समरसगगनसम स्वरूप माझें । नाहीं कदा तेथें दुजें ॥ धृ. ॥" (द. प्रे. ल. १२६८) हें पद त्यांनीं म्हटलें व त्यांत स्वयंसिद्ध, स्वयंप्रकाश, स्वसंवेद्य अशा अद्वैत स्वरूपाचें वर्णन केलें आहे. येथें हें नमूद करावेंसें वाटतें कीं 'अवधूतगीता' व 'अमृतानुभव' या आपल्या आवडत्या ग्रंथांचें पंतांचें वाचन व मनन हें १८९६-९७ च्या सुमारास एकाच वेळीं चाललें होतें. कारण अवधूतगीता अध्याय ५-३२ मधील वचनाचा आधार घेऊन वर उल्लेख केलेलें पद १२६० हें ९-५-१८९६ रोजीं झालें व पद १२६८ हें २१-५-१८९६ रोजीं झालें आणि त्याच दिवशीं अमृतानुभवांतील वचनें ज्यांत आहेत असें मागें उल्लेख केलेलें पद १२६९ "शिवशिवा सद्गुरुस्वामी" हें झालें.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे 'अवधूतगीता' व 'अमृतानुभव' हे दोन्ही ग्रंथ पंतांनीं पूर्णपणें आत्मसात केले होते हें त्यांच्या वाङ्मयावरून स्पष्ट दिसत आहे. पण पंतांसारख्या पूर्णानुभवी महात्म्यानें व मागें उल्लेख केलेल्या दुसऱ्या एका अधिकारी सत्पुरुषानें एकमतानें अमृतानुभवाच्या निदान पहिल्या सहा प्रकरणांचें सुलभ व सोप्या भाषेंत रूपांतर केल्याचा पंतांच्या एका पत्रांत उल्लेख असूनहि तें आज उपलब्ध नसावें ही मोठ्या खेदाची गोष्ट होय !

# प्रकरण ३२ वें

काका घाणेकर; धारवाड–हुबळीकडील दुसरी खेप; श्रीसिद्धारूढस्वामींची पुनः भेट; आपल्या घरीं गोकुळाष्टमीचा उत्सव सुरू केला; मौनी वंगाली संन्यासी; कुरुंदवाड–अकोळ–बेडकिहाळ-कडील खेप; प्रेमकल्लोळ.

## काकाची वकिलीची परीक्षा व त्याला पंतांची आठवण

प्रकरण २२ मध्यें उल्लेख केल्याप्रमाणें १८८५ सालीं मॅट्रिक पास होऊन व्यंकटेश गोविंद ऊर्फ काका घाणेकर आपल्या घरीं गेला. तेव्हां त्याच्या घरांतलि सर्व मंडळीला फार आनंद झाला व वडिलांच्या संमतीनें कॉलेजांत जाण्याचें ठरवून १८८६ च्या सुरवातीपासून तो पुण्यास डेक्कन कॉलेजांत जाऊं लागला. तेथें दोन वर्षें अभ्यास केल्या-वर आर्थिक अडचणीमुळें त्याला कॉलेज सोडावें लागलें व त्यानें रेल्वे मेल सर्व्हिसमध्यें नोकरी धरिली. त्यामुळें त्याला थोडा पैसाहि मिळूं लागला. पण नोकरी करून सर्व आयुष्य घालविणें बरें न वाटून त्यानें नोकरीचा राजीनामा दिला व वकिलीच्या–त्यावेळीं चालू असलेल्या डिस्ट्रिक्ट प्लीडरच्या–परिक्षेचा अभ्यास सुरू केला. घरची आर्थिक मदत नसल्यामुळें वकिलीचा अभ्यास करीत असतांना त्याला आप्तेष्टांच्या मदतीवरच अव-लंबून राहावें लागत होतें. १८९२ व १८९३ सालीं काका वकिलीच्या परिक्षेला बसला; पण त्याला यश आलें नाहीं. तेव्हां तो इतका वैतागला कीं, आणखी एकदां परिक्षेला बसावयाचें व यश न आल्यास घरदार सोडून कोठें तरी निघून जावयाचें असा त्यानें निश्चय केला !

काकानें जरी १८७९ च्या सुरवातीपासून १८८५ अखेरपर्यंत बेळगावांत पंतांच्या जवळ त्यांच्या धाकट्या भावाप्रमाणें दिवस काढले होते व तो त्यांच्या कळकळीच्या शिक-वणीनें व कृपेनें मॅट्रिक पास झाला तरी १८८५ पासून १८९४ पर्यंत तो एकदांहि त्यांना भेटण्यास गेला नव्हता अगर त्यांच्याशीं त्यानें पत्रव्यवहारहि केला नव्हता ! किंबहुना त्या आठ नऊ वर्षांत त्याला पंतांचें जवळ जवळ विस्मरणच झालें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं ! परंतु वकिलीच्या परिक्षेंत दोन वेळां अपयश आल्यामुळें त्याला फार निराशा वाटूं लागली व तशा स्थितींत पंतांची आठवण होऊन परिक्षेकरितां मुंबईस जातांना तो बेळगावास उतरला आणि तसाच पंतांच्या घरीं गेला. त्यावेळीं पंत पूजेला बसले होते. काकानें त्यांना पाहतांच सांष्टांग नमस्कार घातला व आपली सर्व हकीगत सांगितली. तेव्हां

पंतांनीं त्याला धीर देऊन " या वर्षी तूं परीक्षा पास होतोस जा " असा आशिर्वाद दिला. त्यामुळें त्याला मोठी उमेद वाटूं लागली व तो परिक्षेकरितां मुंबईस गेला. त्याच वर्षी त्याच्याबरोबर धारवाड येथील त्याचे सहाध्यायी वासुदेव विनायक अभ्यंकर व इतर पाच सहा विद्यार्थी वकिलीच्या परीक्षेकरितां मुंबईस गेले होते; ते सर्व एकाच खोलींत राहात असत. ज्या दिवशीं परीक्षा सुरू व्हावयाची त्याच्या आदल्या दिवशीं रात्रीं नऊ वाजतां काकाचे दात दुखूं लागून भयंकर वेदना सुरू झाल्या, ताप भरला आणि पहाटेपर्यंत मानेवर व तोंडावर इतकी सूज आली कीं त्याला डोळ्यांनीं जवळ जवळ दिसेनासें झालें. तेव्हां वासुदेवराव अभ्यंकरांनीं त्याला एका डॉक्टरकडे नेलें. डॉक्टरनें सकाळीं आठ वाजतां त्याच्या तोंडांत शस्त्रक्रिया केल्यामुळें सुमारें दोन भांडीं काळें रक्त गेलें व त्याला भोंवळ आली; पण अर्ध्या तासानें तो शुद्धीवर आला व सुमारें साडेनऊ वाजतां तोंडावरची सूज थोडी कमी होऊन थोडथोडें दिसूं लागलें. दहा वाजतां तो तसाच टाऊन हॉलमध्यें परिक्षेकरितां गेला व त्यानें त्या दिवशीं कसेबसे पेपर लिहिले. दुसऱ्या दिवशीं त्याला थोडा आराम पडला. तिसऱ्या दिवशीं वकिलीच्या परीक्षे-तील शेवटचा विषय इक्विटी हा होता. प्रश्नांचा कागद हातीं येतांच काकानें सर्व प्रश्न वाचून पाहिले तों त्याला एकाहि प्रश्नाचा अर्थ समजेना व पुष्कळ प्रयत्न करूनहि कांहींच लिहितां येईना. अशा तऱ्हेनें दोन तास फुकट गेले. तेव्हां आपल्या बाजूच्या एक दोन इसमांप्रमाणें प्रश्नांच्या उत्तरांचा कागद न देतांच आपणहि निघून जावें असें त्याला वाटूं लागलें. पण तो उठणार इतक्यांत सुपरवायझर त्याच्या समोरच आले. त्यामुळें प्रश्नांचीं उत्तरें दिल्याशिवाय उठून जाण्याची लाज वाटून तो खालीं बसला व 'पुन्हां एकदां प्रश्नांच्या कागदाकडे पाहूं या' असें वाटून तो एकेक प्रश्न वाचूं लागला. तों सर्वच प्रश्न आपल्याला येताहेत असें त्याला वाटूं लागलें ! तेव्हां पुढें काय प्रकार झाला तो काकांच्याच शब्दांत सांगणें बरें. ते म्हणतात, " उत्तरांचा कागद देण्यास फक्त एकच तास उरला होता. तेव्हां, 'श्रीपंत काय करतात तें करूं देत,' असें म्हणून लिहूं लागलों. साधारण पंधरा वीस कागद लिहिले. मीं काय लिहिलें हें त्या वेळीं मला कांहीं आठवत नव्हतें. पुढें घंटा होणेच्या आंत उत्तरांचे कागद सुपर-वायझर जवळ देऊन मी बाहेर निघून आलों. " याप्रमाणें काकाची परीक्षा संपली व त्या वर्षी त्या परिक्षेंत तो उत्तीर्ण झाला ! ! त्याच सालीं वासुदेव विनायक अभ्यंकर हेहि वकि-लीची परीक्षा पास झाले व त्या दोघांनीं धारवाड येथें भागीदारीत वकिलीचा धंदा सुरू केला. काका हे फौजदारी काम चालविण्यांत फार हुषार होते, त्यामुळें ते साधारणपणें तें काम करीत व वासुदेवराव अभ्यंकर हे विशेषेंकरून दिवाणी दावे चालवीत.

## श्रीसिद्धारूढस्वामींची पुनः भेट

वकिली करूं लागल्यापासून काका धारवाड येथें स्वतंत्र बिऱ्हाड करून राहूं लागले व त्यांना पैसाहि मिळूं लागला. तेव्हां पंतांनीं एकदां आपल्या घरीं यावें असें वाटून

त्याप्रमाणें त्यांनीं पंतांना लिहिलें व धारवाडास गेल्यास हुबळीस श्रीसिद्धारूढांच्या भेटीचाहि योग येईल असा विचार करून पंतांनीं तिकडे जाण्याचें कबूल केलें.

पंत कोठेंहि जावयाचे म्हणजे त्यांचेबरोबर १५–२० मंडळी असावयाचीच. त्याप्रमाणें गणूअण्णा मारीहाळकर, पुटप्पा कणबर्गी, मुतालिक, पंतबंधु गोविंदरावजी, अप्पासाहेब सुळेभावीकर, बळवंतराव मंडवळी कोल्हापूरकर वगैरे मंडळींसह १८९५ च्या उन्हाळ्याच्या सुट्टींत पंत धारवाडास काका घाणेकरांकडे गेले. तेथें आठ दहा दिवस त्यांचा मुक्काम होता. त्यानंतर बरोबरची मंडळी व काका यांचेसह ते हुबळीस श्रीसिद्धारूढांकडे गेले. १८८५ सालीं त्यांची व स्वामींची भेट होऊन चांगला परिचय झाला होता. त्यामुळें या खेपेला पंत येत असल्याचें समजतांच सामोरे येऊन स्वामींनीं त्यांचें स्वागत केलें आणि पंत व त्यांच्या बरोबरची मंडळी यांच्या निजण्याबसण्याची सोय आपल्या बसण्याच्या जागेजवळच असलेल्या खोलींत केली. दहा वर्षांनीं पंत त्यांच्या भेटीला गेल्यामुळें स्वामींना फार आनंद झाला व त्यांनीं पंत व त्यांच्या बरोबरची मंडळी यांची उत्तम व्यवस्था ठेविली होती. स्वामींच्या पुढें पेढे, वर्फी, केळीं वगैरे खाण्याचे जिन्नस पुष्कळ येऊन पडत. त्यांपैकीं कांहीं ते पंतांच्या बरोबरच्या मंडळीकडे पाठवून देत व आपणहि फुरसुदीप्रमाणें पंतांच्या खोलींत जाऊन बसत. तेथें त्यांचें पंतांशीं अध्यात्मविषयासंबंधीं संभाषण होत असे. दुपारच्या वेळीं स्वामींचा पुराण सांगणें वगैरे प्रकारचा कार्यक्रम चालू असतांना पंतांच्या बरोबरची मंडळी विहिरींचें पाणी काढून बगीचाला घालीत असत. आपला कार्यक्रम संपल्यावर स्वामी बगीचांत जात. ते तेथें गेले म्हणजे पंत व त्यांच्या बरोबरची मंडळी हे बगीचांतील मोकळ्या जागेंत टिपरी खेळून भजन करीत आणि स्वामी मोठ्या प्रेमानें व कौतुकानें तो खेळ पहात बसत.

या खेपेला श्रीसिद्धारूढस्वामींच्या मठांत पंतांचा मुक्काम सुमारें पाच सहा दिवस होता. हुबळीहून पंत पुनः धारवाडास गेले व तेथून काका घाणेकरांच्या मूळ गावीं म्हणजे कलघुटगी तालुक्यांतील मिश्रीकोट येथें दोन तीन दिवस राहून ते धारवाडास आले व धारवाडहून बेळगावास परत गेले. धारवाडहून निघतांना पंतांनीं काकांना आपला ओव्हरकोट दिला. याप्रमाणें पंत कोणाला काठी, कोणाला सदरा, कोणाला डोकीचा रुमाल अशा जिनसा देत असत.

पंत आपल्या शिष्यमंडळीसह फिरतीवर गेले म्हणजे त्यांची बोधवृष्टि, भजन, थट्टामस्करी वगैरे प्रकार नेहमीं चालत व बरोबरच्या मंडळीला तो एक उत्सवप्रसंगच वाटे. या खेपेला श्रीसिद्धारूढस्वामींच्या संगतींत पाच सहा दिवस काढण्यास मिळाल्यामुळें पंतांना स्वतःला फार समाधान झालें. १३–९—१८९५ रोजीं अण्णांना लिहिलेल्या (न-छापलेल्या) पत्रांत पंत लिहितात, "सुटीमध्यें श्रीआरूढांकडे मी, गणू, पुटप्पा, मुतालिक, गोविंदा, सुळीभावीकर, मंडवळी इत्यादि गेलों होतों. सहा दिवस मुक्काम होते. परमानंदांत काळ गेला. उजळणी झाली. रावजी व तूं दोघांची आठवण होत असे. उपाय नाहीं."

## गोकुळाष्टमीच्या उत्सवास सुरवात

शके १८०७ ( सन १८८५ ) पासून पंतांचे घरीं दर वर्षी गुरुद्वादशी, दत्तजयंती व गुरुप्रतिपदा या तीन तिथींचे उत्सव होत असत आणि अकोळ, कोल्हापूर वगैरे ठिकाणचीं त्यांची शिष्यमंडळी आपापल्या गावीं गोकुळाष्टमीचा उत्सव करीत. पण प्रत्यक्ष पंतांच्या घरीं गोकुळाष्टमीचा उत्सव होत नसे. गोकुळाष्टमी म्हणजे भगवान श्रीकृष्णाचा जन्मदिवस. सद्‌गुरु बालमुकुंदांचा व पंतांचा जन्मदिवसहि तोच ! तेव्हां आपल्या घरीं गोकुळाष्टमीचा उत्सव सुरू करावा असे पंतांच्या घरांतील मंडळींना वाटूं लागलें. त्यांनीं ती गोष्ट पंतांच्या कानावर घातली व त्यांना ती पटून त्यांनीं १८९५ सालीं श्रावण वद्य ८ शके १८१७ रोजीं आपल्या घरीं मोठ्या प्रमाणावर उत्सव केला. उत्सवाला भक्तमंडळी पुष्कळ जमली होती व भजन–पूजन, टिपरी खेळणें वगैरे कार्यक्रम मोठ्या उत्साहानें झाले. दिवसेदिवस पंतांच्या ठिकाणची भजनस्फूर्ति अधिकाधिक जोरावत होती. उत्सवप्रसंग म्हणजे स्फूर्तिगंगेच्या भरतीचा समयच तो ! त्यामुळें या गोकुळष्टमीच्या उत्सवांत पंतांनीं भजनरंगांत पुढील नवीन पदें म्हणून या उत्सवाचें रहस्य काय तें सांगितलें. " गोकुळाष्टमी आजी केली । स्वस्वरूपीं वृत्ति ही निमली ॥ धृ. ॥ अष्टधा प्रकृति सारुनी मागें । तुर्यस्थिति साधिली ॥ १ ॥ शब्दखंडण करुनी सहज । उन्मनी भोगिली ॥ २ ॥ सोडिलें पारणें दत्तभजनीं । मुक्ति सती वरिली ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. १०७१) " अष्टधा प्रकृति सांडूनी आजी गोकुळाष्टमी केली । सद्‌गुरु कृष्ण नयनीं देखुनी स्वरूपीं बुडी दिधली॥धृ.॥ सहा अठरांची भीड टाकुनी चौघांसी भुली । वाचामनासी मागें सारुनी बुद्धिहि गिळिली ॥ १ ॥ एकादशांनी उपवास घडला अहंकृति निमली । सद्‌गुरुकृपें तुर्य भोगितां उन्मनी प्रगटली ॥ २ ॥ विश्वगोकुळ आत्माकृष्ण व्यवहारपूजा केली । नष्टचि झालें शब्दराक्षस पूतनाभ्रांति आपणचि मेली ॥ ३ ॥ अवधूतपदीं पारणें फेडुनी धन्यता वरिली, ब्रह्मविद न ब्रम्हचि सहज दत्त कमलआलि ॥ ४ ॥ " ( द. प्रे. ल. १०७२ ) याप्रमाणें पंतांनीं आपल्या घरीं गोकुळाष्टमीचा उत्सव सुरू केला खरा; पण विश्वरूपी गोकुळांत आत्मारूपी कृष्णाची व्यवहाररूपी पूजा ज्यांत नित्य चालली आहे असा पंतांचा उत्सव अखंड चालला होता हें सांगणें नकोच. १८९५ सालीं पंतांच्या घरीं गोकुळ-अष्टमीचा उत्सव जो सुरू झाला तो त्यांच्या घराण्यांत अद्यापहि प्रतिवर्षी होत असतो.

दिवसेदिवस पंतांची स्थिति अधिकाधिक प्रेमळ व बोधरूप होत चालली आणि " शिवोभूत्वा शिवं भजेत् " हा अभेद भक्तीचा अनुभव त्यांचे ठिकाणीं अधिकाधिक दृढावत चालला. शके १८१७ अश्विन वद्य १२ ( १५--१०–१८९५ ) रोजीं गुरुद्वादशीचा उत्सव होता. त्या दिवशीं पुढील नवीन पद झालें. " उत्सव सद्‌गुरूचा । प्रेमोद्गार सच्चिदघ्याचा ॥ धृ. ॥ स्थूल सूक्ष्म कारण निमलें । अनुभव तुर्येचा ॥ १ ॥ स्वानंदामृत पान करूनी । ढेंकर गुरुभजनाचा ॥ २ ॥ ब्रह्म होऊनी ब्रह्म भजणें । खेळ दत्तगुरूचा ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ११२६ )

## मौनी बंगाली स्वामी

हा उत्सव संपल्यावर थोड्या दिवसांनीं एक बंगाली स्वामी पंतांकडे आले. ते दिगंबर स्थितींत असून कांहींहि बोलत नसत; पण त्यांना दोन तीन भाषा चांगल्या अवगत होत्या. त्यांना इंग्रजी भाषेचें ज्ञान चांगलें असल्यामुळें ते विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें इंग्रजींत लिहून दाखवीत. त्यामुळें पंतांना व त्यांना परस्परांबद्दल फार आदर वाटूं लागला आणि पंतांनीं त्यांना कांहीं दिवस आपल्याकडे ठेवून घेतलें. ते स्वामी फार अधिकारी होते व त्यांच्या रूपानें श्रीनृसिंहसरस्वती अथवा श्रीबालावधूतच आले आहेत असें पंतांना वाटूं लागलें. एके दिवशीं पंत भजन करीत बसले असतां स्वामी तें ऐकत बसले होते व त्यांना तें ऐकून फार समाधान झालें. तें पाहून " तूं बसल्या ठिकाणीं सत्पुरुषाची भेट होऊन खूण मिळते पहा " या बाळप्पांच्या वचनाची आठवण होऊन पंतांचा कंठ दाटून आला व त्यांनीं पुढील सात पदें म्हणून स्वामींचा गौरव केला. " प्रेमळ पुरुष आजी भेटला । द्वैताद्वैत भाव निमाला ॥ धृ० ॥ माता पिता हा बंधु बहीण हा । जिवलग मित्र आजि देखियला ॥ १ ॥ सगुण निर्गुण हा आत्मानात्म हा । अवस्थातीत तुर्य गमला ॥ २ ॥ ब्रम्हानंदस्वामी दत्तस्वरूप । अनुपम पूर सहज लोटला ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ११४१ ); " स्वामी गृहाप्रति आले । भलें प्रेम उदेलें ॥ धृ० ॥ अहंभाव ओवाळुनियां । पदीं मस्तक ठेवियेलें ॥ १ ॥ स्वामी तो मीची मीचि स्वमी । ऐक्य हें गुप्त ठेलें ॥ २ ॥ दत्तावधूत ब्रम्हानंदें । नित्य भजनीं खेळे ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ११४२ ); " बालावधूत आजि देखियला । शांतीसीहि गहिवर आला ॥ धृ० ॥ " ( द. प्रे. ल. ११४३ ); " नरसिंहसरस्वती आजि देखियला । परमहंस हृदयीं आजि प्रगटला ॥ धृ० ॥ बालावधूत दिगंबर गुरु । शिष्यरूपें तोचि नटला ॥ १ ॥ " ( द. प्रे. ल. ११४४ ); " संन्यास गुरूनें मज दिधला । द्वैतभाव समूळ मावळला ॥ धृ० ॥ निजरंगें रंगीत भगवी । आश्रमबाध सगळा बुडला ॥ १ ॥ " ( द. प्रे. ल. ११४५ ); " दत्ता कां रुसवा मजवरी ॥ धृ० ॥ × × × नरसिंहसरस्वती प्रेमळ माझा । दत्त शिरावरी ॥ ३ ॥ " ( द.- प्रे. ल. ११४६ ); " मुळींच मी नाहीं । सर्वहि सद्गुरु पाहीं ॥ धृ० ॥ जड चैतन्य मुळींचि नसती । सर्व ब्रम्ह पाहीं ॥ १ ॥ ( द. प्रे. ल. ११४७ ).

## वाडी-कुरुंदवाड-बेडकिहाळ-अकोळकडील खेप

कुरुंदवाडास येण्याबद्दल रावजींनीं फार आग्रह केल्यामुळें १८९५ च्या नाताळाच्या सुटींत दहा बारा मंडळीसह पंत नरसोबाच्या वाडीस गेले व तेथें श्रींच्या पादुकांचें दर्शन घेऊन कुरुंदवाडास गेले. तेथें रावजी वकिली करीत होते व विष्णूचे देवळाचे पिछाडीस असलेल्या लेले यांचे घरीं राहात असत. तेथें पंतांचा मुक्काम होता. त्या वेळीं रावजींच्या घरांत बायकामाणसें नसल्यामुळें स्वयंपाक करण्याचें काम अण्णांकडे असे व भिमाजी सदाशिव कुलकर्णी, पुटप्पा कणबर्गीकर वगैरे मंडळी त्या कामां त्यांना साह्य करीत असत. पंतांचा मुक्काम कुरुंदवाडास असतांना कोल्हापूर, बेडकिहाळ, अकोळ वगैरे

ठिकाणांहून बरीच शिष्यमंडळी कुरुंदवाडास गेली होती. तेथें रोज सकाळीं पंत मंडळीसह कृष्णानदीवर स्नानास जात असत व तेथें थट्टामस्करी करणें, जलक्रीडा करणें, खेळ खेळणें वगैरे प्रकार चालत; अशा वेळीं पंतांचें बोध सांगणें चालूच असे. तसेंच कुरुंदवाड येथील भक्तमंडळी पंतांना मंडळीसह आपल्या घरीं भोजनास अगर पानसुपारीस बोलावीत असत.

या खेपेला पंत कुरुंदवाड येथें असतांना विष्णुपंत माणगावकर नावाच्या एका फोटोग्राफरनें श्रीमंत कुरुंदवाडकरांच्या मळ्यांत पंतांचे एकट्यांचे कांहीं व कांहीं त्यांचे इतर मंडळीसह असे सहा फोटो काढले. त्यांपैकीं अंगावर उपरणें व हातांत काठी घेऊन पंत बसले असतांना घेतलेला त्यांचा फोटो श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथील पंतांच्या पादुकांच्या मागें ठेविलेला असून तसाच फोटो पुष्कळ भक्तमंडळींकडे पूजेस ठेविलेला आढळतो आणि या ग्रंथाच्या सुरवातीलाहि तोच फोटो दिलेला आहे. तसेंच पंतांचा एक कफनी घातलेलाहि फोटो याच वेळीं काढला होता; आणखी एका फोटोंत मध्यें पंत उघडे बसलेले असून एके बाजूस अण्णा व दुसरे बाजूस रावजी हे आहेत.

## सौ. हरिणाबाईची ब्रह्मसमंधाची बाधा दूर केली !

कुरुंदवाड येथें तीन चार दिवस राहून पंत मंडळीसह बेडकिहाळ येथें त्यांचे शिष्य रामचंद्र खंडो कुळकर्णी यांचे आग्रहावरून त्यांचेकडे गेले. रामभाऊंचे घरीं पंत जातांच तेथें असा चमत्कार झाला कीं रामभाऊंची बहीण सौ. हरिणाबाई ही घरांत मोठमोठ्यानें ओरडूं लागली. सौ. हरिणाबाईला करवीर इलाख्यापैकीं पेटा भुदरगड, कसबा तारळे गावचे विष्णुपंत जोशी यांस दिली होती. तिच्या सासरच्या घराण्यांत कित्येक वर्षें एका ब्रह्मसमंधाची बाधा होत असे. तो समंध सौ. हरिणाबाईच्या अंगांत येऊं लागला व ती गरोदर राहिली म्हणजे सतत तिच्या अंगांत येई आणि ती बाळंत होऊन मूल गेलें म्हणजे येण्याचा बंद होई. अशा तऱ्हेनें तिचीं चार मुलें गेलीं. पुष्कळ नवस केले, देव खेळविले तरी कांहीं उपाय चालेना! रामभाऊंच्या घरीं पंत जातांच जेव्हां सौ. हरिणाबाई मोठमोठ्यानें ओरडूं लागली, तेव्हां हा काय प्रकार आहे म्हणून त्यांनीं चवकशी केली व रामभाऊंनीं त्यांना सर्व हकीकत सांगितली. लगेच पंतांनीं तिला बाहेर आणण्यास सांगितलें. तिला बाहेर आणिल्यावर, "तूं कोण आहेस?" म्हणून पंतांनीं विचारतांच तिच्या अंगांतील समंधानें आपला वृत्तांत सांगितला व "मला चरणतीर्थ द्या म्हणजे मी पावन होऊन जातों," असें तो म्हणाला. त्याप्रमाणें सौ. हरिणाबाईच्या तोंडांत तीर्थ घालतांच ती मोकळी झाली! तेव्हांपासून तिला त्या समंधाची बाधा झाली नाहीं व पुढें बरींच मुलें होऊन ती सुखानें नांदूं लागली. याप्रमाणें सौ. हरिणाबाईला त्या समंधानें सोडिली इतकेंच नव्हे, तर त्यानंतर तिच्या घराण्यांत कोणालाहि त्याची पीडा झाली नाहीं.

## २३१

## प्रेमकल्लोळ !

बेडकिहाळ येथें पंतांचा मुक्काम दोन तीन दिवस होता. तेथेंहि भजन, टिपरी, खेळ, बोध सांगणें वगैरे प्रकार चालत व तेथील भक्तमंडळींकडे पानसुपाऱ्याहि झाल्या. बेडकिहाळहून मंडळीसह पंत अकोळास गेले. तेथें दोन तीन दिवस राहून पुनः बेडकिहाळास व तेथून पुनः कुरुंवाडास गेले व तेथें एक दोन दिवस राहून आगगाडीनें बेळगावास गेले.

पंतांचा हा दौरा फार प्रेमानंदांत गेला. कुरुंदवाड येथें रावजी, बेडकिहाळ येथें रामभाऊ कुळकर्णी व अकोळ येथें अण्णा ही मंडळी त्यांच्या अत्यंत प्रीतींतील होती व त्या त्या गावांतील इतर भक्तमंडळीहि दृढनिश्चयी व एकदिलाची होती. तसेंच पंतांच्या बरोबर दहा बारा मंडळी होतीच व नवीन शिष्यहि पुष्कळ झाले. त्यामुळें १८९५ च्या नाताळची सुटी सुरू होतांच ते बेळगावाहून निघाल्यापासून जानेवारी १८९६ मध्यें परत बेळगावास जाईपर्यंत भक्तिप्रेमाचा मोठाच रमणा झाला. या सुमारें १५–२० दिवसांत भजनाचे वेळीं झालेलीं सुमारें ४० नवीन पदें 'श्रीदत्तप्रेमलहरी' मध्यें पद ११६३ पासून पद १२०२ पर्यंत छापिलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं पदांवरून भक्तमंडळीकडे पंत कोणत्या दृष्टीनें पाहात असत व भक्तमंडळीशीं त्यांचें वागणें किती सलगीचें असे तें दिसून येतें. पद ११६८ मध्यें पंत म्हणतात " स्वस्थानीं जातों मी। लोभ असों द्यावा ॥ धृ० ॥ स्वात्मभजनीं खेळुनियां। दावा प्रेमभावा ॥ १ ॥ कृपा करूनी दीन बाळ हा। चरणीं सतत ठेवा ॥२॥ तुम्ही संत दयावंत। प्रेमें दत्त निरवा ॥३॥ " हें पद कुरुंदवाड अगर बेडकिहाळहून निघतांना झालेलें आहे. त्याच्या अखेरच्या चरणांत 'तुम्ही संत दयावंत' अशा प्रकारें अत्यंत सलगीनें भक्तमंडळीस संबोधून पंतांनीं त्यांची ज्या प्रेमानें करुणा भाकिली तें अवर्णनीय होय! तसेंच पंतांची कृपादृष्टि सर्व भक्तमंडळींवर सारखीच होती आणि भोळया, भाविक व एकनिष्ठ भक्तांवर त्यांचें विशेष प्रेम असे. त्यामुळें असे भक्त पंतांच्या जवळ असतां ते निःशंकपणें भक्तिप्रेमांत रंगून जात व हा अनुभव पंतांनीं पद ११७५ मध्यें " मौज पहा ही सद्गुरुघरची। मूढहि सहज प्रेमें नाची ॥ धृ० ॥ " या शब्दांनीं व्यक्त केला आहे.

या दौऱ्यांत पंत अकोळ येथें असतांना जीं पदें झालीं त्यांवरून तेथील भक्तमंडळींवर त्यांचें किती अलोट प्रेम होतें याची साक्ष पटते. या गुरुभक्तांधील जिव्हाळा काय स्वरूपाचा होता हें तेथील भक्तमंडळींचा निरोप घेतांना पंतांनीं जें पुढील पद म्हटलें त्यावरून सहज समजून येईल. " झाली आमुची फेरी। आतां जातों माघारीं ॥ ॥ धृ० ॥ प्रेमळ संतीं सांभाळ केला। काय वर्णूं थोरी ॥ १ ॥ पूर्ण लोभ हा तुमचा असूं दे। या बाळावरी ॥ २ ॥ देह राही तरी येउनी भेटूं। दावूं प्रेमलहरी ॥३॥ कृपा करूनि निरोप द्यावा। दत्ता नरहरी ॥ ४ ॥ " ( द. प्रे. ल. ११७९ )

अनन्य भक्तांबद्दल पंतांना किती आदर वाटत असे व त्यांना ते किती श्रेष्ठ मानीत

तें पद ११८० वरून स्पष्ट होत आहे. त्या पदांत ते म्हणतात, " सतत मी संतांचे । वाहीन मस्तकीं मोचे ।। धृ० ।। नलगे मुक्ति नलगे भुक्ति । ज्ञानवैभव कैंचें ।। १ ।। संत-द्वारींचा श्वान मी पाहीं । आणिक मज न रुचे ।। २ ।। दत्त चरणीं लोळतो सदा । भजनीं प्रेम साचे ।। ३ ।। " पद ११८२ मध्यें पंतांनीं आपल्या उर्वरित आयुष्यांतील कर्तव्य काय तें दिग्दर्शित करून आपल्या जीविताचें रहस्यच सांगितलें आहे. " सद्-गुरुभजनीं देह झिजवुनी । आयुष्य हें सारूं ।। धृ० ।। सद्गुरुकृपें तरुनी आम्ही । जनांसी तारूं ।। १ ।। अवधूतमार्ग प्रगट करूनी । संशय हे वारूं ।। २ ।। हातोहातीं देउनी मुक्ति । दत्तभजन करूं ।। ३ ।। " व पद ११८३ मध्यें भक्तरूपी संतमंडळीला त्यांनीं पुढीलप्रमाणें पुनः विनविलें आहे. " माय बाप तुम्ही संत माझे । लोभ पूर्ण ठेवा ।। धृ० ।। प्रेमळ माय तुम्ही बाळ मी । घ्यावी चरणसेवा ।। १ ।। कृपा करूनी दर्शन देतां । खाऊं प्रेममेवा ।। २ ।। दीन दत्त हा विनवितो तुम्हां । सतत चरणीं ठेवा ।। ३ ।। "

बेळगावास परत आल्यानंतर कुरुंदवाड, बेडकिहाळ, अकोळकडील आपल्या या फेरीचें रहस्य पंतांनीं पद ११९९ मध्यें पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे. "पहा ही फेरी गुरूची जाहली ।। धृ. ।। असंख्य जनां भक्ति देऊनी । निजधामा आली ।। १ ।। धर्मसंस्थापना ब्रीद त्याचें । गोष्ट अनुभवा आली ।। २ ।। बहुत मजेचा अवधूतमार्ग । दत्ता प्रेमभुली ।। ३ ।। " पंतांची ही खेप फारच चिरस्मरणीय झाली. कुरुंदवाडाहून परत आल्यावर सुमारें नऊ महिन्यांनीं, ३–९–१८९६ रोजीं, रामभाऊ बेडकिहाळकरांना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंत लिहितात, " वरचेवर बेडकिहाळांत सहजानंदांत काळ घालवि-ल्याची व तेथील मंडळींच्या अनिमित्त बांधव्याची आठवण होते. तेथील एकंदर लहान थोर मंडळीस माझा शिरसाष्टांग नमस्कार प्रविष्ट करणें. चि. सौ. हरिणाबाई, रा. आबा, व्यंकू आदिकरून स्नेही मंडळीस आशिर्वाद. समर्थस्मरणीं निश्चिंत असावें. "

# प्रकरण ३३ वें

---:o:---

## बेळगावांत प्लेग; दड्डी व अकोळ येथील मुक्काम; अकोळ येथील खेळ व प्रेममौजा.

---:o:---

### प्लेगमुळें झालेली दाणादाण व दड्डीस मुक्काम

१८९६ सालीं प्लेगचा आजार प्रथम मुंबईस सुरू झाला व त्यानंतर लौकरच तो सर्वत्र पसरूं लागला. बेळगाव जिल्ह्यांत प्लेगचा शिरकाव १८९७ सालीं होऊन त्या सालच्या अखेर त्यानें बेळगाव शहरांत कहर उडवून दिला व सर्व लोकांची दाणादाण झाली. त्यापूर्वी या रोगासंबंधीं फारशी कोणाला माहिती नसल्यामुळें तन्निवारणार्थ काय काय उपाय योजावे यासंबंधीं लोकांमध्यें पूर्ण अज्ञान होतें. त्यामुळें लोक फार घावरून गेले व ज्यांना परगावीं जाऊन राहण्याची सोय होती किंवा तसें करणें शक्य होतें ते परगावीं जाऊन राहिले. त्यावेळीं पंतांचें बिऱ्हाड मारुती गल्लींत नाटेकर यांचे घरीं होतें व त्यांच्या घरांत माणसेंहि पुष्कळ होतीं. शके १८१९ मार्गशीर्ष शुद्ध १५ (९-१२-१८९७) रोजीं पंतांच्या घरीं श्रीदत्तजयंतीचा उत्सव मोठ्या थाटाचा झाला. भक्तमंडळी पुष्कळ जमली होती व त्या दिवशीं भजनरंगांत पंतांनीं सुमारें दहा नवीन पदें म्हटलीं. पण हा उत्सव झाल्यानंतर लौकरच प्लेगचा आजार फार जोरावला, प्लेगप्रतिबंधक उपायांची कडक रीतीनें अंमलबजावणी होऊं लागली व शाळा, कचेऱ्याहि बंद झाल्या. तेव्हां पंत दहा पंधरा मंडळीसह दड्डी येथें श्रीपादपंत मामा कुळकर्णी यांचेकडे जाऊन राहिले. २७-१२-१८९७ रोजीं केशवराव चिकालगुडकर यांना लिहिलेल्या (न छापलेल्या) पत्रांत पंत लिहितात, " दड्डीस येऊन ८-१० दिवस झाले. ××× गोपाळ, वामन ५-६ दिवसांत येणार आहेत. ते आल्यानंतर चिकालगुडास येण्याचा मनोदय आहे. "

बेळगावांत असतांना पंतांचें घर नेहमीं गजबजलेलें असे. घरांत शाळेस जाणारे १०-१२ विद्यार्थी असत. वामनराव वकिली करीत असल्यामुळें त्यांचेकडे पक्षकारांचें येणें जाणें असे. त्याचप्रमाणें भक्त, मुमुक्षु, विद्वान वगैरे मंडळींची पंतांकडे सारखी ये-जा सुरू असे व भजन, टिपरी, खेळ वगैरे प्रकारहि नेहमीं चालत असत. त्यामुळें अशा अनपेक्षित रीतीनें आपलें सदा गजबजलेलें स्थान सोडून कांहीं मंडळीसह दड्डीस जाऊन राहावें लागलें व घरांतील मंडळींची पांगापांग झाली याबद्दल पंतांना फार वाईट वाटत होतें. १५-१-१८९८ रोजीं रावजींना दड्डीहून लिहिलेल्या (न छापलेल्या) पत्रांत पुढील

मजकूर आहे " मी, बावा सेनापति, विष्णु दिवाण हे दड्डीस आहोंत. पुटप्पा कणबर्गीस गेला. गोविंदा बाळेकुंद्रीस, वामन जाऊन येऊन अलतगेस, शंकर व नरसू अलतगेस, मुतालीक सध्यां हुकेरीस, दोन चार दिवसांत अलतगेस जाईल, अण्णा अकोळास. xxx समर्थकृपेनें सर्व मंडळी बेळगावास जमून पूर्वीप्रमाणें गोकुळानंदांत रमण्याचा दिवस येईलच." त्याच दिवशीं अण्णांना लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात " बेळगाव सोडून आल्यापासून वृत्तीला समाधानी नाहीं. माझी मंडळी चोहोंकडे पसरल्यामुळें वृत्तीला जिकडून तिकडून ओढ सदा लागून राहिली आहे. समर्थकृपेनें सर्वत्र मंडळी बेळगाव मुक्कामी कधी एकत्र जमून गोकुळानंदांत काढूं तो सुदीन ! सध्यां माझी स्थिति अगदीं उदास असून कोठेंच बाह्यात्कारीं रमेनाशी झाली आहे. वृत्ति केव्हांहि स्वरूपविचारांत निमग्न होऊन राहाते. तूष्णीं स्थितिच तिला जास्त आवडूं लागली आहे. पुस्तकें वाचवत नाहींत, चर्चा करवत नाहीं. गुहांतरवास श्रेयस्कर वाटतो. अशा प्रकारचे उद्गार तुम्हां लोकांकडून पत्रीं मजकडे येत असत. आतां पाहा. वरील प्रकारचे उद्गार मुळांतूनच निघून तुझ्याकडे येताहेत. याचें पर्यवसान निजशांति, पूर्ण विरति, उपरति, बोधसमाप्ति, स्वरूपस्थिति वैय्याकरण स्थितीचा समाप्ति, लीलेचा शेवट, आत्मपिसेपणा इत्यादि मौनदर्शक तूष्णीभावामध्येंच होणार हें जाणूनच आहें. लोभ पूर्ण आहेच. सर्वांस स्मरण द्यावें." (पु. ५-३६)

## अकोळ येथें मुक्काम

पंत दड्डीस राहात असतां त्यांचे बंधु गोपाळराव यांचा लहान मुलगा फार आजारी होता. त्यामुळें गोपाळरावांचें कुटुंब तेथेंच होतें व त्यांची तब्बेतहि बरी नव्हती. या खेपेला दड्डी येथें पंतांचा मुक्काम सुमारें दोन महिने होता. त्या दरम्यान गोपाळरावजींचा मुलगा वारला व त्याच्या आईची प्रकृति जास्त बिघडत चालली. तेव्हां आपल्या बरोबरच्या मंडळींसह पंत अकोळ येथें राहाण्यास गेले व गोपाळरावजींच्या कुटुंबालाहि हवापालट व औषधोपचार करण्याकरितां अकोळास नेलें होतें. अकोळ येथें सर्व मंडळींसह पंतांचा मुक्काम अण्णांच्या घरीं होता. गोपाळरावजींच्या कुटुंबाला बरें वाटावें म्हणून गुरुचरित्राचे सप्ताह करणें वगैरे दैवी उपाय व लांबलांबच्या नामांकित वैद्यांना बोलावून त्यांचेकडून औषधोपचारहि चालले होते. गोपाळरावांचें कुटुंब तेथें आजारी असल्यामुळें ते स्वतःहि मधुन मधुन नोकरीवरून सवड मिळेल त्याप्रमाणें अकोळास जात असत.

या खेपेला पंतांचा मुक्काम जरी अण्णांच्या घरीं होता, तरी अकोळ गावांत त्यांचे पुष्कळ शिष्य असल्यामुळें त्यांना रोज कोठें ना कोठें तरी जेवणाचें अगर फराळाचें बोलावणें असे व जेथें पंत जातील तेथें त्यांच्याबरोबर ४०-५० तरी मंडळी असत. पंतांचा रोजचा कार्यक्रम म्हणजे सकाळीं अण्णांच्या घरीं चहा वगैरे झाल्यावर ते विष्णु हरि कुळकर्णी, भिमाजी सदाशिव कुळकर्णी अगर इतर कोणाकडे तरी दोन तीन तास बसावयास जात असत. कारण त्यावेळीं अण्णांकडे औषधाकरितां रोगी येत असल्यामुळें ते कामांत असत. दुपारचें जेवण झाल्यावर तास दोन तास विश्रांति घेऊन सुमारें पाच वाजतां पंत

गावाबाहेर मंडळीसह फिरावयास जात व सात आठ वाजतां परत येत आणि त्यानंतर कोठें भजनाचा कार्यक्रम असल्यास तेथें जात असत.

१८९८ पूर्वी अकोळ येथें पंतांच्या तीन चार खेपा झालेल्या असल्यामुळें व तेथें त्यांच्या शिष्यांची संख्याहि बरीच वाढल्यामुळें अकोळ गावांत त्यांची पुष्कळ माहिती झाली होती व भक्तमंडळांच्या घरांतील मुलांबाळांनाहि त्यांची चांगली ओळख झालेली होती. परंतु पूर्वीच्या प्रत्येक खेपेला चार पाच दिवसांपेक्षां अधिक त्यांचें अकोळांत राहाणें झालें नव्हतें. १८९८ च्या सुरवातीस जेव्हां बेळगावांत प्लेग झाल्यामुळें कांहीं दिवस राहाण्याकरितां पंत अकोळास येत आहेत ही बातमी अकोळांत समजली तेव्हां तेथील भक्तमंडळीला अत्यानंद होऊन ते त्यांची मार्गप्रतीक्षा करीत होते आणि पंतांच्या गाड्या अकोळच्या जवळ आल्याचें समजतांच कित्येकजण–त्यांमध्यें लहान लहान मुलेंहि होतीं–गावापासून मैल दोन मैल त्यांना सामोरे गेले होते. त्यांना पाहतांच सामोरे गेलेल्या बालगोपालांपैकीं कोणी त्यांच्या कडेवर, कोणी पाठीवर, कोणी पायांशीं असे बिलगून राहिले आणि त्यांच्या त्या अकृत्रिम प्रेमानें पंतांना जणूं भारून टाकलें होतें. पुढें होणाऱ्या प्रेमकल्लोळाचा हा पहिला हप्ताच जणूं त्यांच्या अनुभवास आणून दिला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या वेळेपासूनच हीं मुलें इतकीं वेडावलीं कीं पंतांचा अकोळांत मुक्काम असे-पर्यंत त्यांनीं शाळेला जवळ जवळ रामराम ठोकला. इतकेंच नव्हे तर त्यांच्या त्यांच्या घरांत नेहमीं होणारी त्यांची गडबडहि कमी झाली व त्यांचा बहुतेक वेळ पंत असतील तेथें जाऊं लागला. एक तर त्यांच्याशीं पंत फार प्रेमळपणानें वागत व ते जातील तेथें खाण्याचीहि चंगळ असे. खाण्याच्या वेळीं प्रथम मुलांनीं भरपूर खाल्लें कीं नाहीं इकडे पंतांचें लक्ष असे. मुलांनीं पुष्कळ खावें असें त्यांना वाटे. त्यामुळें ते मुलांना खाण्याचा फार आग्रह करीत. तसेंच पंतांच्या मंडळींत हास्यविनोद नेहमींच चालत असे. त्यामुळें मुलांना गंमत वाटून त्यांची करमणूकहि होत असे.

## संध्याकाळचा मोकळ्या हवेंत खेळण्याचा कार्यक्रम

पंतांना अकोळला येऊन एक दोन दिवस झाले नाहींत तोंच कोल्हापुराहून रामानंद उर्फ रामाबोवा, बळवंतराव मंडवळे वगैरे मंडळी आली, बेडकिहाळाहून रामभाऊ कुळकर्णी आले व आजूबाजूची पुष्कळ शिष्यमंडळी अकोळास जमूं लागली आणि परगावांहून तेथें आलेल्या मंडळींचा पुष्कळच भरणा झाला. पंतांची बैठक जरी अण्णांच्या घरीं असे, तरी त्यांचे बंधु गोपाळरावजी, बाबासाहेब सेनापति वगैरे तरुण मंडळींची बैठक जवळच असलेल्या विष्णु दिवाण याच्या घरीं असे व तेथें हास्यविनोद व थट्टामस्करी हीं चालत असत. दररोज दुपारीं पाच वाजतां गावाबाहेर फिरावयास जाण्याचा पंतांचा कार्यक्रम असल्यामुळें बाहेरगावांहून आलेली व गावांतील मंडळी मिळून सुमारें ५०–७५ मंडळी त्यांच्या बरोबर असत व सर्वजण कोठें तरी सोईस्कर जागा पाहून तेथें खोखो, आट्या-पाट्या वगैरे खेळहि खेळत. थोड्याच दिवसांत हा कार्यक्रम सर्वांना इतका प्रिय झाला कीं

त्यामध्यें अकोळ गावांतील लहान लहान मुलें व वृद्ध माणसेंहि भाग घेऊं लागलीं. वर लिहिलेल्या प्रकारच्या खेळांत सुरवातीला स्वतः पंतहि खेळत व थोड्या वेळानें आपण पाहात बसत. हे दोन तीन तास गावांतील लहान थोर मंडळींना मोठे आनंदाचे वाटत. कधीं कधीं पंत कोणातरी भक्ताच्या मळ्यांत मंडळीसह जात व तेथें थट्टामस्करी, भजन, बोध सांगणें वगैरे चालत असे. एके दिवशीं संध्याकाळीं यशवंत हरि कुळकर्णी यांच्या मळ्यांतील तंबाखूच्या शेतांत पंत मध्यभागीं बसले होते व समोर अर्धचंद्राकृति पुष्कळ मंडळी ऊस खात बसली होती. त्यावेळीं नुकताच चंद्रोदय होऊन स्वच्छ चांदणें पडलें होतें. तेव्हां "हें माझें स्वरूप पाहून घ्या" असें म्हणून पंतांनीं विष्णु दिवाण याला "गगनसरोवरीं कमल उगवलें। परब्रम्ह सुवासें परिपूर्ण भरलें ॥ ध्रु. ॥ सद्रूप मनोहर चैतन्यें रंगलें। चिदानंदरसें मार्दवा आलें॥ १ ॥ नित्य तंतूसी सहज लगटलें। परिपूर्ण अवकाशीं एकचि व्यापिलें ॥ २ ॥" (द. प्रे. ल. २११) हें पद म्हणण्यास सांगितलें. तें म्हणून झाल्यावर पंतांनीं त्याचें विवरण करण्यास सुरवात केली व 'सत्, चित्, आनंद, नित्य व परिपूर्ण या पाच लक्षणांनीं युक्त, एकपणेंविण एक विराजणारें, प्रेमानंदरसभरित असें बालावधूतरूपी कमल गगनसरोवरीं उगवल्यामुळें त्याच्या सुवासानें निर्गुण निराकार असें परब्रह्मस्वरूप पूर्णपणें दरवळून गेलें (सगुण सद्गुरूच्या बोधानें निर्गुण निराकार परब्रह्मस्वरूपाचें ज्ञान होतें) आणि त्या बालावधूतरूपी कमलाचा आमोद सेवन करण्याकरितां भक्तभ्रमर धावून आले. वास्तविक गगनसरोवरींचें कमल म्हणजे खपुष्प अथवा आकाशाचें फूल! तें कधीं कोणीं पाहिलें नाहीं व पाहणें शक्य नाहीं. कारण त्याचा अत्यंताभाव आहे. त्याप्रमाणें एकमेवाद्वितीय अशा परब्रह्माचे ठिकाणीं भेदप्रतीतीचा अत्यंताभाव असूनहि जो भेदाभास होतो तो प्रेमभोगार्थ होय; हा सर्व चिद्विलास आहे,' अशा अर्थाचें विवेचन केलें. सर्व मंडळी चित्रासारखी बसून तें ऐकत होती व त्यांत इतकी तल्लीन होऊन गेली होती कीं रात्रींचे दहा वाजण्याची वेळ आली तरी कोणीं हूं कीं चूं केलें नाहीं. पण जेव्हां रात्र फार झाली हें पंतांच्या लक्षांत आलें तेव्हां लगेच त्यांनीं तो बोधाचा ओघ आवरता घेतला व सर्व मंडळी गावांत परत गेली. कधीं कधीं रात्रीं चांदण्यांत गावाशेजारीं असलेल्या ओढ्याचे काठीं ही मंडळी जमत व ओढ्यामध्यें मनसोक्त जलक्रीडा करून नंतर फराळ होत असे आणि हे सर्व प्रकार चालत असतां पंतांचा बोधवर्षाव चालूच असे. अशा प्रसंगीं भक्तमंडळींपैकीं कोणाच्या कांहीं तक्रारी असल्यास पंत त्यांची चवकशी करून निकाल देत व जो अपराधी ठरेल त्याला शिक्षा होत असे. त्या शिक्षा म्हणजे उठाबशा काढणें, गार पाण्याच्या घागरी डोक्यावर ओतणें वगैरे प्रकारच्या असत. अशा रीतीनें पंतांनीं कित्येकांचीं आपसांतील खाजगी भांडणें मिटविलीं. त्यांनीं दिलेला निकाल उभय पक्षहि मानीत. पंत फिरावयास गेले असतां त्यांच्याकडे येणाऱ्या तक्रारी मुख्यतः भक्तमंडळींच्या वर्तनासंबंधींच्या असत; त्यामुळें त्यांचे संबंधीं होणारी चवकशी व पंतांनीं दिलेला निकाल हीं ऐकणें सर्वांना बोधप्रद होत असे.

## २३७

## " आधीं गुंतूं नये मग कुंथूं नये । "

एकदां असें झालें कीं पंतांचा मुक्काम अकोळास असतांना तेथें एक नावाजलेला तमाशा आला होता व पंतांच्या शिष्यमंडळींपैकीं बरेच जण रात्रीं तो पाहण्यास जात असत. नाचतमाशाला अगर नाटकाला जाणें पंतांना बिलकूल आवडत नसे व त्याप्रमाणें त्यांच्या घरांतील मंडळींपैकीं फारसें कोणी जातहि नसे. जेव्हां अकोळमधील कांहीं भक्तमंडळी तमाशा पाहण्यास गेल्याचें पंतांना समजलें तेव्हां त्यांनीं त्यांची कानउघाडणी करून पुनः तमाशाला न जाण्याबद्दल ताकीद दिली. तरी त्यांच्यापैकीं कांहीं जणांचा तो क्रम चालूच होता व एक गेला म्हणून दुसरा गेला अशा रीतीनें एके दिवशीं भजन आटोपल्यावर पुष्कळ जण तमाशाला गेले. दुसरे दिवशीं एकानें पंतांना ही हकीगत सांगितली. त्या वेळीं ते कांहीच बोलले नाहींत. पण जेव्हां रोजच्याप्रमाणें सर्व मंडळी संध्याकाळीं ओढ्याकाठीं फिरावयास गेली तेव्हां आदल्या रात्रीं तमाशा पाहण्यास कोण कोण गेले होते यासंबंधी त्यांनीं चौकशी सुरू केली. तेव्हां भराभर एकेकांचीं नावें पुढें येऊं लागलीं. पण " कोण कोण तमाशाला गेले होते तें पाहण्याकरितां आम्ही गेलों होतों " असें कांहीं शिष्ट म्हणूं लागले ! तें सर्व ऐकून घेऊन पंतांनीं तमाशाला जाणाऱ्या सर्वांना दोषी ठरविलें व त्यांतल्या त्यांत ज्यांनीं आपला अपराध कबूल न करितां उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं होतीं त्यांना जबर शिक्षा दिल्या. या शिक्षा म्हणजे आरोपीनें कान धरून उठाबशा काढणें अगर त्याला उघडा करून ओढ्यांत नेऊन त्याच्या डोक्यावर गार पाण्याच्या पाच पन्नास घागरी ओतणें अशा प्रकारच्या होत्या व गुन्ह्याच्या मानानें उठाबशांची अगर घागरींची संख्या कमी अधिक असे ! याप्रमाणें शिक्षा सुनावल्यानंतर जेव्हां अंमलबजावणी सुरू झाली तेव्हां मोठा हशा पिकून एकच गर्दी उडाली. या आरोपी मंडळींत जशीं लहान लहान मुलें होतीं तसे म्हातारेहि होते ! त्यामुळें तो देखावा मोठा मनोरंजक झाला. मनरंजनाबरोबर पंतांचा उपदेशहि सुरू होता. हा प्रकार संपल्यावर भजन सुरू झालें व त्यावेळीं पंतांनीं सर्व आरोपींना उद्देशून पुढील नवीन पद म्हटलें, तें असें " आधीं गुंतूं नये मग कुंथूं नये ॥ ध्रु०॥ देउनी वचन विपरीत करणी । निजसुख भागा नये ॥ १ ॥ जैसी भक्ति तैसी प्रतीति । दोष कोणावर ठेवूं नये ॥ २ ॥ जैसें करावें तैसें भरावें । फल तें चुकवितां नये ॥ ३ ॥ तनु मन धन अर्पितां चरणीं । आज्ञा गुरूची भंगूं नये ॥ ४ ॥ पदरीं अग्नि बांधुनी स्वस्थ । झोप कदापि घेऊं नये ॥ ५ ॥ अवधूत दत्त सत्यवचनी । खूण विसरतां कामा नये ॥ ६ ॥ " ( द. प्रे. ल. १४८० ) वरील गोष्टीचा असा परिणाम झाला कीं त्यानंतर कांहीं दिवस अकोळ गावांत पोराबाळांच्याहि तोंडीं " आधीं गुंतूं नये मग कुंथूं नये " हें पद झालें. त्यायोगें तमाशाला जाण्याची ज्यांना चटक लागली होती ते सर्व खजिल झाले व तेव्हांपासून त्यांनीं तो नाद सोडून दिला. अशा रीतीनें कोणाच्या ठिकाणीं एखादा दुर्गुण अगर एखादी वाईट सवय असल्यास तो दुर्गुण अगर ती सवय सहज बोधाच्या व थट्टामस्करीच्या द्वारें काढून टाकण्याचा पंत प्रयत्न करीत व त्यासंबंधी कोणीहि विषाद मानीत नसे; तर उलट तो दुर्गुण अगर ती सवय काढून टाकण्याचा

प्रत्येक जण प्रयत्न करी.

## " आतां मात्र बैदा आला ! "

पंतांच्या शिष्यांपैकीं एक पोक्त व हुषार गृहस्थ, रामभाऊ बेडकिहाळकर, हे मोठे विनोदी असून प्रत्येकाच्या भाषणांतील चुका काढीत असत. ते स्वतः बोलण्याच्या ओघांत " आतां मात्र बैदा आला " हे शब्द वारंवार म्हणत व ती त्यांना लकबच लागून गेली होती. एकदां त्यांच्या तोंडचे ते शब्द ऐकून पंत म्हणाले " रामभाऊ, 'आतां मात्र बैदा आला' हें वाक्य किती वेळां म्हणतोस ? प्रत्येक वेळीं त्याचा अर्थ तरी काय ? " तेव्हां " छे, कुठलें पंत ? केव्हां तरी म्हणत असेन झालें," असें रामभाऊंनीं उत्तर दिलें. लगेच पंतांनीं सर्व मंडळींना अशी ताकीद केली कीं "रामभाऊच्या तोंडचें 'आतां मात्र बैदा आला' हें वाक्य ऐकतांच त्याला आठवण द्या. " त्याबरोबर रामभाऊ जे उठले ते " आतां मात्र बैदा आला" असें म्हणतच जाऊं लागले ! इतक्यांत मोठा हशा पिकला व लगेच " या गुन्ह्याला शिक्षा काय ? " म्हणून अण्णांनीं पंतांना विचारलें. तेव्हां कान धरून दहा उठावशा काढण्याची पंतानीं रामभाऊंना शिक्षा फर्माविली. लगेच रामभाऊंनीं बिनतक्रार कान धरून दहा उठावशा काढल्या व शेवटली उठावशी सरते न सरते तोंच " असें झालें तर मात्र पंत खरोखरच बैदा आला " असे शब्द त्यांच्या तोंडून आले ! तेव्हां तर अतिशयच हशा पिकला. नंतर " हें वाक्य न उच्चारतां एक दिवस तरी जाऊं देईन " ही रामभाऊंनीं प्रतिज्ञा केली, पण ती पाव घटकाहि पाळली न गेल्यामुळें त्यांनीं परत घेतली व त्यांची ही सवय दृढमूल झाल्याची खात्री होऊन त्यांच्या तोंडून " आतां मात्र बैदा आला " हें वाक्य निघालें तरी तो गुन्हा समजला जाणार नाहीं असें पंतांनीं सांगितलें. येथें सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं सहज थट्टामस्करीच्या मिषानें व हसत खेळत केलेल्या उपहासाच्या द्वारें पंत आपल्या मंडळींच्या वाईट सवई व त्यांच्या अंगचे दुर्गुणहि काढून टाकीत असत आणि सर्व जण, लहान थोर वगैरे भाव मनांत न आणितां, त्यांच्या आज्ञेंत वागून त्यांनीं दिलेल्या शिक्षा लहान लहान मुलांच्या व आप्तेष्टांच्या समक्ष भोगीत असत. त्यामुळें या सर्व विनोदाचें पर्यवसान आनंदांत होत असे व हास्यविनोदाबरोबर सर्वांना बोधानंद मिळत असे.

गावाबाहेरील कार्यक्रम आटोपून घरीं परत आल्यावर गावांतील मंडळी आपापल्या घरीं जात व जेवण उरकून पुनः अण्णांच्या घरीं जमत. नंतर टिपरीचें भजन व्हावयाचें असल्यास पंत व इतर सर्व मंडळी विष्णु हरि कुळकर्णी यांच्या दत्तमंदिरांत जात व बसून भजन करणें असल्यास बहुतकरून तें पंतांचे शिष्य भिमाजी सदाशिव कुळकर्णी यांच्या परसांतलि औदुंबर कट्ट्यावर बसून करीत असत. भजनाचे वेळीं नवीन नवीन पदेंहि होत असत. या खेपेला अकोळ येथें पंतांचा मुक्काम सुमारें तीन महिने होता. त्या दरम्यान अदमासें ५०·नवीन पदें झालीं व तीं साधारणपणें 'श्रीदत्तप्रेमलहरी' मध्यें पद १४२७ ते १४३२ व पद १४६० ते १५०३ पर्यंत छापलीं आहेत. सदर

पदांमध्यें पंतांच्या ठिकाणचें उत्कट गुरुप्रेम, उज्वल आत्मानुभव व भक्तमंडळीबद्दल वाटणारें वात्सल्य हीं स्पष्टपणें व्यक्त झालीं आहेत. कांहीं पदें त्या त्या प्रसंगांना अनुसरून झालीं. उदाहरणार्थ फाल्गुन वद्य ५ शके १८२० रोजीं रंगपंचमी असल्यामुळें पंतांनीं पुढील पद म्हटलें. " रंगातीत निररंगा रंगुनी । रंगपंचमी खेळूं ॥ ध्रु० ॥ पंच भूतें हीं ब्रह्मचि असती । निजानंदीं लोळूं ॥ १ ॥ निजरंगाचा रंग उडवुनी । विश्व हें उजळूं ॥ २ ॥ दत्तावधूतभजन करूनी । स्वस्वरूपीं मिळूं ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १४७२ ) तसेंच चैत्र शु. १ शके १८२० रोजीं गुढीपाडवा असल्यामुळें त्यांनीं " स्वानंदाची गुढी उभारिली । ऐक्यपाडव्याची सुगी केली ॥ ध्रु० ॥ मायाभ्रांतिवर्ष हें सरलें । सद्गुरुचरणीं विपत्ति सरली ॥ १ ॥ जिकडे पहावें तिकडे सद्गुरु । मूर्ति अंतर्बाह्य भरली ॥ २ ॥ निजानंद सेवुनी दत्त । मौनसमाधीची मिठी पडली ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. १४७३ ) हें पद म्हटलें.

## दुपारचा कार्यक्रम व इंगवलेचा समाधि

ज्याप्रमाणें संध्याकाळीं पाच वाजण्याच्या सुमारास गावाबाहेर फिरावयास जाण्याचा पंतांचा रोजचा कार्यक्रम ठरलेला होता, त्याचप्रमाणें साधारणपणें दुपारचें जेवण होऊन थोडी वामकुक्षी झाल्यानंतर ४॥–५ वाजेपर्यंत कोणी विद्वान शास्त्री, पंडित, वेदांती वगैरे आले असल्यास त्यांचेसह ते वेदांतविषयासंबंधीं बोलत बसत असत. अकोळ येथें पंतांचा मुक्काम असतांना अशा तऱ्हेचे पुष्कळ लोक त्यांच्याकडे येत असत व आजूबाजूचे त्यांचे शिष्यहि अकोळास येऊन जाऊन असत. तसेंच अध्यात्मविषयावर पंतांचें कोणाशीं संभाषण चालू असतांना पुष्कळ जण तें ऐकत बसत.

पंतांचा मुक्काम अकोळास असतांना त्याचे बंधु गोपाळरावजी यांचें कुटुंब तेथेंच असल्यामुळें त्यांना औषधोपचार करण्याकरितां वे. गोविंदभट मिरजकर राजवैद्य यांना मुद्दाम बोलावून घेतलें होतें व त्यांचा मुक्काम अण्णांच्याच घरांत होता. ते नामांकित शास्त्री असून वैद्यकीमध्येंहि निष्णात होते. त्यामुळें पंतांचें व त्यांचें अध्यात्मविषयावर नेहमीं संभाषण चालत असे. एके दिवशीं पंत व राजवैद्य दुपारीं बोलत बसले असतां दत्तवाडकर पाटील तेथें आले. तेव्हां पंतांनीं उठून त्यांना नमस्कार केला व आपले जागीं त्यांना बसवून आपण शेजारीं बसले. नंतर पंतांनी खूण केल्यामुळें तेथें असलेल्या सर्व भक्तमंडळींनीं दत्तवाडकरांना नमस्कार केला. तेव्हां वैद्यबुवांनीं " हे कोठले कोण ? " म्हणून विचारतां " हे दत्तवाडकर पाटील, हे मोठे ज्ञानी असून वेदान्तविषयांत प्रवीण आहेत " असें पंत म्हणाले. तें ऐकून " समाधि म्हणजे काय ? ती कशी साधतां येईल ? " असा वैद्यबुवांनीं दत्तवाडकरांस प्रश्न केला. तेव्हां योगशास्त्रांतील आधार देऊन समाधि म्हणजे काय तें दत्तवाडकर वैद्यबुवांना समजावून सांगूं लागले. इतक्यांत असें झालें कीं, ' इंगवले ' आडनावाचा एक मराठा इसम मुद्दाम पंतांच्या दर्शनाकरितां कोल्हापुराहून अण्णांच्या घरीं आला. त्यावेळीं

दुपारचे सुमारें २-३ वाजले होते. अण्णांचा पुतण्या गोविंद कृष्ण हा समोरच उभा होता. त्याला इंगवले यानें "पंत कोठें आहेत ?" म्हणून विचारलें. त्यावेळीं पंत सोप्यांत बसले होते व भोंवतालीं मंडळीची दाटी झाली होती. गोविंद कृष्ण यांनीं 'पंत ते तेथें बसले आहेत' असें म्हणतांच तो त्या गर्दीतून जाऊन पंतांच्या पायां पडला व परत जाऊं लागला. इतक्यांत, "अरे, ये, माझ्यासमोर बस व मजकडे पहा. भिऊं नकोस" असें त्याला पंत म्हणाले. तेव्हां तो त्यांच्यापुढें मांडी घालून बसला व त्यांच्याकडे पाहूं लागला. त्यावरोबर दत्तवाडकरांचें बोलणें बंद पडून पंत काय करतात तें पाहण्याकडे सर्वांची दृष्टि वेधली. इंगवले पंतांकडे सारखें पाहूं लागला. दोन तीन मिनिटांत त्याचा श्वासोच्छ्वास जोरानें चालून घोरण्यासारखा आवाज येऊं लागला व श्वासोच्छ्वास हळुहळु बंद पडत जाऊन अजिबात थांबला. तेव्हां " योग्याची समाधि कशी असते ती पाहून घ्या " असें पंत वैद्यबुवांना म्हणाले व आपण उठून घरामागील परसांत गेले. त्यानंतर वैद्यबुवांनीं प्रथम " कोल्हापुरकर " "कोल्हापुरकर" म्हणून दोन चार हाका मारल्या; तरी तो 'ओ' देईना. तेव्हां त्यांनीं त्याची नाडी तपासून पाहिली, डोळ्यांत अंजन घातलें, नाकापुढें सूत धरून पाहिलें, पण तो जिवन्त आहे कीं मेला आहे हें त्यांना निश्चित म्हणवेना. तेव्हां त्यांनीं " हें काय आहे ? " म्हणून दत्तवाडकरांना विचारलें पण त्यांनाहि कांहीं सांगतां येईना. इतक्यांत घरांत चहा तयार असल्यामुळें पंतांनीं पाटलांना आंत बोलावून घेतलें व दोघेहि चहा पिऊन बाहेर आले आणि आपापल्या जागीं बसले. तेव्हां वैद्यबुवा पंतांना म्हणाले " पंत, हें काय अरिष्ट ओढवलें? हा मनुष्य जिवंत आहे कीं मेलेला आहे कीं बेशुद्ध आहे कांहींच समजत नाहीं. एक तास झाला; येथें आमचा कांहीं तर्क चालत नाहीं. याला पूर्वीची स्थिति प्राप्त होणार कीं हा असाच बसून राहणार ? " लगेच " त्याची कांहीं काळजी नको " असें म्हणून पंतांनीं इंगवलेच्या डोक्यावर हात ठेवून " हुषार " म्हणून म्हणतांच झोपेंतून जागा झाल्याप्रमाणें तो भानावर आला व " दत्त " असें म्हणाला. नंतर " तूं येथें येऊन बसल्याला किती वेळ झाला व इतका वेळ तूं काय करीत होतास?" असें पंतांनीं विचारतांच " मी आलों तों आपल्या पायां पडून आपणासमोर बसून आपल्याकडे पाहात आहें. " असें त्यानें उत्तर दिलें. तें ऐकून " तुला येथें बसून एक तास झाला " असें पंत म्हणाले; तेव्हां त्याला आश्चर्य वाटलें. नंतर पंतांनीं गोविंद कृष्ण यांना इंगवलेच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यास सांगितलें व तो गेल्यावर ते वैद्यबुवांना म्हणालें " समाधि म्हणजे काय यासंबंधीं पाटलांची व आपली चर्चा चालली होती. पण या अनोळखी मराठ्यानें समाधि म्हणजे काय तें प्रत्यक्ष दाखविलें. " तेव्हां वैद्यबुवांना फार अचंबा व कौतुक वाटून ते पंतांच्या पायां पडूं लागले; पण " आपण वडील आहांत. आपल्या आशिर्वादेंकरून हा अपूर्व योग जमून आला " असें म्हणत पंत फिरावयास जाण्याकरितां उठले व मंडळींसह गावाबाहेर फिरावयास गेले. नंतर पंतांनीं इंगवलेवर अनुग्रह करून त्याला परत पाठविलें. पंतांना भेटण्याकरितां रोज नवीन नवीन मंडळी येत. त्यांपैकीं कांहीं त्यांचे शिष्य असत व कांहीं त्यांच्याकडून अनुग्रह घेण्याच्या

हेतूनें अगर त्यांच्याशीं वेदान्तविषयासंबंधीं संभाषण करण्याकरितां येत असत आणि त्या सर्वांना त्यांच्या त्यांच्या अपेक्षेप्रमाणें समाधान करून पंत पाठवीत असत. पंतांचा अकोळ येथें मुक्काम असतांना त्यांचे पुष्कळ नवीन शिष्य झाले व कित्येकांना त्यांच्या अधिकाराची साक्ष पटून त्यांनीं पुढें बेळगावास जाऊन पंतांकडून अनुग्रह घेतला.

## अकोळहून पंत निघतांना तेथील मंडळींना झालेलें वियोगदुःख

पंतबंधु गोपाळरावजींच्या कुटुंबाला पुष्कळ उपचार करूनहि आराम न वाटतां दिवसेदिवस त्यांची प्रकृति खालावत गेली व १८९८ च्या मे महिन्यांत त्यांचा अकोळ येथें अंत झाला. त्या सुमारास बेळगावमधील प्लेगचें मान बरेंच कमी झालें होतें. त्यामुळें बेळगावास परत जाण्याचें पंतांनीं ठरविलें. तेव्हांपासून ते अकोळमधून निघेपर्यंत काय प्रकार झाला यासंबंधीं वर्णन करण्याचें काम ( ज्यांच्या घरांत पंतांचा मुक्काम होता व ज्यांनीं तो सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहिला होता असे विष्णुअण्णांचे पुतणे ) गोविंद कृष्ण कुळकर्णी यांचेकडे सोपविणें बरें. गोविंद कृष्ण लिहितात " पंत येथून आठ दिवसांनीं बेळगावास जाणार असें ठरल्यापासून आजूबाजूचे भक्तगण त्यांना पोचविण्याकरितां जमूं लागले. गावांतील भक्तमंडळींच्या घरीं मेजवान्या होण्यास सुरवात झाली. ते वेळीं अकोळ येथें जमलेल्या समुदायामध्यें भिन्न भिन्न जातींचे त्याचप्रमाणें जैन, लिंगायत, मराठे, मुसलमान वगैरे भिन्न भिन्न धर्मांचे व मतांचे, तसेच रोगी–निरोगी, सुष्ट–दुष्ट असे नाना तऱ्हेचे लोक जमले होते. पण कोणास कोठेंहि पंत असल्या ठिकाणीं मज्जाव नसावयाचा. सर्वांना सर्कशींतील रिंगमास्तरप्रमाणें आपल्या प्रेमानें एके ठायीं एकरूप केलें. पंतांच्या साम्राज्यामध्यें कोणताहि भेदभाव नव्हता. सहजानंदांत दिवस चालले होते. परंतु 'पंत उद्यां येथून निघणार' म्हणतांच हुरहुर लागली. निघण्याच्या दिवशीं घरीं सर्व तयारी होऊन गाड्यांमध्यें सामान भरलें. घर रिकामें दिसूं लागलें. पंत सर्व पोषाख करून देवघरीं आले व पाटावर बसले. सर्वांस कुंकूं लावून तीर्थप्रसाद दिला. निरंजन पेटवून ताम्हनांत ठेवून दिलेवर 'आरती कर' म्हणतांच ताम्हन हातांत घेतलें; कांहीं म्हणवेना. तेव्हां कोणीशी आरती म्हटली. ताम्हन खालीं ठेवून नमस्कार केला. पाय सोडवेनात. पंतांनीं उठवून मिठी मारली. सर्वजण गहिंवरून गेलों. 'तुम्हीं आम्हांला सोडून निघालां. आम्हांला कसें करमेल ?' म्हणतांच त्या जगन्मातेलाहि कांहीं बोलवेना. तेहि गहिंवरून म्हणाले ' हें माझें माहेरघर आहे. माझा ळळा तुम्हांला व तुमचा मला लागला. सर्व प्रकारें माझी इच्छा पुरवीत होतां; केव्हांहि तुमच्या ठिकाणीं संकोच दिसून आला नाहीं. ' त्याबरोबर जो दुःखाचा उमाळा दाबण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न चाललेला होता, तो अनावर होऊन बाहेर पडला व जो प्रकार झाला तो पाहून पंत पुनः म्हणाले ' मी काय करूं ? किती दिवस माहेरीं राहिलें तरी गेलेंच पाहिजे. उपाय नाहीं. हें माझें घर आहे. याचा विसर मला कधींच पडणार नाहीं. मी तुमचा कायमचा ऋणी आहें. उठा. आतां मला उशीर होतो. माझी रवानगी करा. मी पुनः येऊन येथेंच कायम राहीन. मग तर झालें कीं नाहीं ? ' अशा तऱ्हेनें समजुतीच्या

गोष्टी सांगून पंत उठून उभे राहिले. मग सौभाग्यवतीनें पंतांच्या हातावर दहीं घातलें व नमस्कार केला. 'तुला काय पाहिजे ?' असें पंतांनीं विचारतांच तिनें 'तुह्मी' इतकें बोलून रडूं लागली. पंत म्हणाले 'बरें आहे. कांहीं काळजी करूं नको.' इतक्यांत थोरली काकू (अण्णांचें कुटुंब) म्हणाली 'सर्व जण जाणार तर घरीं साईंना ठेवा.' तेव्हां पंतांनीं साईंना घरी राहण्यास आज्ञा केली व मंडळीसहित निघाले. जातांना प्रत्येक गुरुपुत्राचे घरीं जाऊन निरोप घेत घेत अखेरीस कै. अप्पा नरसगौडा पाटील, निःसीम भक्त, याच्या घरीं जाऊन त्याचे मातोश्रीस भेटून निरोप घेऊन श्रीमारुतीच्या देवळापुढें उभे राहून 'झाली आमुची फेरी । आतां जातों माघारीं ॥ ध्रु० ॥' (द. प्रे. ल. ११७९) हें पद स्वतः म्हटलें व 'येथून पुढें मंडळींनीं पोचविण्यास कोणी येऊ नये' असें पंत म्हणतांच तेथें सर्वत्रांनीं पंतांस नमस्कार केला. निघणारी मंडळी सर्व गाडींत बसल्यानंतर मागील गाडीमध्यें पाठीमागील बाजूस खालीं पाय सोडून पंत बसले. पुनः सर्वांनीं नमस्कार केला. गाड्या चालू झाल्या. पंतांची गाडी दिसेपर्यंत आम्ही उभे होतों."

मलगौडा नरसगौडा, बाळा बाबाजी पाटील, गोविंद सदाशिव वगैरे वरींच लहान मुलें पंतांच्या गाडीच्या मागें धावत गेलीं. तेव्हां पंतांनीं त्यांना थोडा वेळ आपल्या गाडींत घेऊन कुरवाळून चार प्रेमाच्या गोष्टी सांगून परत पाठविलें. विष्णु दिवाण हा पंतांबरोबर बेळगावास गेला व त्यांच्या घरीं राहून त्यांची सेवा करूं लागला. तो फार निष्ठावान आणि हुषार असून त्याचा आवाज चांगला होता व त्याचें भजन पंतांना फार आवडत असे.

पंत अकोळाहून निघण्याच्या वेळचें गोविंद कृष्ण यांनीं वरीलप्रमाणें जें वर्णन केलें आहे, त्यामध्यें व्यक्त झालेला अनुभव कमी अधिक प्रमाणांत प्रत्येक गुरुपुत्राचा होता. पंत निघतांना ते व अण्णा यांनीं परस्परांना जेव्हां मिठी मारली तेव्हां तेथें असलेली सर्व मंडळी वियोगदुःखानें विव्हळ झाली होती. त्यावेळीं अकोळमध्यें नुकत्याच अनुभविलेल्या प्रेमसोहळ्याची आठवण होऊन पंतांनीं असे उद्गार काढले कीं "आतां खेळ संपले. यापुढें नुसतें ज्ञानदान चालणार" व त्याप्रमाणेंच पुढें अनुभव आला.

या खेपेनंतर अण्णांचा बराच काळ बेळगाव येथें पंतांच्या सहवासांत जाऊं लागला. एकदां अण्णा बेळगावास असतांना त्यांचें कुटुंब व त्यांचा एकुलता एक मुलगा रामभाऊ हीं दोघेंहि फार आजारी पडलीं. तेव्हां गोविंद कृष्ण यांनीं ती बातमी अण्णांना कळविली व लगेच पंत, अण्णा व पुटप्पा हे टांग्यांतून अकोळास गेले. या खेपेला तेथें पंतांचा मुक्काम दोन तीन दिवस होता व तेथील मंडळीला तो एक उत्सवसमारंभच झाला. त्यानंतर पंत पुनः अकोळास गेले नाहींत.

——×——

# प्रकरण ३४ वें

## देशपांडे गल्लींतील सुंठणकरांचा वाडा; प्लेगचा कहर व त्याला पडलेले बळी ( चुलते जिवाणकाका, मावसभाऊ गणूअण्णा मारीहाळकर वगैरे ); गुरुद्वादशीच्या उत्सवांत विघ्न; दुःखालाप.

१८९८ च्या मे महिन्यांत अकोळहून बेळगावास परत आल्यावर १४-५-९८ रोजीं रावजींना लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात " + + + दोन प्राणि तरी गेले. ( गोपाळरावजींचें पहिलें कुटुंब व मुलगा ) सद्गुरु–इच्छा. एक दोन दिवस येथें राहून वाळेकुंद्रीस जाणार. तेथून पुढचा विचार. सर्व कांहीं संकल्पाधीन आहे. निश्चय कोणताच नाहीं. केव्हांहि सद्गुरुस्मरणीं स्वस्थ राहा." नंतर लगेच ते वाळेकुंद्रीस राहावयास गेले. तेथें त्यांचा मुक्काम असतांना ३० मे १८९८ रोजीं त्यांचे बंधु गोविंदरावजी यांचें दुसरें लग्न झालें. गोविंदरावजींचें पहिलें लग्न १८८२ सालीं त्यांच्या दत्तक वडिलांनीं पुढाकार घेऊन केलें होतें या गोष्टीचा प्रकरण १३ मध्यें उल्लेख केलाच आहे. पण गोविंदरावजी दत्तक वडिलांजवळ कधींच राहिले नाहींत. त्यांचें कुटुंब घराण्याला सोडून गेलें व त्यांचे वडील १८९७ सालीं कालाधीन झाले. गोविंदरावजींना नावाला मात्र दत्तक दिलें होतें. त्यांचा जनक घराण्याशीं असलेला संबंध कायम राहिला व पंतांच्या इतर भावांप्रमाणें ते पंतांजवळच राहात असत आणि त्यांचें हें लग्न पंतांनींच पुढाकार घेऊन केलें. जूनपासून बेळगावांत राहाण्यास जावयाचें असल्यामुळें पंत वाळेकुंद्रीस असतांना बेळगावमधील बिऱ्हाड बदलण्याची वाटाघाट सुरू झाली.

१८९३ पासून १८९८ च्या मे महिन्यापर्यंत पंतांचें बिऱ्हाड मारुती गल्लींत नाटेकर यांच्या घरांत होतें. त्या घरांत आल्यावर त्यांचे बंधु वामनराव वकिली करूं लागले व दिवसेंदिवस त्यांचें वकिलीचें काम वाढत गेलें. या पाच सालांत पंतांच्या शिष्यांची संख्याहि पुष्कळ वाढली व त्यामुळें त्यांच्या घरीं शिष्यमंडळीची येजा आधिक होऊं लागली. तसेंच त्यांच्या घरीं राहून अभ्यास करणाऱ्या मुलांची संख्याहि वाढली. या सुमारास पंतांचा मेहुणा शेषो श्रीपाद कुळकर्णी, पंतांचे भाचे शंकर विरूपाक्ष पट्टीहाळ, भिमराव बाळकृष्ण देशपांडे, रावजींचा मुलगा रामभाऊ, अकोळ येथील विष्णु हरि कुळकर्णी यांचा मुलगा हणमंत, साईचा पुतण्या पांडुरंग वासुदेव ताम्हनकर वगैरे सुमारें १०–१५ विद्यार्थी पंतांकडे राहात असत. अशा परिस्थितींत मारुती गल्लींतील बिऱ्हाडाची जागा त्यांना अपुरी वाटूं लागली होती. त्यांतच १८९७ अखेर प्लेगमुळें पंतांना तें घर सोडून दड्डी, अकोळ, वाळेकुंद्री वगैरे ठिकाणीं जाऊन राहावें लागलें होतें.

तेव्हां जूनपासून ती जागा सोडून दुसरें चांगलें प्रशस्त घर भाड्यानें घ्यावें असें पंतांना वाटूं लागलें व बाळेकुंद्रीहून बेळगावास परत जावयाचें तें नव्या घरांत जावयाचें असा त्यांनीं जवळ जवळ निश्चयच केला होता.

## देशपांडे गल्लींतील सुंठणकरांचा वाडा

मे १८९८ च्या सुमारास पंतांचे बालपणचे मित्र व सहाध्यायी कै. रामराव सुंठणकर यांचा देशपांडे गल्लींत असलेला प्रशस्त, भव्य, दुमजली व चौसोपी वाडा खालीं झाला. तेव्हां पंतांचा वाढता प्रपंच व त्यांची एकंदर परिस्थिति हीं रामरावांना माहीत असल्यामुळें पंत जर आपल्या वाड्यांत राहावयास येतील तर फार चांगलें होईल असें त्यांना मनापासून वाटत होतें. पूर्वी श्रीमंत सरकार मिरजकर त्याच वाड्यांत कांहीं दिवस राहात असत; त्यामुळें त्याला "मिरजकरांचा वाडा" असेंहि म्हणत. त्या वाड्यांत जीं जीं घराणीं राहून गेलीं त्यांची त्यांची तेथें राहात असतांना भरभराटच झाली होती. त्यामुळें तो यशस्वी आहे अशी रामरावांची समजूत झाली होती व त्याप्रमाणें त्यांनीं पंतांना बोलूनहि दाखविलें आणि तेथें राहाण्यास येण्याबद्दल आग्रह केला. तेव्हां तो वाडा आपणाला सर्व दृष्टींनीं फार सोईचा होईल असें पाहून जून १८९८ पासून तेथें राहावयास जाण्याचा पंतांनीं निश्चय केला. तो वाडा पंतबंधु गोपाळरावजी वगैरे मंडळीसहि पसंत होता. पण त्याचें भाडें (दरमहा रु. १५) जास्त असून तें आपणास झेपणार नाहीं असें त्यांना वाटत होतें व त्याप्रमाणें त्यांनीं पंतांना बोलूनहि दाखविलें. परंतु त्या वाड्यांत राहाण्यास जाण्याचा पंतांचा निश्चयच झाला असल्यामुळें कोणाचें कांहीं चाललें नाहीं व जून १८९८ च्या सुरवातीस ते आपल्या परिवारासह तेथें राहावयास गेले. अशा रीतीनें १८७२ सालीं बेळगावास शिकण्याकरितां आल्यापासून पंतांना जी जागेची अडचण भासून वेळोवेळीं स्थलांतर करावें लागलें होतें ती अडचण दूर झाली. इतकेंच नव्हे तर सुमारें बावीस वर्षांपूर्वी दत्तू राहात असलेल्या दरमहा तीन आणे भाड्याच्या खोलींतील सुदामपुरीचा देखावा पाहून "हाच दत्तूचा वाडा काय?" अशी एका कुटाळ मनुष्यानें कुचेष्टा केलेली ऐकून "दत्तूला मी एके दिवशीं खचित वाड्यांत बसवीन" असे बाळप्पांनीं त्या वेळीं काढलेले उद्गार खरे झाले!

## विलक्षण योगायोग!

या संधीला एक गमतीचा योगायोग जमून आला. तो असा कीं १८९१ च्या सुरवातीस पंतबंधु गोपाळरावजी बेळगाव येथें कलेक्टर कचेरींत कारकुनाच्या जागेवर कायम झाले व त्यांना दरमहा रु. २० पगार मिळूं लागला; १८९३ सालीं त्यांना दरमहा रु. ३० पगार मिळूं लागला व जानेवारी १८९८ पासून दरमहा पगार ३५ व भत्ता रु. ५ मिळून रु. ४० मिळूं लागले. जेव्हां दरमहा रु. १५ भाडें भरून सुंठणकरांचा वाडा भाड्यानें घेण्याचें घाटत होतें तेव्हां इतकें भाडें आपणांस झेपणार नाहीं व तो वाडा आपण भाड्यानें घेऊं नये असें त्यांचें मत होतें; तरी पंतांच्या आग्रहामुळें त्यांना त्या वाड्यांत

जाण्याचें कबूल करणें भाग पडलें व ते गेलेहि हें वर सांगितलेंच आहे. पण त्या वाड्यांत राहावयास गेल्यावर लगेच म्हणजे २२ जून १८९८ पासून गोपाळरावजींच्या पगारांत वाढ होऊन दरमहा रु. ३५ च्या ऐवजीं रु. ४० मिळूं लागले व दरमहा भत्ता रु. ५ ऐवजीं रु. १२ मिळूं लागला! अशा रीतीनें पंतांच्या आग्रहामुळें जून १८९८ पासून जें दरमहा अधिक भाडें भरावें लागलें त्याची त्यांच्याच कृपेनें तावडतोब सोय झाली; हें पाहून पंतांच्या सांगण्याप्रमाणें जें केलें तें योग्यच होतें अशी गोपाळरावजींची खात्री झाली.

## वाड्याचें वर्णन

देशपांडे गल्लींतील ज्या वाड्यांत पंत राहावयास गेले तो उत्तराभिमुख असून समोर देशपांडे गल्लीचा राजमार्ग आहे. हा वाडा अजूनहि उभा आहे. पण त्याच्या आंतील भागांत आतां बरेच फेरफार झाले आहेत. तेव्हां त्याचें पुढें जें वर्णन करीत आहोंत तें पंत तेथें राहात असतांना जी परिस्थिति होती तिला अनुलक्षून करीत आहोंत. तें वर्णन येणेंप्रमाणें:—रस्त्यास लागून दोन्ही बाजूंस उंच ओटे असून मध्यें महाद्वार आहे. महाद्वारांतून आंत जातांच वाड्यांतील पुढील चौक लागतो. चौकाच्या चारी बाजूंस सोपे असून उजव्या बाजूच्या सोप्यांत वामनरावजींची कचेरी असे. डाव्या बाजूच्या सोप्यांतून माडीवर जाणेस पूर्वेकडील भिंतींत एक जिना असे व मागील बाजूकडील परसांत परभारें जाण्यास एक दार असे. चौकाच्या समोरच्या सोप्यांत उजव्या अंगास एक व डाव्या अंगास एक अशा दोन खोल्या होत्या. त्यांपैकीं डावे बाजूकडील खोलींत पंत निजत असत व उजवे बाजूकडील खोलींत वामनरावजी निजत असत. या सोप्याच्या मधोमध घरांत जाण्याचें दार असे. सोप्यांतून आंत पाऊल टाकतांच उजव्या बाजूस माडीवर जाण्याकरितां एक जिना असे व समोर माजघर असे. माजघरांत शिरतांच डावे बाजूस दार असून त्याचे समोर देवघराची खोली आणि त्या खोलीला लागून स्वयंपाक घराचें मोठें दालन असे व उजवे बाजूस एक खोली असे. माजघरांतून पुढें गेलें कीं मागील पडवी लागे व त्या पडवींतून स्वयंपाकघरांत जाण्यास दार असे. ही पडवी मोठी असून जेवणाचीं पानें तेथेंच मांडीत असत. पडवीच्या उजवीकडे एक खोली असून त्या खोलींत गोविंदरावजी निजत असत. या पडवीस लागून एक सोपा असून त्याचे उजवीकडील बाजूस एक खोली असे व डावीकडे न्हाणीघर असे. या सोप्यांतून दरवाजा ओलांडला कीं परसांतील सोपा लागे. या सोप्यांत उजवीकडे खोली असून त्या खोलींत मुलांचा स्वयंपाक होत असे. डावे बाजूस दार असून पायऱ्या होत्या व पायऱ्या उतरून गेलें कीं डावे बाजूस विहीर व उजवे बाजूस पायखाने होते. या सोप्यांतून मागील बाजूच्या पायऱ्या उतरून गेल्यावर मागील चौक लागे व त्या चौकांत एक सुंदर तुलसीवृंदावन असे. या चौकाचे उजवे बाजूस एक सोपा असून त्यांत चर काढून मोठ्या स्वयंपाकाची सोय होत असे. चौकाच्या दक्षिणे-

कडील सोप्यांत गवत ठेवीत असत व गुरें बांधीत असत. त्या सोप्याच्या दक्षिणेकडील म्हणजे मागील दरवाजानें बाहेर पडलें कीं बसवण्णा गल्ली लागते. येथपर्यंत या वाड्याच्या तळमजल्याच्या क्षेत्राचें वर्णन केलें आहे. पण तो दुमजली असल्यामुळें माडीवरहि पुष्कळ जागा होती.

माजघरांतील जिन्यांतून वर गेलें असतां उजवीकडे चौकाकडील माडीवर व डावीकडे माजघरावरील माडीवर जाण्याचे दरवाजे असत. डावीकडच्या दरवाजांतून आंत जातांच लागणाऱ्या दालनांत नरसिंहरावजी अभ्यास करीत व निजत असत. या दालनांतून डावीकडच्या दरवाजानें आंत गेलें की माजघरावरची माडी लागे. ही माडी ओलांडून गेल्यावर दक्षिणेकडील माडीवर उजवीकडे खोली होती. त्या खोलींत शंकररावजी निजत व अभ्यास करीत.

माजघरांतील जिना चढून वर गेल्यावर उजवीकडील दरवाजांतून बाहेर गेलें असतां उजवीकडे फळ्यांची खोली होती. त्या खोलींत मुलें अभ्यास करीत असत व पुढें गोपाळरावजींची कचेरी असे. या खोलींतून पुढें गेलें असतां अवधूतखोली लागे. ती तळमजल्यावरील ज्या खोलींत पंत निजत असत त्या खोलीच्या अगदीं वर असे. या खोलींत श्रीदत्तात्रेयाची पूजेची तसबीर ठेविलेली असे. चौकाच्या उत्तरेकडील माडीवरील दालनांत पूर्वाभिमुख मखर बांधून त्यांत उत्सवाचे वेळीं उत्सवमूर्ति बसवीत असत. चौकाचे पूर्वेकडील माडीच्या दालनांत अवधूतखोलीस लागून पूर्वपश्चिम कोच ठेविलेलें असे व त्या कोचावर बसून पंतांचें वाचन व बोध सांगणें चालत असे. या दालनांत पूर्वेकडील दरवाजानें जिना उतरून पुढील चौकांत व परसांत विहिरीकडे जाण्याची वाट होती व पंतांना भेटण्यास येणाऱ्या मंडळींना परभारें या जिन्यानें माडीवर त्यांचें कोच असलेल्या दालनांत जातां येत असे.

देशपांडे गल्लींतील वाड्यांत राहावयास गेल्यापासून पंतांच्या घरांतील सर्व मंडळींची जागेची उत्तम सोय झाली. या वाड्यांतील निरनिराळ्या भागांचें जें वर्णन केलें आहे त्यावरून असें दिसून येईल कीं वाड्याच्या पुढल्या दरवाजानें आंत गेल्यावर चौकाच्या उजव्या बाजूला वामनरावजींची कचेरी असून त्यांचेकडे येणारे पक्षकार, स्नेही-सोबती वगैरे तिकडे वळत व चौकाच्या डाव्या बाजूला माडीवर पंतांची बैठक असल्यामुळें त्यांचेकडे येणारी जाणारी मंडळी डाव्या बाजूच्या जिन्यानें माडीवर जात. अशा रीतीनें जागेची सोय झाल्यामुळें पंतांकडे येणाऱ्या मंडळींची संख्या दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत चालली.

## बोधसत्र

संध्याकाळीं शाळेंतून घरीं आल्यावर बहुतकरून पंत माडीवरील पूर्वेकडच्या सोप्यांतील कोचावर बसून त्यांचेकडे येणाऱ्या मंडळींबरोबर अध्यात्मविषयासंबंधीं चर्चा करीत

असत अगर भक्तमंडळीला बोध करीत असत. या वाड्यांत राहावयास आल्यापासून त्यांचा दररोज संध्याकाळचा हा कार्यक्रम नियमानें होऊं लागला व दिवसेंदिवस त्यांचा बोध श्रवण करण्यास अधिकाधिक मंडळी जमूं लागली आणि त्यांचे घरीं एकप्रकारचें बोध-सत्रच सुरू झालें. यासंबंधीं प्रकरण ४७ मध्यें अधिक खुलासा होईलच. तसेंच पर-गावांहून पंतांच्या दर्शनाकरितां अगर त्यांचेकडून अनुग्रह घेण्याकरितां येणारी मंडळीहि पुष्कळ असे व या वाड्यांत ते राहूं लागल्यापासून अशा मंडळींची निजण्याबसण्याची चांगली सोय होऊं लागली. विद्यार्थी मंडळीलाहि अभ्यासाला स्वतंत्र जागा मिळून स्नान, व्यायाम वगैरे नित्यक्रमांसहि विपुल जागा झाली.

## पितामहीचें निधन

या वाड्यांत येऊन राहिल्यानंतर लौकरच पंतांची आजी म्हणजे बाळकृष्णपंतांचें कुटुंब या वाळेकुंद्री येथें बऱ्याच आजारी पडल्या. १८९० सालीं बाळकृष्णपंतांनीं आतुर संन्यास घेतला व १८९४ सालीं त्यांनीं देह ठेविला. त्यावेळीं त्यांचें कुटुंब रखमाबाई यांचें वयहि फार झालें होतें. त्यामुळें त्या व त्यांचा मुलगा जिवपा हीं वाळेकुंद्री येथेंच राहात असत. त्या जेव्हां बऱ्याच आजारी झाल्या तेव्हां पंत, त्यांच्या मातोश्री वगैरे मंडळी वाळेकुंद्रीस गेली होती. २५–७–१८९८ रोजीं रखमाबाईचा अंत झाला. त्यांचें और्ध्वदेहिक तेथेंच करून पंत बेळगावास परत आले.

## प्लेगचा कहर !

त्यानंतर लौकरच बेळगाव शहरांत प्लेगचा कहर उडाला. त्या वेळचें प्लेगचें स्वरूप किती भयंकर होतें तें पंतांच्या कांहीं पत्रांवरून दिसून येतें. १–१०–१८९८ रोजी अण्णांना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंत लिहितात " अशा आणीबाणीच्या प्रसंगीं पंताजवळ अण्णांनीं नसावें ! हल्लींची बेळगावची स्थिति, सकाळचीं माणसें संध्याकाळीं नाहींत, संध्याकाळचीं सकाळीं नाहींत. भयंकर ! सध्यां दत्ताजवळ कोणी नाहीं. मरणाला भिणारांनी इकडे येऊं नये. तुझी मर्जी असल्यास, पंताची संगत पाहिजे असल्यास यावें. हल्लींच्या स्थितीवरून पुढील कांहीं लिहवत नाहीं." तसेंच २२–१०–१८९८ रोजीं रावजींना लिहिलेल्या पत्रांत बेळगावमधील परिस्थितीसंबंधीं पंतांनीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे. " बेळगाव शहरची व आजूबाजूच्या खेड्यांची स्थिति भयंकर आहे. सगळा स्वप्नाचा बाजार उघड उघड हरहमेषा दृष्टोत्पत्तीस येतो. उपाय नाहीं. श्रीसमर्थ दत्ताच्या भजनांत काळ काढीत आहों. पहा, पर्वतासारखीं संकटें जरी अनिवार्यशीं आम्हांला दिसलीं व त्यांच्याखालीं आमचा खास चुराडा उडतो कीं काय अशी भीति उत्पन्न होते, तरी भक्तीचा भुकेला, प्रेमाचा सागर, दयाळु समर्थ एका क्षणांत तो पर्वत नाहीं, पण राई आहे, अशी बालंबाल खात्री करून देतो." ( पु. ५–३९ )

## प्लेगला पडलेले बळी

या सुमारास एके दिवशीं असें झालें कीं पंतांच्या राहात्या वाड्याशेजारीं कोणी मेल्यामुळें मोठमाठ्यानें रडारड चालली होती. ती पंतांच्या कानावर आली व त्यांनीं त्यासंबंधीं चौकशी केली. तेव्हां त्यांना समजलें कीं वामनरावांचा कारकून व्यंकटराव भिमराव याची बहीण प्लेगनें वारल्यामुळें ती रडारड चालली होती. त्यावेळीं प्लेगला नुकतीच सुरवात झालेली होती व त्याचें स्वरूपहि फार उग्र होतें. त्यामुळें लोक इतके भयभीत झाले होते कीं प्लेगच्या रोग्याच्या जवळ जाण्यास अगर तो मेला असतां त्याच्या प्रेतयात्रेबरोबर जाण्यास फारसें कोणी धजत नसे. व्यंकटरावाची बहीण वारल्याचें पंतांना समजतांच त्यांनीं ताबडतोब त्याला बोलावणें पाठविलें. तो आल्यावर त्याची दीन स्थिति पाहून त्यांनीं त्याला धीर देऊन अनुग्रह दिला व आपले बंधु गोविंदरावजी व गोपाळरावजी, मुतालिक, रामभाऊ कमतनूर वगैरे मंडळीस पुढील कार्याकरितां त्याच्याबरोबर पाठविलें आणि तेव्हांपासून प्लेगच्या भीतीमुळें प्रेतयात्रेबरोबर जाण्यास माणसांची जेथें जेथें अडचण पडे तेथें तेथें जाण्याबद्दल पंतांची जवळच्या मंडळींना ताकीद असे व त्याप्रमाणें ते तत्परतेनें जात असत.

पुढें थोड्याच दिवसांनीं पंतांचे चुलते जिवप्पा यांना प्लेग होऊन ४-११-१८९८ (अश्विन व. ६ शके १८२०) रोजीं ते कालाधीन झाले. ते बालब्रह्मचारी होते व साधारणपणें वाळेकुंद्री येथें राहात व तेथील कारभार पाहात असत. ते वारल्यापासून वाळेकुंद्री येथलि वतनी कुळकर्णिकीचा वगैरे सर्व कारभार पंत व त्यांचे बंधु यांनाच पाहणें भाग झालें. पंतांच्या चुलत्यांपैकीं चिंतोपंत हे १८८० सालीं वारले. त्यानंतर १८८६ सालीं पंतांचे वडील वारले. चुलते देवप्पा हे प्रथमपासूनच विभक्त होते. त्यामुळें जिवप्पांच्या निधनानें पंतांना फार दुःख झालें.

जिवप्पांचें देहावसान झाल्यानंतर सात दिवसांनीं अश्विन व. १२ रोजीं पंतांच्या घरीं गुरुद्वादशीचा उत्सव व्हावयाचा होता. त्यांच्या घरीं होत असलेल्या उत्सवांत हा उत्सव विशेष महत्वाचा समजला जाई व त्याकरितां परगावांहूनहि पुष्कळ भक्तमंडळी येत. या सालीं उत्सवाचे वेळीं पंतांना अशौच असल्यामुळें मंडळींचा विरस झाला व उत्सवांत होणाऱ्या प्रेमानंदसोहळ्याला तें एक विघ्नच आलें. दर वर्षाप्रमाणें उत्सवाकरितां मंडळीहि वरीच जमली. परंतु उत्सवांत अशा अकल्पित रीतीनें विघ्न आल्यामुळें पंतांना फार वाईट वाटलें व तशा स्थितींत ते भजनाला बसले असतां त्यांनीं दोन नवीन पदें म्हणून लडिवाळपणानें सद्‌गुरुमातेशीं गाऱ्हाणें केलें, तिच्यावर निष्ठुरतेचा आरोप करून तिला भक्तवत्सलब्रीदाची आठवण दिली व " भक्तच नाहीं तर तुझा महिमा कोण गाईल ? " असा टोमणा मारला. तीं पदें अशीं:—

" भक्तीचा वीट कां आला । भक्त नको जाहला ॥ ध्रु० ॥ क्षमानिधि तूं संत बोलती । निष्ठुर भाव कां केला ॥ १ ॥ महापराधी जाणुनी तूंची । चरणीं आश्रय दिधला

॥ २ ॥ आपुला म्हणवुनी टाकिसी दत्ता । अवधूता प्रेमळा ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. १५०५) व "दयानिधि तुज म्हणूं कैसें देवा । निष्ठुर झालासी । समयीं भेट न देसी ॥ ध्रु०॥ भक्ताभिमानी भक्तवत्सल । ब्रीद धारण करिसी । आतां विन्मुख कां होसी ॥ १ ॥ भक्तचि नसतां महिमा कोण । गाई दिननिशीं । गौरव कैसें मिरविसी ॥ २ ॥ भक्ति नसतां भजनप्रेम । केवीं भोगिसी । गर्जतो दत्त प्रेमरसीं ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. १५०६ ) उत्सवांतलि ठराविक कार्यक्रम उरकण्यांत आले व तशा स्थितींत उत्सव समाप्त झाल्यावर पंतांनीं कृतज्ञतापूर्वक पुढील पद म्हणून उत्सवाची सांगता केली. "प्रेमळ दत्ता पायीं पडतों । भक्ति दे मजला । घेईं नित्य सेवेला ॥ धृ० ॥ अज्ञ मूढ मी नेणें कांहीं । तुझ्या महिमेला । परी मी प्रेमा भुकेला ॥ १ ॥ नको मुक्ति नको भुक्ति । वांछी न ज्ञानाला । तुझे पायीं भाव जडला ॥ २ ॥ अंतर जाणसी उत्सव सांग । त्वांचि करविला । प्रेमें दत्ता अर्पिला ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. १५०७ ) ज्याप्रमाणें १८९८ सालीं पंतांना अशौच आल्यामुळें गुरुद्वादशीच्या उत्सवांत अडचण उत्पन्न झाली त्याचप्रमाणें त्या तिथीच्या उत्सवाला पुढेंहि साधारणपणें दर वर्षी कांहीं ना कांहीं तरी अडचण येत गेली !

## प्लेगचा पुनः जोर व पंतांनीं सुचविलेले उपाय

१८९८ अखेर बेळगावमधील प्लेगचा आजार थोडा कमी झाला; तरी त्याचें उच्चाटन झालें नव्हतें. १८९९ च्या जून महिन्यापासून तो पुनः जोरावला व पंतांचे गुरुबंधु कृष्णराव यांचा भाऊ व पंतांचा शिष्य बंडु हा प्लेगनें वारला. त्या सुमारास म्युनिसिपॅलिटीतर्फे प्लेगप्रतिबंधक उपाय योजण्यांत आले व कित्येक लोक आपापलीं घरें सोडून बाहेरगावीं अगर गावाबाहेर झोपड्या बांधून राहूं लागले. कित्येकांना तसें करणें सरकारकडून भाग पाडण्यांत आलें. याच संधीस पंतांचे मावसभाऊ आणप्पा यांची म्युनिसिपॅलिटीच्या दवाखान्यांत डॉक्टर म्हणून नेमणुक झाली. ते गणपतराव मारीहाळकरांचे धाकटे भाऊ असून त्यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण पंतांकडे राहूनच झालें होतें व पुढें पंतांच्या सांगण्यावरून पुण्यास जाऊन त्यांनीं हॉस्पिटल असिस्टंटची परीक्षा दिली होती. त्यांना म्युनिसिपॅलिटीच्या दवाखान्यांत नोकरी मिळाल्यापासून ते बेळगावांतच कायम राहूं लागले व पंतांच्याच घरीं राहात असत. त्यामुळें पंतांच्या घरीं जरूर तेव्हां औषधपाण्याची सोय होऊं लागली. पंतांचा परिवार फार मोठा असल्यामुळें ही जरूर वारंवार भासत असे.

जून–जुलै १८९९ च्या सुमारास बेळगावच्या आजूबाजूला व जवळ जवळ सर्व जिल्ह्यांत प्लेगचा फैलाव झाला. १७–८–१८९९ रोजीं कोल्हापूर येथील पंतांचे एक शिष्य बळवंत नारायण दंडवते यांना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत पंत लिहितात "प्लेग अद्यापि आहेच. अकोळ, बेडकिहाळ इकडेहि सुरू झाला आहे. दरसालप्रमाणें उत्सव (गोकुळाष्टमीचा) तेथें शांतपणें उरकून घ्यावा. समर्थचरणीं निराभिमानपणें निश्चिंत असावें." त्याच दिवशीं पंतांचे मेहुणे अंबाजी श्रीपाद कुळकर्णी, दड्डीकर यांना

लिहिलेल्या पत्रांत लिहितात " शाळा बंद झाली आहे. डेप्यूटी चिटणीसाचा चार्ज गोपाळानें घेतला × × × श्रीदत्तकृपाछत्राखालीं त्याचे भजनानंदांत निश्चित आहे." अकोळ येथे प्लेग सुरू झाल्यावर ती हकीगत अण्णांनीं पत्रद्वारें पंतांना कळविली. २७-८-१८९९ रोजीं त्या पत्राला लिहिलेल्या उत्तरांत " इतर रोगांप्रमाणें प्लेग हा सांथीचा रोग आहे. त्याला स्वरूप मात्र भयंकर दिलें गेलेलें आहे. धैर्य असावें. कधीं सवय नसलेल्या गोष्टीशीं एकाएकीं गाठ पडली कीं प्रथम मनुष्यास साहजिकपणें घाबरेपणा उत्पन्न होतो; नवल नाहीं. येथील प्लेगचें मान जशाचें तसेंच आहे; लौकर शमेल. बहुतेक गाव आपोआप खालीं झाला आहे; शिवाय खालीं केला जात आहे. तोडग्याचें कामहि झपाट्यानें सुरू आहे. " (पु. ४-१८८) असें लिहून पंतांनीं स्थानत्याग, स्वच्छपणा वगैरे प्लेगप्रतिबंधक कांहीं उपाय सुचविले आहेत. त्यानंतर पुढील दैविक उपाय सुचविला आहे. " नित्य भजन चालावें. श्रीगुरुचरित्राचा सप्ताह सुरू करावा. त्याजवर पूर्ण हवाला दिला असतां समर्थबालकांना भय असत नाहीं. त्याच्या कृपाछत्राखालीं, त्याच्या स्मरणांत त्याचें अभय-वचन आठवीत निश्चित राहावें " व त्याचे खालीं नुकतेंच म्हणजे १७-७-९९ रोजीं झालेलें पुढील पद दिलें आहे, " बाहु उभारुनी दत्त गर्जतो । भक्तासी राखितो ॥ धृ० ॥ कोणी न पाहे वक्र दृष्टिनें काळ चाकर तो ॥ १ ॥ रहा निश्चित नाम स्मरत । तापत्रय हरितो ॥ २ ॥ दत्तावधूत भजनीं रमतां । प्रेमस्तन पाजितो ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १५२६ ) आणि त्या पदाचे खालीं " नाभी, नाभी, नाभी " असें लिहून अभय दिलें आहे. धीर देणारा आणखी मजकूर लिहून पत्र पुरें केल्यावर पंतांनी अकोळ येथील सर्व गुरुपुत्रांना पुढील उपाय सुचविला आहे. " सद्गुरुचरणीं अभिमान अर्पून निश्चितीनें त्याचें तीर्थच औषध, त्याचें भजनच पथ्य, त्याची अभयवाणीच सर्व दुःखप्रतिबंधक उपाय हीं चालू ठेवण्यास सांगावें" व त्यानंतर पुढील पद देऊन त्यांचा गौरव करून त्यांना धीर दिला आहे. "सद्गुरुभक्ता दुर्लभ ऐसें । नाहीं त्रिभुवनीं ॥ धृ० ॥ हरिहरब्रह्मां वंद्यचि होतो । पूज्य तो जनीं विजनीं ॥ १ ॥ अष्ट महासिद्धि होती दासी । मुक्ति लोळे चरणीं ॥ २ ॥ बाहु उभारुनी सांगतो दत्त । सत्य भक्तजननीं ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १५०९ ) प्लेगच्या भयंकर सार्थानें भयभीत झालेल्या अण्णाप्रभृति अकोळकर भक्तमंडळीवर " बाहु उभारून गर्जना करून " पंतांनीं दिलेल्या अभयवचनाचा काय परिणाम झाला असेल तें सांगणें नकोच !

## जिवलगाचा वियोग व दुःखालाप

वरील पत्र लिहिलें त्याच्या दुसरे दिवशीं श्रावण व. ८ म्हणजे गोकुळाष्टमी असल्यामुळें पंतांच्या घरीं उत्सव होता. तो निर्विघ्नपणें यथासांग पार पडला. बेळगावांत व आजूबाजूला प्लेगचें मान वाढतच होतें. पुढें अश्विनांत गुरुद्वादशीचा उत्सव जसजसा जवळ येत चालला तसतशी पंतांच्या घरीं उत्सवाची तयारी होऊं लागली. पण अश्विन व. ८ शके १८२१ (२६-१०-१८९९) रोजीं पंतांचे मावसभाऊ गणपतराव

मारीहाळकर हे शहापूर तालुक्यापैकीं चनवेनहट्टी या गावीं प्लेगनें निवर्तले. जेव्हां ही दुःखकारक बातमी पंतांना समजली तेव्हां त्यांना परमावधीचें दुःख झालें. त्या वेळी तशा स्थितीत आश्विन व. ११ शके १८२१ (३०–१०–९९) रोजीं, म्हणजे गुरुद्वादशीच्या आदल्या दिवशीं, ते भजनाला बसले असतां उत्सवामध्यें हें जें विघ्न आलें त्यासंबंधीं पुढील दुःखालाप काढून त्यांनीं सद्गुरूशीं प्रेमाचें भांडण केलें. "उत्सव नको जाहला। तरी कां भक्त राखिला ॥ धृ०॥ भक्ताभावीं गुरुपण न टिके। प्रेमाचा विसर कां पडला ॥ १ ॥ भक्ताभिमानी भक्तवत्सल तूं। भजनासी कां विटला ॥ २ ॥ चरणीं समरस करीं दत्ता। निर्वाण भाव उदेला ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. १५४८), व "कांरे भक्तांचा वीट तूं धरिसी। भक्तवत्सलब्रीद मिरविसी ॥ धृ० ॥ भक्तचि नसतां भक्ताभिमानी। कैसारे म्हणविसी ॥ १ ॥ भक्ताभावीं प्रेमाभाव। गौरव कैसे भोगिसी ॥ २ ॥ भक्ति करितों देईं प्रेम। दत्ता निजानंदरासी ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. १५४९) याप्रमाणें निर्वाण मांडून पतांनीं सद्गुरूला वाक्ताडण केलें खरें, पण लगेच हा सर्व समर्थ सद्गुरूचा चिद्विलास आहे; त्याची खूण त्याला ठाऊक; समर्थाला कोणीं नांव ठेवावें ? त्याच्या चरणी स्वस्थ पडून राहाणें एवढेंच आपलें काम, असें मनांत येऊन त्यांनी पुढील पद म्हटलें:—"समर्था कोणीं नाव ठेवावें। स्वस्थ चरणीं पडुनी राहावें ॥धृ०॥ चिद्विलासीं रमतो सदा। त्याची खूण त्यासी ठावे ॥ १ ॥ अनंतशक्ति अनंतविलास। अनंता स्मरावें ॥ २ ॥ पूर्णचकित दत्त पडला चरणीं। नेणे केवी उठावें. ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. १५५०). नंतर अशा प्रकारचीं सद्गुरूला उद्देशून आणखी दोन पदें म्हटल्यावर पंतांनी गणूअण्णाचे एकेक गुण आठवून त्याची पुढील पदानें स्तुति केली. "जय श्रीगणपती। दत्तध्यानें पावलासी परब्रम्हस्थिति ॥ धृ० ॥ त्यागमंडित धीरा। भक्तजनकंठमणिहारा। दत्तभजनलीला। भक्तप्रेमलोला। त्यक्ताभिमाना व्यक्त त्रिमूर्ति ॥ १ ॥ ब्रम्हानंदसक्ता। संसृतिसंकरविरक्ता। साधुजनप्रिया हृतदुर्धरमाया। अखंड स्वस्थिति ॥ २ ॥ प्रेमानंदरूपा। अकळंक अपहतपुण्यपापा। दत्तप्रिय श्रीगजानन तूं। बालावधूतभक्ति ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. १५५३) पंतांची वाणी म्हणजे वाक्सुमनांनीं सदा भरलेली परडीच होती. वरील पदाच्या रूपानें त्या परडींतील शेलक्या वाक्सुमनांची अंजुली आपला जिवलग आप्त, सुहृद व सखा जो गणपति त्याला अर्पण करून त्यांनीं आणखी एक नवीन पद म्हटलें व त्याचे शेवटीं "पडलों चरणीं नुठवी कदा। हीचि दत्ता मागणी" अशी सद्गुरूशी मागणी मागितली. अशा रीतीनें त्या दिवशीं पंतांनी सात नवीन पदें म्हटलीं व गुरुद्वादशीच्या दिवशीं "दत्तावधूतासम सद्गुरु नाहीं ॥ धृ० ॥" (द. प्रे. ल. १५५५), "किती वर्णूं गुरूची लीला। पायीं पडतां अहंभाव निमला ॥ धृ० ॥" (द. प्रे. ल. १५५६) व "दत्त देखिला। ब्रम्ह। दत्त देखिला ॥ धृ० ॥" (द. प्रे. ल. १५५७) हीं तीन नवीं पदें म्हटलीं.

१८९८ सालीं पंतांचे चुलते जिवप्पा निवर्तल्यामुळें पंतांना गुरुद्वादशीच्या उत्सवाचे वेळीं अशौच होतें. १८९९ सालीं गुरुद्वादशीच्या उत्सवाचे वेळीं त्यांना प्रत्यक्ष

अशौच जरी नव्हतें तरी गणपतरावांसारख्या अत्यंत जिवलग आप्ताच्या निधनानें त्यांना फार दुःख झालें होतें. त्यामुळें उत्सव कसा तरी उरकला. नंतर गणपतरावांचें उत्तर कार्य झालें. पण फार वर्षांचा जिव्हाळ्याचा संबंध एकदम तुटल्यामुळें पंतांना सर्वत्र उदासीन व शून्य वाटत होतें. तशा मनःस्थितींत गणपतरावांच्या निधनानंतर १४ व्या दिवशीं म्हणजे ८–११–१८९९ रोजीं पंत भजनाला बसले असतां त्यांच्या अंतःकरणांतील अनिमित्त बंधूच्या वियोगदुःखाचा उमाळा पुढील पदाच्या रूपानें बाहेर पडला. “ दशदिशा शून्य भासती । तुजविणें भक्त गणपति ॥ ध्रु० ॥ ” अशा प्रकारें सुरवात करून पंतांनीं गणपतरावांना “ इष्टभ्राता, जिवलग, सखा, निर्वाणीं पाठीराखा, भ्रमशावेरीची म्हणजे भ्रमरूपी रात्रीची राका म्हणजे चंद्रमा, अवधूतबोधाचें दिव्य ओक म्हणजे निवासस्थान” अशा शेलक्या व सार्थ विशेषणांनीं संबोधून “प्रपंचीं सदा उदासी । प्राकृतासम व्यवहरसी । निजानंदें वास समरसीं । तुजसम न मिळे त्रिजगतीं ” म्हणजे “प्रपंचांत सदा उदास राहून सामान्य माणसाप्रमाणें व्यवहार करीत होतास पण तूं सदा निजानंद भोगीत असून स्वस्वरूपाशीं नेहमीं समरस होतास. तेव्हां तुझ्यासारखा निजानंदसक्त व समरसमग्न पुरुष त्रिभुवनांत दुसरा कोणी मिळणार नाहीं ” असा त्यांचा गौरव केला आहे. नंतर त्यांच्या जाण्यानें स्वतःची कशी हानी झाली तें पंत पुढील शब्दांनीं सांगतात “ गुज कवणा सांगूं आतां । कवण निरविल मम चित्ता । दग्ध करिते अंतर चिंता । कोठें शोधूं शांतिदाता. ” अशा रीतीनें आलाप करून गणुअण्णाचे गुण आठवून पंत म्हणतात त्यानें आपणास “ अश्रांतपणें जागविलें । निजप्रेमपानें जागविलें । विषम ज्ञान त्यागविलें ” व त्याच्या वियोगानें आपली “ मातृविरहित बालस्थिति ” झाली आणि अशा प्रकारें सद्गुरुमातेचा वियोग झाल्यापासून मातृवत प्रेम करणारी ही दुसरी माता नाहींशी झाल्यामुळें एखाद्या विरहाकुल, निराधार, आईपोरक्या अर्भकाप्रमाणें आपली स्थिति होऊन “मन बुद्धि व्यर्थ भ्रमती । वृत्तिहि निशिदिनीं श्रमती । अभिमाना पूर्ण वमिती । मृतवत ते सगळे गमती । ” अशा प्रकारें मन, बुद्धि, वृत्ति यांच्या ठिकाणचा अभिमान गलित होऊन तीं सर्व मृतप्राय झालीं असें पंत सांगतात आणि “ प्रमाद दूर सारिता, भेदप्रतीति वारिता ” म्हणजे “ आपल्या ठिकाणचा प्रमाद दूर सारणारा व भेदबुद्धीचें निवारण करून अभेदबोधाची जागृति देणारा ” अशा प्रकारें गणूअण्णाला पुनः संबोधून अखेर वरिष्ठ सत्ताधारी जे प्रेमळ सद्गुरु बालावधूत त्यांचेकडे “ दत्ता देईं झडकरी शांति ” अशी पंतांनीं मागणी केली.

या पदांत ( द. प्रे. ल. १५५८ ) पंतांनीं आपल्या प्रिय गणूअण्णाला जी वाक्सुमनांची अंजुली वाहिली तिच्यावरून त्या उभयतांमधील संबंध किती जिव्हाळ्याचे होते याबद्दल यथार्थ कल्पना होते; तसेंच साधूचें रडणेंहि स्वरूपानुसंधानाला सोडून कसें नसतें हें स्पष्ट दिसून येतें. रागद्वेषवियुक्त अशा सत्पुरुषांना वियोगदुःख कां व्हावें अशी कित्येकांना शंका येण्याचा संभव आहे. पण खरा प्रकार असा आहे कीं समुद्रावर उठणाऱ्या लाटांप्रमाणें साधूच्या व विशेषतः प्रपंचांत राहून द्वंद्वांशीं तोंड देत राहाणाऱ्या

साधूच्या अंतःकरणांत पूर्व संस्कारांमुळें संयोग–वियोगजन्य सुखदुःखांच्या वृत्तिहि कधी कधीं उठतात. परंतु ज्याप्रमाणें तरंगाच्या उत्पत्तिस्थितिलयकाळीं जल जलपणानें कायमच असतें, त्याचप्रमाणें सुखदुःखांच्या वृत्ति उठून, खेळून, निमत असतांना सत्पुरुषांचें स्वरूपानुसंधान अखंड कायम असतें. त्यामुळें त्या सुखदुःखांचे त्यांच्यावर कांहींच परिणाम न होतां ते सागराप्रमाणें स्थिर गंभीर म्हणजे रागद्वेषातीतच असतात. आणखी असें दिसतें कीं पंतांना गणूअण्णांच्या वियोगानें दुःख झालें, त्यांनीं त्यांचे गुणानुवाद गायिले. पण वृत्तींचा क्षोभ होऊन हा जो प्रेमकल्लोळ झाला तो " वृत्त्युदयस्थितिलय-प्रकाशक " जे प्रेमळ सद्‌गुरु बालमुकुंद त्यांचे पुढें निवेदन करून त्यांचेकडे पंतांनीं शांतीची मागणी केली. रागद्वेषजन्य दुर्दम वृत्तींना अशा रीतीनें खेळविण्याची अजब युक्ति संतांनाच साधते ! व हा वृत्तिविलासरूपी सुंदर व सुवासिक वाक्सुमनहार गुंफण्याची कलाकृति अभिजात कवीचीच होय !

पंतांच्या अगोदर गणपतरावांवर बालमुकुंदांचा अनुग्रह झाला होता व त्यांना पंतांनीं लिहिलेल्या पत्रांतील मजकूर कानीं पडतांच बालमुकुंदांनीं शाप-ऊःशापाचें निमित्त करून पंतांना आपल्याकडे कसें ओढून घेतलें आणि कृपादेणगी देऊन पंथवृद्धिआज्ञा दिली वगैरे हकीगत प्रकरण ५ ते ९ मध्यें आलेलीच आहे. त्याचप्रमाणें प्रकरण ६ व ९ मध्यें गणपतरावांच्या ज्या दोन कानडी पदांचा मराठींत भावार्थ दिला आहे त्यांवरून ते पंतांना किती मानीत असत तें समजून येईल. वास्तविक पंतांचा जन्म ३–९–१८५५ रोजीं झाला व गणपतरावांचा २८–४–१८५६ रोजीं झाला म्हणजे वयानें गणपतराव पंतांपेक्षां लहानच होते. पण पंतांवर सद्‌गुरूचा अनुग्रह होण्याला गणपतराव मुख्यत्वेंकरून कारणीभूत झाल्यामुळें पंत त्यांना वडील भावाप्रमाणें मान देत. गणपतराव स्वभावानें अतिशय करारी, मनमोकळे व थोडे तापट होते. त्यामुळें त्यांचा सर्वांना मोठा वचक होता व पंतहि साधारणपणें त्यांना भिऊनच वागत असत. त्या उभयतांमध्यें फार सलगी असे व गणपतराव अलतग्यास राहात असल्यामुळें पंत वारंवार तेथें जात. दिवसेंदिवस प्रपंचपरमार्थदृष्ट्या पंतांचा होत चाललेला उत्कर्ष पाहून गणपतरावांना फार कौतुक वाटत असे व ते पंतांना अतिशय जपत असत. अडीअडचणीच्या वेळीं निरपेक्षतेनें व आपलेपणानें पंतांना सल्ला देणारा त्यांच्या गुरुबंधूंमध्यें गणतरावांखेरीज त्या वेळीं दुसरा कोणी नव्हता असें म्हटलें असतां चालेल. त्यामुळें सद्‌गुरुमातेच्या वियोगानंतर तिच्या ठिकाणीं मानिलेल्या या वडील गुरुबंधूच्या वियोगाचें दुःख पंतांना फारच व बरेच दिवस जाणवत होतें. गणूअण्णा असेपर्यंत आपल्यावर कोणी तरी प्रेमळ शास्ता आहे, वेळीं अवेळीं आपण कोठें चुकलों असतां उपदेशाच्या गोष्टी सांगून मार्गावर आणणारा व सद्‌गुरूच्या " येल्ला ठाविनल्लि नन्न हिडि" या अमृत वचनाची वारंवार जागृति देणारा आपला जिवलग सखा व अनिमित्त बांधव सन्निध आहे असा त्यांना विश्वास वाटे. पण तो दृष्टिआड झाल्यामुळें त्यांना वरचेवर त्याच्या आठवणी येत. २२–११–१८९९ रोजीं रावजींना

लिहिलेल्या पत्रांत पंत म्हणतात " तुझीं पत्रें पोंचलीं. उत्तर कां आलें नाहीं हें लिहून कळविणें नको. रावजी, अण्णा, गणू हे त्रिवर्गच अवधूत मत्त हत्तीस आवरून धरणारे. त्यांत तीक्ष्ण अंकुश, उजवा हात, खरा पाठीराखा, योगी, ज्ञानी, विरागी, आमचा वडील एकाएकीं फसवून वचन घेऊन निघून गेला. त्यामुळें मी असावा तसा ध्यानांत नाहीं. वृत्ति वेडावली आहे; कांहींच सुचेनासें झालें आहे. असो. जास्त लिहित नाहीं. " ( पु. ५–५४ ) याप्रमाणें दुःखातिशयानें आपल्याला जास्त लिहवत नाहीं असें पंतांनीं दर्शविलें खरें, पण लगेच त्याच पत्रांत त्यांनीं मिथ्या व क्षणिक जगांत विषम व्यवहार करीत असतां भक्ताचें कर्तव्य कोणतें तें पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. " हल्लींचा काळच विषम आहे. अशा समयीं धैर्यानें जर आम्हीं प्रसंगाला तोंड दिलें नाहीं तर आमचें सार्थक काय ? खोट्या स्थितींत क्षणभंगुरत्वाचा अनुभव पावलोपावलीं येत असतांना उद्यांकरितां तळमळत बसणें केव्हांहि शहाणपणाचें नाहीं. या मिथ्य, क्षणिक, प्रासंगिक, संबंधी, जगाचा, त्यांतील विषम व्यवहाराचा अभिमान समूळ टाकून समर्थाचें चिंतन, भजन करीत कैवल्याचा चढावा करावा व स्वानंदाची गुढी उभारावी हेंच कर्तव्य ! "

वरील पत्रांत गणूअण्णा " एकाएकीं फसवून वचन घेऊन निघून गेला. " असें जें पंतांनीं म्हटलें आहे त्याचा खुलासा २५-११-९९ रोजीं अण्णांना लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं केला आहे. त्या पत्राच्या सुरवातीला " भीष्म पडतांचि गेले सर्वांचेही पळांत आवांके। नसतां धुरंधर वृषभ बाळ-वृष भरें करूनि आ वांके"[ मो.अ.१–१०(१) द्रो.प.] ही मोरोपंतांची आर्या दिली असून तिच्या खालीं वर उल्लेख केलेलें " दशदिशा शून्य भासती। तुजविणें भक्त गणपति ॥ ध्रु० ॥" ( द. प्रे. ल. १५५८ ) हें सगळें पद दिलें आहे. त्यानंतर पंत म्हणतात " अवधूतमार्गाचा पूर्ण अभिमानी, अवधूतमस्तगजाचा प्रेमळ अंकुश, अवधूत स्थितीचा मूर्तिमंत पुतळा, बाळस्नेही, अखंड संयोगी, अढळ सिद्धांती, खडतर विरागी, उजवा हात, घरचा वडील, बोधरूपी निर्मल सूर्य, गणू अवधूत स्वरूपीं समरस झाला. " त्यानंतर " वियोगाखेरीज संयोगाचें महत्व नाहीं; दुःखाविना सुखच नाहीं. " " अगणित द्वंद्वें प्रकृतिपुरुषात्मक शिवशक्तीचा खेळ आहे. " " चिद्विलासाला आळा कोण घालील ? " वगैरे प्रकारचा सिद्धांतपर मजकूर लिहून पुढें पंत म्हणतात " भक्तगणांचा स्वामी स्वरूपैक्य पावल्यानें भक्तप्रेमपुष्ट अवधूतलीलाधारी निरंकुश वृत्तीला विरजण कायमचें पडलें ! ठीकच. अण्णा, रावजी, गणू बरोबरीचे, एकाहारीं शोभणारे. त्यांतील मुकुटमणी गळून पडल्यामुळें माळ अस्ताव्यस्त झाली आहे. प्रेमळाच्या भेटीचा योगदेखील नाहीं. काय लीला ! ! प्रेमाची जात खुळी असल्यामुळें प्रेमळाकरितां आतडें तिळ तिळ तुटतें. काय करावें ? ध्यान करीत ध्यानींच मुरावें; उपाय नाहीं. " इतकें लिहून झाल्यावर पंतांना प्रेमाचा उमाळा अनावर होऊन गणू एकाएकीं फसवून वचन घेऊन कसा निघून गेला तें त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. " तुम्ही प्रेमळ लोक खरोखरी विश्वासघातकी होत, निर्दय होत. कारण दुखण्यानें शेवटचें अंथरूण धरण्यापूर्वी एके गुरुवारीं बेळगाव मुक्कामीं अवधूत-दरबारीं कोणी नाहींसें

पाहून, एकाएकीं मी बेफाम असतांना अंकावर मस्तक ठेवून दीनवाणी " काळ कठीण आहे. तुझ्या पश्चात मी राहूं नये. तुझ्या समक्ष मला जाण्यास आज्ञा दे. आणि एवढी देणगी दिलीच पाहिजे. " असा हट्ट गणूनें धरून मला फसवून वचन घेतलें व त्या वचनाप्रमाणें आपला पणहि शेवटास नेला. खरा अवधूत-पंथांतील भीष्म ! प्रेमळा-विषयीं जितकें बोलावें तितकें थोडेंच. मायेला पाठपोट नाहीं. वृत्ति अगदीं उदास आहे. पुढील अवस्था तूंच अनुभवानें पुरी करून घे. प्रेमळाची आठवण करीत समर्थ-चरणीं वृत्ति लीन करून तादात्म्यानंदांत शांत आहें. " ( पु. ५–५७ ते ५९ )

२५–११–९९ रोजीं पंतांनीं अण्णांना पत्र लिहून गणूअण्णाच्या विरहानें आपणास झालेलें दुःख वर लिहिल्याप्रमाणें निवेदन केलें व त्याच दिवशीं आपला बाल-पणाचा मित्र व अतिशय प्रीतींतील गुरुबंधु गोपाळ श्रीपाद भागोजीकोप याची आठवण होऊन त्यांनीं त्यालाहि गणूच्या वियोगाची दुःखकारक वार्ता कळविली व तसें करीत असतां त्यांना सद्गुरु बालमुकुंद श्रीशैल्ययात्रेला जाण्यापूर्वी आणि गेल्यानंतर आपण गोपाळबरोबर काय काय खेळ खेळलों व दिव्य अनुभव घेतले त्यांची आठवण होऊन त्यांनीं गोपाळाला त्या पत्राच्या द्वारें त्या खेळांची व अनुभवांची आठवण करून दिली. त्या पत्रांत पंत लिहितात "तुझीं पत्रें पोचलीं. हकीगत समजली. प्रारब्धापुढें उपाय नाहीं. प्रसंगाला पाठ दिलीच पाहिजे. असा वियोग कधींच घडला नव्हता. उभयतांनीं श्रीदत्ता-पुढें प्रेमळ खेळ असंख्य खेळलों, भजनीं नाचलों. त्याची आठवण झाली कीं मन उदास होतें. तूं येथून गेल्यापासून उत्सवास रंग नाहीं; नामशेष झाले आहेत. तशांत गणू अल-तगे वगैरे बरोबर खेळलेले अवधूत-मार्गाचे स्तंभ प्लेगला बळी पडल्यामुळे सर्व कांहीं तुटल्यासारखें झाले आहे. अशा वेळीं तूंहि जवळ नाहींस. " याप्रमाणें गणू अण्णाच्या निधनासंबंधींचा मजकूर लिहिल्यावर आपण पूर्वी गुरुप्रेमसुख अनुभविलेल्या प्रसंगांची पंतांना आठवण होऊन अत्यंत जिव्हाळ्यानें ते लिहितात " दत्तप्रिया, पुन्हां पूर्वी-सारखे आम्ही तुम्ही मिळून प्रेमभरांत अवधूतवेषानें बेफाम होऊन समर्थापुढें नाच-ण्याचा प्रसंग श्रीदत्त आणील काय ? काय ते दिवस ! काय ती उमेद ! ! काय तो प्रेमा ! ! ! काय तो श्रीदत्तदर्शनमहिमा ! जागृतिं स्वप्नीं यति-अवधूत-रूपानें दर्शन देऊन वरचेवर आश्वासन देऊन, निजबोध प्रगट करून, भक्ति शिकवून भजनीं नाचवीत असलेली, अखंड प्रेमळ दत्तजननी आतां निद्रा करीत असेल काय ? भक्तबाळाचा विसर पडला असेल ! कीं विटली असेल ! कांहीं कळत नाहीं. त्याजकडे काय दोष ? आमचीच धारणा-शक्ति कमी ! असें तरी कसें म्हणावें ? तोच सूत्रधार, आम्ही बाहुल्या; त्यानें नाचवावें, आम्हीं नाचावें. कांहींच बोलवत नाहीं. आठवण होऊन मन तळमळतें. तुझा विसर कसा पडेल ? अभिन्नपणें दत्तचरणीं सतत लोळत आहों. त्याच्याच कृपेनें गाठी पडल्या. त्यानेंच जोडी नेमून दिली. " ( पु. ५–५९ ते ६२ )

वर लिहिल्याप्रमाणें गणूअण्णाच्या वियोगानें पंतांना जें अपरंपार दुःख झालें त्याचा त्यांना लौकर विसर पडला नाहीं. गणूअण्णाच्या निधनानंतर सुमारें दीड महि-

त्यानें जेव्हां दत्तजयंतीचा ( मार्गशीर्ष शु. १५ शके १८२१; ता. १६-१२-१८९९ ) उत्सव आला तेव्हां गुरुद्वादशीच्या उत्सवाच्या वेळीं त्यांची जशी स्थिति झाली होती तशी स्थिति होऊन दत्तजयंतीच्या आदल्या दिवशीं भजन करीत असतां पुढील पद झालें. " असती सर्वदेशी । दत्ता परी मीं झालों परदेशी ।। धृ० ।। दुःख मी किती भोगूं आतां । प्रभु म्हणविसी । कां रे निष्ठुर झालासी ।। १ ।। टाकीं देवपण भक्तासी सारुनी । राहीं सदा समरसीं ।। २ ।। भक्तीचा वीट नाहीं कदापी । दत्त रमला प्रेमरसीं ।। ३ ।। " (द.प्रे. ल. १५६९ ) व नंतर प्रेम देऊन उत्सव करवून घेण्याबद्दल त्यांनीं पुढीलप्रमाणें सद्गुरूंची प्रार्थना केली. " प्रेम देसी जरी उत्सव करीन मी । पडलों दीन पायीं । दत्ता ।।धृ० ।। भक्ति देउनी भजन करवीं । बुडवीं प्रेमडोहीं ।। १ ।। एकानेकविरहित बोध । जीव ब्रम्ह पाहीं ।। २ ।। बालमुकुंद धन्य सद्गुरु । रमतो दत्त पायीं ।। ३ ।। " ( द. प्रे. ल. १५७० ).

वास्तविक "जन्मचि नाहीं मृत्यु कैंचा । व्यर्थ कां भीसी " (द. प्रे. ल. १२४३) असें म्हणणाऱ्या व सर्व उत्पतिस्थितिलयाचा कारभार म्हणजे चिद्विलास होय ही ज्यांची दृष्टि त्या पंतांना गणूअण्णाच्या निधनानें इतकें अपरिमित दुःख होण्याचें कारण नव्हतें. पण त्यांच्या ठिकाणची सगुण प्रेमाची निरतिशय आवड हेंच त्या दुःखाचें कारण होय व २५-११-१८९९ रोजीं वेदपाळाला लिहिलेल्या पत्रांत "सगुण खेळाची आवड फार, म्हणून हळहळ वाटते" असें त्यांनीं आपणाला वियोगदुःख होण्याचें कारण सांगितलें आहे.

# प्रकरण ३५ वें

——:०:——

## गृहकानूंचा कडक अंमल; दोघां आरोपींवरील खटले; घरांतील व्यायामशाळा; परिक्षांचे समाधानकारक निकाल; मामांबद्दल कृतज्ञता व त्यांना पत्र; परिक्षांकरितां येणारे विद्यार्थी; बापू अभ्यंकर व त्याच्या विचारांत क्रांति.

——:०:——

### गृहकानूंचा कडक अंमल

देशपांडे गल्लींतील सुंठणकरांच्या वाड्यांत पंत राहावयास गेल्यापासून त्यांचेकडे विद्याभ्यासाकरितां राहिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच वाढली व १८९९–१९०० च्या सुमारास त्यांच्या घरांत शाळेंत जाणारे १२–१५ तरी विद्यार्थी होते. मागें लिहिल्याप्रमाणें विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे, त्यांचें शील सुधारण्याकडे व त्यांची शरीरप्रकृति सुदृढ राहण्याकडे पंतांचें फार लक्ष असे. या गोष्टी साध्य होण्याकरितां ईशप्रार्थना, जेवणखाण, निजणें-वसणें, व्यायाम, अभ्यास वगैरे घरांतील विद्यार्थ्यांचे रोजचे कार्यक्रम नियमितपणें चालणें अवश्य होतें. पण पंतांच्या घरीं भाविक, मुमुक्षु व जिज्ञासु मंडळींची येजा सारखी चालू असल्यामुळें घरांतील रोजचे ठराविक कार्यक्रम वेळच्यावेळीं पार पाडणें फार कठिण जात असे. १८९३ सालीं जेव्हां पंत मारुती गल्लींतील नाटेकरांचे घरांत राहावयास गेले तेव्हां सौ. यमनाक्कांची प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें आणि स्वयंपाक वगैरे घरांतील कामें करण्यास दुसरें कोणी नसल्यामुळें घरांतील व्यवस्था ठेवण्यासंबंधीं कांहीं नियम करण्यांत आले होते व त्यांना पंतांची मंजुरी मिळून त्यांची अंमलबजावणीहि सुरू झाली होती आणि त्यामुळें घरांतील रोजचे कार्यक्रम सुरळितपणें चालले होते. तरीपण पंत देशपांडे गल्लींतील वाड्यांत राहावयास गेल्यापासून त्यांच्या घरीं येणाऱ्या--जाणाऱ्या मंडळींचा भरणा पुष्कळ वाढल्यामुळें पूर्वीं केलेले नियम अपुरे वाटूं लागले. त्यामुळें त्या नियमांत जरूर त्या दुरुस्त्या करण्यांत आल्या व विद्यार्थ्यांकरितां म्हणून कांहीं नवीन नियम करण्यांत आले. या सर्व नियमांची अंमलबजावणी करण्याकरितां विद्यार्थ्यांमधून आणि वडील माणसांमधून जरूर ते अधिकारी नेमण्यांत आले व कोणीं एखाद्या नियमाचा भंग केल्याबद्दल योग्य अधिकाऱ्याकडून फिर्याद आल्यास योग्य ती चौकशी करून न्याय देण्याकरितां न्यायाधीशांचीहि नेमणूक करण्यांत आली.

पंतांचे बंधु गोपाळरावजी बेळगाव येथें मुलकी खात्यांत नोकर असल्यामुळें १९०३ अखेरपर्यंत त्यांचें वास्तव्य बेळगावांतच असे. त्यामुळें तेच प्रपंचाचा कारभार

पाहात असत. १८८१ च्या जानेवारी महिन्यांत पंतांनीं गोपाळाला इंग्रजी शिकण्याकरितां बेळगावास आणिलें व खडे बाजारांतील विठोबाच्या देवळानजीक असलेल्या आपल्या बिऱ्हाडीं त्याचेकडे प्रपंचाचा कारभार सोपविला याचा प्रकरण १२ मध्यें उल्लेख केलाच आहे. तेव्हांपासून गोपाळरावजीच तें काम करीत होते. त्यामुळें वर उल्लेख केलेल्या नियमांची अंमलबजावणी करणें, त्या नियमांत फेरफार करणें वगैरे कामें तेच करीत असत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ते सर्वाधिकारी होते व या कामीं त्यांना मदत करण्याकरितां व सल्ला देण्याकरितां पंतबंधु गोविंदरावजी, रामभाऊ कमतनूर व मुतालिक या तिघांचें एक मंडळ ( कौंसिल ) नेमिलें होतें. सर्वाधिकारी-इन्-कौंसिल घरांतील सर्व कारभार पाहात असत. नियमांची अंमलबजावणी करण्याकरितां रामभाऊ कमतनूर सेक्रेटरीचें काम करीत व त्यांचे हाताखालीं विद्यार्थ्यांपैकीं एक अंडर सेक्रेटरी नेमिलेला असे आणि पंतबंधु गोविंदरावजी मॅनेजरचें काम करीत. पहाटेस पाच वाजतां उठल्यापासून प्रातर्विधि, व्यायाम, भजन अगर ईशस्तवन, नियमित घागरी पाणी ओढणें, स्नान, संध्या, अभ्यास, बाजारहाट करणें, पत्रावळी लावणें, वक्तशीर भोजन करणें, वक्तशीर शाळेंत जाणें, सायंकाळीं फिरावयास जाऊन सात वाजतां परत आल्यावर हात पाय धुऊन व भस्म लावून संध्या करणें, सोवळें नेसून भोजन करणें, रात्रीं आठानंतर परवानगीशिवाय बाहेर न जाणें, दहा वाजतां झोपीं जाणें वगैरे विद्यार्थ्यांचे सर्व कार्यक्रम वक्तशीर व बिनबोभाट पार पडतील अशाबद्दल अंडर सेक्रेटरीला नेहमीं दक्षता बाळगावी लागत असे आणि कोणाकडून एखाद्या नियमाचा भंग झाल्यास व गुन्हा सौम्य स्वरूपाचा असल्यास अपराधी इसमास नुसत्या अगर कान धरून उटाबशा काढण्याची शिक्षा देण्याचा अधिकारहि त्याचेकडे असे. अभ्यास करणें, व्यायाम घेणें वगैरेंसंबंधीं फक्त विद्यार्थ्यांना लागू असणाऱ्या नियमांखेरीज बाकीचे नियम, एक दोन अपवादखेरीजकरून, सर्वांना लागू होते; त्यामुळें अपराधी इसम वयानें मोठा असल्यास व अंडर सेक्रेटरीच्या अधिकाराबाहेरचा गुन्हा घडल्यास तो सेक्रेटरीकडे अगर घरांतील मॅनेजरकडे तक्रार करीत असे व सर्वाधिकारी-इन्-कौन्सिल त्या गुन्ह्याची चौकशी करून आणि जरूर तर साक्षीपुरावा घेऊन निकाल करीत; अपराध शाबीत झाल्यास शिक्षा सांगत व सेक्रेटरीकडून त्या शिक्षेची अंमलबजावणी होत असे. साधारणपणें शेकडा नव्याण्णव फिर्यादींचा निकाल सर्वाधिकारी-इन्-कौन्सिल करीत असत. पण आरोपित वजनदार गृहस्थ असल्यास अगर गुन्ह्याचें स्वरूप तीव्र असल्यास क्वचित् प्रसंगीं खुद्द पंतांकडे तपासणीअर्ज होत असे व ते देतील तो निकाल अखेरचा समजण्यांत येई.

या नियमांची अंमलबजावणी फार कडक रीतीनें होत असल्यामुळें एखादे वेळीं घरांतील मोठ्या माणसांवरहि आरोपित होण्याची पाळी येई व शिक्षाहि भोगावी लागे ! अशा प्रसंगीं विद्यार्थ्यांना स्वाभाविक रीत्या फार मौज वाटत असे; त्यामुळें रामभाऊ कमतनूर, मुतालिक वगैरे मंडळींच्या स्वतःच्या वर्तनावर ते फार बारकाईनें नजर ठेवीत असत. या मंडळींचा पंतांशीं नेहमीं संबंध येत असल्यामुळें व आपला वशिला

दांडगा आहे अशा भावनेनें कांहीं कांहीं वेळां त्यांचें कांहीं नियमांकडे दुर्लक्ष होत असे. रामभाऊ कमतनूर हे गोपाळरावजींचे बालमित्र होते व १८९८ सालीं अकोळ येथील विष्णु दिवाण हा पंतांचे घरीं राहण्यास येण्यापूर्वी ते पंतांच्या खाजगी कारभाऱ्याचें काम करीत असत. त्यांना बेळगाव म्युनिसिपॅलिटींत नोकरी होती व त्यांचा बहुतेक वेळ पंतांच्या घरीं जात असे. १८९८ पासून जरी विष्णु दिवाण पंतांची खाजगी कारभारी या नात्यानें सेवा करूं लागला, तरी रामभाऊंचा पंतांशीं अति निकट संबंध येत असे आणि पंतांच्या घरीं येणाऱ्या भक्तमंडळींची व्यवस्था ठेवण्याचे कामीं रामभाऊ व मुतालिक यांची फार मदत होत असे. पंतहि त्या दोघांना सलगीनें वागवीत.

## दोघां आरोपींवरील खटले

१८९९ च्या नोव्हेंबर महिन्यांत एके दिवशीं असें झालें की मुतालिक हे रात्रीच्या वेळीं जेवणाची घंटा होतांच जेवणास आले नाहींत व आले ते भस्म न लावितां, संध्या न करितां आणि सोवळें न नेसतां जेवणास बसले; आणि दुसऱ्या एके दिवशीं रात्रीं घरांत जेवावयाचें नाहीं अशाबद्दल जेवणाच्या आधीं दोन तास सेक्रेटरीला खबर दिल्याशिवाय, ते दुसरीकडे जेवण्यास गेले आणि अशा रीतीनें त्यांनीं तीन नियमांचा भंग केला. त्याचप्रमाणें रामभाऊ कमतनूर हे भस्म लावून संध्या न करितां, सोवळें न नेसतां जेवणास बसले व त्यांनीं दोन नियमांचा भंग केला. लगेच अंडरसेक्रेटरीनें मॅनेजर पंतबंधु गोविंदरावजी यांचेकडे तक्रार केली व त्यांनीं सर्वाधिकारी-इन्-कौन्सिल यांचेकडे रीतसर फिर्याद दाखल केली. त्यावेळीं सर्वाधिकारी गोपाळरावजी हे फिरतीवर असल्यामुळें आरोपी मुतालिक व रामभाऊ यांनीं परभारें पंतांकडे जाऊन आपला गुन्हा कबूल केला व क्षमा मागितली आणि त्या-प्रमाणें मॅनेजर पंतबंधु गोविंदरावजी व अंडर सेक्रेटरी यांना सांगून ते मोकळे झाले. अंडर सेक्रेटरी व इतर विद्यार्थी यांचा या शिष्ट मंडळींवर फार दिवस डोळा होता, त्यामुळें अशा रीतीनें पंतांच्या पाठीशीं लपून या दोघां आरोपींनीं न्यायासनासमोर सर्वांसमक्ष होणारी आपली चवकशी व फजिती टाळली ही गोष्ट त्यांना आवडली नाहीं. पुढें सर्वाधिकारी गोपाळरावजी फिरतीवरून घरीं परत आल्यावर मॅनेजर व अंडर सेक्रेटरी यांनीं ही सर्व हकीगत त्यांचे कानावर घातली व आरोपींची उघड चवकशी झाली पाहिजे असा आग्रह धरिला. तेव्हां गोपाळरावजींना त्यांचें म्हणणें पटून त्यांनीं आरोपींना एकदम वरिष्ठ न्यायासनापुढें जाण्याचा अधिकार नव्हता असें ठरवून त्यांना कायदेमंडळांतून ( कौंसिलमधून ) सस्पेंड केलें, त्यांच्यावरील आरोपांची चवकशी सुरू केली; साक्षी पुरावा घेऊन त्या उभयतांना अपराधी ठरविलें व शिक्षाहि सांगितल्या. पण पंतांनीं स्वत: आरोपींना पूर्वीच क्षमा केलेली असल्यामुळें फक्त ताकीद देण्यांत आली व त्यांना कायदेमंडळांतील त्यांच्या जागांवर पुन: नेमण्यांत आलें.

येथें ही हकीगत जरा विस्तारानें देण्याचें कारण इतकेंच कीं त्यायोगें पंतांच्या घरां-तील कारभार किती शिस्तीनें, एकोप्यानें व हौसेनें चालत असे याची वाचकांना यथार्थ कल्पना

यावी. विद्यार्थ्यांच्या वर्तनाकडे पंतांचें स्वतःचें फार लक्ष असे आणि एखाद्या विद्यार्थ्यानें घरांतील देवाची पूजा करण्याची आपली पाळी चुकविल्यास, त्याचें स्नान झालेलें असल्यासहि ते त्याला पुनः थंड पाण्याचें स्नान घालून पूजा करण्यास लावीत असत व क्वचित् प्रसंगीं एखाद्या विद्यार्थ्याकडून शिस्तीचा भंग झाल्यास शिक्षाहि करीत. त्यामुळें त्यांच्या घरांतील कारभार एखाद्या गुरुकुलाप्रमाणें चालत असे.

ज्याप्रमाणें पैशाअडक्याचा व्यवहार वगैरे कारभार गोपाळरावजी पाहात असत त्याप्रमाणें घरांतील अंतर्व्यवस्था पाहण्याचें काम गोविंदरावजी करीत असत. घरांत काय हवें नको तें पाहणें, सर्वकडे स्वच्छता ठेवणें, गुरें व घरामागील बगीचा यांची योग्य व्यवस्था ठेवणें, उत्सवापूर्वी त्याची तयारी करणें, उत्सव चालू असतांना व्यवस्था ठेवणें व उत्सव समाप्त झाल्यावर निरवानिरव करणें वगैरे कामें ते फार कळकळीनें आणि दक्षतेनें करीत व जरूर तेव्हां विद्यार्थ्यांचें साह्य घेत. त्यांच्या गोड आणि मिनमिळाऊ स्वभावा-मुळें ते विद्यार्थ्यांना फार प्रिय वाटत व सर्वजण त्यांना मनापासून मदत करीत.

## घरांतील व्यायामशाळा

पंतांच्या घरांतील विद्यार्थ्यांना व मोठ्या माणसांना व्यायाम करण्याची घरींच व्यवस्था केलेली होती. गोपाळरावजी स्वतः व्यायामप्रेमी असल्यामुळें त्यांच्या देखरेखीखालीं घरांतील व्यायामखातें चालत असे. त्यांनीं आपले बालमित्र रामभाऊ कमतनूर यांना तालीममास्तर नेमिलें होतें. रामभाऊंना लहानपणापासून तालमीचा नाद असल्यामुळें त्यांना जोर, बैठका वगैरे देशी व्यायामपद्धतींची चांगली माहिती होती. त्यांचें शरीर चांगलें कमावलेलें असून मोठेपणींहि त्यांचा तालमीचा नाद कायम होता व त्यांनीं सँडोच्या डंबेलसच्या पद्धतीचीहि चांगली माहिती मिळविली होती. त्यांचा स्वभाव फार उमदा व मनमिळाऊ असल्यामुळें विद्यार्थ्यांचें त्यांचेवर फार प्रेम असे व त्यांचे हाताखालीं सर्वजण मोठ्या उल्हासानें व्यायाम करीत असत. १८९८ सालीं विष्णु दिवाण पंतांचे घरीं राहूं लागल्यापासून त्याचीहि रामभाऊंना व विद्यार्थ्यांना व्यायामाचे कामीं चांगली मदत होऊं लागली. त्याची शरीरसंपत्ति उत्तम असून त्याचें शरीर बांधेसूद व पिळदार होतें. त्याला तालमीचा फार शोक होता. त्यामुळें १८९९–१९०० च्या सुमारास पंतांच्या घरचा तालिमखाना चांगला भरभराटींत होता आणि आठ दहा हत्तींचे जोड, लहान मोठ्या पाच सहा जोड्या व एक पौंडापासून दहा पौंड वजनापर्यंतच्या कित्येक डंबेलसच्या जोड्या, स्प्रिंगचे डंबेलस, व्यायामासंबंधाचे सचित्र नकाशे, डंबेलसच्या निरनिराळ्या प्रकारांचीं चित्रें, एक मोठा आरसा वगैरे व्यायामोपयोगी पुष्कळशीं उपकरणें व्यायाम करण्याचे जागीं ठेविलेलीं होतीं. शिवाय सँडोचें एक सचित्र चरित्रहि रामभाऊंपाशीं होतें. त्यामुळें सर्व विद्यार्थी रोजच्या व्यायामाचा कार्यक्रम मोठ्या हौसेनें करीत.

सर्व विद्यार्थ्यांच्या, इतकेंच नव्हेतर घरांतील सर्व मंडळींच्या वर्तनाकडे पंतांचें व घरांतील चालक मंडळींचें फार लक्ष असे; त्याचप्रमाणे कोणालाहि कोणतेहि व्यसन असतां

कामा नये असा पंतांचा सक्त दंडक असे. तसेंच रात्रीं आठ वाजल्यानंतर कोणीहि विद्यार्थ्यानें परवानगीशिवाय घराबाहेर जावयाचें नाहीं व दहा वाजल्यानंतर इतर कोणीहि परवानगीशिवाय घराबाहेर पडावयाचें नाहीं असा नियम होता आणि त्याची अंमलबजावणी फार कडक रीतीनें होत असे.

## विद्यार्थ्यांबद्दल पंतांची आस्था

पंतांच्या घरांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांखेरीज परिक्षांच्या दिवसांत बेळगाव येथें होणाऱ्या निरनिराळया परिक्षांना बरेच विद्यार्थी कोणाच्या ना कोणाच्या तरी ओळखीनें पंतांच्या घरीं उतरत असत. रोज संध्याकाळीं ते घरीं परत आले म्हणजे परिक्षेमधील प्रश्नांचीं उत्तरें कोणीं कशीं दिलीं यासंबंधीं पंत चवकशी करीत व त्यांच्या प्रश्नांना प्रत्येकाकडून मिळालेल्या उत्तरांवरून तो पास होईल किंवा नाहीं याची त्यांना अटकळ होत असे. अशा विद्यार्थ्यांच्या जेवणाखाणाच्या सोईकडेहि त्यांचें फार बारकाईचें लक्ष असे. एकदां असें झालें कीं गणेश प्रभाकर काकतकर नावाचा एक विद्यार्थी मुलकी परिक्षेकरितां बेळगावास गेला असतां पंतांच्या घरीं उतरला होता. त्याच परिक्षेला बसणारे इतर कांहीं विद्यार्थीहि पंतांकडेच उतरले होते. परिक्षेच्या दिवशीं जेवणास कदाचित् उशीर होईल असें वाटून त्याच्या भिडस्त स्वभावामुळें घरांत चवकशी न करितां सकाळीं सुमारें ९।–९॥ वाजतां काकतकर जेवल्याशिवाय परिक्षेसाठीं हायस्कूलांत जाण्यास निघाला. त्या वेळीं पंत माडीवरील गॅलरींत उभे होते व त्यांनीं काकतकराला कपडे घालून सडकेवर जातांना पाहिलें; तेव्हां हा बहुतकरून जेवल्याशिवाय जात असावा अशी शंका येऊन, "काकतकर जेवलास काय ? परत ये " असें म्हणून त्यांनीं त्याला मागें फिरविलें व जेऊन जाण्यास सांगितलें. जेवण झाल्यावर आपण शाळेंत जातांना त्यांनीं त्याला आपल्या धमणींत घेऊन परिक्षेच्या जागीं नेऊन पोचविलें. त्यामुळें पंतांच्याच घरीं परिक्षेकरितां आलेल्या इतर विद्यार्थ्यांच्या पूर्वी तो परिक्षेच्या जागीं हजर झाला. रोज संध्याकाळीं तो घरीं परत आल्यावर 'पेपर कोणता झाला ? प्रश्न कोणते होते ? व उत्तरें काय काय लिहिलीं ?' यासंबंधीं पंत चवकशी करीत. शेवटल्या दिवशीं "तूं पास झाला आहेस," असें त्यांनीं त्याला सांगितलें व त्याप्रमाणें तो त्या वर्षी त्या परिक्षेंत उत्तीर्ण झाला.

## मामांबद्दल कृतज्ञता !

मागें उल्लेख केल्याप्रमाणें आपले मामा श्रीपादपंत दड्डीकर यांचेकडे पंत प्राथमिक शिक्षणाकरितां राहिले असतांना त्यांना जें वळण लागलें तेंच त्यांनीं पुढें कायम ठेविलें होतें. श्रीपादपंतांच्या घरीं आप्तेष्टांचे, स्नेह्यासोबत्यांचे व घरचे मिळून नेहमीं पाच सहा विद्यार्थी असत. १८८२ सालीं शहापूरच्या रस्त्यावरील कृष्टप्पा गोकाककर यांचे घरांत पंतांनीं बिऱ्हाड केल्यापासून त्यांचे घरीं त्यांचे सर्व बंधु व त्यांचा मेहुणा नाना हे विद्यार्थी होतेच व त्यांचे आप्तेष्टहि आपलीं मुलें विद्याभ्यासाकरितां त्यांचेकडे ठेवूं लागले. आपल्या

घरापेक्षांहि पंतांकडे त्यांची व्यवस्था चांगली राहाते अशीं त्यांना खात्री वाटत असल्या-मुळें त्यांना काळजी वाटत नसे व तेथें राहाणारीं मुलेंहि आपल्या स्वतःच्या घरापेक्षां पंतांच्या घरीं मोठ्या हौसेनें राहात असत.

पंतांच्या बंधूंपैकीं वामनरावजी हे १८९३ सालीं एल्‌एल्. बी. होऊन बेळगाव येथें वकिली करूं लागले. ते व त्यांच्या पाठचे बंधु नरसिंहराव हे एकाच वर्षीं म्हणजे १८८८ सालीं मॅट्रिक्युलेशन पास झाले. पण नरसिंहराव साधारणपणें अशक्त असल्यामुळें व आर्थिक अडचणीमुळें त्यांचें विश्वविद्यालयांतील शिक्षण बरेंच मागसलें. तरी पण त्यांनीं तो नाद सोडला नव्हता; वामनरावजी वकिली करूं लागल्यावर त्यांनीं बी ए. ची परीक्षा दिली व तेहि एल्‌एल्. बी. चा अभ्यास करूं लागले आणि १९०० सालीं त्यांची पहिली एल्‌एल्. बी. झाली. १९०१ च्या जानेवारी महिन्यांत वामनरावजींना मुन्सफाची जागा मिळाल्यामुळें ते नोकरीवर गेले व तोंपर्यंत नरसिंहराव दुसरी एल् एल्. बी. पास झाले नव्हते. त्यामुळें बेळगावांत पंतांच्या घरीं वकिली करणारा कोणीहि नव्हता. १९०१ च्या जून महिन्यांत एके दिवशीं " वामनराव नोकरीवर गेले व नरसू अजून पास झाला नाहीं, तेव्हां घरांत वकील कोणी नाहीं. " असें एका इसमानें म्हटलें. त्या दिवशीं पंत भजनाला बसले असतां त्यांनीं पुढील पद म्हणून आपण स्वतःच वकिली करीत असल्याचें सांगितलें. "करितों वकीली । अवधूतकिल्लीं । प्रेमानंदकेलि ॥ धृ० ॥ नाहीं माया नाहीं काया । निजस्थिति भरली ॥ १ ॥ बद्ध न कोणी मुक्त जीव । भ्रांति कुणा न झाली ॥ २ ॥ सद्‌गुरु नांदतो स्वानंदीं डुलतो । दत्ताची माउली ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १८११ ) याप्रमाणें "अवधूतानें दाखवून दिलेली जी प्रेमानंदक्रीडा आपण करितों तीच वकिली होय" असें पंतांनीं वरील म्हणण्याला उत्तर दिलें व " आपण वकिली करितों " असें म्हटल्या-बरोबर त्या वकिलीची सनद कोणती व कोणीं दिली हा जो प्रश्न उद्भवतो त्याला त्यांनीं पुढील पद म्हणून उत्तर दिलें. " दिधली मज सनद । निश्चितीची दत्तानें ॥ धृ० ॥ निजप्रेमास्तव भक्ति प्रगटूनि । पुरविला स्वानंद ॥ १ ॥ सदयहृदय सद्‌गुरु माउली । लाविते भक्तिछंद ॥ २ ॥ दत्तचि बालमुकुंद होउनी । दावी प्रेमानंद ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १८१२ ). पुढे सहा महिन्यांनीं म्हणजे १९०१ अखेर नरसिंहराव दुसरी एल् एल्. बी. पास झाले. पण त्यांची प्रकृति साधारणपणें अशक्त असल्यामुळें सुमारें एक वर्ष ते आपले बंधु वामनरावजी यांच्याजवळ राहात असत. पुढें १९०३ च्या सुरवातीला ते बेळगाव येथें वकिली करूं लागले.

१९०१ अखेर नरसिंहराव एल एल. बी. पास झाले हें वर सांगितलेंच आहे. त्याच वेळीं पंतांचे सर्वांत धाकटे बंधु शंकरराव बी. ए.ची परीक्षा पास झाले व पंतांचें मेहुणे शेषो श्रीपाद ऊर्फ बाबासाहेब कुळकर्णी इन्टरमीजिएटची परीक्षा पास झाले. बाबा-साहेबांचें मॅट्रिकपर्यंतचें इंग्रजी शिक्षण पंतांच्या घरीं राहून त्यांच्या देखरेखीखालींच झालेलें होतें. त्याच सालीं पंतांचे भाचे शंकर विरूपाक्ष पट्टोहाळ व अकोळमधील पंतांचे पहिले शिष्य विष्णुपंत कुळकर्णी यांचा मुलगा हणमंत हे दोघे पंतांच्या घरांत राहाणारे

विद्यार्थी मॅट्रिकची परीक्षा पास झाले. अशा रीतीनें एकाच वर्षी आपल्या बंधूंपैकीं एक एल् एल्. बी. व एक बी. ए; आपल्याच घरीं शिक्षण घेतलेला आपला मेहुणा इन्टर व घरांत शिकत असलेले दोघे विद्यार्थी मॅट्रिक या परिक्षांत यशस्वी झाल्याचें ऐकून पंतांना अत्यंत समाधान झालें व आपण इतकीं वर्षे कष्ट व झीज सोसून या तरुण मंडळींना सुशिक्षित करण्याचें जें ध्येय डोळ्यापुढें ठेविलें होतें तें साध्य होत असल्याचें पाहून त्यांना अत्यानंद झाला आणि त्यांच्या सांगण्यावरून सर्वांना जिलबी वाटण्यांत आली !

१९०१ च्या सुमारास विश्वविद्यालयाच्या सर्व परीक्षा नोव्हेंबर महिन्यांत होत असत व नाताळची सुट्टी सुरू होण्याच्या कांहीं दिवस अगोदर त्यांचे निकाल लागत. त्याप्रमाणें वरील पाचहि जणांचे निकाल वीस–एकवीस डिसेंबरच्या सुमारास बेळगावास समजले व त्यायोगें झालेल्या अत्यानंदाचें द्योतक म्हणून पंतांनीं वर लिहिल्याप्रमाणे जिलबी वाटण्यास सांगितली. परंतु पंतांसारख्या आत्मनिष्ठ ज्ञानी पुरुषाचे सर्वच व्यवहार आध्यात्मिकतेच्या प्रकाशांत होत असल्यामुळें त्यांचें स्वरूपानुसंधान कायमच असतें. त्यामुळें आपले दोघे भाऊ, मेहुणा व घरांतील दोघे विद्यार्थी आपापल्या परीक्षा पास झाल्याचें समजल्यावर लगेच २१–१२–१९०१ रोजीं जेव्हां ते भजनाला बसले तेव्हां आपण स्वतः कोणती परीक्षा पास झालों, अभ्यास कोणता केला व परीक्षा पास झाल्यामुळें आपणास कोणता लाभ झाला तें त्यांनीं पुढील पद म्हणून सांगितलें. ते म्हणतात "झाली परीक्षा पास । गुरुकृपें चुकला भवभयत्रास ॥ धृ० ॥ नाहीं अभ्यास नाहीं सोस । धरिली गुरूची कास ॥ १ ॥ सर्व खलु इदं ब्रम्ह । नाहीं द्वैतभास ॥ २ ॥ दत्तावधूतभजनीं रमतां । पाजी प्रेमरस ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २०३१ ) म्हणजे अभ्यास नसतां, सोस न करितां, आपण फक्त सद्‌गुरूची कास धरिली व त्यायोगें " सर्व खल्विदं ब्रम्ह " हा अनुभव स्थिरावून द्वैताचा भासहि नाहींसा झाला आणि त्या स्थितींत दत्तावधूताच्या भजनांत दंग झाल्यामुळें तो प्रेमरस पाजीत आहे हा सहजस्थितीचा आपला अनुभव त्यांनीं व्यक्त केला.

वर लिहिल्याप्रमाणें सदर परिक्षांचे निकाल ऐकून पंतांना जो अत्यानंद झाला त्याच्या भरांत त्यांना आपल्या मागील परिस्थितीची आठवण होऊन श्रीपादपंतमामांच्या उपकारांचें स्मरण झालें व २२--१२--१९०१ रोजीं त्यांनीं मामांना एक (न छापलेलें ) पत्र लिहिलें. तें फार महत्वाचें वाटल्यावरून त्यांतील कांहीं भाग खालीं देत आहोंत. त्यावरून श्रीपादपंतांचे व पंतांचे संबंध किती जिव्हाळ्याचे होते व मामांच्या उपकारांची पंतांना किती जाणीव होती याची यथार्थ कल्पना होते. सदर पत्रांत पंत लिहितात, " आपण वडिलांनीं ओनामा आम्हां बंधूंना प्रेमानें घालून दिलेला. तेंच बीज आपले वडिलांचे आशिर्वादानें वृक्षरूप होऊन, सर्वांनीं क्षुल्लक मानिलेले बाळीकुंद्रीकर फलरूपानें, खरे अंतःकरणाचे माझे खरे हितचिंतक वडिलांस आज चाखावयाला मिळालें. यांत माझें कांहीं कर्तृत्व नाहीं. आपला आशिर्वाद, श्रीदत्तमहाराजाची कृपा. चि. बाबा पास, शंकर पास, नरसिंह पास, आपण्णा, हणमू पास. हें वैभव मामा, आपल्या अन्नाचें, आपल्या निष्कपट

प्रेमाचें. आपले अनंत उपकार या बाळीकुंद्रीचे घराण्यावर झालेले फेड करण्याला आम्ही सगळे बंधु असमर्थ आहों. क्षणोक्षणीं आपलें निरपेक्ष प्रेम आठवीत राहाणें आमचा धर्म."

ज्या दत्तूला मामांनीं आपल्या जवळ आठ नऊ वर्षें ठेवून घेऊन पोटच्या मुलाप्रमाणें सांभाळलें व नमुनेदार गृहशिक्षण दिलें, जो १८७२ सालीं बेळगावास इंग्रजी शिकूं लागला व घरची अत्यंत गरिबी असूनहि मॅट्रिकची परीक्षा पास झाला व ज्याला त्यांनीं, आपल्या स्नेह्यांच्या आक्षेपांना न जुमानतां, आपली मुलगी यमनाक्का दिली त्याच दत्तूचें १९०१ सालीं वरील प्रकाराचें अत्यंत आदरपूर्वक व कृतज्ञताबुद्धीनें लिहिलेलें पत्र वाचून मामांना किती धन्यता वाटली असेल याची सहज कल्पना होते !

पंतांच्या घरीं राहून विद्याभ्यास करणाऱ्या मुलांत त्यांच्या आप्तेष्टांचीं, स्नेही सोबत्यांचीं व तिऱ्हाईतांचींहि मुलें असत. पंतांचे वर्गबंधु व गुरुबंधु, कृष्णराव हे १८९७ सालीं वारले. त्यावेळीं त्यांची आर्थिक स्थिति फार खालावलेली होती. त्यांना दत्तू व अनंत असे दोघे मुलगे होते व ते वयानें लहान होते. त्यामुळें कृष्णरावांचें कुटुंब आपल्या मुलांना घेऊन माहेरीं म्हणजे दड्डी येथें आपले वडील लक्ष्मणराव ऊर्फ भाऊ कुलकर्णी ( श्रीपादपंतांचे चुलते ) यांचे घरीं जाऊन राहिलें होतें. एकदां पंत दड्डीस गेले असतां कृष्णरावांच्या मुलांचें वय शिक्षणाशिवाय फुकट जात आहे असें पाहून त्यांनीं दत्तूला आपल्याबरोबर आणिलें व त्याला आपल्या घरीं ठेवून घेऊन त्याचें प्रवेशपरीक्षेपर्यंतचें शिक्षण करविलें. पुढें तो ती परीक्षा पास होऊन नोकरी करूं लागला. नंतर अनंताचेंहि प्रवेशपरीक्षेपर्यंत शिक्षण होऊन त्यानें नोकरी धरिली व हल्लीं ते दोघेहि सुस्थितींत आहेत. वास्तविक कृष्णरावांच्या निधनापूर्वी कित्येक वर्षें त्यांचा पंतांशीं फारसा संबंध नव्हता. परंतु तिकडे दुर्लक्ष करून पंतांनीं त्यांच्या वडील मुलाला शिक्षण देऊन त्या घराण्याच्या उन्नतीचा पाया घालून दिला हें त्यांच्या सौजन्याला व विद्यादानाच्या व्रताला साजेसेंच झालें. अशा कित्येक तरुण व होतकरू विद्यार्थ्यांना आश्रय देऊन पंतांनीं मार्गाला लाविलें. अशा रीतीनें १८८१ पासून पंतांनीं विद्यादानाचें जें व्रत स्वीकारलें होतें तें १८९८ सालीं ते देशपांडे गल्लींतील सुंठणकरांच्या वाड्यांत राहावयास गेल्यापासून विशेष रीतीनें फलद्रूप होऊं लागलें व त्यांचें घर म्हणजे खरेंखुरें गुरुकुल बनलें.

## " देव आहे कीं नाहीं " या प्रश्नाला उत्तर

पंतांच्या घरीं जे विद्यार्थी विद्याभ्यासाकरितां राहात असत त्यांना अभ्यासाबरोबर सदाचार व सद्वर्तनाचेंहि धडे सहज मिळत व त्यांच्यापैकीं बहुतेकांवर पंतांचा अनुग्रह होऊन अत्यंत दुर्लभ अशा सद्गुरुकृपेचा त्यांना अनायासें लाभ होत असे. हा लाभ पंतांकडे शिक्षणाकरितां राहिलेल्या विद्यार्थ्यांना झाला इतकेंच नव्हे तर परिक्षेकरितां त्यांचेकडे थोडे दिवस येऊन राहिलेल्या कांहीं विद्यार्थ्यांनाहि होत असे. मुलकी परिक्षेकरितां बेळगावास आल्यावेळीं पंतांच्या घरीं उतरलेल्या गणेश प्रभाकर काकतकर नावाच्या ज्या विद्यार्थ्याचा मागें उल्लेख केला आहे त्याच्यावर मागाहून पंतांचा अनुग्रह झाला. अशा

प्रकारचें दुसरें उदाहरण म्हणजे धारवाड जिल्ह्यापैकीं लक्ष्मेश्वर येथील एक विद्यार्थी बापू विनायक अभ्यंकर याचें होय. तो मॅट्रिक व स्कूलफायनल या दोन्ही परिक्षांना बसण्याकरितां बेळगावास गेल्यावेळीं, धारवाड येथील वकील काका घाणेकर यांच्या ओळखीमुळें, पंतांच्या घरीं उतरला होता. त्यावेळीं त्याचा मुक्काम तेथें सुमारें सात आठ दिवस होता. त्यापूर्वी पंतांशीं त्याची मुळींच ओळख नव्हती. पण परिक्षेच्या दिवसांत रोज त्यानें पेपर कसे काय लिहिले यासंबंधीं पंत चवकशी करीत व आपण काय काय लिहिलें तें तो त्यांना सांगत असे. तसेंच तो फुरसुदीच्या वेळीं निर्भीडपणें आपल्या शंकाकुशंका त्यांच्यापुढें मांडी व ते मोठ्या कौतुकानें त्याच्याशीं वादविवाद करून त्याचें समाधान करीत. परिक्षेकरितां बेळगावास आल्यावेळीं बापूचें पंतांच्या घरीं जें सात आठ दिवस वास्तव्य झालें त्या अवधींत ब्रह्मविद्यापारंगत असे पंत आणि देव नाहीं, धर्म नाहीं, हें सर्व थोतांड आहे, अशी ज्याची प्रामाणिक समजूत होती असा बापूसारखा अल्लड, हुषार, मोकळ्या मनाचा व उमद्या स्वभावाचा अनोळखी मुलगा यांचेमध्यें अध्यात्मविषयासंबंधीं जो संवाद होत असे व त्याला जो अनुभव येत गेला त्यासंबंधीं पुढें वकिली करूं लागल्यावर बापूरावांनीं जें सुंदर वर्णन केलें आहे तें वाचून पंतांच्या मार्मिक विवेचनपद्धतीसंबंधीं वाचकांना यथार्थ कल्पना येईल असें वाटल्यावरून तें होतां होईल तों त्यांच्याच शब्दांत येथें देत आहोंत. बापूराव म्हणतात "घरगुती परिस्थिति व मनाची स्थिति माझ्या समजुतीप्रमाणें फारच हृदयद्रावक व दुःखदायक होत गेल्यामुळें मनाची अस्वस्थता फारच होऊन वृत्ति बेफाम होऊन दुःखसमुद्रांत वाहूं लागल्यामुळें पुष्कळ वेळां एकांतीं जाऊन रडलों, आक्रोश केला, तरी समाधानी कोणच्याहि उपायांनीं मिळेनाशी झाली होती. पुढें अकस्मात "माझी आई श्रीपंत" गृहीं परिक्षेकरितां बेळगावास जाणेचा प्रसंग आला व परिक्षेचे दिवसांत श्रीपंतांचे घरींच राहाणेचाहि योग सतत सात आठ दिवसांचा आला. त्या सात आठ दिवसांच्या माझ्या राहाण्यांत 'देव कोण, मनुष्य कोण' या महत्त्वाच्या विषयांची भाषा श्रीपंतांच्या तोंडांतून सारखी अहोरात्र निघालेली ऐकिली. तशी भाषा कोठेंहि ऐकणेंत आली नव्हती. त्या भाषेनें माझें समाधान होऊं लागलें. त्यामुळें व श्रीपंतांची भाषा गोड लागूं लागल्यामुळें मला त्यांच्यांशीं वाद करून कांहीं खात्री करून घेणेची इच्छा वाटूं लागली. त्या इच्छेच्या जोरावर मी माझी प्रत्येक शंका व कुकल्पना त्यांच्यापुढें मांडिली. त्या सर्वांचें ते, माझी समजूत पडेल अशाच भाषेंत बोध करून, बघतां बघतां निवारण करीत जात असत. त्यांचे भाषेंतील गोडी माझे अंतःकरणास गोड वाटत होती व त्यांचा बोध माझें खोटें स्वरूप वितळवून टाकीत असे व मला खऱ्या स्वरूपाकडे घेऊन जात असे. तें मला दिवसेंदिवस समजूं लागलेमुळें त्यांची भाषा व बोध नेहमीं ऐकत बसावें असें वाटून त्यांना सोडून मला जाववत नसे व देव कोण, समाधि म्हणजे काय याची खात्री त्यांच्याकडूनच समजेल असें मला वाटूं लागलें. "जगांत देव नाहीं, कांहीं नाहीं. उगीच 'देव' 'देव' म्हणत आम्हांस खुळे केलें; देवाचे भ्रमांत आम्ही पडलों व अशा रीतीनें आमची नुकसानी करून घेऊन

आयुष्य व्यर्थ घालविलें" असें माझें मत होतें. त्याप्रमाणें श्रीपंतांचें मत काय आहे, ते काय म्हणतात हें समजून घ्यावें म्हणून त्यांना " देव नसतां 'देव' 'देव' म्हणतात हें खरें की देव आहे हें खरें ? " असें मी विचारितां त्यांनी प्रारंभीं माझेच मताप्रमाणे आपलें मत देतांच, हे खरें बोलले, यांचें व माझें म्हणणें जुळलें असें वाटून मला आनंद झाला! आणि पुढें त्याबद्दलचा वाद घालणेस अगर वाद वाढविणेस मन मोकळें झालें. हें पाहून " देव " हा शब्द त्यांनीं पुढें झालेल्या भाषेंत न वापरतां Nature (नेचर) म्हणजे सृष्टिक्रम हा शब्द वापरून सर्व गोष्टी Nature (नेचर) नें चालल्या आहेत असें माझ्याकडून कबूल करविलें. 'स्वयंभू' हा शब्द जसा देवाबद्दल वापरतात तसा तो देवाबद्दल न वापरतां, प्रत्येक कृतीबद्दल ( जन्ममरण, निरनिराळ्या प्राण्यांची व झाडांची उत्पत्ति वगैरे ) वापरून मला ते बोध करूं लागले. " देव " शब्दाचा 'नेचर' या शब्दाच्या जागीं उपयोग केल्यास कांही चूक होते कीं काय ? " असें त्यांनीं विचारतां " चूक होणार नाहीं " असें मी बोललों. तेव्हां 'देव' शब्द वापरूनच पुढील गोष्टींचा विचार कर म्हणजे कोठें चूक होते कीं काय पहा. चूक झाल्यास तो शब्द वापरणेचें सोडूं या " असें मला सांगून प्रश्नोत्तरें सुरू करून 'देव नाहीं म्हणणें हें चुकीचें आहे, देव आहे हें खरें' असें त्यांनीं माझेकडून कबूल करविलें. ती माझी कबुली भ्रमाची नव्हती, माझे अंतःकरणपूर्वकची व माझे खात्रीची होती. आमच्या स्वाधीन नसलेली (जी) परस्वाधीन शक्ति तिच्यानें जगाचे सर्व कारभार चालले आहेत अशी माझी कबुली त्यांनीं घेतली व त्या शक्तीस नेचर (Nature) म्हणतात हें खरें असें मजकडून कबूल करविलें. पण देव म्हणजे काय याची बरोबर कल्पना माझी होईना हें त्यांनीं पाहिलें व मला वरचेवर कांहीं तरी विषय काढण्याचा तगादा लाविला. त्यांना सांगतां येऊं नये, 'आपलेकडून सांगणें होत नाहीं.' असें म्हणणेस त्यांना भाग पाडावें अशी उमेद व हट्ट माझा फार होता. त्या जोरावर नवीन नवीन तऱ्हेनें नवीन नवीन प्रश्न मी उकरून काढीत असें. प्रश्न टाकतांच त्याचा उलगडा फारच जलद, माझे अल्पबुद्धीचे अनुभवांतलि उदाहरणें घेऊन ते करीत असत! असें करतां करतां माझी प्रश्नसंख्या दिवसेदिवस कमी कमी होत गेली व रात्रंदिवस नवीन प्रश्न काढणेंतच माझा वेळ जात असे! पुढें पुढें प्रश्न निघाला तरच झोप येई; नाहींतर झोपच येत नसे. प्रश्न सुचण्यास केव्हां रात्रीं बारावर दोन तीन वाजत; नंतर झोप लागे. याप्रमाणें होतां होतां पुढें रोज एकच प्रश्न रात्रीं निघत असे. जास्ती प्रश्न निघेनासे झाले. पण चमत्कार असा होऊं लागला कीं जो एक प्रश्न रात्रीचे वेळीं मोठ्या श्रमानें निघालेला असावा, त्याचें उत्तर पंतांचे प्रथम भेटींतच त्यांचेकडून येत असे! तें उत्तर मी प्रश्न न विचारतां येत असे. एवढेंच नव्हे; तें प्रथमच येत असे; मध्यंतरीं कोणत्या तरी भाषेंत येत नसे. हें पाहून मी विचारांतच पडलों. याप्रमाणें एकसारखें एक दिवससुद्धां न चुकतां आठ दिवस चाललें. तेव्हां दिवसेदिवस माझें मन हलुवार होऊं लागून पंतांबद्दल जास्ती विचारांत मी पडूं लागलों. पंतांशी वाद सुरू होण्यापूर्वीं त्यांचेबद्दल माझे ठिकाणीं पूज्यता अगर भक्ति मुळींच नव्हती.

पंत पुष्कळ मास्तरांप्रमाणें एक मास्तर, त्यांतहि मिशनस्कूलचे मास्तर आहेत; त्यांना वेदांताचा नाद असून फक्त वाचन जास्ती केलेले आहेत. यापेक्षां हे कांहीं जास्ती किंमतीचे नव्हेत अशी माझी समजूत होती. ती समजूत माझा वाद पुरा होईपर्यंत गेली नाहीं, म्हणजे त्यांनीं घालविली नाहीं. त्यांची स्वतःची वर्तणूक अगर त्यांच्या घरच्या मंडळींची वर्तणूक अगर त्यांच्या घरीं येणाऱ्याजाणाऱ्या लोकांची वर्तणूक यांच्यावरून ही माझी समजूत बदलणेजोगी नव्हती. माझा वाद पुरा होईपर्यंत पंत हे थोर ज्ञानी आहेत अगर गुरुमार्गी आहेत अगर गुरु आहेत अगर पंतांचे शिष्य आहेत वगैरे कोणत्याहि विषयाची बातमी माझे कानावर आली नव्हती; त्यामुळेंच माझा वाद पंतांशीं चालत होता. नाहींपेक्षां वाद करणें माझेकडून मुळींच झालें नसतें. तसें झालें असतें तर माझ्या मनांतील शंका तशाच राहिल्या असत्या व समाधानहि झालें नसतें. यावरून पंतांबद्दलचें अज्ञानच मला फायद्याचें झालें यांत शंका नाहीं. रात्रीं माझे मनांत ठरविलेल्या प्रश्नाचें उत्तर सकाळचे पंतांचे प्रथम भेटींतच सारखें आठ दिवस निघालेलें पाहून पंतांबद्दल मी विचारांत पडून पंतांस कांहींतरी आगाऊ समजत असावें असा मनास सारखा भास होऊं लागला व त्याचा खुलासा त्यांचेकडून करून घ्यावा म्हणून "असा चमत्कार कां घडला ? त्याचें कारण काय ?" असा मीं त्यांना प्रश्न टाकला. तेव्हां पंत म्हणाले "तो कांहीं चमत्कार नव्हे. तसें होणें साहजिक आहे. त्याचा अनुभव तुला नाहीं म्हणून तुला चमत्कार भासला. प्रत्येकजण निर्विकल्प स्थितीस गेल्यास त्याच्यापाशीं निर्विकल्प नसलेले लोक येतांच त्या लोकांच्या कल्पनेच्या लाटा त्याच्या निर्विकल्प स्थितीवर आदळतात व तसें होतांच त्याची भाषा त्यांना अनुसरून निघते. म्हणजे शांत पाण्यामध्यें खडा पडतांच जसें सर्व पाणी हलूं लागतें त्याप्रमाणें तुम्ही मनांत प्रश्न घेऊन माझ्यापुढें बसतांच तुमचा प्रश्नरूपी खडा माझे शांत मनाच्या पाण्यांत पडतो व त्यापुढें जी भाषा माझ्या तोंडून निघते ती तुमच्या प्रश्नाचेंच उत्तर होते. सबब तसें झाल्यानें मला आगाऊ समजत असलें पाहिजे असा तुम्हांस भास होतो. पण तें खरें नव्हे." असें माझ्या प्रश्नास उत्तर देऊन त्यांनीं माझें समाधान केलें. लगेच त्यांना कांहीं तरी आगाऊ कळत असलें पाहिजे अशाबद्दलची माझ्यांत उत्पन्न झालेली त्यांच्याबद्दलची पूज्यभावना नष्ट झाली; म्हणजे त्या उत्तरानें माझ्यांत उत्पन्न झालेली पूज्यभावना त्यांनी नष्ट केली. याप्रमाणें ज्या ज्या वेळां कांहीं कारणानें त्यांच्याबद्दल पूज्यभावना माझे मनीं उत्पन्न होत होती त्या त्या वेळीं वर लिहिल्याप्रमाणें माझें समाधान होईल अशीं उत्तरें देऊन ती पूज्यभावना ते नष्ट करीत असत. आपला प्रतिष्ठितपणा अगर देवपणा अगर अवतारीपणा अखेरपर्यंत कधींहि त्यांनीं माझ्या मनीं भरूं दिला नाहीं. शेवटपर्यंत आपण तसाच मी, मी तसेच आपण, अशींच माझ्या मनाची स्थिति राखीत, माझ्याशीं वाद करीत असत. त्यामुळें त्यांच्याशीं वाद बंद ठेवावा असें मला वाटलें नाहीं. अशा रीतीनें माझ्या मनांतील सुखदुःखाच्या, मानापमानाच्या, पुनर्जन्माच्या, गरिबीश्रीमंतीच्या, मरणभीतीबद्दलच्या सर्व कल्पना आपल्या बोधशक्तीनें माझे मनास पटवून पंतांनीं नाहींशा केल्या. " माझें सुख दुःख वगैरे सर्व

मनाचे धर्म आहेत, मरण म्हणजे माहेरीं जाणें आहे, पापपुण्य हे अज्ञानाचे धर्म आहेत, पुनर्जन्म आत्म्यास नाहीं, जीवदशा ही माझी नसून देहाची आहे, देहाच्या सर्व क्रिया माझ्या असें समजणें हीच माया " अशा प्रकारची बोधवृष्टि त्यांच्या मुखें निघून माझें समाधान झालें व ती मला पटली. "

बापूची परीक्षा आटोपल्यावर आपल्या गावीं परत जातांना तो जेव्हां पंतांना नमस्कार करण्यास गेला तेव्हां " तुझ्या दोन्ही परीक्षा पास होतात बघ " असें ते त्याला म्हणाले. तेव्हां शुभ बोलावें म्हणून पंत हें सांगत असतील असें त्याला वाटलें. पुढें जेव्हां परिक्षेचा निकाल लागून दोन्ही परीक्षा पास झाल्याचें समजलें तेव्हां तो मुद्दाम पंतांना भेटण्याकरितां बेळगावास गेला व त्यांची भेट झाल्यावर त्यानें प्रश्न केला कीं " पंत, जें तुम्ही बोललां तें खरें कसें झालें व तें तुम्हांला अगोदर कसें समजलें ? " तेव्हां " सहज स्फूर्तीनें माझ्या तोंडून ते शब्द आले होते. म्हणून ते खरे झाले. यांत मीं कांहीं केलें नाहीं. सहज स्फूर्तीत जी वाणी निघते तीच ब्रह्मवाणी, सत्य वाणी अथवा गुरु-वाणी होय. सहज स्फूर्तीनें तुझ्या तोंडूनहि जे शब्द निघतील, ते खरे ठरतील. तेव्हां असें होण्यांत नवल कांहीं नाहीं. " असें सांगून आपल्या ठिकाणीं विशेष असें कांहीं नाहीं असें त्यांनीं त्याला दर्शविलें.

दिवसेंदिवस पंतांच्या प्रेमाकर्षणांत अधिकाधिक सापडला जाऊन बापू वारंवार त्यांच्या दर्शनाकरितां बेळगावास जाऊं लागला व त्यांचा शिष्य झाला, तें पुढें ओघा-नें येईलच.

# प्रकरण ३६ वें

---:०:---

## ज्ञानदानाचें व्रत; काका घाणेकरांच्या पुतण्याला प्लेग; काकांचा वीर निश्चय; शिष्यांच्या संख्येत वाढ; मोठा दरबार; बैंदुरकरांच्या कुटुंबाला भूतबाधा; डेव्हिल-वर्शिपर सत्पुरुष ठरला.

---:०:---

### पंतांचें ज्ञानदानाचें व्रत व त्यांच्या शिष्यांच्या संख्येंत वाढ

१८९८ सालीं अकोळहून निघतांना " आतां खेळ संपले. यापुढें फक्त ज्ञानदान चालणार " असे जे पंतांनीं उद्गार काढले होते त्याप्रमाणें ते सुंठणकरांच्या वाड्यांत राहूं लागल्यापासून अनुभव येऊं लागला व त्यांच्या शिष्यांची संख्या झपाट्यानें वाढूं लागली. १८९९ च्या सुमारास पंतांचे शिष्य काका घाणेकर हे धारवाडास वकिली करीत होते. त्यांच्याजवळ त्यांचे वडील बंधु आत्मारामपंत यांची एक मुलगी राहात असे व तिच्यावर त्यांचें फार प्रेम होतें. १८९९ सालीं ती प्लेगनें वारली व त्यामुळें काकांना अतिशय दुःख झालें. ही गोष्ट पंतांना समजतांच त्यांनीं साईंना त्यांचेकडे पाठविलें व ते घरीं राहून भजन, वेदांतचर्चा वगैरे करीत असत. त्यामुळें काकांचा फुरसुतीचा वेळहि सुखासमाधानांत जाऊं लागला. काकांच्या घरीं साईंचा मुक्काम सुमारें तीन वर्षें होता मागें उल्लेख केल्याप्रमाणें ते दिसण्यांत भव्य असून कफनी घालीत व त्यांची दाढी वाढलेली होती. ते भजन फार प्रेमळपणानें करीत, त्यामुळें रोज संध्याकाळीं भजनाच्या वेळीं काकांच्या परिचयांतील कांहीं मंडळीहि तेथें जमूं लागली. काकांचे वकिलीच्या धंद्यांतील भागीदार वासुदेव विनायक अभ्यंकर यांचा कित्येक वर्षें काकांशीं अति निकट संबंध असूनहि काका पंतांचे शिष्य होते ही गोष्ट त्यांना माहीत नव्हती; पण काकांच्या घरीं साईंचें रोज भजन होऊं लागल्यापासून साई म्हणत असलेलीं पदें कोणीं केलीं यासंबंधीं वासुदेवरावांनीं चवकशी केली व तीं पंतांचीं आहेत असें समजल्यापासून पंतांच्या दर्शनाला जाण्याची त्यांना उत्कंठा लागून राहिली. त्यांचे धाकटे बंधु बापूराव हे मॅट्रिक व स्कूलफायनल या परिक्षांच्या वेळीं बेळगावास पंतांच्या घरीं सात आठ दिवस राहून गेल्यापासून त्यांचा पंतांशीं चांगला परिचय झाला होता व पंतांकडून अनुग्रह घेण्याचें त्यांनीं निश्चित केलें होतें हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे.

१८९९ च्या सुमारास काकांच्या जवळ रहात असलेला त्यांचा पुतण्या कल्लप्पा याला प्लेग झाला. तेव्हां काकांनीं नामांकित डॉक्टरांचे उपाय केले, पण कांहीं गुण वाटेना. तेव्हां काकांनीं ते सर्व उपाय बंद ठेविले व पंतांनीं दिलेलें तीर्थ व अंगारा यांखेरीज रोग्याला कांहीं द्यावयाचें नाही असें ठरविलें आणि त्या दुखण्यांतून कल्लप्पा वाचल्यास त्याला बेळ-

गावास पंतांच्या दर्शनाला घेऊन जाण्याचा निर्धार केला. डॉक्टरचें औषध बंद केल्यानें काकांना कांहीं मंडळींनीं दोषहि दिला, पण ते लहानपणापासूनच धाडशी व दृढनिश्चयी असल्यामुळें त्यांनीं कोणाचेंहि न ऐकतां आपला निश्चय कायम ठेविला. हलके हलके कल्लप्पाला कल पडत चालला व कांहीं दिवसांनीं तो चांगला बरा झाला. तेव्हां त्याला घेऊन काका पंतांकडे गेले व त्याच सुमारास वासुदेवराव व बापूराव अभ्यंकर हे बंधु, त्यांचे स्नेही रामभाऊ गाडगीळ, गणपतराव गणपुले वगैरे बरीच मंडळी पंतांच्या दर्शनाला गेली आणि त्यांनीं पंतांकडून अनुग्रह घेतला. आणि पुढें लौकरच गणपरावांचे पुतणे पुरुषोत्तम वासुदेव गणपुले वगैरे बऱ्याच मंडळींवर पंतांचा अनुग्रह झाला. तसेंच आत्मारामपंत व त्यांचा मुलगा शंकर व काकांचा आणखी एक पुतण्या सोमनाथ ऊर्फ सोमण्णा हेहि पंतांचे शिष्य झाले. पुढें सोमण्णांनीं वकिलीची परीक्षा दिली व ते काकांच्या हाताखालीं वकिली करूं लागले. तसेंच बापूराव अभ्यंकर यांनींहि वकिलीची परीक्षा दिली व ते आपल्या गावां म्हणजे लक्ष्मेश्वर येथें वकिली करूं लागले. वरील मंडळींच्यामुळें धारवाडकडे आणखीहि पंतांचे शिष्य झाले.

१९०० पासून काकांच्या घरीं पंतांच्या शिष्यांपैकीं कोणी गेल्यास ते त्याला आग्रहानें कांहीं दिवस ठेवून घेत. त्यामुळें त्यांच्या गुरुबंधूंपैकीं कोणीना कोणी तरी नेहमीं त्यांच्याकडे असत व आपल्या शिष्यांपैकीं अगर विशेष परिचयांतील कोणी धारवाडास जावयाचा असल्यास काकाला भेटून येण्यास पंत त्याला सांगत असत. काकांच्या स्वतःच्याहि बेळगावास मधुन मधुन खेपा होऊं लागल्या व पंतांकडे त्यांचें चित्त अधिकाधिक ओढ घेऊं लागलें; तें इतकें कीं आपल्या घराच्या माडीवरील गच्चींत बसल्यावर बेळगावच्या दिशेनें येणारा वाराहि आपल्याला फार प्रिय वाटतो असे ते म्हणत.

१८९८ पासून बेळगावमध्येंहि पंतांच्या शिष्यांची संख्या वाढत चालली. बेळगावमधील पाटील घराण्यापैकीं भीमराव हे पूर्वीच पंतांचे शिष्य झाले होते. त्याचप्रमाणें त्यांचे आप्त सावंतवाडी येथील दळवी घराण्यापैकीं कानोजीराव ऊर्फ बाबासाहेब सेनापति हेहि पंतांचे शिष्य असून पुढें त्यांनीं पंतांच्या सांगण्यावरून शिंदे सरकारच्या लष्करांत नोकरी धरिली व ते मेजरच्या हुद्यापर्यंत चढले. तसेंच भिमरावांचे एक स्नेही दादाराव सावंत यांनींहि पंतांकडून अनुग्रह घेतला व दादारावांच्या सहवासानें त्यांचे तिघे बालमित्र, अनंतराव सडेकर पवार ( भीमराव पाटील यांचा मेहुणा ), कृष्णराव वाबळे व बाबासाहेब विरजे यांनींहि पंतांचें शिष्यत्व पतकरिलें. तो प्रकार असा.

अनंतराव सडेकर, कृष्णराव वाबळे व बाबासाहेब विरजे हे इंग्रजी शिकलेले असून त्यांची मॅट्रिकची परीक्षाहि झालेली होती. त्यांना वाचण्याचा फार नाद असे व उच्च विचार करण्याची सवय असल्यामुळें ते तसे विचार ज्यांत प्रगट झालेले आहेत अशीं पुस्तकें वाचीत. इंग्रज ग्रंथकारांपैकीं सर जॉन लबक ( लॉर्ड एव्हबरी ) त्यांच्या अत्यंत आवडीचे ग्रंथकार होते. सर जॉन लबक यांचीं "जीवितकर्तव्य" (The Use of Life) व "संसारसुख" (The Pleasures of Life) हीं पुस्तकें

त्यांना इतकीं आवडलीं होतीं कीं त्यांनीं कमींत कमीं वीस वीस वेळां तरी तीं वाचलीं असतील. तीं वाचून त्यांची अशी ठाम समजूत झाली होती कीं मनुष्याच्या जीवितांतील कर्तव्य व संसारसुख या संबंधींचे जे विचार सदर पुस्तकांत व्यक्त केले आहेत त्यांचे पलीकडे मनुष्याच्या बुद्धीची मजल जाऊं शकणार नाहीं. त्यामुळें सर जॉन लबक यांनाच गुरु मानून व त्यांच्या ग्रंथांत व्यक्त झालेले विचार आदर्शभूत समजून त्या धोरणानें आपल्या आयुष्याची नौका चालविली म्हणजे आपलें इहलोकचें कर्तव्य संपलें असें त्यांना वाटूं लागलें व ते त्रिवर्ग आणि त्यांचे स्नेही दादाराव यांची गाठ पडली म्हणजे त्यांचे दरम्यान मोठा कडाक्याचा वाद होत असे. ते तिघे म्हणत कीं गुरु झाला म्हणून सर जॉन लबकपेक्षां अधिक कांहीं सांगूं शकणार नाहीं व दादाराव म्हणत कीं " जोंपर्यंत समर्थ सद्‌गुरूशीं तुमची गाठ पडली नाहीं तोंपर्यंतच या तुमच्या गप्पा आहेत. असले हजारों ग्रंथ जरी तुम्हीं वाचलेत तरी सद्‌गुरुकृपेशिवाय आत्मशांति व खरी कर्तव्यजागृति यांचा लाभ होणें नाहीं. " पण त्या तिघांना तें पटत नसे.

अंनतराव सडेकर व बाबासाहेब सेनापति हे दोघे भीमरावांच्या घरीं राहात असल्यामुळें बाबासाहेबांच्या तोंडून अनंतरावानें असें पुष्कळ वेळां ऐकिलें होतें कीं " श्रीपंतांच्या घरीं सदा सौख्य नांदतें. मनुष्य कितीहि उदास असला तरी पंत त्याचें समाधान करून त्याला मनःशांति प्राप्त करून देतात. प्रत्यक्ष अनुभवाशिवाय प्रचीति येणार नाहीं. " तसेंच एकदां भीमरावांच्या शेतांत शेंगा खाण्याकरितां म्हणून कांहीं शिष्यमंडळीसह पंत गेले होते. तेव्हां अनंतरावहि भीमरावांबरोबर तेथें आला होता. त्यावेळीं पंतांचें आपल्या शिष्यमंडळीबरोबरचें सलगीचें वर्तन पाहून अनंतरावाला फार नवल वाटलें व पंतांबद्दल त्याला पूज्यभाव वाटूं लागला. इतक्यांत त्याच्या जवळ जाऊन पंतांनीं त्याच्या पाठीवर थाप मारली व ते म्हणाले " ईश्वरानें मानवी कर्तव्यासंबंधीं विशेष कडक नियम केलेले नाहींत. ज्या कांहीं उपाधि त्यानें मनुष्याच्या मागें लाविल्या आहेत त्या सुलभ उपायांनीं पार पाडतां येण्यासारख्या आहेत. परंतु मनुष्यप्राणि आपल्याच हृन्मंदिरांतील सन्मार्गदर्शक ईश्वरास सुखदुःखाच्या प्रसंगीं आठवण्याऐवजीं मृगजलाच्या पाठीमागें लागतो व दुःखी होतो. " ते पंतांचे अधिकारयुक्त वाणीनें निघालेले उद्गार ऐकून अनंतरावावर बराच परिणाम झाला, परंतु त्याचें समाधान मात्र झालें नव्हतें.

पुढें एकदां दादाराव सावंत व त्यांचे तिघे मित्र यांचें पुनः गुरूसंबंधीं बोलणें निघालें व भवति न भवति होऊन असें ठरलें कीं त्या तिघांनीं एकदां पंतांकडे जावें व तेथील अनुभव घेऊन मग आपलें जें मत होईल त्याप्रमाणें पुढें पंतांना गुरु करणें अगर न करणें तें ठरवावें. ती दुपारची वेळ होती. तेव्हां दादारावांच्या मनांत असें आलें कीं, आजच्या आज जर यांना पंतांकडे नेलें तर फार चांगलें होईल. पण त्या दिवशीं पंत बाळेकुंद्रीस होते. तेव्हां दादारावांनीं आपला विचार भीमरावांना सांगितला व त्यांना तो पटून त्यांनीं तावडतोब आपली गाडी जुंपण्यास सांगितली व ते, दादाराव, अनंतराव सडेकर व त्यांचे दोघे स्नेही असे पाच जण बाळेकुंद्रीस गेले. त्या वेळीं पंत आपल्या घरीं माडीवर

मंडळीसह बसले होते व त्यांचा बोधवर्षाव चालला होता. इतक्यांत भीमराव व दादाराव तेथें गले व आपल्याबरोबर तिघां तरुण मुलांना आणिल्याचें त्यांनीं पंतांना सांगितलें. लगेच पंतांनीं त्या तिघांना वर बोलाविलें व त्यांचें पंतांशीं थोडा वेळ संभाषण झाल्यावर त्यांच्या शंकाकुशंकांचें निरसन होऊन त्याच दिवशीं त्यांचेवर पंतांनीं अनुग्रह केला. तेव्हांपासून त्यांच्या विचारांत क्रांति होण्यास सुरवात झाली व ' न गुरोरधिकम् ' हा सिद्धांत त्यांना स्वानुभवानें पटला. पुढें पंतांच्या सांगण्यावरून सडेकर यांनीं मुंबईस जाऊन व्हेटरिनरी कॉलेजांतील अभ्यासक्रम पुरा केला व हल्लीं ते बडोदा संस्थानांत मोठ्या हुद्याच्या जागेवर आहेत.

वेळगावास बाबासाहेब फातरफेकर नावाचे मराठा ज्ञातीचे एक सुखवस्तु गृहस्थ राहात असत. त्यांचा तालिमखाना होता व त्या तालिमखान्यांत बरीच तरुण मंडळी तालीम करण्यास जात असत. बाबासाहेबांवर पंतांचा अनुग्रह झाला व त्यांच्यामुळें त्यांच्या तालिमखान्यापैकीं पुष्कळ मंडळी पंतांची शिष्य झाली. त्यांपैकीं जहांगीर अर्देसर जसा-वाला हे पारशी गृहस्थ होते. त्यांनींहि पंतांकडून अनुग्रह घेतला व ते भजनाच्या वेळीं व विशेषतः उत्सवप्रसंगीं पंतांच्या घरीं येत असत. वर ज्यांचा उल्लेख केला आहे त्यां-खेरीज वेळगावमधील पुष्कळ मंडळींनीं या सुमारास पंतांकडून अनुग्रह घेतला.

१८९८ नंतर बेडकिहाळ येथील माधवराव जनार्दन ऊर्फ बाळासाहेब इनामदार, बळवंत दामोदर ऊर्फ बाळासाहेब पागे, इनामदार, विष्णु बळवंत कुळकर्णी, विश्वनाथ हरि कुळकर्णी, सखाराम सोनार, भागोजी शिवमूर्ति वगैरे बेडकिहाळमधील बऱ्याच मंडळींनीं पंतांकडून अनुग्रह घेतला. त्याचप्रमाणें कुरुंदवाड येथील मोरेश्वर केशव दातार म्हणजे हल्लीं अवधूतबूवा म्हणून ज्यांची प्रसिद्धि आहे ते, रामभाऊ व गोपाळराव लेले हे बंधु व इतर कांहीं मंडळींवर पंतांचा अनुग्रह झाला. तसेंच कोचरी येथील सिदोजीराव व्यंकटराव ऊर्फ बाळासाहेब देसाई व अप्पासाहेब मजतीकर यांनीं पंतांकडून अनुग्रह घेतला आणि त्यानंतर कोचरी येथें पंतांचे पुष्कळ शिष्य झाले. कोल्हापूर येथेंहि हरि-भाऊ गोसावी, बळवंतराव व वासुदेवराव दंडवते व इतर पुष्कळ मंडळींवर पंतांचा अनु-ग्रह झाला. तसेंच, दड्डी, अकोळ वगैरे ठिकाणच्या पुष्कळ मंडळींनीं १८९८ नंतर पंतांकडून अनुग्रह घेतला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पंतांनींच म्हटल्याप्रमाणें, १८९८ पासून ज्ञानदान हेंच त्यांचें खरें कार्य होऊन बसलें. तसेंच पंतांकडे असे पुष्कळ लोक येत कीं त्यांना जरी पंतांकडून प्रत्यक्ष अनुग्रह झालेला नव्हता तरी त्यांचा बोध ऐकून अगर त्यांच्या संगतीचा लाभ होऊन त्यांचें पुढें कल्याण झालें.

कोणाहि शिष्यावर पंतांचा अनुग्रह होणें म्हणजे त्यांच्या अंतःकरणांतील प्रेम-सिंधूचा एक कालवा काढल्याप्रमाणें होत असे; कारण ते त्याला आपलें अंतःकरण देऊन त्याच्या अंतःकरणाचें प्रेमानें आकर्षण करीत असत. त्यामुळें त्या उभयतांच्या अंतः-करणांत प्रेमप्रवाह सुरू होत असे व प्रथम त्या शिष्याच्या ठिकाणीं जरी त्यांच्याबद्दल आदर व अदवी असे तरी त्यांचें त्याच्याशीं अत्यंत सलगीचें वर्तन सुरू होत असे. याचा



उभे— (१) शंकरराव (२) नरसिंहराव (३) डॉ. आणाप्पा ( मावस भाऊ )

बसलेले— (१) वामनराव (२) श्रीपंतमहाराज (३) गोविंदराव (४) रा. ब. गोपाळराव

उत्कृष्ट मासला, १९-१-१९०२ रोजीं थोड्या दिवसांपूर्वी अनुग्रह झालेला आपला शिष्य माधव याला त्यांनीं जें पत्र लिहिलें त्यांत, पाहावयास सापडतो. त्या पत्राला पुढीलप्रमाणें सुरवात केली आहे-" माधव (मा=स्फूर्ति; धव=सत्ता )=परब्रह्म ( यास ), दत्त ( द=दर्शन=स्फूर्ति; त्त=तळ=अधिष्ठान=सत्ता )=परब्रह्म याचा आशिर्वाद. तूं ब्रह्मच आहेस हा उपदेश." पुढें पंत म्हणतात "बापा, प्रेमाची जात खुळी आहे. शरण जातांच गुरूनें तुला गिळून टाकिला, तुझ्या अंतःकरणीं निजप्रेमरूपानें त्यानें ठाणें दिलें. आतां तूंच नाहींस मग तुझें कर्तव्य कोठील? आतां तुझ्या स्फूर्तिरूपानें सद्गुरुच दत्त, माधव म्हणून निजप्रेम भोगीत आहे. स्मरण चित्ताचा धर्म, त्याला प्रकाशक सद्रूप सद्गुरु. मग स्मरण कोणाचें कोणीं करावें? अरे कर्ताच नाहीं, ( मग ) कर्म कोठून उत्पन्न? ( मत्सरी किती तूं दत्ता । जगीं नुरविसी कर्ता ) ××× गंमत पाहा. प्रत्यक्ष डोळयांनीं एक पाहात असतां त्यास "तुम्ही" असें अनेकवचनी बोलतां. परंतु गुरुगृहीं आंत बाहेर एकच असल्यामुळें एकवचनच शोभतें. जर तुला बहुवचन दिलें असतें तर मला फार वाईट वाटलें असतें. कारण मी कपट केलें नाहीं; उघडा नागडा जसा आहें तसा तुझ्यासमोर उभा राहिलों. अशा केवळ प्रेममूर्तीला द्वैत-विशेषण सहन झालें असतें काय? तूं माझाच पोर म्हणून तुझे प्रेमोद्गार सरळ निघाले. ××× अरे बाळा, मी कांहीं झाकून ठेविलें नाहीं. बापहो! तुम्हांशीं कपट करून माझें जीवित काय? तुम्हीच माझे प्रेमदाते, बालावधूताचे अवतार; मज गरीब प्रेमभुकेनें तळमळणाऱ्या दत्ताकरितां, प्रेमामृत पाजण्याकरितां ( तोच ) शिष्यरूपानें समोर येतो आहे. ज्याचें त्यास देण्यांत पुरुषार्थ नाहीं. तुझ्या गुरुबंधूंशीं प्रेमानें वाग. कारण ते बंधु नव्हेत, ते मेले; त्यांच्या रूपानें दत्त नटतो आहे. त्याची सेवा कर म्हणजे प्रीति कर. हेंहि व्यर्थ. त्याचा तो करितो. तेथील गुरुपुत्रांकडून पत्र नाहीं. कशींहि असलीं तरी माझींच पोरें. माझें कर्तव्य मी करतोंच म्हणजे दत्त करवितोच. व्यवहारांत त्रास करून घेऊं नको; चिद्विलासांत नेम नाहीं. प्रवाहास अनुसरून राहा. इकडून वैरागी शुद्धाद्वैत दत्तध्यानानें तीर्थ, आंगारा पाठविला आहे. सर्वत्रांनीं हे सुदाम्याचे पोहे भक्षण करावेत. लोभ पूर्ण आहे." ( पु. ५--७१ ते ७३ ) वरील उताऱ्यावरून पंत व त्यांचे शिष्य यांचेमधील संबंध कशा प्रकारचे होते यासंबंधीं वाचकांना यथार्थ कल्पना येईल असा भरंवसा वाटतो.

## थाटाचा 'दरबार'

सुंठणकरांच्या वाड्यांत पंत राहूं लागल्यापासून तेथें जागा विपुल व सोईची असल्यामुळें त्यांच्या शिष्यांची येजा फार होऊं लागली आणि बरीच शिष्यमंडळी सवडीप्रमाणें मधुन मधुन बेळगावास पंतांच्या दर्शनाला जात व परत जाण्याला पंतांची परवानगी मिळेपर्यंत त्यांना तेथें राहावें लागत असे. १९०० सालीं जून महिन्यांत ज्येष्ठ वद्य ११ शके १८२२ रोजीं पंतांच्या घरीं पुष्कळ भक्तमंडळी जमलेली असल्यामुळें त्यांनी आपल्या वाड्यांत एक मोठा भजनसमारंभ केला. त्याला त्यांनीं "दरबार" म्हटलें आहे.

या दरबाराला अतिशय गर्दी झाली होतीच, पण त्याचा एक विशेष हा होता कीं त्या वेळीं सर्व पंतबंधु हजर होते. या समारंभाचे वेळीं भजनांत अपूर्व रंग भरून प्रेमाची जणूं लूट झाली आणि त्या प्रेमरंगांत पंतांनीं पुढील पद म्हटलें. " जन्मोजन्मीं दत्तसद्‌गुरु मिळे जरी मजला। प्रेमानंदें सहज येईन प्रेमासी भुलला ॥ धृ० ॥ अनेक योनी मीचि झालों नाहीं गुरु विसरला। म्हणुनी ब्रम्हानंदीं खेळतां अवतार झाला ॥ १ ॥ मागें पुढें आत्मा मीचि नाहीं दुजा दिसला। ब्रम्हानंदें स्वरूपछंदें दत्त पदीं रमला ॥ २ ॥ " ( द. प्रे. ल. १६५१ ) त्यानंतर त्यांनीं " देखियला दरबार। आजि अटला संसार ॥धृ०॥ भिन्नाभिन्न भावचि नाहीं। ब्रह्म सबराभर ॥१॥ बंध न मुक्ति गुरु शिष्य। नाहीं द्वैतबाजार ॥ २ ॥ दत्तावधूत पाहतां धणीभरी। लोटला प्रेमपूर ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. १६५२) हें पद म्हटलें व त्या अपूर्व प्रेमरंगांत " या थाटाचा हा शेवटचा दरबार आहे. पाहून घ्या" असें पंत म्हणाले आणि आरती म्हणण्यास सुरवात झाली. तेव्हां मध्यभागीं उच्चासनावर पंत बसलेले असून त्यांच्या दोन्ही बाजूंना त्यांचे भाऊ गोविंदरावजी, गोपाळरावजी, वामनरावजी व शंकरराव हे चवऱ्या व मोर्चलें घेऊन उभे होते आणि त्यांच्यासमोर त्यांचा भाऊ नरसिंह हातांत आरती घेऊन उभा होता. तेव्हां आपल्या सर्व बंधूंचें तें निरतिशय प्रेम पाहून पंतांचा कंठ दाटून आला व त्यांनीं पुढील पद म्हणून आपल्या प्रेमळ बंधूंचें व त्यांच्या उत्कट बंधुप्रीतीचें कौतुक केलें. " पाहिली गुरुमूर्ति। आजि मिळली निजशांति ॥धृ०॥ अमूर्त प्रेम दिव्य मूर्ति। पार्श्वभागीं शोभती ॥१॥ पाठीराखा अवधूतसखा। नरसिंह करी आरती ॥ २ ॥ सहज लीला सहज देखिली। दत्तबंधुप्रीति ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १६५४ ) याप्रमाणें बाजूला उभे असलेले आपले बंधु म्हणजे अमूर्त प्रेमाच्या दिव्य मूर्तिच होत व समोर आरती ओवाळीत असलेला नरसिंह म्हणजे पाठीराखा अवधूतसखाच होय असें सांगून अशा रीतीनें शुद्ध प्रेमस्वरूप सद्‌गुरुमूर्तिच आज आपण पाहिली, सद्‌गुरूची सहज लीला आपणास पाहाण्यास मिळाली व निजशांतीचा लाभ झाला असें पंतांनीं म्हटलें आहे. येथें हें नमूद करणें जरूर आहे कीं पंतांनीं आपल्या सुमारें २८०० पदांमध्यें आपल्या घरांतील अगर नात्यांतलि व्यक्तींचा फार क्वचितच उल्लेख केलेला आढळतो. त्यांचे परमहंस आजोबा श्रीबाळकृष्णमहाराज यांनीं समाधि घेतल्यानंतर पंतांनीं " परमहंस गुरु बाळकृष्ण हा प्रेमाचा उदधि " ( द. प्रे. ल. ७०६ ) हें पद म्हटल्याचा मागें उल्लेख झालाच आहे. तसेंच त्यांचे मावसबंधु गणपतराव मारीहाळकर यांच्या निधनानंतर पंतांनीं त्यांच्या गुणवर्णनपर दोन पदें म्हटल्याचेंहि मागें नमूद केलें आहे. आजोबा व मावसबंधु या पूज्य व प्रिय असलेल्या दोन्ही व्यक्तींचा वियोग झाल्यानंतर पंतांनीं त्यांचे गुण आठवून आपल्या आध्यात्मिकतेच्या भूमिकेवरून त्यांचें गुणवर्णन केलें आहे व पुढेंहि अशाच प्रकारें त्यांनीं एक दोन अत्यंत प्रिय व्यक्तींचीं वर्णनें त्यांच्या पश्चात केलीं. पण आपले सर्व प्रेमळ बंधु हजर असतांना त्यांच्या बंधुप्रीतीचें वर्णन करणारें १६५४ हें एकच पद आहे व त्यावरून पंत व त्यांचे पाच बंधु यांचेमधील संबंध किती प्रेमाचे होते याची साक्ष पटते.

वर लिहिल्याप्रमाणें पद १६५४ मध्यें बंधुप्रीतीचें वर्णन केल्यावर तेथें जमलेला तो प्रचंड भक्तमेळा पाहून पंतांना सद्गुरु बालमुकुंदांच्या भक्तवात्सल्याचें कौतुक वाटलें व त्यांनीं सद्गदित कंठानें पुढील पद म्हटलें. "जन्मोजन्मीं ऐसा सद्गुरु मिळावा। भक्तमेळा ऐसा सदा सजावा ॥ ध्रु. ॥ नलगे भुक्ति नलगे मुक्ति। पाहिजे नित्यानंद-मवा ॥ १ ॥ ईहपरासी लाथ मारुनी। वरूं आजी निजभावा ॥ २ ॥ दत्तची सद्गुरु आम्ही निजशिष्य। सोडूं नका कदा या दृढ भावा ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. १६५५.) म्हणजे आपणास भुक्ति, मुक्ति, इहपर सुख वगैरे कांहींहि नको; तर जन्मोजन्मीं श्रीबाल-मुकुंदांसारखा सद्गुरु व तेथें जमलेल्या एकनिष्ठ व दृढनिश्चयी भक्तांच्या मेळ्यासारखा भक्तमेळा यांचा नेहमीं लाभ व्हावा अशी इच्छा पंतांनीं व्यक्त केली. या दरबाराचे वेळीं "या थाटाचा हा शेवटचा दरबार आहे" असे जे पंतांनीं उद्गार काढले होते ते पुढें खरे ठरले. कारण पुढें लवकरच वामनरावजी नोकरीनिमित्त परगावीं गेले व दोन तीन वर्षांनीं गोपाळरावजीहि नोकरीनिमित्त बाहेरगावीं गेले. त्यामुळें सर्व पंतबंधु हजर असून अशा तऱ्हेचा भजनसमारंभ होण्याचा प्रसंग पंतांच्या हयातींत पुनः आला नाहीं.

## बैंदुरकरांचें मतपरिवर्तन

१९०० च्या सुमारास रामचंद्र सुबराव बैंदुरकर नावाचे कारवारकडील एक सारस्वत जातीचे गृहस्थ बेळगाव येथें कलेक्टरचे चिटणीस होते व पंतांचे बंधु गोपाळरावजी हे त्यांचे हाताखालीं डेप्युटी चिटणीसाचें काम करीत होते. बैंदुरकरांचा अंमल फार करडा असे व तो गोपाळरावजींनाहि जाणवत असे. बैंदुरकरांच्या कुटुंबाला फार दिवसांपासून रोज फिट्स् (झटके) येत असत व नामांकित डॉक्टरांचे उपाय करूनहि कांहीं गुण आला नाहीं. शेवटीं औषधोपचाराच्या नादीं न लागतां देव, धर्म, मंत्र, तंत्र अशापैकीं कांहीं तरी उपाय करून पाहावा असें बैंदुरकरांना वाटूं लागलें. आपल्या हाताखालचे डेप्युटी चिटणीस गोपाळराव बाळेकुंद्री यांचे वडिल बंधु हे कांहीं जादूटोणा वगैरे करितात असें बैंदुरकरांच्या कानावर होतें. त्यामुळें ते पंतांना "Devil Worshipper" (सैतानो-पासक) म्हणत असत. तरीपण या 'डेव्हिल वर्शिपर'कडून आपल्या कुटुंबाला कांहीं गुण येतो कीं काय पाहावें म्हणून त्यांनीं एके दिवशीं एक शिपाई बरोबर देऊन पंतांना आणण्याकरितां आपली गाडी त्यांच्या घरीं पाठविली. तो शिपाई जेव्हां गाडी घेऊन देशपांडे गल्लींत पंतांच्या घरीं गेला व त्यानें आपल्या जाण्याचा हेतु घरांतील मंडळीला कळविला, तेव्हां पंतांच्या भोवतालच्या मंडळींना ती गोष्ट आवडली नाही. त्या वेळीं देश-पांडे गल्लींत देव सांगणें, मंत्र–तंत्र करणें वगैरे छा–छूचे प्रयोग करणारा व दाढीमिशा वाढविलेला वेंकय्या नावाचा एक मद्रासी अय्या राहात असे. पंतांच्या घरांतील कांहीं मंडळींनीं बैंदुरकरांच्या गाडींतून वेंकय्याला त्यांचेकडे पाठवून दिलें. त्याला पाहून बैंदुरकरांना चमत्कारिक वाटलें व त्यांचा हिरमोड झाला; तरी पण त्यांनीं त्या अय्याला सर्व हकीगत सांगितली व त्यानें

आपल्याकडून शक्य ते उपाय योजिले, पण गुण आला नाहीं. तेव्हां कसेंहि करून पंतां-कडून कांही उपाय झाल्यास पाहावें असें बेंदुरकरांनीं ठरविलें; परंतु गोपाळरावजींपाशीं ती गोष्ट काढणें त्यांना बरें वाटलें नाहीं. त्या वेळीं बेंदुरकरांचे साडू कै. दत्तात्रय वेंकटेश नागर-कट्टी हे बेळगाव येथें कलेक्टरच्या कचेरींत कारकून होते. ते नेहमीं पंतांकडे त्यांचा बोध श्रवण करण्यास जात असत व पंतांना फार पूज्य मानीत ही गोष्ट बेंदुरकरांच्या कानावर-होती; आणि अशा 'डेव्हिल-वर्शिपर'च्या नादीं लागल्याबद्दल ते नागरकट्टींची कुचेष्टाहि करीत असत ! पण या प्रसंगीं त्यांनीं नागरकट्टींना मुद्दाम पंतांकडे पाठवून त्यांचेमार्फत सर्व हकीगत पंतांचे कानावर घातली. तेव्हां पंतांनीं अंगारा मंत्रून एका ताईतांत घालून तो नागरकट्टीपाशीं दिला व " हा ताईत नेहमीं बेंदुरकरांच्या कुटुंबाच्या अंगावर राहिला पाहिजे " असें सांगितलें. नागरकट्टींनीं तो ताईत बेंदुरकरांना नेऊन दिला व पंतांच्या सांगण्याप्रमाणें तो बाईच्या अंगावर नेहमीं राहिला पाहिजे असेंहि सांगितलें. बेंदूरकरांच्या कुटुंबानें तो ताईत गळ्यांत बांधल्यापासून त्यांना फिटस् येण्याच्या बंद झाल्या. पुढें एके दिवशीं त्यांच्या असें मनांत आलें कीं बहिर्दिशेला जातेवेळीं तो ताईत काढून ठेवणें चांगलें व त्याप्रमाणें त्यांनीं तो काढून ठेविला. तेव्हांपासून त्यांना पुनः फिट्स् येऊं लागल्या. तेव्हां आपण स्वत: कुटुंबाला घेऊन पंतांकडे जावें असें वाटून बेंदुरकरांनीं त्याप्रमाणें पंतांकडे अगाऊ वर्दी पाठविली व आपण दुपारच्या वेळीं सकुटुंब पंतांच्या घरीं गेले. आपले बंधु गोपाळरावजी यांचे वरचे अधिकारी या नात्यानें पंतांनीं त्यांचें योग्य तऱ्हेनें स्वागत केलें. नंतर बेंदुरकरांनीं आपल्या कुटुंबासंबंधीं सर्व हकीगत पंतांना सांगितली व पंतांनीं पुनः अंगारा मंत्रून देऊन पूर्ववत अंगाऱ्याचा ताईत सतत गळ्यांत बांधून ठेव-ण्यास सांगितलें. त्याप्रमाणें करितांच त्या बाईंना फिट्स् येण्याच्या थांबल्या व त्यांची प्रकृति सुधारत चालली.

याच सुमारास पंतांची आजी ( मातामही ) मथुराबाई या फार वर्षांनीं आपल्या लेकीकडे बेळगावास आल्या होत्या. पंतांचे घरीं वरचेवर मोठ्या थाटानें उत्सव होतात हें त्यांचे कानावर होतें. तेव्हां त्या एके दिवशीं पंतांना म्हणाल्या " दत्तू, तुझ्याकडे मोठे मोठे उत्सव होतात असें आम्हीं ऐकितों; पण मला उत्सव पाहण्याची संधि कधीं येत नाहीं. तुझ्याकडील उत्सव पाहाण्याची मला फार इच्छा आहे." तेव्हां त्या वेळीं उत्सवाचे दिवस नसतांनाहि पंतांनीं उत्सवाचे वेळीं होणारे सर्व कार्यक्रम यथासांग करून तीन दिवस उत्सव साजरा केला. त्यामुळें त्यांच्या आजीला फार समाधान व कौतुक वाटलें.

या उत्सवाचे निमित्तानें पंतांनीं एके दिवशीं बेंदुरकरांना आपल्या घरीं बोलविलें व त्याप्रमाणें ते सकुटुंब पंतांच्या घरीं गेले. तेथील भजन-समारंभ पाहून त्यांना फार समाधान वाटलें व पंतांशीं त्यांचें जें संभाषण झालें त्यावरून त्यांना पंतांच्या अधिकारा-संबंधीं थोडीशी कल्पना येऊन आपण ज्यांना 'डेव्हिल-वर्शिपर' म्हणत होतों ते सिद्ध पुरुष आहेत अशी त्यांची खात्री झाली आणि तेव्हांपासून त्यांची पंतांवर फार श्रद्धा बसली. नंतर कांहीं दिवसांनीं ते सेवानिवृत्त होऊन कारवारास जाऊन राहिले. तेथें

गेल्यावर त्यांचा पंतांशी पत्रव्यवहार चालू असे व त्यांनीं पंतांना एक श्रीदत्ताची मूर्ति पाठवून दिली. ३–७–१९०० रोजीं बेंदूरकरांना लिहिलेल्या पत्रांत पंत लिहितात "आपण अगत्यपूर्वक पाठविलेली श्रीची मूर्ति चांगली पसंत पडली. श्रीचें सतत दर्शन व्हावें व त्याबरोबर हमेषा प्रेमळ बंधूची आठवण व्हावी या हेतूनें माझ्या नेहमीं बसण्याच्या ठिकाणीं एक रंगीत कमान करून सुमुहूर्तावर सदरहू मूर्ति स्थापन केली आहे. सर्वांसहि अनायासें तिचें दर्शन होतें." (पु. ५-६२) त्यानंतर त्यांच्या कुटुंबाला कायमचा गुण यावा म्हणून पंतांनीं त्या पत्रांत कांहीं उपाय सुचविले व कांहीं उपदेशपर मजकूर लिहून पुढें पंत लिहितात "ज्या गोष्टी आपल्या स्वाधीन नाहीत त्यांसंबंधीं काळजी नको व ज्या गोष्टी स्वाधीन आहेत त्यांसंबंधींहि काळजी नको. 'Do not fret for what you can and do not fret for what you cannot' म्हणजे जी गोष्ट स्वाधीन आहे ती बेधडक सिद्धीस न्यावी व जी स्वाधीन नाहीं तिच्याबद्दल चिंता करण्यांत कांहीं अर्थ नाहीं." वगैरे व अखेर "सुज्ञांप्रति विशेष काय लिहावें ? आहे तो निष्कपट प्रेमा अखंड असावा. लोभ पूर्ण आहेच. श्रीच्या कृपेनें सर्व कांहीं कल्याणकारकच होईल. तर श्रीच्या ध्यानांत समाधानाचित्त राहाणें" असें त्यांनी लिहिलें आहे. अशा रीतीनें जे बेंदूरकर पंतांना 'डेव्हिल-वर्शिपर' समजून त्यांची चेष्टा करीत असत त्यांचें मतपरिवर्तन होऊन ते पुढें पंतांचे कट्टे भक्त बनले. कारवारास गेल्यावर कांहीं दिवसांनीं बेंदुरकरांच्या कुटुंबाच्या अंगांतील पिशाच्यानें पुनः त्यांना त्रास देण्यास सुरवात केली. तेव्हां त्यांनीं १४–७–१९०० रोजीं पंतांना तार करून विभूति व प्रसाद हीं मागविलीं. त्याप्रमाणें पंतांनीं तीं तावडतोब पाठविलीं व त्यांच्या योगें बेंदुरकरांच्या कुटुंबाला बरें वाटून त्यांनीं १६–७–१९०० रोजीं पंतांना जें पत्र लिहिलें त्यांत "पूर्वीप्रमाणें भूतिक उदबात्ति दिसूं लागली; तत्क्षणीं अन्यथा त्राता नसल्यानें आपल्यास तार केली" असें लिहून अंगाऱ्यानें बरें वाटल्याचें कळविलें. दिवसेंदिवस बेंदुरकरांच्या कुटुंबाच्या अंगांतील भूतबाधा नाहींशी होत जाऊन त्यांची प्रकृति सुधारत चालली. २३–८–१९०० रोजीं बेंदुरकरांनीं पंतबंधु गोपाळरावजींना एक इंग्रजांत पत्र लिहून त्यामध्यें आपणास आलेले अनुभव नमूद केले आहेत व पंतांच्या कृपेनें आपल्या कुटुंबाची प्रकृति सुधारत असल्याचें लिहिलें आहे आणि "हें सर्व पंतांच्या कृपेचें व आशिर्वादाचें श्रेय आहे" असें म्हटलें आहे. पुढें बेंदुरकरांच्या कुटुंबाची प्रकृति चांगली सुधारून त्यांना मुलेंबाळें झालीं व तें कुटुंब सुखानें नांदूं लागलें. बेंदुरकर पंतांना पूज्य मानीत इतकेंच नव्हे तर त्यांच्या बंधूंनाहि पूज्य मानीत व त्यांचेशीं त्यांचा पत्रव्यवहार चालू असे.

---

# प्रकरण ३७ वें

———— :०:————

## १८९८ व १९०० सालांतील स्फुट लेख; "माझें माहेर अथवा नऊ फेऱ्यांचा प्रेमभोंवरा"; राजयोगांतील दिव्य अनुभव; तत्वबोध; प्रेममिठीचा अपूर्व सोहळा.

———— :०:————

### पंतांचे स्फुट लेख

पंत सुंठणकरांच्या वाड्यांत राहूं लागल्यापासून, मागील दोन प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, जरी त्यांच्या घरांत विद्याभ्यासाकरितां राहाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येंत वाढ झाली व त्यांच्या शिष्यांची वाढ होऊन त्यांची येजा अधिकाधिक होऊं लागली तरी, त्यांना पूर्वीपेक्षां अधिक स्वास्थ्य मिळूं लागून कित्येक वर्षे दबून असलेली लेखनस्फूर्ति मधुन मधुन उसळी मारूं लागली व त्यांच्या लेखणीच्या द्वारें त्यांच्या अंतरंगस्थितीचें शब्दचित्र रेखिलें जाऊं लागलें. त्यांच्या बहुतेक लेखांचा विशेष हा आहे कीं त्यांच्यांत त्या त्या वेळच्या त्यांच्या अंतरंगस्थितीचें प्रतिबिंब स्पष्ट पडलेलें दिसतें आणि १८८२ अखेरपासून १८८६ च्या मार्च महिन्यापर्यंत त्यांच्या भोवतालच्या परिस्थितींत कसा कसा बदल होत गेला व त्यांच्या मनःस्थितींत कसकशीं आंदोलनें होत होतीं हें, त्या कालावधींत झालेल्या त्यांच्या वाङ्मयावरून, प्रकरण १८ ते २१ वें प्रकरण २३ मध्यें दाखविलें आहे. १८८६ पासून १८८८ पर्यंत त्यांचें फारच थोडें लेखन झालें व १८८८ पासून १८९८ च्या जून महिन्यांत, ते सुंठणकरांच्या वाड्यांत राहावयास जाईपर्यंत, "गीतासार" या लेखाखेरीज त्यांनीं एकहि लेख लिहिला नाहीं या गोष्टीचाहि मागें निर्देश केला आहे आणि तसें होण्याचें कारण काय यासंबंधींहि दिग्दर्शन केलें आहे. २५–९–१८९८ रोजीं त्यांनीं "भक्तीपुढें मुक्तीची किंमत नाहीं." हा लेख लिहिला. (पु. ६–२७९ ते २८१) व २७–१०–१८९८ रोजीं "जीवन्मुक्तस्थिति" हा दुसरा स्फुट लेख लिहिला. (पु. ६–२८१ ते २८८) या दोन्हीहि लेखांच्या मथळ्यांवरूनच ते पंतांच्या त्या वेळच्या मनःस्थितीचे निदर्शक होते हें उघड दिसतें. कारण त्या वेळीं ते मुक्तीवरील भक्तीचें अनुपम सुख अनुभवीत होते हें आतांपर्यंत जागजागीं दाखविलें आहे व विशेषतः प्रकरण ३१ मध्यें तर या गोष्टीचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. तेव्हां अशा स्थितींत त्यांना मुक्तीची किंमत वाटणें शक्यच नव्हतें. 'मुक्ति' हा शब्द सापेक्ष असल्यामुळें त्याच्याबरोबरच बंधाची कल्पना करावी लागते. पण "बंधमोक्ष स्वप्नींची कथा" (द. प्रे. ल. ११६) आहे अशी खात्री होऊन अद्वयभक्ति सोहाळे भोगणाऱ्या ज्ञानी भक्ताला मुक्तीची

किंमत कशी वाटावी ? म्हणून " भक्तीपुढें मुक्तीची किंमत नाहीं " या लेखांत पंतांनीं सद्गुरूची पुढीलप्रमाणें प्रार्थना केली आहे: " एखाद्या बाळ पक्षाला जेव्हां पंख फुटून त्यास उडण्याची शक्ति येते तेव्हां तो आपल्या मातेची गोडी धरीत नाहीं. तसा मी पक्क ज्ञानी होऊन मला तुझा विसर पडेल. याकरितां जळो तो धन्यपणा ! तो मला नको आहे. पिलाचे अंगीं स्वोदर भरण्याची शक्ति आली कीं, माता त्याला अन्न आणून मुखांत घालीत नाहीं. त्याप्रमाणें मला पक्कता आली कां तूं आपली कृपाझाक करशील; करितां ती पक्कता मला नको. तिजकडे ढुंकूनहि पाहात नाहीं. पिलूं सदा सर्वकाळ मातेचेंच ध्यान करीत असतें व त्याला स्वमातेवीण जगीं अन्य कांहीं दिसत नाहीं. तेव्हां माता त्याच्या पोटापाण्याची वगैरे सर्व काळजी वाहून त्याचें नित्य रक्षण करिते. परंतु तेंच पिलूं मोठें झाल्यावर माता त्याला दूर पाहूं लागते. तद्वत् जीवन्मुक्त पक्कज्ञानी यास तूं दूर पाहाणार; (या) करितां ती (जीवन्मुक्ति) नको. याकरितां मला त्या पिलासारखी अनन्य त्रिदोषरहित भक्तीची देणगी दे. मुक्तींत तुझ्या कृपेचा अभाव दिसतो. त्या स्थितींत भक्तवात्सल्य दावीत नाहींस; तर तिची गोष्ट तरी मुखानें कां काढावी ? कित्येक अल्पमति लोक असें म्हणतात कीं ' भक्तीचे योगानेंच सद्गुरु मुक्ति देतो; मग मुक्ति श्रेष्ठ कां मानूं नये ? ' परंतु असें म्हणणारे लोक केवळ ज्ञानवृद्ध होऊन बालकासारखेच वाटतात. खरोखर सोन्या-करितांच परिसाची श्रेष्ठता मानितात. परंतु परिसाची महिमा सोन्यास येईल काय ? तसें सद्गुरु, तुझ्या भक्तीची महिमा मुक्तीस येईल काय ? जो मनुष्य सोन्याचा लोभ धरून परीस टाकतो तो गांवढळच समजावा. तसाच जो मनुष्य भक्ति टाकून मुक्तीची अपेक्षा करितो तोहि जाणावा. " " जीवन्मुक्त स्थिति " या लेखांत त्यांनीं निरनिराळे दाखले देऊन " जीवन्मुक्त पुरुष नाना प्रकारचे जगव्यवहार करीत असतो, तरी तो जनकासारिखा विदहस्थितींत असल्यामुळें व्यवहारांत मोह पावत नाहीं " असें म्हटलें आहे व नंतर जीवन्मुक्तीची प्रशंसा केली आहे.

मुक्तीवरील भक्ति, अद्वैतभक्ति अथवा परा भक्ति म्हणजेच प्रेमलक्षणा भक्ति होय. सगुणनिर्गुणांचें अभेदत्व ज्याच्या ठिकाणीं पूर्णपणें बाणलेलें असतें असा ज्ञानी भक्त आपण स्वतः भक्तिप्रेमसुख अनुभवीत असतो इतकेंच नव्हे तर तो स्वत: प्रेमरूप बनून इतरांनाहि प्रेमाची देणगी देऊन धन्य करितो. १८९८ पासून पुढें पंतांची हीच भूमिका होती. ११-११-१८९८ रोजीं म्हणजे गुरुद्वादशीच्या दिवशीं त्यांनीं एक लहानसा लेख ( न छापलेला ) लिहून त्यांत " ॐ नमः शिवाय " या मंत्राचा अर्थ निरनिराळया प्रकारांनीं सांगितला आहे व त्याचे शेवटीं पुढील मजकूर आहे. " श्रीसद्गुरु बालावधूतानें परम कृपेंकरून दिलेला अद्वितीय बोध ॐकाररूपी दीन दत्तानें परम समर्थ दत्ता-वधूतचरणीं, शिवरूपीं, ' नमः ' शब्दानें अर्पून बोधऋण फेडिलें. आतां फक्त प्रेमार्थ स्थिति. " या लेखांत " आतां फक्त प्रेमार्थ स्थिति " असें जें पंतांनीं लिहून ठेविलें तें त्यांच्या त्या वेळच्या अंतःस्थितीचें द्योतकच होतें हें उघड आहे आणि या व पुढल्या प्रकरणांत उल्लेख केलेले लेख या गोष्टीची स्पष्ट साक्ष देत आहेत; किंबहुना

१८९८ पासून ज्ञानदान व प्रेमदेणगी हेंच त्यांचें मुख्य कर्तव्य होऊन बसलें होतें. त्यांनीं ६–२–१९०० रोजीं " अवधूत संप्रदाय, उपदेश " ( पु. ६—२८८ ते २९० ) आणि ८–३–१९०० रोजीं " तीन दशा " ( पु. ६—२९० ) या मथळ्यांखालीं टाचणें करून ठेविलीं असून त्यांपैकीं " अवधूत संप्रदाय, उपदेश " हें टाचण फार महत्त्वाचें आहे व पुढें योग्य स्थळीं त्याचा अधिक खुलासा होईल.

## " माझें माहेर अथवा नऊ फेऱ्यांचा प्रेमभोंवरा "

सुंठणकरांच्या वाड्यांत राहावयास गेल्यापासून पंतांकडे हजारों भक्त बाळभावानें येत आणि पंत त्यांना मातृस्नेहानें व पुत्रवात्सल्यानें वागवीत व प्रेमबोध करीत. त्यामुळें गुरुमातेच्या दर्शनाला आतुर झालेल्या भक्ताच्या भूमिकेची त्यांना बरोबर कल्पना होती व आपल्या स्वतःच्या भक्तभूमिकेवरील अनुभवहि त्यांच्या ठिकाणीं जागता होता हें "भक्ती-पुढें मुक्तीची किंमत नाहीं " या लेखांतील जो उतारा वर दिला आहे त्यावरून स्पष्ट दिसून येतें. त्यांनीं आपल्या एका भक्ताची भूमिका घेऊन १९०० च्या आक्टोबर महि-न्यांत " माझें माहेर अथवा नऊ फेऱ्यांचा प्रेमभोंवरा " हा जरा विस्तृत व सुंदर लेख लिहिला; पण तो अद्याप छापून प्रसिद्ध झालेला नाहीं. या लेखाच्या " माझें माहेर " या नावावरूनच त्याच्यांतील प्रतिपाद्य विषयाची थोडीशी कल्पना होते. सासुरवासानें गांजलेल्या व पुष्कळ दिवस सासरीं राहून कंटाळलेल्या एखाद्या कुलवधूची आपल्या प्रेमाचा गड्डाच जी माता तिला भेटण्याकरितां माहेरीं जातांना जशी स्थिति होते आणि तेथें गेल्यावर तिला जसे अनुभव येतात, तशीच स्थिति त्रिविध तापांनीं पोळलेल्या व फार दिवस सद्गुरूचा वियोग झाल्यामुळें त्याच्या दर्शनाला आतुर झालेल्या सच्छिष्याची गुरुगृहीं म्हणजे आपल्या माहेरीं जातांना होते व तेथें गेल्यावर त्याला तशाच प्रकारचे अनुभव येतात. सद्गुरु-सच्छिष्यांमधील शुद्ध व निरपेक्ष प्रेमाला उपमा द्यावयाची ह्मणजे मातृबालकस्नेहाचीच दिली पाहिजे. मातृप्रेम हें निरपेक्ष असतें, हें साधारणपणें खरें आहे. तरी पण, निदान हिंदुकुटुंबांत तरी, सासरीं गेलेल्या मुलीवर आईचें व आईवर त्या मुलीचें जें प्रेम असतें त्याच्याइतकें निरपेक्ष प्रेम, म्हणजे केवळ प्रेमाकरितां प्रेम, क्वचितच पाहावयास सापडतें. त्यामुळें श्रीतुकाराममहाराजांनीं श्रीकेशवाचा वियोग होण्याचे वेळीं आपली जी स्थिति झाली ती " कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ॥ तैसें झालें माझ्या जीवा " हा अत्यंत समर्पक दाखला देऊन व्यक्त केली. त्याचप्रमाणें पंतांनींहि आपल्या पदांत गुरुशिष्यांमधील प्रेमाला मातृबालकस्नेहाची वारंवार उपमा दिलेली आढळते. तरीपण त्या प्रेमाची अगर स्नेहाची तीव्रता व आतुरता व्यक्त करण्याकरितां सासुरवासानें गांजून जाऊन माहेरीं जाण्याला उतावीळ झालेल्या सासुरवाशिणीची त्यांनीं उपमा दिली आहे अगर स्वतःला तशा प्रकारची सासुरवाशीण कल्पून रूपक केलें आहे. अशा प्रकारचें एक बहारीचें रूपक " माहेरा जातें मी सद्गुरुघरा । नांदे निजशांति तेथें दुःख न जरा " ( द. प्रे. ल. २८१ ) या १८८९ सालीं झालेल्या आपल्या पदांत

केलेलें आहे. त्या पदांत पंत म्हणतात " भवारण्यांत वाट चुकलेली, मायानदींतलि वासनारूपी भोवऱ्यांत सापडलेली, मायाप्रेरित धन, मान, आप्तेष्टादि वैऱ्यांनीं मोह घालून उभयभ्रष्ट केलेली, भयंकर दुःख सोसून चिंताग्रस्त झालेली अशी आपण एक सासुरवाशीण असून आपण अवचित जंबुनगराला (कडेगुद्दीला) गेलों व तेथें " अनुताप बंधु घेऊनी। आल्या भक्ति विरति भगिनी। बोधसखा आला धांवुनी। नेलें मज आनंदभुवनीं। चिद्रत्नें लेववुनी। दाविलें गुरुवरा ॥ ५ ॥ " असा प्रकार झाला व त्या गुरुवराचें दर्शन होतांच " प्रेमभरें पडलें चरणीं। झाली अघटीत करणी। मस्तकीं ठेवुनी पाणी। वदली माय अभय वाणी। धरिलें पोटीं जेवीं हारिणी। चुकल्या लेंकरा ॥ ६ ॥ " असा अनुभव आला. आपण अहंतेचा घात करून संसाराला लाथ मारिली व गुरुरायानें हात धरून भवफेरा चुकविला आणि तेव्हांपासून " विसरुनी धन मन काय। स्मरतें अवधूतपाय। धन्य धन्य गुरुमाय। देखियला निजठाय। प्रेमसुख सांगूं काय। लाजते परा ॥ ७ ॥ " म्हणजे ज्याचें वर्णन करण्यास परा वाचाहि लाजते त्या अवर्णनीय प्रेम-सुखाचा आपणास अनुभव येऊं लागला आणि याप्रमाणें भक्तिबीज हस्तगत झाल्यामुळें सहज प्रेमपान करीत निरंजनमहालीं समाधीच्या शेजेवर उन्मनी-झोप घेत असतां चिद्वि-लास भजन मौज पहण्यास मिळाली.

अशा रीतीनें १८८९ सालीं आपणा स्वतःला सासुरवाशीण कल्पून पंतांनीं जो प्रेमानुभव व्यक्त केला तोच त्यांनीं १९०० सालीं लिहिलेल्या " माझें माहेर " या लेखांत निराळ्या तऱ्हेनें व्यक्त केला आहे; म्हणजे या लेखांत पंतांनीं आपल्याकडे (गुरु) मातेची भूमिका घेतली आहे आणि संसाराला अतिशय कंटाळून फार दिवसांच्या (गुरु) मातेच्या वियोगानें तिच्या भेटीला आतुर झालेल्या लेकीची (सच्छिष्याची) भूमिका आपल्या अत्यंत सलगींतील व प्रेमांतील शिष्य अण्णा अकोळकर यांचेकडे दिली आहे. या लेखाचें कथानक असें आहे कीं त्यांत आपण एका दत्तजयंतीच्या उत्सवाकरितां गुरुगृहीं गेलों, तेथील एकेका प्रेमळ व्यक्तीची भेट घेत घेत प्रेमभोंवऱ्याचे नऊ फेरे ओलांडून भोंवऱ्याचा मध्य जी उत्सवमूर्ति तिचें दर्शन घेतलें आणि अखेर भोंवऱ्याचा तळ जी गुरुमाता तिची भेट होऊन अवर्णनीय अशा समरससुखाचा अनुभव घेतला वगैरे हकीगत अण्णा अकोळकर सांगत आहेत. या लेखांत पंतांनीं अण्णांच्या मुखानें त्यांच्या (अण्णांच्या) माहेराचें रसभरित वर्णन करविलें आहे; अथवा त्यांनीं अण्णांची भूमिका घेऊन त्यांना गुरु-गृहीं आलेले अनुभव व्यक्त केले आहेत. ज्याला अण्णांनीं "माझें माहेर" म्हटले आहे तें म्हणजे पंतांचेंच घर होय. तेव्हां आपल्या घरांतील निरनिराळ्या व्यक्तींशीं अण्णांची भेट झाल्यावर अण्णांना काय काय अनुभव आले यासंबंधीं या लेखांत वर्णन करीत असतांना पंतांनीं सहज ओघानें आपल्याच घरांतील व्यक्तींच्या अंगच्या विशिष्ट गुणांचें शब्दचित्र काढलें आहे व अखेर अण्णांच्या भावनेत्रांना दिसणाऱ्या आपणा स्वतःचेंहि वर्णन केलें आहे. त्यामुळें पंतबंधूंनीं हा लेख छापला नसावासें दिसतें व हें त्यांच्या सौजन्याला साजेसेंच झालें. वास्तविक पंतांचें कोणतेंच लेखन छापून प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें

लिहिलेलें नव्हतें. तरी पण तें प्रसिद्ध झाल्यानें पुष्कळांना त्याचा फायदा घेतां येईल या हेतूनें पंतबंधूंनीं तें छापून प्रसिद्ध केलें व त्यांचा तो हेतु पुष्कळ अंशीं सफल झाला आहे. त्याच हेतूनें आम्हांस असें वाटलें कीं निदान या लेखांत बोधप्रद जेवढा भाग आहे—व तोच मुख्य आहे–तेवढा तरी वाचकांच्या पुढें ठेवणें अवश्य आहे आणि त्याप्रमाणें आमचा मानस पंतबंधु गोपाळरावजी यांस कळविला व पुढें दिलेला या लेखाचा सारांश प्रसिद्ध करण्यास त्यांनीं परवानगी दिल्यामुळें तो येथें देत आहोंत.

या लेखाचा थोडक्यांत सारांश असा आहे कीं पंतांची फार दिवस भेट झाली नसल्यामुळें अकोळ येथें असतांना एके दिवशीं अण्णांच्या मनाला फार हुरहुर लागून राहिली. तो दिवस मार्गशीर्ष शुद्ध १२ चा होता व दत्तजयंतीचा उत्सव जवळच आलेला होता. तेव्हां त्या उत्सवालाच आपण गेलों म्हणजे पंतांचें दर्शन होईल आणि त्यांचे घरीं होणारा उत्सवसोहळाहि पाहाण्यास सापडेल असा विचार करून त्यांनीं बेळगावास जाण्याचें ठरविलें. त्रयोदशीचा दिवस आवराआवर व तयारी करण्यांत गेला. चतुर्दशीच्या दिवशीं ते अकोळहून निघाले व गुरूच्या दर्शनाला रिक्तहस्तानें जाऊं नये या शास्त्राच्या दंडकाची आठवण होऊन त्यांनीं पंतांकरितां एक उत्तम तंबाखूची पेंडी बरोबर घेतली. ते दिवशीं संध्याकाळीं ते चिकोडीला गेले व तेथें वस्तीला राहून पौर्णिमेच्या दिवशीं प्रातःकाळीं बेळगावला जाणाऱ्या आगगाडींत बसले आणि बेळगाव स्टेशनवर उतरून टांगा करून, ज्याचें सविस्तर वर्णन प्रकरण ३४ मध्यें केलें आहे, त्या देशपांडे गल्लींतील पंतांच्या वाड्यासमोर आले. सदर प्रकरणांत त्या वाड्याचें जें वर्णन दिलें आहे तें नीट वाचलें असतां हा लेख समजण्यास सुलभ जाईल.

अत्यंत आतुरतेनें सद्गुरूच्या दर्शनाला जाणाऱ्या भक्ताच्या मनोभूमिकेचें पंतांनीं मूळ लेखांत फार सुरस वर्णन केलें आहे. सद्गुरुदर्शनाची इच्छा उत्पन्न झाल्यापासूनच अण्णांना शुभ शकुन होत जाऊन त्यांच्या चित्ताला अधिकाधिक उल्हास वाटूं लागला व पंतांच्या वाड्यासमोर टांगा येईपर्यंत त्यांच्या ठिकाणची पंतदर्शनलालसा अत्यंत तीव्र झाली. इतक्यांत तो उत्सवाचा दिवस असल्यामुळें वाड्याच्या माडीवर कोणीसें म्हणत असलेलें “ माहेरा जातें मी सद्गुरुघरा । नांदे निजशांति तेथें दुःख न जरा । ” हें पद त्यांचे कानीं आलें. त्याबरोबर जवळ–जवळ बेभान होऊन आपण प्रेमसरितेमध्यें पोहत आहोंत असें अण्णांना वाटूं लागलें. इतक्यांत टांगा आल्याचा कडका लागून पंतबंधु गोविंदरावजी टांग्याजवळ आले व आंत डोकावून पाहातात तों त्यांना अण्णा दिसले. तेव्हां अगोदरच प्रेमातिशयानें दिङ्मूढ झालेल्या अण्णांना त्यांनीं मोठ्या प्रेमानें व सलगीनें हात धरून गाडींतून उतरून घेतलें. तों “ अष्ट सात्विक भावांचें भरतें अनावर होऊन ” अण्णांचे “पाय लटपटूं लागले, डोळ्यांवाटें एकसारख्या प्रेमाश्रूंच्या धारा चालल्यानें क्षणोक्षणीं मन आपोआप अंतर्मुख होऊं लागलें. ” तशा स्थितींत ते चोहोंकडे पाहतात तों उत्सवानिमित्त सर्व वाडा श्रृंगारलेला असल्यामुळें तेथील अनुपम शोभा त्यांच्या नजरेस पडली; सर्वत्र आनंदीआनंद दिसूं लागला व तशा स्थितींत

गोविंदरावजी अण्णांचा हात धरून त्यांना पुढें चौकांत नेऊं लागले. तेव्हा " बोधसखा आला धांवुनी । नेलें मज आनंदभुवनीं " या माडीवर चाललेल्या पदांतील चरणाची त्यांना सत्यता पटली. प्रेमातिशयानें गोविंदरावजींनीं एकावर एक विचारलेल्या प्रश्नांनीं त्यांचें अंतःकरण भरून आलें व प्रेमभोंवऱ्याच्या पहिल्या फेऱ्यांत आपण सापडलों असें त्यांना वाटूं लागलें. त्यांतल्यात्यांत धीर करून ते प्रेमाचे हुंदके आवरतात तोंच चौकाच्या उजव्या हाताकडील कचेरींत कांहीं वकील व पक्षकार यांचेशीं बोलत असलेल्या वामनरावजींची त्यांचेकडे नजर गेली. त्याबरोबर ते एकदम उठून चौकांत गेले व अण्णांचा हात धरून त्यांनीं अण्णांना आपल्या कचेरींत नेलें. त्यांना तक्क्याला टेकून बसविलें व आपण बाजूला बसून त्यांचेवर कुशल प्रश्नांचा भडिमार सुरू केला. तेव्हां आपण एक यःकश्चित् खेडवळ मनुष्य असून वामनरावजींनीं इतर वकील मंडळींसमक्ष आपणास इतका मान दिला हें पाहून आपण प्रेमभोंवऱ्याच्या दुसऱ्या फेऱ्यांत सापडलों असें अण्णांना वाटूं लागलें.

थोड्या वेळानें तेथून उठून पंतांकडे जाण्याच्या निमित्तानें अण्णा दिंडी–दरवाजासमोरील सोप्यांत जातात तों पंतांचे मावसभाऊ डॉ. अण्णपा तेथें उभे होते. अण्णांना पाहातांच जवळ जाऊन " पंतांनीं आतांच तुमची आठवण काढली होती " असें त्यांनीं म्हटलें आणि अण्णांच्या प्रकृतीसंबंधीं बरेच प्रश्न विचारून आपल्या ठिकाणची कळकळ व्यक्त केली. त्यामुळें अण्णांना गहिंवरून आलें. हा तिसरा फेरा ओलांडून अण्णा माजघरांत पाय ठेवितात तों डावे बाजूकडील खोलींतील देवघरांत रुद्रघोष चाललेला कानां आला; म्हणून ते तिकडे गेले, तों पंतांच्या मातोश्री तेथें आल्या आणि त्यांनीं मोठ्या वात्सल्यानें व प्रेमळपणानें अण्णांच्या घरच्या माणसांची चौकशी केली व पंत त्यांची वाट पाहात असल्याचें सांगितलें. तें ऐकून अण्णांच्या ठिकाणची पंतदर्शनाची आतुरता अधिकच वाढली व मातोश्रींच्या ठिकाणचें तें वात्सल्य पाहून त्यांना फार धन्यता वाटली. हा चौथा फेरा ओलांडून पाय धुण्याकरितां म्हणून ते माजघरांतून मागील सोप्यांत जातात तों तेथें घरांतील मुली बसल्या होत्या. अण्णांना पाहातांच त्या त्यांच्या भोंवतीं जमा झाल्या व त्यांनीं त्यांना त्यांच्या घरच्या मुलांबाळांसंबंधीं निरनिराळे कुशल प्रश्न विचारून अगदीं भंडावून सोडिलें आणि लगबगीनें व तत्परतेनें त्यांच्या पायधुण्याची तयारी केली. तेव्हां त्या मुलींच्या ठिकाणची शालीनता व आपल्या संबंधींचा आदर पाहून अण्णांना फार कौतुक वाटलें व त्या घरांतील लहानापासून थोरापर्यंत सर्वांचें आपल्यावरील अकृत्रिम प्रेम पाहून त्यांचें अन्तःकरण भरून आलें. हा पाचवा फेरा ओलांडून, थोडी मोकळी हवा मिळावी म्हणून, ते मागील परसांत गेले. इतक्यांत उजवे बाजूच्या सोप्यांत " उघडाबोडका, कास वर बांधलेला, हातांत पळी घेऊन गुळाची ढेप फोडीत असलेला, मधुन मधुन एखादा गुळाचा खडा तोंडांत टाकीत असलेला" पुटप्पा कणबगी त्यांना दिसला व त्याची दृष्टि चुकवून मागें परतावें म्हणून अण्णा मागें वळणार तोंच पुटप्पानें त्यांना पाहिलें आणि एकदम "ये मुदका यावाग बंदी" ! " वाहवारे म्हताऱ्या, केव्हां आलासरे, पंतांनीं

मात्र नेहमीं तुझी आठवण काढावी; पण तूं मात्र येऊं नयेस काय ? ” असें म्हणत एका हातांत ती गेंदेसारखी पळी व दुसरे हातांत बचकभर गुळ अशा थाटांत ती स्वारी एक दोन उड्यांतच अण्णांच्या जवळ आली व त्यानें मोठ्या प्रेमानें व अगदीं सलगीनें त्यांना नमस्कार करून आपल्या हातांतील गुळाचा खडा त्यांच्या तोंडांत खुपसण्यासच सुरवात केली. तेव्हां त्याच्या त्या शुद्ध एकेरी भक्तीचा व निष्कपट प्रेमाचा मासला पाहून अण्णांना फार अचंबा वाटला व तेथून आपली सुटका करून घेऊन म्हणजे सहावा फेरा ओलांडून ते माडीवर जाण्याकरितां पुनः माजघरांत आले तों समोरच पंतबंधु गोपाळरावजी दिसले. त्या उभयतांची दृष्टादृष्ट होतांच दोघांचेहि नेत्र प्रेमाश्रूंनीं भरून आले. नंतर गोपाळरावजींनीं अण्णांना कुशल प्रश्न विचारून आपल्यावरोवर चहा पिण्यास नेलें व चहा पितां पितां त्यांना अकोळकडील हकीगतीचे निरनिराळे प्रश्न विचारून सर्व चौकशी केली आणि पंत वारंवार त्यांची आठवण काढीत असल्याचें सांगितलें. तेव्हां पंतदर्शनाची आतुरता वाढून अण्णांनीं या अत्यंत जोराच्या सातव्या फेऱ्यांतून कशीबशी आपली सुटका करून घेतली व ते माज-घरांतून माडीवर जाण्याच्या जिन्यानें पायऱ्या चढून वर गेले. तों समोरच जिन्याच्या तोंडाशीं पंतबंधु नरसिंहराव उभे होते. अण्णा नरसिंहरावांचें सासरे व अत्यंत पूज्य व वडील गुरुबंधु. तेव्हां ते वर येतांच नरसिंहरावांनीं त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांचेवर प्रेमाश्रूंनीं सिंचन केलें व कुशल प्रश्न विचारून “पंत तुमची आज सारखी वाट पाहात आहेत” असें सांगितलें.त्यामुळें अण्णांची पंत–दर्शन–लालसा अनावर झाली व या आठव्या फेऱ्यांतून आपली सुटका करून घेऊन जेथें उत्सवमूर्ति स्थापन केली होती त्या मखराकडे जाण्यास ते निघाले आणि उजव्या हाताकडील दारानें पुढील वठाणांत गेले तों तेथें सदा बेफिकीर, निश्चिंत, विनोदी, पंतांचे पार्श्वरक्षक, दरबारचे आधारस्तंभ, अवधूतमंदिराचे वतनदार, केवळ गुरुमुद्रित पोळ, ‘ हम हैं सदा रंगमों लाल ’ असें म्हणणारी रामभाऊ कमतनूर, विष्णु दिवाण, मुतालिक वगैरे रंगेल मंडळी बसली होती व त्यांचें हसणें-खेळणें चालू होतें. अण्णांना अनपेक्षित रीतीनें तेथें आलेले पाहतांच कांहीं खाण्याचा जिन्नस मिळेल या हेतूनें त्यांनीं अण्णांचा बटवा हिसकून घेतला व त्यांचें बोचकें सोडून त्यांतील पदार्थ अस्ताव्यस्त टाकून खाण्यासारखें जें कांहीं हाताला लागलें तें काढून घेतलें; इतक्यांत पंतबंधु शंकर-राव, पंतांचे भाचे आपण्णा व भिमू अंकलगी, हणमू अक्कोळकर, रामू दड्डीकर, दत्तू-चिकालगुड वगैरे लहान मंडळी तेथें आली व सर्वांनीं अण्णांच्या गाठोड्यांतील शिल्लक राहिलेल्या खाण्याच्या जिनसांचा फन्ना उडविला आणि मोठ्या सलगीनें ‘ केव्हां आलां ?’ वगैरे प्रश्न विचारून त्यांना भंडावून सोडलें. तेव्हां प्रेमभोंवऱ्याच्या या नवव्या फेऱ्यां-तून मोठ्या प्रयासानें पार पडून अण्णा त्या भोंवऱ्याच्या मध्याशीं म्हणजे माडीवरील सड-केच्या बाजूकडील सोप्यांत पूर्वाभिमुख असलेल्या सुशोभित मखरापाशीं गेले व उत्सव-मूर्तीला साष्टांग नमस्कार घालून नंतर त्या मूर्तीकडे एकाग्र दृष्टीनें पाहूं लागले. तेव्हां त्यांना जो अनुभव आला त्याचें सदर लेखांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. “ ती

प्रसन्न मुद्रा पाहून माझें मनहि सुप्रसन्न झालें. माझी दृष्टि जशी मूर्तीवर स्थिरावली तशी ती मूर्ति मला गिळते आहे कीं काय असें वाटूं लागलें. पाहाणारा, पाहाणें, ती दिव्य मूर्ति प्रकाशमय दिसूं लागलीं. दृष्टि अंतर्मुख होऊं लागली. चंद्र सूर्य हे अग्नींत ऐक्य होण्यास निघाले. पवनहि आपला नेहमींचा इडा पिंगळा मार्ग सोडून सुषुम्णा—मार्गानें कुंभक होऊं लागला. मन तरी सर्वांचे आधींच त्रिकूटगिरीवर आरोहण करून बसलें. अशा त्या त्रिवेणी संगमांत स्नान करून दशम द्वारांतून ती दिव्य उदयास्तरहित प्रकाशमान मूर्ति न्याहाळीत असतां अंतरबाह्यभाव उडाला. जिकडे तिकडे नक्षत्रांचा वर्षाव होऊं लागला. अनंत विद्युल्लता एक होऊन चमकूं लागल्या. जणूं महा प्रकाशाचा सागरच फुटला कीं काय असें झालें. सर्व आकाश दशनादांनीं घुमूं लागलें. प्रवणघोष अखंड सुरू झाला. सत्रावीचें तळें फुटून अमृताची वृष्टि होऊं लागली. श्रवणानें मुख न लावितां त्या नादाचें सेवन घडूं लागलें. जिभेनें न चाखितां तें अवर्णनीय अमृतप्राशन घडूं लागलें. मन उन्मन झाल्यामुळें त्या सुखाची कल्पनादेखील करवत नाहीं.

"अशा मी दिव्य भोगोपभोगांत रमत असतां महाराज अवधूतांनीं माझा द्वैतभाव समूळ खंडून स्वरूपसामरस्याचा अनुभव देण्याकरितां आधारस्थानीं श्रीमन्महामंगलमूर्तिरूपानें मला दर्शन दिलें. तेथून सर्व विश्वकर्मा आपणच हें दर्शविण्याकरितां स्वाधिष्ठानीं चतुर्मुख होऊन आपणच मला दिसले. पुढें अनंत ब्रह्मांडांचा पालकहि मचि हें सुचविण्याकरितां मणिपूरचक्रीं तो मेघश्याम विष्णुरूपानें मला भेटला. मग अनुहतभेरीचा नाद कर्णीं ऐकत हृत्कमलपीठावर विराजमान झालेली सर्वसंहारक रुद्रमूर्ति अवधूतास पाहिलें. तेथून सर्व ब्रह्मांडरूपिणी सर्वाधार चिच्छक्तिहि आपणच होऊन विशुद्धीचे ठिकाणीं तोच दिसला. मग आज्ञाचक्रीं भृकुटीचे मागे त्रिकूटशिखरीं त्या अवधूताचें तारक पादद्वय नमिलें. तेथून ब्रह्मरंध्रांतून ऊर्ध्व दिशेकडे पाहतां अनंत शशिसूर्यांचे तेजासहि फिकें पाडणारी अशी झगझगित सहस्रदळ कमलासनावर विराजमान् झालेली अंगुष्ठमात्र अवधूतमूर्ति पाहिली. ती नीलवर्ण मूर्ति पाहतां क्षणांत आकार, क्षणांत निराकार, जिकडे तिकडे चिदाकाशच असें कांहीं होऊं लागले. ती मूर्ति मजकडे अधोदृष्टीनें एकसारखी टक लावून पाहूं लागली. तेव्हां तिच्यापलीकडे जें अनंत चिदाकाश पसरलें होतें त्यांतील सर्व परिपूर्ण अनंत शक्तीचा मध्यबिंदुच ती दिव्य दृष्टि असे वाटूं लागलें. कारण ती मजकडे जसजशी पाहूं लागली तसतशी माझ्यांतील मीपणा त्या दृष्टिद्वारें शोषून घेऊं लागली माझें 'अहं' भान हळुहळु विघरूं लागलें. असें होतां होतां एकाएकी त्या मूर्तीनें मला गिळल्याचा भास झाला. त्यासरसीं माझी अवस्था काय झाली ती मला माहीत नाहीं. मी त्या अवधूतमूर्तींत ऐक्य झालों किंवा तो सद्गुरु अवधूत आणि मी उभयतां त्या अनंत अचल निस्तरंग चैतन्यांबुधींत समरस झालों कांहींच समजत नाहीं आणि त्या निर्विकल्प समाधिस्थितींत किती काळ गेला हेंहि समजण्याला मार्ग नाहीं. इतक्यांत कोणीकडून कीं मीं श्रवणीं आलेल्या " अलख " गर्जनेसरसीं भानावर येऊन नेत्र उघडले आणि समोर पाहतों तों सहस्रदळ कमळावर पाहिलेली मूर्तिच सुहास्य-

वदन कृपाकटाक्षें मजकडे पाहात आहे असें दिसलें. जसें एखाद्या लाखेच्या पेटींत अग्नि ठेविला असतां आंत बाहेर आपणच होतो तसा हा अवधूत अंतर–बाह्य–भेद गिळुन माझ्या आंत बाहेर आपणच विराजूं लागला. तेव्हां माझें मन कोठें गेलें कीं काय झालें कांहींच समजेना; इंद्रियांचा तर पत्ताच नाहींसा झाला. आपोआप स्वानंदामृततृप्तीचे ढेकर येऊं लागले. पुनः दृष्टि अंतर्मुख होऊं लागली. पुनः पूर्ववत् ब्रह्मरंध्रमार्गानें अहं-वृत्ति चिदाकाशांत लीन झाली; पुनः 'अलख' गर्जनेसरशी जागी होऊन बहिर्मुख होऊन त्या अवधूतमूर्तीचे दर्शनसुखांत डोलूं लागली. अशांत सुविचार थोडासा जागृत झाला आणि आतां ती अनंत चिदाकाशांत एकटीच चमकणारी अवधूतमूर्ति न्याहाळून पाहावी म्हणून या खेपेस अंतर्मुख दृष्टि होतांच लक्षपूर्वक पाहूं लागलों तों काय चमत्कार सांगूं? माझा सद्‌गुरुच तो! ओळख पटतांच एकदम उडी घालून त्या अंगुष्ठमात्र सद्‌गुरुमूर्तीचे चरणीं पडलों असा भास झाला. मात्र पुढें काय झालें कोण जाणे. एक सद्‌गुरुच याला साक्षी.

"किती काळानें (तें) मला सांगवत नाहीं; पण मला कोणीं तरी बाहेर लोटून दिलें असा भास झाला. त्यासरशीं डोळे उघडून पाहतों तों समोर माझा सद्‌गुरु उभाच! आंत सद्‌गुरु, बाहेर सद्‌गुरु; दशदिशा पाहतों तों सद्‌गुरूविना अन्य कांहींच दिसेना. माझ्याकडे मी पाहतों तों मीहि तोच दिसूं लागलों. त्या विश्वरूपाचें वर्णन माझ्यानें करवत नाहीं. सद्‌गुरुमूर्तीचीं अगाध पेवेंच फुटलीं कीं काय असें वाटलें आणि माझा शक्तिपात होऊन मला तूष्णी स्थिति साहजिकच प्राप्त झाली. त्या स्थितींत सर्व त्रिपुटींचा पूर्ण अभाव असल्यामुळें तेथील अनुभव ज्याचा तोच जाणे. "जावें त्याच्या जन्मा तेव्हां कळे" अशा स्वानंदसागरांत निमग्न असतां "अलख, श्रीगुरुदेव दत्त, अवधूत, सद्‌गुरु बालमुकुंदमहाराज की जय" अशी गंभीर गर्जना कर्णद्वारें अंतरावर आदळतांच खड-बडून शुद्धीवर आलों. तों पूर्ववत समोर तें मखर, त्यांतील सुंदर मूर्ति, तो संगीत-भजन-मेळा हीं दृष्टीस पडलीं. पण शरीरांतील शक्ति अगदीं क्षीण झाली होती. एकदम हात पाय हालवितां येईनात. "ब्रम्हानंदीं लागली टाळी कोण देहातें सांभाळी." तुम्हांला ऐकून तरी माहीत असेलच कीं भोंवऱ्याचे मध्य बिंदूंत सापडलेला मनुष्य कितीहि बळवान असला तरी त्या ठिकाणीं बुडणें वर येणें असें होतांना त्याचे अंगांतील सर्व सामर्थ्य पिळिलें जाऊन, निःसत्व होऊन तो शेवटीं तळास जाऊन शेवटची विश्रांति घेतो. मी वर्णन केलेल्या प्रेमभोंवऱ्याचे मध्य बिंदूंत हा वेळपर्यंत घुटमळत असल्यानें माझी अवस्था तशी झाली यांत नवल तें काय?"

याप्रमाणें राजयोगांतील दिव्य अनुभव घेऊन अण्णा प्रेमभोंवऱ्याच्या तळाकडे ह्मणजे ज्यांच्या दर्शनाला ते अत्यंत आतुर झाले होते त्या पंतांकडे जाण्याकरितां एका गुरु-बंधूचा हात धरून निघाले व माडीवरील पूर्वेकडच्या सोप्यांत जेथें पंत आपल्या कोचावर वसून समोर बसलेल्या भक्तमंडळींना अद्वैत बोध सांगत होते तेथें म्हणजे अवधूतदरबारांत गेले. तों पंतांनीं उजव्या हातांत एक गवताची काडी धरलेली असून समोर बसलेल्या

मंडळीला ते बोध करीत होते व सर्व मंडळी एकाग्र मनानें तो ऐकत होती असा देखावा त्यांच्या नजरेस पडला. तेव्हां आतांच आपण पुढें गेल्यास बेरंग होईल असें मनांत येऊन ते एका बाजूला बसून बोध श्रवण करूं लागले. त्या बोधाचा सारांश पंतांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणें आहे. पंत म्हणाले "अरे, एकाग्र होऊन लक्ष देऊन ऐका. आतांच तुम्हांला सिद्ध करून दाखविलें कीं तुम्ही नित्य मुक्त आहां. कधींच बद्ध झालां नव्हतां. बाळपणापासून घडलेल्या संस्कारानें, शिक्षणानें, संगतीनें, भिन्नभिन्न शास्त्रश्रवणानें तुम्हींच धर्माधर्म, पापपुण्य, बंधमोक्ष, जन्म–मरण, स्वर्ग–नर्क, विद्या–अविद्या इत्यादि द्वंद्वांची बाधा कल्पिली होती. परंतु विचार करून पाहातां यांपैकीं तुम्हांला कांहींच लागू पडत नाहीं. कारण पाहा, या स्थूल देहाला आंत बाहेर तुम्ही जाणतां व पंच प्राणांला, पंच कर्मेंद्रियें, पंच ज्ञानेंद्रियें, अन्तःकरणपंचक, तीन अवस्था, त्या त्या अवस्थांचे अभिमानी, बाल्यादि वृद्धापदशा या सर्वांना साक्षी आहां. तुम्ही पृथ्वी नव्हे, या देहांतील आप नव्हे, अग्नि नव्हे, वायु नव्हे, आकाश नव्हे. तर या सर्वांस प्रकाशक, या सर्वांहून निराळे आहां. वायूच्या अलिकडे मनादि इंद्रियांचे खेळ. त्याचे पलीकडे त्यांचें अस्तित्व नाहीं. रूपांत आकाशाचा जर रिघाव नाहीं तर मग तेथें वायुरूप मनाचा प्रवेश कसा होईल ? मग मनःकल्पित द्वंद्वें तुम्हांला बाधा करूं शकतील काय ? आकाशच जर अनंत, अमूर्त आहे, तें कोठें जात नाहीं येत नाहीं; त्यालाहि तुम्ही गिळणारे; मग तुम्हांला काय बरें बाधा आहे ? तुम्ही केवळ सत्तास्फुरद्रूप आहां, अनंत आहां. तुमचे स्वरूपाचे ठिकाणीं मनवाणींचा प्रवेश नाहीं. तुम्हांला धर्माधर्मादि द्वंद्वबाधा कधीं झाली नाहीं, आतां नाहीं, पुढें होण्याजोगी नाहीं. तुमची सत्ता त्रिकालाबाधित आहे. तुमचें ज्ञान अनउदयास्त आहे, तुमचें स्वरूप अनंत आहे, म्हणजे तुम्ही "सत्यंज्ञानमनंतं ब्रम्ह" आहां. आकाशाअलिकडे सगळ्या अनंत कोटी ब्रम्हांडांचा उभारा आहे. आकाशानंतरच काळाचा अंमल सुरू झाला, कार्य–कारण–भाव उद्भवला. तुमचे स्वरूपाचे ठिकाणीं आकाशच नाहीं; मग विश्वविस्तार, काळभीति, कार्य–कारणभाव कोठून असणार ! उत्पत्ति-स्थिति–लयकर्ते देव, कृतांत काळ, निरनिराळ्या देवता, सप्त पाताळ, सप्त स्वर्ग हीं सगळीं आकाशाचे आधारानें राहणारीं. तुझें स्वरूप तरी आकाशाला गाळून शुद्ध अद्वैत; तेथें यांची वार्ता तरी आहे काय ? तुझा तूंच स्वयंभू, अनादिसिद्ध, अचल, अनंत, निरंजन, निर्विकार केवळ अद्वैत आहेस हुषार ! हुषार ! !"

"हा व्यतिरेक बोध म्हणजे तत्त्वमसीचें विवरण तुम्हांला समजलें काय ?" असें पंत म्हणतांच "अहं ब्रह्मास्मि," "नित्य मुक्तोहं", "न बद्धोहं कदाचन" अशी सर्वांनीं एकदम आपली स्वानुभव–संमती दिली. नंतर पंत म्हणतात "आतां तुमचें एक काम झालें. तुमचा देह केव्हांहि पडला तरी तुम्हांला कैवल्यमुक्ति लाभलीच. काळाला तुम्हीं जिंकिलें. जन्ममरणाची भीति तुटली. तुम्ही कसेंहि राहिलां तरी मुक्तच आहां. "यथेष्टाचरणं यदि" हें अवधूतवाक्य प्रमाणाला घ्या. सदा निश्चिंत राहा. वेदांत वाचून पढूनहि शहाणे होऊनहि ब्रह्म "एकमेवाद्वैत, अविकारी, नेह नानास्ति किंचन" असें श्रुतिनिर्णीत

असून हे दृश्य विकारी अनेक भेदांनीं युक्त असें जग कोठून आलें ? असा विक्षेप वरचेवर आणितात. त्याचें निराकरण ऐका. आतां विकार म्हणजे पूर्वींचा धर्म नाहींसा होऊन त्याचे विरुद्ध अन्य धर्म उत्पन्न होणें. जसें दुधाचें दहीं. बरें, ब्रह्माचें लक्षण श्रुतीनें जें निर्णीत केलें आहे तें असें कीं ब्रह्म हें अनंतसत्तात्मक, अनंतशक्त्यात्मक म्हणजे "सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म" (आहे.) या लक्षणांमध्यें विकार होऊन हें जग झालें काय पाहूं. आतां ही पाहा माझे हातांत काडी आहे. हिचें अस्तित्व शून्यापासून झालें आहे असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. "नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः" आहे तें नाहीं होणार नाहीं आणि नाहीं तें आहे होणार नाहीं. ही काडी सजीव-निर्जीव अशा किती स्थितींत राहून हिनें किती शक्ति प्रगट केली असेल व पुढेहि अनंत स्थितींत राहून अनंत शक्ति प्रगट करील. आतां तरी इच्या गुणधर्मांचा म्हणजे इच्या ठायीं असलेल्या शक्तीचा अंत लागेल काय ? मग या जगांतील कोणताहि पदार्थ घेतला तरी अनंतसत्तात्मक, अनंतशक्त्यात्मकच आहेना ? मग तुम्ही याला काय म्हणतां ? असत्, अशक्त, सांत असा एक तरी पदार्थ दाखवा पाहूं ? म्हणजे ब्रम्हाचे ठिकाणीं विकारीपणाचा दोष लावितां येईल. सत्ता आणि स्फूर्ति यांचा नित्य संबंध आहे, म्हणजे एकीला सोडून एक असूं शकत नाहीं. जसें गूळ गोडी, सूर्य प्रकाश, रत्न कीळ, भूमी काठिण्य, आकाश अवकाश, दिवा प्रकाश इत्यादि. त्याचप्रमाणें द्रष्टा दृश्य, गुरु शिष्य, मी तूं, अहं इदं इत्यादिकांचा नित्य संबंध आहे; म्हणजे एकाला सोडून एक स्वतंत्र असणार नाहीं, म्हणजे दोन्हीहि एकच. नावें दोन; अस्तित्व एक. असें शिवश-क्त्यात्मक जग केवळ अद्वैतपणें नांदत असतां त्रिपुटीचा भेद कसा सिद्ध होईल ? द्रष्टा-स्फूर्ति, दर्शन-स्फूर्ति, दृश्य-स्फूर्ति, सर्व स्फूर्तिमात्र आहे. स्फुरद्रूपाव्यतिरिक्त कांहीं तरी पंचज्ञानेंद्रियांना किंवा मनाला गोचर होण्याचा संभव आहे का ? मग भोक्ता भोग्य भोग; ज्ञाता ज्ञान ज्ञेय, कर्ता कर्म कार्य यांचा भेदाभाव झाल्यावर त्यागग्रहणाची व्यवस्था काय झाली ? ग्राह्य ग्राहक एकच ना ? विधि निषेधाची तरी वार्ता नको. मग पाप पुण्य, बंध मोक्ष, जन्म मरण, ज्ञानाज्ञान, गुरु शिष्य हें सर्व एकरूप ना ? भेद कोठें राहिला ? सत्ताच ॐ कार शिव, स्फूर्तिच श्री शक्ति, उभयभेदाभावच दत्तावधूत. मग हा सर्व अवधूताचा चिद्विलासना ? ही त्याची सहजानंदलीला नव्हे काय ? तोच निस्तरंग चिदं-बुधि सर्वत्र उचंबळतो ना ? पाहा आतां काय उरलें ?

"हे नरवीर अवधूतबच्चांनों, तुम्हाला आतां कशाची भीति ? तुमचेकडे वक्र दृष्टीनें पाहाण्याची कोणाची छाती ! भित्रेपणा टाका. मागील सर्व विसरा. षंढांच्या संगतीनें भ्याड झालां होतां. पाहा बरें आतां तुम्ही काळाला पायाखालीं तुडविलें कीं नाहीं ? तुमचेखेरीज अन्य कांहीं कोठें दिसतें काय ? तुम्हीच मी, मीच तुम्ही. तुम्हीच जग, जगच तुम्ही. तुम्हीच चवदा लोक. तुम्हीच सर्व देव. तुम्हीच चंद्र सूर्य नक्षत्रें. सर्व लोक, लोकाधिपति तुम्हीच. औपनिषद पुरुष तुम्हीच. सर्व वेद, शास्त्र, इतिहास, पुराणें तुमचेच गायन करितात. पाहा तुमची केवढी योग्यता. एका क्षणांत सद्गुरूंनी तुम्हांला

रंकाचे राव बनविलें, जीवाचें ब्रह्म केलें, एकदेशीचें सर्व कांहीं केलें आणि शेवटीं भक्त-वत्सल-ब्रीद गाजविलें आणि तुम्हांस अनन्य भक्ति, अखंड शांति, निजात्मरति देऊन निजप्रेमसागरांचे मत्स्य करून खेळवीत आहे. धन्य गुरुमाय! पुकारा 'अलख श्रीगुरुदेव दत्त अवधूत सद्‌गुरु बालमुकुंदमहाराज की जय'!"

अशा प्रकारचे पंतांचे स्फूर्तिदायक प्रेमोद्गार ऐकून श्रोतृमंडळी जणूं प्रेमसागरांत पोहूं लागली. तेव्हां पंत कोचावरून उठून समोर बसलेल्या मंडळींपैकीं कोणाला प्रेमानें कुरवाळीत तर कोणाच्या पाठीवरून हात फिरवीत पुढें चालले. तों त्यांचा हात अण्णांच्या मस्तकाला लागतांच अण्णांनीं वर पाहिलें. तेव्हां त्यांना ओळखून मोठ्या प्रेमानें "अरे माझ्या प्रेमळा, माझ्या जिवलगा, माझ्या चुकल्या लेकरा, माझ्या म्हाताऱ्या अण्णा, एकटा तूं आलास? एकदम येऊन कां भेटला नाहींस? माझा तुला कंटाळा आला काय? असा मी तुझा काय अपराध केला म्हणून इतके दिवस मला न भेटतां राहिलास? कायरे तुझें अन्तःकरण? तुजपुढें माझे उपाय थकले" असें म्हणत पंतांनीं त्यांना हृदयाशीं कवटाळून धरिलें. तेव्हां त्या उभयतांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या होत्या. गुरुभक्तांच्या प्रेममिठीचा तो अपूर्व सोहळा पाहून भोंवतालच्या मंडळींचेहि कंठ प्रेमानें दाटून आले व गोविंदरावजी, गोपाळरावजी वगैरे पंतबंधु आणि कमतनूर, मुतालिक वगैरे इतर मंडळीहि तेथें आली व त्या गुरुभक्तांच्या प्रेमालिंगनानें उचंबळलेल्या प्रेमसागराच्या लाटांत सापडली. तेव्हां जो अपूर्व प्रेमकल्लोळ उडाला तो वाङ्मनातीत असल्यामुळें शब्दांनीं त्याचें वर्णन होणें नाहीं.

या लेखांत पंतांनीं अण्णांचें निमित्त करून राजयोगांतील आपले अनुभव व अद्वैत बोध लिहून ठेविले आहेतच. पण त्याचा एक विशेष म्हणजे त्यांत पराकाष्ठेचें गुरुप्रेम ओत-प्रोत भरून राहिलेलें असून पंतांनीं आपण स्वतः गुरु असून अण्णांच्या म्हणजे भक्ताच्या भूमिकेवरून त्याचें वर्णन केलें आहे. या लेखावरून दुसरी गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते ती ही कीं त्यामध्यें आपल्या कुटुंबांतील बहुतेक व्यक्तींसंबंधींचें पंतांचें मत सहजगत्या प्रगट झालें आहे. आपल्या प्रेमळ बंधूंचा पद १६५४ मध्यें पंतांनीं गौरवपर उल्लेख केल्याचें प्रकरण ३६ मध्यें सांगितलें आहे; तर त्यांच्याकडे येणाऱ्या भक्तमंडळींबद्दल त्यांच्या घरांतील सर्वच मंडळींची काय भावना होती ती पंतांनीं या लेखांत दर्शविली आहे व त्यायोगें घरांतील लहान-थोर, सुशिक्षित-अशिक्षित वगैरे सर्व मंडळींचीं अंतःकरणें एकाच गुरुप्रेमरज्जूनें कशीं निगडित झालेलीं होतीं तें स्पष्ट होत आहे.

---

# प्रकरण ३८ वें

——:०:——

## १९०९–१९०५ मधील स्फुट लेख व " भक्तोद्धार किंवा प्रेमभेट ".

——:०:——

### पंतांचे आणखी कांहीं स्फुट लेख

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें पंत सुंठणकरांच्या वाड्यांत राहूं लागल्यापासून त्यांना मधुन मधुन लेखनाची स्फूर्ति होऊन त्यांनीं जे स्फुट लेख लिहिले त्यांपैकीं १८९८ व १९०० सालांत लिहिलेल्या स्फुट लेखांसंबंधी मागील प्रकरणांत थोडक्यांत माहिती दिली आहे. त्यांनीं १९०१ सालीं " स्फुट सिद्धांत, नित्य काय अनित्य काय (अथवा) अनुभवसिद्ध गोष्टी " ( १५–२–१९०१; पु. ६–२९१–२९५ ), " ॐनमःशिवाय " ( ३०–३–१९०१; पु. ६–२९५–२९७ ), "एका तरुणाचें आत्मवृत्त वाचून उद्गार" ( ८–५–१९०१; पु. ६–२९७–३०२ ) व " सिद्धांत " अथवा " सत्यमेवजयते " ( १३–५–१९०१; पु. ६–३०३–३०४ ) हे चार लेख लिहिले; त्यांपैकीं पहिले दोन व शेवटला हे लहान लहान असून " एका तरुणाचें आत्मवृत्त वाचून उद्गार " हा लेख जरा विस्तृत आहे. तो लिहिण्याला कारण असें झालें कीं पंतांच्या सलगींतल्या व कॉलेज-मध्यें उच्च शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थ्यानें लिहिलेला " आत्मवृत्त " हा लेख त्यांच्या पाहण्यांत आला. त्यांत व्यक्त झालेले उथळ विचार व " Duty " ( डयूटी ), " Reason " (रीझन), " Conscience " ( कॉन्शन्स् ) हे वारंवार येणारे शब्द पाहून त्यांना हसूं आलें व त्या वेळचें शिक्षण किती सदोष होतें व तें संपादन केलेली मंडळी विचाराच्या बाबतींत किती परावलंबी असे हें त्यांनीं या लेखांत दाखविलें आहे. या लेखाला त्यांनीं सुरवातच अशी केली आहे कीं " हल्लींचे मनूंत शिक्षणक्रम अगदींच बदलून गेला आहे. हल्लींच्या शिक्षणाच्या योगानें शिकणाऱ्याच्या बुद्धीचा विकास न होतां मोडक्या बाजारांतील दुकानदाराचे साठ्यांत विविध प्रकारच्या मोडक्या तोडक्या, दिस-ण्यांत उपयोगी पण स्वरूपतः निरुपयोगी वस्तु असतात, तसे अर्धवट, अर्धकच्चे, म्हणून न पचणारे विषय यांची रेलचेल मनांत होऊन जाते. त्यांची व्यवस्थाच लावतां येत नाहीं आणि बुद्धीचे कोमलपणींच आपल्या पायांवर उभें राहाण्याची सवय मोडून दुस-ऱ्याचे आधारावर उभें राहून दुसऱ्याचे ओंजळीनें पाणी पिऊं लागल्यानें, स्वतःचें स्वकष्टा-र्जित असें कांहींच संग्रहीं नसतां, दुसऱ्याचें तेंच आपलें असें खात्रीपूर्वक ( भ्रांतीनें ) वाटूं लागतें; म्हणूनच ही तरुण मंडळी नेहमीं खिन्न असते. मग एकाचे सोईचे मार्ग दुसऱ्यास सोईचे कसे होतील ?

" आतांची ' न जाणे न येणे ' अशी विद्वान मंडळी ' आमचें कर्तव्य ', ' आमची सदसद्विवेक बुद्धि ', ' आमचा सुविचार ' असे उद्गार काढते मात्र. परंतु

हे लोक परदृष्टीनेंच या गोष्टी पाहून, हें आपलेंच असें मानून, त्यावर पूर्ण हवाला ठेवून, त्याच्या अनुषंगानें चालतांना खड्ड्यांत पडून दुःख भोगितात. तरी ' हे मैंद आहेत, मी फसलों ' असें न समजतां पुनः त्यांचीच कास धरून पुढें चालतात; व छायेचा अभिमान धरून गोते खातात; काठी टाकून, चाळशी फेकून स्वसामर्थ्यानें चालण्याचा यत्न करीत नाहींत. अशा रीतीनें हे लोक गांडे बनले आहेत. हे स्वतः शूर नव्हेत. यांचे अंगीं पौरुष नसतां खोट्या भासानें दुःख पावतात. "

त्यानंतर पंतांनीं सदर "आत्मवृत्तांत" वारंवार आलेल्या "Duty" (कर्तव्यकर्म), " Reason " ( सुविचार ) व " Conscience " ( सदसद्विवेकबुद्धि ) या शब्दांचें मर्म न समजतां त्यांचें औडंबर माजविल्यानें कशी फजिती होते तें दाखविलें आहे व अखेर " वरील गोष्टींतून खरा, सुलभ, सुखदायी, सुकर मार्ग दाखविण्याला सुविचार-गडीच पाहिजे. × × × जगांत एक सन्मित्र असला कीं कसलींहि दुःखें असलीं तरी कस्पटाप्रमाणें होऊन जातात. तो सन्मित्र म्हणजे आपला निर्मल, परापेक्षारहित, स्वतंत्र शुद्ध विचार होय. त्याला ओळखून त्याचा हात धरावा " असें म्हटलें आहे. सुमारें ३६ वर्षांपूर्वी पंतांनीं लिहिलेला हा लेख हल्लींहि बऱ्याच अंशानें लागू पडण्यासारखा आहे हें सांगणें नकोच.

## " भक्तोद्गार किंवा प्रेमभेट "

सदर चार स्फुट लेखांखेरीज पंतांनीं १९०१ च्या नोव्हेंबर महिन्यांत " भक्तोद्गार किंवा प्रेमभेट " हा मोठा लेख लिहिला. ( पु. ४–१ ते ५९ ) त्याच्या प्रस्तावनेंत त्यांनीं संतमंडळीला उद्देशून म्हटलें आहे कीं " प्रेमळ सद्गुरूची बरेच दिवस भेट नसल्यानें अतिशय व्याकुळ होऊन गुरुमायेच्या अलभ्य दर्शनास गेल्यावेळीं घडलेला प्रकार यथामति आपल्यापुढें मांडण्यास आशीर्वाद द्यावा म्हणजे माझे उद्गार प्रगट करितों. " त्यानंतर या लेखाच्या रूपानें पंतांचे भक्तभूमिकेवरून जे उद्गार बाहेर पडले त्यांचा संग्रह म्हणजेच हा " भक्तोद्गार " लेख होय. मागील प्रकरणांत ज्याचा गोषवारा दिला आहे त्या "माझें माहेर"या लेखांत पंतांचे प्रिय शिष्य अण्णा अकोळकर अत्यंत आतुरतेनें सद्गुरूच्या दर्शनाला गेले असल्याच्या प्रसंगाचें पंतांनीं रसभरित वर्णन केलें आहे. तर "भक्तोद्गार किंवा प्रेमभेट" या लेखांत त्यांनीं आपण स्वतःच सद्गुरूच्या दर्शनाला गेलों असल्याचें वर्णन केलें आहे आणि " 'महाराज अवधूताची स्वारी ब्रह्मगिरीवर आनंदवनांत आहे ' असे आपल्या आप्तांनीं सांगितल्यावरून एके सकाळीं ब्राह्म मुहूर्तावर आपण तिकडे जाण्यास निघालों तों गर्द झाडींतून बिकट वाटेनें जातांजातां एका अफाट वृक्षातळीं स्फटिकशिळेवर पसरलेल्या व्याघ्राजिनावर पद्मासन घालून बसलेली, जटाभार वाहिलेली, सुहास्यवदन, दिगंबर बालावधूतमूर्ति पाहिली " अशी या लेखाला सुरवात केली आहे. १८७७ अखेर पंतांना अवधूत–पंथवृद्धि–आज्ञा व अधिकार देऊन सद्गुरु बालावधूत श्रीशैल्ययात्रेला गेल्यापासून पंतांना त्यांचें प्रत्यक्ष दर्शन होऊन भेटीचा योग आला

नव्हता. पण त्यांच्या सगुण मूर्तीच्या दर्शनाची लालसा मात्र, दोन तपें लोटलीं तरी, पंतांच्या अंतःकरणांत कायमच होती व ती " भक्तीपुढें मुक्तीची किंमत नाहीं " या मागील प्रकरणांत उल्लेख केलेल्या लेखांत स्पष्टपणें व्यक्त झाली आहे आणि " भक्तोद्धार किंवा प्रेमभेट " लेखांत काल्पनिक कां होईना, पण सद्‌गुरु बालावधूतांची प्रत्यक्ष भेट झाल्याचें व त्या भेटींत अनुभविलेल्या प्रेमसोहळ्याचें रसभरित वर्णन केलें आहे. ज्या पंतांना अत्यंत पूज्य मानून हजारों भक्त त्यांच्या प्रेमभेटीची अपेक्षा करीत होते त्यांना सद्‌गुरु बालावधूतांच्या सगुण मूर्तीच्या दर्शनाबद्दल वाटणारी तळमळ हेंच त्यांच्या ठिकाणच्या मुक्तीवरील भक्तीचें रहस्य होय व " मुक्तीवरी दत्तभक्ति निजप्रेमाचे हेचि सोहाळे " ( द. प्रे. ल. ४४५ ) असेंहि त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे.

ब्रह्मगिरीवरील आनंदवनांत अवधूतांची व पंतांची भेट झाल्यावर प्रथम अवधूतांनीं अत्यंत प्रेमभरानें विचारलेल्या 'तूं खुशाल आहेस ना ?" या प्रश्नाला "आई, तुझ्या कृपाछत्राखालीं, तुझें अभय वचन धारण केलेल्यास काय उणें पडणार आहे ? ××× तूंच अवधूतमार्गप्रगटीकरणार्थ माझ्या पाठीस संसार-परमार्थ लावून ठेविलेस. तूंच माझ्या योगक्षेमाची चिंता वाहतेस आणि माझें निमित्त करून तूंच अद्वैतबोधामृताचा अनुभवविस्तार करितेस आणि निजप्रेमानंदांत भक्तजनांकरवीं भजन करवून तूंच तुझ्या प्रेमांत रमत आहेस. तरी सगुणाची आवड कमी होत नाहीं. चरणगोडीपुढें समाधीचाहि वीट येतो. ती मुक्ति नको, तो ब्रह्मानंद नको. तुझे चरणरज चाखीत, तुझे चरणधुळींत लोळूनच इहलोकींची यात्रा संपवावी असें रात्रंदिन ध्यानीं मनीं घोळतें. पण काय करूं ? तुझ्या आज्ञेत तुझ्या प्रेमरज्जूनें बांधलों आहें " अशा प्रकारें पंतांनीं उत्तर दिलें. त्यानंतर अवधूतांनीं "संप्रदायक्रम यथास्थित चालला आहे कीं नाहीं ? भक्तमंडळी व्यवस्थेशीर आहे कीं कसें ? संसारयात्रा सुरळीत चालली आहेना ?" वगैरे वीस कुशल प्रश्न विचारले व आपण मौनानेंच चरणीं नमन करून त्या प्रश्नांना अस्तिपक्षीं उत्तर दिलें असें पंतांनीं सांगितलें आहे. म्हणजे १८७७ अखेर श्रीशैल्ययात्रेला जाण्यापूर्वी सद्‌गुरु बालावधूतांनीं अवधूतमार्ग पुढें चालविण्याची जी आज्ञा केली त्या आज्ञेप्रमाणें सुमारें चोवीस वर्षांच्या अवधींत आपल्या हातून जें कार्य झालें त्याचा पंतांनीं या लेखाच्या रूपानें सद्‌गुरु अवधूतांपुढें अहवालच वाचला व तो ऐकून अवधूतांनीं समाधान व्यक्त केलें असें पंतांनीं दर्शविलें आहे. जेव्हां अवधूतांनीं पंतांना पंथवृद्धि-आज्ञा केली व अधिकार दिला त्या वेळीं त्या उभयतांमध्यें झालेला संवाद पंतांच्या ' आत्मज्योति ' लेखांत विस्तारानें दिलेला आहे व त्याचा गोषवारा या ग्रंथाच्या प्रकरण ८ मध्यें दिला आहे. तो वाचला म्हणजे या लेखांतील सुरवातीच्या भागाचें महत्व लक्षांत येतें. सद्‌गुरूंनीं पंथवृद्धि आज्ञा केली तेव्हां ' ती आपल्याच्यानें होणार नाहीं, तो अधिकार आपणास नको ' असें पंतांनीं सद्‌गुरूंना सांगितलें होतें व आपल्या शंका व अडचणीहि त्यांच्यापुढें मांडल्या होत्या. पण सद्‌गुरूंनीं त्यांचें निरसन करून व अभय देऊन " करिष्ये वचनं तव " असें पंतांकडून म्हणवून घेतलें होतें. तेव्हां पंतांकडे सोपविलेलें महत्कार्य कसें काय चाललें आहे याची सद्‌गुरु अवधूतांनीं दोन

त्यांनंतर जणूं तपासणी केली व तें कार्य आपल्या आज्ञेप्रमाणें उत्तम रीतीनें चाललें आहेसें पाहून संतोष व्यक्त केला असें पंतांनीं या लेखांत सांगितलें आहे. या गोष्टीवरून पंतांच्या ठिकाणच्या निरहंकृतीची कल्पना होते व सद्गुरु कोणाला करावें यासंबंधीं पुढील पदांत त्यांनीं जे उद्गार काढले आहेत ते त्यांना स्वतःला कसे तंतोतंत लागू होते याची साक्ष पटते.—" सद्गुरु तोचि करावा। वेदाधित अनुभवी असावा ॥ ध्रु० ॥ शिष्याची जो न घे सेवा। उपदेशिता मानी देवा ॥ १ ॥ गुरुत्वाचा अभिमान नाहीं। बोधीं धरीं नम्रभावा ॥ २ ॥ साधनशीण न लावी दासा। अभयवचनें दत्तभावा ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १२५७ )

याप्रमाणें प्रश्नोत्तरें झाल्यावर अवधूतांनीं बोध सांगण्यास सुरवात केली व तो चालू असतांना " अवधूता, दत्ता, प्रेमळा, दयाळा, भक्तवत्सल कामधेनु, दीनोद्धारा, लवकर धांव " अशा प्रकारचा हृदयद्रावक ध्वनि त्यांचे कानीं आला. तेव्हां अवधूतांनीं तो करुण स्वर कोठून आला, तें पाहाण्यासाठीं पंतांना पाठविलें. तेव्हां तेथून थोड्या अंतरावर जाऊन पंत पाहतात तों त्यांना एका झाडाला टेकून बसलेली अत्यंत कृश असलेली एक मनुष्याकृति दिसली व ते जवळ जातांच त्या मनुष्याकृतीनें त्यांनाच अवधूत समजून त्यांचे पायांस मिठी घातली. इतक्यांत तिला मूर्च्छा येऊन ती निचेष्टित पडली. तेव्हां पंतांनीं अवधूताचा धावा केला. त्यासरशीं अभय देत स्वतः अवधूत तेथें आले व त्यांनीं त्या मनुष्याला अंकावर घेऊन जागें केलें व धीर देऊन आणि अभय देऊन आपली हकीगत सांगण्यास आज्ञा केली.

याप्रमाणें अभय मिळाल्यानें त्या मुमुक्षूला कृतकृत्यता वाटून त्यानें प्रेमभरानें अवधूताच्या चरणाला मिठी घातली व आपणास ज्या अनिर्वचनीय सुखाचा अनुभव आला तो यथाशक्ति व्यक्त करण्याचा प्रयत्न करून अवधूतांच्या आज्ञेप्रमाणें आपली हकीगत सांगण्यास सुरवात केली.

एका मध्यम प्रतीच्या संभावित कुळांत आपला जन्म झाला वगैरे हकीगत प्रथम त्यानें सांगितली व ती प्रकरण २ मध्यें दिलेल्या व त्यापुढील पंतांच्या स्वतःच्या चरित्राशीं बरीचशी जुळती आहे. नंतर एका मागून एक आपले आप्त इष्ट मृत्युमुखीं पडत चाललेले पाहून देह नश्वर आहे, जग नश्वर आहे अशी त्याची खात्री होत गेली व त्याला तीव्र वैराग्य उत्पन्न झालें आणि सर्वसंगपरित्याग करून आत्मप्राप्ति व्हावी म्हणून तो एखाद्या तत्वदर्शी महात्म्याच्या शोधार्थ निघाला. प्रथम तो एका सुशील व शुचिर्भूत कर्मठ ब्राह्मणाकडे गेला व त्याला शरण जाऊन त्यानें आपली हकीगत सांगितली. तेव्हां त्या ब्राम्हणानें स्नानसंध्यादि कर्ममार्ग आचरण्यास त्याला सांगितलें. " अनित्य फळ देणारा तो मार्ग आपणास नको; याच जन्मीं मुक्त होण्याजोगें साधन आपणास पाहिजे " असें यानें म्हणतांच " आपणास तो मार्ग माहीत नाहीं. तूं तीर्थयात्रा वगैरे केल्यास कदाचित् एखादा साक्षात्कारी पुण्यपुरुष भेटेल " असें त्यानें सांगितलें. तेव्हां हा तीर्थयात्रा, व्रतोपवास वगैरे करूं लागला. पुढें याला एक उपासनामार्गी सत्पुरुष भेटले. त्यांनीं

याला ईश्वराची उपासना करण्यास सांगितलें व " उपासना पूर्ण झाली म्हणजे तुला साक्षात्कार होईल, " असेंहि ते म्हणाले. परंतु तेवढ्यानें याचें समाधान होत नाहींसें पाहून त्यांनीं याला हिमालय पर्वताचे गुहेंत योगसाधन करीत असलेल्या एका महान योगीराजां-कडे जाण्यास सांगितलें. तेव्हां हा अनेक कष्ट सोसून हिमालय पर्वतावर गेला व तेथील एका गुहेंत समाधिस्थ असलेल्या त्या योगिराजांचें याला दर्शन झालें. पुढें त्या योगिराजांची समाधि उतरल्यावर यानें त्यांना साष्टांग नमस्कार घालून आपली करुण कहाणी निवेदन केली व याच जन्मीं मुक्त होण्याचा मार्ग दाखविण्याची विनंति केली. तेव्हां त्यांनीं याची कळकळ पाहून आपण स्वतः कर्म, उपासना व योग यांचा पूर्ण अनुभव घेऊन पाहिला असून अजूनहि आपली पूर्ण शांति झाली नाहीं, पण अठ्ठेचाळीस वर्षांपूर्वी आपणास एक योगिराज भेटून त्यांनीं " योगाचा श्रम गेल्यावर मजकडे ये व मला ब्रह्मगिरीवर आनंदवनांत भेट " असें आपणास सांगितलें होतें; आतां आपली योगसाधनावरची श्रद्धा उडाली आहे, पण श्रीसद्गुरु अवधूतमहाराजांची भेट होऊन मुक्त होईपर्यंत प्राण राखावा म्हणून आपण समाधीचा क्रम चालू ठेविला आहे असें सांगितलें व " तूं या भानगडींत पडूं नकोस; तर एकदम ब्रह्मगिरीवरच्या आनंदवनांत जाऊन श्रोत्रिय, ब्रह्मनिष्ठ अवधूतास शरण जा म्हणजे तुझें काम होईल व माझी हकी-गतहि त्यांना निवेदन कर. मीहि लौकरच तिकडे येणार आहें " असें सांगून त्या योगि-राजांनीं आपणास प्रेमानें आशिर्वाद देऊन पाठविल्यामुळें आपण या स्थानीं आलों असें यानें सांगितलें. तेव्हां अवधूतांनीं अनादि अवधूत संप्रदायास अनुसरून त्या भक्तबाळास आपल्या सन्मुख बसविलें. नंतर त्याची पूजा करून व त्याला नमन करून तो गुरुशिष्य-भाव गिळिलेला प्रेमसागर, अभिमानरहित, बाललीलाधारी, केवल निर्गुण ब्रह्म, भक्ता-करितां बोधरूपानें प्रगट झालेला, सगुण, करुणामूर्ति, बालावधूताचा बोधाब्धि शिष्यचंद्रास पाहतांच उचंबळला व नंतर जो अमृतबोधप्रवाह वाहूं लागला त्याचें सार पंतांनीं या लेखांत दिलें आहे. तें इतकें उत्कृष्ट आहे कीं तें मुळांतूनच वाचणें बरें. तरी पण त्याची वाचकांना थोडीशी कल्पना यावी म्हणून तें अगदीं थोडक्यांत येथें देत आहोंत.

अवधूतांनीं " पुत्रा, सावध हो. अरे तूं प्रज्ञानघन आत्मा ब्रह्मच आहेस; तुला जीवदशा कालत्रयीं नाहीं " अशा रीतीनें सुरवात करून शुद्ध अद्वैत बोध केला व " मी तुला कांहीं दिलें नाहीं, तुला कांहीं केलें नाहीं; जुनें कांहीं गेलें नाहीं, नवें कांहीं आलें नाहीं. हा गुरुशिष्यसंवाद म्हणजे आवडीचे प्रेमभरांतील सिद्धानुवाद आहे " असें सांगितलें. त्यानंतर सर्व विश्व म्हणजे शिवशक्तीचा विलासच होय हें तत्व विशद करून सांगतांना ते म्हणाले " अनंत नामरूपात्मक स्फूर्तिविलास हा चैतन्यसागरींच उठून, तेथेंच खेळून, तेथेंच क्षणोक्षणीं लीन होत आहे. ही शिवशक्तीची अखंड क्रीडा अनादि अनंत आहे. हें जाणणेंच शिवपूजा आणि जाणीव टाकून ऐक्यभावानें लीन होणेंच नमस्कार. शिव काय, शक्ति काय, भक्त काय, भक्ति काय, सर्वच अवधूत ! × × × शुद्ध अद्वैतानु-भवीं अवधूताचे घरीं मनच नाहीं; म्हणून अधिकारी, अनधिकारी, बद्ध, मुमुक्षु, मुक्त,

सिद्ध साधक, गुरु शिष्य, प्रपंच परमार्थ, विधि निषेध, या द्वंद्वात्मक भेदांची वार्तादेखील नाहीं व तीच तुझे हृदयीं प्रेमरूपानें अवतरून निजप्रेम भोगीत असल्यानें ही वार्ता तुझ्या ठिकाणींहि नाहीं, इतकेंच नव्हे तर शिष्यभाव धरून आलेला तूं केव्हांच अभावरूप होऊन गेलास. आतां तूं नाहींसच; मीच तूं झालों. तूंच मी झालास. तूं मी एकच होऊन मिठाच्या खड्याप्रमाणें शुद्धाद्वैत चैतन्यसागरीं बुडी घेतली." नंतर " आतां तुला जें कांहीं माझ्या संगतीनें नवीन प्राप्त झालें असें वाटत असेल, जीवत्व जाऊन ब्रह्मत्व आलें किंवा बंधन हरून मुक्ति मिळाली, जीवन्मुक्ति-विदेहकैवल्याचा अधिकार मिळाला ही भावनाच गुरुदक्षिणा अर्पण करून ऋणमुक्त हो. भक्ति-वैराग्य-ज्ञान-स्वरूपच तूं आहेस. माझ्या गुप्त प्रेमाचा जिव्हाळा तुझे योगानें आज प्रगटून मला चाखण्यास मिळाला. माझा स्वानुभवोदधि तुझ्या मुखशशीच्या दर्शनानें हेलावून मला त्या पवित्र गंगेचें स्नान घडलें; म्हणून मी तुझा ऋणबद्ध झालों. म्हणूनच तुझ्या सर्वस्वाची चिंता मला लागली. धन्य बापा !" असें म्हणून अवधूतांनीं पूर्ण कृपेनें त्याचेवर अनुग्रह केला व ते गुरुशिष्य कांहीं काळ उन्मनीमंदिरीं सहज समाधीच्या शेजेवर समरसानंदांत निमग्न झाले.

नंतर कांहीं वेळानें अवधूतांनीं त्या उभयतांना " हें गौप्य धन उघड्यावर टाकूं नका. हें दत्तावधूताचे आतड्यांतील परम गौप्य अनाधिकारी यांचे दृष्टीस घालूं नका. योग्य पात्रीं दान करण्यास मागें सरूं नका. श्रीदत्तमहाराजाचे कृपाछत्राखालीं अवधूत संप्रदाय खुशाल चालवा. श्रीदत्तावधूताचें भजन करीत राहा, त्याचे उत्सव प्रेमानें करीत चाला. × × × श्रीदत्तमहाराजांची आज्ञा "अवधूतपंथाचा झेंडा जगांत मिरवावा" अशी आहे. ती अवश्य पाळणार तर तुम्हांला त्या महत्कृत्याकरितां पाठविणें अवश्य आहे. पाहा, तुम्हासारखे कित्येक प्राणि मैंदांच्या जाळ्यांत अडकून तळमळत असतील. त्यांचे विषयीं आम्हांला फार कळवळा येतो. त्यांस संशयचिखलांतून प्रेमानें काढा. तुम्हाला मिळालेला अद्वैत बोध, अप्रतिम प्रेमसुख यांचा यथाशक्ति वाटा द्या. पक्षपात नको. शिष्य करूं नका. मेघोपदेश करा. गुरुत्व स्वप्नींहि घेऊं नका. बोध करितांना श्रीदत्तावधूताची स्तुति करितों असें समजा. तुम्ही मोकळे झालां. श्रीदत्तावधूताच्या नामाचा गजर करा आणि आतां तुम्ही मार्गाला लागा." याप्रमाणें आपला संदेश देऊन अवधूतांनीं त्यांना जाण्यास सांगितलें; पण त्यांचा पाय तेथून निघेना. तेव्हां अवधूतांनीं पुनः त्यांना आपलपोटेपणा टाकून सुक्षेत्रीं भक्तिबीज पेरून भजनवृक्षाचा विस्तार करून प्रेमफळांचा सुकाळ करून दत्तनामाचा डंका त्रिभुवनीं गाजत ठेवून आनंदवनांत संचार करण्याचा इषारा दिला व आपण जवळच्या झाडींत गुप्त झाले.

याप्रमाणें आपल्या प्रेमळ सद्गुरुमातेच्या भेटीची हकीगत सांगून " आतां तो माझा जिवलग बंधुहि माझ्या जवळच असतो " असें पंतांनीं म्हटलें आहे व त्या अपूर्व प्रेमभेटीची पुनः पुनः आठवण होऊन ती दिव्य अवधूतमूर्ति नेहमीं आपल्या ध्यानीं, मनीं, समोर उभी आहे असें सांगितलें आहे. पुढें पंत म्हणतात " तो त्याचा (अवधूताचा) अजात बोध अझुनी कानांत घुमत आहे. त्या अपूर्व भेटींत अनुभविलेल्या प्रेमलहरी

क्षणोक्षणीं हृदयांत उठतात. त्याचे योगानें एखादे वेळीं असें होतें कीं संपूर्ण जगत् हें आनंदवन, सर्व जलाशयें अवधूतचरणतीर्थ, सर्व वृक्ष औदुंबर, जें कांहीं नजरेसमोर येतें तीं अवधूतमूर्तिच, जे शब्द कानीं पडतात तो त्याचा बोध, सर्व पेय त्याचे कमंडलूंतील दुग्ध, भक्ष्य शेषप्रसाद असें होऊन जिकडे तिकडे अवधूतमय होऊन जातें. मला त्याचे व्याप्तीबाहेर जाण्याला मार्गच नाहीं. त्या अवधूतचरणीं माझें प्रेम इतकें जडलें आहे कीं त्याचेशिवाय मला क्षणभरहि चैन पडत नाहीं. त्या महाराजाच्या ध्यानाचें वेडच लागून गेल्यामुळें असें वाटतें कीं माझा देहच ब्रम्हगिरि, माझें हृदय हेंच आनंदवन, तेथें नांदणारी शांतिच कल्पवृक्ष, तेथें वास करणारा शुद्ध सात्विक भावच स्फटिकशिळा, तेथें असणारा द्वैतभावच व्याघ्राजिन, सात्विक वैराग्य धुनी, तींत अगणित द्वंद्वांचीं इंधनें पेटत आहेत. शुद्धाद्वैतज्ञानच अग्नि, अहंभाव–धूपच त्यांत जळतो; ब्रम्हविद्याच कामधेनु, चार महावाक्येंच चार श्वान, प्रवृत्ति निवृत्ति पादुका, अजात–सिद्धांत दंड, अद्वय भक्ति कमंडलु, अनन्य भावच माझा प्रेमळ बंधु, सुविचार गंगा, अशा स्थळीं शुद्ध भावाच्या मुशींत अनुच्छिष्ट प्रेमरस भरून ओतून काढलेली दिव्य अवधूतमूर्ति स्वानंदांत डुलत आहे. असा मी अंतर्बाह्य अवधूतमय बनलों आहें. ”

अशा प्रकारें या लेखांतील गोष्टीच्या रूपानें पंतांनी जें रूपक केलें आहे त्याची फोड करून ज्या संतजनांना या दिव्य प्रेमभेटीची हकीगत सांगितली त्यांना उद्देशून पंत म्हणतात “ संतजनेहो, आम्ही, तुम्ही, जग, स्थावर, जंगम हे शब्द मात्र. तेहि स्वप्रेमभोगार्थ प्रेमस्वरूपीं सहज उठले आहेत. कोठेंच भेदभाव नाहीं. जिकडे तिकडे अद्वैतांबुधि दत्तावधूतच भरून उरला आहे. असा तो समर्थ माझे प्रपंचपरमार्थांत आपणच होऊन राहिला आहे. माझा मीपणादेखील तोच. माझ्या पुढें तुमच्या रूपानें करुणानिधिच बसला आहे. ही आजची प्रेमभेटहि तोच अवधूत. त्याच्याच नावाचा जयजयकार करून मी आपले चरणीं मस्तक ठेवितों. श्रीगुरुदेवदत्त अवधूत-महाराज की जय ! ”

मागें वर्णन केल्याप्रमाणें १८८६ च्या मार्च महिन्यापर्यंत पंतांचें गद्य लेखन पुष्कळ झालें व सुमारें तनि साडे–तीन वर्षांत त्यांनीं ११५ स्फुट लेख व सात आठ निबंधवजा मोठेमोठे लेख लिहिले. त्यांपैकीं अखेरचा जो “ भक्तालाप ” तो १८८६ च्या मार्च महिन्यांत पुरा झाला. त्यानंतरच्या सुमारें पंधरा वर्षांत पंतांचें फारच थोडें लेखन झालें. त्यांपैकीं १८९८ पासून लिहिलेल्या कांहीं लहान लहान स्फुट लेखांचा मागें उल्लेख केलाच आहे. त्याचप्रमाणें १९०० च्या आक्टोबर महिन्यांत त्यांनीं लिहिलेल्या पण अद्याप प्रसिद्ध न झालेल्या “माझें माहेर अथवा नऊ फेऱ्यांचा प्रेमभोंवरा” या विस्तृत लेखाचें सार मागील प्रकरणांत दिलें आहे. त्याखेरीज वर उल्लेख केलेला “ भक्तोद्वार किंवा प्रेमभेट ” हाच १८८६ नंतरचा पंतांचा महत्वाचा लेख होय.

१८८६ पर्यंत लिहिलेल्या पंतांच्या लेखांत व या लेखांत व्यक्त झालेला त्यांचा

बोध साधारणपणें एकाच स्वरूपाचा आहे. तरी पण त्यांनीं 'प्रेमभेट' हा लेख लिहिला तेव्हां त्यांच्या ठिकाणचा आत्मानुभव पूर्णपणें परिपक्क दशेला पोचला होता व तोंपर्यंत हजारों मुमुक्षूंवर त्यांनीं अनुग्रह केला होता. त्यामुळें साधक दशेंतील मुमुक्षूंच्या निरनिराळ्या भूमिकांचा त्यांना चांगलाच परिचय झालेला होता आणि आपणाकडे येणारा मुमुक्षु कर्म, उपासना आणि योग यांपैकीं कोणत्याहि मार्गांतील असला तरी त्यांनीं "ज्ञानादेवतु कैवल्यम्" या आचार्यांच्या सिद्धांताप्रमाणें त्याला शुद्ध अद्वैत बोध देऊन कृतकृत्य केलें. पण या लेखांत एकच मुमुक्षु कर्म, उपासना व योग हे मार्ग क्रमाक्रमानें ओलांडून समाधान न झाल्यामुळें अखेर अनन्य भावें सद्गुरूस शरण गेला व पूर्ण समाधान पावला असें वर्णन केलें आहे आणि त्यांना (अवधूत व तो भक्तराज यांना) पाहून "हा सद्गुरुच अत्रिनंदन दत्तावधूत आणि हा भक्तच कार्तवीर्य किंवा अवधूतच कृष्ण (व) भक्तच उद्धव, शिष्य हाच श्रीराम आणि तो (अवधूत) वसिष्ठमुनि" असें आपणास वाटल्याचें पंतांनीं सांगितलें आहे. तसेंच "भार्गवराम हा चिरंजीव असून गुप्त रूपानें फिरत असतो; श्रीदत्त महाराजहि अवधूतफकीर-वेषानें गुप्तप्रगटपणें संचार करीत असतात. तेच आज माझे भाग्योदयानें येथें अवधूत आणि भक्तरूपानीं प्रगटून आपला अद्वितीय खेळ मला दाखविला, असें वाटून मला प्रेमाचें भरतें आलें" असें त्यांनीं म्हटलें आहे. सर्वसाधारण मुमुक्षूच्या भूमिकेची पंतांना चांगलीच ओळख असल्यामुळें व हा लेख लिहितांना ते आत्मानुभवाच्या शिखरावर आरूढ झालेले असल्यामुळें या लेखांतील प्रेमभेटीचें वर्णन हृदय उचंबळून सोडणारें झालें असून त्यांत व्यक्त झालेले अनुभव व अद्वैतबोध हे सफाईनें व अधिकारानें व्यक्त केलेले दिसतात. या लेखाच्या रूपानें आपण केलेली शिवस्तुति ऐकण्या-करितां अतिगूढ औपनिषद गुरुगम्य शांकरी बम्हविद्या शांतिरूपानें शुभ्र शालू पांघरून त्या आनंदवनांत प्रगट झाली होती असेंहि पंतांनीं म्हटलें आहे. या लेखांत पंतांनीं ज्याला आपला गुरुबंधु म्हटलें आहे, ज्याच्या भेटीचें सुंदर वर्णन केलें आहे व ज्याला "अनन्य-भाव" असेंहि म्हटलें आहे तो म्हणजे त्यांचेकडे बोधग्रहणार्थ येणारा मुमुक्षु होय. त्यांचे-कडे असे प्रेमभेटीचे योग नेहमींच येत असत. पण या लेखांत, मागें सांगितल्याप्रमाणें, भक्तोद्धाराचें कर्तृत्व आपणाकडे न घेतां तें त्यांनीं सद्गुरु बालावधूतांकडे दिलें आहे व आपण या प्रेमभेटीचे फक्त प्रेक्षक होतों असें दाखविलें आहे. या लेखाच्या द्वारें पंतांनीं आपलें हृद्गत अथवा अवधूत-संप्रदायाचें रहस्य व्यक्त केलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रकरण ३६ मध्यें उल्लेख केल्याप्रमाणें २३-६-१९०० रोजीं पंतांच्या घरीं झालेल्या भजनसमारंभाचे वेळीं "या थाटाचा हा शेवटचाच दरबार आहे" असे त्यांनीं उद्गार काढले होते व नोव्हेंबर १९०१ मध्यें लिहिलेल्या "भक्तोद्धार किंवा प्रेमभेट" या लेखाच्या रूपानें त्यांनीं तोंपर्यंत झालेल्या शिष्यप्रबोधनकार्याचा आढावा काढून सद्गुरूला तो निवेदन केला. यावरून त्या वेळेपासूनच ते आपल्या निर्याणाबद्दलच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सूचना देत असावे असें म्हणावेसें वाटतें.

'प्रेमभेट' लिहून झाल्यानंतर १९०२-५ या सुमारें चार वर्षांत पंतांनीं फक्त सात स्फुट लेख लिहिले; (पु. ६-३०४ ते ३२२) त्यांपैकीं १९०२ सालीं "जयशाली भक्ति। गुरुदासां अखंड शांति" (१४-८-१९०२) व "सूचना" (२-१०-१९०२) हे दोन लहान लेख लिहिले; १९०३ सालीं "Where there is a will there is a way" (१२-५-१९०३) हा एक अगदीं लहान लेख लिहिला; १९०४ सालीं "सिद्धांत" (२१-८-१९०४) व "शब्दांचे परमार्थपर अर्थ-टिपण" (२३-१२-१९०४) हे दोन लहान लेख लिहिले आणि १९०५ सालीं "अपवादरहित सिद्धांत" (१२-१-१९०५), व "सहजानुभव" (२०-१-१९०५) हे दोन लहान लेख लिहिले. हे बहुतेक लेख टाचणवजाच आहेत. "सहजानुभव" या लेखांत शाश्वत सुख कसें प्राप्त करून घेतां येईल यासंबंधीं पंतांनीं विवेचन केलें आहे व "मिठानें आपलें मूळ शोधणें म्हणजे सागरच होणें. स्फुरणानें आपले अधिष्ठानाचा अंत पाहाणें म्हणजे त्या स्वानंदसागरांत पुनरुत्थान नाहींसें विरून जाणें" असें सांगून "समित्पाणि होऊन दयाळु, शांत, ब्रह्मनिष्ठ, श्रोत्रिय अशा सद्गुरूस शरण जाऊन तनु मन धन अर्पण करितां, तोच उपदेशमात्रें सत्यज्ञानांत निर्विकल्पांबुधींत समरस करील. अन्य कोट्यवधि साधनांनीं कांहींच होणें नाहीं" असें म्हटलें आहे व अखेर "हा विषय बुद्धीलाहि अनाकळ; शब्दानें त्याचें विवरण कसें होऊं शकेल? येथें इतकेंच कीं आपला जाणिवेचा अभिमान समूळ टाकून अनन्य भावें सद्गुरूस शरण जावें. म्हणजे तो स्वयंनिर्णय, बोधमूर्ति, प्रेमसागर कृपामात्रें अखंडानंदपरमैक्य स्थितीचे साम्राज्यपदावर बसवून आश्रितास आपला म्हणवून मातृस्नेहानें शिष्यबाळकास आपली पदवी देऊन अनुच्छिष्ट प्रेमस्तन पाजून, पुनरुत्थान नाहीं अशा योगनिद्रेंत समरस करील" असें आश्वासन दिलें आहे. (पु. ६-३२१) या लेखानंतर पंतांनीं कोणताहि लेख लिहिला नाहीं.

# प्रकरण ३९ वें

—×—

## कोल्हापूरच्या खेपा; पुटप्पांना प्लेग व पंतांनीं मांडिलेला निर्वाण; नगाला नग; दिवाणाचा मृत्यु; "सरलें संसाराचें काज;" मरीकट्टीची खेप; नोकरीचा राजीनामा."

———:०:———

### पंतांची कोल्हापूरची पहिली खेप

१८८८ च्या सुमारास कोल्हापूर येथील कृष्टप्पा राचप्पा नाईक ऊर्फ बळवंतराव मंडवळे यांनीं पंतांकडून अनुग्रह घेतला व तेव्हांपासून कोल्हापूरच्या बऱ्याच मंडळींवर पंतांचा अनुग्रह झाला या गोष्टीचा मागें उल्लेख केलाच आहे. बळवंतराव मंडवळे हे घरचे सुखवस्तु असून स्वतंत्र होते. त्यामुळें कोल्हापूरमधील पंतांच्या शिष्यमंडळींचें भजन-पूजन वगैरे त्यांचे घरींच होत असे. ते वारंवार बेळगावास पंतांकडे जात व पंत बाहेरगावी गेले म्हणजे त्यांचेबरोबर असत. ते फार दृढनिश्चयी व एकनिष्ठ होते व त्यांचा स्वभावहि अतिशय थट्टेखोर व विनोदी असे. त्यामुळें पंतांचा त्यांचेवर फार लोभ असे व कोल्हापूर येथें पंत गेले म्हणजे त्यांची बैठक बळवंतरावाचे घरीं असे आणि जेवणखाण वगैरे त्यांच्या शिष्यांपैकीं हरिभाऊ गोसावी, बळवंतराव दंडवते वगैरे मंडळींकडे होत असे. कोल्हापूर येथें पंतांचे आणखीहि बरेच शिष्य होते व त्यांमध्यें विशेष प्रसिद्ध म्हणजे रामाबोवा ऊर्फ रामानंद हे होते. त्यांची हकीगत २४ व्या प्रकरणांत दिलीच आहे. ते पूर्ण निःसंग व निस्पृह वृत्तीनें राहात असत व आपला बहुतेक काळ भजनानंदांत घालवीत. त्यामुळें त्यांचें भजन सर्वांना आवडत असे. ते भजनांत पंतांची पदे म्हणत व कधीं कधीं आपण स्वतः रचलेली पदेंहि म्हणत. त्यांना कफनी पंतांनींच दिली होती आणि त्यांची असंग वृत्ति व पराकाष्ठेची गुरुभक्ति पाहून पंतांनीं त्यांना उपदेशक्रम चालविण्याची आज्ञा दिली होती. त्याप्रमाणें त्यांचे कोल्हापूरांत पुष्कळ शिष्य झाले व कोल्हापूर संस्थानांतील लष्करांत त्यांच्या शिष्यांचा भरणा मोठा असे. रामानंदांनीं संप्रदायक्रम चालू केला तरी त्यांची पंतांच्या ठिकाणची निष्ठा अचल होती व ते आपल्या शिष्यांना पंतांचें दर्शन घेऊन येण्यास सांगत असत. तसेंच नृसिंहचार्य शिगिहाळी नावाचे पंतांचे एक गुरुबंधु कोल्हापूर येथें राहात असत व त्यांचेहि कांहीं शिष्य तेथें असत. अशा रीतीनें कोल्हापूर येथें पंतांना पूज्य मानणारी पुष्कळ मंडळी होती.

१८९८–९९ च्या सुमारास पंतबंधु नरसिंहराव व शंकरराव हे कॉलेजमधील शिक्षणाच्या निमित्तानें कोल्हापूर येथें राहात असत. तेव्हां सौ. यमनाक्कांसह पंत तेथें

गेले होते. त्यांचा भजनाचा कार्यक्रम वळवंतराव मंडवळे यांचे घरीं होत असे. या खेपेला तेथें त्यांचे पुष्कळ नवीन शिष्य झाले आणि एकदां त्यांच्या व रामानंदांच्या शिष्यांनीं त्यांना लष्करांत बोलावून नेऊन त्यांचा मोठा थाटाचा सत्कार केला. त्याचप्रमाणें एकदां वळवंतराव मंडवळे यांचे माडीवर पंत बसले होते व तेथें भजन चाललें होतें. भक्तमंडळीहि पुष्कळ जमली होती. त्या वेळीं पंतांच्या दर्शनाला आतुर झालेलें एक चांभाराचें जोडपें वळवंतरावांच्या घराच्या बाहेर बसलें होतें. तीं अस्पृश्य असल्यामुळें त्यांना आंत जाणें शक्य नव्हतें. त्यामुळें पंत परत जातांना आपणाला त्यांचें दर्शन होईल या आशेनें तीं उभयतां घराच्या बाहेरच्या बाजूस वाट पाहात बसलीं होतीं. पंतांना या गोष्टीची खबरहि नव्हती. माडीवर चाललेलें भजन आटोपल्यावर जेव्हां ते बाहेर जाऊं लागले तेव्हां त्या चांभारानें व त्याच्या कुटुंबानें त्यांना लवून मुजरा केला व आपल्यावर कृपा करण्याची विनंति केली. तेव्हां पंतांनीं तेथल्या तेथें त्यांना प्रसाद देऊन त्यांचेवर कृपा केली. तेव्हांपासून त्यांची पंतांवर पूर्ण भक्ति बसून तीं उभयतां पंतांच्या मंडळींच्या भजनसमारंभांचे वेळीं हजर राहात असत. पुढें एकदां पंतांनीं या गोष्टीचा पुढीलप्रमाणें उल्लेख केला आहे. "एकदां दारापाशीं एक चांभार उभा होता. त्याची बायकोहि बरोबर होती. त्यांना असें वाटलें कीं आपण अंत्यज आहोंत, तेव्हां आपल्याला आंत कसें जातां येईल व महाराजांची भेट कशी होईल ? आपला उद्धार कसा होईल ? हें पाहून मला कळवळा आला आणि तीं उभयतां उभीं होतीं त्याच ठिकाणीं त्यांस दुरूनच दृष्टिभेटीनेंच प्रेम दिलें व तीं धन्य होऊन गेलीं." (पु. ७--२७४) या खेपेला कोल्हापूरमधील मंडळींचा उत्साह व दृढ भक्ति पाहून पंतांना फार समाधान झालें व बेळगावास परत गेल्यावर "कोल्हापूरास गेल्यापासून 'धन्य अवधूतमार्ग' 'धन्य गुरु बालावधूत' असें वाटूं लागलें" असे त्यांनीं उद्गार काढले (पु. ७-२७५).

## कोल्हापूरची दुसरी खेप

कोल्हापूरमधील बळवंत नारायण दंडवते व वासुदेव नारायण दंडवते या दोघां बंधूंवर व त्यांचे घरांतील बहुतेक मंडळींवर पंतांचा अनुग्रह झालेला होता. त्यांचा अण्णा अकोळकरांचे घराण्याशीं सोयरिकीचा संबंध असल्यामुळें १८९८ सालीं पंतांचा मुक्काम अकोळ येथें असतांना दंडवते बंधु तेथें कांहीं दिवस जाऊन राहिले होते. १९०२ च्या सुरवातीला कोल्हापूर येथील पंतांचे शिष्य हरि सखराम गोसावी यांची मुलगी अण्णा अकोळकर यांचे चिरंजीव रामभाऊ यांना देण्याचें निश्चित झालें व लग्नसमारंभ कोल्हापूर येथें होण्याचें ठरलें. या कामीं दंडवतेबंधूंनीं विशेष पुढाकार घेतला होता. गोसावी, दंडवते वगैरे मंडळी पंतांच्या शिष्यवर्गापैकीं होती व अण्णा अकोळकर तर त्यांच्या अत्यंत प्रीतींतले. तेव्हां पंतांना या लग्नसमारंभाकरितां कोल्हापूर येथें जावें लागलें व बरोबर त्यांचें कुटुंब सौ. यमनाक्काहि होत्या. सकुटुंब पंत लग्नाला हजर राहिल्यामुळें उभयपक्षांकडील मंडळींच्या उत्साहांत विशेषच भर पडली व सर्व समारंभ मोठ्या प्रेमानंदांत पार पडला.

पंतांचा मुक्काम कोल्हापूर येथें सुमारें आठ दिवस होता. तो आठवडा म्हणजे पंतांच्या व रामानंदांच्या शिष्यमंडळींला एक पर्वणीयोगच वाटला व सर्वांनीं मोठ्या प्रेमानें पंतांचें स्वागत केलें. त्यांमध्यें पुष्कळ मुलेंहि होतीं. त्यांनीं पंतांना रामानंदांच्या अवधूताश्रमांत नेलें व तेथे भजन वगैरे करून लहानसा उत्सवच केला. त्या मुलांचा तो उत्साह पाहून पंतांना फार कौतुक वाटलें व ते रामानंदांना म्हणाले " प्रेमळा रामानंदा, धन्यरे तूं ! अवधूत–भजन–झेंडा तूंच गाजविलास ! आतां या आश्रमांत एक सिंहासन व धुनी तयार करून व एक औदुंबर वृक्ष लावून नित्य भजनक्रम चालू ठेवावा व उत्साह करावे. " त्याप्रमाणें पुढें तजवीज करण्यांत आली.

पंत कोल्हापुरास गेले होते त्या प्रसंगाला अनुसरून रामनंदांनीं कांहीं पदें केली. त्यांपैकीं एक पद असें आहे " सद्गुरु आलेपासुनी । तटस्थ झाली त्रिनयनी । अंतर्बाह्य प्रगटला । ध्यास मला लागला " वगैरे. तसेंच दुसरें पद पुढीलप्रमाणें आहे " करवीरीं दत्त आला । दासा स्वरूप दावुनी । वेणुपुरीं गेला" वगैरे. या खेपेला कोल्हापूर येथें पंतांचे पुष्कळ नवीन शिष्य झाले. एकदां असें झालें कीं कोल्हापूरच्या लष्करापैकीं अठरा इसम अनुग्रह घेण्याकरितां पंतांकडे आले. त्यांमध्यें त्यांचा मुख्य हवालदारहि होता. त्यांनीं पंतांना आपला मनोदय कळविला व असें सांगितलें कीं "आम्हांला फक्त दोन तासांची सवड आहे. तेवढ्या अवधांत आमचेवर कृपा करून आम्हांला परत पाठवावें." तेव्हां त्यांची आतुरता पाहून पंतांनीं त्या सर्वांना आपल्यासमोर उभें राहाण्यास सांगितलें व " आतां माझ्याशीं लढाई सुरू आहे अशी तुम्ही भावना करा " असें सांगून आपण आसनावर उभे राहिले. नंतर आपण दंड ठोकून व दत्तनामाची गर्जना करून पंतांनीं त्यांनाहि तसें करण्यास सांगितलें आणि अशा प्रकारें त्यांचेवर अनुग्रह करून त्यांना ठरलेल्या मुदतींत परत पाठविलें.

पंतांच्या मनांतून या खेपेला कोल्हापूर येथें लग्नसमारंभ आटोपल्यानंतरहि कांहीं दिवस राहावयाचें होतें. पण कांहीं निकडीचें काम असल्यामुळें त्यांना ताबडतोब बेळगावला परत जावें लागलें. तरी पण कोल्हापूरमधील भक्तमंडळाची भक्ति पाहून त्यांना फार समाधान झालें. २०–८–१९०२ रोजी बळवंतराव मंडवळे यांना पंतांनीं लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे. " कोल्हापुरास आल्यावेळीं तेथील मंडळींची भक्ति व प्रेमा हीं पाहून मनाला फार समाधान वाटलें. आणखी कांहीं दिवस तेथें राहाण्याची इच्छा होती. परंतु सवड नसल्यामुळें मोठ्या कष्टानें इकडे यावे लागलें. असो. असा प्रेमा कायम राखून निष्काम भक्ति आणि बंधुप्रीति यांची वृद्धि करीत शुद्ध शांतिसुखांत सर्वत्रांनीं गुरुभजनानंद भोगीत असावें. हेंच आपलें मुख्य कर्तव्य आहे. तेथील सर्व मंडळींना इकडील स्मरण द्यावें आणि 'त्यांची आठवण वरचेवर प्रेमभरांत होत असते. त्यांचें विस्मरण कधींहि पडावयाचें नाहीं ' असें सर्वांना अगत्यपूर्वक कळवावें. समर्थकृपेनें पुनः भेटीचा योग जुळून येईल आणि एके ठिकाणीं आम्हां तुम्हां प्रेमानें खेळूं असें वाटतें. श्रीदत्तगुरूंचें भजन अव्यभिचार भक्तीनें सतत चालू ठेवलेंस तो समर्थ तुम्हांस

निजप्रेमा पाजून अनायासें आपल्या पदरीं ठेवील यांत शंका नाहीं. आम्ही सर्वांनी दत्त-नामाचा जयजयकार करीत अहंकाराला पूर्ण रजा देऊन स्वस्थ त्याच्या चरणीं पडून राहावें. " त्यानंतर पंतांनीं पुढीलप्रमाणें ताजा कलम लिहिला आहे. " यंदाहि तेथें गोकुळाष्टमीचा उत्सव होईल. तर शांत रीतीनें यथासांग करावा. सारांश, मनाची शांति कायम राखून किंचितहि ढोंगास जागा न देतां 'मी कर्ता' हा अभिमान न धरितां श्रीसमर्थांच्या चरणीं वृत्ति लीन करून सहज भजनानंदांत प्रेमानें राहावें. भेदबुद्धि उगवूं देऊं नये " वगैरे. ( पु. ५–७९ ते ८१ )

## गोपाळरावजींच्या कुटुंबाला प्लेग

पंत बेळगावास परत आल्यानंतर बेळगावच्या आजूबाजूला प्लेगचा आजार फार जोरावला. ते जरी १८९८ अखेर प्लेगमुळें दड्डी अकोळकडे जाऊन राहिले होते, तरी प्लेगला भिऊन घर सोडून जाणें त्यांना बरें वाटत नसे. एकदां त्यांच्या घरांतील एका इसमाला प्लेग झाला व " आतां आपण गावाबाहेर राहावयास जावें " असें घरांतील कांहीं मंडळी म्हणूं लागली. ही गोष्ट जेव्हां पंतांच्या कानावर गेली तेव्हां त्यांना ती पसंत पडली नाहीं. तेव्हां जो प्रकार झाला त्यासंबंधीं त्यांनींच पुढें एके प्रसंगीं वर्णन केलें आहे तें असें " जसा मी प्रेमळ आहें तसा कठोरहि आहें. एकदां घरांत प्लेग शिरला असें ऐकतांच अतिशय संताप आला व त्याला ( गुरूला ) बजावलें कीं 'माझी भक्ति अशी खोटी करतोस ? मी खोटा नव्हें. मीच तुझा खरा भक्त असें मानून माझ्या वचनावर विश्वास ठेवून किती तरी लोक जागा न सोडतां राहिले आहेत. त्यांचा विश्वास बिघडवितोस ? भक्ति नाहींशी करितोस ? मी स्थानभ्रष्ट व्हावें म्हणतोस ? घरीं प्लेग आला तर जागा सोड, जंगलांत जाऊन राहा म्हणतोस ? तर पाहा, यायोगें " योगक्षेमं वहाम्यहम् " या तुझ्या ब्रीदाला कलंक मात्र लागेल. तूं खोटा देव होशील. मला कांहीं नको. माझें कांहींच नाहीं. आतां मी तयार आहें. मरणाची भीति मला नाहीं. पण जंगलांत जाणें आणि तें प्लेगला भिऊन, हें माझ्यानें करवत नाहीं. जर प्रसंग तसा येईल तर पाहा, असा उगाच जावयाचा नाहीं. दत्ताचे फोटो, तसबिरा जेवढ्या आहेत तेवढ्या सर्व फोडून, पुस्तकें जाळून मग जंगलांत जाणार, पदच्युत होणार ! प्लेगला भिऊन जागा सोडून जंगलांत जाणार नाहीं. तुझा भक्त कधीं खोटा होणार नाहीं. मी गुरुपुत्र काचा नव्हें,. साचा आहे' अशा संतापापुढें प्लेग कसा घरांत शिरेल ? त्या वेळीं हरि हर ब्रह्मा पुढें आले असते तरी त्यांस जाळून भस्म केलें असतें. इतक्यांत महाराजांचें दर्शन झालें व वचन मिळालें कीं " अरे, इतका निर्वाण कां ? झालें तरी काय सांग. प्लेग घरांत शिरला म्हणतात ? कोण म्हणतात ?" मी म्हटलें "डॉक्टर म्हणतो." तेव्हां ते म्हणाले "डॉक्टर झक मारतो. काय करतोस तें घेऊन ? उठ जा. प्लेग झालेल्याला अंगारा लाव व तीर्थ दे. प्लेग आहे कीं गेला पाहा तर खरा. प्लेग नव्हेरे तो. जाऊन पाहा तरी." त्याप्रमाणें त्याला अंगारा लावून तीर्थ देतांच ताप १०२ डिग्री होता तो एकदम

उतरून एकदम घाम सुटला. अशी त्याची लीला आहे ! ” ( पु. ७–११९ ते १२० ).

तसेंच १९०० सालीं पंत देशपांडे गल्लींतील वाड्यांत राहात असतांना गोपाळरावजींच्या दुसऱ्या कुटुंबाला प्लेग झाला व गाठहि आली. त्या वेळीं त्यांचें अंथरूण माजघरांतील एका खोलींत होतें. कुटुंबाच्या अंगांतील ताप जेव्हां अतिशय वाढला तेव्हां गोपाळरावजींनीं ती गोष्ट पंतांच्या कानावर घातली व ताप प्लेगचा असल्याचें सांगितलें. त्याबरोबर पंत गोपाळरावजींसह माजघरांतील सदर खोलींत गेले व त्यांनीं गोपाळरावजींच्या कुटुंबाला अंगारा लावून तीर्थप्रसाद दिला आणि मावसभाऊ डॉ. अण्णपा यांचें औषध देण्यास सांगितलें. नंतर पंतांनीं आजूबाजूला पाहून “ हिला या खोलींतून काढून बाजूच्या खोलींत निजवा; या खोलीला कुलूप लावून ती बंद करा व ती उघडूं नका ” असें सांगितलें. त्याप्रमाणें ताबडतोब व्यवस्था करण्यांत आली व त्या खोलीला कुलूप लावून ती बंद करण्यांत आली. आस्ते आस्ते गोपाळरावजींच्या कुटुंबाला आराम पडत गेला व त्या चांगल्या बऱ्या झाल्या.

## पुटप्पांकरितां पंतांनीं मांडिलेला निर्वाण !

पंत कोल्हापुराहून परत आल्यानंतर एके दिवशीं पुटप्पा कणबर्गीहून बेळगावास आले व “ कणबर्गीस प्लेग झाल्यामुळें निंगप्पासुद्धां घरांतील सर्व माणसांना बाहेर गावीं पाठवून दिलें आहे व मी घरीं राहून गुरें-ढोरें, गडी-माणसें यांची व्यवस्था पाहतों ” असें सहज बोलतां बोलतां पंतांना म्हणाले. तें ऐकून पंतांना काळजी वाटूं लागली व “ अरे, तूं एकटाच घरीं राहून बाकीच्या सर्व मंडळीला परगावीं पाठवून दिलेंस. पण तुलाच प्लेग झाला तर काय करशील ? तूं मला पाहिजे आहेस. तर तू घरीं जाऊं नकोस, मजपाशीं येथेंच राहा.” असें त्यांनीं पुटप्पांना सांगितलें. तेव्हां पुटप्पा कांहीं बोलले नाहींत व दोन दिवस पंतांजवळ राहिले. पण गुरें-ढोरें वगैरे सर्व पसारा गावीं असल्यामुळें ते गावीं गेले व दोन दिवस राहून पुनः बेळगावास आले. तेव्हां मात्र पंत फार रागावले. पण पुटप्पांची अडचण लक्षांत घेऊन त्यांनीं पुटप्पांना टोचून घेण्यास सांगितलें व ते तसें करण्यास कांकूं करितातसें पाहून पंतांनीं आपण स्वतः टोचून घेतलें आणि घरांतील सर्व माणसांस टोचून घेण्यास सांगितलें. त्यामुळें पुटप्पांनाहि टोचून घेणें भाग पडलें व तेव्हांपासून ते दोन दिवस कणबर्गीस तर दोन दिवस बेळगावास असे राहूं लागले. पंत मधुन मधुन रागावतच असत. असें होतां होतां एके दिवशीं कणगर्बीस असतांना पुटप्पांना प्लेग होऊन गाठी आल्या. दुसरे दिवशीं ही बातमी पंतांना समजली. तेव्हां गोपाळरावजी व भीमराव पाटील यांना बरोबर घेऊन पंत कणबर्गीस गेले व पुटप्पांजवळ जाऊन “पुट्या, तुझें कसें आहे ?” म्हणून त्यांना विचारलें. पंतांना तेथें आलेले पाहतांच पुटप्पा एकदम बसले राहिले व “ कांहीं अधिक नाहीं. मी बरा आहें ” असें म्हणाले. तरी पण त्यांची स्थिति पाहून पंतांना रडूं कोसळलें व पुटप्पांना मिठी मारून ते म्हणाले “ पुट्या, तूं मरतोस काय रे ? तूं जर मेलास तर मी बाळप्पाचा मार्ग चालविणार नाहीं. ” नंतर पंतांनीं

पुटप्पांना अंगारा लावून तीर्थप्रसाद दिला व त्यांना ज्या प्लेगच्या गाठी आल्या होत्या त्यांच्यावर एक फडकें टाकून त्या चोखून टाकिल्या ! ! आणि नंतर " उद्यां तुला औषध पाठवून देतों. तें नीट व्यवस्थेनें घे व बरा झालास म्हणजे बेळगावास ये " असें पुटप्पांना सांगून पंत बेळगावास परत गेले. पुढें पुटप्पांना आस्ते आस्ते कल पडत चालला. पण ते आजारी झाल्यामुळें ते नको नको म्हणत असतांहि त्यांचा भाऊ निंगप्पा हा कणबर्गीस वारंवार येऊं लागला व एके दिवशीं त्याला प्लेग होऊन त्यांतच त्याचा अंत झाला. अशा रीतीनें पुटप्पा हे प्लेगमधून वाचले खरे, पण त्यांचा भाऊ निंगप्पा त्याला बळी पडला ! निगंप्पा गेल्यापासून पुटप्पांनाच घरचा सर्व कारभार पाहावा लागत असे. त्यामुळें त्यांना कणबर्गी सोडून फारसें कोठें जातां येईनासें झालें. पुटप्पांच्या बाबतींत जसा प्रकार झाला म्हणजे ते प्लेगमधून वाचले तरी निर्घृण काळानें त्यांच्या भावाच्या रूपानें नगाला नग घेतलाच, तसाच प्रकार गोपाळरावजींच्या कुटुंबाच्या बाबतींतहि झाला; म्हणजे वर लिहिल्याप्रमाणें त्या जरी प्लेगमधून वाचल्या तरी, कालावधीनें कां होईना, काळानें नगाला नग घेतलाच ! तें कसें तें पुढें ओघानें येईलच.

## १९०२ ची गोकुळाष्टमी व गुरुद्वादशी

१९०२ सालीं पावसाळा सुरू झाल्यापासून बेळगाव शहरांतहि प्लेगचा आजार विशेष जोरावत चालला व दिपवाळीपर्यंत पंतांच्या घरांत राहात असलेलीं त्यांच्या लांबच्या नातेवाईकांपैकीं दोन माणसें प्लेगला बळी पडलीं. त्यामुळें त्या सालीं पंतांच्या घरीं गोकुळाष्टमी व गुरुद्वादशी हे दोन्ही उत्सव जरी नेहमींप्रमाणें झाले तरी दोन्हीहि प्रसंगीं घरांतलि अडचणीमुळें उत्सव सुरक्षितपणें कसा पार पडतो ही विवंचना येऊन पडली होती. पण तशा स्थितींतहि उत्सव निर्विघ्नपणें पार पडले. गोकुळाष्टमीचा उत्सव पार पडल्यावर पंतांनीं २७–८–१९०२ रोजीं " भक्तिप्रेम देउनी मजला। उत्सव करविला ॥ धृ०॥ जळत अग्नींतूनी सहज। भक्त तूंचि राखिला ॥ १ ॥ " ( द. प्रे. ल. २०४८ ) हें पद म्हणून सद्‌गुरूनें उत्सव निर्विघ्नपणें पार पाडल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. १९०२ च्या सुरवातीपासून गोकुळाष्टमीपर्यंतच्या सुमारें आठ महिन्यांत पंतांचीं फक्त सहाच नवीन पदें झालीं होतीं. पण या गोकुळाष्टमीपासून त्यांच्या ठिकाणची भजनस्फुर्ति इतकी जोरावली कीं १९०२ अखेरपर्यंतच्या चार महिन्यांत सुमारें २३० नवीन पदें झालीं. या पदांमध्यें पंतांच्या ठिकाणचा अद्वैतानुभव व उत्कट गुरुभक्ति हीं व्यक्त झालीं आहेतच; पण प्लेगमुळें झालेल्या भोंवतालच्या भेसूर परिस्थितीची छटाहि त्यांमध्यें मधुन मधुन उमटली आहे. ३–१०–१९०२ रोजीं " शांत रूप दावुनी दत्ता। रुद्ररूप हें आटवी ॥ १ ॥ सर्व सत्ता तुझी दत्ता। शाश्वत तूं चिद्रवि ॥ २ ॥ निजरूपदर्शन देउनीं दत्ता। प्रेमामृत पाजवी ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २०८४ ) अशी पंतांनीं सद्‌गुरूची प्रार्थना केली. पद २१०५ मध्यें सद्‌गुरुचरणीं प्रीति धरा म्हणजे तुम्हांला मरणाची भीति वाटणार नाहीं असें भोंवतालच्या मंडळीला आश्वासन दिलें आहे तें असें " खोटी

मरणाची भीति। सद्गुरुचरणीं ज्या प्रीति ॥ १ ॥ कर्माकर्म विकर्म मिथ्या। नाहीं कर्त्यासी स्थिति ॥ २ ॥ त्यागुनी सर्व धर्माधर्म। दत्तचरणीं धरी प्रीति ॥ ३ ॥ " व पद २११३ मध्यें तर 'काळाचें भयंकर स्वरूप पाहून अज्ञ बालकें घाबरतात; तेव्हां हें तुझें भीकर काळस्वरूप झाकून त्यांच्या चित्ताला शांति दे' अशी त्यांनीं पुढील पदांत कळकळीनें सद्गुरूची प्रार्थना केली आहे. "भीकर काळस्वरूप झाकुनी। देईं शांति चित्ता ॥ धृ० ॥ दीनदयाळु ब्रीद तुझें। राखीं तूं आतां ॥ १ ॥ अनंत अपराध करिती बाळें। प्रेमळ तूं माता ॥ २ ॥ पुरे करी खेळ हा तुझा। प्रेम देईं दत्ता ॥ ३ ॥ "

जसजसा गुरुद्वादशीचा उत्सव जवळ येत चालला, तसतशी तो निर्विघ्नपणें कसा पार पडेल ही चिंता सर्वांना वाटूं लागली. १५–१०–१९०२ रोजीं म्हणजे गुरु-द्वादशीच्या सुमारें १३ दिवस आधीं पंतांनीं भजनाच्या वेळीं पुढील पद म्हटलें "गुरुद्वादशीचा उत्सव आला। सुखी ठेवीं दत्ता। हेंचि मागणें अवधूता ॥ धृ० ॥ भक्ति देउनी भजन करवीं। नाहीं मीं कर्ता। तूंचि विश्वानंतधर्ता ॥ १ ॥ प्रेम देउनी उत्सव करवीं। आपुल्या निजभक्ता। तूंचि आमुची माता पिता ॥ २ ॥ दत्त चरणीं अनन्य भावें। पडला पाहीं आतां। ब्रीद राखीं अवधूता ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २१२० ) त्यानंतर १९–१०–१९०२ रोजीं "प्रेमळ दत्ता भीकर स्वरूप। नको भक्तां दावूं ॥धृ०॥ दीन हीन बापुडे आम्ही। नित्य गुण तुझे गाऊंरे ॥ १ ॥ शिणले भागले श्रमले भक्त। प्रेमामृतीं न्हाऊं रे॥२॥ शांत स्वरूप शांतिदायक। दत्तस्वरूप पाहूंरे ॥३॥ " (द. प्रे. ल. २१३८) अशी त्यांनीं सद्गुरुला विनंति केली; तसेंच पद २१४८ मध्यें "राखीं धूर्जटी। भक्त पडले संकटीं ॥ धृ० ॥ भक्तवत्सलब्रीद तुझें। भक्तांसाठीं प्रगटी ॥ १ ॥ प्रेमळ जननी भक्तांची तूं। प्रेमाची ही अटी ॥२॥ अनन्यभावें दत्ता शरण। प्रेमपूर लोटी ॥ ३ ॥ " असें म्हटलें आहे व पद २१४९ मध्यें "उत्सव जवळी आला। देईं उत्साह मजला ॥ धृ० ॥ संसृतिचिंता दूर करी प्रभु। भक्तप्रेमळा ॥ १ ॥ तुझे भक्तां नको चिंता। दीनदयाळा ॥ २ ॥ राखीं भक्तां सुखी दत्ता। नित्य प्रेमळा ॥ ३ ॥ " अशा प्रकारें गुरुद्वादशीचा उत्सव जवळ आल्याची सद्गुरूला आठवण देऊन उत्साह देण्याबद्दल प्रार्थना केली आहे. अखेर गुरुद्वादशीच्या उत्सवाच्या वेळीं पंतांचे मावसभाऊ डॉ. अण्णाप्पा मारीहाळकर यांच्या कुटुंबाला प्लेग झाला. ते पंतांच्याच घरांत राहात असत. त्यामुळें उत्सवांत विघ्नच उपस्थित झालें. उत्सवाच्या दिवशीं ( २८–१०–१९०२ ) पंतांनीं भजनाच्या वेळीं दहा नवीन पदें म्हटलीं. पद २१७५ मध्यें "निर्वाण कां मांडिला। आजी भक्त दुरी सांडिला ॥ धृ० ॥ उत्सव तुझा उत्साह न देसी। भक्त नको जाहला ॥ १ ॥ भक्ताभिमानी भक्तजननी तूं। ब्रीद कां विटाळला ॥ २ ॥ असुनी सर्वदेशी मी कां परदेशी। दत्ताचा जिव्हाळा ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २१७५ ) " याप्रमाणें त्या वेळच्या स्थितीचें वर्णन करून त्यांनीं पद २१७९ मध्यें सद्गुरूला पुढीलप्रमाणें वाक्ताडणहि केलें आहे "अनन्यभक्ता कांरे चिंता। लाज तुला कशी नाहींरे ॥ धृ० ॥ सर्वज्ञ तूं सर्वशक्ति तूं। जाणसी सर्व कांहींरे ॥ १ ॥ " पण

लगेच " नोहे निष्ठुर प्रेमळ तूंचि । त्रिभुवनीं तुझी ग्वाहीरे ॥ २ ॥ शुद्ध ब्रीद तुझें नाहीं कलंक । दत्त दीन भक्त पाहीरे ॥ ३ ॥ " असें म्हणून सद्गुरूला भक्तवत्सलब्रीदाची आठवण दिली आहे. नंतर आणखी तीन पदें म्हणून प्रेमळ सद्गुरूची प्रार्थना केल्यावर अखेर पुढील पद म्हटलें. " कसा तरी उत्सव जाहला । हाचि आवडला ॥ धृ० ॥ असमाधानी बहुत भक्त । काना डोळा झाला ॥ १ ॥ नको उत्सव तरी भक्ति बुडवीं । मार्ग हा मोकळा ॥ २ ॥ तुझिया सत्ते स्थिति आमुची । दत्त प्रेमा भुकेला ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २१८३ )

## विष्णु दिवाणाचा मृत्यु

अशा रीतीनें प्लेगच्या धामधुमींत गुरुद्वादशीचा उत्सव कसा तरी पार पडला. उत्सव समाप्त झाल्यावर ३०--१०--१९०२ रोजीं डॉ. अण्णाप्पांचें कुटुंब परलोकवासी झालें. त्यानंतर चार पाच दिवसांनीं म्हणजे नोव्हेंबर १९०२ च्या चार पाच तारखेच्या सुमारास पंत मंडळीसह बाळेकुंद्रीस राहावयास गेले. त्या वेळीं त्यांचा प्रिय शिष्य व खाजगी कारभारी विष्णु श्रीपाद दिवाण हाहि त्यांच्याबरोबर होता. तो अकोळचा राहाणारा असून १८९८ च्या जूनपासून पंतांजवळ राहून त्यांची फार निष्ठापूर्वक सेवा करीत असे व त्याला तालमीचा नाद असून पंतांच्या घरांतील मुलांना तालीम शिकविण्याचे कामींहि मदत करीत असे या गोष्टीचा मागें उल्लेख केलाच आहे. पंत बाळेकुंद्रीस गेल्यावर लगेच तेथेंहि प्लेग सुरू होऊन १०--११--१९०२ रोजीं त्या आजारानें विष्णु दिवाण कालाधीन झाला. त्यायोगें पंतांना अतिशय दुःख झालें व दिवसेंदिवस त्यांची स्वतःची प्रकृतिहि खालावत चाल्लेली असल्यामुळें दिवाणाचा वियोग त्यांना फारच जाणवला. तो गेला त्या दिवशीं जेव्हां पंत भजनाला बसले तेव्हां त्याच्या अंगचे एकेक गुण आठवून त्यांनीं पुढील पद म्हटलें— " शिवयोगीसेवा केली । श्रीविष्णूनें ॥ धृ० ॥ तनु झिजवुनी चंदन लाविलें । प्रसन्नहृदय-कमल वाहिलें । आत्मार्पण नैवेद्य दाविलें । तनुमनधनाची वाही लाखोली ॥ १ ॥ संसारासी लाथ मारूनी । माय बंधु आप्त इष्ट त्यागुनी । निष्कामें गुरुपदीं रंगुनी । सहज उन्मनी भोगिली ॥ २ ॥ अखंड प्रेमामृत पिउनी । खेळत खेळत निरंजनीं । नाचुनी नित्य सद्-गुरुभजनीं । प्रेमाची मात केली ॥ ३ ॥ साधुनी सहज सर्वप्रियता । मुगुटमणि जाहला भक्तां । सहजानंदीं मिळुनी दत्ता । केवल मुक्ति वरिली ॥ ४ ॥ " ( द. प्रे. ल. २१९४ प्र. आ. ) प्रत्यक्ष सद्गुरूनीं ज्या सच्छिष्याचें याप्रमाणें वर्णन केलें आहे तो, त्यांनींच म्हटल्याप्रमाणें, खरोखर भक्तांमध्यें मुगुटमणिच असला पाहिजे हे सांगणे नकोच !

वरील पद म्हणून झाल्यावर पंतांनीं लगेच दुसरें पद म्हटलें व त्यांत " गुरुप्रेमा अधिकारी जाहला । जगीं धन्य म्हणविला" (द. प्रे. ल. २१९५ प्र. आ.) असें सांगून विष्णु हा गुरुप्रेमाचा खरा अधिकारी होऊन जगीं धन्य म्हणवून गेला असें दर्शविलें आहे. त्यानंतर विष्णु दिवाण म्हणजे निष्काम भक्तीचें वर्म उघड दाखविण्याकरितां मनुष्यरूप धारण करून आलेला भगवान विष्णुच होय अशा भावनेनें पुढील पद म्हणून पंतांनीं त्याचा जयजयकार

केला. " जय जय कृष्णा जय जय विठ्ठला । जय विष्णू भक्तपाला ॥ ध्रु० ॥ मानवाकृति धरूनी जगतीं । दाविली भक्तिलीला ॥ १ ॥ निष्काम भक्ति नित्य भजनीं । चिद्विलासलीला ॥२॥ दत्तस्वरूपीं समरस होउनी । जयजयकार केला ॥३॥" (द. प्रे ल. २१९६ प्र. आ.) याप्रमाणें त्यांनीं विष्णूचा जयजयकार केला खरा; तरी पण त्यांना वियोगदुःख अनावर होऊन तें पुढील पदाच्या रूपानें बाहेर आलेंच. " कैसा विसरूं दिवाण । जिवलग कसा विसरूं ॥ ध्रु० ॥ तनुमनधनेंसी केली सेवा । नाहीं पडूं दिली वाण ॥ १ ॥ अहंममता त्यागुनी पूर्ण । शीस केलें कुर्वाण ॥ २ ॥ प्रेमानंदें दत्तस्वरूपीं । साधियलें निर्वाण ॥३॥" ( द. प्रे. ल: २१९७ प्र. आ. ) विष्णु दिवाणाचा वियोग झाल्यानें पंतांनीं त्याच्या गुणवर्णनपर हीं जीं पदें म्हटलीं तीं 'श्रीदत्तप्रेमलहरी'च्या प्रथमावृत्तींत अनुक्रमें २१९४, २१९५, २१९६ व २१९७ अशीं छापलीं आहेत. फक्त शेवटल्या पदांत " कैसा विसरूं दिवाण " असें न छापतां " कैसा विसरूं महाप्राण " असें छापलें आहे. पण 'श्रीदत्त-प्रेमलहरी'च्या तृतीयावृत्तींत वरील चार पदांपैकीं २१९४, २१९६ व २१९७ हीं तीन पदें गाळून त्यांच्या जागीं पंतांचींच नवीन तीन पदें छापलीं आहेत. पंतांनीं आपल्या अत्यंत प्रिय शिष्याचा नामनिर्देश करून प्रेमातिशयानें त्याच्या गुणवर्णनपर जीं पदें म्हटलीं ती इतर पदांच्या बरोबर छापलीं जाण्याच्या खास लायकीचीं असतांना तीं तृतीयावृत्तींतून कां वगळण्यांत आलीं हें समजत नाहीं !

विष्णु श्रीपाद दिवाण जाण्यापूर्वी नुकताच वामन भिकाजी बापट नावाचा कोकणांतील एक तरुण मुलगा पंतांच्या घरीं येऊन राहिला होता. त्यानें दिवाणाची जागा पतकरली व तो मनोभावानें पंतांची सेवा करूं लागला. याच सुमारास रामचंद्र सखाराम पोवार, विनायक आपटे, वामन गजानन जोशी, विनायक रामचंद्र शिंत्रे वगैरे बऱ्याच मंडळींवर पंतांचा अनुग्रह झाला. त्यांपैकीं पोवार व शिंत्रे हे पूर्वी छत्र्यांच्या सर्केशींत होते. १९०१ च्या सुमारास ती सर्कस ब्रह्मदेशांत रंगून येथें असतांना एके दिवशीं ते दोघे रात्रीं १० वाजण्याच्या सुमारास रेल्वेस्टेशनजवळ भजन करीत बसले होते. तेथें एक गृहस्थ आला व अर्धा तास बसला. त्यानें यांना "तुमचा गुरु कोण ? " म्हणून विचारलें; तेव्हां " आम्ही गुरु केला नाहीं " असें यांनीं उत्तर दिलें व " आपणास माहीत असल्यास सांगा " असेंहि म्हटलें. नंतर त्यानें यांना बेळगावास पंतांकडे जाण्यास सांगितलें व आपणाजवळ असलेली पंतांच्या पदांची वही यांना दिली. तेव्हां यांनीं " आपण कोण ? कोठले ?" वगैरे त्याला विचारलें; पण " मला त्वरेनें बसीनला जावयाचें आहे. माझें नाव गाव सांगण्याची जरूरी नाहीं " असें म्हणून तो निघून गेला. त्यानंतर सुमारें एक वर्षानें छत्र्यांची सर्कस हिंदुस्थानांत आली. नंतर लगेच पोवारनें बेळगावास जाऊन पंतांकडून अनुग्रह घेतला व त्याच्यानंतर थोड्याच दिवसांनीं शिंत्रेवर पंतांनीं अनुग्रह केला. अनुग्रह झाल्यापासून पोवार हा विरक्त बनला व कफनी घालूं लागला आणि त्याचा निश्चय पाहून पंतांनीं त्या गोष्टीला हरकत घेतली नाहीं. तो कफनी घालूं लागल्यापासून लोक त्याला " रामाबोवा " म्हणूं लागले. रामाबोवा व वामन गजानन

जाशी हे दोघे शक्य तेव्हां पंतांच्याच घरीं राहून त्यांची सेवा करण्याचे कामीं वामन बापट यास मदत करूं लागले.

## " सरलें संसाराचें काज। "

पंतांची एकनिष्ठपणें सेवा करणारा त्यांचा शिष्य विष्णु दिवाण मेला, त्यांना दुःख झालें व तें चार पदांच्या रूपानें व्यक्त झालें. पण सुखदुःखांच्या असंख्य लाटा उठल्या अगर निमल्या म्हणून त्यांच्या स्वरूपांबुधीला कांहीं बाध येणें शक्य नव्हतें. विष्णु दिवाण गेल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांचे मेहुणे बंडो सांभाजी कुळकर्णी यांनीं त्यांना आपल्या गावीं म्हणजे मरिकट्टी येथें मंडळीसह बोलाविलें. मरिकट्टी गाव संपगाव तालुक्यांत असून तो बाळेकुंद्रीच्या आग्नेय दिशेला सुमारें तीन मैलांवर आहे. बंडोपंत तेथील कुळकर्णी घराण्यापैकीं असून त्यांना पंतांची बहीण गंगवा या दिल्या होत्या. तेव्हां त्यांचें आग्रहाचें बोलावणें आल्यामुळें पंतांनीं मंडळीसहित तिकडे जाण्याचा बेत नक्की केला. पंत भक्तमंडळीसह दौऱ्यावर जावयाचे म्हणजे गुरुप्रेमसागराच्या भरतीचा समयच तो! त्यामुळें हा बेत ठरल्याबरोबर दिवाणाच्या मृत्यूनें आलेली त्यांच्यां ठिकाणची उदासीनता पार नाहींशी झाली व संसाराचें मिथ्यत्व व सर्व दृश्यविस्ताराचें नश्वरत्व त्यांचेपुढें उभें राहून त्यांचें चित्त आनंदवनाकडे अथवा निरंजनाकडे धाव घेऊं लागलें आणि जवळ जवळ संसाराला रामराम ठोकून त्यांनीं पुढील दोन पदें म्हटलीं. " जाऊं चला आनंदवना। गड्यांनो ॥ जाऊं ॥ ध्रु० ॥ जाणुनी संसार मिथ्या पसारा। विरति आणूं मना ॥ १ ॥ मृत्युग्रासित सर्वहि दृश्य। सेवूं निरंजना ॥ २ ॥ सद्गुरु दत्त सेवुनि अनुदिनीं। करूं प्रेमपाना ॥ ३ ॥ ( द. प्रे. ल. २२०१) व "सरलें संसाराचें काज। पाहूं निरंजनींची मौज ॥ध्रु०॥ नकळत येणें नकळत जाणें। आतां तरी धरूं लाज ॥ १ ॥ चौदेहातीत स्वरूप आमुचें। घेऊं उन्मनीनीज ॥ २ ॥ नाहीं बंध सर्वहि मुक्त। प्रेमळ दत्तराज ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २२०२ ) " सरलें संसाराचें काज " हे वरील पदांतील पंतांचे उद्गार म्हणजे भोवतालच्या मंडळीला तो पुढील गोष्टींसंबंधींचा इषाराच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं; पण त्यावेळीं त्यांचें मर्म कोणाला समजणार?

पंतांबरोबर मरिकट्टीला जाणारी सुमारें १०-१५ मंडळी होती. बाळेकुंद्रीच्या आग्नेय दिशेकडील टेकडीच्या पलीकडच्या बाजूला बाळेकुंद्रीपासून सुमारें दोन मैलांवर सिद्धनकोळ नावाचें श्रीशंकराचें एक रम्य स्थान आहे; तेथें ही सर्व मंडळी प्रथम गेली. या स्थानांत एक शंकराचें पुरातन देवालय असून त्याच्या बाजूला पायऱ्यांची एक मोठी विहीर आहे आणि तिच्या बाजूच्या भिंतींमध्यें मोठमोठे कोनाडे असून त्यांमध्यें श्रीबालमुकुंद हे योगसाधन करीत बसत असत असें सांगतात. त्या देवालयाच्य आजूबाजूला दाट झाडी असून पुढल्या बाजूला टेकडीचा उतार आहे आणि टेकडीच्या पायथ्याशीं बरीच सुपीक जमीन असून पलीकडे मरिकट्टी गाव आहे. सिद्धनकोळहून ही मंडळी मरिकट्टीस गेली. तेथें पंतांचा मुक्काम दोन तीन दिवस होता. आजूबाजूची बरीच भक्तमंडळीहि तेथें जमली होती. भजनपूजन, टिपरी खेळणें वगैरे प्रकार चालले होते व

मधुन मधुन पंतांचा बोधवर्षावहि होत असे. तेथें जमलेल्या भक्तमंडळींची निश्चिति व गुरुभक्ति पाहून पंतांनीं " धन्य धन्य हा अवधूतपंथ। भवदरिद्री होती श्रीमंत " ( द. प्रे. ल. २२०३ ) हें पद म्हणून त्या पंथाचें महत्व वर्णन केलें व " जन्म घेतला याचि कारणें। जड मूढ उद्धराया " (द. प्रे. ल. २२०४) असेहि उद्गार काढले.

## नोकरीचा राजिनामा !

अशा रीतीनें मरिकल्ली येथें भक्तमंडळीसह निरंजनींच्या मौजा भोगून पंत बाळेकुंद्रीस परत आले, तेव्हांपासून डिसेंबर अखेरपर्यंत त्यांचा मुक्काम तेथेंच होता. त्या दरम्यान तेथें त्यांचे पुष्कळ शिष्य येऊन गेले व त्यांचें घर नेहमीं गजबजलेलें असे. पंतांचा भजनक्रम चालूच असे व रोज नवीन नवीन पदें होत. ९-१२-१९०२ रोजीं त्यांनीं बाळेकुंद्री येथील श्रीरामेश्वरावर चार नवीन पदें म्हटलीं. (द. प्रे. ल. २२०५ ते २२०८) पुढें १५-१२ ०२ रोजीं श्रीदत्तजयंतीचा उत्सव आला. या उत्सवप्रसंगीं त्यांच्या ठिकाणची भजनस्फूर्ति इतकी प्रबळ होती कीं १२ ते १५-१२-१९०२ या चार दिवसांत सुमारें २५ नवीन पदें झालीं व त्या वेळीं बाळेकुंद्री येथेंहि प्लेगची धामधूम असल्यामुळें "उत्सव तूंचि उत्साह तूंचि। देईं प्रेम भक्तां ॥ धृ० ॥ प्रेमळ माय तूं निष्ठुर नोहे। सत्यज्ञानानंता ॥ १ ॥ भीकर स्वरूप दडवुनी सद्गुरु। पाजीं प्रेमामृता ॥ २ ॥ दीन हीन आम्ही पडलों पायीं। राखीं राखीं दत्ता ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. २२१८ ) व "सद्गुरु निष्ठुर कां झालासी ॥ धृ० ॥ भाक्ति नको तरी भक्त कासया। रमसी चिद्विलासीं ॥ १ ॥ " ( द. प्रे. ल. २२१९ ) अशा प्रकारें त्यांनीं सद्गुरूचा धांवा केला. तसेंच " कर्दळीग्रामवासी स्वयंभू शंकरा। मर्दुनी द्वैतदैत्य राखीं चरणकिंकरा। " ( द. प्रे. ल. २२३६ ) हें पद म्हणून श्रीरामेश्वराची प्रार्थना केली; या पदांत बाळेकुंद्री गावाचेंहि सुंदर वर्णन केलेलें आहे.

जान्युवारी १९०३ मध्यें पंत मंडळीसह बेळगावीं परत आले. तेथें आल्यापासून त्यांची तब्बेत मधुन मधुन बिघडूं लागली. तरी देखील त्यांचा बोधवर्षाव सतत चालू असे व रोज नवीन नवीन मंडळी अनुग्रह घेण्याकरितां येत. पंतांची भजनस्फूर्तिहि जोरांत असून त्या सुमारें साडेतीन महिन्यांत जवळ जवळ १७५ नवीन पदें झालीं. या वेळीं पंतांचे बंधु नरसिंहरावजी हे बेळगावास वकिली करूं लागले होते व त्यांचा जमहि बसत चालला होता. तेव्हां आपण आतां सेवानिवृत्त व्हावें व म्हातारपण सद्गुरुभजनसेवेंत घालवावें असें त्यांनीं ठरविलें. त्यापूर्वीं बरेच दिवस तो विचार त्यांच्या डोक्यांत घोळत होता. १९०२ सालीं अण्णा अकोळकरांना लिहिलेल्या (न छापलेल्या) एका पत्रांत त्यांनीं पुढील मजकूर लिहिला होता. " माझे म्हातारपणीं म्हणजे प्रेमाचे पक्व दशेंत तूंच म्हातारा जवळ असावा अशी पूर्ण इच्छा. परंतु लौकिक वासना तुला अकोळास नेते. ××× प्रेमळाच्या वियोगाग्नीनें मी किती होरपळत आहें याची कल्पना तरी तूं करतोस काय ? तुझेंच खोटें रडगाणें पुढें करतोस. पण माझी कळकळ तुला नाहीं काय ? माझी इच्छा, तूं सर्वदा माझ्या उतार वयांत जवळ माझे दरबारीं हजर असावें अशी आहे. पूर्ण करणें तुमच्याकडे आहे."

तसेंच १२-६-१९०३ रोजीं अण्णांना लिहिलेल्या ( न छापलेल्या ) पत्रांत ते लिहितात " आतां तरी लौकर येण्याचें करावें. तुझे येण्यावर माझी प्रकृति अवलंबून आहे. मनानें जी गोष्ट घेतली ती स्थूलोपायानें सुधरत नाहीं. समक्ष पाहिल्यावर याची सत्यता प्रतीतीस येणार आहे. ये, ये, ये असें किती वेळां तरी लिहूं ? म्हातारे माणसाचें अंतःकरण प्रेमानें ओथंबत असतें याची साक्ष घ्यावी. "

अशा परिस्थितींत पंतांनीं १९०३ च्या जूनअखेर लंडन मिशनस्कूलमधील शिक्षकाच्या जागेचा राजिनामा दिला व १८८१ सालीं पतकरलेल्या नोकरीच्या पाशांतून ते कायमचे मोकळे झाले. त्यांनीं शिक्षकाची नोकरी जी पतकरली होती ती विद्यादानाच्या हौसेमुळें व आपल्या आणि कुटुंबाच्या उपजीविकेचें साधन म्हणून पतकरली होती. ते प्रवेशपरीक्षा पास झाले तेव्हां त्यांनीं वकिलीचा अभ्यास करावा; निदान मुलकी खात्यांत अगर दुसऱ्या कोणत्या तरी सरकारी खात्यांत नोकरी धरावी म्हणून त्यांच्या कांहीं आप्तेष्टांनीं आग्रह धरिला होता. पण भोंवतालची परिस्थिति व स्वतःची अंतःस्फूर्ति हीं लक्षांत घेऊन त्यांनीं शिक्षकाची नोकरी धरिली व आपल्या आवडीच्या कार्याला म्हणजे अध्ययन-अध्यापनाला आपणास वाहून घेतलें. १८८१ पासून १९०३ पर्यंतच्या सुमारें बावीस वर्षांच्या कालावधींत त्यांच्या हाताखालून शाळेंतील शेकडो विद्यार्थी शिकून गेले, त्यांचे बंधु सुविद्य होऊन व नावलौकिकास चढून प्रपंचाची घडी नीट बसली आणि आप्तेष्टांचीं, स्नेह्यासोबत्यांचीं कित्येक मुलें त्यांच्या घरीं राहून सुविद्य होऊन गेलीं व सुखासमाधानानें नांदूं लागलीं. अशा रीतीनें नोकरी धरण्यांतील पंतांचा हेतु पूर्णपणें सफल झाला होता. त्यामुळें उर्वरित आयुष्य सद्‌गुरुभजनानंदांत घालविण्याचा संकल्प करून त्यांनीं नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर ३१-८-१९०३ रोजीं त्यांनीं अण्णांना एक पत्र लिहिलें. त्यांत आपल्या राजिनाम्यासंबंधीं त्यांनीं पुढीलप्रमाणें खुलासा केला आहे. " माझी प्रकृति सुधारावी तशी सुधारली नाहीं. इंद्रियें आपापल्या कामांत आळस करूं लागलीं. विनाकारण मोहानें त्यांच्या संगतीनें पंचविषयात्मक जगांत खेळत होतों, आतां उमगलों. हुषार झालों. विश्वाकडे वृत्तीला भुलवून नेणाऱ्या अंतर्बाह्य मैंदांचा संग सोडून वृत्ति मूळ घराकडे वळली आणि अवधूतस्वरूपानंदांत रमूं लागली. ( तुलाहि तेंच कर्तव्य आहे. जाणतोसच. ) कामाचा राजीनामा दिला. म्हातारपण प्रेमांत पुरें करावें असा संकल्प. इंद्रियांनीं व इतर शक्तींनीं आमचा राजीनामा दिला व आम्हीहि जगाचा राजीनामा देऊन फार दिवस उपेक्षिलेल्या आमच्या घरच्या व्यवस्थेस म्हणजे अवधूतचरणसेवेस शांत अंतःकरणानें अहर्निश लागलों. तुझा सदा प्रेमखेळाडू, दत्त. " ( पु. ५-९० ते ९१ )

पंतांचें वरील पत्र बरेंच मोठें असून त्यांतील बहुतेक मजकूर 'श्रीदत्तप्रेमलहरी'ला जोडलेल्या प्रस्तावनेंत दिला आहे. तोहि महत्वाचा असून त्यावरून पंतांची सर्व विश्वाकडे पाहाण्याची दृष्टि किती व्यापक होती याची साक्ष पटते.

## प्रकरण ४० वें

———×———

### अंबाक्काचा जन्म; सौ. यमनाक्कांचें निधन; हुकेरी, कोचरी व चिकालगुडची खेप; गोविंदरावजींचें तिसरें लग्न.

———:०:———

### अंबाक्काचा जन्म

नोकरीचा राजीनामा दिल्यापासून पंतांना मोकळेपणा अधिक मिळूं लागला व त्यांचा बहुतेक काळ भक्तमंडळींत जाऊं लागला. त्यांच्याकडे येणाऱ्या भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढतच होती. त्यामुळें पाच पंचवीस भक्तमंडळी नेहमींच त्यांच्या घरीं असत. १९०३ मधील गोकुळाष्टमीचा ( श्रावण वद्य ८ शके १८२५ ) उत्सव यथासांग पार पडला. पण पुढें लौकरच बेळगावांत प्लेगचा जोर झाल्यामुळें पंत मंडळीसह झोपडींत राहावयास गेले. १९०२ सालीं पंतांना एक मुलगी झाली व तिचें नाव " अंबाक्का " असें ठेविलें. ही मुलगी झाल्यापासूनच पंतांच्या कुटुंबाची तब्बेत चांगली नव्हती व १९०३ सालीं ती अधिकच बिघडली. गावांत प्लेगचा आजार वाढत्या प्रमाणांत होता. डॉ. आण्णप्पांचें पहिलें कुटुंब १९०३ सालीं वारल्यामुळें त्यांनीं त्याच सालच्या जून महिन्यांत दुसरें लग्न केलें होतें. पण त्यांचें दुसरें कुटुंबहि ८–१०–१९०३ रोजीं पंतांच्या घरांत प्लेगनें वारलें. त्यामुळें पंत गावाबाहेर झोपडींत राहावयास गेले. अशा परिस्थितींत त्या सालीं गुरुद्वादशीचा ( आश्विन वद्य १२ ) उत्सव नेहमींप्रमाणें झाला नाहीं.

### " चढली ब्रम्हानंद–मस्ती !"

दिवसेंदिवस पंतांची स्थिति अधिकाधिक शांत होत चालली होती. त्या वेळीं त्यांची जी भूमिका होती तिचें चित्र १–११–१९०३ रोजीं त्यांनीं म्हटलेल्या पुढील पदांत उमटलें आहे. "चढली ब्रम्हानंदमस्ती । हृदयीं सद्‌गुरूची वस्ती ।।धृ०।। जीव शिव जग मिथ्या जाहलें । आत्मस्वरूपीं सहज हरपलें । परब्रम्हव्याप्ति ।।१।। चिद्विलास-खेळ मांडिला। विश्वरूपें सहज दिसला । नाहीं आदि अंतीं ।। २ ।। एकाकी न सुख म्हणुनी । गुरुशिष्य आपण होउनी । दत्तप्रेमरति ।।३।। " (द. प्रे. ल. २४९०) ते नेहमीं आत्मानंदांत निमग्न असत. तशा स्थितींत त्यांचेकडे कोणी आल्यास अगर कोणीं प्रश्न विचारल्यास येणाऱ्याच्या इच्छेप्रमाणें अगर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर म्हणून त्यांचे समर्पक उद्गार निघत. १२–११–१९०३ रोजीं प्रातःकाळीं कांहीं मंडळीसह ते फिरावयास गेले व झोपडीचे उत्तर बाजूस असलेल्या इरप्पाचे मठाशीं जाऊन तेथील समाधीच्या बाजूला बसले. सकाळच्या

त्या शांत वेळीं समोरच्या टेकडीकडे पाहात असतांना त्यांनीं चार नवीन पदें म्हटलीं व वामन वापट, नारायणराव संपगावकर वगैरे त्यांच्याबरोबर असलेल्या मंडळींपैकीं एकानें तीं टिपून घेतलीं; तीं अशीं-" निरंजनीं किती हें सुख गमतें । स्वरूपीं अंतर रमतें ॥ ध्रु० ॥ नाहीं व्यवहार आनंदसागर । चित्त किमपि न श्रमतें ॥१॥ अखंड शांति सदा निश्चिंति । स्वरूपीं मन रंगतें ॥२॥ बालावधूत दत्त निरंजनीं । प्रेमस्वरूप स्फुरतें ॥३॥" ( द. प्रे. ल. २५१० ) "विजनीं माहेरसुख भोगिलें । भवसासर त्यजिलें ॥ ध्रु० ॥ विटलें भ्रतारा टेकलें परद्वारा । परपुरुषीं रतलें ॥१॥ टाकुनी भुक्ति भोगिली मुक्ति । निजस्वरूपीं रंगलें ॥२॥ दत्तावधूत प्रेमळ स्वरूप । भक्तिभरें नटलें ॥ ३ ॥ ". (द. प्रे. ल. २५११ ) "निरंजनाची काय ही मौज । कृतांत काळ गिळील सहज ॥ध्रु०॥ असत् जग हें नाहीं जाहलें । जीवशिवांचें नाहीं काज ॥ १ ॥ ज्ञानाज्ञान बालकहाणी । बंधमोक्षांचें नुरलें व्याज ॥२॥ दत्तावधूतानें भुलविलें । प्रेमानंदाची ही मौज ॥३॥". (द.प्रे.ल. २५१२)वरील तीन्हीं पदें पंतांच्या त्या वेळच्या मनःस्थितीची साक्ष देत आहेत व त्यांच्यावरून त्यांचें चित्त व्यवहाराला विटून निरंजनांतील प्रेमसुख अथवा विजनांतील माहेरसुख भोगण्याला किती आतुर झालें होतें तें दिसून येतें. वरील पदें म्हणून झाल्यावर त्यांनीं चौथें पद म्हटलें. तें असें, " ब्रह्मगिरीवर आजि देखिला । दत्त अविनाशी ॥ ध्रु० ॥ चार वेद सवें श्वान शोभती । कल्पतरुतळवासी ॥ १ ॥ एकानेकभाव गिळुनि । डुलतो स्वानंदराशी ॥ २ ॥ देव भक्त स्वरूपीं खेळे । दत्त निजप्रेमराशी ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २५१३ ) हें पद म्हणून झाल्यावर पंतांबरोबरच्या एका इसमानें विचारलें कीं " पंत, आतां हें पद तुम्हीं कशावरून म्हटलेंत ?" तेव्हां "सहज या टेकडीकडे पाहात असतांना माझ्या बाळप्पाची मूर्ति दृष्टीस पडली म्हणून हे उद्गार निघाले " असें ते म्हणाले.

या वेळीं पंतांच्या ठिकाणची भजनस्फूर्ति दांडगी होती व जवळ जवळ रोज नवीन नवीन पदें होत होतीं. पंत झोपडीवर असतांनाच ४–१२–१९०३ रोजीं दत्त-जयंतीचा उत्सव आला व तो त्यांनीं तेथेंच यथासांग केला. मंडळीहि पुष्कळ जमली होती व उत्सवाचे दिवशीं त्यांनीं बरींच नवीन पदें म्हटलीं. उत्सव यथासांग चालला होता खरा, तरी पण गावांत प्लेगची धामधूम असल्यामुळें गुरुद्वादशीच्या उत्सवाला संक्षेपच मिळाला होता व दत्तजयंतीचा उत्सवहि झोपडींत करावा लागला ही गोष्ट त्यांच्या मनाला फार लागून राहिली होती. त्यामुळें उत्सवाचे दिवशीं पुढील पद म्हणून आपणास विजनांत ( गावाबाहेर ) आणून टाकल्याबद्दल त्यांनीं सद्गुरूकडे तक्रार केली " कांरे टाकिले भक्त विजनीं । अवधूता ॥ ध्रु. ॥ अनन्य भावें भजतों तुजला । तूंची प्रेमळ जननी ॥ १ ॥ काळांतक ब्रीद गाजतें । अनंत भुवनीं ॥ २ ॥ पायीं पडतों प्रेमें मिळवीं । दत्त निरंजनीं ॥ ३ ॥ ". ( द. प्रे. ल. २५४४ )

१९०३ च्या डिसेंबरअखेर पंत मंडळीसह गावांतील वाड्यांत राहावयास आले. तेथें आल्यावर पुनः सर्व मंडळी एकत्र जमली. तरी प्लेगच्या धामधुमीमुळें गुरुद्वादशीचा उत्सव झाला नाहीं याबद्दल पंतांना फार वाईट वाटत होतें. कारण आश्विन वद्य १२ शके

१८८५ रोजीं आपल्या बिऱ्हाडीं श्रीदत्ताच्या पादुका स्थापन करून आपल्या घरीं उत्सव करण्यास त्यांनीं सुरवात केल्यामुळें त्यांच्या घरीं होत असलेल्या उत्सवांपैकीं त्यांना गुरु-द्वादशीच्या उत्सवाचें विशेष महत्व वाटत असे. पुढें माघ वद्य १ चा ( गुरुप्रतिपदेचा ) ( २-२-१९०४ ) उत्सव जवळच आला होता. त्यामुळें ७-१-१९०४ रोजीं त्यांनीं सद्गुरूची पुढीलप्रमाणें प्रार्थना केली. " आतां तरी उत्सव हा करीं साजिरा । निरभि-मानें चरणीं पडलों दयासागरा ॥ ध्रु० ॥ द्वादशीचा उत्सव हा त्वांचि लोपिला । भक्तिभरें भजन करितां सद्गुरु कोपला । संकुचित गुरुकृपा भक्त तापला । अनंत शक्ति सद्गुरु तुझी अजरामरा ॥ १ ॥ " वगैरे. ( द. प्रे. ल. २५५८ ) गुरुप्रतिपदेचा उत्सव यथासांग व बिनबोभाट पार पडला. तेव्हां उत्सवाचे दुसरे दिवशीं म्हणजे ३-२-१९०४ रोजीं पंतांनीं पुढील पद म्हटलें. " दत्तप्रतिपदीं आनंद झाला । गुरुउत्सव सांग केला ॥ ध्रु० ॥ भक्ति देऊनी उत्सव करविला । निजप्रेमानंद दिधला ॥ १ ॥ सेवासाधन कांहीं नसतां । निजठाव मज दाविला ॥ २ ॥ मीपणत्यागें पायीं पडतां । दत्त प्रेमामृतें भिजला ॥३॥ ". (द. प्रे. ल. २५६१)

## सौ. यमनाक्कांचें निधन

पंतांचें कुटुंब सौ. यमनाक्का यांची प्रकृति दिवसेदिवस अधिकाधिक खालावत चालली होती. डॉक्टर, वैद्य वगैरेंचे उपचार करण्यांत येत होते; पण कांहीं गुण आला नाहीं व ८ मार्च १९०४ रोजीं त्यांनीं इहलोकची यात्रा संपविली. त्यावेळीं त्यांची मुलगी अंबाक्का ही अगदींच लहान होती. परंतु घरांतील सर्व माणसें तिला जिवापलकिडे जप-णारीं असल्यामुळें तिच्यासंबंधीं काळजी करण्याचें कारण नव्हतें. पंत सेवानिवृत्त झाल्या-नंतर लौकरच त्यांच्यावर पत्नीच्या वियोगाचा हा प्रसंग आला व त्यांना फार दुःख झालें; पण स्वरूपानुसंधान कायम टेवून सुखदुःखादि सर्व द्वंद्वांकडे ते अन्वयदृष्टीनें पाहात अस-ल्यामुळें त्यांच्या अंतःकरणांतलि दुःखाच्या उमाळयाचें पर्यवसान भजनस्फूर्तींत होऊन ज्या दिवशीं सौ. यमनाक्कांनीं देह ठेविला त्या दिवशीं ते भजनाला बसले असतांना त्यांनीं पुढील पद म्हणून सौ. यमनाक्कांचा गौरव केला. " पावन तूं रवितनया । वरिलें धन्यत्व सेवुनि अत्रितनया ॥ ध्रु० ॥ आजन्म योगधारिणी । मातृ-पितृ-बंधु-भगिनी-सौख्य-कारिणी । बाल-गोपाल-पाडसां जेवीं हरिणी । ध्यासी नित्य गुरुपाया ॥ १ ॥ किंचिन्मात्र नसे स्वार्थ । संतसेवामिषें साधिला परमार्थ । जाणुनी आत्मतत्वार्थ । स्वात्मानंदीं केला नरजन्म सार्थ । योगिनी अवधूतप्रिया ॥ २ ॥ प्रेमळ सदयहृदया । आर्त देखुनी त्यावरी करिसी दया । करूनी बोधसूर्योदया । शांति भोगिसी पावुनी स्वरूपठाया । मिळसी जाउनी दत्तराया ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २५६५ ) या पदावरून पंतांची आपल्या कुटुं-बासंबंधीं काय भावना होती तें स्पष्ट दिसून येतें. या पदांत त्यांनीं आपल्या कुटुंबाला ' यमुना ' या नित्य परिचयांतलि नावानें न संबोधितां ' रवितनया ' म्हटलें आहे. कारण यमुना म्हणजेच रवितनया. पण ' यमुना ' हें प्रचलित नाव न उच्चारतां त्याच नावाचा

पर्यायवाचक शब्द वापरल्यानें जुन्या वळणाच्या हिंदुकुटुंबांतील भावनांना अनुसरून त्यांच्या ठिकाणची शालीनता व मर्यादशीलपणा हीं व्यक्त झालीं आहेत. त्याचप्रमाणें त्यांनीं आपल्या स्वतःचा नामनिर्देश करण्याकरितां ‘ दत्तात्रय ’ अथवा ‘ दत्त ’ शब्द न वापरतां त्याचा पर्यायवाचक शब्द जो “ अत्रितनय ” त्याचा उपयोग केला आहे. या शब्दयोजनेंतील मार्मिकपणा रसिक वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. ‘रवितनया’ व ‘अत्रितनय’ या शब्दांचा विशिष्ट अर्थ लक्षांत न आल्यास अखंड ब्रह्मचारी जे श्री अत्रितनय त्यांच्याशीं रवितनयेचा विवाह कधीं झाला हें वाचकांना मोठेंच गूढ पडेल ! कारण या पदाच्या सुरवातीला “ अगोदरच पावन असलेली जी तूं तिनें दत्तात्रेयाला वरून धन्यत्व वरिलेंस ” असें पंतांनीं आपल्या कुटुंबाला उद्देशून म्हटलें आहे. या पदांत त्यांनीं आपल्या कुटुंबाचे जे गुण गाइले आहेत त्यांवरून सौ. यमनाक्का या त्यांना प्रपंच-परमार्थांत कायावाचामनानें साह्य करणाऱ्या आदर्शभूत पत्नी होत्या हें स्पष्ट होत आहे. गोविंदरावजींनीं त्यांना “ आमच्या घरची कुलदेवता, साक्षात् महालक्ष्मीच ” असें म्हटलें आहे व “अखंड शांति ”, “निःस्वार्थी प्रेमा” व “ शुद्ध अंतःकरण” हे त्यांच्या ठिकाणचे गुण गोपाळरावजींनीं प्रामुख्यानें नमूद करून ठेविले आहेत. तसेंच त्यांच्या कुटुंबांतील इतर मंडळी व त्यांचेकडे येणारी भक्तमंडळी त्यांच्यासंबंधीं धन्योद्गार काढतात; त्यामुळें त्यांचा अधिकार किती मोठा होता यासंबंधीं यथार्थ कल्पना करितां येते. परंतु पंतांसारख्या अधिकारी पतीकडून “ योगिनी,” “ अवधूतप्रिया”, “भक्ततापहारिणी ”, “बालगोपाल-पाडसां जेवीं हरिणी”, “पूर्ण निःस्वार्थी”, “ संतसेवामिषें परमार्थ साधलेली ”, “सदय-हृदया”, “ आर्तांवर दया करणारी ”, “ बोधसूर्याचा उदय करणारी ” हीं समर्पक विशेषणें ज्या माउलीला मिळालीं ती अत्यंत धन्य समजली पाहिजे ! तसेंच या सर्व विशेषणांत प्रापंचिक दृष्टीनें योजिलेलें एकहि विशेषण नाहीं. आपल्याकडे येणाऱ्या असंख्य बालगोपालांना अथवा भक्तांना मातृस्नेहानें व दयार्द्र अंतःकरणानें त्यांनीं वागविल्याबद्दल पंतांनीं जो त्यांचा गौरव केला आहे त्यावरून पंतांना आपल्या शिष्यप्रबोधनकार्यांत त्यांचें फार साह्य झालें असलें पाहिजे हें उघड दिसतें. या पदांत व्यक्त होणारा पंतांचा सात्विक शोक पाहिला म्हणजे त्यांच्या थोर व कोमल अंतःकरणाची साक्ष पटते. वास्तविक सेवानिवृत्त झालेल्या गृहस्थाला उतारवयांत पत्नीचा वियोग होण्यासारखें दुःख नाहीं असें आपण समजतों. परंतु द्वंद्वातीत अशा अढळ भूमिकेवर पंतांची बैठक असल्यामुळें त्यांना या आपत्तीचें कांहीं विशेष वाटलें नाहीं; तर उलट आपल्या कुटुंबाला उद्देशून वरील पद म्हटल्यावर त्याच दिवशीं सद्गुरूला उद्देशून त्यांनीं पुढील पद म्हटलें. “ पूर्ण केला संसार । दत्ता नेलें भवाब्धिपार ॥ ध्रु० ॥ निवृत्तीस्तव दाविली प्रवृत्ति । स्वरूपीं दिधला थार ॥ १ ॥ प्रपंच परमार्थ होउनी तूंची । दाविलें निजगुजसार ॥२॥ द्वैतबंधन समूळ खंडिलें । दत्तप्रेमसागर ॥३॥”. ( द. प्रे. ल. २५६७ ) या पदाच्या द्वारें पंतांनीं आपल्या गृहस्थाश्रमाचें जें रहस्य स्पष्ट करून सांगितलें आहे, तें म्हणजे ‘ अनुभव पूर्ण होण्याकरितां तुला प्रपंच केला पाहिजे’ म्हणून सद्गुरु बालमुकुंदांनीं श्रीशैल्ययात्रेला जाण्यापूर्वी आपणाला जो

आज्ञा केली होती त्या आज्ञेप्रमाणें निवृत्तीस्तव म्हणजे स्वरूपानुभव स्थिरावण्याकरितां प्रवृत्तिमार्गाचा अवलंब करून आपण लग्न करून घेतलें, आपले प्रपंच व परमार्थ दोन्हीहि सद्गुरुच झाला व त्यानें निजगुजसार दाखवून, द्वैतबंधन संमूळ खंडिलें आणि संसार पूर्ण करून भवाब्धीच्या पार आपणास नेलें हें होय," असें पंतांनीं म्हटलें आहे. तसेंच सौ. यमनाक्कांच्या निधनानंतर दहाव्या दिवशीं ( १८–३–१९०४ ) पंतांनीं भजनाच्या वेळीं पुढील पद म्हटलें व त्यामध्यें सूत्ररूपानें आपलें स्वतःचें चरित्रच जणूं ग्रथित केलें आहे. "मिळतां बालावधूत-पाउलें। नरजन्माचें सार्थक झालें ॥ धृ० ॥ अभयवचनें मुक्त होऊनी। बोधामृत प्राशन केलें ॥ १ ॥ अवधूतपंथ प्रगट करूनी। सद्गुरुनाम जगीं गाजविलें ॥ २ ॥ प्रेमामृत पिउनी पाजुनी। दत्तस्वरूपीं भक्त जागविले ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. २५६८) या पदाचें धृपद व प्रथम चरण यांमध्यें १८७५ सालीं सद्गुरु बालमुकुंदांचें आपणाला दर्शन झाल्यापासून १८७७ अखेर त्यांचा वियोग होईपर्यंतचा अनुभव पंतांनीं दिला आहे व शेवटल्या दोन चरणांत १८७९ पासून १९०४ पर्यंत झालेल्या शिष्यप्रबोधन कार्याचें दिग्दर्शन केलें आहे. वरील पद झालें त्याच्या दुसऱ्या दिवशीं ( १९–३–१९०४ ) आपण कशाकरितां जन्मास आलों तें त्यांनीं पुढील दोन पदांनीं व्यक्त केलें. "अवधूतमार्ग प्रगट कराया। आलों जन्मासी ॥ धृ० ॥ दंभमतें खंडन करूनी बुडवीं समरसीं ॥ १ ॥ अनुभव-मार्ग प्रगट करूनी। मुक्ति केली दासी ॥ २ ॥ निजबोधामृत पाजुनी दत्त। मग्न प्रेमरसीं ॥ ३ ॥". ( द. प्रे. ल. २५७४ ) "चिद्विलासें जन्म जाहला। शिवस्वरूपीं अहं निमाला ॥ धृ० ॥ वासनात्रय खंडुनी सहज। भक्त प्रेमें धाला ॥ १ ॥ वेदशास्त्रांची नाहीं भीड। स्वानुभवें भरला ॥ २ ॥ द्वैताद्वैतातीत अवधूत। दत्तहृदयीं भरला ॥ ३ ॥". ( द. प्रे. ल. २५७५ ) यांपैकीं पहिल्या पदांत दंभमतांचें खंडन करून अवधूतमार्ग अथवा अनुभवमार्ग प्रगट करण्याकरितां आपण जन्मास आलों असें म्हटलें आहे; तर दुसऱ्यांत विवाक्षित हेतूनें आपण जन्मास आलों ही कल्पना ग्राह्य न मानितां सहज चिद्विलासांत निराळेपणानें आपण जन्मास आलों असें मानिलें तरी अनुभव असा आला कीं शिवस्वरूपीं जीवभाव निमाला, वासनाखंडण होऊन प्रेमामृतप्राशनानें पूर्ण तृप्ति झाली व निःशब्द अनुभव पूर्णपणें बाणून आपलें हृदय अवधूतमय बनून गेलें असें पंतांनीं सांगितलें आहे.

ज्याप्रमाणें १९०३ च्या जून महिन्यांत नोकरीचा राजीनामा दिल्यावर ३१–८–१९०३ रोजीं अण्णांना लिहिलेल्या, मागें उल्लेख केलेल्या, पत्रांत "आम्हीहि जगाचा राजीनामा देऊन फार दिवस उपेक्षिलेल्या आमच्या घरच्या व्यवस्थेस म्हणजे अवधूतचरणसेवेस शांत अंतःकरणानें अहर्निशीं लागलों आहोंत" असें पंतांनी म्हटलें आहे, त्याचप्रमाणें सौ.यमनाक्कांनीं देह ठेविल्यानंतर झालेल्या त्यांच्या वर उल्लेख केलेल्या व इतर पदांमध्यें त्यांच्या ठिकाणचें पूर्ण असंगत्व व अनुभवाचें पूर्णत्व दर्शविणारें उद्गार निघाले आहेत.

## ३१६

## हुकेरीची खेप

१९०३ च्या आक्टोबरपर्यंत पंतबंधु गोपाळरावजी बेळगावमध्यें कलेक्टर–कचेरींत डेप्युटी चिटणीसच्या जागेपर्यंत चढले होते. त्या वेळीं ते पंतांजवळच असत. १९०३ च्या आक्टोबर महिन्यांत बेळगाव जिल्ह्यापैकीं हुकेरी तालुक्यांत म्हालकऱ्याच्या जागेवर त्यांची नेमणूक झाली व ते हुकेरीस राहावयास गेले. नंतर १९०४ च्या मार्च महिन्यांत सौ. यमनाक्का वारल्या; त्यापूर्वींच पंत सेवानिवृत्तहि झाले होते. तेव्हां पंतांनीं हुकेरीस येऊन आपल्याजवळ कांहीं दिवस राहावें म्हणजे त्यांना विश्रांति मिळेल असा गोपाळरावजींनीं आग्रह धरिला. आपल्या हाताखालीं धाकटा भाऊ सुविद्य होऊन त्याच्या नोकरीवर जाऊन राहाण्याचा पंतांचा हा पहिलाच प्रसंग होता. त्यांतल्या त्यांत त्यांचें गोपाळावर फार प्रेम होतें. त्याच्या ठिकाणचें चातुर्य, त्याची भावनाप्रधान वृत्ति व त्यांच्या ठिकाणीं त्याची असलेली अतुल निष्ठा या सद्‌गुणांची त्यांच्या बालपणापासूनच त्यांना साक्ष पटलेली होती व १८८१ च्या जानेवारी महिन्यांत त्याला इंग्रजी शिक्षणाकरितां बेळगावास आपल्या बिऱ्हाडीं आणला त्याच दिवशीं त्यांनीं आपल्या 'प्रपंचाचा चार्ज' त्याचेकडे दिला होता आणि तेव्हांपासून त्यानें एकीकडे प्रथम विद्यार्जन करून व नंतर नोकरी करून तो मोठ्या दक्षतेनें सांभाळला. तेव्हां आपल्या गोपाळाचा शब्द मोडणें पंतांना शक्य नव्हतें. त्यांतून गोपाळरावजी फार युक्तिवान व समयज्ञ असल्यामुळें पंतांच्या अवधूतवृत्तीचें प्रेमानें कसें आकलन करावें ही कला त्यांना चांगली अवगत होती. सौ. यमनाक्का हयात असतांना एके दिवशीं रात्रीं पंत उठले आणि कोणालाहि दाद न देतां कफनी घालून व मोठ्यानें 'अलख' पुकारून जे घराबाहेर पडले ते तडक किल्ल्याच्या मैदानाकडे चालले. त्यांचा तो 'अलख' शब्द सौ. यमनक्कांनीं ऐकिला व त्या बाहेर येऊन पाहातात तों अपरात्रीं पंत एकटेच घराबाहेर निघून गेल्याचें त्यांना आढळून आलें. तेव्हां त्यांनीं गोपाळरावजींना उठवून झालेला प्रकार सांगितला. त्याबरोबर ते तसेच घराबाहेर पडले व पंतांच्या मागोमाग धावत गेले. आपल्यापुढें थोड्या अंतरावर पंत आहेत असें पाहून गोपाळरावजी जरा बाजूला वळले व पंतांच्या जरा पुढें जाऊन त्यांच्या रस्त्यांत आडवे पडून राहिले आणि ते जवळ येतांच त्यांना म्हणाले "दत्तू, आतां या वेळेस आम्हांला सोडून तूं कोठें निघालास? मी तुला जाऊं देणार नाहीं. मला तुडवून तुला जावयाचें असल्यास खुशाल जा." ते गोपाळरावजींचे निर्वाणीचे शब्द ऐकून पंतांनीं त्यांना उठवून घट्ट हृदयाशीं धरिलें व त्यांची समजूत घातली. नंतर दोघेहि घरीं परत आले व सर्वांना आनंद झाला. इतका ज्यांच्या प्रेमाचा जिव्हाळा त्या गोपाळरावजींच्या नोकरीच्या गावीं जाण्याचें पंतांनीं कबूल केलें व १९०४ च्या एप्रिल महिन्याच्या सुरवातीला कांहीं मंडळीसह ते हुकेरीस गेले. त्यामुळें गोपाळरावजींना परमानंद झाला व त्यांनीं हुकेरी, कोचरी, चिकालगुड, नेरली वगैरे आजूबाजूच्या गावांतलि पंतांच्या शिष्यमंडळींना कांहीं दिवस हुकेरीस बोलावून घेतलें. त्यामुळें पंत तेथें असेपर्यंत गोपाळरावजींच्या बिऱ्हाडीं एक प्रकारचा उत्सवसमारंभच चालला होता. तेव्हां गोपाळरावजींच्या ठिकाणचें तें अत्युत्कट

बंधुप्रेम व गुरुबंधूंबद्दलची आपुलकीची कळकळ पाहून पंतांनीं भजनाच्या वेळीं पुढील पद म्हटलें " काय वर्णूं मी बंधुप्रीति । सहज दाविली निजप्रेमस्थिति ॥ ध्रु० ॥ " ( द. प्रे. ल. २५८१ ) त्या दिवशीं त्यांचीं आणखीहि कांहीं नवीन पदें झालीं. तसेंच तेथील तो प्रेमोल्हास पाहून पंतांनीं पुढील पद म्हटलें " प्रेमळ सद्‌गुरु दत्तावधूत । भक्ताघरीं आला चालत ॥ध्रु०॥ भक्तजननी ती भक्तवत्सल । भक्ता पाजी प्रेमामृत ॥ १ ॥ प्रेमतृप्त प्रेमभुकेली । प्रेमें भक्तहृदयीं नांदत ॥ २ ॥ प्रेमास्तव दत्त सगुण । प्रेमपानें विश्व हें मुक्त ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. २५८६ )

हुकेरीस कांहीं दिवस मुक्काम करून पंत कोचरीस गेले. तेथें सिदोजीराव व्यंकटराव ऊर्फ बाळासाहेब देसाई, अप्पासाहेब मजतीकर वगैरे पंतांची बरीच शिष्यमंडळी होती; शिवाय ते तेथें जावयाचे असल्यामुळें आजूबाजूची पुष्कळ शिष्यमंडळी तेथें जमली होती. पंतांचा मुक्काम तेथें असतांना त्यांचा बोध, भजन-पूजन, टिपरी खेळणें, हास्य-विनोद वगैरे प्रकार नित्य चालत असत. ते ४०–५० मंडळीसह हिरण्यकेशी नदीवर स्नानास जात व तेथें नदींतील पाण्यांत शिष्यमंडळीबरोबर त्यांची जलक्रीडा चालत असे. या वेळीं कोचरी येथें पंतांचा मुक्काम सात आठ दिवस होता. त्या दरम्यान तेथें त्यांचे पुष्कळ नवीन शिष्य झाले व गावभर 'शिवायनमः'चा गजर चालला होता. तेथील मंडळींचा तो अपूर्व उत्साह व दांडगी निष्ठा पाहून पंतांना फार समाधान झालें. कोचरी येथील मंडळींत बाळासाहेब देसाई व अप्पासाहेब मजतीकर हे प्रमुख होते. त्याचप्रमाणें बाळासाहेब देसायांचे परम स्नेही शिवराम गोविंद सहस्रबुद्धे हेहि कोचरींतील मंडळींत मोडत असत व पंत कोचरीस गेले असतां ते तेथें असावयाचेच. पण त्या वेळीं ते वऱ्हाडांत असल्यामुळें त्यांना कोचरीस हजर राहातां आलें नाहीं; त्यामुळें कोचरी येथें असतांना त्यांची आठवण होऊन पंतांनी त्यांना २७–४–१९०४ रोजीं एक पत्र लिहिलें. तें छापलेलें नाहीं, परंतु तें प्रेमानें ओथंबलेलें असून त्यावरून पंतांचा आपल्या शिष्यमंडळींशीं संबंध किती जिव्हाळ्याचा होता यासंबंधीं कल्पना होते. त्या पत्रांत पंत म्हणतात " प्रेमळ दादा, सविस्तर हकीगतींचीं पत्रें पोचलीं. प्रेमोद्गारानें वृत्ति निजप्रेमानें ओथंबली. प्रेमळाचा वियोग सहन करणें कोणत्याहि धीरास होणें नाहीं. काय पत्र लिहूं असें वाटून इतका काळ उत्तर पाठविलें नाहीं. अकस्मात या खेपेस या बाजूला फेरी जाहली. कोचरी मुक्कामीं आल्यापासून एकसारखी तुझी आठवण होते. चुकल्या चुकल्यासारखें वाटतें. प्रेमळ भक्तांचा मेळा सदोदित सांनिध असल्यामुळें निर्विकल्प खेळ, सहज बोध हीं चालणारच. क्षणोक्षणीं प्रेमलहरी उठतात. त्या त्या काळीं तुझें स्मरण होऊन हळहळ वाटते. या अमोलिक बाळांत तुझा प्रेमाचा गड्डा देसाई आहे. हें तरी भाग्यच. कारण तो आपला अनुभव तुला कळवीलच. पत्र लिहितांना प्रेमानें वृत्ति भांबावली. लेखणी चालेना, अंगाला कंप सुटला. यामुळें अक्षरें चांगलीं निघेनात. पुढें कांहीं सुचेना. तुझा दत्त "

## गोविंदरावजींचें तिसरें लग्न

कोचरीहून बेळगावास परत जातांना चिकालगुड येथें त्यांचे भक्त केशव बळवंत व दत्तात्रय बळवंत पाटील यांचेकडे पंतांचा तीन दिवस मुक्काम होता. तेथेंहि पुष्कळ भक्तमंडळी जमली होती. या खेपला पंतांच्या मनांतून हुकेरी, कोचरी, चिकालगुड वगैरे ठिकाणीं आणखी कांहीं दिवस घालविण्याचें होतें व त्यांच्या प्रकृतीच्या दृष्टीनें ते हितावहहि होतें. या सुमारास 'आतां आपल्याला हिमालयावर जावयाचें आहे' अशा अर्थाचे त्यांचे उद्गार निघत व 'एकदां बेळगावास जाऊन वाघ गुहेंत गेला म्हणजे लवकर बाहेर पडणें होत नाहीं' असेंहि ते म्हणत. परंतु गोविंदरावजींचें दुसरें कुटुंब १९०३ सालीं निवर्तलें असल्यामुळें याच संधीला त्यांचें तिसरें लग्न होण्याचें निश्चित होऊन लग्नसमारंभ बाळेकुंद्रीजवळ असलेल्या मोदगे गावीं होण्याचें ठरलें व लग्नाकरितां पंतांनीं आलेंच पाहिजे असा गोविंदरावजींनीं आग्रह धरिला. त्यामुळें पंतांना तातडीनें बेळगावास परत जावें लागलें. नंतर ते मोदग्यास गेले व तेथील लग्नसमारंभ उरकल्यावर परत बेळगावास आले. अशा रीतीनें पंतांचा सुमारें महिना दीड महिना भक्तमंडळींच्या मेळ्यांत मोठ्या प्रेमानंदांत गेला.

पंत कोचरीहून परभारें बेळगावास गेल्यामुळें त्यांना बेडकिहाळास नेऊन तेथें त्यांचें जंगी स्वागत करण्याच्या हेतूनें आलेले त्यांचे शिष्य माधवराव जनार्दन कुळकर्णी, इनामदार, यांची मात्र फार निराशा झाली.

## प्रकरण ४१ वें

---

# बेडकिहाळकरांचा विरस; मरिकट्टीची दुसरी खेप; कोचरीची दुसरी खेप.

---

### बेडकिहाळकरांचा विरस !

१९०४ च्या सुरवातीला माधवराव जनार्दन ऊर्फ बाळासाहेब इनामदार वगैरे बेडकिहाळमधील पंतांच्या शिष्यमंडळींनीं बेडकिहाळ येथें येण्याची त्यांना विनंति केली होती व त्यांचा आग्रह पाहून पंतांनींहि जाण्याचें कबूल केलें होतें. तेव्हां बेडकिहाळकर मंडळींना अत्यानंद होऊन पंत बेडकिळहास आल्यावर मोठा उत्सवसमारंभ करावयाचा व त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढावयाची असा त्यांनीं बेत केला आणि मुद्दाम मुंबईस मनुष्य पाठवून पंतांकरितां एक जरीकाठी कफनी, जरीकाठी मंदील, चांदीचा त्रिशूळ, चांदीचा कमंडलू, चांदीच्या पादुका, स्फटिकाची माळ, एक मौल्यवान आंगठी, एक भरजरी शाल वगैरे जिन्नस तयार करवून आणिले व बाळासाहेब इनामदारांच्या घराला रंगसफेती वगैरे करून पंतांच्या स्वागताची जय्यत तयारी केली जेव्हां एप्रिल १९०४ च्या सुरवातीला पंत गोपाळरावजींकडे हुकेरीस गेल्याचें बेडकिहळास समजलें तेव्हां बाळासाहेब स्वतः पंतांना बेडकिहाळास नेण्याकरितां हुकेरीस गेले; तेथून ते पंतांबरोबर कोचरीस गेले व तेथून चिक्कालगुडास गेले आणि पंत तेथून बेळगावास जाण्यापूर्वी त्यांना बेडकिहाळास नेण्याचा त्यांचा बेत होता; परंतु पंतबंधु गोविंदरावजींच्या लग्नाकरितां पंतांना ताबडतोब बेळगावास परत जावें लागल्यामुळें बेडकिहाळास जाण्याचा बेत तसाच राहिला. पण निराश न होतां बाळासाहेब पंतांबरोबर बेळगावास गेले व लग्नसमारंभ उरकल्यावर पंतांना बेडकिहाळास नेण्याचा त्यांचा विचार होता. परंतु बेडकिहाळ येथील मंडळींनीं आपल्या स्वागताकरितां काय काय तयारी केली होती ती जेव्हां पंतांना समजली तेव्हां, ‘ हत्तीवर बसवून हे लोक माझी धिंड काढणार काय ?’ असें ते म्हणाले व बाळेकुंद्रीहून बेळगावास परत जातांना ‘ आतां बेडकिहाळास जाणें होईलसें दिसत नाहीं. वाघ गुहेंत शिरला; आतां बाहेर पडणें कठीण ’ असे त्यांनीं उद्गार काढले. बेळगावास परत गेल्यावर ‘ तूर्त मी फार थकलों आहें. तेव्हां आतांच तिकडे येणें होणार नाहीं. पुढें मागें पाहूं ’ असें त्यांनीं बाळासाहेबांना सांगितलें. त्यामुळें बाळासाहेबांची फार निराशा झाली व ते बेडकिहाळास परत गेले. नंतर थोड्या दिवसांनीं पंतांनीं तिकडे येण्याबद्दल त्यांचें आग्रहाचें पत्र आलें. तेव्हां पंतांनीं मुद्दाम मनुष्य

पाठवून त्यांना कळविलें कीं " सध्यां येणें होत नाहीं. आठ पंधरा दिवसांत तूंच सर्व सामान घेऊन इकडे ये. मागाहून जमेल त्याप्रमाणें तिकडे येणेचें पाहूं. "

दिवसेदिवस पंतांची वृत्ति अधिकाधिक शांत होत चालली व प्रकृतिहि थोडथोडी खालावत चालली. त्यामुळें ते घराबाहेर फारसे जात नसत. २-६-१९०४ रोजीं बाळासाहेब बेडकिहाळकरांना लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात "तेथील एकंदर स्वजनमेळा सुखरूप असल्याचें कळविणें. त्या सर्वांस इकडील निजप्रेमस्मरण देणें. बहुतेक काळ तूष्णींस्थितींत जातो. दरबारचीं कामें बहुतेक बंद पडल्यासारखीं झालीं आहेत. उत्थानाचा वीट येतो. सर्वांच्या संकल्पाप्रमाणें या खेपेस तिकडे स्वारी झाली नाहीं. जारीनें, मेहनतीनें, खर्चानें केलेल्या तयारीची पूर्तता झाली नाहीं यांत चूक कोठेंच नाहीं. सहज क्रमास अनुसरून सृष्टींतील कार्यें घडत असतात. मर्यादित शक्तीच्या क्षुल्लक अहंकाराच्या कर्तृत्वानें कोणतीच गोष्ट घडून येत नाहीं. म्हणून कृत संकल्पाच्या सिद्धि-असिद्धीपासून ज्ञात्यास सुखदुःखादि द्वंद्वांची बाधा बिलकूल होत नाहीं. कर्तृत्वाभिमान पूर्ण निमाला कीं सहज समाधीचें सुख स्वतःसिद्धच आहे. बंधमोक्षांची गोष्टच नाहींशी होते; आपोआप केव्हांहि अंतर्बाह्य प्रेम खेळूं लागतें; भक्ति, वैराग्य, ज्ञानाची खरी स्थिति अनायासें येते. आपण नाहींसा होऊन सर्वत्र सद्‌गुरूचा चिद्विलास प्रगट होतो. विशेष लिहूं शकत नाहीं. प्रेमळ आहेस. तथापि इकडे आल्यास हरकत नाहीं. प्रेमोद्गारास आवडेल तसें करणें. " ( पु. ५-९१ )

याप्रमाणें पंतांचें पत्र आल्यावर बाळासाहेब व आपटे आडनावाचा पंतांचा एक शिष्य ( ज्याला " मास्तर " म्हणत असत व जो कांहीं दिवस बाळासाहेबांकडे राहात असे तो ) असे दोघे पंतांकरितां तयार केलेले सर्व जिन्नस घेऊन बेळगावास आले व त्यांनी ते पंतांना अर्पण केले. तेव्हां पंतांनीं त्या जिनसांपैकीं चांदीचा कमंडलू मोडून त्याची उत्सवमूर्ति करण्यास सांगितलें व बाकीचे जिन्नस पूजेच्या ठिकाणीं ठेवण्यास सांगितलें. परंतु कफनी वगैरे आपण आणिलेल्या वस्तु पंतांना एकदां तरी घालून पाहाव्यात असा बाळासाहेबांनीं आग्रह धरिल्यामुळें पंतांनीं त्या वस्तु घातल्या व त्या वेळेपुरतें तरी बाळासाहेबांचें समाधान झालें ! पुढें पंतांच्या सांगण्याप्रमाणें तो चांदीचा कमंडलू मोडून त्याची उत्सवमूर्ति करण्यांत आली व तीच हल्लीं दर उत्सवाचे वेळीं पालखींत ठेवीत असतात. त्याचप्रमाणें बाकीचे जिन्नसहि पूजेच्या ठिकाणीं ठेवण्यांत आले असून अजूनहि त्यांची नित्य पूजा होत असते. बाळासाहेब व मास्तर हे बेडकिहाळास परत जाण्यास निघाले तेव्हां पंतांनीं बाळासाहेबांस कफनी, पटका, अवधूत-सोटा व पादुका हे जिन्नस पुजेकरितां दिले.

बाळासाहेब बेळगावाहून बेडकिहाळास परत गेले तरी त्यांच्या संकल्पाप्रमाणें पंत बेडकिहाळास न गेल्यामुळें त्यांच्या मनाला मोठा धक्का बसला व ते आपला बहुतेक वेळ भजनांत घालवूं लागले; घरकामाकडे त्यांचें दुर्लक्ष होऊं लागलें आणि त्यामुळें त्यांचे वडील व घरांतील इतर मंडळी यांना त्रास होऊं लागला. त्या वेळीं आपटे मास्तर व वामन जोशी यांना बाळासाहेबांनीं आपल्याजवळ ठेवून घेतलें होतें आणि ते त्रिवर्ग कोणाची फारशी पर्वा

न करितां आपला काळ भजनांत अगर गुरूसंबंधीं गप्पागोष्टी करण्यांत घालवीत असत. ही हकिकत जेव्हां पंतांचे कानावर गेली, तेव्हां त्यांनीं २५–७–१९०४ रोजीं बाळासाहेबांना मोठ्या प्रेमानें पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें, " प्रेमळा, कुशलवृत्त वरचेवर कळविणें. सांगितल्या गोष्टी बिनचूक चालविणें. पुढारी या नात्यानें सर्व बांधवांना आज्ञांकित कित्ता वळवून दाखविणें. समर्थांच्या ब्रीदाला कलंक न लागेल असें वर्तन ठेवणें प्रत्येक अंकितांचें कर्तव्य आहे आणि हीच सेवा संतमान्य आहे. सहज प्रेम विसरूं नये हा धर्म. गुर्वाज्ञांकुशानें विकारग्रस्त मनाला आवरून धरणें शौर्य, समर्थअभय–वचनावर दृढ विश्वास ठेवून कसल्याहि प्रसंगीं न डगमगणें खरें धैर्य; वचनाचा अनुभव घेण्यास उतावीळ न होणें सबूरी; तनुमनधनाशा टाकून अनुकूल, प्रतिकूल स्थितींत एकरूप राहाणें निजशांति; कोणतीहि कामना नसतां प्रेमानें डुलत राहाणेंच अनिमित्त भक्ति; विश्वानंत व्यवहार पाहून कोठेंहि चूक न दिसणें खरें ज्ञान; सद्‌गुरुपायीं आपलेपणा सर्व अर्पून स्वस्थ राहाणें मुक्तदशा; आपणासहित सर्व विश्वविस्तार सहजप्रेमाचे तरंग आहेत असें अनुभवदृष्टीनें पाहाणें भजन; निस्तरंग प्रलयांबुधि अवधूतस्वरूपीं स्वभावसरिता नामरूप-व्यवहारसहित लीन होणें सद्‌गुरुपदीं नमन म्हणजे ॐनमः शिवाय. " ( पु. ५–९२ )

वरील पत्र बाळासाहेबांना मिळालें; परंतु त्यांची वृत्ति अधिकाधिक भडकूं लागून एके दिवशी ते, आपटे मास्तर व वामन जोशी असे त्रिवर्ग कफन्या घालून कोणालाहि न कळवितां घरांतून निघून गेले ! ही गोष्ट बाळासाहेबांच्या घरांतील मंडळींना समजतांच घरांत हाहाःकार उडाला व बाळासाहेबांचे वडील, चुलते व आणखी एक दोन इसम असे त्यांच्या शोधार्थ निघाले. ही मंडळी आपल्या मागून येताहेत हें त्या त्रिवर्गास समजतांच त्यांनीं गळतग्याचा रस्ता धरिला. अखेर पाठलाग करणाऱ्या मंडळींनीं त्यांना गळतग्यास गाठलें आणि बाळासाहेबांचे वडील व चुलते यांनीं घरीं येण्याबद्दल त्यांच्या पुष्कळ विनवण्या केल्या; तरी ते ऐकेनात. शेवटीं एकानें अशी तडजोड सुचविली कीं तूर्त बाळासाहेबांनीं घरीं परत जावें, नंतर पंतांकडे मनुष्य पाठवून त्यांचे कानावर सर्व हकीकत घालावी व ते सांगतील त्याप्रमाणें बाळासाहेबांनीं वागावें. ही योजना बाळासाहेबांना पटून ते घरीं जाण्यास तयार झाले व सर्व मंडळी बेडकिहाळास परत गेली. नंतर ठरल्याप्रमाणें मास्तर मुद्दाम बेळगावास गेला व त्यानें घडलेला सर्व प्रकार पंतांच्या कानावर घातला. तेव्हां पंतांना फार वाईट वाटलें व त्यांनीं एक आज्ञापत्र काढून सर्व गुरुपुत्रांना लागू पडणाऱ्या अशा दहा आज्ञा केल्या आणि गुरुपुत्रांनीं प्रपंच-परमार्थीं कसें वागावें यासंबंधीं नियम घालून दिले. ( पुष्प ५-९५–१०१ ) त्यांपैकीं ७ व्या आज्ञेंत पुढील मजकूर आहे. " ज्या मार्गांत कर्म, उपासना, योग यांची गडबड नाहीं, सद्‌गुरुकृपेनें ज्याचा उदय होतांच जिकडे तिकडे अंतर्बाह्यरहित सत्यज्ञानानंत ब्रम्हच आपोआप प्रकाशूं लागतें आणि सर्व द्वंद्वांचा, त्रिपुटींचा, साधनांचा, समूळ द्वैताचा बाजारच आटोपतो, असा अनादि शुद्ध ज्ञानमार्ग अवधूतचरणप्रसादानें प्राप्त झाल्यावर व त्याचीं प्रेमपूरित फळें अनायासें नित्य चाखावयास मिळाल्यावरहि घरदार सोडून वनांत राहाण्याची, वेष

पालटण्याची किंवा सहज प्राप्त स्थितीचा अव्हेर करून भलत्याच मार्गाचें अवलंबन करण्याची बुद्धि कदापिहि होऊं नये. जर होईल तर त्यास कपाळकरंटाच म्हणावयाचा; सहजामृतसागर टाकून मिथ्या मृगजळाकडे धाव घेणें होय. असें होऊं नये." या दहा आज्ञा लिहून झाल्यानंतर पंतांनीं "ध्यानांत ठेवण्याच्या कांहीं गोष्टी" म्हणून मोठ्या कळकळीनें कांहीं मार्मिक सूचना केल्या आहेत व अधिकारानुरूप गुरुपुत्रांचे पाच वर्ग कोणते तें दाखविलें आहे आणि त्यांपैकीं आपण कोणत्या वर्गांत मोडतों तें प्रत्येकानें आपल्यास विचारून जागृत राहावें आणि चरम ( शेवटच्या ) पायरीवर जाऊन उभा राहीतोंपर्यंत मध्यें कोठेंच न थांबण्याचा इषारा दिला आहे व अखेर "निर्वाण" या सदराखालीं "सत्य भूमिका" कोणती तें पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. "गुरुभक्ति, गुरुप्रेम, जीवन्मुक्ति, निजशांति यांस तिलांजुली देऊन दत्ताज्ञा उल्लंघण्याचें साहस करावें; जबबादार तुम्ही, मी सांगून मोकळा. कोणीहि अनादि सिद्ध अवधूतसंप्रदायाचा अवमान करितां कामा नये, महा नष्ट स्थिति आपण होऊन आपल्यावर ओढून घेतल्यासारखें होईल. मार्गास अनुसरून सरळ चालल्यास प्रेमळ समर्थांच्या चरणीं प्रेमाची सुगीच आहे. हुषार ! हुषार ! ! हुषार ! ! ! हेंच शेवटचें सांगणें !" ( पु. ५--९९ ते १०१ )

याप्रमाणें पंतांकडून पत्र आल्यावर बाळासाहेब निरुत्तर झाले व त्यांनीं कफनी घालून निघून जाण्याचा बेत कायमचा रहित केला व तेव्हांपासून ते प्रापंचिक बाबतींकडेहि लक्ष देऊं लागले. यानंतर लवकरच बाळासाहेबांचा स्नेही मास्तर यास बेडकिहाळास असतांना प्लेग झाला. तेव्हां त्यांनीं पत्रद्वारें ती बातमी पंतांना कळविली. त्या पत्राला पंतांनीं ४—१०—१९०४ रोजीं जो जबाब पाठविला त्यांत ते लिहितात "पत्र पोहोंचलें. धीर सोडूं नकोस. अवधूतबच्चा आहेस. संसारांतील विषम प्रसंगीं न डगमगणेंच वीरशैवाचें ब्रीद आहे. जगांत अनिष्ट कांहींच घडत नाही. × × × अढळ भक्तीची कास धरून परमार्थमार्गीं पुढें टाकलेलें पाऊल आतां मागें घेऊं नका. मिथ्य संसृतीच्या हुलकावणीला भिऊं नका. समर्थ प्रेमदाता आहे. त्याच्या चरणीं अनन्य भावें भजनसुख भोगीत प्रेमानंदांत प्रेमस्वरूपानें प्रेमसागरीं प्रेमसरिता–ऐक्य आहेच, होऊं दे." ( पु. ५-१०३ ) याप्रमाणें पत्र पाठवून पंतांनीं बाळासाहेबांना धीर दिला. त्या दुखण्यांत मास्तरचा बेडकिहाळ येथें अंत झाला.

## रामाबुवा ऊर्फ रामानंद यांची समाधि

१९०४ च्या ऑगष्ट महिन्यांत पंतांचे शिष्य रामाबुवा ऊर्फ रामानंद हे कोल्हापूर येथें समाधिस्थ झाले. तेथील पंतांचे एक शिष्य बळवंतराव दंडवते यांनीं ती बातमी पंतांना कळविली. तेव्हां पंतांनीं २४—८—१९०४ रोजीं दंडवते यांना लिहिलेल्या पत्रांत रामाबुवांसंबंधीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत. "रामाबुवानें भगव्याचें सार्थक चांगलें केलें; दत्तभजनाची वृद्धि केली, अनेक लोक भजनास लाविले. त्याचे मंडळीस परम दुःख झालें असेल. सर्वत्रांना इकडचें स्मरण द्यावें आणि भजनानंदांत

आयुष्य क्रमण्यास कळविणें." (पु. ५--१०२) पंतांच्या वरील उद्गारांवरून रामानंदांसंबंधीं त्यांचें काय मत होतें तें स्पष्ट दिसतें. रामानंदांना पंतांनीं कफनी देऊन उपदेशक्रम पुढें चालविण्याची जी आज्ञा केली होती त्या आज्ञेनुसार त्यांनीं एकतारी गाजविली व हजारों शिष्य केले. मात्र पंतांवरची त्यांची निष्ठा अढळ होती. ते मधुन मधुन पंतांना येऊन भेटत असत व आपल्या शिष्यांनाहि पंतांना भेटून येण्यास सांगत. रामानंदांच्या निधनानंतर एकदां त्यांची बरीच शिष्य-मंडळी कोल्हापुराहून भजन करीत बेळगावास पंतांच्या दर्शनाला गेली होती व पंत आपले परम गुरु या भावनेनें त्यांचे-करितां जरीकाठी शुभ्र वस्त्रांचा पोषाख त्यांनीं आपणाबरोबर नेला होता. त्यांच्या इच्छेला मान देऊन पंतांनीं तो पोषाख घातला व त्यांना एक दिवस ठेवून घेऊन भजनसमारंभ करविला आणि दुसरे दिवशीं त्यांची रवानगी केली.

१९०४ (शके १८२६) सालीं गोकुळाष्टमीचा उत्सव पंतांच्या राहात्या वाड्यांत पार पडला. त्यानंतर प्लेगची धामधूम झाल्यामुळें मंडळीसह ते गावाबाहेर झोपडींत राहावयास गेले व गुरुद्वादशीचा (अश्विन वद्य १२) उत्सव तेथेंच झाला. शके १८२५ सालीं अडचणी आल्यामुळें गुरुद्वादशीचा उत्सव झाला नव्हता. त्यामुळें शके १८२६ सालचा हा उत्सव पंतांनीं विशेष आस्थेनें केला. द्वादशीच्या दिवशीं (३-११-१९०४) "द्वादशीचा उत्सव गुरूचा । प्रेमळ भक्तीचा ॥ ध्रु. ॥" (द. प्रे. ल. २६११); "किती प्रेमळ सद्गुरुमूर्ति । पाहतां निमली अहंस्फूर्ति ॥ध्रु.॥" (द. प्रे. ल. २६१२) व "उत्सव हा सद्गुरूचा । भक्ति देऊनी करवितो साचा ॥" (द. प्रे. ल. २६१३) हीं तीन नवीन पदें त्यांनीं म्हटलीं. उत्सव यथास्थित चालला होता. तरी पण आपलें नेहमींचे राहाण्याचें ठिकाण सोडून झोपडींत येऊन आपणास उत्सव करावा लागत असल्याबद्दल एक प्रकारें वाईट वाटून पंतांनीं सद्गुरूला उद्देशून पुढील पद म्हटलें. "खेळत होतों सहज जनीं । कां रे आणिलें विजनीं ॥ ध्रु.॥ भक्तवत्सल–ब्रीद तुझें रे । भक्ताची जननी ॥ १ ॥ भक्तासाठीं अवतार तुझा । रमतों तव भजनीं ॥ २ ॥ अवधूतनामडंका वाजतो । दत्तनिरंजनीं ॥३॥" (द. प्रे. ल. २६१४) हा उत्सव निर्विघ्नपणें पार पडल्यावर ५-११-१९०४ रोजीं पंतांनीं "सुदिन उगवला । उत्सव सांग जाहला ॥ ध्रु० ॥" (द. प्रे. ल. २६१५) हें पद म्हटलें व सद्गुरूपाशीं पुढीलप्रमाणें मागणी मागितली. "याहुनी मागणें काय । दत्ता ॥ ध्रु० ॥ उत्साह देईं उत्सव करवीं । तूंचि प्रेमळ माय ॥ १ ॥ भक्ति देईं भक्त म्हणवीं । स्मरतों तुझे पाय ॥२॥ जन्म अनेक घेईन परी मी । दत्तगुरु-गुण गाय ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. २६१६)

## मरिकट्टीची दुसरी खेप

गुरुद्वादशीचा उत्सव झाल्यावर पंतांचे मेहुणे बंडो सांभाजी कुळकर्णी यांनीं त्यांना मरिकट्टी येथें मंडळीसह पुनः बोलाविलें. त्याच सुमारास म्हणजे डिसेंबर १९०४ मध्यें पंतांचे बंधु गोपाळरावजी यांची संपगांव तालुक्यांत ॲक्टिंग मामलतदार म्हणून नेमणूक

झाली होती. मरिकट्टी गाव संपगाव तालुक्यांतच आहे. तेव्हां पंतांनीं तेथें जाण्याचें कबूल केलें. त्यामुळें बंडोपंतांना फार हर्ष झाला व त्यांनीं पंतांच्या स्वागताची तयारी केली आणि पुष्कळ गुरुबंधुमंडळींना बोलाविलें. त्याप्रमाणें बरीच मंडळी परभारें मरिकट्टीस जमली होती. पंतांना नेण्याकरितां बंडोपंतांनीं मुद्दाम बेळगावास गाडी पाठविली होती. चाळीस-पन्नास मंडळीसह पंत निघाले व बाळेकुंद्रीस जाऊन तेथून सिद्धनकोळास गेले. पंत सिद्धनकोळास आल्याची खबर कळतांच ताशे, वाजंत्री, टिपऱ्या खेळणाऱ्या मुलांचा मेळा वगैरे मोठ्या लव्याजम्यानिशीं बंडोपंत त्यांना सामोरे आले व गावाच्या वेशीपासून त्यांची मोठी थाटाची मिरवणूक काढण्यांत आली. बंडोपंतांचे घरीं गेल्यावर भजन-पूजन, खेळ, पंतांचें बोध सांगणें वगैरे प्रकार सुरू झाले. तेथें पंतांचा मुक्काम सुमारें चार दिवस होता. त्या दरम्यान एकदां पंत मंडळीसह तेथून जवळच असलेल्या गणिकोप या गावीं आपल्या एका शिष्याकडे गेले होते व पंतबंधु गोपाळरावजीहि तेथें आले होते. मरिकट्टी येथें पंतांचा मुक्काम असतांना त्यांच्या मंडळींत हास्यविनोद नेहमींप्रमाणें चालत असे. त्या वेळीं एका इसमानें राधेचें सोंग आणिलें व एक लावणी म्हटली. तेव्हां पंतांनीं राधा म्हणजे प्रकृतिच होय असें सांगून त्या लावणीचा अध्यात्मपर अर्थ सांगितला व त्या लावणीवर त्यांचा सुमारें एक तास बोध चालला होता. तेव्हां त्या लावणीमध्यें उपनिषदांचें सार भरलेलें आहे असेंच सर्वांना वाटूं लागलें. मरिकट्टी येथें सुमारें १०० भक्त मंडळी जमली होती; त्यांत लहान-थोर, श्रीमंत-गरीब, ब्राम्हण-अब्राम्हण वगैरे सर्व प्रकारची मंडळी होती व पंतांचे शिष्य जहांगीर अर्देसर जसावाला हे पारशी गृहस्थहि होते.

मरिकट्टी येथें पंतांचा मुक्काम असतांना एके दिवशीं गोपाळरावजींची तब्बेत एका-एकीं बिघडली. तेव्हां सर्वांना मोठी चिंता येऊन पडली. तशा स्थितींत पंतांनीं सद्गुरूला उद्देशून पुढील पद म्हटलें " कांरे छळ माझा करिसी ॥ धृ० ॥ दीन दुर्बळ जाणुनी प्रभु तूं । व्यर्थ रंका मारिसी ॥१॥ पायीं पडलों तैंची मी निमलों । तूंचि कर्ता करविसी ॥२॥ प्रेमळ दत्ता आपुल्या भक्ता । बुडवीं प्रेमरसीं ॥३॥" ( द. प्रे. ल. २६२० ) पुढें लौकरच गोपाळरावजींना गुण वाटला. त्यामुळें तेथें जमलेल्या सर्व मंडळींचा उत्साह दुणावला; तो इतका कीं त्या वेळच्या भक्तिप्रेमरंगांत पंतांनीं " गुरुगृहीं प्रेम लुटारे ॥ धृ० ॥ सद्गुरु-कृपेवीण शिणतां । पदोपदीं आहे तोटारे ॥ १ ॥ मीपण दत्तपदीं अर्पितां । पूर्ण ब्रह्मानंद-साठारे ॥ २ ॥ " ( द. प्रे. ल. २६२२ ) हें पद म्हणून भक्त-मंडळींना प्रेमाची लूट करण्यास सांगितलें. याप्रमाणें भक्तिप्रेमरंगांत चार पाच दिवस घालवून जेव्हां पंत परत जावयास निघाले तेव्हां ते आणि बंडोपंत वगैरे स्थानिक भक्तमंडळी या उभयतांनांहि फार कठिण वाटूं लागलें. त्या हृदयद्रावक स्थितींत पुढील पद म्हणून पंतांनीं स्थानिक भक्तमंडळींचा निरोप घेतला. " आतां येतों मी लोभ असों द्यावा ॥ धृ० ॥ भक्त माझे तुम्ही माय भगिनी । तुम्हांवीण दुसरा मज न ठेवा ॥ १ ॥ दत्तावधूत प्रेमळ गुरु-जननी । नित्य तुम्हां पाजिते प्रेममेवा ॥ २ ॥ " ( द. प्रे. ल. २६२३ )

## ३२५

# कोचरीची दुसरी खेप

मरिकट्टीहून पंत बेळगावास परत येतात तों त्यांचे साडू बेडकिहाळ येथील हरिपंत कुळकर्णी यांची मुलगी कोचरी येथील पंतांचे शिष्य आप्पासाहेब मजतीकर यांचा मुलगा श्रीपाद याला देण्याचें निश्चित होऊन लग्नसमारंभ शके १८२६ च्या मार्गशीर्ष महिन्यांत कोचरी मुक्कामीं होण्याचें ठरलें. नवरी मुलगी ही पंतांच्या कुटुंबाची भाची व नवरा मुलगा त्यांच्या शिष्यवर्गापैकीं. तेव्हां त्यांना या लग्नसमारंभाकरितां कोचरीस जावें लागलें. कोचरीस जातांना त्यांनीं आपले शिष्य वामन गोविंद कुळकर्णी, यशवंतराव निंगुडगेकर व आणप्पा कलावंत यांच्या आग्रहावरून यमकनमर्डी येथें मंडळीसह एक दिवस मुक्काम केला होता. कांहीं महिन्यांपूर्वीं पंत कोचरी येथें जाऊन आल्यामुळें ते येणार ही बातमी ऐकून तेथील भक्तमंडळींना फार आनंद झाला व आजू–बाजूच्या गावांतील पुष्कळ भक्तमंडळी या समारंभाकरितां कोचरीस् जमली.

कोचरी येथें पंतांचा मुक्काम आप्पासाहेब मजतीकरांच्या घरीं होता व सकाळ-संध्याकाळ त्यांची बैठक बाळासाहेब देसाई यांचे घरीं असे. या लग्नसमारंभाला पंत हजर राहिल्यामुळें सर्वांना फार उत्साह वाटत होता. वरातीची मिरवणूक जेव्हां निघाली तेव्हां पंत पायीं चालत होते; भजनी मंडळींचा ताफाहि बरोबर होता. त्या मिरवणुकीला सुमारें एक हजार मनुष्य जमलें होतें व " शिवाय नमः " चा सारखा गजर चालू होता. तेव्हां ती जणू पंतांचीच मिरवणूक निघाली आहे असें वाटत होतें ! लग्नसोहळा चालू असतां जेव्हां जावईबुवा रुसले तेव्हां पंतांनीं त्यांना जवळ बोलाविलें आणि "श्रीपाद, तुझा राग कशानें शांत होणार ?" असें म्हणून स्वतःचे अंगावरील तांबडी भरजरी शाल काढून त्यांनीं त्यांचे आंगावर घातली व "आतां तुझा राग शांत झाला की नाहीं ?" असें विचारलें. तेव्हां जावईबुवांचा राग शांत होऊन त्यांनीं पंतांचे घट्ट पाय धरिले. पुढें जावईबुवांनीं तें महावस्त्र पंतांचा प्रसाद म्हणून पूजेस ठेविलें. या लग्नसमारंभाचे वेळीं पंतांनीं पुढील पद म्हणून तेथें जमलेल्या मंडळीला आशिर्वाद दिला. " आशिर्वाद गुरूचा भक्त–जनांसी ॥ ध्रु० ॥ आपुला म्हणवुनी मुक्त्त्याचि केलें । स्वानंदराशी ॥ १ ॥ अघटित लीला प्रगटुनी कलियुगीं । मुक्त केलें मूढासी ॥ २ ॥ प्रेमानंदें खेळा भक्त हो । दत्त स्मरा अहर्निशीं ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २६२४ )

पंत कोचरीस असतांना भजन, खेळ, टिपरी वगैरे प्रकार चालूच होते व ते मंडळींसह हिरण्यकेशी नदीवर स्नानास जात असत. या वेळीं बोध सुरूच असे आणि हास्यविनोद व थट्टामस्करीहि चालत. एके दिवशीं असें झालें कीं लग्नसमारंभ चालू असतांना त्या रात्रीं पंत झोपल्यावर कांहीं मंडळींनीं दंगा केला; त्यामुळें समारंभाकरितां जमलेल्या बऱ्याच मंडळींना त्रास झाला. दुसरे दिवशीं पहाटे उठून पंत फिरावयास गेले व परत येतांना बाळासाहेब देसाई यांचे घरीं नेहमींप्रमाणें गेले. आदल्या रात्रीं कांहीं मंडळींनीं दंगा केल्याचें तेथें त्यांचे कानावर आलें. पंत बाळासाहेबांकडे गेल्यामुळें बहुतेक

भक्तमंडळी तेथें जमली होती. तेव्हां "ज्यांनीं ज्यांनीं काल दंगा केला त्यांनीं पुढें यावें" असें पंतांनीं म्हणतांच दोघे तिघे इसम भयभीत होऊन त्यांच्या पुढें उभे राहिले. त्या वेळीं पंत अगोदरच रागावलेले; इतक्यांत त्यांच्यापुढें उभे असलेल्या आरोपितांपैकीं एकासंबंधीं दुसऱ्या एका इसमानें त्यांच्याशीं हलकेच कांहीं चुगली केली. तेव्हां पंत इतके रागावले कीं समोरच्या त्या अपराधी इसमाला ते कृतांत काळासारखे वाटून तो थरथर कांपूं लागला. तेव्हां त्याची ती भेदरलेली स्थिति पाहून, अतिशय कडक ऊन पडलें असतांना एकदम जोराची पर्जन्यवृष्टि व्हावी त्याप्रमाणें पंतांचा राग एकदम नाहींसा झाला व त्यांच्या हृदयांत करुणासागरच जणूं उचंबळून त्यांनीं त्या भक्ताला घट्ट पोटाशी धरिलें! एकीकडे त्यांच्या नेत्रांवाटे प्रेमाश्रूंचा प्रवाह चालला होता व तशा स्थितींत त्यांनीं पुढील पद म्हटलें:—" निष्ठुर कां होसी । केवळ प्रेमाची राशी ॥ धृ० ॥ भक्तजननी तूं भक्तवत्सल । भक्तहृदयवासी ॥१॥ जगदुद्धारा सगुण होउनी । दीनां उद्धरसी ॥२॥ अवधूतमार्ग प्रगट कराया । दत्ता अवतरसी ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २६२५ ) पंतांचें पद चालू असतांना भोवतालची मंडळी चित्राप्रमाणें तटस्थ होऊन तो हृदयद्रावक देखावा पाहात होती व सर्वांचीं अंतःकरणें भरून आलीं होतीं. तें पद म्हणून झाल्यावर पंतांनीं त्या भक्तराजाला चार उपदेशाच्या गोष्टी सांगून अभय दिलें व नीट रीतीनें वागण्यास सांगितलें.

या खेपेला आप्पासाहेब मजतीकर, बाळासाहेब देसाई वगैरे स्थानिक भक्तमंडळींनीं पंतांचें स्वागत करण्याचे कामीं आपापल्यापरी कमाल केली. लग्नसमारंभ उरकल्यानंतर पंतांनीं एक भजनसमारंभ करविला. त्या वेळीं सर्व भक्तमंडळींच्या चित्तवृत्ति अतिशय प्रसन्न होऊन प्रेमानंदाचा जणूं पूर वाहात होता. तेव्हां पंतांनीं पुढील पद म्हणून आनंदाची लूट करण्यास सर्वांना सांगितलें. " लुटारे आनंद लुटारे । सद्गुरूसी भेटारे॥धृ०॥ मिथ्या भ्रमाचा सर्व पसारा । संसार हा खोटारे ॥१॥ मी कोण हें जाणुनी त्वरित । गुरुभजनां काळ लोटारे ॥२॥ अभिमान टाकुनी दत्त भजतां । उसळती प्रेमलाटारे ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. २६२६ ) लग्नसमारंभ संपल्यानंतर जेव्हां आप्पासाहेब मजतीकरांच्या घरांतील मंडळीचा व तेथें जमलेल्या सर्व भक्तांचा निरोप घेऊन पंत निघाले तेव्हां सर्वांचीं अंतःकरणें प्रेमानें भरून आलीं होतीं. त्या वेळचा तो अपूर्व देखावा पाहून " हाच माझा संसार होय ! " असे पंतांनीं उद्गार काढले.

२१ डिसेंबर १९०४ रोजीं दत्तजयंती असल्यामुळें आदले दिवशीं बरोबरीच्या मंडळीसह पंत बेळगावास आले. त्या वेळीं ते झोपडींतच राहात असत. कोचरी येथील एक उत्सव आटोपून पंत नुकतेच आलेले असल्यामुळें कोचरींतील प्रेमानंदसोहळ्याप्रमाणेंच हा दत्तजयंतीचा दुसरा प्रेमानंदसोहळा झाला. लांबलांबची भक्तमंडळी बरीच जमली होती. या दत्तजयंतीच्या उत्सवाचें पंतांनीं पुढील पद म्हणून वर्णन केलें. " उत्सव जयंतीचा । भक्तप्रेमकल्लोळ साचा ॥ धृ० ॥ प्रेमास्तव हें जग उद्भवलें । द्वैतभाव तेथें कैंचा ॥ १ ॥ अंतरीं बाहेरी सद्गुरु व्यापला । उदय चिद्विलासाचा ॥ २ ॥ सहजानंदीं दावितो खेळ । दत्त प्रेमळ सद्गुरूचा ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. २६२७ ) आणि हा उत्सव

समाप्त झाल्यावर त्यांनीं पुढील पद म्हटलें, "जयंतीचा उत्सव हा केला साजिरा ॥ धृ० ॥ भक्तिभरें भजन करितां सद्गुरु तोषला। परमोदार सगुण ब्रह्म भक्तां दिसला। अनंत शक्ति सद्गुरु तुझी। अजरामरा ॥ १ ॥ " वगैरे. ( द. प्रे. ल. २६२८ ) हा दत्तजयंतीचा उत्सव आटोपल्यावर लगेच पंत मंडळीसह बेळगावमधील आपल्या राहात्या वाड्यांत गेले.

१९०४ सालीं सौ. यमनाक्कांच्या निधनानंतर भक्तमंडळीसह पंतांच्या कोचरीस दोन आणि मरिकट्टीस एक अशा तीन खेपा झाल्या व त्यामुळें त्यांचा काळ भक्ति-प्रेमरंगांत गेला आणि, त्यांनींच म्हटल्याप्रमाणें, भक्तमंडळीकडून त्यांनीं प्रेमाची लूट करविली खरी, पण अगोदरच क्षीण झालेल्या त्यांच्या शरीरप्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं.

# प्रकरण ४२ वें

——:०:——

## पंतांच्या शरीरप्रकृतींत बिघाड; निर्याणाच्या सूचना; दर्शनोत्सुक भक्तांच्या झुंडी; प्रेमळांच्या भेटी; बाळेकुंद्रीमधील आंबराईंत कायमची विश्रांति !

————:०:————

### पंतांच्या शरीरप्रकृतींत बिघाड

१९०४ च्या डिसेंबरअखेर बेळगावांतील सुठणकरांच्या वाड्यांत पुन्हां राहावयास आल्यापासून पंतांची प्रकृति अधिकाधिक अशक्त होत चालली व त्यांचें हिंडणें–फिरणेंहि कमी कमी होत गेलें. त्यामुळें ते फारसे घराबाहेर पडत नसत. त्यांची वृत्तिहि अधिकाधिक शांत होत चालली व नवीन पदें होण्याचेंहि जवळ जवळ बंदच झालें. जान्युआरी १९०५ पासून त्यांचेकडे येणाऱ्या भक्तमंडळींना बोध करणें हेंच त्यांचें मुख्य काम होऊन बसलें. त्यांच्या दर्शनाला अगर त्यांचा बोध श्रवण करण्यास येणाऱ्या भक्तमंडळींची संख्या या सुमारास फार वाढली होती. त्यांतून त्यांची प्रकृति अशक्त होत चालल्यामुळें बाहेरगावांहून पुष्कळ भक्तमंडळी त्यांच्या दर्शनाला येऊं लागली होती.

या वेळीं घरांतील माणसांखेरीज, पंतांच्या सन्निध राहून त्यांची सेवा करणारी मंडळी म्हणजे वामन भिकाजी बापट, छत्रे-सर्कशींतील पोवार उर्फ रामाबूवा व वामन जोशी हे होते. त्यांपैकीं बापट हा पंतांच्या घरांत राहात असे व मराठी शाळेंतील आपलें शिक्षकाचें काम सांभाळून बाकीचा वेळ त्यांच्या सेवेंत घालवीत असे. रामाबूवा या सुमारास पंतांच्या घरींच राहात असे व वामन जोशी येऊन जाऊन असे. पंत या सर्वांना अत्यंत प्रेमानें वागवीत. या त्रिवर्गापैकीं वामन बापट हा पंतांशीं एखाद्या लाडक्या मुलाप्रमाणें वागत असे व पंतहि त्याला ममतेनें वागवीत असत. एके दिवशीं पंतांच्या घरांतील मंडळी बाळेकुंद्रीस गेली होती आणि घरांत पंत स्वतः, बापट व जोशी असे तिघेच होते. त्या दिवशीं धारवाडकडील कांहीं मंडळी पंतांच्या दर्शनाला येऊन बराच वेळ बोलत बसली. त्यामुळें पंतांना रात्रीच्या जेवणास उशीर झाला. त्यांचें जेवण आटोपतें न आटोपतें इतक्यांत आणखी एक इसम ते जेवीत होते तेथें आला व बराच वेळ बोलत बसला; त्यामुळें पंतांना निजण्यास उशीर होऊं लागला. बापटानें बरेच वेळां त्यांना उठण्यास सांगितलें. पण ते कांहीं केल्या उठेनात व तो आलेला इसमहि जाईना. तेव्हां बापट रागावला व त्यानें पंतांचा हात धरून त्यांना स्वयंपाकघरांतून माडीवर जाण्याच्या जिन्यापर्यंत ओढीतच नेलें ! परंतु त्याच्या हेतूकडे लक्ष देऊन न रागावतां ते उठले व माडीवर जाऊन निजले. तसेंच पंतांच्या सन्निध राहून त्यांची सेवा करणाऱ्या मंडळींमध्यें कधीं कधीं

आपसांत भांडणें होत; कारण प्रत्येकाला असें वाटे कीं पंतांची आपल्यावरच अधिक प्रीति आहे! अशा प्रकारचे तंटे पंतांपर्यंत गेले म्हणजे ते दोघांचीहि समजूत घालून समाधान करीत.

## निर्याणाच्या सूचना

सौ. यमनाक्कांच्या निधनापासून "आपण आतां फार दिवस राहूं नये" असें पंतांना वाटूं लागलें होतें. त्यानंतर कोचरीस गेल्यावेळीं त्यांना एक स्वप्न पडलें व "इतक्यांत जाण्याची इच्छा करूं नकोस. अजून बरीच मंडळी यावयाची आहेत" असें सद्गुरूंनीं सांगितलें. दुसरे दिवशीं त्यांनीं तें स्वप्न अण्णा अकोळकरांना सांगितलें. तरी पण कोचरीची दुसरी खेप करून बेळगावास परत आल्यापासून "आपण आतां लौकरच जाणार" अशा अर्थाचे उद्गार वारंवार त्यांच्या तोंडून निघूं लागले. त्या सुमारास एके दिवशीं "हिमालयांतील सिद्ध आपणास तिकडे बोलावीत आहेत" असें त्यांना आणखी एक स्वप्न पडलें. तेव्हांपासून कधीं "आपण जंगलांत जाणार", तर कधीं "प्रथम काशीस जाऊन नंतर हिमालयावर जाणार" असें ते म्हणत; व कधीं "येथें शहरांत राहाण्यापेक्षां बाळेकुंद्रीस जाऊन राहावें" असेंहि म्हणत, तसेंच दर्शनाकरितां येणाऱ्या भक्तमंडळीला कधीं कधीं ते असें सांगत कीं, "आणखी सहा महिन्यांनीं हा बोध ऐकण्यास मिळणार नाहीं. मागाहून रडाल." माघ वद्य १ शके १८२६ रोजीं पंतांच्या घरीं गुरुप्रतिपदेचा उत्सव झाला. तेव्हां बेडकिहाळकर बाळासाहेब वगैरे मंडळी आली होती. त्यांचे आग्रहावरून त्यांनीं पंतांकरितां कफनी, फेटा, पादुका वगैरे जे जिन्नस मुद्दाम करविले होते; व पंत बेडकिहाळास न गेल्यामुळें जे बेळगावास आणिले होते ते पंतांनीं उत्सवाचे वेळीं घातले आणि "हें पुनः पाहणेस मिळणार नाहीं आतांच पाहून घे" असें त्यांनीं बाळासाहेबांना सांगितलें. तो उत्सव झाल्यावर त्यांनीं आलेल्या मंडळीस कांहीं दिवस ठेवून घेतलें. एके दिवशीं दोन प्रहरीं पंत माडीवर बोलत बसले असतां तेथें असलेल्या मंडळीला ते म्हणाले "रस पिण्यास चला खालीं जाऊं." त्याप्रमाणें सर्वजण तळमजल्यावरील मागील सोप्यांत गेले. तेथें रस काढून ठेविला होता. पंतांच्या बरोबरची मंडळी रस पिण्याकरितां बसली व पलीकडे पंतांच्या मातोश्री बसल्या होत्या त्यांचे पुढें जाऊन पंत बसले आणि हासत हासत म्हणाले, "आई, माझी शेंडी विंचर ग. शेंडीची फार गुंतागुंत झाली आहे." लगेच मातोश्रींनीं तेल लावून पंतांची शेंडी विंचरणेस सुरवात केली. तेव्हां पंत म्हणाले, "आई, तुझे उपकार फार ग! आतां मी तुझे देखत जावें म्हणजे बरें होईल." लगेच, "गप बैस बाबा, असें बोलूं नकोस" असें मातोश्री म्हणाल्या. इतक्यांत मंडळीचें रस पिणें आटोपलें व सर्वजण माडीवर गेले.

## पंतांचें अण्णा अकोळकरांना शेवटचें पत्र

दिवसेंदिवस पंतांची प्रकृति अधिकाधिक थकत चालली व वृत्तिहि अधिकाधिक शांत होऊं लागली. त्यामुळें पत्रलेखनहि जवळ जवळ बंद पडलें व कोणाकडून तितक्याच निकडीचीं

पत्रें आल्यास पंत दुसऱ्या कोणाला तरी जबाब पाठविण्यास सांगत. तरी पण शके १८२७ मधील गोकुळाष्टमीचा उत्सव जवळ आल्यामुळें ८–८–१९०५ रोजीं पंतांनीं अण्णांना पत्र लिहून उत्सवाकरितां बोलाविलें. ह्या पत्रांत पंतांच्या त्या वेळच्या शारीरिक व मानसिक स्थितीचें प्रतिबिंब चांगलें उमटलें असल्यामुळें व त्यांच्या हयातींतील हेंच शेवटचें पत्र असल्यामुळें तें पुढें देत आहोंत. सदर पत्रांत पंत म्हणतात, "प्रियतम अण्णा, स्वानंदव्यसनानें बुद्धि आत्माभिमुख सहजीं होऊन विश्वाचा विसर पडला, म्हणून शब्दाचा व्यवहार खुंटला. याजकरितां मजकडून किंवा तुजकडून पत्रव्यवहार बंद पडला यांत आश्चर्य नाहीं. असो. देहादि दृश्य-प्रपंचांत सद्‌गुरुच खेळत असल्यानें शब्दाचा व्यवहार खुंटला. वृत्ति मौनशय्येवर झोंप घेऊं लागली. तरी अनादि द्वैतवनाचें दहन केल्यानें विश्रांतीची तीव्र तहान लागली म्हणून वृत्ति गुरुपुत्राकडे प्रेमपानार्थ धांव घेते, उपाय नाहीं. जाणून कर्तव्य हुषार !

"वृद्धपण अंगीं झगटलें; दृश्या खुंटत चालली; जीवित नकोसें झालें. फक्त प्रेमळाची भेट, संगत हीं असावींत. एवढीच स्फूर्ति राहिली आहे. ती राखून प्रेमसुख भोगणें तुमचें कर्तव्य. प्रेमाच्या पलीकडे गेल्यास माझें सांगणें नाहीं. तूं प्रेमळ, तुझा दत्त प्रेमळ, दत्ताचा अण्णा प्रेमळ, संसार प्रेमळ, व्यवहार प्रेमळ, जन्म प्रेमळ, मरण प्रेमळ, सुखदुःखादि द्वंद्वें प्रेमळ. आम्ही प्रेमसागरांतील प्रेमाचे घडलेले मत्स्य ! अण्णा तूं माझा, मी तुझा दत्त. गोकुळाष्टमीस ये. प्रत्यक्ष भेट घे. कागदाच्या भेटीची वाट पाहूं नको. अण्णा, तुझा, दत्त." (पु. ५–१०६)

## पंतांचें शेवटचें पद

हें पत्र लिहिल्यानंतर चारच दिवसांनीं १२–८–१९०५ रोजीं गोकुळाष्टमीचा उत्सव होता. पत्र मिळाल्याबरोबर अण्णा बेळगावास आले. या वेळीं उत्सवाकरितां पुष्कळ भक्तमंडळी जमली होती; कारण आतां पंत फार दिवस राहात नाहींत असें प्रत्येकाला वाटूं लागलें होतें. उत्सवाचा कार्यक्रम नेहमींप्रमाणें चालला होता. पण पंतांची तब्बेत नरम असल्यामुळें त्यांना उत्सवांत प्रत्यक्ष असा फारसा भाग घेतां आला नाहीं. उत्सवाचे दिवशीं त्यांचे बाळमित्र व अत्यंत प्रिय गुरुबंधु गोपाळ श्रीपाद भागोजीकोप हे जेव्हां पंतांच्या घरीं आले तेव्हां पंतांच्या अंगांत बरें नव्हतें; तरी देखील इतर मंडळीस बाहेर जाण्यास सांगून ते एकट्या गोपाळाला घेऊन बसले व कांहीं वेळ सद्‌गुरु बालमुकुंदांच्या गोष्टी बोलून त्यांनीं श्रीदत्ताची पूजा केली आणि दोघे मोठ्या प्रेमानें एकमेकांना कडकडून भेटले. त्या दिवशीं पंतांनीं 'जागृति, जागृति, जागृति । दत्त-जन्माची स्मृति ॥ ध्रु० ॥ धर्मलोप कलियुगीं । सगुणावतार या जगतीं ॥ १ ॥ श्रुति-शास्त्रार्थ नेणुनी जन । विषयानंदीं ते रमती ॥ २ ॥ दत्तचरणीं शरण जातां । अखंड शांति भोगिती ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. २६३२) हें पद म्हटलें. पण त्यांच्यानें पुढें म्हणवेनासें झाल्यामुळें इतर मंडळींनीं भजन, आरती वगैरे करून उत्सवाचा कार्यक्रम पुरा केला. हेंच पंतांचें अखेरचें पद होय !

## ३३१

## बंधुप्रीति

उत्सवाचा ठराविक कार्यक्रम संपल्यानंतर सर्व भक्तमंडळी अवधूतमंदिरांतून बाहेर गेली. त्यानंतर तशा स्थितींतच पुनः अवधूतमंदिरांत येऊन पंतांनीं गोविंदरावजी, गोपाळरावजी, नरसिंहराव व शंकरराव या आपल्या बंधूंना जवळ बोलाविलें व त्यांना चार प्रेमाच्या गोष्टी सांगितल्या आणि " अशा स्वरूपाचा हा अखेरचाच प्रसंग आहे" असेंहि उद्गार काढले. तेव्हां पंतांची ती अशक्त होत चाललेली प्रकृति पाहून आणि त्यांचे ते अत्यंत कळकळीचे व निर्वाणीचे उद्गार ऐकून नरसिंहरावांना दुःखावेग अनावर झाला व " दत्तू, तूं फारच थकलास. तुझ्या समोर मी जावें अशी माझी इच्छा आहे " असें ते म्हणाले. तेव्हां पंत म्हणाले " अरे, माझें काय म्हाताऱ्याचें ? " तें ऐकून नरसिंहराव पुनः म्हणाले " दहा गेले तरी हरकत नाहीं; पण दहांचा पोशिंदा जाऊं नये. " नरसिंहरावांचे हे उद्गार ऐकून पंतांचा कंठ भरून आला व कांहींच उत्तर न देतां त्यांनीं नरसूला घट्ट पोटाशीं धरिलें व दोघेहि त्या सामरस्यस्थितींत कांहीं वेळ होते. नंतर पंतांनीं चार समाधानाच्या गोष्टी सांगितल्या व बंधूंच्या प्रेमभेटीचा तो समारंभ आटोपला.

पंत व त्यांचे बंधु यांचेमधील प्रेम खरोखर अवर्णनीय होतें. पंतांनीं आपल्या बंधूंना लहानाचे मोठे करून सुविद्य केलें आणि प्रपंच—परमार्थ—दृष्ट्या त्यांचें कोट—कल्याण केलें. या गोष्टीची त्यांच्या सर्व बंधूंना पूर्ण जाणीव होती व ते त्यांना जिवापलीकडे जपत आणि त्यांच्या सद्गुरुसेवेच्या कार्यांत मनोभावानें झटून साह्य करीत. पंतांचे व त्यांचे परस्परांमधील संबंध फार सलगीचे असत आणि ते परस्परांना नेहमींच्या व्यवहारांत एकवचनी नावानें संबोधीत. सर्व बंधु पंतांना 'दत्तू' या एकेरी नावानेंच हाक मारीत असत ही गोष्ट आतांपर्यंत वाचकांच्या लक्षांत आलीच असेल. एके दिवशीं पंतांच्या बंधूंच्या असें मनांत आलें कीं पंतांकडे हजारों भक्त येतात व ते त्यांना 'पंत', 'महाराज' वगैरे बहुमानदर्शक नावांनीं हाक मारितात व आपण त्यांचे धाकटे भाऊ असूनहि त्यांना 'दत्तू' म्हणतों हें बरें नव्हे. तेव्हां आपणहि आजपासून त्यांना 'दत्तू' न म्हणतां 'दादा' म्हणावें व या गोष्टीला गोविंदरावजींनीं प्रथम सुरवात करावी असें त्यांनीं ठरविलें. संध्याकाळीं जेवणाची वेळ झाली, त्या वेळीं पंत माडीवर कांहीं मंडळींबरोबर बोलत बसले होते. तेथें गोविंदरावजी गेले व पंतांना उद्देशून, " दादा, जेवायला उठा " असें म्हणाले. पण हा दुसऱ्या कोणाला तरी बोलावीत असेल असें वाटून पंत उठले नाहींत. गोविंदरावजी त्याप्रमाणें पुनः पुनः म्हणूं लागले; तरी पंत उठेनात. अखेर गोविंदरावजी पंतांच्या जवळ गेले व म्हणाले " दत्तू, इतका वेळ मी हाका मारल्या तरी तूं कां उठत नाहींस ?" त्यावर पंत म्हणाले " तूं मला कुठें बोलाविलेंस ? " तेव्हां " आतांपर्यंत 'दादा' म्हणून मी तुलाच हाक मारीत होतों" असें गोविंदरावजींनीं सांगितलें ! तें ऐकून पंतांना विस्मय वाटला व " हा नवीन प्रघात आजच कोणीं व कां सुरू केला ?" असें त्यांनीं विचारलें. तेव्हां गोविंदरावजींनीं घडलेला प्रकार त्यांना सांगितला. लगेच पंतांनीं सर्व बंधूंना

बोलावण्यास सांगून आपण अवधूतमंदिरांत गेले व तेथें सर्व बंधूंना प्रेमानें कवटाळून म्हणाले " बाळांनो, आजपर्यंत जसे तुम्ही मला 'दत्तू' म्हणत आलां तसेच यापुढेंहि म्हणत चला. कारण 'पंत' शब्दांत असंख्य भागीदार आहेत. पण 'दत्तू' शब्दांत फारच थोडे भागीदार आहेत. 'दत्तू' शब्दांत जी गोडी अगर जो प्रेमा आहे ती गोडी अगर तो प्रेमा इतर शब्दांत नाहीं. तेव्हां असा अपूर्व गोडीचा मिळालेला शब्द सोडून असंख्य भागीदार ज्याच्यांत वांटेकरी आहेत अशा 'पंत' अगर 'दादा' शब्दांत तुम्ही कां भागीदार होतां ?" तेव्हांपासून सर्व बंधु पंतांना पूर्ववत 'दत्त' म्हणं [illegible].

## दुखणें बळावत चाललें !

जसजशी पंतांची तब्बेत अधिकाधिक क्षीण होत चालली तसतसा त्यांचेकडे येणाऱ्या मंडळींशीं बसण्याबोलण्यानेंहि त्यांना शीण होऊं लागला. ही गोष्ट पंतबंधूंच्या नजरेस आल्यापासून ते त्यांच्याकडे येणाऱ्या मंडळींवर पंतांशीं बसण्याबोलण्याचे बाबतींत नियंत्रण घालूं लागले. कारण प्रत्येक भक्ताचें आराध्य दैवत म्हणजे पंत असून आपल्याला शक्य तितकें त्यांच्याशीं बसण्याबोलण्यास मिळावें म्हणून मोठ्या आतुरतेनें तो येई व पंत स्वत; सदा भक्तप्रेमभुकेले असल्यामुळें कोणी भक्तमंडळी आली म्हणजे आपल्या शरीरप्रकृतीकडे लक्ष न देतां त्यांचेशीं बोलत बसत. त्यामुळें जसजसें पंतांचें दुखणें जोरावत चाललें व अशक्तता वाढूं लागली तसतशी येणारी भक्तमंडळी एके बाजूस आणि पंतबंधु व पंतांची सेवा करणारी घरांतील मंडळी दुसरे बाजूस यांचेमध्यें प्रेमकलहांना सुरवात झाली. पंतांना उदराची व्यथा झाली होती व त्यांचे मावसभाऊ डॉ. अण्णाप्पा मारीहाळकर हे औषधोपचार करीत असत. फार वेळ बोलत बसल्यानें पंतांना फार त्रास होत असल्यामुळें तसें करूं न देण्याबद्दल अण्णाप्पांची सक्त ताकीद होती व त्याप्रमाणें सदर निर्बंध घालण्यांत आले होते. पंतांची प्रकृति अधिक बिघडावी अशी कोणाचीच इच्छा नव्हती. पण पंतांकडे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला असें वाटे कीं, 'त्यांचें आपल्यावर फार प्रेम आहे, तेव्हां त्यांना नुसतें भेटण्यास आपल्याला मज्जाव कां असावा ? त्यामुळें तो दांडगाईनें त्यांच्या खोलींत जाण्याचा प्रयत्न करी तर खोलीच्या बाहेर जोशी, बापट, बूवा अगर इतर जो कोणी राखण करीत असे त्याला मिळालेल्या हुकुमाची तो कडक रीतीनें अंमलबजावणी करीत असे. त्यामुळें कित्येक वेळां मारामारीपर्यंत प्रसंग येई ! एकदां असें झालें कीं, पंतांचे गुरुबंधु परशराम हे पंतांना भेटण्याकरितां आले व तडक त्यांच्या खोलीशीं गेले; तेव्हां खोलीचें दार बंद होतें. ते दार लोटूं लागले, तों बाहेर उभा असलेल्या रखवावालदारानें त्यांना हरकत केली व दोघांची बोलाचाली सुरू होऊन दोघेहि एकेरीवर आले. तेव्हां परशरामाचा शब्द ओळखून पंतांनीं आंतून " कोण परशराम काय ? " म्हणून विचारलें व दार उघडण्यास सांगितलें. नंतर परशराम आंत जाऊन दोघांच्या कांहीं वेळ सद्गुरु बालमुकुंदांसंबंधीं प्रेमाच्या गोष्टी झाल्या व परशराम हे निघून गेले. असे प्रकार वारंवार होऊं लागले.

भाद्रपदअखेर पंतांची तब्येत अधिकच बिघडली. तेव्हां घरांतील मंडळींनीं गावां- तील नामांकित डॉक्टर आणविले व कांहीं दैवी उपायहि सुरू केले. एके दिवशीं एक मांत्रिक पंतांच्या वाड्यांत आला व " मी असे पुष्कळ रोगी बरे केले आहेत. पंतांना मी खात्रीनें बरे करीन " असें म्हणूं लागला. पंतांच्या मातोश्रींचा त्याच्यावर विश्वास बसून त्या स्वतः माडीवर पंतांच्या खोलींत गेल्या व त्यांनीं त्या मांत्रिकाकडून उपचार करवून पाहाण्याचा आग्रह धरिला. तेव्हां मातोश्रींच्या आग्रहास्तव पंतांनीं तें कबूल केलें. दुसरे दिवशीं तो मांत्रिक आला. तेव्हां पंतांना उचलून मोठ्या कष्टानें माडीवरून खालीं नेण्यांत आले. नंतर मांत्रिकानें काय मंत्रप्रयोग करावयाचा तो केला व आपण दुसरे दिवशीं येऊं असें सांगून तो गेला. पंतांना माडीवर आणिल्यावर मातोश्रींना त्यांनीं सांगितलें कीं " आज मला अतिशय त्रास झाला आहे; असा त्रास माझ्यानें आणखी सहन होणार नाहीं. तेव्हां त्या मांत्रिकाला पुनः आणण्याचें कारण नाहीं." त्याप्रमाणें त्या मांत्रिकाला सांगितलें व तो उपचार तेथेंच थांबला.

## पंतांचा शेवटचा शिष्य !

या सुमारास मुंबईकडील शिवराम लक्ष्मण सत्पाळ नावाचा एक मराठा जातीचा तेरा चवदा वर्षांचा मुलगा पंतांच्या दर्शनाला आला होता. त्या वेळीं मुंबई येथें राहात असलेल्या बाळकृष्ण जाधव नावाच्या पंतांच्या एका शिष्यानें पंतांकरितां दिलेलीं कांहीं औषधें व फळें घेऊन तो एकटाच बेळगावास गेला होता. पंतांच्या घरांतील कोणाहि माणसाशीं त्याची ओळख नव्हती. तो तपास करीत पंतांच्या वाड्याशीं गेला व त्यानें मुंबईहून आणिलेले जिन्नस घरांतील मंडळींच्या स्वाधीन केले. पंतांकडे अनोळखी मंडळी पुष्कळ येत व ते आले म्हणजे घरांतील व्यवस्थापक मंडळी त्यांची विचारपूस करून जेवणाखाणाची वगैरे व्यवस्था करीत असत. त्याप्रमाणें शिवरामाची व्यवस्था करण्यांत आली व त्याला पंतांचें दर्शनहि झालें. पण त्याच्या मनांतून त्यांच्याकडून अनुग्रह घ्याव- याचा असल्यामुळें तो परत जाईना. पंतांच्या प्रकृतिमानामुळें त्यांचेशीं जाऊन बसण्या- बोलण्याला कडक प्रतिबंध होता. त्यामुळें या अनोळखी मुलाची दाद कोणी घेईना. उलट " तूं पंतांच्या दर्शनाकरितां आलास; दर्शन झालें; आतां तूं येथें कां थांबलास ?" असेंहि त्याला कोणी म्हणूं लागले. पण त्याचें समाधान झालें नसल्यामुळें तो परत न जातां माडीवर रस्त्याकडील गॅलरींत रडत बसत असे. तें पाहून पंतांच्या सेवेकऱ्यांपैकीं एकानें त्याला त्याची हकीकत विचारली व त्यानें आपण कशाकरितां आलों तें त्याला सांगितलें. लगेच त्या सेवेकऱ्यानें पंतांच्या कानावर ती गोष्ट घातली. तेव्हां त्यांना फार वाईट वाटलें व "अरें, त्याच्या रूपानें माझा बाळप्पा आला असून त्याला इतके दिवस कां तिष्ठत ठेविलात ? " असें म्हणून त्यांनीं त्याला बोलावण्यास सांगितलें आणि तो जवळ आल्या- वर तशा अशक्त स्थितींतच आपणास बसविण्यास सांगितलें व त्याचे मस्तकावर वरद हस्त ठेवून त्याचेवर अनुग्रह केला. त्यायोगें त्याचें समाधान होऊन तो मुंबईस परत गेला. हाच पंतांचा शेवटला शिष्य होय !

## प्रेमळांच्या भेटी

शिवरामाला अनुग्रह झाला त्याच्या दुसऱ्या दिवशीं पंतांनीं आपले बंधु व इतर भक्तमंडळी यांना जवळ बोलावून श्रीदत्ताची पूजा करविली. तेव्हांपासून ' पंत आपल्याला लवकर सोडून जाणार ' असें प्रत्येकाला वाटूं लागलें व त्यांच्या दर्शनाला भक्तमंडळांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. पंतांचे बालमित्र कै. रामराव सुंठणकर यांना पंतांची प्रकृति फार बिघडल्याचें समजतांच तेहि त्यांच्या समाचाराला आले. तेव्हां पंतांना फार आनंद होऊन त्यांनीं रामरावांना बसण्यास खुर्ची देण्यास सांगितलें. नंतर त्या उभयतांचें थोडा वेळ संभाषण होऊन रामरावांनीं सद्गदित अंतःकरणानें पंतांचा अखेरचा निरोप घेतला. आतां पंत फार दिवस राहात नाहींत अशी खात्री झाल्यामुळें रामराव सुंठणकर व पंतबंधु यांचें आपसांत बोलणें होऊन पंतांच्या दर्शनलालसेनें आतुर होऊन येणाऱ्या भक्तमंडळींना दर्शन घेण्याच्या बाबतींत अडचण पडूं नये म्हणून पूर्वीं घातलेले निर्बंध थोडे ढिले करण्यांत आले व पंतांना विशेष त्रास न होईल अशा रीतीनें भक्तमंडळींना निदान दर्शन घेण्यास तरी मोकळीक असावी असें ठरविण्यांत आलें आणि तेव्हांपासून पंतांच्या दर्शनाला येणाऱ्या मंडळीला फारसा त्रास न होतां दर्शन होऊं लागलें. पण प्रकार असा होई कीं येणारी बहुतेक मंडळी पंतांच्या प्रेमांतील असल्यामुळें पंतांची व त्यांची नुसती दृष्टादृष्ट झाली तरी परस्परांचीं अंत.करणें प्रेमानें भरून येऊन पंत त्यांची विचारपूस करीत. पंत फार आजारी असल्याचें समजल्यावरून लांबलांबची पुष्कळ शिष्यमंडळी त्यांच्या दर्शनाला येत होती. धारवाडहून काका घाणेकर, अभ्यंकर वगैरे मंडळी आली असल्याचें पंतांना कळतांच त्यांना आनंद होऊन "माझा काका आला!" असें ते म्हणाले व काकांना जवळ बोलावून त्यांच्याशीं प्रेमाचे चार शब्द बोलले. गणपतराव गुमास्ते पंतांच्या दर्शनाला आले, तेव्हां पंतांनीं त्यांना आपल्या अंथरुणावर बोलाविलें व त्यांच्या पाठीवरून हात फिरवून त्यांच्याशीं थोडा वेळ प्रेमाच्या गोष्टी केल्या. या सुमारास पंतांचे प्रिय शिष्य मुतालिक हे सरकारी कामानिमित्त चिकोडीस राहात असत. पंतांची प्रकृति फार बिघडल्याचें त्यांना समजतांच ते बेळगावास आले व पंतांना भेटण्यास गेले. तव्हां पंतांना आनंद होऊन ते विनोदानें म्हणाले "आलास ये. पूर्णाहुती झाली" म्हणजे त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ असा होता कीं 'आपला अंतसमय जवळच आला आहे. तेव्हां अखेरच्या कार्याला तूं अनायासें येथें आला आहेस. ' कारण मागें उल्लेख केल्याप्रमाणें गोविंदरावजी, गोपाळरावजी, मुतालिक, रामभाऊ कमतनूर, दत्तोपंत चिकालगुडकर वगैरे मंडळी पंतांच्या सांगण्यावरून जेथें जरूर असेल तेथें कोठेंहि स्मशानयात्रेकरितां नेहमीं तत्परतेनें जात असत. या वेळीं पंतांनीं विनोदानें मुतालिकांना ती आठवण दिली. तसेंच एखादा भक्त आला म्हणजे कांहीं न बोलतां पंत खुणेनें चिलमींत तंबाखू भरण्यास सांगत व आपण हात लावल्यासारखें करून ती त्याला देण्यास सांगत. कित्येकांना तर दुरूनच दर्शन घेऊन आपलें समाधान करून घ्यावें लागे. ज्या कारुण्यमूर्तीनें दीन दुबळे, रंजले-गांजलेले, अशिक्षित-सुशिक्षित अशा असंख्य भक्तांना त्यांची जात, गोत, अधिकार,

गुणावगुण वगैरे न पाहातां, प्रेमानें हृदयाशीं कवटाळून आपलें आतडेंच दिलेलें होतें त्या असंख्य दीन, दुबळ्या, भोळ्या, भाविकांना आपल्या प्रेमाचा गड्डा तशा स्थितींत अंथरुणावर पडलेला पाहून काय वाटलें असेल याची कल्पनाहि करवत नाहीं !

## अंबाजीपंतांना झालेले दृष्टांत !

अश्विन शुद्ध १५ पासून पंतांची प्रकृति चिंताजनक वाटूं लागली व सिव्हिल सर्जनला आणावा असें कोणाकोणाचें मत पडलें. प्रथम "आतां सिव्हिल सर्जनला कशाला आणतां ?" असें पंत म्हणाले. पण अखेर मंडळींचा आग्रह पाहून त्यांनीं संमति दिली. सिव्हिल सर्जननें त्यांना तपासून रोग असाध्य असल्याचें सांगितलें. अश्विन वद्य १ व २ म्हणजे शनिवार व रविवार हे दोन दिवस सिव्हिल सर्जन येत असे व त्यानें आपली शिकस्त केली; पण कांहीं गुण आला नाहीं. हे दोन दिवस पंत फारसें बोलत नसत. फक्त मधुन मधुन 'बाळ', 'बाळप्पा' असें म्हणत. या सुमारास दूर दूर असलेल्या पंतांच्या कांहीं शिष्यांना भेटून जाण्याबद्दल तारा, पत्रें वगैरे पाठविलीं व ते भेटून गेले. त्याचप्रमाणें कांहींना दृष्टांत होऊन ते भेटून गेले. अश्विन शुद्ध १५ शुक्रवार रोजीं रात्रीं पंतांचे मेहुणे अंबाजी श्रीपाद कुळकर्णी ऊर्फ दादासाहेब यांना दड्डी येथें स्वप्नांत पंतांनीं सांगितलें कीं "अजून तुम्ही येत नाहीं काय ? न याल तर मात्र फसाल." ही हकीकत त्यांनीं आपले चुलतभाऊ वामन खंडो कुळकर्णी यांस सांगितली व शनिवारीं बेळगावास जाण्याचें त्या दोघांनीं ठरविलें. पण कांहीं अडचण आल्यामुळें ते शनिवारीं निघूं शकले नाहींत; पण शनिवारीं रात्रीं अंबाजीपंतांच्या स्वप्नांत पुनः पंत येऊन म्हणाले "तुमची आशा सोडावी काय ?" तेव्हां मात्र अंबाजीपंत चपापले आणि रविवारीं ते, वामन खंडो कुळकर्णी व ईश्वराप्पा वाघ्राळी असे तिघे बैलगाडींतून बेळगावास जाण्यास निघाले व ते कागतीस येईपर्यंत रात्रींचे नऊ वाजले. ते पावसाचे दिवस होते व गाडीचे बैलहि थकले होते. त्यामुळें ते पायींच बेळगावास जाण्यास निघाले व सुमारें साडेअकराच्या सुमारास पंतांच्या वाड्याशीं आले आणि वर जाऊन पंतांच्या खोलींत गेले. अंबाजीपंतांना आलेले पाहातांच पंतांना समाधान वाटलें व त्यांनीं त्यांना हातांनीं कवटाळून "केव्हां आलांत ?" असें खुणेनें विचारलें. या वेळीं पंतांचें बोलणें जवळ जवळ बंदच होतें.


## नि–र्या–ण

अश्विन वद्य ३ शके १८२७ सोमवार रोजीं पहाटे २॥-३ वाजल्यापासून पंतांचा श्वास जोरानें सुरू झाला; तेव्हां बापट, जोशी वगैरे जवळची मंडळी घाबरली व लगेच त्यांनीं गोपाळरावजींना बोलावून आणिलें. गोपाळरावजींनीं पंतांची स्थिति पाहून आपल्या इतर बंधूंना, मातोश्रींना व भगिनींना बोलावून आणण्यास सांगितले आणि भक्तमंडळींस एकतारी घेऊन "ॐ नमः शिवाय" मंत्र चालू करण्यास सांगितलें. पंतांच्या मातोश्री, बंधु, भगिनी वगैरे सर्व मंडळी आल्यावर पंतांची यथाविधि पूजा करण्यांत आली व श्रीचे

तीर्थ एक पळीभर त्यांचे तोंडांत घातलें. त्यावरोबर आपणास बसविण्यास त्यांनीं खुणावलें. त्याप्रमाणें करितांच पंतांनीं एकदां प्रेमार्द्र दृष्टीनें सर्वांकडे अवलोकन केलें आणि सूर्योदयाचे सुमारास दृश्यभान हरपून **श्रीपंतमहाराज** निर्गुण निराकार अशा सद्‌गुरु बाळस्वरूपीं ऐक्य पावले! शेवटपर्यंत त्यांची नाडी हाताला चांगली लागत होती व त्यांचा चेहेरा अखेरपर्यंत व नंतरहि निद्रिस्त मनुष्याच्या चेहेऱ्याप्रमाणें दिसत होता!' "समाधिस्थितींतच अंतसमयीं मी जाईन" असें कधीं कधीं ते म्हणत व त्याचप्रमाणें अखेर स्थिति झाली. श्रीपंतांचें प्राणोत्क्रमण झाल्याची बातमी समजतांच घरांत जो आक्रांत झाला त्याचें वर्णन करणें शक्य नाहीं. त्या वेळीं घरांतील मंडळी व तेथें जमलेली भक्तमंडळी मिळून सुमारें शें दीडशें माणसें होतीं. पण सव शोकाकुल झाल्यामुळें कोणीं कोणास सावरावें व कोणीं कोणाची समजूत घालावी अशी स्थिति झाली व प्रत्येकाला "बाळा टाकुनी जाय माता। तेवीं तुवां केलें ताता" (द. प्रे. ल. २१). असें वाटूं लागलें.

थोड्या वेळानें कांहीं मंडळी नेहमींच्या रिवाजाप्रमाणें श्रीपंतांच्या देहाची व्यवस्था लावण्याच्या तयारीला लागली. परंतु त्यांचे बंधु गोविंदरावजी यांना ती गोष्ट पसंत पडली नाहीं व श्रीपंतांच्या देहाचा अंत्य संस्कार बेळगावीं न करितां तो बाळेकुंद्रीस समारंभानें न्यावा व तेथें त्यांच्याच जागेंत त्याला अग्निसंस्कार करावा असें त्यांना वाटूं लागलें. त्यांनीं आपला विचार आपल्या इतर बंधूंना आणि कांहीं जुन्या जुन्या भक्तमंडळींना सांगितला व तो सर्वांना पसंत पडून पंतांचा देह धमणींतून बाळेकुंद्रीस नेण्याचें ठरलें आणि त्याप्रमाणें परवाने काढणें वगैरे तयारीला मंडळी लागली. श्रीपंत निजधामाला गेल्याची बातमी उजाडल्याबरोबर हां हां म्हणतां सर्व गावभर पसरली व बेळगावमधील भिन्न भिन्न जातींतील व पेशांतील शेकडों भक्त श्रीपंतांच्या वाड्याशीं जमले.


गोविंदरावजी व इतर कांहीं भक्तमंडळी यांनीं श्रीपंतांची पूजा केली व अंगांत त्यांची उत्सवाच्या वेळीं घालणेची कफनी, डोकीला कफनीच्याच रंगाचा त्यांचा मंदील, गळ्यांत स्फटिकांची माळ व पुष्पहार घालून त्यांना धमणींत बसविण्यांत आलें. त्यांचे एके बाजूस मातोश्री व दुसरे बाजूस गोपाळरावजी आणि समोर बापट व जोशी अशी मंडळी बसली होती. धमणीसमोर रामभाऊ लेले कुरुंदवाडकर वगैरे भक्तमंडळी एकतारीवर भजन म्हणत चालली होती व धमणीच्या मागें शेकडों भक्त पायीं चालले होते. ही मिरवणूक गणपति गल्लीचे नाक्याशीं आली तों पुष्पहार व फुलें घेऊन शेकडों लोक उभे होते. त्यांनीं श्रीपंतांचें अखेरचें दर्शन घेऊन त्यांना हार अर्पण केले. नंतर आरती होऊन धमणी पुढें चालू लागली. मिरवणूक गावाचे वेशीपाशीं जाईपर्यंत वाटेंत श्रीपंतांना पुष्कळ हार अर्पण करण्यांत आले व भक्तमंडळींचा जमावहि फार मोठा जमला आणि बाळेकुंद्रीच्या रस्त्यानें मिरवणूक चालू झाली. जसजशी मिरवणूक पुढें चालली तसतसा मिरवणुकीबरोबर चाललेल्या भक्तमंडळींचा जमाव वाढत चालला होता. भक्तमंडळींच्या आर्त स्वरांत म्हटलेल्या भजनाचा गजर सारखा चालू होता;



श्रीपंतमहाराजांचें मोडी हस्ताक्षर
(हें पत्र पृ. ३१७ वर दिलें आहे)



श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथील श्रींच्या
पालखीचा देखावा (पृ. ४७१)



बाळेकुंद्री गावांतील घरामागें असलेली
श्रीपंतमहाराजांची समाधि (पृ. ४७१)



बाळेकुंद्री गावांतील घरामागें असलेली श्रीपंतमहा-
राजांचे आजोबा परमहंस श्रीबाळकृष्णमहाराज
यांची समाधि ( पृ. २१४ )

कापूर, धूप वगैरे सुवासिक द्रव्यांचा सुवास सुटला होता व फुलें, गुलाल, बुक्का वगैरे सर्व वाटभर पडत होतीं. कुडची गावांत मिरवणूक जातांच तेथील भक्तमंडळींनीं श्रीपंतांना हार घातले; नंतर सांगली संस्थानच्या हद्दीनजीकच्या टेकडीवरील कंचूर माळावर असलेल्या विहिरीजवळ मिरवणूक थोडा वेळ थांबली व आरती करून पुढें चालूं लागली. बाळेकुंद्रीस मिरवणूक जाईपर्यंत आजूबाजूच्या गावांतील पुष्कळ भक्त मिरवणुकींत सामील झाले व हजारों भक्तमंडळींसह श्रीपंतांची धमणी बाळेकुंद्री गावांत गेली.

बाळेकुंद्री गावांतील श्रीपंतांच्या घरासमोर त्यांच्या मातोश्री धमणींतून उतरल्यावर गावकरी मंडळींनीं श्रीपंतांचें दर्शन घेतलें. नंतर श्रीरामेश्वराभोंवतीं तीन प्रदक्षिणा करून दुपारचे सुमारें दोन वाजतां हल्लीं जेथें श्रीदत्तसंस्थान आहे त्या आंबराईंत मिरवणूक गेली. ती आंबराई सुमारें शंभर–सवाशें वर्षांपूर्वीं श्रीपंतांच्या पूर्वजांपैकीं ' गंगाबाई ' नावाच्या एका पुण्यशील साध्वीनें काशीपासून रामेश्वरापर्यंत पायीं यात्रा करून आल्या-नंतर लाविलेली होती. ही मिरवणूक तेथें गेली तेव्हां आंबराईच्या आसपासचा भाग ओसाडच होता व कधीं कधीं तिचा स्मशानासारखाहि उपयोग करण्यांत येत असे. श्रीपंतांच्या बंधूंनीं आंबराईच्या तोंडाशीं असलेल्या मोकळ्या जागेंत दहनविधि करण्याची योजना केली आणि भक्तमंडळींनीं तेथील जागा साफसूफ करून चंदनाच्या लाकडांची चिता तयार केली व श्रीपंतांचा देह त्या चितेवर ठेविण्यांत आला; त्या वेळीं जो हलकल्लोळ उडाला त्याचें शब्दांनी वर्णन करणें शक्य नाहीं ! कित्येकजण चितेजवळ जाऊन श्रीपंतांचे चरणांवर मस्तक ठेवीत, तर कोणी प्रदक्षिणा घालीत आणि तशा स्थितींत त्यांना आवरून धरण्याचें धैर्यहि कोणाला होईना. एकाच वियोगदुःखाच्या भोवऱ्यांत सर्वजण सापडल्यावर कोणीं कोणास सावरावें ? अखेर श्रीपंतांच्या बंधूंनीं त्यांच्या देहाला यथाविधि अग्निसंस्कार केला व ज्या प्रेममूर्तीनें पंचवीस–तीस वर्षें असंख्य भक्तांना बोधामृत पाजून शुद्ध प्रेमाची अमूल्य देणगी दिली ती अग्निनारायणाचे स्वाधीन करून खिन्न मनानें सर्व मंडळी आपा-पल्या गावीं परत गेली आणि पंचभूतांचा देह त्यांचे स्वाधीन करून भूतनाथ शिवस्वरूप श्रीपंतमहाराजांनीं श्रीक्षेत्र बाळेकुंद्रींतील आंबराईंत कायमचें वास्तव्य केलें !!

दुसरे दिवशीं सकाळीं श्रीपंतांच्या परगावच्या भक्तमंडळींना तारा करून व पत्रें पाठवून श्रीपंतनिर्याणाची बातमी कळविण्यांत आली. तिसरे दिवशीं श्रीपंतबंधु गोविंद-रावजी वगैरे मंडळी बाळेकुंद्रीस गेली व रक्षा भरून दहनभूमीच्या आजूबाजूची जागा त्यांनीं साफ केली. ज्या ठिकाणीं श्रीपंतांच्या देहाला अग्निसंस्कार झाला होता त्या ठिकाणीं एक लहानसा औदुंबराचा रोपा लावण्यांत आला आणि त्याच्याभोंवतीं फुलझाडांच्या कुंड्या ठेवून त्याला इजा न पोहोंचेल असा बंदोबस्त करण्यांत आला. नंतर श्रीपंतांच्या अस्थि त्यांचे मेहुणे व बाळेकुंद्रीमधील त्यांचे शेजारी वे. विरूपाक्षभटजी पट्टीहाळ यांचे स्वाधीन करण्यांत येऊन विभूति बेळगावास आणण्यांत आली. तसेंच श्रीपंतांच्या अंगावरलि व उपयोगांतलि सर्व कपडे स्वच्छ धुऊन व्यवस्थित रीतीनें ठेवण्यांत आले आणि त्या वेळीं बेळगावांत प्लेग असल्यामुळें श्रीपंतांच्या घरांतील मंडळी झोपडीवर राहाण्यास गेली.

# प्रकरण ४३ वें

:o:

## अवधूत–संप्रदाय

श्रीपंतमहाराजांच्या चरित्राचें येथपर्यंत जें वर्णन केलें आहे त्यावरून वाचकांना त्यांच्या अधिकारासंबंधीं व त्यांनीं केलेल्या कार्यासंबंधीं बरीचशी कल्पना आली असेलच; तरी पण प्रपंचपरमार्थदृष्ट्या त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या कांहीं विशिष्ट गुणांचें अधिक स्पष्टीकरण केल्यास वाचकांना त्यांच्या चरित्रासंबंधीं यथार्थ कल्पना येईल असें वाटल्यामुळें तसें करण्याचें योजिलें आहे. साधारणपणें आपला अनुभवहि असाच आहे कीं, आपल्या एखाद्या आवडत्या आप्ताचा अथवा पूज्य व्यक्तीचा वियोग झाला म्हणजे आपण त्याच्या ठिकाणचे एकेक गुण आठवून त्याचें स्मरण करीत असतों आणि ते गुण उदात्त, उज्वल व आदर्शभूत असले तर त्यांचें आपणांस नेहमीं स्मरण व्हावें म्हणून आपण त्या व्यक्तीचें कांहीं तरी स्मारक करून ठेवितों. श्रीपंतांच्या बाबतींतहि असाच प्रकार झाला व त्यांचें कायम स्वरूपाचें स्मारकहि झालेलें आहे. पण त्या स्मारकाकडे वळण्यापूर्वीं त्यांच्या ठिकाणच्या विविध गुणांचें पुढील कांहीं प्रकरणांत पुण्यस्मरण करण्याचें योजिलें आहे. पण त्यापूर्वीं ज्या अवधूतसंप्रदायानुसार सद्‌गुरु बालमुकुंदांनीं त्यांच्यावर अनुग्रह केला व जो त्यांनीं सद्‌गुरूच्या आज्ञेप्रमाणें सुमारें पंचवीस वर्षें चालविला त्याचें स्वरूप काय तें, होतां होईल तों, त्यांच्याच वचनांच्या आधारें सांगत आहोंत.

शके १७९७ अश्विन वद्य १२ (गुरुद्वादशी – २६–१०–१८७५) रोजीं श्रीबालावधूतांनीं श्रीपंतांना अवधूतमार्गाची दीक्षा दिली. त्या प्रसंगाचें श्रीपंतांनीं ‘ दत्त-प्रेमलहरी’ पद २७२५ मध्यें सुंदर वर्णन केलें असून प्रकरण ५ मध्यें त्याचा उल्लेख केलाच आहे. त्या पदांत त्यांनीं “अनादिसिद्ध श्रुतिसंमत संप्रदाय भला” असें या संप्रदायाचें वर्णन केलें आहे व पद १६२९ मध्यें “अति गूढ मार्ग हा आमुचा । मथित अनादि अवधूताचा ” असें म्हटलें आहे आणि पद ९८६ मध्यें “ सांप्रदाय सद्‌गुरूचा । बहु परंपरेचा ” असें सांगितलें आहे. त्यावरून अवधूतसंप्रदाय हा अनादि, श्रुतिसंमत म्हणजे वैदिक, बहु परंपरेचा म्हणजे फार प्राचीन कालापासून गुरुपरंपरेनें चालत आलेला आणि फार गूढ आहे हें स्पष्ट होतें.

## श्रीपंतांची गुरुपरंपरा

ज्या परंपरेनें अवधूत-संप्रदायांतील गुह्य ज्ञान आपल्या हातीं आलें त्या परंपरेचें श्रीपंतांनीं आपल्या “ आत्मज्योति ” लेखांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. “ दुजाभाव दवडून अति गुप्तपणें श्रीदत्तात्रयस्वामींनीं रामचंद्र अवधूत यास ज्या गुह्य गोष्टी सांगितल्या त्याच रामावधूतानें एकांतीं बसून, दुजें दृष्टीस न पडेल अशा गुह्य मार्गानें,

श्रीबालावधूतास उपदेशिल्या. श्रीसद्गुरु बालमुकुंदांना जंबुनगरीं निर्जन गुहेंत दीन दत्तास नीजबोध सांगितला. याच मार्गानें कांहीं एकांना यथार्थ स्थिति प्राप्त झाली. एवं परंपरेनें उपदेशस्थिति गुप्त रूपानें चालत आली." ( पु. ३–२१४ ) तसेंच त्यांच्या दप्तरांत असलेल्या एका कागदावर त्यांनीं आपली गुरुपरंपरा खालीलप्रमाणें दिली आहे:—

दत्तावधूत
|
रामावधूत
|
बालावधूत
|
दत्त ( पंत )

त्यांनीं पद १८३ मध्यें "श्रीराम आनंदधाम योगीविश्राम दयाघन ओळे। देखुनी तयाचीं बाळ वंदी पाउलें। देउनी अभय अंकावरी घेतला। अवधूत अनादि मूळ पंथ बोधिला।" म्हणजे श्रीरामचैतन्यांनीं श्रीबालावधूतांवर अनुग्रह केला असे सांगितलें आहे व पद १४५ मध्यें "दत्त बाळ राम। भिन्न मात्र नाम। आभिन्न हें वर्म। कळों आलें" म्हणजे दत्त (आपण स्वतः), बाळ (बालमुकुंद) व राम (रामावधूत) हे भिन्न दिसले तरी एकच होत असें म्हटलें आहे आणि एके ठिकाणीं आपल्या स्वतःला "रामदाससूनु" म्हणजे रामावधूतांचे दास जे बालावधूत त्यांचा 'सूनु' म्हणजे पुत्र अथवा शिष्य म्हटलें आहे. तसेंच आपली गुरुपरंपरा श्रीनृसिंहसरस्वतींपासून आलेली आहे असेंहि श्रीपंत सांगत व त्यांनीं अवधूतसंप्रदायाला "बहुपरंपरेचा" म्हटल्याचा वर उल्लेख केलाच आहे. तेव्हां श्रीनृसिंहसरस्वती आणि श्रीरामावधूत यांच्या कालांमध्यें सुमारें तीनशें वर्षे गेल्यामुळें आणि त्यांच्या परंपरारूपी साखळींतील मधल्या दुव्यांची माहिती नसल्यामुळें श्रीरामावधूतांवर श्रीदत्तात्रेयांनीं अनुग्रह केला असें श्रीपंतांनीं म्हटलें असल्याचा संभव आहे.

श्रीरामावधूतांवर प्रत्यक्ष त्रिमूर्ति दत्तात्रेयांनीं अनुग्रह केलेला असो, अथवा महाराष्ट्रांत श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्यापासून दत्तसंप्रदयाची जी परंपरा सुरू झाली त्या परंपरेंतील कोणीं अवधूतानें केलेला असो, श्रीदत्तात्रेय, श्रीपादश्रीवल्लभ, श्रीनृसिंहसरस्वती व श्रीबालावधूत हे एकच होत असें श्रीपंतांनीं वारंवार म्हटलें आहे. पद २१ मध्यें हे चारहि अवतार एकाच दत्ताचे आहेत असें त्यांनीं सांगितलें आहे व पद १४०१मध्यें 'जो पारखपुरीं उद्भवला, जो अत्रिअनुसूयापोटीं आला, जो श्रीपादश्रीवल्लभ झाला व जो नृसिंहसरस्वतीरूपानें गाणगाभुवनीं खेळला तोच अवधूत होय' असें म्हटलें आहे; आणि सद्गुरूला या चारी रूपांनी आळविलें आहे. तसेंच पद १५९ मध्यें "उपास्य नरसिंहमुनि, सद्गुरु बालावधूत" असेंहि त्यांनीं म्हटलें आहे. त्यावरून श्रीबालावधूत हे सदगुरु व श्रीनृसिंहसरस्वती हें श्रीपंतांचें उपास्य दैवत होतें हें उघड दिसतें. प्रकरण २ मध्यें दर्शविल्याप्रमाणें श्रीपंतांच्या पितृ–घराण्यांत व मातृ–घराण्यांत फार पुरातन

कालापासून दत्तभक्ति चालत आलेली होती आणि श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांचेसंबंधीं पूज्यभाव वसत होता. पुढें १८७५ सालीं जेव्हां श्रीबालावधूतांनीं श्रीपंतांवर कृपा केली तेव्हां पूर्वसंस्कारांमुळें त्यांच्या ठिकाणीं वसत असलेली अमूर्त गुरूची भक्ति व त्यांना प्रत्यक्ष अनुग्रह देणाऱ्या श्रीबालावधूत सद्गुरूवरील भक्ति यांचा बेमालूम सांधा जमला आणि श्रीबालावधूत हेच श्रीदत्तात्रेय, तेच श्रीपादश्रीवल्लभ व तेच श्रीनृसिंहसरस्वती अशी त्यांची दृढ भावना झाली. एके ठिकाणीं तर " अत्रि-अनसूयापोटीं आला बालावधूत " ( द. प्रे. ल. २५४७ ) असेंहि त्यांनीं म्हटलें आहे व " बालावधूता नरसिंहस्वामी " ( द. प्रे. ल. १८२ ) असें सद्गुरूला संबोधून " नरसिंहसरस्वती स्वामी औदुंबरवासी । सद्गुरु बालावधूत भजकां प्रसन्न अहर्निशीं " ( द. प्रे. ल. २०१ ) अशा प्रकारें श्रीनरसिंहसरस्वती व श्रीबालावधूत हे शब्द पुष्कळ ठिकाणीं समानार्थीच वापरले आहेत.

गुरुचरित्रग्रंथ श्रीपंतांना फार पूज्य वाटत असे व ते आपल्या कांहीं शिष्यांना त्याचे सप्ताह करण्यास सांगत. त्यांनीं " गुरुकथामृतसार सेवन करा । गुरुचरणीं भाव ठेवुनी संसृति तरा ॥ ध्रृ० ॥" (द. प्रे. ल. ३८९) या ११ कडव्यांच्या पदांत श्रीनृसिंहसरस्वतींचें चरित्र थोडक्यांत सांगितलें आहे व दहाव्या कडव्यांत " गुरुलीला श्रवण-पठण भावें करितां । अंगीं भरे प्रेमवारें नाम गर्जतां । निरुपम सुख होय नये सांगतां । भजा चरणीं लक्ष ठेवुनी दयासागरा ।। १० ।। " असा अनिर्वचनीय प्रेमसुखाचा आपला अनुभव व्यक्त करून दयासागर सद्गुरुचरणीं लक्ष ठेवून त्याचें भजन करण्याचा उपदेश केला आहे. तसेंच पद ११ मध्यें श्रीपंतांनीं " अत्रिवंशकुलदीप अवधूत स्वभक्तकैवारी । नरहरी ॥ध्रृ०॥ ज्ञानमार्ग स्थापन कराया आला भूमीवरी । नरहरी ॥ १॥" असें श्रीनृसिंहसरस्वतींचें वर्णन केलें आहे. श्रीनृसिंहसरस्वतींच्यामुळें प्रसिद्धीस आलेल्या पुण्य क्षेत्रांपैकीं श्रीनृसिंहवाडीस श्रीपंतांच्या तीन चार खेपा झाल्याचाहि मागें उल्लेख केलाच आहे. तेव्हां श्रीपादश्रीवल्लभ, श्रीनृसिंहसरस्वती, श्रीरामावधूत व श्रीबालावधूत हे एकाच अवधूत-संप्रदायाला ललामभूत झालेले पुण्यपुरुष अथवा अत्रिवंशकुलदीप होत असें म्हणावयास हरकत नाहीं. दुसरें असें दिसतें कीं अवधूत हा ' गगनमठींचा योगी ' असल्यामुळें त्याची कोणतीहि गादी स्थापन केलेली नाहीं. अनन्य भक्तांचें हृदय हीच त्याची गादी. ती जेथें असेल तेथें तो प्रगट होतो. त्यामुळें त्याची ही गादी कोणत्या परंपरेनें चालेल तें सांगतां येणार नाहीं. फक्त जेथें जेथें त्याचें वास्तव्य होऊन त्याची अद्‌भुत लीला प्रगट झाली असेल त्या त्या स्थानांना महत्व येतें. श्रीदत्तात्रेय हे स्मर्तृगामी व त्रिभुवनसंचारी असून त्यांना श्रीपंतांनीं " प्रगट–गूढ " म्हटलें आहे; कारण ते गुप्त रूपानें वास करितात व स्मरणासरसे अनन्य भक्तांना प्रगट रूपानें दर्शन देतात.

## अवधूत-संप्रदायांतील रहस्य

श्रीदत्तात्रेयांपासून जो अवधूतसंप्रदाय चालत आला त्यांतील गूढ रहस्य अथवा

गुह्य म्हणजे वाङ्मनातीत अद्वैतभक्तिसुखाचा अनुभव अथवा भक्तिप्रेमसार होय. म्हणूनच श्रीपंतांनीं पद ११८८ मध्यें या संप्रदायाला " निःशब्द श्रुतिमार्ग " म्हटलें आहे व " वाङ्मनासी दूर सारुनी । धरिला गुरुपंथ । जाहलों शुद्ध अवधूत " असें पद २००३ मध्यें सांगितलें आहे. सद्गुरु बालमुकुंदांनीं श्रीपंतांना शब्दाच्या साह्यानें बोध करण्याची शिकस्त केली; पण तेवढ्यानें त्यांचें समाधान झालें नाहीं. कारण शब्दाचें काम आहे तोंपर्यंत वक्ता श्रोता व बोध हा भेदभाव राहातोच. त्यामुळें जो शब्दाला गवसत नाहीं व मनाला ज्याचें आकलन होत नाहीं तो निःशब्द अनुभव अथवा वाङ्मनातीत ऐक्य-प्रेमाचा अनुभव श्रीपंतांना देण्याकरितां " खेवाचें " अथवा " गाढालिंगनाचें " मिष करून सद्गुरूंनीं आपल्या हृदयींचें भक्तिप्रेमसार शिष्यहृदयीं घातलें हें पूर्वीं सांगितलेंच आहे व त्या ठिकाणीं देणारानें काय दिलें आणि घेणारानें काय घेतलें अथवा " शिष्यगुरूचा भेदचि नुरला । ब्रम्हात्मैक्य अनुभव साची ( दे. प्रे. ल. २६७१ ) व " गुरुशिष्य निमले बोधसागरीं । स्वानुभवदीप्ति " ( द. प्रे. ल. २७०५ ) या श्रीपंतांच्या उक्तींप्रमाणें देणारा आणि घेणारा या दोघांचा प्रकार झाला हें ज्यांचें त्यांनाच माहित; इतरांना तें गूढच राहाणार ! या संप्रदायांत अनुभवावर सर्व भर असल्यामुळें श्रीपंतांनीं त्याला " अनुभवमार्ग " असेंहि म्हटलें आहे व श्रुतिशास्त्रांत जें गुह्य ज्ञान साठवलेलें आहे तें स्वानुभवानें सिद्ध करण्याकरितां श्रीदत्तात्रेय अवधूतांनीं हा मार्ग स्थापन केला आहे असे त्यांनीं वारंवार उद्गार काढले आहेत. 'दत्तप्रेमलहरी' पद ५७७ मध्यें ते म्हणतात " पतितोद्धार करायाला । भूवरी दत्त अवतरला ॥ धृ० ॥ मार्ग स्थापुनी वेदोदित । बोध प्रगटिला शुद्धाद्वैत । निजानंदें सहज डुलत । दत्त पूर्ण धाला ॥ ३ ॥ " तसेंच पद ९४४ मध्यें तर 'वेदशास्त्रांना मागें सारून म्हणजे शब्दाचा प्रांत ओलांडून अवधूतमथित अनुभवमार्गानें वाङ्मनातीत स्वरूपसामरस्याचा शिष्याला अनुभव आणून देतों' असें श्रीपंतांनीं म्हटलें आहेः—ते उद्गार असे "वेद शास्त्रांसी मागें सारुनी अवधूतमथित मार्ग दावितों ॥ धृ० ॥ अनुभवपथीं आणुनी सर्व । स्वानुभव-स्वरूपीं मिळवितों १॥ "

## संप्रदाय म्हणजे काय ? व परंपरेचें महत्व

संप्रदाय म्हणजे अनेक वर्षे साचत आलेल्या अनुभवाचा पुंज किंवा साठा अथवा गुह्य ज्ञानाचा अनुभव घेण्याचा साचाच होय व जे निरनिराळे वैदिक संप्रदाय आज प्रच-लित आहेत ते मनुष्याला आत्मानुभव बाणावा म्हणून तयार केलेले साचेच होत. कोणी एखादा संप्रदाय स्वीकारणें म्हणजे आपल्या अंतःकरणास त्या संप्रदायरूपी साच्यांत घालणें होय आणि त्यानें तसें केलें म्हणजे संप्रदायक्रमाप्रमाणें बिनचुक चाललें असतां सहज ओघानें त्याची प्रगति होत जाते व अंतःकरण स्वस्वरूपाशीं तद्रूप होतें. गुरुमार्गाविरुद्ध आचरण करणाऱ्या कांहीं शिष्यांना उद्देशून " आधीं गुंतूं नये । मग कुंथूं नये ॥ धृ० ॥ देऊनी वचनें विपरीत करणी । निजसुख भागा नये ॥१॥ " ( द. प्रे. ल. १४८० ) हें

पद श्रीपंतांनीं म्हटल्याचा प्रकरण ३३ मध्यें उल्लेख केलाच आहे. संप्रदायक्रम बिनचुक चालविण्यावर त्यांचा फार कटाक्ष असे. कोणी संप्रदायक्रमाविरुद्ध वर्तन केल्यास तें त्यांना बिलकूल खपत नसे. "इतर कोणताहि अपराध केला तरी तो एक वेळ क्षम्य होईल, पण संप्रदायाविरुद्ध वागणें अथवा त्याची अवहेलना करणें अक्षम्य होय" असेंहि ते म्हणत.

अवधूतमार्गांत परंपरेचें महत्व फार आहे. कारण त्याची उपयुक्तता अनादि कालापासून अनेक महात्म्यांच्या अनुभवानें सिद्ध झालेली आहे. एके ठिकाणीं श्रीपंत म्हणतात "वर्म चुकून खऱ्या हेतूंत अंतर पडून परस्परविरोधी मतें अनेक कां होत आलीं ? तर कारण असें कीं आचार किंवा बोधपरंपरा तुटली व नाना शाखा उद्भवल्या. परंपरा सारखी चालली असती तर भिन्न व विरोधी मतांस ठाव मिळाला नसता. आचार्यांनीं चूक तेवढी दुरुस्त केली, गुरुपरंपरा पुनः धरिली व रूढींत आणिली. म्हणून परंपरेचें महत्व अथवा संप्रदायमहिमा फार आहे. याविना नुसते कोरडे शब्द राहातील; किंवा मूळ हेतु बाजूला राहून शुष्क क्रियाचार मात्र राहील. या शब्द व क्रियांचें गूढ वर्म अनुश्रुति, अनुभूति, परंपरागत संप्रदायाधार बोधानेंच गम्य आहे". (पु ७-९९) याप्रमाणें परंपरेचें महत्व आहे खरें; पण अवधूतमार्ग हा कधीं प्रगट व कधीं गुप्त अशा रीतीनें चालत असल्यामुळें श्रीपंतांनीं "उघड झाक हा पंथ चालतो न कळे कोणासी" (दं. प्रे. ल. ४०५) असें म्हटलें आहे. गुरुपरंपरा ही साखळीसारखी आहे. ती जरी कायम असली तरी जेव्हां त्या परंपरेंतील एखादा अधिकारी पुरुष लोकांत मिसळून धर्मजागृतीसारखें महत्कार्य करितो तेव्हां त्याच्या योगानें लोकांत या मार्गाचा प्रसार विशेष होतो; नाहीं तर दिव्यानें दिवा लागावा त्याप्रमाणे परंपरा तेवढी कायम राहाते. सद्गुरूंनीं आपल्यावर अनुग्रह करून "घटीं उजळिलें निजज्ञानदीपा" (द. प्रे. ल. १७०६) असा श्रीपंतांनीं आपला अनुभव सांगितला आहे व पद १७८९ मध्यें "कलियुगीं अवधूत मार्ग लोपला। म्हणुनी दत्त प्रभु प्रगटला ॥" असें म्हटलें आहे.

## गुरुमंत्राचें महत्व

श्रीपंतांनीं गुरुमंत्राचें फार महत्व गाइलें आहे. "गुरुमंत्र हा अनादि कालापासून अनेक सत्पुरुषांच्या संप्रदायशक्तीनें भरलेला असून त्या मंत्रांत सर्व सृष्टि व सर्व कांहीं सामावतें. त्याला सोडून कांहीं असत नाहीं. सद्गुरुमुखें मंत्र अंगीं भरून अंगभूत होतांच सर्व जोडलें. गुरु हा शिष्याचे कर्ण फुंकून, कर्मप्रारब्धाचा पूर्वीचा वायुप्राण जाळून टाकून आपला गुरुप्राण अंगीं भरतो व ब्रह्मप्रारब्ध सुरू करितो आणि त्यापासून आपोआप वृत्तांत बदल पडत जातो व सुधारणा होत जाते; सद्गुरु हा मंत्र देतेवेळीं अनंत, अनादि शक्तीसह सिद्ध मंत्र देतो. उदार दाता तो! तो थोडें देणारा नव्हे ××× मंत्रोपदेश अर्थासह व शक्तीसह होतो. पण तो आपणास न कळल्यामुळें व "माझ्यानें हें कसें होईल?" ही भीति व संशय असल्यानें ती शक्ति बाहेर पडत नाहीं व मंत्र उच्चारल्यानें फक्त शब्दमात्र, श्वासमात्र बाहेर पडतो" असें श्रीपंतांनीं म्हटलें

आहे (पु. ८–१०५) आणि गुरुमंत्राचें महत्व पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे. "गुरुमंत्र हा सप्तकोटी मंत्रांची जननी आहे. + + + तो शिष्यास नित्य मंगलसूत्र आहे, तो त्याची गळसरी आहे, अखंड सौभाग्यदोरा आहे" व त्याला इतकें महत्व येण्याचें कारण त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. "मंत्र म्हणजे शक्ति भरलेलीं अक्षरें; गुरुमंत्रांतील शक्तीस शक्ति देणारा गुरुप्रेमप्रसाद असतो. गुरु हा आपल्या मंत्रशक्तीनें शिष्यहृदयीं आपला प्रेमा देतो. सद्गुरु हा मंत्रमिषें निजप्रेमा भक्तहृदयीं भरतो. सद्गुरुप्रेम सर्व शक्तींचें अधिष्ठान. शक्तिरूप तेज निजप्रेमसागरींचा तरंग आहे. सद्गुरुवचनें कोणत्याहि शब्दास शक्ति येईल. त्याचे आवडीच्या मंत्रांतच प्रणवादि ब्रह्मांडांतील शक्ति भरली आहे. अंकावर घेऊन, पोटाशीं धरून, मस्तकीं वरद हस्त आणि पाठीवर राखता, योगक्षेमवाहता हात ठेवून सद्गुरु कर्णरंध्रांत अंतःकरण शुद्ध करणारी फुंक मारून अनादि भ्रांतितमाचा नाश करितो व गूढासहि गूढ आणि प्रकाशासहि प्रकाशशक्ति देणारा, मूळ घरच्या देवाची भेट करून देणारा आणि निःशब्द प्रेमैश्वर्यानें, निर्मल प्रेमभाग्यानें पूरित असा वायु (शक्ति) 'बाळा तूं माझा आहेस. तुला कशाचीहि भीति नाहीं' असें म्हणून शिष्यहृदयीं भरतो." (पु. ७–२६७) तसेंच गुरुमंत्राचा आपला अनुभव त्यांनीं पुढील पदाच्या रूपानें व्यक्त केला आहे. "मंत्रमय जाहलें। विश्व सर्व मंत्ररूपें दिसलें ॥ धृ० ॥ ॐकारारूढ सर्व विश्व हें। शिवस्वरूपीं रमलें ॥ १ ॥ नोहे व्यवहार नमस्कार। सद्गुरुपदीं कळलें ॥ २ ॥ सदाशिव दत्तस्वरूपीं। प्रेम उचंबळलें ॥ ३ ॥." (द. प्रे. ल. २३४३) व 'गुरुमंत्र श्वासाबरोबर आपोआप चालवावा' असें ते सांगत.

## प्रत्येक संप्रदायांत सद्गुरूचें महत्व

प्रत्येक संप्रदायांत अनुभवावर विशेष भर असल्यामुळें स्वाभाविकपणें गुरूला फार महत्व असतें. रसायनशास्त्रांतील प्रमाणभूत ग्रंथ कोणाहि विद्यार्थ्याला विकत घेऊन अगर ग्रंथसंग्रहालयांतून वाचावयास मिळणारे असतात. पण ते नुसते वाचून त्याला त्यांचें मर्म समजत नाहीं. तर ते समजावून घेण्याकरितां कोणातरी तज्ज्ञाकडे अगर प्रोफेसराकडे जावें लागतें आणि तो तज्ज्ञ अगर प्रोफेसर नुसत्या शब्दानें म्हणजे व्याख्यानद्वारा त्या ग्रंथांचा फोड करून सांगणारा असून भागत नाहीं. तर तो शिष्याला प्रयोगशाळेंत नेऊन व प्रत्यक्ष प्रयोग करून दाखवून त्याचें समाधान करणारा, इतकेंच नव्हे तर त्याचेकडून बिनचूक प्रयोग करवून घेणारा असावा लागतो. तशीच स्थिति प्रत्येक संप्रदायाची असते. म्हणून वेदप्रतिपादित अद्वैत सिद्धांत ज्यांना मान्य आहे असे वैदिक संप्रदाय हे तो सिद्धांत मुमुक्षूच्या अनुभवाला आणून देणाऱ्या प्रयोगशाळाच होत. "सर्वं खल्विदं ब्रह्म", (छां. ३–१४–१) "एकमेवाद्वितीयं ब्रह्म", (छां. ६–२–१) "नेहनानास्ति किंचन" (क. २-४-११) वगैरे श्रुतिवचनांनीं स्थापित केलेल्या त्रिकालाबाधित अद्वैत सिद्धांताचा अनुभव आणून देणें हें प्रत्येक वैदिक संप्रदायाचें ध्येय असतें. अशा निरनिराळ्या संप्रदायांतील विधि आणि आचार भिन्न भिन्न असले तरी

ध्येय मात्र एकच म्हणजे अद्वैत सिद्धांताचा अनुभव आणून देणें हें असतें. अथवा असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, हे संप्रदाय जरी निरनिराळे असले तरी ते सर्व एकाच शुद्ध अद्वैतज्ञानरूपी स्वरूपसागराला मिळणाऱ्या नद्यांप्रमाणें असून त्यांपैकीं एखाद्या संप्रदायांत प्रवेश झाला असतां अद्वैतांबुधीलाच जाऊन मिळतां येतें. अवधूत-मार्गासंबंधाचा आपला अनुभव श्रीपंतांनीं पुढीलप्रमाणें सांगितला आहे " क्रमितां अवधूतपंथ । नेणों कोठें झालों निवांत ॥ २ ॥ आनंदी आनंद झाला । भोक्ता दत्तप्रेमें रंगला ॥ ३ ॥ ", ( द. प्रे. ल. १६० ) किंवा प्रत्येक वैदिक संप्रदाय म्हणजे भवसागर तरून जाण्याची नौकाच असून त्या नौकेंत बसणाऱ्या मनुष्याला तो तरून जातां येतें. पण या संप्रदायरूपी नौकेंत शिष्याला घेऊन ती हांकारणारा कर्णधार जर कुशल नसेल तर ती केव्हां कोठल्या खडकावर आपटून तिच्यांतील प्रवासी जलसमाधि घेईल याचा नियम नसतो. म्हणून ही संप्रदायरूपी नौका सुरक्षितपणें चालविणारा नावाडी फार कुशल असावा लागतो. हा नावाडी म्हणजेच सद्गुरु होय व श्रीपंतांनीं एके ठिकाणीं " कर्णधार सद्गुरु समर्थ । गाजे वेदडंका " ( द. प्रे. ल. २४६ ) असें म्हटलें आहे.

## शास्त्र आणि सद्गुरु

सद्गुरूचें इतकें महत्व असण्याचें कारण असें कीं " घोर भयंकर शब्दारण्य । पार कसा पडसी । गुरुविणें व्यर्थ धडपडसी ॥ धृ० ॥ शास्त्रें पहासी अनुभव नेणसी । अभिमानें फुगसी । व्यर्थ संशयीं मरसी ॥ १ ॥ कोण मी काय स्वरूप माझें । किमपि नेणसी । मिथ्या शब्दानें अडसी ॥ २ ॥ टाकुनी शब्द जातां शरण । सद्गुरुपदासी । स्वरूपीं सहज दडसी ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २४२६ ) या पदांत श्रीपंतांनीं म्हटल्या-प्रमाणें शब्दारण्य फार घोर व भयंकर असल्यामुळें जिज्ञासु अगर मुमुक्षु भांवावून जाण्याचा फार संभव असतो. शास्त्रकारांमध्यें मतभेद असतात. श्रुतिप्रामाण्य मानणाऱ्या आचार्यांमध्येंहि श्रुतीचा भावार्थ काय अथवा श्रुतिप्रतिपाद्य अखेरचा सिद्धांत कोणता या-संबंधीं तीव्र मतभेद आहेत. तेव्हां अशा मतामतांच्या गलबल्यांत भांबावून गेलेल्या मुमुक्षूला बिनचूक मार्ग दाखवून वेदशास्त्रांचें सार त्याला अनुभवानें पटवून देणारा कोणी-तरी भेटावा लागतो. असा जो तोच सद्गुरु होय. शास्त्र आणि सद्गुरु यांच्यामधील संबंध श्रीपंतांनीं एका पदांत रूपकाच्या द्वारें फार सुंदर रीतीनें दाखविला आहे. तें पद असें "शास्त्रसागर सद्गुरुमेघ । खूण मनीं धरा ॥ धृ०॥ सागरीं तृषा भागवूं जातां । येई मृत्यु जरा ॥ १ ॥ मेघमुखें नीर प्राशन करितां । आनंद चराचरा ॥ २ ॥ सद्गुरुमुखें गुज कळतां । मिळसी दत्तगुरुवरा ॥ ३ ॥ ". ( द. प्रे. ल. २४२५ ) समुद्र हा प्रचंड जलाशय खरा; पण त्याचें पाणी खारट असल्यामुळें तें पिण्याची सोय नाहीं. पण कृपाळु मेघ हे खारटपणाचा अंश वगळून ( सूर्यकिरणांनीं शोषून घेतलेल्या ) गोड्या पाण्याची, भेदाभेद न करितां, निरपेक्ष बुद्धीनें, वृष्टि करून चराचर सृष्टीला आनंदित

करितात. त्याचप्रमाणें सद्गुरु हा वेदशास्त्रांतील निरर्थक भाग वगळून शुद्ध अद्वैतज्ञानरूपी सार तेवढें घेऊन तें परम कारुण्यानें त्रिविध तापांनीं त्रस्त झालेले भाविक, जिज्ञासु व मुमुक्षु यांना स्वानुभवानें पटवून देतो. " ज्या अर्थी अध्यात्मविषयावरील संस्कृत भाषेंतील ग्रंथांचीं प्राकृत भाषांत भाषांतरें झालीं आहेत, त्या अर्थी आतां सद्गुरूची आवश्यकता नाहीं, तीं भाषांतरें वाचून आत्मज्ञान कां प्राप्त करून घेतां येऊं नये ? " असा प्रश्न फ्री मेसन सोसायटीच्या दोघां सभासदांनीं श्रीपंतांना केला असतां "ग्रंथांवरून होणारें ज्ञान अपुरें असून आत्मानुभव होण्याकरितां सद्गुरूच्या कृपेचीच आवश्यकता आहे " हें श्रीपंतांनीं त्यांना सांगितल्याची व " गुरुप्रेम म्हणजे काय " हें त्यांना प्रत्यक्ष अनुभवानें पटवून दिल्याची हकीगत प्रकरण २६ मध्यें दिलीच आहे. नुसतीं पुस्तकें वाचून आत्मानुभव होणारा नसून त्याच्या प्राप्तीकरितां "शाब्दे परेच निष्णात" अथवा श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ म्हणजे वेदाधित व अनुभवी अशा सद्गुरूच्या कृपेची किती आवश्यकता आहे व ती असण्याचें कारण काय यासंबंधीं श्रीपंत म्हणतात " पुस्तकापेक्षां एखादी गोष्ट सांगून ठसविणारा श्रेष्ठ. ग्रंथोक्तीपेक्षां सद्गुरुवचन अधिक पटविणारें. कारण ग्रंथांत जरी अनुभव लिहिलेला असतो तरी तो अनुभव यथार्थपणें कसा घ्यावा हें समजत नाहीं. अनुभव खरा कोणता हें तर्कानें समजावें लागतें व तर्क बहुतकरून चुकीचे असतात; म्हणून समजूतहि भलतीच, चुकीची होते. तेंच खरा अर्थ समजविणारा सद्गुरु, प्रत्यक्ष अनुभवरूप, जवळ असला म्हणजे त्याच्या वचनाबरोबर अनुभव बाहेर निघून ऐकणाऱ्याच्या अंतःकरणांत पूर्ण बिंबून तेथें रुजतो, ठसतो, न हालेल असा बसतो व प्रगट होतो. Such conveying of the impulses of the heart's true experience is impossible in the reading of dry words from books. This was why more value was given in former times to oral teaching than to Book–teaching ( पुस्तकांतून कोरडे शब्द वाचल्यानें अंतःकरणांतील खऱ्या अनुभवांचीं स्फूर्ति अशा तऱ्हेनें दुसऱ्यास देणें अशक्य आहे. या करितांच पूर्वीं पुस्तकें वाचून मिळणाऱ्या ज्ञानापेक्षां ( गुरु ) मुखांतून मिळणाऱ्या बोधाला अधिक महत्व देत असत. ) दुसऱ्यानें सांगून जें समजतें तें वाचण्यानें समजत नाहीं. सद्गुरूखेरीज विद्या शोभत नाहीं व येतहि नाहीं. ' आतां उपायवनवसंतु । जो आज्ञेचा ( ब्रह्मविद्येचा ) आहेवतंतु. ' ( अमृ० २–१ ) One cannot catch the spirit of things, unless there is present some one who can convey the same by his own heart's impulse into the heart of the receiver. ( आपल्या अंतःकरणांतील स्फूर्तीच्या योगें महत्वाच्या गोष्टींचें मर्म ऐकणाऱ्याच्या अंतःकरणीं उतरविणारा कोणी हजर असल्याशिवाय तें त्याला कळणें शक्य नाहीं. ) " ( पु. ८–१४८ ) सद्गुरूच्या कृपेनें आत्मप्राप्तीच्या मार्गावर शिष्याची प्रगति फार झपाट्यानें होते व ध्येय चुकण्याचा संभव नसतो.

## ३४६

# अवधूत सद्गुरूचा अधिकार व त्याच्या अवताराचा हेतु

सर्व संप्रदायांत जरी सद्गुरूला फार महत्व असलेलें आढळतें व " सद्गुरू-वाचुनी सापडेना सोय । धरावे ते पाय आधीं त्याचे ॥ " या श्रीतुकाराममहाराजांच्या उक्तींच्या सत्यतेबद्दल सर्व संप्रदायांमधून एकवाक्यता असली तरी कांहीं संप्रदायांत असें आढळतें कीं, त्यांतील लोकांच्या ठिकाणीं उज्वल गुरुभक्तीबरोबरच विठ्ठल अथवा पांडुरंग, राम, कृष्ण अशा एखाद्या देवाची अगर दैवताची भक्तिहि असते. श्रीज्ञानेश्वर व श्रीएकनाथ हे कट्टे गुरुभक्त होते हें सर्वविश्रुतच आहे. तरी पण या दोघां गुरुभक्तांच्या ठिकाणीं उत्कट कृष्णभक्ति वसत होती व त्याबरोबरच विठ्ठल अथवा पांडुरंग हें त्यांच्या भक्ति-प्रेमाचें स्थान होतें. वास्तविक " गुरुरेव हरिः साक्षात् नान्य इत्यब्रवीच्छ्रुतिः " असें ब्रह्मविद्योपनिषदांत सांगितलें आहे. ( ब्र. वि. ३१ ) या श्रुतिवचनाप्रमाणें त्यांना सद्गुरु व हरि अथवा पांडुरंग हे भिन्न दिसत नव्हते हें उघड आहे. तरी पण व्यक्त स्वरू-पांत तरी त्यांच्या प्रेमाचीं तीं दोन स्थानें झालीं. त्यामुळें ते दोघे जरी कट्टे गुरुभक्त होते तरी त्यांनीं आक्रमिलेल्या मार्गाला " गुरुमार्ग " म्हणत नाहींत. तर त्या उभ-यतांना भागवत संप्रदायाचे आधारस्तंभ मानण्यांत येतें. अवधूत-संप्रदाय व भागवत-संप्रदाय या दोन्हीहि संप्रदायांत अद्वैतभक्तिरहस्य हेंच अंतिम ध्येय असल्यामुळें तत्वतः त्यांच्यांत फारसा फरक नाहीं.

भक्तशिरोमणी नामदेव हे तर पांडुरंगाच्या अत्यंत प्रीतींतील होते व "प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठल रखुमाई " अशी त्यांची स्थिति होती. म्हणजे त्यांच्या प्रेमाचें स्थान पांडुरंग होतें व " सर्व सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता " या वचनांत दर्शविल्याप्रमाणें सर्वात्मभाव बाणविणारे सद्गुरु विसोबा खेचर हे होते. त्यामुळें, स्थूल दृष्ट्या कां होईना, त्यांच्या आवडीचा विषय पांडुरंग व ज्ञानदाता सद्गुरु असा प्रकार होता. तसेंच कांहीं लोकांची अशी समजूत असलेली आढळते कीं, गुरु हा बोध करणारा; प्रेमदेणगी ही त्याचेकडून मिळणारी नसून ती संतांकडूनच मिळावयाची. पण गुरुमार्गांत सद्गुरु म्हणजेच संतशिरोमणि व सर्व देवांचा देव; तोच प्रेमसागर व अद्वैतबोधभांडाराच्या चाव्याहि त्याच्याचपाशीं असतात अशी शिष्याची भावना असते व त्याचा अनुभवहि तसाच असतो. त्यामुळें त्याच्या सगुण प्रेमाचा विषय एक सद्गुरुच असतो. असें होण्याचे मुख्य कारण म्हणजे सद्गुरूचें प्रेमाकर्षण व अद्भुत सामर्थ्य हें होय. " सर्व मार्गांपेक्षां अवधूतमार्ग हा या प्रेमामुळें श्रेष्ठ गणला आहे " असें श्रीपंतांनीं म्हटलें आहे ( पु. ७–२४९ ) व अवधूत सद्गुरूचा अधिकार, त्याच्या अवताराचा हेतु आणि अवधूतमार्गाचें रहस्य यांचेसंबंधीं त्यांनी पुढील उद्गार काढले आहेत.

" अवधूतास अमुक बद्ध व अमुक मुक्त असे भेद दिसत नाहींत. त्याची एक समदृष्टि असते. त्या सद्गुरूस ब्रह्माची किंमत नाही. ब्रह्मपणा ज्यास शिवत नाहीं असा तो सम, प्रेमस्वरूप, शिष्यप्रेमास्तव अवतार घेणारा. वेद ज्याचे श्वास त्यास

वेदांताची काय मोठी किंमत! म्हणून मुक्ति, ऋद्धि, सिद्धि या त्याच्या पायांच्या दासी, पायांची धूळ होत. 'अमूर्तची परी मूर्तु कारुण्याचा' (अमृ. २–१) अनन्य प्रेमास्तव, एक भावास, मूढ भक्तीस भुकेलेला; मुक्ति, ज्ञान, वेदांत, सिद्धांत, शास्त्र, श्रुति हीं ज्याचे पदतळींचा केर, जो या सर्वांना पायीं तुडवून प्रेमतृप्तीस्तव, भक्तोद्धारमिषानें प्रेमरूप आपण एकच विराजून रमतो अशा सद्गुरु दत्तावधूतपदीं वेदांस मान नाहीं, शास्त्रांस मान नाहीं. कारण हीं 'नेति नेति' म्हणून कडेस राहाणारीं, मौन धरणारीं, निदर्शनास, ओळख देण्यास असमर्थ आहेत. सद्गुरूचें प्रेम त्याची कृपादृष्टिच एक समर्थ आहे. गुरुमार्ग असिधारेसम तीक्ष्ण आहे. शिष्यबाळाकरवीं त्याचा हात धरून, धीर देऊन, पाठ राखून, पडूं लागल्यास सावरून, धीर खचल्यावेळीं वरचेवर उचलून धरून, अनन्य भक्तीची गोडी लावून, भक्ति शिकवून, गुरुप्रेममार्ग चालविणारी समर्थ सद्गुरु-माय एकच आहे. 'ब्रह्मज्ञान नलगे मज। देईं मला भक्तिबीज.' (द. प्रे. ल.१८६) सद्गुरूस तुमचा वेदांत, ब्रह्मज्ञान वगैरे नको आहेत. त्यांची किंमत तुम्हांला जरी दिसली तरी सद्गुरूला नाहीं. वेदांताला व ब्रह्मज्ञानाला मान देणारा सद्गुरुच नव्हे. 'श्रुतिवेदांतशास्त्राणि पादपांशुमिव त्यजेत्' असें श्रुतिवचन आहे. त्यांना मान देणारा तो भित्रा ज्ञानी, शब्दज्ञानी असें समजावें. जो ज्ञाननिधि त्यास वेदशास्त्रांची भीड कोठून असणार! सूर्यास चंद्राचें अस्तित्व, अंधाराचें अस्तित्व म्हणजे अज्ञान ठाऊक नाहीं. तेव्हां सूर्यास चंद्राची भीड वाटेल काय? तशीच सद्गुरूस वेदशास्त्रांची भीड नाहीं. आत्म्यास मनोविकारांची भीड वाटेल काय? सद्गुरु–अवतार कशाकरितां? तर वेदान्त व ब्रह्मज्ञान लोकांस शिकविण्याकरितां नव्हे. कारण त्यास ठाऊक आहे कीं, सर्व नित्य मुक्तच आहेत. म्हणून ब्रह्मज्ञान शिकविण्याची त्यास इच्छा नाहीं. त्याच्या ठायीं कल्पितास मान नाहीं. तो प्रेमस्वरूप, म्हणून निजप्रेमाचे खेळ खेळण्यासच अनन्य, अव्यभिचारी (अनाथ) भक्तांस प्रेमदान देऊन त्यांचीं अंतःकरणें आपल्या सघन समरस प्रेमानें भरून निजशांति भोगण्याकरितां व भक्तांशीं खेळण्याकरितां सद्गुरूचा अवतार आहे. या उत्तम अवताराचा हेतु शुद्ध प्रेमाचा, अखंड प्रेमाचा आहे. वेदांत, ब्रम्हज्ञान, शास्त्रें हीं बोधासाठीं; तीं प्रेम देणारीं नव्हत. तीं कोरडीं; त्यांच्यांतून प्रेम निघणें नाहीं. सद्गुरु हा शुद्ध व अप्रतिम, अप्रमेय, प्रेमस्वरूप आहे." (पु. ७–४८ ते ५०).

## अवधूत-संप्रदायाचें वैशिष्ट्य

तसेंच अवधूत संप्रदायाचें विशिष्टत्व काय आहे तें श्रीपंतांनीं पुढीलप्रमाणें स्पष्ट करून दाखविलें आहे—"वेदान्त मार्गांत शरीरप्रकृति चांगली असणें जरूर आहे. कारण तेथें साधन करणें, साध्य साधणें असतें; आरोग्य चांगलें ठेवावें, सात्विक आहार असावा, बेतानें व नेमानें वागावें, बोलावें व चालावें, इच्छा वाईट उठूं नयेत, शमदमादि साधनसपन्नता असावी, अधिकारी शिष्य असावा वगैरे बंधनें पाळणें वेदांतमार्गांत जरूर असतें;

कारण वेदांतमार्गांत कांहीं बद्ध, कांहीं मुक्त व कांहीं मुमुक्षु अशी दृष्टि असते. अवधूत-गुरुमार्ग वेदांतमार्गापेक्षां श्रेष्ठ होय. तेथें बंध नाहीं व मुक्तीचीहि किंमत नाहीं. कल्पना-प्रवृत्तीनें बंध झाला तोहि खोटा व कल्पना–निवृत्तीनें मोक्ष झाला तोहि खोटा. मूळ 'अहं'चा खोटेपणा, नाहींपणा पटल्याबरोबर 'अहं'संबंधींच्या बंध–मोक्ष–कल्पनाहि खोट्या होऊन वेदान्तशास्त्रानें उभारलेल्या मोक्षाची, ज्ञानाचीहि किंमत राहात नाहीं. अवधूतमार्गीं सर्वच अधिकारी. कारण तेथें 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या स्थितीपलीकडील एकच चरमवृत्तीची अभेद दृष्टि असते; त्या दृष्टीला कोणी बद्धच दिसत नाहीं; म्हणून शब्दोपदेशाची अगर साधनकर्मांची जरूरी नाहीं. अखंड प्रेमाची, सद्‌गुरुभक्तीची 'अहं'च्या पलीकडील चरम वृत्तिच देऊन टाकून ब्रह्मशिक्का न हालेल असा बसवितात. अवधूत-मार्गीं आतां, या क्षणीं मरण्यास टेपलेल्यालाहि अधिकार आहे. स्त्री, शूद्र सर्वच अधिकारी. अवधूत-गुरुमार्ग शुद्ध प्रेमभक्तीचा, शुद्ध शांति प्रीतीचा, मुक्तीवरील भक्तीचा, वेदान्त-ज्ञानाचा नव्हे. या मार्गी गुरुवचनच सर्व वेदान्त; गुरुराहाटीच सिद्धांत; गुरुवचनच श्रेष्ठ. 'नाहीं विधि वा निषेध शुद्ध मार्ग हा' (द. प्रे. ल. १४९८) एक अप्रतिम प्रेमस्वरूप सद्‌गुरु मुख्य व सर्व देवदेवतांसहि गिळून विराजणारें दैवत. अन्य दैवत नाहीं. अद्वैत निजप्रेमशांतिच त्या दैवताची परा भक्ति, प्रेमभक्ति. जगीं सद्‌गुरुच भरला असल्यानें जें जें होतें जातें, जें सहज घडतें चालतें तेंच सद्‌गुरुपूजन, सद्‌गुरुप्रेमास्तव नित्योत्सव, जगराहाटीच सद्‌गुरुमंत्रपठण." (पु. ७–६८–६९)

## श्रीपंतांचा श्रुतीबद्दल अत्यादर

श्रीपंतांनीं अवधुत सद्‌गुरूच्या स्थितीचें वरीलप्रमाणें जें वर्णन केलें आहे त्यावरून कोणाला असें वाटण्याचा संभव आहे कीं त्यांना श्रुतीबद्दल अनादर वाटत असे. पण खरा प्रकार याच्या अगदीं उलट आहे. तो असा कीं, त्यांना श्रुतीबद्दल अत्यंत आदर वाटत असे व त्यांनीं आपल्या पदांत, लेखांत व व्याख्यानांत वारंवार श्रुतिवचनांचा उपयोग केलेला असून तो श्रुति प्रमाण मानून केला आहे. यासंबंधाचे जे कांहीं मासले पुढें देत आहोंत ते वाचून वाचकांना या विधानाची सत्यता पटेल. ते असेः—

१ "सांडुनी संसार रे। शोधी श्रुतिसार रे" (द. प्रे. ल. १३३)

२ "सर्वं खलु इदं ब्रह्म। श्रुतिवाक्य न विसरा रे" (द. प्रे. ल. २४९३)

३ "नेति नेति स्वरूप त्याचें। गाजे वेदडंका" (द. प्रे. ल. १७७)

४ "स्वानुभव गुरु श्रुति प्रमाण आमुच्या सिद्धांता" (द. प्रे. ल. २१६)

५ "तत्त्वमसि ऐसा गाजे वेदडंका" (द. प्रे. ल. २३७)

६ "त्वमेव सर्वं ही श्रुति नित्य घोका" (द. प्रे. ल. २३७)

७ "एकमेव नास्ति द्वितीयम्। श्रुतिनिर्णय झाला"॥ तत्त्वमसीनें अहं ब्रह्मास्मि। अनुभव बाणला" (द. प्रे. ल. २४३)

८ " न गुरोरधिकं श्रुति वदती। साधुसंतां दृढ प्रतीति " (द. प्रे. ल. ३४२);

९ " बह्मी जग झालें नाहीं। श्रुतिसिद्धांत ठरला पाहीं " (द. प्रे. ल. ४०१);

१० " यतोवाचो निवर्तंते। खूण जाणतां शांति मिळे ॥ १ ॥ एकाकी न रमते म्हणुनी। एकाचि बहुधा सहज झालें ॥ २ ॥ विद्वद्वर्या स्वरूपाविण। आन न भासे श्रुति बोले ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ४४५ )

११ " ब्रह्मविद्ब्रह्मैव भवति। श्रुतिवाणी बोले " ( द. प्रे. ल. ४५५ )

१२ " श्रुति ही गर्जे न गुरोरधिकं। ध्यानीं न आणिती " (द. प्रे. ल. ७३८)

१३ " प्रमाणांसी उरों नेदी। आम्नायही लाजला " (द. प्रे. ल. ८०८)

१४ " सच्चिदानंद अर्थवाद। वेदही वदला " (द. प्रे. ल. ८१६)

१५ "वेदशास्त्रांचें रहस्य नाम। भाव हा प्रगटला " (द. प्रे. ल. ८४६)

१६ " काय सांगे श्रुति। मनीं हें कदा नाणिती ॥ ध्रु० ॥ त्वमेव ब्रह्म गर्जतो वेद। स्वप्नीं नाठवती ॥ १ ॥ भेद धरितां केवळ पशु। आम्नाय वदतीं ॥ २ ॥ सर्व खलु इदं ब्रह्म। दत्ताची स्थिति ॥ ३ ॥ ( द. प्रे. ल. १११६ )

१७ " जीव नव्हेसी ब्रह्मचि केवळ। पाहीं श्रुतिशास्त्रांसी" (द प्रे. ल. ११७०)

१८ " मौनावली साध्वी श्रुति। ठाव न शास्त्रांसी। डुलतो दत्त ब्रह्मरसीं ( द. प्रे. ल. १२१० )

१९ "सोड अभिमान मातीचा। बोलती चारी साहीरे" (द. प्रे. ल. १२१५)

२० " सत्यज्ञानानंत ब्रह्म। श्रुतिहि बोभातसे " ( द. प्रे. ल. १२५३ )

२१ " मुक्त सदा तूं बंध नसे। जाउनी श्रुतिशास्त्रांसी पुसे " ( द. प्रे. ल. १२६७ )

२२ " स्वसंवेद्या नाहीं कदा शब्दाचें ओझें। ऐसा श्रुतिडंका वाजे " ( द. प्रे. ल. १२६८ )

२३ " सांगते श्रुति ब्रह्मचि आपण। सद्गुरुकृपें कां न स्मरावें " ( द. प्रे. ल. १२९५ )

२४ " श्रुतिशास्त्रांचा उघड सिद्धांत। स्थिति ही एकरसी। अखंड ॥ " ( द. प्रे. ल. १३१७ )

२५ "नेहनानास्ति किंचन। वचन हें बोले श्रुति गर्जून" (द. प्रे. ल. १३५१)

२६ " नेतिनेति वदती श्रुति। प्रणवघोषें " ( द. प्रे. ल. १३७१ )

२७ " सत्यज्ञानानंत ब्रह्म तूंची। श्रुतीचा नगारा " ( द. प्रे. ल. २२९८ )

२८ " सदा श्रीमंत श्रुतिहि वदत। स्वानंदराशी " ( द. प्रे. ल. २३८७ )

याप्रमाणें श्रीपंतांनीं आपल्या वाङ्मयांत श्रुतीबद्दल वारंवार अत्यादर व्यक्त केला आहे, इतकेंच नव्हें तर पद ९२१ मध्यें " नित्य सद्गुरूसी भजावें। वेदविहित तोंचि

करावें " असें सांगितलें असून आपल्या हयातीच्या अखेर म्हणजे २-९-१९०४ ( गोकुळाष्टमी ) रोजीं त्यांनीं सद्‌गुरूची पुढीलप्रमाणें प्रार्थना केली " वेदमार्गलोप होतो येई झडकरी । दैत्याक्रांत भूमि जाहली प्रगटे नरहरी ॥ ध्रु० ॥ वेदविहित मार्ग सांडुनी जन चालले । निजानंद नेणुनी विषयसुखा भुलले । त्वरा करा धरेवरी । नरावतार घेई भक्तवत्सल श्रीहरि ॥ १ ॥ ". ( द. प्रे. ल. २६०१ ) तसेंच अवधूताच्या स्थितीचें श्रीपंतांनीं केलेलें वर्णन श्रुतीला धरूनच आहे व ही गोष्ट " आत्मानमात्मना साक्षाद्ब्रह्म बुद्‌ध्वा सुनिश्चलम् । देहजात्यादि संबंधान्वर्णाश्रमसमन्वितान् ॥ २९ ॥ वेदशास्त्राणि चान्यानि पादपांसुमिवत्यजेत् । गुरुभक्तिं सदा कुर्याच्छ्रेयसे प्रेयसे नरः " ( ब्र. वि. ३० ) या ब्रह्मविद्योपनिषदांतील वचनाचा आधार देऊन त्यांनीं स्पष्ट केली आहे.

## श्रीमच्छंकराचार्यांबद्दल परमावधीचा आदर; वेदांत-मार्ग म्हणजे शुद्ध ज्ञानमार्ग व वेदान्ती म्हणजे आत्मानुभवी

त्याचप्रमाणें अवधूत मार्गाचें महत्व वर्णन करितांना श्रीपंतांनीं वेदान्त-मार्गासंबंधीं जे उद्गार काढले आहेत त्यांवरून त्यांना खरा वेदान्तमार्ग नापसंत होता अगर तो निरुपयोगी आहे असें त्यांना वाटत होतें असें समजूं नये. कारण वेदान्तमार्गासंबंधीं आणि त्याचे प्रवर्तक जे आद्य श्रीमच्छंकराचार्य त्यांचेसंबंधीं त्यांना फार आदर व पूज्यभाव वाटत असे. आचार्यांचा वेदान्तमार्ग व अवधूतमार्ग हे दोन्हीहि ज्ञानमार्ग असून तात्विक दृष्ट्या एकच होत असें त्यांचें म्हणणें असे व एके ठिकाणीं " अत्रिवंशकुलदीप अवधूत स्वभक्तकैवारी । ज्ञानमार्ग स्थापन कराया आला भूमीवरी " ( द. प्रे. ल. ११ ) असें त्यांनीं म्हटलें आहे. तसेंच " ज्ञानादेवतु कैवल्यम्" हा जो आचार्यांचा मूलभूत सिद्धांत त्याच्या संबंधीं "ज्ञानदेव कैवल्यमार्ग सरळ " ( द. प्रे. ल. ९६ ) असे त्यांनीं प्रशंसोद्गार काढले आहेत. इतकेंच नव्हे तर, " शंकरमथित वेदान्तमार्ग हा नास्तिकें अवरोधिला । म्हणूनी दत्त प्रभू प्रगटला " ( द. प्रे. ल. १७८९ ) असें म्हटलें आहे. तसेंच श्रीपंतांनीं जें अद्वैत मत प्रतिपादन केलें आहे तें वेदांतशास्त्राला धरूनच केलें आहे. वेदांतमार्गासंबंधीं वर उल्लेख केलेले जे त्यांचे उद्गार आहेत ते अनुभव-दृष्टीचे व सर्व साधारणपणें साधकांची त्या मार्गासंबंधीं अथवा वेदांतशास्त्रासंबंधीं जी समजूत असते त्या समजुतीला अनुलक्षून आहेत. त्याच अर्थाचें त्यांचें पुढील पद आहे " गोड हा वेदांत ऐकाया । करणी करितां क्वचितचि दिसे । सुलभ हे सिद्धांत बोलाया ". ( द. प्रे. ल. १३१५) तसेंच एके ठिकाणीं ते म्हणतात " पाप, पुण्य, धर्म म्हणत शास्त्राच्या काठ्या घेऊन ( जे ) चालतात ते तोंड-वेदांती. हातांतलि काठी काढून घेतली म्हणजे ते डळमळून पडतात; स्वतंत्र विचारानें आपला अनुभव पाहात नाहीं. ' हा असें म्हणतो ', ' त्या ग्रंथांत असें सांगितलें आहे ' अशा हवाल्यांवर त्यांच्या समाधानाचा पाया असतो. हवाला चुकला म्हणजे ते गडबडून जातात व घाबरतात. " ( पु. ७-१६८ ) आणखी एके ठिकाणी " लौकिक

वेदांत केवळ शाब्दिक होय. खरा वेदांत म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाचा, गुरुकृपाप्रसादें मिळणारा. प्रसंगीं शाब्दिक वेदांत टिकत नाहीं. अनुभवाचा वेदांत कधीं डळमळत नाहीं. तोंडाचा वेदांत आपल्याला फसवितो व दुसऱ्याची शांति हारवितो. खरा अनुभवाचा वेदांत आपली शांति वाढवून दुसऱ्याची हरवीत नाहीं. वाद आहे तर तो वेदांत नव्हे. वेदांती म्हणजे अनुभवी. तेथें सर्व वाद मिटतात. अंतरीं सूक्ष्म भेदभावना आहे म्हणून वाद उठतो. जेथें भेदभाव नाहीं तेथें वाद व कलह नाहींत. गुरुविद्या वाद गिळून शांति देते. खऱ्या वेदांतज्ञानांत वाद नाहीं" असें त्यांनीं म्हटलें आहे. ( पु. ७–२९५ ते ९६ ) व "गुरुगम्य वेदांत हा नुसत्या शब्दपांडित्यानें समजणारा नव्हे. गुरूला शरण गेला त्याला आपोआप सर्व समजतें; ग्रंथ वाचावे लागत नाहींत." ( पु. ८–१५५ ) असेंहि त्यांनीं सांगितलें आहे.

## प्रेमस्वरूप सद्गुरूचें निरपेक्ष प्रेम व समदृष्टि

अवधूत सद्गुरूसंबंधींचे जे श्रीपंतांचे उद्गार वर दिले आहेत त्यांवरून अवधूत सद्गुरूचा विशिष्ट गुणधर्म म्हणजे तो शुद्धप्रेमरूपच होय हें स्पष्ट होतें. म्हणून "प्रेमाची घडली। गुरुमूर्ति। प्रेमाची घडली" ( द. प्रे. ल. २४६० ) व "अनन्य भक्तिमुशीमाजीं। प्रेमरस भरला। तोचि अवधूतपुतळा" ( द. प्रे ल. १९४७ ) अशा प्रकारचे त्यांनीं वारंवार उद्गार काढिले आहेत. असा जो शुद्ध प्रेमस्वरूप अवधूत त्याच्या मार्गाचें मुख्य लक्षण म्हणजे शरणागताला अभय देऊन शुद्ध प्रेमाची देणगी देणें हें होय. जो करुणानिधि प्रेमसागर, अवधूत सद्गुरु तो सर्व शिष्यांकडे किंबहुना सर्व जगाकडे समदृष्टीनें व प्रेमदृष्टीनें पाहात असल्यामुळें त्याला अधिकारी, अनधिकारी हा भेद दिसत नाहीं व "अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्। साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितोहि सः" ( भ. गी. ९–३० ) या भगवदुक्तीप्रमाणें जो अनन्यगतिक असेल त्याची जात, गोत, वय, धर्म, शिक्षण वगैरे कांहींहि न पाहतां तो त्याला आपली प्रेमदेणगी अर्पण करितो. श्रीनृसिंहसरस्वतींनीं यवन राजावर अनुग्रह केला होता ही गोष्ट मशहूर आहेच. सद्गुरूची निरपेक्ष प्रेमाची देणगी व समदृष्टि हीं अवधूत-मार्गाचीं मुख्य लक्षणें होत. श्रीपंत म्हणतात "लक्षावधि जरी गुरुपुत्र असले तरी गुरुप्रेमा सर्वांवर सारखाच. हा गुरुमार्गच तसा. इतर कोणी 'ब्रह्म देतों' म्हणतील, 'मुक्ति देतों' म्हणतील तरी त्याची किंमत नाहीं. गुरुप्रेमा समप्रीति हीच या मार्गांतील गूढता. प्रेमच परम गूढ. तें कोणालाहि कळावयाचें नाहीं. हा प्रेमाच मुक्तीला गोडी देणारा व ब्रह्माला समरसपदवीचा आनंद पुरविणारा. हा प्रेमाच मुक्तीवरील भक्तीचा (निर्मळ भक्तीचा) जिव्हाळा." ( पु. ८–२३८ ) या मार्गांत सद्गुरूची समदृष्टि असून प्रेमदेणगी सर्वांना एकच असल्यामुळें त्याच्या शिष्यांमध्यें श्रेष्ठ–कनिष्ठ–भाव राहात नाहीं व खऱ्या अनिमित्त बंधुप्रीतीचा प्रादुर्भाव होतो.

## ३५२

## गुरुमार्गांतील गुरुभक्ति

अवधूतमार्गांत अथवा गुरुमार्गांत गुरूचें महत्व फार असल्यामुळें गुरुभक्तीलाहि अत्यंत महत्व आहे. श्रीपंत म्हणतात " पहिल्यानें गुरुभक्ति, मग ज्ञान व मग पुनः अद्वयगुरुभक्ति अगर प्रेम हा अनुभव मिळणें कठीण. तो सत्संगानेंच मिळतो व असा खरा अनुभव ठसला तरच जन्मसार्थकता." ( पु. ८–७३ ) या मार्गांतील गुरुभक्तीचा प्रकार इतर मार्गांतील गुरूभक्तीपेक्षां कांहींसा निराळा आहे. कारण या मार्गांतील गुरुभक्ति पूर्ण एकेरी असलेली आढळते. म्हणजे शिष्याच्या ठिकाणीं परमावधीची गुरुभक्ति असून त्याच्या अंतःकरणाच्या सर्व शक्ति एका अवधूत सद्गुरूच्याच ठिकाणीं केंद्रीभूत झालेल्या असतात. श्रीपंतांच्या ठिकाणीं या गुरुभक्तीचा उत्कृष्ट नमुना पाहावयास सापडतो. एके ठिकाणीं ते म्हणतात " परमार्थलाभास गुरुभक्तीविण अन्य मार्ग नाहीं. जर खरोखरच परमार्थाची आशा आहे तर भावें सद्गुरुनाथ भजावा. गुरुभक्ति सर्व साधनांचें शिखर आहे. ज्याचे मुखीं गुरुनाम, ज्यास गुरुसेवाच नित्यनेम तो देहासकटच परब्रह्मच होय. ज्यास स्वानंद गुरुभक्ति त्यास, त्याचे पायीं सर्व तीर्थें वास करितात; वेद त्याचे भाट होतात. सुरवर त्याचें चरणरज होतात. ज्याचे घरीं गुरुभक्ति नांदते त्याचे घरीं यम तळवारकी करीत असतो. परमात्मभावें त्याची पूजा करावी. गुरुभक्तीची थोरी वर्णायास जाऊन वेद मौनावले. गुरुभक्तीपेक्षां श्रेष्ठ असें ब्रह्मांडांत कांहींच नाहीं !" (पु. ३–१९५) तसेंच श्रीपंतांची अवधूत सद्गुरुवरील भक्ति किती एकेरी व तीव्र होती हें येथपर्यंत जागजागीं दाखविलेंच आहे व त्यांच्या पुढील उक्त्या या गोष्टीची साक्ष देतात. " हरि हर ब्रह्मा नाठवती । गुरुचरण सदा आठवती " ( द. प्रे. ल. १११३); "गुरुविण दैवत स्वप्नींही नाठवूं । व्यभिचार भक्ति टाळूं " (द. प्रे. ल २३३); " बालमुकुंदाविण जगीं । दत्ता दुजें नाहीं । " (द. प्रे. ल. ४४०); "गुरुविण अन्य दैवत नाहीं । कल्पित देवा पुजूं नको " (द प्रे. ल. ३६७) व सद्गुरूला उद्देशून "चरण सोडुनी तुझे शरण म्हणतां । मस्तक पडो धरणीं " ( द. प्रे. ल. १८३१ ) अशा त्यांनीं प्रतिज्ञाहि केल्या आहेत. या मार्गांत सद्गुरु नुसता ज्ञानदाता अथवा बोध देणारा इतकीच भावना नसून सद्गुरु म्हणजे शिष्याचें सर्वस्वच असतो. तोच प्रेमस्वरूप व बोधस्वरूप, त्याच्याच पायीं सकलवैभवप्राप्ति, तोच शिष्याच्या चित्तचकोराचा चंद्र, तोच त्याच्या जीवींचें जीवन, तोच परब्रह्म, तोच सगुण निर्गुणरूपानें नटलेला आहे, तोच विश्वनाटकसूत्रधार, त्याची भक्तिच अद्वैतज्ञानमाता व कैवल्यजननी, तीच प्रेमाची खाण, तिच्या पोटींच वैराग्याचा जन्म. त्या भक्तीपुढें ब्रह्मज्ञानाचीहि किंमत नाहीं. गुरुवाक्यच वेदान्त व गुरुखेळच सिद्धांत अशी शिष्याची दृढ भावना असते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्याच्या आवडीचा अथवा प्रीतीचा विषय एक सद्गुरुच असतो व ही एकांतिक, एकनिष्ठ, अनन्य, अव्यभिचारिणी भक्तिच शिष्याचें भांडवल व तेच त्याचें वैभव. ज्याप्रमाणें लहानशा बींजांत सूक्ष्म रूपानें प्रचंड वृक्ष असतो त्याप्रमाणें या भक्तिबीजांत सर्व आध्यात्मिक अनुभव सूक्ष्म रूपानें वास करितात व "उपायवनवसंतु" अशा सद्गुरूचा

कृपामेघ प्रेमवृष्टि करूं लागला म्हणजे ते गूढ आत्मानुभव भक्ताला सहज येऊं लागतात. ही अनन्य भक्ति पूर्णपणें निष्काम असली पाहिजे व 'मी ती करितों अगर करीन' इतका अभिमानहि या मार्गांत सहन होत नाहीं.

## खरा गुरुपुत्र अथवा सच्छिष्य

श्रीपंतांनीं खऱ्या गुरुपुत्राचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. "गुरुपुत्र तोचि जाणा। नित्य भजे श्रीगुरुचरणा ॥ धृ० ॥ वेदाधिक गुरुवाक्य मानुनी। वृत्ति वेधली नामस्मरणा ॥ १ ॥ अभय वचनें पूर्ण निवाला। नाठवे कदा साधनशीणा ॥ २ ॥ सहज शांति सहज भोगी। सहज होऊनी दत्तपाहुणा ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. ९७६) व सच्छिष्याचीं मुख्य लक्षणें कोणतीं तें (पु. ६–१५९ ते १७२; पु. ६–२२१ वगैरे) पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे. अनन्यगतिक शिष्याला समर्थ सद्गुरु करुणार्द्र अंतःकरणानें व मातृस्नेहानें आपल्या हृदयांतील गुप्त ठेवा अर्पण करितो. हें जें गुरुशिष्यांमधील रहस्य त्याचें श्रीपंतांनीं आपल्या "आत्मज्योति" व "भक्तोद्गार किंवा प्रेमभेट" या दोन्ही लेखांत वर्णन केलें असून त्याचें दिग्दर्शन अनुक्रमें प्रकरण २० व ३८ मध्यें केलें आहे. साधारणपणें गुरु व शिष्य यांच्यामध्यें पूज्यपूजक भावाचा अथवा सेव्यसेवक भावाचा जो संबंध असतो त्यांत भेदभावना कायम असते; पण सद्गुरु व सच्छिष्य यांच्यामध्यें पूज्यपूजक अथवा सेव्यसेवकभाव जरी दिसला तरी त्याची अभेदत्वावर उभारणी असते. त्या उभयतांच्या अंतःकरणांमधील जो भक्तिप्रेमाचा जिव्हाळा त्यामध्येंच अद्वैत बोधाचा उगम होतो. नाथसंप्रदायाचा उद्भव आदिनाथ शंकर व त्यांची अर्धांगी आदि शक्ति यांच्यामधील शुद्ध व निरतिशय प्रेमांत झाला आणि याच अर्थानें एके ठिकाणीं "सद्गुरु शंकर, शिष्य पार्वती। काय सांगुं प्रीति। अर्धनारी-नटेश्वर अवधूत। म्हणवी पुरुष प्रकृति" (द. प्रे. ल. ३६९) असें श्रीपंतांनीं म्हटलें आहे. दत्तसंप्रदायाचा उद्भवहि आदिनारायणांनीं ज्या पुत्रवात्सल्यानें ब्रम्हदेवाला गुह्यज्ञान दिलें त्यांत झाला व 'नारायण विधि अत्रिनाथ। दत्त जनार्दन एकनाथ' हा श्लोक प्रसिद्धच आहे. भगवान श्रीकृष्णानेंहि अर्जुनाला गुह्याद्गुह्यतम असें जें उत्तम रहस्य दिलें तें देण्याचें कारण 'भक्तोऽसि मे सखाचेति' म्हणजे 'तूं माझा भक्त व सखा आहेस' असें सांगितलें आहे (भ. गी. ४–३); तसेंच उद्धव आपला "भक्त, सुहृद व सखा" म्हणून श्रीकृष्णानें त्याला भक्तिप्रेमसार अर्पण केलें. ऐक्यभक्ति अथवा अद्वैत भक्ति हेंच या मार्गाचें प्रमुख अंग होय आणि म्हणून श्रीपंतांनीं या मार्गाला "भक्तिपंथ" म्हटलें आहे (द. प्रे. ल. ४०५) व "अद्वैत भक्तीचा पंथ धरुनी चाललों" (द. प्रे. ल. २६४०) असें सांगितलें आहे. एके ठिकाणीं ते म्हणतात, "अकृत्रिम भक्ति म्हणजे मी आणि सद्गुरु निराळे नाहींत अशी सहजीसहज स्थिति; तीच निजभक्ति व सर्वांभूतीं भगवद्भाव. आपण निराळे म्हणून कल्पना करून, भक्ति करून, समाधान मिळविण्यास जाणें हेंच महत्पाप होय, हाच गुरुद्रोह होय. अखंडास खंडित

केल्यास ती पूजा म्हणवेल काय ? " ( पु. ८-६४ ) या ऐक्यभक्तीचा विशेष हा आहे कीं ती ज्याच्या हृदयांत वास करिते त्या अनन्य भक्ताच्या ठिकाणीं ऐक्यानुभवाबरोबरच सदगुरुचरणीं परमावधीची लीनता वसत असते. ज्ञानोत्तर भक्तीचें हेंच रहस्य होय आणि तें हस्तगत होण्याला बोध, विरति व उपरति यांची सीमा होणें अवश्य आहे.

## अवधूत संप्रदायाचीं मुख्य लक्षणें

स्फुट लेख १२१ मध्यें श्रीपंतांनीं " अवधूत संप्रदाय " या मथळ्याखालीं या संप्रदायाचीं विशिष्ट लक्षणें पुढीलप्रमाणें सांगितलीं आहेत ( १ ) विधिनिषेध-त्याग, ( २ ) विषय-वैराग्य, ( ३ ) कर्म-उपासना-योग-निराकरण, ( ४ ) संचित-आगामी-प्रारब्ध-शून्यकरण, ( ५ ) सूक्ष्माभिमानत्याग, मिथ्याभिमानखंडण, अंतरबाह्यबंधन-( लौकिक, शास्त्रीय )-मोक्ष, ( ६ ) ऐक्य बोध, समरस भाव, ( ७ ) बंधुप्रेम, अखंड शांति, ( ८ ) अद्वैत भक्ति, कैवल्यमुक्ति, ( ९ ) सहजानुभव, प्रगट युक्ति, (१०) सहज समाधिरति, सद्‌गुरुचरणप्रीति, (११) निरंकुश स्थिति, सदा निश्चिंति; आणि पुढें असें म्हटलें आहे कीं " अवधूत पंथांत अहंतेस मान नाहीं. समभाव संभावित आहे, श्रेष्ठ-किंचित्-भाव लेशहि मान्य नाहीं. " ( पु. ६-२८८ ) येथें श्रीपंतांनी विधिनिषेधत्याग हें जें अवधूत संप्रदायाचें एक लक्षण सांगितलें आहे त्यावरून विधिनिषेधत्याग म्हणजे सबगोलंकार अथवा अस्ताव्यस्तपणा अशी कोणाला शंका येईल ती येऊं नये म्हणून त्यांनीं एके ठिकाणीं असा खुलासा केला आहे कीं हा जो त्याग करावयाचा तो विधिनिषेध-बुद्धीचा होय. विधिनिषेध-बुद्धि असूनहि विधि-निषेध न मानितां अमर्याद चालणें, अस्ताव्यस्त तारतम्यरहित वागणें, असा विधिनिषेधत्यागाचा अर्थ नव्हे. विधिनिषेधबुद्धीसह कर्तेपणा जिवंत असतां विधि व निषेध या दोहोंची किंमत एक असें म्हणून खुशाल निषेध कृत्यें करावीं म्हटल्यास चूक होईल. सहज, अकृत्रिम विलास आहे; म्हणून कर्तेपणास जागा नाहीं. अकर्तेपणास विधि, निषेध लागू नाहींत; " (पु. ७-५९) तसेंच २९-१-१८९९ रोजीं आपल्या एका शिष्याला लिहिलेल्या पत्रांत श्रीपंत लिहितात " मोहक वस्तूंच्या पाठीस लागून मन मानेल तसें करीत सुटणें मार्गास शोभत नाहीं व असें करणारीं मनुष्येंहि या मार्गांत राहाण्यास योग्य नाहींत. ×××× मंडळी जर नीतीला अनुसरून खऱ्या भावानें, निष्कपट बंधुप्रीतीनें, अनन्य भक्तीनें, निस्पृहपणें वागणारी असेल तर खरी महती आहे. बाजारबुणग्यांची धांदल कामा नये. सर्व व्यसनें टाकून, निर्मल अंतःकरण राखून, आज्ञेप्रमाणें बिनचूक वागून, विषयाचा खरा वीट मानून, क्षणिक दृश्याचा अभिमान न धरितां केवळ परमार्थेच्छु होऊन दृढ निश्चयानें कोणींहि आल्यास जवळ करण्यास हरकत नाहीं. परमार्थांत भीड कामाची नाहीं. " ( पु. ५-४० ते ४१ )

श्रीपंतांनीं आपल्या वाङ्मयांत जागजागीं अवधूत मार्गाचें महत्व गाइलें आहे व त्याला 'बहुत मजेचा, नित्य शांतीचा दाता, सहजानंदाचा सागर, दत्तप्रेमाचा निजठाव,

वेदशास्त्रांचा निजभावार्थ, जन्ममृत्यूचा अंतक, द्वैतभावाचा घातक, संसृतिघातक '-वगैरे विशेषणें दिलीं आहेत आणि 'तो उघडझांक चालणारा आहे' असेंहि म्हटलें आहे. तसेंच "विरति उपरति अभेदभक्ति बोधमार्ग निका। जितांचि मुक्तिपदा नेईल घेई अभय भाका" ( द.प्रे.ल.१९३ ); " मार्ग सुलभ हा स्वानुभवाचा । कैवल्यदायी " (द.प्रे.ल.१२०४); "अवधूतपंथ । भोगिती निजशांति भक्त" (द. प्रे. ल. २०२६); " पाहतां सुलभची अवधूत पंथ ॥ धृ० ॥ अभिमान टाकुनी चरणीं पडतां । अंतर होई शांत ॥ १ ॥ सर्व कर्मांची होळी होऊनी । न उरे मिथ्या जगत ॥ २ ॥ अंतर्बाह्य दाटे प्रकाश । भूमानंद दत्त ॥ ३ ॥ " (द. प्रे. ल. २०४३) वगैरे प्रकारचे स्वानुभवोद्गार त्यांनीं या मार्गासंबंधीं काढिले आहेत.

आणखी एके ठिकाणीं " सहजावस्था कशाला म्हणावी ?" या मथळ्याखालीं अवधूतमार्ग म्हणजे काय तें त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. " मंत्र, लय, हट, राज व शिव या योगांनी म्हणजे मंत्र=गुरुमंत्रपठण; लय=गुरुचरणीं स्थिर चित्त; हठ=दृढभक्ति; राज=चैतन्यघनाचा निदिध्यास; शिवयोग=कांहीं नव्हे तें स्वरूप स्थिर करून, नादबिंदुकलातीत होऊन मनाचें घन होऊन, घनाचें लय होऊन राहाणें. या पाच अवस्थांत पाच तत्वांच्या मूर्ति, पंचविषय, पाच अभिमान, पांच प्रणव, पंचकला, पंचशक्ति हीं सोडून सुषुम्णाचक्र, शिखाचक्र अथवा अग्निचक्राचे ठायीं सुस्थिर होऊन हंसमंत्र ऊर्ध्वगति करून सोहंमंत्र सतत प्रवाही करून, हंस, सोहं दोन्ही सोडून उरलेलें शुद्ध प्रणव निखिलप्रभा, अविरल अशा परमात्म्याच्या शेषांत एक–साक्षीपर भावहि स्मरणास न आणितां राहाणें यास ' आरूढ पथ ', ' अवधूतमार्ग ' व ' जीवन्मुक्ति ' म्हणतात. ' (पु. ५–११४) या दृष्टीनें अवधूतमार्ग म्हणजेच श्रुतींत वर्णिलेला 'देवयान पंथ' होय असें म्हणावयास हरकत नाहीं. तसेंच ७–८–१८९५ रोजीं आपल्या एका शिष्याला लिहिलेल्या पत्रांत श्रीपंतांनीं सद्गुरुसंप्रदायाचें थोडक्यांत समर्पक वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहेः- " स्वात्मसुखीं नित्य रममाण होणें आणि फिरून शब्दजनित भ्रांतींत न पडतां जीवन्मुक्त स्थितींत डुलत राहाणेंच सद्गुरुसंप्रदाय होय; " (पु. ५–२४) व दुसऱ्या एके ठिकाणीं " स्वसंवेद्य स्वयंप्रकाश । स्वात्मा अवधूत ॥ धृ० ॥ सहज स्फुरण अंतःकरण । तोचि अनन्य भक्त " ( द. प्रे. ल. ११९३ ) असें म्हटलें आहे. या दृष्टीनें पाहातां स्वसंवेद्य, स्वयंप्रकाश असा जो सत्तारूपी आत्मा तोच अवधूत व सहज स्फुरणरूपी जें अंत:करण तोच अनन्य भक्त असून हा अवधूत-भक्तांचा भक्तिप्रेमसोहळा अथवा सत्तास्फूर्तिविलास अखंड चालला आहे असें म्हटलें पाहिजे. हीच अनन्य, अव्यभिचारिणी आत्मभक्ति होय. ही अभेदभक्ति ज्या मार्गाचें रहस्य आहे तो अनादि व अनंतच म्हटला पाहिजे; म्हणून श्रीपंतांनीं " संप्रदाय चैतन्य एकची । प्रेमसागर भरला " (द. प्रे. ल. १३७७ प्र.आ.) म्हणजे संप्रदाय व चैतन्य एकच असून तोच प्रेमसागर होय असें सांगितलें आहे. ब्रह्मविद्या ही उपनिषदांच्या द्वारें व्यक्त होऊं लागण्यापूर्वीं कित्येक वर्षे गुरु-शिष्यपरंपरेनें दिली घेतली जात होती हे त्या ग्रंथांवरून स्पष्ट दिसतें आणि तेव्हांपासूनच

हा शुद्ध ज्ञानमार्ग अथवा अनुभवमार्ग चालत आलेला आहे. निदान ज्या उपनिषत्कालीं " तत्त्वमासि श्वेतकेतो " ( छां. ६-७-८ ) हा ब्रम्हत्मैक्यबोध सद्गुरूंनां सच्छिष्याला केल्याचा लेखी पुरावा उपलब्ध आहे त्या काळापासून तरी तो चालत आलेला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. " एकट्या ब्रम्हांड पुराणांत मात्र दत्तमहात्म्याचें उघड वर्णन आहे. त्यांत अवधूत ( उपदेश ) मार्ग प्रगट केला आहे व अवधूतदर्शन उघड वर्णिलें आहे. बाकी सर्व ठिकाणीं तें गूढ आहे " असें श्रीपंतांनीं म्हटलें आहे. (पु.८-१७८)-

## अवधूत संप्रदायाचें व्यापक स्वरूप

एके ठिकाणीं श्रीपंत म्हणतात " अवधूतमार्गांत बाकी सर्व प्रवृत्तिनिवृत्तिमार्ग मिळतात. तो अगाध शांतीचा सागर आहे. प्रवृत्तिनिवृत्तिमार्गरूपी सर्व नद्या निरनिराळ्या रस्त्यांनीं, निरनिराळ्या उपाधिभेदांनीं, निरनिराळ्या प्रवाहांनीं त्या सागरास जाऊन मिळतात. सद्गुरु अवधूतबोधमार्ग हा सर्व बोधमार्गांचा साठा असून तो पुनः पुनः संतबोलरूपी जलधारा वर्षत असतो. " ( पु. ८-२५१ ) याप्रमाणें अवधूतमार्गाचें स्वरूप फार व्यापक असल्यामुळें तत्वतः प्रत्येक मनुष्य त्यांत समावेश होण्याला पात्र आहे. श्रीपंतांच्या शिष्यवर्गांतहि हिंदु ( अस्पृश्यसुद्धां ), मुसलमान, पारशी, ख्रिश्चन वगैरेंचा समावेश झालेला होता व त्यांच्या धर्मभावना न दुखावतां ते प्रत्येकाला प्रेमबोध करीत असत आणि त्याला आपल्या धर्माप्रमाणें वागण्यास सांगत हें त्यांच्या चरित्रकथनांत सांगितलेंच आहे. श्रुतीच्या " तत्त्वमासि " बोधाचा हा विशेष आहे कीं तो सर्व काळीं, सर्व ठिकाणच्या, सर्व धर्मांच्या व सर्व मतांच्या लोकांना लागू आहे. प्रत्येकाला, मग तो आफ्रिकेंतील नीग्रो असो, रशियांतील बोल्शेव्हिक असो अथवा इतर कोणीहि असो, श्रुतिमाउलीचें " तत्त्वमासि " हेंच सांगणें आहे व सनातन धर्म हाच विश्वधर्म होण्याला जो पात्र आहे तो याचमुळें होय. श्रीपंतांनीं म्हटल्याप्रमाणें आत्मा अवधूत व सहजस्फुरणरूपी अंतःकरण भक्त यांच्यामधील भक्ति ( आत्मभक्ति ) जाणून न जाणून प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं चाललीच आहे. त्यामुळें " सर्व विश्व हें आत्म्याचें अविचारी भक्त आहे " असें श्रीपंतांनीं म्हटलें आहे.

त्याचप्रमाणें अवधूतमार्गाचें स्वरूप फार व्यापक असल्यामुळें व श्रीदत्तात्रेयांच्या ठिकाणीं ब्रह्मा, विष्णु व महेश या तिघांचें एकीकरण झालें असल्यामुळें या मार्गांत सत्वगुणी, रजोगुणी व तमोगुणी अशा सर्व लोकांचा समावेश होऊं शकतो. श्रीदत्तात्रेयांच्या शिष्यवर्गांत कार्तवीर्य, अलर्क, आयुराजा वगैरे रजोगुणप्रधान क्षात्रवृत्तीचे लोक पुष्कळ होते. अवधूत सद्गुरु " निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः " या कोटींतील असल्यामुळें तो आपल्या अद्भुत सामर्थ्यानें तिन्ही गुणांचेंहि आकलन करूं शकतो; त्यामुळें अवधूतमार्ग अभ्युदय व निश्रेयस या दोहोंचीहि प्राप्ति करून देणारा आहे.

पनवेल येथील सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीयुत सदाशिव कृष्ण फडके यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेलें " श्रीदत्तभक्तरहस्य " नावाचें सुंदर पुस्तक प्रसिद्ध केलें असून

त्यांत दत्तसंप्रदायासंबंधीं पुष्कळ माहिती दिली आहे. त्या पुस्तकांत श्रीयुत फडके यांना दत्तसंप्रदायाच्या व्यापकत्वासंबंधीं जें मत व्यक्त केलें आहे तें त्या संप्रदाया-संबंधींचे श्रीपंतांचे जे उद्गार वर दिले आहेत त्यांचेशीं पुष्कळसें जुळतें आहे. आपल्या पुस्तकाच्या "श्रीदत्त-मुक्ता-माला" या भागांतील पान ३६२ वर श्री. फडके म्हणतात "हिंदुस्थानांत परकीय अंमल सुरू झाल्यानंतर येथें जे जे संप्रदाय रूढ झाले त्या सर्वांचा सूक्ष्म धागादोरा या मीं मानलेल्या तात्त्विक दत्तसंप्रदायाशीं आहेच आहे असें उघड दिसतें. नाथ-संप्रदायाचा संबंध (त्या पुस्तकांत दिलेल्या) गोरखनाथांचे चरित्रांत उघड केला आहे व लिंगायत व शीखसंप्रदायांचे सूक्ष्म धागेदोरे माणिकप्रभूंच्या (त्या पुस्तकांत दिलेल्या) चरित्रारंभीं दाखविले आहेत. श्रीदत्तप्रभूंनीं श्रीवासुदेवानंदांना योगशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां कबीराचें पुस्तक हातीं दिलें ही गोष्ट चिंतनीय आहे. श्रीभैरव अवधूत ज्ञानसागर यांचें अल्प चरित्र मुद्दाम देण्याचें कारण त्यांच्या गुरुपरंपरेंत चैतन्यसंप्रदायाचाहि धागा सांपडतो. मानभावी सांप्रदायी दत्तांनाच गुरु मानितात. गोसावी पंथाचा संबंध नाथ-संप्रदायाकडून किंवा अन्य तऱ्हेनेंहि दत्तसंप्रदायाकडे सहज पोंचेल. नवनाथांचे गुरु दत्त असें वाचनांत येतें. समर्थ रामदासांनीं दत्तात्रेयांकडून योगदीक्षा घेतली आहे व त्यांचें 'समर्थ' हें नांव दत्तात्रेयांनींच ठेवलें आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, दासोपंत हे सारे पंढरीचे वारकरी दत्त-संप्रदायीच असल्यामुळें वारकरी संप्रदाय दत्तसंपदायाहून दूर नाहीं. अवधूत संप्रदाय व दत्त संप्रदाय एकच. अशा रीतीनें जे जे संप्रदाय देशकालानुसार गेल्या हजार पांचशें वर्षांत समाजोन्नतीकरितां रूढ झाले असें आधुनिक विद्वानांचे मत आहे त्या बहुतेक सर्व संप्रदायांचे धागेदोरे दत्तसंप्रदायाशीं येऊन मिळतात हें तत्वतः तरी मान्य करणें अपरिहार्यच आहे."

## "अवधूतमार्ग सोपा तर सोपा; कठीण तर कठीण"

अवधूतमार्गाला श्रीपंतांनीं कांहीं ठिकाणीं असिधारेसम तीक्ष्ण, दुर्गम व कठीण म्हटलें आहे, तर कांहीं ठिकाणीं सुलभ व सोपाहि म्हटलें आहे. एके ठिकाणीं ते म्हणतात, "अवधूतमार्ग सोपा तर सोपा, कठीण तर कठीण. सद्गुरुकृपाबळच तारणार. अहं-कर्तृत्वाचा किंवा 'मी केलें' अशा अभिमानाचा थोडा जरी अंकुर अंतःकरणीं उठला तरी तात्काळ हा चिरला जातो. असे चिरले गेलेले कित्येक आहेत. 'क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया' अवधूत मार्ग चालणें म्हणजे खड्गाच्या धारेवर चालणें, लोखंडाचे चणे खाणें अगर कथिल तापवून रस करून पिणें यासारखें अवघड व कठीण आहे; येथें सद्-गुरुकृपाबळच तारण; अन्याची येथें गति नाहीं; अन्याचा अंमल येथें चालणार नाहीं. असिधाराव्रत यासच म्हणावें. व्रत कसलें तर अकर्तव्याचें, सहजाचें. या व्रतांत आपलें कर्तव्य मुळींच नाहीं. × × × गुरुमार्ग अगर अवधूत मार्ग चालणारा कर्तेपणा गलित अगर हलका झालेला, सूक्ष्म दृष्टीचा, निजनिष्ठ, सद्गुरूच्या पायीं पूर्ण मरून

पडलेला असला तरच हा असिधारामार्ग सद्गुरुकृपेनें चालून पार होईल. अन्य उपायच नाहीं. ” ( पु. ८–२५७ ) तसेंच “ क्षुरस्यधारा निशिता दुरत्यया । दुर्गंपथस्तत्कवयो वदन्ति ” (कठ १-३-१४) या श्रुतिवचनांत वर्णन केल्याप्रमाणें श्रीपंतांनीं “ क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया । दुर्गम पंथ कवि वदतीया ॥ धृ० ॥ ” ( द. प्रे. ल. १७६७ ) असें अवधूत संप्रदायाचें वर्णन केलें आहे. अशा या कठीण मार्गानें सुरक्षितपणें जातां यावें म्हणून त्यांनीं पुढीलप्रमाणें इशारेहि दिले आहेत. “ सुलभ नोहे हा अवधूत मार्ग । भक्तिकरीं घ्या ज्ञानखड्ग ” ( द. प्रे. ल. १०२ ); “ अरे हा कठीणची गुरुपंथ । वैराग्याची सीमा होई । तरीच सद्गुरु प्राप्त ” ( द. प्रे. ल. ६८२ ); “ गुरु-मार्गांत इतकें कडकडीत वैराग्य पाहिजे कीं त्याच्या तेजांत वासना व कल्पना समूळ जळून गेल्या पाहिजेत; कर्तव्य नजरेस पडतां कामा नये. स्वप्नींहि देखील अशी खबर-दारी असावी. ” (पु. ८--१३७) म्हणजे या संप्रदायांत भक्ति, ज्ञान व वैराग्य यांची सीमा होणें अवश्य आहे. याप्रमाणें श्रीपंतांनीं अवधूतमार्गाचा कठीणपणा जरी दाखविला तरी तो सर्वांनाच कठीण आहे असें नसून तो वीरनिश्चयी आणि एकनिष्ठ भक्तांना सोपा व सुलभ आहे असें ते सांगत. एके ठिकाणीं ते म्हणतात, “ असिधारेसम असणारा गुरुमार्ग हा सद्गुरुभक्तांस, ऐक्यप्रीतीच्या, अखंड–भजनाच्या, तन्मय- वृत्तीच्या गुरुपुत्रांस तो गुरु-कृपेनें सोपा. तो चालणें म्हणजेच खरा गुरुपुत्र होणें. तो चालतांना अंगीं सरळता असून मन जसें गंगाजळ, आंत बाहेर निर्मळ असतें. कोठेंच मल चिकटूं शकत नाहीं; कारण अहंकर्तृ-त्वाचा आग्रह तेथें नाहीं. कशांतहि आग्रह नाहीं. अंतरवृत्ति (अंतःकरण) सद्गुरुस्मरणीं रत, निजभक्त, अचल व शांत असतें. ”( पु. ८–२५८ ) तसेंच आणखी एके ठिकाणीं ते म्हणतात “ अवधूत मार्ग लेंडीचा नव्हे. कनककान्तामेदिनीची आशा जाळून, देहादि प्रपंचाचें मिथ्यत्व वाणून, नामरूपात्मक माया स्वप्नींहि सत्य न मानतां, अनन्य भावें सद्गुरूच्या चरणीं थारा केलेला, विरतिखड्ग धारण करून, भक्तिकवच आंगीं चढवून, बोधवळानें द्वैत-शत्रूचें हनन करून, मुक्तिसती शांतीसह मिळवून कृतकृत्यतेच्या जोरांत प्रेमानंदानें सद्गुरुचरणीं लोळत असणाराच अवधूत-सिंहाचा बच्चा होय. ” ( पु. ४–१९४ ) दुसऱ्या एके ठिकाणीं ते सांगतात “ निर्मळ प्रीतीचा गुरुमार्ग विसरून ( जे ) जन आशेच्या व्यापारांत पडले त्यांनीं गुरुमार्ग हा देवघेवीचा व्यापार केला. तो नित्य ‘दत्त’ म्हणजे नित्य दिलेलाच आहे. मुक्तस्थिति नित्य दत्त आहे. या शुद्ध दत्तमार्गीं कांहीं देणें नाहीं, कोणा कांहीं घेणें नाहीं; कोणताच व्यापार नाहीं. ‘ Out of the fulness of love the heart breathes forth love ’ ( अंतःकरण प्रेमानें भरलेलें असल्यामुळें तें प्रेमच देतें ). प्रेमाकरितां गुरुशिष्यखेळ; संसार, परमार्थ हेहि प्रेमाकरितां; निरपेक्ष प्रेमाखेरीज इतर अपेक्षा नाहीं. असली तरी ती खोटी. प्रेम हेंच सर्व भावनांचें जीवन होय. प्रेम नाहीं ती भावना कोरडी.” ( पु. ८–२२८ ) तसेंच ‘या मार्गांत शहाणपणा बिलकूल चालावयाचा नाहीं; यांत स्त्रैणांचें काम नाहीं; व्यावहारिक दृष्टीच्या लोकांनीं या मार्गांत शिरूं नये; लौकिक राखून गुरुमार्ग साधणें होणार नाहीं व

या मार्गांत ढोंग बिलकूल चालावयाचें नाहीं ' असें ते सांगत आणि स्वार्थी व दांभिक लोकांची गुरुमार्गांत काय स्थिति होते तें त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. " स्वार्थासाठीं जन खटपटती । म्हणूनी गुरु मार्गीं न पटती ॥ धृ० ॥ दंभभक्ति प्रगटुनी जगीं । वासनात्रयीं लटपटती ॥१॥ " ( द. प्रे. ल. २०२१ )

## अवधूतमार्ग व बाह्य राहाटी

येथपर्यंत सद्गुरूच्या व सच्छिष्याच्या अंतरंग-स्थितीच्या अनुरोधानें अवधूत संप्रदायाचें वर्णन केलें आहे. आतां अवधूताच्या बाह्य राहाटीसंबंधीं वर्णन करीत आहोंत. सर्वसाधारणपणें ' अवधूत ' म्हणजे त्रिमूर्ति दत्तात्रेय असें समजतात. पण 'अवधूत' हा शब्द विवक्षित–अंतरंग–स्थितीचा द्योतक असल्यामुळें प्रकरण ४ मध्यें दिलेल्या अवधूतोपनिषदाच्या पहिल्या दोन श्लोकांत वर्णिलेल्या अक्षरत्व (अविनाशित्व), वरेण्यत्व (श्रेष्ठत्व), धूतसंसारबंधन ( संसाराचे सर्व पाश ज्याचे तुटले आहेत ), तत्त्वमस्यादिलक्ष्यत्व ( श्रुतिवचनांचें मर्म जाणणारा ), अतिवर्णाश्रमित्व ( वर्णाश्रमांचें बंधन ज्याला राहिलें नाहीं असा ), सदा आत्मनिष्ठ व अखंडयोग साधलेला या लक्षणांनीं युक्त अशी स्थिति ज्याच्या ठिकाणीं असेल त्याला ' अवधूत ' म्हणतात व त्याच्या रूपानें श्रीदत्तात्रेय अवतीर्ण झाले आहेत असें भक्त मानितात. श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधांत ज्या अवधूतांनीं यदुराजाला दर्शन दिल्याचें वर्णन आहे ते मानव देहधारी असून द्विज म्हणजे ब्राह्मण होते असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें श्रीदत्तात्रेयांनीं जनार्दनस्वामी, समर्थ रामदास वगैरे कांहीं सत्पुरुषांना मलंग वेषांत आणि एकनाथ, दासोपंत वगैरे कांहींना पठाणाच्या रूपानें दर्शन दिल्याचीं वर्णनें आढळतात. तसेंच श्रीपंतांनींहि "बालोन्मत्त पिशाच योगी । भोगी धूलिधूसरितांगीं । स्मरणमात्रें प्रगटुनी जगीं । भक्त लोटिसी निजप्रेमरंगीं " ( द. प्रे. ल. २१ ) व " योगी भोगी यति फकीर नग्न ब्रह्मचारी । अनंत रूपें दासां भेटे प्रेमें श्रीनरहरी " ( द. प्रे. ल. ३० ) अशा निरनिराळ्या रूपांनीं अवधूत हा भक्तांना दर्शन देतो असें म्हटले आहे. श्रीबालमुकुंदांचे गुरु श्रीरामचैतन्य हे जनसंमर्दापासून दूर राहात व स्वात्मानंदीं निमग्न असून विजनांत विहार करीत असत असें श्रीपंतांनीं केलेल्या त्यांच्या वर्णनावरून दिसतें. श्रीबालावधूत हे तर आपल्या नांदत्या प्रपंचाचा त्याग करून प्रथम कांहीं वर्षें विचित्र वेषानें योगानंदांत विजनांत कालक्रमणा करीत होते व मागाहून " सहज पिसेपण मिरवीत आपण । खेळवी भक्तमेळा ॥ " ( द. प्रे. ल. ३१५ ) आणि " जनीं वेड पांघरूनीयां । जड मूढ जनां उद्धरी " ( द. प्रे. ल. १००१ ) या थाटांत कर्डेगुद्दी अगर देसनूर येथें भक्तमंडळींत राहात असत; परंतु स्वतःची अशी स्थिति असूनहि त्यांनीं श्रीपंतांना आग्रहानें प्रपंच करण्यास सांगितलें व त्याप्रमाणें श्रीपंतांनीं अखेरपर्यंत प्रपंचांत राहून शिक्षकाचें काम केलें. तसेंच श्रीपंतांनीं आपल्या शिष्यांपैकीं रामानंद उर्फ रामाबुवा, विनायकराव ताम्हनकर ऊर्फ साई व बापूभट राजापुरकर या तिघांनाच भगवें घालण्यास कायमची परवानगी दिली होती या गोष्टीचा प्रकरण २४

मध्यें उल्लेख केलाच आहे. बाकीच्या सर्व शिष्यांना त्यांनीं प्रपंच करून परमार्थ साधण्याचा उपदेश केला व कांहींना तर तसें करण्यास भाग पाडलें. तसेंच सर्वसाधारणपणें दत्तसंप्रदायांत वर्णाश्रमधर्म पाळण्यावरहि कटाक्ष असलेला आढळतो. वर्णाश्रमधर्म, देशाचार, कुलाचार वगैरे बिनचूक पाळले पाहिजेत अशी श्रीपंतांचीहि शिकवण असे व मागें उल्लेख केल्याप्रमाणें त्यांनीं आपल्या गुरुबंधूंना व शिष्यांना वेळोवेळीं जे नियम घालून दिले व हुकूमवजा लेखी आज्ञा केल्या अथवा पत्रें लिहिलीं यांवरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. तेव्हां अवधूत मार्गांत बाह्य राहाटीसंबंधीं निश्चित असें कांहीं सांगतां येणार नाहीं; म्हणून श्रीपंतांनीं एके ठिकाणीं अवधूत राहाटी ' अनंत ' आहे असें म्हटलें आहे व पद ५७८ मध्यें " जना उफराटी। दिसते अवधूत राहाटी ॥ धृ० ॥ " असे सांगून त्या राहाटीचें खरें वर्म काय असतें त्याचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे—" आत्मस्वरूपीं जडली प्रीति। प्रारब्धास्तव क्रिया घडती। रागद्वेष नसे चित्तीं। इच्छा नच पोटीं॥ १ ॥ अभिमानाचा घातचि केला। नाठवे द्वैतप्रपंचाला। बंधमोक्षातीत झाला। अद्भुत ही कोटी ॥ २ ॥ कर्मे करूनी अक्रिय सदा। सहज भोगितो सहजानंदा। निजस्थिति त्याची न कळे वेदा। दत्त प्रेम घोटीं ॥ ३ ॥ "

अवधूत राहाटीचें थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हणजे असें म्हणतां येईल कीं अंतरंगीं पूर्ण असंगता अथवा अनासक्ति आणि भक्तिप्रेमरंग व सहज स्थितीची राहाणी यांचें या राहाटींत समीकरण झालेलें असतें. त्यामुळें अवधूताच्या ठिकाणीं कित्येक वेळां विरक्ति व श्रीमंती असे परस्परविरोधी दिसणारे गुण एकत्र नांदत असलेले दिसतात. सत्पुरुषांच्या राहाटीसंबंधीं एके ठिकाणीं श्रीपंत म्हणतात " सत्पुरुषांच्या राहाटी या त्यांच्या त्यांच्या प्रकृतिस्वभावांस अनुसरून सहज. अकृत्रिम असतात. त्यांची राहाटी आपण घेऊन त्याप्रमाणें वागतों म्हणणारा आपणास न झेपणारें असें मोठें ओझें अंगावर घेऊं जाऊन, रावण जसा राम–धनुष्याखालीं दडपून गेला तसा, त्या ओझ्याखालीं दडपून जातो. एका प्रकृतीची राहाटी दुसऱ्या प्रकृतीवर बसवितां येणार नाहीं. तसें केल्यास सहज क्रियेचा सुलभपणा तिला येणार नाहीं; सहज क्रियेची शोभाहि येणार नाहीं. ××× म्हणून सत्पुरुषांप्रमाणें वागण्यास शहाण्यानें जाऊं नये. त्यापेक्षां स्वतःच सत्पुरुष कसा होईन इकडे लक्ष दिल्यास खरें हित व कल्याण होईल. म्हणून सत्पुरुषाप्रमाणें वागणें हा मूर्खपणा व स्वतः सत्पुरुष होणें हा शहाणपणा. एकदां सत्पुरुष व्हा, स्थितप्रज्ञ व्हा; मग सत्पुरुष झाल्यावर आपोआपच कोणतेहि वर्तन घडेल कीं ! हें सहज आपोआप घडणारें वर्तनच खरें वर्तन; अनुकरणाचें वर्तन खोटें वर्तन. एकदां आरूढ व्हा; मग सहजच आपोआप ' आरूढ–'वर्तन होईल कीं. एकदां राजा व्हा; मग राजश्री सहजच येईल कीं. एकदां पशुपति व्हा; मग सहजच पशुस्वामित्व येईल कीं. स्त्री गर्भार झाली म्हणजे आपोआप पीतवर्ण वगैरे गर्भचिन्हें मुखावर दिसतील कीं; स्वतः गर्भार न होतां हळद तोंडास माखली म्हणून गर्भार स्त्रीची शोभा व सौंदर्य हीं येतील काय ? सहज शोभा ही कृत्रिमानें येईल काय ? म्हणून पंताची राहाटी घेऊं नका. पंतालाच ध्या; पंतस्वरूप व्हा. पुनः

कसें वागूं ? कशी राहाटी ठेवूं ? असा प्रश्नच राहूं नये. कर्तेपणाच खोटा. तेथें राहाटीची काय बाकी राहिली ? सत्पुरुषांची सहज राहाटी ही आपल्याप्रमाणेंच कृत्रिम आहे अशी चुकीची समजूत धरूं नका. राहाटींत कां कांहीं सत्पुरुषत्व आहे ? कित्येक विलक्षण, असमंजस राहाटीच सत्पुरुषत्व असें कल्पून फसतात. सत्पुरुषत्वमूळ राहाटी आहे; राहाटीमूळ सत्पुरुषत्व नव्हे. ××× सहज शक्तीची बरोबरी कृत्रिम शक्तीस येणार नाहीं ". ( पु. ७-५६ ते ५७ ).

येथपर्यंत अवधूत संप्रदायासंबंधीं जें वर्णन केलें आहे त्याचें सार श्रीपंतांनीं एका पदांत पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. " दुर्गम हा अवधूत पंथ । मनुजा ॥ ध्रु० ॥ वैराग्य निज बाणतांची । सहजची होसी शांत ॥ १ ॥ सद्गुरुचरणीं परा भक्ति । करील तुज निश्चित ॥२॥ दत्तात्रयस्वरूप जाणुनी । होई त्रिपुटी(अ)तीत ॥३॥ " ( द. प्रे. ल. १८२५ ) म्हणजे तीव्र वैराग्य, परा भक्ति व स्वरूपबोध हीं या मार्गाचीं मुख्य लक्षणें आहेत. यालाच त्यांनीं " अन्वय–व्यतिरेक–राजयोग मार्ग " (पु. ३–१९० ) व " दत्तपंथ–राजमार्ग " ( द. प्रे. ल. १५७ ) म्हटलें आहे आणि अशा या अनादिसिद्ध श्रुतिसंमत, उज्वल व श्रेष्ठ मार्गानें जातांना आपल्या ठिकाणीं पूर्णत्व बाणून जीवन्मुक्त स्थिति प्राप्त झाली तरी सद्गुरूशीं कृतघ्न न होतां त्याचा अंकित म्हणून अद्वय भजनानंदांत सहज प्रेम भोगीत आपण कालक्रमणा करीत आहोंत असें त्यांनीं " संप्रदाय गुरूचा । बहु परंपरेचा ॥ ध्रु० ॥ सिंहासनारूढ जरी झाला । मान राखी मातेचा ॥ १ ॥ पूर्णबोधोपरी कृतघ्न नोहे । अंकित सद्गुरूचा ॥ २ ॥ जीवन्मुक्त होउनी भजन । सहजानंद प्रेमाचा ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ९८६ ) या पदांत म्हटलें आहे.

या प्रकरणाच्या सुरवातीला अवधूत संप्रदायांतील गूढ रहस्य अथवा गुह्य म्हणजे वाङ्मनातीत अद्वैत भक्तिसुखाचा अनुभव अथवा भक्तिप्रेमसार होय असें जें म्हटलें आहे त्याचें स्पष्टीकरण येथपर्यंत श्रीपंतांच्या वचनांच्या आधारें केलें आहे. आतां पूर्ण बोधाच्या बैठकीवरून त्यांनीं या अद्वैत भक्तिसुखाचा अथवा भक्तिप्रेमसाराचा कसा उपभोग घेतला किंवा त्यांची आध्यात्मिक भूमिका काय होती तें पुढील प्रकरणांत सांगत आहोंत.

# प्रकरण ४४ वें

---

## श्रीपंतांची आध्यात्मिक भूमिका:

---

### तत्वबोध

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें तत्वबोध हें अवधूत संप्रदायाचें एक मुख्य अंग आहे. श्रीपंतांचाहि तत्वबोधावर फार भर असे. तें तत्व म्हणजे श्रुतिप्रतिपादित 'एकमेवाद्वितीयम् ब्रह्म' हा अद्वैतसिद्धांत होय. साधारणपणें तत्वबोध करणें म्हणजे व्याख्यानद्वारां हा अद्वैतसिद्धांत विशद करून सांगणें अथवा त्याची फोड करून तो शिष्याला समजावून देणें असें समजलें जातें. याप्रमाणें ब्रह्मतत्वाचें जें ज्ञान होतें त्याला परोक्ष ज्ञान म्हणतात. पण परोक्ष ज्ञान हें शब्दज्ञान होय. अनुभवाशिवाय त्याचा उपयोग नाहीं. उलट तें ज्ञानाभिमानाला कारणीभूत होण्याचा संभव असतो. त्यामुळें ब्रह्मतत्वाचा म्हणजे स्वस्वरूपाचा अनुभव येणें हें अत्यावश्यक आहे. म्हणून तत्व-बोध करणें म्हणजे तें तत्व अनुभवाला आणून देणें होय. अनुभवयुक्त जें ज्ञान त्याला अपरोक्ष ज्ञान म्हणतात.

अद्वैत हें असें आहे कीं त्याच्या अर्थावरूनच तें ज्ञानाचा विषय होणें शक्य नाहीं. आपल्या नेहमींच्या व्यवहारांत आपण ज्याला 'ज्ञान' म्हणतो तें त्रिपुटींतील ज्ञान होय. त्यालाच वृत्तिगत ज्ञान म्हणतात. हें ज्ञान होण्याला ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान; द्रष्टा, दृश्य व दर्शन ही त्रिपुटी असणें अवश्य आहे. या साखळीपैकीं एक दुवा जरी तुटला तरी ज्ञान संभवणार नाहीं. या त्रिपुटीरूपी तिवईवर आधारलेलें जें ज्ञान तें 'एकमेवा-द्वितीयम्' असें जें अद्वैत म्हणजे एकच एक तत्व त्याचे बाबतींत कसें संभवणार ? तें शक्य नाहीं. तेव्हां अद्वैतबोध अथवा अद्वैतज्ञान हें आपल्या नित्य परिचयांतील म्हणजे वृत्तिगत अथवा त्रिपुटीवर अवलंबून असणाऱ्या ज्ञानाहून निराळेंच असलें पाहिजे व तें तसें आहेहि. जगाचें उपादान–कारण, निमित्त–कारण व नियमन-कारण जें ब्रह्म तें एकच असून 'सत्यं ज्ञानमनंतम्' असें श्रुतींनीं त्याचें वर्णन केलें आहे; म्हणजे ज्ञान हें त्या अद्वैत वस्तूचेंच एक लक्षण आहे असें श्रुति सांगतात. त्यामुळें अद्वैत ज्ञान होणें म्हणजे अद्वैत-रूप होणें, अद्वैत स्थितीचा अनुभव येणें होय. 'ज्ञानिनस्तत्वदर्शिनः' या कोटींतील महात्मे ज्या ज्ञानाचा उपदेश करितात व ज्या ज्ञानाच्या प्राप्तीकरितां त्यांचेकडे जावें लागतें तें ज्ञान म्हणजे विज्ञान अथवा स्वरूपाचा अनुभव होय आणि याच अर्थानें 'तद्वि-ज्ञानार्थं सगुरुमेवाभिगच्छेत्, समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्' म्हणजे त्या अद्वैत वस्तूचें विज्ञान व्हावें, त्या वस्तूचा अनुभव यावा म्हणून लीन वृत्तीनें श्रुतिसंपन्न व ब्रह्म-निष्ठ सद्गुरूकडे जाण्याचा मुंडकोपनिषदांत मुमुक्षूला उपदेश केला आहे.

अशा प्रकारच्या श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरूकडून ज्या साक्षात्कारयुक्त ज्ञानाची प्राप्ति होते त्या ज्ञानाचा म्हणजे अपरोक्ष ज्ञानाचा अथवा अनुभवयुक्त ज्ञानाचा विशेष हा आहे कीं तें निश्चयात्मक व निःसंदिग्ध असल्यामुळें तेथें मताला वाव राहात नाहीं. कारण 'मत' म्हटलें म्हणजे तेथें त्रिपुटी आलीच. म्हणजे विचार करणारा जो मी अथवा 'अहम्' त्यानें विचार करून अथवा कल्पनेनें जें ठरविलें तें त्याचें मत. अशा तऱ्हेनें जितके विचार करणारे तितकीं मतें होऊं शकतील. अशा निरनिराळ्या मतांत मेळ तरी कसा बसावा? म्हणून सर्वत्र मतमतांचा गलबला चाललेला आढळतो. परंतु त्रिपुटी-पलीकडील अथवा वृत्तिविरहित जें अपरोक्ष ज्ञान अगर विज्ञान किंवा ज्ञानानुभव त्याचे बाबतीत मतभेदाला जागा नाहीं. ज्या अहंच्या पुढें मत असावयाचें त्याचीच समुद्रांत टाकलेल्या जलबिंदूप्रमाणें गत होऊन "कोणीं कोणासी सांगावें। दिसतें गुरुरूप आघवें ॥ धृ० ॥ कोण श्रोता कोण वक्ता। ॐकाराचा ठाव पुशितां ॥" (द. प्रे. ल. १४४) अशी स्थिति होते. याच अर्थानें श्रीपंतांनीं एके ठिकाणीं "दत्तप्रभूनें अघटित केलें। जीव मारुनी मज अमर केलें ॥ धृ०॥ XXX चैतन्यसिंधूमाजीं बुडविलें। देवभक्तपण समूळ गेलें ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. १५८) असें म्हटलें आहे. तेव्हां स्वरूपसामरस्याच्या स्थितींत मताला इतकेंच नव्हे तर शब्दाला अथवा मनालाहि वाव नाहीं आणि त्यामुळें "वाचामनातीत अनुभव माझा केवीं बोलुनी दावूं" (द. प्रे. ल. १०४७) असे श्रीपंतांनीं उद्गार काढले आहेत.

याप्रमाणें स्वरूपानुभव जरी वाचामनातीत आहे व श्रुतींनींहि 'नेति' 'नेति' म्हणून त्या स्वरूपाचें अनिर्वचनीयत्व दर्शविलें आहे तरी ब्रम्हवेत्ते पुरुष ब्रम्हस्वरूपाचें व ब्रम्हात्म्यैक्यरूपी समरससुखाचें जें वर्णन करितात तें अज्ञानांत चाचपडत असणाऱ्या जीवांना दीपस्तंभांप्रमाणें मार्गदर्शक होत असतें. अशा प्रकारच्या वर्णनांवरून होणारें ज्ञान हें परोक्ष ज्ञान खरें; पण तें 'आधीं पाहिलें। मग सांगितलें' या कोटींतील असल्यामुळें विश्वसनीय असतें. श्रुतीचें म्हणजे विशेषतः उपनिषदांचें जें अत्यंत महत्व आहे तें याच अर्थानें होय. उपनिषदें हीं कोणीं व केव्हां रचिलीं तें सांगतां येत नाहीं. त्यांच्यांत जें ज्ञान साठविलेलें आहे तें निश्चयात्मक व आत्मानुभवाच्या भक्कम पायावर उभारलेलें आहे हें त्यांच्यांतील प्रतिपादनावरूनच उघड दिसतें. उपनिषदांतील बहुतेक भाग कोणी तरी ब्रम्हनिष्ठ पुर्णानुभवी पुरुषानें म्हणजे सद्‌गुरूनें अल्पज्ञ मनुष्याला म्हणजे शिष्याला केलेल्या उपदेशानें व्यापला आहे. त्यामुळें तो उपदेश निःसंदिग्धपणें, अधिकारयुक्त वाणीनें, सहज लीलेनें व सिद्धांतरूपानें केलेला आढळतो. 'सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्' (छा. ६-२-१) (बाळा, जगाच्या उत्पत्तीचे पूर्वी एक अद्वितीय असें सत्तत्त्व मात्र होतें) हा आरुणीनें श्वेतकेतूला म्हणजे पित्यानें पुत्राला अथवा गुरूनें शिष्याला केलेला निश्चयात्मक सिद्धांतबोध आहे व तो अशा स्वरूपाचा आहे कीं तो ज्यांनीं केला त्या महर्षींपुढें आजचें सर्व जगहि 'सोम्य' म्हणजे शिष्याप्रमाणें आहे. कारण वरील बोध केल्यानंतर हजारों वर्षे होऊन गेलीं तरी स्वरूपासंबंधींचें गाढ अज्ञान कायमच आहे;

त्यामुळें तो सिद्धांतबोध अजूनहि ताजा व जगाला मार्गदर्शक आहे. याचें कारण तो अनुभवाच्या भक्कम पायावर स्थिर झालेला होता हें होय. तें जर 'मत' असतें तर आतांपर्यंत त्यानंतरचीं जितकीं वर्षे होऊन गेलीं तितकीं तरी निदान त्याचीं खास परिवर्तनें व रूपांतरें झालीं असतीं; पण तसें झालेलें नाहीं व तो सिद्धांत अजूनहि प्रमाण मानिला जातो. यासंबंधीं श्रीपंत म्हणतात " आर्यांचीं उदार मनें अनुभवाकडे होतीं, दृश्याकडे नव्हतीं. व्यापक सिद्धांतांकडे त्यांचें लक्ष जास्त. × × × पाश्चिमात्यांचीं मनें दृश्यावर जास्त असून ते आपण कोण, आपलें अस्तित्व आहे किंवा नाहीं हें न पाहतांच प्रत्येक दृश्य वस्तु विवरून तिच्यांत काय आहे हें पाहतात; आपल्या आंत, आपल्या अनुभवाकडे पाहातच नाहींत. म्हणून अनुभवाचा पाया नसल्यामुळें, विचाराला योग्य दिशा न लागल्यानें त्यांच्यांत बहुतेक Atheists ( निरीश्वरवादी ) आहेत व नाना मतें झालीं असून × × × नानापंथ झाले आहेत. पण आर्यांचा पाया दृढ होता. म्हणून कांहीं झालें तरी ते जागा चुकले नाहींत, आत्मा विसरले नाहींत. " ( पु. ७–५२ ) असें जरी आहे तरी वरील सिद्धांतवाक्याच्या अर्थासंबंधीं, श्रुतीचा अद्वैत सिद्धांत मान्य करणाऱ्या आचार्यांमध्येंच मतभेद होऊन श्रीमच्छंकराचार्यांचें केवलाद्वैत, श्रीरामानुजाचार्यांचें विशिष्टाद्वैत व श्रीमद्वल्लभाचार्यांचें शुद्धाद्वैत अशीं एकाच अद्वैत तत्वासंबंधीं निरनिराळीं मतें निर्माण झालीं. पण त्यांपैकीं श्रीमच्छंकराचार्यांचाच अद्वैत सिद्धांत सर्वसाधारणपणें प्रमाण मानला जातो. महाराष्ट्रांतील साधुसंतांनींहि तोच प्रमाण मानला आहे व दशोपनिषदांवरील श्रीमदाचार्यांचें भाष्यच प्रमाण मानलें जातें. श्रीपंतहि आचार्यांचा अद्वैत सिद्धांत प्रमाण मानीत असत.

श्रुतींतील अद्वैत सिद्धांतपर वचनांना जें प्रामाण्य आलेलें आहे तें नुसत्या अंध श्रद्धेनें आलेलें नसून त्यांना आत्मानुभवाचा भक्कम पाठिंबा असल्यामुळेंच होय व तो सिद्धांत ज्या मंत्रद्रष्ट्या महर्षींनीं परम कारुण्यानें व सहज लीलेनें प्रिय शिष्याला सांगितला त्यांचे ठिकाणीं तो स्वानुभवसिद्ध होता, इतकेंच नव्हे तर उपनिषत्कालापासून आजतागायत आत्मानुभवाची परंपरा कायम राहिल्यामुळें हजारों किंबहुना लक्षावधि ज्ञात-अज्ञात अशा ब्रह्मनिष्ठ सत्पुरुषांच्या अनुभवानें अद्वैत सिद्धांतपर वचनांची सत्यता सिद्ध झालेली आहे. ती नुसत्या तर्कानें अगर कल्पनेनें पटणारी नसून स्वानुभवानेंच पटावयाची ! ती पटविण्याकरितांच मागील प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणें निरनिराळे वैदिक संप्रदाय उत्पन्न झाले. त्यामुळें प्रत्येक संप्रदायांत अनुभवावर विशेष भर असतो. पण स्वरूपानुभव घेणारे निरनिराळे सांप्रदायिक लोक त्या स्वरूपाचें युक्तिप्रयुक्तींनीं निरनिराळे दाखले देऊन व निरनिराळी शब्दयोजना करून वर्णन करितात. त्यामुळें मौज अशी होते कीं निरनिराळ्या आत्मानुभवी पुरुषांनीं केलेल्या एकाच अद्वैत वस्तूसंबंधाच्या वर्णनावरून त्यांच्यांत एकवाक्यता नसल्याचा भास होतो व निरनिराळे 'वाद' उपस्थित होतात. हे 'वाद' निरानिराळ्या सांप्रदायिकांमध्यें उत्पन्न होतात इतकेंच नव्हे, तर एकाच संप्रदायांतील पुरुषांनीं एकाच अद्वैत सिद्धांताचें निरनिराळ्या पद्धतींनीं प्रतिपादन केल्यामुळें त्यांच्यांतहि एकवाक्यता नसल्याचा कधीं कधीं भास होतो. उदाहरणार्थ

श्रीगौडपादाचार्यांनीं मांडुक्योपनिषदावरील कारिकांत अद्वैतप्रतिपादन करितांना अजात-वादाचा अंगिकार केला आहे. अद्वैत हें त्रिकालबाधित असून जग हें कधीं झालेंच नाहीं; तर त्याचा अत्यंताभाव आहे असा हा वाद आहे. त्यावरून श्रीगौडपादाचार्यांना पूर्णाद्वैती म्हणतां येईल. तर त्यांच्याच शिष्याचे शिष्य जे श्रीमदाद्यशंकराचार्य त्यांनीं माया-वादाचा अथवा विवर्तवादाचा अंगिकार केला असून जग हें रज्जु-सर्पवत अथवा मृगजल-वत मिथ्या आहे व एक परब्रह्म वस्तुच सत्य आहे असें प्रतिपादन केलें आहे. त्यामुळें त्यांना केवलाद्वैती म्हणतात. पण या बाबतींत खरा प्रकार असा दिसतो कीं हे 'वाद' आत्मानुभवी पुरुषांमध्यें होत नाहींत. कारण श्रीपंत म्हणतात "वृत्तिभेदें, प्रकृतिभेदें, राहाटीभेद दिसले तरी, सत्पुरुषत्वांत कोठेंच भेद (फरक) नाहीं. म्हणून सत्पुरुष सर्व एकच, एकभावाचे. सत्पुरुषांमध्यें तुलना नाहीं; उच्च–नीच भेद नाहीं." (पु. ७–५७) पण अशा सत्पुरुषांनीं लिहून ठेविलेले ग्रंथ वाचणारांमध्यें वाद उत्पन्न होतात. मायावाद अथवा विवर्तवाद, बिंबप्रतिबिंबवाद, दृष्टिसृष्टिवाद, कल्पनावाद, अवच्छेदवाद, सत्तास्फूर्तिवाद, चिद्विलासवाद, अजातवाद वगैरे निरनिराळे 'वाद' हे एकाच अद्वैत सिद्धांताचें प्रतिपादन करण्याकरितां अस्तित्वांत आलेले आहेत.

## अद्वैत ज्ञानाची परंपरा

एके ठिकाणीं श्रीपंतांनीं असें म्हटलें आहे कीं "शुद्ध अद्वैत–ज्ञान हें उपनिषदांत स्पष्टपणें सांगितलें आहे. त्याचेवर श्रीवेदव्यासांनीं सूत्रें रचिलीं, श्रीमच्छंकराचार्यांनीं अद्वैत मताचा प्रकाश जगभर पाडिला. अवधूतांनीं तेंच ज्ञान गीतारूपानें मुमुक्षु जनांस सुलभ करून दाखविलें. त्या आधारानें अनेक संत, महंत, जीवन्मुक्त होऊन (त्यांनीं) जनांस त्याचें (शुद्ध अद्वैत ज्ञानाचें) सत्यत्व स्वानुभवानें दाखविलें." (पु. ५–९७) त्यावरून उपनिषदें, ब्रह्मसूत्रें, अवधूत गीता, आचार्यभाष्य व आधुनिक संत–महंतांचें वाङ्मय यांच्यांत एकाच शुद्ध अद्वैत ज्ञानाचें प्रतिपादन केलें आहे असा श्रीपंतांच्या लिहिण्याचा भावार्थ आहे हें उघड दिसतें. अशी जर वस्तुस्थिति आहे तर वर उल्लेख केलेले "वाद" कां उपस्थित व्हावे? हा प्रश्न उत्पन्न होतो. याचें कारण असें दिसतें कीं जरी प्रत्येक अद्वैत सिद्धांत प्रतिपादन करणारा ब्रह्म सत्य आहे असेंच म्हणत असतो तरी जगाकडे पाहाण्याची दृष्टि मात्र प्रत्येकाची निरनिराळी असते. द्वैतावरच ज्याची उभारणी व ज्याचा प्रत्येक जीवाला समजूं लागल्यापासून परिचय असतो त्या जगाचें निरसन केल्याशिवाय अद्वैत सिद्धांत स्थापित होणें शक्य नाहीं. म्हणून प्रत्येक सिद्धां-त्याला जगाचा निरास करणें अथवा त्याची कांहीं तरी वाट लावणें भागच पडतें. श्रीम-च्छंकराचार्य वगैरे कांहीं तत्ववेत्त्यांचें म्हणणें असें आहे कीं जग हें मिथ्या असून भ्रांती-मुळें आपल्याला त्याचा भास होतो. ही भ्रांति म्हणजेच माया. ही अनादि व सांत आहे. या भ्रांतीचा निरास ज्ञानानें होतो व तें ज्ञान झालें म्हणजे 'ब्रह्म सत्यं जग-न्मिथ्या। जीवोब्रह्मैव नापरः' असा अनुभव येतो. आचार्यांच्या या सिद्धांतामुळेंच

त्यांना मायावादाचे पुरस्कर्ते मानण्यांत येतें. ज्याप्रमाणें मायावाद, विवर्तवाद व आभासवाद यांमध्यें जग हें मिथ्या आहे असें मानण्यांत येतें त्याचप्रमाणें बिंबप्रतिबिंबवाद, कल्पनावाद, दृष्टिसृष्टिवाद, अवच्छेदवाद या वादांतहि जगाचें मिथ्यात्वच प्रतिपादन केलेलें आढळतें. जें आपणांस दिसतें अगर भासतें म्हणजे आपल्या इंद्रियांना गोचर होतें तें जग मिथ्या ठरल्याशिवाय 'एकमेवाद्वितीयम् ब्रह्म' हा सिद्धांत पटणें शक्य नाहीं. त्यामुळें मुमुक्षु अथवा साधक जो असेल त्याला प्रथम जग मिथ्या आहे असेंच सांगितलें पाहिजे व युक्तिप्रयुक्तींनीं त्याचें मिथ्यात्व त्याला पटवून दिलें पाहिजे. त्याकरितां वरील वादांतील विचारसरणीचा अंगीकार करणें सोईचें असतें.

## व्यतिरेक व अन्वय

जगरूपी जें कार्य तें मिथ्या असून त्याचें कारण जें ब्रम्ह तें मात्र सत्य आहे हें निश्चयात्मक ज्ञान होणें याला व्यतिरेक ज्ञान म्हणतात व या ज्ञानाच्या दृष्टीनें म्हणजे व्यतिरेक–दृष्टीनें जेव्हां कोणी तत्ववेत्ता जग–ब्रम्हाचें वर्णन करितो तेव्हां मिथ्या जग व सत्य ब्रम्ह या दोन परस्परविरुद्ध भासणाऱ्या वस्तु एका ठिकाणीं एकदम कशा नांदूं शकतात हें त्याला स्थापित करावें लागतें. त्यामुळेंच वर वर्णन केलेले वाद उपस्थित झाले. कोणत्या तरी वादाचा अंगिकार करून 'ब्रम्ह सत्यम्' हा सिद्धांत एखाद्याचा कायम झाला व बुद्धीचा तसा ठाम निश्चय झाला म्हणजे तो आपल्या स्वरूपस्थितीशीं समरस होतो. कित्येक ज्ञानी पुरुष उन्मनी स्थितींत या स्वरूपसामरस्याचा अनुभव घेत उन्मत्त अगर पिशाच्च वृत्तीनें राहातात. असे लोक जगापासून फटकून राहून आत्मानंदांत निमग्न असतात. पण कांहीं आत्मानुभवी पुरुष कारण व कार्य एकरूप पाहात असल्यामुळें ज्याप्रमाणें सुवर्ण व अलंकार हे निरनिराळे शब्द वापरले तरी एक सुवर्णच असतें त्याप्रमाणें ब्रम्ह व जग हे भिन्न शब्द वापरले तरी एक परब्रह्मच व्यक्ताव्यक्त रूपानें नटलें आहे असा त्यांचा अनुभव असतो. हीच अन्वयदृष्टि होय. अशा प्रकारचा आपला अनुभव श्रीपंतांनीं पुढीलप्रमाणें वर्णिला आहे "व्यतिरेकाची वाट पाहिली शुन्य उल्लंघुनीयां गेलों । अन्वय मार्गें परतुनी येतां सर्वांमाजीं मी दिसलों" (द. प्रे. ल. २३५) म्हणजे "मीपणासह सर्व दृश्यविस्तार मिथ्या होय अशी व्यतिरेक ज्ञानानें खात्री होऊन स्वरूपीं समरस झाल्यावर अन्वय मार्गानें परत फिरलों म्हणजे अद्वैत–बोधानुभव–दृष्टीनें पाहूं लागलों तों आपणच सर्वत्र दिसूं लागलों." कार्य मिथ्या व कारण सत्य असें पाहाणें ही व्यतिरेक-दृष्टि व कारण व कार्य एकरूप पाहाणें ही अन्वयदृष्टि. संत हे अन्वय दृष्टीनें जगाकडे पाहात असल्यामुळें सर्वत्र एक सत्तारूपी प्रलयांबुधिच भरलेला असून जरी त्यांत अनंत जगरूपी स्फूर्ति–लाटा उठतात, खेळतात व निमतात तरी त्या स्वरूपांबुधीच्या एकत्वाला व पूर्णत्वाला कधींच बाध येत नाहीं; जग म्हणजे चिद्विलास आहे असा त्यांना अनुभव येतो. किंवा व्यतिरेक म्हणजे स्वरूपस्थिति व अन्वय म्हणजे पूर्ण भक्ति अथवा पूर्णाद्वैताच्या अनुभवाची स्थिति होय. एके ठिकाणीं श्रीपंत म्हणतात "दत्त स्वरूपीं सर्वांचि निमलें।

भजन करितां सर्व उदेलें" (द.प्रे.ल.३८५). या वचनांत त्यांनीं अनुक्रमें व्यतिरेक व अन्वय या दोन मार्गांतील अनुभव सूत्ररूपानें वर्णिले आहेत. व्यतिरेक-अन्वय मार्गांनीं पूर्णाद्वैत-स्थिति बाणून ती स्थिर होणें ही आध्यात्मिक अनुभवाची परमोच्च स्थिति अथवा चरम स्थिति होय. शुद्ध एकरस पूर्णाद्वैताचा अनुभव आला म्हणजे काय स्थिति होते याचें श्रीपंतांनीं एके ठिकाणीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे "सहज मीपण पाहाया गेलों। पाहातां पाहाणें विसरलों। अवघ्या गिळुनी अवघ्या मुकलों। वाद खुंटला निवांत ठेलों." ( द. प्रे. ल. १५२ ) अशा स्थितींत जेथें वादच खुंटला तेथें कसला वादी आणि कसला प्रति-वादी! तेथें जग म्हणजे सत्तास्फूर्तिविलास दिसूं लागतो. आत्मानुभवी संतांच्या ठिकाणीं शुद्ध अद्वैत स्वरूपाचें ज्ञान (व्यतिरेक) व अनन्य भक्ति अथवा अद्वैत भक्ति (अन्वय) यांचा सुंदर मिलाफ झालेला आढळतो. त्यामुळें सर्व वादांच्या पलीकडे त्यांची बैठक असते व " अवघें एकमय झालें गुरुकृपें । मुक्ति-सुख खेळीं मेळींरे " ( द. प्रे. ल. २२९ ) हा त्यांचा अखंडानुभव असूनहि सिद्धांत-प्रतिपादनार्थ अथवा अज्ञजनबोधार्थ कधीं कधीं मायावाद व जगाचें मिथ्यात्व आणि अनि-त्यत्व दर्शविणारे तत्सदृश इतर वाद यांचाहि त्यांनीं आपल्या वाङ्मयांत अंगिकार केलेला आढळतो. श्रीपंतांच्या वाङ्मयांतहि तोच प्रकार झालेला आहे. "मिथ्या संसृति जाणुनी हृदयीं । सद्‌गुरुपद धरिले " ( द. प्रे. ल. २३२६ ); " मिथ्या जगासी लाथ मारुनी । सद्‌गुरुभजनीं खेळूं " ( द. प्रे. ल. १९२९ ) या पदांत त्यांनी संसृतीला व जगाला मिथ्या म्हटलें; तर " स्फूर्ति ही उठली आनंदा । चालला संसृतिधंदा । " ( द. प्रे. ल. ४७२ ) या पदांत संसृति म्हणजे आनंदाची स्फूर्तिच होय असें म्हटलें आहे व "जग चिद्विलास हा दत्ताचा ॥ ध्रु० ॥ " (द.प्रे.ल.२०७२) या पदांत जगालाच दत्ताचा चिद्विलास म्हटलें आहे. तेव्हां असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं व्यतिरेक व अन्वय हे एकाच परब्रह्मवस्तूकडे व जगाकडे पाहाण्याचे दृष्टिकोन आहेत. प्रत्येक आत्मानुभवी पुरुष आपापल्या वृत्तिधर्माप्रमाणें व मनोरचनेप्रमाणें जग-ब्रह्माकडे पाहात असतो. त्यामुळें निरनिराळ्या प्रसंगीं त्या त्या प्रसंगानुसार त्याचे व्यतिरेक अथवा अन्वय दृष्टीचे उद्गार निघत असतात. तरी त्यांच्यामुळें त्याच्या अद्वैतानुभवाला बाध येत नाहीं. सिद्धांतबोध कर-ण्याचे कामीं व्यतिरेक–मार्गाचा फार उपयोग होतो. कारण गुरूला शिष्याची भूमिका लक्षांत घेऊन व त्याच्या परिचयांतील उदाहरणें देऊन त्याला समजेल अशा रीतीनें विषयप्रतिपादन करावें लागतें. तर अन्वयदृष्टि ही अनुभवाची दृष्टि अथवा चिद्विलास–दृष्टि असून निजरंगीं रंगून अन्वयदृष्टीनें जगाकडे पाहणाऱ्या संतांचे उद्गार म्हणजे तृप्तीचे ढेकरच होत. " स्वानंदाचें भोजन करितां । तृप्तीनें ढेकर दिधली " ( द. प्रे. ल. ८०० ) असें श्रीपंतांनीं म्हटलें आहे.

## श्रीपंत पूर्णाद्वैती होते

श्रीपंत हे पूर्णाद्वैती होते. त्यामुळें त्यांच्या वाङ्मयांत "द्वैत कधीं न उद्भवलें। सत्य-ज्ञानानंत विलसलें। दृश्य तितुका दत्तप्रेमा" (द.प्रे.ल.१८८०) "नोहे जग चिद्विलास हा।

सहजची स्थिति । हीची निजप्रेमगति " ( द. प्रे. ल. २०५० ); " अत्यंताभाव सृष्टि सत्य मानिसी " ( द. प्रे. ल. १००७ ) अशा तऱ्हेचे जगाचा अत्यंताभाव दर्शविणारे उद्गार वारंवार निघाले आहेत व पुष्प ७ पराग ३४ मध्यें 'पूर्णात्पूर्ण उदच्यते ॥ पूर्णस्य पूर्णमादाय । पूर्णमेवावशिष्यते' या श्रुतिवचनावर झालेलें त्यांचें व्याख्यान दिलेलें असून त्यांत त्यांनीं पूर्णाद्वैतसिद्धांत मोठ्या मार्मिकपणानें प्रस्थापित केला आहे. तशाच अर्थाचीं वचनें त्यांच्या सर्व वाङ्मयांत [ पदें, पत्रें, बोल व लेख ] विखुरलेलीं आहेत; तीं इतकीं विपुल आहेत कीं त्यांच्यावरून श्रीपंतांच्या ठिकाणीं पूर्णाद्वैतबोधाच्या अनुभवाची सीमा झाली होती याची सहज साक्ष पटते. कांहीं प्रसंगीं एकच नित्य परिपूर्ण वस्तु अखंड असल्यामुळें सिद्धांतरूपी भाषा बोलणें हेंहि झोपेंतील बडबडण्याप्रमाणें होय असें ते म्हणत व याच अर्थानें त्यांनीं " सिद्धांत हे निदसुऱ्याचे । ब्रम्हविदा केवीं रुचे " (द. प्रे. ल. ९९२) असें म्हटलें आहे. ही निःशब्दानुभवाची भाषा झाली. पण शब्दाच्या व्यवहारांत बोलावयाचें म्हणजे त्यांनीं उच्चारिलेला अगर प्रतिपादन केलेला प्रत्येक सिद्धांत स्वानुभवाच्या भक्कम पायावर आधारलेला होता. त्यांनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं " 'अनुभव' हा शब्द देहातीत सहज चिद्विलासद्योतक असल्यानें देवस्वरूपवाचक होतो. " (पु. ७–११६) " तसेंच 'भावना' म्हणजे अंतःकरणवृत्तीचें मूळ स्वरूपीं सामावणें, वृत्ति तद्रूप होणें; म्हणून शिव होऊन शिव भजणें अशी संतोक्ति आहे " असें त्यांनीं म्हटलें आहे. ( पु. ७--११६ ). अशा रीतीनें त्यांनीं 'भावना' हा शब्द जिव–शिवांच्या ऐक्याचा निदर्शक असल्याचें दर्शविलें आहे. त्यांचा अनुभवावर फार भर असल्यामुळें " स्वतःचा अनुभव खरा. त्यावरच आपल्या विचाराचा, निश्चयाचा पाया असावा. शास्त्रावर हा पाया ठेवणें चूक आहे. शास्त्रांत अनेकांचीं अनेक मतें आहेत. त्यांचें एकीकरण आपल्या अनुभवानें करावें. नाहीं तर ती खटपट सोडावी. गुरुवचनाचे आधारें आपला अनुभव पाहावा असा अनुभव सोडून अन्य कांहीं नको " ( पु. ७--१७४ ) असें त्यांचें सांगणें असे. तसेंच श्रीपंत जे सिद्धांत बोलत ते आत्मप्रतीति, गुरुप्रतीति व शास्त्रप्रतीति यांच्या भक्कम पायावर आधारलेले असून ते त्यांचें निर्भीडपणें प्रतिपादन करीत. एके ठिकाणीं " स्वानुभव गुरु श्रुति प्रमाण आमुच्या सिद्धांता । आणिकाची भीड न धरूं न मिळूं अन्य मता " (द. प्रे. ल. २१६) असें त्यांनीं म्हटलें आहे व दुसऱ्या एके ठिकाणीं आत्मानुभवाच्या शिखरावर उभे राहून त्यांनीं पुढील उद्गार काढले आहेत " अनुभव शिखरावरी चढुनी । सद्गुरु देखियला ॥ धृ० ॥ ध्येय–ध्याता–ध्यान–भाव समूळ हरला । ऐसा सद्गुरु देखियला ॥१॥ गुरु शिष्यांचा नाहीं भेद । उपदेश भला । अलभ्य लाभ आजि जाहला ॥२॥ प्रेमामृतें तृप्त होऊनी । द्वैतातें वमला । दत्त स्वरूपीं रमला ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. १९५५.) ही श्रीपंतांची स्वतःची आत्मानुभवाची बैठक दृढ होती इतकेंच नव्हे तर श्रुतिप्रतिपादित अद्वैत सिद्धांताचें सत्यत्व त्यांनीं कित्येकांना सुलभ रीतीनें पटवून तें त्यांच्या अनुभवाला आणून दिलें या संबंधींचा अधिक खुलासा पुढील प्रकरणांत येईल. एके ठिकाणीं

श्रीपंत म्हणतात " पंतनामबळें वेदांताचें पाऊल अनुभवमार्गी अधिक पुढें पडलें आहे. म्हणजे पतांनीं आजवर जगास ठाऊक होता त्यापेक्षां अवधूतमार्ग अधिक सुलभ केला. वेदान्तास ठाऊक नाहीं असा सद्गुरुप्रेमा पंतनामीं सिद्ध झाला; पंतांनीं निजगुज प्रगट करूनहि पुनः गूढ तें गूढच ठेविलें." ( पु. ७--२८३ )

श्रीपंतांच्या स्वानुभूतिपूर्ण उद्गारांचे कांहीं मासले येथें देत आहोंत; त्यांवरून त्यांच्या ठिकाणीं भक्ति, ज्ञान व वैराग्य यांची सीमा होऊन ब्रह्मात्मैक्यानुभव किती बाणलेला होता याची वाचकांना कांहींशी कल्पना होईल. ते उद्गार असेः—

१ स्वानुभवें उन्मत्त होऊनी । लाथ जगा मारिली । शुद्ध गुरुभक्ति वरिली ॥ ( द. प्रे. ल. २४२२ )

२ चढली ब्रह्मानंदमस्ती । हृदयीं सद्गुरूची वस्ती ॥ ( द. प्रे. ल. २४९० )

३ पाहूं जातां दृश्य दिसे । न पाहातां द्रष्टा असे । दोन्ही गिळुनी समरसें । स्वयं ब्रह्म उरलें ( द. प्रे. ल. २५२५ )

४ पूर्ण बोधाची मस्ती चढली । आपणा विसरलें ( द. प्रे. ल. २५४२ )

५. परेसी मिठी पडली । स्वानुभवमात सरली ( द. प्रे. ल. ९८९ )

६ बोलूं जातां बोलची सरला । परेसी अनुभव जिरला ( द. प्रे. ल. ९९३ )

७ अभिमानाचा थारा मोडिला । अंगीं अद्वैत–वारा झोंबला ( द. प्रे. ल. १७६३ )

८ निजानंदाचें भोजन जाहलें । पूर्ण तृप्ति जाहली ॥ ध्रु० ॥ इंद्रियांचे चाळे खुंटले । उन्मनी वरिली ॥ १ ॥ ' तत्त्वमसि ' बोध जिरला । परम पुष्टि आली ॥ २ ॥ दत्तचरणीं भाव निमाला । पूर्ण स्थिति बाणली ॥ ३ ॥ ( द. प्रे. ल. ३२५ )

याप्रमाणे श्रीपंतांच्या आत्मानुभवाचें वर्णन केलें खरें, पण एक नित्य परिपूर्ण वस्तुच ओतप्रोत भरलेली असल्यामुळें " मी अद्वैत स्थितीचा अनुभव घेतों " ही भाषा अगर ही नुसती कल्पनाहि तेथें सहन होत नाहीं. म्हणून " ब्रह्मात्म्यैक्यबोधानुभव । सहज स्थितीनें जाळूं " ( द. प्रे. ल. २६९१ ); "दत्त गुरूचा अनुभव विरला ब्रह्मानंदडोहीं " ( द. प्रे. ल. ५१५ ) असे त्यांनीं उद्गार काढले आहेत. आणि ब्रह्मात्म्यैक्य–बोधाचा अनुभव सहज स्थितीनें जळून गेला किंवा ब्रह्मानंदडोहांत विरून गेला म्हणजे काय स्थिति होते तिचें त्यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे, " सच्चित्सुखसागरीं । अहं लवण–मीन भीतरीं" ( द. प्रे. ल. १४१३ ) व " लवण-मत्स्य जळीं विरला । तैसा दत्त स्वरूपीं निमला " (द. प्रे. ल. ४९७) ' म्हणजे मिठाचा बनलेला मासा जिवंत आहे असें मानिलें तरी तो मिठाचा असल्यामुळें पाण्यात गेल्याबरोबर विरून जातो; तसा दत्त हा दिसत असला तरी स्वरूपीं निमला म्हणजे समरस झाला आहे ' असें ते सांगतात व पद १०८४ मध्यें हाच अर्थ त्यांनीं पुढीलप्रमाणें स्पष्ट केला आहे.

" ब्रह्मसागरीं लवण–मीन मी। असुनी नाहीं झालों " आणि हा अनुभव पद १४१ मध्यें अधिक स्पष्टपणें व खुलासेवार सांगितला आहे. तो असा " सद्गुरूसी गेलों शरण। तेणें मरण निवारिलें ॥ धृ० ॥ शून्यातीत शुद्ध ज्ञान। देउनी केलें समाधान ॥ १ ॥ " म्हणजे ' सद्गुरूला शरण गेल्यावर त्यानें माझें मरण नाहींसें करून मला अमर केलें व शून्याच्या पलीकडील म्हणजे ज्याचें वाणीला वर्णन करितां येत नाहीं आणि मनाला आकलन होत नाहीं असें शुद्ध ज्ञान देऊन माझें समाधान केलें; पण ' मला समाधान झालें,' ' मला शांति प्राप्त झाली, ' ' मला ज्ञान प्राप्त झालें ' ही जो जाणीव तीहि उरूं न देतां त्या जाणिवेला साक्षी जो मी त्याचाच सद्गुरूनें फडशा उडवून टाकिला.' तो असा कीं " अनुभवाचा ठाव गेला। शब्दातीत बोल उरला ॥ २ ॥ " म्हणजे ' अनुभवाचा ठाव जो मीपणा तोच नाहींसा झाला; पण तो नाहींसा झाल्यावर जो शब्द निघतो त्याची वाट काय ? असें कोणीं म्हणेल तर तो "शब्दातीत बोल" उरलेला आहे हें त्याला उत्तर होय' असें ते सांगतात. वरें, तसें म्हटलें तरी "उरला"हें तरी कोणीं व कसें म्हणावयाचें ? असें कोणी विचारील तर श्रीपंत पुढें म्हणतात " उरला नुरला म्हणतां नये। हीच सोय मौनाची ॥३॥" (द.प्रे.ल.१४१) म्हणजे 'अशा स्थितींत जो " बोल" येतो त्याला 'उरला' म्हणतां येत नाहीं व नुरलाहि म्हणतां येत नाहीं. तेव्हां मौन धरणें वरें व हीच मौनाची सोय म्हणजे मौनाची स्थिति होय;' आणि बोल निघत असूनहि जशी मौनाची स्थिति कायम आहे त्याचप्रमाणें " दीन दत्त मरुनी उरला। बाळचरणीं अखंडीत ॥ ४ ॥ " (द. प्रे. ल. १४१) म्हणजे ' दीन दत्त मरून उरला म्हणजे अमर होऊन अखंड सद्गुरु बाळचरणीं वस्ति करून राहिला' असें श्रीपंतांनीं आपल्या जीविताचें वर्म सांगितलें आहे. तसेंच द्वैताचा अत्यंताभाव असूनहि जीव शिव, बंध मोक्ष, ज्ञान अज्ञान वगैरे द्वंद्वांचा जो अनिर्वचनीय खेळ नजरे पडतो तो पाहून " मौन शब्दांतें व्यालें। अक्रिय क्रिया करूं लागलें ॥ धृ० ॥ शुद्ध ब्रम्ह जीव झालें। बोधासाठीं तळमळलें ॥ १ ॥ सूर्या गडद हो पडलें। म्हणूनी शास्त्र–दिवे लाविले ॥२॥ दत्ता नवल हें जाहलें। ब्रम्हानंद–स्फुरण उठलें ॥३॥ " ( द. प्रे. ल. १०२३ )अशा प्रकारचें नवल त्यांनीं वारंवार प्रगट केलें आहे. उदाहरणार्थ दत्तप्रेमलहरींतील पुढील पदें पाहावीं:—१६१, १६२, ६४९, ७०३, ७४५, ७७१, ८०२, ८५३, ९५१, १०१७, १०२३,११२५,१४६८,१४९३,१७०४, १९२२,२२११ वगैरे. अशा प्रकारचे उद्गार म्हणजे ब्रम्हानंदसेवनानें पूर्ण तृप्त झालेल्या आत्मरति, आत्मक्रीड पुरुषांची करमणूक होय. मौनच जर शब्दाला व्यालें आणि अक्रियच क्रिया करूं लागलें तर मग ही आत्मक्रीडा अथवा करमणूक करण्यांत कसर कां ? म्हणून श्रीपंत म्हणतात " वाचामनातीत अनुभव माझा केवीं बोलुनी दावूं। मौनमुद्रा धारण करुनी सद्गुरुगुण गावूं ॥ धृ० ॥ " (द.प्रे.ल.१०४७) 'म्हणजे अनुभव पाहावा तर वाचामनातीत, तेव्हां तो बोलून दाखविणार कसा ? पण मौनाची मुद्रा धारण करून सद्गुरूचे गुण गाऊं या म्हणजे त्यांत सर्व आलें ' असें त्यांनीं म्हटलें आहे. हें गुणगान म्हणजे आत्मभजनच असून त्यांत सिद्धांत, अनुभव व करमणूक हीं सर्वच साधतात असा याचा

भावार्थ आहे व " मौन पिउनी बोलतों। अक्रिय सदा क्रिया करितों " ( द. प्रे ल. ९५८ ) असा त्यांनीं आपला अनुभव सांगितला आहे.

श्रीपंतांचीं पदें, त्यांचे लेख व बोल यांच्या रूपानें त्यांनीं जो वाग्विलास केला तो या थाटांतील होय. श्रीज्ञानदेवांच्या अमृतानुभव, चांगदेव-पासष्टी वगैरे ग्रंथांशीं ज्यांचा चांगला परिचय असेल त्यांना या अपूर्व नवलाईचें मर्म सहज समजून येईल.

## " जग म्हणजे चिद्विलास "

" सर्वं खल्विदं ब्रम्ह ", " एकमेवाद्वितीयम् ब्रम्ह ", "नेहनानास्ति किंचन" या श्रुतिवचनांप्रमाणें एकच परब्रम्ह वस्तु नित्य व परिपूर्ण आहे असें निश्चित झालें तरी प्रत्येक जीवाला जें द्वैत अगर अनेकत्व प्रतीत होत आहे त्याची वाट काय? म्हणजे तें कां भासतें? हा प्रश्न शिल्लक राहातोच. त्याचा खुलासा श्रुतिमाउलीनें पुढील वचनांनीं केला आहे " सोऽकामयत। बहुस्यां प्रजायेयेति " ( तै. २-६) [ त्या ( जगत्कारण ) आत्म्याला ' मी पुष्कळ व्हावें, प्रजा उत्पन्न करावी ' अशी इच्छा झाली ]; " तदैक्षत बहुस्यां प्रजायेयेति " ( छा. ६-२-३ ) [ ( एक अद्वितीय असें जें सत् ) त्यानें पाहिलें कीं ' मी बहुत व्हावें, प्रजा उत्पन्न करावी ]; " स वै नैव रेमे तस्मादेकाकी न रमते स द्वितीयमैच्छत् " ( बृ. १-४-३ ) [ त्या प्रजापतीला ( दुसरी वस्तुच नसल्यामुळें) रममाण होतां आलें नाहीं. म्हणून अद्यापहि एकट्या मनुष्याला रममाण होतां येत नाहीं; त्याला दुसऱ्याची [ जोडीदाराची ] इच्छा उत्पन्न झाली ] वगैरे; म्हणजे एकत्वीं प्रेमभोग नसल्यामुळें एक परब्रम्हच प्रेमभोगार्थ आपणच अनेक रूपांनीं भासूं लागलें अगर नटलें असून हा द्वैतसोंगाचा अनाद्यनंत खेळ चालला आहे. एकाच सद्वस्तूच्या आत्मविलासाचें श्रीपंतांनीं आपल्या वाङ्मयांत वारंवार वर्णन केलें आहे व "परब्रह्माचि विश्व झालें। प्रेमार्थ दोन भासलें " ( द. प्रे ४७२ ); " एकचि अनेक रूपें विलसे। नाहीं भेदाभेद " ( द. प्रे. ल. २४१२ ) ; " ब्रह्मरूपें त्रिपुटी दिसली। विश्व नोहे चैतन्यकेलि " ( द. प्रे. ल. १७६५) अशा प्रकारचीं शेकडों वचनें त्यांच्या वाङ्मयांत आढळतात. लीला, खेळ, अगर विलास करावयाचा म्हणजे दुसरें पाहिजे. त्याशिवाय प्रेमभोग संभवत नाहीं. पण जेथें एकच एक तेथें दुसरें आणणार कोठून? म्हणून आपणच देव आपणच भक्त, आपणच शिव आपणच शक्ति, आपणच सत्ता आपणच स्फूर्ति, आपणच गुरु आपणच शिष्य बनून परब्रह्मरूप सद्गुरूनें हा अनाद्यनंत खेळ अथवा आत्मविलास चालविला आहे व तो अशा शिताफीनें कीं त्यायोगें अद्वैताला बाध येऊं नये. म्हणून श्रीपंत म्हणतात " देव भक्त हा आपणची होऊनी। खेळे आनंदभुवनीं। झाला सर्वहि कांहीं न होऊनी। प्रेमळ भक्तजननी। वेदां न वळे हो सद्गुरूची लीला ॥१॥" (द.प्रे.ल.३३०)म्हणजे 'कांहीं न होऊन सर्व झाला व आपणच देव आणि भक्त बनून आनंदभुवनीं खेळ खेळला. ही सद्गुरूची लीला वेदानांहि अनाकळ आहे' अशा अर्थाचीं त्यांचीं शेकडों वचनें आहेत. त्यांपैकीं कांहीं येथें देत आहोंत. तीं अशीं:—" चैतन्याची लीला

सहज जगभास झाला ॥ नाहीं हानी चैतन्यासी चिद्विलास भासला ॥ " ( द. प्रे. ल. १२१५ ); " चिद्विलासमात्रें सगुण तेंची झालें । एकची अनंत रूपें सहज भासलें । निजप्रेम भोगाया देव भक्त झालें । सर्वत्र असूनि नाहीं कोणा दिसलें " (द. प्रे. ल. २३७); " एकाकी न रमते म्हणूनी । प्रेमास्तव विश्व बनुनी । गुरु शिष्य स्वयें होउनी । प्रगट केलें दत्तानंदा" (द. प्रे. ल. १७६५); " एकीं अनेक दाविली लीला । एकपणेंसी नाहीं विकरला ॥ १ ॥ स्वानंदीं स्वानंद दाटला । शिवशक्तिरूपें सहजीं नटला " (द. प्रे. ल. १७६६); " सत्ताची स्फूर्ति । दत्त अवधूतमूर्ति ॥ धृ० ॥ सत्तारूपें शिवची असे । विलास ती शक्ति " ( द. प्रे. ल. १६२२ ); " व्यतिरेकान्वयें पाहातां दृष्टि । ब्रह्मचि दिशा दाहीरे ॥ १ ॥ सत्ता स्फूर्ति विलसे त्रैमूर्ति । खेळ चिद्विलासडोहीरे ॥ २ ॥ " (द. प्रे. ल. २५९२ ); या ठिकाणीं सत्तास्फूर्तिरूपानें त्रैमूर्ति श्रीदत्तात्रेयच विलसत आहेत असे श्रीपंतांनीं म्हटलें आहे. तसेंच हा जो चिच्छक्तीचा विलास चालला आहे त्यासंबंधीं दत्तप्रेमलहरी पद २५९३ मध्यें "चिद्विलास दिसतें विश्व । हींची दैवी मायारे " असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

जग हें केवळ आत्म्याचा स्फूर्तिविलास आहे, तें ब्रह्मरूपच आहे; पण ज्याप्रमाणें सोन्याचा गणपति, कंकण, म्हसोबा, भवानी वगैरे केलीं तरी सोनेंच असतें त्याप्रमाणें शब्दाच्या सोईकरितां, व्यवहाराकरितां जग निराळें मानिलें तरी वस्तुस्वभाव भिन्न झाला नाहीं; सत्तारूपी सूर्याचा तो किरणपुंज आहे; तें असृष्ट, सहज चिद्विलास आहे; सहज स्फुरण हा सत्तेचा परमानंदस्वभावच आहे; सत्ता ही पूर्ण व अखंडरसच आहे; अहं म्हणजे सत्तेंतून निघालेला अंकुर अथवा चिद्विलासस्फुरण आहे; कर्ता मुळींच नाहीं; होणें जाणें सर्व सद्‌गुरूची लीला होय; जीवदशा हें चिच्छक्तिविलासाचें नाव; बदल होणें हाच अनंत चिच्छक्तिविलास; जन्म म्हणजे आनंदाचीच स्फूर्ति होय; सद्‌गुरु सत्तास्फूर्तिरूप असून शिष्याचा अभिमान हा सद्‌गुरूचाच चिद्विलास होय; बरें वाईट कांहींहि असलें तरी तो चिद्विलासच; द्रष्टा-दृश्य-दर्शन-त्रिपुटीरूपानें सत्ता-स्फूर्तीचा, शिवशक्तीचाच खेळ भासतो. अशा प्रकारें आपल्यासह सर्व विश्व म्हणजे चिद्विलास आहे हा सिद्धांत श्रीपंतांना पूर्ण ठसून तो इतका अंगभूत झाला होता कीं तो त्यांच्या सहजोद्गारांत वारंवार व्यक्त होत असे व त्यांचें सर्व वाङ्मय या गोष्टीची स्पष्ट साक्ष देत आहे. तरी पण त्यांतल्या त्यांत श्रीदत्त-प्रेम-लहरींतील पदें हीं " आत्मरंगीं पूर्ण रंगुनी । भजन करीं नित्यरे " ( द. प्रे. ल. १३३ ) या थाटांत झालेलीं असल्यामुळें त्यांच्यामध्यें ' जग चिद्विलास ' या सिद्धांताचीं निदर्शक वचनें इतकीं विपुल आहेत कीं श्रीदत्त-प्रेम-लहरी मधील २७३० पदांपैकीं निदान २५०० पदांत तरी, या नाहीं त्या रूपानें, हा अनुभव व्यक्त झाला आहे आणि हीं पदें एकाच वेळीं अथवा एक दोन वर्षांच्या अवधींत झालेलीं नसून तीं सुमारें बावीस तेवीस वर्षें मधुन मधुन होत होतीं ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्या कालावधींत श्रीपंतांची जगाकडे पाहाण्याची अन्वय-दृष्टि, चिद्विलास-दृष्टि अथवा अद्वैत-बोध-दृष्टि किती स्थिरावली होती याची साक्ष पटते.

अहं हें आत्मारूपी सत्तेचें स्फुरण अथवा चिद्विलाससागरांत चंचलपणें वावरणारा फेण अगर जलबिंदु असून, स्फुरणा-अलिकडे म्हणजे स्फुरणाच्या पुढें अनेकत्व दिसणें, चिद्विलासत्व सहजी अक्रिय, अकृत्रिम खेळ चालला आहे हें पाहाणें, हा अनुभव घेणें; त्यांत समरस होणें म्हणजेच अकृत्रिम व अति श्रेष्ठ अनन्यभक्ति, निरभिमान भक्ति, सद्गुरु-भक्ति; यालाच अखंड प्रेम म्हणतात; हा शोधच सद्गुरुसेवा व इकडे अंतःकरण वळणें म्हणजेच ज्ञानानुभव घेणें होय असें श्रीपंतांचें सांगणें असे व सद्गुरूनें दिव्य दृष्टि दिल्याशिवाय, त्याच्या कृपेनें ज्ञाननेत्र उघडल्याशिवाय हा अनिवर्चनीय चिच्छक्तिविलास नजरेस पडणार नाहीं. नुसतें शास्त्र-पठण हें भ्रामक होय. पण सद्गुरुकृपेनें अनुभव मिळाल्यावर तींच शास्त्रे अनुकूल व उपयोगी होतात. म्हणून स्वरूपानुभवास व चिद्विला-सरूपी विश्वाचें गारूड उकलण्यास सद्गुरुकृपेशिवाय व संतसंगाशिवाय दुसरा उपाय नाहीं असें ते सांगत आणि " गुरुविण कोटी साधनें करितां । न मिळे निजशांति " ( द. प्रे. ल. १७४२ ); " श्रुत्यागम पढुनी शहाणा । स्वरूपीं दुरावला । अनन्य भजतां दत्तचरण ब्रम्हानंदीं भरला " ( द. प्रे. ल. ११०१ ); " कृपा गुरूची होय जरी तरी प्राप्त निज-शांति । गुरुविण आत्मप्राप्ति नोहे न फिटे भवभ्रांति ॥ ध्रु० ॥ पढुनी पढविती उपनिषदें सदा बद्ध आपणां मानिती । तत्त्वमसि बोध ऐकुनी मोक्षेच्छा धरिती ॥ १ ॥ देहचतुष्टय कोशपंचक निवाडा करिती । अयमात्मा ब्रम्ह ह्मणूनि साधनीं भ्रमती ॥ २ ॥ अध्यारोप अपवादानें प्रत्यगात्मा म्हणती । सोहं सोहं मंत्र पढूनी ब्रम्ह नित्य शोधिती ॥ ३ ॥ प्रज्ञानं ब्रम्ह श्रुति वदूनी अज्ञान कल्पिती । स्वयंप्रकाश स्वरूपस्थिति सिद्धची नेणती ॥ ४ ॥ सच्चिदानंद ब्रम्ह विलसे भिन्न न जगस्थिति । बालावधूत दत्तभजनीं समाधि भोगिती ॥ ५ ॥ " ( द. प्रे. ल. १३१४ )

## गुरुप्रेम

" सर्वं खल्विदं ब्रह्म " हा पूर्णाद्वैत बोध ठसला, " जग चिद्विलास " ही दृष्टि स्थिर झाली म्हणजे साक्षित्व लोपून भोक्ता भोग्य व भोगरूपी त्रिपुटी मावळून समरसानं-दाचा अथवा सद्गुरुप्रेमाचा अनुभव येतो. जाणीव जोंपर्यंत आहे तोंपर्यंत निर्भेळ, शुद्ध व मी-तूंविरहित प्रेमाचा अनुभव शक्य नाहीं. कारण सुखोपभोगांत थोडी जरी जाणीव उत्पन्न झाली तरी ती त्या सुखाच्या एकजिनसीपणाला थोडें तरी गौणत्व आणिते. पण जेव्हां साक्षीचेहि भान न राहातां आपली आवड केवळ आत्मनिष्ठ होते तेव्हां जो प्रेम-प्रत्यय येतो तेंच खरें गुरुप्रेम अथवा निजप्रेम होय. त्या समरस प्रेमापुढें इतर सर्व आनंद तुच्छ होत. वैषयिक आनंद हे तर क्षणिक व दुःखपर्यवसायी आहेतच. पण योगसाधनानें सिद्ध झालेल्या समाधींतील आनंदहि या शुद्ध प्रेमापुढें फिक्का पडतो. कारण त्याच्यांत, सूक्ष्म प्रमाणांत कां होईना, पण साक्षित्वभाव असतो. पण शुद्ध प्रेमाच्या ठिकाणीं तितकें साक्षित्वहि सहन होत नाहीं. हें शुद्ध व अनिमित्त प्रेम अवीट आहे. त्याची कधीं तृप्ति होणें नाहीं. भक्ताच्या अंतःकरणाची देवाकडे एकसारखी ओढ लागणें

हेंच त्याचें व्यक्त रूप होय. प्रेमाची पूर्ण तृप्ति न झाल्यामुळें अंतःकरणाला लागणारी तळमळ हींच ती ओढ होय. या तळमळीसंबंधीं श्रीपंतांनीं असें म्हटलें आहे कीं " तळमळ नोहे चिद्विलास करि तूं नेणसी । तळमळ चित्ता म्हणूनी स्वरूपा सहज भेटलासी " ( द प्रे. ल. १२४५ ). भक्ताच्या अंतःकरणाला तळमळ लागून त्याच्या चित्ताची ओढ सद्गुरूकडे लागणें व त्याला निर्मळ प्रेमसुखाची प्राप्ति होऊन अधिकाधिक प्रेमसुखाची आवड अथवा आस उत्पन्न होणें हाच " गुरुभक्तांचा सोहळा " होय. हा सोहळा मनमुराद भोगणें हेंच जीवन्मुक्तिवैभव होय व त्याचीच सर्व संत, जीवन्मुक्त अपेक्षा करितात. श्रीपंतांच्या ठिकाणीं ही तळमळ सद्गुरूचा वियोग झाल्यापासूनच उत्पन्न झाली होती व ही गोष्ट त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितली आहे " श्रीशैल्ययात्रामिसें सद्गुरु गेला । तळमळभाव भक्तमनीं उदेला " (द. प्रे. ल. १५९६). या तळमळ–भावांतच त्यांच्या अंतःकरणांतील गुरुप्रेमझऱ्याचा उगम झाला. या प्रेमाचा आणखी एक विशेष असा आहे कीं तें ग्रंथ वाचून अगर इतर साधनें करून मिळणें नाहीं. संतमेळीं खेळल्याशिवाय व प्रेमकल्लोळीं लोळल्याशिवाय तें मिळणें नाहीं व वृद्धिंगत होणें नाहीं. म्हणून श्रीपंतांनीं " भूक ती प्रेमाची लोळूं संतद्वारीं । अंतकासी हारी न वचूं कदा ॥ ३ ॥ मुक्तीसीहि मागें सारूनी नाचतों । दत्तचीं भजतों अहर्निशीं ॥ ४ ॥ " ( द. प्रे. ल. १२११ ) असें म्हटलें आहे व " खेळूं दे मज संतमेळीं । लोळूं दे सदा प्रेमकल्लोळीं ॥ २ ॥ " ( द. प्रे. ल. २३२ ), अशी सद्गुरूकडे मागणी केली आहे.

## अत्युत्कट भक्ति व भावनांची तीव्रता

श्रीपंतांच्या भावना अत्यंत तीव्र असल्यामुळें त्यांची भक्ति अत्युत्कट होती व प्रेमहि खुळें होतें. अत्युत्कट प्रेमाचा व भक्तीचा हा एक विशेष आहे कीं तीं व्यक्त करितांना साधे शब्द वापरून भक्ताचें मुळींच समाधान होत नाहीं. त्याला आपल्या मनांतील भाव व्यक्त करण्याकरितां शेलक्या शब्दांचा उपयोग करावा लागतो. त्यामुळें श्रीपंतांच्या वाङ्मयांत अंतःकरणांतील भावनांची अत्यंत तीव्रता दर्शविणारे शब्द वारंवार आले आहेत. उदाहरणार्थ " वेडा मी झालों । गुरुपदीं नित्य मी लोळलों ॥धृ०॥ स्थूल सूक्ष्म कारण फाडुनी महाकारणीं रिघलों ॥१॥ आपपर नाठवे सदा बेशुद्ध । गुरुनाम वडबडलों ॥२॥" ( द. प्रे. ल. १०४० ); " वेड लागलें निरंजनाचें । चाळे करितों गुरुभजनाचे ॥ धृ० ॥ मस्तकीं चढलें गुरुप्रेम । निःशंक जल्पतों गुरुनाम । ॥ १ ॥ " ( द. प्रे. ल. २३८ ). या ठिकाणीं वेडा होऊन आपपरभाव विसरल्यानें बेशुद्ध स्थितींत गुरुनाम बडबडणें व निरंजनाच्या वेडांत गुरुभजनाचे चाळे करीत गुरुप्रेममस्तींत गुरुनाम जल्पणें हें अहंभावाचा पूर्ण निरास झाल्याशिवाय होणें नाहीं हें उघडच आहे. त्याचप्रमाणें छंद, नाद, व्यसन, पिसेपण हे शब्द त्यांनीं वारंवार वापरले आहेत. उदाहरणार्थः—" छंद गुरूचा लागला । अहंभाव समूळ गेला ॥धृ०॥ नाठवे देह नाठवे गेह । नाठवे ममता मला ॥१॥" द. प्रे. ल. ९८४ ); " मला व्यसन लागलें गुरुप्रेमाचें ॥धृ०॥" ( द. प्रे. ल. २३९९ );

" गुरुप्रेमपिसें लागलें आज " (द. प्रे. ल. ६५०); " दत्त पिसावला रूपीं विसावला। निजीं घेतो नीज " ( द. प्रे. ल. १४६ ); " अज्ञ, सुज्ञ, पिसा नावें ठेविती । पाहुनी वाटते मौज " ( द. प्रे. ल. १६५ ); " ब्रह्मानंदें मस्त होऊनी सहज बरळतों । अवधूत-चरणां लोळतों " ( द. प्रे. ल. १०३६ ); " अमली मी जाहलों । गुरुप्रेम-अमली मी जाहलों " ( द. प्रे. ल. १०४९ ).

सर्वसाधारणपणें भक्त हा देवाच्या चरणांच्या ठिकाणीं आपलें मन स्थिर करून त्यांचेंच सदा ध्यान करितो. श्रीतुकाराममहाराजांनीं "चरणीं स्थिरावलें मन " असें म्हटलें आहे; तसेंच " तें ऋणशेष वाचा इयां । न फेडवेचि मरोनियां । तें पायां पडोनि मियां । सोडविलें" (अमृ. ३-३२) असें श्रीज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे व "दत्तगुरुपायीं चित्त स्थापन करी " ( द. प्रे. ल. ११२ ) आणि " भानची अर्पितां सद्गुरुपायीं । बोधऋण तें वेचे" ( द. प्रे. ल. ४६८ ) असें श्रीपंतांनींहि सांगितलें आहे. ज्ञानोत्तर भक्तीच्या भूमिकेंत गुरुचरणीं वस्ति करूनच सर्व जीवन्मुक्त भक्तिप्रेमसोहाळे भोगतात. श्रीपंतांच्या पदांत तर गुरुचरणमहिमा पदोपदीं वर्णिलेला आढळतो. पण त्यांत एक अशी मौज आढळते कीं सद्गुरूच्या चरणीं पडून राहिल्यानें आपल्याकडे जें नीचपण व सद्गुरूकडे थोरपण येतें तेवढ्यानें श्रीपंतांचें समाधान होण्यासारखें नव्हतें. म्हणून " सतत मी संतांचे । वाहीन मस्तकीं मोचे " ( द. प्रे. ल. ११८० ) असें म्हणून संतांचे मोचे मस्तकीं धारण कर-ण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली आणि " झाडीं चरण धूळ मस्तकीं आतां " ( द. प्रे. ल. ८७६ ) व " झाडीं चरणधूळ मस्तकीं माझ्या " ( द. प्रे. ल. ८८४ ) अशी सद्गुरूची प्रार्थना केली. पण सद्गुरूनें आपल्या मस्तकावर चरणधूळ झाडली तरी मस्तक तेवढें पावन होईल व धन्यता मानील; पण शरीराच्या बाकीच्या अंगांनीं काय अपराध केला आहे ? त्यांना गुरुचरणधूलिस्नान कां घडूं नये ? असें वाटून श्रीपंतांनीं " लोळेन धूळीं सर्व काळीं " असें म्हटलें व तसें केल्यानें सर्वांगाला कृतकृत्यता वाटेल असें दर्शविलें आणि हें अनुपम सुख भोगून तृप्तीचे ढेकर देत देत " अवधूतचरणीं लोळलोळुनी । अंग धुळीनें भरलें " ( द. प्रे. ल. १०४८ ) असे त्यांनीं धन्योद्गार काढले आहेत. तसेंच पूर्णाद्वैत सिद्धांत प्रतिपादन करणारे, आपल्या तीक्ष्ण बोधखड्गानें दुराराध्य शिष्यांचेहि ग्रंथीभेद व संशयछेद करणारे, आपल्या कृपाकटाक्षानें शेकडों भक्तांना अभय देऊन धन्य करणारे आणि " सहजचि येणें सहजचि जाणें । काय तुला भजणें " ( द. प्रे. ल. २३२३ ) अशी नास्तिकाला शोभ-ण्यासारखी भाषा वापरून त्रिभुवनचालक सद्गुरूला सलगीनें बजावणारे अथवा हिणवणारे श्रीपंत " मस्तकीं धरुनी गुरुपदधूळ । मुक्तस्थिति वर्ततों " ( द. प्रे. ल. ७४६ ) असें आपल्या वर्तनाचें रहस्य सांगतात. हा देखावा खरोखरच अपूर्व व रम्य होय ! पूर्णा-द्वैत बोध, अभेद भक्ति, जगचिद्विलास ही अनुभव-दृष्टि व सद्गुरुचरणीं परमावधीची अचल प्रीति हेंच अद्वैत-भक्ति-रहस्य होय. या रहस्याचा उलगडा नुसत्या कल्पनेनें अगर तर्कानें होणें शक्य नाहीं. सर्व जगाला दिव्य अद्वैत बोध व अभेद भक्तीचें रहस्य व

जग चिद्विलास हा स्वानुभव सिद्धांत विशद करून दाखविणारे श्रीज्ञानेश्वर " ज्ञानियांचे राजे " जेव्हां श्रीमद्भगवद्गीतेंतील अ. १३–७ मधील " आचार्योपासनम् " या शब्दावर व्याख्यान ( ज्ञा. १३–३६९–४६१ ) करूं लागले तेव्हां ते ज्ञान वगैरे सर्व जणूं विसरून गेले व त्यांच्या अंतःकरणांतील भक्तिरसाचे पाट आपोआप बेफामपणें वाहूं लागले आणि विविध प्रकारांनीं सद्गुरूची उपासना अथवा सेवा म्हणजे काय तें त्यांनीं सांगितलें. तोच प्रकार ए. भा. १२–२४ मधील " गुरूपासना " व " एकभक्ति " या शब्दांवर व्याख्यान करितांना एकनाथांचा झाला आणि " गुरुपादनिरीक्षणात् " हा शब्द पुढें येतांच लेखनाकरितां पुढें घेतलेला " निःसंशय हो निरंजन मिळेल " हा विषय बाजूला राहून प्रकरण १८ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें, श्रीपंत जे वाहवले ते गुरुरहस्याचेंच वर्णन करीत सुटले. याचें इंगित अनुभवानेंच समजावयाचें !

अंतःकरणांतील भक्तिप्रेमाच्या भावनांची तीव्रता अथवा अत्युत्कटता हेंच भक्तिप्रेम-रहस्य होय. ही तीव्रता जितकी अधिक तितके भक्तिप्रेमाचे गोड अनुभव अधिक बहारीचे. अशी तीव्रता स्वामी रामकृष्ण परमहंस व श्रीगौरांगचैतन्य यांच्या ठिकाणीं परमावधीला पोचली होती. श्रीपंतांच्या बाबतींत ही तीव्रता फार विलक्षण होती. कित्येक वेळां त्यांना सद्गुरु बालावधूतांची आठवण होऊन ते देहभान विसरून जात व त्या निर्भान स्थितींत त्यांना प्रत्यक्ष सद्गुरुच पुढें दिसत असे. अशा कांहीं प्रसंगीं ती मूर्ति पाहात असतांना त्यांनीं त्या मूर्तीचें वर्णन केल्याचीं उदाहरणें मागें आलेलींच आहेत. बाळेकुंद्री येथील आपल्या घराच्या ओटीवर भर दिवसा जागेपणीं श्रीपंतांना जी मूर्ति दिसली तिचें त्याच वेळीं त्यांनीं " राजयोगी धुरंधर बाल दिगंबर दर्शनें धन्य मी झालों " ( द. प्रे. ल. ३० ) हें पद म्हणून वर्णन केल्याचा प्रकरण १९ मध्यें उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें " अवधूत देखियला। प्रेमाचा अमल भला चढला " (द. प्रे. ल. १५३) हें पद केव्हां झालें त्याचाहि प्रकरण १९ मध्यें उल्लेख केला आहे. तसेंच प्रकरण १७ मध्यें सद्गुरूच्या वियोगदुःखानें विव्हल होऊन " प्राण देतों निर्धार झाला " असें म्हणून जेव्हां श्रीपंतांनीं भजन म्हणतांना निर्भान स्थितींत जमिनीवर अंग टाकिलें तेव्हां सद्गुरूनें प्रत्यक्ष दर्शन देऊन " सुकल्या अंकुरा पाऊस आला। तप्त मीन जळीं लोटला। तैसा दत्त शांत झाला। धांवत धांवत बाळ आला " ( द. प्रे. ल. २१ ) असा प्रकार झाला व लगेच "सद्गुरु बालमुकुंद आला। प्रेमें कवटाळूं त्याला" ( द. प्रे. ल. २२ ) हे पद म्हणून ते त्यांच्या स्वागताला कसे तयार झाले तें सांगितलें आहे. तसेंच एके दिवशीं सकाळीं कांहीं मंडळीसह ते फिरावयास गेले असतां समोर दिसणाऱ्या टेकडीवर त्यांना सद्गुरूचें दर्शन होऊन त्यांनीं " ब्रह्मगिरीवरी आजि देखिला। दत्त अविनाशी" ( द. प्रे. ल. २५१३) हें पद म्हटल्याचा प्रकरण ४० मध्यें उल्लेख केला आहे. श्रीपंतांच्या तन्मयतेच्या स्थितींत असा प्रकार पुष्कळ वेळां होत असे. तन्मयतेच्या स्थितींत झालेल्या सगुण मूर्तीच्या दर्शनाचा हा प्रकार झाला. असाच प्रकार सद्गुरूच्या व्यापक स्वरूपाशीं त्यांची तन्मयता झाल्यावेळीं होत असे. याचा एक मासला पुढील पदांत पहावयास सापडतो.

" अद्वैताचें व्यसन लागलें। न सुचे व्यवहार। झाली वृत्ति अनावर ॥ धृ० ॥ मी माझें समूळ हारपलें। नाहीं आपपर। गुरुमय झालें चराचर " ( द. प्रे. ल. २६८). कित्येक वेळां " बाळ " अथवा " माझा बाळप्पा " असे शब्द त्यांच्या तोंडून निघत व नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागत. भक्तीची तीव्रता जितकी अधिक तितका प्रेमकल्लोळ अधिक. मात्रा एकच; पण वळसे जितके अधिक तितकी ती अधिक गुणकारी. स्वतःचा पूर्ण विसर घडून आपल्या आराध्य दैवताशीं तन्मय होऊन जाणें हीच नवविधा भक्तीपैकीं अखेरची म्हणजे " आत्मनिवेदन " भक्ति होय. स्वतःचा पूर्ण विसर पडल्याशिवाय म्हणजे आत्मार्पण झाल्याशिवाय भक्ति खरी होत नाहीं. म्हणून श्रीपंत म्हणतात "कर्तृत्वाचा भाव धरितां। तळमळची चित्ता ॥ १ ॥ × × आत्मनिवेदन भावें करितां। प्रेमसुख दत्ता ॥३॥" ( द. प्रे. ल. ६३४ ).

## ' गुरुशिष्यभक्तीपोटीं ब्रह्मानंद लाळ घोटी "

अशा तन्मयतेच्या स्थितींत ज्या अत्युत्कट भक्तिप्रेमाच्या भावना भक्ताच्या अंतःकरणांत उठतात त्या त्याला स्वस्थ बसूं देत नाहींत व तो लज्जा, भीति, शंका सोडून निरनिराळ्या भूमिकांवरून आपल्या आराध्य दैवताशीं खेळत असतो. कैवल्य स्थितींतील ब्रह्मानंद हा मधुर खरा, पण तो एकच एक म्हणजे एकतारीचा सूर असल्यामुळें त्यांत वैचित्र्य नसतें. त्यामुळें सतार, सारंगी अगर दिलरुबा यांचेवर वादनपटु कलावंतानें केलेल्या वहारीची सर नुसत्या एकातारीच्या सुराला येत नाहीं. म्हणून " गुरुशिष्यभक्तीपोटीं। ब्रह्मानंद लाळ घोटी " ( द. प्रे. ल. ६१४ ); " ब्रह्मानंद हा भुकेला। म्हणुनी सद्गुरुपदीं रमला " ( द. प्रे. ल. १०३२ ) असें म्हणून भक्तिप्रेमरंगापुढें ब्रह्मानंद फिका होय हें श्रीपंतांनीं दर्शविलें आहे. भक्तिप्रेमसुखांत वैचित्र्य असून शांतरसाच्या दिव्य प्रकाशांत वात्सल्य, दास्य, सख्य, मधुर वगैरे भिन्न भिन्न रस सेवन करण्यास मिळतात. त्यामुळें भक्त हा निरनिराळ्या भूमिकांवरून देवाशी खेळत असतो. ऐक्यप्रेमरूपी शांतभावाच्या प्रकाशांत श्रीपंतांनीं बालकाच्या भूमिकेवरून सद्गुरुमातेशीं भक्तालापाच्या रूपानें जो गोड प्रेमकलह केला त्याचें दिग्दर्शन प्रकरण २३ मध्यें केलेंच आहे. त्यांनीं आपल्या पदांतूनहि मातृ बालक, धेनु वत्स, हरिणी पाडस हीं उपमानें घेऊन गुरुशिष्यांमधील जिव्हाळ्याचा संबंध वारंवार व्यक्त केला आहे. त्यांतल्यात्यांत " मी बाळ तूं जननी। सद्गुरु ॥ धृ० ॥ कुरवाळूनी घेई गे पदरीं। लावीं प्रेमस्तनीं ॥ १ ॥ " ( द. प्रे. ल. २०७ ); " सद्गुरुमाय मी बाळ। सदा पुरवी माझी आळ ॥ धृ० ॥ प्रेमस्तन पाजिते। आपुल्या पदरा झाकिते ॥ १ ॥ " ( द. प्रे. ल. २१३५ ) व " किती प्रेमळ सद्गुरु आई ॥ धृ० ॥ " ( द. प्रे. ल. २१८१ ) वगैरे प्रकारचे आलाप काढून त्यांनीं सद्गुरूला वारंवार आळविलें आहे व त्याच्या वात्सल्यप्रेमाची याचना केली आहे. त्यांतल्यात्यांत सासरा कंटाळून आपल्या आईला भेटण्याच्या आतुरतेनें माहेरीं जाणाऱ्या बालिकेच्या भूमिकेवरून म्हटलेलीं " माहेरा

जातें मी सद्गुरुघरा " ( द. प्रे. ल. २८१ ) वगैरे पदें फारच बहारीचीं आणि हृदयंगम आहेत व त्यांचा प्रकरण ३७ मध्यें प्रामुख्यानें उल्लेख केलेलाच आहे. त्याचप्रमाणें सेवकाच्या भूमिकेवरून म्हटलेल्या " मी गुलाम, मी गुलाम, मी गुलाम तुझा " ( द. प्रे. ल. १८२१ ); " अज्ञ अधीर दीन पामर पाइक मी तुझा " ( द. प्रे. ल. २४६८ ); " बटकि मी आजी झालें सद्गुरुघरची " ( द. प्रे. ल. २६६ ) वगैरे पदांत दास्यभाव व्यक्त झालेला आहे.

बरोबरीच्या नात्यानें सद्गुरूबरोबर प्रेमाची कुस्ती खेळणाऱ्या मित्राची भूमिका घेऊन म्हटलेल्या " गुरुसवें धरिली आजि कुस्ती रे । प्रेमाची चढली मज मस्ती " ( द. प्रे. ल. ४०८); " निष्ठुर माझा सद्गुरु पाहीं । घेतला माझा जीव ॥धृ०॥ त्रिभुवनीं हा कृपण पाहीं । नुरवी द्वैतवैभव ॥१॥ एकानेकविरहित प्रभु । हरिलें रूपनाव ॥२॥ मीतूंपणाचा घातचि केला । नकळे दत्तमाव ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ३२६ ) वगैरे पदांत सख्यभाव व परमावधीची सलगी हीं व्यक्त झालीं आहेत. दीर्घ विरहानंतर सद्गुरुसंग झाल्यानें प्रेमपिशी झालेल्या विरहिणीच्या भूमिकेवरून म्हटलेल्या "धन्य दैव सद्गुरुसंग मज घडला । वेडी झालें न सुचे व्यवहार मजला " ( द. प्रे. ल. २८३ ) या पदांत व " घररिघी झालें संतांच्या घरची " (द. प्रे. ल. ४४१); " निर्गुण पुरुष मी आजी देखियला । गुह्य प्रगटुनी मजसी मिळाला ॥ धृ० ॥ × × लाज भय शंका समूळ गेली । माय बंधु भगिनी दूर तीं झालीं । वृत्ति गुरुपदीं पूर्ण निवाली । अहंममता ठायीं हरपली । नावडे जन संसार मजला ॥ २ ॥ पाहिजे सदा तोची जवळी । प्राण गेल्याहि न राहें निराळी । भुललें जेवीं भ्रमरी कमलीं । अखंड लोळतें गुरुचरणधूळीं । दत्तभजनीं प्रेमपूर लोटला ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. २८४ ) वगैरे पदांत मधुर भाव उत्कटतेनें व्यक्त झाला आहे. आपल्या ठिकाणीं ही मधुर भावाची भक्ति कशी अखंड चालली आहे तें श्रीपंत पुढीलप्रमाणें सांगतात " शिव शक्ति माझा मीचि । नित्य व्यवहार पूजा साची ॥ धृं० ॥ नित्य मंगल आत्मा शिव । बुद्धि पार्वती पतिव्रताची ॥ १ ॥ " ( द. प्रे. ल. १२७१ ). त्याचप्रमाणें " ॐ शांतिः शांतिः शांतिः । एकानेकीं नांदते शांति ॥ धृ० ॥ भिन्नाभिन्न दिसते शांति । गुरुशिष्यबोध शांति ॥ १ ॥ बंधन शांति मुक्ति शांति । कैवल्याचे ठायीं शांति ॥२॥ ज्ञानाज्ञान आपण शांति । दत्तावधूतप्रेम शांति ॥३॥" ( द. प्रे. ल. १६३६ ); " शांति शांति शांति । दिधली गुरूनें निजशांति " ( द. प्रे. ल. ११९१ ); " निजशांतीचे भोक्ते आम्ही गुरुदास । समाधीची आस नाहीं आम्हां " ( द. प्रे. ल. १२११ ); " अंतरीं बाहेरीं मीचि विलसें । कोणा पूजूं कोणा ध्याऊं" ( द. प्रे. ल. ४६० ) वगैरेंसारख्या शेकडों पदांत शांतरस ओतप्रोत भरलेला आहे. श्रीपंतांसारख्या ज्ञाननिर्धाला गारुड्याबरोबरच्या हुंडीबागाची, वत्साची, श्वानाची, पाडसाची, जळाबाहेर पडून तडफडणाऱ्या जलचराची अशा निरनिराळ्या भूमिकांवरून सदगुरूची करुणा भाकितांना अगर त्याच्याशीं खेळतांना पाहिलें म्हणजे त्यांच्या अंतःकरणाची खरी साक्ष पटते आणि रसिक व भक्तिमान वाचकाला मोठें कौतुक वाटतें. त्यांतल्यात्यांत

या सर्व वाग्विलासांत दिव्यत्वाची प्रभा फाकलेली दिसत असल्यामुळें वाचक मोहित होतो.

## परा अथवा प्रेमलक्षणा भक्ति

अशा प्रकारची सर्वव्यापी, अष्टपैलू, अनन्य, अव्यभिचारिणी, अकृत्रिम, परा अथवा प्रेमदक्षणा भक्ति ज्याच्या हृदयांत वास करिते त्यालाच निजभक्तिवर्म समजतें, तोच भक्तीचा जिव्हाळा जाणणारा व म्हणून दैवाचा पुतळा होय. कारण या भक्तीचा उदय अंतःकरणांत झाला म्हणजे अनुभवभांडाराचें द्वारच खुलें झालें म्हणून समजावें. म्हणून श्रीपंतांनीं "ब्रह्मज्ञान नलगे मज। देई मला भक्तिबीज" (द. प्रे. ल. १८६) अशी भक्तिबीजाची सद्गुरूकडे मागणी केली. या भक्तीच्या पोटींच ज्ञान, प्रेम, वैराग्य, मुक्ति यांचा जन्म होतो. श्रीपंत म्हणतात "अनन्य भक्ति अमृतास अमृतत्व आणणारी, नित्य मुक्तास मुक्ति देणारी, नित्य तृप्तास तृप्ति देणारी व ब्रह्मानंदास आनंदपणा आणणारी आहे. भक्तिविरहित ज्ञान व विरति हीं निर्जीव, कोरडीं व निरस आहेत. विरतीची गोडी भक्तींत कळते. ज्ञानाची खरी अव्याहत ज्योति, त्याची प्रभा भक्तींत फांकते. सद्गुरूस पूर्णपणें शरण गेलें कीं भक्तिबीज सद्गुरुकृपाबळें गम्य होतें." (पु. ७–१२१) ऐक्यभक्तिरूपी हा पाचवा पुरुषार्थ संतसंगानें व सद्गुरुकृपाबळानें प्राप्त होतो. तो अहमहमिकेनें साध्य होणारा नव्हे. तर उलट 'अहंकर्तृत्व', 'मी कर्ता' ही बुद्धि म्हणजे हा पुरुषार्थ साध्य होण्याच्या मार्गांतील दुर्लंघ्य अशी दरडच होय. ही बुद्धि तर्काचे घाव घालून नाहींशी होणारी नव्हे. तर ती संतसंगतींत सद्गुरुकृपेनें विरघळली पाहिजे; म्हणजे हें कार्य हळुवार चित्तानें, लीनपणानेंच साध्य होत असतें. अहंभाव म्हणजे 'मी कर्ता' ही भावना, हा अभिमान अनंत कोटी साधनें करूनहि मरणारा नव्हे. पण तो सद्भक्तिभरानें सद्गुरुसेवनीं चूर झाल्यानें आपोआप गलित होत जातो. देहाभिमान व प्रपंचाच्या ठिकाणची आसक्ति यांना नाहींशीं करण्याची बेमालुम युक्ति म्हणजे त्यांचा विसर पडणें ही होय. अनन्य भक्ताला भक्तिप्रेमरंगांत, भजनछंदांत, आत्मचिंतनांत त्यांचा आपोआप विसर पडत जातो व असंगपणानें त्याचे सर्व व्यवहार चालतात. ही जी अनन्य भक्ताची भूमिका ती फार स्पृहणीय आहे. सर्व आत्मानुभवी संत याच भूमिकेवर आरूढ झालेले असतात. श्रीनिवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम वगैरे संतांची हीच भूमिका होती. श्रीपंतांची हीच भूमिका होय. या भूमिकेवरील भक्ताच्या ठिकाणीं अद्वैत बोध, अभेद भक्ति व दिव्य प्रेम यांचा गोड मिलाफ झालेला असल्यामुळें त्याला सगुण व निर्गुण, जड व चैतन्य एकरूप दिसत असतात. त्यामुळें निर्गुण, निराकार परब्रम्ह व "विटेवरी उभा कटीवरी हात" असा श्रीपंढरीनाथ अथवा "जटाभार शिरावरी, दाढी रुळे नाभीवरी" (द. प्रे. ल. ८६५) अशा अगर अन्य थाटांत नररूपानें दिसणारा सद्गुरु यांच्यांत भेद दिसत नाहीं. त्यामुळें निर्गुणोपासना करणें अथवा सगुण भक्ति करणें यांत त्याला कांहीं फरक दिसत नाहीं व त्याच्या ठिकाणची भज्य, भजक व भजन ही भावनाहि त्याच्या अद्वैत-सिद्धांताला बाधक न होतां पोषकच होते. "निर्गुण वैभव ब्रह्मादिकां न कळे। मी

तरी दुबळें बाळ तुझें ॥ २ ॥ आवडीनें पायां घालीन मी मिठी । तेथूनियां उठी कांहीं केल्या ॥ ३ ॥ न मागें आणिक नाहीं दुजी आस । दत्ता पायीं वास देई सदा ॥ ४ ॥" ( द. प्रे. ल. ४४ ) अशी श्रीपंतांनीं वारंवार मागणी केली आहे; म्हणजे असा भक्त कैवल्याधिकारी असूनहि स्वैरपणानें आपल्या आराध्य दैवताशीं खेळतो. इतकेंच नव्हे तर या प्रेमखेळाकरितांच आपण जगावयाचें व तो पुनः पुनः खेळण्यास मिळावा म्हणून आपण पुनः पुनः जन्मास यावें, ती मुक्ति नको असें त्याला वाटतें. " मझा मीच सर्वां ठायीं" ( द. प्रे. ल. १३४४ ); " मीच आधार चिद्विलासा । द्वैत कैसें भावूं " ( द. प्रे. ल. ४६० ); " चहुं वेदांचे जनक आम्ही " ( द. प्रे. ल. ७५६ ); "आम्ही कैवल्यअधिकारी । वेद वर्णू न शके थोरी " ( द. प्रे. ल. १४७७ ) स्वरूपसाम्राज्यपदारूढ होऊन अशा प्रकारें जाहीर करणारे श्रीपंत "नित्य नित्य जन्मुनी मरूं । प्रेमें बालावधूता स्मरूं" ( द. प्रे. ल. १६७८ ); " जन्मोजन्मीं ऐसा सद्गुरु मिळे जरी मजला । अनेक योनी भोगीन सुखें स्वानंद सजला । " ( द. प्रे. ल. ९०५ ) अशा प्रकारची अपेक्षा करितात. हीच स्थिति सर्व संतांची आहे. देह असेपर्यंत त्यांना सगुण प्रेमापुढें इतर कशाचीच किंमत वाटत नाहीं व तें नित्य मिळावें म्हणून श्रीपंतांनीं " प्रेम देऊनी गुरूचें नित्य । घालीं जन्माला " ( द. प्रे. ल. ४१३ ) अशी अवधूत सद्गुरूकडे मागणी केली.

## ज्ञानी भक्त

वर वर्णन केलेला जो भक्त त्यालाच ज्ञानी भक्त म्हणतात. श्रीमद्भगवद्गीतेंत " ज्ञानीत्वात्मैव मे मतम् " ( ७—१८) म्हणजे अभेद-भक्तियुक्त जो ज्ञानी तो माझा आत्माच आहे असें भगवान् श्रीकृष्णानें म्हटलें आहे. अशा भक्ताला सर्व विश्व ज्ञानमय दिसतें व 'नामरूपात्मक सर्व जग हा चिद्विलास होय' असा अनुभव येतो. हा अनुभव श्रीपंतांनीं पुढीलप्रमाणें व्यक्त केला आहे "सर्व विश्व ज्ञानमय झालें ॥ धृ० ॥ सद्गुरुबोधरवि उदेला । अज्ञानतम नुरलें ॥ १ ॥ नामरूप हें चिद्विलास । आन कांहीं न आलें ॥ २ ॥ स्थावर जंगम ज्ञानात्मक । दत्तप्रेमीं कळलें ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. ६९५ ). या अभेद दृष्टीनें अथवा चिद्विलास-दृष्टीनें श्रीपंत अखिल विश्वाकडे पाहात असल्यामुळें त्यांना स्वतःचा प्रपंच अथवा संसारहि प्रेमरूप अथवा चिद्विलास दिसत होता व त्याप्रमाणें त्यांनीं वारंवार उद्गार काढले आहेत. त्यांपैकीं कांहीं येथें देत आहोंत:— " अनंत व्यवहार चिद्विलास । नाहीं स्वरूपीं हानी ॥ " ( द. प्रे. ल. ३७३ ); " स्फूर्ति ही उठली आनंदा । चालला संसृतिधंदा ॥ " ( द. प्र. ल. ४७२ ); " चिद्विलास संसृति ही । दत्ता सहज समाधि " ( द.प्रे.ल.४९२ ); " कैवल्यमय संसार हा भिन्न कांहीं न दिसे । स्वानंदसागरीं मत्स्य हा जाहला । दत्ता भजनपिसें " ( द.प्रे ल. ७४१ ); पद ४०७ मध्यें तर याच्याहि पुढें जाऊन जगरूपानें जो सद्गुरूचा चिद्विलास चालला आहे त्याला लोक संसृति म्हणतात याबद्दल श्रीपंतांनीं मोठें आश्चर्य प्रगट केलें आहे. ते म्हणतात " चिद्विलासा संसृति म्हणतां ऐकुनी येत हंसें । नित्य मुक्त हें जग वर्ततें उपेदश करूं कैसें. "

## सहज स्थिति

कर्तृत्वाभिमानरहित होण्याची अथवा मरून उरण्याची जी ज्ञानी भक्ताची स्थिति-तिलाच सहज स्थिति म्हणतात. कर्तृत्वाभिमानाचा काटा निघाला, जगीं कर्ता कोठेच नाहीं,-आपणासकट सर्वत्र चिच्छक्तीचा अकृत्रिम विलास चालला आहे अशी पक्की खात्री झाली म्हणजे सर्वत्र सहज स्थितीचेंच साम्राज्य पसरलेलें दिसतें व अखंड समाधीचाच अनुभव येतो म्हणून "सहज–स्थितीपरती समाधि खोटी" असे श्रीपंतांनीं म्हटलें आहे. ही स्थिति पूर्णपणें बाणणें, ती अचल होणें हेंच सर्व योगांचें ध्येय होय. सहज स्थितीच्या अथवा अखंड समाधीच्या पोटीं राजयोग, ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग वगैरे सर्व योग सामावतात सहजस्थिति ही महासागरासारखी असून निरनिराळे योग म्हणजे त्या सागराला मिळणाऱ्या जलौघांप्रमाणें अथवा नद्यांप्रमाणें होत. याच स्थितीला श्रीपंतांनीं 'चरम वृत्ति' म्हटलें आहे. "झाला स्वेच्छाचि विधि। स्वैर झाली समाधि" (द.प्रे.ल.८५१); "कैवल्यासी लाथ मारुनी वरिली गुरुभक्ति। सदगुरुबोधें समूळ गेली जन्ममरणभीति ॥ धृ० ॥ स्वेच्छाचार स्वैर समाधि गुरुपायीं प्रीति। दत्तावधूत एकार्णवीं निरंकुश वृत्ति ॥ ३॥" (द. प्रे. ल. ६४३) हे याच स्थितींतलि उद्गार होत. "निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः" यांत वर्णिलेली विधिनिषेधातीत स्थिति अथवा अवधूत स्थिति ती हीच. या स्थितींतील अनुभवाचे श्रीपंतांचे कांहीं उद्गार पुढें देत आहोंतः— "सहज स्थितीची खूण बाणतां। भक्त जिताचि रे मेला" (द. प्रे. ल. १३)

"सहज स्थितीनें सत्यत्व आणिलें। जक्षन् क्रीडन् श्रुतिबोला" (द. प्रे. ल. ४११)

"विश्वीं गुरु पाहुनी वागे। क्षणोक्षणीं त्या समाधि लागे" (द. प्रे. ल. १३६).

"समाधीची नाहीं आस। चरणगोडीपुढें फोस" (द. प्र. ल. १८६)

"अवस्था खोटी। होतां सुद्गुरूची भेटी" (द. प्रे. ल. १८५३)

"करूं तोचि विधि। आम्ही। करूं तोचि विधि" (द. प्र. ल. ७५६)

"मुळींच मी नाहीं। सद्गुरु सर्वांठायीं" (द. प्रे. ल. ११४७)

"बालमुकुंदपदीं दत्त निमाला। प्रेमाकारणीं उरला" (द. प्रे. ल. ४११)

## प्रपंच तोच परमार्थ व परमार्थ तोच प्रपंच

ज्याला सहज स्थितीचा अचल अनुभव आला त्याला अमुक प्रपंच, अमुक परमार्थ असा भेदच राहात नाहीं. प्रपंचरूपी बागुलबोवा नाहींसा झाल्यावर त्याची भीति वाटण्याऐवजीं श्रीपंतांना गुरुप्रेम भोगण्याचें तें एक साधन होऊन बसलें. ते म्हणतात "विषम संसृति समची झाली। सद्गुरुसेवा हाचि धंदा" (द. प्रे. ल. ८९०); "प्रपंच-परमार्थी। दत्त आमुचा सारथी ॥ धृ० ॥ सद्गुरुसेवा धंदा आमुचा। नाहीं विषयरति ॥ १ ॥" (द. प्रे. ल. १७९५) एकदां संसार सम म्हणजे बिनत्रासाचा झाला व प्रपंच परमार्थी सद्गुरुच सारथ्य करूं लागला म्हणजे सद्गुरुसेवेचा धंदा करण्याला कोणताच प्रत्यवाय

राहिला नाही. उलट प्रपंचांत राहून निरनिराळ्या प्रसंगांतून जात असतांना सद्‌गुरूच्या अतर्क्य लीलेचा व भक्तवात्सल्याचा अनुभव घेण्यास सापडतो. त्यामुळें प्रपंच हा भक्ताला गुरुप्रेमा भोगण्याचें क्रीडांगणच वाटतो. प्रसंग आणणारा तोच; त्यांचें निवारण करणाराहि तोच. श्रीपंत म्हणतात सद्‌गुरूनेंच आपणास गृहस्थ केलें व " शांति-गृहिणी देऊनी मजला । तुर्यापर नेलें ॥ १ ॥ संसारभजन लाविलें पाठीं । निजसुख दिधलें " ( द. प्रे. ल. १०२१ ); त्यामुळें " प्रपंच हा परमार्थ जाहला । व्यवहार हा शांतीनें भरला " ( द. प्रे. ल. १००८ ). सर्व अंतःकरण तन्मय झालें म्हणजे अमुक प्रपंच व अमुक परमार्थ असें म्हणण्यास वावच नाहीं. दोन्हींहि चालविणारा तोच. म्हणून " प्रपंच परमार्थ दोन्ही । गुरु दत्त चालवी पाहीं " असें पद ५६६ मध्यें श्रीपंतांनीं म्हटलें आहे. एकदां संसार हा सदगुरूचा खेळ आहे अशी खात्री झाली म्हणजे भीति कोणाची ? व अशा रीतीनें आपण निर्भय झाल्यावर गुरुप्रेममस्ती चढून काय प्रकार झाला त्याचें श्रीपंतांनीं पुढीलप्रमाणें फार बहारीचें वर्णन केलें आहे. " गुरुमुद्रित पोळ संसारीं फिरतो । जाणुनी सेवीं नरा ॥ धृ० ॥ मायाकल्पित ढोंसुनी पाडिलें । अंतका दरारा ॥ १ ॥ पाप पुण्य आणि बंध मोक्ष हे । नाणीं मनींहि जरा ॥ २ ॥ तुर्यपीठावरी वस्ती जयाची । ब्रम्हानंद-चारा ॥ ३ ॥ दत्तगुरुपायीं वस्ती जयाची । धुंद भक्त खरा ॥ ४ ॥ " ( द. प्रे. ल. ८८५ ). याप्रमाणें निर्भयता बाणल्यावर " संसार प्रेमरूप झाला । नाहीं उरला अंतक घाला " ( द. प्रे. ल. ४५१ ) असे त्यांनीं उद्गार काढले आहेत. अनंत व्यवहार करीत असूनहि अंतरीं अलिप्त अथवा निःसंग राहाणारा जो ज्ञानी भक्त त्याच्या या अजब युक्तीचें श्रीपंतांनीं पुढील पदानें कौतुक केलें आहे "धन्य तूं ज्ञानी काय मौज करिसी । असुनी व्यवहारीं अलिप्त राहासी ॥ धृ० ॥ जैसी उपाधि तैसें रूप । धरुनी अकलंक सदा अससी ॥ १ ॥ धर्माधर्मीं होऊनी सम । पाप-पुण्या नाकळसी ॥ २ ॥ सद्‌गुरु शिष्य होउनी तोची । दत्त डुलतो निजप्रेमरसीं ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. १०८८ ) व लोकांत बडेजाव अथवा बाजार न मांडतां व निंदा-स्तुतिकडे पाठ करून आत्मसुखाचा अथवा स्वानंदसाम्राज्याचा उपभोग आपण कसा घेत आहोंत तें श्रीपंतांनीं पुढील पदांत दाखविलें आहे. " जनां असूं वावा भ्रम । सदा सेवूं आतमाराम ॥ धृ० ॥ जनां दिसूनीः संसारी । परमार्थाची आस भारी ॥ १ ॥ जनडोळां बद्ध दिसों । सदा मुक्त आम्ही असों ॥ २ ॥ जनां ऐसे आम्ही वागूं । ब्रह्मानंद सदा भोगूं ॥ ३ ॥ जनां ऐसी विषयप्रीति । दत्तभजनीं पूर्ण रति " ( द. प्रे. ल. ५७४ ); " अलक्ष्य स्वरूप आमुचें पाहीं । खूण नेदूं जनां कांहीं " ( द. प्रे. ल. १०५६ ) हें पदहि तशाच अर्थाचें आहे. या आपल्या आत्मधनाला कोणाची दृष्ट लागेल कीं काय या भीतीनें श्रीपंत म्हणतात " जाऊं येऊं गुरूसी गाऊं । नेदूं खूण जनां ॥ धृ० ॥ इच्छामरणी आम्ही मुक्त । सोकलों गुरुभजना ॥ १ ॥ असुनी नाहीं प्रपंचीं वृत्ति । भजूं निरंजना ॥ २ ॥ मृत्यु मारुनी जीवन साधिलें । भजूं दत्तचरणा ॥ ३ ॥ " (द.प्रे.ल.६२४) व पद ३७७ मध्यें " असुनी प्रपंचीं योगी आम्ही । नेदूं खूण जना " असें स्पष्ट

म्हटलें आहे आणि आपण कर्मयोगी कसे आहोंत तें स्पष्ट केलें आहे. याप्रमाणें स्वतःची राहाणी असली तरी आम्ही एकटेच या आत्मधनाचा आपलपोटेपणानें उपभोग घेत बसत नसून " ब्रह्मानंद भोगुनी आम्ही देऊं जनासी । कैवल्य हें उघड दावूं दत्तप्रेमरसीं ( द. प्रे. ल. २६६० ) व " आत्मस्वरूपीं राहुनी सदा । जनांसी मुक्त केलें ॥ १ ॥ होऊनी मुक्त संसारामधें । प्रेमसुख दाविलें ॥२॥" ( द. प्रे. ल. १३२२ ) असें श्रीपंत सांगतात आणि " जन्म घेतला याची कारणें । जडमूढ उद्धराया " ( द. प्रे. ल. २२०४ ); " स्त्रीशूद्रादि श्वपच न पाहातां । प्रेमसुख देतों " ( द. प्रे. ल. २३७४ ) असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

## अवधूताचा संसार

श्रीपंत प्रापंचिक होते व अखेरपर्यंत नोकरी व इतर सर्व व्यवहार करीत होते. पण त्यांचा प्रपंच व व्यवहार काय थाटांत चालला होता यासंबंधीं त्यांच्या वेळोवेळीं निघालेल्या उद्गारांचा आधार घेऊन येथपर्यंत वर्णन केलें आहे. त्यावरून स्थूल दृष्टीला प्रपंच करीत असलेल्या श्रीपंतांची अंतरंग-स्थिति काय होती यासंबंधीं वाचकांना यथार्थ कल्पना येईल असा भरंवसा वाटतो. पण जरी त्यांचा स्थूल प्रपंच याप्रमाणें चालला होता, तरी सूक्ष्मांतील त्यांच्या प्रपंचाचा विस्तार फार मोठा होता. पद ३६४ मध्यें ते म्हणतात " आम्ही संसारी संसारी । मुक्ति वरिली नवरी ॥ ध्रु० ॥ निरंजनींचें गृह शोभतें । निर्गुण वैभव भारी ॥ १ ॥ बोधपुत्र हा कुलोद्धारक । चुकली भवाची फेरी ॥ २ ॥ दत्तपदीं आम्ही निश्चिंत जाहलों । उठती प्रेमलहरी ॥ ३ ॥ " व पद ७५१ मध्यें "बालमुकुंदकृपा आजी जाहली । निजशांति पतिव्रता वरिली ॥ ध्रु० ॥ × × × अद्वयभक्ति-कन्या जाहली । जीवन्मुक्ति घरीं राबली ॥ २ ॥ " असें त्यांनीं सांगितलें आहे. याच आपल्या संसाराला त्यांनीं " अवधूताचा संसार " म्हटलें असून त्याचा थाट पुढीलप्रमाणें वर्णिला आहे. " माझा खरा संसार तो हा पाहा. सहजविलासस्त्री ही माझी ललना. तूर्या व उन्मनी या माझ्या दासी, सहजस्त्रीहून कमी दर्जाच्या; चारी मुक्ति माझ्या दासी, पायांची सेवा करणाऱ्या; भक्ति व शांति या दोन माझ्या पोटच्या मुली व बोध हा माझा चिरंजीव, वज्रदेही पुत्र; हा माझा अवधूतचा संसार. मला मरणारीं बायकापोरें घेऊन काय करावयाचें ? माझें कोणी मरत नाहीं. भक्ति व शांति या अखंड कुमारी, बोध-पुत्र हा अमर, सहज स्त्री अद्वैत सुंदरी. गुरुघरचा हा संसार नित्य मौजेचा; गुरुप्रेमानें, अखंड श्रीनें विराजणारा, थाटणारा हा संसार सोडून तुटका मोहक संसार कां घेऊं ? "

श्रीपंतांच्या या संसारांतील कुलोद्धारक जो त्यांचा बोधपुत्र त्यानें अद्वय भक्तिरूपी आपल्या भगिनीच्या साह्यानें कोणता पराक्रम केला व लोकसंग्रह करून कुलोद्धार कसा केला तें पुढील प्रकरणांत सांगत आहोंत.

# प्रकरण ४५ वें

—— :०: ——

" प्रेमाचा अवतार । गुरूचा । प्रेमाचा अवतार ॥ धृ० ॥
निर्गुण मुळींचा सगुण जाहला । करुणेचा सागर ॥ १ ॥
शिवशक्तिविलास विश्व । दाविलें चराचर ॥ २ ॥
दत्तावधूत प्रेमळ माता । संतांचें माहेर ॥ ३ ॥"

—— :०: ——

## परचित्त–प्रबोधक शक्ति

मागील प्रकरणांत वर्णन केलेली श्रीपंतांची आध्यात्मिक भूमिका म्हणजे ब्रह्मज्ञानाची पूर्णावस्था अथवा परिपक्वदशा होय. या कोटींतील ब्रम्हज्ञानी आपण स्वतः तरलेला असून दुसऱ्यांना तारतो. ही जी त्याच्या ठिकाणची अद्‌भुत शक्ति तिलाच परचित्त-प्रबोधक शक्ति म्हणतात. ती ज्याच्या ठिकाणीं असते व जो शिष्याला ब्रम्हविद्या देतो तो " सद्‌गुरु " अशी सद्‌गुरूची थोडक्यांत व्याख्या करितां येईल. एके ठिकाणीं श्रीपंत म्हणतात " ब्रह्मविद्या ज्या ठिकाणीं आहे व मिळते तें ठिकाण कसेंहि असो; तें पवित्रच आहे. तारक गुण ज्याचे अंगीं आहे, तोच सद्‌गुरु जाणावा; मग तो कसाहि असो. " ( पु. ७–१६० ) हा तारक गुण अथवा ही परचित्त-प्रबोधक शक्ति इतकी महत्वाची आहे कीं, अवधूतगीता अध्याय २ श्लोक १ मध्यें असें सांगितलें आहे कीं, " बालस्य वा विषयभोगरतस्य वापि मूर्खस्य सेवकजनस्य गृहस्थितस्य । एतद्‌गुरोः किमपि नैवहि चिंतनीयं रत्नं कथं त्यजति कोऽप्यशुचौ प्रविष्टम् ॥ "

## प्रेमाचा अवतार

प्रकरण ११ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें १८७९ – ८० च्या सुमारास श्रीपंतांचें शिष्य-प्रबोधन कार्य सुरू झालें. तें त्यांच्या हयातीच्या अखेरपर्यंत अत्यंत आस्थेनें चालू होतें व हजारों शिष्यांनीं त्यांचेकडून अनुग्रह घेतला. हें जें त्यांनीं शिष्य-प्रबोधन कार्य केलें त्यालाच " लोकसंग्रह " म्हणतां येईल. कारण एके ठिकाणीं " अभेदभक्ति वैराग्य ज्ञान । स्वयें आचरोनि आपण । देखी लावावे इतर जन । लोकसंग्रहलक्षण जाण या नांव ॥ " ( ए. भा. २९–८१६ ) असें श्रीएकनाथांनीं लोकसंग्रहाचें एक लक्षण सांगितलें आहे. तसेंच " उद्धवा मुक्तीवरील जे भक्ति । ते मज अवतारांची अवतारशक्ति । " ( ए. भा. २९–७६० ) असेंहि त्यांनीं म्हटलें आहे. तेव्हां श्रीपंतांच्या ठिकाणीं ही अवतारशक्ति होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसेंच अवतार म्हणजे व्यक्त दशेला येणें अथवा

प्रगट होणें असेंहि म्हणतां येईल. " अमूर्तचि परी मूर्त कारुण्याचा " असें श्रीज्ञानेश्वरांनीं सद्‌गुरूचें जें वर्णन केलें आहे त्यांत त्यांनीं सद्‌गुरूला कारुण्यमूर्ति म्हटलें आहे म्हणजे सद्‌गुरूच्या रूपानें कारुण्यालाच मूर्त स्वरूप आलेलें आहे असें सांगितलें आहे. त्याचप्रमाणें " प्रेमाची घडली । गुरुमूर्ति । प्रेमाची घडली ॥ " ( द.. प्रे. ल. २४६० ) असें ज्या सद्‌गुरूच्या मूर्तीचें श्रीपंतांनीं वर्णन केलें आहे त्याला प्रेममूर्ति अथवा प्रेमाचा अवतार म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. तसेंच श्रीपंतांनीं सद्‌गुरूला " अवतार निजशांतीचा " ( द. प्रे. ल. १४७८ ) असेंहि म्हटलें आहे. म्हणजे सद्‌गुरूच्या रूपानें निजशांतीला, आत्मशांतीलाच मूर्त स्वरूप आलें असें त्यांनीं अलंकारिक भाषेंत सांगितलें आहे. आध्यात्मिकतेच्या दृष्टीनें श्रीपंत विश्वाकडे पाहात असल्यामुळें त्यांचें बोलणें नेहमीं गूढार्थाचें असे. श्रीदत्तात्रेय हे श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनरसिंहसरस्वती यांच्या सारख्या दिव्य विभूतींच्या रूपानें धर्मसंस्थापना करण्याकरितां कधीं काळीं अवतीर्ण होतात अशी सर्वसाधारण समजूत आहे. पण श्रीपंतांना श्रीदत्तात्रेय हे दूर असणाऱ्या व कधीं काळीं क्षितिजावर येणाऱ्या ज्ञानसूर्याप्रमाणें सामान्य जनांच्या आटोक्याबाहेर आहेत असें न दाखवितां ते सर्वांच्या अगदीं जवळ असल्याचें सांगितलें आहे. श्रीपंत म्हणतात " अवतरला दत्त आजि धरणीं । तोचि विलसतो कार्य–कारणीं ॥ धृ० ॥ निज-भक्त हृदय शुद्ध अनुसूया । प्रेमरूपें जन्म झाला त्या ठायां । ओळखितां सुखा नाहीं वाणी ॥ १ ॥" (द. प्रे. ल. १६१३) म्हणजे 'अनन्य भक्ताचें शुद्ध हृदय हींच अनुसूया असून तिच्या पोटीं प्रेमरूपानें जन्मणारा तोच श्रीदत्ताचा अवतार !' ही दत्तजयंती प्रत्येक भक्तानें आपल्या ठिकाणीं साजरी करावी व आपलें हृदयच दत्तमाता बनवून दत्तजन्माचे सोहाळे भोगावे. या दत्तप्रभूच्या दर्शनाला गिरनार पर्वतावर अथवा सह्याद्रीच्या शिखरांवर जावयास नको. तेव्हां शुद्ध प्रेमाचा जो पुतळा तो प्रेमस्वरूप दत्तप्रभूचाच अवतार होय असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. तसेंच श्रीपंतांनीं आपलें अंतःकरण हेंच जंबुनगर म्हणजे कर्डेगुद्दी गाव असून तेथें सद्‌गुरु ( बालावधूत ) प्रगट झाला व त्यायोगें बेणुनगरीं म्हणजे बेळगावांत आपल्या घरीं प्रेमाचा पूर लोटला असें एका पदांत म्हटलें आहे. तें पद असें " भक्तअंतरीं जंबुनगरीं । सद्‌गुरु प्रगटला ॥धृ०॥ वेणु-ग्रामीं दत्तधामीं । प्रेमपूर लोटला ॥ १ ॥" ( द. प्रे. ल. ६०७ ).

## आत्मारामाचा अवतार

श्रीपंतांनीं अवताराचा आणखी एक प्रकार सांगितला आहे. तो असाः—" बुद्धी-मार्जी प्रगटला । आत्माराम अवतरला " ( द. प्रे. ल. ५९० ). हा अवतार तर सर्वांना सुलभ आहे. कोणी कितीहि नीच, दुर्जन, दुराचारी असला तरी आत्मारामाला तो वर्ज्य नाहीं. त्याच्या ठिकाणींहि तो आहेच. तेव्हां त्याच्या ठिकाणींहि आत्मारामाचा अवतार संभवतो. वाटमाऱ्या करणारा वाल्या कोळी व स्त्रीलंपट तुलसीदास यांच्या हृदयांत दडून असलेला आत्माराम जेव्हां त्यांच्या बुद्धींत प्रगट झाला म्हणजे त्याचा अवतार झाला तेव्हां त्या

अवतारी पुरुषोत्तमानें अनुक्रमें " वाल्मीकि रामायण " व " तुलसीदासांचें रामायण " हीं सर्वांगसुंदर व रसाळपणानें जगाला मोहून टाकणारीं काव्यें निर्माण केलीं ! नेहमीं अवतार घेऊन धरणीवर अवतीर्ण होणारे भगवान शेषशायी कोठेंहि असोत, आत्माराम मात्र आपल्याजवळ, आपल्या हृदयांतच आहे. पण तो आपणास माहीत नसतो. सद्-गुरुकृपाबळानें तो प्रगट झाला म्हणजे आत्मप्रसादजन्य जें ज्ञान स्फुरतें तेंच दिव्य ज्ञान व तोच तारक बोध आणि तोच आत्मारामाचा अवतार होय. श्रीपंतांनीं प्रत्यक्ष मानववेषधारी कोणतेहि कंस चाणूर मारिले नव्हते. पण श्रीकृष्णावतार घेऊन जेव्हां आत्माराम आपल्या बुद्धींत प्रगट झाला तेव्हां त्यानें काय काय पराक्रम गाजविला याचें त्यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. " संशय-कंसा मारुनी दत्तें । ब्रह्मानंद दिधला । जनासी ॥धृ०॥ कामक्रोधादि अघ बक मारूनी । निजबोध प्रगटिला ॥१॥ माया-पूतना अनुभवें शोषुनी । अलिप्त राहिला ॥२॥ द्वैत-दैत्य संहारूनी । सिद्ध दत्त खेळला ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १८६७).

## बोधाचा अथवा ज्ञानाचा अवतार

भक्तहृदयांत प्रेमरूपानें श्रीदत्तात्रेयाचा अवतार होतो; त्याचप्रमाणें आत्मारामाचा अवतार झाला म्हणजे तो बोधरूपानें बुद्धींत प्रगटतो हें वर सांगितलेंच आहे. तसेंच श्रीपंतांनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, " शिष्याचे अंतःकरणीं बोधवचनानें, मंत्रोपदेशानें शुद्ध सत्वाचा ठसा उठणें म्हणजेच सद्गुरु शिष्याचे हृदयीं बसणें. बोध हेंच सद्गुरूचें सगुण रूप; आणि त्या बोधानें जो प्रेमानुभव अंतःकरणीं प्रगटतो तेंच सद्गुरूचें निर्गुण रूप होय. बोधाचा व अनुभवाचा ताळा मिळणें म्हणजे साक्षात्कार" (पु. ७-१९४) व "ज्ञान तेंच सगुण ब्रह्म; तोच अवतारी सद्गुरु" असेंहि म्हटलें आहे. म्हणजे हा ज्ञान-रूपानें सद्गुरूचा अवतार झाला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्या पुण्य पुरुषाच्या ठिकाणीं " तत्त्वमसि " बोध उदयाला आला अथवा प्रगट झाला असेल त्याला अवतार म्हणतां येईल. श्रीपंतांच्या ठिकाणीं " तत्त्वमसि ' अथवा ब्रह्मात्म्यैक्यबोधाचा अनुभव सदा खडा होता व त्यांचा आत्मप्रत्यय फार दांडगा असून आपण कोणत्या कारणाकरितां जन्मास आलों आहों याची त्यांचे ठिकाणीं जाणीव होती. त्यामुळें कांहीं प्रसंगीं त्यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत. " अवधूत मार्ग प्रगट कराया । आलों जन्मासी ॥ धृ० ॥ दंभ मतें खंडन करुनी । बुडवीं समरसीं ॥१॥ अनुभवमार्ग प्रगट करूनी । मुक्ति केली दासी ॥२॥ निजबोधामृत पाजुनी दत्त । मग्न प्रेमरसीं ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. २५७४ ). श्रीपंतांच्या वरील उत्तयांमध्यें अवधूत मार्ग प्रगट करून जड मूढांचा उद्धार करण्याकरितां आपण जन्म घेतला, दंभ मतें खंडन करून व सन्मार्गाची खूण दाखवून सद्गुरूची लीला प्रगट केली, मुक्तीवरील भक्तीचा अनुभवमार्ग उघड केला व प्रेमाकरितां शरीर धारण करून भक्तांना समरस-सुखांत बुडविलें असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. अशा प्रकारचें कार्य ज्याचे हातून घडतें तोच सद्गुरु होय.

## श्रीपंतांच्या शिष्यांनीं लिहिलेल्या हकीगती

" सद्गुरु " हा शब्द सापेक्ष आहे. कारण सद्गुरु म्हटला म्हणजे शिष्य असलाच पाहिजे. एकाशिवाय दुसऱ्याची कल्पना करितां येत नाहीं. मागील प्रकरणांत श्रीपंतांच्या आध्यात्मिक वैभवाचें व स्वानंदसाम्राज्यश्रीचें जरी पुष्कळ वर्णन केलें आहे तरी त्यांना " सद्गुरु " ही पदवी किंवा हें नाव त्यांच्या शिष्यप्रबोधनकार्यामुळें आलें त्यांनीं स्वतः आपल्या " आत्मज्योति " लेखांत म्हटलें आहे कीं " मोह, ममता, अहंभाव, भूतभौतिक अभिमान नसतां, निःसंदेह मानसें गुरुसंप्रदाय अव्याहत चालवून शिष्यवर्ग केले म्हणून तो ( आपण ) ' सद्गुरु ' नाम पावला. ( सद्गुरूनें ) करकंजीं जन्मलेल्या पुत्रास निजात्मपुष्टि देऊन संप्रदायक्रम चालविण्यास सांगून पुष्ट केला. " ( पु. ३–१९८ ) म्हणजे सद्गुरूच्या आज्ञेप्रमाणें शिष्यप्रबोधनकार्य आपण करूं लागल्यामुळें आपणास " सद्गुरु " म्हणूं लागले असें येथें श्रीपंतांनीं दर्शविलें आहे. तेव्हां ते सद्गुरु होते किंवा नाहीं हें त्यांच्या शिष्यांनाच समजावयाचें. त्यानीं स्वतः सद्गुरूला उद्देशून एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं " तूं सद्गुरु कशावरून ? तर याला माझें अंतःकरण साक्ष व तूं बालावधूतप्रभु साक्ष ". सद्गुरूचीं कितीहि लक्षणें जरी सांगितलीं तरी फुटपट्टीप्रमाणें तीं लावून पाहून तीं ज्याला आपल्या कल्पनेनें लागू पडतील त्यालाच सद्गुरु मानावयाचें अशा पद्धतीनें कधीं सद्गुरूची भेट होत नसते. तर शिष्याचा भाग्योदय काळ आला म्हणजे सद्गुरूची भेटी अकस्मात होते. "अकस्मात सद्गुरूची भेटी मज जाहली। आपण होउनी श्रीगुरुमाय धांवत आली " ( द. प्रे. ल. ७८६ ); " सहजी सहज सद्गुरुप्राप्ति " ( द. प्रे. ल. १८१४ ) असें श्रीपंतांनीं म्हटलें आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनींहि " ऐशी कर्में साम्यदशा। होय तेथ वीरेशा। मग श्रीगुरु आपैसा। भेटेचि गा " ( ज्ञा. १८–९६६ ); " अवचित दैवयोगें गुरू भेटला कृपाळु " ( ज्ञा. अभंग ७४६ ) असें सांगितलें आहे व सर्व संतांचा तोच अनुभव आहे. तसें नसतें तर बाजारांतील सौद्याप्रमाणें अमुक इतकी किंमत दिली अथवा साधनें केलीं म्हणजे सद्गुरूची भेट होऊन ब्रह्मविद्या हस्तगत करितां आली असती. पण वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. तेव्हां श्रीपंतांच्या सद्गुरुत्वाचा विचार करितांना त्यांच्या हजारों शिष्यांचा अनुभवच प्रमाण होय. त्या सर्वांची या बाबतींत पूर्णपणें एकवाक्यता होती. " होती " म्हणण्याचें कारण असें कीं श्रीपंतांनीं देह ठेविल्यानंतर बत्तीस वर्षें लोटल्यामुळें त्यांच्या शिष्यांपैकीं फार थोडी मंडळी हल्लीं विद्यमान आहेत. परंतु श्रीपंतांच्या शिष्यवर्गापैकीं सुमारें १६० शिष्यांनीं श्रीपंतांच्या दिव्य बोधानें व सहवासानें आपणांस जे आध्यात्मिक अनुभव आले त्यांचीं, श्रीपंतबंधूंच्या प्रेरणेनें, टिपणें करून तीं श्रीपंतबंधूंकडे पाठविलीं व तीं त्यांचे घराण्यांतील मंडळीपाशीं आहेत. अशीं टिपणें पाठविणारांची यादी परिशिष्ट " अ " मध्यें दिली आहे. त्या यादींत श्रीपंतांच्या एका गुरुबंधूचें व एका गुरुभगिनीचें अशीं दोन नावें आहेत व श्रीपंतांचे शिष्य नसलेल्या त्यांच्या कांहीं भक्तांचींहि नावें आहेत. या यादींतील १६७

लेखकांमध्यें सुशिक्षित, अशिक्षित, सुष्ट, दुष्ट, भिन्न भिन्न जातींचें व संस्कृतींचे लोक असून कांहीं लेखिकाहि आहेत. त्या सर्वांनीं जणूं आपापलीं अंतःकरणें उघडीं करून त्यांच्या ठिकाणीं विराजमान होणाऱ्या सद्गुरूपुढें म्हणजे श्रीपंतमहाराजांपुढें त्यांच्या कृपाप्रसादानें आपल्यांत जी क्रांति घडून आली तिचें अत्यंत प्रांजलपणें निवेदन केलें आहे. जो प्रथम कपटी होता त्यानें ती गोष्ट नमूद करून सद्गुरुकृपेनें आपण सुधारल्याचें सांगितलें आहे. त्याचप्रमाणें ज्यांच्या ठिकाणचे इतर दुर्गुण सद्गुरुकृपेनें नाहींसे झाले त्यांनीं ती गोष्ट नमूद करून सद्गुरूचें उपकारस्मरण केलें आहे.

## प्रेमबोध व त्याचें अद्भुत सामर्थ्य

या सर्व हकीगतींमधून एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते; ती ही कीं त्या लिहिणाऱ्या सर्व लेखकांना श्रीपंतांनीं शुद्ध व निर्हेतुक प्रेमाची देणगी सारखीच दिली होती. त्याचप्रमाणें शुद्ध बोधहि सर्वांना एकच केला होता. ग्रहण करणाराच्या शक्तीप्रमाणें ज्यानें त्यानें तो ग्रहण केला असेल हें निराळें. पण श्रीपंतांनीं त्या बोधांत प्रतारणा केली नाहीं. आणि प्रेमबोधाचा प्रकारच असा आहे कीं त्याचे बाबतींत प्रतारणा होणेंच शक्य नाहीं. कारण सद्गुरूच्या प्रेमबोधाचा ठसा शिष्याच्या अंतःकरणावर होत असतो; म्हणजे सद्गुरु आपलें अंतःकरणच त्याला देऊन त्याचें अंतःकरण काबीज करीत असतो. श्रीपंतांनीं आपला स्वतःचा या बाबतींतील अनुभव पुढीलप्रमाणें व्यक्त केला आहे "कैसे विसरूं उपकार । गुरूचे ॥ ध्रु० ॥ प्रेमळ माय निजभक्तांची । कष्टते निशिदिनीं फार ॥ १ ॥ आपुलेपणा देउनी भक्तां । उरों नेदी अहंकार ॥ २ ॥ अद्वैत भक्ति शिकवुनी दत्ता । लोटते प्रेमपूर ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. ३३३); "आपुलेपण देसी भक्तां" (द. प्रे. ल. २५६). "तूंचि मी म्हणुनी बोध प्रेरिला निका" (द. प्रे. ल. ३५९). शिष्याचें अंतःकरण एकदां काबीज झालें म्हणजे बोधाचें कार्य सुकर होतें. म्हणूनच श्रीपंतांनीं अवधूत मार्गांत "आधीं अनुभव आणि मग बोध" असें म्हटलें आहे. हा अनुभव म्हणजे प्रेमाचा व आपलेपणाचा. तो अनुभव आला म्हणजे सद्गुरु हा आपला खरा आप्त आहे, आपला अनिमित्त सोयरा आहे, आपला खरा हितचिंतक आहे अशी शिष्याची खात्री होते व सद्गुरूच्या वचनावर त्याचा एकदम विश्वास बसतो. म्हणूनच श्रीपंतांनीं "करुणासागर शरण जनांसी निजपददाता । बोधाद्वैतवज्रें भेदी द्वैतपर्वता" (द. प्रे. ल. २६९); "कैवल्यस्वरूप सद्गुरूचें माहेर हें अनुभवाचें" (द. प्रे. ल. १२५८); "सुखदा दत्ता कैवारी तूंचि आमचा ॥ ध्रु० ॥ करुणार्द्र तव मन । राखिसी निजजन । अवतार निजशांतीचा । प्रभू तूं ॥ १ ॥ न्यसुनी अभयकर । मस्तकीं शिवकर । ठाव तूं निजभक्तीचा ॥ २ ॥" (द. प्रे. ल. १४७८); "भक्तजनांच्या माहेरा । अवधूता गुरुवरा" (द. प्रे. ल. १७३), असें सद्गुरूचें वर्णन केलें आहे. तोच अनुभव त्यांच्या शिष्यांचा होता. श्रीपंतांकडे बोधग्रहणार्थ जाणाराला ते मातृस्नेहानें व शुद्ध, निरपेक्ष प्रेमानें आत्मबोध करीत असत व वर

उल्लेख केलेले त्यांच्या शिष्यांचे लेख या गोष्टीची साक्ष देत आहेत. असंख्य अंतःकरणांना प्रेमजलानें भिजवून टाकणारा प्रेमाचा साठा प्रचंड असला पाहिजे अथवा तो प्रेमसागरच असला पाहिजे हें उघड आहे. हें जें शुद्ध प्रेम तेंच भक्तोद्धारार्थ सद्गुरूचें अवतरणें, तेंच त्याचें लीलाविग्रहित्व होय.

श्रीपंतांकडे अनन्यगतिक होऊन लीन वृत्तीनें येणारा सुशिक्षित, अशिक्षित, सुष्ट, दुष्ट कसाहि असला तरी व कोणत्याहि जातीचा अगर धर्माचा असला तरी ते त्याला आपल्या प्रेमवृत्तीनें आपलासा करीत. हें प्रेमाकर्षण हेंच त्यांच्या हातांतील अमोघ शस्त्र होतें. या प्रेमाकर्षणांत जो सापडला तो त्यांचाच होत असे. या शुद्ध व निरपेक्ष प्रेमाचें सामर्थ्य इतकें विलक्षण आहे कीं त्याचा कोणाशींहि कोणत्याहि मार्गानें संबध आला तरी तें त्याला भारणी घातल्याशिवाय रहात नाहीं. सद्गुरु हा कोणत्या वेळीं व कोणत्या मार्गानें शिष्याला आपली प्रेमदेणगी देईल याचा नियम नाहीं. त्यामुळें श्रीपंतांसारखे अधिकारी सत्पुरुष हे निरनिराळ्या प्रकारांनीं, म्हणजे कोणाला बोध करून, तर कोणाला स्पर्शानें; कोणाला मिठी मारून तर कोणाला दृष्टिक्षेपानें आपली प्रेमदेणगी देतात. अक्कलकोटच्या स्वामींनीं एका अधिकारी पुरुषाच्या श्रीमुखांत देऊन त्याच्यावर कृपा केल्याचें सांगतात. बाळप्पांच्या शापउःशापांत किती अजब प्रेमजादू भरलेली होती हें मागें सांगितलेंच आहे. " अरे, माझ्या शिव्यांत व रागांतहि प्रेम भरलेलें आहे " असें श्रीपंत कळवळ्यानें एखाद्या हट्टी शिष्याला म्हणत. अशा प्रकारचें प्रेमाकर्षण हाच अवतारी पुरुषांच्या ठिकाणचा विशेष गुण होय. प्रत्येक मनुष्याला वेदान्तशास्त्र अथवा इतर ग्रंथ पढूनच मोक्षाधिकार यावयाचा असता तर दीन, दुबळे, निरक्षर, भोळे, भाबडे वगैरे लोकांना परमार्थ असाध्यच झाला असता. परंतु संत–सत्पुरुषांचें मुख्य कार्य येणाऱ्यांच्या अंतःकरणावर घडत असतें. कारण कोणीहि कितीहि अशिक्षित अगर मूढ असला तरी त्याला अंतःकरण हें असतेंच. त्यामुळें प्रेमाची भाषा त्याला तेव्हांच समजते. हें प्रेमच प्रत्येक प्राणिमात्राचें, किंबहुना, सर्व विश्वाचें जीवन असून जगाचें धारणपोषण करणारी हीच जीवनकला होय; म्हणून या प्रेमाची भाषा पशुपक्ष्यांनाहि समजते असा आपला अनुभव आहे. त्यामुळें अशिक्षित, मूढ लोकांचें अंतःकरण प्रेमाचे ठसे तेव्हांच घेतें. ते भाविक व एकधोरणी असतात. त्यामुळें त्यांना आपली प्रेमदेणगी देऊन सत्पुरुषांना तेव्हांच मुक्त अगर मोकळे करितां येतें.

## लोकसंग्रह

अभेदभक्ति, वैराग्य आणि ज्ञान हीं आपल्या स्वतःच्या आचरणांत आणून इतरांनाहि तसेंच करण्यास लावणें हें लोकसंग्रहाचें एक लक्षण नाथांनीं सांगितलें असल्याचा वर उल्लेख केलाच आहे. या दृष्टीनें पाहातां श्रीपंतांनीं लोकसंग्रहाचें फार मोठें कार्य केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं शेकडो लोकांना निरपेक्षपणानें, निःपक्षपातीपणानें व शुद्ध प्रेमानें आत्मबोध करून जें एका गुरुप्रेमरज्जूनें बांधून टाकिलें तोच लोकसंग्रह होय. त्याचा एक विशेष हा होता कीं श्रीपंतांचा बोध हा तारक बोध अथवा अखेरचा बोध असल्यामुळें ते

आपण होऊन तो देण्यास जात नसत. तर तो मिळावा या इच्छेनें जो कोणी त्यांचेकडे जाई त्यालाच तो ते देत असत. त्यामुळें बाहेर हिंडून व्याख्यानद्वारां अथवा प्रवचन-द्वारां लोकांना त्यांनीं कधीं बोध अगर उपदेश केला नाहीं. आत्मबोध हा कोणावर सक्ती करून देणेचा नसून त्या बोधाची ज्याला भूक आहे त्यालाच बोधान्न घालावयाचें असा त्यांचा नियम होता. त्यामुळें त्यांनीं आपल्या घरीं बसूनच अन्नदान, ज्ञानदान व प्रेमदान केलें. त्यांनीं हें व्रत कडक रीतीनें पाळलें होतें तरी, त्यांनींच एका पदांत म्हटल्याप्रमाणें, गगनसरोवरीं उगवलेल्या सद्गुरुरूपी कमलाच्या सुवासानें आकर्षिले जाऊन शेकडो भक्त-भ्रमर आमोद सेवनाकरितां त्या कमलाकडे धावून गेले. अथवा एखाद्या शीतल छायेच्या प्रचंड वटवृक्षाच्या आश्रयाला ज्याप्रमाणें हजारों पक्षी जाऊन राहावे त्याप्रमाणें शेकडो आर्त, जिज्ञासु व मुमुक्षु श्रीपंतांकडे जाऊन त्यांनीं त्यांचेकडून ज्ञानप्राप्ति करून घेतली व गुरुप्रेमसुख अनुभविलें. त्यामुळें श्रीपंतांच्या हयातींत त्यांची फारशी प्रसिद्धि झाली नव्हती व प्रसिद्धीची त्यांनीं कधीं अपेक्षाहि केली नाहीं. हा जो लोकसंग्रह श्रीपंतांनीं केला त्याचें स्वरूप ठोकळ मानानें खालीं लिहिल्याप्रमाणें होतें.

## श्रीपंत शिष्याला गुरुरूपानें पाहात

आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक आर्त, जिज्ञासु व मुमुक्षूला ते गुरुरूपानें पाहात असत व त्याची अपेक्षा, त्याच्या शंका कुशंका काय असतील त्या सर्व शांतपणानें व सहानुभूतीनें ऐकून घेऊन त्याच्याच कलानें जाऊन जरूर तितकें त्याच्या शंकांचें निर-सन करीत आणि मग त्याला आत्मबोध करीत. आपल्याकडे बोधग्रहणार्थ येणाराकडे ते कोणत्या दृष्टीनें पाहात असत तें त्यांच्या कांहीं पदांवरून दिसून येतें. " आत्मा-देव तूंचा असतां । व्यर्थ कासया भ्रमसी ॥ ध्रु० ॥ परम शुद्ध परब्रह्म तूंची । कासया गया काशी ॥ १ ॥ " ( द. प्रे. ल. ५२९ ); "आत्माचि परब्रह्म सत्य । तूंचि सर्वांठायीं " (द. प्रे. ल. ५३६) असा ते शिष्याला बोध करीत. एके प्रसंगीं एका मुमुक्षूला उद्देशून त्यांनीं पुढील पद म्हटलें. " धांवुनि आलासी सद्गुरुचरणा । सहज मुक्तलासी जन्ममरणा ॥ ध्रु० ॥ × × × येणें जाणें नाहीं आतां । परब्रह्म तूं आत्मरमणा ॥२॥ " ( द. प्रे. ल. १६५९ ) म्हणजे त्या येणाराला ' आत्मरमणा ' म्हणून संबोधून ' तूंच परब्रह्म आहेस ' असें त्यांनीं सांगितलें. त्याचप्रमाणें आणखी एका शिष्याला दत्तनाम जपण्याचा उपदेश करितांना " अहं-सोहं–वृत्ति–शून्य तूंचि ब्रह्म बापा " ( द. प्रे. ल. ९९ ) असें म्हणून त्यांनीं त्याचा गौरव केला. १८९५ सालीं कांहीं मंडळींसह श्रीपंत कणबर्गीस जाण्याकरितां निघाले. किल्ल्याजवळील तळ्यापलीकडे गेल्यावर त्यांनीं सर्वांना त्यांचे जोडे काढून ठेवण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं करि-तांच श्रीपंतांनीं ते एका गाठोड्यांत बांधले व तें गाठोडें आपल्या डोक्यावर घेऊन ते जे धूम पळत सुटले ते एका टेकडीवर जाऊन बसले. बाकीची मंडळी त्यांच्या पाठोपाठ धावत गेली व त्यांनीं श्रीपंतांना तसें करण्याचें कारण विचारतांच " अहं निर्विकल्पो

निराकाररूपी " असें सांगून त्यांनीं श्रीमच्छंकराचार्यांचा एक श्लोक म्हटला. नंतर सर्वांतर्यामीं परमात्मा कसा भरला आहे यासंबंधीं एक तास बोध करून ते मंडळीसह कणबर्गीस गेले. अशा रीतीनें " सतत मी संतांचे वाहीन मस्तकीं मोचे " ( द. प्रे. ल. ११८० ) हे आपले शब्द त्यांनीं प्रत्यक्ष कृतीनें खरे करून दाखविले. ते आपल्या शिष्यांना व भक्तांनाच 'संत' म्हणून संबोधीत असत व "माय बाप तुम्ही संत माझे लोभ पूर्ण ठेवा " ( द. प्रे. ल. ११८३ ) वगैरे प्रकारचीं पदें अकोळहून निघण्याचे वेळीं, भक्तांचा निरोप घेतांना त्यांना उद्देशून, त्यांनीं म्हटल्याचा प्रकरण ३३ मध्यें उल्लेख केलाच आहे.

## समदृष्टि

श्रीपंत आपल्याकडे बोधग्रहणार्थ येणाऱ्यांकडे, मग ते कोणत्याहि जातीचे अगर धर्मांचे असले तरी, समदृष्टीनें पाहात असत व त्यांनीं एके ठिकाणीं " ब्रम्हविद् ब्राह्मण, श्वपच । समरूपें दिसती " ( द. प्रे. ल. १६४० ) असे उद्गार काढले आहेत. सुमति, दुर्मति कोणी कसाहि असला तरी त्यांना तो गुरुरूपच दिसत असे. एके ठिकाणीं सद्गुरूला उद्देशून ते म्हणतात " तुजवांचुनी नाहीं जगतीं । कोण सुमति कोण दुर्मति " ( द. प्रे. ल. १३६० ). त्याचप्रमाणें " सर्वहि सद्गुरुरूप दिसे । सदैव बोध मिळत असे ॥ ध्रु० ॥ सुष्ट असो वा दुष्ट असो वा । बोधचि देत असे ॥ १ ॥ सदाचारी दुराचारी । अनुभव देत असे ॥ २ । " ( द. प्रे. ल. ११२१ ); " धन्य गुरूनें कृपा केली । समदृष्टि दिधली ॥ ध्रु० ॥ जाति, गोत्र न पुसे आतां । ऐक्यस्थिति लाभली ॥ १ । " ( द. प्रे. ल. ११५४ ) अशा प्रकारचा त्यांचा अनुभव वारंवार व्यक्त झाला आहे. ज्याप्रमाणें ते सर्वांना समदृष्टीनें पाहात त्याचप्रमाणें एकच बोधान्न सर्वांना जेवूं घालीत. 'तत्त्वमसि'-बोधरूपी तें अन्न होय. तें जेवूं घालण्यांत ते पक्षपात करीत नसत. याचें कारण असें कीं त्यांच्या दृष्टीला सर्वच मुक्त दिसत असत व " सर्व मुक्तचि बद्ध न कोणी । गर्जते श्रुतिवाणी " (द. प्रे. ल. १२५४); "जग मुक्त हें ठायींच्या ठायीं । सद्गुरु-शिष्य-भावची नाहीं" (द. प्रे. ल. १०२०); "नित्य मुक्त हें जग वर्ततें" ( द. प्रे. ल. ७२३ ) अशा प्रकारचे त्यांनीं वारंवार उद्गार काढले आहेत. "या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी ।" ( गी. २-६० ) या श्रीमद्भगवद्गीतेंतील श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें त्यांच्या ठिकाणीं स्वरूप-जागृति कायम असल्यामुळें येणाऱ्याच्या 'बद्ध, मुक्त' वगैरे कल्पना म्हणजे स्वप्नींच्या कथा असें त्यांना वाटत असे; त्यामुळें ते त्याला स्वरूपबोधच करीत असत. त्याचा असा परिणाम होत असे कीं जरी त्यांच्या शिष्यवर्गात निरनिराळ्या जातीचे, धर्मांचे, वयोमानांचे व संस्कृतींचे लोक असत तरी त्यांपैकीं कोणालाहि मी दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठ आहे असें वाटण्यास जागा नव्हती व तसें एखाद्याला वाटत असल्याचें आढळल्यास ते त्याच्या अभिमानाचें तेव्हांच छेदन करीत असत. सर्वसाधारणपणें असें मात्र होत असे की ते सर्वांशीं अत्यंत सलगीनें व मातृप्रेमानें वागत असल्यामुळें आपल्यावरच त्यांची खरी

प्रीति आहे असें प्रत्येकाला वाटे. पण आपल्याशीं त्यांची जशी सलगी आहे तशी इतरांशीं असलेली पाहिली म्हणजे तो स्वतःशींच खजील होऊन जात असे. एकदां असें झालें कीं श्रीपंतांच्या एका शिष्यानें दुसऱ्या शिष्यासंबंधीं त्यांच्याकडे कागाळी केली व तो फार वाईट वर्तनाचा आहे असें सांगितलें. तेव्हां त्यांनीं आपणास राग आलासें दाखवून व "तो भेटला म्हणजे त्याची कानउघाडणी करितों" असें सांगून त्याचें समाधान केलें. पुढें लौकरच त्यांच्या घरीं उत्सव व्हावयाचा होता. त्या उत्सवाकरितां तो आरोपित शिष्य मोठ्या आतुरतेनें आला व श्रीपंतांना पाहातांक्षणींच त्यांच्या पायां पडला. तेव्हां त्यांनीं त्याला उचलून घेऊन प्रेमानें मिठी मारली. हा प्रकार तो चुगली करणारा पाहात होता. तें पाहून तो खजील झाला व रागावून त्यानें श्रीपंतांना विचारलें कीं "पंत, 'याला शासन करीन' म्हणून ते दिवशीं तुम्हीं म्हणालां होतां. आणि आतां त्याला प्रेमानें मिठी मारतां हें कसें ?" तेव्हां त्यांनीं असें उत्तर दिलें कीं "अरे, आज फार दिवसांनीं तो मोठ्या आतुरतेनें माझ्या भेटीला आला. त्याच्या रूपानें माझा बाळप्पाच मला भेटला; म्हणून मी त्याला मिठी मारली. यांत गैर काय झालें ? तो कर्ता नाहीं ही गोष्ट मी जाणत असतांना मी त्याला काय म्हणून दोष देऊं ?" हें उत्तर ऐकून तो चुगली करणारा गारच झाला.

कोल्हापूर येथील श्रीपंतांचे शिष्य रामाबुवा ऊर्फ रामानंद यांच्या वर्तनाबद्दल श्रीपंतांकडे मधुन मधुन कोणी तरी तक्रार करीत असत व त्या त्या वेळीं ते रागावत. एकदां ते रागांत असतांनाच रामाबुवा त्यांचेकडे गेले. लगेच श्रीपंतांनीं रागाच्या भरांतच रामाबुवांसंबंधींची तक्रार त्यांच्या कानावर घातली. तेव्हां रामाबुवांनीं निर्भयपणें असा जबाब दिला कीं "पंत, तुमच्या शपथ मी कांहीं केलें नाहीं. 'मी कर्ता नव्हे' हा तुमचाच उपदेश ना ?" तें ऐकून श्रीपंतांनीं मोठ्या प्रेमानें रामाबुवांना मिठी मारिली व त्यांच्या रागाचें पर्यवसान प्रेममिठींत झालें. असाच एक प्रसंग १९०४ सालीं श्रीपंत कोचरी येथें गेले असतांना झाला व त्याच वेळीं "निष्ठुर कां होसी। केवळ प्रेमाची राशी" (द. प्रे. ल. २६२५) हें पद म्हणत असतांना त्यांच्या रागाचें पर्यवसान प्रेमोद्रेकांत झालें या गोष्टीचा प्रकरण ४१ मध्यें उल्लेख केलाच आहे.

## निर्लोभता अथवा निरपेक्षता

निर्लोभता अथवा निरपेक्षता हा गुण श्रीपंतांच्या ठिकाणीं प्रामुख्यानें वसत होता. त्यांच्या प्रेमाच्या शुद्धपणाचें व बोधाच्या उज्वलतेचें बीज निर्लोभपणांत होतें. अंतःकरणांत आशेचा थोडा जरी उद्भव झाला तरी शुद्ध प्रेमरूपी दुधांत तो मिठाचा खडाच होय. त्याचप्रमाणें बोधदात्याच्या मनांत लोभाचा थोडा जरी प्रादुर्भाव झाला तरी शिष्यहृदयीं पेरलें जाणाऱ्या बोधबीजाला लागणारी ती कीडच होय. श्रीपंतांनीं निरपेक्षतेचें अथवा निर्लोभतेचें असिधाराव्रत अखेरपर्यंत पाळलें व आर्थिक दृष्ट्याहि ते प्रथमपासून स्वावलंबी असल्यामुळें त्यांना शिष्यांकडून द्रव्याची अथवा कोणत्याहि ऐहिक सुखोपभोगाच्या

वस्तूची अपेक्षा करण्याचें कारणच नव्हतें. "नाहीं उणें आप्तकामा" (द. प्र. ल. १८८०); "नित्य तृप्त नाहीं झोळी" (द. प्रे. ल. १९४१) या त्यांच्याच उक्तींप्रमाणें आप्तकाम म्हणजे ज्याच्या सर्व कामना पूर्ण झाल्या आहेत असा जो त्याला काय कमी आहे? त्याला झोळी कशाला? उलट सद्गुरुकृपेनें त्यांच्या स्थूल प्रपंचाची भरभराट व "अवधूताच्या संसाराची" वाढ या समांतर रेषेंत चालल्या होत्या. त्यामुळें त्यांच्याकडे येणाराला पोटभर भाजीभाकरीचें अन्न व आतृप्ति बोधान्न मिळत असे. श्रीपंतांनीं शिष्यांकडून एकच अपेक्षा केली. ती म्हणजे "आस ती प्रेमाची" होय. त्या बाबतींत मात्र "करूं सहजीं आस लोभ्याहूनी" (द. प्रे. ल. १२११) असें ते म्हणत आणि नेहमीं असा प्रकार घडत असे कीं आपल्याकडे आलेल्या कोणाही शिष्यानें परत जावें असें त्यांना वाटत नसे व त्याला जाण्याला परवानगी देण्याचे बाबतींत नेहमीं ते नाखुष असत. शिष्यांनीं नेहमीं आपल्या जवळच असावें असें त्यांना वाटे व अण्णा अकोळकरांनीं नेहमीं आपल्या जवळच असावें या हेतूनें श्रीपंतांनीं त्यांना अत्यंत सलगीनें व कळकळीनें लिहिलेल्या कांहीं पत्रांचा मागें उल्लेख केलाच आहे. निघण्याची इतर सर्व तयारी करून कपडे करून श्रीपंतांना नमस्कार करण्यास गेलेल्या शिष्याला कांहीं तरी सबबीवर त्यांनीं महिना महिनाहि राहवून घेतल्याचीं उदाहरणें आहेत. काका घाणेकरांना तर परत जाण्याची परवानगी मिळण्याची फार मुष्किल पडत असे. श्रीपंतांचें व काकांचें दोघांचेंहि प्रेम खुळें! त्यामुळें काकांना जाण्याची परवानगी देण्याला ते नेहमीं खळखळ करीत. एकदां काका श्रीपंतांच्या भेटीला आले असतां त्यांना परत जाण्याची फार निकड होती व श्रीपंत सुखासुखीं आपल्याला परवानगी देणार नाहींत ही त्यांची पक्की खात्री होती. तेव्हां त्यांनीं असा बेत केला कीं आज आपण श्रीपंतांना न कळवितांच जाऊं म्हणजे पंचाईत नको. त्याप्रमाणें ते व श्रीपंतांचे दुसरे एक शिष्य रामभाऊ गाडगीळ हे श्रीपंतांना सांगितल्याशिवाय रात्रीं नऊ वाजतां स्टेशनवर जाण्याकरितां पायींच निघाले. पण प्रकार असा झाला कीं बेळगावांत पाच सहा वर्षें राहिलेले व नेहमीं येणारे असूनहि बोलण्याच्या नादांत ते स्टेशनचा रस्ता चुकून भलत्या दिशेला गेले व बऱ्याच अंतरावर गेल्यानंतर स्टेशन अजून कां येत नाहीं म्हणून पाहातात तों आपण भलतीकडे आल्याचें त्यांच्या लक्षांत आलें. तेव्हां ते परत फिरले व जेथून तो रस्ता फुटला तेथें आले व दुसऱ्या रस्त्यानें जाऊं लागले. पण पुनः तोच प्रकार झाला. असें दोन तीन वेळां झालें. अखेर त्यांनीं रस्त्यांत भेटलेल्या एका मनुष्याला स्टेशनचा रस्ता विचारला व त्यानें सांगितलेल्या रस्त्यानें ते स्टेशनवर गेले. तों गाडी उभीच होती. तिच्यांत ते जाऊन बसले व "श्रीपंतांना न विचारतां आपण निघाल्याबद्दल आपणास हें बक्षिस मिळालें!" असें ते म्हणूं लागले.

कांहीं कांहीं वेळां याच्या अगदीं उलट प्रकार होत असे. म्हणजे श्रीपंत एखाद्या शिष्याला ताबडतोब जाण्यास सांगत व त्यांच्या त्या सांगण्यांत कांहीं तरी हेतु असे; निदान त्यांच्या सांगण्याप्रमाणें जाण्यांत त्याचें हित असे असा पुढें अनुभव येई. भोर संस्थाना-

पैकीं पडघवली गावचे वामन गजानन जोशी हे श्रीपंतांचे शिष्य असून एकनिष्ठ सेवक आहेत हें मागें सांगितलेंच आहे. १९०४ सालीं श्रीपंतांची प्रकृति बरीच खालावली होती; तेव्हां जोशी यांनीं असें ठरविलें कीं श्रीपंतांची तबेत बरी नसल्यामुळें आपण त्यांच्या जवळ राहून त्यांची सेवा करावयाची व इतर कोठें जावयाचें नाहीं. पण श्रीपंतांचा त्यांचे पाठीशीं सारखा तगादा लागला कीं "तूं आपल्या घरीं जाऊन आईबापांना भेटून ये." पण जोशींना कांहीं केल्या तें रुचेना. अखेर जेव्हां श्रीपंतांनीं फारच आग्रह धरिला तेव्हां ते आपल्या गांवीं गेले. तों त्यांचे वडील अत्यवस्थ असून त्यांनीं त्यांचा सारखा ध्यास घेतला असल्याचें त्यांना समजलें. तेव्हां श्रीपंतांच्या सांगण्यांतील वर्म त्यांना समजून आलें. पुढें एक दोन दिवसांतच त्यांच्या वडिलांनीं देह ठेविला. त्याचप्रमाणें धारवाड येथील वासुदेवराव अभ्यंकर वकील हे श्रीपंतांचे शिष्य असल्याचा मागें उल्लेख केलाच आहे. एकदां प्रापंचिक दगदगीनें व वकिलीच्या कामाच्या जिकीरीनें ते फार कंटाळले व बेळगावास जाऊन चार पाच दिवस श्रीपंतांच्या संगतींत निश्चिंतीनें काढावे म्हणजे मनाला समाधान होईल असें वाटून ते बेळगावास गेले व त्यांनीं श्रीपंतांचें दर्शन घेतलें. तेव्हां प्रथम भेटींतच "तूं परत कधीं जाणार ?" असें श्रीपंतांनीं विचारलें. इतकेंच नव्हे, तर "वडिलांच्या हाताशीं कोणी नाहीं तूं लवकर जा" असेंहि म्हटलें. तें ऐकून वासुदेवराव अगदीं चकित होऊन गेले. कारण "मी जाऊं कां ?" म्हणून कोणीं विचारलें तरी सुखासुखीं परवानगी न देणारे श्रीपंत आज आपणास पाहिल्याबरोबर "केव्हां जाणार ?" म्हणून कां विचारतात हें त्यांना मोठें गूढ पडलें; आणि आपणास विश्रांति व निश्चिंति मिळावी म्हणून ज्यांच्याकडे आपण आलों त्यांनीं प्रथम भेटींतच जाण्याची गोष्ट काढल्यामुळें त्यांचा हिरमोडहि झाला. पण श्रीपंतांची आज्ञा शिरसामान्य करून ते त्याच दिवशीं रात्रीं धारवाडास परत जाण्यास निघाले. दुसरे दिवशीं सकाळीं ते धारवाडास पोचले व आदल्या दिवशीं रात्रींच त्यांची बहीण बाळंत झाल्याचें व तिचे बरेच हाल झाल्याचें त्यांना स्टेशनवरून घरीं जातांना वाटेंतच समजलें. त्या वेळीं त्यांचे वृद्ध वडील व मातोश्री यांचे खेरीज घरांत कोणीहि नव्हतें. पुढें दहा बारा दिवसांनीं त्यांची बहीण वारली. तेव्हां आपल्या वडिलांजवळ कोणी नाहीं म्हणून आपणाला आग्रहानें श्रीपंतांनीं ताबडतोब परत पाठविण्यांतील वर्म त्यांना कळून आलें व श्रीपंतांबद्दल फार कृतज्ञता वाटूं लागली.

आणखी एकदां असा विलक्षण प्रकार झाला कीं श्रीपंतांचे एक लिंगायत शिष्य आपल्या बहिणीला घेऊन बेळगावास श्रीपंतांच्या दर्शनाला आले होते. त्यांची बहीणहि श्रीपंतांच्या शिष्यवर्गापैकीं होती. ती घरीं आलेली असून तिचे सासरीं फार हाल होत असत व तिची शरीरप्रकृतिहि नीट नव्हती. त्यामुळें ती आपल्या जिवाला अगदीं कंटाळून गेली होती. ते गृहस्थ व त्यांची बहीण हीं दोघें श्रीपंतांच्या घरीं दोन तीन दिवस होतीं. नंतर परत जातांना जेव्हां तीं श्रीपंतांचा निरोप घेण्यास गेलीं तेव्हां त्या बाईचा कंठ दाटून येऊन तिला तें वियोगदुःख अनावर झालें. तशा स्थितींत तिनें आपल्या जिवाचा

कंटाळा आला असल्याचें श्रीपंतांना सांगून आपणाला देह सोडून जाण्याची परवानगी मागितली. तेव्हां श्रीपंतांचाहि कंठ दाटून येऊन त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. पुढें तीं भावंडें तशा स्थितींतच श्रीपंतांच्या पायांवर डोकें ठेवून कशीं बशीं माडीवरून खालीं उतरलीं व सडकेनें चालूं लागलीं; तों श्रीपंतहि त्यांच्या मागोमाग जिना उतरून आंगणांत आले व दिवाण ' नको, नको ' म्हणत असतांनाहि त्यांना पोंहोंचविण्याकरितां त्यांच्या मागें जाऊं लागले. या वेळीं त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु चालले होते व " बाळे जा " म्हणून ते म्हणत होते. त्यांच्या आजूबाजूच्या मंडळींना तो देखावा पाहून मोठा अचंबा वाटला व त्यांपैकीं एक दोघांनीं श्रीपंतांच्या मागोमाग जाऊन त्यांना परत घरीं आणिलें. पुढें थोडक्याच दिवसांनीं ती बाई निवर्तल्याची खबर आली. तेव्हां श्रीपंतांच्या वर वर्णन केलेल्या स्थितींतील रहस्य सर्वांना समजून आलें.

## मानाचा व पूज्यतेचा तिटकारा

श्रीपंत शिष्यांकडून मानाची अथवा पूज्यतेची बिलकूल अपेक्षा करीत नसत व बेडकीहाळ येथील त्यांच्या भक्तमंडळींनीं १९०४ सालीं त्यांच्या स्वागताची जंगी तयारी केली असतां त्यांनीं तिकडे जाण्याचें नाकारलें या गोष्टीचा प्रकरण ४१ मध्यें उल्लेख केलाच आहे. तसेंच एखाद्या भक्तानें आचरटपणा करून त्यांना भलतेंच महत्व दिल्यास त्यांना तें खपत नसे. एकदां त्यांचा एक शिष्य त्यांचेकडे आला होता. त्याला संकष्टी चतुर्थीचा उपवास असतो हें समजल्यावर त्याला पूजेकरितां लागणाऱ्या दूर्वा वगैरे तयारी करण्यास त्यांनीं घरांतील मंडळीस सांगितलें. संध्याकाळीं त्यानें श्रीगणपतीची पूजा केली व श्रीपंतांची पूजा करावी म्हणून तो पूजासाहित्यासह माडीवर ते होते तेथें गेला व त्यांना गंध, फूल अर्पण करून त्यांच्या मस्तकावर दूर्वा टाकण्याच्या तो बेतांत होता. तें पाहून "अरे, मी हत्ती कां आहे माझ्या डोक्यावर दूर्वा टाकायला ? " असें ते म्हणाले. त्याबरोबर तो ओशाळला व भोंवतालच्या मंडळींत मोठा हंशा पिकला. तसेंच, एकदां श्रीपंत अकोळ येथें असतांना त्यांच्या एका शिष्यानें आपल्या घरीं त्यांना जेवणास बोलाविलें होतें. ते त्याच्या घरीं गेल्यावर त्यांची पूजा व आरती करण्याच्या हेतूनें सर्व साहित्य घेऊन तो त्यांच्यापुढें आला, तेव्हां " खुळ्या, एकवार ' आपला ' म्हटल्यावर पुनः पूजाच कां करावयास पाहिजे ? " असें सांगून त्यांनीं तो प्रसंग टाळला.

## सलगी

श्रीपंत आपल्या शिष्यांशीं बरोबरीच्या नात्यानें वागत व शिष्यांनींहि आपणाशीं अकृत्रिम सलगीनें वागावें असें ते सांगत. त्यांचे एक शिष्य नारायण अण्णाजी संपगावकर यांना आपणास नमस्कार न करण्याबद्दल त्यांनीं सांगितलें होतें. एकदां आपल्या कांहीं स्नेह्यांना बरोबर घेऊन नारायणराव श्रीपंतांकडे गेले व आपले स्नेही बरोबर असतांना आपणच नमस्कार केला नाहीं तर तें बरें दिसणार नाहीं असें मनांत येऊन त्यांनीं आपल्या

स्नेह्यांबरोबर आपणहि " महाराज " म्हणून श्रीपंतांना नमस्कार केला. त्याबरोबर " नारायण, मी ब्राम्हणाचा बच्चा आहें हें विसरलास काय ? तसेंच तूं मला नमस्कार करावयाचा नाहींस अशी ताकीद केली असूनहि पुन्हां नमस्कार करतोस ? खबरदार पुनः नमस्कार करशील तर ! " असें श्रीपंत म्हणाले. तें ऐकून नारायणराव व त्यांचे स्नेही चकितच झाले. " अरे, मला ' महाराज ' म्हणून दूर राहूं नका, तर मला आपला मित्र समजून सलगीनें माझ्याशीं वागा " असें ते म्हणत.

## सोंगा-ढोंगावर कटाक्ष

श्रीपंतांचा सोंगा-ढोंगावर फार कटाक्ष असे. " दंभ भक्ति झकवी मुक्ति । नेणुनी युक्तीला " ( द. प्रे. ल. ९७३ ) असें त्यांनीं म्हटलें आहे. तरुण मंडळींनीं प्रपंच सोडून कफनी घालून बूवा होऊन भिरवणें त्यांना बिलकूल आवडत नसे व अशा कांहीं जणांना भगवें टाकून देऊन प्रपंच करण्यास त्यांनीं लाविलें. मुंबईजवळ वसई म्हणून ठाणें जिल्ह्यापैकीं एक तालुक्याचें ठिकाण आहे. तेथील एक जाधव आडनावाचा तरुण मराठा गृहस्थ कफनी घालीत असे व त्यानें थोडासा योगाभ्यासहि केला होता. श्रीपंतांची कीर्ति ऐकून तो बेळगावास त्यांच्या वाड्यांत गेला. तेव्हां घरांतील मंडळींनीं संन्यासीबूवांना माडीवर नेलें आणि तेथें श्रीपंतांच्या कोचासमोर आपलें आसन घालून ते बसले. थोड्या वेळानें श्रीपंत तेथें आले व त्यांनीं त्या संन्यासीबूवांना नमस्कार केला. हेच श्रीपंत असें समजतांच संन्यासीबुवांनींहि त्यांना नमस्कार केला व " आपण थोर, आपण मला कां नमस्कार केला ? " असें त्यांना विचारलें. तेव्हां " तो नमस्कार तुला केलेला नसून तुझ्या भगव्याला केला " असें श्रीपंतांनीं उत्तर दिलें व तें ऐकून तो चपापला ! पुढें त्याचें श्रीपंतांशीं संभाषण होऊन त्यांनीं त्याला आपल्याजवळ कांहीं दिवस ठेवून घेतलें व कफनी सोडण्यास लावून त्याला धोतर, सदरा, कोट वगैरे गृहस्थी बाण्याचा पोषाख दिला आणि "घरीं जाऊन प्रपंच कर" असें सांगून पाठवून दिलें. तेव्हांपासून तो प्रपंच करूं लागला.

## श्रीपंत युक्तिस्वरूप होते

श्रीपंत युक्तिस्वरूप होते. शिष्याला पाहिल्याबरोबर ते जें सहज बोलत त्यावरून त्याला असें वाटत असे कीं आपल्या मनांतील विचार अथवा आपल्या शंका ओळखून ते बोलत असावे व असें कसें होतें याबद्दल पुष्कळ शिष्य त्यांना विचारीतहि. तेव्हां आपल्या मनाच्या साम्यावस्थेंत तें सहज होतें असें सांगून, आपणा स्वतःकडे महत्व न घेतां, ते त्याचें समाधान करीत. शिष्याला पाहिल्याबरोबर त्यांना आपोआप बोध स्फुरत असे व आपल्या सहज स्थितींत त्याच्यासंबंधीं जे उद्गार निघाले असतील त्यांचा अनादर करूं नये असें ते सांगत. ' सद्‌गुरु युक्तिस्वरूप असल्यामुळें निरनिराळ्या शिष्यांचें समाधान करून त्यांच्या चित्तांचें आकर्षण करण्याकरितां तो निरनिराळ्या युक्त्या योजीत असतो. त्यामुळें दुसऱ्या एकाला श्रीपंतांनीं अमुक सांगितलें व आपणास निराळें कां सांगितलें

अशी शंका न घेतां आपल्याला त्यांनीं जें सांगितलें असेल त्याप्रमाणें बिनचूक वागण्यांतच खरें हित आहे' असें ते सांगत. " एकाला तारक झालेल्या युक्त्या दुसऱ्याच्या उपयोगीं पडत नाहींत. तशा युक्त्या योजल्यास तान्हेल्याला सुकें अन्न व भुकेल्याला पाणी दिल्या-सारखें तें अप्रयोजक व निरर्थक होईल. समोर आलेल्याला पाहातांच सद्‌गुरूला आपो-आप युक्त्या सुचतात; त्या पूर्वीपासून योजलेल्या नसतात " असें त्यांनीं म्हटलें आहे. ( पु. ८-७७-७८ ) श्रीपंतांना सर्वसाधारणपणें असा अनुभव येत असे कीं ज्यांचा शुद्ध भाव आहे अशा मूढ भक्तीच्या लोकांना एकदां आपला म्हणवून प्रेमानें चार शब्द जरी सांगितले तरी तें पुरें होत असे. त्यामुळें अशा मंडळींचें समाधान करण्यास फारसा त्रास पडत नसे. त्याचप्रमाणें मेरुवत ज्यांची निष्ठा अचल होती अशा पुटप्पा कणबगी-सारख्या सेवारत भक्तांना शंकाच उठत नसल्यामुळें त्यांचें समाधान अभंगच असे. त्यामुळें तत्वबोध करून त्यांचें समाधान करण्याचा प्रश्नच उरत नसे. असे एकनिष्ठ व सेवारत भक्त श्रीपंतांजवळ नेहमीं असत. तसेंच त्यांच्या शिष्यवर्गांत प्रणिपात करून म्हणजे लीन वृत्तीनें तर्क कुतर्क न लढवितां अनन्य भावानें शरण जाणाऱ्या भक्तांची संख्याहि बरीच मोठी होती. अशा लोकांच्या बाबतींतहि श्रीपंतांना बोधखड्गाचा क्वचितच उपयोग करावा लागे.

एकदां एक अशिक्षित इसम श्रीपंतांकडे उपदेश घेण्याकरितां आला होता. त्यांनीं जें कांहीं सांगितलें तें ऐकून तो म्हणाला " पंत, हें माझ्या ध्यानांत कसें राहील ? " तेव्हां ते म्हणाले " बरें, तें ध्यानांत नाहीं राहात तर सोडून दे. नुसतें "दत्त", "दत्त" म्हणत जा. तेंहि होत नसेल तर " पंत ", " पंत " म्हणत जा. तितकेंहि होत नसेल तर निदान इतकें तरी कर कीं मला विसरूं नकोस ! " या सलगीच्या व कळकळीच्या बोधानें तो पूर्ण समाधान पावून गेला. येणाराची भाषा कोणतीहि असो अगर त्याला मुळींच बोलतां येत नसो, श्रीपंत त्याला वाङ्मनातीत शुद्ध प्रेमाचा अनुभव देत असल्या-मुळें तो समाधान पावून जात असे. म्हणूनच त्यांनीं एके ठिकाणीं " मौज पहा ही सद्-गुरुघरची। मूढहि सहज प्रेमें नाची " ( द. प्रे. ल. ११७५ ) असें म्हटलें आहे. आणखी एकदां बेरड जातीचा एक इसम श्रीपंतांच्या दर्शनाकरितां त्यांच्या घरीं आला असतां त्यांनीं त्याला " चोरी, चाहाडी व शिंदळकी करूं नको " असा उपदेश केला. तेव्हां तो मोकळ्या मनानें म्हणाला "पंत, चोरीचा तर आमचा धंदा ! तेव्हां चोरी केल्या-शिवाय आमचें कसें भागणार ? " त्याचा तो प्रांजलपणा व प्रामाणिकपणा पाहून श्रीपंतांना फार कौतुक वाटलें व " तुला योग्य वाटेल तें तूं कर; पण मला स्मरून करीत जा, " असें त्यांनीं त्याला सांगितलें आणि त्याचें समाधान करून पाठवून दिलें. पुढें असा प्रकार झाला कीं नेहमींच्या सवईनें तो चोरी करण्यास जाई; पण श्रीपंतांचें स्मरण होतांच माघार घेई. असें होतां होतां त्याची ती सवय पार नाहींशी झाली व कष्ट करून तो उपजीविका करूं लागला. दड्डी येथें एक कुत्रा होता. त्याची श्रीपंतांवर फार भक्ति होती. ते दड्डीस गेले म्हणजे तो नेहमीं त्यांच्या मागें मागें असे व ते परत गेले म्हणजे तो त्यांच्या

शिष्यांपैकीं कोणाकडे तरी सहात असे. श्रीपंतांनीं त्याचें नाव " वेदांत " असें ठेविलें होतें. पुढें तो मेल्याची बातमी जेव्हां श्रीपंतांना समजली तेव्हां " आमचा वेदांत संपला ! " असें ते म्हणाले.

ज्याप्रमाणें डॉक्टरकडे अगर वैद्याकडे रोगी असतील तेच यावयाचे त्याप्रमाणें दयाळु संतांकडे रंजले गांजलेले, सर्वांनीं अव्हेर केलेले व तुच्छ मानलेले किंवा त्रिविध-तापांनीं तप्त झालेले असेच लोक यावयाचे. श्रीपंतांकडे असे पुष्कळ लोक येत व अत्यंत सहानुभूतीनें व प्रेमानें त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन श्रीपंत त्यांना अभय देत आणि युक्ति-प्रयुक्ति योजून त्यांचें समाधान करीत असत. एका इसमाचें एक अंगवस्त्र होतें आणि त्याच्या घरांतील माणसांनीं व इतर पुष्कळ आप्तेष्टांनीं सांगून पाहिलें पण त्याचा तो नाद कांहीं केल्या सुटेना. ही गोष्ट श्रीपंतांच्या कानावर गेली. तेव्हां त्यांनीं त्याची असहायता पाहून त्याला असें सांगितलें कीं " तूं करतोस तेंच कर. पण एकच अंगवस्त्र कां ? दोन असूं देत कीं. मला मात्र विसरूं नकोस ". तेव्हां त्याला जरा बरें वाटलें व श्रीपंतांच्या शब्दावर त्याचा विश्वास असल्यामुळें त्यांनीं सांगितल्याप्रमाणें करितांच एका ठिकाणीं बैठक मारून बसलेलें त्याचें चित्त द्विधा झालें व आस्ते आस्ते दोन्हीहि अंग-वस्त्रें नाहींशीं होऊन तो मोकळा झाला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे समाधानाची अगर प्रेमाची इच्छा करून लीन वृत्तीनें त्यांचेकडे येणारा प्रत्येक याचक आपलें अंतःकरणरूपी भांडें प्रेमामृतानें भरून घेऊन जात असे.

## बोधखड्गाचा उपयोग

ज्यांच्या ठिकाणीं शंका कुशंका असत असे लोक आपलें समाधान व्हावें म्हणून श्रीपंतांकडे आले म्हणजे मात्र त्यांना प्रेमबोध देण्यापूर्वी बोधखड्गानें त्यांच्या शंका-कुशंकांचें निरसन करावें लागे; कारण वर उल्लेख केलेली अनन्य भक्ति म्हणजे मूढ अथवा अंध भक्ति नव्हे. ज्या मुमुक्षूंच्या ठिकाणीं शंका अथवा प्रश्न उठतच नाहींत त्यांचा भाग निराळा; पण ज्याच्या ठिकाणीं शंका अथवा प्रश्न उठतात त्यानें तीं दाबून न ठेवितां त्यांचा गुरुकडून निकाल लावून घेतलाच पाहिजे. त्याशिवाय त्याची भक्ति अनन्य होणार नाहीं व त्याचें समाधान होणार नाहीं. कित्येक मुमुक्षु व जिज्ञासु श्रीपंतांचा बोध श्रवण करण्यास त्यांचे घरीं जात व तो ऐकूनच पुष्कळांच्या शंकांचें निरसन होत असे आणि आस्ते आस्ते त्यांच्याबद्दल पूज्यभाव उत्पन्न होऊन ते त्यांचे शिष्य होत. ज्यांनीं श्रीदत्तप्रेमलहरी पुष्पमालेंतील पुष्प ७ व ८ मध्यें प्रसिद्ध झालेल्या श्रीपंतांच्या बोधाचीं टिपणें करून ठेविलीं ते कै. दत्तोपंत नागरकट्टी व ज्यांचा उल्लेख प्रकरण २४ मध्यें केला आहे ते, फ्रीमेसन सोसायटीचे दोघे सभासद, पद्मनाभराव व गणपतअय्या हे अशा लोकांपैकींच होते. १९०० च्या सुमारास मॅट्रिक व स्कूलफायनल या परिक्षांकरितां बेळगावास येऊन श्रीपंतांकडे उतरलेला धारवाड येथील विद्यार्थी बापू विनायक अभ्यंकर याला श्रीपंत हे ज्ञानी आहेत अगर गुरु आहेत यासंबंधीं बिलकूल कल्पना नसतांनाहि केवळ आठ दहा

दिवसांतील त्यांचा सहज बोध श्रवण करून तो मोहित झाला व पुढें त्यांचा शिष्य झाला या गोष्टीचा प्रकरण ३५ व ३६ मध्यें उल्लेख केलाच आहे. पण बापूसारखा तरुण, होतकरू, उमद्या स्वभावाचा, हुषार, चिकित्सक व ज्याची श्रीपंतांबद्दल पूज्यबुद्धि मुळींच नसून ते एक वेदांत–ग्रंथ वाचलेले शाळा–मास्तर आहेत अशी समजूत होती, अशा कोंवळ्या मनाच्या मुलाशीं श्रीपंतांसारख्या ब्रम्हनिष्ट, श्रोत्रिय व तत्वदर्शी महात्म्याचा अत्यंत सलगीनें व जणूं बरोबरीच्या नात्यानें 'गुरु करावा किंवा नाहीं ?' व 'समाधि म्हणजे काय ?' या प्रश्नासंबंधीं जो संवाद झाला त्याचा गोषवारा शक्य तितका बापूरावांच्याच शब्दांत दिल्यानें वाचकांना श्रीपंतांच्या चित्ताकर्षक बोधशैलीची कांहींशी कल्पना येईल असें वाटत असल्यामुळें, विस्तारवृद्धीचा दोष पतकरूनहि, तो येथे देत आहोंत.

## 'गुरु करावा कीं नाहीं ? व समाधि म्हणजे काय ?'

जेव्हां आपणाला कोणी तरी गुरु असावा असें बापूला वाटूं लागलें तेव्हां त्यानें निर्भीडपणें श्रीपंतांना असें म्हटलें कीं " पंत, माझ्या मतें गुरु करणें म्हणजे स्वतःला गुरूला विकणें, आमचें स्वातंत्र्य हरविणें; व तो सांगेल तसें न ऐकणें म्हणजे परस्वाधीन होणें आहे असें वाटतें. तो सांगेल तसें न ऐकल्यास गुरुद्रोहास विनाकारण पात्र व्हावें लागतें. असें झाल्यानें आपण पेंचांत पडूं व विकत श्राद्ध घेतल्याचें श्रेय आपणावर येणार या प्रकारची समजूत माझी आहे. गुरूनें ' बायको सोड ' अगर ' घर दार सोड ' असें म्हटल्यास तसें करणें आमचेकडून होणें नाहीं. तसें न झाल्यास गुरु करून घेऊन काय उपयोग ? गुरु करून घेणेपेक्षां न करून घेणें चांगलें असें माझें मत वरील कारणामुळें झालें आहे व त्याच हेतूनें गुरु करून घेणेंत काय फायदा.व गुरु करून घेतल्यानंतर गुरु नवीन काय सांगणार आहे ? व नवीन सांगणेचें कांहीं नाहीं तर गुरु करून घेणेचें कारण काय ? " तेव्हां " जो आपल्याकडून कशाचीहि अपेक्षा न करितां आपणास आपली ओळख करून देणारा व आपण पूर्णपणें स्वतंत्रच आहोंत हें अनुभवाला आणून देणारा तो गुरु. असा गुरु म्हणजे आपण चुकल्यावेळीं योग्य मार्ग दाखविणारा व संकट-समयीं धीर देऊन त्यांतून निभावून नेणारा सन्मित्र अथवा जिवलग सखाच होय " असें सांगून श्रीपंत पुढें म्हणाले " गुरु म्हणजे जी आमचेकडून कांहीं इच्छित नाहीं, आमच्या मदतीची जिला जरूर नाहीं, आमच्या देण्यानें जिला कांहीं लाभ होणें नाहीं, आम्ही कांहीं न देतां व आमचेकडून कांहीं न इच्छितां, आमच्याच कल्याणाकरितां जी नेहमीं झटणारी अशी आई होय. तिलाच ' गुरुमाय ' म्हणतात. ती आई मिळतांच स्वार्थीं अगर परमार्थीं आमची न्यूनता कांहींच राहात नाहीं. ज्यांत आमचें हित आहे तेंच करणेस ती सांगते व जें आमचे हातून होणेजोगें नाहीं अगर जें आम्ही करूं इच्छित नाहीं तें करणेस ती सांगत नाहीं. तसें तिनें सांगितल्यास ती 'गुरुमाय ' म्हणविली जाणार नाहीं. यावरून ' प्रपंच सोडा ', ' बायका–मुलांना सोडा ' असें सांगणारा गुरु खरा नव्हे. तेव्हां गुरु करणें म्हणजे आहे त्यापेक्षां जास्त स्वातंत्र्य

मिळविणें व आहे त्यापेक्षां जास्त फायदा करून घेणें आहे आणि संकटेंहि पुढें येईनाशीं करून घेणें आहे. " श्रीपंतांच्या तोंडचे हे कळकळीचे शब्द कानीं पडतांच हेच आपले गुरु होत ही बापूनें आपल्या मनाशीं खूणगाठ बांधली आणि " समाधि म्हणजे काय व समाधिसुख कसें मिळावें ? " असा श्रीपंतांना प्रश्न केला. लगेच श्रीपंतांनी स्वरूपबोध करण्यास सुरवात केली. तेव्हां काय प्रकार झाला तेंहि बापूरावांच्याच शब्दांत सांगणें बरें. ते म्हणतात " जसजसें माझ्या स्वरूपाचें श्रीपंत वर्णन करूं लागले तसतसें माझें भान उडालें. पुढें काय झालें तें समजेनासें झालें. अशी स्थिति कांहीं वेळ राहून पुढें झोपेंतून जागा झाल्यासारखें वाटलें. असें कां झालें आणि हें काय झालें व यासच समाधि म्हणतात काय असे विचार माझ्या मनांत येतात न येतात इतक्यांत " बापू तुला काय झालें ? " असें श्रीपंतांनीं मला विचारलें. तेव्हां " माझें मनच नाहीसें झालें होतें " असें मीं उत्तर दिलें. त्याबरोबर " या स्थितीसच समाधि म्हणतात " असें श्रीपंत म्हणाले. तेव्हां "अशी समाधि पुष्कळ खटपट करून योगाभ्यास, जप, तप केल्यासहि साधत नाहीं अगर भोगतां येत नाहीं असें म्हणतात. असें असतां मला बसतां बसतां, बोलतां बोलतां समाधिसुखाचा अनुभव कसा मिळाला ? मी जप तप केलेला मनुष्य नाहीं, योगाभ्यास केलेला नाहीं अगर कांहींच केलेला नाहीं. असें असतां मला त्या सुखाचा अनुभव कांहीं श्रम न करितां अनायासें आला हें कसें ? " असा प्रश्न श्रीपंतांबद्दल पुनः पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन केला व " पंत, तुम्हापाशीं समाधिसुख देणेची शक्ति आहे; त्यामुळेंच तुम्हीं मला आपल्या बोधशक्तीनें समाधिसुखाचें दर्शन करविलें. तेव्हां तुम्ही आमच्यापेक्षां श्रेष्ठ आहां असें मला वाटतें. तें खरें कीं खोटें ? " असें बापूनें श्रीपंतांना विचारलें. तेव्हां ते म्हणाले कीं " रात्रींचें वेळीं दोघां लेह्यांपैकीं एक गोष्ट सांगत असतो व दुसरा ऐकत असतो. ऐकणारा गोष्टीकडे लक्ष देऊन नुसता 'हुं', 'हुं' म्हणत असतो व ती ऐकतां ऐकतां त्याला झोप लागते. गोष्ट सांगणारास झोप लागत नाहीं. यांत गोष्ट सांगणारानें गोष्ट ऐकणारास झोंप लाविली कीं ऐकणारास झोंप आपोआप आली ? " तेव्हां " झोंप आपोआप लागली व आपोआप ती तशी लागते " असें बापूनें उत्तर दिलें. लगेच " झोंप लागल्याचें श्रेय ती सांगणाराकडे आहे कीं ऐकणाराकडे आहे, कीं ऐकणाराच्या एकाग्र चित्ताकडे आहे, कीं रात्रींच्या वेळच्या परिस्थितीकडे आहे ? " असें श्रीपंतांनीं त्याला विचारलें. तेव्हां " एकाग्र चित्ताकडे आहे " असें तो बोलला. त्याबरोबर " तूं एकाग्र चित्तानें अंतःकरण-पूर्वक माझा बोध ऐकिलास, म्हणूनच तुला समाधि लागली असें तुझ्या उत्तरावरूनच झालें. असें असतां तुझ्यापेक्षां मी श्रेष्ठ असें जें तुला भासलें तें चुकीचें नव्हे काय ? " असें श्रीपंतांनीं विचारिलें. तेव्हां त्यानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. पण " तुम्हीं कांहीं तरी सांगून मला फसवितां. खरें असेल तें तुम्ही सांगत नाहीं " असें तो बोलला. तें ऐकून श्रीपंत म्हणाले " तूं खुळा आहेस. खरा विचार कर म्हणजे माझ्या म्हणण्याची तुला खात्री पटेल. समाधि ही नित्य अविनाशी असून ती

सदा सर्वांपाशीं आहे व ती तशी असल्याचें लहान मुलाला पाहातां सहज दिसून येणारें आहे. मुलें जितकीं लहान तितकीं तीं अधिक आनंदी दिसून येतात व तीं जसजशीं मोठीं होत जातात तसतशीं तीं कमी आनंदी दिसूं लागतात. यावरून आमची पूर्व-स्थिति आनंदस्वरूपाची, सहज समाधीची आहे यांत शंका नाहीं. तेव्हां समाधि-स्थिति ही मूळ गुरुघरचीच म्हणजे आमचीच आहे ती दुसऱ्यानें देणेची नाहीं. पण दिवसेदिवस तिचा विसर जास्त जास्त पडत गेल्यानें आम्ही समाधिस्थितींतून दूर जातों व तसें झाल्यानें तिची ओळख राहात नाहीं. म्हणूनच 'समाधि म्हणजे काय ?' असा तूं मला प्रश्न टाकलास. तेव्हां तुझ्या मूळ स्थितीची कथा म्हणजे आठवण मी तुझ्यापुढें मांडतां मांडतां व तूं एकाग्र चित्तानें ' हुं ', ' हुं ' म्हणतां म्हणतां तुझ्या आनंद-स्वरूपास तूं जाऊन पोंचतांच तुला समाधिसुख मिळालें. यांत नवल तें काय तुला वाटलें हें समजेना. तेव्हां माझें म्हणणें तुला खरें वाटतें किंवा खोटें वाटतें ? " असें श्रीपंतांनीं विचारिलें व त्याला समाधिसुख दिल्याचें श्रेय आपल्याकडे नसल्याचें बापूकडून कबूल करविलें आणि इतका प्रकार होईपर्यंत आपण श्रेष्ठ आहोंत असें त्याला मुळींच भासूं दिलें नाहीं. पुढें बापूनें त्यांचेकडून अनुग्रह घेतला व नंतर वकि-लीची परीक्षा देऊन तो वकिली करूं लागला वगैरे गोष्टींचा प्रकरण ३६ मध्यें उल्लेख केलाच आहे. बापूचे प्रश्न सद्धेतुमूलक असल्यामुळें श्रीपंतांनीं आपलें अद्‌भुत सामर्थ्य व वाक्चातुर्य या दोहोंचा उपयोग करून त्याला प्रत्यक्ष अनुभवानें समाधि म्हणजे काय तें पटवून दिलें. गुरु करणें व समाधि यांसंबंधीं बापूप्रमाणें पुष्कळांचे विचार अस-ल्यामुळें हा संवाद जरा विस्तारानें दिला आहे. श्रीपंतांचें बोधशस्त्र नेहमीं परजलेलें असे व ते तें लीलेनें आणि सफाईनें वापरीत असत.

## " पंत, अखेरचा सिद्धांत सांगा "

श्रीपंतांचा बोध शेलका व सोलीव असे. त्यामुळें तो दिसण्यांत सोपा दिसला तरी शिष्याच्या चित्ताचा सर्वस्वीं ग्रास करणारा असून सर्वव्यापी असे. " वाटेल तें कर पण विसरूं नको " असें जें ते कांहीं शिष्यांना सांगत त्यांतील इंगित असें होतें कीं " मला विसरूं नको " हें जें स्मरणभक्तीचें वर्म तें त्याला सांगितल्यानें " वाटेल तें कर " या शब्दांनीं व्यक्त होणाऱ्या स्वैरपणाला जबरदस्त पायबंद बसत असे. " मामनुस्मर युध्यच " या गीतेंतील बोधाचें तेंच मर्म होय. करून अकर्ता राहाण्याची ती युक्ति आहे. एकदां श्रीपंत मंडळीला बोध करीत बसले असतांना त्यांनीं आपले बंधु नरसिंह-राव यांना पदांची वही घेऊन लिहिणेस सांगितलें व आपण एकतारी घेऊन " सावध हो लवकरी । नित्य सद्‌गुरुस्तव करीं " ( द. प्रे. ल. २३० ) हें पद म्हटलें; तेव्हां भाऊ जुनेबेळगावकर नावाचे त्यांचे एक शिष्य म्हणाले " पंत, हें असलें नको. अखेरचा सिद्धांत सांगा. " तेव्हां लगेच त्यांनीं " आतां करूं नको कांहीं । गुरुपदीं स्वस्थ राहीं " ( द. प्रे. ल. २३१) हें पद म्हटलें व तूं " कांहींच करूं नको " म्हणून सांगितलें. पण लगेच "गुरुपदीं स्वस्थ राहीं" असा इषारा दिला. गुरुपद हेंच अधिष्ठान व तेंच निर्गुण

पद. तेथें जो स्वस्थ राहाणारा तो "आपआपणा भोगी । नोहे भोगी त्यागी" ( द. प्रे. ल. ११४ ) या कोटींतील राजयोगीच होय. तसेंच " तूं कांहीं करूं नको " म्हणजे 'मी कर्ता' हा भाव अंतःकरणांतून पार काढून टाक असें सांगून श्रीपंतांनीं त्यांना अकर्तात्मबोध केला व त्याच पदांत "वृत्तिउगमीं बुडी देउनी । स्वयं ब्रह्म उरसी ठायीं । सहज सिद्ध अविनाश । दुजेपणा किमपि नाहीं ॥ १ ॥" वगैरे प्रकारचा ब्रह्मबोध करून अखेर " दत्तवचन सत्य मानुनी । अवधूत तूंचि होई " येथपर्यंत मजल नेली. असाच प्रकार नेहमी होत असे.

## संकटपर्वणीयोग

सद्गुरूच्या बोध पचनीं पाडण्याचें स्थान म्हणजे प्रपंच अगर संसारच होय असें श्रीपंतांचें सांगणें असे. द्वंद्वांनीं युक्त अशा प्रपंचरूपी आखाड्यांत उतरल्याशिवाय सद्गुरुबोध अंगीं भिनत नाहीं; प्रपंचांत निरनिराळ्या प्रसंगांतून जात असतांना, नाना प्रकारच्या संकटांशीं तोंड देत असतांना आपल्या योगक्षेमाची चिंता सद्गुरु कशी वाहातो याचा अनुभव पदोपदीं घेण्यास मिळतो असें श्रीपंत म्हणत. " गुरुभक्तास संकटें हीच अनुभवाची वाग होय. ××× संकटीं शांति राखणें, गुरुप्रेम बाळगणें, श्रद्धा ठेवणें हेंच महत्तप, हाच महान् यज्ञ. या तपास संसारस्थिति हीच सामुग्री व जरूरीचें साधन. हें तप मुद्दाम करणें नको. आपोआप संकटपर्वणीयोग आला असतां तो वायां जाऊं न देतां सहजी अन्य दृष्टीस न पडतां तीर्थस्नान साधून घ्यावें. हें तप आचरणेस वनांतरीं, देशांतरीं जाणेस नको. सहज असलेल्या कोणत्याहि स्थितींत तें साधतां येतें " असें त्यांनीं सांगितलें आहे. ( पु. ८-२४७ ) ज्यांनीं ज्यांनीं सद्गुरुस्मरणांत राहून त्यांनीं आखून दिलेल्या मार्गाचें आक्रमण केलें त्यांचें कोटकल्याण झालें. त्यांच्या दिव्य बोधाचें मर्म ज्याला समजेल व त्याप्रमाणें जो वागेल त्याचें कल्याण झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

## बोधाचा प्रभाव

श्रीपंतांचा बोध इतका प्रभावशाली होता कीं कित्येक वेळां एकमेकांचे कट्टे वैरी असलेले त्यांचे शिष्य त्यांच्या घरीं असतांना सख्ख्या भावांप्रमाणें वागतांना दिसत ! सात्विक, राजस व तामस या सर्व वृत्तीच्या लोकांना त्रिगुणांच्या पलीकडील आपल्या चरम वृत्तीनें म्हणजे विश्वव्यापी शुद्ध ऐक्यप्रेमानें बांधून ते एकत्र आणीत असत. वाघ व शेळी यांना एके ताटांत जेवूं घालणाऱ्या सद्गुरु गारुड्याचेंच हें सामर्थ्य होय ! तसेंच श्रीपंतांच्या कांहीं शिष्यांच्या बाबतींत असा प्रकार झालेला आढळतो कीं ज्या वेळीं त्यांचेवर श्रीपंतांनीं अनुग्रह केला त्या वेळीं त्यांचें वय लहान असून त्यांचे ठिकाणीं फारशी ज्ञानलालसा अगर आत्मानुभवाची भूक नव्हती. त्यामुळें त्यांच्या अंतःकरणी श्रीपंतांनी पेरिलेलें बोधबीज कित्येक वर्षे तसेंच राहून त्याला अंकुरहि फुटला नव्हता. परंतु कालांतरानें, कांहीं तरी निमित्त घडून, जागृति मिळून त्याच बोधबीजाला अंकुर फुटूं लागले. याचें एक उदाहरण असें झालें

कीं, सुमारें १५ वर्षांचा एक मुलगा आपल्या कांहीं आप्तांबरोबर व स्नेह्यांबरोबर श्रीपंतांकडे गेला व त्यानें इतरांबरोबर त्यांचेकडून अनुग्रह घेतला. त्याच वेळीं "याचा अनुभव तुम्हांला पुढें येईल" असें श्रीपंत बोलले होते. त्या मुलाला अनुग्रह झाला तरी त्याची श्रीपंतांवर फारशी श्रद्धा नव्हती व एखादे वेळीं ते त्याचे गावीं गेल्यास, इतरांबरोबर आपण न गेल्यास वाईट दिसेल तें न दिसावें म्हणून, तो त्यांचेकडे जात असे. पुढें श्रीपंतांनीं देह ठेविल्यापासून तर त्यालीं जवळ जवळ त्यांची व अध्यात्मविषयाची विस्मृति पडून तो पूर्णपणें संसारांत दंग झाला व त्याला मुलें बाळें होऊन संसारहि थाटांत चालूं लागला. त्याच्या वयाच्या ३९ व्या वर्षाच्या सुमारास जेव्हां त्याच्या गावांत प्लेग सुरू झाला तेव्हां त्यानें आपला एकुलता एक मुलगा व घरांतील इतर माणसें यांना परगावीं पाठवून दिलें व आपण एकटाच घरीं राहूं लागला. पुढें एके दिवशीं त्याचा मुलगा सहज वडिलांना भेटण्याकरितां म्हणून आपल्या गावीं गेला असतां त्याला प्लेग होऊन त्यांतच त्याचा अंत झाला. त्यायोगें त्याच्या बापाला परमावधीचें दुःख होऊन सर्व जग शून्य भासूं लागलें व त्याच्या चित्ताला भयंकर असमाधान वाटूं लागलें. तेव्हां त्यानें बऱ्याच साधुसत्पुरुषांच्या भेटी घेतल्या तरी त्याला समाधान वाटेना. अखेर तो अतिशय निराश होऊन जिवालाहि कंटाळला असतां एके दिवशीं त्याला श्रीपंतांचें स्मरण होऊन त्यांचा "भक्तालाप" लेख वाचावासा वाटला व तो वाचतां वाचतां त्याला "याचा अनुभव पुढें येईल" हे जे शब्द त्याला अनुग्रह देतांना त्यांनीं उच्चारले होते त्यांची आठवण झाली आणि तेव्हांपासून तो श्रीपंतांचीं पदें व लेख आस्थेनें वाचूं लागला, त्याच्या शंकांचें आपोआप निरसन होऊं लागलें, त्याच्या हृदयांत श्रीपंतांच्या दिव्य बोधाचा प्रकाश पडून त्यांच्या उपदेशाचें रहस्य त्याला स्वानुभवानें पटलें व तो पूर्ण सुखी झाला.

## अखेरचा संदेश

देह नश्वर असून पुनः भेट होईल कीं नाहीं याचा निश्चय नसल्यामुळें आपले शिष्य कोठेंहि असले तरी त्यांना आपली भेट घेतां यावी व स्वस्वरूपाची ओळख पटावी म्हणून श्रीपंतांनीं पुढील पदांत ऐक्यबोधाचा स्वानुभवसिद्धांत सांगून त्यांनीं आपली संसारयात्रा कशी पार पाडावी तें थोडक्यांत सांगून ठेविलें आहे.

"आरंभ नाहीं शेवट कैंचा। मध्यस्थितीला भुलूं नको। संसारामधिं एकही पाऊल। अनुभवाविणें टाकूं नको ॥ ध्रु० ॥ जन्मा येऊनी पंच विषयांसाठीं। निशिदिनी झुरूं नको। अज्ञानामधिं दुःख भोगुनि। व्यर्थ पशुवत मरूं नको ॥ १ ॥ गुरुविण अन्य दैवत नाहीं। कल्पित देवा पुजूं नको। सद्‌गुरु आत्मा तुझा तूंचि। बोध मनींचा सोडूं नको ॥ २ ॥ वेदशास्त्रांची भीड धरूनी। संशयरानीं फिरूं नको। स्वानुभवसिद्धांत दत्ताचा। ध्यानीं धरीं कधीं विसरूं नको ॥ ३ ॥" (द. प्रे. ल. ३६७)

# प्रकरण ४६ वें

## भजनलालसा व काव्यस्फूर्ति

प्रकरण ११ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें श्रीपंतांवर सद्गुरु श्रीबालमुकुंदांची कृपा झाल्यापासूनच त्यांचे ठिकाणीं भजनलालसा उत्पन्न झाली होती व श्रीबालमुकुंदांचा वियोग झाल्यानंतर सुमारें चार पाच वर्षें श्रीबालमुकुंदांचीं व इतर साधुसंतांचीं पदें म्हणून ते भजन करीत असत. पुढें भोंवतालच्या विकट परिस्थितीमुळें श्रीबालमुकुंदांच्या वियोगाचें दुःख त्यांना अत्यंत तीव्रतेनें जाणवूं लागलें व प्रकरण १७ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें ते करीत असलेल्या भजनाला नवीन वळण लागून त्यांच्या अंतःकरणांत विरहाग्नीनें उडालेली भयंकर खळबळ आणि तिच्यामुळें वाटणारी तळमळ स्वतंत्र भजनालापांच्या रूपानें व्यक्त होऊं लागली. १८८५ अखेरपर्यंत झालेल्या श्रीपंतांच्या पदांत अनंताशीं तादात्म्य होण्याकरितां तळमळत असणाऱ्या साधक कवीची भूमिका स्पष्ट उमटलेली दिसते; पण १८८५ अखेर "अनुभवयुगाला" अथवा "अवधूत युगाला" सुरवात झाल्यापासून त्यांची सिद्धावस्था सुरू झाली व १८८६ च्या सुरवातीला त्यांनीं लिहिलेला "भक्तालाप" लेख आणि १८८६–८७ सालीं झालेलीं त्यांचीं बहुतेक पदें ( द. प्रे. ल. १०० ते १६० ) या गोष्टीची स्पष्ट साक्ष देतात हें प्रकरण ३१ मध्यें दाखविलेंच आहे. १८८६ नंतर झालेल्या श्रीपंतांच्या कित्येक पदांचा येथपर्यंतच्या चरित्रकथनांत जागजागीं उपयोग केलाच आहे. पण या प्रकरणांत त्यांच्या पदांचा काव्य या दृष्टीनें विचार करीत आहोंत.

श्रीपंतांच्या आध्यात्मिक उन्नतीला ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांपैकीं भजनगोडी ही मुख्य होती. त्यांच्या ठिकाणीं भजनस्फूर्ति निर्माण झाल्यावर त्यांना भजनाचें इतकें महत्व वाटलें कीं, प्रकरण १७ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें, " स्फुरवुनी भजनपंथा । बोलवी गुण यथार्था "; " प्रेम द्यावें भजन गाया " ( द. प्रे. ल. ४१ ) अशी त्यांनीं सद्गुरूपाशीं मागणी मागितली आणि नंतर लौकरच सद्गुरूनें पूर्ण कृपेनें त्यांना दत्तनामरत्नहार अर्पण करून ती पुरविली यासंबंधीं ते सांगतात " दत्तनामरत्नहार दिला मजला । श्रीगुरुमायेनें ॥ धृ० ॥ भक्तिसुवर्णसूत्रीं गोंविला । विवेकें गाठिला । मुक्तिगोंडा सुंदर शोभे भला । प्रेमें रंगविला ॥ १ ॥ पूर्वपुण्य–उदयकाळ आला । सद्गुरु भेटला । काम–क्रोध- रिपु–मेळा निवटिला । कंठीं घातला ॥ २ ॥ ". ( द. प्रे. ल. ८० ) सद्गुरूंनीं हा नामरत्नहार श्रीपंतांच्या कंठात घातल्यापासून त्यांचा अंतःस्फूर्त भजनपंथ त्यांच्या हयातीच्या अखेरपर्यंत वृद्धिंगत होत होता.

### भजनपंथ

वास्तविक श्रीपंतांनीं कोणताहि नवीन पंथ स्थापिला नाहीं अथवा कोणतेंहि नवीन मत प्रस्थापित केलें नाही. तर अनादि सिद्ध सद्गुरुमाथित अवधूतमार्गानें जाऊन

वेदोपनिषदांत प्रतिपादिलेलें शुद्ध अद्वैत ज्ञान व अभेद भक्ति यांचा त्यांनीं आपण स्वतः अनुभव घेतला व हजारों लोकांना तो आणून दिला, निदान त्याची गोडी लावून तो त्यांच्या हस्तगत होईलशा युक्त्या सांगून ठेविल्या. १९०३ च्या जून महिन्यांत त्यांनीं आपल्या शिक्षकाच्या नोकरीचा राजीनामा दिला व मार्च १९०४ मध्यें त्यांचें कुटुंब निवर्तलें. त्यामुळें स्थूल दृष्ट्या तरी त्यांचें इहलोकचें कार्य संपत आलें होतें. अशा स्थितींत प्रकरण ४० मध्यें सांगितल्याप्रमाणें १८–३-१९०४ रोजीं त्यांनीं भूतकाळांत दृष्टिक्षेप केला व सद्गुरूची गाठ पडल्यापासूनच्या कालाचें सिंहावलोकन करून " मिळतां बालावधूतपाउलें। नरजन्माचें सार्थक झालें ॥ ध्रु० ॥ अभय वचनें मुक्त होउनी। बोधामृत प्राशन केलें ॥ १ ॥ अवधूत पंथ प्रगट करूनी। सद्गुरुनाम जगीं गाजविलें ॥२॥ प्रेमामृत पिउनी पाजुनी। दत्तभजनीं भक्त जागविले ॥३॥ " ( द. प्रे. ल. २५६८ ) हें जें पद म्हटलें त्यांत " सद्गुरु नाम जगीं गाजविलें " व " दत्तभजनीं भक्त जागविले" या गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. त्यायोगें वर उल्लेख केलेला भजनपंथ निर्माण झाल्याचें सूचित झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाही. हा भजनपंथ म्हणजे मनरंजनार्थ संगीताच्या साह्यानें भजन करण्याचा पंथ नसून भजनाच्या योगानें दत्तभजनीं भक्तांना जागविणारा अथवा भजनानंदाबरोबरच स्वरूपानुभव करवून देणारा आहे. याला नवीन पंथ म्हणण्याचें कारण असें कीं श्रीपंतांनीं एक प्रकारची नवीन भजनपद्धति रूढ केली व त्या भजनाला भरपूर पुरेल इतका प्रचंड पूर्णाद्वैत बोधानें प्रकाशित, भक्तिप्रेमरसानें थबथबणारा व आत्मानुभवाच्या भक्कम पायावर आधारलेला पदसंग्रह निर्माण केला. त्यांच्या पुण्यतिथीच्या उत्सवाचे वेळीं श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथें श्रींच्या पादुकांपुढें तीन चार दिवस अहोरात्र भजनगजर चालू असून त्या वेळीं भक्तमंडळी आपापल्या आवडीच्या चालींवर निरनिराळीं पदें म्हणत असतात व त्या चार दिवसांत श्रीपंतांच्या पदांखेरीज इतर पदें क्वचितच ऐकण्यास मिळतात. अशा रीतीनें जें श्रीपंतांच्या साधक स्थितींत प्रमुख व सद्यःफलदायी साधन म्हणून उपयोगीं पडलें, जें त्यांच्या सिद्धावस्थेंत गुरुप्रेमसुख अनुभवण्याचें व आत्मरंगीं रंगण्याचें मुख्य साधन होऊन बसलें, जें त्यांच्या ठिकाणीं काव्यस्फूर्ति निर्माण होण्याला व त्या स्फूर्तींचा जोम कायम राखण्याला आणि वृद्धिंगत होण्याला कारणीभूत झालें व ज्याचा त्यांनीं एक प्रकारचा नवीन पंथ निर्माण केला त्या भजनाचें त्यांना किती महत्व वाटत होतें व क्षुद्र वाटणाऱ्या या साधनाचा प्रभाव किती अद्भुत आहे तें त्यांच्याच उक्तींच्या आधारें दाखवीत आहोंत.

## नामस्मरणाचें महत्व

नामस्मरण हें भजनाचेंच एक अत्यंत महत्वाचें अंग असल्यामुळें त्याचा भजनांतच अंतर्भाव होतो हें सांगणें नकोच. परमार्थप्राप्ति करून घेण्याचे कामीं नामस्मरणासारखें सुलभ साधन नाहीं यासंबंधीं सर्व संतांचें एकमत आहे. श्रीपंतांनींहि नामस्मरणाचें जागजागीं फार महत्व गाइलें आहे. त्यांनीं द.प्रे.ल.पद २०८५ मध्यें 'भवभयनाशक,

स्वरूपप्रकाशक, मनाची कोड पुरविणारें, भ्रांतिहारक, संसृतितारक, निजपदाची जोड करून देणारें, अद्वय भक्ति व अखंड शांति यांचा लाभ करून देणारें' या विशेषणांनीं त्याचा गौरव केला आहे व पद २२२ मध्यें तर गुरुनाम हें आपलें जीवनच आहे असें सांगून 'तोच स्वधर्म, तोच आश्रम, तोच नित्य नेम, तोच वेदांत, तोच सिद्धांत; तेंच कैवल्यधाम, तेंच रंजन, तेंच निरंजन व तेंच दत्तप्रेम' असें म्हटलें आहे. श्रीपंतांसारख्या अनुभवशिखरावर आरूढ झालेल्या सिद्ध पुरुषानें नामस्मरणाचें जें इतकें महत्व वर्णिलें आहे तें त्यांना स्वानुभवानें पटून त्यांनीं वर्णिलें आहे हें सांगणें नकोच. तो अनुभव म्हणजे निजानंद अथवा परमानंद प्रगट झाल्याचा होय. पद २८७ मध्यें "नामस्मरणें प्रगट मिळाला निजानंदठेवा । बिंदुलें पडलें अहंभावा" म्हणजे 'नामस्मरणाच्या योगानें हृदयांत गुप्त असलेला निजानंदाचा ठेवा प्रगट झाला व अहंभावावर बिंदुलें म्हणजे शून्य पडलें अथवा त्याचें वाटोळें झालें' असा त्यांनीं आपला अनुभव सांगितला आहे आणि पद ८८ मध्यें "गुरुनामामृत कंठीं धरितां । प्रगटे परमानंदरे" असें सांगून त्यायोगें प्रत्येकाच्या हृदयांत गुप्त असलेल्या परमानंदाच्या प्राप्तीचें साधन त्यांनीं दाखवून दिलें आहे.

## नादानुसंधान व ध्यान

नामस्मरणाच्या योगानें निजानंदाचा लाभ होण्याचें कारण असें कीं तें चालू असतांना नामसंकीर्तनांतील नादानुसंधान व स्मरणरूपानें होणारें आराध्य मूर्तीचें ध्यान अथवा चिंतन यांचा मिलाफ होत असतो. नुसतें यंत्राप्रमाणें वैखरीवाटें नाम घेत बसलें तर फारसा फायदा होत नाहीं. तो होण्याला तें परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चारी वाचांत घुमून राहावें लागतें किंवा त्याला अजपाजपाचें अथवा सहज स्फुरणाऱ्या सोहं ध्वनीचें स्वरूप यावें लागतें; अगर नामसंकीर्तनाला स्मरणाची साथ तरी असावी लागते. हें स्मरण कोणाचें? तर नामीचें. ज्या आराध्य दैवताचें नाम घ्यावयाचें त्याचें नामोच्चाराबरोबरच स्मरण झालें म्हणजे त्या आराध्य दैवताची मूर्ति मनश्चक्षूंपुढें उभी राहाते. कारण सूक्ष्म देहाचा सर्व कारभार भाषेच्या व कल्पनाशक्तीच्या साह्यानें चाललेला असतो. एखाद्या माणसाचें स्मरण झालें म्हणजे त्याची मूर्ति आपल्या मनश्चक्षूंपुढें उभी राहाते. कल्पनेनें प्रतिसृष्टि निर्माण करण्याचें हें जें विश्वामित्री कार्य अंतःकरणांत अव्याहत चाललेलें असतें तें करण्याऐवजीं भगवद्भक्त हे त्याच उत्पादक कल्पनाशक्तीनें मनःश्चक्षूंपुढें आपल्या आराध्य दैवताचें प्रतीक उभें करून आणि त्याच्याशीं निरनिराळे भाव प्रगट करून भक्तिप्रेमरंग खेळत असतात. या स्मरणाची अथवा ध्यानाची नामाला जोड मिळाली म्हणजे तीं परस्परांना साहाय्यकारी होऊन भावनांची उत्कटता वाढवितात नादानुसंधानासारखें मनाला रंजविविणारें व गुंगविणारें दुसरें साधन नाहीं. त्यामुळें योगी लोक सुषुम्णामार्गानें अनाहत ध्वनिरूपी नादाच्या अनुसंधानानें षट्चक्रभेद करून प्राणाला ब्रम्हरंध्रांत स्थिर करितात व अखेर नादब्रम्ह जो प्रणव अथवा ॐकार त्याच्यांत मनोलय करून प्रणवातीत परब्रम्हवस्तूशीं समरस होतात.

त्याचप्रमाणें नामगुंजारव करीत आराध्य मूर्तीचें ध्यान करूं लागलें म्हणजे ध्यान करणारें जें चित्त तें सहजीं सहज चैतन्याशीं समरस होतें. नामस्मरणानें हें अद्‌भुत कार्य साधून निजानंदठेवा प्रगट होत असल्यामुळें " काय कैवल्य नाम कंठीं जरी। दत्त नामा भुलला " ( द. प्रे. ल. ८४६ ); " वेदशास्त्रांचें रहस्य नाम." ( द. प्रे. ल. ८४६ ); " नामार्थचि तत्त्वमसीचा। श्रुतिसिद्धांत खरा " ( द. प्रे. ल. ४०६ ) असा श्रीपंतांनीं त्याचा गौरव केला आहे आणि "हृदयीं ध्यान तुझें। वदनीं नाम दत्ता" ( द. प्रे. ल. ८७६ ) अशा स्थितींतील आपला अनुभव " ध्यानीं मूर्ति आनंद चित्तीं वदनीं नामकीर्ति " ( द. प्रे. ल. ८०६ ) या सूत्रानें वर्णिला आहे. माया ही नामरूपात्मक आहे. तेव्हां नामस्मरणानें म्हणजे ध्यानयुक्त नादानुसंधानानें वाणी व मन यांना बाह्य नश्वर विषयांपासून परावृत्त करून भगवच्चरणीं लाविलीं असतां दिव्यानंदाचा सुकाळ होऊन आपोआप नामरूपात्मक अनर्थकारिणी मायेचा निरास होत जातो. मन व वाणी यांना भगवद्भक्तींत रमवून प्रेमानंदसोहाळे भोगण्याची ही अनुभवाची पकड अथवा युक्ति एकदां साधली म्हणजे आपणच देव व आपणच भक्त बनून भक्त हा निजानंदसोहाळे भोगीत असतो. त्याचें चित्त प्रेममय, आनंदमय झालेलें असल्यामुळें त्या चित्तानें चिंतिलेली ध्यानमूर्ति प्रेमाचीच घडलेली असते. त्यामुळें देव व भक्त, गुरु व शिष्य दोघेहि प्रेमस्वरूपच असतात. दोन्हीहि मूर्ति प्रेमाच्या अथवा साखरेच्याच असल्या म्हणजे गोडीला काय वाण ! प्रल्हाद व ध्रुव यांनीं भगवंताचें जे नाम घेतलें तें कांहीं ' और ' होतें असें संत कबीरांनीं म्हटलें आहे. अक्षरें तींच, मग तें और कसें झालें ? तर तन्मयतेनें. प्रल्हाद व ध्रुव यांची तन्मयता इतकी झाली कीं देवाचें नाम उच्चारतांच स्वतःची पूर्ण विस्मृति होऊन तेच देव झाले. हा जो नामाचा व भजनाचा प्रभाव तो तन्मयतेंत, तद्रूपतेंत आहे. ही तन्मयता अथवा अंतःकरणाची तदाकारता म्हणजे स्वतःचा पूर्ण विसर पडून आपल्या आराध्य दैवताशीं तन्मय होऊन जाणें होय. हीच नवविधा भक्तीपैकीं अखेरची जी " आत्मनिवेदन " भक्ति ती होय. स्वतःचा पूर्ण विसर पडल्याशिवाय म्हणजे आत्मार्पण झाल्याशिवाय भक्ति खरी होत नाहीं व प्रेमसुखाचा अनुभव येत नाहीं; म्हणून श्रीपंत म्हणतात " आत्मनिवेदन भावें करितां। प्रेमसुख दत्ता ॥ ३ ॥ " ( द. प्रे ल. ६३४ ).

## भजन, नृत्य व टिपरी

भजन हें नामाचेंच विस्तृत व बव्हंगी रूप होय. भजनांत नादानुसंधान असून संगीताचाहि अंतर्भाव होतो आणि केवळ आराध्य दैवताच्या स्मरणावर न भागतां त्याचे गुणानुवाद गाण्यास व प्रकरण ४४ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें त्याच्याशीं भिन्नभिन्न भूमिकांवरून खेळण्यासहि मिळतें. त्यामुळें भजनांत चित्तवृत्ति दंग होण्याला फारसा अवकाश लागत नाहीं आणि रुचिवैचित्र्याप्रमाणें निरनिराळे भावहि प्रगट करितां येतात. भजनांत नाम तर असतेंच; पण गुणगानहि असतें. त्यामुळें भजनाचें कार्य फार प्रभावशाली होतें.

वर वर्णन केल्याप्रमाणें नामस्मरण व भजन यांच्या योगानें मनरंजन होऊन अहंइदंची अथवा स्वतःची व जगाची विस्मृति आपोआप पडत जाते. म्हणून " भजनीं अखंड नाचवीं। दत्ता हेंचि तुला मागणें " ( द. प्रे. ल. ११७६ ) अशी श्रीपंतांनीं दत्ताजवळ मागणी केली.

नामस्मरण व भजन हीं साधकावस्थेंत जशीं सुलभ व मनरंजन करणारीं असतात त्याचप्रमाणें सिद्धावस्थेंत म्हणजे देहाभिमान गलित झाल्यावर तींच दिव्यानंद व प्रेम देतात. कारण देहाभिमान हा आपल्या आनंदस्वरूपावर झाकण घालितो व अंतःकरणांत स्फुरणाऱ्या प्रेमझऱ्याचा प्रवाह बंद करितो. पण भजनानंदांत तो बांधच विरघळून गेला म्हणजे अंतःकरणांतील आनंदाच्या उकळ्या व्यक्त दशेला येऊं लागतात आणि ज्याप्रमाणें चुलीवर ठेविलेल्या भांड्यांतील पाणी उकळूं लागलें म्हणजे त्याच्यावर ठेविलेलें झाकणहि उडूं लागतें त्याप्रमाणें भजनरंगांत वृत्ति रंगून गेल्यावर आनंदातिरेकानें भक्ताचें सर्व शरीरच हलूं लागतें; हात टाळ्या पिटून ताल धरतात व प्रेमोद्गारांना साथ करूं लागतात, पायांच्या ठिकाणीं प्रेमवारें संचरून ते नृत्य करूं लागतात आणि " पुलकांकित तनु। नेत्रीं प्रेमआप " (द. प्रे. ल. २८३ ) अशी स्थिति होते व अष्ट सात्विक भावांना भरतें येऊन सर्व अवयवांच्या द्वारें प्रेमोद्रेक होऊं लागतो. अत्युत्कट भावनेच्या भक्ताला अशा प्रकारचा प्रेमोद्रेक झाल्याशिवाय समाधान नाहीं हें प्रकरण ४४ मध्यें दर्शविलेंच आहे. त्यामुळें श्रीपंतांच्या पदांतून भजनाला नृत्याची साथ झाली असल्याचा स्पष्ट उल्लेख वारंवार केलेला आढळतो. " प्रेमानंदें नाचूं गुरुभजनीं " (द. प्रे. ल. २५९९); "नाचत दत्तदर्शना जाऊं " ( द. प्रे. ल. २५९६ ) असे त्यांनीं वारंवार उद्गार काढले आहेत व अवधूताच्या आगमनाचें वर्णन करितांना " उडत नाचत आला " ( द. प्रे. ल. १५३ ) असेंहि म्हटलें आहे. श्रीपंतांनीं टिपरीचें भजन आपल्या मंडळींत जें रूढ केलें तें याच हेतूनें होय. कारण टिपरी खेळून भजन केलें म्हणजे त्यांत भजन, नृत्य व संगीत याचा एकदमच अंतर्भाव होतो. टिपरीवरहि श्रीपंतांचीं कांहीं बहारीचीं पदें आहेत. त्यांतील एक येथें देतों.—"आजि टिपरी खेळुंया रे। दत्तचरणीं लोळूं या ॥ ध्रु० ॥ वाजवुनी टाळ मृदंग। पायीं बांधुनियां चंग। सहजी उडवूं भजनीं रंग। लज्जा भीति वारुनियां ॥ १ ॥ ज्ञान विज्ञान गुण्या घेऊनी। स्वानुभवशिखरीं चढुनी। भोगुनी सहज उन्मनी। द्वैतदुःख टाळूं या ॥ २ ॥ दत्तप्रेमें गुंग होऊनी। देहभान विसरूनी। वास करूनी ब्रम्हभुवनीं। दत्तनाम वरळूं या ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. १४८२ ).

ज्याप्रमाणें नादलुब्धता ही मनुष्याच्या इतकेंच नव्हे, तर पशुपक्ष्यांच्या ठिकाणींहि स्वभावतःच असते त्याचप्रमाणें आनंदातिरेक व्यक्त करण्याकरितां नृत्य अथवा निरनिराळे अंगविक्षेप करणें हाहि प्रत्येक प्राणिमात्राचा स्वभावधर्मच आहे. स्वैर सोडिलेलें वासरूं ज्याप्रमाणें स्वच्छंदानें नाचूं उडूं लागतें त्याचप्रमाणें लहान मुलेंहि आनंद झाला म्हणजे नाचूं बागडूं लागतात. थोर माणसेंहि, एरव्हीं कितीहि ताठरलेलीं दिसलीं तरी,

अत्यानंद झाला म्हणजे आपला थोरपणा विसरून टाळ्या वाजवितात अथवा निरनिराळे अंगविक्षेप करितात आणि क्वचित प्रसंगीं आनंदाचा अतिरेक झाला म्हणजे नाचूंहि लागतात असें आपण पाहातों. पण सामान्य माणसाच्या मनावर जनलज्जा, मनलज्जा वगैरे प्रकारचीं दडपणें असल्यामुळें त्याला आपल्या आनंदस्वरूपाची विस्मृति पडलेली असते. पण ज्यांच्या मनावरील सर्व दडपणें नाहींशीं होऊन जे सदा सहज स्थितीनें राहातात त्यांचा सहजानंद सदैव स्फुरद्रूप असून त्यांना अनुपम प्रेमसुखाचा अथवा जीवन्मुक्तिवैभवाचा अनुभव घेण्यास मिळतो. अशा या सहजानंदाचा सहजानुभव घेण्याचें सर्वोत्कृष्ट साघन म्हणजे भजन होय.

## भजनाचें सर्वव्यापी स्वरूप

श्रीपंतांच्या भजनाचें स्वरूप फार व्यापक असून त्याच्यांत साध्या नामस्मरणापासून "चिद्विलास भजनमौज" (द. प्रे. ल. २८१) पाहाण्यापर्यंतच्या सर्व स्थितींचा अथवा अनुभवाच्या टप्प्यांचा अंतर्भाव झालेला आहे हें त्यांच्या पुढील उक्त्यांवरून दिसून येईल. "अद्वयभजनें आत्मचिंतनें। प्राप्त ब्रह्मानंद" (द. प्रे. ल. ९३); "अद्वय सेवा भजनाची। भक्तांसवें दत्त नाची" (द. प्रे. ल. १४४); "दत्तकृपें स्वरूप उदेलें। आत्मभजन सहज चाललें" (द. प्रे. ल. १५२); व "दत्तभजनीं नित्य नवें प्रेम उद्भवलें" (द. प्रे. ल. १५७). श्रीपंत सांगतात "भजनापुढें योगाची किंमत नाहीं." कारण "अष्टांगयोग नमनीं। प्राप्त भजनीं सहज उन्मनी" (द. प्रे. ल. १६३) व "नित्यानदसंमाधि भजनीं प्राप्त" (द. प्रे. ल. १८७) होते. त्यामुळें ते म्हणतात "लज्जा भीति शंका नाहीं मानाची आस। सहजानंदें भजनीं रमतों होऊनी उदास" (द. प्रे. ल. २१६); आणि तें कशा स्थितींत? तर "दाटलें प्रेम गर्जतों नाम। निशिदिनीं दत्तभजन" (द. प्रे. ल. १९८); "अवधूतरूपीं अहंकृति मिळली। दत्तप्रेमें गुरुभजनीं नाचे" (द. प्रे. ल. २७४); "प्रेमपिशी झालें भजनीं खेळतें" (द. प्रे. ल. २८३); "भज्य–भजक–भजन–भाव गेला। प्रेमपिसें सदा दत्त बाळा" (द. प्रे. ल. ३२०); "तनु मन वाणी विकली। अद्वय भजना। त्रिपुटी गिळुनी गातसे दत्तगुरुवरा" (द. प्रे. ल. ३८९) अशा प्रकारच्या स्थितींत होय. "स्फूर्तिभ्रमर सेवितो निशिदिनीं। सहज समाधि पुष्पमरंद" (द प्रे ल. ६९१) हा त्यांचा अखंड अनुभव असल्यामुळें शिष्यांना ते सांगतात "परब्रह्म तूंचि होउनी गुरुकृपें। दत्तभजनरंगीं रंग" (द. प्रे. ल. २१९); "गुरुबोधमात्रें मरावें। गुरुभजनकारणीं उरावें" (द. प्रे. ल. ३६१); "आपुले ठायीं आपण रंगुनी। दत्तगुरूसी भजावें" (द. प्रे. ल. ६४५); "दत्तगुरूचें भजन करितां। सहजो सुख कैवल्याचें" (द. प्रे. ल. ६७३); "प्रेमास्तव भक्ति प्रगटे। दत्तभजन करितां" (द. प्रे. ल. ९३३) अशा प्रकारच्या भजनानंदांत "देह जगाची ममता तुटली। सद्गुरुचरणीं वृत्ति अटली" (द. प्रे. ल. १९०४) अशी स्थिति होऊन निजानंदसोहाळे भोगतां येतात. "आप आपणा विसरणें हेंचि।

भजन-प्रिय दत्ता (द. प्रे. ल. १५६ ); " देहाचीही नाहीं आस । म्हणुनी सद्गुरुपदीं वास" ( द. प्रे. ल. १८९० ); " देह जगाची तुटली आस । परब्रम्हीं घडला वास " (द.प्रे. ल. १८६२); " आपणां विसरणें । आरति करणें " ( द. प्रे. ल. २७०६) असे त्यांनीं वारंवार उद्गार काढले आहेत. याप्रमाणें देह—जगाचा विसर पडल्यानें " दत्तगुरु निजभजनानंदें प्रेमसागरीं देई बुडी " ( द. प्रे. ल. २३५ ) असें त्यांनीं सांगितलें आहे. एखाद्या इंद्रियाच्या द्वारें प्रेमामृताचे अथवा आनंदाचे तुषार किंवा कण सेवन करणें हें केव्हांहि मर्यादितच असणार. पण प्रेमसागरांत बुडीच दिली म्हणजे अंतर्बाह्य नाका-तोंडातहि प्रेमामृतच. अशा अमूप, अतींद्रिय प्रेमसुखाचा उपभोग घ्यावयाचा म्हणजे प्रेम-सागरांतच बुडी दिली पाहिजे अथवा प्रेमसागरींचा मत्स्यच झालें पाहिजे. तो आपला अनुभवहि श्रीपंतांनीं पुढीलप्रमाणें सांगितला आहे " स्वानंदसागरीं मत्स्य जाहला ! दत्ता भजनपिसें " ( द. प्रे. ल. ७४१ ); " दत्तभजनीं मन निमग्न झालें । खवळे प्रमोदधि " ( द. प्रे. ल. ८५१ ); " स्वानंदसागरीं स्वानंदें खेळतो । स्वानंदो-न्मत्त दत्त हा भला " ( दे. प्रे. ल. ८८० ). अंतर्बाह्य व्यापून राहिलेल्या या एकजिनसी प्रेमाला अथवा आनंदाला नुसत्या सागराची उपमा देऊन श्रीपंतांचें कांहीं वेळां समाधान होत नसे; कारण सागर म्हटला कीं त्याला किनाऱ्याची मर्यादा आलीच. पण हा स्वरूपसा-गर, स्वानंदसागर अथवा प्रेमसागर अमर्याद असल्यामुळें त्याला त्यांनीं " प्रलयांबुधि निजप्रेमाचा " ह्मटलें आहे व " कल्पांबुधीसम स्वरूप माझें । भरलें दिशा दाही " ( द. प्रे. ल. ५१६ ) असेंहि वर्णन केलें आहे.

## ' श्रीदत्तप्रेमलहरी '

ज्या भाग्यशाली महापुरुषाचा हा अखंडानुभव आहे त्याला " स्वानंदसागरीं । विश्व स्वानंदलहरी " ( द. प्रे. ल. १९५९ ); " जिकडे तिकडे प्रेमझरा " ( द. प्रे. ल. २१३३ ); " जिकडे तिकडे ब्रम्हानंद " ( द. प्रे. ल. २२४० ); " दत्त स्वानंदसागरीं क्रीडतां । उसळती निजप्रेमलाटारे " (द. प्रे. ल. २३६) असा अनुभव येतो व "लहरी" हा शब्दहि अपुरा पडतो; म्हणून " दत्तभजनीं मन निमग्न झालें । खवळे प्रेमोदधि " ( द. पे. ल. ८५१ ) असेंहि श्रीपंतांनीं म्हटलें आहे. अशी अंतःकरणाची स्थिति झाली म्हणजे ज्या लहरी अथवा लाटा उसळतात त्याच प्रमोद्गारांच्या रूपानें बाहेर पडतात. आनंदरूप अथवा प्रेमरूप झालेल्या श्रीपंतांच्या अन्तःकरणरूपी प्रेमसागरावर ज्या लहरी अथवा लाटा उठल्या त्याच भजनालापांच्या रूपानें व्यक्त दशेला आल्या; म्हणून त्या आलापांना " प्रेमलहरी " हें नाव दिलें आहे श्रीपंतांनीं स्वतःच जागजागीं "ब्रम्हानंद-लहरी उठती वरि वरि " ( द. प्रे. ल. ५६७,१०८७ ); " उठली लहरी आनंदाची । भजनलीला बालमुकुंदाची " (द. प्रे. ल. २६७१); " अद्वैतसागरा उठती सहज । दत्त-स्वानंदलहरी " ( द. प्रे. ल. ३०७ ); "सद्गुरु अंतरीं प्रगट होतां । उठते प्रेमलहरी" (द. प्रे. ल. ४३६); "सहज समाधि दत्तभजनीं । चित्सिंधुलहरी " (द. प्रे. ल. ६७२);

" बुडालों स्वरूपसागरीं । उठती प्रेमानंदलहरी " ( द. प्रे. ल. १२१४ ); " बालमुकुंद-कृपासागरीं । दत्त प्रेमलहरी " ( द. प्रे. ल. ४१६ ); असे उद्गार काढले आहेत. तेव्हां श्रीपंतांच्या पदसंग्रहाला " श्रीदत्तप्रेमलहरी " हें जें नाव दिलें आहे तें पूर्णपणें सार्थ आहे हें सांगणें नकोच.

## श्रीपंतांचे स्वतःच्या पदांसंबंधाचे उद्गार

श्रीपंतांच्या पदांसंबंधीं विवेचन करण्यापूर्वी त्यांनीं स्वतः एकदां सहज बोलण्याच्या ओघांत आपल्या पदांसंबंधीं जे उद्गार काढले होते ते फार महत्त्वाचे वाटल्यावरून येथें देत आहोंत. ते असेः—" स्वयंभू पाण्याचे झरे ज्याप्रमाणें जमीन फोडून वर येतात अथवा कारंजाच्या पाण्याचे फवारे जसे सहज वर उडतात त्याप्रमाणे निघालेले या पदांतील उद्गार आहेत. ते सहज प्रेमोद्गार आहेत. सहज कार्यांत सर्व शक्ति एकदम अनुकूल असतात. म्हणून सहज उद्गारांची थोरवी कृत्रिम रचनेस कधींहि येणारी नव्हे. या पदांतील अनुभवास पोहोंचून पद म्हटल्यास त्यांत गोडी फार असते. त्यायोगें म्हणणाऱ्याला व ऐकणाऱ्याला दोघांसहि आनंद होतो. अनुभव नसतां म्हणणें तें कोरडें, वायां बडबडणें होतें. प्रत्येक पदांत एक तरी सिद्धांत असतोच. प्रत्येक पदांत अर्थ, तर्कशास्त्र, काव्यपद्धति, अलंकार यांपैकीं कांहींहि न चुकतां अनुभवच ओतलेला आहे; प्रत्येक पदांत शब्दजुळणी, व्याकरणरचना, भावनावर्णन हीं न शोधूं जातां आपोआप प्रतिबिंबित झालेलीं आढळतात " ( पु. ८–२३९). तसेंच आणखी एके ठिकाणीं त्यांनीं असें म्हटलें आहे कीं " पंतांनीं पदें रचिलेलीं नव्हेत. पंतांचें भजन तींच पदें झालीं. तीं पदें नव्हेत. ते पंतांतःकरणींचे प्रेमोद्गार आहेत. तें शुष्क ज्ञान नव्हे. तेथें अनुभव प्रगट झाला आहे. पंतांचीं पदें हेंच पंतांचें अंतःकरण. या पदांवरून पंतांचें अंतःकरण किती उदार, किती प्रेमळ होतें, तसेंच तें सर्वांचें विश्रांतिस्थान, सर्वांचें शांतिस्थान कसें आहे याची थोडीशी कल्पना मात्र करितां येते. हीं पदें म्हणजे गूढ वेदांतसिद्धांतांचें अनंत भांडारच होय. अणूपासून तों ब्रह्मांडापर्यंत सर्व आपल्या प्रेम-उदरांत सामावणारी जगज्जननी सद्गुरुमाय निजभक्तांचा योगक्षेम कसा वाहाते हें या पदांवरून स्पष्ट होतें " ( पु. ७–२८३ ).

श्रीपंतांचे वरील उद्गार आपल्याच मंडळीशीं बोलत असतांना निघालेले आहेत व ते कधीं प्रसिद्ध केले जातील याची त्यांना त्या वेळीं कांहींहि कल्पना नव्हती. तेव्हां या उद्गारांवरून त्यांचें स्वतःचें आपल्या पदांसंबंधींचें मत काय होतें तें समजून येतें. हीं पदें त्यांनीं बुद्धिपुरःसर रचिलेलीं नसल्यामुळे भजनांत एखादें पद सहज ओघांत म्हणून गेल्यानंतर मागाहून तें त्यांना तसेंच्या तसें म्हणतां येत नसे. इतकेंच नव्हे तर दुसऱ्याच्या तोंडून तें ऐकिल्यास, तें नित्य परिचयांतील नसेल तर, हें आपलेंच पद आहे अशी त्यांना चटकन ओळख पटत नसे. यासंबंधीं एके ठिकाणीं ते म्हणतात " कोल्हापुरांत एके ठिकाणीं चाललेलें भजन ऐकून मला असें वाटलें कीं मीं केलेलींच हीं पदें काय ? हीं किती उत्तम प्रेमानुभवानें भरलेलीं आहेत. एकेका शब्दांत, एकेका चरणांत,

एकेका पदांत किती वेदांत व सिद्धांतांचें सार भरलेलें असून तीं किती रसभरित आहेत ! माझी योग्यता काय ? छे, हीं पदें मीं केलेलीं नव्हेत ! आतां अशीं पदें निघत नाहींत. काय असेल तें असो. दत्ता, तुझी लीला अतर्क्य आहे. हीं पदें तूंच केलीं आहेस. माझें कर्तृत्व त्यांत कांहींच नाहीं. " ( पु. ७-२७४ ) तेव्हां हीं पदें श्रीपंतांनीं मुद्दाम रचिलेलीं नसून तीं भजनरंगांत सहज स्फूर्तीनें झालेलीं आहेत म्हणजे त्यांनींच म्हटल्याप्रमाणें त्यांचें भजन तींच पदें झालीं हें उघड आहे व " बालावधूत सदा भुलला । दत्तभजनानंदालापा " असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

## चरमावस्था व सिद्धकवि

प्रकरण ३१ मध्यें सांगितल्याप्रमाणें १८८६ पासून श्रीपंतांच्या सिद्धावस्थेला सुरवात होऊन, प्रकरण ४४ मध्यें दर्शविल्याप्रमाणें, त्यांच्या ठिकाणीं पूर्णाद्वैत बोध व अभेद भक्ति यांची परिणति झाली होती व ते अनुभवरूपच झाले होते. या स्थितीला त्यांनीं " चरम स्थिति " म्हटलें आहे व तिचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे " अहंवृत्तीलाहि जी साक्षी वृत्ति तीच चरम वृत्ति, जीवन्मुक्त वृत्ति, अहं-प्रत्ययास जाणीव देणारी, ऊर्मिरहित, अखंड वृत्ति " व " याच वृत्तींत गुरुप्रेमा मिळतो " असें सांगितलें आहे ( पु. ७-६४ व ७१ ). ही स्थिति सर्वावस्थातीत, सर्वावस्थांना आधारभूत, अमर्याद, स्वयंप्रकाश असून या स्थितींतच विदेह-कैवल्य-सुख प्राप्त होतें. या चरम स्थितीशीं जो कवि समरस झाला असेल तोच आपल्या कलाकृतीनें दिव्य, व्यापक व चिरस्थायी आनंद दुसऱ्यांना देऊं शकतो. असा कवि हा अखिल विश्वाची जी जीवनकला तिच्याशीं एकजीव झालेला असतो. त्याला देह-जगाचा म्हणजे एकदेशीपणाचा पूर्ण विसर पडून तो जणूं ब्रम्हानंदसागरांत नित्य डुंबत असतो. देहाभिमानाच्या मर्यादा ओलांडून जाऊन व स्वस्वरूपाशीं म्हणजे सच्चिदानंदरूपाशीं समरस होऊन अन्वय दृष्टीनें तो स्वतःकडे व विश्वाकडे पाहत असल्यामुळें " सच्चित्सुखसागरीं । अहं लवण मनि भीतरीं " ( द. प्रे. ल. १४१३ ); " ब्रम्हसागरीं विश्ववीचि । द्वैत मुळीं नाहीं " ( द. प्रे. ल. १०१ ) असा एकरसतेचा त्याला अनुभव येतो. अन्वय दृष्टीनें जगाकडे पाहाणारा जो साक्षात्कारी कवि तोच खरा सिद्ध कवि होय. " शुद्ध प्रेमामृत पाझरला । करुणार्णव हेलावला " ( द. प्रे. ल. २०६१ ) अशी त्याच्या अंतःकरणाची स्थिति होऊन शुद्ध प्रेमाचे पाझर फुटतात, आनंदाच्या उकळया येतात किंवा प्रेमसागरावर लाटा उसळतात. त्याचें अंतःकरण म्हणजे आनंदरसाची मूसच होय व त्याची वैखरी म्हणजे त्या मुशींतून अथवा अनुभवगड्ड्यांतून वाहाणाऱ्या प्रेमप्रवाहाचें बाहेर पडण्याचें मुख होय. त्यामुळें त्याच्या मुखांतून शुद्ध आनंदरसाचा, प्रेमरसाचा अथवा शांतिरसाचाच वर्षाव होत असतो. आपल्या दिव्य नयनांना आनंदाच्याच भिंगाचा चष्मा लावून तो सर्व विश्वाकडे व त्यांतील परस्पर-विरुद्ध भासणाऱ्या द्वंद्वांकडे पाहात असल्यामुळें त्याला सर्व आनंदरूपच दिसतें आणि जीव शिव, व्यष्टि समष्टि, जग ब्रम्ह एकरूपच दिसतात व आपण स्वतः म्हणजे आपला मीपणा,

आपलें मन, आपली बुद्धि, त्यांचे व्यापार, त्यांचे विषय, मनोविकार हीं सर्व म्हणजे एका चिदंबुधीच्याच लहरी आहेत असा त्याला अनुभव येतो. त्यामुळें असा कवि शृंगार, वीर, करुणादि रसांचें वर्णन करूं लागला तरी त्याच्या अभेद व आनंदमय दृष्टीमुळें त्या वर्णनांतहि अद्वैत बोधाचें दिव्य तेज फाकलेलें दिसतें व तें वर्णन ऐकणाराला सात्विक प्रेमानंदाचा लाभ होतो. श्रीपंतांचें काव्य याच कोटींतील असून त्यांचें कोणतेहि पद घेतलें तरी तें निजरंगानें रंगलेलें व ब्रम्हात्मैक्यबोधाच्या सौंदर्यानें खुललेलें आढळतें

## अद्वैतानुभव व काव्य यांचा संबंध

तत्वज्ञान म्हणजे घटपटादि कटकटीचा रूक्ष वेदान्त अशी ज्यांची समजूत असते त्यांना तत्वज्ञान व काव्यप्रतिभा यांचें विळयाभोपळयाएवढें वाकडें असून तीं एकत्र नांदणें शक्य नाहीं असें वाटत असतें आणि वेदान्तचर्चा, वादविवाद, अन्यमतखंडन, स्वमतप्रतिपादन वगैरे गोष्टींकरितां पद्यापेक्षां गद्याचा उपयोग करणें अधिक सोईचें असतें असें आपण पाहातों. या दृष्टीनें वरील लोकांची समजूत अगदीं निराधार आहे असें म्हणतां येणार नाहीं. पण श्रीपंतांसारख्या साक्षात्कारी कवींच्या ठिकाणीं पर तत्व अंगभूत झालेलें असल्यामुळें सर्व वादविवाद मिटलेले असतात व ज्ञानाला स्वानुभव-सिद्धांतांचें स्वरूप येतें. अशा प्रकारचें सिद्धांतज्ञान व काव्य यांच्यांत विरोध राहात नाहीं. उलट तीं एकमेकांचीं पूरक असतात. श्रीपंतांनीं पद ५९ मध्यें " तव इच्छेनें भजन भाक्ति । ज्ञान स्फुरवुनी वदवी स्तुति " अशी सद्‌गुरूपाशीं मागणी मागितली. कारण ज्ञान हें सर्व द्वैताचा निरास करून अद्वैत प्रस्थापित करितें अथवा व्यतिरेक मार्गानें स्वरूपस्थितीला नेऊन पोचवितें व स्वरूपानुभव आल्यावर अन्वय–दृष्टीनें अथवा अनुभव–दृष्टीनें पाहूं जातां अद्वयभजन सुरू होतें. म्हणून श्रीपंतांनीं पद ५८६ मध्यें " कारण मींची कार्य मींची । द्वैतवार्ता आतां कैंची ॥ धृ० ॥ शिष्य गुरु मींची जाहलों । भजनानंदें सहज खेळलों ॥ २ ॥ बद्ध मुक्त माझी स्थिति । भक्तिसुखाची ही रीती ॥ ३ ॥ " असें म्हटलें आहे. व्यतिरेक-अन्वय मार्गांनीं बुद्धि स्थिर होऊन चरम स्थितीचा अखंडानुभव घेणारा जो तत्वज्ञ तो ब्रम्हपुष्ट, भजनशीळ व सहजानंदोपजीवी असतो. त्यामुळें त्याचें काव्याशीं वाकडें असण्याऐवजीं त्याचें सर्व जीवनच काव्यमय बनतें. तो जीवन्मुक्त झाला तरी भक्तिप्रेमानें उचंबळणारें त्याचें अंतःकरण भजनरंगांत रंगून गेलेलें असतें व त्याच्या अंतःकरणांतील प्रेमझरा आटत नाहीं. यासंबंधीं श्रीपंत आपला अनुभव पुढीलप्रमाणें सांगतात " मूळ स्वभाव सद्‌गुरुभक्ति कांहीं केल्या सुटेना । जीवन्मुक्त जरी मी झालों प्रेमोदधि अटेना" ( द. प्रे. ल. ९८८ ). भक्तिप्रेमाचा जिव्हाळा हा अंतःकरणाचा धर्म आहे. तेव्हां जीवन्मुक्त स्थितींत बुद्धीला स्थैर्य येऊन मनाच्या धांवा मोडल्या तरी अंतःकरणांतील जिव्हाळा नष्ट होत नाहींच; तर उलट तो अधिक तीव्र होतो " मुक्तीवरी दत्त भक्ति । निजप्रेमाचे हेचि सोहाळे " ( द. प्रे. ल. ४४५ ) असें श्रीपंतांनीं म्हटलें आहे आणि म्हणूनच मुक्तीवरील भक्तीचें अथवा ज्ञानोत्तर भक्तीचें महत्व वारंवार गाइलें आहे.

## भावगीत

भक्ताच्या अंतकरणांतील भक्तिप्रेमाच्या अत्युत्कट भावनांचा स्फोट होऊन सहज स्फूर्तिद्वारां जें काव्य निर्माण होतें तें, इंग्रजींत ज्याला LYRIC म्हणतात, त्यासारखें असल्यामुळें त्याला पूर्वीं वीणाकाव्य म्हणत असत. पण अलिकडे अशा पदाला ' भावगीत ' म्हणतात. श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम वगैरे संतांचे भावनाप्रधान अभंग आणि त्रुटित व स्फुटगीतात्मक पदें वगैरे काव्य या कोटींतील होय. केशवसुतादि बऱ्याच आधुनिक कवींची कविता म्हणजे भावगीतेंच होत. ही अभिनव काव्यपद्धति केशवसुतांनीं प्रथम मराठींत सुरू केली अशी कित्येकांची समजूत आहे. पण संतवाङ्मयाचा जणूं आत्माच असा जो उत्कट भक्तिरस त्याला मात्र आधुनिक कवितेंत फारसें स्थान नाहीं. अशा प्रकारच्या काव्यांत कवींच्या भिन्न भिन्न भावनांचीं शब्दचित्रें कोमल, मधुर व हृदयंगम शब्दांनीं रंगविलीं जातात. त्यामुळें तीं कर्णमधुर असून त्यांच्यांत वैचित्र्य निर्माण होतें. श्रीपंतांच्या पदांत हे दोन्ही गुण दिसून येतात. त्यांचें प्रत्येक पद म्हणजे त्या त्या वेळच्या त्यांच्या अंतकरणांतील भक्तिप्रेमविषयक संवेदनांचें अथवा भावांचें शब्दचित्रच होय आणि त्याला अनुरूप अशा शब्दलालित्याच्या कुंचल्यानें व संगीतमिश्रित भक्तिप्रेमरंगानें तें रंगविलेलें असल्यामुळें तें ऐकणाराला माधुर्याबरोबरच निर्मळ व सात्विक आनंदाचा लाभ होतो. सर्वसाधारणपणें व्यक्तिनिष्ठ भावनांचा आविष्कार करणें हें भावगीताचें मुख्य लक्षण समजलें जातें. श्रीपंतांच्या पुष्कळ पदांत व विशेषतः 'श्रीदत्तप्रेमलहरीं'-तींल पहिल्या सुमारें शंभर पदांत वैयक्तिक भावना चित्रित झालेल्या असून कांहीं पदें प्रासंगिक म्हणजे त्यांच्या आयुष्यांतील विवक्षित प्रसंगांना उद्देशून झालेलीं आहेत. पण त्यांचा विशेष हा आहे कीं तीं संकुचित दृष्टीचीं नसून व्यापक दृष्टीचीं आहेत, म्हणजे त्यांच्यांत श्रीपंतांची वैयक्तिकता व्यक्त न होतां त्यांची व्यक्तिमत्ताच व्यक्त झाली आहे. सर्वसाधारणपणें भावगीतें गाणारा कवि आपण स्वतः, आपलीं बायकापोरें, स्नेही-सोबती, आपल्यावर उपकार करणाऱ्या व्यक्ति वगैरे वैयक्तिक संबंध अगर विषय यांच्या जाळ्यांत गुरफटलेला असून त्याची दृष्टि संकुचित असते. त्याच्या कवितेचा वर्ण्य विषय एकदेशी असल्यामुळें सर्वव्यापी व चिरस्थायी आनंद देण्याचें सामर्थ्य त्या कवितेंत असत नाहीं. यासंबंधीं श्रीपंतांनीं एके ठिकाणीं "भूमिभागीं फिरतां कैंची । जाणती खगलीला" (द. प्रे. ल. ८१७ ) असें म्हटलें आहे. स्थूलावर वावरणाऱ्या जडबुद्धीला सूक्ष्म सृष्टींतील दिव्य आनंदाचा लाभ होणें नाहीं हें उघडच आहे. अशा कवींच्या ठिकाणीं प्रतिभा असली तरी ती हीन अथवा क्षुद्र प्रतीची असते. त्यामुळें त्याचें काव्य कांहीं काळ लोटल्यानंतर निष्प्रभ होतें. या बाबतींत श्रीपंतांचा प्रकार अगदीं निराळा होता. कारण त्यांनीं आपलें व्यक्तित्व गुरुपदीं अर्पण केलें होतें. " गुरुपदीं अर्पिलें तनुमन । नाहीं उरलें विषयधन " ( द. प्रे. ल. ३४४ ) हा त्यांचा अनुभव होता. त्यांनीं सद्गुरूशीं "गुरुचरणाची साक्ष मी देतों कांहीं न मागें । कृपाकटाक्षें दीन दासा पाहीं अनुरागें " ( द.प्रे. ल. ७८९ ) अशी शुद्ध गुरुकृपेची मागणी मागितली व " बालमुकुंदपदीं दत्त निमाला ।

प्रेमाकारणीं उरला " ( द. प्रे. ल. ४११ ) असे वारंवार उद्गार काढले आहेत. अशा प्रकारें सद्गुरुपदीं मरून प्रेमभोगार्थ उरलेला कवि "देह मी" व "देहाचे संबंधी ते माझे" अशा क्षुद्र भावनांनीं प्रेरित होऊन नश्वर विषयांची अथवा क्षणिक सुखाची कधींच अपेक्षा करीत नाहीं. त्याच्या ठिकाणच्या उत्कट भावना " मी माझें", " अहं इदं " वगैरे एकदेशीपणाचे तट फोडून अनंताला कवटाळण्याकरितां भराऱ्या मारीत असतात. " मला छंद लागला आत्मारामाचा। रजतमरहित सत्व उजळलें। अमल नाहीं मोह कामाचा ॥१॥ विरति-उपरति-विवेक-सहित । पंथ धरिला निजधामाचा ॥२॥ अद्वैत-डोहीं बुद्धि हरपली। गजर करीत दत्तनामाचा ॥३॥ " ( द. प्रे. ल. १६४ ) या पदांत श्रीपंतांनीं म्हटल्या-प्रमाणें ज्याला आत्मारामाचा छंद लागून अंतःकरणांत शुद्ध सत्वाचा उदय झाला, विरति, उपरति व विवेक यांच्या संगतींत जो निजधामाच्या मार्गानें जात आहे व ज्याची बुद्धि अद्वैतडोहांत हरपून गेली अशा कवीची प्रतिभा ही शुचि प्रतिभा असते व तीच उत्कृष्ट काव्याची जननी होय. त्याची व्यक्तिमत्ता ही जरी त्याच्या काव्यांत दिसत असली तरी ती " मी तूं वंध्यासंतति । त्याची नोहे सत्य प्रतीति " ( द. प्रे. ल. १२७ ) या कोटींतील असून अद्वैतडोहांत त्याची बुद्धि हरपून गेल्यामुळें ती प्रातिनिधिक स्वरूपाची असते हें सांगणें नकोच. त्यामुळें जरी श्रीपंतांच्या पदांत " मी " व " आम्ही " या प्रथम पुरुषी सर्वनामांचा उपयोग केला आहे तरी तीं जीव अथवा व्यष्टि अशा उभारत स्वरूपाचीं आहेत. तसेंच त्यांच्या पदांत शिष्य व गुरु यांचेमधील जो जिव्हाळ्याचा संबंध वर्णिला आहे तो जीव शिव, व्यष्टि समष्टि, भक्त देव अशा व्यापक स्वरूपाचा आहे. उदाहरणार्थ त्यांनीं विरहाकुल स्थितींत " सद्गुरुमाते धांव गे । मज भेट देई गे " (द. प्रे. ल. २६) असें म्हणून सद्गुरुमातेचा जो धावा केला आहे तोच त्याच शब्दांनीं कोणीहि भक्त करूं शकेल. तसेंच त्या पदाच्या प्रथम चरणांत ती सद्गुरुमाता कोणती तें त्यांनीं पुढील शब्दांनीं सांगितलें आहे " श्रीरूपें अनंत ब्रह्मांडें व्यापूनी। शेष तूंचि ॐकारगे" म्हणजे अनंत ब्रह्मांडांना आपल्या प्रेमोदरांत साठविणारी ती कृपाळु जगज्जननी होय असें स्पष्ट करून दाखविलें आहे. श्रीपंतांच्या ठिकाणीं एवंगुण–विशेषण–विशिष्ट अशा स्वतःच्या वैय्यक्तिकतेचा इतका निरास अथवा लोप झाला होता कीं एके ठिकाणीं "वंध्या-सुत हा दत्त टाकुनी। सतत बालमुकुंद भजावा" ( द. प्रे. ल. १४० ) अशी त्यांनीं आपल्या भक्तांना सूचना केली आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या सुमारें २८०० पदांत वैय-क्तिक संबंध अथवा प्रापंचिक दृष्टया आपली परिस्थिति यांच्यासंबंधीं नुसता ओझरता उल्लेखहि त्यांनीं कधीं केला नाहीं किंवा आपल्या जवळच्या आप्तांच्या स्तुतिपर अथवा कोणताहि ऐहिक विषय नजरेपुढें ठेवून एकहि पद म्हटलें नाहीं; उलट " बंधु मेहुणा म्हणती मजला । सर्वांसी मी अलिप्त राहातों " ( द. प्रे. ल. ८१५ ) असें म्हटलें आहे. आपले परमहंस आजोबा, गुरुबंधु व मावसबंधु गणपतराव मारीहाळकर, आपला प्रिय शिष्य दिवाण व आपलें कुटुंब सौ. यमनाक्का यांच्या निधनानंतर श्रीपंतांनीं त्यांच्या त्यांच्या गुणवर्णनपर जे दुःखालाप काढले आहेत त्यांच्यांत सुद्धां शुद्ध आणि निर्हेतुक प्रेम व

अद्वैत बोध आणि त्या त्या व्यक्तींच्या ठिकाणीं आध्यात्मिक दृष्टया जे गुण होते ते, हींच आढळून येतात हें अनुक्रमें प्रकरण ३०, ३४, ३९ व ४० मध्यें दाखविलेंच आहे.

## प्रसाद, सौंदर्य व माधुर्य

येथपर्यंत वर्णन केल्याप्रमाणें " निजछंद भजनानंद वृत्तिहि धुंद दत्तनिजरंगीं " ( द. प्रे. ल. १८३ ) " निजानंदापिसें भक्ता लागतां । गर्जे गुरुनामारे शिव शिव " ( द. प्रे. ल. १४७ ) अशा तन्मयतेच्या स्थितींत श्रीपंतांच्या अंतरंगांचा निजरंगच त्यांच्या पदांच्या रूपानें बाहेर पडत असे. त्यामुळें प्रसाद अथवा सहजता, सौंदर्य व माधुर्य हे गुण त्या पदांत उतरले आहेत. तत्वज्ञ कवीचें अंतःसौंदर्यच त्याच्या वाणींत प्रगट होतें व त्याच्या अंतरींचें संगीतच कोमल व मधुर ध्वनींच्या रूपानें व्यक्त होत असतें. त्यामुळें अशा कवीला अंतरंगींचे भाव व्यक्त करण्याकरितां शब्दांची निवड अथवा जुळणी मुद्दाम करावी लागत नाहीं. तर त्याच्या अंतरंगींचे कोमल व मधुर भाव आपोआप अनुरूप अशा ध्वनींच्या व शब्दांच्या साह्यानें व्यक्त होतात. श्रीपंतांचीं पदें भजनरंगांत सहज स्फूर्तीनें झालेलीं असल्यामुळें त्यांचा सहजानुभव व्यक्त होतांना त्यांच्यांत कर्त्याचा अभाव दर्शविणाऱ्या शब्दांचा व अकर्मक क्रियापदांचा सहज उपयोग झाला असलेला आढळतो. पद १२५१ मधील चार चरणांच्या शेवटीं अनुक्रमें पुढील चार क्रियापदें आहेत मिटला, अटला, भासला, रंगला; पद १३१२ मध्यें पुढील क्रियापदें आहेत लोपलों, भरलों, मिरलों, बनलों; पद २४३२ मध्यें विनटलों, विटलों, भेटलों, थाटलों, नटलों, अटलों, झटलों व मिटलों हीं क्रियापदें आलीं आहेत व पद १४७६ मध्यें पुढील क्रियापदें आहेत भरला, उडला, नुरला व उचंबळला. अशीं आणखी पुष्कळ उदाहरणें आहेत. अशा वाक्यरचनेमध्यें सहज स्थितींतील अनुभव व्यक्त झाले असल्यामुळें कर्त्याचा अभाव सुचविणारी शब्दयोजना सहज झाली आहे. पद ३१४ मध्यें श्रीपतांनीं "आतां मी झालों अवधूत ॥धृ०॥ कल्पित बाजार गिळुनी सगळा । सहज झालों निवांत" असें म्हटलें; पण लगेच "गिळुनी" व " झालों " हें तरी कोणी म्हणावयाचें अशी शंका येऊन, "गिळलों झालों न बोलवे कांहीं। झालों परातीत ॥ २ ॥ सहजी सहज स्थिति बाणली। धन्य धन्य गुरु दत्त " असा खुलासा केला. तसेंच पद ८८३ मध्यें " एक तो अनेकची झाला " असें सांगून लगेच श्रीपंत म्हणतात " झाला म्हणणें अर्थवाद हा "; म्हणून ही भाषा " ऐकुनी मी हसलों " असें त्यांनीं म्हटलें आहे. त्यांनीं आपल्या पदांमध्यें जी मार्मिक शब्दयोजना केली आहे ती बिनतोड आहे. त्यांच्यामध्यें पदलालित्य, मार्दव, सोपेपणा व सुटसुटितपणा हे गुण प्रामुख्यानें दृष्टोत्पत्तीस येतात. त्यांतल्या त्यांत त्यांनीं सद्गुरूला ' भाविकचिन्मंदीरदीप, अविरळानंददाता, दत्तहृदयाभिराम, ' ( द. प्रे. ल. २ ८) वगैरे जीं अन्वर्थक विशेषणें लाविलीं आहेत आणि ज्या संबोधनांनीं संबोधिलें आहे तीं इतकीं उदात्त व हृदयंगम आहेत कीं त्या वाक्सुमनांचा जर एक स्तवनहार गुंफिला तर तो आपल्या सौंदर्यानें व सुवासानें रसिकांना खचित मोहून टाकील ! त्याचप्रमाणें

शारदा, अंबा, आदि माया जी चिच्छक्ति तिला पाच पदांच्या रूपानें ( द. प्रे. ल. ६ ते १० ) विविध रंगांच्या वाक्कुसुमांची जी माला त्यांनीं अर्पण केली आहे त्या मालेंतील कुसुमांची शोभा, त्यांच्या ठिकाणचें मार्दव, कोमलपणा व अर्थरूपी सुवास हे गुण प्रामुख्यानें नजरेस येतात.

श्रीपंतांच्या पदांमधून अद्वैत सिद्धांत सूत्ररूपानें वारंवार आलेला असल्यामुळें त्यांच्या सहजोद्गारांना एक प्रकारचें गांभीर्य आलें आहे. तसेंच प्रमाणभूत श्रुतिवचनें त्यांच्या पद्यरचनेंत जागजागीं गोविलीं गेल्यामुळें पदांची भाषाहि जोमदार व ओजस्वी झाली आहे. अशा वचनांचे कांहीं मासले प्रकरण ४३ मध्यें दिलेच आहेत. अशा वचनांत सोपेपणा व सुटसुटितपणा यांचे बरोबर सखोलपणा व अर्थगांभीर्य हे गुण सहज प्रगट झाले आहेत. श्रीपंतांच्या पदांतील अर्थपूर्ण व सुटसुटित सुभाषितें एकत्र केल्यास त्यांचा फार मोठा संग्रह होईल.

## शब्दालंकार-अनुप्रास

श्रीपंत हे सहजानंदी, भजनछंदी व नादप्रिय असल्यामुळें त्यांच्या पदांत, इतकेंच नव्हे तर, गद्य लेखांत व पत्रव्यवहारांतहि ध्वनिमाधुर्य प्रगट झालें आहे व अनुप्रास हा शब्दालंकार वारंवार आलेला आहे. त्यांच्या ठिकाणीं काव्यस्फूर्ति निर्माण होण्यापूर्वी १-१०-१८८० रोजीं त्यांचा गुरुबंधु हणमू दड्डीकर याला त्यांनीं लिहिलेल्या पत्राच्या शेवटीं पुढील वाक्य आहे " श्रेष्ठ सद्‌गुरुपुत्राची कृपा झाल्यानंतर दुष्ट यमाचीहि भीति नाहीं. मग निष्ठा कां ठेवूं नये ? " या एकाच वाक्यांत श्रेष्ठ, दुष्ट व निष्ठा हे शब्द आल्यामुळें तें कानाला गोड लागतें. त्याचप्रमाणें द. प्रे. ल. पु. ६ मधील ७९ व्या स्फुट लेखाच्या शिरोभागीं पुढील वाक्य आहे " तर्कांत गर्क होऊन नरकमार्ग धरूं नका; सरकून पार पडा. " या एका वाक्यांत 'र्'कार सात वेळां आल्यामुळें तें वाचणाराला आल्हाद उत्पन्न होतो. श्रीपंतांच्या पदांतहि अनुप्रासाचीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. त्यांपैकीं कांहीं पुढें देत आहोंत. " वेदविहित मार्ग सांडुनी जन चालले । निजानंद नेणुनी विषयसुखा भुलले । त्वरा करा धरेवरी नरावतार घेई भक्तवत्सल श्रीहरी ॥ १ ॥ शिष्ट जन छळ होतो कष्टती भारी । दुष्ट जनां संहरुनी सृष्टि उद्धरी । क्षमा शमा रमाधवा तमारि दूर करी भ्रमा दीनकैवारी ॥ २ ॥ " ( द. प्रे. ल. २६०१ ); " दत्तराज निजशांतिधाम मम चित्तचकोरासी " ( द. प्रे. ल. १४६४ ) या पदांतील तीन्ही चरणांत अनुप्रास अलंकार दिसून येतो; ते असे " कंद जगाचा नंद संसृतिचंदिरमदहरणा । नंद विधि हरा छंदस्वरूपीं वृंदारकरमणा ॥ १ ॥ धूतकल्मषावधूतवृत्ति अद्‌भुत वीर्यधारी । भूतभावनोद्भूतप्रकृति उद्‌भूत चराचरीं ॥ कर्महरा निजशर्मरूप सद्धर्मचरितमोदा । निर्मलांत श्रुतिमर्मविदा दत्त ऊर्मी ब्रम्हानंदा ॥ ३ ॥ " त्याचप्रमाणें पद ६८ मध्यें या अलंकाराचा उत्कृष्ट नमुना पाहावयास सापडतो. तें पद असें " दत्ता बालावधूता माझी चिंता तुज अनंता रे । माता प्रेमळ पिता तूंची त्राता भवअरिहंतारे ॥ धृ० ॥ घोर हा भवसागर यांतुनी पार करी

तूं धीरारे । थोर हा षड्रिपुमार सारीं दूर श्रुतिसारारे ॥ १ ॥ स्थूळ हें भ्रमाचें मूळ प्रपंच खूळ प्रतिकुळरे । काळ दुर्धर व्याळ पाहुनी केवळ झाली तळमळरे ॥ २ ॥ व्हावें जीवन्मुक्त भावें गावें तुजला ध्यावेंरे । यावें दत्ता ध्यावें पदरीं देवें अलक्ष्यीं न्यावेंरे ॥ ३ ॥ " शब्दालंकारांचा विशेष हा आहे कीं त्यांच्या योगानें काव्य कर्णमधुर लागतें. त्यामुळें ऐकणाराला त्याच्यांतील गूढार्थ न समजला तरी तें नुसत्या ऐकण्यानें आल्हाद होतो.

## संगीताची साथ

श्रीपंतांना ताल, सूर, राग वगैरेंचीहि चांगली माहिती असल्यामुळें नादमाधुर्याला संगीताचो जोड मिळून त्यांचीं पदें निरनिराळ्या रागांत व निरनिराळ्या चालींवर म्हणतां येतात आणि म्हणणारा सुरेल असून पदांतील रहस्य समजून म्हणूं लागला म्हणजे तीं ऐकणारांना मोहित करून टाकतात असा अनुभव आहे. श्रीपंतांच्या शिष्यांपैकीं पुष्कळ जण त्यांच्या पदांनीं मोहित होऊनच प्रथम त्यांच्याकडे गेले.

साधारणपणें संतांचें भक्तिपर काव्य हें ओवी व अभंग वृत्तांत असलेलें आढळतें. एखाद दुसरा अपवाद वगळला असतां श्रीपंतांनीं ओवी-वृत्ताचा मुळींच उपयोग केलेला नसून अभंग-वृत्ताचाहि २७३० पदांपैकीं फक्त दहा पाच पदांकरितां उपयोग केला आहे. याचें कारण असें दिसतें कीं ते सुरेल व गानप्रिय होते. तशांत किर्लोस्कर संगीत नाटकमंडळीचे संस्थापक आधुनिक नाटकाचार्य कै. अण्णा किर्लोस्कर यांनीं १८८० च्या सुमारास " किर्लोस्कर " नाटकमंडळीची स्थापना केली. १८६८ पासून सुमारें आठ वर्षे ते बेळगावांत राहात असत. प्रथम ते अँग्लोव्हर्नाक्युलर स्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत असत व मागाहून पोलीसखात्यांत नोकरी करूं लागले. तेथें असतांना त्यांनीं ' शांकर दिग्विजय' हें गद्य नाटक लिहिलें व भारतशास्त्रोत्तेजक मंडळीची स्थापना केली. ही मंडळी नाटकें करीत असे. त्या वेळीं फार लोकप्रिय असलेल्या कर्नाटकी 'पारिजातक' नाटकाचे धर्तीवर अण्णांनीं मराठींत 'पारिजातक' नाटक लिहिलें. बेळगावांत ते असेपर्यंत होळीच्या सणाला फार महत्व आलें होतें व त्यांचें 'शिमगा काव्य' ऐकण्यास शेकडो लोक जमत. त्या सुमारास श्रीपंत बेळगाव येथें इंग्रजी शाळेंत शिकत होते. त्यामुळें त्यांना अण्णांची चांगली माहिती होती. अण्णा प्रासादिक कवि असून त्यांनीं आपल्या नाटकांचीं संविधानकें सर्वांना प्रिय होतील अशींच निवडलीं होतीं. श्रीपंतांच्या ठिकाणीं काव्यस्फूर्ति निर्माण होण्याच्या म्हणजे १८८२-८३ च्या सुमारास किर्लोस्कर मंडळीचे 'शाकुंतल' व 'सौभद्र' या नाटकांचे प्रयोग पुण्या-मुंबईकडे फार लोकप्रिय व विद्वन्मान्य होऊन त्या मंडळीची वाहवा होऊं लागली होती आणि वर्तमानपत्रांतून किर्लोस्कर मंडळी, तिचीं नाटकें व तिचे उत्पादक, अण्णा किर्लोस्कर, यांचेसंबंधीं वारंवार लेख येत असत व चर्चा होत असे. तेव्हां श्रीपंतांच्या कानावर 'सौभद्र', 'शाकुंतल' वगैरे नाटकांतील पदेंहि येतच असलीं पाहिजेत. अण्णा किर्लोस्कर यांचा कर्नाटकाशीं फार निकट संबंध असल्यामुळें त्यांच्या काव्यांत व विशेषतः 'सौभद्र' नाटकांतलि मुख्य पात्रांच्या तोंडीं घातलेल्या पदांत कर्नाटकी चालींचीं

पदें पुष्कळ आहेत. त्या चाली गोड व कोमल भाव व्यक्त करण्याला अनुकूल असल्या-मुळें श्रीपंतांनींहि पदें म्हणतांना बऱ्याच कर्नाटकी चाली उचललेल्या आहेत. श्रीपंतांच्या वेळची जी एक जुनी पदांची वही त्यांच्या दप्तरांत आहे त्या वहींत कित्येक पदांच्या शिरो-भागीं राग आणि 'सौभद्र' व कानडी 'पारिजातक' या नाटकांतील कांहीं पदांच्या चाली लिहि-लेल्या आहेत. १८९५ सालीं एके दिवशीं बेळगावांत एका सरकारी अधिकाऱ्याला पानसुपारी देण्याचा एके ठिकाणीं समारंभ झाला व त्या वेळीं स्वागताचें पद म्हणण्याकरितां किर्लोस्कर मंडळींतील एका नटाची योजना केली होती. ते दिवशीं संध्याकाळीं श्रीपंत फिरावयास गेले असतांना त्यांनीं तें स्वागतपर पद ऐकिलें व त्यांना त्या पदाची चाल इतकी आवडली कीं तें ऐकिल्यापासून तें त्यांच्या डोक्यांत घोळत होतें आणि घरीं परत आल्यावर ते जेव्हां भजनाला बसले तेव्हां त्यांनीं त्याच चालीवर " दत्ता हा स्तवनहार अर्पितों तुला। अनुभवसह प्रेमभरें आजि गुंफिला " ( द. प्रे. ल. ८५६ ) हें सुंदर पद म्हटलें.

## अर्थालंकार–उपमा व रूपक

ज्याप्रमाणें श्रीपंतांच्या पदांत प्रेमरस, नादमाधुर्य, अन्वर्थक व मार्मिक शब्द-योजना आणि संगीत हे गुण एकवटले आहेत त्याचप्रमाणें त्यांची कविता अर्थालंकारांचीं सुंदर लेणीं लेवून बाहेर पडलेली आहे. त्यांच्या पदांत वारंवार आढळणारे मुख्य अर्था-लंकार म्हणजे उपमा व रूपक हे होत. आपल्या मनांतील भाव व्यक्त करण्याकरितां त्यांनीं जागजागीं अर्थबोधक व समर्पक उपमा दिल्या आहेत आणि त्याकरितां विविध उपमानांची योजना केली आहे. त्यांपैकीं वारंवार येणारीं उपमानें म्हणजे सागर–सरिता, बालक–माता, केसरी–गज, दीप–प्रभा, लवण–जल, वारा–आकाश, बाळ–बागुल वगैरे होत. साधारणपणें वेदांतपर ग्रंथांत आढळून येणारीं पुढील उपमानें श्रीपंतांच्या पदांतहि वारंवार आलेलीं आहेत–रज्जु–सर्प, अलंकार–सोनें, पट–तंतु, घट–मृत्तिका, गगनकुसुम जल-तरंग, गंधर्वनगर, मृगजळ, शुक्ति–रजत, वंध्यासुत, चंद्र-चकोर, चातक-मेघ, कामधेनु, कल्पवृक्ष, लोहपरिस, भ्रमर–कमल वगैरे.

श्रीपंतांनीं आपल्या वाङ्मयांत व विशेषतः पदांत रूपकाचा वारंवार उपयोग केला आहे व कांहीं ठिकाणीं त्यांनीं केलेलीं रूपकें विस्तृत आहेत. त्यांपैकीं कांहीं उदाहरणार्थ पुढें देत आहोंत.

१ " सद्गुरुकृपें झालों। सहजानंदशिकारी ॥ धृ० ॥ कल्पित दृश्यरानीं शोधितों। निजानंदलहरी ॥ १ ॥ द्वैतमृगासी मारुनी। सहजामृत पान करी ॥ २ ॥ "; ( द. प्रे. ल. १९३१ )

२ " भवाटवीं मृगया मी करितों। स्वानंद भोगितों ॥ धृ० ॥ पंचविषयमृगांपाठीं। विरति–बाण सोडितों ॥ १ ॥ मारुनी मृग भक्षण करितां। उपवासी राहातों ॥ २ ॥ खेळुनी मृगया उन्मनीमंदिरीं। दत्तपदीं निजतों ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १७९९ );

३ " गुरुमुद्रित पोळ संसारीं फिरतो । जाणुनी सेवीं नरा ॥ ध्रु० ॥ माया-कल्पित ढोंसुनी पाडिलें । अंतका दरारा ॥ १ ॥ "; ( द. प्रे. ल. ८८५ )

४ "××× मायानदी भयंकर । वसतो नक्र अहंकार । काम क्रोध जलचर । न दिसे कधीं पैलतीर । वासना घोर जन्म-मरण भोंवरा ॥ २ ॥ " ( द. प्रे. ल. २८१ ).

श्रीज्ञानेश्वर, एकनाथ वगैरे संत कवींनींहि आपला गूढ आत्मानुभव व्यक्त करण्याकरितां रूपकालंकाराचा फार उपयोग केलेला आढळतो. याचें कारण असें दिसतें कीं आपल्या सच्चिदानंद रूपाशीं समरस झाल्यावर अशा आत्मानुभवी सत्पुरुषांना जो वाङ्मनातीत अतएव अनिर्वचनीय अनुभव येतो तो अमूर्त असल्यामुळें तो व्यक्त करण्याकरितां सर्वांच्या परिचयांतील मूर्त प्रतीकांचें अथवा सजीव अगर निर्जीव मूर्तीचें अवलंबन करून त्यांच्या साह्यानें ते आपला भाव व्यक्त करीत असतात; किंवा असेंहि म्हणतां येईल कीं अनुभवी महात्मे हे दुभाष्याप्रमाणें असतात. श्रीपंतांनीं पुढीलप्रमाणें अवधूताचें एक लक्षण सांगितलें आहे " दृश्य सर्वहि सारुनी मागें । अदृश्याच्या गोष्टी सांगे । रंगातीत निजरंगीं रंगे । अवधूत भूत गे ॥ " ( द. प्रे. ल. १४५० ) त्याचप्रमाणें " जो जनांमध्यें वागे । परी जनावेगळया गोष्टी सांगे । ज्याच्या अंतरीं ज्ञान जागे । तो एक साधु " अशी एका संतकवीनें साधूची व्याख्या केली आहे. अशा प्रकारचा अवधूत अथवा साधु मौनमंदिरांत अतींद्रिय सुखाचा जो अनुभव घेत असतो तो श्रोत्यांपुढें व्यक्त करितांना त्याला त्यांच्या भाषेंत, त्यांना समजेल अशा रीतीनें, त्यांच्या नित्य परिचयांतील उपमानें घेऊन अथवा दृष्टांत देऊन, आपले निरनिराळे अनुभव व्यक्त करावे लागतात. त्यामुळें साक्षात्कारी कवीच्या ठिकाणीं जी विधात्री कल्पनाशक्ति असते तिच्या साह्यानें तो अमूर्ताला मूर्त स्वरूप देतो, निर्जीवाला सजीवत्व देतो व निर्गुणाला सगुण बनवितो आणि जणूं प्रतिसृष्टि निर्माण करून, श्रोत्यांना अगर वाचकांना समजण्यास सुलभ जाईल अशा रीतीनें आपल्या अंतःकरणांतील सूक्ष्म आणि नाजुक संवेदना व भाव व्यक्त करीत असतो.

जेव्हां श्रीपंतांना सद्गुरूचा वियोग अगदीं असह्य होऊं लागला तेव्हां आपल्या चित्ताची त्याचेकडे लागलेली ओढ आणि त्याच्याशीं मीलन होण्याबद्दल झालेली आतुरता व्यक्त करण्याकरितां त्यांनीं आपलें चित्त हाच चकोर व सद्गुरु हाच चंद्र अशी भावना करून " मम चित्त-चकोर-चंद्रा " या सामासिक शब्दानें सद्गुरूला हाक मारिली व " भेटी देई परमोदारा " अशी विनवणी केली. या रूपकाला परंपरित रूपक म्हणतात. कारण येथें श्रीपंतांनीं सद्गुरूला चंद्र म्हटलें व आपल्या चित्ताला चकोर म्हटलें. त्यांनीं साध्या रूपकांचाहि वारंवार उपयोग केला आहे. त्यांपैकीं समासयुक्त एकशब्दात्मक कांहीं रूपकें येथें देत आहोंत. ज्ञान-भास्कर, तुर्य-पीठ, उन्मनी-मंदिर, संसार-वन, विराग-वैश्वानर, समाधि-शेज, मुक्ति-ललना, याद-भक्त, भक्ति-सुवर्णसूत्र, मुक्ति-गोंडा, बोध-सखा, अनुताप-बंधु, माया-वस्त्र, भ्रांति-कंचुकी, बोध-पुरुष, बोध-दंड वगैरे. त्याचप्रमाणें त्यांच्या पदांत समासरहित रूपकेंहि पुष्कळ आहेत. उदाहरणार्थ, उन्मनीचा पलंग,

द्वैताचा काळिमा, दुःखाचा सागर, अहं–मुक्ताचा दुर्ग, अनुभवाचें माहेर वगैरे. आपली विधात्री कल्पनाशक्ति व दिव्य प्रतिभा यांच्या साह्यानें श्रीपंतांनीं एका आरतीमध्यें रूपकद्वारां विशाल व भव्य विश्वरूप दत्ताचें सुंदर चित्र रंगविलें आहे. तें असें "शुद्ध गगनताटीं चंद्र–सूर्य–ज्योति । विश्वरूप दत्ता ओवाळूं आरती ॥धृ०॥ नक्षत्र–पुष्पें उडविलीं आयितीं । मीपणा टाकुनी भोगिली शांति ॥१॥ अवनी जलाग्नि अनिलाकाश । पाहातां विलसे शुद्ध सत्तास्फूर्ति ॥२॥ अहं त्वं इदं मायाकल्पित । ओवाळिली दत्ता ऐक्यारती " ॥ ३ ॥ ( द. प्रे. ल. २६९४ ). या आरतींतील विश्वरूप दत्ताचें उदात्त, भव्य व रम्य कल्पनाचित्र व पंचमहाभूतांच्या रूपानें चाललेला शुद्ध सत्ता-स्फूर्ति--विलास पाहाणारी श्रीपंतांची ऐक्यानुभवदृष्टि हीं रसिक व मार्मिक वाचकांना खास मोहून टाकतील !

श्रीपंतांनीं निजरंगाच्या कुंचल्यानें रूपकाच्या द्वारां नाथांच्या भारुडांप्रमाणें स्वतःचीं निरनिराळ्या भूमिकांमधील बहारींचीं शब्दचित्रें काढिलीं आहेत व अशा प्रत्येक चित्रांत अगर रूपकांत ऐक्यबोध व अभेद भक्ति हीं ठळकपणें उमटलेलीं दिसतात. तीं शब्दचित्रें अशीं:—

'संन्यासी' (पद ३०३, १९२६, २३०२, २३०९, २३२० ); 'वैरागी' ( ६३७, ११६४, १४९०, २३०८, २४११, २४२३ ); 'फकीर' ( १११२, १११३, १९९९, २००६ ); 'बोवा' ( २२६८, २४१० ); 'गारुडी' ( २२६५ ); 'अवधूत' ( १९२७ ); 'मांत्रिक' ( २२६६ ); 'जोगी' ( ११११, १६६, ); 'जोगीण' ( १७५८ ); 'गोसावी' ( ३७२; २२९१ ); 'डोंबारी' ( ४३५, ); 'वैद्य' ( २२६७ ); 'जोशी' ( १४६९ ); 'ब्राम्हण' ( २३१५); 'लिंगायत' ( २३१४); 'वाणी' ( २१९६ ); 'घरबारी' ( १२७७ ); 'श्रीमंत' ( १५३४ ); 'भिकारी' ( १५३३ ); 'कृपण' ( २३८७ ); 'बटीक' ( २६६ ); 'गुलाम' ( १८२१ ); 'पाईक' ( २४६८ ); 'वकीली व सनद' १८११ व १८१२ ); 'श्वान' ( २६१, २६३, ७२६, ७८८, २१९३, २२३९ ); वगैरे. त्याचप्रमाणें निरनिराळे सण, पुण्य–दिवस, काशीयात्रा वगैरेंचीं अद्वैतपर शब्दचित्रेंहि त्यांनीं प्रेमानंदाच्या कुंचल्यानें रंगविलीं आहेत. उदाहरणार्थः–'पाडवा' १४७३ ); 'दसरा' ( २१११ ); 'नवरात्र' ( १५५२ ); 'गोकुळाष्टमी' ( १०७१, १०७२ ); 'शिमगा' ( ८६८ ); 'होळी' ( १२३८ ); 'रंगपंचमी' ( १४७२ ); 'एकादशी' ( १०२८, १३८३, २१९९ ); 'शिवरात्र' ( ५५२, १२२६, १२२८ ); 'सोमप्रदोष' ( १५६८ ); 'काशीयात्रा' ( ५२८, ५३० ) वगैरे. वरील प्रकारचीं पदें कांहीं तरी निमित्त घडून सहज स्फूर्तीनें झालेलीं आहेत व तीं सर्व रूपकेंच आहेत. उदाहरणार्थ, कोणी तरी पंचांग सांगणारा जोशी आलेला पाहून " झालों आम्ही जोशी । पंचांग सांगूं जगासी ॥ धृ० ॥ पंच तत्वें दिसुनी नासती । परब्रह्म अविनाशी ॥ १ ॥ सदा मंगल गुरुपुत्रासी ।

सद्गुरुचरणवासी ॥ २ ॥ अभिमानाची देतां दक्षिणा । निमग्न दत्तरसीं ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १४६९ ) हें पद म्हणून आपण जोशी कसे तें त्यांनीं दाखविलें. अशा पदांवरून श्रीपंत हे ' शीघ्र कवि ' कसे होते हें स्पष्ट दिसून येतें.

## स्वतंत्र प्रतिभा

श्रीपंत हे स्वतंत्र प्रतिभावान् कवि होते व त्यांचीं पदें त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेची स्पष्ट साक्ष देत आहेत. तीं कांहीं तरी आधार घेऊन रचलेलीं नसून अगदीं स्वतंत्र आहेत. त्यांच्यांत त्यांचा स्वतःचा अनुभवच व्यक्त झाला आहे. त्यांच्या कित्येक पदांत एकच सिद्धांत अगर एकाच प्रकारचा अनुभव निरनिराळ्या शब्दांत पुनः पुनः आलेला आहे. त्यामुळें जो वाचक अर्थाला न भिडतां करमणुकीकरतां हीं पदें वाचण्यास जातो त्याला तीं कंटाळवाणीं वाटण्याचा संभव आहे आणि हीं पदें वाचणारे अगर म्हणणारे पुष्कळ भक्त करुणापर व भक्तिपर पदांवरच आपलें काम भागवितात. अशा पदांतूनहि शुद्ध अद्वैतबोध मधुन मधुन चमकत असल्यामुळें तीं मनरंजन करून तत्वबोधहि करितात. पण श्रीपंतांच्या पदांत अनुभवपर व सिद्धांतपर पदांचा भरणा फार मोठा आहे. त्यामुळें त्यांनीं एकच सिद्धांत वारंवार कशाकरितां सांगितला अथवा एकाच साच्याचे अनुभव निरनिराळ्या वेळीं, शब्दांच्या थोड्या अधिक फरकानें, कां सांगितले असें कोणाला वाटण्याचा संभव आहे; तर त्यासंबंधीं असें म्हणावेंसें वाटतें कीं त्यांनीं हीं पदें विवक्षित हेतूनें मुद्दाम रचलेलीं नसून तीं भजनानंदांत सहज झालीं व त्या त्या वेळच्या भावना व अनुभव हीं त्यांच्या द्वारें व्यक्त झालीं आणि ते एकाच अद्वैत स्थितीचा अखंड अनुभव घेत असल्यामुळें तोच अनुभव निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या शब्दांनीं व्यक्त झाला. ज्याप्रमाणें आपला रोजचा आहार साधारणपणें एकाच स्वरूपाचा असतो, पण त्याचा आपणास कंटाळा येत नाहीं, त्याप्रमाणें सिद्धांतबोधाचें अन्न व भजनप्रेमामृतपान हा जणूं श्रीपंतांचा आहारच होऊन बसला होता. त्यामुळें त्या अन्नाचा त्यांना कंटाळा येणें शक्य नव्हतें. त्यांनीं भजनरंगीं पूर्ण रंगून सेवन केलेल्या स्वानंदामृत–भोजनांतील उच्छिष्ट प्रसादच या पदांच्या रूपानें राहिला आहे. अथवा "लुटारे प्रेम लुटारे" असें म्हणून त्यांनीं भक्तांकडून बोधान्नाची व प्रेमामृताची जी लूट करविली त्यांतलि उरलेला हा अवशेष आहे किंवा असेंहि म्हणतां येईल कीं, सद्गुरुसेवेंत देह झिजवून अखेरपर्यंत त्यांनीं शिष्यप्रबोधनकार्यरूपी जो आत्मयज्ञ केला त्याचें हें यज्ञशिष्टामृत आहे. या पदांतील अर्थाला बिलगणाराला तीं अमृतत्व देतील असा भरंवसा वाटतो.

श्रीपंतांचीं पदें एकाच वेळीं रचलीं गेलेलीं नसून तीं जरी सुमारें बावीस तेवीस वर्षांच्या कालावधींत निरनिराळ्या वेळीं निर्माण होत होतीं तरी पहिल्या पदापासून अखेरच्या पदापर्यंतच्या सर्व पदांमधून उज्वल गुरुभक्ति, शुद्ध अद्वैत बोध, उत्कट गुरुप्रेम, कडकडीत वैराग्य, अंतरंगाचीं असंगता, दिव्य प्रबोधिनी शक्ति यांपैकीं निदान एक गुण तरी प्रगट झालेला आढळतोच. तेव्हां ज्या अंतःकरणांत या लहरी उठल्या तें किती प्रेमळ, उदार,

अनुभवपूर्ण, भक्तिरसानें थवथवलेलें व असंग असलें पाहिजे याची कांहींशी अटकळ बांधितां येते. "श्रीदत्तप्रेमलहरी" मधील पदांत एकसूत्रीपणा अथवा ज्या क्रमानें तीं छापलीं आहेत त्यांत सुसंबद्धता हीं दिसत नसलीं तरी एकाच हृदयाकाशांत चमकलेल्या तारकांचा तो पुंज आहे. अमावस्येच्या रात्रीं अंतरिक्षांत नजर फेकली असतां ज्याप्रमाणें स्वतेजानें चमकणारे स्वयंप्रकाश असे असंख्य तारे स्वतंत्रपणें चमकत असलेले दिसतात तरी ते सर्व मिळून आकाशाला अनुपम शोभा आणितात, त्याप्रमाणें श्रीपंतांचें प्रत्येक पद स्वयंप्रकाश म्हणजे अर्थपूर्ण व बोधप्रचुर असून त्या सर्वांनीं मिळून या पदसंग्रहाला अनुपम शोभा आणिली आहे. श्रीदत्तप्रेमलहरी ही खरी अद्वैतामृतवर्षिणी होय. कारण ती शुद्ध अद्वैत बोध व प्रेमामृत यांचा एकदम वर्षाव करिते. त्यांतल्यात्यांत या पदसंग्रहाच्या शेवटीं ज्या आरत्या दिल्या आहेत त्यांमध्यें तर अद्वैत बोधाचा भव्यपणा व गांभीर्य आणि शुद्ध प्रेमाचें मार्दव व सौंदर्य यांचा फार गोड मिलाफ झालेला आढळतो. याचें एक कारण असें दिसतें कीं पदें हीं भजनाचे वेळीं झालेलीं असून आरत्या या भजनाच्या अखेर झालेल्या आहेत. त्यामुळें दर दिवशीं भजनांत जो प्रेमरंग भरत असे त्याचा परिपाक अथवा त्याचें पर्यावसान आरतींत होत असे आणि म्हणून प्रत्येक आरतीमध्यें त्या त्या दिवसाच्या भजनप्रेमाची परिपक्वदशा उमटलेली आहे व कांहीं आरत्यांमध्यें तर "मौनेंचि आरती ओवाळूं दत्ता" (द. प्रे. ल. २६३३) म्हणजे शब्द स्वगृहीं म्हणजे मौनमंदिरीं आराम घेण्यास जाईपर्यंत मजल गेलेली आढळते. तसेंच या पदसंग्रहाच्या अखेर जीं अष्टकें व धावे हीं दिलीं आहेत त्यांच्यांतहि भक्तिप्रेमाचा जिव्हाळा व शुद्ध बोध यांचा मिलाफ झालेला आहे.

## श्रीपंतांचीं कानडी पदें

श्रीपंतांचीं मराठी भाषेंत जीं पदें आहेत त्यांचेसंबंधीं येथपर्यंत विवेचन केलें आहे. पण कानडी भाषेंतहि त्यांचीं कांहीं पदें आहेत व तीं 'श्रीदत्तप्रेमलहरी' पुष्पमालेंतील ६ व्या पुष्पाच्या अखेर मराठी बालबोध लिपींत छापिलीं आहेत. श्रीपंत बेळगावचे राहाणारे होते व त्यांच्या शिष्यवर्गांत लिंगायत व कानडी बोलणारे इतर लोकहि बरेच होते. त्यामुळें कधीं कधीं भजनांत ते कानडींत पदें म्हणत असत व कोणीतरी तीं टिपून ठेवी. अशीं पदें २७ असून एक आरती आहे. भाषा मराठी असली अगर कानडी असली तरी एकच अंतःकरण दोन्हीहि भाषांतील पदांत व्यक्त झालें आहे; त्यामुळें हीं कानडी पदेंहि मराठी पदांप्रमाणेंच भक्तिरसप्रधान व रसाळ आहेत हें सांगणें नकोच.

## चिकित्सक दृष्टीला दिसणारे पदांमधील किरकोळ दोष

श्रीपंतांचीं पदें भजनरंगांत म्हटलेलीं असल्यामुळें कांहीं पदांच्या रचनेंत बांधेसूदपणा फारसा आढळत नाहीं व क्वचित ठिकाणीं व्याकरण—दृष्ट्याहि दोष आढळतात. पण सहजस्फूर्त काव्यामध्यें अशा प्रकारचे कांहीं दोष अपरिहार्यच असतात. त्याचप्रमाणें

सव पदांत सारखेच चरण आहेत असें नाहीं. सर्वसाधारणपणें प्रत्येक पदाचे ( एक ध्रुपदाचा व इतर तीन ) चार चरण आहेत व अनुभवपर पदांत चार चरणांच्या पदांचा भरणा फार मोठा आहे. पण भावनाप्रधान व विशेषतः करुणापर पदांत आणि धाव्यांत चरणांची संख्या बावीसपर्यंतहि गेली आहे. कांहीं पदांत तीनच चरण आहेत तर कांहींत पाच अगर सहाहि आहेत. पद म्हणतांना भावनेचा उचाट जितका अधिक होता तितकें तिचें व्यक्त स्वरूप म्हणजे पदहि मोठें झालेलें आढळतें.

## संतवाणीबद्दल धन्योद्गार

येथपर्यंत श्रीपंतांच्या रसवंतीचें यथामति वर्णन केलें खरें; पण वाचकांना असा इषारा द्यावासा वाटतो कीं या पदांचें शब्दांनीं कितीहि वर्णन केलें तरी त्यांच्यांतलि मोहकपणा व श्रोत्यांचें देहभान हरपून त्यांना निजरंगीं रंगण्यास लावणारी अद्‌भुत जादू हीं शब्दाच्या आटोक्याबाहेरचीं आहेत. निजरंगीं रंगून जाऊन व श्रोत्यांना रंजवून वेदशास्त्रांचें गूढ रहस्य प्रेमरसावगुंठित करून परम कारुण्यानें त्यांच्या गळीं उतरविणारे संत हे मनुष्यजातीच्या कल्याणाकरितांच अवतीर्ण होतात ! त्यांचें कितीहि वर्णन केलें तरी त्यांचा कंठ व त्या कंठांतून स्फुरणारी मधुर व मृदु अमृत वाणी यांचें वर्णन कसें करणार ! अंतःकरणांत भक्तिप्रेमाचा जिव्हाळा असल्याशिवाय श्रीपंतांच्या पदांतील अनुपम गोडी चाखतां येणार नाहीं. स्वतः भजनरंगीं रंगून ती गोडी चाखणें उत्तमच. पण तें साधण्यासारखें नसलें तर निदान भक्तिप्रेमानें तल्लीन होऊन हीं पदें म्हणणाराच्या प्रेमळ कंठांतून निघालेलीं तरी ऐकावीं म्हणजे तीं श्रवणसुख देऊन चित्ताला आनंद देतील. कारण वाग्देवीचा प्रसाद हा कानांनींच सेवन करण्यांत औचित्य विशेष आहे. वाणींतून निघालेलें गान कागदावर लिहून नेत्रांनीं वाचल्यास तें श्रवणद्वारें सेवन करण्याचें सुख कधींहि मिळत नाहीं. संतवाणी ही कर्णांतून अंतःकरणांत शिरून प्रसादरूपानें नेत्रीं प्रगट व्हावी लागते. भवतापानें तप्त झालेल्या असंख्य जीवांना आपल्या अंगच्या मार्दवानें, लालित्यानें व मोहकपणानें आपलेसे करून त्यांचेवर करुणामृताचा वर्षाव करणाऱ्या अथवा त्यांना प्रेमसागरांत बुडविणाऱ्या संतवाणीचे धन्यवाद गावे तेवढे थोडेच होत !

तत्वज्ञ व साक्षात्कारी कवि जे श्रीपंत त्यांनीं भजनरंगांत सहज स्फूर्तीनें म्हटलेल्या पदांत स्वानुभव--सिद्धांत सहज लीलेनें गोवून दिले खरे; पण शिष्यांच्या शंकाकुशंकांचें व संशयांचें छेदन करून अद्वैत सिद्धांत प्रस्थापित करण्याकरितां त्यांना गद्याचा ( बोधखड्गाचा ) अवलंब करावा लागत असे. त्यांनीं लिहिलेले लेख वगळले असतां हें कार्य मुख्यत्वेंकरून त्यांच्या वाणीच्या द्वारेंच होत असे व तें अखेरपर्यंत अव्याहत चालूच होतें. तेव्हां काव्यानंदाचें हें रम्य उद्यान सोडून श्रीपंतांच्या बोधवृष्टीनें फुरफुरलेल्या अशा निसर्गरमणीय व भव्य वनप्रदेशांत म्हणजे पुष्प ७ व ८ मधील त्यांच्या "बोलांत" काय काय मौजा दिसतात त्या आतां पाहूं.

---

# प्रकरण ४७ वें

—————:०:—————

## श्रीपंतांचे बोल व त्यांची वक्तृत्वशैली

प्रकरण २६ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें १८८६ च्या सुमारास श्रीपंतांचा लेखन-व्यवसाय सुटल्यापासून, भजनाच्या वेळीं म्हटलेलीं पदें व भक्तांना लिहिलेलीं पत्रें वगळलीं असतां, त्यांचा बोध सहज बोलण्याच्या ओघांत अथवा संभाषणप्रसंगीं अधिकाधिक व्यक्त होऊं लागला. त्यामुळें बोधश्रवणार्थ येणाऱ्या शिष्यांची व भक्तांची त्यांच्या भोवतालीं दिवसेंदिवस अधिकाधिक गर्दी जमूं लागली आणि त्यांचा फुरसुदीचा वेळ अशा मंडळींला बोध करण्यांत जाऊं लागला. असा फुरसुदीचा वेळ म्हणजे रोज संध्याकाळीं पाच वाजतां शाळेंतील काम आटोपून ते घरीं आले म्हणजे काय तास दोन तास मिळत तो होय. तो वेळ इतरांना सोईस्कर असल्यामुळें त्यांचे शिष्य नसलेलेहि कित्येक जिज्ञासु त्यांचा बोध श्रवण करण्यास येत असत व अशा वेळीं मोकळेपणा असल्यामुळें व विशेषतः श्रोतृमंडळी बरीच जमत असल्यामुळें श्रीपंतांच्या बोलण्याच्या ओघांत विषयहि गहन व गंभीर स्वरूपाचे निघत आणि ते त्यांची तात्विक दृष्टया फोड करीत असत. श्रीपंतांच्या कार्यक्रमांपैकीं हा संध्याकाळचा कार्यक्रम जवळ जवळ ठरल्यासारखाच झाला होता व विशेषेंकरून १८९८ च्या जून महिन्यांत ते देशपांडे गल्लींतील सुंठणकराच्या वाड्यांत राहावयास गेल्यापासून या कार्यक्रमाला विशेष चालना मिळाली. कारण मागें वर्णन केल्याप्रमाणें त्या वाड्यांत जागा विपुल होती. संध्याकाळीं शाळेंतून परत आल्यावर चहा वगैरे घेऊन श्रीपंत माडीवरील पूर्व बाजूच्या सोप्यांत ठेविलेल्या कोचावर बसत व मग बोध सुरू होत असे. त्या कोचासमोर सुमारें ५०—६० इसम बसतील इतकी जागा होती व सोप्याच्या आजूबाजूला उभें राहून बोध श्रवण करण्यालाहि बरीच जागा होती. त्यामुळें श्रीपंतांचा बोध श्रवण करण्यास श्रोत्यांची गर्दी जमत असे. श्रीपंतांनीं सद्गुरु या भूमिकेवरून जें शिष्यप्रबोधनकार्य केलें त्यासंबंधीं प्रकरण ४५ मध्यें वर्णन केलें आहे व ते शिष्याला प्रेमबोध करीत असत असेंहि सांगितलें आहे; पण या प्रकरणांत त्यांनीं व्याख्यानद्वारां जो बोध केला त्यासंबंधीं विवेचन करीत आहोंत. प्रेमबोध व सिद्धांतबोध यांच्यामध्यें असा फरक आहे कीं प्रेमबोध म्हणजे सद्गुरु व सच्छिष्य यांच्यामधील ऐक्यप्रेमाचा बोध अथवा अनुभव होय. या बोधाला शब्दाची जरूरी आहेच असें नाहीं. कारण तो निःशब्दानुभवच होय. पण या प्रकरणांत श्रीपंतांच्या ज्या बोधाचें वर्णन केलें आहे तो बोध म्हणजे सिद्धांतप्रतिपादन अथवा तत्वविवेचन होय. अशा बोधाला मेघोपदेश म्हणतां येईल, कारण ज्याप्रमाणें मेघ हे पात्रापात्र न पाहातां पर्जन्यवृष्टि करितात त्याप्रमाणें, कांहीं अपवाद वगळले असतां, श्रीपंतांची ही बोधवृष्टि होत असे व श्रोत्यांपैकीं प्रत्येक जण आपल्या अधिकाराप्रमाणें तो ग्रहण करीत असे.

## बोल उपलब्ध कसे झाले

१८९९ सालीं असा प्रकार सुरू झाला कीं, श्रीपंतांचा बोध श्रवण करण्यास येणारांपैकीं करवारकडील एक तरुण गृहस्थ, म्हणजे प्रकरण ३६ मध्यें ज्यांचा उल्लेख केला आहे ते, दत्तात्रय व्यंकटेश नागरकट्टी, यांनीं स्वयंस्फूर्तीनें आपल्या स्वतःकरितां म्हणून श्रीपंतांच्या तोंडून निघणाऱ्या बोधांचीं थोडक्यांत टाचणें करून घेण्यास सुरवात केली. ते मुंबई विश्वविद्यालयाचे पदवीधर असून बेळगाव येथें कलेक्टर कचेरींत नोकरीवर होते. त्यांची मातृभाषा कानडी होती व शिक्षणहि कानडींतूनच झालेलें होतें. त्यांना मराठीचेंहि थोडें ज्ञान होतें व अध्यात्मविषयाची फार आवड असल्यामुळें त्यांचा मराठी भाषेंतील संतवाङ्मयाशीं बराच परिचय झाला होता. त्यामुळें श्रीपंतांचा बोध चालू असतांना त्याचीं बालबोध लिपींत ते टाचणें घेऊं लागले व घरीं परत गेल्यावर त्याच दिवशीं रात्रीं अगर दुसरे दिवशीं सकाळीं त्या टाचणांवरून श्रीपंतांचें विस्तृत व्याख्यान बालबोधींत लिहून ठेवूं लागले. अशा रीतीनें कित्येक वेळां श्रीपंत प्रतिपादित असलेला विषय गहन असून व पारिभाषिक शब्द योजून भारदस्त भाषेंत त्यांनीं शास्त्राला धरून विषयप्रतिपादन केलेलें असूनहि, दोन दोन तीन तीन तास अव्याहत चाललेलीं श्रीपंतांचीं विस्तृत व्याख्यानें, महत्वाचा मुद्दा अगर शब्द फारसा न गाळतां, नागरकट्टींनीं बालबोध लिपींत लिहून काढिलीं. हा प्रकार सुमारें तीन वर्षें चालला होता व त्या दरम्यान चार पाच मोठमोठ्या वह्या भरतील इतका मजकूर त्यांनीं लिहून ठेविला. हा मजकूर व्याकरणदृष्ट्या फारसा शुद्ध नव्हता व कांहीं वाक्यें तुटक व अपुरीं होतीं.

जेव्हां श्रीपंतांच्या पश्चात् १९२६ सालीं श्रीपंतबंधूंनीं श्रीपंतांचें वाङ्मय प्रसिद्ध करण्यास सुरवात केली तेव्हां नागरकट्टींनीं लिहून ठेविलेलीं श्रीपंतांचीं हीं व्याख्यानेंहि छापून प्रसिद्ध करण्याचें त्यांनीं ठरविलें. पण तीं छापण्यापूर्वीं त्यांच्यांत व्याकरणदृष्ट्या व इतर जे कांहीं दोष होते ते काढून टाकून व त्यांचे सुटसुटित भाग पाडून छापण्याला योग्य असें त्यांना स्वरूप द्यावें लागलें. तेव्हां दत्तोपंत नागरकट्टींना पत्र लिहून हीं टाचणें त्यांनीं कां, केव्हां व कशी केलीं यासंबंधींची माहिती मागितली असतां त्यांनीं इंग्रजींत पत्र लिहून ती आपलेपणानें दिली. त्यांच्या त्या पत्रांतील मजकूर मराठींत वाचकांपुढें ठेविला असतां श्रीदत्तप्रेमलहरी पुष्प ७ व ८ मध्यें ५५० पानांचा जो मजकूर "श्रीपंतांचे बोल" अथवा त्यांचा बोध म्हणून प्रसिद्ध झाला आहे त्याचेसंबंधीं वाचकांना यथार्थ कल्पना होईल. त्या पत्रांतील आशय पुढीलप्रमाणें आहे. "माझी नुकतीच बी. ए. ची परीक्षा पास झाली होती व मी श्रीपंतांचा अमृत बोध ऐकण्यास जात असें. श्रीपंतांचा बोध साधारणपणें ते शाळेंतून आल्यानंतर, म्हणजे सायंकाळीं ५ ते ७ च्या दरम्यान, चालत असे. ते वेळीं त्यांचा बोध श्रवण करण्यास त्यांचे घरीं पुष्कळ गर्दी जमत असे. मी नुकताच कॉलेजांतून बाहेर पडलों असल्यामुळें श्रीपंतांचा हा अमृत बोध ऐकून परमार्थासंबंधीं माझे मनावर विलक्षण परिणाम झाला; तो इतका कीं 'हा अमूल्य बोध पुनः ऐकण्यास मिळणें कठीण' असें वाटून आपण ( स्वतःकरितां )

या बोलांचें टाचण करून ठेवावें असें मला वाटूं लागलें व त्याप्रमाणें श्रींचा बोध श्रवणः करून, घरीं गेल्यावर, तेच रात्रीं अगर दुसरे दिवशीं सकाळीं, नुकत्याच ऐकिलेल्याः बोधाचें शक्य तितकें श्रीपंतांच्याच शब्दांत मी टाचण करून ठेवूं लागलों. माझी मातृ-भाषा कानडी व माझें शिक्षणहि कानडींतून झालेलें; त्यामुळें मराठी भाषेशीं माझा परि-चय बेताचाच होता. त्यांतून श्रीपंतांसारख्या भाषाकोविदाच्या मुखांतून त्यांच्या भारदस्त व ओजस्वी वाणीनें अस्खलित व्याख्यानद्वारां जो बोधवर्षाव अविरतपणें चालत असे तो आठवणींत ठेवून कांहीं वेळानें लिहून काढणें हें दुरापास्तच होतें. तरी पण श्रीपंतांचे बोल शक्य तितके त्यांच्याच शब्दांत माझ्या मराठी भाषेंत लिहून ठेवण्याचा मी उपक्रम सुरू केला. ही गोष्ट मी बेळगावीं असतांनाच शक्य होत असे. प्रथम प्रथम मी हें जें टिपण करून ठेवीत होतों त्याची कोणास फारशी दादहि नव्हती. माझ्या स्वतःकरितांच मीं हें टाचण करून ठेविलें असल्यामुळें मी त्यासंबंधीं कोणापाशींहि बोललों नव्हतों. परंतु सुमारें दोन वह्या भरतील इतका मजकूर लिहून झाल्यानंतर एके दिवशीं मी एकटाच श्रीपंतांचे जवळ बसलेला असतां त्यांनीं आपण होऊन म्हटलें " तूं काय लिहून ठेविलें आहेस तें आण पाहूं. " लगेच मी ज्या दोन वह्या लिहून ठेविल्या होत्या त्या श्रींचे स्वाधीन केल्याः व तेव्हांपासून त्या श्रींचेच घरीं पडून आहेत. बेळगावीं असतांना माझा वरील उपक्रम चालूच होता व आणखीहि बोल मी टिपून ठेविले होते. हा उपक्रम अदमासें १८९९, १९०० व १९०१ या तीन सालांतच चालू होता. त्यानंतर पुनः माझी बदली बेळगावास झाल्यावर पूर्वीप्रमाणें श्रींच्या बोलांचें टाचण करण्याचा मी प्रयत्न केला; पण तें काम माझ्याकडून झालें नाहीं व तें मला साधेनासें झालें. वरीलप्रमाणें मीं जीं टाचणें करून ठेविलीं त्यांपैकीं दोन वह्या मी वर लिहिल्याप्रमाणें श्रीपंतांच्या स्वाधीन केल्या होत्या व बाकीचीं टाचणें श्रीपंतांचे पश्चात पंतबंधु नरसिंहरावजींचे स्वाधीन केलीं. त्यानंतर त्या टाचणांसंबंधीं मी कधींहि चौकशी केली नाहीं. "

नागरकट्टींचें वरील पत्र आल्यावर श्रीपंतांच्या बोधाचीं हीं टिपणें तपासून व त्यांचे सोईस्कर असे गट पाडून त्या गटांना " पराग " हें नाव देण्यांत आलें व श्रीपंतांचे हे बोल १९३१ व १९३२ सालीं अनुक्रमें श्रीदत्तप्रेमलहरी पुष्प ७ व ८ या दोन पुस्तकांच्या रूपानें प्रसिद्ध झाले. या दोन पुस्तकांत १८९९, १९०० व १९०१ या तीन सालांत नागरकट्टींना श्रीपंतांच्या रोज चाललेल्या बोधापैकीं जेवढा मजकूर टिपून ठेवितां आला तेवढाच फक्त प्रसिद्ध झाला आहे. त्याखेरीज श्रीपंतांनीं त्या तीन वर्षांत किती बोधवर्षाव केला असेल तें सांगणें शक्य नाहीं. नागरकट्टींच्या पत्रांतील वरील मजकुरावरून असें दिसतें कीं, १९०१ नंतर बेळगावास त्यांची पुनः बदली झाल्यावर त्यांनीं श्रीपंतांच्या बोधाचीं पूर्वीप्रमाणें टाचणें करण्याचा प्रयत्न करून पाहिला; पण त्यांना तो साधला नाहीं. असो. नागरकट्टींनीं टिपून ठेविलेले श्रीपंतांचे जे 'बोल' पुष्प ७ व ८ मध्यें प्रसिद्ध झाले आहेत त्यांच्या अंतःस्वरूपासंबंधीं येथें चार शब्द लिहीत आहोंत.

श्रीपंतांचा अनुभवावर फार भर असल्यामुळें त्यांचें बोलणें नेहमीं अनुभवाला धरून असे व बोलण्याच्या ओघांत त्यांचा अनुभव अथवा त्यांचें अंतःकरणच उतरत असे. अंतःकरणाची स्थिति बाजूला ठेवून नुसतें नाटकी पद्धतीनें व्याख्यान झोडणें हें त्यांच्या मनोरचनेच्या विरुद्ध होतें. एकदां बेळगावांत थिऑसॉफिकल सोसायटीच्या सभासदांची सभा भरावयाची होती व त्या सभेंत वेदांत या विषयावर चर्चा व्हावयाची होती. तेव्हां तेथें त्या चर्चेंत भाग घेण्याकरितां श्रीपंतांना बोलावण्यांत आलें होतें, पण ते गेले नाहींत. या प्रसंगासंबंधीं ते म्हणतात "Once I was invited by the Captain to deliver a lecture on Some Vedant Subject, opening it for discussion in the Theosophical Meeting. I said 'No, I am not a lecturer, nor Vedant a matter or subject for discussion with me. It is a thing settled once for all that God's glory and love are immeasureable and limitless. If the Captain wants, I can talk to him a few words at his leisure, but cannot come there for delivering a lecture.'" (एकदां थिऑसॅफिकल सोसायटीच्या सभेंत वेदान्तासंबंधींच्या एका विषयावर व्याख्यान देऊन चर्चेला सुरवात करून देण्याकरितां मला कॅप्टनचें बोलावणें आलें. तेव्हां मी म्हटलें कीं, "मी येणार नाहीं; कारण मीं व्याख्याता नाहीं व माझ्या मतें वादविवाद करण्यासारखा वेदांत हा विषयहि नाहीं. ईश्वराचें ऐश्वर्य व प्रेम हीं अनंत व अमर्याद आहेत ही गोष्ट एकदां निश्चित झालेली आहे. कॅप्टनची जर तशी इच्छा असेल तर त्याच्या सवडीप्रमाणें मी त्याच्याशीं चार शब्द बोलेन; पण व्याख्यान देण्याकरितां मला तेथें येतां येत नाहीं.") (पु. ८-१५५-१५६)

श्रीपंतांचें अंतःकरण नेहमीं खुलें, उदार व प्रेमळ असे. त्यामुळें त्यांच्या बोधांत अकृत्रिमपणा व सहजता हे गुण प्रामुख्यानें आढळतात. दुसरें असें कीं, श्रीपंतांचा हा बोध त्यांचे घरीं त्यांचे शिष्य अगर तेथें येणारे इतर जिज्ञासु यांचे समोर व त्यांना उद्देशून चालत असे. त्यामुळें सार्वजनिक सभेंत ज्याप्रमाणें एखादा वक्ता एखाद्या विषयाचें उभारत स्वरूपाचें प्रतिपादन करितो तसें श्रीपंतांचें होत नसे. कारण प्रथम त्यांच्या भाषणाला सुरवात जी होई ती कांहीं तरी प्रसंगामुळें अथवा आयत्या वेळीं घडलेल्या एखाद्या गोष्टीमुळें किंवा श्रोत्यांपैकीं एखाद्यानें एखादा प्रश्न विचारल्यामुळें होत असे व असें कांहीं तरी कारण घडून एकदां श्रीपंतांची बोलण्याला सुरवात झाली म्हणजे विषयाच्या महत्वाच्या मानानें तो ओघ चालू राही. कित्येक वेळां एकाच दिवशीं दोन चार विषयहि त्यांच्या बोलण्यांत येत व एखादा गमतीचा विषय निघाला म्हणजे हास्य-विनोदहि चालत असे. त्यामुळें त्यांच्या बोलण्यामध्यें विषयांची विविधता फार आढळते;

आणि एकदां ते एखाद्या गहन विषयाचें प्रतिपादन करितांना आढळतात तर लगेच अकोळकर अण्णांसारख्या एखाद्या अत्यंत प्रीतींतील शिष्याबरोबर थट्टामस्करी करितांना दिसतात. त्याचप्रमाणें एखादा कठिण विषय समजावून देतांना ते एखादी विनोदी गोष्टहि सांगत. उदाहरणार्थ पुष्प ७ पराग २ मधील देवपूजेचें वर्णन करितांना आपली देवपूजा म्हणजे काय प्रकार होतो याचें त्यांनीं फार गमतीचें व खऱ्या वस्तुस्थितीचें निदर्शक असें वर्णन केलें आहे व पुष्प ८ मधील पराग ७७ मध्यें "अनिर्वचनीय वस्तु म्हणजेच सद्‌गुरु" या गहन व गंभीर विषयाचें प्रतिपादन करितांना त्यांनीं एका भोळ्या लक्षाधीशाची गमतीदार गोष्ट सांगितली आहे. त्यामुळें वाचणाराला बोलांचें वाचन कंटाळवाणें न होतां त्याचे ठिकाणीं अधिकाधिक गोडी वाटूं लागते.

## बोलांत वारंवार आलेले विषय

श्रीपंतांच्या बोलांत जे विषय वारंवार आलेले आढळतात त्यांचें साधारणपणें पुढीलप्रमाणें वर्गीकरण करितां येईल. (१) मनचांचल्य व तें नष्ट करण्याचे उपाय, (२) मरणाची भीति कां वाटते? व ती कशी नाहींशी करितां येते? (३) सद्‌गुरूचें स्वरूप, (४) सद्‌गुरुभक्ति, (५) गुरुप्रेम, (६) अवधूत संप्रदाय व त्याचें महत्व, (७) तत्वबोध व गूढार्थविवरण, (८) गुरुवचन व गुरु-आज्ञा यांचें महत्व, (९) दंभावर व अंधअनुकरणावर झोड, (१०) शब्दज्ञानाचा फोलपणा व अनुभवाचें महत्व, (११) तारक योगांतील षट्‌चक्रभेद व नादबिंदुकलात्मक अनुभव, (१२) प्रपंच व परमार्थ यांचेमधील संबंध, (१३) अस्ताव्यस्त वागणाऱ्या गुरुपुत्रांवर ताशेरे, (१४) नीतीनें वागण्यावर कटाक्ष वगैरे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे श्रीदत्तप्रेमलहरीमधील पदांमध्यें साधारणपणें जे विषय आलेले आहेत तेच त्यांच्या या बोलांमध्यें वारंवार आलेले आहेत. कारण बोल व पदें यांच्यांत एका अध्यात्मविषयाचेंच प्रतिपादन झालेलें असल्यामुळें त्यांच्यांतील विषयांमध्येंहि पुष्कळ साम्य आहे आणि तसें होणेंहि स्वाभाविकच होतें. कारण दोन्ही ठिकाणीं एकच अंतःकरण प्रगट झालें आहे. पण दोन्ही ठिकाणच्या विषय मांडण्याच्या पद्धतींत मात्र फरक आढळून येतो. कारण मागील प्रकरणांत दर्शविल्याप्रमाणें श्रीपंतांच्या पदांत सोलीव स्वानुभव सिद्धांत सोप्या भाषेंत सूत्रवत सांगितले आहेत तर बोलांमध्यें साधक बाधक प्रमाणें देऊन तर्कशुद्ध व मार्मिक विवेचन पद्धतीनें तेच सिद्धांत विशद करून शिष्यांना पटवून दिले आहेत. "मनचि कारण बंधमोक्षा। आम्नाय या देती साक्षा" (द. प्रे. ल. ४४९); "मनकल्पित बंध मुक्ति। मनाभावीं पूर्ण शांति"; "मन प्रसन्न मुक्ति बापा। नुरवी पुण्य पापा" (द. प्रे. ल. ५६३) श्रीपंतांच्या पदांत गोविलेल्या या सूत्रवत सिद्धांतवचनांचें स्पष्टीकरण बोलांत फार विस्तारपूर्वक केलेलें आहे. उदाहरणार्थ, पराग ४,६३,७८,८०,९४,९७ वगैरेंमध्यें या सिद्धांताचे सांगोपांग विवरण केलेलें आहे. "जन्मलें निमलें कल्पना व्यर्थ आहे तैसें पाहीं" (द. प्रे. ल. १०१५); "जन्मचि नाहीं मृत्यु कैंचा" (द. प्रे. ल. ६१२;

७०२ ); " खोटी मरणाची भीति " (द. प्रे. ल. २१०५) या सिद्धांताचें ५,३०,१०५ वगैरे परागांत विस्तृत विवेचन झालें आहे. सद्गुरुभक्ति हा विषय, तिचे दास्य, सख्य, वात्सल्य, मधुर वगैरे प्रकार व नवविधा भक्तीपैकीं अखेरची आत्मनिवेदन भक्ति, अथवा श्रीमद्भगवद्गीता अध्याय ७ श्लोक १६ मध्यें वर्णिलेली चौथी किंवा ज्ञानी भक्ताची अद्वैत भक्ति यांचें वर्णन जसें श्रीपंतांच्या पदांत वारंवार आलें आहे तसेंच तें बोलांतहि पराग १२,३४,४५,४६,५०,५७,८०,८१,८२,९२,९८,९९,१०५, व १०८ मध्यें व इतर पुष्कळ ठिकाणीं आलें आहे. त्याचप्रमाणें गुरुप्रेम ( पराग ६,११४ वगैरे ), शुद्ध अद्वैत ज्ञान, जगच्चिद्विलास हा स्वानुभव सिद्धांत ( पराग ८,२४,३१,३४,८८,१०८ ) वगैरे विषयहि बोलांत वारंवार आलेले असून श्रीपंतांनीं त्यांचें फार मार्मिकपणें विवरण केलें आहे. उदाहरणार्थ, पुष्प ८ पराग ८८ मध्यें मुण्डकोपनिषत् व ध्यानाबिंदूपनिषत् या उपनिषदांतील " तस्मिन्दृष्टे परावरे " या वचनावर श्रीपंतांचें जें विस्तृत व्याख्यान झालें आहे तें बहारीचें व गूढ विषय गळीं उतरविणारें झालें आहे. त्याचप्रमाणें पुष्प ७ पराग ३४ मध्यें " पूर्णात्पूर्ण उदच्यते पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते " हा उपनिषदांतील पूर्णाद्वैत सिद्धांत व पराग २४ मध्यें " ज्ञानादेवतु कैवल्यम् " हा सिद्धांत त्यांनीं फार खुबीनें व अधिकारयुक्त वाणीनें विशद करून दाखविला आहे. तसेंच पुष्प ८ पराग १११ मध्यें " आपल्या देहांत कृष्णजयंतीउत्सव कसा चालतो व कृष्णचरित्र कसें चालतें तें पाहून शांत हो " असें एका शिष्याला सांगून श्रीपंतांनीं आत्मा म्हणजे कृष्ण, परा भक्ति हीच राधा, विरति ही यशोदा, सद्विवेक हा वसुदेव, सद्गुरुबोधानें भक्तहृदयीं प्रेमरूपानें प्रगट होणें म्हणजेच कृष्णजन्म वगैरे सांगून एका विस्तृत रूपकाच्या द्वारें आपल्या देहांत कृष्णचरित्रच चाललें असल्याचें दाखविलें आहे. तसेंच त्यांनीं या बोलांत अवधूत मार्गाचें महत्व वारंवार गाइलें आहे व प्रपंच करून परमार्थ कसा साधावा यासंबंधींहि मधुन मधुन विवेचन केलें आहे.

## श्रीपंतांचीं पदें व बोल यांचेमधील संबंध

श्रीपंतांचे हे बोल म्हणजे त्यांच्या अनुभवपर व सिद्धांतपर पदांवरील यथार्थ दीपिकाच होय व गहन विषय सुलभ रीतीनें जिज्ञासूंना पटवून देण्याची त्यांची बोधशैली अप्रतिम असल्यामुळें त्यांची ही दीपिका त्यांच्या कित्येक पदांतील गूढार्थावर प्रकाश पाडणारी असून त्यांचें विवेचनहि मार्मिक, मुद्देसूद व भारदस्त झालें आहे. श्रीपंतांचीं पदें व बोल यांचे मधील विषय साधारणपणें जरी एकाच स्वरूपाचे असले तरी त्यांच्यांत एक असा फरक दिसून येतो कीं, त्यांच्या पदांपैकीं जवळ जवळ तीन चतुर्थांश पदें भजनरंगांत तन्मयतेच्या स्थितींत झालेलीं असल्यामुळें त्यांच्यांत तो निजरंगच प्रामुख्यानें व्यक्त झाला आहे व अभेदबोध व ऐक्यभक्ति यांचें वारंवार वर्णन आलेलें आहे आणि त्या मानानें उपदेशपर व बोधपर पदें पुष्कळच कमी आहेत. कारण पुष्कळ पदांमध्यें श्रीपंतांची दृष्टि सद्गुरूकडे वेधलेली आढळते, तर कित्येक पदांत ती अंतर्मुख झालेली दिसते. अथवा,

प्रकरण ४४ मध्यें दाखविल्याप्रमाणें, श्रीपंत सद्गुरूचे सेवक, सद्गुरुमातेचें बाळक अगर अन्य भूमिका घेतलेले आढळतात किंवा अद्वैतसागरांत स्वात्मानंदीं निमग्न होऊन पोहत असलेले दिसतात. पण त्यांच्या बोलांत व्यक्त झालेला बोध मात्र शिष्यांकरितांच प्रगट होत असे. त्यामुळें बोलांमध्यें अथपासून इतिपर्यंत त्यांची तत्वज्ञ ही भूमिका अढळ असलेली दिसून येते व ते शिष्यसंशयवन-छेदक बोधखड्गाचा अत्यंत सफाईनें उपयोग करितांना दिसतात. त्यांच्या पदांत मधुन मधुन शिष्यांना बोध केलेला आढळतो खरा पण तो कांहीं विशेष प्रसंगानें मोजक्या शब्दांत केलेला आहे. श्रीपंतांच्या बोलांत मात्र बोधावरच विशेष भर असलेला दिसतो व याचें कारणहि उघडच आहे. बोल हे तत्व-बोध करण्याकरितांच बाहेर पडले व बोलांच्या रूपानें व्यक्त झालेला बोध सडेतोड व क्वचित्प्रसंगीं अत्यंत निर्भीडपणें केलेला आहे. तत्वबोध उघड करण्यासबंधीं श्रीपंतांनीं पु. ७ पराग ३४ मध्यें पुढील उद्गार काढले आहेत " तत्वबोध उघड करणें हें मोठें धैर्याचें काम आहे. गांड्र लोकांच्या हातून तें होणें नाहीं. अवधूत–बोध स्वच्छ, सरळ, न लप-वितां सांगणारे पुरुषसिंह स्वतः अनुभवानें आरूढ, कूटस्थ व पर्वतशिखरवत् अचल असतात. तीक्ष्ण आत्मानुभव त्यांच्या अंगीं मुरलेला असतो. म्हणून त्यांचें धैर्य विलक्षण असतें. ज्यांच्यापुढें हरिहरब्रह्मांची किंमत नाहीं, ज्यांस असाध्य कोणतेंच नाहीं असे ते शक्तीचे पुतळे व धैर्याचे डोंगर असल्याकारणानें धर्माचीं खरीं तत्वें उघड करण्यास ते भीत नाहींत. त्यांनीं लोकांची पर्वा बाळगिली नाहीं. कित्येक परधर्मी राजांनीं हिंदुधर्म बुडवून आपला धर्म वाढविण्याचे आटोकाट प्रयत्न केले. पण अशा वेळीं त्यांचा सर्व छळ साहून व पीडा सोसूनहि त्या पुरुषसिंहांनीं खरीं धर्मतत्वें प्रगट करण्याचे कामीं मागें पाऊल घेतलें नाहीं. असे जे ज्ञानदेव, तुकाराम, रामदास, एकनाथ, रंगनाथ इत्यादि धर्मशूर महात्मे होऊन गेले त्यांचे आभार आम्हीं किती मानले पाहिजेत ? "

श्रीपंतांच्या पदांप्रमाणें त्यांच्या बोलांतहि अद्वैतज्ञानाचा भव्यपणा व गांभीर्य आणि अभेदभक्तीचें मार्दव व सौंदर्य यांचा गोड मिलाफ झालेला दिसतो. पण त्यांतल्यात्यांत बोलांत बोधाला विशेष प्राधान्य असल्यामुळें त्यांच्यांतील भव्य व गंभीर विचारसरणीनें सामान्य वाचक दिपून जातो व त्याला आपल्या ठिकाणचे दोष दिसूं लागून आपल्या क्षुद्रत्वाची जाणीव उत्पन्न होते. तर पदांमध्य भक्तिप्रेमरसाला प्राधान्य असल्यामुळें त्याच्या जिव्हाळ्यानें ऐकणाराचें हृदय हलूं लागून त्याचा मीपणा विरघळूं लागतो. शुद्ध पूर्णाद्वैत बोध व अभेदभक्ति हीं एकाच निरंग वस्तूचीं दोन अंगें होत. ज्याप्रमाणें एकच सद्वस्तु शिवशक्तिरूपानें चिद्विलास खेळ खेळते त्याचप्रमाणें अद्वैत बोध व अभेदभक्ति हीं एकमे-कांपासून वस्तुतः अभिन्न असून निरनिराळ्या गुणधर्मांवरून तीं निरनिराळीं नावें कल्पिलेलीं आहेत. नुसतें ज्ञान भक्तिरसाच्या अभावीं कोरडें आहे. त्याचप्रमाणें भक्तिमाउली प्रेमळ खरी, पण शुद्ध ज्ञानाचा डोळा नसेल तर, ती अंध बनते. त्यामुळें अद्वैत ज्ञान व अभेद भक्ति यांचा हृदयंगम मिलाफ होणें हेंच श्रुतिशास्त्रांचें रहस्य होय. तें श्रीपंतांनीं श्रीदत्तप्रेमलहरींतील पदें व पुष्प ७ व ८ मधील बोल यांचेमध्ये आपल्या अधिकारयुक्त

वाणीनें उघड करून दाखविलें आहे व त्यांच्यावरून " वेदगुह्य जनां उकलुनी दाविलें " ( द. प्रे. ल. ३८९ ) ही त्यांची उक्ति सत्य असल्याची साक्ष पटते. वेदगुह्य अथवा अद्वैतभक्तिरहस्य उघड करण्याचे कामीं जसे पदांत तसे बोलांतहि अत्यंत आदरपूर्वक श्रुतिवचनें, स्मृतिवचनें, वेदांतशास्त्र व संतवाङ्मय यांचे त्यांनीं जागजागीं आधार घेतले आहेत. मागें वर्णन केल्याप्रमाणें श्रीपंतांच्या उद्गारांना आत्मप्रतीति, गुरुप्रतीति व शास्त्र-प्रतीति यांचा पाठिंबा असल्यामुळें त्यांचा बोध नेहमीं निश्चयात्मक असे व ऐकणारांवर त्याचा तात्काळ परिणाम होत असे.

## बोलांत व्यक्त झालेली शिष्यहिताबद्दलची कळकळ

बोलांमध्यें आणखी एक विशेष आढळतो तो हा कीं, त्यांच्यांत श्रीपंतांचें प्रेमळ व दयार्द्र अंतःकरण शिष्यांच्या सुखदुःखांशीं समरस होऊन शिष्यकल्याणाबद्दल त्यांना वाटणारी कळकळच त्यांच्या शब्दांच्या रूपानें बाहेर पडलेली दिसते. उदाहरणार्थ पुष्प ७ पराग ४९ मध्यें आपणास भगवें घालण्याची परवानगी मागण्याकरितां श्रीपंतां-कडे आलेल्या तिघां तरुण शिष्यांना त्यांनीं अत्यंत कळवळ्यानें, जीव तोडून व जणूं आपलें आतडें उघडें करून दाखवून जो कळकळीचा बोध केला तो अवश्य वाचण्या-सारखा आहे. त्यावरून त्यांचें आपल्या शिष्यांशीं वागणें किती सलगीचें व कळकळीचें होतें याची साक्ष पटते. त्या परागांत श्रीपंत म्हणतात " माझ्या पोरांनीं मला सोडून जाणें, मला सोडून जाण्याची इच्छा त्यांस होणें म्हणजे मला आश्चर्य वाटतें! अशी कल्पना कां आली? कोठें मी चुकलों? मीं कांहीं बोध लपवून ठेविला काय? उघडपणें सर्व कांहीं सांगितलें, तरी अजून " मी कांहीं करीन ", " मी कांहीं होईन " हें राहिलेंच! इतक्या श्रमानें मोकळा बोध केला त्याचा हा परिणाम व्हावा काय? गुरूनें संसार धरून राहावें आणि पोरांनीं संन्यास घेऊन जावें! गुरूपेक्षां जास्त कीर्ति मिळविण्यास जाणें आहे काय? गुरूपेक्षां अधिक कांहीं होऊं शकेल काय? पोरांनीं भीक मागावी हें आईस आवडेल काय? मी तर योगक्षेमाचा भार तुमचा घेतला, म्हणून तुम्हांस कशाचीहि कमताई नसावी. तुमचा हात दातृत्वाचा, वर असावा. माझ्या पोरांस कांहीं कमी नाहीं. ' देहि ' म्हणून त्यांचा हात कधीं खालीं नसावा. ' देहि ' म्हणून ज्याच्या त्याच्या पुढें हात पसरून भिक्षा मागणेस पोरांनीं जावें हें मला सहन होईल काय? " भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें " ××× असा सोपा बोध अन्य कोणत्याच ठिकाणीं तुम्हांस मिळणार नाहीं. साध्या रीतीनें मी असतों, मला महती नको. म्हणून मी कसा आहें, माझी किंमत काय हें तुम्हांस कळलें नाहीं व कळावयाचें नाहीं; म्हणून दुसरीकडे तुमचें लक्ष जातें, मन धांव घेत असतें. तुम्हांस बाह्य रंजन पाहिजे, सोंग भपकेदार पाहिजे, महती मिरविणारा पाहिजे; औडंबर, डौल व देखावा आवडतो. त्यावर तुमची भक्ति लवकर बसते. अंतःकरण, प्रेम यांची परीक्षा तुम्हांस नाहीं. त्यांची गोडी तुम्हांस लागत नाहीं. निजरूप

समजत नाहीं, अंतर्दृष्टि झाली नाहीं. अजून बहिर्मुख दृष्टिच आहे. ××× गुरुच जर व्यवहारीं खेळत आहे मग आपण कां व्यवहार सोडावा ? व्यवहार सोडून, सर्व टाकून, ज्यांत समर्थ सद्‌गुरु अभयदाता पाठीराखा सदोदित आहे असें लढाईचें समरांगण सोडून गांध्याप्रमाणें पळून जाण्यांत काय पुरुषार्थ आहे ? लढाईच्या आंगणांतच सद्‌गुरु कशी पाठ राखतो, कसा योगक्षेम वाहतो, तो भक्तसखा भक्तवत्सलब्रीद प्रत्यक्ष कसें दाखवितो हा अपूर्व, दुर्लभ अनुभव समरांगण म्हणजे संसार, व्यवहार सोडून गेल्यास कोठें विजन अरण्यांत मिळणार काय ? ××× ' सदा निस्पृह राहीन. कोणीं न दिलें तर उपाशी पडून मरेन. आज मरण्यास सिद्ध आहें. पाहिजे तें होवो ' असें म्हणून ' अलख ' पुकारून जंगलांत शिरावें. गावांत हिंडत राहूं नये. असा स्वतंत्र, स्वच्छंद, निरालंबाचा, निराधारपणाचा संन्यास घेण्याचें धैर्य असल्यास पुरुषव्याघ्र हो, पुढें या. तुम्हांस परवानगी देतों. एकेकास एकेक दिशेस पाठवीन व मला वाटेल तेव्हां आणि वाटेल तरच संन्यासास परवानगी देईन. ×× बोध अंगीं मुरला नाहीं, संगत फळली नाहीं म्हणून असे कच्चे विचार येतात, कल्पना उठतात. अजून पाहा. अनुभव घ्या. पंताची संगत किती गंमतीची पाहा. प्रेमानें बोलतो, खेळतो, गुरु-शिष्यभाव सोडून, मधील अंतरपट फाडून पोटीं घेतो. ज्याच्या शिव्यांतदेखील तुमचें कल्याणच भरलें आहे, जो कधींच तुमचें अकल्याण इच्छित नाहीं असा प्रेमळ पंत आपल्या नेणत्या पोरांनीं संन्यास घ्यावा, संकटीं जीव घालावा, दुःख भोगावें असें इच्छील काय ? अरे, ज्याचें अंतःकरण तुमच्या हिताकरितां, योगक्षेमाकरितां झुरत असतें असा पंत तुम्हांस कसा ' जा ' म्हणेल ? तुम्हीं दुःखी व्हावें हें पंताला आवडत नाहीं. मग तो कसा परवानगी देईल बरें ? ”

हा उतारा जरा विस्तृत आहे खरा; पण ज्यांनीं पुष्प ७ वाचलें नसेल त्यांना त्यावरून शिष्यहिताबद्दल श्रीपंतांच्या हृदयांत किती कळकळ वसत होती याची साक्ष पटेल. श्रीपंत आपल्या शिष्यांशीं अत्यंत सलगीनें वागत व शिष्यांनींहि आपल्याशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागावें असें त्यांचें सांगणें असे हें मागें सांगितलेंच आहे. पुष्प ७ पराग ४६ व ५१ आणि पुष्प ८ पराग ८० व ९२ मध्यें त्यांनीं पुढील उद्गारांप्रमाणें उद्गार काढले आहेत. “ ‘उच्च’, ‘ श्रेष्ठ, ’ ‘ सद्‌गुरु ’ असें तुम्ही मला म्हटलें म्हणजे माझ्याशीं तुम्हीं अंतर ठेवलेंत व मी तुम्हांला दूर झालों. मला ‘ सद्‌गुरु ’ म्हणूं नका. Call me your friend, your brother, your mother or father. Do not call me your Lord ( मला मित्र, बंधु, आई किंवा बाप म्हणा. महाराज म्हणूं नका.) तुझी तुला जितकी प्रीति वाटते तितकीच प्रीति मजवर करून माझ्याशीं किंचितहि अंतर अगर भीड न धरितां मोकळ्या अंतःकरणानें वाग व मिठी घालून एक हो. तूं माझ्याहून कमी आहेस असें मानून, माझ्या पायां पडून माझे पाय धरून स्वस्थ राहूं नको. मिठींत गुरुशिष्यभाव राहिला नाहीं; ऐक्यभाव आला. पाय धरून दूर राहाण्यांत गुरु-शिष्य-भाव म्हणजे द्वैत आलें. तेथें प्रेम नाहीं; भीति राहिली, संशय राहिला व निश्चय झाला नाहीं. असा प्रेमळ तुम्हांस पुनः मिळणार नाहीं. ” ( ७–१८९ )

## ढोंग व कृत्रिमपणा यांचेवर ताशेरे

श्रीपंतांनीं या बोलांत ढोंगी गुरूंवर ताशेरे उडविले आहेत. त्यांना ढोंगाबद्दल इतका तिटकारा वाटत असे कीं " चांगला गुरु करून हा चोर झाला तरी चालेल. पण ढोंगी गुरूचें कैवल्यहि नको " असें ते म्हणत व " ढोंग होऊं नयें; अंगच व्हावें " असें त्यांनीं सांगितलें आहे. ( पु. ८–३९ ) त्यांना कृत्रिमपणा किंवा अंध अनुकरण बिलकूल खपत नसे. त्यामुळें या दुर्गुणांवर त्यांनीं या बोलांत वारंवार झोड घेतलेली आढळते. त्याचप्रमाणें आत्मोन्नतीच्या दृष्टीनें आधुनिक शिक्षणाचा आणि नुसत्या पुस्तकी ज्ञानाचा उथळपणा व फोलपणाहि त्यांनीं मधुन मधुन दाखविला आहे.

## अप्रतिम वक्तृत्वशैली

पुष्प ७ पराग ४९ मधील जो उतारा वर दिला आहे त्यावरून श्रीपंतांच्या अप्रतिम वक्तृत्वशैलीची वाचकांना कांहींशी कल्पना येईल. ते उत्तम वक्ते होते हें त्यांच्या बोलां-मधील व्याख्यानांवरून दिसून येतें. दत्तोपंत नागरकट्टींनीं त्यांचीं जीं व्याख्यानें लिहून ठेविलीं त्यांवर प्रथम प्रथम ते तारखा घालीत असत व पु. ७ मधील कांहीं कांहीं परागांवर तारखा आहेत. त्यांवरून एकेका दिवशीं श्रीपंतांच्या व्याख्यानाचा विस्तार किती झाला होता तें समजून येतें. पराग ३५ मधील व्याख्यान १३–१०–१९०० रोजीं झालें असून तें पु. ७–१३१ ते १४१ वर छापलें आहे; म्हणजे त्या व्याख्यानाच्या नागरकट्टींनीं लिहून ठेविलेल्या मजकुराचा विस्तार छापील दहा-साडेदहा पानें भरतील इतका झाला आहे. श्रीपंत अध्यात्मविषयावर एकदां बोलूं लागले म्हणजे त्यांचा वाक्प्रवाह तासचे तास चालत असे. प्रकरण ३५, ३६ व ४५ मध्यें ज्यांचा उल्लेख केला आहे त्या बापूराव अभ्यंकर वकील यांनीं बेळगावास श्रीपंतांच्या घरीं तीन चार दिवस राहून मुंबईस गेल्या-वर तेथून ४–६–१९०३ रोजीं श्रीपंतांना एक पत्र लिहिलें. त्यांत पुढील मजकूर आहे "आपण सोमवारीं आठ तास सतत उपदेश केलात. या श्रमाचें फळ म्हणजे माझ्या मनावर वाढलेलें चिंतावारूळ निघून जाऊन माझ्या मनाची वृत्ति स्वच्छ गंगाजलाप्रमाणें जाहलेली लिहून कळविणेस फारच आनंद वाटतो. " अशाच प्रकारचा अनुभव श्रीपं-तांच्या पुष्कळ शिष्यांना येत असे. श्रीपंतांचा हा जो वाक्प्रवाह तासचे तास अविरत-पणें चालत असे त्याचें मुख्य कारण म्हणजे त्यांच्या ठिकाणची शिष्यहिताबद्दलची कळ-कळ, बोध करण्याची हौस, वर्ण्य विषयाशीं तादात्म्य व विलक्षण भाषाप्रभुत्व हे गुण होत. ग्रंथांत लिहून ठेविलेल्या बोधापेक्षां तत्वदर्शी महात्म्याच्या मुखांतून निघणाऱ्या बोधवर्षा-वाचा विशेष हा असतो कीं तो चालू असतांना वक्ता व श्रोता हे एकमेकांच्या सन्मुख असल्यामुळें श्रोत्याची एकाग्रता जसजशी अधिकाधिक होत जाईल तसतसें वक्त्यालाहि अधिकाधिक स्फुरण चढत जातें. कारण बोधश्रवणाला आतुर होऊन सर्वांगाचे कान करून ऐकणारा श्रोता असला म्हणजे तत्वज्ञ वक्त्याच्या बोधसागराला भरतें येऊन त्याच्यावर बोधानंदलहरी उठूं लागतात. श्रीपंतांसारखे आत्मानुभवी सत्पुरुष म्हणजे शुद्ध प्रेमरूपी

विजेचे साठेच होत व त्यांचा वाक्प्रवाह सुरू झाला म्हणजे ती वीज श्रोत्यांच्या सर्वांगांतून भिनत असे. श्रीपंत बोध करूं लागले म्हणजे त्यांच्या नेत्रांत दिव्य तेज चमकत असे व त्यायोगें श्रोत्यांचें चित्त त्यांचेकडे स्वाभाविकपणें आकर्षिलें जाई. श्रीपंतांचा कळकळीचा बोध सुरू झाला म्हणजे आपल्या हृदयाकाशांत जणूं बोध-सूर्याच्या प्रकाशाचा झोत पडल्याप्रमाणें ऐकणारांना होत असे. तसेंच आपल्या मनांतील शंका ओळखूनच ते बोलत असावे असें प्रत्येकाला वाटे.

## नागरकट्टींनीं श्रीपंतांचे बोल टिपून ठेविल्याचें महत्व

दत्तोपंत नागरकट्टींनीं श्रीपंतांचे बोल टिपून ठेवण्याची जी कामगिरी करून ठेविली ती फार महत्वाची होती. कारण त्यांनीं टिपून ठेविलेला बोध श्रीपंतभक्तांच्या दृष्टीनें आत्मानुभवाच्या भांडाराप्रमाणें आहे. इतकेंच नव्हे तर श्रीपंतांची ज्यांना माहिती नाहीं अशा कित्येक पारमार्थिक लोकांना या बोलांच्या वाचनानें फार फायदा होतो असा अनुभव आहे. इतक्या उघडपणें आत्मानुभवाच्या क्षेत्रांतील गूढ अनुभवाबरोबर बारीक सारीक खाचाखोचाहि ज्यांत सांगितल्या आहेत असा सत्पुरुषांचा सहज बोध फारसा जतन केलेला कोठें आढळत नाहीं. स्वामी रामकृष्ण परमहंसांची " रामकृष्ण वाक्सुधा " अशाच स्वरूपाची आहे. सर्वसाधारणपणें ग्रंथांत लिहिलेला बोध हा जरी विचारपूर्वक, व्यवस्थित रीतीनें मांडणी करून व अनुरूप शब्दयोजना करून लिहिलेला असतो, तरी सत्पुरुषांच्या बोधप्रचुर अशा स्वैरालापांमधलि सहज सौंदर्य, अकृत्रिम बोधवैभव व धडाडी यांची सर लेखांमधील बोधाला येत नाहीं. लेखनाच्या वेळीं लेखकाच्या मनश्चक्षूंपुढें उभारत स्वरूपाचा वाचक असतो व पत्र लिहितांना वाचक हा विवक्षित व्यक्तीच्या रूपानें उभा असतो आणि त्या वाचकाला उद्देशून लेखन होतें. त्यामुळें त्या व्यक्तीशीं लेखकाच्या मनांत चाललेलें भाषण लेखणीच्या साह्यानें कागदावर उतरावें लागतें. पण जेव्हां अंतःस्फूर्ति जोराची असते अशा वेळीं शब्दापुढें अर्थ धावूं लागतो व तो व्यक्त करण्याच्या कामा लेखणी अपुरी पडते. सर्व अंतःस्फूर्त लेख लिहिणारांना असाच अनुभव येतो. पण वक्त्याच्या ठिकाणच्या स्फूर्तीला प्रतिबंध नसल्यामुळें ती ज्याप्रमाणें असेल त्याप्रमाणें त्याचा वाक्प्रवाह स्वैरपणें चालू राहातो. तसेंच लेखणीच्या द्वारें कागदावर जो मजकूर उतरतो तो जसाच्या तसाच कोणी जगापुढें मांडीत नाहीं. तर त्याला मागून तपासून, साफसूफ करून तो प्रसिद्ध केला जातो. त्यामुळें लेखांमध्यें आढळणाऱ्या बोधांत, सहज स्फूर्त बोधाच्या ठिकाणीं आढळून येणारा, जातिवंतपणा थोडा कमी होतो. पण संभाषणप्रसंगीं जणूं वक्त्याचें अंतःकरण श्रोत्याच्या अंतःकरणाशीं बोलत असल्यामुळें त्यांचेमध्यें एक प्रकारचा विजेचा प्रवाह अव्या[illegible] होतो व अशा वेळीं शब्द म्हणजे या विजेचें वाहक असें एक साधन असतें. शिष्य दुराग्रही अथवा शंकेखोर असेल तर सद्गुरु बोधखड्गाचा जरूर तितका उपयोग करितो व युक्तिप्रयुक्तींनीं म्हणजे मधुन मधुन गोंजारून, मधुन मधुन

भय दाखवून, मधुन मधुन त्याला मोठेपणा देऊन आपला हेतु साधीत असतो. तो हेतु म्हणजे शिष्याच्या चित्ताचा ग्रास करून त्याला आपलासा करून बोधग्रहणाला योग्य व कार्यक्षम करणें हा असतो. अशा प्रसंगीं सद्गुरूच्या मुखांतून निघणारा बोध जशाचा तसा शुद्ध स्वरूपांत मिळणें फार कठीण असतें. रणक्षेत्रावर आणीबाणीच्या प्रसंगीं कृष्णार्जुनांमध्यें झालेला अद्भुत रम्य संवाद सर्व जगाच्या उपयोगीं पडावा म्हणून व्यासमुनींनीं आपल्या कृपेनें संजयाच्या नेत्रांना दुर्बिण व कानांना रेडिओवजा अद्भुत ध्वनिवाहक यंत्र लावून त्याचेकडून तो धृतराष्ट्राला ऐकविण्याची सोय केली व त्यामुळें तो आज उपलब्ध आहे. त्याचप्रमाणें श्रीपंतकृपेनें त्यांचा दिव्य बोध चालू असतां, हजर नसलेल्या मुमुक्षूंना तो उपलब्ध व्हावा म्हणून, नागरकट्टींच्या ठिकाणीं तो टिपून ठेवण्याची स्वयंस्फूर्ति निर्माण झाली व तो आपल्या डोक्यांत ठेवून बऱ्याच अंशानें जशाच्या तसा मागाहून लिहून काढण्याची कलाहि त्यांना हस्तगत झाली. तसें न होतें तर ३५–३६ वर्षांपूर्वीं श्रीपंतांनीं केलेला बोध आज उपलब्ध होणें शक्य नव्हतें. त्यामुळें या बोलांच्या वाचकांना नागरकट्टींनीं फार उपकृत करून ठेविलें आहे.

या बोलांच्या वाचनानें आत्मानुभवाची प्राप्ति करून घेऊं इच्छिणाऱ्यांना तसेंच सद्गुरुकृपेनें ज्यांचा आत्मानुभवाचा मार्ग चोखाळला आहे अशा पारमार्थिक लोकांना फायदा होऊन अनुभवाचे बाबतींत त्यांचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडत गेल्याशिवाय राहाणार नाहीं असा भरवंसा वाटतो. श्रीपंतांचे जे अनुयायी अगर भक्त आहेत त्यांना तर या बोलांच्या मननपूर्वक वाचनानें अपरिमित फायदा होतो व होईल. कारण जरी श्रीपंतांचे हे बोल खुल्या अंतःकरणानें बाहेर पडलें असल्यामुळें सर्वांना समजण्यासारखे आहेत तरी सांप्रदायिक वाङ्मयाचा हा एक विशेष आहे कीं, त्या त्या संप्रदायांतील लोकांना त्यांतील मर्म त्वरित कळून येतें व अशा वाङ्मयाकडे ते आपलेपणाच्या दृष्टीनें पाहात असल्यामुळें त्यांतील बोध त्यांच्या चटकन गळीं उतरतो. तेव्हां ते बोलांच्या वाचनानें आपला शक्य तितका फायदा करून घेतील अशी आशा आहे.

## श्रीपंतांचें मराठी भाषेवरील प्रभुत्व

येथपर्यंत श्रीपंतांच्या बोलांसंबंधीं व त्यांच्यांत व्यक्त झालेल्या विषयांसंबंधीं थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. आतां ज्या भाषेच्या साह्यानें श्रीपंतांनीं आपला गद्यपद्यात्मक वाग्विलास केला त्या भाषेसंबंधीं चार शब्द लिहीत आहोंत. श्रीपंतांच्या सुरवातीच्या कांहीं लेखांतील भाषा कांहींशी बोजड असून विषयांची मांडणी बांधेसूद नसलेली आढळते व या गोष्टीचा आत्मज्योति लेखांत त्यांनीं जो उल्लेख केला आहे, तो विनयानें केलेला असेलहि, पण त्यांत थोडा तथ्यांशहि आहे. तसेंच श्रीपंतांचे लेख हे छापण्याच्या बुद्धीनें लिहिलेले नव्हते व ते सर्व मोडींत लिहिलेले होते. त्यामुळें त्यांचे पश्चात् २०–२१ वर्षांनीं जेव्हां श्रीपंतबंधूंनीं ते छापण्याचें ठरविलें तेव्हां त्यांच्या बाळबोध लिपींत नकला करून छापण्यास द्याव्या लागल्या. त्यामुळें त्यांच्यांत कांहीं दोष राहून गेले आहेत.

लेखकाच्या स्वतःच्या देखरेखीखालीं त्याचे लेख प्रसिद्ध व्हावयाचे असले म्हणजे तो स्वतः त्यांच्यांतील किरकोळ दोषहि काढून टाकीत असतो. पण येथें तसें झालें नाहीं. श्रीपंतांचे बहुतेक लेख त्यांच्या पूर्व वयांत लिहिले गेले व तेहि मोडींत आणि ते सुमारें चाळीस वर्षें तसेच पडून राहिले होते. त्यामुळें भाषेच्या व व्याकरणाच्या दृष्टीनें त्यांच्यांत कांहीं दोष राहून गेले आहेत. हे अपवाद वगळले असतां श्रीपंतांची मराठी भाषा अत्यंत भारदस्त व जोरदार असून उपनिषदादि संस्कृत ग्रंथांशीं त्यांचा चांगलाच परिचय असल्यामुळें तिच्यावर संस्कृत भाषेची छाप पुष्कळच पडलेली आढळते. त्याचप्रमाणें संतवाङ्मयाशीं त्यांचा फार परिचय असल्यामुळें त्या वाङ्मयाची व विशेषतः श्रीज्ञानेश्वरांच्या ग्रंथांची छाप त्यांच्या पदांवर पडलेली दिसते आणि जुन्या संत–कवींच्या वाङ्मयांत आढळणारे " खेंव ", " बिंदुलें, " " बिदीं, " " याद " " बोभातसे " वगैरे बरेच शब्द श्रीपंतांच्या वाङ्मयांत व विशेषतः पदांत आढळतात. अध्यात्म–विषयावरील बहुतेक सर्व संतवाङ्मय हें पद्यांत आहे. ही जाणीव श्रीपंतांना असल्यामुळें त्यांनीं आपल्या 'आत्मज्योति' लेखांत " आजपर्यंत गुह्य ज्ञान गद्याच्या रूपानें प्रसिद्ध झालेलें नाहीं. तें या गद्य लेखाच्या द्वारें प्रगट होत आहे म्हणून त्याला कमी लेखूं नये " अशी वाचकांना विनंति केली आहे.

श्रीपंतांचा लेखनव्यवसाय १८८२–८३ च्या सुमारास सुरू झाला व त्यापूर्वींच पुणें येथें 'केसरी,' 'सुधारक' वगैरे वर्तमानपत्रें निघून त्यांचा प्रसार अधिकाधिक होत होता. त्याचप्रमाणें विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या निबंधमालेंतील मार्मिक, भारदस्त व सडेतोड भाषेमुळें मराठी भाषेंत नवीन जोम उत्पन्न होण्यास सुरवात झाली होती. त्याच सुमारास मराठी भाषेंतील ग्रंथसंपत्तिहि वाढीस लागली होती. त्यामुळें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं १८८३-८५ च्या सुमारास मराठी भाषेला प्रौढपणा येऊं लागून गद्यलेखनाला जोमदार व भारदस्त स्वरूप येत होतें. तसेंच श्रीपंतांचा नेहमींचा व्यवसाय शिक्षकाचा असल्यामुळें भाषाज्ञानाच्या वाढीला व वाङ्मयसेवेला तो पोषक असाच होता. १८८५ च्या सुमारास म्हणजे सुमारें ५० वर्षांपूर्वीं श्रीपंतांनीं लिहिलेल्या लेखांत व म्हटलेल्या पदांत जें भाषाप्रभुत्व दृष्टोत्पत्तीस येतें तें आश्चर्य करण्यासारखें आहे. त्यांच्या ठिकाणीं सद्गुरूची पूर्ण कृपा, आत्मानुभवाचें भरपूर भांडार, भक्तिप्रेमाचा अतोनात जिव्हाळा, शिष्यप्रबोधनकार्याची उत्सुकता, रसिकता, मार्मिकता, शास्त्रप्रतीति, योगादि साधनांतील प्रावीण्य, विलक्षण भाषाप्रभुत्व व चातुर्य हे गुण एकवटल्यामुळें त्यांच्या वाङ्मयाला फार शोभा आलेली आहे. सरस्वतीची त्यांचेवर पूर्ण कृपा असल्यामुळें त्यांच्या सर्व वाङ्मयांत तिचा प्रसादच प्रगट झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# प्रकरण ४८ वें

———:०:———

## योग व चमत्कार.

———:०:———

उपनिषत्कालापासून योग हें ईश्वरप्राप्तीचें अथवा स्वरूपसाक्षात्कार करून घेण्याचें एक प्रमुख साधन मानलें गेलें आहे व आत्मानुभवी हा योगी असलाच पाहिजे अशी सर्वसाधारण समजूत असल्याचें दिसून येतें. राजयोग व ज्ञानयोग हीं दत्तसंप्रदायाचीं मुख्य अंगें होत. श्रीदत्तात्रेय हे योगीमुकुटमणिच होते व त्यांनीं आपली माता सती अनुसूया व कार्तवीर्य, अलर्क, भार्गवराम वगैरे आपले शिष्य यांना योगमार्गांत प्रवीण केल्याचे पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आढळतात. श्रीदत्तावतारी श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंह-सरस्वती हे योगीवर्य होते व श्रीसमर्थ रामदासस्वामींना योगमार्गाची दीक्षा श्रीदत्तात्रेयांनींच दिली होती.

आधुनिक काळांतील अद्वितीय विभूति श्रीमाणिकप्रभु व अक्कलकोटचे स्वामी यांच्या योगलीलांचा त्यांच्या समकालीन लोकांना चांगलाच अनुभव आला होता. सुप्रसिद्ध दत्तभक्त श्रीवासुदेवानंदसरस्वती हेहि महान् योगी होते व त्यांचे ग्रंथ या गोष्टीची स्पष्ट साक्ष देत आहेत. श्रीबालमुकुंदांचे गुरु श्रीरामचैतन्य ऊर्फ रामावधूत यांना श्रीपंतांनीं ‘ योगी-विश्राम ’ म्हणजे योग्यांचेंहि विश्रांतिस्थान म्हटल्याचा मागें उल्लेख केलाच आहे. श्रीबाल-मुकुंद हे महान् योगी होते व त्यांनीं श्रीपंतांकडून खडतर योगसाधन करवून घेतल्याचा प्रकरण ६ मध्यें उल्लेख केलाच आहे आणि श्रीपंतांनीं त्यांना उद्देशून ‘ योगीमुकुटमणि ’ ‘ निर्गुण योगी, ’ ‘ शिवयोगी, ’ ‘ अनंतपुरींचा बालयोगी, ’ ‘ योगधुरंधर, ’ ‘ योगी-कंठहार ’ वगैरे अर्थपूर्ण व समर्पक विशेषणें जागजागीं योजिलीं आहेत. श्रीपंतांनीहि कल्पांच्या संगतींत योगशास्त्राचा अधिक अभ्यास करून त्यांत प्रावीण्य मिळविलें होतें या गोष्टीचा मागें उल्लेख केलाच आहे व बाका घाणेकर, कोल्हापूरचा इंगवले आणि बापू अभ्यंकर यांचा बोलतां बोलतां समाधि लाविल्याची हकीगत अनुक्रमें प्रकरण १५,३३ व ४५ मध्यें दिली आहे.

### योगसाधन व सिद्धि

वास्तविक राजयोग, ज्ञानयोग, भक्तियोग व कर्मयोग या सर्व “ योगांचें ” ध्येय एकच आहे. तें म्हणजे आपल्या सच्चिदानंद स्वरूपाशीं समरस होणें अथवा त्याच्याशीं आपला अखंड योग आहे असा अनुभव येणें. हें ध्येय ज्यांनीं गाठलें ते सर्व “योगीच” होत. त्यामुळें कर्मयोगाचा उपदेश करितांना श्रीकृष्णानें अर्जुनाला “ तस्माद्योगी भवार्जुन ” ( भ. गी. ६–४६ ) असें सांगितलें. श्रीपंतांनींहि “ असुनी प्रपंचीं योगी आम्ही ” ( द. प्रे. ल. ३७७ ) असें म्हटलें आहे. तरी पण सर्वसाधारण समजूत

अशी असते कीं योगी म्हटला म्हणजे तो हठयोगी अथवा राजयोगी असला पाहिजे व दुसऱ्याच्या मनांतील विचार ओळखणें, अक्षय विजयी होणें, दूरदर्शन, दूरश्रवण, मनोजव, इंद्रियजय, अणिमा, गरिमा, महिमा वगैरे कांहीं सिद्धि त्याच्या जवळ असल्याच पाहिजेत. ' योगी ' या शब्दांतच एक प्रकारची अशी कांहीं जादू भरली आहे कीं कोणी योगी आल्याचें ऐकतांच त्याच्या दर्शनाला लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटतात; पण ज्याची योगी म्हणून प्रसिद्धि झालेली नाहीं असा एखादा साधु पुरुष आल्याचें लोकांना समजलें तरी त्याचेकडे फारसें कोणी जात नाहीं असा आपणांस अनुभव येतो. सहज स्थितींत भिक्षाटण करणाऱ्या मत्स्येंद्रनाथांच्या झोळींत एका वेळेला पुरेल इतका शिधा मिळण्याचीहि पंचाईत पडत असे. तर तेच त्यांचे शिष्य गोरखनाथ यांनीं कांहीं अद्भुत चमत्कार दाखविल्यानें त्यांचे पुढें खाद्य पदार्थांचे ढीग पडले ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

योगाभ्यास व सिद्धि यांचें साहचर्य असण्याचें कारण असें कीं हठयोग अथवा राजयोग यांपैकीं कोणत्याहि योगाचा अभ्यास सुरू झाला म्हणजे साधकाच्या ठिकाणीं अधिकाधिक शक्तीचा साठा होऊं लागतो व तो ज्या प्रमाणांत असेल त्या प्रमाणांत, सामान्य मनुष्यांना दुर्घट वाटणारें असें, कार्य त्या साधकाला करितां येऊं लागतें. हें जें सामर्थ्य योगसाधन करणाऱ्याच्या ठिकाणीं उत्पन्न होतें त्याला " सिद्धि " म्हणतात. या सिद्धि ज्या साधकाच्या ठिकाणीं निर्माण होतात त्याला त्यांचा उपयोग करण्याचा मोह पडण्याचा फार संभव असतो व तो पडण्याचे प्रसंगहि येऊं लागतात आणि तो जर अशा सिद्धींच्या मोहजालांत सापडला तर तो तेथेंच गुरफटला जातो व त्याचें अंतिम ध्येय बाजूला राहून त्याची फसगत होते. याचें कारण असें कीं योगसाधन हें केव्हांहि 'साधनच' होय. तें साध्य नव्हे. तो मार्ग आहे. " यद्गत्वा न निवर्तन्ते " असें धाम नव्हे. फक्त जे योगी आपल्या मार्गांत आड येणाऱ्या सिद्धींच्या मोहजालांत न गुरफटतां निश्चयानें, वैराग्यानें, दृढ भक्तीनें व सद्गुरूनें आखून दिलेल्या मार्गानें दीर्घ कालपर्यंत सतत अभ्यास चालू ठेवितात त्यांनाच, जेथें गेलें असतां परत फिरणें नाहीं असें, तें परम धाम गाठतां येतें. तसेंच सिद्धि व त्यांचीं कार्यें हीं मर्यादित व कल्पित होत. त्यामुळें सर्व सिद्धि जरी एकदम एखाद्याला प्राप्त झाल्या तरी त्यांच्या साह्यानें होणारें कार्य अथवा फलप्राप्ति मर्यादित व नश्वरच असणार. सिद्धींच्या साह्यानें अविनाशी पद कधींच प्राप्त होणार नाहीं. श्रीपंत म्हणतात " हठयोगादि साधनें करून हिरण्यगर्भ प्रजापतीचें आयुष्य प्राप्त करून सुखी व्हावें म्हटल्यास हें सुख तरी ब्रह्मांड राहीतोंपर्यंतच. कल्पाचा व ब्रम्हांडाचा अंत होणारच. मग हें घेऊन काय करावयाचें ? तें नश्वर अशी आपली खात्री करून घेऊन या नश्वर सुखाच्या मागें न लागण्याचा निश्चय करावा. नित्यानित्यविवेकानें अनित्यसुखदायी वस्तूंच्या कोटींत ब्रह्मांड, देवलोक, पृथ्वी हीं सर्व आलीं. हीं कांहीं उपयोगी नाहींत. " ( पु. ८–४४ ) सिद्धि झाल्या तरी ते अनंत, अपार चिच्छक्तीचे कल्पित तुकडेच होत. त्यामुळें अशा एखाद्या तुकड्याच्या

प्राप्तीकरितां आपलें शक्तिसर्वस्व खर्च करण्यापेक्षां सर्व शक्तींचें उगमस्थान जें स्वस्वरूप त्याच्याशींच जो तद्रूप होतो त्यानें सर्व शक्ति आपल्यांत सामावून घेतल्याप्रमाणें होतें. सर्व सिद्धींना मागें सारून जे योगी सच्चिदानंद स्वरूपाशीं समरस होतात ते अभेद दृष्टीनें अनंत चिच्छक्तिविलास पाहून त्यांतच रममाण होतात व स्वात्मानंदांत डुलत राहातात. त्यांना सिद्धि व नश्वर फल देणारीं त्यांचीं कार्यें हीं अमृतापुढें कांजीप्रमाणें क्षुद्र अतएव त्याज्य वाटतात. त्यामुळें श्रीपंतांनीं ऋद्धि-सिद्धींचा वारंवार निषेधच केला आहे व " नको ऋद्धि सिद्धि वैभव ब्रम्हज्ञान । इहपर भोग वाटती श्वानवमन " ( द. प्रे ल. ७६ ); " नको दिवि भोग ऋद्धि सिद्धि योग " ( द. प्रे. ल. २५५ ) असा आपला स्पष्ट अभिप्राय दिला आहे. तसेंच त्यांनीं ऋद्धिसिद्धींच्या तावडींत सापडलेल्या आपल्या शिष्याला " ऋद्धि सिद्धि गारुड दावुनी । भुलविसी हे जन "; " पाहीं पाहीं सुखकर दत्तभजन " ( द. प्रे. ल. १२८ ) असा जिव्हाळ्याचा उपदेश केला आहे. त्याचप्रमाणें योगाभ्यासानें प्राप्त होणारा जो समाधि व ज्याची जनमनावर विलक्षण छाप बसलेली आढळते त्या समाधीला श्रीपंतांनीं " ताटस्थ्य–समाधि मूर्छाविकार " ( द. प्रे. ल. १९१ ) असें म्हटलें आहे. कारण प्राणनिरोधन करून मनाला ब्रह्मरंध्रीं कोंडल्यामुळें जो समाधि लागतो तो उतरला म्हणजे कोंडून ठेविलेलें मन दुप्पट जोरानें सैरावैरा धावूं लागण्याचा संभव असतो. समाधि उतरल्यावर मनाच्या तडाख्यांत सापडून फसगत झालेल्या कांहीं योग्यांचीं उदाहरणेंहि आढळतात. तसेंच हा समाधि मुद्दाम लाविलेला अतएव कृत्रिम असतो. त्यामुळें त्याचा भंग होण्याचाहि संभव असतो. म्हणून श्रीपंतांनीं " सहज स्थितीपरती समाधि खोटी " असें म्हटलें आहे व " अष्टांग योग नमनीं । प्राप्त भजनीं सहज उन्मनी " ( द. प्रे. ल. १६३ ); सद्गुरूनें " अखंड योग सोपा केला " ( द. प्रे. ल. १८९३ ); " जीवस्वरूप नेणुनी मूढ । योगास्तव भ्रमती ॥ २ ॥ चित्त–चैतन्य–योग अखंड " ( द. प्रे. ल. ५६१ ) असे उद्गार काढले आहेत. तसेंच श्रीपंतांनीं अढळ व अभंग समाधीची खूण पुढीलप्रमाणें सांगितली आहे " विश्वीं गुरु पाहुनी वागे । क्षणोक्षणीं त्या समाधि लागे ॥ २ ॥ ब्रह्मानंदीं हारपे चित्त । ठायींचे ठायीं पूर्ण निवांत ॥ ३ ॥ " ( द. प्रे. ल. १३६ ) व " बंध मुद्रा योग येणें नोहे सिद्धि । सर्वात्म साधी । व्यतिरेक–अन्वयीं स्थिर करीं धी, भोगी समाधि " ( द. प्रे. ल. ९० ) व्यतिरेक व अन्वय मार्गाचें प्रकरण ४४ मध्यें वर्णन केलेंच आहे.

## चमत्कार होत नसतात तर ते दिसत अथवा भासत असतात

सिद्धींना व त्यांच्या साह्यानें घडून येणाऱ्या अद्भुत गोष्टींना अथवा चमत्कारांना जें महत्व आलेलें आहे त्याच्या मुळाशीं ऐहिक सुखलालसा व तें सुख मिळविण्याचीं साधनें संपादन करण्याचा हव्यास हीं असतात. एक शुद्ध प्रेमाखेरीज ज्यांनी सर्व आशापाश तोडून टाकिलेले आहेत असे महात्मे कधीं चमत्कार करीत नाहींत. पण सर्व

सिद्धींच्या मुळाशींच त्यांची बैठक असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं कांहीं सिद्धि कधीं कधीं, कांहीं तरी कारण घडून, सहज प्रगट होत असतात. त्यामुळें त्यांनीं चमत्कार करून दाखविले असें इतरांना वाटतें. ते कधीं बुद्धिपुरःसर चमत्कार करीत नाहींत. पण त्यांच्या आयुष्यांत असे कांहीं प्रसंग येतात कीं त्या वेळीं कांहीं लोकांना चमत्कार दिसतात. श्रीज्ञानदेवांनीं रेड्याच्या तोंडून वेद बोलविले, मातीची भिंत चालविली वगैरे जे चमत्कार झाल्याचें आपण ऐकितों त्यांचेसंबंधीं खरा प्रकार काय झाला असेल तो असो. पण ते कांहीं तरी आणीबाणीच्या प्रसंगानें घडून आलेले दिसतात. जेव्हां श्रीज्ञानदेवांनीं रेड्याकडून ( दोन शिंगांच्या पशूकडून असो अथवा विनशिंगांच्या नरपशूकडून असो ) वेद बोलविले तेव्हां एका बाजूला दुराराध्य व सत्ताधारी कर्मठ ब्रह्मवृंद असून दुसरीकडे समाजानें दलित समजलेलीं, दीन दुबळीं पण परम नैष्ठिक निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई हीं अल्पवयी भावंडें होतीं. त्यामुळें तमोगुणप्रधान व सत्वगुणप्रधान अशा परस्परविरोधी दोन संस्कृतींमध्यें झगडा उत्पन्न झाला होता. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं दुष्टसंहरण व शिष्टउद्धरण करणारी भक्तहृदयीं गुप्त रूपानें वसत असलेली भगवंताची अवतारशक्ति प्रगट होत असते. श्रीज्ञानदेवांनीं जेव्हां भिंत चालविली तेव्हांहि चौदाशें वर्षें योगसाधन केल्यानें अहंकाररूपी वाघावर स्वार होऊन व मदमत्सररूपी सर्पाचा चाबूक हातीं घेऊन योगबलाढ्य व तमोगुणानें ज्यांची विवेकदृष्टि अंध झाली होती असे चांगदेव सत्वगुणाच्या जणूं मूर्तिच अशा निवृत्तिप्रभृति भावंडांना आपल्या अद्भुत योगसामर्थ्यानें दिपवून टाकून अजिंक्यपत्र घेण्याकरितां आले होते. म्हणजे या प्रसंगींहि तमोगुण व सत्वगुण यांचेमध्यें द्वंद्व सुरू होऊन सत्वाचाच विजय झाला. जगाला थक्क करून सोडणारे चमत्कार हे उठल्या बसल्या, जनमनरंजनार्थ होत नसून आणीबाणीच्या प्रसंगीं होत असतात व त्यांच्या योगानें धर्मसंस्थापनेचें व भक्तरक्षणाचें भगवंताचें ब्रीद प्रस्थापित होत असतें.

## श्रीपंतांना दिसलेले कांहीं चमत्कार

तसेंच एखादे वेळीं एखाद्या मनुष्यानें दुराग्रहानें अथवा दुष्टाव्यानें एखाद्या साधु पुरुषाचा छळ केला असतां त्या साधूच्या साधुत्वाला कस लागतो व त्या निंदकाचा भक्त बनतो. श्रीतुकाराममहाराजांच्या चरित्रांत असे प्रकार पुष्कळ झालेले आढळतात. श्रीपंतांना श्रीबालमुकुंदांच्या कृपेचा जो लाभ झाला तो चमत्कारानेंच झाला. ते आपली निंदा करितात म्हणून श्रीबालमुकुंदांनीं त्यांना शाप देऊन लगेच उःशाप दिला व त्याचा ताबडतोब श्रीपंतांवर परिणाम होऊन ते श्रीबालमुकुंदांच्या दर्शनाला गेले आणि त्यांचे शिष्य झाले. हा श्रीपंतांच्या चरित्रांतील अत्यंत महत्वाचा चमत्कार होय. कारण त्यांनीं आपल्या समजुती व पूर्वग्रह यांच्यामुळें ज्याला "ढोंगी, जोगडा व कर्मभ्रष्ट" ठरविलें होतें तोच पुढें स्वानुभवानें " भवसागरतारक जोगी " ठरला.

१८८३ ते १८८५ या सालांत श्रीपंतांनी जे लेख लिहिले त्यांमध्यें आपल्याला

कांहीं आश्चर्यकारक अनुभव आल्याचा त्यांनीं उल्लेख केला आहे. त्यांपैकीं, (१) त्यांचा गुरुबंधु गोपाळ श्रीपाद भागोजीकोप याला वारंवार अवस्थांतरीं विलक्षण देखावे दिसत व श्रीदत्तात्रेयांचें दर्शन होऊन श्रीपंतांना सांगण्याकरितां संदेश मिळत व (२) श्रीबालावधूत-अवतारी दत्तात्रयस्वामींच्या कृपेनें त्यांना अद्‌भुत विश्वरूपदर्शन झालें होतें हे अनुभव मुख्य होत; यासंबंधीं प्रकरण १९ मध्यें विवेचन केलेंच आहे. "विश्वरूपदर्शन हें 'ॐ श्री' दुर्बिणीच्या साह्यानें घडतें" असें श्रीपंतांनीं म्हटलें आहे (पु. ३-२२६) व 'प्रेमतरंग' व 'आत्मज्योति' या लेखांत व इतर पुष्कळ ठिकाणीं 'ॐ श्री' चा अर्थ उघड करून दाखविला आहे. श्रीपंतांनीं वर्णन केलेली ही जी 'ॐ श्री' ची दुर्बिण तिलाच दिव्य चक्षु अथवा ज्ञाननेत्र म्हणतात. श्रीमद्भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायांत योगेश्वर श्रीकृष्णानें अर्जुनाला अद्‌भुत, रम्य व रोमांचकारी विश्वरूपदर्शन करविल्याचें जें सुंदर वर्णन केलें आहे त्यामध्येंहि भगवंतांनीं अर्जुनाला साध्या डोळ्यांनीं विश्वरूप पाहातां येणार नाहीं म्हणून "दिव्य चक्षु" दिला व त्याच्या साह्यानें त्याला विश्वरूप दर्शन घेतां आलें असें सांगितलें आहे. विश्वरूपदर्शनाचा प्रसंग हा श्रीमद्भगवद्गीतेंतील अत्यंत अद्‌भुत व मनुष्याची मति कुंठित करणारा भाग होय. पण त्या विश्वरूपदर्शनरूपी अद्‌भुत चमत्काराचा अर्जुनावर परिणाम मात्र असा झाला कीं तो अत्यंत भयभीत होऊन व त्याचा कंठ दाटून येऊन त्यानें कांपत कांपत हात जोडून गीता अध्याय ११ श्लोक ३६-४६ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें भगवंताची अनन्यभावानें स्तुति करून चतुर्भुज रूप दाखविण्याची विनंति केली. श्रीपंतांनींहि आपली स्थिति कांहींशी तशीच झाल्याचें सांगितलें आहे. योगेश्वर भगवान् श्रीकृष्ण व त्यांचा भक्त व सखा अर्जुन या जगद्वंद्य व थोर विभूतींचे अनुभव बाजूला ठेविले तरी साधारणपणें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं आत्मानुभव घेऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक साधकाला 'सर्व कर्ता करविता परमेश्वर आहे' अशी खात्री होईल असा प्रसंग केव्हांना केव्हां तरी आल्याशिवाय राहात नाहीं. कारण "मी नाहीं, तूं आहेस"; "त्वमेव सर्वं मम देव देव" अशी प्रत्यक्ष अनुभवानें मनुष्याची खात्री झाल्याशिवाय त्याचे ठिकाणीं सर्वात्मभाव बाणत नाहीं. नुसत्या विचारानें हा सिद्धांत बुद्धीला पटेलहि, पण तो अंगीं भिनण्यास तशा प्रसंगांतूनच जावें लागतें. श्रीपंतांनाहि कधीं कधीं असे प्रसंग येत व अशा प्रसंगीं "पूर्ण चकित दत्त पडला चरणीं । नेणे केव्हां उठावें" (द. प्रे. ल. १५५०); "विश्वनाटकसूत्रधार तूं खूण बाणली मजला । अनन्य भावें भजतों तुजला" (द. प्रे. ल. २४६६) असे त्यांनीं त्या त्या वेळच्या अनुभवांच्या खुणेचे उद्गार काढले आहेत आणि विश्वरूपदर्शनाला "चिद्विलास गारुड" म्हटलें असून "गारुड तुझें नकळे सद्‌गुरु । तटस्थ वृत्ति जाहली" (द. प्रे. ल. ७६९) असें म्हटलें आहे. चमत्कृतिजनक अनुभव श्रीपंतांना १८८६ पर्यंत मधुन मधुन येत असत व कणबर्गीच्या डोंगरावर अगर इतर विजन स्थळीं कांहीं चमत्कार घडल्याचाहि प्रकरण २४ मध्यें उल्लेख केला आहे. पण पुढें त्यांच्या स्वानुभूतिरूपी सरितेचा ओघ सपाट प्रदेशांतून संथपण वाहूं लागला आणि गुरुप्रेम व

तत्वबोध यांच्यावर त्यांचा विशेष भर असे. मात्र सद्गुरूच्या कृपेनें त्यांना जें चिद्विलास-गारूड दिसत होतें त्याचें त्यांनीं अखेरपर्यंत वारंवार वर्णन केलें आहे.

## श्रीपंतांच्या शिष्यांना दिसलेले कांहीं चमत्कार

येथपर्यंत गुरुपुत्राच्या भूमिकेवरून श्रीपंतांना जे कांहीं विलक्षण अनुभव आले त्यांचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. आतां सद्गुरु या नात्यानें त्यांचा जो हजारों लोकांशीं संबंध आला त्यामुळें त्यांच्या शिष्यांना काय काय चमत्कार दिसले तें पाहूं. श्रीपंत स्वतः चमत्कारांना मुळींच महत्व देत नसत. त्यांचें बोधखड्ग नेहमीं परजलेलें असे. त्यांचेजवळ कल्पिताला मुळींच मान नसे आणि एखाद्या शिष्यानें आपल्याला कांहीं चमत्कार दिसल्याचें सांगितल्यास त्या चमत्काराची फोड करून व ती सहज घड-णारी गोष्ट आहे असें सांगून ते त्याची ती समजूत दूर करीत. श्रीपंतांचें वाचन दांडगें व विचारशक्ति फार बलवत्तर असून विचारसरणी तर्कशुद्ध व सरळ होती. त्यामुळें कोणीं कांहीं खुळचट कल्पना काढल्यास ते त्यांचें ताबडतोब छेदन करीत.

सद्गुरूचा बोध होणें म्हणजे शिष्याच्या जीवनांतील अत्यंत महत्वाचा क्रांतिकारक प्रसंग होय व श्रीपंतांनींहि "सद्गुरुकृपें बोधप्राप्ति । द्विजन्म हाची" (द. प्रे. ल. १७६९) असें म्हटलें आहे. आणखी एके ठिकाणीं 'सद्गुरूचा बोध म्हणजे भक्ताच्या हृदयग्रंथीवर पडलेला घालाच होय' असें सांगून या घाल्यानें आपल्या अंतःकरणांत कशी दाणादाण उडवून दिली तें श्रीपंत पुढीलप्रमाणें सांगतात " सद्गुरूचा घाला आला । भेदभाव समूळ गेला ॥ १ ॥ पंचविसांचा संग तुटला । सोऽहंचाही भंग झाला ॥ २ ॥ नेणिवेची वाढ खुंटली । जाणिवेची वृत्ति सुटली ॥ ३ ॥ तुर्यातीत भाव गेला । महाप्रकाशीं प्रणव भरला ॥ ४ ॥ बालमुकुंदसंग घडला । निजानंदीं दत्त बुडाला ॥ ५ ॥ " (द. प्रे ल. ८६७) 'तत्त्वमसि' बोधाचा शिष्यहृदयीं प्रवेश झाला म्हणजे ज्या भ्रमरूपी चरकांत शिष्याचा हात गुंतलेला असतो त्या चरकाला उलट गति मिळण्यास सुरवात होते व त्याला अननुभूत अशा शुद्ध प्रेमाचा अनुभव येऊं लागून विचारांची पहाट फुटते आणि आस्ते आस्ते चित्ताचा ओढा सद्गुरूकडे अथवा स्वस्वरूपाकडे लागतो. अशा रीतीनें त्याच्या अंतःकरणांत एक प्रकारचें नवीन अनुभवांचें दालनच खोलल्याप्रमाणें होतें. जरी सद्गुरूची देणगी सर्वांना सारखीच असते तरी अनुग्रह घेणाराची बुद्धि जितकी शुद्ध व निष्काम असेल तितके त्याचे अनुभव उज्वल व बलवत्तर असतात. निरनिराळे शिष्य आपापल्या मनोरचनांप्रमाणें श्रीपंतांकडे पाहात असत व त्या त्या प्रमाणें त्यांना अनुभव येत. म्हणून श्रीपंतांनीं एके ठिकाणीं " कामुक जनां विषयहि देतों । निष्कामा चाहातों " ( द. प्रे. ल. ६३१ ) असें म्हटलें आहे. कोणाची कशीहि दृष्टि असली तरी श्रीपंत आणि त्यांचे शिष्य यांचे मध्यें एक प्रकारचा जिव्हाळ्याचा व चमत्कृति-जनक संबंध उत्पन्न होत असे. श्रीपंतांच्या बोधाचा एक विशेष हा असे कीं तो उघड, सडेतोड व निरपेक्षतेनें केलेला असल्यामुळें व " निष्काम भजनीं धरीरे दृढ प्रीति " ( द. प्रे. ल. २३७ ) असें त्यांचें प्रत्येकाला सांगणें असल्यामुळें त्यांच्या बोधाच्या शुद्ध

प्रकाशाच्या झोतांत शिष्यांच्या ठिकाणच्या ऐहिक सुखाबद्दलच्या इच्छा, आशा अगर वासना वृद्धिंगत होण्याऐवजीं त्या मरण्याच्या पंथाला लागत व त्यांच्यांशीं कोणतीहि क्षुद्र स्वरूपाची मागणी उघड रीतीनें मागण्याची कोणालाहि फारशी हिंमत होत नसे. तत्वबोध व चमत्कार हे सहसा एकत्र नांदत नाहींत. साधारणपणें चमत्कार हे संकुचित दृष्टीला दिसत असतात व मनुष्याच्या बुद्धीचा विकास करणें व त्याची दृष्टि व्यापक करणें हें कार्य बोध करीत असतो.

श्रीपंत व त्यांचे शिष्य यांचे मध्यें व्यावहारिक अथवा ऐहिक फायद्याचा फारसा संबंध न राहातां अंतःकरणाच्या देवघेवचिाच संबंध असे. त्यामुळें प्रत्येक शिष्याला आपलें स्वतःचें व श्रीपंतांचें जीवित चमत्कृतिपूर्ण वाटे. कारण प्रत्येक खेपेला तो श्रीपंतांकडे जाई तों त्याला नवीन नवीन असे अनुभव येत. सर्वसाधारण स्वरूपाचे अनुभव म्हणजे त्यांना त्रिकालज्ञान असावें, त्यांना आपलें मनोगत कळत असावें, त्यांना लांबच्या गोष्टी दिसत असाव्या असें प्रत्येकाला वाटे. त्यांपैकीं श्रीपंतांना शिष्याचें मनोगत समजत असावें अशा समजुतीनें बापू अभ्यंकरानें त्यांना प्रश्न केला असतां त्यांनीं काय उत्तर दिलें तें प्रकरण ३६ मध्यें सांगितलें आहे. तसेंच प्रकरण ४५ मध्यें त्यांच्या त्यांच्या घरीं अडचणी असल्यामुळें श्रीपंतांनीं कांहीं शिष्यांना आग्रहानें पाठवून दिलें व या गोष्टीचें वर्म मागाहून त्यांच्या लक्षांत आलें यासंबंधीं उदाहरणें दिलीं आहेत. श्रीपंतांचे एक शिष्य मंगेशराव गुंजीकर हे दत्तदर्शन व्हावें म्हणून गाणगापुरास गेले व त्यांनीं गुरुचरित्राचा सप्ताह सुरू केला. पहिल्या शनिवारीं आपल्याजवळ खुर्चीवर बसलेले श्रीपंत त्यांना दिसले; पण त्यांना दत्तदर्शन झालें नाहीं. तेव्हां त्यांनीं पुन्हां सप्ताह सुरू केला. दुसऱ्या शनिवारींहि दत्तदर्शन न होतां श्रीपंतांचेंच दर्शन झालें. म्हणून त्यांनीं पुन्हां सप्ताह सुरू केला; पण तिसऱ्या शनिवारींहि श्रीपंतांचेंच दर्शन झालें. तरी समाधान न झाल्यानें त्यांनीं आणखी एक दोन सप्ताह केले; पण कोणाचेंच दर्शन झालें नाहीं. तेव्हां कंटाळून ते श्रीपंतांकडे आले. त्यांना पाहातांच “ पंत असतात तेथें दत्त नाहीं म्हणून गाणगापुरास गेला होतास, तर तेथें काय दर्शन झालें रे ? ” असें श्रीपंतांनीं विचारलें व मंगेशरावांनीं झालेला सर्व प्रकार सांगितला. तेव्हांपासून श्रीपंतांच्या अधिकारासंबंधीं त्यांची खात्री झाली. (पु. ८-१५४) शिष्यांना पडलेलीं स्वप्नें प्रथम भेटींतच श्रीपंत सांगत असा पुष्कळांना अनुभव येत असे. स्वप्नांत दृष्टांत होऊन कांहीं जणांना न्यायकोर्टांत चालू असलेले आपले दावे आपल्यासारखे झाल्याच्या व कांहीं जणांना आपला मुलगा, भाऊ अगर दुसरा कोणीतरी आप्त परीक्षेंत पास झाल्याच्या वगैरे प्रकारच्या सूचना मिळत असत. १९०१ सालीं काका घाणेकरांच्या पुतण्याला प्लेग होऊन सर्वांची निराशा झाली. तेव्हां काका संडासांत जाऊन दुःख करीत बसले. तों “ रोगी मरत नाहीं ” हे शब्द त्यांचे कानीं पडले व पुढें ते खरे ठरले.

एकदां काका घाणेकर बेळगावास श्रीपंतांच्या घरीं उत्सवाला येण्याकरितां

धारवाडाहून निघाले व वाटेंत काम असल्यामुळें थांबले. तें काम आटोपण्यास उशीर झाल्यामुळें त्यांना उत्सवाला हजर राहाणें शक्य नव्हतें. म्हणून ते धारवाडास परत जाण्याकरितां पायींच निघाले व रात्र पडली. तेव्हां एका अस्वलानें त्यांना वाटेंत गाठलें. त्या वेळीं दुसरें कोणी त्यांच्याबरोबर नव्हतें. पण न घाबरतां " देवा, दत्ता, तुझा उत्सव पाहाणें तर मला घडलें नाहीं, म्हणून या रूपानें तूं दर्शन देण्यास आलास; बरें झालें " असें म्हणून ते अस्वलाच्या पायां पडले व निर्भान झाले. तों त्यांना बेळगावास श्रीपंतांच्या घरीं चाललेला उत्सवांतील सर्व भजनसोहाळा दिसला. कांहीं वेळानें ते भानावर येऊन पाहातात तों अस्वल नाहीं व कांहीं नाहीं. तसेंच एके दिवशीं संध्याकाळीं काका कचेरींतून घरीं परत आल्यावर माडीवरील गच्चींत फेऱ्या घालीत असतां " आतांच्या आतां घर सोड " असा ध्वनि त्यांचे कानीं पडला. तेव्हां ते जरा चपापले. पण ते पूर्ण नैष्ठिक व एकधोरणी असल्यामुळें, ज्या अर्थीं कांहीं कारण नसतां हा ध्वनि जागेपणीं आपल्या कानीं आला आहे त्या अर्थीं, ही कांहीं तरी भयाची सूचना आहे असें वाटून घरांतील सर्व मंडळींनीं रात्रीं निजण्यास दुसऱ्या कोठें तरी जावें असें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें घरांतील माणसांना सांगितलें. पण त्यांचा काकांच्या बोलण्यावर विश्वास बसेना व त्यांनीं पुष्कळ आढेवेढे घेतले. अखेर " तुम्ही येत नसाल तर मी एकटा तरी जाणार " असें जेव्हां काकांनीं निश्चितपणें सांगितलें तेव्हां नाइलाज होऊन घरांतील सर्व माणसें दुसरीकडे झोपण्यास गेलीं. ते दिवस पावसाचे होते व त्या रात्रीं मुसळधार पाऊस पडला. दुसरे दिवशीं सकाळीं काका घरीं जाऊन पाहातात तों घराच्या मागल्या बाजूची सर्व भिंत पावसानें कोसळून जवळच असलेल्या विहिरींत पडल्याचें त्यांना आढळून आलें व अशा अनपेक्षित रीतीनें भयसूचना मिळाल्याबद्दल त्यांना श्रीपंतांबद्दल कृतज्ञता वाटली आणि त्यांच्या घरांतील माणसांनाहि काकांच्या एकनिष्ठ भक्तीचा अनुभव आला. एकदां वकीलीच्या कामाकरितां काका हानगलास गेले होते. धारवाडास परत येतांना रात्र झाल्यामुळें ते, पक्षकार व गाडीवाला असे बैलगाडींत बसून चालले. रात्रीं तिघांनाहि झोपा लागल्या व गाडीचे बैल रस्ता सोडून बाजूला वळले आणि गाडीसह एका तळ्यांत शिरले. पुढें जेव्हां गाडी पाण्यांत जाऊन काकांच्या अंगाला पाणी लागलें, तेव्हां ते जागे होऊन पाहातात तों बैल व गाडी पाण्यांत तरंगत असल्याचें त्यांना आढळून आलें. त्या वेळीं रात्रीं दोन वाजले होते. तेव्हां ते घाबरले व त्यांनीं श्रीपंतांचें स्मरण केलें, तों असा चमत्कार झाला कीं हातांत कंदील असलेला एक मनुष्य पुढें दिसूं लागला व त्यानें यांची गाडी पाण्याबाहेर काढून दिली आणि आपण निघून गेला. तो इसम कोण कोठला वगैरे यांना कांहींच पत्ता लागला नाहीं.

उचगाव येथील श्रीपंतांचा एक शिष्य एका सर्कशींत नोकर होता. पुढें ती नोकरी सुटून तो बेकार झाला. त्या वेळीं त्याचें वय सुमारें ३५ वर्षांचें असून तो अविवाहित होता व घरांत फक्त त्याची वृद्ध आई होती. "पंतांशीं तूं लग्नाची गोष्ट काढ" म्हणून तिनें त्याच्या मागें सारखा तकादा लावला. तेव्हां त्यानें ती गोष्ट श्रीपंतांकडे

काढली व लग्न होणें नसल्यास आपणास संन्यास देण्यास त्यांना सांगितलें. तेव्हां श्रीपंत म्हणाले " संन्यास घेऊन भीक मागून पोट भरणार काय ? संन्यास घेऊन कुत्र्या-प्रमाणें पोट भरणें तुला शोभत नाहीं. तूं दत्ताचें रात्रंदिवस ध्यान करीत जा म्हणजे तुझें कल्याण होईल." तें ऐकून त्याला धीर आला. पुढें थोड्याच दिवसांनीं त्याला स्वप्नांत एका साधु पुरुषाचें दर्शन होऊन " तुझें लग्न होतें बघ " असा आशीर्वाद मिळाला. तें सांगण्याकरितां तो श्रीपंतांकडे जाणार इतक्यांत त्याच्या एका आप्तानें त्याच्या आईजवळ रु. २०० देऊन एक मुलगी सांगून आल्याचें सांगितलें व पंधरा दिवसांचे आंत त्याचें लग्न झालें. पुढें आईच्या सांगण्यावरून मुलगा होण्याबद्दल त्यानें श्रीपंतां-जवळ गोष्ट काढली व नंतर मुलगा झाला. पुढें श्रीपंत समाधिस्थ झाल्यानंतर त्यानें घर बांधण्यास सुरवात केली. पाया खणून झाला व सुतारकाम झालें, तों जवळचा पैसा संपून गेला. तेव्हां दगड, विटा वगैरेंकरितां लागणारा पैसा कोठून आणावा ही त्याला विवंचना येऊन पडली. तेव्हां एके दिवशीं त्याला श्रीपंतांनीं स्वप्नांत दर्शन देऊन परसांत खणण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें खणण्यास सुरवात केली; तों प्रथम दगडांचा थर लागला व पुष्कळ दगड मिळाले; त्याच्या खालीं विटांचा थर लागला व विटाहि पुष्कळ मिळाल्या आणि त्याच्या खालीं एक विहीर व तिच्या जवळच धुण्याचा एक मोठा दगड सापडला. याप्रमाणें त्याला सद्गुरुकृपेनें गृहस्थाश्रम, मुलगा, घर व विहीर यांचा लाभ झाला.

श्रीपंतांनीं पुष्कळांची भूतबाधा दूर केली व यासंबंधींचीं कांहीं उदाहरणें यापूर्वीं दिलीं आहेत. त्यांनीं सांगितलेल्या युक्तीनें कांहीं जणांचे रोग बरे झाले. श्रीपंतांचे मावस भाऊ डॉ. अण्णप्पा मारीहाळकर व श्रीपंतांचे शिष्य गणपतराव गुमास्ते यांच्या अंगांत ताप फणफणत असतांना श्रीपंतांनीं त्यांना उघडे करून व सर्व अंगाला विभूति लावून टिपरी खेळण्यास उभे केले आणि टिपरी खेळण्याच्या भरांत त्यांचा ताप जो गेला तो कायमचाच! तसेंच एका इसमाला पोटशूळाची फार दिवसांची व्यथा होती व त्यामुळें अन्न मुळींच जात नसे. तेव्हां श्रीपंतांनीं त्याला श्रीदत्ताचा तीर्थप्रसाद देऊन दुधभात खाण्यास सांगितलें व त्याचा पोटशूळ बरा झाला. पुष्प ७ पराग ३३ मध्यें श्रीपंतांनीं या गोष्टीचा उल्लेख करून ' गुरुचरित्रांतील उदरव्यथा बरी झालेल्या ब्राह्मणाच्या गोष्टी-प्रमाणें हा पुनः प्रत्यय आला' असें म्हटलें आहे. (पु. ७-१२२) एकदां श्रीपंत मंडळी-सह जंगलांत गेले असतांना त्यांचेकरितां एक पर्णासन तयार केलें होतें व त्यावर ते बसले होते. कांहीं कामानिमित्त ते आसनावरून उठले व जरा बाजूला गेले. इतक्यांत एक जण त्यांच्या आसनावर बसला. तेव्हां " हें पंतांचें आसन आहे, तुम्हीं येथें बसूं नका " असें त्याला दुसऱ्या एकानें सांगितलें. पण " मी येथें कां बसूं नये ? बसलों तर काय होईल ? हें आसन पंतांकरितां घातलेलें असलें तरी त्यावर आम्ही कां बसूं नये ?" असें त्यानें उत्तर दिलें व आपण तेथून उठला नाहीं. इतक्यांत हजारो बारिक बारिक चावऱ्या मुंग्या जमिनींतून आल्या व त्याच्या धोतरांत व अंगांतील कपड्यांत शिरून

त्याला चावूं लागल्या. त्यांनीं त्याला इतकें भंडावून सोडिलें कीं "पुरे पुरे, या आसनाला नमस्कार असो!" असें ओरडत तो आसनावरून उठला व त्यानें अंगांतील सर्व कपडे काढून टाकिले आणि धोतरहि सोडून टाकिलें! अशा रीतीनें त्याची फजिती झाली व सर्व अंगाला मुंग्या चावल्यानें गांधी येऊन अंगाची आग होऊं लागली! एका दुष्ट मनुष्यानें कांहीं बेरड लोक बरोबर घेऊन श्रीपंतांच्या एका भक्ताला एके दिवशीं रात्रीं काळोखांत एकट्याला गाठलें व त्या बेरडांनीं त्याला गराडा घातला. तेव्हां तो भक्त घाबरला व त्यानें श्रीपंतांचा धावा सुरू केला. तशा स्थितींत त्या दुष्ट मनुष्यानें त्याला मारण्याकरितां लाथ उगारली; पण तितक्यांत त्याला चक्कर येऊन तो जमिनीवर पडला व 'पाणी', 'पाणी' म्हणून मोठ्यानें ओरडूं लागला. त्याबरोबर कांहीं लोक धावून आले व त्यांना पाहातांच ते बेरड पळून गेले. अशा रीतीनें त्या भक्ताच्या जिवावरचें संकट टळलें! नंतर जेव्हां तो बेळगावास गेला तेव्हां त्याला पाहातांच श्रीपंतांनीं त्याला वरील प्रसंगाची आठवण दिली; त्यामुळें चकित होऊन "हें आपणांस कसें समजलें?" असें त्यानें विचारिलें. तेव्हां "त्याच वेळीं मला तें समजलें" असें श्रीपंत म्हणाले.

१८९७ पासून बेळगाव शहर व आजूबाजूचे गाव येथे प्लेग सुरू झाला आणि तेव्हांपासून श्रीपंतांच्या हयातीच्या अखेरपर्यंत व नंतरहि कित्येक वर्षे त्यानें कहर उडविला होता. तशा स्थितींत आपणांस आलेले कांहीं विलक्षण अनुभव श्रीपंतांच्या कांहीं शिष्यांनीं लिहून ठेविले आहेत व ते साधारणपणें 'आपणास प्लेग होऊन सद्गुरूनें अवस्थांतरीं दर्शन देऊन अभय दिल्यानें आपण वाचलों' अशा स्वरूपाचे आहेत.

सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां असें दिसतें कीं चमत्कार हे दिसत अथवा भासत असतात. ते कधीं होत नाहींत. कारण सृष्टींतील सर्व कारभार अत्यंत सुरळितपणें चाललेला आपण पाहातों व त्यांतील एकसूत्रीपणा ओळखणें व हा सर्व एकाच चिच्छक्तीचा विलास आहे अशी अनुभवशीर खात्री होणें ही ज्ञानाची परमावधि अथवा हा ज्ञानाचा कळस होय. या स्थितीलाच सहजस्थिति म्हणतात. "एकचि अनेक स्वरूपें विलसे नाहीं भेदाभेद" (द. प्रे. ल २४१२); "परम पुरुष जगीं एकलाची नांदे" (द. प्रे. ल. १०८७) हा ज्याचा अचल अनुभव व ज्याच्या दृष्टीला जगांत चूक कोठेंच दिसत नाहीं त्याला कोठेंच चमत्कार दिसत नाहीं. पण इतर लोकांचा प्रकार निराळा असतो. एखादा मनुष्य जर भावनाप्रधान असेल तर त्याला त्याच्या भावनेप्रमाणें चमत्कृतिपूर्ण देखावे दिसतात व अनुभव येतात. सत्पुरुषांकडे जाणाऱ्या लोकांमध्यें अशा लोकांचा भरणा फार असतो. त्यामुळें त्यांच्यापैकीं प्रत्येक जण आपापल्या दृष्टिकोनाप्रमाणें निरनिराळे अनुभव घेत असतो. श्रीपंतांकडे येणाऱ्या लोकांतहि असे लोक पुष्कळ होते व प्रत्येकाला त्याच्या अंतःस्थितीप्रमाणें अनुभव येत. जो शुद्ध प्रेमाचा सागर, शुद्ध बोधाचें अपरंपार भांडार व कारुण्याची केवळ मूर्तिच त्याचेपासून क्षुद्र आणि क्षणिक सुख व तें मिळविण्याची साधनें यांची अपेक्षा करणें म्हणजे सर्वसत्ताधारी महाराजाधिराज प्रसन्न झाला असतां त्याचेपासून चणेकुरमुऱ्यांकरितां एक पैसा मागितल्याप्रमाणें होय. त्याचप्रमाणें ॐ श्रीची

दुर्बिण नेत्रांना लावून अनाद्यनंत चिद्विलासगारूड दाखविण्याची अद्भुत जादू ज्याचे-जवळ आहे त्यानें वादीचा सर्प अथवा एखादा क्षुद्र चमत्कार करून दाखविला म्हणून त्याचे गोडवे गाणें ही एक प्रकारें त्याची निंदाच होय. असले क्षुद्र चमत्कार म्हणजे बाळप्पांनीं म्हटल्याप्रमाणें 'केळीं खाणारांना दिलेलीं केळींच ' होत. त्यांना शुद्ध गुरुप्रेमदुग्धाची सर कशी येईल ? म्हणून श्रीपंतांनीं स्वतःच १८८३-८४ च्या सुमारास मागें उल्लेख केलेलें " भलारे गारुडी दत्तावधूत ॥ ध्रु० ॥" ( द. प्रे. ल. ३३ ) हें पद म्हटल्यावर लौकरच पुढील पद म्हणून गुरुपदगोडीपुढें योगाभ्यास करणें, मुद्रा लावणें वगैरे गोष्टींची किंमत काय आहे तें दाखविलें. " जाणों गुरूचे पाय । आम्ही ॥ ध्रु० ॥ योग न जाणों मुद्रा नेणों । नेणों अन्य उपाय ॥ १ ॥ अमृत सांडुनी तक्र पिणें । जळो त्याचा व्यवसाय ॥२॥ सद्गुरु बाळपद सांडुनी । मुक्ति वरूं हाय हाय ॥३॥ " (द.प्रे.ल. ४०) तेव्हां श्रीपंतांच्या कांहीं शिष्यांना आलेले चमत्कृतिजनक वाटणारे जे कांहीं अनुभव वर दिलेले आहेत ते श्रीपंतांचा अधिकार व त्यांचें अलौकिकत्व प्रस्थापित करण्याकरितां नसून केवळ सद्गुरूच्या शुद्ध बोधानें शिष्याच्या हृदयांत जी क्रांति सुरू होते तिच्या योगानें शिष्याला त्याच्या मनोरचनेप्रमाणें कांहीं विलक्षण अनुभव येतात व तसें होणें अपरिहार्य आहे हें दर्शविण्याकरितां होय. हजारो लोकांच्या चित्तवृत्ति आपल्या प्रेमानें आकर्षून घेणारा व बोधप्रकाशानें त्यांचीं अंतःकरणें प्रकाशित करणारा जो चिन्मूर्ति सद्गुरु त्याच्या स्वरूपाचा अथवा अगाध लीलेचा शिष्याला कधीं अंत लागणें शक्य नाहीं; त्यामुळें सर्व शिष्य आश्चर्यचकित होऊन " आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैवचान्यः । आश्चर्यवच्चैनमन्यः श्रृणोति श्रुत्वाप्येनं वेदनचैव कश्चित् " ( भ. गी. २-२९ ) या श्रीमद्भगवद्गीतेंतील श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें अत्यादरानें त्याचेकडे पाहात असतात. बोधरूप व प्रेमरूप सद्गुरु अमूर्त आहे, स्वयंभू आहे, अविनाशी आहे. त्याची शक्ति अपार असून करणी अनंत आहे; त्यामुळें त्याचें अगम्य गौरव शिष्यबुद्धीला अनाकळ होय. तेव्हां त्याचें चरित्रकथन व गुणगान करणे म्हणजे श्रीपंतांच्याच शब्दांत सांगावयाचें तर " नमस्कार गुरु दत्ताला । नमस्कार गुरु-भक्ताला । ॥ धृ ० ॥ अनंत शक्ति अनंत करणी । नमन सत्यज्ञानानंताला ॥ १ ॥ नमस्कार जननस्थितिलया । नमस्कार या जगताला ॥ २ ॥ नमन अनंत बालावधूता । नमन प्रेमळ ' दत्त ' गुरूला ॥ ३ ॥" ( द. प्रे. ल. २१८६ ) हें होय.

# प्रकरण ४९ वें

## गृहस्थ व शिक्षक

मागील पाच सहा प्रकरणांत श्रीपंतांच्या आध्यात्मिक भूमिकेसंबंधीं व त्या भूमिकेवरील कार्यासंबंधीं निरनिराळ्या दृष्टींनीं जें वर्णन केलें आहे त्यावरून त्यांच्या अंतरंगाची वाचकांना चांगली ओळख पटली असेल असा भरंवसा वाटतो. आतां प्रापंचिक अथवा गृहस्थ व शिक्षक या दृष्टींनीं त्यांची राहाणी, स्वभाव, प्रपंच करण्याची हातोटी, विद्यार्थ्यांबद्दलची कळकळ वगैरे गोष्टींचें वर्णन करीत आहोंत.

साधारणपणें १८८१ पासून प्रापंचिक अथवा गृहस्थ व शिक्षक या भूमिकांवरील श्रीपंतांचें कार्य सुरू झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या सालीं त्यांनीं लंडन मिशन स्कूलमध्यें दरमहा रु. २० पगारावर शिक्षकाची नोकरी धरिली व तेव्हांपासून १९०३ च्या जूनपर्यंत त्यांनीं त्याच शाळेंत शिक्षकाचें काम केलें. त्या अवधींत फक्त दरमहा रु. ४५ पर्यंत त्यांच्या पगारांत वाढ झाली. याप्रमाणें जरी आर्थिक दृष्ट्या व्यक्तिशः त्यांची प्रगति अगदीं बेताची झाली तरी स्वतः झीज व त्रास सोसून त्यांनीं अत्यंत कळकळीनें आपल्या भावांना शिक्षण दिल्यामुळें त्यांच्या हयातीच्या अखेरीस गोपाळरावजी कलेक्टर कचेरींत डेप्युटी चिटणिसाच्या जागेवर काम करीत होते, वामनरावजी मुन्सफ होते, नरसिंहरावजी बेळगावांत वकिली करीत होते व शंकरराव एल्एल्. बी. चा अभ्यास करीत होते. त्याचप्रमाणें श्रीपंतांचे मेहुणे शेषो श्रीपाद कुलकर्णी हेहि एल्एल्. बी. चा अभ्यास करीत असून त्यांच्या आप्तेष्टांचीं व स्नेह्यांचीं कित्येक मुलें त्यांच्या देखरेखीखालीं शिक्षण संपादन करून योग्य मार्गाला लागलीं होतीं.

ज्याप्रमाणें श्रीपंतांनीं १८८० पासून शिष्यप्रबोधनकार्याला सुरवात करून अखेरपर्यंत तें चालू ठेविलें व हजारों शिष्यांना ब्रह्मविद्येचें शिक्षण दिलें आणि सद्गुरुभजनसेवेचें व्रत अव्याहत चालवून अध्यात्मविषयासंबंधीं उच्च कोटींतील गद्यपद्यात्मक वाङ्मय निर्माण केलें, त्याचप्रमाणें त्यांनीं शेंकडो तरुणांना त्यांच्या अभ्युदयाचा मार्ग दाखवून व तो त्यांचेकडून गिरवून घेऊन त्यांना स्वावलंबी केलें ही मोठ्या नवलाची गोष्ट होय. एकाच वेळीं अभ्युदय व निःश्रेयस यांचा मार्ग दाखवून देणारा श्रीपंतांसारखा कुशल वाटाड्या फार क्वचितच पाहाण्यांत येतो. देहादि जग हें नश्वर आहे, संसार पापमूलक व खोटा आहे म्हणून त्याचा त्याग करावा अशा प्रकारचा नाउमेद करणारा उपदेश त्यांनीं कधींच केला नाहीं. तर उलट प्रत्येकानें आपापली परिस्थिति ओळखून आपल्यावरील विविध प्रकारच्या कर्तव्यांची व जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवून आणि अत्यंत दक्षतेनें वागून अभ्युदय व निश्रेयस या दोहोंचीहि प्राप्ति करून घ्यावी असें त्यांचें आग्रहाचें

व कळकळीचें सांगणें असे. एके ठिकाणीं सद्गुरूला उद्देशून त्यांनीं पुढीलप्रमाणें प्रेमाचा टोमणा मारला आहे " ही नवखंड पृथ्वी ( देहाभिमान ) सोडून तूं श्रीशैल्यशिखरीं वस्ति केल्यानें सबंद नवखंड पृथ्वी ओसाड पडली; तर ती ओसाड पडून काय कामाची ? पृथ्वीवर खेळ कीं, जन उद्धरतील. शिखरावर तुझा तूं एकटाच बसलास. पण त्यायोगें जगावर काय उपकार केलेस ? " ( पु. ७-२१९ ) ' संसाराचें हें अनादि चक्र कोणीं सैतानानें अथवा वेताळानें अज्ञ जीवांना भोवांडण्याकरितां व दुःख देण्याकरितां निर्माण केलेलें नसून तो चिच्छक्तीचा विलास आहे व या चिद्विलास-नाटकांत प्रत्येकानें आपली भूमिका योग्य तऱ्हेनें बजावली पाहिजे ' असें त्यांचें आग्रहाचें सांगणें असे. एके ठिकाणीं ते म्हणतात " प्रत्येक प्राणि हा या विश्वरंगभूमीवरील सोंग आहे. ××× या विश्वनाटकांत प्रत्येकाला निरनिराळीं कामें निरनिराळ्या वेळीं नेमलेलीं आहेत. तें कर्तव्य नीट रीतीनें बजावून प्रेक्षकांना व आपल्याला संतोष उत्पन्न करीतच सोंगाचें विसर्जन करावें हा विहित मार्ग. तो सोडून व प्रेमाचें विस्मरण पडून मूळ स्थिति व मूळ स्वरूप व सहज उद्देश हीं लक्षांत न राहून प्रेमाचेंच बिघडलेलें स्वरूप जो मोह त्याच्या तडाक्यांत सांपडून प्राणि तडफडतो आणि खेळाचा बेरंग करून आपल्यास व आपणास पाहणाऱ्यांना दुःख देऊन दुःखानेंच निघून जातो. अनुच्छिष्ट प्रेमळ सद्गुरूच्या प्रेमळ स्फूर्ति–उदरांत त्याच्याच प्रेमभोगानंदभरांत उदय पावून, त्याचें शुद्ध प्रेम–विश्व–अंकावरच प्रेमानंद–स्तनपान करीत, पुन्हां त्या अद्वितीय प्रेमसागरीं लीन होऊन जाणें हा या सोंगाचा अनाद्यनंत व्यवहार चालला आहे. हा सहजानंद–चिद्विलास आहे. " ( पु. ५–८९ )

## प्रेमाचे कौटुंबिक संबंध

श्रीपंत हे एक कुटुंबवत्सल गृहस्थ होते. त्यांचें कुटुंब मोठें होतें. त्यांना मातृ–पितृघराण्यांतील वडील माणसांबद्दल फार पूज्यभाव व आदर वाटत असे. त्यांचे वडील १८८६ सालीं अकस्मात निवर्तले. त्यामुळें त्यांच्या सहवासाचा श्रीपंतांना फारसा लाभ झाला नाहीं. पण त्यांचे आजोबा बाळकृष्णपंत हे मात्र १८९४ पर्यंत हयात होते. श्रीपंतांना आजोबांबद्दल किती आदर वाटत असे हें त्यांनीं आजोबांना संन्यास देऊन त्यांच्या चतुर्थाश्रमाला साजेसें जें चिरस्मरणीय स्मारक करून ठेविलें त्यावरून स्पष्ट दिसून येतें. तसेंच आपल्या या ज्येष्ठ नातवाबद्दल बाळकृष्णपंतांना किती विश्वास वाटत असे हें त्यांनीं २०–११–१८९० रोजीं मृत्युपत्रवजा लिहून ठेविलेल्या लेखाचा जो भाग प्रकरण २७ मध्यें उद्धृत केलेला आहे त्यावरून समजून येतें. तसेंच श्रीपंतांनीं आपल्या मातुल घराण्यांतील वडील माणसांमधील भाऊबंदकीचा तंटा सलोख्यानें मिटविला या एकाच गोष्टीवरून त्या सर्वांचा त्यांच्यावर किती विश्वास होता तें दिसून येतें. श्रीपंतांना आपल्या मातोश्रींबद्दल अत्यंत पूज्यता वाटत असे व त्यांच्या हयातीच्या अखेरपर्यंत त्यांना मातृसुख लाभलें. श्रीपंतांच्या मातोश्री म्हणजे सौजन्याची जणूं मूर्तिच

होती. त्या प्रापंचिक गोष्टींत फारसें लक्ष घालीत नसत. श्रीपंत व त्यांच्या मातोश्री यांचेमधील संबंध कसे जिव्हाळ्याचे होते हें प्रकरण ४२ मध्यें दाखविलेंच आहे. श्रीपंतांच्या आध्यात्मिक वैभवाची त्यांच्या मातोश्रींना फारशी कल्पना नव्हती. आपला 'दत्तू' श्रीदत्ताची भक्ति करितो व त्याला पूज्य मानून पुष्कळ भक्त त्याचेकडे येतात एवढें मात्र त्यांना माहीत होतें. त्या श्रीपंतांच्या प्रकृतीला फार जपत व त्यांना जागरण झालें किंवा ते फार वेळ बोलत बसले म्हणजे मातोश्रींना त्यांच्या प्रकृतीसंबंधीं फार काळजी वाटत असे. श्रीपंत एक प्रकारें नादी होते; म्हणजे भक्तमंडळी जमून भजन सुरू झालें किंवा ते बोध करूं लागले म्हणजे त्यांना वेळाचें अवधान राहात नसे; त्यामुळें कित्येक वेळां निजण्यास फार उशीर होई. एके दिवशीं असें झालें कीं रात्रीं श्रीपंतांच्या घरीं बरीच मंडळी जमली होती व भजनाला रंग आला होता. बारा वाजून गेले तरी श्रीपंत उठेनात; इकडे मातोश्रींचा जीव थोडथोडा होऊं लागला. अखेर त्यांनीं नरसूला हाक मारून सांगितलें कीं " रात्र फार झाली; दत्तू अजून उठत नाहीं. त्याची प्रकृति बिघडेल. जा त्याला उठीव." त्याबरोबर नरसिंहराव श्रीपंतांजवळ गेले व "दत्तू, रात्र फार झाली. उठ. आईला तुझ्या प्रकृतीसंबंधीं फार काळजी वाटत आहे " असें त्यांनीं श्रीपंतांना सांगितलें. तेव्हां " आणखी एक दोन पदें होऊं देत " असें श्रीपंत म्हणाले व त्यांचा लवकर उठण्याचा बेत दिसेना. त्यामुळें नरसिंहरावांना राग आला व श्रीपंतांच्या हातांतील एकतारी हिसकून घेऊन " आतां भजन पुरे " असें त्यांनीं त्यांना सांगितलें. पण तशा ऐन रंगांत नरसूनें भजनांत व्यत्यय आणिला असतांहि यत्किंचित्‌हि न रागावतां श्रीपंतांनीं त्याला प्रेमानें कवटाळून धरिलें व लगेच उठून ते निजावयास गेले. आईच्या सांगण्यावरून नरसिंहरावांना आलेला सात्विक संताप व त्या संतापाच्या भरांत त्यांनीं भजनांत व्यत्यय आणिला असतांहि त्या गोष्टीचा राग न मानितां श्रीपंतांनीं त्यांना प्रेमानें व कौतुकानें मिठी मारणें या गोष्टींवरून त्या दोघांच्या मातृभक्तीची व परस्परांमधील अकृत्रिम प्रेमाची साक्ष पटते. श्रीपंतांप्रमाणें त्यांचे सर्व बंधुहि कट्टे मातृभक्त होते. श्रीपंतांचे आपल्या भावांशीं अखेरपर्यंत फार जिव्हाळ्याचे संबंध होते हें मागें सांगितलेंच आहे. त्यांतल्या त्यांत कौतुकाची गोष्ट म्हणजे वामनराव व नरसिंहराव हे बी. ए. एल्. एल्. बी. व शंकरराव बी. ए. झालेले असूनहि त्यांच्या ठिकाणच्या श्रीपंतांसंबंधींच्या पूज्यभावांत यत्किंचित्‌हि ढळ झाला नव्हता ही होय. आपले धाकटे भाऊ इतके शिकले असूनहि विनयशील व आज्ञाधारक असल्याचें पाहून श्रीपंतांनाहि फार कौतुक वाटत असे व एकदां सहज बोलण्याच्या ओघांत त्यांनीं त्यांच्यासंबंधीं पुढील गौरवपर उद्गार काढले आहेत " जो मर्यादशील असेल तो सर्वप्रिय होतो, सर्वांचा आवडता होतो. आमचा नरसूच पाहा. आमच्या लोकांना गर्व अगदीं सहन होत नाहीं. समता व लीनता आम्हांला आवडतात. " ( पु. ७–४७ ) तसेंच आणखी एके ठिकाणीं श्रीपंत म्हणतात " गुरुकुलीं सज्जन बंधु आहेत. या दिवसांत कोणी थोडेसें इंग्रजी शिकला असला म्हणजे गर्विष्ठ होतो. पण आमचे येथें वामन वगैरे पाहा. किती निगर्वी, किती मोकळे आहेत ! " ( पु. ७–१२५ ) श्रीपंतांनीं

शुद्ध प्रेमानें व निःस्वार्थीपणानें आपल्या बंधूंचें प्रापंचिक व पारमार्थिक दृष्ट्या कोट कल्याण केलें ही गोष्ट तर खरीच; पण धाकट्या बंधूंनीं आंग्लविद्याविभूषित होऊनहि आपल्या सद्वर्तनानें व सौजन्यानें वडील बंधूकडून अशा प्रकारचें शिफारसपत्र मिळविणें ही फार महत्वाची व कौतुकाई गोष्ट होय. ज्याप्रमाणें श्रीपंतांचें आपल्या भावांवर अकृत्रिम प्रेम होतें त्याप्रमाणें आपल्या बहिणींवरहि होतें व त्यांच्या बहिणींना आणि त्यांच्या कुटुंबीयांनाहि श्रीपंतांची हरएक प्रकारची मदत होत असे. त्यांच्या बहुतेक भाच्यांचें शिक्षण त्यांचे जवळ राहून त्यांचे देखरेखीखालींच झालें आणि ते सर्व सुस्थितींत आहेत. त्यांतल्या त्यांत प्रकरण २७ मध्यें ज्यांचा उल्लेख केला आहे त्या श्रीपंतांच्या भगिनी गंगावा, मरिकट्टी येथील बंडो सांभाजी कुलकर्णी यांचें कुटुंब, यांच्याकडे त्यांचें विशेष लक्ष असे व श्रीपंतांच्या पश्चातहि त्यांच्या बंधूंनीं तेंच धोरण कायम ठेविलें होतें. गंगावा या अखेरपर्यंत आपल्या बंधूंच्या घरींच राहात असत व थोड्या दिवसांपूर्वीं त्यांनीं इहलोकची यात्रा संपविली.

श्रीपंतांचें कुटुंब सौ. यमनाक्का या त्यांच्या कार्याला पूर्णपणें अनुकूल असून सुगृहिणीपदाला सर्वस्वीं योग्य होत्या. त्यांच्या निधनानंतर श्रीपंतांनीं त्यांच्यासंबंधीं काढिलेले प्रसंशोद्गार या गोष्टीची स्पष्ट साक्ष देत आहेत. तसेंच सौ. यमनाक्कांच्या पश्चात एकदां आपल्या शिष्यमंडळीशीं बोलत असतांना श्रीपंतांनीं सौ. यमनाक्कांचें गुणवर्णन करितांना " माउली फार चांगली होती. माझा मार्ग चालविण्याचे कामीं मला तिचा फार उपयोग होत होता" असे उद्गार काढले होते.

## निराश्रितांना आश्रय

याप्रमाणें श्रीपंतांचे सर्व कौटुंबिक संबंध अशा प्रकारचे होते कीं, कोठेंहि भिन्न सूर निघत नव्हता. घरांतील कर्त्या पुरुषाला वडील व धाकट्या सर्व कुटुंबीयांची इतकी अनुकूलता असणें ही गोष्ट भाग्याची तर खरीच, पण तिच्यावरून त्या पुरुषाच्या ठिकाणच्या सौजन्य, सुस्वभाव, निःस्वार्थीपणा, प्रेमळपणा वगैरे गुणांचीहि साक्ष पटते. तसेंच या गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, श्रीपंतांच्या घरांतील सर्व कारभार एकसूत्रीपणानें व जुटीनें चालत असल्यामुळें त्यांचें अन्नदानाचें व ज्ञानदानाचें कार्य फार सुकर झालें आणि शेकडो नव्हे हजारो लोकांना त्याचा फायदा घेतां आला.

श्रीपंतांची जसजशी भरभराट होत गेली तसतसा त्यांच्या भोवतालचा परिवारहि वाढत गेला. त्यांचेकडे शिक्षणाकरितां राहाणाऱ्या विद्यार्थ्यांखेरीज ज्यांना कोठें फारसा आश्रय नव्हता अशीं कांहीं मोठीं माणसेंहि त्यांचेकडे येऊन राहात. दड्डी येथील गंगाधरभट भुजंगभट जोशी यांचेवर १८८२ च्या सुमारास श्रीपंतांचा अनुग्रह झाला होता. पुढें त्यांना गांजा ओढण्याचें व्यसन लागून त्यांचें डोकें फिरलें व ते झाडपाला खाऊन जंगलांत कोठें तरी एकटेच भटकूं लागले. एके दिवशीं एका झाडाखालीं ते निजले असतांना " ऊठ, येथून बेळगावास पंतांचे घरीं जाऊन राहा " असें त्यांना कोणीतरी वारंवार

सांगूं लागलें. हें कोण बोलत आहे म्हणून ते पाहूं लागले; पण कोणी दिसेना. पुढें दोन तीन दिवस तसाच प्रकार चालू होता. अखेर ते बेळगावास श्रीपंतांकडे गेले व त्यांना नमस्कार करून जंगलांत घडलेला प्रकार त्यांनीं श्रीपंतांना सांगितला. तेव्हां श्रीपंतांनीं त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन "आजपासून आमचें घर सोडून कोठें जाऊं नकोस" असें सांगून त्यांना आपले जवळ ठेवून घेतलें. तेथें राहूं लागल्यावर पाच-सहा महिने ते स्वस्थ पडून असत व कोणीहि त्यांचे वाटेस जात नसे. कांहीं दिवसांनीं त्यांचें व्यसन सुटत चाललें व ते श्रीपंतांच्याच घरीं पाणी ओढणें, देवपूजा करणें वगैरे कामें करूं लागले. तरी त्यांच्या लहरी स्वभावामुळें त्यांचेशीं कोणीहि फारसा संबंध ठेवीत नसे पुढें १९०१ सालीं जेव्हां वामनरावांनीं मुनसफीची नोकरी धरेली तेव्हां त्यांच्यासारख्या शांत स्वभावाच्या पुरुषाशीं या रागीट पण एकधोरणी माणसाची लखण घालून दिल्यास दोघां-नाहि तें हितावह होईल असें वाटून श्रीपंतांनीं गंगाधरभटजीना वामनरावांबरोबर पाठ-विलें व तेव्हांपासून श्रीपंतांच्या अटकळीप्रमाणें पुढे अनुभव आला. अशा कित्येक लोकांना श्रीपंतांच्या घरीं आश्रय मिळत असे.

## उत्तम शील व सौजन्य

उत्तम शील व सौजन्य हे गुण श्रीपंतांच्या ठिकाणीं उपजतच होते असें म्हटलें असतांहि चालेल. सामाजिक बंधनें व नीतिमर्यादा हीं अवश्य पाळलीं पाहिजेत असें त्यांचें आग्रहाचें सांगणें असे. एके ठिकाणीं ते म्हणतात "सुविचारी व्यवहाराचा पाया न्याय, नीति, सत्य व सद्गुण यांच्यावर असल्यामुळें सामाजिक सुख मिळतें. हें बंधन सुखकारक व सद्धेतुमूलक आहे. म्हणून सद्वर्तन ठेवून नीतीनें वागावें, सद्गुणश्री अंगीं प्रगट असावी. सद्गुणबंधन जर नसेल तर उच्छृंखल, बेमर्याद, शिमगा, अंदाधुंदी होऊन समाज बिघडेल व अनर्थ होतील. न्यायकोर्टें (फौजदारी व दिवाणी) आहेत तीं पुरणार नाहींत; समाजांत अनवस्था होईल. म्हणून सामाजिक बंधनें हितावह आहेत. त्यांचा अनादर करूं नये. सामाजिक नियम असलेच पाहिजेत." (पु. ७-११३) घरांतील सर्व माणसांच्या नीतिमत्तेकडे श्रीपंतांचें फार लक्ष असे. कोणालाहि कसलेंहि व्यसन असतां कामा नये अशी त्यांची सख्त ताकीद असे व त्याप्रमाणें अंमलबजावणी केली जाई. ते जसे दयाळु होते तसे प्रसंगविशेषीं निष्ठुरहि बनत. एकदां त्यांच्या घरांत राहाणाऱ्या व त्यांच्या भक्तमंडळींत प्रामुख्यानें मिसळणाऱ्या एका इसमाला कांहीं वाईट नाद लागल्याचें श्रीपंतांना समजतांच त्यांनीं त्याच्या इतर गुणांकडे दुर्लक्ष करून त्याला ताबडतोब घर सोडून जाण्यास सांगितलें. एके ठिकाणीं त्यांनीं आपल्या शिष्यांना पुढीलप्रमाणें उपदेश केला आहे "पंताचीं पोरें निदान morality (नीति) उत्तम शिकलीं एवढें तरी होवो. परमहंस होणें बाजूला राहीना कां ? म्हणून पंताच्या पोरांना कोणतेंहि व्यसन असतां कामा नये. बिडी ओढणें देखील नको. तसेंच पंताचीं पोरें रडवीं असूं नयेत; moral and stout (नीतिमान व सुदृढ) असावींत." (पु. ८-७९)

## " सत्यमेव जयते "

श्रीपंत सत्यप्रिय होते. " सत्यमेव जयते "; " नहि सत्यात्परो धर्मः " हीं त्यांचीं ब्रीदवाक्येंच होतीं व तीं टळक अक्षरांनीं लिहून माडीवरील त्यांच्या बसण्याच्या कोचासमोर लाविलेलीं होतीं. थट्टेंतहि खोटें बोललेलें त्यांना खपत नसे. कोणीं चहाडी केली तर त्यांना फार राग येत असे. एकदां त्यांच्या एका शिष्यानें दुसऱ्या एका शिष्याची फार निंदा केली. थोडा वेळ तें निमुटपणें ऐकून घेऊन ते निंदा करणाराला म्हणाले कीं ' परनिंदा ऐकतांना माझे कान बधिर होतात. तो वाईट वागला तर त्याला जनांकडून अपवाद येईल. तूं तसा वागूं नको म्हणजे झालें. तसें झाल्यानें त्यानें तुला बोध केल्याप्रमाणें होईल. " हें उत्तर ऐकून तो निरुत्तर झाला. तसेंच दुसऱ्या एका शिष्यानें कांहीं मंडळींबद्दल खोट्या नाट्या गोष्टी सांगून श्रीपंतांचें मन कलुषित करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांनीं त्याला छड्या मारून शिक्षा केली. त्यांना दुटप्पीपणा, खुनशीपणा, बढाईखोरपणा अशा दुर्गुणांबद्दल तिटकारा वाटत असे. एके ठिकाणीं ते म्हणतात " दुर्गुण कोणतेच असूं नयेत. परमार्थी तसेंच व्यवहारीं पंताचें पोर हुषार, धीट, निर्मळ करणीचें व निर्मळ नावाचें असावें. आपणांत शूरपणा नसल्यास, आपण बुळे, गांडू, स्त्रैण होऊन गेल्यास कोण लोक नम्र होतील ? " ( ८–१४४ )

## जुनें वळण व साधी राहाणी

श्रीपंतांचें वळण जुन्या चालीचें होतें व कोणी नटवेपणा, छानछुकी अगर चैन केल्यास तें त्यांना आवडत नसे. त्याचप्रमाणें गबाळपणा किंवा अस्ताव्यस्तपणाहि त्यांना पसंत नसे. आपली राहाणी साधी व टापटिपीची असावी असें ते म्हणत. घरांतील विद्यार्थ्यांनीं इतकेंच नव्हे तर इतर कोणीहि तमाशाला अगर नाटकाला जाणें त्यांना आवडत नसे. वामनराव वकिली करूं लागल्यावर एके दिवशीं त्यांच्या कांहीं व्यवसायबंधूंनीं नाटकाला जाण्याचें ठरविलें व त्यांना येण्याचा फार आग्रह केला. परंतु त्यांनीं ती गोष्ट नाकारली; पण जेव्हां त्यांच्या न येण्याचें खरें कारण त्यांच्या स्नेह्यांना समजलें तेव्हां त्यांच्यांपैकीं एक दोघांनीं श्रीपंतांकडे जाऊन त्यांना आपला मनोदय कळविला व त्यांची परवानगी काढून ते वामनरावांना आपल्याबरोबर नाटकाला घेऊन गेले. जरी तमाशाला अगर नाटकाला जाणें श्रीपंतांना आवडत नसे तरी ते स्वतः फार रसिक होते. कधीं कधीं ज्यांचा आवाज चांगला होता अशा सर्जेराव हेळेवाडीकर, नारायणराव मुतगेकर वगैरे आपल्या कांहीं शिष्यांना ते कानडी ' पारिजातक ' नाटकांतील पदें म्हणण्यास सांगत व कधीं कधीं सिताराम अक्कोळकर वगैरे कांहीं मंडळी जळती समई डोक्यावर घेऊन त्यांचे पुढें नाच करीत असत. तालसुराची श्रीपंतांना चांगली माहिती असल्यामुळें कोणीं तालावर पदें म्हटलीं तरी त्यांना फार आनंद होत असे व कोणामध्यें कांहीं विशिष्ट गुण आढळल्यास ते त्याचें कौतुक करून तशा

मनुष्याला प्रोत्साहन देत असत. श्रीपंत हे फार मार्मिक होते व त्यांचें वाङ्मय या गोष्टीची साक्ष देत आहे.

## मंडळींची आवड व गोरगरिबांबद्दल कळवळा

श्रीपंतांना बाळपणापासूनच मंडळींची आवड फार असे आणि त्यांचेशीं ते मन-मोकळेपणानें व प्रेमानें वागत. ते कोणाचाहि अपमान करीत नसत व आपल्याकडे शुद्ध भावानें येणाऱ्या भक्ताचा आपल्या घरांतील इतर कोणी अपमान केलेला त्यांना खपत नसे. एके दिवशीं असें झालें कीं श्रीपंतांचे शिष्य मंगेशराव गुंजीकर यांचे घरची मंडळी श्रीपंतांच्या घरीं भजनाला गेली होती. तो दिवस शनिवारचा होता व रात्रीं बरीच भक्त-मंडळी जमून भजन व्हावयाचें होतें. भजन आटोपल्यावर आपल्या घरीं परत जातांना मंगेशरावांच्या मंडळींच्या मनांतून श्रीपंतांच्या पायां पडून मग जावयाचें होतें. त्या वेळीं श्रीपंत माडीवर कांहीं भक्तमंडळींशी बोलत बसले होते. त्यामुळें ही मंडळी जेव्हां जिन्यानें माडीवर जाऊं लागली तेव्हां श्रीपंतांचे त्या वेळचे द्वाररक्षक रामभाऊ कमतनूरकर यांनीं त्यांना वर येण्याची मनाई केली. तेव्हां त्यांचा हिरमोड होऊन ती मंडळी तशीच घरीं परत गेली. रामभाऊंचें तें उद्दामपणाचें वर्तन श्रीपंतांच्या लक्षांत आलें. पण त्या वेळीं इतर मंडळी तेथें बसलेली असल्यामुळें ते कांहीं बोलले नाहींत. दुसरे दिवशीं म्हणजे रविवारीं दुपारीं जेवणें झाल्यावर घरांतील सर्व मंडळी आपापल्या जागीं झोपली. तेव्हां ती संधि साधून श्रीपंत उठले आणि आंगरखा व रुमाल घालून, ऊन होतें तरी छत्रीहि न घेतां, एकटेच निघाले आणि मंगेशरावांच्या घरीं गेले. तेव्हां ते अचानक तेथें गेल्यानें मंगेशरावांना व त्यांच्या घरांतील मंडळींना फार आनंद झाला. पुढें बोलण्याच्या ओघांत आदल्या दिवशीं रात्रीं घडलेल्या प्रकारासंबंधीं गोष्ट निघाली. तेव्हां "मी सर्व प्रकार वरून ऐकत होतों. पण त्या वेळीं इतर मंडळी तेथें असल्यामुळें मी कांहीं बोललो नाहीं. पण त्याबद्दल तुम्हीं कांहीं मनांत आणूं नका" असें सांगून श्रीपंतांनीं त्यांची समजूत घातली. या-प्रमाणें तास दोन तास बोलणें झाल्यावर श्रीपंत म्हणाले "आतां मला शोधण्या-करितां घरची मंडळी येथें येतील व तुम्हांला त्रास होईल. तेव्हां आपण नागरकट्टींच्या घरीं जाऊं." लगेच सर्व मंडळी उठली व थोड्या अंतरावर असलेल्या नागरकट्टींच्या घरीं जाऊन बसली आणि तेथें भजन, बोध सांगणें वगैरे प्रकार सुरू झाला. इकडे दोन अडीच वाजण्याच्या सुमारास श्रीपंतांच्या घरांतील मंडळी जागी होऊन पाहातात तों श्रीपंत कोठें दिसेनात. तेव्हां प्रत्येक जण रामभाऊंना "पंत कोठें गेले ?" म्हणून विचारूं लागला. पण त्यांना कांहींच सांगता येईना. तेव्हां सर्वांना मोठा अचंबा वाटला. कारण श्रीपंत एकटे घरांतून कधींच बाहेर पडत नसत व उन्हाची वेळ असून त्यांनीं छत्रीहि बरोबर नेलेली नव्हती. तेव्हां हा काय प्रकार आहे हें कोणालाच समजेना व सर्व जण तपास करूं लागले. रामभाऊ मात्र मनांत चरकले व रात्रींच्या आपल्या आडदांड वर्तनाबद्दल

ही आपणास शिक्षा असावी असें त्यांनीं ताडलें आाणि "पंत मंगेशरावांकडे गेले असतील" असें सांगितलें. तेव्हां रामभाऊ व घरांतील इतर चार पाच मंडळी मंगेशरावांच्या घरीं गेली. तेव्हां मंगेशरावांच्या घरांत कोणीहि नव्हतें. पण शेजारच्या एका इसमानें 'ती सर्व मंडळी नागरकट्टींच्या घरीं गेली असतील' असें सांगितलें. लगेच रामभाऊ वगैरे पंतांच्या शोधार्थ निघालेली मंडळी नागरकट्टींच्या घरीं गेली. तों पंत व इतर बऱ्याच मंडळी माडीवर असून भजन चाललें होतें असें त्यांना आढळून आलें. म्हणून रामभाऊ पुढें व इतर मंडळी मागें असे जिना चढूं लागले. तों दरवाजा बंद. तेव्हां "पंत", "पंत" म्हणून रामभाऊ हाका मारूं लागले. त्यांचा शब्द ओळखून "तुला वर येण्याला परवानगी नाहीं" असें श्रीपंतांनीं आंतून सांगितलें. तेव्हां रामभाऊंना पश्चात्ताप होऊन ते घाबरले व "परवानगीच्या बाहेर वागणारा असा मी जगून तरी काय करावयाचें आहे ?" असें म्हणून आपल्या स्वतःला मारून घेऊं लागले व मोठमोठ्यानें रडूं लागले. तेव्हां श्रीपंतांनीं दार उघडण्यास सांगून रामभाऊंना व त्यांच्या बरोबरच्या मंडळींना आंत घेतलें आणि रामभाऊंना जवळ घेऊन ते म्हणाले "अरे, आज मी तुझी नुसती थट्टा केली तर तुला इतकें वाईट वाटलें. मग काल तूं या मंडळीला आपल्या घरीं परत येतांना माझ्या नुसतें पायांहि पडूं दिलें नाहींस. तेव्हां त्यांना किती वाईट वाटलें असेल बरें ! प्रेमळ भक्तांशिवाय मला तरी कोण आहे ? तेव्हां असें वेडेपणाचें काम पुनः केव्हांहि करूं नकोस व माझेकडे भक्तिभावानें कोणी आल्यास त्यांना मज्जाव करूं नकोस." तेव्हां रामभाऊंनीं श्रीपंतांची क्षमा मागितली व थोड्या वेळानें आपल्या शोधार्थ आलेल्या मंडळीसह श्रीपंत आपल्या घरीं गेले.

ज्याप्रमाणें आपल्या घरांतील व आपल्यावर अवलंबून असलेल्या अथवा आपल्या आश्रयाला येऊन राहिलेल्या माणसांशीं श्रीपंत प्रेमळपणानें वागत असत त्याचप्रमाणें वागण्याची त्यांची आपल्या शिष्यांनाहि शिकवण असे. त्यांचे एक शिष्य फार श्रीमंत होते व त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी अशीं दोन अपत्यें होतीं. ते आपल्या पत्नीला अगदीं तुच्छतेनें व निर्दयपणानें वागवीत आणि तिच्या हातचें जेवीतहि नसत. आपल्या मुलांकडेहि त्यांचें दुर्लक्ष असे. याप्रमाणें त्यांच्या घरांत गृहस्वामिनीला मुळींच मान नसे व ती साध्वी आपल्या मुलांकडे पाहून कसेबसे कष्टानें दिवस काढीत असे. पण आपले पति दुसरें लग्न करण्याच्या विचारांत आहेत असेंहि जेव्हां त्या बाईच्या कानावर आलें तेव्हां मात्र त्यांना फार काळजी वाटूं लागली. त्यांचे एक दोन आप्त श्रीपंतांचे शिष्य होते. त्यांनीं त्या बाईची करुण कहाणी श्रीपंतांच्या कानावर घातली व कांहीं तरी उपाययोजना करण्याची त्यांना विनंति केली. पुढें लौकरच श्रीपंत त्या श्रीमंत गृहस्थांच्या गावीं गेले असतांना त्यांनीं श्रीपंतांना आपल्या घरीं भोजनास बोलाविलें. तेव्हां "तुझ्या कुटुंबानें स्वयंपाक करून आम्हांला वाढलें पाहिजे. ही अट जर कबूल असेल तरच आम्ही तुझ्याकडे जेवावयास येऊं; नाहीं तर येणार नाहीं" असें श्रीपंतांनीं सांगितलें. खुद्द श्रीपंतांनींच असें सांगितल्यामुळें त्या गृहस्थांचा नाइलाज झाला व त्या दिवशीं त्यांनीं

आपल्या कुटुंबाला स्वयंपाक करण्यास सांगितलें. पुढें श्रीपंतांनीं त्या गृहस्थांना आपल्या जवळच्या पानावर बसण्यास सांगितलें व त्याप्रमाणें त्यांनीं केलें आणि त्यांच्या कुटुंबानें सर्वांना वाढलें. अशा रीतीनें आपल्या कुटुंबाच्या हातचें न खाण्याची त्यांची प्रतिज्ञा निष्फळ झाली व या प्रसंगाचा त्यांच्यावर इतका विलक्षण परिणाम झाला कीं त्या दिवसापासून त्यांची वृत्तिच पालटली आणि आपल्या पत्नीकडे व मुलांकडे पाहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन पार बदलून गेला. तेव्हांपासून त्यांच्या घरांत गृहलक्ष्मी सुखासमाधानानें नांदूं लागली. त्या बाईची श्रीपंतांवर फार श्रद्धा बसली आणि पुढें त्यांच्या आग्रहावरून त्या गृहस्थांनीं आपल्या मुलाला कांहीं वर्षें श्रीपंतांकडे शिक्षणाकरितां ठेविलें व त्याचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण तेथेंच झालें.

एक सुवासिनी बाई रोज श्रीपंतांकडे जाऊन त्यांचे पायां पडत असे. एके दिवशीं श्रीपंतांनीं तिला तिच्या येण्याचें कारण विचारलें. तेव्हां "सासरचीं माणसें माझा फार राग करतात व मला घरांत घेत नाहींत" असें तिनें सांगितलें. नंतर श्रीपंतांनीं विचाल्यावरून तिनें आपली चूक होती ती कबूल केली. तेव्हां पतिव्रताधर्मानें राहाण्यास सांगून त्यांनीं तिला नारळ व प्रसाद दिला आणि एकदम सासरीं जाणेस सांगितलें. त्याप्रमाणें तिनें केलें. सासरीं तिला कोणींहि हरकत केली नाहीं व तेव्हांपासून ती आपल्या घरीं सुखानें नांदूं लागली.

## गुणग्राहकता व विद्वत्तेबद्दल आदर

श्रीपंत गुणांचे व विद्वत्तेचे फार चाहाते होते. त्यामुळें त्यांचेकडे कोणी विद्वान शास्त्री, पंडित अगर साधुसंत आल्यास ते त्यांना फार आदरानें वागवीत व त्यांची योग्य ती संभावना करून परत पाठवीत असत. एकदां श्रीसंकेश्वर मठाधिपति श्रीशंकराचार्यांची स्वारी बेळगावांत आली असतांना श्रीपंतांनीं श्रींना आपल्या घरीं पाद्यपूजेस बोलाविलें होतें. त्या वेळीं ते देशपांडे गल्लींतील सुंठणकरांच्या वाड्यांत राहात असत. स्वामी यावयाचे म्हणून सर्व वाडा गुढ्या, तोरणें वगैरेंनीं शृंगारला होता व श्रींना बसण्याकरितां एक उच्चासन मुद्दाम तयार करविलें होतें आणि त्याचे दोन्ही बाजूंना शास्त्री, पंडित वगैरे विद्वान मंडळींना बसण्याकरितां पाट मांडले होते. श्रींची स्वारी पालखींत बसून आपल्या लव्याजम्यासह सकाळीं आठ वाजतां श्रीपंतांच्या घरीं आली. तेव्हां श्रीपंतांनीं सामोरे जाऊन श्रींचें स्वागत केलें व श्रींना त्या उच्चासनावर बसण्याची विनंति केली. नंतर श्रींच्या पाद्यपूजेस सुरवात झाली. एकीकडे एकतारी घेऊन एकानें श्रीपंतांचीं पदें म्हणण्यास सुरवात केली. तीं पदें ऐकून श्रींना फार आनंद झाला व तीं श्रीपंतांचींच आहेत असें समजतांच श्रींनीं श्रीपंतांना आपल्या जवळ बसवून घेऊन त्यांचा गौरव केला. श्रीपंतांचें व श्रींचें अध्यात्म विषयासंबंधीं थोडा वेळ संभाषण झाल्यावर तो समारंभ आटोपला.

स्वामी विवेकानंद दक्षिण महाराष्ट्रांतील आपल्या दौऱ्यांत बेळगावास गेले असतांना श्रीपंतांची व त्यांची भेट झाली होती. त्या उभयतांचें कांहीं वेळ संभाषण झालें

व त्या भेटीनें उभयतांसहि फार आनंद झाला. इतकेंच नव्हे तर त्या दोघां थोर पुरुषांच्या भेटीचा तो अपूर्व समारंभ पाहाण्यास जे हजर होते त्यांनाहि फार समाधान वाटलें.

## आदरातिथ्य व अन्नदान

आदरातिथ्य हा गुण श्रीपंतांच्या ठिकाणीं प्रामुख्यानें वसत होता व त्यांचा अन्नदानावर फार भर असे. त्यांचेकडे केव्हांहि कोणी भुकेलेला मनुष्य आल्यास तो विन्मुख जात नसे. ते हातांनीं स्वयंपाक करून राहात असतांना कधीं कधीं आपल्यापुढील वाढलेलें ताट अन्न मागण्याकरितां आलेल्या मनुष्याला देऊन ते स्वतः उपाशीं राहात. त्यांच्या पंक्तीला नेहमीं दहा वीस माणसें तरी असत व १८९८ सालीं ते सुंठणकरांच्या वाड्यांत राहावयास गेल्यापासून तर दररोज त्यांच्या पंक्तीला कमींत कमी वीस–पंचवीस माणसें असत. जेवतांना पंक्तिप्रपंच केलेला त्यांना आवडत नसे. एकदां ते आपल्या एका शिष्याकडे बऱ्याच मंडळींसह जेवण्यास गेले होते. श्रीपंतांकरितां तुपांत तळलेले कांहीं पदार्थ केले होते व ते त्यांच्याकरितां मांडलेल्या पानावर वाढण्यांत आले होते. एकेक मंडळी जेवणाच्या ठिकाणीं येऊन बसूं लागली. त्यांपैकीं एक इसम श्रीपंतांकरितां वाढलेल्या पानावर बसला. तेव्हां "या पानावर श्रीपंतांकरितां निराळे पदार्थ वाढले आहेत; तुम्ही दुसरीकडे जाऊन बसा" असें त्याला सांगण्यात आलें. तें श्रीपंतांनीं ऐकिलें व त्या पानावर ते बसले नाहीत. त्या दिवशींचें जेवण सर्वांना बाधलें. श्रीपंत फार मिताहारी असून त्यांचा आहार सात्विक म्हणजे दुधभात, भाकर, लोणी वगैरे प्रकारचा असे. त्यांचें जेवण फार लवकर आटपत असे व तें आटोपल्यावर ते उठून जात. श्रीपंत पानावर असेपर्यंत ते स्वतः, अगर अण्णा व रावजी यांचेपैकीं कोणी असल्यास ते, यांचेखेरीज कोणीहि बोलत नसे. पण श्रीपंत उठून गेल्यावर मात्र इतर मंडळीस बोलण्यास वाव मिळे. एखादा खाण्याचा पदार्थ सर्वांना द्यावयाचा असल्यास तो प्रत्येकाला वाटून देऊन सर्वांनीं निरनिराळें खात बसणें त्यांना पसंत नसे. तर तो मध्यें ठेवून सर्वांनीं एकाच राशींतून खाण्यास ते सांगत. जेवण झाल्यावर ते विडा खात नसत; नुसती सुपारी व लवंग खात.

श्रीपंत आपल्या घरच्या व्यवस्थेंत विशेष मन घालीत नसत. पण घरांतील सर्व मंडळींना त्यांचेबद्दल अत्यंत पूज्यभाव आणि आदर वाटे व त्यांचा सर्वांवर वचक फार असे. त्यामुळें घरांतील सर्व कारभार शिस्तीनें व सुयंत्रितपणें चालत असे. पैशाअडक्याच्या व्यवहारांत तर ते बिलकुल लक्ष घालीत नसत. आपला पगार आला कीं ते तो भावांजवळ देत आणि खर्च काय व कसा झाला याबद्दल चवकशी करीत नसत.

## उत्तम शरीरसंपत्ति

श्रीपंत उंच व शरीरानें धिप्पाड असून त्यांचा वर्ण काळासावळा व चेहेरा रुबाबदार होता. त्यांचें शरीर पिळदार असून ताकद दांडगी होती. एकदां बाळेकुंद्री येथील श्रीरामेश्वराचे देवालयांत बांधण्याकरितां श्रीपंतांचे घरीं एक मोठी घाट आणिली होती.

ती फार जड असल्यामुळें उचलण्यास दोन माणसें लागत. पण श्रीपंतांनीं ती सहज लीलेनें उचलून धक्क्यावर ठेविली; इतकी त्या वेळीं त्यांची ताकद चांगली होती. घरांतील विद्यार्थी मंडळी व त्यांचेकडे येणारी तरुण शिष्यमंडळी यांच्या शरीरप्रकृतीकडे त्यांचें फार लक्ष असे व आपलें शरीर सुदृढ राखण्याचा ते त्यांना उपदेश करीत. त्यांचेकडे कोणी रोडका अथवा अशक्त मनुष्य आल्यास त्याला ते तालीम करण्यास अथवा सूर्य-नमस्कार घालण्यास सांगत. ज्यांचें शरीर धिप्पाड असून कमाविलेलें असून स्वभाव उमदा असे अशी मंडळी त्यांना फार आवडत असत व त्यांच्या शिष्यमंडळींतहि तालमेचा नाद असलेली तरुण मंडळी बरीच असत. श्रीपंतांना रडवें तोंड आवडत नसे व आपल्या शिष्यांनीं सदा हसतमुख असावें असें ते म्हणत. श्रीपंत धाडशी, निश्चयी व सरळमार्गी होते आणि हा त्यांचा स्वभाव नित्याच्या राहाणींत व परमार्थांतहि दिसून येत असे. ते चालूं लागले म्हणजे लांब लांब व झप झप पावलें टाकीत चालत; त्यामुळें त्यांच्याबरोबरच्या मंडळींना धावावें लागत असे.

## पोषाख व रोजचा दिनक्रम

घरांत असतांना श्रीपंत अंगांत एक नुसता सदरा घालीत असत व शाळेंत जातांना त्यांचा पोषाख पुढीलप्रमाणें असे, म्हणजे डोकीला पांढरा जरीकाठी रुमाल, अंगांत एक लांबशी पैरण, जाकीट व पारशीफॅशनचा कोट व बहुतेक रेशीमकाठी उपरणें, पायांत बूट-स्टॉकिंग व हातांत छत्री अगर उंच काठी असे. फिरावयास जातांना ते पायांत फुलबूट घालीत व हातांत लांब काठी घेत. त्यांचा पोषाख साधा व नीटनेटका असे. त्यांचा दिनक्रम पुढीलप्रमाणें असेः—ते पहाटे ५ वाजण्याचे सुमारास उठून शाळेंत जाणाऱ्या मुलांना अभ्यासास व मेहनत करावयास लावीत व आपण तासभर भजन करीत अथवा ऐकत बसत. त्यानंतर शाळेचें काम म्हणजे वह्या तपासणें, कठीण शब्दांना प्रतिशब्द काढणें वगैरे करीत बसत. कठीण शब्दांना योग्य व सुलभ प्रतिशब्द सांगून विषय समजावून सांगणेचें त्यांना चांगलें साधलें होतें. सकाळीं १० चे आंत जेवण आटपून ११ चे आंत ते लंडन मिशन स्कुलांत आपल्या शिक्षकाचे कामावर जात व जातांना बहुतकरून घरांतील शाळेंत जाणाऱ्या मुलांना बरोबर नेत असत. सध्यांकाळीं ५ वाजतां शाळें-तून परत आल्यानंतर वाचनांत व त्यांचेकडे येणाऱ्या लोकांशीं अध्यात्म-विषयावर बोलण्यांत त्यांचा वेळ जात असे. रात्रीं जेवणानंतर ते घरांतील मुलांचा अभ्यास घेत व निज-ण्यापूर्वी कांहीं वेळ भजनांत घालवीत असत.

## मानी स्वभाव व उद्योगप्रियता

श्रीपंतांचा स्वभाव मानी, उदार व क्षमाशील होता. उपाशीं पडूं पण कोणापुढेंहि हात पसरावयाचा नाहीं असा त्यांचा बाणा असे. ते निरलस उद्योगी होते व कोणी रिकामें बसलेलें अथवा गप्पा मारीत बसलेलें त्यांना आवडत नसे. ते दुसऱ्याच्या

भानगडींत कधीं पडत नसत व कोणाची उसाबर करीत नसत. आपला पोटाचा उद्योग जरूरी-पुरता करून बाकीचा वेळ पारमार्थिक ग्रंथ वाचण्यांत, परमार्थाच्या गोष्टी बोलण्यांत, लेखनांत अगर भजनांत घालवीत असत. ते मोकळ्या मनाचे असून शांत स्वभावाचे व विनयशलि होते. त्यांना एकमेकांशीं कुजबुजणें अथवा कान-गोष्टी करणें बिलकूल आवडत नसे. त्यांचे कानावर कोणतीहि गोष्ट गेली म्हणजे ती गुप्त राहात नसे. आपण सरळ मार्गानें जात असतां कोणीं नावें ठेविलीं अगर निंदा केली तर त्याची ते पर्वा करीत नसत.

## तारतम्य व चातुर्य

" ज्ञानी हा शहाणा असलाच पाहिजे. कारण परमार्थांत जें ज्ञान तेंच व्यवहारांत शहाणपण" असें जें श्रीपंतांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे त्याप्रमाणें त्यांची स्वत:ची स्थिति होती. ते जरी व्यवहारांत लक्ष घालीत नसत तरी त्यांच्या ठिकाणीं विलक्षण तारतम्य व चातुर्य वसत होतें व त्यांचे बंधु द्रव्यार्जन करूं लागल्यानंतरहि त्यांनीं जो अखेरपर्यंत नोकरी केली ती या गोष्टीची साक्ष देते. श्रीपंतांना मनुष्यस्वभावाचें विलक्षण ज्ञान होतें. त्यामुळें स्वतः अलिप्त राहून निरनिराळ्या वृत्तींच्या माणसांशीं त्यांच्याप्रमाणें वागून त्यांना त्यांचें समाधान करितां आलें. श्रीपंतांचे सर्व बंधु त्यांच्या पूर्ण आज्ञेंत होते हें जसें खरें आहे तसेंच ते आपल्या भावांचा नेहमीं बोज राखीत असत आणि त्यांच्या अत्यंत प्रीतींतील असे पुष्कळ शिष्य जरी होते, तरी ज्या गोष्टीनें आपल्या भावांना कमीपणा येईल अशी गोष्ट ते कधीं करीत नसत. त्यांच्या अखेरच्या दुखण्यांत एकदां काका घाणेकर त्यांना भेटण्यास बेळगावास आले होते. त्या वेळीं श्रीपंतांची प्रकृति फार अशक्त झाली होती. तेव्हां त्यांना हवापालट करण्याकरितां आपण धारवाडास घेऊन गेल्यास त्यांना लौकर बरें वाटेल असें वाटून काकांनीं त्याप्रमाणें श्रीपंतांचे मावसबंधु डॉ. अणाप्पा व श्रीपंतांच्या मातोश्री व त्यांचे बंधु यांचेशीं गोष्ट काढली व त्या सर्वांना ती पसंत पडली. नंतर काकांनीं श्रीपंतांचीहि संमति मिळविली व दुसरे दिवशीं सकाळचे मेलनें धारवाडास जाणेचें ठरलें. लगेच त्या तयारीला मंडळी लागली व सकाळीं स्टेशनवर जाण्याकरितां गाडीहि सांगितली. पहाटेस घरांतील मंडळी उठून श्रीपंतांच्या निघण्याच्या तयारीची धामधूम सुरू झाली. तेव्हां श्रीपंतांनीं काकांना आपल्या खोलींत हाक मारिली व त्यांना जवळ घेऊन श्रीपंत म्हणाले " हें बघ, मी धारवाडास येतों. हें घर तें घर मला एकच. तूंहि माझाच आहेस. पण थोडा विचार कर. मरण हें कोणाला केव्हां येईल तें सांगतां येत नाहीं. तेव्हां मी जर धारवाडास असतांना गेलों तर तें बरें होईल काय ? " तेव्हां काका म्हणाले " त्यांत काय ? तेंहि घर तुमचेंच आहे. " त्यावर श्रीपंत म्हणाले " तूं म्हणतोस तें खरेंच आहे. पण मी तुझ्याकडे असतांना गेलों तर ' आजारी असतांना हा जाणून बुजून घरदार सोडून दुसरीकडे जाऊन मेला ' असें लोक मला म्हणतील व तुला म्हणतील कीं ' ते आजारी असतांना यानें त्यांना आई, भाऊ, आप्तेष्ट वगैरेंनीं भरलेल्या कुटुंबांतून ओढून नेऊन मारिलें. ' तसेंच मी इतका आजारी असतांना माझ्या घरांतील

मंडळीनीं मला तुझ्याकडे कसें पाठविलें असें म्हणून लोक त्यांनाहि दूषण देतील. तेव्हां या गोष्टीचा तूं नीट विचार कर." याप्रमाणें श्रीपंतांनीं सांगितल्यावर काकांनाहि असें वाटूं लागलें कीं अशा स्थितींत त्यांना आपल्याबरोबर धारवाडास घेऊन जाणें योग्य नव्हे व त्यांनीं तो बेत रहित केला.

## वाचनावर भर व आवडीचे ग्रंथ

श्रीपंतांचें वाचन दांडगें व विविध असे. त्यांनीं इस्लामी, पारशी, ख्रिश्चन व बौद्ध धर्मासंबंधीं कांहीं ग्रंथ वाचले होते; त्याचप्रमाणें लिंगायत लोकांचे पूज्य ग्रंथहि वाचले होते. त्यांची बुद्धि तीक्ष्ण असून स्मरणशक्ति दांडगी होती. त्यांचें शिक्षण जरी मॅट्रिक-पर्यंतच झालें होतें तरी दीर्घ व्यासंगानें त्यांना इंग्रजी, मराठी, कानडी, संस्कृत व हिंदी या भाषा चांगल्या येत होत्या. देशपांडे गल्लींतील वाड्यांत राहावयास गेल्यानंतर फुरसुतीच्या वेळीं श्रीपंत माडीवरील दिवाणखान्यांतील कोचावर पडून वाचीत असत. त्या कोचावर एक गादी घातलेली असून त्या गादीवर पाय व शेपूट कायम असलेलें एक प्रशस्त व्याघ्राजिन पसरलेलें असे. कोचावर वाचीत पडलें असतांना पुस्तकें घेतां यावीं म्हणून उशाकडचे बाजूस थोड्या अंतरावर एक मोठें कपाट असे व त्या कपाटांत उपनिषदें, श्रीमद्भगद्गीतेवरील निरनिराळ्या टीका व भाष्यें, वेदांतविषयासंबंधींचे इतर ग्रंथ, तसेच संतांचे अभंग व इतर ग्रंथ वगैरे पुस्तकें ठेविलेलीं असत. ते जीं जीं पुस्तकें वाचीत त्यांच्यांत जागजागीं तांबड्या पेन्सिलीनें खुणा करीत असत. त्यांच्या कोचाजवळ तांबडी व काळी पेन्सिल, टाक, दौत, चष्मा, कुंकवाचा करंडा, भस्माचा उंडा, एकतारी, झांज, झंगट वगैरे उपकरणें ठेविलेलीं असत. त्याचप्रमाणें आजूबाजूला श्रीदत्ताचे चार पाच तऱ्हेचे फोटो लाविलेले असून, स्नेही मंडळींकडून व भडमंडळींकडून आलेल्या सुबक व कोरींव अशा चंदनी आणि सागवानी लाकडाच्या, काचेच्या अथवा गारेच्या श्रीदत्ताच्या मूर्ति ठेविल्या होत्या व आद्य श्रीमच्छंकराचार्यांची तसबीर लाविलेली होती; त्याचप्रमाणें ठळक अक्षरांनीं लिहिलेलीं संतवचनें चिकटविलेलीं होतीं. त्यामुळें त्यांच्या बसण्याच्या जागीं जाणाराला पूज्यभाव वाटत असे व तेथें पावित्र्य वसत असल्याचा अनुभव येई. श्रीपंतांच्या वाङ्मयावरून व त्यांच्या उत्तरांवरून असें दिसतें कीं त्यांच्या अत्यंत आवडीचे व त्यांना फार पूज्य वाटत असलेले संस्कृत ग्रंथ म्हणजे उपनिषदें, अवधूतगीता, श्रीमद्भगवद्गीता, श्रीमच्छंकराचार्यांचीं भाष्यें व उपदेशसहस्री वगैरे त्यांचे ग्रंथ हे होत व मराठी ग्रंथांपैकीं गुरुचरित्र, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी व वामनपंडितांची यथार्थदीपिका हे ग्रंथ होत. तसेंच श्रीमदाद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर या दोघां अवतारी पुरुषांबद्दल त्यांना परमावधीचा आदर वाटत असे व तो ते वारंवार बोलून दाखवीत असत. श्रीमच्छंकराचार्यांचें अद्वैत-सिद्धांतप्रतिपादन व श्रीज्ञानेश्वरांची जग-चिद्विलास ही पूर्णानुभावाची दृष्टि यांनीं श्रीपंतांना जणूं मोहित करून टाकिलें होतें. त्यामुळें त्यांच्या वाङ्मयांत आचार्यांच्या सिद्धांताचें गांभीर्य व भाषेंतील ओज आणि भारदस्तपणा व श्रीज्ञानेश्वरांचा सहजानुभव,

भाषासौंदर्य, पदलालित्य व सुटसुटितपणा वगैरे गुण यांची बरीच छटा उमटलेली दिसते. अमृतानुभव तर श्रीपंतांनीं जणूं आत्मसात केला होता हें प्रकरण ३१ मध्यें दाखविलेंच आहे.

## चांगले शिक्षक

श्रीपंत हे चांगले पंतोजी ( शिक्षक ) होते. विद्यार्थ्यांना शिस्त पाळण्यास लावणें व त्यांचेकडून चापून अभ्यास करून घेणें हें त्यांना चांगलें साधलें होतें. अज्ञ मुलांना, ज्यांच्या त्याच्या कुवतीप्रमाणें, विषय समजावून सांगून शहाणे करण्याचा त्यांचा हातखंडा होता. त्यांच्याकडे शिकण्यासाठीं ठेविलेलीं मुलें चांगलीं अभ्यासी, सुस्वभावी व निर्व्यसनी बनत असा त्यांचे वेळीं त्यांच्या घराण्याचा लौकिक होता. त्यांची शिस्त कडक असे; पण त्यांचा स्वभाव दयाळु असल्यामुळें मुलांची त्यांचेबद्दल पूज्यबुद्धि राहात असे. ते देशपांडे गल्लींत अमृतरावांचे घरीं राहात असेपर्यंत स्नानसंध्या, देवपूजा, अष्टक म्हणणें, नमस्कार वगैरे विद्यार्थ्यांचे रोजचे कार्यक्रम गोविंदरावजींचे देखरेखीखालीं चालत असत. पण श्रीपंतांचें लक्ष मुलांच्या अभ्यासाकडे जास्त असे. गृहशिक्षण, शिस्त, टापटीप, व्यायाम वगैरे बाबतींतलि नियम कडक असत व ते पाळविले जात. कोणत्याहि कारणानें अभ्यासाकडे दुर्लक्ष्य झाल्यास तें क्षम्य होत नसे. त्याचप्रमाणें अभ्यासाची सबब सांगून कोणीं देवपूजेची अथवा संध्येची टाळाटाळी केल्यास त्याला जबर शिक्षा होत असे. श्रीपंत मुलांना परमार्थिक बोध कधीं सांगत नसत. एवढेंच नव्हे तर, एखाद्यानें बोध ऐकण्याचा बाहाणा करून अभ्यास चुकविला तर त्याला चांगला चोप बसत असे. श्रीपंतांचा दरारा फार असे. ते छडीचा उपयोग केव्हां तरी करीत; पण उपयोग केला कीं, चांगली आठवण राहील असा करीत. असा प्रसंग साधारणपणें कोणी विद्यार्थी खोटें बोलल्यास अथवा त्यानें कांहीं लबाडी केल्यास येत असे. या बाबतींत श्रीपंतांचा स्वभाव थोडा रागीट असे. त्यामुळें कोणीं विद्यार्थ्यानें अपराध केल्याचें त्यांच्या कानावर जातांच ते त्याला हाक मारीत व ती ऐकूनच तो घाबरून जात असे. तेव्हां कधीं सौ. यमनाक्का, कधीं अण्णा अकोळकर, तर कधीं गोपाळराव मध्यस्थी करून त्याला मिळणारी शिक्षा सौम्य स्वरूपाची होईल अशाबद्दल खटपट करीत. एकदां श्रीपंतांनीं घरांतील कांहीं मुलांना संध्या न केल्याबद्दल चांगला चोप दिला. त्यांच्यापैकीं एकजण सौ. यमनाक्कांचा जरा लाडका होता. श्रीपंतांच्या हातचा मार खाल्ल्यावर तो तसाच रडत श्रीपंतांच्या झोपण्याच्या खोलींत गेला. तेथें सौ. यमनाक्का होत्या. त्याला रडतांना पाहून त्यांना कळवळा आला व त्या त्याची समजूत घालीत होत्या. इतक्यांत तेथें श्रीपंत गेले. तेव्हां सौ. यमनाक्कांनीं थोडें रागानेंच " लहान पोरें चुकलीं म्हणून किती मार द्यायचा ! चुकलीं तर चुकलीं. 'पुनः करूं नका' म्हणून सोडून द्यावयाचीं " असें श्रीपंतांना म्हटलें. त्यावर श्रीपंत म्हणाले " मी त्यांना कडक शिक्षा जी केली ती संध्या न करण्याबद्दल नसून ते खोटें बोलल्याचा मला राग आला म्हणून

केली." श्रीपंतांचे घरीं विद्यादानाचें जणूं सत्रच होतें. या विद्यासत्रापासून घरांतील मुलांचा फायदा झाला इतकेंच नव्हे तर बाहेरच्याहि पुष्कळ विद्यार्थ्यांनीं त्याचा उपयोग करून घेतला व एके काळीं श्रीपंतांचें घर म्हणजे उनाड मुलांनादेखील बुद्धिमान व नीतिमान करून सोडणारें घर असा त्याचा लौकिक होता.

लंडन मिशन स्कूलमध्यें असतांना श्रीपंतांच्या समकालीन शिक्षकवर्गांत 'चांगले शिक्षक' म्हणून त्यांचा लौकिक होता. शाळेचे वरिष्ठ अधिकारीहि त्यांना मान देत असत. त्याचप्रमाणें त्यांच्या बरोबरीच्या शिक्षकवर्गाशीं त्यांचे संबंध फार चांगल्या प्रकारचे असत. ते वर्गांतहि कधीं कधीं छडीचा उपयोग करीत व त्यांचा वर्गांतील मुलांवर फार वचक असे. त्यांच्या सुमारें २१ वर्षांच्या कारकिर्दींत त्यांच्या हाताखालून पुष्कळ विद्यार्थी शिकून गेले व त्यांच्यापैकीं कित्येक चांगल्या नावलौकिकास चढले.

येथपर्यंत जें श्रीपंतांचें चरित्रकथन व प्रपंचपरमार्थदृष्ट्या त्यांचें गुणवर्णन केलें आहे त्यावरून त्यांनीं आपल्या शुद्ध प्रेमानें व इतर अनेक गुणांनीं हजारो लोकांना प्रपंचपरमार्थीं योग्य मार्ग दाखवून कसें आपलेसे करून ठेविलें होतें हें समजून आलेंच असेल. त्यांचेकडे कोणी वडिल म्हणून, कोणी गुरु म्हणून, कोणी सन्मित्र म्हणून, कोणी आश्रयस्थान म्हणून, कोणी अन्नदाता म्हणून, कोणी अनिमित्त सोयरा म्हणून व कोणी आपली प्रेमळ माय म्हणून पाहात असत. कोणीं कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी ते असेपर्यंत अशा सर्व लोकांच्या चित्तवृत्तींचें तेंच केंद्रस्थान होतें. पण अश्विन वद्य तृतीया शके १८२७ ( १६-१०-१९०५ ) रोजीं त्यांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली, तेव्हां प्रकरण ४२ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें त्यांच्या सर्व भक्तांना दुःखसागरांत लोटून दिल्याप्रमाणें झालें व प्रत्येकाला आपल्या उपकारकर्त्याचे एकेक गुण आठवून आपलें समाधान करून घेणें भाग झालें. पुढें लौकरच श्रीपंतांचें नेहमीं स्मरण व्हावें व त्यांच्या असंख्य भक्तांना एकत्र जमून त्यांची सेवा करितां यावी म्हणून श्रीपंतबंधु व इतर श्रीपंतभक्त यांनीं त्यांचें स्मारक कोणत्या रीतीनें करून ठेविलें आहे यासंबंधींची हकीकत पुढील प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे.

---

# प्रकरण ५० वें

———:०:———

## बंधुप्रीतींचा अपूर्व अनुभव; स्मारकाची योजना.

———:०:———


श्रीपंतमहाराजांनीं देह ठेविल्यापासून त्यांच्या शिष्यमंडळीला त्यांचा वियोग असह्य होऊन दशदिशा शून्य भासूं लागल्या. आपला विश्रांतिठाय, आपलें प्रेमनिधान, आपल्या जीवींचें जीवन जे श्रीपंत ते दृष्टिआड झाल्यामुळें त्यांना चुकल्या चुकल्यासारखें वाटूं लागलें. तशा स्थितींत कित्येक भक्त श्रीपंतबंधूंकडे जाऊन ज्यायोगें आपलें समाधान होईल व आपणास त्यांचें स्मरण राहील अशी कांहीं तरी योजना करण्याबद्दल विनवूं लागले. श्रीपंतांनीं आपल्या हयातींत कोणतीहि गादी स्थापन केली नव्हती अगर कायम स्वरूपाचें पूजास्थान निर्माण केलें नव्हतें. जोंपर्यंत ते हयात होते तोंपर्यंत तेच देव व ते जेथें असतील तेंच देवालय अशी सर्व भक्तांची भावना होती. पण तो देवच दृष्टिआड झाल्यामुळें त्यांना सर्वत्र शून्य भासूं लागलें व सगुण मूर्तीच्या दर्शनाला लालचावलेल्या त्यांच्या वृत्तीला भांबावल्यासारखें झालें.

श्रीपंतबंधूंनाहि श्रीपंतवियोगाचें दुःख असह्य वाटूं लागलें व त्यांच्या शिष्यमंडळींनीं पूर्वीप्रमाणेंच आपुलकीच्या भावनेनें आपल्याकडे यावें व त्यांनीं श्रीपंतांच्या सहवासांत जें गुरुप्रेम अनुभविलें असेल व जे दिव्य अनुभव घेतले असतील त्यांचे आपणांस अंशभागी करावें अशी त्यांना तीव्र इच्छा उत्पन्न झाली. त्यामुळें त्यांनीं श्रीपंतांची पाठ फिरल्यापासूनच निरनिराळ्या ठिकाणच्या त्यांच्या शिष्यांना पत्रें पाठवून श्रीपंतांच्या सहवासांत आलेले आपापले अनुभव लिहून पाठविण्याबद्दल विनंति करण्यास सुरवात केली. अशा रीतीनें श्रीपंतबंधु व श्रीपंतांचे इतर शिष्य यांना परस्परांबद्दल अधिकच प्रेम वाटूं लागलें आणि सर्व भक्तमंडळींनीं एकत्र जमून श्रीपंतांचे गुणानुवाद गावे व त्यांचें आपणास कायमचें स्मरण राहील अशी कांहीं तरी योजना करावी असें प्रत्येकाला वाटूं लागलें. श्रीपंतनिधनानंतरचे बारा दिवस उत्तरकार्यांत गेले. तेराव्या दिवशीं म्हणजे अश्विन वद्य ३० ( २८–१०–१९०५ ) रोजीं श्रीपंतबंधु व बरीचशी भक्तमंडळी हे बेळगावमधील श्रीपंतांच्या राहात्या वाड्यांत जमले व सर्वानुमतें असें ठरलें कीं दुसरे दिवशीं म्हणजे कार्तिक शुद्ध १ शके १८२७ ( २९–१०–१९०५ ) रोजीं प्रातःकाळीं सर्वांनीं श्रीपंतांच्या वाड्यांत एकत्र जमून श्रींची पालखी बाळेकुंद्रीस न्यावी व तेथें श्रींचें भजनपूजन करून पुढें काय करणेचें तें निश्चित करावें.


कार्तिक शुद्ध १ शके १८२७ ( २९–१०–१९०५ ) रोजीं पहाटे बेळगावमधील तसेच परगावांहून आलेली सर्व मंडळी देशपांडे गल्लींतील वाड्याशीं जमली आणि पालखींत



श्रीपंतमहाराज राहात असलेला देशपांडे गल्लींतील
सुंठणकरांचा वाडा ( पृ. २४३ )



श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री बुद्रुख येथील भजनमंडप ( पृ. ४७१ )



श्रीपंतमहाराजांच्या पादुका व एकतान्या ( पृ. ४८४ )



श्रीक्षेत्र वाळेकुंद्री येथील श्रींचा औदुंबर-कट्टा व आंबराई ( पृ. ४७१ )

श्रीपंतांची भरजरी कफनी, फेटा, रुद्राक्षमाळा, खडावा, त्यांचा फोटो व त्यांचे सर्व ग्रंथ ठेवून तेथून पालखीची मिरवणूक निघाली. पालखीचे दोन्ही बाजूंस श्रीपंतबंधु गोपाळ-रावजी व वामनरावजी चौऱ्या घेऊन उभे होते, पालखीसमोर श्रीपंतांचा चांदीचा त्रिशूळ घेऊन श्रीपंतबंधु गोविंदरावजी चालले होते व नाना तऱ्हेचीं मंगल वाद्यें वाजवीत शिष्य-मंडळी भजन करीत चालली होती. पालखी जातांना वाटेंत श्रीपंतांच्या कित्येक शिष्यांनीं आपापल्या घरांपुढें पालखी उभी करवून आरती केली व नारळ फोडिले. अशा रीतीनें पालखी गावाबाहेर जाणेस सुमारें चार तास लागले व पालखीची मिरवणूक बाळेकुंद्रीच्या रस्त्यास लागली. मिरवणूक सांगली सरकारच्या हद्दींतील कंचूर माळावर गेल्यावर एका आसना-वर श्रींची पालखी ठेवण्यांत आली व तेथें भजन सुरू झालें आणि टिपरी खेळण्यासहि सुरवात झाली. त्या वेळीं सर्वांचीं अंतःकरणें एका श्रीपंतप्रेमानें व्याकुळ झालेलीं होतीं. तशा स्थितींत जेव्हां गोविंदरावजींनीं “ मम चित्त–चकोर–चंद्रा । देईं भेटी परमोदारा ॥धृ०॥ बहुत दिन झाले भेटीसी । अजुनी किती तरी दूर राहसी । तुजविणें व्यर्थ पसारा ॥ १॥ भक्तवत्सल ब्रीद कां गेलें । अवतारकाज कीं सरलें । सदा तरुण नव्हेसी म्हातारा ॥२॥ करुणा येऊं दे आतां तरी । दीन दासा घेईं पदरीं । पाहीं दत्ता भजनतत्परा ॥ ३ ॥ ” ( द. प्रे. ल. ८६३ ) हें पद म्हणण्यास सुरवात केली तेव्हां जो कल्लोळ उडाला त्याचें वर्णन करणें शक्य नाहीं ! अगोदरच श्रीपंतांनीं सद्गुरु बालमुकुंदांच्या वियोगानें विव्हल झाल्यावेळीं त्यांना उद्देशून आर्त स्वरानें म्हटलेलें तें पद, त्यांतून श्रीपंतांच्या वियोग-दुःखानें होरपळून गेलेल्या गोविंदरावजींनीं तें त्या तशा स्थितींत म्हटलें ! त्यामुळें तेथें जमलेल्या हजारो भक्तमंडळींच्या नेत्रांतून सारख्या प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या होत्या. इतक्यांत पुढील कार्याकडे नजर देऊन गोपाळरावजींनीं सर्वांना शोक आवरण्याची विनंति केली व “ शुद्ध प्रेमस्वरूपानें श्रीपंत आपल्या जवळच आहेत ” असें सांगून त्यांची सम-जूत घातली आणि पालखी पुढें चालूं लागली. पालखी लहान बाळेकुंद्रीच्या विहिरीजवळ जाते न जाते इतक्यांत थोरल्या बाळेकुंद्रीस जमलेली भक्तमंडळी भजन करीत सामोरी आली. त्यायोगें तेथपासून मिरवणूकीला फार मोठें स्वरूप आलें व अठरा पगड जात एक भावनेनें प्रेरित होऊन पालखीबरोबर चालूं लागली. नंतर पालखी बाळेकुंद्री येथील आंबराईंत गेली व श्रीपंतांच्या दहनभूमीवर लाविलेल्या औदुंबर वृक्षाभोवतीं प्रदक्षिणा करून सर्व भक्तमंडळींनीं भजन, आरती वगैरे कार्यक्रम केला. तेथून ती मिरवणूक बाळेकुंद्री गावांत गेली व श्रीरामेश्वराचे देवालयास प्रदक्षिणा घालून श्रीपंतांच्या राहात्या घराच्या परसांतील त्यांचे परमहंस आजोबा श्रीबाळकृष्णमहाराज यांच्या समाधीजवळ गेली. तेथें गेल्या-वर पालखी खालीं ठेवण्यांत आली व भजन सुरू झालें.

१८९४ सालीं जेव्हां श्रीपंतांनीं आपल्या परमहंस आजोबांची समाधि बाळेकुंद्री-मधील घरामागील परसांत बांधिली, तेव्हां “अरे, माझी समाधिहि आजोबांचे बाजूसच व्हावयाची” असें श्रीपंत आपल्या बंधूंना म्हणाले होते. हे त्यांच्या तोंडून सहज निघालेले उद्गार त्यांच्या बंधूंच्या लक्षांत होते त्यामुळें आजोबांच्या समाधीशेजारीं श्रीपंतांच्या

अस्थि व विभूति ठेवून तेथें श्रीपंतांची समाधि बांधावी असें त्यांनीं ठरविलें. वास्तविक श्रीपंतांना अशा तऱ्हेच्या समाधीची मुळींच जरूरी नव्हती व एकदां त्यासंबंधीं कोणीं त्यांचेशीं गोष्ट काढिली असतां त्यांनीं असें उत्तर दिलें होतें कीं " मला असली ( दगड-मातीची ) समाधि काय करावयाची ? माझ्या मुलांचीं शुद्ध, प्रेममय अंतःकरणें हींच माझी समाधि. " तथापि आजोबांची समाधि बांधण्याच्या वेळीं श्रीपंतांनीं जे उद्गार काढले होते ते ध्यानांत ठेवून त्यांच्या अस्थि ठेवण्याकरितां आजोबांच्या समाधीशेजारींच एक खोल खळगा खणण्यांत आला व त्याच्यांत सर्व बंधु उतरून त्यांनीं आपल्या हातांनीं श्रीपंतांच्या अस्थि तेथें ठेविल्या. त्या वेळीं पुन्हां अतिशय कल्लोळ उडाला व कांहीं मंडळींना आलेला दुःखावेग आवरणें फार मुष्किलीचें झालें. तशा स्थितींतच सर्व विधि उरकून तो खळगा भरण्यांत आला. नंतर श्रीपंतांच्या घरांत महाप्रसाद झाला. या समारंभाला सुमारें एक हजार लोक जमले होते आणि त्यांच्यांत लिंगायत व इतर जातींचे पुष्कळ लोक होते. महाप्रसाद झाल्यानंतर पुन्हां सर्व मंडळी श्रींच्या आंबराईंत गेली व तेथें भजन सुरू झालें. भजन आटोपल्यावर श्रीपंतांचें कांहीं तरी कायम स्वरूपाचें स्मारक करावें असें सर्वानुमतें ठरलें. परंतु स्मारक काय स्वरूपाचं असावें यासंबंधीं कांहींहि निश्चय न होतां असें ठरलें कीं स्मारकाची योजना नक्की करण्याकरितां सर्व मंडळींनीं पुनः एकत्र जमावें व त्याकरितां एखादा दिवस नक्की करून त्याप्रमाणें बाहेरगावच्या भक्तमंडळींना आगाऊ सूचना देऊन बोलवावें. नंतर त्या दिवसाचा कार्यक्रम आटोपून मंडळी आपापल्या ठिकाणीं परत गेली.

श्रीपंत दृष्टिआड झाल्यापासून श्रीपंतबंधूंना श्रीपंतभक्तांचें जणूं वेडच लागून राहिलें. श्रीपंत असेपर्यंत त्यांचेकडून कोणीं कोणीं आणि केव्हां केव्हां अनुग्रह घेतला यासंबंधीं श्रीपंतबंधूंनीं फारशी चवकशी केली नव्हती व नोंद करून ठेविली नव्हती आणि तसें करणें फारसें शक्यहि नव्हतें. कारण श्रीपंतांनीं १८७९ च्या सुमारास अवधूतमार्ग चालविण्यास सुरवात केल्यानंतर कांहीं वर्षें त्यांचे बंधु विद्यार्थीदशेंतच होते. पुढें क्रमाक्रमानें त्यांचेवर श्रीपंतांचा अनुग्रह झाला; तरी गोविंदरावजींखेरीज बाकीचे बंधु श्रीपंतांनीं बोलावल्याखेरीज फारसे त्यांच्या भजनसमारंभांत भाग घेत नसत. पुढें गोपाळरावजींनीं नोकरी धरल्यापासून तेहि अशा समारंभांत भाग घेऊं लागले. त्यामुळें श्रीपंतांचे शिष्य कोण व कोठें आहेत यासंबंधीं, नित्य परिचयाच्या व कांहीं ठळक ठळक मंडळींखेरीज, श्रीपंतबंधूंना फारशी माहिती नव्हती. तसेंच जेव्हां जेव्हां श्रीपंत बाहेर गांवीं अगर जंगलांत जात तेव्हां तेव्हां कित्येक नवीन नवीन शिष्य होत असत. त्यामुळें श्रीपंतांच्या सर्व शिष्यांची मोजदाद ठेवणें शक्यच नव्हतें व तसा कोणीं प्रयत्नहि केला नव्हता. पण श्रीपंत गेल्यावर मात्र त्यांची शिष्यमंडळी कोण कोण व कोठें कोठें आहेत आणि आपल्या परम प्रिय बंधूच्या कृपाप्रसादानें कोणा कोणाला कसे कसे अनुभव आले हें जाणण्याची श्रीपंतबंधूंना तीव्र इच्छा उत्पन्न होऊन गोपाळरावजी व नरसिंहरावजी यांनीं ज्या श्रीपंतशिष्यांची माहिती होती त्यांना पत्रें लिहून श्रीपंतांच्या सहवासानें त्यांना काय

काय अनुभव आले, त्यांच्या भावनांत व विचारांत कसकशी क्रांति होत गेली वगैरें-संबंधाचें व श्रीपंतचरित्रासंबंधींच्या माहितिचें टाचण करून पाठविण्यास प्रेमाची व आग्रहाची विनंति केली.

याला आणखी एक कारण असें झालें कीं श्रीपंत निजधामाला गेल्यापासून सर्व श्रीपंतभक्त श्रीपंतबंधूंना अत्यंत पूज्य मानून त्यांचेकडूच आतां आपलें सांत्वन होईल अशा भावनेनें त्यांचेकडे पाहूं लागले. त्याचप्रमाणें मनुष्यस्वभावच असा आहे कीं आपल्या निरतिशय प्रेमाचें जें स्थान त्याचें नाव गाव वगैरे सर्वच आपणास प्रिय वाटतें. त्यामुळें जसे श्रीपंत हे त्यांच्या शिष्यांना अत्यंत प्रिय होते, तसेंच त्यांचें जें जें कांहीं होतें तें तें सर्व त्यांना प्रिय वाटे. त्यामुळें श्रीपंतांची काठी, त्यांचीं वापरण्याचीं वस्त्रें, त्यांचें पादत्राण वगैरे वस्तुहि त्यांना अत्यंत प्रिय व पूज्य वाटूं लागल्या. श्रीपंतांच्या पश्चात् त्यांचें पादत्राण काका घाणेकरांनीं पूजास्थानीं ठेवून ते त्याची पूजा करीत असत. त्याचप्रमाणें आतां श्रीपंत तेथें नाहींत हें पक्कें माहीत असूनहि ते ज्या वाड्यांत राहात असत त्या वाड्यांत जाऊन आल्याशिवाय, निदान तो दुरून पाहिल्याशिवाय कित्येक भक्तांना समाधान वाटत नसे. श्रीपंत गेल्यावर थोड्याच दिवसांनीं एके दिवशीं असा प्रकार झाला कीं देशपांडे गल्लींतील त्यांच्या राहात्या वाड्यांत एक मुसलमान पुढल्या दिंडी दरवाजानें आंत आला व कोणाशींहि विचारपूस न करितां चौकाच्या डाव्या बाजूच्या सोप्यापलीकडील जिन्यानें तडक माडीवर गेला आणि ज्या कोचावर बसून श्रीपंतांचा बोधवर्षाव होत असे त्या कोचासमोर त्यानें साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां हा श्रीपंतांचा निःसीम भक्त असला पाहिजे अशी घरांतील मंडळींची खात्री झाली. अशा प्रकारचे अनुभव श्रीपंतबंधूंना पुष्कळ येत असत व ते कित्येक वर्षे येत राहिले. श्रीपंतांच्या कृपेनें कोठें कोठें बोधबीज पेरिलें जाऊन त्याला अंकुर फुटले असतील हें कोणालाहि समजणें शक्य नव्हतें. याचा एक मासला असा झाला कीं १९२४ सालीं श्रीपंतांचे एक भक्त नारायण दामोदर दीक्षित राहाणार बेडकिहाळ हे काशीयात्रेला गेले असतां त्यांनीं प्रयाग येथें गोसावी लोकांनीं हत्तीच्या अंबारींतून श्रीपंतांच्या फोटोची मिरवणूक काढलेली पाहिली. तेव्हां त्यांनीं ती कोण मंडळी होती व त्यांनीं श्रीपंतांच्या फोटोची मिरवणूक कां काढिली यासंबंधीं चवकशी केली. तेव्हां त्यांना असें समजलें कीं काशीनाथबुवा नावाचे श्रीपंतांचे एक शिष्य श्रीपंतांकडून अनुग्रह घेतल्यावर हिमालय पर्वताकडे गेले होते व तेथें बैरागी मंडळींत त्यांचे पुष्कळ शिष्य झाले आणि त्या काशीनाथबूवांच्या शिष्यमंडळींनीं आपल्या परम गुरूच्या म्हणजे श्रीपंतांच्या फोटोची ती मिरवणूक काढिली होती. यात्रेहून परत आल्यावर दीक्षित यांनीं २२–२–१९२४ रोजीं पत्र लिहून ही हकीगत श्रीपंतबंधु नरसिंहरावजींना कळविली. सदर पत्रांत पुढील मजकूर आहे. "श्रीक्षेत्र काशी-महायात्रा करून सुखरूप येऊन पोचलों. प्रयाग मुक्कामीं हिमालय पर्वतांत राहणारे बैरागी यांनीं श्रीपंतमहाराजांच्या फोटोची मिरवणूक हत्तीवर अंबारी ठेवून नानाप्रकारचे

बेंडबाजे व भजन करीत मकरसंक्रमणास त्रिवेणीस आणिलीं होतीं. फार उत्सव चांगला झाला होता. काशिनाथबोवा यांनीं श्रीपंतांचा अनुग्रह घेतला होता व त्यांची शिष्य-मंडळी ती. फार आनंद पाहाण्यासारखा झाला." त्यानंतर नरसिंहरावजींनीं दीक्षित यांना पत्र लिहून अधिक चवकशी केली; पण आपणास अधिक माहिती नसल्याचें त्यांनीं कळविलें.

अशी वस्तुस्थिति असल्यामुळें श्रीपंत गेल्यानंतर त्यांच्या शिष्यांसंबंधीं व त्यांना श्रीपंतांच्या कृपेनें आलेल्या अनुभवांसंबंधीं माहिती मिळवावी व श्रीपंतांचें चरित्र लिहिलें जावें असें श्रीपंतबंधूंना वाटूं लागलें आणि त्याप्रमाणें दूर दूरच्या शिष्यमंडळींना पत्रें लिहिण्यास त्यांनीं ताबडतोब सुरवात केली. ९–११–१९०५ रोजीं नरसिंहरावजींनीं श्रीपंतांचे शिष्य शिवराम गोविंद सहस्रबुद्धे यांना वऱ्हाडांत जेवली येथें पत्र पाठविलें; त्यांत पुढील मजकूर आहे " ती. पंतांविषयीं आपणास व इतरांस जो कांहीं अनुभव, साक्षात्कार आला असेल तो नमूद करून तुमचे समजुतीप्रमाणें एक टिपण तयार करून इकडे पाठवावें म्हणजे सर्वत्रांचीं टिपणें घेऊन चरित्र लिहिण्यास बरें पडेल. पंतांचे लेख व अस्सल कागद वगैरे असतील ते पाठवावे. ती. पंतांची शिष्यमंडळी कोठें कोठें आहेत याची याद करावी असा विचार आहे. करितां तुमच्या गावीं, तुमच्या आसपास व तुम्हांस माहीत असतील तीं नावें इकडे लिहून पाठवावीं. प्रत्येक गुरुपुत्राचें नाव, बापाचें नाव, आडनाव, जात, धंदा, कोठें असतो व त्यास कोणत्या दिवशीं निदान कोणत्या वर्षी अनुग्रह जाहला एवढी सर्व माहिती पाठवावी. आपणहि त्यांत आहांच". अशा रीतीनें श्रीपंत दृष्टिआड झाल्यापासूनच त्यांच्या शिष्यांसंबंधीं माहिती मिळविण्यास व चरित्राची सामुग्री जमविण्यास श्रीपंतबंधूंनीं सुरवात केली.

श्रीपंत गेल्यावर श्रीपंतबंधूंपुढें दुसरा एक अत्यंत महत्वाचा प्रश्न उभा राहिला. तो म्हणजे श्रीपंतांचा मार्ग पुढें चालू ठेवणें अगर न ठेवणें हा होता. श्रीपंतांनीं देह ठेवण्यापूर्वी आपल्या पश्चात अवधूतमार्ग पुढें चालविण्याबद्दल आपले बंधु व अण्णा अकोळकर, रावजी दड्डीकर वगैरे अति परिचयांतील मंडळी यांना कांहींच सांगून ठेविलें नव्हतें. त्यामुळें त्यांच्या पश्चात अवधूत संप्रदाय पुढें चालवूं नये असें त्यांच्या सर्व बंधूंचें मत होतें. श्रीपंत हे अवतारी पुरुष होते व "अवधूत मार्ग प्रगट कराया । आलें जन्मासी" ( द. प्रे. ल. २५७४ ) असें त्यांनींच म्हटल्याप्रमाणें तो मार्ग चालविण्याचा अधिकार त्यांचाच; तें आपणास नको असें त्याना वाटत होतें; आणि त्याप्रमाणें त्यांनीं संप्रदाय-क्रम बंद ठेविला होता. पण श्रीपंत गेल्यावर लौकरच तो चालू ठेवण्याबद्दल त्यांना कांहीं दृष्टांत झाला.

कार्तिक शु. १ शके १८२७ ( २९–१०–१९०५ ) रोजीं ठरल्याप्रमाणें श्रीपंतांच्या स्मारकाच्या योजनेसंबंधीं विचार करण्याकरितां पौष शु. १ शके १८२७ ( २७–१२–१९०५ ) हा दिवस नक्की करण्यांत आला व त्या दिवशीं बेळगाव, शहापूर, अकोळ, कडोली, बेडकिहाळ, चिकोडी, दड्डी, चिकालगुड, कोचरी, हुक्केरी,

यमकनमर्डी, पुणें, रत्नागिरी, ठाणें वगैरे पुष्कळ ठिकाणची भक्तमंडळी बाळेकुंद्री येथें जमली. भजन, आरती, महाप्रसाद वगैरे कार्यक्रम झाल्यावर त्या दिवशींच्या मुख्य कार्यक्रमाला सुरवात होऊन त्या वेळीं स्थापन होत असलेल्या संस्थेचें ' श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री बुद्रुक ' हें नाव ठेवावें असें ठरलें. त्यानंतर पुढील गोष्टी करण्याचें सर्वानुमतें ठरलें. त्या येणे-प्रमाणें:—श्रीपंतांच्या घरामागील परसांत समाधि बांधणें; आंबराईतील औदुंबर वृक्षास-भोवतीं षट्कोनी कट्टा बांधणें; विहीर व धर्मशाळा वगैरे इमारती बांधणें; आंबराई व बाग तयार करणें; श्रीपंतजन्मदिवस म्हणजे श्रावण वद्य ८ व श्रीपंतपुण्यतिथि म्हणजे अश्विन वद्य ३ या दोन्ही दिवशीं सर्व भक्तमंडळींनीं श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथें जमून श्रींचा उत्सव करणें व संस्थानाचें स्वतंत्र असें कायमचें उत्पन्न करून अतिथि–अभ्यागतास शिधा-पाणी देण्याची सोय करणें आणि ही सर्व व्यवस्था करण्याकरितां सर्वानुमतें कांहीं तरी योजना करणें; श्रीपंतांचीं पदें व त्यांचे लेख, निबंध, पत्रें वगैरे छापून प्रसिद्ध करणें व श्रीपंतांचें चरित्र लिहवून प्रसिद्ध करणें. यांपैकीं घरामागील परसांतील श्रीपंतांची समाधि बांधणें, औदुंबरकट्टा बांधणें व विहीर बांधणें हीं कामें ताबडतोब हातीं घेण्याचें ठरलें आणि त्या-करितां पाच सद्गृहस्थांची कमिटी नेमण्यांत आली व या कमिटीच्या कामावर देखरेख ठेवण्याकरितां आणि सल्ला देण्याकरितां १२ वजनदार गृहस्थांचें एक सल्लागार मंडळ नेमण्यांत आलें. त्यानंतर श्रीदत्तसंस्थानचे खजिनदार व सेक्रेटरी यांची नेमणूक होऊन संस्थानचा कारभार सुरळितपणें चालावा म्हणून कांहीं नियम करण्यांत आले व श्रीपंतांचे चुलते देवजी बाळकृष्ण कुळकर्णी यांच्या हस्तें श्रीदत्तसंस्थानच्या पायाचा दगड बसविण्यांत आला.

या प्रसंगीं आंबराईत श्रीपंतांची भक्तमंडळी जमून वाटाघाट चालली असतांना एक विलक्षण प्रकार घडून आला. तो असा कीं जेथें मंडळीची वाटाघाट चालली होती तेथें एक जण आला व त्यानें श्रीपंतबंधूंपुढें साष्टांग नमस्कार घालून असें सांगितलें कीं " पंतांकडून अनुग्रह घ्यावा अशी मला फार दिवस तळमळ लागून राहिली होती. परंतु माझ्या दुर्दैवानें त्यांच्या हयातींत तो योग जमून आला नाहीं. तेव्हां माझी आपणांला अशी अत्यंत काकुळतीची विनंति आहे कीं आपण मला अनुग्रह देऊन पावन करावें. " त्या इसमाचे हे निर्वाणीचे उद्गार ऐकून सर्व मंडळींना आश्चर्य वाटलें व सर्व जण आपापसांत वाटाघाट करूं लागले. तेव्हां अण्णा अक्कोळकर, काका घाणेकर, रावसाहेब दड्डीकर, बाळासाहेब कोचरीकर, गोपाळ श्रीपाद भागोजीकोप पुटप्पा कणबर्गी वगैरे तेथें हजर असलेल्या जुन्या जुन्या अनुभवी मंडळींनीं त्या आलेल्या भक्ताला अनुग्रह देण्याबद्दल श्रीपंतबंधूंना विनंति केली. तेव्हां सर्वांचीच तशी इच्छा असल्याचें पाहून व बेळगावांत नुकत्याच आलेल्या अनुभवावरून त्या भक्ताला अनुग्रह देण्याचें श्रीपंतबंधूंनीं ठरविलें आणि त्यांच्यांत वडील जे गोविंदरावजी त्यांनीं हें कार्य करावें असें सर्वानुमतें ठरलें. गोविंदरावजींचा स्वभाव अत्यंत निगर्वी व साधा; तेव्हां हा मान अथवा ही जबाबदारी आपणास नको असें त्यांनीं सांगितलें. परंतु आपल्या

बंधूंचा व इतर प्रेमळ व पूज्य व्यक्तींचा आग्रह पडल्यामुळें त्यांनीं त्या आलेल्या भक्ताला संप्रदायानुसार अनुग्रह दिला व तो समाधान पावून परत गेला. अशा तऱ्हेनें श्रीपंतांच्या पश्चात कांहीं दिवस बंद असलेलें शिष्यप्रबोधनकार्य त्यांच्याच घरांत, त्यांचे बंधु गोविंदरावजी यांचेकडून, सुरू झालें.

अशा रीतीनें पुढील कार्याची दिशा निश्चित झाल्यामुळें श्रीपंतांनीं देह ठेविल्यापासून भक्तमंडळींना जी उदासीनता वाटूं लागली होती ती बऱ्याच अंशानें कमी झाली व प्रत्येक जण आपल्या ऐपतीप्रमाणें व आवडीप्रमाणें स्मारकाचे कामीं हातभार लावूं लागला. वरील योजना निश्चित झाल्याबरोबर श्रीपंतबंधूंनीं आपल्या कांहीं जमिनी "श्रीदत्तसंस्थान, बाळेकुंद्री बुद्रुख" या संस्थेस दिल्या व त्या हल्लीं संस्थानच्या मालकीच्या व वहिवाटींत आहेत.

# प्रकरण ५१ वें

———:०:———

## स्मारकाच्या योजनेला मूर्तस्वरूप; वामनरावजींचें निधन; श्रीपंतांचें ओवीबद्ध चरित्र; नरसिंहरावजींचें निधन; ग्रंथप्रकाशन व स्मारकाच्या एका अंगाची पूर्तता

———:०:———

पौष शुद्ध १ शके १८२७ ( २७–१२–१९०५ ) रोजीं श्रीपंतांच्या स्मारकाची योजना निश्चित झाल्यानंतर लौकरच औदुंबर वृक्षाभोवतीं चिरेबंदी षट्कोनी पार बांधण्यांत आला, त्याच्या पूर्व बाजूस एक चिरेबंदी विहीर बांधिली गेली व उत्तरेस एक भव्य धर्मशाळा बांधण्यांत आली. नंतर कांहीं दिवसांनीं श्रीपंतांचे मामा श्रीपादपंत कुळकर्णी दड्डीकर हे श्रीक्षेत्र काशी येथें यात्रेनिमित्त गेले असतां त्यांनीं तेथून गंगा पाठवून दिली. ती श्रीपंतांच्या मातोश्रींनीं औदुंबर कट्ट्याशेजारीं बांधलेल्या विहीरींत घातली व त्या विहीरीचें " दत्ततीर्थ " असें नाव ठेवण्यांत आलें. श्रीपंतांच्या पहिल्या पुण्यतिथीचा उत्सव शके १८२८ पराभव नाम संवत्सरीं बाळेकुंद्री येथें झाला. त्या वेळीं बाळेकुंद्रीमधील श्रीपंतांच्या घराच्या परसांत जेथें अस्थि पुरल्या होत्या तेथें श्रीपंतांची विभूति स्थापून त्या जागेवर बांधलेल्या एका लहानशा व टुमदार देवालयांत त्यांच्या पादुकांची यथाविधि स्थापना करण्यांत आली. त्या पादुका श्रीपंतांचे एक शिष्य कुरुंदवाड येथील रामभाऊ सोनार यांनीं तयार करून दिल्या होत्या. या सालापासून श्रीपंतांच्या पुण्यतिथीचा उत्सव दरवर्षी श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथें होऊं लागला. प्रथम कांहीं वर्षे उत्सवाच्या पहिल्या दिवशीं सकाळीं श्रींची पालखी बेळगावमधील बाळेकुंद्रीकरांचे घरांतून निघून बाळेकुंद्रीस जात असे. पण पुढें श्रीपंतबंधूंनीं ती वहिवाट बंद केली व तेव्हांपासून श्रींची पालखी बाळेकुंद्रीमधील श्रीपंतांच्या घरांतून निघून श्रीरामेश्वराला प्रदक्षिणा करून आंबराईंत येते व उत्सवाला सुरवात होते. जरी पौष शुद्ध १ शके १८२७ ( २७–१२–१९०५ ) रोजीं श्रीपंतांच्या जन्माष्टमीचा व पुण्यतिथीचा असे दोन्ही उत्सव श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथें भक्तमंडळींनीं जमून करावयाचे असें ठरलें होतें, तरी जन्माष्टमीचा म्हणजे श्रावण वद्य ८ चा उत्सव बेळगाव येथें आपल्या घरीं करण्याचें श्रीपंतबंधूंनीं ठरविलें व त्याप्रमाणें तो त्यांचे घरीच होत असतो. तसेंच बेडकिहाळ येथील श्रीपंतांचे शिष्य श्रीमंत माधवराव जनार्दन ऊर्फ बाळासाहेब बेडकिहाळकर यांनीं श्रीपंतांच्या ह्यातींत जी एक जमीन त्यांचे नावें करून दिली होती तिचें उत्पन्न या जन्माष्टमीच्या उत्सवाकडे खर्च करण्याची श्रीपंतबंधूंनीं योजना केली असून त्या योजनेप्रमाणें दरसाल व्यवस्था करण्यांत येते.

## अंबाक्काचें अकल्पित निधन

श्रीपंतांच्या निधनानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांच्या घरांतील मंडळी प्लेगमुळें झोपडीवर राहावयास गेली होती व प्लेग्चें मान कमी झाल्यावर गावांतील वाड्यांत राहावयास आली. पण श्रीपंत गेल्यापासून त्यांना तेथें करमेनासें झालें. तशा स्थितींत १९०६ सालीं श्रीपंतबंधु देशपांडे गल्लींतील वाड्यांत राहात असतांना एक विलक्षण प्रकार घडून आला; तो असा कीं, प्रकरण ३९ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें, १९०० सालीं गोपाळरावजींच्या कुटुंबाला प्लेग झाल्याचें समजतांच ज्या खोलींत त्यांचें अंथरूण होतें त्या खोलींत जाऊन श्रीपंतांनीं त्यांना अंगारा लावून तीर्थप्रसाद दिला व त्या खोलींतून त्यांचें अंथरूण काढून दुसऱ्या ठिकाणीं नेण्यास सांगितलें होतें आणि त्याप्रमाणें त्यांचे अंथरुण दुसऱ्या ठिकाणीं नेऊन त्या खोलीला कुलूप घालण्यांत आलें व पुढें गोपाळरावजींच्या कुटुंबाला आराम पडत जाऊन त्या दुखण्यांतून त्या वाचल्या. पण ज्या खोलींत प्रथम त्यांचें अंथरूण होतें तिला जें एकदां कुलूप लावण्यांत आलें होतें तें श्रीपंत असेपर्यंत केव्हांहि काढलें नव्हतें. त्यांच्या पश्चात १९०६ सालीं एके दिवशीं त्या वाड्याचे मालक, रामराव सुंठणकर, हे वाड्यांत गेले व गोपाळरावजींना बरोबर घेऊन घरांत कोठें दुरुस्ती वगैरे पाहिजे आहे की काय तें पाहूं लागले. माजघरांतील बंद असलेल्या खोलीशीं जेव्हां ते गेले तेव्हां त्यांनीं गोपाळरावजींना ती उघडण्यास सांगितलें व "या खोलीला एखादी खिडकी तरी लावूं" असें म्हटलें. त्या वेळीं श्रीपंतांची मुलगी अंबाक्का हिला घेऊन श्रीपंतांच्या मातोश्री माजघरांतील त्या खोलीच्या समोरच बसल्या होत्या. त्या वेळीं अंबाक्का सुमारें चार वर्षांची होती. रामरावांच्या सांगण्यावरून गोपाळरावजींनीं त्या खोलीचें कुलूप काढून दरवाजा उघडल्याबरोबर समोरच असलेल्या अंबाक्कानें मोठ्यानें किंकाळी फोडली व तिला ताप भरला आणि दुसऱ्याच दिवशीं तिचा अंत झाला! अशा रीतीनें १९०० सालीं श्रीपंतांच्या सांगण्याप्रमाणें व्यवस्था केल्यावर गोपाळरावजींचें कुटुंब प्लेगच्या दुखण्यांतून वाचलें खरें, पण नंतर सहा वर्षांनीं त्या खोलींत जणूं कोंडून ठेविलेल्या निर्घृण काळानें श्रीपंतांच्या पश्चात ती खोली उघडतांच त्यांच्या मुलीचाच बळी घेतला! अंबाक्काच्या अकल्पित निधनानें श्रीपंतांची औरस संतती नाहींशी झाली व घरांतील सर्व मंडळीला अतिशय दुःख झालें. श्रीपंतांच्या पश्चात श्रीपंतमातोश्री वगैरे मंडळी अंबाक्काकडे पाहून समाधान मानून घेत व तिला जिवापलीकडे जपत. पण तें समाधानहि फार वेळ टिकलें नाहीं. वरील प्रकार घडल्यानंतर थोड्याच दिवसांनीं श्रीपंतबंधूंनीं देशपांडे गल्लींतील वाडा सोडला व केळकरबागेंत भाड्यानें जागा घेऊन तेथें ते राहूं लागले. नंतर कांहीं दिवसांनीं त्यांनीं हल्लीं बाळेकुंद्रीकर राहात असलेलें समादेवी गल्लींतील घर विकत घेऊन तेथें ते राहावयास गेले.

## "श्रीदत्तप्रेमलहरी" चें प्रकाशन

श्रीपंतांच्या हयातींत अकोळ येथील त्यांचे शिष्य श्रीयुत गोविंद सदाशिव कुळकर्णी

आणि भिमाजी सदाशिव कुळकर्णी यांनीं १९०२ च्या सुमारास त्यांचीं सर्व पदें छापून प्रसिद्ध करण्याबद्दल श्रीपंतांजवळ गोष्ट काढिली होती. पण आपल्या हयातींत तीं छापलीं जाऊं नयेत असें त्यांनीं निक्षून सांगितलें होतें. परंतु जेव्हां आपण एक छापखाना मुद्दाम विकत घेऊन त्या छापखान्यांत हीं पदें छापविणार असल्याचें त्यांनीं श्रीपंतांना सांगितलें तेव्हां छापखाना विकत घेण्याची व त्यांत पदें छापण्याची श्रीपंतांनीं त्यांना परवानगी दिली होती. त्याप्रमाणें त्यांनीं एक छापखानाहि विकत घेतला होता. पण तो नीट न चालल्यामुळें पदें छापण्याचें काम तसेंच राहिलें व श्रीपंतांच्या हयातींत त्यांचीं पदें छापलीं गेलीं नाहींत. मात्र वरील दोन भक्तांनीं श्रीपंतांची परवानगी घेतल्याशिवाय " भक्तालाप " व " भक्तोद्वार किंवा प्रेमभेट " हे त्यांचे दोन लेख, अनुक्रमें मुंबई येथील निर्णय-सागर प्रेस व कोल्हापूरमधील जैनेंद्रप्रेस या छापन्यांत छापवून घेतले. पण श्रीपंतांची परवानगी न घेतां आपण तो छापवून घेतल्यामुळें श्रीपंत रागावतील या भीतीनें त्यांनीं ' भक्तोद्वार किंवा प्रेमभेट ' या लेखाच्या सर्व छापील प्रतींचा नाश करून टाकिला व फक्त ' भक्तालापा'च्या छापील प्रति बेळगावास श्रीपंतांकडे पाठवून दिल्या. पण श्रीपंतांना ती गोष्ट पसंत न पडून त्यांनीं त्या सर्व प्रति नाहींशा करण्यास सांगितलें व त्याप्रमाणें ताबडतोब व्यवस्था करण्यांत आली. अशा रीतीनें श्रीपंतांच्या हयातींत त्यांच्या वाङ्मयाचा कोणताहि भाग त्यांनीं प्रसिद्ध होऊं दिला नाहीं. पण त्यांनीं देह ठेविल्यापासून त्यांच्या भक्तांना त्यांचें वाङ्मय केव्हां प्रसिद्ध होईलसें वाटूं लागलें होतें. निदान त्यांचीं पदें तरी ताबडतोब छापलीं जावी असें प्रत्येकाला वाटत होतें. त्यामुळें श्रीपंतबंधूंनीं प्रथम श्रीपंतांचीं पदें छापून प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. हीं सर्व पदें श्रीपंतांच्या घरांत व्यवस्थित रीतीनें लिहून ठेविलेलीं होतीं. तसेंच कित्येक पदांचीं मूळ टिपणेंहि होतीं. श्रीपंतांच्या एकंदर पदांची संख्या सुमारें दोन हजार आठशेपर्यंत आहे. त्यांपैकीं शेकडा नव्याण्णव पदें मराठींत आहेत व बाकीचीं कानडींत आहेत. तसेंच श्रीपंतांच्या शिष्य-मंडळींतहि मराठी भाषा जाणणारांचा व बोलणारांचा भरणा विशेष होता. त्यामुळें श्रीपंत-बंधूंनीं श्रीपंतांचीं मराठी भाषेंतील पदें छापविण्याचें काम हातीं घेतलें व तीं सर्व तपासून चैत्र शुद्ध १ शके १८२९ च्या सुमारास त्यांची प्रथमावृत्ति " श्रीदत्तप्रेमलहरी " या नावानें छापून प्रसिद्ध केली आणि श्रीपंतांच्या पश्चात सुमारें दीड वर्षानें त्यांच्या सर्व पदांचा संग्रह भक्तमंडळींच्या हातीं पडण्याची व्यवस्था झाली. सदर आवृत्तीला नरसिंह-रावजींनी जी प्रस्तावना लिहिली आहे त्या प्रस्तावनेंत श्रीपंतांचें थोडक्यांत चरित्र दिलें असून " श्रीदत्तप्रेमलहरीं "तील पदांसंबंधींहि थोडक्यांत माहिती दिली आहे. १९१७ ( शके १८३९ ) सालीं श्रीपंतबंधूंनां " श्रीदत्तप्रेमलहरी " ची दुसरी आवृत्ति काढली; १९२३ (शके १८४५) सालीं त्यांनीं तिसरी आवृत्ति काढली व तिला विस्तृत असा उपोद्घातहि जोडलेला आहे.

श्रीपंतांचे लहान मोठे लेख व निबंध त्यांच्या घरीं त्यांच्या दप्तरांत होते. तेव्हां

ते तावडतोब छापून प्रसिद्ध करितां येण्यासारखे होते. परंतु श्रीपंतांनीं वेळोवेळीं निर-निराळया भक्तांना लिहिलेलीं पत्रें मात्र त्या त्या भक्तांकडे अगर त्यांच्या वारसांकडे होतीं. श्रीपंतबंधूंना तीं त्यांचेकडून मागवून घ्यावीं लागलीं व या कामीं त्यांना फार परिश्रम करावे लागले. जरी १९०५ च्या अखेरपासून श्रीपंतांसंबंधीं माहिती व आपापले अनुभव लिहून पाठविण्याबद्दल भक्तमंडळींना पत्रें लिहिण्यास श्रीपंतबंधूंनीं सुरवात केली होती तरी १९१२ पर्यंत एकाहि भक्ताकडून त्यांचेकडे माहिती लिहून आली नव्हती. पण त्या सालीं ( शके १८३४ ) गोकुळाष्टमीच्या उत्सवाकरितां श्रीपंतबंधूंच्या घरीं पुष्कळ भक्तमंडळी जमली असतां श्रीपंतांसंबंधीं माहिती व श्रीपंतांच्या सहवासांत आलेले अनुभव लिहून पाठविण्याबद्दल त्यांनीं सर्वांना अतिशय कळकळीनें विनंति केली आणि तेव्हांपासून भक्तमंडळींवर पत्रांचा जणूं भडिमार सुरू केला. त्याचप्रमाणें अकोळ येथील श्रीपंतांचे शिष्य गोविंद सदाशिव कुळकर्णी यांनींहि एक पत्रक प्रसिद्ध करून आपल्या गुरुबंधूंना श्रीपंतांसंबंधींची माहिती लिहून ती श्रीपंतबंधूंकडे पाठविण्याची कळकळीची विनंति केली. या सर्व प्रयत्नांचा योग्य तो परिणाम होऊन १९१३ पासून कांहीं टाचणें श्रीपंतबंधूंचे हातीं येण्यास सुरवात झाली.

## वामनरावजींचें निधन

श्रीपंतांच्या पश्चात त्यांचे शिष्य त्यांच्या बंधूंना फार पूज्य मानीत असत व श्रीपंतबंधुहि त्यांना आपलेपणानें व बंधुभावानें वागवीत. श्रीपंतबंधूंच्या व इतर श्रीपंतभक्तांच्या कळकळीनें व परिश्रमानें श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री बद्रुक या संस्थेची भर-भराट होत गेली व तेथील वार्षिक उत्सव विशेष थाटानें व उत्साहानें होऊं लागला. तसेंच पावसाळ्याखेरीज दर पौर्णिमेला व अमावास्येला श्रींची पालखीसेवा व्हावी म्हणून श्रीपंतबंधूंनीं एक योजना तयार केली. पालखीसेवेच्या पाळ्या ठरवून एक एक पाळी एक अगर अधिक गावांतील भक्तांकडे सोपविण्यांत आली. त्यामुळें ही पालखीसेवा सुर-ळितपणें होऊं लागली. मागें उल्लेख केल्याप्रमाणें गोकुळाष्टमीचा अथवा श्रीपंतजन्माष्टमीचा उत्सव श्रीपंतबंधु आपल्या घरींच करूं लागले व त्या उत्सवालाहि भक्तमंडळींचा मोठा भरणा जमूं लागला. अशा रीतीनें श्रीपंतांच्या पश्चात श्रीपंतबंधूंची सुमारें बारा वर्षें प्रपंच-परमार्थ-दृष्ट्या चांगलीं भरभराटींत गेलीं. पण श्रीपंतबंधु वामनरावजींची नाशिक येथें ॲक्टिंग-फर्स्टक्लास सब-जजाचे जागेवर नेमणूक होऊन तेथें गेल्यावर थोड्याच दिवसांत २२-२-१९१८ रोजीं ते सद्गुरुस्वरूपीं लीन झाले. त्यांचे पश्चात त्यांचें कुटुंब व चार लहान मुलें होतीं. त्यांचेवर व वामनरावजींच्या मातोश्री, त्यांचे बंधु वगैरे मंडळींवर हा मोठाच आघात झाला. अंतसमयीं वामनरावजींचें वय सुमारें ५० वर्षांचें होतें. त्यांनीं आपल्या नोकरींत चांगला नावलौकिक संपादन केला होता. पण विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे अखेरपर्यंत त्यांची श्रीपंतांच्या ठिकाणची निष्ठा अचल होती व सर्व श्रीपंत-भक्तांना ते आपुलकीनें व मोठ्या प्रेमानें वागवीत. त्यामुळें जेथें जेथें त्यांचा नोकरीनिमित्त

मुक्काम असे तेथें तेथें पुष्कळ श्रीपंतभक्त वारंवार जात असत व त्यांचें तेथें प्रेमानें आदरातिथ्य होत असे.

वामनरावजींच्या अकल्पित मृत्यूनें भरभराटीस आलेल्या बाळेकुंद्रीकरांच्या घराण्याला मोठाच धक्का बसला. तरी पण त्यांच्या बंधूंनीं मोठ्या धैर्यानें सद्गुरुसेवेचें व्रत चालूच ठेविलें. बेळगाव येथील घरचा कारभार नरसिंहरावजी पाहात असत. ते जसे श्रीपंतबंधु होते तसे कट्टे श्रीपंतभक्ताहि होते. त्याचप्रमाणें ते व्यवहारदक्ष असून आपल्या वकिलीच्या धंद्यांत नाणावलेले होते. त्यामुळें ते प्रपंचाची धुरा सांभाळून आपले बंधु गोविंदरावजी यांना सद्गुरुसेवेच्या कार्यांत झटून मदत करीत व श्रीपंत-भक्तांना योग्य सल्ला देऊन आणि वेळप्रसंगीं झीज सोसूनहि मनापासून साह्य करीत. त्यामुळें हजारो श्रीपंतभक्तांना ते आपले अनिमित्त सोयरेसे वाटत. नरसिंहरावजींचें कुटुंब १९०८ सालीं निवर्तलें. पण त्यानंतर त्यांनीं दुसरें लग्न न करितां सद्गुरुसेवेला आपणास जणूं वाहून घेतलें. त्यायोगें वामनरावजींच्या निधनानें विसकटलेली प्रपंचाची घडी पुनः थोडथोडी बसत चालली. गोपाळरावजी डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टरच्या हुद्यापर्यंत चढून १९२२च्या सप्टेंबर महिन्यांत सेवानिवृत्त झाले व त्यांना रु. ३०३-१-० पेन्शन मिळूं लागलें. ते सरकारी नोकरीवर असतांना त्यांनीं जी कामगिरी केली तिजबद्दल त्यांना "रावबहादूर" ही पदवी मिळाली. पुढें १९२५ साली रामदुर्ग संस्थानचे कारभारी म्हणून त्यांची नेमणूक झाली व ते रामदुर्ग येथें राहूं लागले. त्यामुळें घरचा कारभार नरसिंहरावजीच पाहात असत.

## श्रीपंतभक्तांनीं लिहिलेल्या हकीगती व श्रीपंतांचें ओवीबद्ध चरित्र

दिवसेंदिवस निरनिराळ्या श्रीपंतभक्तांकडून त्यांच्या त्यांच्या अनुभवांसंबंधींच्या हकीगती येऊं आगल्या व त्यांची संख्या १६० चे वर गेली. श्रीपंतांचें सर्व कागदपत्र नरसिंहरावजींनीं अतिशय काळजीपूर्वक जपून ठेविलें होतें व तें एका अग्निप्रतिबंधक (फायरप्रुफ) पेटींत ठेवून ती पेटी ते आपल्या झोपण्याच्या पलंगडीखालीं ठेवीत असत. त्याचप्रमाणें भक्तमंडळींकडून आलेल्या हकीगती व इतर कागद पत्र हें सर्व त्यांनीं फार व्यवस्थित रीतीनें जपून ठेविलें होतें. श्रीपंतांचें गद्य वाङ्मय प्रसिद्ध करावें व त्यांचें चरित्र लिहवून घेऊन तें आपल्या देखत प्रसिद्ध करावें असें त्यांना फार वाटत असे. पण तो योग जमून आला नाहीं. मात्र त्यांचे देखरेखीखालीं श्रीपंतांचें ओवीबद्ध चरित्र लिहिलें जाण्याचा एक विलक्षण योगायोग जमून आला. तो असा:—वामन नरहर कामत नावाचे सारस्वत जातीचे एक गृहस्थ श्रीपंतांचे शिष्य आहेत. ते सुमारें तेरा चौदा वर्षांचे असतांना त्यांचेवर श्रीपंतांचा अनुग्रह झाला होता. त्यानंतर एक दोन वर्षांनीं श्रीपंतांनीं देह ठेविला. वामनरावांची घरचो गरिबी असून शिक्षण अगदीं बेताचें म्हणजे मराठी तीन चार यत्तांपर्यंत झालें होतें. पुढें त्यांचे वडीलहि वारले व ते एकटेच कोठें तरी भटकत असत. मिरज येथें एका धर्मशाळेंत एके दिवशीं ते निजले असतांना श्रीपंतांनीं त्यांच्या तोंडांत विभूति घालून लिहिण्यास सांगि-

तलें असा त्यांना स्वप्नांत दृष्टांत झाला. जागे झाल्यावर त्यांना त्या स्वप्नाचें आश्चर्य वाटलें व काय लिहावें तें सुचेना; पण आपण कांहीं तरी लिहावें अशी उत्कंठा मात्र वाटूं लागली. दुसरे दिवशीं सकाळीं उठल्याबरोबर बाजारांत जाऊन त्यांनीं चार पैशांचे कागद व एक पेन्सिल हे जिन्नस विकत घेतले आणि श्रीपंतांसंबंधीं कांहीं तरी लिहावें असें जरी त्यांना वाटत होतें तरी काय लिहावें यासंबंधीं कांहींच निश्चिय होईना; तेव्हां ते बेळगाव येथें श्रीपंतबंधूंचे घरीं गेले. त्यांची राहाणी एखाद्या खेडवळाप्रमाणें होती व आपण येथें कशाकरितां आलों हें त्यांनीं कोणाशींहि बोलून दाखविलें नाहीं. श्रीपंतबंधूंकडे श्रीपंतांचे असे पुष्कळ शिष्य येत असत; त्यामुळें त्यांनीं इतर मंडळींप्रमाणें वामनरावांची जेवणाखाणाची वगैरे व्यवस्था केली; पण "तूं कशाकरितां आला आहेस?" असें वामनरावांना कोणीं विचारलें नाहीं. ते घरांतील मंडळीबरोबर जेवीत असत व बसून राहात असत. एके दिवशीं श्रीपंतांचा एक लेख त्यांच्या पाहाण्यांत आला व कोणालाहि न सांगतां त्यांनीं त्या लेखांतील मजकुराचा आधार घेऊन शे दिडशे ओव्या लिहिल्या. असा प्रकार दोन तीन दिवस चालला होता. नंतर एके दिवशीं श्रीपंतबंधु नरसिंहरावजी यांचे हाताला वामनरावांनीं ओवीवृत्तांत लिहिलेलें तें काव्य लागलें व तें वाचून पाहातां 'हें कांहीं तरी नवीन आहे' असें वाटून त्यांनीं त्यासंबंधीं चौकशी केली. तेव्हां तें वामनरावांनीं लिहिलें असल्याचें त्यांना समजलें. वामनरावांच्या त्या कवितेमध्यें दिसून येणारी सहज स्फूर्ति व अलंकारिक आणि प्रौढ भाषा पाहून नरसिंहरावजींना फार कौतुक वाटलें. वामनरावांपाशीं अधिक चौकशी केल्यावर त्यांच्या ठिकाणीं काव्यस्फूर्ति असल्याची नरसिंहरावजींची खात्री झाली आणि तेव्हांपासून त्यांचें वामनरावांकडे विशेष लक्ष वेधून ते त्यांना लिहिण्याला जरूर अशा सोई करून देऊं लागले. आस्ते आस्ते श्रीपंतांच्या शिष्यमंडळींकडून लिहून आलेल्या हकीगती ते वामनरावांना वाचावयास देऊं लागले आणि त्यायोगें वामनरावांना श्रीपंतांच्या चरित्रांतील ठळक ठळक गोष्टी माहित झाल्या. नंतर वामनरावांच्या ठिकाणच्या काव्यस्फूर्तीचा उपयोग श्रीपंतांचें चरित्र लिहिण्याचे कामीं झाल्यास फार चांगलें होईल असें वाटून नरसिंहरावजींनीं त्याप्रमाणें त्यांना सांगितलें व त्यांचेकडून लिहिण्यास सुरवातहि करविली. तेव्हांपासून श्रीपंतभक्तांकडून लिहून आलेल्या हकीगतींपैकीं एकेक हकीगत वामनरावांना देण्यास नरसिंहरावजींनीं सुरवात केली आणि त्या मजकुरावरून ते ओवीवृत्तांत एकेक अध्याय लिहूं लागले. असें होतां होतां वामनरावांनीं बावन्न अध्यायांत श्रीपंतांचें चरित्र लिहिलें. या चरित्रांतील प्रत्येक अध्याय शे दीडशे ओव्यांचा असून एकंदर ओवी-संख्या सुमारें सहा सात हजार भरेल. याप्रमाणें श्रीपंतांचें चरित्र लिहून झाल्यानंतर नरसिंहरावजींनीं श्रीपंतांचे कांहीं लेख वामनरावांना दिले व वामनरावांनीं त्यांचेंहि ओवीवृत्तांत रूपांतर केलें आहे.. अशा रीतीनें वामनरावांनीं आतांपर्यंत एकंदर १२००० ते १५००० ओव्या लिहिल्या आहेत. सवडीप्रमाणें त्यांतील कांहीं भाग प्रसिद्ध करण्याचा श्रीपंतबंधूंचा विचार होता; पण तो अद्याप सफल झाला नाहीं.

वामनरावांचें शिक्षण व वाचन हीं अगदींच तुटपुंजीचीं दिसतात. त्यामुळें त्यांच्या काव्यांत जे उपमारूपकादि अलंकार व प्रौढ शब्द आले आहेत ते कोठून व कसे आले यासंबंधीं मोठा अचंबा वाटतो. त्यांनीं लिहिलेल्या श्रीपंतचरित्राच्या पहिल्या अध्यायांतील कांहीं ओव्या येथें देत आहोंत. त्यांवरून त्यांच्या गुणासंबंधीं वाचकांना थोडीशी कल्पना येईल. त्या अशाः—

"तूं भक्तजनमानसचकोरचंद्र। कीं तूं भक्तजनकरुणासमुद्र। मस्तकीं ठेवितां अभयकर। सर्व सुखें तो पावे ॥ १७ ॥ तुझे कृपें सर्व सुखें पावलों। ब्रह्मानंदसागरीं निमालों। पूर्ण तृप्त जाहलों। तुझिया चरणप्रसादें ॥ १८ ॥ × × × × × × तूंचि शांतीचा सागर। भक्तिवैराग्याचें भांडार। भक्तजनांचें माहेर। दिनदयाळा अससी तूं ॥ ६९ ॥ माउलीहूनी तूं मायाळ। चंद्राहूनी तूं शीतळ। गंगेहूनी तूं निर्मळ। अवतार प्रेमाचा ॥ ७० ॥ तुज द्यावया उपमा। न दिसे आन पुरुषोत्तमा। तुझी तुजाचि साजे उपमा। आनंदधामा जगद्गुरु ॥ ७१ ॥ × × × × × × × × × × × सूत्र बाहुलीची निश्चितीं। सूत्रें जैसीं सूत्रधाराचे हातीं। तैसा तूं गुरुमूर्ति। सूत्रधार आमुचा ॥ ७५ ॥ जैसें तूं लिहविशी जाण। तैसें तैसेंचि होतें लेखन। निमित्त नाहीं मजवरी जाण। हेंचि तुजप्रति मागतों ॥ ७६ ॥ रसाळ वाचा कवित्वशक्ति। दोन्हीहि नाहीं मजप्रति। त्यांत मज्जा अशक्ति। विचार कैसे सुचती मज ॥ ७७ ॥ परी तूं देसी अभयवर। मज श्रम न होती अणुमात्र। क्षणक्षणां सुचती विचार। अगाध करणी करसी तूं ॥ ७८ ॥ नेत्रांसि कांहीं नोहे त्रास। मस्तक शांत विशेष। प्रकृतींत जोम बहुवस। सर्वहि करणें तुझेंचि ॥ ७९ ॥ कांहीं न वाटे खंती। मनामाजीं विशेष शांति। कृपाळुत्वा गुरुमूर्ति। हेंहि करणें तुझेंचि ॥ ८० ॥ तूं काय न करिसी जाण। सर्वहि सत्ता तुझे आधीन। पतितमुखें करोन। वेद तुवां बोलविले ॥ ८१ ॥ तव चरणीं मस्तक ठेवून। तव प्रेरणेनुरूप होतसे लेखन। तूं जे लीला सुचविसी जाण। तेचि लिहीन दयाळा ॥ ८२ ॥"

वामनरावांनीं आपल्या काव्यांत जी शब्दयोजना केली आहे व जे अलंकार उपयोगांत आणिले आहेत त्यांची उपपत्ति ... त्यांना विचारली तर ती त्यांना सांगतां येत नाहीं. तसेंच त्यांच्या कवित्वशक्तीचा हा एक विशेष आढळतो की, त्यांना कविता करण्याची सुरवात करण्यास कांहीं तरी मजकूर पुढें असावा लागतो. तसा मजकूर पुढें आला म्हणजे ते नुसतें गद्याचें पद्यांत रूपांतर करीत नसून त्यांच्या काव्यांत स्वतंत्र प्रतिभेचा व कल्पकतेचाहि बराच भाग असतो. वर ज्या कांहीं ओव्यांचें अवतरण दिलें आहे त्या ओव्या पहिल्या अध्यायांतील मंगलाचरणापैकीं असून त्या त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेनें निर्माण झालेल्या आहेत हें उघड आहे. कारण नरसिंहरावजींनीं श्रीपंतचरित्रा-संबंधीं त्यांचे पुढें जो मजकूर ठेविला होता त्यांत हा मंगलाचरणाचा भाग येणें शक्य नव्हतें. त्यांनीं लिहिलेल्या श्रीपंतचरित्रांत त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेनें निर्माण केलेलीं अशीं बरींच रम्य स्थळें आहेत. उदाहरणार्थ श्रीपंतांच्या एका भक्तानें लिहिलेल्या हकीगतींत आपण श्रीगणपतिभक्त असल्याचा उल्लेख केलेला आहे. तेवढ्या आधारावर वामनरावांनीं

त्या भक्तासंबंधींच्या अध्यायांत श्रीगणपतीच्या उपासनेचें विस्तृत असें तात्विक विवेचन केलें आहे व तें सर्वमान्य होण्यासारखें आहे. वामनरावांच्या या लेखनस्फूर्तीचा आणखी एक विशेष हा आहे कीं ते जो मजकूर लिहीत जातात तो कायमच असतो; त्यांत मागाहून म्हणण्यासारखे फेरफार ते करीत नाहींत. म्हणजे तोंडपाठ असलेला मजकूर ज्याप्रमाणें कागदावर लिहावा त्याप्रमाणें त्यांचें लेखन चालतें. वामनरावांनीं या ओवीबद्ध चरित्रांत बरेचसे चमत्कार वर्णिले आहेत.

## नरसिंहरावजींचें निधन

वर उल्लेख केलेलें श्रीपंतांचें ओवीबद्ध चरित्र लिहून झालें तरी प्रस्तुत चरित्रासारखें श्रीपंतांचें चरित्र आपल्या देखरेखीखालीं लिहून घ्यावें अशी नरसिंहरावजींची फार इच्छा होती. पण ती सफल होण्यापूर्वींच शके १८४७ चैत्र शुद्ध ९ (रामनवमी) २१–४–१९२६ रोजीं त्यांनीं बेळगाव येथें इहलोकची यात्रा संपविली. त्यामुळें त्यांच्या वृद्ध मातोश्रींना व बंधूंना फार दुःख झालें आणि कित्येक भक्तांना आपला आप्त गेल्याप्रमाणें वाटूं लागलें. नरसिंहरावजींचें कुटुंब अगोदरच निवर्तलें होतें व ते गेले तेव्हां त्यांचा एकुलता एक मुलगा सीताराम ऊर्फ बापूराव हा लहानच होता.

नरसिंहरावजींच्या बंधूंनीं त्यांचा देह बाळेकुंद्री येथें नेऊन तेथें श्रींच्या आंबराईच्या उत्तरेच्या बाजूला त्याला अग्निसंस्कार केला. नंतर कांहीं दिवसांनीं त्यांचें भाचे श्रीयुत (हल्लीं रावसाहेब) शंकर विरूपाक्ष पट्टीहाळ, असिस्टंट एंजीनिअर पी. डब्ल्यू. डी. मुंबई, (हल्लीं रिटायर्ड) व असिस्टंट एंजीनिअर, पॅलेस, बिकानेर, यांनीं आपल्या पूज्य व प्रिय नरसूमामांच्या स्मरणार्थ, ज्या जागीं त्यांच्या देहाला अग्निसंस्कार झाला त्या जागीं, "श्रीनरसिंहमंदीर" नावाची एक लहानशी टुमदार इमारत बांधिली व त्या इमारतींत वामनरावजी व नरसिंहरावजी यांच्या अस्थि ठेवण्यांत आल्या आणि श्रीपंतांचें नेहमीं बसण्याचें कोच व त्यांची एकतारी व इतर जिन्नस हीं ठेवण्यांत आलीं. नरसिंहरावजींच्या अकल्पित निधनानें बाळेकुंद्रीकरांच्या घराण्याची मोठी हानी झाली. नरसिंहरावजींचें चरित्र फार उदात्त व पुष्कळ बाबतींत आदर्शभूत होतें. श्रीपंतांच्या ठिकाणीं त्यांची फार निष्ठा होती व सर्व श्रीपंतभक्तांवर त्यांचें अकृत्रिम प्रेम असे आणि त्यांच्या ऐहिक व पारमार्थिक उन्नतीकरितां ते मनापासून झटत असत. नरसिंहरावजी म्हणजे जाज्वल्य गुरुभक्तीची मूर्तिच होते. त्याचप्रमाणें ते कट्टे मातृभक्त असून त्यांच्या ठिकाणची बंधुप्रीतिहि वाखाणण्यासारखी होती. त्यांचा स्वभाव फार बाणेदार असून निस्पृह होता. त्यांचा वर्तनक्रम अत्यंत शुद्ध असून राहाणी साधी व टापटिपीची होती. तसेच ते शिस्तीचे फार चाहाते होते. त्यांनीं वकिलीच्या धंद्यांतहि चांगला नावलौकिक संपादन केला होता. त्यांच्या निधनानंतर २६-४-१९२६ रोजीं बेळगाव येथें प्रसिद्ध होत असलेल्या बेळगाव-समाचारांत पुढील मजकूर प्रसिद्ध झाला. "येथिल वकील मि. नरसिंगराव बाळेकुंद्रीकर यांस २०।२१ दिवस ताप येऊन गेल्या बुधवारीं म्हणजे रामनवमीचे दिवशीं दोन प्रहरीं १२ वाजतां (रामजन्माचे

सुवेळीं ) देवाज्ञा झाल्याचें कळविण्यास आम्हांस फार दुःख होतें. त्यांचें वय ५१ वर्षांचेंच होतें व ते प्रकृतीस फार जपून राहात होते. त्यामुळें त्यांच्यावर मृत्यूचा घाला इतक्यांत पडेल असें कोणासहि वाटलें नव्हतें. परंतु एकाएकीं घात व्हावयाचा तो झालाच ! त्यांचे बंधु (पंतमहाराज, दत्तोपंत) यांचे पश्चात बाळेकुंद्रीस त्यांनीं स्थापन केलेल्या देवस्थानची व्यवस्था अखेरपर्यंत तेच पाहात होते. वकिलीच्या व्यवहारांत ते फार पोक्त व योग्य सल्ला देत असत व त्यांची द्रव्यतृष्णाहि फार नसे. त्यांचें कुटुंब निवर्तून बरीच वर्षें झालीं. परंतु अंतकाळपर्यंत ते अविवाहित स्थितींतच राहिले होते. सार्वजनिक काम म्हणजे येथील को. के. ब्यांकेचे दावे तेच निकाल करीत असत. त्यांच्या मृत्यूमुळें बाळेकुंद्रीकरांचे घराण्यावर विशेषतः त्यांचे वृद्ध मातोश्रींवर मोठाच दुर्धर प्रसंग गुदरला यांत संशय नाहीं. त्यांचा अंत झाल्याबरोबर त्यांचें शव मोटारमधून बाळेकुंद्रीस त्यांच्या पूज्य देवस्थानचे ठिकाणीं नेऊन विधि उरकण्यांत आला." तसेंच ७-५-१९२६ च्या मुंबई येथें निघत असलेल्या "नवाकाळ" च्या अंकांत नरसिंहरावजींसंबंधीं पुढील मजकूर होता "येथील ( बेळगावमधील ) सदाचारी, सत्यप्रिय, प्रसिद्ध वकील श्रीनरसिंहराव बाळेकुंद्री यांना न्युमोनियाच्या विकारानें रामनवमीच्या दिवशीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास फार वाईट वाटतें. हे पंतमहाराज बाळेकुंद्री यांचे कनिष्ठ बंधु होत. यांच्या स्वभावांत सत्वगुण प्रामुख्येंकरून असल्यानें ते सर्वांना प्रिय होते. इहलोकच्या त्यांच्या आचरणावरून परमेश्वर त्यांना मोक्ष देईल यांत मुळींच शंका नाहीं."

## ग्रंथप्रकाशन व स्मारकाच्या एका अंगाची पूर्तता

नरसिंहरावजींनीं आपल्या हयातींत "श्रीदत्तप्रेमलहरी" या पदसंग्रहाला पुष्कळ मागणी असल्यामुळें त्याच्या तीन आवृत्ति काढल्या व लेख, निबंध, पत्रें, कानडी पदें वगैरे श्रीपंतांचें इतर वाङ्मय चांगलें संशोधून प्रसिद्ध करण्याची त्यांना सारखी तळमळ लागून राहिली होती. त्याचप्रमाणें नागरकट्टींनीं केलेलीं श्रीपंतांच्या बोधाचीं टिपणें, श्रीबालमुकुंदांची कानडी पदें वगैरे क्रमाक्रमानें छापून प्रसिद्ध करण्याचाहि त्यांचा संकल्प होता. परंतु त्यांच्या हयातींत त्यांची ही इच्छा पूर्ण होण्याचा सुयोग जमून आला नाहीं. पण त्यांच्या अकल्पित निधनानंतर त्यांचे बंधु गोविंरावजी, गोपाळरावजी व शंकररावजी यांना मात्र असें वाटूं लागलें कीं आतां यापुढें श्रीपंतांचें वाङ्मय अप्रसिद्ध राहूं देणें बरें नाहीं. त्यामुळें श्रीपंतांचें स्वदस्तुरचें वाङ्मय ताबडतोब प्रसिद्ध करण्याचें त्यांनीं ठरविलें व या कामीं शंकररावजींनीं पुढाकार घेतला.

शंकररावजी १९०७ सालीं एल् एल्. बी. पास झाले व तेव्हांपासून ते वकिली करूं लागले होते. नरसिंहरावजींच्या निधनानंतर घरचा कारभार त्यांना पाहावा लागे. तरी पण त्यांनीं गोविंदरावजींच्या सल्ल्यानें श्रीपंतांचें वाङ्मय प्रसिद्ध करण्याची तयारी करण्यास सुरवात केली. मागें सांगितल्याप्रमाणें लेख, निबंध, पत्रें वगैरे श्रीपंतांचें बहुतेक गद्य वाङ्मय मोडींत लिहिलेलें होतें. त्यामुळें त्याचें संशोधन करून शुद्ध बालबोध लिपींत

नक्कल करणें भाग झालें. दत्तोपंत नागरकट्टी, रामभाऊ गाडगीळ, नारायण अण्णाजी संपगावकर, रामचंद्र व्यंकटेश करवीर वगैरे कांहीं उत्साही मंडळींनीं "ग्रंथप्रसारक मंडळी" नावाचा एक लहानसा संघ स्थापन करून या जिकीरीच्या कामीं श्रीपंतबंधूंना मनापासून साह्य केलें आणि "मुद्रणफंड" नावाचा एक निधि काढून हें वाङ्मय छापून प्रसिद्ध करण्याला लागणाऱ्या खर्चाचीहि व्यवस्था केली. त्याचप्रमाणें श्रीपंतांचे मेहुणे श्रीयुत शेषो श्रीपाद ऊर्फ बाबासाहेब कुळकर्णी, दड्डीकर, बी. ए. एल् एल्. बी. वकील, बेळगाव यांनीहि या कामीं श्रीपंतबंधूंना साह्य करून प्रत्येक पुस्तकाला प्रस्तावना लिहिली. अशा रीतीनें जी माला गुंफण्यास नरसिंहरावजींनीं आपल्या हयातींत "श्रीदत्तप्रेमलहरी" नावाच्या पदसंग्रहरूपी प्रथम पुष्पानें सुरवात केली होती ती त्यांच्या पश्चात लौकरच त्यांच्या बंधूंनीं एक एक पुस्तकरूपी पुष्प ओवून अधिकाधिक गुंफण्यास सुरवात केली व या मालेंतील दुसरें पुष्प (पुस्तक) शके १८४८ मध्यें गोकुळाष्टमीला प्रसिद्ध झालें. या पुष्पांत श्रीपंतांचे पुढील चार लेख प्रसिद्ध करण्यांत आले (१) श्रीदत्तगत बालबोध किंवा प्रेमतरंग (२) श्रीबालमुकुंदबोधानंदगुटिका किंवा कल्याणचरित्र (३) श्रीबालबोधामृतसार व (४) भक्तालाप हे होत. हे चारी लेख श्रीपंतांनीं १८८४ ते १८८६ या सालांत लिहिले व त्यांचेसंबंधीं प्रकरण १८, १९ व २३ मध्यें विवेचन केलें आहे.

शके १८४८ मध्यें आश्विन शुद्ध १० ला म्हणजे विजया दशमीला श्रीपंतबंधूंनीं तिसरें पुष्प प्रसिद्ध केलें व त्यांत (१) परमानुभवप्रकाश (२) ब्रह्मोपदेश (३) आत्मज्योति व (४) अनुभववल्ली भाग १ व २ हे लेख प्रसिद्ध केले. हे सर्व लेखहि १८८४ ते १८८६ या सालांत लिहिलेले असून त्यांचेसंबंधीं विस्तृत विवेचन प्रकरण २०, २१ व २३ मध्यें झालेलें आहे. त्यानंतर शके १८४८ माघ वद्य प्रतिपदा (गुरुप्रतिपदा) रोजीं चौथें पुष्प प्रसिद्ध झालें व त्यांत १९०१ सालीं श्रीपंतांनीं लिहिलेला "भक्तोद्वार किंवा प्रेमभेट" हा लेख प्रसिद्ध झाला असून श्रीपंतांनीं आपल्या शिष्यांना व भक्तांना लिहिलेलीं १११ पत्रें छापलीं आहेत. "भक्तोद्वार किंवा प्रेमभेट" या लेखासंबंधीं प्रकरण ३८ मध्यें विस्तृत विवेचन आलेलें आहे. तसेंच श्रीपंतांच्या सदर पत्रांचाहि मागील प्रकरणांत जागजागीं उल्लेख केला आहे. त्यानंतर शके १८४९ चैत्र शुद्ध ९ (रामनवमी) रोजीं पाचवें पुष्प प्रसिद्ध झालें. या पुष्पांत श्रीपंतांचीं ८० पत्रें (११२ ते १९१), "श्रीमद्भगवद्गीतासार" हा लेख व २४ स्फुट लेख हीं प्रसिद्ध करण्यांत आलीं. श्रीमद्भगवद्गीतासार हा लेख श्रीपंतांनीं १८९२ सालीं लिहिला असून त्याच्यासंबंधींचें विवेचन प्रकरण २९ मध्यें आलेलें आहे. स्फुट लेख १ ते २४ हे १८८३ व १८८४ सालीं लिहिलेले असून त्यांच्यासंबंधींहि प्रकरण १८ मध्यें विवेचन केलें आहे. अशा तऱ्हेनें नरसिंहरावजींच्या निधनानंतर एक वर्षाच्या अवधींत त्यांच्या बंधूंनीं पुष्प २ ते ५ हीं चार पुस्तकें प्रसिद्ध केलीं. नंतर शके १८४९ अश्विन शुद्ध १० (विजया दशमी) रोजीं सहावें पुष्प प्रसिद्ध झालें व त्यांत श्रीपंतांचे १०९ स्फुट लेख (२५–१३३) प्रसिद्ध झाले आणि त्यांचीं कानडी पदें २७ व एक आरती हीं बाळबोध लिपींत छापण्यांत आलीं.

अशा रीतीनें पुष्प २ ते ६ या पाच पुस्तकांत श्रीपंतांचें बहुतेक गद्य वाङ्मय व कानडी पदें हीं प्रसिद्ध झालीं. श्रीपंतांचे कांहीं लेख अजून प्रसिद्ध झालेले नाहींत. त्यांपैकीं " माझें माहेर अथवा नऊ फेऱ्यांचा प्रेमभोंवरा " हा लेख मुख्य होय. त्याच्यासंबंधाची माहिती प्रकरण ३७ मध्यें दिली आहे व तो श्रीपंतबंधूंनीं छापून प्रसिद्ध न करण्याचें कारणहि सदर प्रकरणांत दिग्दर्शित केलें आहे. या लेखाखेरीज श्रीपंतांचे कांहीं लहान लहान लेख व कांहीं टाचणें हीं अद्याप छापलीं गेलीं नाहींत. पण तीं फार थोडीं असल्यामुळें, तीं वगळलीं असतां, श्रीपंतांचें स्वदस्तुरचें सर्व वाङ्मय ' श्रीदत्तप्रेमलहरी ' पुष्प १ ते ६ मध्यें प्रसिद्ध झालें आहे असें समजण्यास हरकत नाहीं.

## स्मारकाच्या एका अंगाची पूर्तता

श्रीपंतबंधूंनीं १९३१ सालीं, शके १८५३ अश्विन शुद्ध १० ( विजया दशमी ) रोजीं, नागरकट्टींनीं टिपून ठेविलेल्या श्रीपंतांच्या बोलांचा एक हप्ता सातव्या पुष्पाच्या रूपानें प्रसिद्ध केला व १९३२ सालीं, शके १८५४ श्रावण वद्य ८ (गोकुळाष्टमी ) रोजीं, सदर बोलांचा दुसरा हप्ता पुष्प ८ च्या रूपानें प्रसिद्ध केला. श्रीपंतांच्या बोलांसंबंधीं प्रकरण ४७ मध्यें विस्तृत विवेचन केलेंच आहे. 'श्रीदत्तप्रेमलहरी' पुष्पमालेचें ८ वें पुष्प प्रसिद्ध झाल्यानें श्रीपंतांचें बहुतेक सर्व वाङ्मय त्यांच्या भक्तांना व इतर जिज्ञासूंना आणि मुमुक्षूंना मिळण्याची सोय झाली आणि शके १८२७ पौष शुद्ध १ ( २७-१२-१९०५) रोजीं श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथें श्रीपंतबंधु व इतर श्रीपंतभक्त यांनीं एकत्र जमून श्रीपंतांच्या स्मारकाची जी त्रिविध योजना आखली होती तिच्या एका अंगाची म्हणजे श्रीपंतांचें गद्य व पद्य वाङ्मय छापून प्रसिद्ध करण्याच्या हेतूची पूर्तता झाली.

---

# प्रकरण ५२ वें

——:०:——

## श्रीदत्तसंस्थानाची वाढ; श्रीपंतांच्या मातोश्रींचें निधन; श्रीदत्तसंस्थानाचीं विश्वस्तिपत्रें; शंकररावजींचें निधन; गोविंदरावजींचें निधन; गोपाळरावजींचें निधन; स्मारकाची पूर्तता.

——:०:——

### श्रीदत्तसंस्थानाची वाढ

श्रीपंतांच्या स्मारकाच्या योजनेचें मुख्य अंग जें "श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री, बुद्रुख" तें स्थापन झाल्यापासून त्याची दिवसेंदिवस वाढ होत चालली. श्रीदत्तसंस्थानाच्या हद्दींत निरनिराळ्या इमारती होऊं लागल्या, श्रींच्या कट्ट्यापुढें मुंबईमधील एका धनिक भक्ताच्या उदार देणगीनें एक सुंदर भजनमंडप बांधण्यांत आला, भक्तमंडळींच्या सोईचीं इतर साधनें उपलब्ध झालीं, कांहीं भक्तांनीं श्रीदत्तसंस्थानाला मालकी हक्कासह जमिनी दिल्या व संस्थानचा कायमनिधिहि वाढीला लागला. संस्थानाचा उत्कर्ष व्हावा म्हणून गोविंदरावजी, गोपाळरावजी व शंकररावजी हे आपापल्या परी प्रयत्न करीत होते. उत्सवाची व्यवस्था ठेवणें वगैरे गोष्टी गोविंदरावजी मोठ्या कळकळीनें करीत असत व त्यांच्या प्रेमळ, गोड आणि मनमिळाऊ स्वभावामुळें भक्तमंडळी मोठ्या उत्साहानें श्रींची सेवा करीत.

### श्रीपंतांच्या मातोश्रींचें निधन

श्रावण शुद्ध १५ शके १८५० ( ३१-८-१९२८ ) रोजीं श्रीपंतांच्या परम पूज्य मातोश्री ती. गं. सीताबाई या वयाच्या ८७-८८ व्या वर्षी बेळगाव येथें देवाधीन झाल्या. त्यापूर्वी कांहीं वर्षें त्या फार अशक्त झाल्या होत्या; त्यामुळें अंथरुणावर पडूनच असत. पण त्या होत्या तोंपर्यंत घरांतील सर्व मंडळींना तें आपल्यावर छत्र आहे असें वाटत असे. त्यांचा स्वभाव अतिशय साधा व प्रेमळ असे व सुना, लेकी व नातवंडें यांना व त्यांच्या घरीं येणाऱ्या सर्व भक्तमंडळींनाहि त्या फार प्रेमानें वागवीत असत. त्यांचे घरीं येणारा प्रत्येक भक्त परत जातांना जेव्हां त्यांना नमस्कार करण्यास जाई तेव्हां त्या आपल्या शुभाशिर्वादासह त्याला प्रसाद देत असत. त्यांचे सर्व मुलगे कट्टे मातृभक्त असल्यामुळें " न मातुः पर दैवतम् " हें त्यांचें ब्रीदवाक्यच होतें. श्रीपंत व त्यांचे बंधु यांच्या ठिकाणचें सौजन्य, साधेपणा व प्रेमळपणा हे गुण त्यांच्या मातोश्रींच्या ठिकाणचे उतरले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्रीपंतांच्या पश्चात त्यांनीं सुमारें तेवीस वर्षें काढलीं. त्या दरम्यान त्यांना वामनरावजी व नरसिंहरावजी यांच्या अकल्पित निधनानें पुत्रशोक

होण्याचे प्रसंग आले. तरी पण त्यांच्या इतर मुलांनीं त्यांच्या हयातीच्या अखेरपर्यंत मनोभावानें मातृसेवा केली व अखेर त्यांचा देह मोठ्या समारंभानें बाळेकुंद्रीस नेऊन श्रीपंतांच्या औदुंबरकट्याच्या समोर थोड्या अंतरावर त्याला अग्निसंस्कार करण्यांत आला आणि मातोश्रींचें स्मारक म्हणून त्या दहनभूमीवर एक सुंदर तुलसीवृंदावन बांधण्यांत आलें. अशा रीतीनें ज्या माउलीनें श्रीपंतांना जन्म दिला तिनें त्यांच्याच समाधीसमोर कायमची विश्रांति घेतली. त्यामुळें श्रीपंतांच्या समाधीबरोबरच त्यांच्या मातोश्रींच्या पुण्यस्थानाचेंहि दर्शन घेण्याची भक्तमंडळींची सोय झाली आहे.

## शिवायनमःचें निधन व दत्तधामाच्या सन्निध कायमची वस्ति

पौष शुद्ध १ शके १८२७(२७–१२–१९०५) रोजीं "श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री, बुद्रुख" या संस्थेची स्थापना होऊन श्रींच्या औदुंबरवृक्षाभोंवतीं षट्कोनी दगडी कट्टा बांधण्यांत आला व तेंच तेथील मुख्य पूजास्थान झालें. त्यानंतर श्रीदत्ततीर्थ, श्रीनरसिंह-मंदीर, श्रीपंतांच्या मातोश्रींचें तुलसीवृंदावन हीं पूज्य स्थानें निर्माण झालीं. त्यांखेरीज १९१४ सालीं श्रींच्या आंबराईत पश्चिमेच्या अंगाला श्रीचन्नबसवेश्वराचें एक लहानसें देवालय झालें. श्रीपंतांचे गुरुबंधु चनबसाप्पा ऊर्फ शिवायनमः हे बाळप्पा श्रीशैलययात्रेला गेल्या-पासून श्रीपंतांजवळच राहात असत. श्रीपंतांनीं देह ठेविल्यामुळें त्यांना अतिशय दुःख झालें व त्यांनीं श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथें श्रीपंतांच्या समाधीशेजारीं राहाण्याचें ठरविलें आणि ते बाळेकुंद्री येथें राहूं लागले. श्रीपंतांचे दाईज व शिष्य चिदंबर बापूराव कुळकर्णी यांनीं बाळेकुंद्रीमधील आपले घरीं राहाण्याची त्यांची सोय केली व त्यांना काय हवें नको वगैरे ते पाहात असत. त्यांनीं शिवायनमः यांना कसलीहि उणीव भासूं दिली नाहीं. कार्तिक शु० ११ शके १८३६ रोजीं शिवायनमः हे बाळेकुंद्रीहून दोन मैल असलेल्या सांबरें गावीं आपले गुरुबंधु आप्पय्या पाटील यांना भेटण्याकरितां गेले होते. त्या दिवशीं तेथें त्यांनीं वस्ति केली व दुसरे दिवशीं जेवण झाल्यावर ते परत बाळेकुंद्रीस जाण्यास निघाले. "आज तुळशीचें लग्न आहे. तेव्हां आजचा दिवस येथें राहून उद्यां तुम्ही परत जा" असें घरांतील मंडळींनीं त्यांना सांगितलें. पण "माझ्या लग्नापेक्षां तुळशीचें लग्न मला अधिक काय ?" असें म्हणून ते तेथून निघाले व पायीं बाळेकुंद्रीस आले आणि श्रीपंतांच्या समाधीला नमस्कार करून जवळच असलेल्या एका बोवाच्या झोपडींत जाऊन बसले. नंतर तेथें असलेल्या मंडळीला त्यांनीं असें सांगितलें कीं "आतां मी येतों. ही हकीगत बेळगावास कळवा व तिकडून मंडळी आल्याशिवाय पुढील व्यवस्था करूं नका". इतकें सांगून त्यांनीं कार्तिक शु. १२ शके १८३६ (३०–१०–१९१४) रोजीं सायंकाळीं "शिवायनमः" असें म्हणून प्राण सोडला. ही बातमी बेळगावास श्रीपंतबंधूंना समज-तांच कांहीं भक्तमंडळीसह ते बाळेकुंद्रीस गेले व शिवायनमःचा देह धमणींत घालून त्यांनीं त्याची मिरवणूक काढली आणि आंबराईच्या पश्चिम बाजूला असलेल्या एका बिल्ववृक्षा-खालीं विद्वान अशा जंगमांकडून लिंगायत धर्माप्रमाणें शिवायनमः यांना विधियुक्त समाधि

दिली. नंतर त्या जागीं एक लहानसें देवालय बांधण्यांत आलें असून तेथें शिवायनमः यांच्या पादुका स्थापन करण्यांत आल्या आहेत. शिवायनमः हे लिंगायत असल्यामुळें श्रीपंतांच्या शिष्यांपैकीं लिंगायत मंडळींना त्या स्थानाबद्दल विशेष पूज्यभाव वाटतो.

## आंबराईतील श्रीकट्टयावर पादुकास्थापना

वर लिहिल्याप्रमाणें बाळेकुंद्री येथें पुष्कळ पूज्य स्थानें झालीं खरीं, तरी पण तेथील मुख्य दैवत जे श्रीपंतमराहाज त्यांच्या पादुका स्थापन करून देवालय बांधल्यानें श्रींच्या दर्शनाला येणाऱ्या असंख्य भक्तांना पूजेला स्थान होईल असा विचार करून श्रीपंतबंधूंनीं श्रींच्या औदुंबरकट्ट्यासमोर एक कट्टा बांधून त्याच्यावर देवालयाचे दोन थर घातले व त्यांत शके १८५२ आश्विन व. ३ (१०-१०-१९३०) रोजीं श्रींच्या पादुका विधियुक्त स्थापन केल्या. तेव्हांपासून तेथेंच पूजा अर्चा होत असते. श्रींच्या पादुका स्थापन होणेच्या असल्यामुळें त्या सालच्या उत्सवाला भक्तमंडळी पुष्कळ जमली होती व पादुकास्थापन-विधि मोठ्या थाटानें करण्यांत आला. देवालयाचें व त्याच्या पुढील दगडी छपरीचें काम अजून पुरें व्हावयाचें आहे.

## श्रीदत्तसंस्थानाचीं विश्वास्तिपत्रें व स्मारकाच्या मुख्य अंगाची पूर्तता

श्रीपंतांच्या पादुका स्थापन झाल्यापासून श्रीपंतबंधूंना असें वाटूं लागलें कीं, १९०५ सालीं भक्तमंळींच्या साह्यानें आपण श्रीदत्तसंस्थानरूपी जो रोपा लाविला त्याचा २५-२६ वर्षांत मोठा वृक्ष बनला असून श्रींच्या पुण्यतिथीच्या वार्षिक उत्सवाचें वैभव दिवसेंदिवस वाढत आहे; तेव्हां संस्थानचा कारभार नेहमीं सुरळितपणें चालण्याकरितां कांहीं तरी कायम स्वरूपाची योजना करून ठेवणें जरूर आहे; कारण संस्थानची स्थावर व जंगम मिळकत बरीच झाली होती व संस्थानच्या कायमनिधीची रक्कमहि सुमारें ३६००० पर्यंत जमली होती. श्रीपंतबंधूंपैकीं कोणीहि हयात असेपर्यंत त्याच्या देखरेखीखालीं संस्थानचा कारभार सुरळीत चालेल याबद्दल कोणालाहि शंका नव्हती. पण त्यांच्या पश्चात संस्थानचा कारभार सुरळितपणें चालेल अशी कांहीं तरी व्यवस्था करणें जरूर होतें. त्यामुळें श्रीदत्तसंस्थानाच्या व्यवस्थेसंबंधीं कांहीं तरी कायम स्वरूपाची योजना करून ठेवण्याचें श्रीपंतबंधूंनीं ठरवलें. ही योजना करण्याचे बाबतींत त्यांच्यापुढें जो मुख्य प्रश्न उभा राहिला तो असा, श्रीदत्तसंस्थान व त्याच्या स्थावर-जंगम मिळकती यांची व्यवस्था व वहिवाट करण्याचा हक्क बाळेकुंद्री-करांच्या घराण्यांतील मंडळींकडे असावा किंवा श्रीघराणें व भक्तमंडळी यांचेमध्यें त्या हक्काची विभागणी करावी आणि जर तशी विभागणी करावयाची तर ती काय धोरणानें करावी. श्रीपंतबंधु व भक्तमंडळींचे प्रतिनिधि यांचेमध्यें वाटाघाट होऊन व कायदे-पंडितांची सल्ला घेऊन असें ठरविण्यांत आलें कीं श्रीपंतबंधूंनीं कायदेशीर विश्वस्तिपत्र (डिक्लेरेशन ऑफ ट्रस्ट) करून आपण श्रीदत्तसंस्थानाच्या स्थावर, जंगम वगैरे सर्व

मिळकतींचे विश्वस्त ( ट्रस्टी ) आहोंत असें जाहीर करावें व श्रीदत्तसंस्थानची वहिवाट चालविण्याकरितां योग्य असे नियम करून त्या नियमांना अनुसरून सर्व व्यवस्था व्हावी. त्याप्रमाणें ५-१-१९३३ रोजीं गोविंदरावजी, गोपाळरावजी व शंकररावजी यांनीं बेळगावांत असलेल्या श्रीदत्तसंस्थानाच्या कायम निधीच्या रकमेचें व ब्रिटिश हद्दींत असलेल्या श्रीदत्तसंस्थानाच्या स्थावर मिळकतींचें एक विश्वस्तिपत्र केलें व तें रीतसर रजिस्टरहि झालें. श्रीपंतबंधु गोविंदरावजी, गोपाळरावजी व शंकररावजी हे तिघे या विश्वस्तिपत्राचे पहिले विश्वस्त होते.

वरील विश्वस्तिपत्र झालें तरी श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री, बुद्रुख हें सांगली संस्थानच्या हद्दींत असल्यामुळें व त्याचा कारभार मुख्यत्वेंकरून बाळेकुंद्री येथें चालवयाचा असल्यामुळें एक निराळें विश्वस्तिपत्र करून संस्थानचा कारभार सुरळितपणें चालावा म्हणून नियम करणेंहि जरूर होतें. त्याप्रमाणें गोविंदरावजी, गोपाळरावजी व शंकररावजी यांनीं भक्तमंडळींशी वाटाघाट करून त्यांच्या सल्ल्यानें मिति ज्येष्ठ शु. ८ शके १८५५ (१-६-१९३३) रोजीं दुसरें एक विश्वस्तिपत्र केलें व स्वत्वनिवृत्ति करून त्या विश्वस्तिपत्राचे ते तिघे पहिले विश्वस्त झाले आणि संस्थानचा कारभार सुरळितपणें चालावा म्हणून एक योजना तयार करून ती " घटना व नियम " या नावानें सदर विश्वस्तिपत्राला परिशिष्ट " ड " म्हणून जोडण्यांत आली. ही घटना तयार करण्याचे कामीं निःस्वार्थीपणा व दूरदर्शित्व हे श्रीपंतबंधूंच्या ठिकाणचे गुण प्रामुख्यानें नजरेस आले. कारण संस्थानाचा कारभार चालविण्याच्या बाबतींत हक्कविभागणी करितांना त्यांनीं आपलें घराणें व भक्तमंडळी यांना जवळ जवळ सारखे हक्क देऊन आपले वंशज व भक्तमंडळी यांचेमध्यें सलोखा राहून सहकारिताहि राहील अशी योजना केली आहे. ही गोष्ट त्यांना अत्यंत भूषणावह झाली आहे !

## शंकररावजींचें निधन

पण दैवयोग असा विलक्षण कीं १-६-१९३३ च्या विश्वस्तिपत्रावर श्रीपंतबंधूंच्या सह्या झाल्यानंतर दोन तीन दिवसांनीं शंकररावजींना ताप येऊं लागला व दुखणें विकोपाला जाऊन २१-६-१९३३ रोजीं त्यांचा अंत झाला ! त्यामुळें तें विश्वस्तिपत्र त्यांच्या पश्चात सांगली संस्थानापैकीं शहापूर येथील व कुरुंदवाड ( सीनिअर ) पैकीं वडगाव येथील सबरजिस्ट्रींत नोंदलें गेलें.

शंकररावजींचें कुटुंब त्यांच्या अगोदरच निवर्तलें होतें व त्यांना मुलगा नव्हता. त्यांच्या अकल्पित निधनानें त्यांचे वडील बंधु गोविंदरावजी व गोपाळरावजी यांना फार दुःख झालें. शंकररावजींची श्रीपंतांच्या ठिकाणीं पूर्ण निष्ठा असून इतर वडील बंधूंबद्दलहि त्यांना फार पूज्यभाव व आदर वाटत असे. त्यांचा स्वभाव फार गरीब व निगर्वी होता. त्यामुळें त्यांचे पुतण्ये व घरांतील इतर तरुण मंडळी त्यांचेशीं सलगीनें वागत व गोविंद-

रावजी व गोपाळरावजी यांचीं वयें बरींच झाल्यामुळें, त्यांचे पश्चात शंकररावजी आपणांस मार्गदर्शक होतील असें त्यांना वाटत असे. पण शंकररावजींच्या अकल्पित निधनानें त्यांचीं फार निराशा झाली.

शंकररावजीचा देह बाळेकुंद्री येथें नेण्यांत आला व श्रींच्या आंबराईच्या पश्चिम बाजूला त्याला अग्निसंस्कार करून त्यांच्या अस्थि श्रीसरस्वतीमंदिरांत त्यांचे बंधु वामन-रावजी व नरसिंहरावजी यांच्या अस्थींसन्निध ठेवण्यांत आल्या.

## स्मारकाच्या योजनेची पूर्तता करण्याची व्यवस्था

श्रीपंतांच्या स्मारकाच्या योजनेचें तिसरें अंग म्हणजे त्यांच्या चरित्रासंबंधीं माहिती जमवून तें छापून प्रसिद्ध करणें हें होतें. प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें १९३२ अखेर श्रीपंतबंधूंनीं श्रीपंतचरित्राची सर्व सामुग्री प्रस्तुत लेखकाच्या स्वाधीन करून श्रीपंतचरित्र लिहिण्याचें काम त्याचेकडे सोपविलें व त्यायोगें १९०५ सालीं निश्चित झालेल्या श्रीपं-तांच्या स्मारकाच्या योजनेपैकीं अपुरा राहिलेला भाग पुरा करण्याची व्यवस्था केली.

## गोविंदरावजींचें निधन

१९२३ सालीं गोविंदरावदादांची तब्बेत बरींच बिघडली होती व अशक्तपणा आला होता. पुढें त्यांच्या तब्बेतींत बरींच सुधारणा झाली. तरी पण त्यांच्या मेंदूला थोडासा शीण झाला तरी थकवा येत असे. तरीसुद्धां त्यांचें श्रीपंतसेवेचें कार्य अव्याहत चालूच होतें. पुढें पुढें त्यांचा अशक्तपणा अधिकाधिक वाढत गेला व श्रावण शु. ३ शके १८५७ ( २–८–१९३५ ) रोजीं सायंकाळीं त्यांनीं बेळगाव येथें आपल्या राहात्या घरीं देह ठेविला. त्या वेळीं त्यांचें वय सुमारें ७१ वर्षांचें होतें. त्यांना मूल बाळ नसून त्यांचें कुटुंब त्यांचे पूर्वींच निवर्तलें होतें.

गोविंदरावजींच्या निधनानें त्यांच्या हजारो शिष्यांना व भक्तांना फार दुःख झालें. त्यांच्यांत सर्व जातींचे लोक आहेत. सर्व जण त्यांना " दादा " या सलगीच्या नावानें संबोधीत असत. दादांचा स्वभाव फार गोड, प्रेमळ व निगर्वी होता. तसेंच ते निःस्वार्थी असून त्यांचें बोलणें मार्मिक व बोधप्रद असे. त्यामुळें ते सर्वप्रिय होते. त्यांच्या शिष्यवर्गापैकीं आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांना दादा म्हणजे आपले खरे कळकळीचे जिवलग, हितचिंतक व सन्मार्गदर्शक वाटाव्हे आहेत असें वाटे. सर्व जण निःशंकपणें व मनमोकळेपणानें त्यांचेशीं वागत आणि ते सर्वांना प्रेमानें वागवून कळकळीनें बोध करीत. त्यांनीं आपल्या स्वतःकडे महत्व कधींच घेतलें नाहीं व कोणाचेंहि मन दुखाविलें नाहीं.

ज्या दिवशीं दादांचे देहावसान झाले त्या दिवशीं रात्रीं त्यांना मोटारींतून बाळे-कुंद्रीस नेण्यांत आलें. दुसरे दिवशीं सकाळीं ही बातमी समजतांच त्यांची शेकडो शिष्यमंडळी बाळेकुंद्री येथें जमली. दुपारीं १२ वाजेपर्यंत भजनगजरांत त्यांच्या

देहाची मिरवणूक काढण्यांत आली व श्रीकट्ट्यासमोरील त्यांच्या मातोश्रींच्या स्मरणार्थ बांधलेल्या तुलसीवृंदावनाच्या पूर्वेस त्याला अग्निसंस्कार करण्यांत आला. नंतर ज्या जागीं दादांच्या देहाला अग्निसंस्कार करण्यांत आला तेथें रा. ब. गोपाळरावजींच्या संमतीनें त्यांचें स्मारक म्हणून संगमरवरी दगडाचा एक सुंदर कट्टा बांधून त्यावर श्रींचा प्रेमध्वज उभा करण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे व प्रेमध्वज कट्ट्याच्या ईशान्येस थोड्या अंतरावर "श्रीगोविंदभुवन" नावाची लोखंडी खांबांची भव्य व प्रशस्त अशी एक धर्मशाळा बांधिली आहे. त्यामुळें दरवर्षी आश्विन व० ३ च्या उत्सवाचे वेळीं पाऊस पडला म्हणजे भक्तमंडळींचे जे हाल होत असत ते बऱ्याच अंशानें कमी झाले आहेत. शके १८५७ आश्विन वद्य ३ रोजीं परम पूज्य दादांच्या अस्थि श्रींच्या कट्ट्या-खालीं असलेल्या तळघरांत मुद्दाम तयार केलेल्या जागीं मोठ्या समारंभानें ठेवण्यांत आल्या.

## रा. ब. गोपाळरावजींचें निधन

रा. ब. गोपाळरावजींनीं तत्परतेनें आपल्या प्रिय बंधूच्या स्मारकाच्या योजनेला मूर्त स्वरूप देण्याचें ठरविल्याप्रमाणें त्यांच्या हयातींत तें काम बहुतेक पुरें होत आलें होतें. पण श्रींचा प्रेमध्वजकट्टा उभा होण्यापूर्वी १३-४-१९३७ रोजीं त्यांनीं बेळगाव येथें इहलोकची यात्रा संपविली. गेलीं सुमारें दोन वर्षे त्यांची प्रकृति फारच खालावलेली होती व त्यांचा देह परावलंबी झाला होता. तरी श्रींचे उत्सव वगैरे कार्यक्रम व श्रीदत्तसंस्था-नाची व्यवस्था यांचे बाबतींत ते फार दक्षता बाळगीत असत व यत्किंचितहि चालढकल केलेली त्यांना खपत नसे. त्यांचा देह बाळेकुंद्रीस नेऊन तेथें त्याला श्रींच्या आंबराईच्या शेजारीं अग्निसंस्कार करण्यांत आला व त्यांच्या अस्थि श्रीसरस्वतीमंदिरांत त्यांच्या बंधूंच्या अस्थींसन्निध ठेवण्यांत आल्या.

गोपाळरावजी अत्यंत निष्ठावान, व्यवहारदक्ष व कर्तबगार होते. त्यांनीं गेलीं पन्नास वर्षे प्रपंचाचा भार बऱ्याच अंशानें आपल्या शिरावर घेऊन वडील बंधूंकडे येणाऱ्या शेकडो भक्तांना आपलेपणानें व प्रेमानें वागविलें. त्यांच्या जाण्यानें श्रीपंतबंधूंची कारकीर्द समाप्त झाली.

## श्रीपंतघराण्यांतील नवी पिढी

गोपाळरावजी फार अशक्त झालेले असल्यामुळें अलीकडे श्रीदत्तसंस्थानाचा कार-भार श्रीपंतघराण्यांतील तरुण मंडळी त्यांचे देखरेखीखालीं, विश्वस्तिपत्रांतील योजनेप्रमाणें, पाहात असत. वामनरावजींच्या दोघां चिरंजिवांपैकीं श्रीयुत दत्तात्रय वामन पंतबाळेकुंद्री हे श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री, बुद्रुख या संस्थेचे हल्लींचे अध्यक्ष आहेत. ते बाळेकुंद्री येथें राहात असून घराण्याचें कुळकर्णिकी वतन व शेत-जमीन यांचा कारभार पाहात असतात व श्रीयुत रामचंद्र वामन पंतबाळेकुंद्री हे बी. ए. जी. असून फलटण येथील साखरेच्या कारखान्यांत कामावर आहेत. गोपाळरावजींचे वडील चिरंजीव श्रीयुत श्रीपाद गोपाळ पंतबाळेकुंद्री हे बी. ए. एल् एल्. बी. असून बेळगाव येथें वकिली करीत

आहेत व त्यांचे बंधु श्रीयुत बाळकृष्ण गोपाळ पंतबाळेकुंद्री हे कुलाबा जिल्ह्यांत सॅनिटरी इन्स्पेक्टरचें काम करितात व नरसिंहरावजींचे चिरंजीव श्रीयुत सीताराम नरसिंह पंतबाळेकुंद्री हे एल. सी. पी. एस. असून बेळगाव जिल्ह्यांत बेडकिहाळ येथें डॉक्टरचा धंदा करीत असतात. त्या सर्वांना श्रीपंत, श्रीदत्तसंस्थान व श्रीपंतबंधु यांचेबद्दल फार आदर व पूज्यभाव वाटत असून ते एकजुटीनें व श्रद्धेनें श्रीदत्तसंस्थानाचा कारभार पाहात असतात आणि तेथें येणाऱ्या भक्तांच्या सोईगैरसोईकडे लक्ष पुरवून श्रीदत्तसंस्थानाचें वैभव अधिकाधिक वाढेल याबद्दल काळजी घेतात.

या ग्रंथाच्या प्रकाशनानें श्रीपंतमहाराजांच्या स्मारकाचें कार्य पुरें झालें आहे व श्रीदत्तसंस्थान बाळेकुंद्री, बुद्रुख ही संस्था, श्रीपंतमहाराजांचें गद्य पद्य वाङ्मय व हा चरित्र ग्रंथ मिळून झालेलें स्मारक त्यांचें स्मरण कायम ठेवील व असंख्य भाविक, जिज्ञासु व मुमुक्षूंना प्रपंचपरमार्थी योग्य मार्ग दाखवून आणि स्फूर्ति देऊन अभ्युदय व निःश्रेयस यांचा लाभ करून देईल असा भरंवसा वाटतो.

**मंगलारती गुरूची करूं ॥ भवसागर सहज तरूं ॥ ध्रु० ॥**
**ज्ञान विज्ञान उजळुनी ज्योति ॥ निवारूं ही मायाराती ॥ १ ॥**
**अहंभाव अर्पुनी पायीं ॥ बुडी देऊं स्वरूपडोहीं ॥ २ ॥**
**नित्यानंदसमाधि भजनीं ॥ दत्तचरण नित्य ध्यानीं ॥ ३ ॥**

श्रीदत्तप्रेमलहरी–२६५७



**श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथील आंबराई व श्रींचा कट्टा** ( पृ. ४७१ )

# परिशिष्ट " अ "

---×---

## ज्या श्रीपंतभक्तांनीं श्रीपंतांसंबंधीं हकीगती व स्वतःच्या अनुभवांचीं टिपणें श्रीपंतबंधूंकडे पाठविलीं त्यांची यादी

| | | |
|---|---|---|
| १ | गोपाळ श्रीपाद भागोजीकोप | बेळगाव |
| २ | गं० तंगेवा विरूपाक्ष | देसनूर |
| ३ | बसवंत गुरुनाथ ऊर्फ गोविंदराव कुळकर्णी | बाळेकुंद्री |
| ४ | रा. ब. गोपाळ रामचंद्र कुळकर्णी | ” |
| ५ | नरसिंह रामचंद्र कुळकर्णी | ” |
| ६ | शंकर रामचंद्र कुळकर्णी | ” |
| ७ | चिदंबर बापूराव कुळकर्णी | ” |
| ८ | शिवराम गोविंद सहस्रबुद्धे | ” |
| ९ | खंडो रामचंद्र कुळकर्णी | दड्डी |
| १० | रावजी ऊर्फ व्यंकटेश लक्ष्मण कुळकर्णी | ” |
| ११ | अनंत बाळकृष्ण जोशी | ” |
| १२ | चनवीरय्या स्वामी | ” |
| १३ | गंगाधर भुजंगभट जोशी | ” |
| १४ | गोविंद रामचंद्र कालकुंद्रीकर ( मास्तर ) | ” |
| १५ | वामन नरहर कामत | ” |
| १६ | वामन खंडो कुळकर्णी | ” |
| १७ | आपा तातोबा सोनार | ” |
| १८ | दुंडापा विरपाक्षपा यळकट्टी | ” |
| १९ | शामजी लक्ष्मण कुळकर्णी | ” |
| २० | गुंड्डु रामचंद्र सोनार | ” |
| २१ | चनबसपा भूपाळी | ” |
| २२ | हणमंत भिमाजी बिर्जे | ” |
| २३ | विठू सोनार | ” |
| २४ | रामचंद्र तातोबा सोनार | ” |
| २५ | अंबाजी श्रीपाद कुळकर्णी | ” |
| २६ | ईश्वराप्पा वागराळी | ” |
| २७ | अनंत बाळाजी देशपांडे | बेळगाव |

| | | |
|---|---|---|
| २८ | रामचंद्र विठ्ठल कमतनूर | बेळगाव |
| २९ | गणेश गोपाळ गुमास्ते | ,, |
| ३० | दत्तात्रय कृष्ण गुमास्ते | ,, |
| ३१ | बंडो आत्माराम कामत | ,, |
| ३२ | विठाबाई शांताराम | ,, |
| ३३ | गंगूबाई, मास्तरीण | ,, |
| ३४ | कृष्णराव शहापूरकर | ,, |
| ३५ | राघवेंद्र शेषो हुबळीकर | ,, |
| ३६ | कृष्णाजी शेषो हुबळीकर | ,, |
| ३७ | गणेश प्रभाकर काकतकर | ,, |
| ३८ | कोन्हेरेराव अण्णाजी ऊर्फ दादा सावनूर | ,, |
| ३९ | रामचंद्रभट माईनकट्टी | ,, |
| ४० | नारायण रामप्पा कपलेश्वरी | ,, |
| ४१ | नारायण अण्णाजी संपगावकर | ,, |
| ४२ | दादाराव सावंत | ,, |
| ४३ | भिमराव व्यंकराव पाटील, चव्हाण | ,, |
| ४४ | चंद्राबाई जिनगर | ,, |
| ४५ | अनंतराव सडेकर, पोवार | बडोदा |
| ४६ | बसवंत बाळकृष्ण ऊर्फ पुटप्पा कुळकर्णी | कणबर्गी |
| ४७ | अनंत दाजी कुळकर्णी | ,, |
| ४८ | विष्णु अनंत कुळकर्णी | अकोळ |
| ४९ | गोविंद कृष्ण कुळकर्णी | ,, |
| ५० | विष्णु हरि कुळकर्णी | ,, |
| ५१ | यशवंत हरि कुळकर्णी | ,, |
| ५२ | हणमंत विष्णु कुळकर्णी | ,, |
| ५३ | नारायण दत्तात्रय कुळकर्णी | ,, |
| ५४ | गोविंद सदाशिव कुळकर्णी | ,, |
| ५५ | भिमाजी सदाशिव कुळकर्णी | ,, |
| ५६ | गोविंदभट विठ्ठलभट जोशी | ,, |
| ५७ | सिताराम भिमराव देसाई | ,, |
| ५८ | सिदोजीराव व्यंकटराव ऊर्फ बाळासाहेब देसाई | कोचरी |
| ५९ | श्रीपाद गुरुनाथ मजती | ,, |
| ६० | बसगौडा लखगौडा पाटील | ,, |
| ६१ | जयसिंगराव केशवराव ऊर्फ आबासाहेब देसाई | ,, |

| | | |
|---|---|---|
| ६२ | आप्पासाहेब केशवराव देसाई | कोचरी |
| ६३ | सत्यापा जकापा | ,, |
| ६४ | नंदापा आंदानेपा कबडगी | ,, |
| ६५ | गोविंद भिमापा बरगली | ,, |
| ६६ | मल्लपा लिंगापा गुरव | ,, |
| ६७ | शिवापा गणापा वागोजी | ,, |
| ६८ | शेव्यापा रुद्रापा नाईक | ,, |
| ६९ | मलगौडा चनगौडा | ,, |
| ७० | मलगौडा लींगगौडा | ,, |
| ७१ | शेटीगौडा नरसगौडा | ,, |
| ७२ | सातगौडा लखगौडा | ,, |
| ७३ | धुळापा पाटील | ,, |
| ७४ | सखाराम गुरुनाथ कुळकर्णी | ,, |
| ७५ | शामराव गुरुनाथ कुळकर्णी | ,, |
| ७६ | शिवगौडा बसगौडा पाटील | ,, |
| ७७ | सिदापा सत्यापा तोरणी | ,, |
| ७८ | गुरुनाथ बाबाजी कुळकर्णी | कुरणी |
| ७९ | बसलिंगपा घटगेपा करोसी | नेरली |
| ८० | कोटरपा निंगापा लट्टी | ,, |
| ८१ | शिवरुद्रापा दुंडापा कोष्टी | ,, |
| ८२ | बसलिंगपा शिवपा कोचरी | ,, |
| ८३ | श्रीपाद रामचंद्र यार्दी | शेट्टीहाळी |
| ८४ | केशव विष्णु यार्दी | ,, |
| ८५ | नारायण रामचंद्र यार्दी | ,, |
| ८६ | विष्णु जिवाजी यार्दी | गोकाक. |
| ८७ | नरसिंहाचार्य | सिगीहाळी |
| ८८ | व्यंकटेश गोविंद घाणेकर, वकील | धारवाड. |
| ८९ | रघुनाथ नारायण ऊर्फ कलप्पा घाणेकर | ,, |
| ९० | सोमनाथ गोविंद घाणेकर, वकील | ,, |
| ९१ | शंकर आत्माराम घाणेकर | ,, |
| ९२ | रामभाऊ गाडगीळ | ,, |
| ९३ | यशवंत यादपा दरेकर | ,, |
| ९४ | वासुदेव विनायक अभ्यंकर, वकील | ,, |
| ९५ | बापूराव विनायक अभ्यंकर, वकील | ,, |

| | | |
|---|---|---|
| ९६ | देवजी नागोजी गोटेकर | हुबळी |
| ९७ | आणपा किल्लेदार मोरब | धारवाड |
| ९८ | गणेश वासुदेव गणपुले | ,, |
| ९९ | पांडुरंग वासुदेव ताम्हनकर, पोस्टमास्तर | ,, |
| १०० | बळवंत दामोदर ऊर्फ बाळासाहेब पागे, इनामदार | बेडकिहाळ |
| १०१ | आपासाहेब इनामदार | ,, |
| १०२ | माधवराव जनार्दन ऊर्फ बाळासाहेब, इनामदार | ,, |
| १०३ | विष्णु बळवंत कुळकर्णी | ,, |
| १०४ | नारायण अण्णाजी कुळकर्णी | ,, |
| १०५ | विश्वनाथ हरि कुळकर्णी | ,, |
| १०६ | श्रीधर हरि कुळकर्णी | ,, |
| १०७ | रामचंद्र खंडो कुळकर्णी | ,, |
| १०८ | नागया शिवमूर्ति | ,, |
| १०९ | सखाराम अण्णाजी सोनार | ,, |
| ११० | कृष्णाबोवा जत्राटकर | ,, |
| १११ | श्रीस्वामी महाराज कुन्नूरकर | ,, |
| ११२ | विनायकराव नाटेकर | कोल्हापूर |
| ११३ | हरि सखाराम गोसावी | ,, |
| ११४ | दत्तो बाबाजी साठे | ,, |
| ११५ | रामचंद्र हरि ठाकूर | ,, |
| ११६ | वासुदेवराव पर्वते | ,, |
| ११७ | वामन गजानन जोशी | पडघवली |
| ११८ | केशव रामचंद्र दिवेकर, सॉलीसीटर | ,, |
| ११९ | हरि पुरुषोत्तम दिवेकर | ,, |
| १२० | विनायक रामचंद्र शिंत्रे | पुणें |
| १२१ | श्रीधर रघुनाथ जोगदेव | ,, |
| १२२ | सुबराव बसवंतराव पाटील | मरीकट्टी |
| १२३ | बंडो सांभाजी कुळकर्णी | ,, |
| १२४ | भीमराव हणीकेरी | ,, |
| १२५ | वीरभद्रया बसलिंगपा | हणीकेरी |
| १२६ | गोविंद बापूजी मुतालिक | हुकेरी |
| १२७ | गोविंददीक्षित रामदीक्षित | ,, |
| १२८ | निंगाप्पा सातापा पावटी | यमकनमर्डी |
| १२९ | वामन गोविंद हेब्बाळकर | ,, |

| | | |
|---|---|---|
| १३० | दत्तो बाबाजी कुळकर्णी | घोडगिरी |
| १३१ | नारायण रामचंद्र चिटणीस | वंटमुरी |
| १३२ | शामराव विसाजी चिटणीस | ,, |
| १३३ | व्यंकटेश भेंडीगणी | ,, |
| १३४ | वामन गंगाधर कुळकर्णी | संकेश्वर |
| १३५ | कृष्णाजी दत्तात्रय जिनराळ | ,, |
| १३६ | केशव बळवंत पाटील | चिकालगुड |
| १३७ | दत्तो बळवंत पाटील | ,, |
| १३८ | अनंत रामचंद्र नाडगौडा | हलकर्णी |
| १३९ | गोपाळ रामचंद्र | तुर्केवाडी |
| १४० | बळवंत रामचंद्र देसाई | उचगांव |
| १४१ | वामन मंगेश हरमलकर | चंदगड |
| १४२ | दामोदरपंत जांबोटकर | ,, |
| १४३ | मुकुंद देवपा मन्नोळकर | खानापूर |
| १४४ | अनंत रघुनाथ जोशी, चंदगडकर | कारद्गे |
| १४५ | विष्णु जिवाजी कुळकर्णी | कडोली |
| १४६ | दत्तात्रय व्यंकपा नागरकट्टी | होनावर |
| १४७ | चनबसपा पाटील देवरकोंड | धारवाड |
| १४८ | ज्योतिर्मार्तंड वे. रा. पंडित शंकरशास्त्री होसरित्ती ज्योतिषी | हावेरी |
| १४९ | वे. कोंडभटजी जोशी | ढाणकी ( वऱ्हाड ) |
| १५० | कृष्णाजी रामचंद्र वकुंदकर | बेंगळूर |
| १५१ | मोरेश्वर हरि ऊर्फ अण्णाराव दाते | कागवड |
| १५२ | गणेश कल्लो कुळकर्णी | कणगली |
| १५३ | भिमराव गोविंद धमणगीकर | ,, |
| १५४ | गणेश विनायक कुळकर्णी | कागती |
| १५५ | बाबासाहेब सेनापति, सावंतवाडी | ग्वाल्हेर |
| १५६ | भावकाणा म्हातारबा पाटील | मुंगुरवाडी |
| १५७ | बाळकृष्ण दाजी जाधव | कर्जत |
| १५८ | मोरेश्वर केशव दातार | कुरुंदवाड |
| १६९ | रामचंद्र दत्तात्रय पोतदार | ,, |
| १६० | नारायण अण्णाजी कुळकर्णी | मुतगें |
| १६१ | शामभट कृष्णभट तळकलकर | कर्डेगुद्दी |
| १६२ | गणपतराव रामचंद्र दीक्षित, इनामदार, वकील | बेकनाळ |
| १६३ | कृष्णाजी विनायक गोकाककर | सावनूर |

| | | |
|---|---|---|
| १६४ | लक्ष्मणराव गणपतराव पवार, इनामदार | उचंगांव |
| १६५ | धोंडू गणू जकाते | सांगली |
| १६६ | कृष्णराव आबाराव देसाई | बसरीकट्टी |
| १६७ | सिताराम आत्माराम गोसावी | कोल्हापूर |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ५५८५
ग्रंथ, शाखा (ठाणे शहर)
तारीख
२६३

REFBK-0005585

# श्रीपंतमहाराजांचे समग्र ग्रंथ

## श्रीदत्तप्रेमलरी पुष्प–माला

**पुष्प १ लें**:–( आवृत्ती ३ री )—पदें, अभंग, अष्टकें, आरत्या, ओव्या, पाळणे, धावे, मिळून २७३०

**पुष्प २ रें**:–( १ ) प्रेमतरंग, ( २ ) बोधानंदगुटिका अथवा कल्याणचरित्र, ( ३ ) बालबोधामृतसार, ( ४ ) भक्तालाप

**पुष्प ३ रें**:–( १ ) परमानुभव प्रकाश, ( २ ) ब्रह्मोपदेश, ( ३ ) आत्मज्योति, ( ४ ) अनुभववल्ली भाग १ व २

**पुष्प ४ थें**:–( १ ) भक्तोद्गार किंवा प्रेमभेट, ( २ ) श्रीपंतांचीं १११ पत्रें.

**पुष्प ५ वें**:–( १ ) श्रीपंतांचीं ८० पत्रें, ( २ ) श्रीमद्भगवद्गीतासार, ( ३ ) श्रीपंतांचे २४ स्फुट लेख

**पुष्प ६ वें**:–( १ ) श्रीपंतांचे १०९ स्फुट लेख, ( २ ) कानडी पदें २८ ( बालबोध लिपींत )

**पुष्प ७ वें**:–श्रीपंतांचे बोल ( पराग १–७० )

**पुष्प ८ वें**:–( १ ) श्रीपंतांचे बोल ( पराग ७१–१२० )

सर्व पुष्पें टिकाऊ कापडी बांधणींत आहेत; पुष्प नं. १ ची किंमत ३ रुपये, पुष्प नं. २ ते ५ व ८ प्रत्येकीं किंमत १॥ रुपया, पुष्प नं. ६ व ७ चीं किंमत प्रत्येकीं २ रुपये ४ आणे. सर्वांस ट. ह. निराळें पडेल.

## पुस्तकें मिळणेचीं ठिकाणें :—

**( १ ) श्रीपंतग्रंथप्रसारक मंडळ, बाळेकुंद्रीकरांचा वाडा,**
समादेवीगल्ली–बेळगाव.

**( २ ) श्रीपंतग्रंथप्रसारक मंडळ, बाळेकुंद्रीकरांचा वाडा,**
पोस्टः–बाळेकुंद्री खुर्द. मु० बाळेकुंद्री बु०, बेळगाव नजीक S. M. C.